# उत्तरकालीन मुघल

## खंड दुसरा

वुइल्यम इर्विन लिखित व जदुनाथ सरकार संपादित
" LATER MUGHALS "
या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडाचा अनुवाद

अनुवादक :
**प्रा. प्रमोद गोविंद ठोंबरे**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

विलियम इर्विन, आय्. सी. एस्. (रिटा.) यांनी लिहिलेल्या आणि जदुनाथ सरकार, आय्. ई. एस्. यांनी संपादित केलेल्या लॅटर मुघल्स या इंग्रजी ग्रंथाचा श्री. प्रमोद ठोंबरे यांनी केलेला अनुवाद दोन खंडांत प्रसिद्ध झाला. पहिला खंड उत्तरकालीन मुघल, खंड पहिला या नावाने १९७७ साली प्रसिद्ध झाला. हा सदर अनुवादाचा दुसरा खंड उत्तरकालीन मुघल, खंड दुसरा या नावाने आता प्रसिद्ध होत आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर नादिरशाहाचे दिल्लीवर आक्रमण होण्याच्या प्रसंगापर्यंतचा सुमारे बत्तीस वर्षांचा इतिहास इर्विनने बऱ्याच तपशिलानिशी सांगितला आहे. थोडक्यात १७०७ इ.स. ते १७३९ इ.स. या कालखंडाचा, बादशाह बहादुरशहापासून बादशाह मुहम्मदशाह यांच्या राजवटीपर्यंतचा हा इतिहास आहे. पहिल्या ४३२ पृष्ठांच्या खंडात मुख्यत्वेकरून बहादुरशाह, जहाँदरशाह आणि फर्रूससियर यांच्या राजवटींचा तर प्रस्तुतच्या दुसऱ्या खंडात मुहम्मदशाहाच्या राजवटीचा व त्याच्या कारकिर्दीत घडलेल्या नादिरशाहाच्या आक्रमणाचा इतिहास आहे.

पहिल्या खंडात मूळ लेखक इर्विन याचे चरित्रपर टिपण, त्याच्या लेखनकृतींची यादी या गोष्टी आल्या आहेत. या खंडात त्याचे चित्रही घालण्यात आले आहे.

इर्विन (१८४० इ.स.–१९११ इ.स.) याने १८६३ ते १८८८ या काळात ब्रिटिश हिंदुस्थानात इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्ये सेवा बजावली. सामान्यपणे मुघल सल्तनत संपुष्टात आल्यानंतर इंडियन नॅशनल काँग्रेस उदय पावण्यापर्यंतच्या या काळात मुघल सरंजामदारीच्या वारशांविषयीचे खटले चालविण्याच्या निमित्ताने फारशी इतिहाससाधनांचे ज्ञान झाल्याने तो या इतिहास लेखनाकडे आकृष्ट झाला. मुघल अमदानीचा ऱ्हास आणि पतन अशा नावाचा अनेक खंडांचा इतिहास लिहिण्याचा त्याचा मनोदय होता. पण लवकर सेवानिवृत्त होऊनही या दोन्ही वर्षांच्या कालखंडाच्या पहिल्या बत्तीस वर्षांचा काही पक्का तर काही कच्चा इतिहास लिहून, तो निधन पावला. त्याचा कच्चा इतिहास जदुनाथ सरकार यांनी संपादला. आज इतक्या वर्षांनंतरही, त्या कालखंडावरील इर्विन यांचा हा ग्रंथ अग्रगण्य आहे.

दुसऱ्या खंडात, पहिल्या व दुसऱ्या खंडातील मुसलमानी तारखा, त्याची मूळ इंग्रजी तारखांतील रूपांतरे व त्याची खरी रूपांतरे अशी मोठी सूची केवळ मराठी भाषांतरातच आहे. मराठी भाषांतरातील सूचीही मूळ इंग्रजी ग्रंथातील सूचीपेक्षा अधिक विस्तृत आहे.

पहिल्या खंडाप्रमाणेच याही ग्रंथाचे भाषांतर कार्य श्री. प्रमोद ठोंबरे यांनी केले.

# उत्तरकालीन मुघल

## खंड २

## ( १७१९ – १७३९ )

वुईल्यम ईर्विन लिखित व जदुनाथ सरकार संपादित
**“ Later Mughals ”**
या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडाचा अनुवाद

अनुवादक
**प्रा. प्रमोद गोविन्द ठोम्बरे**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

* प्रथमावृत्ती :

ऑगस्ट, १९९८

* प्रकाशक :


सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन,
मुंबई-४०० ०३२.

* © प्रकाशकाधीन

* मुद्रक :

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६ ००३

* किंमत : रु. २४१



उत्तरकालीन मुघल खंड–२ या प्रकाशनाचे
लेखक ख्रिस्तवासी डब्ल्यू. इर्विन (१८४०–१९११)

## निवेदन

वुईल्यम इर्विन (१८४०–१९११) या इतिहासकाराने लिहिलेल्या आणि डॉ. जदुनाथ सरकार यांनी संपादित केलेल्या "Later Mughals" (उत्तरकालीन मुघल) या ग्रंथाचा अनुवाद करण्याची जबाबदारी प्रा. प्र. गो. ठोम्बरे यांच्यावर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने दोन दशकापूर्वी सोपविली होती. या ग्रंथाच्या अनुवादाचा पहिला खंड १९७७ साली मंडळाने प्रकाशित केला होता. या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडाचे हस्तलिखित प्रा. ठोम्बरे यांनी १९८१ साली मंडळास सादर केले होते. अनेक कारणांमुळे या दुसऱ्या खंडाच्या प्रकाशनास अक्षम्य बिलंब झाला. ही वस्तुस्थिती कोणीही मान्य करील. इतक्या दिरंगाईनंतरही हा दुसरा खंड प्रकाशित झाला याचे निदान लेखकास समाधान वाटेल. दोन्ही खंडांचा अनुवाद प्रा. ग. ह. खरे यांच्यासारख्या विख्यात इतिहासकाराने काळजीपूर्वक तपासला आहे. त्यांनी मंडळाला कायमचे उपकृत केले आहे.

इंग्रजी राजवटीत अनेक जेष्ठ अधिकारी कर्तबगार प्रशासक म्हणून नावाजलेले असत. शिवाय त्यांच्यापैकी काहीजण भारताचा इतिहास, येथील समाजव्यवस्था, संस्कृती यांचा अनेक वर्षे चिकित्सक अभ्यास करून त्यावर आधारलेले ग्रंथ लिहून प्रकाशित करीत असत. वुईल्यम इर्विन यांनी महसूल खात्यात मोठी अधिकारपदे भूषविली. सेवानिवृत्तीसाठी त्या काळात रूढ असलेली वयोमर्यादा गाठण्यापूर्वीच वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी ते निवृत्त झाले. फार्सी, उर्दू, हिंदी वगैरे भाषांवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. अनेक दुर्मिळ हस्तलिखितांचा त्यांनी संग्रह केला होता. याखेरीज युरोपीय भाषांतील अस्सल कागदपत्रांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला होता. १७०७ मध्ये औरंगजेब बादशहा कालवश झाल्यानंतर मुघल साम्राज्याला अवकळा आली. मुघल साम्राज्याचा ऱ्हास आणि पाडाव याच्याबद्दलचा सुमारे एक शतकाचा समग्र इतिहास लिहिण्याचा इर्विन यांचा इरादा होता. मात्र, त्यांचा संकल्प त्यांच्या मृत्युमुळे पूर्णपणे सिद्धीस गेला नाही. "उत्तरकालीन मुघल" या द्विखंडात्मक ग्रंथात १७०७ ते १७४० पर्यंतच्या कालखंडाची समग्र हकिगत त्यांनी सांगितली आहे.

८०० वर पृष्ठे असलेल्या या मूळ इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद करणे हे चिकाटीचे आणि जिकिरीचे काम होते. ते प्रा. प्र. गो. ठोम्बरे यांनी यशस्वीरित्या पार पाडले आहे. हा ग्रंथ वाचकांनाही आवडेल असा विश्वास वाटतो.

**य. दि. फडके**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

मुंबई,
दि. १६ मार्च, १९९४

---

## भाषांतरकाराचे दोन शब्द

स्टोरिया दो मोगोर, आर्मी ऑफ दि इंडियन मुघल्स वगैरे ग्रंथांचा कर्ता वुइल्यम इर्विन ( आय्. सी. एस्. रिटायर्ड ) या लेखकाच्या Later Mughals खंड १ या ग्रंथाचा 'उत्तरकालीन मुघल' ( खंड पहिला ) या नावाखाली झालेला, माझा मराठी अनुवाद महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती-मंडळ, मुंबई यांनी १९७९ साली प्रसिद्ध केला. त्यानंतर आता सदर ग्रंथाच्या दुसऱ्या खंडाचा, माझा मराठी अनुवाद प्रसिद्ध होण्याचा योग येत आहे. यामुळे इर्विनचा, सदरचा संपूर्ण ग्रंथ आता मराठी वाचकांना उपलब्ध होत आहे, याचे समाधान वाटते.

Later Mughals या ग्रंथाविषयी आपले संकल्प सिद्धीस जाण्यापूर्वीच इर्विनचे निधन झाले. पण निधनापूर्वी ग्रंथातील बराचसा भाग निरनिराळ्या शोधनिबंध–पत्रिकांतून वगैरे प्रसिद्ध झाला होता; काही अजून अप्रकाशित वा असंस्कारित होता. म्हणून विख्यात इतिहासकार कै. जदुनाथ सरकार यांनी तो संपादित केला. घटनाक्रमातील दुवे जोडण्यासाठी त्यांनी पदरचा मजकूर, आपला नावनिशीवार उल्लेख करून, त्यात घातला. दुसऱ्या खंडात कै. जदुनाथ सरकारकृत मजकूर बराच आला आहे. तो नेमका कोणता आहे, हे वाचकांना एका दृष्टिक्षेपात कळावे म्हणून अनुक्रमणिकेत त्या त्या विभागापुढे व प्रकरणापुढे ( * ) अशी खूण केली आहे.

पहिल्या खंडात इर्विनचे चित्र टाकण्याचे जमले नाही. ती चूक या दुसऱ्या खंडात सुधारली आहे. पहिल्या खंडात कै. जदुनाथ सरकारलिखित 'वुइल्यम इर्विन : चरित्ररेखा' नामक बावीस पृष्ठांचा लेख तसेच 'वुइल्यम इर्विन याच्या प्रकाशित वाङमयाची सूची', इर्विनची प्रस्तावना, पहिल्या खंडाचे भाषांतरकाराचे दोन शब्द, ग्रंथात आलेल्या संक्षेपांचा खुलासा या दुसऱ्या खंडात उपयुक्त असलेल्या मजकुराची पुनरुक्ती केलेली नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी त्यामुळे दोन्ही खंड एकत्रित संग्रहित करण्याची उचित गरज निर्माण झाली आहे.

मूळ इंग्रजी ग्रंथास, कै. जदुनाथ सरकार यांच्या सांगण्यावरून श्री. बिजयनाथ सरकार बी. ए., सी. इ., यांनी तयार केलेली सूची आहे. सदर सूची दोन्ही खंडांची मिळून छापील बारा पृष्ठांची भरते. तेव्हा ती सूची संक्षिप्त आहे यात शंका नाही. सदर ग्रंथाचे कोशसदृश स्वरूप पाहाता, ग्रंथास विस्तृत सूची असावी असे मला वाटले. तदनुसार पहिल्या खंडास नामसूची व स्थलसूची यांनी युक्त अशी विस्तृत, सुमारे तीस छापील पृष्ठांची सूची मी जोडली. हा उपक्रम दुसऱ्या खंडातही, सूची आणखी वर्गीकृत करून, कायम ठेवला आहे. दुसऱ्या खंडाची ही वर्गीकृत सूची २७ छापील पृष्ठांची झाली आहे. या तपशीलवार सूचीचा वाचकांना उपयोग होईल.

पहिल्या खंडाचे भाषांतर तपासताना प्रसिद्ध इतिहासकार प्रा. ग. ह. खरे यांनी, इर्विनची मुसलमानी तारखांची इंग्रजी तारखांतील रूपान्तरे चुकली आहेत, असा अभिप्राय दिला होता. अभ्यासू वाचकास याची शहानिशा करता यावी व त्यांतून निघालेले निष्कर्ष ग्रंथाच्या मजकुरात लगेच वापरता यावेत यासाठी सूचीच्या अगोदर, ग्रंथात आलेल्या

मुसलमानी तारखा आणि इर्विनने त्याची केलेली इंग्रजी तारखांतील रूपान्तरे, पहिल्या व दुसऱ्या खंडात ज्या क्रमाने आली आहेत, त्या क्रमाने पृष्ठवार दिली आहेत. त्यावरून इर्विनच्या चुका झाल्या आहेत काय व झाल्या असल्यास दुरुस्ती काय हवी याची शहानिशा अभ्यासू वाचक स्वतःशी करू शकतील. तारीख दुरुस्त करण्याचा प्रसंग उद्भवल्यास इंग्रजी तारखेसमोरच्या सूचीतील रिकाम्या जागेत, दुरुस्त तारखेची नोंद करून ठेवावी. वाचकास ही सोय उपलब्ध व्हावी यासाठीच तारखांची सूची तयार करण्याचे कष्ट मी घेतले. हे पाहून डॉ. ग. ह. खरे यांनी दुरुस्त तारीख लिहिण्यासाठी ठेवलेल्या रिकाम्या जागा दुरुस्त तारखांनी भरून टाकल्या, दुरुस्त तारखांचे श्रेय डॉ. ग. ह. खरे यांचे आहे. त्यामुळे चिकित्सक वाचकांची चांगली सोय झाली आहे.

मी इतिहासाचा प्राध्यापक नाही किंवा Later Mughals च्या पहिल्या खंडाच्या मराठी भाषांतराचे काम पत्करीपर्यंत, मी कोणत्याही औपचारिक अर्थाने इतिहासाभ्यासी नव्हतो. शिवाय असल्या मानक अथवा प्रमाणित अनुवादाच्या ( म्हणजे मराठी वाचकांच्या माथी पडणाऱ्या स्वैरानुवादाच्या किंवा भावानुवादाच्या विरुद्ध टोकाच्या अशा ) क्षेत्रातही माझे ते पदार्पणच होते. भाषांतर चळवळीतील एक म्हणून, मी हे काम शिरावर घेतले होते. बहुधा प्रा. ग. ह. खरे यांच्या अभिप्रायामुळे दुसऱ्या खंडाचे कामही मजकडे आले. पहिल्या खंडाच्या वाचकमित्रांनी भाषांतराबद्दल दिलेल्या अभिप्रायामुळे हुरूप येऊन, दुसऱ्या खंडाचे भाषांतर, पहिल्याच्या मानाने फारच कमी वेळात, मी संपवू शकलो. हे हस्तलिखित मी प्रकाशकास १९८० साली सादर केले. दरम्यानच्या काळात, इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्चसाठी The Rise of Business Corporations in India या आर्थिक इतिहासावरील प्रबंधाच्या मराठी भाषांतराचे काम मी पुरे केले होते. त्याचाही अनुकूल परिणाम झाला असावा. लहानपणी शाळेत असताना, माझे शिक्षक आणि माझे आई-वडील यांनी माझी भाषाविषयक तयारी करून घेतली; त्याचाही मला आता लाभ होत असावा.

शाळेत वा महाविद्यालयात इंग्रजी व मराठी विषयात भाषांतरासाठी उतारे देण्यात येतात. त्यावेळी या पुस्तकासारख्या भाषांतर मालेतील पुस्तकातील आणि त्यांच्या मूळ इंग्रजी ग्रंथांतील उतारे विद्यार्थ्यांना घालण्यात यावेत; म्हणजे भाषांतराचे अखंड परीक्षण होत राहील, असे मला वाटते. जोपर्यंत आपण केलेल्या भाषांतरापेक्षा भाषांतरकाराने केलेले भाषांतर सरस वाटेल तोपर्यंत भाषांतरकाराच्या संस्थेची गरज त्या त्या वाचकाला राहील, असा माझा कयास आहे.

पेलेल की नाही असे प्रथमदर्शनी वाटलेले काम अखेर पूर्णपणे तडीस नेल्याचे समाधान आता मला वाटत आहे. ग्रंथातील संशोधनप्रचुरतेला न जुमानता ग्रंथ वाचत जाण्याचा हिय्या केल्यास, इतिहासाभ्यासी वाचकाबरोबरच सामान्य, जिज्ञासू वाचकाला देखील, सदर ग्रंथ निदान ऐतिहासिक कादंबरीइतका, खास मनोरंजक वाटेल असा मला विश्वास आहे.

पहिल्या खंडात, मूळ ग्रंथाप्रमाणे, तळटीपासाठी चिन्हे वापरली होती. मुद्रणाच्यावेळी होऊ शकणारे घोटाळे लक्षात घेऊन दुसऱ्या खंडात, प्रत्येक प्रकरणासाठी तळटीपांचे स्वतंत्र आकडे क्रमवार वापरले आहेत. त्यामुळे टीप गळण्याची अथवा एकाचा खुलासा दुसऱ्यास जोडला जाण्याची शक्यता दुरावली आहे.

ग्रंथाच्या मुद्रणाबद्दल व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर व प्रकाशनाबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांचा मी ऋणी आहे. हा दुसरा खंड देखील सिद्ध करण्याच्या कामी ग्रंथाच्या सर्व अवस्थांत, माझी पत्नी सुप्रिया हिची मला सर्व प्रकारची मदत झाली हे नमूद करणे जरुरीचे आहे. पहिल्या खंडाप्रमाणे याही खंडाचे भाषांतरपरीक्षण प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ प्रा. ग. ह. खरे यांनी अत्यंत चिकित्सकपणे करून दुरुस्त्या व सुधारणा सुचविल्या. त्यामुळे भाषांतराची उपयुक्तता वाढली यात शंका नाही.

कोल्हापूर, **प्रा. प्रमोद गोविन्द ठोम्बरे**
दि. १५ ऑगस्ट १९८१ भाषान्तरकार

**ताजा कलम :** १९८१ साली प्रकाशकास दिलेले हस्तलिखित खरोखर प्रकाशात येण्यास तब्बल एक तप खर्ची पडले. मधल्या काळात, हे पुस्तक प्रसिद्ध झाल्याचे ज्यांना खास आवडले असते ते माझे वडील तसेच भाषांतराचे परीक्षक प्रा. ग. ह. खरे हे दोघेही निवर्तले. मुद्रिते हातावेगळी करण्यासही खूप विलंब झाला. तरीपण पुस्तक एकदाचे प्रसिद्ध होत आहे याचे समाधान वाटते. मला इंटर आर्टस्च्या वर्गात इतिहास शिकविणारे डॉ. अ. रा. कुलकर्णी यांना अल्पसे समाधान मी या कामाद्वारे देऊ शकेन असे वाटते.

ईविनकृत अनन्यसाधारण ग्रंथाच्या दोन्ही खंडांच्या मिळून आठशेच्यावर पृष्ठांचे भाषांतर मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्याचे मजहातून घडले त्यास कित्येकांच्या उत्तेजनाचा हातभार लागला. (कै.) डॉ. आप्पासाहेब पवार, श्री. बा. रं. सुंठणकर, प्रा. अ. के. भागवत, डॉ. अ. रा. कुलकर्णी, श्री. अ. चिं. टिकेकर यांचा उल्लेख अटळ आहे.

मुद्रिते मजकडून चिकाटीने तपासून घेण्याचे काम म. रा. सा. सं. मंडळाच्या पुणे कार्यालयाचे श्री. प्र. मा. पवार यांनी करून मला सुखद धक्का दिला. त्यांच्या तगाद्यांमुळे या पुस्तकाच्या प्रकाशनाबाबतचे माझे हरपलेले स्वारस्य मला पुन्हा लाभण्यास मदत झाली.

पुस्तक-प्रकाशनाबद्दल प्रकाशकाचे आभार.

२, गोपाळनगरी, **प्रा. प्रमोद गोविन्द ठोम्बरे,**
९४, शुक्रवार, पुणे–२, भाषान्तरकार.
२६ जानेवारी १९९४.

# संक्षेपांचा खुलासा

अली हझीन— बेल्फोरकृत 'मेम्वार ऑफ शेख अली हझीन' (ओ. टि. एफ्.)

आनंदराम— तजकिरह् (अलीगढ, कॉल्. मॅन्युस्क्रि.)

बयान— बयान–इ–वाकिअ, अब्दुल्लकरीम काश्मीरी–कृत. (प्रकरण क्र. ११ ते १३ साठी लाहोर पब्लिक लायब्ररीमधील हस्तलिखित तर इतरत्र ब्रिटिश म्यूझियम-मधील प्रत वापरली आहे.)

बुर्हान— बुर्हानुल्फुतूह.

क्रॉनिकल— दिल्ली क्रॉनिकल; इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स् कमिशन १९२१ च्या वृत्तान्तात जदुनाथ सरकार यांनी वर्णिलेले एक फार्सी हस्तलिखित.

हॅन्वे— ट्रॅव्हल्स, तिसरी आवृत्ती.

हरचरण दास—चहार गुलजार–इ–शुजाई (जदुनाथ सरकार यांचे हस्तलिखित, आता नॅशनल लायब्ररी, कलकत्ता येथे.)

इमाद— इमादुस्सआदत, गुलाम अलीकृत (शिळाछाप)

जहान किंवा जहानकुशा— तारीख–इ–जहानकुशा–इ–नादिरी; मिर्झा महदीकृत (शिळा, मुंबई)

खिज्रखान— सवानिह–इ–खिज्री

मिरात—मिरात–इ–अहमदी, मुहम्मद अलीखानकृत

नादिरशाह— फ्रेजरचे नादिरशाह

राज— मराठ्यांच्या इतिहासाची साधने, संपादक वि. का. राजवाडे

शाकीर— तजकिरा, शाकीरखानकृत. (जदुनाथ सरकार यांचे हस्तलिखित, आता नॅशनल लायब्ररी, कलकत्ता येथे.)

तिलोक दास— ज. ए. सो. बे., (१८९७) मधील नादिरशाह आणि मुहम्मदशाह यांच्यावरील कवन.

# अनुक्रमणिका


| प्रकरण व विभाग क्र. | तपशील | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| निवेदन | | | तीन |
| भाषांतरकाराचे दोन शब्द | | | पाच |
| संक्षेपांचा खुलासा | | | नऊ |
| **प्रकरण सहावे** | **सय्यिदांच्या पालकत्वाखालचा मुहम्मदशाह १७१९–१७२०** | | **१ ते ८२** |
| १ | राज्यारोहण | .. | १ |
| २ | सवाई जयसिंगाशी सलोखा | .. | २ |
| ३ | बादशाह फतहपूरहून आग्र्यास जातो | .. | ४ |
| ४ | बुंदीविरुद्धची मोहीम | .. | ४ |
| ५ | छबेला राम आणि गिरिधर बहादुर अल्लाहाबादेस येतात | .. | ७ |
| ६ | निजामुलमुल्क माळव्यातून दख्खनला सटकतो | .. | १३ |
| ७ | दिलावर अलीखानाचा पराभव आणि मृत्यू | .. | २२ |
| ८ | सय्यिद बंधू गोंधळून जातात | .. | २७ |
| ९ | मुहम्मद अमीनखानावर हल्ला | .. | २९ |
| १० | निजामुलमुल्काचा आलिम अलीखानाशी लढा | .. | ३१ |
| ११ | दख्खनची खबर आग्र्याला पोहोचते | .. | ४० |
| १२ | बादशाहाचे दक्षिणेकडे कूच | .. | ४२ |
| १३ | हुसैन अलीखानाचा वध | .. | ४५ |
| १४ | भावाच्या मृत्यूची खबर अब्दुल्लाहखानाच्या कानी येते | .. | ५३ |
| १५ | मुहम्मदशाहाच्या हालचाली | .. | ५४ |
| १७ | अब्दुल्लाहखान तक्रार करतो | .. | ५८ |
| १८ | शाहझादा मुहम्मद इब्राहीम याला तख्तावर बसवितात | .. | ६० |
| १९ | बादशाह मुहम्मदशाह याचे आगेकूच | .. | ६६ |
| २० | लढाईची तयारी | .. | ६६ |
| २१ | हसनपूरची लढाई | .. | ६८ |
| २२ | शाहझादा इब्राहीमला पकडतात | .. | ७५ |
| २३ | अब्दुल्लाहखानाचा शेवट | .. | ७६ |
| २४ | दोघे सय्यिद : त्यांचा स्वभाव आणि वर्तन | .. | ७८ |

## अनुक्रमणिका—चालू


| प्रकरण व विभाग क्र. | तपशील | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| **प्रकरण सातवे** | **मुहम्मदशाहाची कारकिर्द : १७२०–१७२५** | .. | **८३ ते १२५** |
| २५ | मुहम्मदशाह दिल्लीला परतल्यावर झालेल्या नव्या नेमणुका | .. | ८३ |
| २६ | मुहम्मद अमीनखानाचा मृत्यू | .. | ८४ |
| २७ | नवा वजीर निजामुल्मुल्क | .. | ८६ |
| २८ | राजा अजितसिंग राठोड याचे बंड | .. | ८८ |
| २९ | अजितसिंगाचा त्याच्या मुलाकरवी खून | .. | ९३ |
| ३० | अली मुहम्मदखान रोहिला याचा उदय | .. | ९५ |
| ३१ | जाट लोक | .. | ९८ |
| ३२ | मुहम्मदशाहाचा विवाह आणि त्याचा दिनक्रम | .. | १०१ |
| ३३ | भारतीय सालोमनच्या भूमिकेत मुहम्मदशाह | .. | १०२ |
| ३४ | निजामुल्मुल्काची गुजरातची आणि माळव्याची मोहीम | .. | १०३ |
| ३५ | निजामुल्मुल्क वजीरी सोडतो आणि दक्षिणेला परततो | .. | १०६ |
| ३६ | खन्नाची हकीकत | .. | १०८ |
| ३७ | निजामुल्मुल्क संघर्ष थांबवितो | .. | १०९ |
| ३७ | दक्षिणेत निजामुल्मुल्कावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न | .. | ११२ |
| ३८ | निजामुल्मुल्काशी लढण्यास मुबारिझखान सज्ज होतो | .. | ११६ |
| ३९ | साखरखेडल्याची लढाई | .. | ११८ |
| ४० | निजामुल्मुल्काच्या विजयानंतरच्या हालचाली | .. | १२२ |
| ४१ | निजामुल्मुल्काचे मुहम्मदशाहास पत्र | .. | १२४ |
| **प्रकरण आठवे** | **गुजरातेतील मराठे : १७३० पर्यंतचा काळ** | .. | **१२६ ते १७५** |
| ४२ | मराठे लोक आणि त्यांचा देश | .. | १२६ |
| ४३ | शिवाजी : त्याचा जीवनमार्ग | .. | १२९ |
| ४४ | औरंगजेबाची मराठ्यांशी युद्धे | .. | १३० |
| ४५ | १७०७ नंतरच्या मराठ्यांतील घटना | .. | १३१ |
| ४६ | गुजरातेत मराठे | .. | १३४ |
| ४७ | हमीदखानाचा कारभार | .. | १३६ |
| ४८ | गुजरातेत हमीदखानाच्या जागी शुजाअतखान येतो | .. | १३७ |
| ४९ | शुजाअतखान ठार होतो | .. | १३९ |
| ५० | इब्राहीम कुलीखानाचा मृत्यू | .. | १४० |
| ५१ | रुस्तम अलीखानचे कूच व मृत्यू | .. | १४२ |

अनुक्रमणिका–चालू


| प्रकरण व विभाग क्र. | तपशील | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ५२ | हमीदखान आणि मराठे यांनी केलेल्या वसुलीचा जुलूम | .. | १४९ |
| ५३ | गुजरात व्यापण्यासाठी सरबुलंदखानाची तयारी | .. | १५० |
| ५४ | सरबुलंदखान अहमदाबादेत प्रवेश करतो; हमीदखान दख्खनला परततो. | .. | १५१ |
| ५५ | मराठे परत येतात | .. | १५४ |
| ५६ | सरबुलंदखानचा गुजरातमधील कारभार | .. | १५६ |
| ५७ | गुजरातेत मराठे, ऑक्टोबर १७२६ ते जून १७२७ | .. | १५८ |
| ५८ | गुजरातमधील घडामोडी, ऑक्टोबर १७२७ ते जून १७२८ | .. | १६० |
| ५९ | गुजरातमधील घडामोडी, ऑक्टोबर १७२८ ते जून १७२९ | .. | १६१ |
| ६० | गुजरातेतील घडामोडी, ऑक्टोबर १७२९ ते जून १७३० | .. | १६२ |
| ६१ | शेख अब्दुल्लाह याच्या नेतृत्वाखाली बोहरा मंडळींचा उठाव | .. | १६३ |
| ६२ | आपला उत्तराधिकारी महाराजा अभयसिंग याशी प्रतिकार करण्यासाठी सरबुलंदखान सज्ज होतो. | .. | १६५ |
| ६३ | महाराजा अभयसिंग राठोडला दिल्लीहून गुजरातेस पाठवितात. | .. | १६६ |
| ६४ | अहमदाबादेवर कब्जा मिळविण्यासाठी अभयसिंग आणि सरबुलंदखान यांची लढाई. | .. | १६७ |
| ६५ | सरबुलंदची फौज पांगते | .. | १७० |
| ६६ | सरबुलंदखान आणि अभयसिंग यांमधील वाटाघाटी | .. | १७२ |
| ६७ | अभयसिंग अहमदाबादेत प्रवेश करतो; सरबुलंद गुजरात सोडतो. | .. | १७३ |
| ६८ | सरबुलंदखानाचे अखेरचे दिवस | .. | १७४ |
| **प्रकरण नववे** | **बुंदेलखंड आणि माळवा : १७२०–१७३६** | .. | **१७६ ते २१०** |
| ६९ | बुंदेलखंड : देश आणि लोक | .. | १७६ |
| ७० | जुझारसिंगाचे जीवन आणि त्याचा अंत | .. | १७९ |
| ७१ | चंपतराय बुंदेला याची कारकिर्द | .. | १८१ |
| ७२ | चंपतरायाचे पलायन व मृत्यू, इ. १६६१ | .. | १८३ |
| ७३ | राजा छत्रसाल याची इ. १७२० पर्यंतची कारकिर्द | .. | १८६ |
| ७४ | मुहम्मदखान बंगश बुंदेलखंडाच्या मोहिमेवर निघतो | .. | १८८ |
| ७५ | मुहम्मदखानाचे लढ्याबाबत खलिते | .. | १९१ |

## अनुक्रमणिका—चालू


| प्रकरण व विभाग क्र. | तपशील | पृष्ठ |
|---|---|---|
| ७६ | मुहम्मदखान बंगश याच्या मार्गात अडचणी येतात व तो माघार घेतो. .. | १९४ |
| ७७ | छत्रसालाच्या मदतीसाठी बाजीराव बुंदेलखंडात येतो .. | १९५ |
| ७८ | मुहम्मदखानाची बुंदेलखंडातून अखेरची माघार, १७२९ .. | १९७ |
| ७९ | मराठ्यांच्या माळव्यातील प्राथमिक कुरापती .. | १९८ |
| *८० | मराठ्यांनी माळव्यात पाय कसे रोवले? (मजकूर संपादकाचा) | १९९ |
| *८१ | भवानीरामने केलेला माळव्याचा कारभार (मजकूर संपादकाचा) | २०० |
| *८१ | दया बहादुराने केलेला माळव्याचा कारभार (मजकूर संपादकाचा) | २०२ |
| ८२ | मुहम्मदखान बंगश याची माळव्यावर मोहीम, पहिले वर्ष .. | २०४ |
| ८३ | मुहम्मदखानाची माळव्यातील मोहीम, दुसरे वर्ष .. | २०८ |
| **प्रकरण दहावे** | **मुहम्मदशाह : त्याचे दरबार व्यवहार, १७२१–१७३३ आणि उत्तर हिंदुस्थानात मराठे, १७३२–१७३८** .. | २११ ते २५२ |
| ८४ | दिल्लीतील चांभारांची दंगल .. | २११ |
| ८५ | दरबारातील गट आणि दरबारची लाडकी मंडळी (१७२१ ते १७३४) .. | २१६ |
| ८६ | शाह अब्दुल् गफूर त्याचे जीवनकार्य आणि त्याचा प्रभाव .. | २१९ |
| ८७ | अब्दुल् गफूर याचे पतन .. | २२३ |
| ८८ | शाह अब्दुल् गफूर याच्या अधःपतनाची आणखी एक हकीकत. .. | २२५ |
| ८९ | मराठ्यांची वाढती आक्रमणे (१७३२–१७३५) .. | २२६ |
| ९० | ११४८–४९ हिजरीची मोहीम; मुहम्मदशाहाच्या कारकिर्दीचे १८ वे वर्ष (१ ऑक्टोबर १७३५ – ३० जून १७३६). .. | २३१ |
| ९१ | ११४९–५० हिजरीमधील मोहीम, मुहम्मदशाहाच्या कारकिर्दीचे १९ वे वर्ष (१ ऑक्टोबर १७३६ – ३० जून १७३७). .. | २३५ |
| ९२ | बाजीराव दिल्लीवर हल्ला करतो .. | २३७ |
| ९३ | बाजीराव आणि वजीर यांमधील लढाई .. | २४४ |
| ९४ | ११५०–५१ हिजरीची मोहीम—मुहम्मदखानाच्या कारकिर्दीचे २० वे वर्ष, (१ ऑक्टोबर १७३७ ते ३० जून १७३८) .. | २४७ |
| ९५ | भोपाळला बाजीरावाने वेढलेला निजाम अवहेलनाकारक सलोखा करतो. .. | २४९ |

## अनुक्रमणिका—चालू


| प्रकरण व विभाग क्र. | तपशील | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| * प्रकरण अकरावे | **१७३८ इ. मधील भारतातील अंतर्गत परिस्थिती नादिरशाह याचा उदय व उत्कर्ष.** (मजकूर संपादकाचा) | .. | **२५३ ते २७२** |
| ९७ | मुघल उमरावशाहीचा ऱ्हास | .. | २५३ |
| ९८ | हिंदू आणि शिया लोकांना जाणवणारा परकेपणा | .. | २५४ |
| ९९ | उत्तरकालीन मुघलांचे कमकुवत व्यक्तिमत्व | .. | २५६ |
| १०० | दरबारातील गटबाजी आणि तिचे परिणाम | .. | २५८ |
| १०१ | सफवी राजवंशाचा ऱ्हास होतो आणि अफगाण इराण बळकावतात. | .. | २६० |
| १०२ | नादिर इराणची मुक्तता करतो आणि स्वत: राजा बनतो | .. | २६२ |
| १०३ | इराणी सरकार आणि मुघल साम्राज्य यांतील राजनैतिक बिघाडाची कारणे. | .. | २६५ |
| १०४ | अफगाणिस्तान आणि पंजाब याच्याकडे झालेले दुर्लक्ष आणि त्यांची संरक्षणविहीन अवस्था. | .. | २६६ |
| १०५ | नादिर मुघलांकडून उत्तर अफगाणिस्तान जिंकून घेतो | .. | २७० |
| * प्रकरण बारावे | **नादिरशाहाचे भारतावरील आक्रमण** (मजकूर संपादकाचा) | .. | **२७३ ते ३००** |
| १०६ | पेशावर आणि लाहोर यांवर नादिरशाह कब्जा करतो | .. | २७३ |
| १०७ | नादिर लाहोरहून कर्नाळला कूच करतो | .. | २७७ |
| १०८ | नादिरच्या आक्रमणाच्या समयी शाही दरबारची हालहवाल | .. | २७८ |
| १०९ | कर्नाळ येथील प्रतिस्पर्धी फौजा, शाही छावणी | .. | २८० |
| ११० | नादिर कर्नाळ येथे हिंदुस्थानी फौजेच्या संपर्कात येतो; फेब्रुवारी १२ | | २८२ |
| १११ | कर्नाळला हिंदुस्थानी पक्ष लढतीसाठी बाहेर पडतो | .. | २८३ |
| ११२ | कर्नाळची लढाई, फेब्रुवारी १३ | .. | २८७ |
| ११३ | भारतीय पक्षाचा पराभव आणि त्यांची झालेली हानी | .. | २८९ |
| ११४ | हिंदुस्थानींच्या कर्नाळ येथील पराभवाची कारणे | .. | २९१ |
| ११५ | नादिरशहाबरोबर शांततेच्या वाटाघाटी | .. | २९३ |
| ११६ | बादशाह आणि उमराव यांना नादिर तुरुंगात टाकतो | .. | २९७ |

## अनुक्रमणिका—समाप्त


| प्रकरण व विभाग क्र. | तपशील | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| * प्रकरण तेरावे | नादिरशाह दिल्लीत; तो दिल्लीहून परततो (मजकूर संपादकाचा) | | ३०१ ते ३१७ |
| ११७ | बादशाहाच्या पराभवानंतर दिल्ली शहराची स्थिती | .. | ३०१ |
| ११८ | नादिरशाह आणि बादशाह दिल्लीतील राजमहालात प्रवेश करतात. | .. | ३०२ |
| ११९ | दिल्लीतील जनता इराण्यांविरुद्ध उठाव करते | .. | ३०४ |
| १२० | नादिरने केलेली दिल्लीतील कत्तल | .. | ३०६ |
| १२१ | दिल्लीतून खंडणी उकळली जाते | .. | ३०९ |
| १२२ | नादिरचे दिल्लीहून प्रयाण | .. | ३१२ |
| १२३ | नादिराच्या प्रयाणानंतर हिंदुस्थानची स्थिती | .. | ३१५ |
| परिशिष्टे | | | ३१८ ते ३५७ |
| (अ) | मुसलमानी तारखांच्या इंग्रजी तारखांतील रूपांतरांची सूची (खंड १) व (खंड २) | | ३१८ |
| (आ) | सूची—नामसूची व स्थलसूची | .. | ३३७ |


**टीपा :**

(१) मूळ इर्विनकृत इंग्रजी ग्रंथात अनुक्रमणिका प्रकरणवार तेवढी आहे, विभागवार अशी दिलेली नाही. प्रकरणाच्या पोटात उपविषय दिलेले आहेत. शिवाय प्रत्येक विषम पृष्ठावर प्रतिपादित विषयाचा मथळा शिरोभागी छापला आहे. मराठी भाषांतरात ही पद्धत अनुसरलेली नाही. त्याऐवजी प्रकरणवार आणि विभागवार अनुक्रमणिका अधिक सोयिस्कर वाटल्यावरून ती तशी पहिल्या व दुसऱ्या भागात दिली आहे.

(२) इर्विनकृत मूळ इंग्रजी ग्रंथात विभाग १६ हा आकडा नाही; तसेच विभाग ३७ व ८१ हे आकडे दोन-दोन विभागांना एका पाठोपाठ पडले आहेत व विभाग ९५ नंतर विभाग ९७ असा आकडा छापलेला आहे. हे मुद्रणदोषही असावेत. पण भाषांतरात ते सुधारलेले नाहीत. मुद्रणदोष समजून सुधारणा केली असती तर इर्विनचे विभाग क्रमांक आणि मराठी भाषांतरातील विभाग क्रमांक यांतील समानता नष्ट झाल्याने, वाचकांची गैरसोयदेखील होऊ शकली असती.

(३) (*) अशी खूण केलेले विभाग वा प्रकरणे जदुनाथ सरकारलिखित आहेत.

**——भाषान्तरकार**

प्रकरण सहावे

# सय्यिदांच्या पालकत्वाखालचा मुहम्मदशाह
## १७१९–१७२०

### १ : राज्यारोहण

रफीअ-उद्दौलह याचा मृत्यू आणि त्याच्या वारसाचे आगमन या दोन घटनांमधील अल्प दिवसांच्या काळात, वजीर आणि त्याचा भाऊ शिरस्त्याप्रमाणे दररोज शाही निवासात भेटीस जात व मानाची वस्त्रे बहाल झाल्याचे आणि ती नव्यानेच बहाल झाल्याचे दर्शवीत परत येत; अशा प्रकारे, त्यांनी, बादशाह अजून जिवंत आहे असा विश्वास सामान्य माणसांत जागृत ठेवून त्यांची एकप्रकारे फसवणूकच केली.[१]

शेवटी, ११ जिल्काद ११३१ हिजरी ( २४ सप्टेंबर १७१९ ) रोजी, फत्तेपूर सिक्रीच्या उत्तरेस तीन कोसांवर असलेल्या बिद्यापूरच्या छावणीत गुलाम अलीखान याचे आगमन झाले. बादशाह बहादुरशाह याचा चवथा मुलगा मरहूम खुजिस्ता अख्तर, जहान शाह याचा मुलगा शाहझादा रोशन अख्तर यास त्याने बरोबर आणले होते.[२] आता ( म्हणजे २६ सप्टेंबर १७१९ ) रोजी रफीअ-उद्दौलह मरण पावला असल्याचे जाहीर केले. त्याचे शवयान बाहेर काढले व शव दफनासाठी दिल्लीस पाठविले. लगोलग, त्याच्या वारसाच्या राज्यारोहणाची व्यवस्था केली.[३]

हे राज्यारोहण बिद्यापूर[४] येथे १५ जिल्काद ११३१ हिजरी ( २८ सप्टेंबर १७१९ ) रोजी झाले; रोशन अख्तरची, अबुल फतह[५] नासिरुद्दीन, मुहम्मद शाह, बादशाह, गाझी अशी द्वाही फिरविण्यात आली. यावेळी तो देखणा, चांगला बुद्धिमान, तरुण होता; गझनी येथे, २३ रबिलावल १११४ हिजरी ( १६ ऑगस्ट १७०२ इ. ) रोजी त्याचा जन्म झाला असल्याने, राज्यारोहणसमयी त्याचे अठरावे ( चांद्र ) वर्ष चालू झाले होते. नाणी

---

१ शिवदास ३२ ब, नव्याने बहाल झालेली खिलत २४ तास अंगावर चढवून ठेवलेली असे व तिच्यावर आणखी काही घालण्यास परवानगी नव्हती.

२ रुस्तम अली तारीख-इ-हिंदीच्या पान २३७-अ वर सांगतो की शाहझाद्याला यमुनानदी-मार्गाने नावेतून ३ दिवसांत दिल्लीहून आणले.

३ कामवरखान पृ. २११, खाफीखान खंड दोन, पृ. ८४०.

४ पूर्वी सांगितल्याप्रमाणे श्रीयुत रेनॉल्ड्स् यांनी कृपावंत होऊन तहसिलदाराकडून मला मिळवून दिलेल्या अहवालानुसार बिद्यापूरच्या पश्चिमेस ४ मैलांवर ताजपूर नावाचे स्थळ मला आढळले. सदर नाव लक्षात घेता व सदर गावास निरंतरची माफी आहे ही गोष्ट लक्षात घेता सदर ताजपूर हेच तख्तारोहणाचे स्थळ असावे असा माझा कयास आहे.

५ तारीख-इ-मुजफ्फरी पृ. १६६, पण मुकद्दम-इ-शाहआलम-नामाच्या ४५-अ या पृष्ठावर गुलाम अलीखान ३ जमादिलाखर ११३४ हिजरी ( २० मार्च १७२२ ) ही तारीख देतो. "अबुल फतह" याऐवजी "अबुल मुजफ्फर" असा किताबात बदल झाला.

त्याच्या नावे पाडली व खुत्बाही त्याच्या नावे पढण्यात आला; यावेळी असाही आदेश निघाला की, त्याच्या राजवटीच्या आरंभीची तारीख फर्रुखसियरच्या पदभ्रष्टतेच्या तारखेपासून धरावी. बाकी सर्व व्यवस्था यापूर्वीच्या दोन राजवटींप्रमाणेच राहिली आणि नव्या नेमणुकांही झाल्या नाहीत. सार्वभौमाभोवतीची माणसे, पूर्वीप्रमाणेच सय्यिदांनी नेमिलेली होती आणि हिम्मतखान पूर्वीप्रमाणेच शिक्षक व पालक या नात्याने काम करीत होता. प्रत्येक बाबतीत मुहम्मदशाह त्याच्यावर अवलंबून होता; शुक्रवारच्या जाहीर प्रार्थनेस अथवा शिकारीस जावयाचे झाल्यास त्यासाठी तो हिम्मतखानाची परवानगी घेई. बादशाह कूच करीत असता, सय्यिदांची विश्वासू माणसे तरुण बादशाहाभोवती वेढा टाकीत व अशा प्रकारे ते बादशाहाशी संपर्क साधण्यास सर्वांना प्रतिबंध करीत.[६]

## २ : सवाई जयसिंगाशी सलोखा

फत्तेपूर सिक्री येथील शेख सलीम चिश्तीच्या दर्यात प्रार्थना वगैरे करुन बादशाह मुईनुद्दीन चिश्तीच्या दर्याच्या दर्शनासाठी अजमेरला जाईल असा कार्यक्रम यावेळी जाहीर झाला. या कार्यक्रमामागील छुपा हेतू राजा सवाई जयसिंग यावर कुरघोडी करण्याचा होता; कारण फर्रुखसियरच्या पदच्युतीनंतर, आपल्या युद्धखोर उद्दिष्टांना लपवून ठेवणे सवाई जयसिंगास मुश्किल झाल्याचे दिसत होते. त्यास काही रोकड उदेपूरच्या राण्याकडून साहाय्य म्हणून मिळाली होती; तसे त्याने राजकुमाराच्या मंत्र्याला लिहि- लेल्या ४ भाद्रपद संवत् १७७६ ( ९ ऑगस्ट, १७१९ ) या तारखेच्या पत्रावरुन दिसते. सदर पत्रात सवाई जयसिंग ठासून लिहितो की, निजामुल्मुल्क उज्जयिनीहून निघाला असून छबेला रामाने काल्पी येथे यमुना ओलांडली आहे; पण ही दोन्ही निवेदने खोटी होती.[७] आग्र्यातील पुंडाव्याबाबत समजल्यावर, मोठा गाजावाजा करुन तो आपल्या आंबेरच्या राजधानीबाहेर पडला. मृत्यू अथवा विजय, अशा निकराच्या निर्धारावर राजपूत चालून येत तेव्हाच्या रीतीनुसार, त्यांनी केशरी वस्त्रे परिधान केली व आपल्या शिरोभागात हिरवे गवत खोवले.[८] सवाई जयसिंगाने जाहीरपणे सांगितले की, आंबेर शहर पवित्र दान म्हणून ब्राह्मणांना अर्पण केले आहे. आग्र्याच्या नैर्ऋत्येस ८० मैलांवर असलेल्या परगणा तोडाच्या तलावापर्यंत तो चाल करुन गेला; घटना कशा घडतात याची वाट पाहात तेथे थांबला. सय्यिद दिलावर अलीखान याच्या फौजांची त्याच्यावर नजर होती; त्यामुळे त्याची उत्तरेकडील चाल रोखली गेली. ( कासिम २९४, टॉड खंड एक, ३८०. )

६ कामवरखान पृ. २१३; तारखेबाबत खुशहालचंद हा बर्लिन हस्तलिखित क्र. ४९५ पान ९९५-अ यावर सांगतो, " जिल्कादच्या मध्यास ".

७ त्याच्या युद्धखोरपणाला आणखी चिथावणी देणारे तहव्वुरखान तूरानी, सलाबतखान ( जो पूर्वी मीर आतिश होता ), रुहुल्लाहखान आणि यापूर्वी उल्लेखलेले दिल्लीहून आलेले निर्वासित हे होते.

८ मुहम्मद कासिम याच्या लेखनकृतीत मी ग्याहे म्हणजे 'गवत' असे वाचन केले आहे पण टॉड, खंड एक, पृ. ५०६ यावर माऊर (म्हणजे विवाह-समयीचा वराचा मुकुट) अशासमयी ते परिधान करीत असे सांगतो. बिहार प्रॉव्हर्बस्, पृ. १९७, क्र. ४२६ या ठिकाणी जॉन ख्रिश्चन वेगळ्या शब्दात जो दर्शवितो तोच हा मुकुट असावा. तो सांगतो की वराचा शिरोवेश "Talipot" या वनस्पतीच्या पानांचा आणि काही काही ठिकाणी शिंदीच्या (Date, Plam) पानांचा केलेला असतो." कधीकधी तो खरोखर गवताचा केलेला असतो असा तर्क डब्ल्यू. कूकच्या ट्राईब्स अँड कास्टस् ऑफ दि नॉर्थ-वेस्ट प्रॉव्हिन्सेस्, खंड दोन, पृ. ६२ वरुन काढता येतो.

महाराजा अजितसिंग याने मध्यस्थी करण्याची तयारी दर्शविली होती; पण त्याची ऐश–आरामी कार्यपद्धती, तो आणि त्याचे भाईबंद राजे यांची वेळखाऊपणाची सवय या गोष्टी हुसैन अलीखानाच्या तापट स्वभावाशी जुळणाऱ्या नव्हत्या. या प्रकरणाला चालना देण्याच्या हेतूने फतहपूर सिक्रीहून अजमेरला कूच करण्याचे ठरविले होते. आसपासच्या ठिकाणांकडे थोड्याफार चाली झाल्याही; पण खरेखुरे प्रस्थान ठेवल्यासारखे दिसले नाही. २४ जिल्काद ( ७ आक्टोबर १७१९ ) रोजी तळ मलिकपूर आणि मूमिनाबाद यांमध्ये होता व तेथे हुसैन अलीखान फतहपूरहून मुजऱ्यासाठी आला. २६ तारखेला ( ९ आक्टोबर रोजी ) प्रवासाचा आणखी एक टप्पा पुरा झाला.[१]

१ जिल्हेज ( १४ आक्टोबर १७१९ ) रोजी, दिल्लीहून पाचारलेली बादशाहाची आई–जिला आता नवाब कुदसिया हे अभिधान प्राप्त झाले होते–व अंतःपुरातील अन्य स्त्रिया यांचे तळावर आगमन झाले. बेगमेच्या हालचाली अगदी सावधपणे होत होत्या; सय्यिदांमध्ये संशय निर्माण होईल अशा सर्व गोष्टी तिने टाळल्या. तिच्या मुलाला नेण्यासाठी सय्यिदांचे दूत दिल्लीला आले तेव्हा तिने त्या दूतांचे, मुलासमवेत जाणाऱ्या मंडळींचे, तसेच दिल्लीतील सर्व पदधारकांचे मानाची वस्त्रे देऊन रीतीप्रमाणे सन्मान केले. असे मानपान करण्याचा अधिकार आपणास आहे असे आपण गृहीत धरल्याने सय्यिद नाराज झाले आहेत हे समजल्यावर तिने यानंतर तिजकडे भेटीस आलेल्या अर्जदारांना परत पाठविले. त्याच पद्धतीने, तळावर आगमन झाल्यावर, तिच्या मृत पतीशी–जहानशाहाशी–संबंध आलेल्या सर्व व्यक्तींना तिच्या स्वागतासाठी वा तिच्या समवेत जाण्यासाठी रस्त्यावर न येण्याबद्दल तिने ताकीद केली. सय्यिदांच्या स्वभावातील नाजूक जागा तिने पुऱ्या तपशिलानिशी अभ्यासल्या. तिच्या आणि इतर स्त्रियांच्या खर्चासाठी दरमहा पंधरा हजार रुपयांची रक्कम मुकर करण्यात आली. [ कामवर २१४, खाफीखान ८४१ ]

सवाई जयसिंगाबरोबर अजून वाटाघाटी चालू असता व समाधानकारक शर्ती ठरण्याचे जमून आले नसताना घरी परतण्यासाठी अति-उत्सुक झालेल्या अजितसिंगाने, जोधपूरच्या वाटेवर सवाई जयसिंगाची जातीने भेट घेण्याची तयारी दर्शविली. म्हणून त्याला घरी जाण्यासाठी निरोप झाला आणि २ जिल्हेज ( १५ ऑक्टोबर १७१९ ) रोजी खबर आली की तीन दिवसांपूर्वी ( म्हणजे १२ आक्टोबर रोजी ) जयसिंगाने आंबेरला परतण्यासाठी तोंडा सोडले आहे. त्याच्या विनंतीवरून तहव्वुरखान, सलाबतखान आणि रूहुल्लाहखान या पळपुट्या सरदारांना माफी मिळून, त्यांना त्रास न देता, त्याच्याबरोबर जाऊ देण्यात आले. माघार घेण्यासाठी त्याचे मन वळण्यास कारणीभूत झालेली गोष्ट म्हणजे त्याला मिळालेले मोठे द्रव्य होय. काही जण सांगतात की, रक्कम चांगली वीस लाख रुपयांच्या घरात होती. आंबेर ब्राह्मणांकडून परत विकत घेण्यासाठी रक्कम हवी या त्याच्या विनवणीवरून त्यास हे द्रव्य दिले होते. लोकांत मात्र असे जाहीर केले की, त्याचे अजितसिंगाच्या मुलीशी–ही मुलगी त्याची बराच काळ वाग्दत्त वधू होती–लग्न जमले असल्याने, लग्नातील भेट म्हणून हे द्रव्य मिळाले आहे. या वाटाघाटींचा एक भाग म्हणून सवाई जयसिंग यास सरकार सोरठ ( सुभा अहमदाबाद ) चा कारभार मिळाला. पण उरलेला

१ कासिम, पृ. २९४, इंडियन अॅटलास, तक्ता ५० यावर फतहपूरच्या पूर्वेस सुमारे ५ मैलांवर एक मलिकपूर आहे; मूमिनाबादचा पत्ता मात्र मला लागला नाही.

अहमदाबाद सुभा अजितसिंगाकडे राहिला; शिवाय सर्वच्या सर्व अजमेर सुभा सवाई जयसिंगाकडे राहिला. अजमेर सुभ्यावरील त्याच्या नेमणुकीची औपचारिक घोषणा २३. जिल्हेज ( ५ नोव्हेंबर १७१९ ) रोजी झाली. अशा प्रकारे दिल्लीच्या दक्षिणेस साठ मैलांपासून ते सुरतेच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंतचा मुलुख या दोन राजांच्या–जे या उघड्या सरहद्दीवरील मुघलांचे अगदी अविश्वासू पहारेकरी होते–हातात आला.[१०]

## ३ : बादशाह फतहपुरहून आग्र्यास जातो

११ जिल्काद ( २४ सप्टेंबर १७१९ ) रोजी या तळावर आल्याच्या दिवसापासून २० जिल्हेजपर्यंत मुहम्मदशाह फतहपूर सिक्री सोडून कधी बाहेर गेला नव्हता. फतहपूरच्या आपल्या तंबूतच त्याने इदचा सण साजरा केला (१० जिल्हेज) आणि त्याच महिन्याच्या १४ तारखेस तो तेथेच असलेल्या शेख सलीम चिश्तीच्या कबरीला जाऊन आला. २० तारखेस तो आग्र्यास निघाला आणि तीन दिवसांनंतर ( ५ नोव्हेंबर १७१९ ) रोजी खेलानाथ तलावाजवळ त्याचा तळ पडला. १५ मोहरम ११३२ हिजरी (२७ नोव्हेंबर १७१९) या दिवशी आग्र्याच्या किल्ल्यातील राजमहालात काही दिवसांचे वास्तव्य झाले; पण २ सफर ( १४ डिसेंबर १७१९ ) रोजी बादशाह आपल्या पूर्वीच्या तळावरील तंबूत परतला. यावेळी, हुसैन अलीखानाच्या फौजांचा बक्षी सय्यिद दिलावर अलीखान यास दुआबात जलेश्वर आणि सअदाबाद यांच्या बाजूस शंभरावर शाही उंट नुकतेच पळवून नेलेल्या जाटांचा बीमोड करण्यासाठी पाठविले.[११]

## ४ : बुंदीविरुद्धची मोहीम

पूर्वी सांगितल्याप्रमाणे, राजपुतान्यातील बुंदीच्या मुलुखावरून बुधसिंग हाडा आणि त्याचा भाऊबंद भीमसिंग या दोघात कित्येक वर्षे झगडा चालू होता. बुंदी बुधसिंगाच्या ताब्यात होती व त्याने आपले वजन फर्रुखसियर आणि सवाई जयसिंग यांच्या पारड्यात टाकले होते. भीमसिंगाने वजीर आणि त्याचा भाऊ यांची बाजू घेतली होती. त्याबद्दल बक्षिसी म्हणून त्यास मुलुख मिळवून देण्याचा निर्णय झाला होता. पण अल्लाहाबादेचा बंडखोर सुभेदार गिरिधर बहादुर यास जातीने मदत करण्याचे व छत्रसाल बुंदेला यास तेच कृत्य करण्यास चिथावणी देऊन बुधसिंगानेही आपल्या पूर्वीच्या दुष्टपणात नवी भर घातली होतीच. म्हणून ५ मोहरम ११३२ हिजरी ( १७ नोव्हेंबर १७१९ ) रोजी भीमसिंगास बुधसिंगाविरुद्ध स्वारीवर पाठविण्यात आले व त्याच्या विनंतीवरून, माळव्याचा दोस्त मुहम्मदखान अफगाण[१२] यास मोठी मनसब देऊन राजाच्या दिमतीस देण्यात आले. जाटांविरुद्ध केलेल्या मोहिमेवरून नुकत्याच परतलेल्या सय्यिद दिलावर अलीखान या हुसैन अलीखानाच्या फौजेच्या बक्षीस पंधरा हजार घोडेस्वारांच्या सुसज्ज फौजेनिशी बुंदीस कूच करण्याचा हुकूम झाला. नरवरच्या गजसिंगालाही सामील होण्याबाबत हुकूम झाला. त्यांच्या या फौजी हालचालींच्या उद्घोषित उद्दिष्टाखेरीज त्यांना गुप्त सूचनाही होत्या की, माळव्याच्या

१० कामवर, पृ. २१४, २१६; खाफीखान, पृ. ८३८; कासिम पृ. २९७; शिवदास पृ. ३२-अ.

११ कामवरखान पृ. २१५; कासिम, दुसरी पुनर्संशोधित आवृत्ती पृ. ४०२.

१२ भोपाळ संस्थानाचा संस्थापक. यासमयी त्याचे माळव्याच्या सुभेदारपदावर असलेल्या निजामुल्मुल्कांशी बिनसलेले होते.

दिशेने त्यांच्या फौजांची आवश्यकता असण्याची शक्यता नाही ना याची माहिती होईपर्यंत, त्यांनी माळव्याच्या सरहद्दीवर थांबावे. भीमसिंगाला महाराजा हा किताब व सात हजारी ( ७ हजार स्वार ) मनसब मत्स्यनिशाणासह देण्याचे आश्वासन मिळाले होते; माळव्याच्या निजामुल्मुल्काविरुद्धच्या यशस्वी व्हावयाच्या मोहिमेत त्याने भाग घेणे ही त्यासाठी अट मात्र होती.[१३]

३ रबिलाखर ११३२ हिजरी ( १२ फेब्रुवारी १७२० ) रोजी खबर मिळाली की राव भीमसिंग आणि दिलावर अलीखान यांनी भीमसिंगाचा चुलता राव बुधसिंग याशी लढाई केली; तीत बुधसिंग पराभूत झाला; तो स्वतः कापला गेला; त्याच्याबरोबर त्याच्या जमातीचे पाचसहा हजार लोकही कामास आले. [ खाफीखान ८५१, कामवर २१८ ]

## ५ : छबेला राम आणि गिरिधर बहादुर अल्लाहाबादेस येतात

छबेला राम नागराचे नशीब उजळले होते ते केवळ अजीमुश्शानामुळे; त्याच्या बाजूने लढताना छबेला रामाचा भाऊ दया राम लाहोर येथे ११२४ हिजरी ( १७१२ इ. ) मध्ये मारला गेला होता. आपण फर्रुखसियरच्या पक्षाचे आहोत असे सर्वांत अगोदर जाहीर करणारांपैकी तो एक होता. सय्यिद बंधूंनी अगोदरच त्या शाहाजाद्यांचे समर्थन केले होते. अजीमुश्शानची तळी उचलून धरण्याबाबत दाखविलेल्या तडफेबद्दल त्याला वरची मनसब मिळाली आणि कित्येक नेमणुकाही मिळाल्या. सय्यिदाबद्दल आपुलकी त्याला कधीच नव्हती; किंबहुना त्याजबद्दल फर्रुखसियरकडे त्याने पुष्कळ तक्रारी छुपेपणाने केल्या होत्या. बादशाह सत्ताभ्रष्ट होत असताना तो अल्लाहाबादेचा सुभेदार होता. आश्रयदात्याची झालेली ही अधोगती त्याच्या हितसंबंधास स्पष्टपणे बाधक होती. पण म्हणतात ना; "जमीन तर कठीण आणि आकाशदेखील फार दूर आहे". एव्हापासून तो सय्यिदांना फटकून राहू लागला. सय्यिदांबाबतची त्याची ही वृत्ती बंडखोरीहून फार वेगळी नव्हती; सय्यिद-मंत्र्याच्या हातून भूतपूर्व सार्वभौम शासकाची मुक्तता घडवून आणण्याच्या हेतूने आखलेल्या व अफवा बनलेल्या प्रत्येक योजनेमध्ये त्याचे नाव गुंतले असल्याचे आढळून येईल. त्याने सय्यिदांविरुद्ध उघड उघड बंड केल्याची तारीख ११३१ हिजरीच्या रमजान महिन्याच्या मध्यातील ( ऑगस्ट १७१९ ) निघते; ही बंडखोरी आग्र्याचा किल्ला पुन्हा काबीज केला जाण्याच्या काळापूर्वीची तसेच नेकूसियरच्या बाजूने होणाऱ्या हालचालींचा बंदोबस्त झाल्यापूर्वीची आहे. मुहम्मदखान बंगश आणि त्याचा हस्तक मऊ–शम्साबादेचा रुस्तमखान आफ्रीदी यांच्या चिथावणीमुळे काल्पीचा जमीनदार जसनसिंग याने निर्माण केलेल्या कटकटींच्या पायी छबेला राम आपल्या प्रांतात चांगलाच गुंतून पडला होता; यामुळेच आग्र्याकडे कूच करणे त्याला जमले नव्हते. आता आग्र्याचा किल्ला पुन्हा कब्जात आला असल्यामुळे आणि सवाई जयसिंगास द्रव्यबळावर वश करून घेतल्यामुळे यापुढची पायरी म्हणून छबेला राम याचा समाचार घेणे जरुरीचे वाटले; शिवाय त्याच्या मुजोरीमुळे रस्ता बंद झाल्या कारणाने बंगालचा खजिना पटण्यास अडकून पडला होता. [ खुशहाल; बर्लिन हस्त. ९९९ अ ]

फर्रुखसियर सिंहासनभ्रष्ट होण्याच्या जरा अगोदर मृत दया रामाचा मुलगा गिरिधर बहादुर–म्हणजे त्याचा पुतण्या–यास दिल्लीला पाचारले होते; फर्रुखसियर पदच्युत

१३ खाफीखान खंड दोन, पृ. ८४४; कामवरखान पृ. २१६; खिजखान पृ. ४१.

झाल्यानंतर छबेला रामाचे असंतुष्टत्व स्पष्ट दिसल्यामुळे गिरिधर बहादुराला राजधानीत एक प्रकारच्या सन्माननीय कैदेत अडकवून टाकण्यात आले. बादशाह रफीअ-उद्दौलह यासह वजीर आग्र्यास निघाला तेव्हा गिरिधर बहादुर यास लुत्फुल्लाहखान सादिक याच्या ताब्यात दिले. त्याने गिरिधर बहादुरला आपला मुलगा हिदायत अलीखान याच्या ताब्यात दिले. हा रखवालदार आपल्या बंदीला रोज भेटत असे; अशा एका प्रसंगी हुसैन अलीखान लवकरच अल्लाहाबादेवर हल्ला करणार असून छबेला राम आणि त्याजकडून होणारा विरोध यांचा शेवट करणार आहे असा उल्लेख त्याच्या बोलण्यात आला. आपल्या पहारेकऱ्यांना लाच देऊन गिरिधर बहादूर रातोरात पळाला. पहाटेच्यावेळी ५० घोडेस्वार त्याच्या पाठलागावर गेले, पण पळत्याचा कसलाही मागमूस लागला नाही. तो अल्लाहाबादेला पोहोचला असून आपला चुलता छबेला राम यास मिळाला आहे असे लवकरच समजून आले. [सिवानिह, ७]

गिरिधर बहादुराला ताज्या दमाच्या फौजेनिशी, अल्लाहाबादेवर काल्पीच्या जसनसिंगावर धाडण्यात आले. त्या बंडखोराचा वारंवार पराभव केल्यावर उभयता तह होऊन गिरिधर बहादुर अल्लाहाबादेला परतला. दरम्यान अल्लाहाबाद धोक्यात सापडले होते. सय्यिद अब्दुल्लाहखानाने ६,००० घोडेस्वारांनिशी अब्दुन्नबीखानाला अल्लाहाबादेच्या मोहिमेवर धाडले होते. हुसैन अलीखानानेही आपल्यापरीने मुहम्मदखानाचा ग्वाल्हेरमधील नायब दाऊदखान याला ३,००० सैन्यानिशी याच कामगिरीवर पाठविले होते; त्याने या सैन्यानिशी अल्लाहाबादेकडे कुरामार्गे कूच केले. नवाब बंगशाचा गुलाम दिलेरखान हा १,५०० असामीनिशी अब्दुन्नबीखानाला इटाव्यास येऊन मिळाला. [तत्रैव, ८]

अल्लाहाबाद किल्ल्याची जोखीम आपल्या पुतण्यावर सोपवून छबेला राम कित्येक कोस बाहेर आला. तळाभोवती त्याने खंदक खणले. दोन्ही फौजा एकमेकींच्या दृष्टिपथास येण्यापूर्वीच छबेला रामाला पक्षघात झाला व अल्लाहाबादेला पोहोचण्यापूर्वीच तो मरण पावला.[१४] त्याचा हा मृत्यू हिजरी ११३१ च्या जिल्हेज महिन्यात (नोव्हेंबर १७१९) झाला. त्याचा मृत्यू म्हणजे दैवाने आपल्यावर दाखविलेली खास मेहरनजर आहे असे दोघा सय्यिद बंधूंना वाटले; त्याच्या मृत्यूच्या बातमीने त्यांना आनंद झाला; त्यांनी गिरिधर बहादुरास मानाची वस्त्रे ताबडतोब पाठविली आणि अल्लाहबादेचा किल्ला हवाली करण्याची विनंती केली व तोवर संघर्षाला रजा दिली. छबेला रामाचा मृत्यू झाल्याचे समजल्याबरोबर अब्दुन्नबीखान शहझादपूर [१५]येथे पुढील हुकुमांची वाट पहात थांबला आणि अल्लाहाबादेच्या बाहेर निमूटपणे आल्यास लखनऊ व गोरखपूर येथील फौजदाऱ्यांनिशी अयोध्येचा सुभा तुला ताबडतोब बहाल होईल हा वजीराचा प्रस्ताव त्याने गिरिधर बहादुराला कळविला.

पण हे सगळे पवित्रे गिरिधर बहादुराने फेटाळून लावले. चुलत्याचे सगळे अंत्य-संस्कार अजून पूर्ण झालेले नाहीत आणि ते गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या पवित्र

१४ खुशहालचंद, बर्लिन हस्त. क्र. ४९५; पान ९९९-अ; अन्वये काही असामीचे म्हणणे असे की यात काही काळेबेरे होते. त्यांचे सांगणे असे :—"सय्यिदांकडून एक पत्र आले आणि तो लखोटा उघडताक्षणीच सगळा ग्रंथ आटोपला."

१५ कानपूर जिल्ह्यात; २६° ७७′ अक्षांश आणि ८०° २′ रेखांश; थॉर्नटन, ८८१.

त्रिवेणी संगमावरच ( म्हणजे अल्लाहाबादेला उर्फ प्रयागलाच ) पूर्ण करता येतील अशी उघडउघड अपुरी सबब सांगितली. आपले ठिकाण सोडण्यामुळे त्याने एक वर्षासाठी आपले स्वातंत्र्य गमावले होते. एव्हा जो काही श्वास घेण्यापुरता अवधी त्याला मिळाला तो कारणी लावून त्याने वेढ्याला तोंड देण्याची जय्यत तयारी केली; किल्ल्याच्या तटबंदीच्या आत दाणादारूचा भरपूर साठा करून ठेवला. गंगा आणि यमुना या नद्यांना जोडणारा एक खंदक त्याने खणला असेही सांगतात. या दोन नद्यांच्या पाण्याने हा खंदक त्याने भरून टाकला आणि अशा प्रकारे किल्ल्याच्या पश्चिमेकडील जो भाग तितकासा अभेद्य नव्हता; तो सुरक्षित केला. या खंदकाबाहेर मातीच्या कित्येक गढ्या त्याने उभ्या केल्या.[१६]

या अवधीत बुंदेले मंडळी सक्रिय उपद्रव देऊ लागली होती. त्यांच्या मुलखाच्या दक्षिणेला माळव्याच्या सरहद्दीलगत आणि उत्तरेला अल्लाहाबाद आणि आग्रा या दरम्यानच्या भागात त्यांच्या उपद्रवी हालचाली चालू होत्या. त्यांच्या माळव्यालगतच्या उपद्रवांबाबत माळव्याचा सुभेदार निजामुल्मुल्क याम कळविण्यात आले. यमुना नदीलगतच्या मुलुखाच्या संरक्षणासाठी मुहम्मदखान बंगश, अझीझखान दाऊदझई, कुरा जहानबादेचा फौजदार हसनखान आणि जागीरदार यांच्या हाताखालच्या फौजांना एकत्र येण्याचा हुकूम निघाला. यमुनेच्या दक्षिणेला येऊन त्यांनी हुकुमाची वाट पहावयाची होती. ६ आक्टोबर १७१९ रोजी हिंदौन आणि बयानाचा फौजदार म्हणून नेमल्या गेलेल्या सआदतखान बुर्हानुल्मुल्क याला शाही आघाडीचा सेनापती केले. या सुमारास सय्यिदांबरोबर नुकताच सलोखा केलेल्या मीरजुम्ला तर्खान याला ८ जिल्हेज ११३१ हिजरी ( २१ ऑक्टोबर १७१९ ) रोजी सद्रस्सुदूर ( म्हणजे वर्षासनादि व्यवहारांचा अधीक्षक ) म्हणून नेमले. पण राजा रतनचंद याच्या आडकाठीमुळे त्याला नेमणूकपत्र मिळण्यात अडचण निर्माण झाली होती. मीरजुमल्याने सआदतखानाला मदतीसाठी विनविले; त्याने हुसैन अलीखानाकडे शब्द काढला. रतनचंद नाखूष झाला आणि सआदतखानापासून अब्दुल्लाहखानाला अलग करण्यात त्याने लवकरच यश मिळविले. आघाडीची हुकूमत सआदतखानाकडून काढून घेऊन ती हैदरकुलीखानास दिली.[१७]

रतनचंदाच्या अगदी इतर खात्यातील ढवळाढवळीबाबतदेखील पुढील गोष्टी कानावर आल्या :—एके दिवशी रतनचंदाने एका माणसास अब्दुल्लाहखानापुढे हजर केले व त्यास काझी करण्याची इच्छा व्यक्त केली. अब्दुल्लाहखान हसत जवळ उभ्या असलेल्या माणसास म्हणाला :—" रतनचंद आता काझी मंडळींच्या नेमणुकाही करतो. " त्यावर दरबारातील माणूस उत्तरला " ऐहिक जगातील हव्या असलेल्या सगळ्या गोष्टी रतनचंदाला लाभल्या आहेत; तेव्हा आता त्याने पारलौकिक जगातील गोष्टींची काळजी का करू नये ?" किंवा शेख अब्दुल अझीझचा मुलगा फख्रुद्दीनखान अब्दुल्लाहखानाजवळ उद्गारला :—" आजकाल

१६ सिवानिह-इ-खिज्री, पृष्ठ ८; २५ जिल्हेज या तारखेची कामवरखानाची नोंद छबेला रामाच्या मृत्यूच्या तारखेविषयीचा उल्लेख तारीख-इ-मुहम्मदीमध्ये " ११३१ हिजरीच्या अखेरीस " असा आहे; कासिम ३००, ३०१; शिवदास, पान ३३-अ.

१७ कामवरखानाच्या २३ जिल्काद आणि ८ जिल्हेज ११३१ हिजरी रोजीच्या नोंदी; खिज्रखान पृ. १०; शिवदास, ३३; कुरा-जहानाबाद फतहपूर जिल्ह्यात आहे; थॉर्नटन, ५२२; हिंदौन ( जयपूर मुलुखांत ); अक्षांश २६° ४१′, रेखांश ७७° १६′; बयाना (भरतपूर मुलुखात), अक्षांश २६°, ५७′ रेखांश ७७° २०′, थॉर्नटन; ३८७, ११९.

आपल्या कृपेमुळे रतनचंद दुकानदार हिमू एवढा मोठा झाला आहे." [१८] हैदर कुलीखान १ मोहरम ११३२ हिजरी ( १३ नोव्हेंबर १७१९ ) रोजी अल्लाहाबादेकडे जाण्यास निघाला. कुराचा फौजदार शेर अफगनखान पानिपती त्याला येऊन मिळाला. [१९] कुरा येथे थोडा वेळ थांबून ते अल्लाहाबादेपासून २५ कोसांवर असलेल्या ठिकाणाकडे कूच करीत गेले. एव्हा शाहअलीखानाचे आगमन झाले. त्याने आपल्या सोबत दाऊतखानाला आणले. हा अमलदार मुहम्मदखान बंगशाने धाडला होता. शाह अलीखान हा बार्हा सय्यिद होता; वजीर व त्याचा भाऊ यांनी आपल्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यास नायब म्हणून पाठविले [२०] होते. मुहम्मदखान बंगशाने जातीने हजर न रहाण्याची सवलत घेतली; बामटेला या राजपूत जमातीच्या टोळीने उठाव केला होता व नव्याने वसविलेल्या फर्रुखाबाद या शहराचा नाश करण्याचा प्रयत्न केला होता. दाऊदखान आणि दिलेरखान या आपल्या दोन अमलदारांचा उत्साह आणि दमदारपणा यांची त्याने खात्री दिली. [सिवानिह, ११ ]

आता बुंदीच्या बुधसिंग हाडाच्या चिथावणीवरून बुंदेले मंडळी मोठ्या संख्येने रणांगणात उतरली होती. या मंडळींनी अब्दुन्नबीखान आणि दिलेरखान यांचे कूच चालू असता त्यांची अडवणूक केली. एके दिवशी अब्दुन्नबीखान पकडला गेला; पण दिलेरखानाने निकराची लढत देऊन त्याची सुटका केली. दुसऱ्या दिवशी सकाळी झटापटीस पुन्हा तोंड लागण्यापूर्वीच तहव्वुर अलीखान हा दिलावर अलीखानाने पाठविलेल्या २,००० असामींनिशी येऊन दाखल झाला. आता बुंदेल्यांनी झटापटीला पुन्हा तोंड फोडण्याचे टाळले; पण अब्दुन्नबीखानाचा सल्ला न जुमानता, केवळ धैर्यप्रदर्शनासाठी पुढे होऊन, तहव्वुर अलीखानाने लढाईला तोंड फोडले. मागे राहिल्याचा उबग येऊन दिलेरखान त्याच्या पाठोपाठ धावला. त्यांना पाठबळ देणे भाग आहे असे अब्दुन्नबीखानाला वाटले; अखेर पुरेसे नजीक आल्यावर अफगाण ओरडून शिवीगाळ करू लागले. त्यातील टोमणे जिव्हारी लागून बुंदेला पुढारी भगवंतसिंग याने आपले जानवे तोडले; ते आपल्या तलवारीच्या टोकावर ठेवले आणि मरेन नाही तर सूड घेईन अशी शपथ त्याने घेतली. आपल्या घोडीला टाच मारून तो दोन सैन्यांमधील जागेत आला; लढण्यासाठी त्याने तहव्वुर अलीखानाला निवडले. त्याच्या हत्तीपर्यंत तो दौडत आला; एका बाणाने त्याने माहुताला खाली पाडले आणि दुसरा एक बाण तहव्वुर अलीखानाच्या बाहूत घुसविला. बुंदेल्यांना पिछाडीवर घेण्याचा प्रयत्न दिलेरखान करू लागला. त्याला तोंड देण्यासाठी भगवंतसिंग २०० असामींनिशी वळता झाला. दिलेरखान डगमगला नाही. पाऊण तासपर्यंत घोर झटापट होऊन एका पठाणाने भगवंतसिंगाला कापले. तेव्हा बुंदेल्यांची पळापळ झाली. अफगाण घोडेस्वारांनी त्यांचा दोन–तीन कोस पाठलाग केला. मोठ्या जलदीने कूच करून अब्दुन्नबीखान आणि त्यांचे सोबती हैदर कुलीखानाला पुन्हा येऊन मिळाले. [ खिज्रखान, ११ ]

---

१८ तारीख-इ-मुज्जफ्फरी; इर्विन हस्त, पृष्ठ १६७. खुशहालचंद; बर्लिन हस्त., ४९५, पा. १००० व. हिमूधूसर हा आदिलशाह सूर याचा वजीर होता. मोहरम ९६४ हिजरी ( नोव्हेंबर १५५६ ) मध्ये त्याचा पराभव होऊन तो कैद झाला; १६०.

१९ हा माणूस म्हणजे लुत्फुल्लाहखान सादिक याचा भाऊ होय. तारीख-इ-मुजफ्फरी १७०; येथे कुरा याऐवजी कोरा असा उल्लेख आहे.

२० खुशहालचंद, बर्लिन हस्त. क्र. ४९५, पान ९९९-अ, प्रमाणे गिरिधर बहादुरला पिटाळून लावण्यात यश मिळविल्यास वारसा मिळेल; असे वचन या माणसाला मिळाले होते.

आता, येऊ घातलेली सगळी रसद येऊन पोहोचल्यामुळे हैदर कुलीखानाने आपल्या फौजांचे तीन विभाग केले. एक विभाग स्वतःच्या हुकूमतीखाली ठेवला; दुसरा शेर अफ्गनखान पानिपती, बहादुरखान आणि दाऊदखान यांकडे सोपविला; तर तिसरा विभाग शाहअलीखान बार्हा आणि अब्दुन्नबीखान यांकडे दिला. नंतर कूच करण्यात आले. शाही फौजा किल्ल्यापासून पाच कोसांवर येऊन पोहोचल्या तेव्हा गिरिधर बहादुराशी हातमिळवणी केलेले चंदेले जमीनदार या फौजांना विरोध करण्यासाठी बाहेर पडले; त्यामुळे जोरदार चकमक झडली. चंदेले मंडळींनी शाही फौजेच्या दुसऱ्या विभागात मुसंडी मारल्याने त्यातील नव्याने भरती झालेले सैनिक शरण आले. शाहअलीखान याला इतक्या गंभीर जखमा झाल्या की तो आपल्या हत्तीवरून खाली पडला व त्याचे सैन्य सैरावैरा पळाले; पण आपल्या अफगाण सैन्याला चुचकारत दाऊदखानाने दिवस ढळेतोपर्यंत लढाई कशीबशी चालू ठेवली. रात्री शाही फौजेचा तिसरा विभाग या ठिकाणी येऊन पोहोचला. आता शत्रूचे संख्याबळ वाढलेले पाहून चंदेल्यांनी किल्ल्याबाहेरच्या खंदकात आश्रय घेण्यासाठी माघार घेतली. [ खुशहाल ९९९ ब, खिज्रशान १३ ]

स्वतःच्या आधिपत्याखालच्या फौजेनिशी हैदर कुलीखानाने घाई केली; सैन्यात सुव्यवस्था निर्माण करण्यात दोन दिवस गेले. तिसऱ्या दिवशी आपल्या सगळ्या फौजेनिशी कूच करीत तो खंदकाच्या नजीक गेला. फौजा एकमेकांच्या दृष्टिपथात येताच त्यांनी एकमेकांवर तोफा आणि बाण यांचा भारी वर्षाव केला. तिसऱ्या प्रहरापासून सूर्य मावळेपर्यंत लढाई चालू राहिली. गिरिधर बहादुर आपल्या खंदकातून जातीनिशी बाहेर पडला आणि धाडसी हल्ला करून त्याने लढाई आपल्या बाजूस वळविली. अखेर अंधार पडला; मित्र कोण व शत्रू कोण हे ओळखता येईनासे झाले. तेव्हा दोन्ही फौजा आपापल्या तळावर परतल्या. दोन-तीन दिवस रोज लढाई होत राहिली. एका रात्री अब्दुन्नबीखानाच्या तळावर हल्ला झाला. शेर अफ्गनखान येईपर्यंत तळावर मोठी हानी झाली. नंतर त्या दोघांनी हल्लेखोरांना त्यांच्या खंदकापर्यंत मागे पिटाळले व शत्रूची दोन माणसे जिवंत पकडली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार किल्ल्यामध्ये दहा वर्षे पुरेल इतकी दाणादारू होती; गिरिधर बहादुरची स्वतःची दहा हजार माणसे आणि बुधासिंग हाडा, छत्रसाल बुंदेला तसेच जवळपासच्या मुलुखातील हिंदू जमीनदार यांची त्यापेक्षा कितीतरी जास्त माणसे होती. या सगळ्या गोष्टी हैदर कुलीखानाने हुसैन अलीखानाला कळविल्या आणि आणखी कुमक पाठविण्याची मागणी केली. [ सिवानिह, १४ ]

किल्ल्याला वेढा घालणाऱ्या फौजांच्या सेनापतींच्या वागण्यात देखील एकवाक्यता नव्हती. आपली माणसे कामास आली त्याचा बदला म्हणून हाती लागलेल्या दोन कैद्यांची डोकी उडविण्याचे अब्दुन्नबीखानाने जाहीर केले. या गोष्टीस संमती देण्यास हैदर कुलीखानाने नकार दिला. हाती लागलेल्या कैद्यांकरवी किल्ल्यातील परिस्थिती व किल्ल्याचे रक्षक यांविषयी माहिती काढण्यासाठी हे दोघे कैदी मला हवे आहेत; यथावकाश अमीरुल्उमरा हुसैन अलीखान या कैद्यांबाबत हुकूम देतील त्याची अमलबजावणी करू असे त्याचे म्हणणे पडले. सुरुवातीला सभ्य शब्दांतील त्यांचे बोलणे वाढून अखेर त्याचे रूपांतर बोलाचालीत झाले व त्यांनी एकमेकांविषयी कटु शब्द उच्चारले. तेव्हा अब्दुन्नबीखानाने किल्ल्याच्या उत्तर बुरूजावरचा आपला वेढा काढून घेतला आणि नेमक्या त्याच रात्री बुधासिंग हाडा याने पाठविलेली कुमक, वेढा उठविलेल्या ठाण्यावरून कसलाही अडथळा न होता, किल्ल्यात शिरली.

यापूर्वी सांगितलेच आहे की, बुंदेल्यांना बुधसिंगाचे उत्तेजन होते आणि गिरिधर बहादुर विरोध करीत होता. हे समजताच हुसैन अलीखानाने दिलावर अलीखान वगैरेंना कोटा बूंदी मुलुखाच्या कामगिरीवर धाडले. त्याचवेळी, आपले काही अमलदार अल्लाहाबादेला पाठवून मुहम्मदखान बंगशाने हुकुमाची तामिली केली असता त्याला रणांगणात जातीने उतरण्याचा आग्रह केला. त्याप्रमाणे तो लगेच अल्लाहाबादेला येऊन पोहोचला; अब्दुन्नबीखानाने रिकामी सोडलेली जागा त्याने व्यापिली. त्याच्या आगमनानंतर लगेच, एका रात्री, पहाट होण्यास तास दोनतास अवकाश असता दोन हजार हशमांनी त्यावर अचानक हल्ला केला. नवाबाचे डोळे सुजले असल्याने लढाईचे पुढारीपण स्वीकारणे त्याला शक्य नव्हते. पण पाठविलेला तातडीचा निरोप पोहोचून दिलेरखान लगेच घटनास्थळी हजर झाला. अंधारामुळे आणि उडालेल्या गोंधळामुळे शत्रूचे दोनशे जण माघार घेत असता वाट चुकले आणि नदीत कोसळले; तर त्यांचा पुढारी सलीमसिंग जखमी होऊन नूरखान खाटकचा कैदी झाला. पण ओळख पटण्यापूर्वीच त्याने आपला लष्करी जामानिमा, आपली तलवार, आपला फेटा आणि आपल्या अंगावरील जे जे काही मूल्यवान होते ते ते सर्व उतरविले; तेव्हा त्याला जाऊ देण्यात आले. दिलेरखानाला पाठीत दोन गंभीर जखमी झाल्या; पण त्याचा जीव वाचला. [ तत्रैव, १७ ]

या, रात्रीच्या अकस्मात हल्ल्यानंतर सकाळी हैदर कुलीखानाने दोन बाजूंनी व्यापक चढाई करण्याचा हुकूम दिला. फौजेचा एक भाग त्याने आपल्या हाताखाली घेतला तर दुसऱ्या भागाचे नेतृत्व शेर अफगनखान, दाऊदखान बंगश आणि शाहअलीखान बार्हा यांकडे दिले. किल्ल्याच्या उत्तर बाजूला किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या मोर्चातील शत्रू हैदर कुलीखानाने वारंवार हल्ले करून निपटून काढला. त्याचप्रमाणे शाहअलीखानाने आपल्या बरोबरच्या अमलदारांनिशी आपल्यासमोर असलेल्या शत्रूला किल्ल्याच्या तटाच्या पायथ्यापर्यंत मागे हटविले. दाऊदखानाने शेर अफगनखानासह किल्ल्याच्या तटावर चढण्याच्या शिड्या आणल्या; किल्ल्यात प्रवेश करण्याची आशा त्याला वाटत होती; पण बराच प्रयत्न केल्यावर व लढत दिल्यावर तो मार्ग सोडून देणे त्याला भाग पडले. किल्ल्याच्या खाली नदी अगदी खेटून वहात असल्यामुळे आणि किल्ल्याच्या तटाखाली कित्येक नावा बांधून ठेवल्या असल्यामुळे अशी भीती वाटली की, आजची लढाई प्रतिकूल होत आहे असे दिसल्यास, शत्रू या नावा वापरून निसटून जाईल. हे त्यांना करता येऊ नये म्हणून मुहम्मदखानाने आपली माणसे पाठवून सर्व नावा कबजात घेतल्या.

तीन दिवस लढत चालू राहिली; चौथ्या दिवशी शाही फौजा किल्ल्याच्या नजीक येऊन पोहोचण्यात यशस्वी झाल्या व त्यांनी तटबंदीला सुरुंग लावण्यास आरंभ केला. आजची लढाई हरणार आहोत असे पाहून गिरिधर बहादुराने मुहम्मदखानाकरवी सलोख्याच्या वाटाघाटीचा पवित्रा घेतला. या वाटाघाटीत बराच वेळ खर्ची पडला. नंतर गिरिधर बहादुरला असेही आढळून आले की त्याला किल्ल्याबाहेर हुसकून लावल्यास मुहम्मदखानाला अल्लाहाबादेचा सुभा देण्याबाबत आश्वासन मिळालेले आहे; त्यामुळे त्या सरदाराच्या निःपक्षपातीपणावरील गिरिधर बहादुरचा विश्वास उडाला आणि तो म्हणाला की मी आता व्यवहार करीन तो, इतर कोणाकरवी न करता फक्त रतनचंदामार्फतच करीन.

अल्लाहाबाद शत्रूच्या हाती राहू देणे सय्यिदांच्या सत्तेला कमालीचे धोकेदायक होते. सय्यिदांविषयी प्रेम नसलेले लोक जेथे गोळा होऊ शकतील व अशांची त्रासदायकता वाढत

जाऊ शकेल असे अल्लाहाबाद हे केंद्र होते. इथला किल्ला अकबराबादेइतका मजबूत होताच; पण इतर काही गोष्टींचा विचार केल्यास तो जिकण्यास अधिक अवघड होता. तिथे किल्ल्यातील शिबंदीने बंड केले आहे आणि बंडाचे पुढारीपण नाकर्त्यांना मिळाले आहे अशी स्थिती नव्हती; उलट किल्लेदार हा कसलेला, धैर्यशाली शिपाईगडी होता आणि तो एका शिस्तबद्ध फौजेचे आधिपत्य करीत होता. तो दाणादारूची जेमतेम तरतूद केलेला बालेकिल्ला नव्हता; उलट तेथे कित्येक वर्षे पुरेल एवढा साठा होता.

आग्रा येथे यमुनेवर नावांचा पूल बांधण्याचा हुकूम हुसैन अलीखानाने सोडला; आपल्या दुआबातील आगे कूचाची पूर्वतयारी म्हणून त्याने आपल्या फौजा पैलतीरावर पाठविल्या. ज्योतिषांनी केलेल्या भाकितावर त्याची मुळीच श्रद्धा नव्हती. तो म्हणाला; 'अमर घटनाक्रमाने जे निवडले आहे त्याप्रमाणेच घटना घडणार; तेथे ज्या घटना घडण्याचे ठरलेले नाही त्या घडणार कशा?' ३ सफर (१५ डिसेंबर १७१९) रोजी त्याने आपली बाग-इ-दहरआरा येथील छावणी सोडली आणि नावेतून जहान-आरा-बेगम बागेकडे निघाला. अल्लाहाबादेत वाटाघाटी चालू राहिल्या. रात्रंदिवस सांडणीस्वार येत आणि जात. पण गिरिधर बहादुर सांगत राहिला की, सय्यिदांवर अथवा त्यांच्या प्रतिष्ठेवर आपला विश्वास नाही आणि घेतलेली आश्रयाची जागा आपण सोडण्याची शक्यता नाही. असे कित्येक महिने गेले पण तडजोड घडून आली नाही. [ कासिम, ३०३ ]

शेवटी २३ जमादिलावल ११३२ हिजरी ( १ एप्रिल १७२० ) रोजी हुसैन अलीखानाने जहान-आरा बाग सोडली. पण बाग-इ-बुलंद[२१] येथील कुरणात आपले तंबू ठोकून अल्लाहाबादेकडे कूच करण्याचे त्याने निश्चित केले. ही हरकत अब्दुल्लाहखानाला मात्र पसंत पडली नाही.

या अगोदर काही आठवड्यांपूर्वी म्हणजे १ रबिलाखर ११३२ हिजरी ( १० फेब्रुवारी १७२० ) रोजी बादशाहाच्या आघाडीचे तंबू दिल्लीच्या दिशेने धाडले होते; पण बादशाह त्या मागोमाग निघाला नाही; तेव्हा सिकंदरा इटाला[२२] येथून तो तंबू १ जमादिलावल ( १० मार्च १७२० ) रोजी परत मागविले. याच सुमारास आग्र्यातील लुटीवरून अब्दुल्लाहखान आणि त्याचा धाकटा भाऊ यांत पुन्हा एकदा भांडण झाले; रतनचंदाने कमालीचे सायास केल्यानंतरच त्यांचे हे भांडण मिटले; दोघांतील या मतभेदाची बाहेर वाच्यता होण्याचे देखील टळले होते. आपला भाऊ हुसैन अलीखान याने आग्रा येथे बजावलेल्या भूमिकेमुळे अजूनही नाराज राहिलेला अब्दुल्लाहखान तडक अल्लाहाबादेस निघाला. दुसऱ्या खेपेला माझी फसवणूक होऊ देणार नाही अशी शपथ त्याने घेतली.

आग्र्याची लूट हुसैन अलीखानाने बळकावली तर अल्लाहाबादेची लूट आपण घ्यावी असे त्याने ठरविले. थोडक्यात म्हणजे वजीर या नात्याने सर्वोच्च सत्ता आपल्याकडे ठेवण्याचा हेका त्याने चालविला. शेवटी मध्यम मार्ग स्वीकारून दोन्ही भाऊ आग्र्याला थांबले आणि रतनचंद त्यांचा दूत बनून अल्लाहाबादेला गेला. [ कासिम ३०६, खाफीखान ८४५, कामवर २२० ]

२१ नदीपलीकडे किल्ल्यासमोर असलेल्या बागेचा खुशहालचंदाने मोतीबाग असा उल्लेख केला आहे.
२२ बहुधा हे स्थळ आग्र्याच्या पश्चिमेस असावे; अक्बराची कबर असलेले ठिकाण म्हणजेच ही जागा असावी.

२५ जमादिलावल ११३२ हि. ( ३ एप्रिल १७२० ) रोजी रतनचंद निघाला. त्याच्या परिवारात कित्येक सरदार होते; तसेच ६० मोठ्या तोफाही त्याच्या बरोबर होत्या; त्यातील प्रत्येक तोफ १००–२०० बैलांनी व ३–४ हत्तींनी ओढली जाणारी होती. वाटेने जात असता, अनेक फौजदार, जागिरदारांचे अनेक हस्तक, तसेच अनेक जमीनदार त्याच्या निशाणाभोवती गोळा झाले. अल्लाहाबादेपासून २ कोसांवर राजाने तळ ठोकला आणि गिरिधर बहादुराला निरोप धाडला की तुला भेटण्यासाठी येथवर आलो आहे आणि भेटीसाठी आतुर आहे. गिरिधर बहादुराचा जबाब आला की तुमची भेट होण्यात मला आनंदच आहे; पण छबेला रामाच्या मृत्यूचे सुतक अजून संपलेले नसल्याने अतिथीने इकडे येण्याची तसदी घ्यावी; शिवाय तसे करणे म्हणजे एखाद्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसाच्या समाचारास जाण्याचा प्रघात पाळण्यासारखेच होईल. सर्वांना मागे ठेऊन आणि मुहम्मदखान बंगश हैदर कुलीखान आणि आपली १–२ विश्वासू माणसे बरोबर घेऊन राजा रतनचंद किल्ल्यात गेला. राजा गिरिधर बहादुर आपल्या राहत्या घराच्या दरवाज्यापर्यंत बाहेर आला. त्याची भेट झाल्यावर रतनचंदाने रिवाजाप्रमाणे त्याचे सांत्वन केले. भेटवस्तू पुढे आल्या; त्यातील १ हत्ती आणि २ घोडे रतनचंदाने स्वीकारले; नंतर तेथे थोडावेळ थांबून तो स्वस्थानी परतला. दुसऱ्या दिवशी गिरिधर बहादुर आपल्या सर्व ऐश्वर्यासह प्रतिभेटीसाठी आला. रतनचंद त्याला तंबूच्या दरवाज्यापाशी सामोरा गेला. गिरिधर बहादुराला त्याने आपल्या मसनदीवर उजव्या हाताला बसविले. १ हत्ती आणि ५ घोडे अलंकारांनी मढवलेल्या स्थितीत भेट म्हणून दिले. गिरिधर बहादुरानेही १ हत्ती आणि २ घोडे वगळता बाकीच्या भेटी नको म्हणून सांगितले. [ कामवर २१९, शिवदास ३४ अ, खुशहाल १००० ब. ]

थोडी सलोख्याची बातचीत सर्वांसमक्ष केल्यावर ते दोघे वेगळ्या बैठकीत गेले आणि त्यांनी मसलती केल्या. अयोध्येचा सुभा, त्यात असलेल्या विभागांसह (सरकारांसह) तसेच सुभ्यातील सर्व फौजदार आणि दिवाण नेमण्याचा हक्कांसह गिरिधर बहादुराला द्यावा आणि पूर्वी नेमलेल्या मीर मुश्रिफ या सुभेदाराला त्याच्या हाताखालच्या अमलदारांसह काढून घ्यावे; खेरीज, किल्ल्याच्या रक्षणावर आणि फौजांवर झालेल्या खर्चाची भरपाई म्हणून बंगालच्या खजिन्यातून पाठविलेल्या द्रव्यांपैकी ३० लक्ष रुपये देणगीदाखल गिरिधर बहादुराला द्यावे आणि पोषाखाचा खास मानपान म्हणून फेटयावर घालावयाचा रत्नजडित अलंकार व १ हत्ती बादशाहाकडून गिरिधर बहादुराला मिळावा असा सलोख्याचा प्रस्ताव झाला. ही बैठक २५ जमादिलाखर ११३२ हि. ( ३ मे १७२० ) रोजी झाली. [ सिवानिह १९, खाफीखान ८४६, शिवदास ३५ अ. ]

एकमेकांना बांधून घेणाऱ्या शपथा गंगोदक हाती घेऊन झाल्यावर गिरिधर बहादुराने वरील प्रस्ताव स्वीकारला. नंतर, आपला सर्व परिवार, परिवाराचे जिन्नस, आपला खजिना, आपला मालटाल घेऊन गिरिधर बहादुर ४ रज्जब ( ११ मे १७२० ) रोजी किल्ल्याबाहेर पडला. तेव्हा मुहम्मदखान बंगशाचा भाऊ अहमदखान याने ५०० असामींनिशी किल्ल्यात जाऊन त्याचा ताबा घेतला. शाह अलीखान याकडे अल्लाहाबाद सोपवून रतनचंद आग्र्याच्या परतीच्या प्रवासास निघाला. इतके दिवस पटण्यास अडकून पडलेला बंगालचा खजिना मागविण्यात आला; खजिन्यातील ३० लक्ष रुपये राजा गिरिधर बहादुरास द्यावे आणि शिल्लक रक्कम राजधानीकडे पाठवावी असा हुकूम निघाला.

रतनचंदाचा अहवाल हाती आल्यानंतर ९ रज्जब रोजी अब्दुल्लाहखान दरबारात हजर झाला. त्यापूर्वी काही दिवस तो दरबारात आल्याचे दिसले नव्हते. विजयाच्या नौबती वाजविण्याची परवानगी त्याने बादशाहाकडून घेतली. हुसैन अलीखानाने १६ रज्जब ( २३ मे १७२० ) रोजी यमुना पुन्हा ओलांडली आणि अगोदर ठरल्याप्रमाणे बाग-इ-दहर-आरा या ठिकाणी आपले ठाणे ठेवले. रतनचंदाचे ९ शाबान म्हणजे ८ जून १७२० रोजी आगमन झाले. तेव्हा दोघा भावांनी त्याचे हार्दिक अभिनंदन केले; ५ हजार जात आणि ५ हजार स्वार अशी बढतीची मनसब दिली; शिवाय खास मानाचा पोषाख आणि एक मोत्याचा अमूल्य कंठा त्याला दिला. मुहम्मदखान बंगश आणि शेर अफगनखान यांना प्रत्येकी २५ हजार रुपये आणि मोत्याचा कंठा दिला. यावेळी अर्थात १४ जमादिलावर म्हणजे २२ एप्रिल १७२० रोजी मुमताजाबाद या गावात, शाहजहानाच्या कबरीचे दर्शन घेता यावे म्हणून, बादशाहाने एक मुक्काम केला होता. त्याच महिन्याच्या १७ तारखेला म्हणजे २५ एप्रिल १७२० रोजी तालाब खेलानाथ या ठिकाणापर्यंत तळ मागे हलविण्यात आला. [२३]

## ६ : निजामुल्मुल्क माळव्यातून दख्खनला सटकतो

निजामुल्मुल्क आणि सय्यिद मंडळी यांचा एकमेकांवर विश्वास नसण्यास बरीच कारणे होती. आलमगीराच्या कारकिर्दीच्या अखेरच्या काळात निजामुल्मुल्क आणि त्याचा बाप यावर कृपेचा वर्षाव झाला होता. पण आलमगीराच्या वारसांकडून तशी वागणूक न लाभल्याने निजामुल्मुल्क नंतरच्या काळात नेहमी असंतुष्ट राहिला. बहादुरशाहाच्या काळात त्याने चाकरी कुरकुरतच केली; अनेकदा आपल्या चाकरीचा राजीनामाही पाठविला. जहांदारशाहाच्या कारकिर्दीतही असेच घडले. जहांदारशाह पदभ्रष्ट होण्याच्या सुमारास फर्रुखसियरच्या बजावलेल्या चाकरीबद्दल त्याला दक्षिणेचा कारभार मिळाला. या दख्खनच्या प्रदेशाच्या बाबतीत त्याच्या मनात अनेक गुप्त स्वरूपाच्या योजना आलमगीराच्या मृत्यूपासून शिजत होत्या यात संशय नाही. आपल्या बापाप्रमाणेच निजामुल्मुल्कानेही दक्षिणेतील मोहिमांमध्ये आपला नावलौकिक कमावला होता; जुल्फिकारखानाने बिनदिक्कतपणे जे केले ते करण्यास–म्हणजे दिल्ली आणि दिल्लीतील सार्वभौम शासक यांच्यापासून थोडीफार आणि कदाचित पूर्ण स्वायत्तता मिळविण्याचा योग साधण्यास–दक्षिणेचा कारभार मिळणे उत्तम असल्याचे त्याला वाटले असणार. हुसैन अलीखानाने त्याच्यावर कुरघोडी केली तेव्हा दख्खनच्या सहा सुभ्यांचा कारभार त्याने सुमारे दोन–एक वर्षे पाहिला होता.

आपल्यावर झालेल्या कुरघोडीचे शल्य त्याच्या मनाला टोचत असावे. मुरादाबाद येथील आपल्या नव्या नेमणुकीवर रुजू होण्यासाठी तो मागे हटला आणि फर्रुखसियरच्या तातडीच्या विनंतीखातर राजधानीस परतला. फर्रुखसियरबरोबर काम करणे अशक्य झाल्याने वजीर आणि त्याचा भाऊ यांच्या पक्षाला तो नाममात्र येऊन मिळाला, हे आपण मागे पाहिलेच आहे. त्यास दिल्लीबाहेर ठेवण्याच्या धडपडीपायी सय्यिदबंधूंनी बिहार सुभ्याचा

---

२३ कामवरखान, २२०; शिवदास, ३३ ब; बयान-इ-वाकिअ ४०६; खुशहालचंद, १००० ब; खिफ्रखान, पृ. २०. ७५ हजारांचा खजिना बंगालमधून आग्रा येथे १९ रज्जब ( २४ मे १७२० ) रोजी येऊन पोहोचला.

कारभार त्याला देऊ केला. बिहारात कारभार करणे जिकिरीचे होते म्हणूनच सय्यिद बंधूंना वाटले की, त्याचे बळ संपुष्टात येण्यास ही जबाबदारी पुरेशी नसली तरी निदान कारभारात तो पुरा गुंतून पडेल. निजामुल्मुल्क पटण्याला जाण्यास निघण्यापूर्वी फर्रुखसियर सिंहासनभ्रष्ट झाला. त्यावेळी माळव्याची जागा रिकामी असल्याने त्याला ती देऊ केली. माळव्याची एक अकबराबादेकडची बाजू, तसेच दुसरी दक्षिणेकडची बाजू आपल्याच नातेवाईकांच्या किंवा आपल्याच पक्षाच्या असामींच्या ताब्यात आहे; तेव्हा निजामुल्मुल्काला माळव्याच्या कातरीत धरल्यास या बड्या प्रस्थाच्या कारवायांना वाव उरणार नाही असे सय्यिद बंधूंना वाटले. दक्षिणेतील आपली कारकिर्द कशी अल्पकालीन ठरली हे लक्षात घेऊन, आपल्याला पुन्हा हलविण्यात येणार नाही असा मनापासून करार करण्याची अट घालून, मगच निजामुल्मुल्काने माळव्याची जागा स्वीकारली. ते आश्वासन त्याला मिळाले आणि रफीउद्दरजात याच्या राज्यारोहणानंतर काही दिवसांनी, आपला कोणी आप्तस्वकीय सय्यिदांच्या तावडीत ओलीस म्हणून सापडणार नाही अशी खबरदारी घेऊन व आपला सर्व परिवार आणि चीजवस्तू बरोबर घेऊन तो २४ रबिलाखर ११३१ हि. ( १५ मार्च १७१९ ) रोजी उज्जयिनीला जाण्यास निघाला.

आग्रा येथे अपयशी ठरलेला जो उठाव झाला त्यास चिथावणी मिळण्यास निजामुल्मुल्काने हातभार लावला होता, अशा अफवा त्याच्या प्रस्थानापासून पसरल्या होत्या. शत्रुत्व-प्रदर्शनाचे कोणतेही उघड कृत्य केल्याचा दोष जरी त्याच्या पदरी येत नव्हता तरी हुसैन अलीखानाची वर्मस्थळे अभ्यासण्यात काही बाबतीत त्याची चूक झाली. त्याने जाणूनबुजून हुसैन अलीखानाकडे दुर्लक्ष केल्यामुळे मांडवची सुभेदारी करीत असलेल्या मरहमतखानाच्या डोक्यावर ख्वाजम कुलीखानाला आणून बसविण्याचे काम हुसैन अलीखानाने केले. त्यामुळे त्या किल्ल्याचा ताबा घेण्याबाबत कटकटी निर्माण झाल्या. त्यातून मार्ग निघाल्यावर मरहमतखान निजामुल्मुल्काकडून घालविला जाण्याऐवजी, त्याला जयचंद बुंदेल्यास रामगडातून हुसकावण्याच्या कामगिरीवर धाडले. नंतर अवमानित मरहमतखानाविषयी दया दाखविण्याबाबत नवाबाने अर्ज केला. मरहमतखानाची कड घेणाऱ्या या विनंत्याकडे हुसैन अलीखानाने दुर्लक्ष केले. त्यानंतर लवकरच, निजामुल्मुल्क, सुभेदार या नात्याने त्याला जरुर असल्यापेक्षा अधिक प्रमाणात माणसे भरती करीत आहे व युद्धोपयोगी सामग्री गोळा करीत आहे असे वार्ताहरांनी राजधानीस पाठविलेल्या इतिवृत्तांमध्ये नमूद केले होते.

ही इतिवृत्ते हाती आल्यावर हुसैन अलीखानाने निजामुल्मुल्काच्या दरबारातील प्रतिनिधीला बोलावून घेतले; त्याला आणि त्याच्या धन्याला दूषणे दिली व मी जे काही बोललो ते तुझ्या धन्याला कळव, असे त्यास सुनावले. मरहमतखानाची यापूर्वी उल्लेखिलेली बाब, परगणा नालम [२४] येथील एका जमीनदाराची हकालपट्टी आणि जमिनीबाबतचे इतर काही तंटे या तक्रारी म्हणून सांगितल्या. निजामुल्मुल्काने हुसैन अलीखानाला प्रत्यक्ष लिहून पत्राची पोच दिली. त्यात अधिकृत वार्ताहरांनी शत्रुत्व दाखविल्याची तक्रार करून त्याने निदर्शनास आणून दिले की ; जी माणसे माळव्यात कधीच नव्हती त्यांना येथील परिस्थिती समजण्यासारखी नाही; पण अलीकडेच आपण माळव्यातून गुजरलो असल्यामुळे येथील

२४ हा बहुधा तालम या शब्दाचा मुद्रणदोष असावा; सरकार सारंगपूर, आईन, दोन, २०३.

परिस्थिती आपणास चांगली माहीत असणारच; ५० हजार घोडेस्वारांनिशी मराठे माळव्यात धुमाकूळ घालीत आहेत; मोठ्या फौजा जवळ बाळगल्या नाहीत तर त्यांच्या विध्वंसापासून मुलूख वाचविण्याची कोणती आशा उरणार आहे? याच कारणासाठी माणसे आणि दाणादारू या स्वरूपातील माझी सामग्री मी वाढविली आहे; रब्बी पिके निघण्याच्या वेळी वसूल व्हावयाचे महसुलाचे हप्ते ठरविले आहेत; बहुतेक सगळा महसूल वसूल होण्याचा हाच काळ आहे; आपला झालेला अवाढव्य खर्च परत मिळण्याची हीच काय ती आशा आहे; तेव्हा अशा वेळी मी माळवा सोडणे योग्य नाही; माझे वाईट चिंतणाऱ्या खेरीज दुसरे कोणी मजवर, नको ती कामे करीत असल्याचा आरोप करणार नाहीत; माझी इच्छा तशी असती तर नेकूसियरकडून कित्येक सांगावे आले; तेव्हा आग्रा येथेच ती इच्छा पुरी होऊ शकली असती; माझ्या मनात तसले काही हेतू नाहीत आणि माझ्या लौकिकास बट्टा लावणाऱ्यांना गप्प करणे आवश्यक आहे. आग्ऱ्यात निजामुलमुल्कास काय करता येणे शक्य होते या विषयीच्या अशा अप्रत्यक्ष उल्लेखाने हुसैन अलीखानाचा राग आणखी भडकला. [ खाफीखान ८५१, तारीख-ई-मुजाफ्फरी १७४. ]

दख्खनच्या संरक्षणाच्या दृष्टीने माळव्याचा कारभार हुसैन अलीखानाच्या हाती देणे आवश्यक आहे अशी सबब सांगून निजामुलमुल्काला माळव्याहून परत बोलावणारे फर्मान निघाले. अक्बराबाद, अल्लाहाबाद, मुलतान किंवा बुर्हानपूर या चार सुभ्यांपैकी कोणताही सुभा निवडण्याचा प्रस्ताव त्याच्यापुढे ठेवला. हा सहज लक्षात येणारा विश्वासघात होता. आपला पार निकाल लावावयाचा बेत आहे असा निजामुलमुल्काचा समज झाला होता त्यास यामुळे निःसंशय पुष्टी मिळाली. हुसैन अलीखानाचा बक्षी दिलावर अलीखान बूंदीचा राजा भीमसिंग, नरवरचा राजा गजसिंग आणि इतर सरदार यांना घेऊन माळव्याच्या पश्चिम हद्दीजवळ घोटाळत होता. त्याच्या या हालचालीमुळे निजामुलमुल्काच्या मनात यापूर्वीच चिंता निर्माण झाली होती. सवाई जयसिंगाच्या मूकसंमतीने बूंदीचे राज्य बळकावण्याचा प्रयत्न करणाऱ्या सालिमसिंगाचा बंदोबस्त केल्यावर, निजामुलमुल्काच्या कारवायांवर लक्ष ठेवून पुढील हुकुमांची वाट पाहावी अशा गुप्त सूचना या सेनापतींना दिल्या होत्या. नवाब हुसैन अलीखानाच्या परिवारास आणावयास जाण्याच्या कामगिरीवर मी दक्षिणेत औरंगाबादेस जात आहे, असे सर्वांस सांगावे; अशी सूचना दिलावर अलीखानास मिळाली होती.

या हालचालींचा अन्वयार्थ निजामुलमुल्काने प्रतिकूल असाच लावला. तेव्हा उलट कामास लागण्यात कसूर करण्यात अर्थ नव्हता. मुहम्मद अमीनखानाने आग्ऱ्याहून निजामुलमुल्कास कळविले : 'नेकूसियरचा पक्ष दाबू न टाकण्यास आणि अल्लाहाबाद परत मिळविण्यास सय्यिदांना थोडाच अवकाश उरला आहे; त्यांची पुढील चाल आपला (निजामुलमुल्काचा) समूळ उच्छेद करण्याची असेल.' आपल्या स्वतःच्या या पत्रासोबत मुहम्मद अमीनखानाने मुहम्मदशाहाच्या स्वतःच्या हस्ताक्षरातील एक आणि बादशाहाच्या आईची मोहर असलेले एक अशी दोन पत्रे जोडली. त्यात सय्यिदांविषयीच्या तक्रारी होत्या त्यांनी सगळे अधिकार बळकावले असल्याबद्दल, बादशाहाला कसलीही मोकळीक ठेवली नसल्याबद्दल तसेच बादशाहाची कड घेऊन त्याची मुक्तता घडवून आणण्याबद्दल मजकूर होता. [ खाफीखान ८५०, ८५२; कासिम ३०७. ]

दुसऱ्या एका मार्गाने निजामुल्मुल्काच्या माळव्यातील वास्तव्यासंबंधीचा आणखी तपशील मिळतो. तो उज्जयिनीला पोहोचल्या नंतरच्या रात्री तेथे मुसळधार पाऊस पडला. हा पाऊस म्हणजे त्याला अल्लाची खैर वाटली; कारण त्या दिवसापासून त्याचा सतत उत्कर्ष होत गेला. नावाप्रमाणे आणि प्रत्यक्षातही उज्जयिनी म्हणजे दार-उल्-फतह (विजय-गृह = उज्जयिनी) आहे असे त्याला वाटले. १७१९ चा पावसाळा संपल्यावर आपल्या सुभ्यात सुव्यवस्था निर्माण करण्याच्या कामास तो लागला; तेव्हा हुसैन अलीखानाचे मित्र निजामुल्मुल्काच्या सैन्यबळाविषयी आतंक निर्माण करणारी पत्रे धाडू लागले. दरबारी वार्ताहराच्या इतिवृत्तांमध्ये फेरफार केले जातात, त्यावरूनच काही काळेबेरे योजले जात असावे; अशी तक्रार या पत्रांतून झाली. हे सर्व कानी येताच हुसैन अलीखान कडक शब्दांत गरजू लागला. निजामुल्मुल्काला दरबाराबाहेर जाऊ द्यावयास नको होते; आता एकाचे हजार निजामुल्मुल्क झाले आहेत; आता त्याशी वागणे खुल्या मैदानातील वाघबच्च्यांशी सामना करण्याइतके अवघड बनले आहे.

त्यावर कुत्बुल्मुल्क (अब्दुल्लाहखान) उत्तरला की पूर्वी घडले त्याला आता इलाज नाही. दैवाची लीला अगाध म्हटली पाहिजे. काहीतरी मार्ग आता काढला पाहिजे. तेव्हा बराच विचार करून, त्यास परत बोलावणारे फर्मान गुर्जदारांच्या हाती पाठविण्यात आले; त्याच वेळी फौजा चंबळे पलीकडे पाठविल्या. सुभेदार स्वाधीन झाला तर ठीकच, नाहीतर त्याशी लढावे किंवा वाटाघाटी कराव्या; तो दक्षिणेस पळाला तर आपले सेनापती त्याचा पाठलाग करतील. औरंगाबादेस असलेल्या आलिम अलीखानाला सावध राहाण्याबाबत इशारा झाला. निजामुल्मुल्क शेवटी तडाख्यात सापडणार हे निश्चित असे त्यांना वाटले.

धामधुमीचा काळ नजीक येऊन ठेपला आहे आणि पहिली धामधूम बहुधा माळव्यात होणार अशी बोलवा निजामुल्मुल्काच्या दरबारात होऊ लागली होती. आपणास कसलाही धक्का लागू नये या हेतूने आणीबाणीस तोंड देण्यासाठी निजामुल्मुल्क सज्ज होऊ लागला. हुसैन अलीखान मोठ्या सरदारकीवर असला तरी त्याचा स्वभाव नुसता शिपाईगड्याचा आहे; काही प्रतिकूल कानी आले की तो रागाने जळू लागतो व लगेच शत्रू बनतो. तसे झाले तर लढाईच्या तयारीत कसूर नको.

सय्यिद दिलावर अलीखान चालून येत असल्याचे जाहीर होताच आपला सर्वांत विश्वासू अमलदार मुहम्मद घियासखान याशी निजामुल्मुल्काने मसलत केली. उगीच डोक्यात राख घालून घेण्यात काय अर्थ आहे; हे प्रकरण सहज निपटून नेता येईल; नशिबाचे फासे आपल्या बाजूला पडले आहेत आणि सामना देणे हाच सर्वोत्तम मार्ग असे त्याचे म्हणणे पडले. नवाब उत्तरला : "असे का बोलता ? मी अजून बुचकळ्यातच आहे; माझे काही चुकलेले नाही हे स्पष्ट आहे; शरम वाटावी असेही काही माझ्या हातून घडलेले नाही; पैगंबरवासी आलमगिराच्या जमान्यापासून आजपर्यंत मी सन्मानाने जगत आलो; यापुढे जे काही थोडेफार दिवस माझ्या पदरात आहेत तेही अवमान न होता जातील; ही पामर मंडळी मला इजा करण्याच्या प्रयत्नात का आहेत ? उत्कर्ष अचानक झाल्यामुळे फुगून गेल्यानेच ते असे वागत आहेत; असे वागणे म्हणजे बादशाह असल्याचा तोरा आणण्यासारखेच आहे; थोडाफार उत्कर्ष झाला तर तेवढ्याने आपली डोकी कोणी बिथरवून घेण्याचे कारण

काय ? अल्ला वर स्वर्गात आहे; तो आपल्यावर कृपा करतो; अशा कृपाळू अल्लाच्या उपासकावर कृपाकांक्षी होण्याची पाळी येत नाही हे बरेच म्हणावयाचे. मात्र सुरुवात माझ्याकडून न झालेली बरी. मी गप्प राहून देखील त्यांनी हल्ला केला तर मग माझा इलाज नाही. अखेर मीही माणूसच ना. माझ्याइतके उच्चस्थान लाभलेला कोणता माणूस आपली अब्रू जपल्याशिवाय राहील ? विजय दडून बसलेला असतो; तो प्राप्त होणे म्हणजे स्वर्गीय देणगी मिळण्यासारखे आहे. केवळ फौजा अवाढव्य आहेत म्हणून ही देणगी लाभत नाही. जन्माला घालणाऱ्या परमेश्वराची शपथ घेऊन सांगतो सगळा हिंदुस्थान जरी त्यांनी माझ्याविरुद्ध उभा केला तरी मी निर्भयपणे प्रतिकार करीन. माझ्या आयुष्याची दोरी बळकट असेल तर मला धोका नाही आणि माझा मृत्यू नजीक आला असेल तर कसलाही उपाय कामी येणार नाही. "

या बोलण्याला घियासखानाने सहमती दर्शविली. सज्जता ठेवणे आवश्यक आहे एवढेच मला सुचवावयाचे होते; 'लढाई संपल्यावर ठोसा मारण्याचा प्रसंग गुदरावा' यात नुसती मानहानीच आहे असे त्याने निदर्शनास आणले. नवाबाच्या नातेवाईकांनी मान्यता दर्शविल्यावर, तयारीविषयी निर्णय झाला. मंडेश्वरहून उज्जयिनीला कूच करावे तेथे फर्मानाची वाट पाहावी आणि आपल्या जवळचे, नको असलेले सामानसुमान सुरक्षित ठेवावे असे घियासखानाने सुचविले. फर्मानाचा मान राखून ते स्वीकारणे व लगोलग राजधानीस निघण्यासाठी कूच करणे बाह्यात्कारी भागच होते. झगडा करावयाचाच असला तर तो येथल्याप्रमाणे तेथेदेखील करता येईल; किंबहुना दरबारी आपली स्थिती अधिक बळकट आहे असा त्यांचा कयास होता. माणसे जिवावर उदार होतात तेव्हा ती स्वर्गाविरुद्ध-सुद्धा लढू शकतात. मग त्यांच्यासारख्या खिजगणतीत नसणाऱ्या पामरांविषयी काय बोलावे? सय्यिद मंडळी म्हणजे काय प्रेषित नाहीत की ज्याना पंख आहेत आणि उडत जातात. कुंपण कितीही मोठे असले तरी आतल्या माणसापर्यंत जाऊन पोहोचता येतेच. शिवाय आपली बाजू न्यायाची आहे. कृपावंत देवाने आपल्याला संरक्षण दिले तर विजय न्यायाच्याच बाजूने होणार. सिरोंजनजीक पोहोचण्यापूर्वीच प्रकरणाने पलट खाल्ली तर फरक असा काय पडणार ? आपले बरवरचे राजधानीस होणारे आगमन ऐकून विरोधकांची दक्षता एकदम नाही का संपुष्टात येणार ? मुहम्मद अमीनखान, हमीदखान वगैरे दरबारी मंडळींना लिहावे तसेच इवजखान वगैरे दक्षिणेतील मंडळींनाही लिहावे. अशीरगडाच्या किल्लेदाराला आपलेसे करून घ्यावे; किल्ला हवाली करण्याचा ठराव करून देण्याबद्दल त्याला वाटल्यास द्रव्य देऊ करावे. या ठिकाणी पोहोचण्यासाठी सिरोंजमार्गे जाणे सोपे आहे, आणि अशीर आपल्या ताब्यात आला तर दख्खनच्या राज्याची किल्लीच अल्लाने आपल्या हवाली केली असे म्हणावयाचे. रिआयतखान अब्दुर्रहीमखान, कादिरदादखान आणि मुतवस्सीलखान यांनी मुहम्मद घियासला पाठिंबा दर्शविला.

ठरल्याप्रमाणे सर्व ठिकाणी पत्रे रवाना झाली. दोन–तीन दिवस विलंब होऊन दिल्लीच्या दिशेने कूच झाले. दरबारी वार्ताहरांनी तातडतोब या घडामोडीबाबत दरबारास इतिवृत्ते पाठविली. मजल दरमजल करीत दोराहापर्यंत ते येऊन पोहोचले. दख्खनच्या मुख्य माणसांकडून पत्रे आली. पण नवे हुकूम धाडण्यात आले नाहीत; आपण हिंदुस्थानच्या वाटेला लागलो म्हणून शिपायांमध्ये आनंदीआनंद पसरला. पण ज्या मार्गाने

ते कूच करीत आले त्याच मार्गाने ते एकाएकी मागे फिरले. याचा शिपायांना विस्मय वाटला. पण एकंदरीत गुप्तता चांगल्या प्रकारे राहिली. शेवटी एक रात्रभर कूच करून ते ८ मे १७२० रोजी नर्मदेवर पोहोचले व त्यांनी नदी ओलांडली. [ अहवाल १५५ ब]

आपल्याला राजधानीस परतणे भाग पाडण्यासाठी गुर्जदार निघाले आहेत ही गोष्ट निजामुल्मुल्काला समजली होती. तशा आशयाचे एक फर्मान खरोखर धाडलेही होते. त्यात राजधानीस आल्या आल्या अक्बराबाद सुभा दिला जाईल असा मजकूर होता. निजामुल्मुल्काने माळवा सोडल्याची बातमी आग्र्यास ९ रज्जब ११३२ हि. (१६ मे १७२०) रोजी समजली. नंतर ११३२ हि. जमादिलाखर महिन्याच्या मध्यास ( म्हणजे २३ एप्रिल १७२० च्या सुमारास ) असा अहवाल आला की ५ किंवा ६ हजार घोडेस्वारांनिशी आणि अब्दुर्रहीमखान, मरहमतखान, रिआयतखान, कादिरदादखान रौशनी, वजीर सादुल्लाह-खानाचा नातू मुतवस्सिलखान, इनायतखान वगैरेंना बरोबर घेऊन, निजामुल्मुल्काने मंडेश्वर सोडून, उज्जयिनीपर्यंत कूच केले आहे. आपण सिरोंजेच्या मार्गावर आहोत असे तेथे उठवून, एक-दोन मजला मारून, तो कायथ या खेड्यापर्यंत येऊन पोहोचला. तेथून तो तडक नर्मदेवर गेला आणि १ रज्जब ११३२ हि. ( म्हणजे ८ मे १७२० ) रोजी अक्बरपूरच्या उतारावरून त्याने नदी पार केली. [ खाफीखान ८५२, ८६०; कासिम ३०८; कामवर २२१. ]

तत्काल कारवाई केली पाहिजे असे हुसैन अलीखानाला वाटले. त्यासाठी जातीने निघण्याची त्याला इच्छा झाली. उलट सबूरीने घ्यावे असा अब्दुल्लाहखान आणि समसामुद्दौलह (खान दौरान) याचा सल्ला पडला. कारण "सबूरी अल्लाची असते तर घाई सैतानाची असते" अशी म्हणच होती. सारे काही परत हस्तगत करण्यासाठी सय्यिद दिलावर अलीखान यास त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांसह एका बाजूने आणि आलिम अलीखान यास दुसऱ्या बाजूने धाडणे पुरेसे होते. अशीरगड त्यांनी घेतला असला तरी त्याची बचावाची व्यवस्था करण्यास त्याना अजून अवसर मिळाला नसल्याने तो पुन्हा सर करणे काहीच अवघड नाही. "हुशार असणे चांगले आहे, तुम्ही रुस्तमसारखे बलवान व्हा."

हुसैन अलीखान धुमसत राहिला. आपल्या भावात दम नाही असा त्याचा दोषारोप होता. अब्दुल्लाहखान आपल्या मतांशी चिकटून राहिला आणि त्यानेच विनयाने तक्रार केली की माझा मार्ग, धैर्य नसल्याने, अनुसरण्यात आला नाही. आपल्याला भित्रा म्हटल्या-बद्दल त्याने आश्चर्य व्यक्त केले. "मी तुझा भाऊ नाही का? मी सुद्धा एक सय्यिद नाही का?" भाऊ जरा विवेकाने वागला तर सगळ्यास होकार देण्याची त्याची तयारी होती. फर्रुखसियरला कैद करण्यात चूक झाली असे वारंवार सांगून देखील, माझा शब्द बाजूस सारून, माझ्या भावाने मनमानी केली. आता आपण जे पेरले तेच उगवणार. आपल्याच कर्माचे पहिले-वहिले फळ म्हणजे निजामुल्मुल्काचा हा उठाव होय. शेवटी निजामुल्मुल्काच्या पाठलागावर तत्काल निघण्याबाबत तातडीचे हुकूम दोघा भावांनी सय्यिद दिलावर अलीखानाला दिले. त्याच्या सोबत राव भीमसिंग हाडा, राजा गजसिंग नरवरी व दोस्त मुहम्मद अफगाण यांना पाठविले. अशी काही हालचाल होईल याची पूर्वकल्पना असल्याने ही मंडळी यापूर्वीच माळव्याच्या हद्दीजवळ येऊन ठेपली होती. त्यामुळे विलंब

न करता कामगिरीवर निघणे त्यांना शक्य झाले. सय्यिदांचा २० वर्षांचा पुतण्या आलिम अलीखान औरंगाबाद येथे दख्खनचा नायब सुभेदार म्हणून काम पहात होता. नवाबाच्या आगे कूचाला पायबंद घालण्याचा हुकूम त्याला मिळाला. [ अहवाल १५७ ब, कामवर २२१].

अशीरगडचा बळकट किल्ला नर्मदेच्या दक्षिणेस ४५ मैलांवर असून तेथून बुर्हानपूर फार दूर नाही. निजामुल्मुल्काने सर्वप्रथम अशीरगडावरील शिबंदीला द्रव्याची लालूच दाखवून आपणाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. खुस्रव नावाच्या त्याच्या गुलामाचा उस्मानखान कादिरी नावाचा एक मित्र शिबंदीमध्ये होता. खुस्रवला उस्मानखान कादिरीकडे वाटाघाटीसाठी धाडण्यात आले. नवाबाने नर्मदा ओलांडली त्याच दिवशी खुस्रव उस्मानखानासह निजामुल्मुल्कास येऊन भेटला. किल्लेदारी मिळण्याविषयी त्याने अट घातली. शिबंदीच्या २ वर्षांच्या पगारबाक्या भागविण्यास पुरेल इतक्या रकमेची तरतूद करून दिल्यावर उस्मानखान नवाबाचा सर्वांत थोरला मुलगा गाझीउद्दीनखान फीरूझजंग आणि बक्षी हिफ्‌जुल्लाहखान यांसह अशीरगडावर परतला. त्रिजागट कहरगाव मार्गे जितकी त्वरा करता येईल तितकी करून निजामुल्मुल्क पाठोपाठ निघाला. १३ रज्जब ११३२ हि. (२० मे १७२०) रोजी किल्ला कबजात आला. अबूतालिबखान नावाच्या अतिवृद्ध किल्लेदाराला कैद केले; कहरगावचा रुस्तम बेगखान आणि मकडाईचा राजा फतहसिंग हे दोघे याचवेळी येऊन मिळाले. येथून १२ मैलांवर असलेल्या बुर्हानपूर या शहराचा कबजा घेण्यासाठी घियासखानास धाडले. निजामुल्मुल्क अशीरगडास गेला, गडाच्या माथ्यापर्यंत तो चढून आला. नंतर आपले दोन मुलगे आणि जादा सामानसुमान मागे ठेवून बुर्हानपुरास निघाला. तेथे त्याचा तळ लालबाग या ठिकाणी पडला. [२५]

निजामुल्मुल्काने नर्मदा ओलांडली आहे हे कानी येताच आलिमअलीखानाने औरंगाबादेस रजेवर आलेल्या अन्वरखान कुत्बुद्दौलह या बुर्हानपूरच्या फौजदाराला कामगिरीवर पाठविले व त्याच्यासोबत रंभा निंबाळकर यास दिले. निंबाळकर त्याच्या मध्यस्थीने दिल्लीच्या तुरुंगातून सुटलेला होता. ते बुर्हानपुरापासून दक्षिणेस १२ कोसांवर असलेल्या आदिलाबाद [२६] या गावी आले तेव्हा घियासखान यापूर्वीच तेथे पोहोचला आहे; शहरास वेढा घालण्याची तयारी करीत आहे असे त्यांच्या कानावर आले. या सुभ्याचा दिवाण नूरुल्लाहखान हा अन्वरखानाचा भाऊच होता व शहराचा ताबा त्याच्याकडे होता. आलेली कुमक पकडण्यासाठी घियासखानाने तापी नदीच्या पलीकडे फौजा धाडल्या; पण रात्रीच्या अंधाराचा चांगला फायदा मिळून घियासखानाच्या लोकांना चुकवून आणि रस्त्यालगतच्या पायवाटा वापरून ही कुमक शहरात पोहोचली. मात्र

२५ खाफीखान, खंड दोन, ८५३, ८६५; तारीख–इ–मुज्फरी, पृ. १८० आणि शिवानिह–इ–दखिखन लेखक-मुन्अिमखान औरंगाबादी, इर्विन हस्त. क्र. ३९६, पान १३१, १५२. ज्या इसमाशी वाटाघाट झाली त्याचे नाव इस्लामउल्लाह हजारी आणि ज्यास नवा किल्लेदार नेमले त्याचे नाव शर्फखान असे बुर्हानुल्-फुतूह, १६७ ब यात दिले आहे. या लेखकाच्या म्हणण्यानुसार किल्ला कबजात देण्याची घटना १५ रज्जब रोजी घडली. कहरगाव बुर्हानपूरच्या आग्नेयीस ५५ मैलांवर आणि मकडाई ७० मैलांवर ईशान्येस आहे. लालबाग शहराच्या उत्तरेस २ मैलांवर असन सध्याच्या रेल्वे स्टेशनच्या अगदी नजीक आहे. बॉम्बे गॅझेटिअर (खानदेश, पृ. ५८९, ५९१.)

२६ हे खानदेश जिल्ह्यात आहे. बॉम्बे गॅझेटियर, बारा, ४४७ वर त्याचा अक्षरविन्यास एदिलाबाद असा दिला आहे. सदर ठिकाण जी. आय्. पी. रेल्वेच्या भुसावळ स्थानकाच्या वायव्येस सुमारे १५ मैलांवर आहे.

त्यांच्या पालख्या आणि इतर सामानसुमान लुटारूंच्या हाती पडले. फौजदाराच्या आगमनानंतर शहरवासी गोळा झाले; प्रतिकार केल्यास फक्त आमचेच तेवढे नुकसान होईल असे सांगून प्रतिकार करण्याविषयीचा आपला निषेध त्यांनी फौजदाराकडे नोंदविला. घियासखानाची माणसे शहराच्या तटावरून आत येऊ शकतील; आमचे जीव धोक्यात येतील आणि आमच्या मालमत्तेची वाट लागेल असे ते म्हणाले. बाहेर, उघड्यावर लढाई करा असा त्यांनी फौजदारास सल्ला दिला. तशी लढाई केली नाहीत तर शहर शत्रूच्या हवाली करू असेही ते म्हणाले. अन्वरखान, काही धीराचा गडी नव्हता. त्याचे डोके काम देईना. १६ रज्जब ( २३ मे १७२० ) रोजी त्याने घियासखानाकडे तहाची विनवणी केली. निजामुलमुल्क दुसऱ्या दिवशी जातीने आला. अन्वरखान आणि नूरुल्लाहखान हे दोघे आपले अधिकारी आणि नागरिक यांसमवेत शरण आले. शहर आणि शहररक्षक किल्ला याचा कबजा घेतला. अशीरगड आणि बुर्हानपूर ताब्यात आल्यामुळे निजामुल्मुल्काची बाजू भलतीच बळकट झाली. [२७]

या सुमारास, वजीराचा धाकटा भाऊ सैफुद्दीन अलीखान बार्हा याची आई आपल्या नातवंडासमवेत बुर्हानपूरला येऊन पोहोचली होती. दिल्ली सुभ्यातील मुरादाबादेस तिचा मुलगा आता फौजदार झाला होता व त्याच्याकडे जाण्यासाठी ती औरंगाबादेहून निघाली होती. निजामुल्मुल्क आला आणि त्याने शहर व्यापले तेव्हा तिच्या दिमतीच्या माणसांमध्ये एवढे भय निर्माण झाले की, कुटुंबाची अब्रू सुरक्षित रहावी आणि सर्वांचे प्राण वाचावेत या अटीवर आपल्या ताब्यात असलेली रत्ने व मूल्यवान जिन्नसा नवाबाकडे पाठविण्याचे त्यांनी ठरविले. देऊ केलेली मालमत्ता निजामुल्मुल्काने नाकारली; बेगमेचा प्रतिनिधी म्हणून आलेल्या मुहम्मद अलीशी तो दयेने वागला; त्याला मानाचा पोषाख देऊ केला आणि फळांची करंडी मुलांसाठी देऊन त्यास परत पाठविले. बेगमेला जाण्याची अनुमती मिळाली. तिला नर्मदेच्या तीरापर्यंत सोबत करण्यासाठी २०० घोडेस्वार त्याने पाठविले. [ खाफीखान, ८७३ ]

अब्दुल्लाहखान आणि हुसैन अलीखान या आपल्या दोन चुलत्यांची पत्रे औरंगाबाद मुक्कामी मिळाल्या मिळाल्या आलिम अलीखान, मराठे आणि इतर लोक यांच्या फौजा उभारण्याच्या कामास लागला. जवळपासच्या फौजदारांना औरंगाबादेस येण्यास त्याने सांगितले. दिलावर अलीखान उत्तरेकडून आल्याचे दिसू लागले की आपण दक्षिणेकडून कूच करावे आणि अशा तऱ्हेने निजामुल्मुल्काला कचाट्यात पकडावे असा त्याचा विचार होता. आपल्या लोकांना स्फूर्ती मिळावी म्हणून त्याने उदार मनाने बढत्या दिल्या. शहरातील व मुलुखातील रहिवाशांना आपलेसे करण्याची एकही संधी त्याने दवडली नाही. नंतर त्याने आग्र्याच्या कार्यालयाला कळविले की मजकडे जुन्या चाकरीतील सात हजार घोडदळ आहे; शिवाय फौजदार आणि जमीनदार यांनी दोन–तीन हजार हशम आणले असून सहा हजार लोकांची नव्याने भरती केली आहे. खेरीज राजा शाहू १५–१६ हजारांचे घोडदळ पाठवील असा भरोसा वाटतो. नांदेडचा म्हणजे वऱ्हाडचा माजी सुभेदार अमीनखान याची हुसैन अलीखानाशी पूर्वी चांगलीच दुश्मनी होती; पण द्रव्य; रत्ने आणि हत्ती

२७ खाफीखान, ८५३, ८७१, ८७२; बुर्हानुल्-फुतूह १६८ अ; तारीख-इ-मुजफ्फरी, पृ. १८१.

नजर करून त्याला वश करून घेतले.[२८] आपल्या सगळ्या फौजांची आलिम अलीखानाने मोजदाद केली तेव्हा ती ३० हजार घोडदळ अशी निघाली. या फौजांची हुकमत जातीने स्वतःकडे घेण्याची त्याची इच्छा दिसली. शाबान महिन्याच्या सुरुवातीस (१ = ७ जून १७२०) त्याने कूच केले. [ खाफीखान, ८७४. ]

पावसाळा संपेपर्यंत आपल्या पुढील हालचाली थांबवावयाच्या आणि तोपर्यंत देवगड येथे, तेथील जमीनदारांना आपलेसे करावयाचे अथवा जिंकून घ्यावयाचे असे निजामुलमुल्काने आपल्या परीने ठरविले. पण जवळ आहे तेवढ्या द्रव्यबळावर सैन्याला चार महिने सांभाळणे कठीण आहे; सध्या जवळ आहे त्यापेक्षा जास्त पैसा उपलब्ध होण्याची शक्यता नाही; असे दिसून आले. तेव्हा कारवाई तावडतोब हाती घेण्याचा निश्चय झाला. आलिम अलीखानाचे तंबू औरंगाबादेबाहेर उभे आहेत हे कानी पडताच निजामुलमुल्क बुर्हानपूरच्या उत्तरेस असलेल्या लालबागेतून बाहेर पडला; त्याने तापी ओलांडली आणि शहराच्या पूर्वेस तळ टाकला. पण रज्जब महिन्याच्या अखेरीस (३० = ६ जून १७२०) त्याला समजले की, आपला खडा पाठलाग करीत आलेल्या दिलावर अलीखानाने हांडियाच्या[२९] जवळपास नर्मदा पार केली आहे. तो हुसैनपूर या हांडिया सरकारमधील ठिकाणापर्यंत येऊन ठेपला होता. हे ठिकाण बुर्हानपुरापासून चौदा कोसांवर होते. हा शत्रू समाचार घेण्यास अधिक अवघड मानून, सामना प्रथम त्याच्याशी देण्याचा निर्णय निजामुलमुल्काने केला. [खाफीखान, ८७५ ; अहवाल १६० अ.]

असे दिसते की साय्यिदांनी आपल्या सेनापतीसशी एक पत्र पाठविले व त्यात त्याच्यावर डरपोकपणाचा आरोप केला. तो जिव्हारी लागून नशेच्या तारेत—तो तसा नेहमीच असे—त्याने निजामुलमुल्काला लिहिले : "मरणाला भिऊन त्यापासून दूर पळणे यात कसला पुरुषार्थ आहे ; नव्हे तो आपल्या अब्रूला काळिमाच आहे. आणि हा असला क्षुद्र जीव वाचविण्यासाठी इतक्या डोंगरचढणी करावयाच्या आणि एवढी वाळवंटे ओलांडावयाची ? त्यापेक्षा परवरदिगारवर विसंबून या पत्रलेखकाची गाठ घेण्यास बाहेर का पडत नाही ? तसे केल्यास 'हाजिर' होण्यास्तव परतणेही शक्य होईल व तेथे आपणांसारख्या सन्माननीयास दया दाखविता यावी म्हणून अट्टाहासही करता येईल. हे होणार नसेल तर याची पक्की खूणगाठ बांधा की वीस हजार स्वारांवरचा हा बंदा रक्तासाठी तहानलेला आहे ; वाऱ्यासारखा, पाठलाग करीत येईन तो वादळ होऊनच ; आणि तू मैदानी भागातल्या हरणासारखा डोंगरात पळालास तर मी चित्त्याप्रमाणे तुझा पाठलाग करीत येईन; तुझ्या पाठीवर झेप घेऊन माझे आसुसलेले दात तुझ्या रक्ताने माखून काढीन." पत्रातील ही प्रक्षोभक भाषा निजामुलमुल्काला सहन झाली नाही ; आल्या पावलावर पाऊल टाकत तो परत उलटला. [वारिद, १५९ ब.]

आपले कुटुंब आणि आश्रित यांना अवजड सामानसुमानासह अशीरगडाला सुरक्षिततेसाठी पाठवून निजामुलमुल्काने शाबान महिन्याच्या सुरुवातीस (१ = ७ जून १७२०) उत्तरेकडे

२८ अमीनखान हा खान आलिम दख्खिनीचा एक भाऊ होता. मुबारिजखानाच्या आधिपत्याखाली निजामुल्मुल्काशी लढता लढता तो ११३७ हि. (१७२४ इ.) मध्ये कामास आला. मासिरुल्-उमरा, खंड एक, ३५२.

२९ हे ठिकाण बुर्हानपुराच्या ईशान्येस सुमारे ९२ मैलांवर नर्मदेच्या दक्षिण तीरावर होशंगाबाद जिल्ह्यात आहे. दक्षिणेतून आग्र्यास जाणाऱ्या जुन्या हमरस्त्यावर ते आहे. सेंट्रल प्रॉव्हिन्सेस गॅझेटिअर, २०१.

कूच केले.[३०] घियासखान आणि शेख मुहम्मदशाह फारुकी यांच्या नेतृत्वाखालचा त्याचा तोफखाना त्याच्या पुढे गेला. तो स्वतः ९ शाबान म्हणजे १५ जून रोजी निघाला. बुर्हानपुरापासून १६–१७ कोस चाल झाली असता आणि मकडाईच्या[३१] राजाच्या मुलुखातील रतनपूर हे ठिकाण दोन-तीन कोसांवर राहिले असता त्याने तळ ठोकला. त्यावेळी दिलावर अलीखानाचा तळ त्याच्या तळापासून दोन किंवा तीन कोसांवर होता. निजामुल्मुल्काने त्याच्याकडे मैत्रीचा प्रस्ताव पाठविला पण निजामुलमुल्काचे सगळे पवित्रे दिलावर अलीखानाने फेटाळून लावले.[३२]

दिलावरखानाचे सैन्यबळ फार मोठे नव्हते : तरी त्याचे सैनिक सुसज्ज आणि परीक्षेत उतरलेले होते. बक्षी म्हणून काम केले असल्याचा परिणाम म्हणून त्याला साय्यिदांच्या सगळ्या सैन्यांची गुणवत्ता चांगली माहीत होती. या मोहिमेवर त्याला पाठविण्यात आले तेव्हा सय्यिदांकडे सेवेस रूजू असलेल्या सतरा-अठरा हजार घोडेस्वारांमधून उत्तम सामग्री आणि उत्तम बैठक असलेल्या सहा हजार घोडेस्वारांची निवड त्याने केली होती. त्यांतील बहुतेक जण बार्हा सय्यिद, हिंदुस्थानी आणि अफगाण होते. दिलावरखानाच्या दिमतीस देण्यात आलेल्या प्रमुख अधिकाऱ्यांत बाबरखान आणि सय्यिद बंधूंचा दूरचा भाऊ लागणारा सय्यिद शमशीरखान यांचा समावेश होता.[३३] शिवाय नरवरच्या अनूपसिंगाचा मुलगा राजा गजसिंग याचे तसेच बूंदीच्या महाराव भीमसिंग याचे चिलखतधारी राजपूतही फौजेत होते. राजा गजसिंगाने सुमारे दोनतीन हजार लोक आणले होते. दोस्त मुहम्मदखान रोहिला (पुढे भोपाळचा नवाब झाला तो)[३४] ३५०० हशमांसह येऊन मिळाला. तेव्हा एकंदर सैन्य तेरा हजारांपेक्षा कमी नव्हते. कदाचित अठरा हजार असेल.

## ७ : दिलावर अलीखानाचा पराभव आणि मृत्यू

१३ शाबान ११३२ हि. (१९ जून १७२०) रोजी निजामुलमुल्काने ४ कोसांची मजल मारली आणि नंतर लढाई देण्यासाठी आपल्या फौजांची मांडामांड केली. आघाडीच्या फौजांची हुकूमत घियासखानाकडे दिली ; त्याच्या दिमतीला शेख मुहम्मदशाह आणि तोफखान्याचा प्रमुख असलेला त्याचा भाऊ नूरुल्लाह फारुकी यांना दिले. मध्य भागाच्या

---

३० किंवा गुलशन-इ-अजाइब, पान १३२ ब येथे उल्लेख असल्याप्रमाणे बुर्हानपुराला प्रयाण केले.

३१ होशंगाबाद जिल्ह्याच्या हांडिया तालुक्यामधील एक लहानसे स्वतंत्र संस्थान; त्याचे सध्याचे क्षेत्रफळ २१५ चौ. मैलांचे आहे. खुद्द मकडाई हे ठिकाण हांडियाच्या दक्षिणेस सुमारे तीस मैलांवर आहे, सेंट्रल प्रॉव्हिन्सेस गॅझेटिअर, २५६.

३२ खाफीखान, ८७५; खुशहाल पान १००२ अ; कासिम ३११ बयान-इ-वाकिअ, इर्विन हस्त. पान ४०६ सिवानिह-इ-दखिनच्या १६३ पृष्ठावर उल्लेख आहे की लढाई नर्मदेच्या दक्षिणेस बारा कोसांवर सरकार हांडियाच्या चारदा परगण्यातील रायपूरजवळ झाली.

३३ खाफीखान पृ. ८७९ वर "शेरखान" असा एक उल्लेख करतो. हाच उल्लेख साहिब रायच्या खुजिस्ता कलाममधील निजामुल्मुल्काच्या तुमारच्या नकलेतही आढळतो. येथे फरहतखान हे आणखी एक नाव दिसते.

३४ बुर्हानुल्फुतूह, पान १६८ अ, मध्ये त्याचा उल्लेख 'भाकाचा जमीनदार' असा झाला आहे. हे ठिकाण माळवा सुभ्यात सरकार कनौजमध्ये आहे; आईन खंड दोन २००. उलटपक्षी, सेंट्रल इंडिया, पहिली आवृत्ती, २३१, मध्ये माल्कम म्हणतो की मीर मुहम्मदखान हा त्याचा भाऊ अधिकारावर होता व तो वार लागून कामास आला.

उजव्या बाजूस नवाबाच्या विवाहासंबंधामुळे, त्याचा मामा लागणारा वऱ्हाड (एलिचपूर) चा नाजिम इवजखान यास ठेवून त्यासोबत त्याचा मुलगा जमालुल्लाहखान, अन्वरखान, हकीम मुहम्मद मुर्तजा वगैरे मंडळी होती. मध्य भागाच्या डाव्या बाजूस मरहमतखान, फीलजंग यांना ठेवले. उजव्या फळीत अझीझ बेगखान हरीसी याची तर डाव्या फळीत अब्दुर्रहीमखान (निजामुल्मुल्काचा चुलता) आणि कादिरदादखान रौशनी यांच्या नेमणुका केल्या. मुतवस्सिलखान (सादुल्लाहखानाचा नातू), इस्माईलखान खीशगी, कामयाबखान, दाराबखान, सादुद्दीनखान आणि मीर इहसान बक्षी हे मध्य भागी राहिले. निजामुल्मुल्क व मुहम्मद अमीनखान चीन यांचा चुलत भाऊ रिआयतखान याला बुर्हानपूर शहर सांभाळण्यास तर रुस्तम बेगखान याला सैन्याच्या पिछाडीचे रक्षण करण्यास सांगितले. ५०० लोकांसह फतहुल्लाहखान खुस्ती आणि राव रंभा निंबाळकर (मराठा) यांना छापेमारीची कामगिरी दिली.[३५]

पूर्वी सांगितल्याप्रमाणे, लढाईचे ठिकाण नर्मदा नदी आणि बुर्हानपूर यांच्या दरम्यान असलेल्या पांढर[३६] या नावाने संबोधल्या जाणाऱ्या डोंगराळ भागात होते. निजामुल्मुल्क स्वतः सांगतो की मी बुर्हानपूरहून ४० कोस कूच करून आलो व नंतर ठोकलेल्या तळापासून चार कोस पुढे आल्यावर शत्रूशी गाठ पडली. दुपारपर्यंत लढाईला सुरुवात झाली नव्हती. (१३ शाबान ११३२ हि., १९ जून १७२०). नवाबाच्या पूर्व बाजूस असलेल्या उचंवटयावर दिलावर अलीखान होता. या टेकाडाच्या पायथ्याला आपले सामानसुमान टाकून दिलावर अलीखानाने सय्यिद शेरखान आणि बाबरखान यांच्या हुकूमतीखाली आपले आघाडीचे सैनिक धाडले. त्यात सुमारे ३००० स्वार आणि ८००० बंदूकची होते. नंतर फौजेच्या मुख्य भागाच्या अग्रभागी राहून, हत्तीवर आरूढ झालेल्या आपल्या प्रमुख अमलदारांसह तो पाठोपाठ निघाला. [खाफीखान ८७६, कामवर २२३.] मध्यान्ह उलटून गेल्यावर तोफा आणि बाण यांच्या माराने लढाईला सुरुवात झाली. दिलावर अलीखानावर हल्ला करण्यासाठी घियासखान आणि इवजखान हे दोघे दोन निरनिराळ्या दिशांनी कूच करीत निघाले. पण दोघांच्या फौजा वाटेत एकमेकींना मिळू शकण्यात असफल झाल्याने इवजखानावर एकट्याच्या बळानिशी सय्यिद, राजपूत आणि अफगाण यांच्या तमाम फौजांच्या हल्ल्याला तोंड देण्याची पाळी आली. त्याचा हत्ती परत फिरत होता आणि त्याची पुष्कळशी माणसे पळून गेली; तरी इवजखानाने पुरुषार्थ दाखवून रणांगण धरून ठेवले. पण जबर जखमी झाल्यामुळे अखेर त्याला रणांगणातून माघार घेणे भाग पडले. सय्यिद शेरखान आणि बाबरखान हे हर्षोत्फुल्ल होऊन ओरडू लागले आणि घोड्याला घोडे खेटवून त्याचा पाठलाग

३५ खाफीखान, खंड दोन, पृ. ८७६; मासिरुल्-उमरा, खंड तीन, पृ. ८७७; अहवालुल्-खवाकीन, पृ. १५४ ब; कामवरखानाची १७ शाबान रोजीची नोंद; गुलशन-इ-अजाइब, पृ. १३२ ब, खुशहाल पान १००२ अ आणि बुर्हानुल्-फुतूह यात सदर तारीख ११ (म्हणजे १७ जून) अशी दिली आहे.

३६ पांढरच्या स्थाननिश्चितीसाठी आणि पांढरचा पिंढारी मंडळीशी असलेल्या संबंधाच्या शक्यतेविषयक माहितीसाठी मे १९०० इसवीच्या इंडियन अँटिक्वेरीमधील माझा लेख पाहा. तारीख-इ-हिंदीमध्ये, २४० ब, रुस्तम अली सांगतो की कसबा खांडवा या ठिकाणाजवळ-जे अशीरगडपासून फार दूर नाही-लढाई झाली. हे ठिकाण बुर्हानपूरच्या उत्तरेस ३२ मैलांवर आणि हांडियाच्या नैर्ऋत्येस ६० मैलांवर आहे. हे ठिकाण आता सेंट्रल प्रॉव्हिन्सेसच्या नेमाड जिल्ह्याचे मुलकी ठाणे आहे (सी. पी. गॅझेटिअर, ३८३). तारीख-इ-मुजफ्फरीच्या १८१ पृष्ठावर "बुर्हानपूरपासून १४ कोसांवर असलेले हुसैनपूर" असा उल्लेख याबाबत येतो. हेच नाव एशियाटिक मिसलेनी (१७८५ इ.) मध्ये आढळते. सदर कृतीत एका अनामक फार्सी लेखनकृतीचा, हेन्री व्हॅन्सिटार्ट (धाकटा) याने, आसफजाह (निजामुल्मुल्क) याच्या हकीकतीचा केलेला अनुवाद आहे.

करू लागले. कादिरदादखान जखमी झाला तरी लढत राहिला. अझीझबेगखान आणि त्याचा भाऊ हे देखील जखमी झाले. तेव्हा इवजखानाच्या हाताखालच्या एक मातब्बर अधिकारी अजमतखान घोड्यावरून उतरला आणि पायी लढू लागला. यावेळी मुतवस्सिलखानाने कुमक आणली आणि प्रत्येक वेळी कधी याच्या तर कधी त्याच्या हाती दिवस लागत आहे अशी परिस्थिती निर्माण झाली. शेवटी सय्यिद शेरखान आणि बाबरखान हे दोघे कामास आले.[37]

नंतर दिलावर अलीखान स्वतः मध्य भागावर चालून गेला. तेव्हा एक गोळी त्याच्या छातीत घुसली आणि तो मेला. त्याच्या बाजूच्या कित्येक बाऱ्हा सय्यिदांनाही या वेळी प्राणास मुकावे लागले. राव भीमसिंग आणि राजा गजसिंग अजून रणांगणात होते. लवकरच भीमसिंग गोळी लागून ठार झाला.[38] तद्नंतर नरवरचा तरणाबांड व देखणा गजसिंग आपल्या ४०/५० भाईबंदांसह घोड्यावरून पायउतारा झाला आणि त्याने हातघाईची लढाई सुरू केली. त्यांनी ढालतलवारींनी नवाबाच्या आघाडीला जोरदार धडक मारून तिला मागे रेटले. पण मरहमतखानाने त्यांवर डाव्या अंगाने जोरदार हल्ला चढविला. अखेरीस उरल्यासुरल्या राजपूत राजांच्या मृत्यूनंतर ४०० राजपूत आणि पुष्कळसे बाऱ्हा अधिकारी असे मिळून अंदाजे ४००० सैनिक प्रतिपक्षाने धनुष्यबाण, भाले आणि तलवारी यांचे भक्ष्य बनले. त्यातून वाचून उरल्यासुरल्या व पांगापांग झालेल्यांनी रणांगणातून काढता पाय घेऊन माळव्याच्या दिशेने पळ काढला. दोस्त मुहम्मदखान अफगाण त्यांत होता. ही मंडळी माघार घेत असता निजामुलमुल्काला मदत करणाऱ्या मराठ्यांनी त्यांचा पाठलाग केला आणि त्यांना लुटले. हा काहीसा अनपेक्षित विजय मिळाल्याचे पाहिल्यावर एका लेखकाला पुढील काव्यपंक्ती उद्धृत करण्याची इच्छा होते.

बख्त यावर गर बुवद
सिन्दान झ दन्दान बशिकनद
तालअ बरगश्तहरा
फालूदा दन्दान बशिकनद

(नशीब सहाय्यक झाले तर दातांनी ऐरणीचा तुकडा देखील तुटेल पण ग्रह फिरले तर फालुदा (मऊ पक्वान्न) दात पाडील.[39]

३७ दिलावर अलीखानाच्या बाजूच्या फराहखान मारला गेला. पाहा अहवाल-उल्-खवाकीन, १५९ अ; गुलशन इ-अजाइब, १३२ ब येथे याचा "फरहात" असा उल्लेख आला आहे.

३८ टॉडच्या वृत्तामध्ये, सामान्यपणे लक्षात येईल अशा चुकीपेक्षा अधिक मोठी चूक कशी असते याचे एक उदाहरण म्हणजे त्याने भीमसिंगाच्या मृत्यूविषयी दिलेली हकीकत, खंड २, ४८७, होय. लढाईत भीमसिंग एकटा साथीदाराशिवाय लढला असे त्यात दाखविले असून लढाई कोरवाई बोरसू या शहराजवळच्या सिंद नदीलगतच्या खाचखळग्यात झाली असे सांगितले आहे. आंबेरचा सवाई जयसिंग कच्छवाहा याने भीमसिंग आणि गजसिंग याना निजामुल्मुल्काचा रस्ता रोखण्याचा हुकूम दिला असे सांगून आपल्या हकीकतीवरील चुकांवर त्याने कळसच चढविला आहे. ज्या शहराचा उल्लेख झाला आहे ते कुरवाई हे गाव असावे हे उघड आहे. सदर गाव माळव्यात (थॉर्नटन ५२०) बेटवा नदीच्या उजव्या अथवा पूर्व किनाऱ्याला असून त्याच्या पैलतीरावर बोरसू गाव आहे. खरी जागा खांडवा ही आहे व त्या जागेचे नाव वाचण्यात झालेल्या अल्पशा चुकीमुळे त्याला लढाईचा संबंध कोरवाई बोरसू या गावाशी लावण्याची बुद्धी झाली असावी.

३९ तारीख-इ-मुजफ्फरी, पान १८३. साहिबरायच्या खुजिस्ता कलाम (इर्विन हस्त. पृ. ३२३) मध्ये लढाईचा निजामुल्मुल्काचा अधिकृत वृत्तांत किंवा तूमार आपणास वाचावयास मिळतो. याची एक प्रत फर्रुखाबादच्या महमदखान बंगशाला, एक आनंद ओसंडणारे पत्र सोबत देऊन पाठविण्यात आली होती. मा. उ. खंड ३, ३७०.

विजय मिळाल्याचे जाहीर करण्यासाठी निजामुल्मुल्काने डंका वाजविण्याचा हुकूम दिला. त्याच्या बाजूला हानी अशी विशेष झाली नाही. बदख्शीखान आणि इवजखानाच्या हाताखाली असलेला दिलेरखान नामक अधिकारी एवढीच काय ती विशेष उल्लेखनीय मंडळी प्राणास मुकली. जखमी झालेल्यांत स्वतः इवजखान आणि घियासखान होते. याखेरीज, उपयोगात आणता येतील अशा कित्येक तोफा निजामुल्मुल्काच्या हाती लागल्या. सैनिक आणि लुटारू यांच्या हातीदेखील पुष्कळ लूट लागली. विजयी फौजांनी आहे त्याच ठिकाणी तळ टाकला. एका अनावर झालेल्या हत्तीने आपले साखळदंड तोडले; तळाभोवती तो मोकाट हिंडून विध्वंस करू लागला; म्हणून उडालेल्या तथाकथित भीतीमुळे त्या रात्री गदारोळ उठला. पण मुतवस्सिल खानाच्या बाणामुळे हत्ती जायबंदी झाला. [खाफीखान ८८१.]

उपर्युक्त हकीकत शासकीय वृत्तान्त आहे आणि तो निजामुल्मुल्क आणि त्याच्या फौजा यांना अतिशक अनुकूल आहे यात शंका नाही. इतर लेखक या घटनेची वर्णने वेगवेगळ्या प्रकारे देतात आणि दगाफटका झाल्याची माहिती सांगतात. असा दगाफटका होणे निजामुल्मुल्काचा कारस्थानी स्वभाव पाहाता साहजिक वाटते; इतकेच नव्हे तर पराभूत पक्षामध्ये एवढी मोठी प्राणहानी का झाली आणि विशेष म्हणजे अधिकारी मंडळी मोठ्या प्रमाणावर मारली जाणे कसे शक्य झाले याचाही त्यावरून उलगडा होतो. या हकीकतीवरून असे दिसते की दोन्ही फौजांच्या मधील जागेत जमिनीला एक खोल खळी होती व तीमध्ये मोठ्या फौजा कोणाला न समजेल अशा पद्धतीने, लपविता येणे शक्य होते. निजामुल्मुल्काने आपल्या तोफा बाहेर काढून अशा ठिकाणी बसविल्या की ही खळी ओलांडण्याच्या एकमेव रस्त्याच्या दोन्ही बाजूंवर भडीमार करता येणे शक्य होई. त्यांची आघाडीची सेना दोन्ही बाजूला खळ्यांत दबा धरून बसली होती. नंतर दाढी, वय, पोषाख आणि एकंदर शरीरयष्टी या सर्व दृष्टींनी नवाबाशी मिळत्याजुळत्या ठरतील अशा २–३ व्यक्तींना हत्तीवर चढविले. त्यामुळे खळीपलीकडे सैन्य दिसल्यावर, निजामुल्मुल्क आपल्या मुख्य सैन्याचे जातीने नेतृत्व करीत आहे असा भास शत्रुपक्षाला झाला. दिलावर अलीखानाची माणसे तडक शत्रूवर धावली. तेव्हा माघार घेण्याच्या शत्रूच्या बनावट हालचालीमुळे ती शत्रूच्या घशात गेली. शत्रुपक्षाचा पुढारी जातीने हुकूमत गाजवत आहे, तेव्हा त्याला मारावे अथवा पडकावे या तळमळीपायी त्यांनी धीमा पाठलाग आरंभला आणि वाटेत भेटलेल्या कित्येक तोतया निजामुल्मल्कांचा त्यांनी समाचार घेतला. अखेर, सय्यिद शेरखानाने आपला हत्ती इवज खानाच्या अगदी नजीक आणला तेव्हा त्या मुघलाने खुणेने आपल्या हत्तीस बसावयास लावून त्या युक्तीद्वारे जीवावरच्या संकटातून सुटका करुन घेतली. शत्रुपक्ष खळीपर्यंत येऊन पोहोचल्यावर तोफांनी आपली कामगिरी बजावली. अधिकारी मंडळी मारली गेल्यावर दिलावर अलीखानाच्या उरलेल्या फौजेची पांगापांग झाली. [शिवदास ३७ ब, कासिम ३१४.]

लढाईनंतरच्या सकाळी, दिलावर अलीखान आणि सय्यिद शेरखान यांचे मृतदेह दफनासाठी सज्ज करण्यात आले. ते औरंगाबादेस रवाना झाले, कारण तेथे त्यांची मुले आलिम अलीखानाच्या चाकरीत होती. त्याच दिवशी आलिम अलीखान हरताल तलावावर आला आहे अशी बातमी येऊन पोहोचली.[४०] सदर तळे बुर्हानपुराच्या दक्षिणेला १७ कोसांवर

४० हरताल हे ४४० एकरांचे, तापीला मिळणाऱ्या नदीवरील, खानदेश जिल्ह्याच्या भुसवळ तालुक्यातील एदलाबादच्या नैर्ऋत्येस ४ मैलावरील तळे आहे. एदलाबाद हे बुर्हानपुराच्या दक्षिणेस सुमारे ३० मैलांवर आहे, बॉम्बे गॅझेटिअर, खंड १२ ब ६, १४२ ब ४४९.

होते. तेव्हा बुर्हानपूर शहरी अनेक लोकांच्या परिवारांना सुरक्षित ठिकाणी म्हणून ठेवलेले असल्यामुळे, सदर शहराच्या रक्षणासाठी आणि तेथील शिबंदीना कुमक म्हणून ३००० घोडेस्वार देऊन मुतवस्सिलखानाला पाठविले. त्याने एका दिवसात ४० कोसांची मजल मारून बुर्हानपूर गाठले. यामुळे बुर्हानपुरावर छापा पडण्याचा प्रसंग टळला. कारवाई इतक्या विद्युत्-वेगाने होईल अशी आलिम अलीखानाची कल्पना नसल्याने तो गोंधळला आणि आला होता त्याच ठिकाणी तो थांबला. [कासिम ३१८, खाफीखान ८८१.]

**टिपण**––या लढाईच्या हकीकतीविषयी आणखी एक वेगळे 'अहवालुल्-खवाकीन' मधून घेतलेले विवरण, पान १६२ अ.

दिलावर अलीखानाने नर्मदा ओलांडून चार-पाच मजला मारल्या व तो नकटी भवानी येथपर्यंत येऊन पोहोचला. शब-इ-बरात (१४ शाबान, २० जून १७२०) नजीक आली असल्याने त्यांनी तीन-चार दिवसांसाठी मुक्काम केला. सण संपल्यावर कूच करावे असा त्याचा बेत होता. पण निजामुल्मुल्काची हालचाल आपल्याच दिशेने होत आहे असे समजल्यावर सय्यिद बाहेर पडला व त्याने तळापासून एक कोस अंतरावर आपल्या फौजा उभ्या केल्या.

निजामुल्मुल्काच्या टेहळ्यांनी खबर आणली की, सय्यिदांचे तोंड पूर्वेस असून आघाडीला तोफा आहेत. समोरून चालून जाणे धोक्याचे आहे हे जाणून, पिछाडीस पोहोचणे शक्य आहे का, असा तपास निजामुल्मुल्काने केला. सहा कोसांचा वळसा घालून ते शक्य आहे असे टेहळ्यांनी सांगितले. सूर्य अजून मध्यान्ही आलेला नव्हता. हालचाली करण्यास अजून वेळ होता. आपली दिशा बदलून ते सय्यिदांच्या पिछाडीस आले. त्यासाठी तीन तास लागले. तेव्हा ते सय्यिदापासून एक कोस अंतरावर येऊन पोहोचले होते.

निजामुल्मुल्कांची निशाणे दूर अंतरावर अस्पष्ट दिसू लागली तेव्हा सय्यिद दिलावरखान विस्मयचकित झाला व आपल्या हेर प्रमुखावर त्याने दगलबाजीचा आरोप केला. त्या पदावर असलेल्या वृद्ध बार्हा सय्यिदाने या आरोपाचा प्रखर इन्कार केला. अशा आकस्मिक उद्भवलेल्या आणीबाणीच्या वेळी तोफखान्याचा उपयोग करता येण्यासारखा नव्हता; म्हणून तो मागे ठेवण्यात आला आणि शत्रूला भिडता यावे अशा प्रकारे आघाडी बदलली. शक्य तेवढी त्वरा करून मागून यावे असा तोफखान्याला हुकूम झाला.

निजामुल्मुल्काच्या आघाडीच्या अधिकाऱ्याने घियासखानावर भीमसिंग, गजसिंग आणि 'बे-दोस्त रोहिला' (दोस्त मुहम्मदखान) यांनी हल्ला चढविला; तर सय्यिद शेरखान, बाबरखान आणि फराहखान यांनी आपले मोहरे इवजखानाकडे वळविले. गजसिंग आणि भीमसिंग हाडा घोड्यावरून उतरले आणि दोन हजार राजपूत फौजांच्या अग्रभागी राहून त्यांनी हातघाईची लढाई केली. कुरेश बेग, ख्वाजा मासूम आणि आणखी काही मंडळी यांनी प्रतिकार केला पण तो नगण्य ठरला. दोन हजार चिलखतधारी राजपुतांपुढे चाळीस लोकांचा कसा पाड लागणार? भीमसिंग आणि कुरेश बेग यांचे द्वंद्व झाले, नंतर चाळीस राजपुतांनी कुरेश बेगवर हल्ला केला. प्रसंग येवढा बाका असताना देखील, आपल्याला झालेल्या असंख्य जखमांमुळे गतप्राण होण्यापूर्वी, भीमसिंगाला ठार करण्यात कुरेश बेगला यश आले. मेलेल्या राजपुतांच्या प्रेतांची रास बनली.

दरम्यान इवजखानाची शेरखान आणि बाबरखान यांच्याशी जुंपली होती. लढाई इतकी धनघोर होती की 'कियामतका दिन' उगवल्यासारखे वाटले. धुमश्चक्री दोन तासपर्यंत चालू राहिली. सय्यिदांच्या फौजांनी पराकाष्ठा केली. अखेर त्यांची ४५०० माणसे कामास आली. दोस्त मुहम्मदखान रोहिलाच काय तो तेवढा पाठ दाखवून पळाला.

निजामुल्मुल्काला साधी जखमसुद्धा झाली नाही; पण ख्वाजा मासूम, मिर्झा नईम वगैरे त्याचे लोक ठार झाले. घियासखानावरील हल्ला परतवून लावण्याच्या कामगिरीत सय्यिद मुसाफिरखान चांगलाच चमकला. या कामी त्याला यल्रशखान, ख्वाजा अब्दुल्हम्माम, मीर कुत्बुद्दीन, ख्वाजा इब्राहीम वगैरे सव्वाशे लोकांची मदत झाली. इवजखानाचा बचाव करीत असता काही पन्नी अफगाण देखील ठार वा जखमी झाले. या पक्षाकडील सगळी मिळून तीस माणसे प्राणास मुकली व सुमारे १०० माणसे जखमी झाली, सय्यिदांच्या पक्षाची साडेचार हजार माणसे ठार झाली व जखमी किती झाली याचा पत्ता लागला नाही.

पाठलागाविषयी हुकूम होण्याविषयी लोकांनी निजामुल्मुल्काकडे विचारणा केली; पण त्याने नकार दिला. जखमींना त्याने आपल्या तंबूभोवती गोळा केले. त्यांजकडे शल्यवैद्य, आरामदायक मलमे आणि कपडे धाडले. त्याने काहींना घोडे, काहींना पालख्या तर काहींना नालक्या दिल्या. ते बरे झाल्यावर आपल्याकडे चाकरी करण्याविषयी त्याने त्यांना विनंती केली. आपला धनी हुसैन अलीखान अजून जिवंत आहे या सबबीखाली त्यांनी या विनंतीस नकार दिला; तेव्हा त्यांना वाटखर्चासह निरोप दिला. दिलावर अलीखानाच्या मृतदेहाचे इतमामाने दफन केले. हिंदू होते त्यांचे, राजा इंदरसिंगाच्या देखरेखीखाली दहन केले. निजामुल्मुल्क आणि त्याच्या फौजा बुऱ्हानपुरास परतल्या.

## ८ : सय्यिद बंधू गोंधळून जातात

खानदेशात आपणावर कोणते महासंकट कोसळले याची गुप्तहेरांनी आणलेली खबर अब्दुल्लाहखान आणि त्याचा भाऊ यांना शाबान महिन्याच्या अखेरीच्या दिवशी (२९-५ जुलै १७२०) मिळाली. निजामुल्मुल्काची आगेकूच रोखण्यात त्यांना यश आले नव्हतेच; त्यांचा एक सेनापती आणि सगळी फौजही बरबाद झाली होती; हे जणू थोडेच म्हणून की काय हुसैन अलीखानाचे संपूर्ण कुटुंब विजेत्याच्या हाती सापडण्याची शक्यता निर्माण झाली होती. आपण पूर्वी पाहिलेच की, सैफुद्दीन अलीखानाची मुले बुऱ्हानपुरास पकडली गेली होती. त्यांना जाऊ देण्यात आले हा भाग वेगळा. दख्खन सोडली तेव्हा हुसैन अलीखानाने आपली बायको आणि मुले मागे ठेवली होती. ती अजूनही औरंगाबाद मुक्कामी होती. वाटेल तो धोका पत्करून कुटुंबाचा नावलौकिक राखणे भागच होते. आलिम अलीखानास पुन्हा पत्र धाडावे आणि निजामुल्मुल्कास शांत करावे याबाबत दोघा भावांचे एकमत झाले. स्त्रिया सुरक्षित आहेत आणि हुसैन अलीखानाचे आगमन होत आहे तोपर्यंत कोणतीही निर्णायक कृती लांबणीवर टाकावी असा हुकूम आलिम अलीखानाला आला.

दियानतखानाच्या निवेदनावरून निजामुल्मुल्काशी वाटाघाट करण्याचे पवित्रे अगदी नाईलाजाने उचलण्यात आले. हा दियानतखान एके काळी दख्खनचा दिवाण होता. पण यावेळी तो हुसैन अलीखानाच्या ताब्यातील जवळजवळ कैदीच होता. ज्या दिवशी पराजयाची

भयानक खबर येऊन पोहोचली त्याच दिवशी अशा कठीण समयी दियानतखानाचा सल्ला घेण्याबाबत हुसैन अलीखानाने उत्सुकता दाखविली. दगडाखाली सापडलेला हात हळूहळू काढून घ्यावा अशा अर्थाच्या हिंदी म्हणीचा उल्लेख करून दियानतखान म्हणाला की या प्रकरणी नवाबाचाच जीव धोक्यात आला आहे; कारण त्याचे कुटुंब संकटात सापडलेले नाही काय? क्षणाचाही विलंब न लावता सय्यिदांनी निजामुल्मुल्कास सनद पाठवावी आणि त्याद्वारे संपूर्ण दख्खनचा कारभार त्याच्याकडे सोपवून त्याच्याशी सलोखा करावा आणि अधिक अनुकूल संधी येईल तेव्हाच युद्ध आणि बदला घेणे या गोष्टींचा विचार करावा.

कुत्सितपणे हसत राजा रतनचंदाकडे पाहात हुसैन अलीखान म्हणाला: "मी पूर्वेकडे द्रव्य धाडले आहे. तेथून म्हणजे आग्र्यापासून दक्षिणेपर्यंत दर टप्प्यावर जलद चालीच्या घोड्यांची दळामागून दळे धाडण्याची व्यवस्था करता येईल. बारा हजार मशालधारी मी सहज ठेवीन. एका क्षणासाठीही, मग तो दिवसाचा असो वा रात्रीचा, मी मार्गावर थांबणार नाही किंवा दौडही थांबविणार नाही". यापेक्षा अधिक शीण आणू शकतील असे कष्ट उपसण्यास नवाब समर्थ आहेत हे कबूल करून दियानतखान म्हणाला की अशा घाईगर्दीच्या आगेकूचीत किती फौजांचा निभाव लागेल आणि लागला तरी अखेर स्वार आणि हशम यांची किती संख्या हाती लागेल? आपल्या भुवया फिरवीत हुसैन अलीखान उत्तरला: "शिपायाच्या महत्त्वाकांक्षेचा कडेलोट म्हणजे मरणाची इच्छा. पण आमचे दुर्दैव की आपणासारखा लौकिकवान नेता भेदरटपणे बोलतो आणि धीर खचल्यासारखा दिसतो". अरबी म्हणीचा आसरा घेत खानाने उलट टोमणा मारला की, 'माणूस ठरवितो एक आणि अल्ला करतो दुसरेच'. अखेर, हा प्रसंग शौर्य गाजविण्याचा नाही, अन्य मार्गानेच परिस्थिती हाताळली पाहिजे असे ठरले. त्यांनी एका लांब पत्रासोबत निजामुल्मुल्काला फर्मान पाठविले. फर्मान आणि पत्र या दोहोंचेही उद्धरण मी पुढे केले आहे. [मा. उ., खंड २, ७५.]

नवाबाने हुकूम नसताना माळवा सोडला हे समजल्यावर बादशहास आश्चर्य वाटले असा फर्मानाचा आरंभ होता. असे करण्यास काय कारण असावे? तुम्हास भयाकुलता कशामुळे झाली? तुम्ही तख्तापुढे आपली बाजू मांडली का नाही? आणि तशी मांडल्यावर मिळणाऱ्या जबाबानुसार वागला का नाही? तुमची कोणती विनंती यापूर्वी कधी नाकारण्यात आली होती? दक्षिणेत मुलुखगिरी करावी अशी इच्छा झाली असेल तर असली इच्छा धुडकावली जाणे शक्य तरी वाटते का? किंवा तुम्ही मागणी केली असती तर दक्षिणेचा कारभार तुमच्यावर सोपविला नसता का? वाईट बोलणाऱ्याकडून धिक्काराचे धनी होण्याचे टाळता यावे म्हणून तशी सनद तुम्हाला दिली असती. तुमच्यावर बादशहाची मुळीच खप्पा मर्जी झालेली नाही; पण वरकरणी अपराध केल्यासारखी वाटणारी ही गोष्ट तुम्ही टाळावयास हवी होती. "दक्षिणेत अनागोंदी असल्याचे वृत्तांत वारंवार येत असल्यामुळे दख्खनचे सर्व सुभे तुमच्या हवाली करण्याच्या विचारात खाविंद होते. अल्लाची खैर की ज्यासाठी ते करावयाचे ते कारणच आता संपुष्टात आले आहे आणि देवाच्या मनात असेल तर बादशहांचा हेतू आणि तुमची इच्छा या दोन्ही गोष्टी पुऱ्या होतील. 'या स्वर्गाच्या कमानीखाली मनाला मन मिळते'. औपचरिक सनद तयार होत आहे. जेव्हा तुम्ही काम पाहू लागाल तेव्हा आलिम अलीखान आणि बक्षी-उल्-ममालिक, अमीरूल्-उमरा यांचा परिवार—ज्याचा त्यांना दीर्घकाळ वियोग सोसावा लागला आहे—यांची योग्य त्या सोबतीसह आणि सुरक्षिततेसह पाठवणी करावी". [शिवदास, ३३ब.]

फर्मानासोबत हुसैन अलीखानाचे एक पत्र होते. त्यातील मजकूर असा : माझा औरंगाबादेतील परिवार हिंदुस्थानला आणण्यासाठी दिलावर अलीखानाला पाठविले होते. आता असे कळते की, हुकूम असल्याचा निराधार बहाणा करून, त्याने तुमच्या व्यवहारात ढवळाढवळ केली. पण अल्लाची खैर की त्याचे त्याला प्रायश्चित्त मिळाले. उचापती आणि शैतानात करण्यावरच जीव जडलेल्या कित्येक व्यक्तींनी, आपणा दोघांत तणातणीची बीजे पेरू शकतील अशी, कित्येक बाबीसंबंधी खोटी माहिती देणारी पत्रे पाठविली आहेत. आपल्यासारख्या जुन्या दोस्तांमध्ये संशय निर्माण व्हावा हे दुर्दैवच म्हटले पाहिजे. मतभेदाची बीजे पेरण्याद्वारे हेव्यादाव्यात रस असलेल्या मंडळींना आपला कार्यभाग तेवढा साधावयाचा आहे. जर माझी आपणाविषयी काही कुरकूर असती—देव करो आणि तसे नसो—तर मी स्वतः तुम्हासच लिहिले असते. "अशा पुष्कळ गोष्टी नजरेस आणल्या आहेत की ज्यामुळे बादशहास राग आला असता; कोत्या दृष्टीच्या माणसांनी बादशहाचे मत आपल्या विषयी कलुषित करण्याचा प्रयत्न केला आहे; पण आपली इमानदारी माहीत असल्यामुळे मी बादशहाकडे खुलासेवार रदबदली केली आहे. त्यामुळे तुमच्या हितशत्रूंना नमावे लागले आहे आणि तुमच्या पाठीराख्यांना आनंद झाला आहे; हे सांगताना मला धन्यता वाटते. बादशहाने कृपावंत होऊन दक्षिणेचा कारभार तुमच्यावर सोपविणारी सनद तुम्हास देण्याचे ठरविले आहे. आपले अभिनंदन. त्याचा स्वीकार करा. माझा (मानलेला) मुलगा आलिम अलीखान आणि माझा परिवार यांचा इकडे येण्याचा बेत आहे. कृपया त्यांच्या सोबतीस रक्षक द्या आणि वाटेवर असताना त्यांना इजा होणार नाही याची खबरदारी घ्या". [शिवदास, ३९अ.]

सय्यिद मंडळी किती गलितधैर्य झाली होती याची कल्पना वरील पत्रावरून येते. कारवाईची रोज एक नवी योजना आखीत आणि आणखी नवी योजना साकार होत असल्यामुळे अगोदरची टाकून देत. प्रथम त्या दोघांनी बादशहाबरोबर दक्षिणेत कूच करण्याचे योजले. नंतर त्यांचे असे ठरले की, बादशहाबरोबर हुसैन अलीखानाने जावे आणि अब्दुलाहखानाने दिल्लीला परतावे. नंतर पुन्हा ठरले की बादशहा मुहम्मदशाहाने वजीराबरोबर राजधानीला परतावे. आणखी एकदा त्यांना वाटले की, वर दिलेल्या पत्रात आल्याप्रमाणे, निजामुल्मुल्कांशी सलोखा करावा आणि अधिक अनुकूल संधी मिळेतो हल्ला करणे लांबणीवर टाकावे. या बदलत्या निर्णयामुळे, बादशहा आणि त्याचे हे दोन मंत्री यांचे आघाडीचे तंबू एकदा या दिशेला तर पुन्हा दुसऱ्या दिशेला धाडण्याचे प्रकार घडत राहिले.

## ९ : मुहम्मद अमीनखानावर हल्ला

खुद्द आपल्याच सैन्यातील मुघल सैन्याचे संख्याबळ ही बाब सय्यिदांना फार मोठ्या अडचणीत टाकत होती. मुघल सैनिक वर्गाचा प्रमुख आणि निजामुल्मुल्काचा भाऊबंद मुहम्मद अमीनखान याचे काय करावे हे त्यांना कळेनासे झाले. एकदा त्यांना, त्यास मागे ठेवावे असे वाटले तर दुसऱ्या खेपेस, त्यास बरोबर न्यावे असे वाटले. काहींनी पुरविलेल्या माहितीनुसार त्यांनी त्याला विष घालण्याचा प्रयत्नही केला. नशिबाची सद्दी संपलेल्या सय्यिदांच्या बोडक्यावर संकटाचे जे संचित आदळत होते, त्यामुळे मुहम्मद अमीनखानाला आतल्या आत आनंदाच्या कितीही उकळ्या फुटत असल्या तरी, सय्यिदांच्या दरबारास हजेरी लावण्याचे त्याने चालू ठेवले आणि तेथे निजामुल्मुल्काच्या वर्तणुकीतील दुष्टपणाबाबत अप्रतिहतपणे बोलत राहाण्याचा नेम ठेवला. [खाफीखान ८८२, शिवदास ४५अ, बयान ३१९.]

असे सांगतात की आपण आपल्या प्रचंड संपत्तीला मुकू या भीतीपोटी मुहम्मद अमीनखान सय्यिदांच्या बाजूस आला होता. आपण इतर सर्वांपेक्षा वरचढ आहोत अशी त्याची स्वतः विषयीची एक थोर कल्पना होती; आपणच अखेर विजयी ठरू अशीही त्याची दुसरी कल्पना होती. तो हुसैन अलीखानाशी गुफ्तगू करू लागला तेव्हा हुसैन अलीखानाच्या मित्रांनी सय्यिदाला सावध करण्यासाठी, हा मुहम्मद अमीनखान दुतोंड्या आहे, असे बजावले. सय्यिद उत्तरला, 'माझ्याविरुद्ध लढण्याइतके बळ त्याजवळ काही आहे तरी का? आणि समजा वाईटातले वाईट घडले तरी मी त्याच्या तावडीतून सुटणे अवघड आहे का?"

सय्यिदांना अपमानकारक वाटेल अशी कोणतीही हकीकत कानावर आली रे आली की हुसैन अलीखानाला ती ऐकविण्यासाठी मुहम्मद अमीनखान जात असे. ती हकीकत ऐकण्यासाठी हुसैन अलीखान आपल्या शरीररक्षकांना बाहेर जावयास सांगेल व असे झाल्यास सय्यिदास खंजिराने खुपसून मारण्याची संधी मिळेल असा त्याचा, असे करण्यामागील कयास होता. पण त्याच्या मुघल छापाच्या, लालसावलेल्या डोळ्यामुळे सय्यिद हुसैन अलीखानाला त्याचा संशय वाटे. असे सर्व असूनही, मुहम्मद अमीनखान मोठ्या चिकाटीने सय्यिदांच्या बैठकीस जात असे. आपणास सगळे कांही चांगले समजते असा ज्यांना अभिमान वाटे, अशा मंडळींनी वारंवार सांगितले की, सगळ्या कटकटींच्या मुळाशी हा मुहम्मद अमीनखान असून फर्रुखसियरच्या पदच्युतीलाही हाच खऱ्या अर्थाने कारणीभूत झाला आहे. "यात खऱ्याखोट्याचा भाग किती ते ओळखणे सांगणाऱ्यावरच सोपवावे! आवश्यक तथ्य लेखकाने नोंदवून ठेवावे; मग त्याचे शत्रू त्यास कितीही टोमणे मारोत. जर त्याने दुष्टाचे सुष्टात रूपांतर केले तर सगळी हकीकत सदोष बनेल; पण आपणास न समजलेल्या सर्व गोष्टींचा ज्ञाता परमेश्वर, तोच काय तो या प्रकरणीचा गाभा उघडा करून दाखवू शकेल." [अहवाल १४६ ब.]

पण असे मानले जाते की अखेरीस सय्यिदांनी मनाशी निर्णय केला की या 'म्हाताऱ्या लांडग्यांच्या कटकटीतून आपण सुटका करून घ्यावी. लाहोरच्या सुभेदारपदावर असलेला, विवाहसंबंधामुळे मुहम्मद अमीनखानाचा नातेवाईक लागत असलेला मुघल गटाचा आणखी एक आधारस्तंभ अब्दुस्समदखान याच्याबाबतही असेच ठरले. त्याला बल्ख अथवा बुखारा येथे परागंदा करावे अशी त्यांची इच्छा होती. या धोक्याची कल्पना खबऱ्यांनी मुहम्मद अमीनखानाला दिली आणि एके दिवशी तर त्याच्या शिपायांचा असा समज झाला की त्यांच्या धन्याला दरबारातच धरले तरी आहे किंवा ठार तरी केले आहे. त्यांनी हलकल्लोळ केला. आपला सेनापती सुखरूप बाहेर आलेला दिसेपर्यंत तो त्यांनी थांबविला नाही. मुहम्मद अमीनखान मुख्यत्वे करून इख्लासखानाच्या सल्ल्यामुळे वाचला. या इख्लासखानाच्या मताला दोन्ही सय्यिद बंधूकडे व विशेषेकरून हुसैन अलीखानाकडे चांगले वजन असे. मुहम्मद अमीनखानाला हटविला तर त्यामुळे सूडवृत्तीचा वडवानळ माणसांच्या अशा एका गटात पसरेल की ज्यांना गोंजारणे सोपे नाही, असा युक्तिवाद इख्लासखानाने मांडला. ज्या टोळीचा तो मुख्य आहे ती टोळी मोठी आहे हे गांधील माशांचे मोहळ एकदा डिवचले की त्यांना शांत करण्यास अथवा त्यांच्या दुःखावर फुंकर घालण्यास, मुहम्मद अमीनखानाला मारल्यावर, कोणी उरणार नाही.

पण या सल्ल्याबरहुकूम दिलजमाई होण्यापूर्वीच सय्यिदांनी आपला मुघलांबरोबरचा तंटा लढून सोडविण्याचा प्रयत्न करून पाहिला. सय्यिद आलिम अलीखानाचा पराभव आणि मृत्यू–की तो ज्या परिस्थितीत झाला त्याची माहिती पुढे लगेचच येत आहे– झाल्याची बातमी आल्यावर या सय्यिद-मुघल तंट्याने उग्र रूप धारण केले. अचानक कोसळलेल्या त्या आपत्तीची बातमी सांडणीस्वारांनी आग्र्याला, लढाईच्या सोळाव्या दिवशी, २२ शव्वाल (२६ ऑगस्ट १७२०) रोजी आणली. त्यामुळे भडकलेल्या क्रोधाग्नीच्या भरात, मुहम्मद अमीनखानाचा बदला घेण्याचा निर्धार सय्यिदांनी केला. तेव्हा मुहम्मद अमीनखानाने तावडतोब आग्र्याच्या राजा भोज भागातील आपल्या राहात्या घराभोवती मोर्चे बांधले. या घराच्या एका बाजूने यमुना नदी वहात होती; उरलेल्या तीन बाजूंना त्याने चर खणले. हुसैन अलीखानाने आपले सैन्य हल्ल्यासाठी तयार केले. पण हल्ल्याची कल्पना अमलात आणण्यापासून त्याला परावृत्त केले. मुहम्मद अमीनखानाला या गोष्टी कळल्या तेव्हा तो आपल्या लोकांना घेऊन बाहेर आला; तुम्हास मी हवा असेन तर हा मी तुम्हास भेटण्यास तयार आहे असे त्याने सय्यिद बंधूंना आव्हान दिले. त्यास इजा करण्याची आपली इच्छा होती याचा आता सय्यिदांनी इन्कार केला. [शिवदास, ४५ अ.]

मोठी फौज सोबतीला देऊन बादशहाला ताजकडे पाठवावे असे आणखी एके दिवशी ठरले. मुहम्मद अमीनखानाचे राहाते घर ताजगंजपासून फार दूर नव्हते. कबरींच्या दर्शनासाठी, तसेच एक–दोन दिवस मनोविनोदात घालविता यावे येवढ्याच हेतूने बादशहा बाहेर पडला आहे असे त्यांनी भासविले. बादशहाचा रक्षक म्हणून आळीपाळीने काम करण्याची सर्वज्ञात रीत सरदार–मानकऱ्यांत होती. आपली रक्षक म्हणून काम करण्याची पाळी येईल तेव्हा आपण सदर कामगिरीवर असल्याचे भासवीत, आपल्या सैन्यासह ताजगंजकडे यावयाचे; बादशहाला ताजमहालामध्ये सुरक्षित ठेवल्यावर आपल्या फौजेसह मुहम्मद अमीनखानावर चालून जावयाचे असे दोघा भावांनी मिळून ठरविले. काय शिजत आहे याची कल्पना मुहम्मद अमीनखानाला आली असावी; म्हणून यमुनेवरील सगळ्या नावा धरून आणून त्याने यमुना नदी ओलांडून पैलतीरावर तळ टाकला; आपल्या घराच्या रक्षणासाठी देखील पुरेशी माणसे त्याने मागे ठेवली. येवढे झाल्यावर सगळ्यांनीच सबूरीने घेण्याचे ठरविले. इख्लासखानाचा सल्ला सय्यिदांनी मानला. दंगल न वाढविण्याबाबत अब्दुल्लाहखानाने आपल्या भावाचे मन वळविले; दंगल वाढविल्याने आपल्यास कोणता धोका आहे तेही निदर्शनास आणून दिले. शेवटी, मुहम्मद अमीनखानाला मेजवानीचे आमंत्रण गेले. त्या सर्वांनी एकत्र बसून जेवणखान केले. निदान बाह्यात्कारी का होईना सर्वांची समजूत पटल्यासारखी दिसली.

## १० : निजामुल्मुल्काचा आलिम अलीखानाशी लढा

सय्यिद दिलावर अलीखान आणि त्याची फौज यांचा निकाल लावल्यावर निजामुल्मुल्क पुन्हा एकदा बुर्हानपूरच्या लालबागेत २१ शाबान ११३२ हि. (२७ जून १७२०) रोजी आला. त्याच्या आलिम अलीखानाशी झालेल्या वाटाघाटीबाबत अशी माहिती मिळते की, आलिम अलीखानाने मक्केची यात्रा करावी असे निजामुल्मुल्काने त्याला सांगितले. त्यानुसार त्याने सुरत शहराकडे आपला मोर्चा वळविला आणि आपल्या चाकरीतील लोकांना काढून टाकल्याचा बहाणा करून, प्रत्येक गाव सोडताना तेथे आपली दोन-तीनशे माणसे मागे ठेवली. आपल्या घोडदलातील स्वारांना वाटेल तेथे जाऊन वाटेल

ती चाकरी धरण्याची मुभा देणारा आदेश जारी करणारी दवंडीही त्याने पिटविली. पण गुप्तपणे त्यांना अशी सूचना दिली की ते आले आहेत तेथेच त्यांनी थांबावे किंवा त्यांनी शत्रूकडे जावे. ( जाण्याचा बहाणा करावा ). गरज वाटेल तेव्हा त्यांनी आलिम अलीखानाच्या निशाणाभोवती गोळा व्हावे अथवा लढाईसमयी त्यास ( निजामास ) सोडून जावे. तो पुढच्या प्रवासाला निघाला तो एक साधा प्रवासी अथवा उंटाच्या तांड्यातील कोणी एक साधा कारवान म्हणून. निजामुल्मुल्क जवळजवळ एकाकी आहे हे पाहून त्याचा रस्ता बंद करण्याच्या भरीस तो पडला. निजामुल्मुल्काने त्याला इशारा दिला व लिहिले की, आता लौकिक गोष्टींविषयी मी विरक्त झालो असून सार्वजनिक पद अथवा सत्ता याविषयी मी पूर्ण जाणीवरहित आहे; मला भीती कसली वाटत असेल तर मुसलमानांचे रक्त अन्यायाने सांडले जाईल की काय याची. या निषेधाचा उपयोग होत नाही असे दिसताच अखेरीस त्याने लढाईचा निर्णय घेतला व त्यासाठी आपल्या फौजेला पाचारले. [ यह्या, १२६ अ. ]

पूर्वी सांगितल्याप्रमाणे, सय्यिद दिलावर अलीखान येऊ घातल्याचे समजताच आलिम अलीखानाने आपले तंबू १२ रज्जब ( १९ मे १७२० ) रोजी मुहम्मदी बागेत टाकले आणि तीस हजार घोडेस्वारांस सांगाती घेऊन त्याने औरंगाबाद शहर सोडले. फुलमडीमार्गे त्याने कूच केले.[४१] औरंगाबाद आणि बुर्हानपूर यांच्या मधोमध पडणाऱ्या, फर्दापूरच्या खिंडीत[४२] रमजान महिन्याच्या सुरुवातीस ( मे १७२० ) येऊन पोहोचल्यावर त्याने आपल्या तोफखान्याच्या खिंडीमधून जाण्याची तजवीज केली आणि खिंडीपलीकडे आपले आघाडीचे रक्षक पाठविले. मराठे आणि तहव्वुरखानाच्या फौजा, त्यांच्या निम्म्या-शिम्म्या तोफा घेऊन, खिंड ओलांडतात तोच, मारल्या गेलेल्या दिलावर अलीखानाच्या फौजेतून पळून गेलेले दोन हजार बार्हा सय्यिद दृष्टीस पडले. त्यांनी दिलावर अलीखानाच्या पराभवाची व मृत्यूची अस्वस्थ करणारी खबर दिली. बहुतेक मराठे आणि खुद्द त्याचे सरदार यांनी आलिम अलीखानाला या परिस्थितीत औरंगाबादेला, निदान अहमदनगरला परतण्याचा सल्ला दिला. तेथे हुसैन अलीखान येईपर्यंत वाट पहावी आणि मराठ्यांना निजामुल्मुल्काच्या फौजेस सतावण्याचा कामावर–ज्यात ते तरबेज होते–मोकळे सोडावे असेही त्याचे मत होते.[४३]

माघार घेणे लांच्छनास्पद समजून आलिम अलीखानाने आपल्या उरलेल्या फौजा खिंडीपलीकडे आणल्या. त्याच्या या हालचालीची माहिती समजताच निजामुल्मुल्काने त्याच्याकडे सय्यिद दिलावर अलीखान आणि सय्यिद शेरखान याचे जनाजे धाडले; त्यासोबत पाठविलेल्या पत्रात प्रतिकार थांबवून कुटुंबातील स्त्रियांसमवेत कूच करून आपल्या दोन चुलत्यांना जाऊन मिळावे असा त्यास सल्ला दिला. या पत्राचा काही उपयोग झाला नाही. यानंतर निजामुल्मुल्क बुर्हानपुराबाहेर कूच करीत पूर्णा नदीच्या तीरावर आला. ही

४१ औरंगाबादेच्या ईशान्येस १६ मैलांवरील शहर. पाहा हुसैन बिलग्रामी आणि विलमॉट, स्केच ऑफ निजाम्स डोमिनिअन्स, खंड दोन, ७०५.

४२ अजिंठे घाटांच्या उत्तर पायथ्याशी असलेले एक खेडेगाव. हे जी. आय्. पी. रेल्वेवरील पाचोरे स्टेशनच्या दक्षिणेस २० मैलांवर आहे. पाहा एस्. हुसैन आणि सी. विलमॉट खंड २, ४६७ आणि कॉन्स्टेबलचा हँड ॲटलास तक्ता ३१.

४३ बुर्हानुल्-फुतूह १६६ अ. अहवाल १६५ ब, १७० अ; खाफीखान ८८५.

नदी बुर्हानपूरच्या दक्षिण आणि नैर्ऋत्य दिशेला सोळा सतरा कोसांवरून वहाते त्याचा तळ तेथे पडला. दुसऱ्या दिशेने आलिम अलीखान आला. त्याने हरताल तलावावर आपला तळ दिला. हे तळ पूर्णा नदीपासून फार दूर नाहीत. [ खाफीखान ८८६, कामवर २२६.]

अशा स्थितीत त्याचे बरेच दिवस गेले. संततधार पाऊस, चिखल झालेले रस्ते, पूर आलेली नदी आणि नदी ओलांडण्याच्या साधनांचा अभाव (नावांचा एक पूल वाहून गेला होता) यामुळे कोणत्याच पक्षाला हलणे शक्य झाले नाही. छावणीची जागा बदलणे आवश्यक वाटल्याने, निजामुल्मुल्काने नदी प्रवाहाच्या विरुद्ध बाजूस वऱ्हाडातील मलकापूरच्या[४४] दिशेला नदीचा उतार धुंडाळण्यासाठी, अनेक मजला मारल्या, अखेरीस, आठ मजला मारून झाल्यावर, आसपासच्या जमीनदारांकडून नदीच्या उताराबाबत माहिती काढण्यात इवजखानाला यश आले. वऱ्हाड सुभ्याच्या बाळापूर[४५] जिल्ह्याच्या दिशेला चौदा-पंधरा कोसांवर तो होता. विरुद्ध तीरावरून आलिम अलीखान पाठोपाठ येत होता. नदीच्या एका तीरावरून दुसऱ्या तीरावर मारा होणे असे प्रकार रोज चालत. रमजान महिन्याच्या मध्यात (१५=२० जुलै १७२०) निजामुल्मुल्क आपल्या सगळ्या फौजेसह नर्मदा नदी ओलांडून तिच्या दक्षिण तीरावर आला. नदीचे पाणी कोठे कमरेइतके तर कोठे छातीइतके खोल होते. तरी प्रवाहात सामान असे वाहून गेले नाही अथवा प्राणहानीही झाली नाही. तळावरची सगळी मंडळी एकत्र जमणे शक्य व्हावे म्हणून एक दिवस त्यांनी नदीकिनारीच मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी लढाई खेळण्यास सोयीची जागा हुडकण्यास ते निघाले. वऱ्हाड सुभ्यातील शेवगाव या खेड्या-जवळील काटेरी झुडपांनी भरलेल्या डोंगर-खडकांचे तुटलेले कडे असलेल्या भागात त्यांनी तळ टाकला व भोवती चर खणले.[४६]

संततधार पावसास तोंड द्यावे लागल्यामुळे आणि काळ्याशार खोल चिखलात राहावे लागल्यामुळे, अतिशय त्रास सहन करीत त्यांना बरेच दिवस काढावे लागले. पहिली गोष्ट म्हणजे, मुसळधार पाऊस आणि पूर आलेल्या नद्या यांमुळे खानदेश किंवा वऱ्हाड यांपैकी कोठूनही पुरवठा होऊ शकला नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, नागपूरचे मराठे आलिम अलीखानाच्या पक्षास मिळाले होते व ते तळाभोवती घुटमळून लुटालटीचा मोका साधत होते; त्यामुळे एखादासुद्धा बैल अथवा उंट चरावयास पाठविण्याची सोय उरली नव्हती; मग बाहेरील रसद आत येण्याची गोष्टच सोडा. तेरा-चौदा दिवसपर्यंत किमती वाढत वाढत अखेर जनावरांना खाद्य काही उरले नाही. झाडाची पाने आणि कोंब दगडाने कुटून त्याचा तोबरा जनावरांना देण्याची पाळी आली. 'गवत किंवा धान्य यांचा वासदेखील जनावरांना मिळेनासा

४४ मलकापूर हे बुर्हानपूरच्या दक्षिणेस ४० मैलांवर आहे. ते जी. आय्. पी. रेल्वेच्या नागपूर फाट्यावर पूर्णेच्या दक्षिणेस काही मैलांवर आहे–कॉन्स्टेबलचा हँड ॲटलास, प्लेट ३१.

४५ बाळापूर अकोल्याच्या पश्चिमेस १६ मैलांवर आहे; ते पूर्णा नदीच्या दक्षिणेस १६ ते १८ मैलांवर आणि नदीप्रवाहाच्या वरच्या दिशेस, पूर्वेला, एदलाबादपासून सुमारे ७२ मैलांवर आहे. लढाईची जागा कोल्हारी आणि पिंपरी गौळी या दोन खेड्यादरम्यानच्या भागात आहे. हे ठिकाण बुर्हानपूरच्या आग्नेयेस ६५ मैलांवर आणि औरंगाबादच्या ईशान्येस जवळजवळ तितक्याच मैलावर आहे–बेरार गॅझेटिअर, १६३.

४६ शेवगाव अकोला जिल्ह्यात आहे. आता ते जी. आय्. पी. रेल्वेच्या नागपूर फाट्यावरील स्थानक आहे. ते पूर्णा नदीच्या डाव्या अथवा दक्षिण तीरापासून दहा मैल दूर व बाळापूरच्या वायव्येस ११ मैलांवर आहे, बेरार गॅझेटिअर, १६४; खाफीखान ८८७; कामवर २२६; बुर्हानुल्-फुतूह, १६८ अ; कासिम, ३२७.

झाली. त्यातील कित्येक जनावरे दलदलीत रुतून उपासमारीने मेली. अन्न म्हणाल तर ते फक्त श्रीमंतांनाच तेवढे मिळू शके. रुपयास दोन ते चार पौंड पीठ अशी किंमत मोजावी लागे. ज्या शिपायांची सामग्री अल्पशी होती त्यांनी फौजा सोडल्या व आपल्या घराची वाट धरली. [खाफीखान ८८८, अहवाल १६६ ब.]

छावणीतील गोंधळ वाढण्यास बऱ्याच गोष्टी कारणीभूत होत्या. नदीनाल्यांना आलेले पूर, शिपायांची झालेली उपासमार, तंबूराहुट्यांचे उडून जाणे आणि मराठ्यांचे होणारे अचानक हल्ले. हे मराठे कधीकधी छावणीच्या बाजारपेठेपर्यंत धडक मारीत. शिपाई पेंगुळले आहेत आणि त्यांच्यातील जोर ओसरला आहे हे दिसताच अधिकाऱ्यांनी तक्रारी करावयास सुरुवात केली. म्हणून थोडावेळ पाऊस उघडताच बाळापूरपासून ३ कोसांवरील एका उजाड गावापर्यंत मजल मारुन तेथे तळ दिला. मराठ्यांचा ताप भलताच वाढला असल्यामुळे इवजखान, घियासखान आणि रंभा निंबाळकर यांना त्यांवर पाठविण्यात आले. तेव्हा मराठे आपल्या घोड्या, भाले आणि अब्दागिरीचे दांडे मागे टाकून पसार झाले. त्यांचा तीन-चार कोस पाठलाग करण्यात आला. [खाफीखान, ८८८.]

या नव्या ठिकाणी धान्याचा पुरवठा पुरेसा झाला. तेव्हा येथेच ईद (१ शव्वाल ११३२ हि. ५ ऑगस्ट १७२०) (सण) साजरी झाली. पण येथेही घोड्यांना गवत मिळत नव्हते. गवताला केशराची किंमत आली होती. तळावरचा कोणी गवत गोळा करावयास बाहेर पडला तर तो आपले नाक गमावून परत येई. तेव्हा आणखी कूच करणे क्रमप्राप्त झाले. पण निघण्यापूर्वी बऱ्याच मोठ्या तोफा त्यांनी तेथेच पुरून ठेवल्या; चिखलाचे रस्ते आणि गाड्या ओढणाऱ्या बैलांची झालेली आबाळ यांमुळे या तोफा वाहून नेणे अशक्य झाले. पुढचा तळ खद्द बाळापूरलाच पडला. इथे पुरवठा मुबलक होता. विश्रांती घेता यावी आणि कमी झालेल्या संख्याबळाची भरती करता यावी म्हणून तीन दिवसांचा मुक्काम येथे झाला. [खाफीखान ८८९, अहवाल १६७अ.]

[आलिम अलीखानाची तयारी]

मोठी फौज उभी करा आणि आपला परिवार व आश्रित निजामुल्मुल्काच्या हाती लागणार नाहीत याची खबरदारी घ्या अशा सूचना अलीखानाला त्याच्या चुलत्याकडून आल्या होत्या. पैसे सढळ हाताने खर्च करा आणि मनसबी व बढत्या मुक्तपणे बहाल करा असेही त्यांनी लिहिले होते. या हुकुमांची अमलबजावणी करण्यासाठी त्याने जे उपाय योजले; त्यामुळे लौकरच त्याच्या निशाणाभोवती मोठी फौज गोळा झाली.

आलिम अलीखानाचा विवाह मरहूम दाऊदखान पन्नीच्या जवळच्या नात्यातील तरुणीशी झाला असल्याने त्याच्या कुळाशी जवळीक दाखविणाऱ्या लोकांचे पुढारी—जे दक्षिणेत मोठ्या प्रमाणावर होते—तत्परतेने त्याला येऊन मिळाले. त्या पैगंबरवासी सरदाराचा पुतण्या किंवा चुलतभाऊ उमरखान हाही दाऊदखानाच्या रक्ताचा बदला घेण्याचा आक्रोश अजून करीत असतानादेखील, येऊन मिळाला. जौहरखान आणि मुहम्मदी बेग ही इतर उल्लेखनीय पुढाऱ्यांची नावे. पैकी मुहम्मदी बेग हा दीर्घकाळपर्यंत गुल्शनाबाद (नासिक) चा नायब सुभेदार होता. निजामुल्मुल्क पूर्वी दक्षिणेच्या सहा सुभ्यांचा प्रमुख होता तेव्हा या मुहम्मदीखानाने दंडलीने वसुली केली म्हणून निजामुल्मुल्काने त्याला बेड्या घालून कैदेत टाकले होते.

पुढे त्याला क्षमा करून नवाबाच्या फौजेत कनिष्ठ पातळीच्या जागेवर त्याची नेमणूक केली होती. यावेळी, आलिम अलीखानाने, हास्यास्पद वाटेल एवढी मोठी किमत देऊन, म्हणजे त्यास पाच हजारी मनसबदार करून आणि नौबतीचा मान बहाल करून विकत घेतले. अशाच प्रकारे आपलीशी करून घेतलेली इतर मंडळी म्हणजे मत्तीखान, त्याचा भाऊ लतीफखान बनवार आणि त्याचे नंदुरबारचे पुतणे सय्यिद वली मुहम्मद आणि मुहम्मद अश्रफ. या सर्वांना पाच हजारी मनसबदार करून त्यांना आघाडीचा प्रमुख तहव्वुरखान याच्या दिमतीस दिले. रुस्तमखानाचा मुलगा घालिबखान–ज्याचे घराणे कित्येक पिढ्या दक्षिणेत राहिलेले होते–आपला मुख्य दिवाण अप्पा पंडित यासह येऊन मिळाला. [शिवदास ४०, कासिम ३२५, खाफीखान ८९०.]

इतरांमध्ये एक उल्लेखनीय योद्धा मिर्झा अली आणि सय्यिद बार्हा यांचा समावेश होता. उरलेल्यांत खान-इ-आलम दख्खिनीचा भाऊ अमीनखान मोडत होता. याचे सय्यिदांशी चांगलेच वाकडे होते; काही वर्षांपूर्वी सय्यिदांनी त्यास काही इजा केली होती. हा बेदर सुभ्याचा नायब सुभेदार असताना हुसैन अलीखानाच्या चिथावणीवरून मराठ्यांचा प्रमुख राजा शाहू याच्या दत्तक मुलाने खान-इ-आलम दख्खिनीवर अचानक हल्ला चढविला होता. द्रव्याची आणि दोन किंवा तीन हत्तींची देणगी देऊन, पूर्वी दुखावलेल्या खान-इ-आलम दख्खिनीला आपलेसे केल्याने तो आता मोहिमेतील, बिनभरोशाचा का होईना, साथीदार बनला. निजामुलमुल्कास गुप्तपणे साथ देणारे तुर्कताजखान आणि फिदाईखान दिवाण हे दोघेही असेच धरसोडे अनुयायी होते. इतर अधिकाऱ्यांमध्ये दख्खनच्या सुभ्यांचा बक्षी अश्रफखान, रफअत तलबखान, आलिम अलीखानाच्या तोफदळाचा प्रमुख ख्वाजा रहमतुल्लाखान (शुजाअतखान) आणि शमशीरखान यांचा समावेश होता. मराठा अधिकाऱ्यांत संताजी शिन्दे, साताराहून पाठविलेला मराठ्यांचा सेनापती खंडूजी दाभाडे, शंकराजी मल्हार,[४७] कान्होजी (भोसले) वगैरे होते. यांपैकी काहींना राजा शाहूने सतरा-अठरा हजार स्वारांसह धाडले होते व या सर्वांनी हुसैन अलीखानाशी दोस्तीच्या शपथा घेतल्या होत्या. दोन्हीकडे दगलबाजी करणाऱ्या अन्वरखानाने आलिम अलीखानास निजामुलमुल्काच्या छावणीतून लिहिले की येथील बळ अजून एकवटावयाचे असल्याने टोला हाणायची हीच वेळ आहे; ते जेवढे लौकर होईल तेवढे बरे. हे पत्र वाटेतच पकडले गेले व परिणामी अन्वरखानाची बेअब्रू झाली. त्यास तुरुंगवास घडला व त्याची मालमत्ता जप्त झाली.[४८]

४७ बुर्हानुल्-फुतूह, १६७ अ आणि खुशहालचंद, बर्लिन हस्त. ४९५, पान १००३ अ यात म्हटले आहे की आलिम अलीखानाची दक्षिणेतील सगळी सत्ता शंकराजीच्या हाती एकवटली होती. हा शंकराजी अलीकडेच दिल्लीहून परतलेला होता. ग्रँट डफ, २०६ म्हणतो; तो राजा शाहूचा दूत म्हणून औरंगाबादेस होता. आरंभी तो शिवाजीकडे कारकून होता; पुढे १६९० मध्ये रामराजाने त्याला सचिव (ज्या पदास त्यापूर्वी सुरनीस असे म्हणत असत) केले. हे मराठा राज्यातील अष्टप्रधानांपैकी एक पद होते. सचिवाकडे अभिलेखरक्षणाचे तसेच पत्रपरीक्षणाचे काम असे. जिंजीच्या वेढ्याच्या काळात १६९८ साली तो निवृत्त झाला व बनारसला गेला. तो वृद्ध होता तरी निकामी आयुष्याचा त्याला कंटाळा आला म्हणून हुसैन अलीखान दक्षिणेत आला तेव्हा शंकराजी त्याच्या चाकरीत शिरला. ग्रँट डफ, १०५, १६४, १७१, १९७, १९८.

४८ तारीख-इ-मुजफ्फरी, १८६; खाफीखान खंड २, ८९९. गुलशन-इ-अजाइबमध्ये, १३० ब, आणखी काही मराठ्यांच्या नावाचा उल्लेख आहे. पेशवा बाळाजी विश्वनाथाचा मुलगा बाबाजी (बाजीराव), तुकोजी. गुजर, पिला जदू (पिलाजी जाधव), दावलजी सोमवंशी, चिमणाजी दामोदर, मंकाजी दाणा (?) खुशहालमधील नावे (१००३ अ), कान्हाजी, बाळाजी, पिलाजी आणि शंकर ब्राह्मण अशी आहेत. ग्रँट डफ, २०६ याने हैबतराव निंबाळकर हे एक अधिक नाव दिले आहे.

[आग्र्याहून आलेल्या पत्रांना निजामुल्मुल्क उत्तरे धाडतो]

आपल्या विरुद्ध पक्षात असलेल्या, नीट हाताळल्या जात नसलेल्या प्रचंड सैन्यात मतभेद आणि गैरविश्वास यांची बीजे पेरण्यात निजामुल्मुल्क लौकरच यशस्वी झाला. तसे करण्यासाठी लागणाऱ्या कौशल्याविषयी त्याची प्रसिद्धी होतीच. हुसैन अलीखानाच्या पत्रासोबत आलेले दक्षिणेच्या कारभाराच्या सनदेचे फर्मान सगळे रिवाज पाळून व साग्रसंगीतपणे स्वीकारण्यात आले. एक खास शामियाना उभारण्यात आला. नवाब घोड्यावर स्वार होऊन फर्मानास सामोरा गेला. नौबती वाजवीत व अशा पत्राबाबतचे नेहमीचे शिरस्ते पाळीत त्या पत्रांचे जाहीर वाचन झाले. ही पत्रे पाठविताना ज्या कारणांसाठी ती वापरली जाऊ शकतील असे वाटले नव्हते, नेमक्या त्याच कारणांसाठी त्या पत्रांचा तावडतोब वापर झाला. या फर्मानाची एक प्रत, काजीच्या मोर्तबानिशी प्रमाणित करून, आलिम अलीखानास पाठविण्यात आली; त्यास एका पत्रान्वये कळविले की आता निजामुल्मुल्काला सुभेदारपदी नियुक्त केले असल्यामुळे, आलिम अलीखानाने रणांगणात उभे राहाणे व्यर्थ आहे. आता आपली फौज तावडतोब विसर्जित करून अकारण खर्चातून सुटका करून घेणे आलिम अलीखानास भाग आहे. त्यास हिंदुस्थानला परतावयाचे असेल तर त्यासाठी लागतील तेवढी माणसे निजामुल्मुल्क त्यास उपलब्ध करून देईल. निजामुल्मुल्काच्या नेमणुकीच्या बातमीमुळे स्थानिक पुढारी आणि नव्याने भरती झालेले शिपाई यांतील हवाच निघून गेली आणि घरी पळून जाऊन अथवा नव्या सुभेदाराच्या पक्षाला मिळून, स्वतःची सुरक्षितता पाहाणे त्यांना भाग पडले किंवा एक लेखक लिहितो त्याप्रमाणे : "वाटेवर असताना, अनेक कुचकामी बढाईखोर आणि भोजनवीर निघून गेले". थोडक्यात सांगावयाचे तर जो निजामुल्मुल्क आजवर पलायनवीर आणि बंडखोर ठरला होता, तो आता फर्मानाच्या पक्क्या आधारावर कायदेशीररीत्या नेमलेला सुभेदार व सार्वभौम शासकाच्या हक्कासाठी झगडणारा इमानदार अधिकारी ठरला. [शिवदास ४० ब, कासिम ३२७.]

बादशाहाच्या फर्मानाला आणि हुसैन अलीखानाच्या पत्राला प्रदीर्घ उत्तरे धाडण्यात आली. अशा वेळी बाह्यात्कारी अदब दाखविण्यात जो क्रमप्राप्त विनोद घडला तो कसलीही सबब न सांगता शेवटास नेणे झाले. नव्या नेमणुकीबद्दलचे धन्यवाद आपल्या उत्तरात व्यक्त केल्यानंतर, हुकुमाशिवाय माळवा सोडल्याच्या आरोपाचा त्याने परामर्श घेतला. औरंगाबादेच्या आसपास मराठ्यांनी येवढा गोंधळ उडविला होता की बुर्हानपूरच काय पण माळव्याच्या सुरक्षिततेची चिंता मला वाटू लागली; याहीपेक्षा अधिक चिंता अमीरुल्-उमरा हुसैन अलीखान यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेविषयी वाटू लागली असे त्याने बेधडक प्रतिपादिले. प्रचंड अंतराच्या अडचणीमुळे हुकूम होण्याबाबत विचारणा करणे किंवा उत्तराची वाट पाहात बसणे मला शक्य दिसले नाही आणि म्हणून मी तावडतोब कूच केले; मी येत असल्याचे पाहाताच मराठे पांगले देखील. माझ्या या कृत्याबद्दल गैरसमजुती पसरवून दिल्या आहेत. स्वामीनिष्ठेच्या बाबतीत कोणी दोषी असेल तर ते, ज्यांनी पूर्वी कधी उत्कर्ष अनुभवलेला नाही आणि खाविंदांची अदब कशी राखावी हे ज्यांना अजून समजलेले नाही ते होत. माझ्यासारख्या जुन्यापुराण्या सेवकाच्या बाबतीत–की ज्याच्या शरीराचा कण नि कण खाल्लेल्या मिठावर वाढला आहे–असली चूक संभवत नाही. आलमगीरांनी केलेल्या सगळ्या खटाटोपानंतरही, दख्खनची परिस्थिती गोंधळाची राहिली हे खाविंदांना माहीतच आहे. आता तेथे शासक उरलेला नाही; तेव्हा काही संकटे कोसळण्याखेरीज दुसरे आणखी काय तेथे

घडू शकेल? वेळ न गमावता कूच करणे हा एकमेव उपाय दिसत आहे. गेले कित्येक दिवस काबाची यात्रा करण्याची इच्छा मनात आहे; या मराठ्यांचा पराभव केल्यावर रजेवर जाण्याचा माझा मनोदय होता. पण आता माझी दक्षिणेत नेमणूक झालीच असल्यामुळे, प्राप्त परिस्थितीत हुकूम डावलणे माझ्या स्वप्नातही यावयाचे नाही. देवाच्या उपासनेपेक्षा आपल्या सम्राटाच्या इच्छेनुरूप वागणे यास मी कितीतरी अधिक महत्त्व देत आलो आहे. लौकरच जागेवर पोहोचेन; देवदयेने आणि खाविंदांच्या दैवयोगामुळे तेथे आवश्यक असलेली उपाययोजना माझ्या हातून होईल. [शिवदास, ४१ अ.]

सय्यिदांच्या औरंगाबादेस असलेल्या कुटुंबियांना आणण्यासाठी दिलावर अलीखानाला पाठविलेले आहे या हुसैन अलीखानाच्या पत्रातील आशयाचा पुनरुच्चार करून निजामुल्मुल्क अमीरुल्-उमरा हुसैन अलीखानाला पाठविलेल्या उत्तराच्या पत्रात लिहितो : "नवाब अमीरुल्‌उमरा! जीते रहो. आपला कृपाळूपणा आणि मजविषयी वाटणारी मैत्रीची भावना याची कल्पना दिलावर अलीखानास असूनही, तसेच मी त्यास अनेकवेळा लिहूनही व विश्वासू निरोप्यांना त्याजकडे धाडूनही, त्याला सद्बुद्धी झाली नाही आणि अखेर घडला तो प्रसंग त्याने स्वतःवर ओढवून घेतला. आपणाविषयीच्या माझ्या मैत्रीच्या भावना बदललेल्या नाहीत". नंतर केवळ औरंगाबाद शहर वाचविण्यासाठी आणि अमीरुल्-उमराच्या कुटुंबियांचा मानभंग न होऊ देण्यासाठी दक्षिणेकडे कसे कूच करावे लागले याची हकीकत तो आपल्या पत्रात पुन्हा ऐकवितो. आपल्या कुटुंबियांचा मानभंग वाचविण्यासाठी असे सांगताना निजामुल्मुल्काने असे संसूचितच केले की खुद्द सय्यिद आपल्या कुटुंबियांचे रक्षण करण्यास समर्थ नाहीत. या संसूचनेमुळे गर्विष्ठ आणि मातबर समजल्या जाणाऱ्या सय्यिदांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखेच होते. "दैवाची खैर, सारे काही निर्विघ्नपणे पार पडले. माझ्या फौजा येताच, बंडखोरांना थारा न उरल्याने, ते चारी दिशांना पळाले. मत्सरग्रस्त मंडळींनी सत्याचा अपलाप करणाऱ्या खबरा धाडल्या; त्यामुळे मजवरील मर्जी कमी करावी असे खाविंदांना वाटले; पण देवाची ही कृपाच की सत्य काय ते पुन्हा एकदा स्पष्ट झाले आणि माझे म्हणणे खरे समजून आपण स्वीकारले. फर्मानास जबाब म्हणून एक अहवाल सोबत जोडला आहे, तो योग्य वेळी दाखल होईल असा मला विश्वास वाटतो. अल्लाचे सहाय्य होईल आणि मी लौकरच औरंगाबादेला पोहोचेन. पोहोचल्यावर आपला परिवार आणि आपली चीजवस्तू, शक्य तितक्या काळजीने आपणाकडे रवाना करीन". [शिवदास, ४२ अ.]

## [आलिम अलीखानाशी लढाई]

निजामुल्मुल्काने ५ शव्वाल (९ ऑगस्ट १७२०) रोजी आपले सामानसुमान बाळापूर गावी ठेवून, लढाई देण्याच्या दृष्टीने आपल्या फौजांची मांडामांड त्या शहरापासून दोन-तीन कोस अंतरावर केली.[४९] आघाडीच्या सेनेत मुहम्मद घियासखान, तोफखानाप्रमुख मुहम्मदशाह,

४९ बेरार गॅझेटिअर, १६३, मध्ये सांगितले आहे की, अकोला जिल्ह्यातील बाळापूर गावाजवळ कोल्हारी आणि पिंपरी गौळी या गावांच्या दरम्यान रेखांश ७५° ८०', अक्षांश २०° ४०' या ठिकाणी सदर रणक्षेत्र आहे. सिवानिह-इ-दख्खिनमध्ये १३३, सदर रणक्षेत्र वऱ्हाड सुभ्यांच्या पाईनघाट तालुक्यात असल्याचे नमूद आहे. कामवरखान, २२६, म्हणतो की, ती जागा दार सवाद-इ-बालाघाट नामक होती; ती अजिंठे डोंगरओळीच्या वरच्या अंगाला, त्या डोंगरओळीकडे जाणाऱ्या घाटरस्त्याच्या दक्षिण उतारावर आहे; तर वऱ्हाड पाईनघाट हे ठिकाण उत्तरेला गौरीगड टेकड्या आणि दक्षिणेला अजिंठे डोंगराच्या बाहेरच्या फुटकळ टेकड्या या दरम्यान आहे.

त्याचा भाऊ शेख नूरुल्लाह यलबुर्ज (अलबुर्ज ?) खान अधारिया, अन्वरखान वगैरेंना मुकर केले. उजव्या बाजूस–जिकडे विरुद्ध पक्षाची मराठे मंडळी मोठ्या संख्येने होती–इवजखान आणि त्याचा मुलगा जमालुल्लाहखान यांना ठेवण्यात आले. फौजेचा मुख्य भाग आणि उजवी फळी यांमध्ये नवाबाचा थोरला मुलगा गाझीउद्दीनखान, मरहमतखान, निमतइलाही, अब्दुर्रहीमखान (रिआयतखान), मुतवस्सिलखान, सादुद्दीनखान, कादिर दादखान, दाराबखान आणि कामयाबखान (हे दोघे जाननिसारखानाचे मुलगे), इख्तिसासखान (खान-इ-आलम दखिनीचा चुलत पणतू), रुहुल्लाहखान, मुतहव्वरखान आणि इतर कित्येक सरदार व राजपूत राजे यांचा समावेश होता. पिछाडीचे आणि सामानसुमानाचे रक्षण हे काम रंभा निंबाळकर आणि साणेसर परगण्याचा देशमुख अंताजी यांकडे सोपविले. [खाफीखान ८८९.]

विरुद्ध पक्षात आलिम अलीखान आपल्या हत्तीवर आरूढ झाला. त्याने फौजेच्या मध्य फळीत आपली जागा घेतली. त्याच्या खवाशीत घियासुद्दीनखान बसला. आलिम अलीखानाने आपला तोफखाना पुढे धाडला. कर्नाटकातून आणलेल्या चौदा-पंधरा हजारांच्या घोडदळाचा आधार त्याला दिला. ६ शव्वाल ११३२ हि. (१० ऑगस्ट १७२०) रोजी लढाईस तोंड लागले. पहिली हालचाल निजामुल्मुल्काकडून झाली. आपल्या तोफेतून दोन-तीन गोळे फेकून आलिम अलीखानाने जबाब दिला. पण ते गोळे जमिनीवर पडले. त्यामुळे कोणास इजा झाली नाही. निजामुल्मुल्काकडून आलेला पहिला गोळा लतीफखानाच्या हत्तीजवळ पडला. त्यामुळे हौदा डळमळून हत्तीवरील स्वार खाली कोसळला. त्या माऱ्याचा धूर विरण्यापूर्वीच आलिम अलीखानाच्या आघाडीचे आधिपत्य करणारा मुतहव्वुरखान, सतरा-अठरा हत्ती आणि चौदा-पंधरा हजार स्वार यांसह निजामुल्मुल्काच्या आघाडीवर एकदम तुटून पडला. कित्येक मुघलांना त्याने शरण आणले. निजामुल्मुल्काच्या तोफखान्याचा प्रमुख मुहम्मदशाह याला वाटले की हा दिवस आपणास पराजयाचा जाणार. तेव्हा तो, त्याचा भाऊ नुरुल्लाह आणि इतर अधिकारी हिंदुस्थानी रिवाजानुसार, पायउतारा झाले आणि लढू लागले. निजामुल्मुल्काच्या आघाडीत चांगलाच गोंधळ माजला. शेख नुरुल्लाह कापला जाऊन मुहम्मदशाह जखमी झाला. आघाडी सांभाळणारा मुहम्मद घियासखान अगोदरच एका डोळ्याने आंधळा होता, आता त्याच्या दुसऱ्या डोळ्यालाही इजा झाली. यलबुर्जखान अधारिया वगैरे अधिकारी मंडळीही जखमी झाली. या संपूर्ण विभागाने माघार घेतली. [खाफीखान, ८९१, ८९३.]

याच वेळी निजामुल्मुल्काच्या फौजेच्या डाव्या व उजव्या फळ्यांतील विभाग पुढे चालून आले व त्यांनी शत्रूला घेरले. तेव्हा आलिम अलीखानाने हुकूम सोडून स्वतःसह आपल्या फौजेची मधली फळी आणि आपल्या प्रमुख नेत्यांसह इतक्या जोरात पुढे रेटत नेली की त्याच्या तुकडीचा एक भाग इतरांपासून सुटून मागे राहिला. आलिम अलीखान जिकडे जिकडे म्हणून गेला तिकडे तिकडे इवजखान, मरहमतखान आणि कादिरदिलखान त्याला सामना देण्यासाठी सामोरे गेले. आलिम अलीखान जखमी झाला तरी त्याने रणांगण सोडले नाही. बाऱ्हा सय्यिद आलिम अलीखानाच्या वयाच्या मुतवस्सिलखान या तरुणाने आपला हत्ती त्याच्या अगदी नजीक आणला. त्याने जौहरखान,[५०] इतर आठ-नऊ प्रमुख सेनापती–की जे आलिम अलीखानास साथ करीत होते–यांवर त्याने हल्ला चढविला. पण तो जखमी झाला.

---

५० अहवाल-उल्-खवाकीन, पान १६८ मधील हकीकतीनुसार हल्ल्याचा पहिला फटका या माणसाला बसला; शत्रूच्या पहिल्या गोळ्याने बाच्या माहुताला खलास केले आणि हत्तीवरील अर्धा हौदा मोडून टाकला.

रक्तस्रावही फार झाला. त्यामुळे माघार घेणे त्याला भाग पडले. या निकराच्या झटापटीत त्यास कादिरदादखानाने चांगली साथ दिली. [खाफीखान ८९४.]

मुतहव्वुरखानाचा मेव्हुणा म्हणजेच आलिम अलीखानाचा माहूत ठार झाला; आपल्या तोफखान्याचे नेतृत्व करता करता घियासुद्दीनखान पडला. तीच गत घालिबखान आणि त्याचा दिवाण अप्पाजी, शमशीरखान, सय्यिद वली, सय्यिद आलम बार्हा वगैरे आठ-दहा प्रमुख अधिकाऱ्यांची झाली. पण मराठे मात्र निजामुल्मुल्काच्या सामानसुमानापर्यंत जाऊन पोहोचले व त्याचा सुवर्ण नाण्यांचा काही खजिना त्यांनी लांबविला. एकेवेळी, आलिम अलीखानाचा हत्ती दलदलीत रुतला; त्यातून पाय बाहेर काढून घेण्याला त्यास फार कष्ट पडले. शेवटी तो पुढील बाजूने एकटाच बाहेर पडला. पहिल्या दृष्टिक्षेपातच मुतहव्वुरखानाचे शव हत्तीस्वाराच्या नजरेस पडले. तलवारी हाती घेतलेल्या तीस-चाळीस बार्हा सय्यिद स्वारांनी आपली घोडी दलदलीतून दामटली व ते आपल्या नेत्यास येऊन मिळाले.

त्यानंतर लगेचच आलिम अलीखानाच्या हत्तीने पाठ फिरविली. कारण बाणांचा वर्षाव सहन करणे आता त्याला शक्य होईना. पण आपल्या जखमांतून रक्त वाहात असतानादेखील आलिम अलीखान पाय रोवून होता. चारी बाजूंनी आपल्या अंगाभोवती फिरत शत्रूशी सामना देत होता. "माझा हत्ती फिरेल पण मी मागे फिरणार नाही" असे उत्तेजित आवाजात म्हणत होता. हल्ला पुनः पुनः चढविण्यात त्याला तीन वेळा यश आले. दिसत नसलेल्या निजामुल्मुल्काला तो जिकडे तिकडे धुंडाळत होता; पण त्याचा शोध व्यर्थ ठरल्याने अखेर माघार घेणे त्याला भाग पडले. भात्यातील बाण संपल्यामुळे, आपल्या चेहऱ्यावर, अंगावर आणि हत्तीच्या साजावर रुतलेले बाण काढून, ते आपल्या धनुष्यास लावून, मोठ्या निर्धाराने तो ते शत्रूवर सोडत राहिला. शेवटी तलवारीच्या वाराने इख्तिसासखानाने त्याला जायबंदी केले. त्याच्या उजव्या हाताची बोटे हाडापर्यंत तुटली. त्याने आणखी एक वार, चौथ्याने निजामुल्मुल्कावर हल्ला चढविला; 'असा लढाईबाहेर कसा राहिला आहेस ?' असे निजामुल्मुल्कास उद्देशून तो ओरडला. 'हा बघ मी निजामुल्मुल्क' असे म्हणून निजामुल्मुल्काने आपला धनुष्यबाण आकर्ण ओढून, बाण सोडला. आलिम अलीखान पुन्हा जखमी झाला. त्याला शत्रूने वेढले. इख्तिसासखानाने त्याचे शीर धडावेगळे केले. अशा प्रकारे आपल्या दोन चुलत्यांसाठी शौर्य गाजवीत, वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षी त्याने प्राण वेचले.[५१]

सगळे मिळून, हत्तीस्वार सतरा-अठरा अधिकारी आणि कित्येक लोक लढाईत कामास आले. जखमी झालेल्यांची संख्या त्यापेक्षा जास्त होती. अमीनखान, उमरखान, तुर्कताजखान, दख्खनचा दिवाण फिदाईखान वगैरे उल्लेखनीय व्यक्तींनी क्षणाचाही विलंब न लावता, स्वतःस निजामुल्मुल्काच्या चाकरीत दाखल करून घेतले. राजा शाहूचा मुख्य अधिकारी शंकराजी जखमी झाला. त्यास कैद केले. पराजित पक्षाचे हत्ती आणि तोफखाना विजयी सेनापतीच्या हाती लागले. पराजित पक्षाच्या उरलेल्या सामानसुमानाची लुटालूट झाली. विजय घोषित करण्यासाठी नौबत वाजविली. आलिम अलीखान मारला गेला नसता तर

५१ खाफीखान, ८९४; तारीख-इ-मुजफ्फरी, १८९; मुकद्दमह लेखक गुलाम अलीखान, ३४ ब; खुशहाल पान १००५ अ; यह्याखान, पान १२६ व सांगतो की बंदुकीचा एक गोळा सय्यिदाच्या कपाळावर बसला होता त्याचे शीर निजामुल्मुल्कापुढे ठेवण्यात आले. त्याची ओळख पटल्यावर ते सर्वांच्या पुढे नाचविले. शेवटी तै. बादशाहाकडे पाठविले.

निजामुल्मुल्काची स्थिती चांगलीच विकट होती असे मुहम्मद कासिम सांगतो. मराठे त्याच्या पिछाडीस पोहोचले होते आणि त्याच्या दहा हजार फौजेविरुद्ध तब्बल ऐंशी हजार फौज होती. ६३४ मराठे लढाईत मरण पावले. [खाफीखान ८९५, अहवाल १६९ अ.]

अव्लिया घौसुल अअ्ज्जमचा नातू सय्यिद सुलैमान, शेख नुरुल्लाह आणि दोन-तीन कनिष्ठ दर्जाचे अधिकारी सोडता निजामुल्मुल्काच्या फौजेतील कोणीही मेले नाही. इवजखानाला किंचितशी जखम झाली. मुतवस्सिलखान, कादिरदादखान, मुहम्मद घियासखान, मुहम्मदशाह आणि कामयाबखान हेही जखमी झाले. लढाईबाबतची दुर्दैवी बातमी औरंगाबादेस पोहोचली तेव्हा हुसैन अलीखानाच्या कुटुंबातील स्त्रिया आणि आलिम अलीखानाचे आश्रित यांत घबराट पसरली. शहराच्या आग्नेयीस दहा मैलांवर असलेल्या दौलताबादेच्या किल्ल्यात आश्रय देण्यास त्यांनी किल्लेदारास सांगितले. हा किल्लेदार बुखाऱ्याच्या सय्यिद जलालचा नातेवाईक मुर्तजाखान आणि सय्यिद मुबारिक यांचा वंशज होता. किल्लेदाराची ही जागा त्याच्या घराण्यात शाहजहानाच्या अमदानीपासून (१६२७–१६५८) चालत आली होती. हुसैन अलीखानाने त्याची मनसब कमी केली असता आणि त्याच्या जागी अन्य माणसे नेमली असता देखील याने स्त्रियांना त्यांच्या मालमत्तेसह आसरा दिला. लढाई झाल्यावर काही दिवसांनी, हैदराबादेचा सुभेदार मुबारिजखान आणि त्याचा भाऊ दिलावरखान–हे सय्यिदांना मदत करण्यासाठी कूच करीत आहोत असे सांगत होते–आले व निजामुल्मुल्कास मिळाले. त्यांच्या या मिळण्याने दख्खनची सुभेदारी बळकावणाऱ्या निजामुल्मुल्काला निदान दक्षिणेत तरी कोणी प्रतिस्पर्धी उरला नाही. [खाफीखान ८९६; वारिद १६१ अ.]

## ११ : दख्खनची खबर आग्र्याला पोहोचते

भरधाव सुटलेले सांडणीस्वार आग्र्यास २२ शव्वाल (२६ ऑगस्ट १७२०) रोजी पोहोचले. त्यांनी बाळापूरजवळ आलिम अलीखानाचा पराभव व मृत्यू घडल्याची खबर दिली. त्याच्या चारच दिवस अगोदर हुसैन अलीखानाचे आघाडीचे तंबू दक्षिणेच्या मोहिमेवर निघण्यासाठी म्हणून आग्र्याबाहेर, सतरा-अठरा मैलांवरील कुरौली गावाजवळ उभारले होते. आग्र्यापासून पाच कोसांवरील सराई खोजाजवळील सिहारा गावाजवळ एक छावणी उभीही झाली होती. तेथे दगडी बंधाऱ्याच्या तळ्यातील गोड्या पाण्याचा मुबलक पुरवठा होता.[५२]

या महासंकटाच्या खबरीने सय्यिदांच्या पायाखालची जमीन सरकल्यासारखी झाली. अब्दुल्लाहखानाच्या हाती पत्र पडले तेव्हा तो इतका हादरला होता की पत्र वाचणे त्याला मुश्किल झाले. त्यामुळे खबऱ्याच्या तोंडी सांगण्यावरूनच काय घडले त्याची माहिती तो घेऊ लागला. बातमी ऐकल्यावर त्याचा शोकावेग अनावर झाला. आपल्याला झालेला दुःखावेग आवरण्यात हुसैन अलीखान पूर्णपणे यशस्वी झाला नाही, तरी हा तडाखा चित्त विचलित न करता सहन केल्याचे त्याने दाखविले. दोघे भाऊ लगेच आपला दरबार सोडून चालते झाले. हा धक्का हुसैन अलीखानाला अब्दुल्लाहखानापेक्षा जास्त तीव्रतेने बसला. आपल्या स्त्रियांनी मालमत्तेसह दौलताबादेच्या किल्ल्यात आश्रय घेतला आहे अशी खबर आठवड्यानंतर येऊन पोहोचली. तेव्हा त्याचे मन जरा ताळ्यावर आले. मसलती मागोमाग

५२ सिहारेकी सराई, इंडियन ॲटलास, तक्ता ५७, हे ठिकाण कुरौली आणि फतहपूरच्या रस्त्यावर आग्र्यापासून साडेसात मैलांवर आहे.

मसलती झाल्या. योजने मागोमाग योजना शिजल्या. निजामुल्मुल्क ज्या समर्थ जमातीचा होता त्याचा प्रमुख मुहम्मद अमीनखान याचा काटा काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता, हे पूर्वी आलेले आहेच. पण ते साधण्याएवढे बळ पुरेशा प्रमाणात आपल्या-जवळ नाही हे आढळून आल्यावर त्या महत्त्वपूर्ण व्यक्तीशी मैत्रीपूर्ण संबंध राखण्याचा त्यांनी अट्टाहास ठेवला. उलट, मुहम्मद अमीनखानाने निजामुल्मुल्काच्या वागण्यातील हिणकसपणा आणि त्याची दुष्टता याबाबत दरबारात मोठमोठ्याने गप्पा मारून, आपल्याविषयीच्या सय्यिदांच्या मनातील संशयांना बधिर करण्याचे प्रयत्न चालू ठेवले. [ खाफीखान ८९६, कामवर २२६, कासिम ३१९, अहवाल १७१ ब. ]

हुसैन अलीखानाच्या आधिपत्याखाली मुहम्मदशाहाने, शाही तोफखाना आणि आपले सर्व प्रमुख सरदार यांना दिमतीस घेऊन जातीने दक्षिणेच्या मोहिमेवर निघावे; अब्दुल्लाहखानाने दिल्लीस परतावे आणि साम्राज्याचा उत्तरभाग सांभाळावा असे शेवटी एकदा ठरले. अस्सल सत्तेत भागिदारी मिळविण्याच्या स्पर्धेत हुसैन अलीखानाने आपल्या थोरल्या भावाला मागे सारलेच होते; सर्वच्या सर्व म्हणजे २२ सुभ्यांचे दिवाण, बक्षी आणि सद्रस्सुदूर दोन मुख्य दिवाणांसह बरोबर मोहिमेवर नेण्याचा हेका त्याने धरल्याने अब्दुल्लाहखानासाठी फक्त थोडासा कार्यालयीन सेवकवर्ग काय तो उरला. यास अब्दुल्लाहखानाने हरकत घेतली. पण दोघांतील हा झगडा पडद्याआड झाला. शेवटी, अक्बराबाद, अहमदाबाद, अजमेर आणि माळवा या हिंदुस्थानातील चारच सुभ्यांचा आणि दक्षिणेतील साही सुभ्यांचा सर्व सेवकवर्ग, तसेच इतर सुभ्यांचा थोडासा सेवकवर्ग बादशाह आणि हुसैन अलीखान यांच्या सोबत जावा अशी तरतूद झाली. [ खाफीखान ८९७, कासिम ३२२, यह्या १२७ ब. ] सोंगट्यांच्या खेळाची उपमा घेऊन यह्याखान दोघा भावातील या वाटणीवर टिपणी करताना सांगतो की, आपली प्यादी विखरून खेळाडूने चुकीची खेळी खेळली आहे; त्यामुळे त्याचा स्वतःचा मोहरा सुरक्षित राखण्यात अडचण निर्माण होणार आहे असे सर्वसाधारण मत दिसते. ते खरे होते असे पुढे आढळून आले.

राजा अजितसिंगास भेटता यावे आणि शाही फौजेमध्ये राजपुतांचा भरणा करता यावा म्हणून ग्वाल्हेर आणि नरवरमार्गे जाणारा अधिक सीधा रस्ता सोडून अजमेरमार्गे जाण्याचा लांबचा रस्ता ठरविला. त्यानुसार शाही तंबू सराई सिहारा येथे १ जिल्काद ११३२ हि. ( ३ सप्टेंबर १७२० ) रोजी पाठवून पहिली मजल ९ रोजी ( ११ सप्टेंबर) मारली. १० तारखेला ते कुरौलीला आले. पाण्याच्या साठ्याजवळील उंचवट्यावर तळ ठोकला. येथे अब्दुल्लाहखानाने बादशाहाचा दिल्लीस जाण्यासाठी निरोप घेतला; त्याच्या दरबारातील प्रतिनिधी म्हणून राजा रतनचंद राहिला. अब्दुल्लाहखानासमवेत दिल्लीला गेलेल्या मनसबदारांमध्ये बक्षी सय्यिद सलाबतखान, गाजीउद्दीनखान घालिबजंग, हमीदखान, हमीदुद्दीनखान, निअमतुल्लाहखान, बैरामखान, किलिच मुहम्मदखान, बाकिरखान आणि अमीरखान यांचा समावेश होता.

आपणास कोणत्याच चिंतेने ग्रासलेले नाही असे दाखविण्याचा खटाटोप सय्यिद मंडळी बाह्यात्कारी करीत होती. त्यांच्या तरण्याबांड पुतण्याच्या मृत्यूबद्दल कोणी शोकसमाचारास आले तर ते म्हणत, 'अल्लाची खैर, आमच्यातील महत्त्वाचा कोणी आम्ही गमावलेला नाही.' सय्यिद घराण्याचे नाव आमच्या पोराने राखले असे म्हणून त्याबद्दल आनंदच

दाखवीत. पण त्याच्या पक्षातील काही प्रमुख व्यक्तींचे धैर्य हळूहळू गळू लागले. आजारपणाच्या अगर तसल्याच कसल्या तरी लंगड्या सबबीच्या आधारे लढाईच्या मोहिमेवर जाण्यास ते तयार होईनासे झाले. अशा मंडळीत आलिम अलीखानाचा चुलता सय्यिद फीरुझ अलीखान याचाही समावेश होता. हुसैन अलीखानाचा आत्मविश्वास अजून पक्का होता. अशा सोडून जाणाऱ्यांचा कसलाही परिणाम त्यावर दिसला नाही. कोणत्याही आकस्मिक आपत्तीला तोंड देण्यास आपल्या फौजा आणि आपले आप्त पुरेसे आहेत असे त्याला वाटे. एक लाखाची फौज उभी करण्याचा संकल्प सुटला होता. असदुल्लाहखानाचा मुलगा सय्यिद मुहम्मदखान तसेच विशेष उल्लेखनीय बाऱ्हा सय्यिद आणि अफगाण मंडळी याना फौजेत दाखल होण्यास आवाहन करणारी तातडीची पत्रे रवाना झाली. तरीही फौजेचा एकूण आकडा, नवी आणि जुनी जमेस धरूनही, पन्नास हजारांपलीकडे गेला नाही. [ खाफीखान ८९७, कासिम ३२८. ]

## १२ : बादशाहाचे दक्षिणेकडे कूच

१३ जिल्काद ( १५ सप्टेंबर १७२० ) रोजी तळ माहोर आणि गोपाळपूर या दरम्यान पडला होता. दुसऱ्या दिवशी तो कनवारी आणि मूमिनाबाद या दरम्यान हलविला. मुहम्मदशाहाच्या राज्यारोहणाचा वार्षिकोत्सव साजरा करण्यासाठी चार दिवस ( १५ ते १८ तारीख ) थांबून १९ तारखेला शेख सलीम चिश्तीच्या फतहपूर सिक्रीच्या दर्ग्याला गेले. नंतरच्या मजला म्हणजे जालवा ( २१ ता. ), नवहरा ( २३ ता. ), सलिहाबाद(२६ ता. ), बजहरा ( २८ ता. ), बहादुरपूर ( २९ ता. ), हिंदौनच्या उत्तरेस चार मैलांवर असलेल्या कसबा बहादुरपूर येथील तळ झाडांच्या थंडगार सावलीत होता व तेथे मधुर, पाचक पाण्याचा पुरवठा होता. या अगोदरच्या दोन मजला खाचखळग्याच्या, काट्या-कुट्याच्या, पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या अतित्रासदायक रस्त्याने झाल्या होत्या. म्हणून दोन दिवसांची विश्रांती द्यावयाचे ठरले. नंतर २ जिल्हेज (४ आक्टोबर १७२०) रोजी ते तेथून निघाले आणि माहवा आणि मुहक्कमपूर या दरम्यानच्या एका ठिकाणी येऊन पोहोचले. दुसऱ्या दिवशी ते लाखी दऱ्यातून ( खिंडीतून) गेले आणि एका अगदी निर्जन रानात कोणत्या तरी डोंगराच्या पायथ्याशी त्याचा मुक्काम पडला. तेथून ते ६ जिल्हेज ( ८ ऑक्टोबर १७२० ) रोजी जिऊंद आणि बिऊंद या दरम्यानच्या, तोडा भोन ( किंवा भीम) च्या पूर्वेकडे २ कोसांवर असलेल्या एका ठिकाणी येऊन पोहोचले; सदरचे स्थळ सध्या जयपूरच्या मुलखात असून ते आग्र्याच्या आग्नेयीस ७५ मैलांवर तर जयपूरच्या पूर्वेस ६० मैलांवर आहे.[५३]

हे सगळे कूच चालू असता, मीर बक्षी आणि त्याचा प्रमुख प्रतिस्पर्धी यांत मतैक्य व मैत्री आहे असाच देखावा बाहेरून सर्वांना दिसत होता. निजामुलमुल्काशी समेट घडावा

५३ कामवर; कासिम ३४५, ३४६, मुहम्मद कासिम फौजेसमवेत होता, तो राय सुरतसिंग मुलतानीच्या चाकरीत होता. राजपुताना स्टेटस् नकाशात या खिंडीचे नाव कुरैली घाट असे आले असून इंडियरन ॲटलासमधील करीती म्हणजेच हे ठिकाण असावे. माहवा हे इंडियन ॲटलासच्या ५० व्या तक्त्यावद महू या नावाने दिसते. हे गंभीरा नदीवर बहादुरपूरच्या पश्चिमेस सहा मैलांवर आहे. जिऊंद ( जों ) हे महूच्या वायव्येस पाच मैलांवर, बिऊंद ( बोंद ) हे 'जोंद' च्या वायव्येस तीन मैलांवर आणि तोडा भोन ( तोडा भीम ) हे 'जोंद' च्या पश्चिमेस सात मैलांवर याप्रमाणे ठिकाणे सदर नकाशात दर्शविली आहेत.

म्हणून मुहम्मद अमीनखानाचा खटाटोप होत होता. सय्यिदांच्या स्त्रिया आणि मुले घरी सुखरूप यावीत यासाठी तो स्वतः जामीन राहाण्यास तयार झाला. त्या बायकामुलांच्या रखवाली-सोबतीला आपल्या स्वतःच्या कमरुद्दीनखान या मुलाला पाठविण्याची तयारीही त्याने दाखविली. असे झाल्यास संकल्पित मोहीम अनावश्यक ठरत होती. पण या प्रस्तावांना कबूल होण्याच्या मार्गात हुसैन अलीखानाचा गर्विष्ठपणा आडवा आला. मुहम्मद अमीनखानाने हरकत उपस्थित केली की, फौजेत आणि विशेषतः माझ्या फौजेत निजामुल्मुल्काच्या हाताखाली वर्षानुवर्षे चाकरी बजावलेल्या लोकांचा भरणा दिसत आहे. तेव्हा त्याजकडून इमानी चाकरीची अपेक्षा धरणे व्यर्थ ठरणार आहे. ही मंडळी भले करण्यापेक्षा बुरेच जास्त करू शकतील. सबब मला आणि त्यांना मागे ठेवणे अधिक बरे. पण, मुहम्मद अमीनखानाने आपल्या विश्वासू लोकांना गुप्तपणे सांगितले की, माझा विचार सय्यिदांवर वार करण्याचा आहे; आपणाला दख्खनला जाण्याचा हुकूमच झाला तर वाटेवर असतानाच पळून जाण्याची मी संधी साधीन किंवा विजय इकडे की तिकडे अशी अनिश्चित स्थिती लढाईत निर्माण होईल तेव्हा मी लढाईतून काढता पाय घेईन; मला मागे ठेवले तर दोघा भावांचे पुन्हा कधी जमणार नाही याची पक्की काळजी मी घेईन. आपण कोणत्या संकटात सापडलो आहोत याची हुसैन अलीखानाला मुळीच कल्पना आली नव्हती असे नाही. मुघलांना बरोबर घेणे काय अगर मागे ठेवणे काय दोन्ही गोष्टी सारख्याच धोक्याच्या होत्या; म्हणून त्याने मुहम्मद अमीनखानाला चुचकारत खष ठेवण्याचा आटापिटा चालविला. तो भेटला की त्याला चाचासाहब म्हणून तो संबोधी. त्याच्या मुघलांच्या पगारासाठी म्हणून त्याला मोठमोठ्या रकमा आगाऊ दिल्या. [ कासिम ३२४. ]

हैदर कुलीखानावरही खास मर्जी दाखविणे चालू झाले. ४ जिल्काद ( ६ सप्टेंबर १७२० ) रोजी त्याची शाही तोफखान्याचा मीर आतिश म्हणून सय्यिद गुलाम अलीखानाच्या जागी नेमणूक झाली. मोहिमेत शाही तोफखाना प्रचंड स्वरूपात असे. १६०० लहान मोठ्या उखळी तोफा, त्याशिवाय गजनाळ, शुतरनाळ, कहरवाल, बाण हे नग वेगळेच.[५४] आपण अगदी मनापासून सय्यिदांची चाकरी बजावत आहो असे हा तोफखान्याचा अधिकारी या नात्याने याचे कर्तृत्व उठावदार आहे असे हुसैन अलीखानाचे मत बनले होते. मीर बक्षीला या माणसाविषयी वाटणाऱ्या ओढीबद्दल मीर बक्षी भोवतालची माणसे नाराज होती. या 'नशिबाच्या जोरावर खालून वर गेलेल्या' माणसाविषयी ते अवमानकारक भाषेत बोलत. वर पुस्ती जोडत की 'एखाद्या रिकाम्या भट्टीतून एवढे मोठे वादळ उद्भवले असे कोणाला वाटले तरी तरी असते का?' मुअज्जमखान अफगाण, सय्यिद घैरतखान, मीर मुश्रीफ वगैरेंनी सय्यिदाला सावध राहाण्याचा इशारा दिला; कारण मुघल गटात कारस्थान शिजू लागले होते. मुघली अधिकाऱ्यांना हत्यारी

५४ या पदावरील या अगोदरचा अमलदार सय्यिद खान जहान होता असे खाफीखान, ८९८, सांगतो. तो नुकताच वारला होता. कदाचित गुलाम अलीखान त्याचा केवळ नायब असावा. तारीख-इ-हिंदीमध्ये, २४२ ब, रूस्तम अली सांगतो की भोसावर मुक्कामी ही नेमणूक झाली. पण नेमणुकीची त्याने दिलेली तारीख व स्थळ कामवरखानाच्या माहितीशी जुळत नाही. वारिद, १६१ ब, हैदर कुलीखानाला शीराझी म्हणून समजतो पण वस्तुतः तो खुरासानमधील इस्फरैन शहराचा होता. हिंदुस्थानला येण्याच्या वाटेवर असताना तो कदाचित काही दिवस शीराझला राहिला असेल. दुसऱ्या एका ठिकाणी त्याचा इस्फहानी असा उल्लेख आहे.

माणसे घेऊन भेटीस येऊ देणे उचित नाही असे त्यांचे म्हणणे पडले. त्यावर हुसैन अलीखान फिसकारला की मुहम्मद अमीनखानाला आपलेसें करण्याचे आपले प्रयत्न या असल्या सांगण्याने विफल होत आहेत. आणखी तो म्हणाला, 'मजवर हात टाकणार कोण आहे? कसले कारस्थान चालले आहे? माझा वध करण्यास कारण काय आहे? या सगळचाचा अर्थ एवढाच की एका सय्यिदाकडून एका मुघलाकडे तोफखाना गेला हे त्याना पाहवले नाही. नंतर तो लगेच हैदर कुलीखानाची तारीफ करणे सुरू करी. पदावर रूजू झाल्यावर नव्या तोफखाना प्रमुखाने जे फेरफार घडवून आणले त्यावरून त्याची नेमणूक अतिशय योग्य होती असे फौजेत सर्वांना वाटल्याचे दिसले. इतर गोष्टींबरोबरच त्याने अगोदरच्या अमदानींतील एक प्रघात पुन्हा सुरू केला. तो युरोपीय पद्धतीस अनुसरून उचलण्यात आला होता. तो म्हणजे, बादशाह कूच करून अथवा शिकारीवरून स्वस्थळी दाखल होत असता, दहा-वीस रेहकले उडवीत. त्या आवाजाने खाविंदांच्या हालचालींची जाणीव सगळचा तळाला देणे शक्य होई. [ कासिम ३४४, कामवर, खुशहाल १००७ अ. ]

हुसैन अलीखानाच्या मर्जीत विशेष करून गेलेला आणखी एक माणूस म्हणजे सआदतखान हा होय. तो नैशापूरचा फार्सी होता व नुकत्याच वारलेल्या गंज अलीखानाचा नातेवाईक म्हणून प्रामुख्याने सर्वांना माहीत होता. काही आठवडयांपूर्वीच, आग्ऱ्याच्या आग्नेयीस ४०–५० मैलांवर असलेल्या हिंदौन आणि बयाना यांचा फौजदार म्हणून त्यास नेमणूक मिळाली होती आणि फौजेचा मार्ग त्याच्या मुलुखातून गुजरत असल्यामुळे तो सेवेस हजर झाला होता. तो रोज आपल्या फौजेच्या कवायती हुसैन अलीखानासमोर पेश करी आणि आपल्या तडफेचे इतके प्रदर्शन करी की आणि त्याच्या जादा पैशाबाबतच्या, तसेच नव्या जागिरीविषयीच्या विनवण्या सहज मंजूर होत. कदाचित, सय्यिदाकडून त्याच्यावर आता मेहरबानीचा नुसता वर्षाव होत असला तरी याच्या थोडेच अगोदर त्याला तंबी मिळाली होती; त्याची बोच त्याच्या मनास लागून राहिली असली पाहिजे. एका गरीबाजवळ म्हैस तेवढी होती. तीही त्याच्याकडून काढून घेण्यात आली. कूच चालू असता याविषयीची हकीकत हुसैन अलीखानापुढे सादर झाली. फौजदाराच्या, दरबारातील मुनीमाला बोलावणे गेले. म्हैस व्यवस्थित मिळाली, काही तक्रार राहिली नाही अशी पक्की पावती म्हैशीच्या मालकाकडून घेऊन ताबडतोब हजर केली नाही तर तुझ्या धन्याची धडगत नाही, अशी तंबी त्याला मिळाली. तेव्हां सआदतखानाने म्हैस मालकास देऊ करून पोचपावती लिहिण्यास सांगितले. तो माणूस म्हणाला, 'तुम्ही बळजबरी केलीत. माझे समाधान एवढचाने होणार नाही.' 'मग दोन म्हशी घे.' हाही देकार नाकारला. शेवटी कागदावर सही करण्यासाठी पन्नास म्हशी त्याला द्याव्या लागल्या. सआदतखानाच्या मनात हा हस्तक्षेप बोचत राहिला असावा; नाहीतर सय्यिद, शिया व मीरबक्षीचा आश्रित असूनही तो विरुद्ध पक्षास जाऊन मिळाला याचे नवल वाटते. तो धडाडीचा, तडफदार माणूस होता, अजून तो मार्गी लागला नव्हता, असंतुष्ट बंडखोरांची बाज घेण्यात, अमदानी बदलण्याच्या वेळी विशेष लाभ होईल, असा विचार त्याने केला असणे शक्य आहे. [ रुस्तमअली २३४ ब. ]

## १३ : हुसैन अलीखानाचा वध

या काळात, आग्र्याहून कूच केल्याच्या ९ जिल्काद ( ६ सप्टेंबर १७२० ) या तारखेपासून ६ जिल्हेज ११३२ हि. ( ८ ऑक्टोबर १७२० ) या तारखेपर्यंतच्या दिवसांत हुसैन अलीखानाचा निकाल लावण्याचा कट शिजत होता. मुहम्मद अमीनखान, हैदर कुलीखान, अब्दुल गफ्फार आणि मीर जुम्ला ही कटातील प्रमुख मंडळी होती. मीर जुम्ल्याला फर्रुखसियरच्या आमदनीत आलेल्या अवकृपेच्या अनुभवामुळे, त्याने असल्या प्रकारच्या योजनेत सहभागी होण्यास नकार दिला असणे शक्य वाटते; म्हणून या कटाचा एक सक्रिय सदस्य म्हणून तो दिसून येत नाही.[५५] बयानाचा नवा फौजदार सय्यिद मुहम्मद अमीन सआदतखान याला देखील या गुपिताची माहिती दिली होती. कट तडीस नेण्याचे काम करण्यास काशघरचा मीर हैदर बेग दुघलत स्वेच्छेने तयार झाला.[५६] मुहम्मद अमीनखानाने मुघलांना त्यांची इमानदारी राखण्याची कळकळीची विनंती केल्याचे सांगतात. हुसैन अलीखानाच्या फौजेवर मात करणे शक्य नाही, तेव्हा मीर बक्षीचा निकाल लावण्यासाठी आपल्या प्राणाची बाजी लावण्यास कोणी शूर माणूस आहे काय? मारेकरी वाचला तर हा नवाब जन्मभर त्याचा बंदा होईल आणि तो यात मारला गेला तर त्याच्या कुटुंबाची उदारतेने देखभाल होईल. सुरूवातीला कोणीच बोलेना. नंतर मीर हैदरने आपली तयारी असल्याचे सांगितले. 'मी सय्यिद आहे, आणि तोही सय्यिद आहे; भावाने भावास मारले तर त्यात विशेष ते काय ? ' [ खाफीखान ९०२, अहवाल १७५ अ. ]

राणीवशाची प्रमुख रखवालीण सद्रुन्निसा हिच्या मार्फत मुहम्मदशाहाच्या आईशी संधान बांधण्यात आले. मध्यस्थाचे काम ठठ्ठा ( सिंध ) येथील शाह अब्दुल्गफूर नामक फकिराने बजावले. तो गवळणीच्या वेशात जनानखान्यात ये-जा करी. या माणसाची अधिक माहिती या आमदनीच्या पुढील काळात आपणास घ्यावी लागणार आहे. मुहम्मद अमीनखान देखील पुष्कळदा तुर्की बोलीत मुहम्मदशाहाशी सूचक बोले. ही बोली त्या दोघांनाही समजत असे. एकदा अशी तुर्की बोलीतील बातचीत हुसैन अलीखानासमोर घडली. तेव्हा त्याने काय बोलणे झाले अशी विचारणा केली. पोटात कळ येत आहे सबब परतण्याची अनुमती द्यावी असे तो म्हणाला हे उत्तर मुहम्मदशाहाने दिले. मुहम्मदशाहाने हे गुपित असे राखले यावरून कटास बादशाहाचा विरोध नाही असा अर्थ मुहम्मद अमीनखानाने काढला. त्यांनी फतहपूर सिक्री मागे टाकल्यावर, एकदा सआदतखान रात्रीच्या अंधारात मुहम्मद अमीनखानाच्या तंबूत आला. त्यावेळी ठरले की उद्या कूच चालू असताच हुसैन अलीखानास जीवे मारण्याचा प्रयत्न करावयाचा. त्याच्या डाव्या आणि उजव्या अंगाला आपल्या टोळ्या आणून त्याला व त्याच्या लव्याजम्याला घेरावयाचे व त्यास कापून काढावयाचे. कम्रुद्दीनखानाने या बेतास खूप उचलून धरले; पण दुसऱ्या दिवशी आढळून आले की हुसैन अलीखान घोड्यावरून उतरून हत्तीवर स्वार झाला आहे.

---

५५ हैदर कुलीखान, कम्रुद्दीनखान किंवा बादशाह यांना याबाबत काही माहीत असल्याचा खाफीखान इन्कार करतो. ९०३, ९०५. असे असणे नक्कीच संशयास्पद वाटते.

५६ हा शापूरखानाचा भाऊ ( कामवरखान, २३० ). खाफीखान, ९०३; त्याला चघताई वंशाचा मानतो त्याच्या घराण्याला मीर-इ-शमशेर असे उपनाम होते व त्याला सामान्यपणे मीर हैदर बेग असे संबोधीत तारीख-इ-रशीदीचा लेखक आणि काश्मीरचा सुभेदार मिर्झा हैदर त्याचा पणजोबा होता, असे म्हणतात.

आता हल्ला करणे श्रेयस्कर नव्हते. म्हणून दुसरी योजना आखली. [ कामवरखान ९०३, वारिद ४२, यह्या, खुशहाल १००९ अ. ]

आपल्या वधाच्या आदल्या दिवशी हुसैन अलीखान मूर्खासारखा बरळला. माझा जोडा ज्या कोणास मी फेकून मारेल त्याला मी बादशाहापदावर बसवू शकेन असे तो म्हणाला. त्या रात्री मुहम्मद अमीनखान आणि हैदर कुलीखान यांची गाठभेट झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी आपण केलेला कट पार पाडावयाचा असे त्यांनी ठरविले. असे म्हणतात की, हैदर कुलीखानाकडून मुहम्मद अमीनखान बाहेर पडल्यानंतर योगायोगाने हुसैन अलीखान हैदर कुलीखानास भेटण्यास आला व कसल्यातरी बाबतीत त्यास सल्ला विचारू लागला. हैदर कुलीखान जात्याच धूर्त होता. काहीही घडले तरी आपण सुरक्षित राहू असा मार्ग त्याला दिसला. त्याने हुसैन अलीखानास सांगितले की तोफदळप्रमुख म्हणून मजवर कोणाची तरी कुरघोडी होणार असल्याची अफवा तळावर पसरली असून मुहम्मद अमीनखानाचा उद्या सकाळी मजकडे येण्याचा विचार आहे; मीर बक्षींनी बादशाहास जनानखान्याच्या दारापर्यंत सोबत करून आपल्या तंबूकडे परत जाताना मजकडे, मीर आतिशच्या तंबूवर येण्याचे करावे; म्हणजे मजसाठी जीवावर उदार होण्यास सज्ज असलेल्या कोणा एखाद्या करवी मुहम्मद अमीनखान याचा वध घडवून आणणे शक्य होईल. ही योजना पक्की करून हुसैन अलीखान तेथून निघाला. कोणत्याही पक्षाचा वरचष्मा झाला तरी वरचष्मा झालेल्या पक्षाला आपल्या सूचनेबद्दल कृतज्ञता वाटेल व तो आपल्यावर खास मेहरबानी दाखवेल असा हैदर कुलीखानाचा आडाखा होता. [ यह्या, १२८ अ. ]

प्रत्येक मजल मारून झाल्यावर बादशाहापुढे सकाळी कुर्निसातला जावयाचे असा हुसैन अलीखानाचा नेम होता. यास जुहर असे म्हणत. त्यानुसार ६ जिल्हेज ११३२ हि. ( ८ ऑक्टोबर १७२० ) च्या सकाळी तोडा भीमच्या[५७] पूर्वेस दोन कोसांवर ठोकलेल्या तळावर आगमन झाले तेव्हा हुसैन अल्लीखान आणि इतर मातबर मनसबदार नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे, मुहम्मदशाहामागोमाग त्याच्या तंबूच्या प्रवेशद्वारापर्यंत गेले; त्यांनी कुर्निसात केली व आपापल्या मुक्कामाच्या जागांकडे ते वळले. हुसैन अलीखानाने

५७ तोडा भीम हे स्थळ डोंगरातून जाणाऱ्या खिडीच्या पश्चिमेस अंदाजे सहा मैलांवर ( इंडियन ॲटलास, तक्ता ५० ) आहे. खाफीखान, खंड दोन, पृ. ९०३ वर सदर स्थळास तोरा असे संबोधतो व सदर स्थळ फतहपूर सिक्रीपासून ३५ कोस अंतरावर असल्याचे म्हणतात असे सांगतो. सदर शहरापासून नैर्ऋत्येस, सरळ रेषेत ते वस्तुत: सुमारे ४५ मैलांवर आहे. ब्रिटिश म्युझिअममधील हस्तलिखित क्र. १७४६ ( इलिअट-संग्रह ) नुसार सदर ठिकाण हे घाट करबाली ( विचारणा: करकाली किंवा करेली ) नामक, भुसावार जिल्ह्यातील जोंदा ( विचारणा : इंडियन ॲटलासमधील जोन बोंद ) नामक खेड्याजवळील आहे. म्हणजे हे ठिकाण खिडीच्या पूर्वेस ( पहा मॅप ऑफ : राजपुताना स्टेट्स, १८५९ ) असलेले खारेला हे खेडेगाव असले पाहिजे. इंडियन ॲटलासच्या ५० क्रमांकाच्या तक्त्यावर खिडीच्या अगदी जवळ करिती नामक गाव असून त्याच्या ईशान्येस सुमारे पाच मैलांवर खरेला नामक गाव दिसते. खुशहाल पान १००८ अ वर लाखरी दर्रा ( म्हणजे लाखरीची खिड ) असा उल्लेख करतो. हे नाव म्हणजे इंडियन ॲटलासमध्ये करेलाच्या दक्षिणेस अंदाजे दोन मैलांवर दाखविलेल्या लकेरके पुरासमान धरता येईल. भुसावार हा अकबराबाद सुभ्याच्या आग्रा सरकारमधील एक परगणा होता, गॅरेट, आईन, खंड दोन, १३२. सदर शहर खिडीच्या ईशान्येस अंदाजे १३ मैलांवर आहे ( इंडियन ॲटलास, तक्ता ५० ). खुद्द तोडा भीम हे एका परगण्याचे मुख्य ठाणे होते, गॅरेट, १३३; खुशहालचंद, पान १००९ अ सांगतो की, परगणा भुसावार सोडल्यावर तळ कसबा पाओटा येथे पडला. सदर ठिकाण तोडा भीमच्या ईशान्येस ८ मैलांवर आणि खिडीच्या उत्तरेस ५ मैलांवर आहे.

आपली नालकी शाही जाळीपर्यंत आत नेली; त्यावेळी त्याच्या सोबतीस त्याचे सात-आठ नोकर आणि दोन नातेवाईक होते. मुहम्मद अमीनखान, सआदतखान, वगैरे कित्येकही तेथे उपस्थित दिसत होते. त्यावेळी मुहम्मद अमीनखानाने अगोदरच तोंडात रक्ताची गुळणी राहील असे केले होते असे म्हणतात. त्याने नंतर आपली बोटे आपल्या तोंडात घालून ओकारी आल्याची बतावणी केली आणि चक्कर येत असल्याचे सांगितले. तो आपण होऊन जमिनीवर आडवा झाला. हुसैन अलीखानाने गुलाब-पाणी आणि बेदमुश्क–एक हरपलेली शुद्ध आणते असे समजले जाणारे गंधयुक्त लाकूड–मागविले. या दोन औषधांचे उपचार झाल्यावर, मुहम्मद अमीनखानाने खुणेनेच सांगितले की, आपणास हैदर कुलीखानाच्या तंबूत घेऊन जावे. हैदर कुलीखान, मीर आतिश म्हणजे तोफखाना प्रमुख असल्याने त्याचा तंबू शाही प्रवेशद्वारानजीक होता. आता हुसैन अलीखानाभोवती दोन-तीन माणसांपेक्षा जास्त माणसे उरली नव्हती. एव्हा मध्यान्हाची वेळ झाली होती. [शिवदास ४९ ब. ]

त्याची नालकी शाही परिसरातून बाहेर पडली तोच, हैदर बेग दुघ्लत एक दोन मुघलांसमवेत, एका बाजूने पुढे झाला व 'तक्रार तक्रार' असे ओरडू लागला. आपल्या बाहीत हात घालून अर्जाचा कागदही त्याने बाहेर काढला. हा माणूस बक्षीच्या पाहाण्यातला असल्यामुळे त्यास बक्षीने जवळ येऊ दिले. तो द्वितीय बक्षी मुहम्मद अमीनखान यास दूषणास्पद असे बोलू लागला. नाही तरी मुहम्मद अमीनखान कर्कश आणि कंजूष आहे असा त्याचा बदलौकीक होताच. तो माणूस जवळ येताच म्हणाला की, आमच्या सेनापतीने आमचे पगार हडप केले असून, या दख्खनच्या मोहिमेत आमची उपासमार होत आहे. आमच्या घोड्यांनाही अखेरची घरघर लागल्यासारखी झाली आहे; नवाब फौजेबाबत औदार्य दाखवितात; मीर बक्षी म्हणून आपण आम्हास काही मदत करू शकणार नाही काय ? तो अर्ज घेण्यासाठी अंगरक्षक पुढे झाला; तेव्हा त्या मुघलाने अर्ज त्याच्या हाती देण्यास नकार दिला. हुसैन अलीखान आपल्या नेहमीच्या समजूत घालण्याच्या शैलीत म्हणाला, 'इथे ये आणि दे.' अर्ज देणारा जवळ आला आणि त्याने तो कागद त्याच्या हातात ठेवला. नालकीच्या दुसऱ्या अंगाने हुक्केवाला पुढे झाला. नवाबाने त्या बाजूस आपले तोंड वळविले. हुक्का तोंडात धरून तो अर्ज वाचू लागला. बक्षी कागद वाचण्यात गर्क आहे हे पाहाताच मारेकऱ्याने क्षणार्धात आपल्या कमरपट्ट्यातून खंजिरासारखा एक लांब खाटकी चाकू बाहेर काढला. आणि हुसैन अलीखानावार तो चालविला. जखमीने तशा स्थितीत मारेकऱ्यास लाथ मारली; ती मारेकऱ्याच्या छातीत बसली; तो कोसळला व त्याचा फेटाही सुटला. नंतर हुसैन अलीखान ओरडला 'घोडा आणा, मला स्वार झालेच पाहिजे'. पडलेल्या हैदरबेगने स्वतःला सावरले. त्याने नवाबाचे पाय घट्ट पकडले. त्याला त्याच्या नालकीतून ओढून जमिनीवर पाडले. त्याच्या छातीवर बसून त्याचे शीर धडावेगळे करण्याच्या खटाटोपास तो लागला.[५८]

नालकीच्या जवळ पायी आलेला सय्यिद नूर अली- त्याचा किताब नूरुल्लाहखान होता. हा चौदापंधरा वर्षांचा पोरसवदा सय्यिद उभा होता. हुसैन अलीखानाच्या चुलत बंधूंपैकी, नवाब अवलिया नावाने प्रसिद्ध असलेल्या असदुद्दौलहखान बहादुर याचा तो मुलगा होता. काय झाले हे ते त्याने पाहिले तेव्हा तो तत्काल ओरडला, 'बेशरम माणसांनी

५८ कासिम ३४७; खाफीखान ९०३, खुशहाल १००८ अ, १००९ ब; वारिद १६२ अ.

नवाबास जिवे मारले हो;' विजेच्या चपळाईने त्याने आपल्या कमरेचे पिस्तुल काढले. त्यातून निघालेल्या गोळीने हैदर बेग जखमी झाला. नंतर आपल्या तलवारीने तीन वार करून त्याने खुनी माणसाला ठार करून, त्या खुनीने बळी घेतलेल्याच्या शेजारीच जमिनीवर लोळविले. पण पळून जाण्यास अवसर मिळण्यापूर्वीच त्याच्यावर इतर मुघलांनी हल्ला केला व हा मुलगा आपल्या चुलत बंधूच्या छिन्नविछिन्न प्रेतापाशी निष्प्राण होऊन पडला. हुसैन अलीखानाचे मुंडके हैदर कुलीखानाच्या राहुटीकडे, बाजी मारल्याच्या थाटात नेले. तेथे, आरडाओरडयास सुरुवात झाल्या झाल्या, हैदर कुलीखान आणि मुहम्मद अमीनखान घाईघाईने, अनवाणी पायाने राहुटीबाहेर आल्यासारखे दिसून येत होते. [खाफीखान ९०४, कासिम ३४९, खुशहाल १००९ अ, शाकिर १० ब.]

मुहम्मद अमीनखान तात्काल शाही दालनात गेला; बादशहापुढे हजर होऊन त्याने त्यास बाहेर येऊन आपल्या फौजांची हुकूमत हाती घ्यावी असे विनविले. बादशहाच्या खासगीच्या तंबूसमोरील जागेत वध केलेल्या बक्षीचे मुंडके बादशहाच्या पायाशी वहाण्यात आले. या रहस्यात मुहम्मदशाह सामील असो वा नसो, त्याचा कल आता माघार घेण्याकडे दिसला; त्याने सौम्य निषेधपर बोलण्यास आरंभ केला. सय्यिदांच्या करडया पालकत्वातून आपल्या मुलाला सोडविण्यासाठी या कारस्थानात निःसंशयपणे सामील झालेल्या बादशहाच्या आईला आता बादशहाच्या जिवाची भीती वाटू लागून तिने त्याला ओढून जनानखान्यात नेले. त्यानंतर वजीर आणि बक्षी याचा एक चुलतभाऊ असलेला दीवान-इ-खासचा अधीक्षक सय्यिद गुलाम अलीखान हा, इस्लाम कुली नावाचा एक गुलाम आणि आपल्या चाकरीतील काही हजारी (बंदुकस्वार) यांना घेऊन बादशहाच्या खासगी दालनात शिरला व बादशहाच्या शरीराचा ताबा मिळविण्यासाठी कनाती फाडून आत घुसला. मुहम्मद अमीनखान आणि इतर मुघल यांनी त्यांना परत पिटाळले. नंतर सआदतखानाने त्यांना पकडून धरून ठेवले.

आणखी दिरंगाई करणे आता धोक्याचे होते. रीतीभातीची सगळी बंधने भिरकावून देऊन सआदतखानाने आपल्या अंगाभोवती एक शाल पांघरली आणि तो जनानखान्यात घुसला. त्याने मुहम्मदशाहाला हातावर आडवे घेऊन त्यास बळजबरीने वधाच्या ठिकाणी आणले. तेथे अजूनही माणसे जमली नव्हती. हत्ती बोलाविले. मुहम्मदशाह कम्रुद्दीनखानाच्या हत्तीवर आरूढ झाला. त्याच्या मागे (खवाशीत) बुलंदबख्त आणि मुहम्मद अमीनखान बसले. छावणीच्या रक्षकगृहास लागून असलेल्या बाजारपेठेच्या रस्त्याच्या प्रवेशद्वारापाशी ते येऊन थांबले. या ठिकाणी नौबती वाजत होत्या. हुसैन अलीखानाचे कापलेले मुंडके, लांब बांबूच्या टोकावर खोचून, उंच धरलेले होते.

हुसैन अलीखानाचे तंबू आणि त्याचा खजिना यांची सरसकट लूट करण्याचे हुकूम सुटले. सुरुवातीला मुहम्मद अमीनखानाच्या घोडदळातील फक्त चाळीस–पन्नास स्वार आणि काही हजारी (तोफखान्यातील असामी) तेथे हजर होते. सगळी मिळून शंभर–दोनशे माणसे असावीत; हैदर कुलीखानाने हत्ती, घोडे आणि असामी यांची जमवाजमव करण्यासाठी तातडीचे निरोप धाडले. तर मुहम्मद अमीनखान निरनिराळ्या सेनाधिकाऱ्यांना तातडीच्या चिठ्ठ्या लिहिण्यात गुंतून गेला. "तुमची आमच्याशी असलेली मैत्री

पटवून देण्याची आता हीच वेळ आहे. जो कोणी तात्काळ आमच्याकडे येईल त्याची चाकरी आम्हास लखलाभ आहे व त्याला त्याच्या चाकरीचे इनामही भरपूर मिळेल." मनसबदारांपैकी या वेळेपर्यंत कोणी तिकडे फिरकला नव्हता. फक्त खुद्द मुहम्मद अमीनखान, त्याचा मुलगा कमरुद्दीनखान, हैदर कुलीखान आणि सआदतखान एवढेच मनसबदार तेथे दिसत होते. शाही तोफखाना सय्यिदाच्या छावणीत धुडघूस घालू लागला. धुमश्चक्री संपण्यापूर्वी खान दौरान थोडी फौज घेऊन त्या ठिकाणी आला. पण जाफरखान, तुर्रा-इ-बाज हा मोठ्या धूर्तपणाने तेथील धोक्यापासून अलिप्त राहिला.[५९] काय घडले आहे याची कल्पना नसल्यामुळे सय्यिदांच्या फौजेतील अधिकारी आणि शिपाई आपले तंबू उभे करण्यात आणि दैनंदिन शिधा मिळविण्यात गर्क होते. झालेल्या गोळीबाराच्या आवाजामुळे त्यात घबराट पसरली नाही; कारण बादशाहाचे स्वस्थानी आगमन होई तेव्हा, ती घटना जाहीर करण्यासाठी, नेहमीच्या प्रथेनुसार दिलेली सलामी असेल असे त्यांना वाटले. वध झालेल्या हुसैन अलिखानाचा पुतण्या सय्यिद घैरतखान[६०] आपली शस्त्रास्त्रे उतरवून न्याहरीला बसणार तोच, बधाची पहिली खबर येऊन थडकली. हातात घेतलेला घास तसाच थाळीत टाकून, खरकटा हात न धुता नुसता दुसऱ्या हातावर तो चोळून, अंगावर तलम सुती झग्याशिवाय काही घालण्यात वेळ न दवडता, तो धावत बाहेर आला आणि आपल्या हत्तीवर स्वार झाला. त्याच्या मागोमाग काही माणसे आली. पण ती सगळी मिळून चाळीस-पन्नास पेक्षा जास्त नव्हती.[६१] पोक्त इसमांनी त्याला सबुरीने आणि सावधानतेने वागण्याची गरज कशी आहे, ते पटवून देण्याचा प्रयत्न केला; पण चर्चेकडे लक्ष देण्यास त्याला सवड नव्हती. बाण लागल्याने जखमी झाल्या झाल्या, डरकाळ्या फोडणाऱ्या वाघाप्रमाणे, शिव्याशाप आणि आणाभाका यांच्या गर्जना करीत तो शाही जाळीपर्यंत आला. त्याच्याविरुद्ध सोडलेल्या फौजा त्याच्या तोंडावर आल्या तेव्हा त्याचे बहुतेक सोबती कामास आले होते आणि खुद्द त्यालाही दोन बाणांमुळे जखमा झाल्या होत्या. या सगळ्या झटापटीत बादशाहाच्या छावणीला असलेल्या कनाती तुटून पडल्या.

आपल्या लोखंडी पंजाने मढविलेल्या अंबारीत एकाकी बसून घैरतखान पुढे घुसत राहिला. घुसता घुसता बाणांपाठीमागून बाण सोडण्याचे त्याचे काम चालू होते. असा तो आता हैदर कुलीखानाच्या हत्तीजवळ आला; त्याने दाखविलेल्या निखालस कृतघ्नपणाबद्दल जिव्हारी झोंबतील अशा शब्दांत घैरतखानाने त्याची कानउघाडणी केली. तेव्हा हैदर कुलीखानाने उलटा टोमणा मारला, "भल्या माणसा! नमकहराम आहेस. हत्तीवरून खाली उतर आणि शरण ये; तर मी तुला बादशहाकडून क्षमा मिळवून देईन". तरुण सय्यिद आणखी पुढे सरकला आणि ओरडला, 'तुझ्या हुकूमाचीच तर मी वाट पाहातो आहे ना'. कानपिचक्या देण्याच्या स्वरात तो आणखी म्हणाला, 'धिःकार असो तुझ्या इमानदारीचा

५९ कासिम, ३५०, ३५१; खुशहाल पान १०१० अ; बयान-इ-वाकिअ, ४२४; कामवर २३१; वारिद १६२ ब; खाफीखान ९०६, ९०८; शाकीर, १० ब.

६० तारीख-इ-मुहम्मदीमधील उल्लेखानुसार याच्या वडिलांचे नाव सय्यिद नसरुल्लाह सआदतखान बहादुर बार्हा असे होते तर त्याची आई हुसैन अलीखानाची बहीण होती. बुर्हानुल्-फुतूह, १६८ ब, मध्ये त्याला सय्यिद खान जहान बार्हा याचा मुलगा असे संबोधिले आहे. खाफीखान ही संपूर्ण हकीकत सांगताना (पृ. ९०१, ९०२, ९०५) इज्जतखान आणि घैरतखान अशा दोन वेगळ्या व्यक्तींचा उल्लेख करतो; त्याच्या मते इज्जतखान मारला गेला आणि घैरतखान वाचला.

६१ खाफीखान ९०५ सांगतो की तेथे ४००–५०० असामी होते.

आणि दोस्तीचा'. त्यावर घैरतखानाने एक बाण सोडला. तो हैदर कुलीखानाच्या धनुष्यात इतका गच्च रुतून बसला की, सदरच्या झटापटीनंतर तो बाहेर काढण्यास बरेच प्रयास पडले. हैदर कुलीखानाच्या खवाशीत हाजी बशीर नावाचा एक हबशी गुलाम होता. धनी मागे वळून या गुलामास रागारागाने म्हणाला, 'आता तू का थांबला आहेस?' तेव्हा गुलामाने आपली बंदूक चालविली. त्यातून सुटलेली गोळी घैरतखानाच्या छातीत घुसली. तो हत्तीवरून खाली पडला तो मृत होऊनच.[६२]

सय्यिद दिलावर अलीखानाच्या जागी बक्षी म्हणून नेमणूक झालेला सय्यिद करीमुल्लाह याने आणखी एक हल्ला चढविला. तो शाही जाळीच्या प्रवेशद्वारापर्यंत येऊन थडकला पण त्याचे सगळे लोक तावडतोब ठार झाले. अदालतीचा अधीक्षक नेक अंदेशखान ऊर्फ शेख नज्मुद्दीनदेखील पाच-सहाशे घोडेस्वार घेऊन लढतलढत शाही जाळीपर्यंत आला. अमीरूल्‌उमराचे शव बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न त्याने केला. पण खवाटयावर आणि बाजूला दोन-तीन जखमा झाल्यामुळे तो बेहोश होऊन पडला. तेव्हा हैदर कुलीखानाची माणसे त्याला उचलून घेऊन गेली. दरम्यान, राजा मुहक्कमसिंग आपल्या फौजेच्या एका तुकडीसह, या सगळ्या घटनेकडे, बघ्यासारखा पाहात उभा राहिला होता पण सय्यिदांच्या चाकरीत दीर्घकाळ असलेला चूडामण हजारी याने मात्र आपले कर्तव्य चोख बजावले. बादशहाच्या तंबूच्या खासगी प्रवेशद्वारापर्यंत, म्हणजे देवडीपर्यंत, त्याने धडक मारली. पण त्यापेक्षा अधिक काही त्याला करता आले नाही. सय्यिदांच्या नाजिर ख्वाजा मक्बूल अहमदने एका भोयाला आणि एका झाडूवाल्याला बरोबर घेऊन शाही गटावर नंग्या तलवारीसह हल्ला केला. या तिघांनी मोठे धैर्य दाखवून बादशहाच्या तस्बीहखान्यापर्यंत (म्हणजे शाही प्रार्थनामंदिरापर्यंत) धडक मारली. पण तेथे त्यांच्यावर वार झाले. झालेल्या जखमांमुळे ख्वाजा ३-४ दिवसांनंतर मरण पावला. राजा मुहक्कमसिंग याचा बक्षी मुस्तफाखान, आपल्या धन्याशी मसलत न करता, दुसऱ्या दिशेने आला; थोड्याशा लोकांनिशी त्याने जाळीच्या दरवाजापर्यंत मजल मारली. तेथे त्याच्यावर झालेल्या हल्ल्यामुळे त्याला माघार घ्यावी लागली. तेव्हा तो बाजूस वळला व दीवान-इ-खासच्या कनाती त्याने फाडून काढल्या; आरडाओरडा करीत आणि शिव्याशाप उच्चारीत तो आत घुसला; पण त्याची काही माणसे तेथे ठार झाली; तेव्हा मुघल लोकांनी त्याला तेथून हुसकले. ही कर्कश आरडाओरडा चालू असता, बादशाह मुहम्मदशाह हा रिजाकुलीखान, जहांदार-शाही याची बायको सद्रुन्निसा हिच्या मागे लपून राहिला होता. [कासिम ३५४, खाफीखान ९१०, खुशलाह १००९ ब.]

राजा सूरतसिंग मुल्तानी आणि त्याचा मुलगा लाला आनंदसिंग यांनी काहीही हालचाल केली नाही. आपली चीजवस्तू व माणसे सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम फक्त त्यांनी केले. साहिबराय मुन्शी याचा मुलगा लाला जसवंतराय याने धूम ठोकली. त्यामुळे त्याच्या वडिलांचा खजिना आणि खुद्द त्यांची स्वतःची चीजवस्तू लुटारूंकरवी लुटली जाण्यास मोकळी झाली. सटकून पळालेला आणखी एक माणूस म्हणजे, सय्यिद अब्दुल्लाह खानाच्या वतीने दरबारी वकील असलेला, राय सरोमनदास कायथ हा होय. त्याने आपली दाढी उतरवली; तोंडाला राख फासली आणि फकीराचा वेश धारण केला. नंतर कनवटीला

६२ खुशहाल, पान १०१० अ, सांगतो की गुलामाने बंदूक आपल्या धन्याच्या हाती दिली. कासिम, ३५२; खाफीखान' ९०५–९०८; यह्या १२८ अ; शाकीर ९ ब; वारिद १६२ अ आणि ब.

थोडचा शेलक्या जिनसा लावून तो आपल्या दोस्तांच्या तंबूत लपून राहिला. संधी मिळताच त्याने अब्दुल्लाहखानाकडे पलायन केले. पूर्वेकडील मुलखातील मुअज्जमखान म्हणजे चांगला मातब्बर मनसबदार. तरीही त्याने काहीच हालचाल केली नाही. त्याचा भाऊ उमरखान हा मात्र लटारुंकरवी ठार झाला. घोड्यांच्या पागेचा अधीक्षक मीर अलीखान याचा भाऊ सय्यिद जान अली याने लढण्याची शर्थ केली व परिणामी आपले प्राण गमावले. उलट त्याचा भाऊ सटकला, पण ते थोड्या काळासाठीच. काही दिवसांनी तो सापडला आणि कैद झाला.

गोंधळ गडबड चांगली दहा-बारा तास चालू होती. या काळात खजिन्याची लूट किती झाली याची गणती नाही. मालमत्तेची नासधूसही खूपच झाली. भिकाऱ्यांनी आणि लफंग्यांनी हुसैन अलीखानाच्या मृतदेहाची अवहेलना किती केली याबद्दल तर न बोलणेच बरे. एखादे अरिष्ट अकस्मात उद्भवले तर, भारतातील फौजांमधील एकजिनसीपणाचा अभाव कसा उठून दिसतो याचा सबळ पुरावा म्हणजे ही घटना होय. लुटालुटीनंतर सय्यिदांचा विस्तीर्ण तळ अथवा त्यांची प्रबळ फौज यांपैकी कशाचाही मागमूस उरला नव्हता. तंबूची मेख तिथल्या जमिनीवर रोवली होती अथवा दोऱ्या ताणल्या होत्या हे खरेसुद्धा वाटेनासे झाले. सगळ्या चीजवस्तूंची पळवापळव तरी झाली किंवा जाळपोळीत तिची राख तरी झाली. हे सर्व करणाऱ्यांनी आपले काम आटोपून पोबारा केला.

लूटमार काबूत न आणलेली बरी, असा धूर्त विचार मुहम्मद अमीनखानाने केला. त्याचे दोस्त आणि दुश्मन असे दोघेही या लुटालुटीत गर्क होते. त्यामुळे घडून गेलेल्या घटनेस विरोध होण्याची शक्यता मावळून गेली होती. लुटालूट किती बेछूटपणे झाली याचे उदाहरण म्हणून सांगतात की, एका साध्या शिपायाने नाण्यांनी भरलेली दोन पोती पळवून नेली; त्यात रुपये असावेत असा त्याचा समज होता; ही पोती घेऊन तो सराफाकडे गेला; या पोत्यांच्या बदल्यात त्याने सोने मागितले; कारण ओझे वागविण्यास ते हलके पडले असते. पोती उसवली तेव्हा ती सोन्याच्याच नाण्यांनी भरलेली असल्याचे आढळून आले! वधाची घटना घडण्याच्या जरा अगोदर नाणी बदलून देणाऱ्या सराफांची दुकाने, हुसैन अलीखानाचे बहुतेक सगळे सामानसुमान आणि म्हणे एक कोटी रुपयांनी भरलेल्या बैलगाड्या प्रवास संपवून तळावर दाखल झाल्या होत्या. या सगळ्यांची लुटालूट, पळवापळवी झाली. बक्षीची हिरे-माणके आणि पैशाचे काही पेटारे अजून वाट चालत होते. या वस्तू सदरच्या लुटालुटीतून बचावल्या खऱ्या; पण अखेर त्या बादशहाच्या उपयोगासाठी जप्त झाल्या. [खाफीखान ९०४-९१०, यह्या १२९ ब, वारिद १६२ ब, शिवदास ४९ अ, खुशहाल १००९ ब.]

राजा रतनचंद बनिया याला कोठे जावे कळेनासे झाले. कारण लोक त्याचा सय्यिदां-पेक्षाही अधिक तिरस्कार करीत. जिकडे पाहावे तिकडे त्याला त्याचे शत्रूच दिसत असल्याने पलायनाचा मार्ग खुंटला. रणांगणात उतरणे आणि ठोशास ठोसा लगावणे या वृत्तीचा तो माणूस नव्हता. म्हणतात ना, 'लाथा झाडणारे गाढव आणि बनिया हे दोघे सारखेच टाकाऊ' एका हाताने जपमाळ ओढीत आणि दुसऱ्या हाताने रुमालाने नुसता डोळे पुसत राहिला. "घोड्यावर चढ, घोड्यावर चढ" असे सांगून अब्दुर्रहमानखान वगैरे सरहिंदच्या अफगाणांनी यास सुरक्षित घेऊन जाण्याची तयारी दाखविली. तेव्हा, काहीतरी निरर्थक बोलून त्याने

नकार दर्शविला. सय्यिद अब्दुल्लाहखान यास घाईघाईने बोटभर चिठ्ठी लिहून ती एका सांडणीस्वाराहाती पाठविली. या समयी, तो जे काही करू शकला ते येवढेच. त्यानंतर लगेचच, मुहम्मद अमीनखानाचा मुनीम राजा दयाराम तेथे त्याच्याकडेच आला. तेव्हा राजा रतनचंद त्यास तत्काल शरण आला. त्याला रस्त्याने नेत असता, काही मुघल तसेच सटरफटर लोक यांनी भर बाजारात त्याची नालकी वेढली; त्याला फरफटत बाहेर आणले; लाथाबुक्क्यांचा मार दिला; त्याच्या अंगावरील कपडयांच्या फाडून चिंध्या केल्या. अशा दयनीय नग्नावस्थेत त्याला वजीरासमोर उभे करण्यात आले. तेव्हा त्याने जीवदान मिळण्याची भीक मागितली. मुहम्मद अमीनखानाने प्रथम कपडयांचा एक संच मागविला व नंतर साखळदंडाने त्यास कैदेत ठेवण्याचा हुकूम फर्मावला. त्याचे प्रकरण म्हणजे 'करावे तसे भरावे' या म्हणीचे उत्तम उदाहरण होय. सय्यिदांचा खजिना कोठे आहे अथवा त्यांचे पुरलेले धन कोठे आहे, हे समजून घेण्यासाठी, त्यास जंगजंग पछाडले. तरीही त्याने काही कळू दिले नाही. कूच सुरू झाले तेव्हा, थोडया अवकाशानंतर, त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्याच्या पहाऱ्यावर असलेल्या मुघलांनी त्याच्यावर वार केला. त्यांना त्याची कत्तल करणेही आवडले असते. पण त्याचा जीव यथासांग घेता यावा म्हणून यावेळी त्याला मारण्याचे रहित झाले.[६३]

चूडा जाटाचा मुलगा मुहक्कम याला कैद करून आणले. सगळी आशा खुंटली तेव्हा, जीव वाचणार असेल तर मुसलमान होण्याची तयारी त्याने दर्शविली. पण मुहम्मदशाहाने यास नकार दिला; त्यावर दया दाखवून परत पाठविले. सय्यिद असदुल्लाहखान याचीही धरपकड झाली. त्याला बरेच दिवस तुरुंगात अडकून पडावे लागले. शेवटी त्याने मक्केची यात्रा करण्याची परवानगी मागितली; ती त्याला मिळाली व तो दक्षिणेची वाट चालू लागला. मुहम्मदशाहाला तख्तावर बसविण्यासाठी दिल्लीहून आग्ऱ्यास आणण्याचे काम, सय्यिदांचा दूत म्हणून, गुलाम अलीखान याने बजावले होते. म्हणून त्याचा जीव वाचला व त्याला संरक्षण मिळाले. पण काही दिवसांनी त्याच्याकडे एक संधी चालून आली. ती साधून तो अब्दुल्लाहखानाकडे पळून गेला. [शिवदास ४८ अ, खाफीखान ९१०.]

हुसैन अलीखानासारख्या उच्चपदस्थ आणि सामर्थ्यवान मनसबदाराचा असा शेवट झालेला बघून अनेक मिथ्यकथा आणि दंतकथा पसरू लागल्या. अशा प्रकरणी असे होणे ही नित्याचीच बाब होती. एक माणूस म्हणाला की इमाम हुसैनच्या दरबारात आपण आहोत असे माझ्या स्वप्नात आले; रक्ताने माखलेल्या कपडयानिशी हुसैन अलीखान तेथे दरवाजापाशी आला; त्याला सन्मानपूर्वक आत नेण्यात आले आणि इमामाने "बलघा वदका, व घलवा, अदका" असे अभिनंदनपर उद्‌गार काढले. गमतीची गोष्ट ही की हे उद्‌गार म्हणजे दोन कालसूचक रचना मानल्या तर या विचित्र शब्दांतून सय्यिदाच्या हौतात्म्याचे वर्ष व्यक्त होते. आणखीही काही कालसूचक रचना आढळून येतात. त्यांचे अर्थ असे आहेत: "हुसैनचा मोहरम महिना नव्याने उगवला, आणि भारतीय करबल्यात दुसऱ्या यझीदने दुसऱ्या हुसैनला हौतात्म्य दिले".

६३ कासिम, ३५५; शिवदास, ४८ अ; खुशहाल पान, १०१० अ; यह्याखान, १२९ अ; खाफीखान ९०९.

## १४ : भावाच्या मृत्यूची खबर अब्दुलाह्खानाच्या कानी येते

मागे आपण पाहिलेच आहे की अब्दुल्लाह्खानाने दिल्लीचा रस्ता धरण्यासाठी १२ जिल्काद (१४ सप्टेंबर १७२०) रोजी शाही छावणी सोडली. त्याने काही दिवस आग्र्याजवळ सिकंदरा येथे मुक्काम ठोकला. तो ७ जिल्हेज (९ ऑक्टोबर १७२०) रोजी सराई छाथ या ठिकाणी होता. हे ठिकाण आग्र्याच्या वायव्येस ४८ मैलांवर आणि दिल्लीपासून ६४ मैलांवर आहे. याच ठिकाणी, हुसैन अलीखानाच्या वधाच्या घटनेनंतर १८ तासांनी, मध्यरात्रीच्या सुमारास, रतनचंदाची बोटभर चिठ्ठी घेऊन सांडणीस्वार आला. त्या चिठ्ठीत त्याच्या जिवाची घालमेल करणारी, हुसैन अलीखानाच्या वधाची बातमी होती. अब्दुल्लाह्खानाच्या डोक्यात सूडाचे विचार थैमान घालू लागले. आपल्या सांगाती असलेल्या सरदार–दरकदारांना त्याने हजर होण्यास पाचारले; त्यास समजली होती ती काळजाला घरे पाडणारी हकीकत त्याने त्यांना ऐकविली. माझ्या बाजूला या, अशी त्यांची विनवणी केली; याचनाही केल्या. काहींनी अगदी मनापासून, तर काहींनी केवळ शहाणपणा म्हणून त्याच्या पक्षाबरोबर राहाण्यास कबुली दिली.

सय्यिदाच्या पक्षाविषयी जास्त जिव्हाळा व जास्त उत्साह दाखविणाऱ्यापैकी काहींनी, मुहम्मदशाहाला कुमक मिळविण्याची फुरसत मिळण्यापूर्वी, म्हणजे तावडतोब, आपले बळ अजमावावे असे अब्दुल्लाह्खानाला सुचविले. हुसैन अलीखानाच्या फौजा मुहम्मदशाहाने द्रव्याच्या जोरावर वश करून घेण्यापूर्वीही असे घडणे त्यांना आवश्यक वाटले. पण मुहम्मदशाह आपले तख्त पूर्णपणे कब्जात ठेवून आहे हे ध्यानात घेता, तख्तावर हक्क सांगणारा दुसरा कोणी दावेदार दिसून येत नसताना, आपल्या सगळ्या फौजा गलितधैर्य झाल्या असता रणांगणात उतरणे श्रेयस्कर नाही, असे अब्दुल्लाह्खानाला वाटले. त्यापेक्षा राजधानीला जावे, तेथे फौज उभी करावी, तख्तासाठी एखादा उमेदवार निवडावा आणि आपल्या अनुयायी वर्गात आत्मविश्वासाची पुनः स्थापना करावी हे अधिक बरे असा विचार त्याने केला.

म्हणून अगदी त्याच दिवशी त्याने दिल्लीची वाट धरली. कूच चालू असता मेवाती आणि जाट मंडळी दररोज सामानसुमानाची लूट करीत व छावणीमधील रहिवाशांवर हल्ले करून त्यांना ठार करीत. या त्यांच्या कटकटी मनावर न घेता दिल्लीचा प्रवास त्याने जारी ठेवला. दिल्लीपासून २१ मैलांवर असलेल्या फरीदाबादला पोहोचेपर्यंत त्यांचा प्रवास चालू होता. अब्दुल्लाह्खानाचा जावई शुजाअतुल्लाह्खान, मुर्तजाखान आणि वजीराच्या विश्वासातील सिताराम नामक व्यक्ती यांना मोठी गडबड करून राजधानीस सर्वाआधी धाडले. वजीराचा भाऊ नज्मुद्दीन अलीखान याच्याशी सल्लामसलत करून तुरुंगात असलेल्या तैमूर घराण्यातील राजकुमारांपैकी एकाची तख्तावर बसण्यासाठी निवड करावी असा त्यांना हुकूम होता. यावेळी सय्यिदांच्या जहागिरीच्या मुलुखामध्ये लगोलग दंगली उसळल्या होत्या; त्यांचे मुनीम हुसकून लावण्यात आले होते; रब्बीची पिके निघाल्यानंतर द्यावा लागणारा खंडाचा हप्ता देण्यास शेतकरी वर्ग नकार देऊ लागला होता.[६४]

६४ कामवर २१४, २३८; वारिद १६३ अ; शिवदास ५४ अ; खाफीखान ९०१, ९११ ते ९१३.

## १५ : मुहम्मदशाहाच्या हालचाली

हुसैन अलीखानाच्या वधाच्या दुसऱ्या दिवशी मुहम्मदशाहाने औपचारिकरीत्या आपला दरबार भरविला. मधल्या काळात मुहम्मद अमीनखानाने सैनिकांच्या चौक्या बसवून तळ सोडून पळून जाणाऱ्यांना पकडणे सुरू केले होते. तळ सोडून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना थोपवून धरावे अशा सूचनाही हत्यारबंद खेडुतांना दिल्या होत्या. या उपाययोजनेमुळे तळावरील बरेच लोक सय्यिदांच्या बाजूचे व पळून जाण्याच्या खटाटोपात असूनही, त्यांना छावणीवरच राहाणे भाग पडले. मुहम्मद अमीनखान जातीने त्यांच्याकडे जाई व त्यांना अनुयायी बनविण्याचा प्रयत्न करी. मुसलमान धर्माविषयीचा दुराग्रह असूनदेखील, सय्यिदांचा एक प्रमुख चाकर राजा मुहक्कमसिंग याच्या तळास त्याने भेट दिली. आपण आता मुघलांच्या विळख्यात आहोत हे पाहून त्याने शरणागती पत्करली. त्यानंतरच्या पहिल्या दरबारात त्याला मुहम्मद अमीनखानाचा मुनीम दयाराम याने हजर केले. त्याला ६,००० च्या मनसबीची बढती मिळाली व नौबत वाजवीत जाण्याचा हक्कही मिळाला. सय्यिद पक्षाचा आणखी एक मुख्य नोकर म्हणजे लखनऊचा मीर मुश्रिफ. त्याशी झालेल्या सलोख्याच्या पहिल्या वाटाघाटी त्याने फिसकटविल्या. पण नंतर त्याचे समाधान करून त्याला बढती दिली. खान-इ-सामान इनायतुल्लाहखान काश्मिरी, राजा गोपालसिंग भदौडिया यांनी इतर एकवीस नोकरांसह स्वतःला बादशहाच्या चरणी सादर केले. मुहम्मद अमीनखान याला ८,००० जातची बढती मिळाली. बक्षिसांचा नुसता वर्षाव त्याच्यावर झाला. सय्यिदांच्या भीतीपायी, आपण बादशाहाच्या पक्षाचे आहोत हे जाहीर करणे, कसोटीच्या क्षणी खान दौरानला शक्य झाले नव्हते. तरीही त्याला तीच सन्माननीय मनसब मिळाली. आतापर्यंत जो कोणी शाही रक्ताचा नाही त्याला जास्तीत जास्त ७,००० पर्यंतची मनसब मिळत असे. कमरुद्दीनखान, हैदर कुलीखान आणि सआदतखान यांना अनुक्रमे ७,०००, ६,००० आणि ५,००० अशा मनसबी दिल्या. जफरखान आणि राजा गोपालसिंग भदौडिया यांना देखील बढती मिळाली. सय्यिदांच्या वेठीतून बादशाहाची झालेली सुटका साजरी करण्यासाठी एका कवीने पुढील आशयाची कालसूचक रचना केली असल्याचे दिसून येते.

> "तो एक तेजस्वी तारा (रोशन अख्तर)
> होता; आता तो चंद्र झाला; जोसेफप्रमाणे
> त्याने राजा होण्यासाठी तुरुंग सोडला".

एव्हा तळ आग्र्याहून ७२ मैलांवर व दिल्लीहून १२८ मैलांवर होता आणि यमुनेचा सर्वात जवळचा किनारा ईशान्येस ६८ मैलांवर होता. परिस्थितीत झालेला बदल लक्षात घेता दख्खनच्या दिशेने आणखी कूच करण्यात काही अर्थ उरला नव्हता. आग्र्यास परतावे की दिल्लीला जावे याबाबत त्यांच्या मनात थोडा विकल्प होता म्हणून त्यावर चर्चा झाली. शेवटी यमुना आडवी लागेपर्यंत उत्तरेकडे सरकावे असे ठरले. चूडामण जाट हा सय्यिदांचा ऋणी होता. आता त्याचे मन वळविण्यात आले. मोठी बक्षिसे देण्याचा प्रस्ताव करून स्वतःच्या मोठ्या फौजेनिशी मुहम्मदशाहाच्या पक्षास मिळणेविषयी त्याला पाचारण करण्यात आले. त्याने धूर्तपणे दिलेले एक उत्तर नमूद आहे. जेव्हा मुहम्मद अमीनखान त्यास म्हणाला, "सय्यिदांच्या हातून तू घडला आहेस, तुझ्या चाकरीवर अथवा तुझ्या सदिच्छांवर माझा

बिलकूल भरवसा नाही"; तेव्हा आपल्या दैवतांची शपथ घेऊन तो उत्तरला, "नवाबसाहेब ! हे खरेच आहे की त्या थोर मंडळींनी माझे एवढे भले केले की मला हजार आयुष्ये लाभती आणि माझी संपत्ती हजारपट होती तरी मी माझे वर्चस्व, माझा परिवार आणि मुले यांच्यासह सर्व, त्यांच्यासाठी वेचले असते. पण मी आता साम्राज्याच्या निशाणाखाली आहे. सर्वांना एकत्र खेचून घेणारे हेच ते निशाण होय. भगवानाची शपथ घेऊन मी सांगतो की लढाईच्या दिवशी मी अशी चाकरी बजावीन की खुद्द नवाबाला त्या चाकरीची कबुली द्यावी लागेल". तो बोलला ते खरेच होते; कारण लढाईच्या दिवशी त्याने केली ती लुटालूट होय व तीदेखील बादशाहाच्या सामानाची आणि इतर कित्येकांच्या सामानाची. [कासिम ३६६, कामवर २३६.]

प्रवासाचा निवडलेला मार्ग चूडामणच्या मुलुखातील गावांवरून जात होता म्हणून त्याने तो बदलण्याविषयी बादशाहाचे मन वळविले. आपली गावे उजव्या अंगाला टाकून त्याने सर्वांना जयसिंगाच्या मुलुखापलीकडे नेले. उंच डोंगरावरून आणि काटेरी झुडुपांनी भरलेल्या जंगलातून जाणारा मार्ग त्याने अवलंबिला. या रस्त्यावर पाण्याचे मोठे दुर्भिक्ष होते. पाणी फार दुरून आणावे लागे आणि ते अगदी मोजूनमापून वापरावे लागे; जणू काही ते पाणी नव्हते, तर तेलच होते. आपली तहान भागेल एवढेसुद्धा पाणी मिळणे कित्येकांना मुश्किल झाले व त्याचा बराच ताप त्यांना सहन करावा लागला. ९ जिल्हेज (११ ऑक्टोबर १७२०) रोजी तळ भुसावार आणि खारिदा या दरम्यानच्या एका जागेवर हालविण्यात आला. तेथे सण साजरा करण्यात आला. मेवातचा फौजदार सय्यिद नुस्रतयारखान बार्हा हा हुसैन अलीखानाच्या बोलावण्यावरून, त्याच्या फौजेस मिळण्यासाठी निघालेला होता. बादशाहाच्या खास हुकुमानुसार खान दौरान याने त्यास एक पत्र लिहिले; त्यास जबाब म्हणून सय्यिद नुस्रतयारखान बार्हा बादशाहासमोर हजर झाला. त्याचे स्वागत होऊन त्याला ७,००० ची मनसब मिळाली. खान दौरानचा आश्रित असलेला साबितजंग (जफरबेग) हा देखील येऊन मिळाल्यामुळे अनुयायी वर्गात मोलाची भर पडली. तो प्रत्यक्षात जरा उशिरा म्हणजे हसनपूरच्या जरा अगोदर आला. यमुनेच्या पलीकडे फौजेचे कूच होत असल्याने उडणारा धुरळा दिसला तेव्हा सगळेजण ओरडले, "आला, राजा गिरिधर बहादुर आला". उताराच्या जागी त्याने आपल्या बरोबरच्या लोकांसह नदी ओलांडली. दोस्त अलीखान, आबिदखान आणि घालिबखान–जो शाही फौजेच्या छापनीस विभागाचा अधीक्षक होता– हे तिघे हुसैन अलीखानाच्या फौजेतील अधिकारी होते. तेही आले, त्यांनी शरणागती स्वीकारली. त्यांना बढतीही मिळाली.[६५]

११ तारखेला (१३ ऑक्टोबर १७२०) बरेच लोक दरबारात चाकरीसाठी हजर झाले. लगोलग त्यांना बढत्या आणि नेमणुका मिळाल्या. याच दिवशी हुसैन अलीखान, घैरतखान आणि नूरुल्लाहखान यांचे मृतदेह सोन्याची जर असलेल्या वस्त्रात गुंडाळून दफनासाठी जनाजात (शवयानात) घालून रवाना झाले. अजमेर येथे नवाबाचा बाप अब्दुल्लाहखान याच्या कबरीजवळ हे दफन व्हावयाचे होते. ही कबर अजमेरच्या तटाबाहेर अब्दुल्लाहगंजच्या नजीक आहे. जनाजा रवाना करण्याच्या ठरविलेल्या वेळी, तो उचलणारे वाहक मिळाले

६५ कासिम, शुद्धिकृत दुसरी आवृत्ती, ४२९; शिवदास ५०, ५१ ब, २ अ; खुशहाल पान १०१४ अ; रुस्तमअली पान २४५ अ; खाफीखान ९१०.

नाहीत. ही अडचण निवारल्यावर वाटेत, शवपेटीत मूल्यवान जिनसा आहेत असा समज करून घेऊन, लुटारूंनी ती हिसकावली. त्यात काही नाही असे दिसल्यावर त्यांनी मृतदेह बाजूस फेकून दिले. काही वेळाने त्या भागातील फौजदारांनी ते पुन्हा हस्तगत केले. शेवटी खासगी वृत्तांतानुसार मृतदेह अजमेरला पोहोचले व तेथे त्यांचे दफन झाले.[६६]

रामगड (१२ तारीख) आणि गोपाळपूर (१३ तारीख) हे बादशहाचे यापुढले मुक्काम होते. या ठिकाणी सआदतखानाला आणखी बढती मिळाली. तो सहा हजारी झाला. त्यास अकबराबादेचा (आग्र्याचा) कारभार दिला. पुढचे मुक्काम म्हणजे मांडवगड (मांडू) (१५ तारीख) मल्काहरी (२१ तारीख). पुढचे मुक्काम (२२ तारीख) जालौरी आणि मलिकपूर या दरम्यानचे होते. तदनंतर खोरी (२३ तारीख), सालगाव (२५ तारीख), कसबा कामा (२७ तारीख), आणि नांदगाव आणि बरसाना या दरम्यानचे स्थळ(२८ तारीख) असे मुक्काम झाले. नारनोळ, अलवार, तिजारा आणि खोहरी यांसारखी वाटेतील गावे टाळली.[६७]

बरसाना मुक्कामी दोन मोहरम ११३३ हि. (२ नोव्हेंबर १७२०) रोजी मुहम्मदखान बंगश दोन-तीन हजार लोकांसह आणि अझीझखान बहादुर चघताई अकबराबादेहून आले. हुसैन अलीखानाच्या मृत्यूपूर्वी, अब्दुल्लाहखान आग्र्याजवळ असताच मुहम्मदखानाने अब्दुल्लाहखानाची प्रयत्नपूर्वक भेट घेऊन, अगोदर उचललेल्या रकमेशिवाय आणखी ५०,००० रुपये मिळण्याविषयी मागणी केली. तदनंतर, बरीच चालढकल करीत त्याने आपले कूच केले. दक्षिणेच्या वाटेवर असलेल्या शाही फौजेला मिळण्यासाठी जात आहे असे तो म्हणे. दोन्ही अधिकारी आग्र्याहून दिल्लीस जाणाऱ्या सरळ रस्त्यावर सराई छाथ येथपर्यंत येऊन पोहोचले होते. त्यांचा कल काय आहे याविषयी संशय होता. ते बिथरले असते तर बादशहाचा दिल्लीला जाण्याचा मार्ग ते रोखू शकले असते. अब्दुल्लाहखान मुहम्मदखानाचा आश्रयदाता होता. मी तुझे किती भले केले याची आठवण कर असे म्हणून अब्दुल्लाहखानाने त्याला आपल्या पक्षाकडे वळविण्याचा प्रयत्न केला.[६८] शाही पक्षाला वाटणारे भय एवढे गंभीर होते की हैदर कुलीखान आणि कमरुद्दीनखान यांना बंगशाला भेटण्यासाठी धाडले. त्यांचे उद्दिष्ट सफल झाले. त्यांनी या दोन अफगाण अमलदारांना शाही छावणीत आणले. मनसबीची बढती मुहम्मदखानाला मिळालीच, पण त्याशिवाय अल्लाहाबादेच्या महसुलातील ४ कोटी दाम त्यास इनाम म्हणून मिळाले. सरकार खैराबादमधील पाली, बैरा आणि बावन हे परगणे

६६ खाफीखान ९१० याच्या नोंदीस खुद्द सय्यिद अब्दुल्लाहखानाचा आधार आहे. अब्दुल्लाहखानाने याबाबतचे निवेदन अनेकदा सर्वांसमक्ष आणि खाफीखानाला सहज ऐकू जाईल अशा रीतीने केले आहे. शिवाय पहा, जौहर-इ-समसाम, ब्रि. म्यू. ओरि. हस्त क्र. १८९८, ( फुलरचे भाषांतर, हस्त. ३०, ७८४ पान ७९ ) आणि रुस्तमअली पान २४४ अ. श्रीयुत युस्टस् किट्स् पूर्वी अजमेरचे असिस्टंट कमिशनर होते. त्यांनी मला कळविलेल्या माहितीनुसार अब्दुल्लाहगंज आणि त्या कबरी शहराबाहेर पूर्वेस असून, सध्या रेल्वे स्टेशन असलेल्या जागेपासून हे ठिकाण फार दूर नाही.

६७ कामवर २३६, कासिम ३६७, मांडूगड आणि साळगाव वगळता बाकीची सर्व स्थळे इंडियन ॲटलास तक्ता क्र. ५० वर पहावयास मिळतात.

६८ सदर बाबतच्या पुराव्यासाठी पाहा, साहिब रायचे खुजिस्ता कलाम, इर्विन हस्त.; अब्दुल्लाहखानाच्या दूतांना आलेल्या साहसी अनुभवांची तपशीलवार हकीकत सिवानिह-इ-खिज्री, इर्विन हस्त. पृ. ६८ ते ७२ येथे नमूद आहे.

तर सरकार लखनऊमधील हरहा हा परगणा आणि संदीलाचा काही भाग या सगळ्या अयोध्येच्या सुभ्यातील जहागिरी अझीझखानाला बहाल केल्या.

पहारी मुक्कामी अल्लाहाबाद सुभ्यातील कुरा आणि जहानाबाद येथील फौजदार शेर अफगनखान पानिपती कूच करीत आला व बादशाहाच्या पक्षास मिळाला. तो अल्लाहाबादेहून आपल्या सिकंदरा या जहागिरीच्या गावी जात असता, आग्र्याजवळ आला असता, त्याला दरबारातून निघालेले काही दूत आढळले. त्याने त्या दूतांना काही खबर आहे का म्हणून विचारले. खबऱ्यांनी सांगितले की, हुसैन अलीखानाचा वध दोन दिवसांपूर्वी झाला आहे. खबर ऐकताना खुशहालचंद, पानिपतीच्या हत्तीशेजारी होता. बातमी ऐकल्यावर पानिपतीचा चेहरा आनंदाने उजळल्याचे खुशहालचंदाला दिसले. पानिपतीचा जुना धनी जहानशाह होता. मुहम्मदशाह हा जहानशाहाचा मुलगा होता. आपल्या जुन्या धन्याचा मुलगा मुक्त झाल्याचा आनंद त्याला वाटला. यानंतर थोड्याच दिवसांत बादशाहाची आई नवाब कुदसिया हिने स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेले एक पत्र त्याकडे आले. त्या पत्रात तिने त्याला "माझा भाऊ" असे संबोधले होते. या ठिकाणी आणखी काही येऊन मिळाले. त्यांत बायझीदखान मेवाती आणि खेमा जाट हे होते. बायझीदखान मेवात मुलुखातला जबर माणूस होता. तर खेमा जाट हा चूडामणच्या मुख्य सोबत्यांपैकी होता. या जाटावर बादशाहाच्या पिछाडीच्या रक्षणाचे काम सोपविण्यात आले.[६९]

आता सुभेदार मंडळींना आश्वासनपर पत्रे लिहिणे आणि सय्यिदपक्षाचे विरोधक म्हणून लौकिक असणाऱ्यांना कुमक धाडण्यास सांगणे ही कामे मुहम्मदशाहाने शिरावर घेतली. ज्यांना ज्यांना फर्माने गेली त्यात निजामुलमुल्क, राजा गिरिधर बहादुर, राजा सवाई जयसिंग आणि लाहोरचा सुभेदार अब्दुस्समदखान यांचा अंतर्भाव होता. या फर्मानांतील काही मजकूर सर्वांस सारखाच होता;[७०] त्यात विजयी झाल्याची भावना स्पष्ट दिसत होती व ते साहजिकही आहे. "अल्लाची खैर," हुसैन अलीखानाला त्याच्या कर्माचे फळ मिळाले. त्याचे दमन करून त्यास नाहीसा करणे या घटना माझ्या इच्छेनुसार सहज साध्य झाल्या आहेत. याच सुरात पुढे वधाची तारीख व जागा यांची माहिती सांगून इतर काही तपशील दिला आहे. घैरतखान "सन्मानविहीन अवस्थेत"[७१] आला; हुसैन अलीखानाचे मुंडके निजामुलमुल्कास पाठविलेल्या पत्रासोबत धाडले असून त्याने बादशाहास येऊन मिळण्यासाठी कूच करण्यास सांगितले आहे वगैरे तपशील त्यात होता. याचप्रमाणे गिरिधर बहादुर, सवाई जयसिंग आणि अब्दुस्समदखान यांना शक्य तितक्या लवकर येऊन मिळण्याविषयी आग्रहपूर्वक कळविले. [ शिवदास ४९ अ. ]

६९ कामवर २३७; शिवदास ५७ ब, खाफीखान ९००, ९२०; खुशहाल पान १०१२ ब. वर उल्लेखलेल्या परगण्यांसाठी पाहा; आईन, खंड दोन, १७६, १७७, १७८, १७९ आणि औध गॅझेटिअर, खंड एक,२४७; खंड दोन, ७२; खंड तीन ५०, २९२.

७० यांपैकी एका फर्मानासाठी पाहा मज्मूल-इन्शा ( शिळाछाप आवृत्ती ), पृ. ८५. त्यात घैरतखान आणि मीर मुश्रिफ यानी शाही छावणीवर हल्ला केला तेव्हा तो परतविण्यात आला व त्यांना ठार केले; त्यावेळी म्हणजे कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षीच्या जिल्हेज महिन्याच्या ६ तारखेला, हुसैन अलीखानाचा वध झाला, अशा आशयाचा मजकूर आहे.

७१ त्याच्या नावावरील कोटी, बेघैरत ( सन्मानविहीन ).

या फर्मानांना प्रतिसाद म्हणून, जातीने हजर होण्याऐवजी सवाई जयसिंगाने जगराम या आपल्या दिवाणाला पाठविले. त्याच्या सोबत स्वार आणि पायदळ मिळून तीन–चार हजारांची फौज दिली. त्याने बादशाहास लिहिले की फौज उभी करण्यात मी गर्क आहे आणि हे काम आटोपले की मी तावडतोब जातीने हजर होईन. थोडाही वेळ न गमावता कूच करण्याच्या तयारीस मी लागलो आहे असे अब्दुस्समदखानाचे उत्तर आले. त्याला हुसैन खान नावाच्या कसूर येथील अफगाण म्होरक्याने केलेले बंड मोडून काढण्यासाठी फौजा उभ्या कराव्या लागल्या होत्या व त्याचे ४ लाख रुपये देणे अजून बाकी होते. त्यामुळे शिपायांनी पुंडाई चालविली होती व म्हणून कूच होण्यास अडथळा येत होता. मी सुभेदार माणस रोखा लिहून देण्यास तयार असताना देखील सुभ्याचा दिवाण शाही खजिन्यातील पैसे उपलब्ध करुन देत नाही. याबाबत जोवर काही हुकूम होत नाही अथवा पैशाची तरतूद होत नाही तोपर्यंत येथून हालता येणे कठीण आहे, असे त्याचे म्हणणे दिसले. गिरिधर बहादुरचे, लवकर येऊन पोहोचत आहे असे, आश्वासनापर उत्तर आले तर निजामुल्मुल्काने निवण्याच्या बेतात आहे असे कळविले. ( शिवदास ४९ अ, खाफीखान ९२१.)

## १७ : अब्दुलाहखान तक्रार करतो

आपल्या भावाचा मृत्यू झाल्याचे समजताच दिल्लीस कूच करण्यापूर्वी अब्दुल्लाह-खानाने बादशाहाकडे एक तक्रारपत्र पाठविले. त्या पत्रातील शब्दयोजना नेहमीची आदब दाखविणारी होती. दख्खन आणि लाहोर येथील उठावाबाबतचे बादशाहापुढे सादर केलेले अहवाल, आपला धाकटा भाऊ हुसैन अलीखान याने पत्करलेली दख्खनची मोहीम आणि राजधानीस परतण्याचे मी पतकरलेले काम या घटनांचा व व्यवस्थेचा संदर्भ देऊन अब्दुल्लाहखान पुढे म्हणतो, "माझ्या भावापासून होणारी माझी ताटातूट मला रुचण्यासारखी नव्हती; तरीही बादशाहाच्या आज्ञेचा आदर करण्यासाठी मी कसलीच हरकत घेतली नाही आणि आम्हा दोघा भावांपैकी एकजण राजधानीला व दुसरा दख्खनच्या मोहिमेवर बादशाहाची चाकरी करण्यासाठी निघाला. आपणाशी एकनिष्ठ असलेला हा मी, माझ्या दिल्लीच्या मार्गावर असताना व दिल्लीला पोहोचलो नसताना, माझा भाऊ एकटा आहे असे पाहून व संधी साधून, बरेपणाने न वागणाऱ्या व कायद्याचा आधार नसलेल्या मंडळींनी, त्याला, घैरतखानाला आणि नवाब अवलियाच्या मुलाला अगदी थेट खाविंदांच्या छावणीत ठार केले. आणि त्याचे सामानसुमान व मालमत्ता यांची लुटालूट केली. हे जगदाश्रया व लोकाश्रया! आपली सुरक्षा असो! हे सर्व जर खाविंदांच्या हुकुमानुसार झालेले असेल आणि त्या माणसांनी ही सर्व इजा आणि हा सगळा रक्तपात आपल्या आदेशा-नुसार घडविलेला असेल तर मला काही म्हणता येण्यासारखे नाही. गुलामाला आपल्या धन्याच्या आज्ञेविरुद्ध काय बरे ोलता येणार? पण जर हे सगळे आपल्या हुकुमाशिवाय झालेले असेल आणि त्या सर्व असामींनी ही सर्व अघोर कृत्ये स्वतःच्या बुद्धीनेच केल असतील तर माझा भरवसा मी आपल्या न्यायबुद्धीवर आणि तारतम्यावर ठेवू इच्छितो. खून करणाऱ्यांना कैद करण्याचा हुकूम व्हावा म्हणजे त्यांना पळून जाण्यास अवसर उरणार नाही. हा मी आपणाशी एकनिष्ठ असलेला मृत भावांच्या वारसांना घेऊन येत आहे. आम्हाला खात्री आहे की आमच्या तक्रारींचा पवित्र कायद्यातील आज्ञेनुसार खाविंद

परामर्श घेतील. आपले चरणी सेवा अर्पण केलेल्या माझी आपणास प्रार्थना आहे की, मी तेथे येईतो कैद केलेल्यांना सोडू नये. यदाकदाचित जर कोणी त्यांची मुक्तता करण्याविषयी विचारणा करील तर ती विनंती देखील मान्य होऊ नये." ( शिवदास ५४ अ. )

अलीकडे घडलेल्या घटनांचा आपणास खेद झालेला असून आपणास फार दुःख होत आहे असे मुहम्मद शाहाने आपल्या उत्तरात सत्य प्रतिज्ञेचा हवाला देऊन लिहिले. त्याबद्दल मला काय वाटते ते केवळ अल्लाच जाणू शकेल; अल्लाची खैर, गुन्हेगार हैदर बेगखान जागच्या जागीच ठार झाला. "अल्लाची शपथ घेऊन सांगतो की, यातील काहीसुद्धा मला माहीत नव्हते. जेव्हा दंगल उसळली तेव्हा योग्य त्या सगळ्या मनाया जारी केल्या गेल्या होत्या; पण त्या बदमाशाने आपला हेतू तडीस नेल्यामुळे, त्याचा काही उपयोग झाला नाही. हैदर बेगखान मेला आहे; इतरांची नावे माहीत नाहीत; तुम्हीही कोणाची नावे दिलेली नाहीत. तुम्ही जर नक्की तपशील दिलात तर कारवाई केली जाईल. आमच्या राज्यास मोठा आधारस्तंभ असलेल्या त्या स्पष्टवक्त्या हुसैन अलीखानाची घनिष्ठ स्वामीनिष्ठा सूर्यापेक्षाही प्रखर होती. त्याचे ते गुण माझ्या अंतःकरणावर बिंबलेले आहेत. देवदयेने मीसुद्धा लवकरच इच्छित जागी पोहोचेन आणि स्वामीनिष्ठा असे आपणदेखील माझ्या भेटीस येऊ इच्छिता. देवाच्या मनात असेल तर आपण उपस्थित केलेल्या प्रकरणावर परिपूर्ण आणि समाधानकारक असा निर्णय पवित्र कायद्यानुसार व न्यायतत्त्वानुसार दिला जाईल." ( शिवदास ५५ अ. )

आणखी काही काळ गेल्यावर अब्दुल्लाहखानाच्या फौज जमवाजमवीच्या अफवा अधिक जोरात पसरू लागल्या; तेव्हा बादशाहाने त्यास एक फर्मान पाठविले. तुमच्या पत्रात तुम्ही आश्वासन दिल्यानुसार माझ्या दरबारात हजर होणार आहात व प्रत्येक दिवशी आपल्या येण्याची मी प्रतिक्षा केली आहे, असे म्हणून बादशाह पुढे लिहितो, "एवढे झाल्यावर आता ध्यानीमनी नसता अशी खबर आली आहे की आपण दिल्लीला पोहोचवण्याची घाई केली आहे; साम्राज्याच्या तुरुंगातून राजघराण्यातील एका कुमाराला आणून त्याला सिंहासनावर बसविले आहे आणि मोठा फौजफाटा जमा केला आहे. आपल्या या वर्तनाचे कारण आपल्या भावाचा मृत्यू हे असेल. ( देवापुढे माणसाचे काही चालत नाही. ) तर पवित्र कायद्यात किससची ( प्रत्याघाताची ) तरतूद आहे. देवाची कृपा की दोषी माणसास शिक्षा झाली आहे. सुरूवातीला मानवी कमकुवतपणामुळे मनात क्रोधाचे विचार आले असतील तर आता तुम्ही अल्लाच्या करणीपुढे नमावे. फौजा आणि दारूगोळा याचा अवलंब करणे म्हणजे अल्लाच्या शाही प्रतिनिधीला प्रतिकार करण्यासारखे आहे. एवढेच नव्हे तर आपल्या सारख्या मातब्बर मनसबदाराच्या स्वभावातही ते बसण्यासारखे नाही. समोर हजर व्हा, तुमच्या इच्छेनुरुप सर्व काही होईल. तुम्ही कसलाही अर्ज गुदरलेला नाही, वेळ न गमावता या आणि आपली बाजू स्वतः बादशाहापुढे मांडा. बादशाहाच्या मनात प्रजेच्या कल्याणा-खेरीज दुसरा विचार नाही आणि बादशाहाची अशी अंतःकरणापासून इच्छा आहे की, आपणासारख्या मनसबदाराविषयी जनतेत वेडावाकडा बोलबाला होऊ नये. या शब्दांकडे लक्ष पुरवणे तुम्हास योग्य ठरेल. ते शब्द समजून घ्या, त्याचे मनन करा आणि त्यानुसार वागा." (शिवदास ५६ अ.)

बादशाहाने काढलेल्या या खरडपट्टीस अब्दुल्लाहखानाने निर्वाणीचे उत्तर धाडले. "हा नेक सेवक आपल्या वर्दीस आला म्हणजे मजवर होणाऱ्या परोपकाराच्या उगमस्थानी आल्यासारखे मला वाटणार आहे. बादशाहाच्या चरणी हजर होण्यास मला देवाची आराधना केल्याइतका आनंद होतो; पण ऱ्या पामराचा भाऊ अमीरुल्-उमरा यास काय झाले हे खाविंदाना माहीत आहेच. हा बंदा गुलाम दरबारी असता तर याचेही तसेच झाले असते ना? काय घडले असते ते फक्त अल्लाच जाणे. या कारणासाठी स्वतःचा आसरा शोधण्याचा मार्ग म्हणजे आपल्या दरबारातून तोंड फिरविणे हाच आहे, दुसरा कोणता नाही. बादशाह म्हणजे पृथ्वीवरील अल्लाचा प्रतिनिधीच तरी अल्लाने त्यास हा अधिकार दिला तो, अल्लाने निर्माण केलेल्या लोकांच्या कल्याणासाठी व रक्षणासाठी. जर खाविंद जेथे आहेत तेथे सुरक्षितताही असेल तर माझ्यासारख्या पामराला आपल्या मातब्बर फर्मानाला कसे धुडकाविता आले असते? साम्राज्याच्या रक्षका! मुहम्मद इब्राहीम हा देखील खविंदांच्या परिवारातील आहे व खाविंदाचा भाऊबंदही आहे, होय, खरोखर त्याच्याच द्वारे मी माझ्या सुरक्षिततेची तरतूद केली आहे. जर परवदिगारच्या मनात असेल तर थोड्याच दिवसात त्याच्या आधारांना लोंबत आम्हाला हजर होण्याचा मान लाभेल आणि खरोखरी हकीकत आपणापुढे सादर करता येईल. यापेक्षा अधिक काही लिहिणे मर्यादाभंग करणारे ठरेल." अशा प्रकारे वक्रोक्तिपूर्ण शब्दयोजना करून अब्दुल्लाहखानाने मुहम्मदशाह आणि त्याचे पाठीराखे याचे आवाहन भिरकावून दिले. (शिवदास ५६ ब.)

## १८ : शाहझादा मुहम्मद इब्राहीम याला तक्तावर बसवितात

आपला भाऊ नज्मुद्दीन अलीखान याला फौजेत भरती करण्याची सूचना देणारे अब्दुल्लाह-खानाचे पत्र दिल्लीस उशिरा म्हणजे ८ जिल्हेज ११३२ हि. ( १० ऑक्टोबर १७२० ) रोजी पोहोचले. या वाईट बातमीचा प्रसार होण्यापूर्वीच, त्याने सत्याचा पूर्ण अपलाप असलेली बातमी पसरविली आणि कोतवालाला घोडदळ आणि पायदळ देऊन मुहम्मद अमीनखानाच्या घरावर धाडले. मध्यरात्रीपर्यंत घर वेढण्याचे काम पूर्ण झाले. पण या वेळेपर्यंत मुहम्मद अमीनखानाच्या माणसांना वस्तुस्थिती समजून चुकली होती. त्यांनी मोर्चे बांधले व प्रतिकाराची तयारी केली. हे सर्व करीत असता ते आनंदाने नाचत होते, गात होते आणि वस्तुस्थिती सर्वांना ओरडून सांगत होते.

शहरातल्या रस्त्यारस्त्यावर आणि गल्लीगल्लीत बातमी वणव्यासारखी पसरली. नंतर मुहम्मद अमीनखानाच्या स्त्रिया आणि त्याचे कुटुंबीय यांच्या व्यवहारात ढवळाढवळ करण्यास प्रतिबंध करणारी चिठ्ठी तरी अब्दुल्लाहखानाकडून आली असावी किंवा नज्मुद्दीन अलीखानाने आपला बेत तरी बदललेला असावा. ते काही असो, मुहम्मद अमीनखानाच्या घराभोवतालचा वेढा उठविण्यात आला. त्या रात्री रतनचंदाच्या बहिणीचा नवरा केशवराय मृत्यू पावला. तो दिल्लीच्या सुभेदाराचा नायब होता. वस्तुतः तो त्यावेळी मृत्युपंथाला लागलेल्या स्थितीत आजारी होता. तरीही त्याने विषप्राशन केले अशी हूल उठविण्यात आली. ईदच्या दिवशी ( १० जिल्हेज, १२ ऑक्टोबर १७२० ) नज्मुद्दीन अलीखान जामा मशीदीत गेला. त्याचे डोळे पाण्याने डबडबलेले होते. तो घरी परतत असताना वाटेत अब्दुल्लाहखानाच्या दूतांनी त्यास सलाम केला.

तो तात्काळ राजकुमारांच्या कारागृहात गेला आणि जहांदारशाहाच्या मुलांच्या राहण्याच्या ठिकाणाकडे त्याने माणसे पाठविली. प्रथम त्यांना पाहताच शाहझाद्यांनी आपले दरवाजे बंद केले. माणसे येण्याचे कारण समजल्यावर राजकुमारांनी आपला नकार कर्कशपणे व्यक्त केला. काहीजणाच्या माहितीप्रमाणे त्या माणसांनी तद्नंतर नेकूसियरशी बोलणी केली. पण तेथून त्यांना परतावे लागले. शेवटी शाहझादा इब्राहीम याजकडे प्रस्ताव आला. त्याची या प्रस्तावाला अधिक अनुकूलता असल्याचे त्यांना आढळून आले. (खाफीखान ९१३, ९१४.)

अब्दुल्लाहखान दिल्लीत येऊन पोहोचण्यापूर्वीच शाहझादा इब्राहीम याला तुरुंगाबाहेर काढून सिंहासनावर बसविण्यात आले होते. त्याच्या नावे खुतबा पढण्यात आला. त्यात त्याचा किताब अबुल्-फतह जहीरुद्दीन मुहम्मद इब्राहीम असा होता. त्याच्या नावे नाणे पाडण्यात आले. नाण्यावर पुढील ओळी कोरल्या होत्या---

सिक्कह बर सीम झद दर जहान

बा फज्ल-इ-मुहम्मद इब्राहीम

शाह-इ-शाहान

( राजांचा राजा मुहम्मद इब्राहीम याच्या कृपेने या जगात चांदीवर शिक्का उठविण्यात आला. )

तख्तारोहण १५ जिल्हेज ११३२ हि. ( १५ ऑक्टोबर १७२० ) रोजी झाले. त्यावेळी शाहझादा अंदाजे तेवीस वर्षांचा होता. तो बहादुरशाह बादशाहाचा तिसऱ्या क्रमांकाचा मुलगा रफी-उश्शान याचा सर्वात थोरला मुलगा होता आणि म्हणून बादशाह रफीअ उद्दरजात आणि रफीअ-उद्दौलह यांचा भाऊ होता.[७२] त्यास सय्यिद मंडळींनी रफीअ उद्दरजातचा वारसा म्हणून मुक्रर केले होते. पण दिल्लीचा सुभेदार सय्यिदखान जहान याला निवडीबाबत अखेरचा अधिकार होता. आडदांड स्वभावाचा म्हणून झालेल्या लौकिकाचा धसका घेऊन त्याने त्याच्या ऐवजी, आता मुहम्मदशाह बनलेल्या रोशन अख्तरला निवडले होते. [खाफीखान ९१४, कासिम ३६१, वारिद १६१ अ.]

७२ एक अलीकडची लेखनकृती जाम-इ-जाममध्ये नोंदल्याप्रमाणे त्याचा जन्म २६ रबिलावल १११५ हि. ( ९ ऑगस्ट १७०३ ) रोजी झाला होता. म्हणजे या तारखेनुसार तो या तीन भावांतील सर्वात धाकटा ठरतो. नूरुन्निसा बेगम हीच त्याची आई होती व त्याच्या राज्यारोहणाची तारीख २८ जिल्हेज ११३२ हि. ( २८ ऑक्टोबर १७२० ) असे या ग्रंथात नमूद केले आहे. पण दानिश्मंदखानाच्या बहादुरशाह नाम्यामध्ये ७ रमजान १११९ हि. ( २ डिसेंबर १७०७ ) या दिवसाखाली शाहझादा इब्राहीम याला ७,००० ची ( २,००० स्वार ) मनसब देण्यात आली असा उल्लेख आहे, त्याअर्थी तो ११०७ हि. (१६९५-९६) नंतर जन्मला असण्याची शक्यता जवळजवळ नाही; कारण शाहझाद्यांना मनसब मिळण्याचे योग्य वय कमीत कमी बारा वर्षांचे मानीत. तारीख-इ-मुहम्मदीमध्ये त्याच्या मृत्यूच्या वेळी ( ११५९ हि. = १७४६ ) त्याचे वय अंदाजे ५० वर्षांचे होते असे नमूद आहे. त्यावरून त्याचे जन्मवर्ष ११०९ हि. (१६९७-९८) असावे आणि तख्तावर बसण्याच्या समयी तो २३ वर्षांचा असावा. याउलट रुस्तम अलीच्या तारीख-इ-हिंद पान २४६ ब, मध्ये त्यावेळी तो ४० वर्षांचा होता असे नमूद आहे.

नव्या बादशहाला तख्तावर बसवून दोनच दिवस उलटल्यावर अब्दुल्लाहखान राजधानीस येऊन पोहोचला. त्याने शाही खजिन्याचा कब्जा घेतला. तेथे सापडलेल्या द्रव्याची भर अब्दुल्लाहखानाने स्वतःच्या आणि रतनचंदाच्या खजिन्यात घातली. द्रव्याची ही सर्व पेवे आता उकरण्यात आली. त्यांतील द्रव्य फौज उभी करण्याच्या कामी लावण्यात आले. नंतरच्या काही दिवसात १ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे वाटप झाले असे सांगतात. जवळच्या आणि दूरच्या सर्वांना तातडीचे हुकूम सुटले. प्रत्येक सय्यिदाने, मग तो चाकरीत असो वा नसो, आपला सन्मान समजून, हजर व्हावे असे आदेश जारी झाले. दिल्लीच्या मार्गावर असता पुष्कळसे जाट, मेवाती आणि राजपूत जमाव करून आले होते. नव्या फौजेच्या मागण्या पुऱ्या करता याव्या म्हणून प्रत्येक पुढाऱ्याला ३० ते ४० हजार रुपयांची उचल देण्यात आली. इतके द्रव्य का पेरीत आहा असे विचारले असता अब्दुल्लाहखान उत्तरला, "जर मी जिंकलो तर राज्य आणि खजिना माझा आहे; जर तसे न होईल तर हे द्रव्य माझ्या शत्रूंच्या हाती पडण्यापेक्षा वाटून टाकणे अधिक श्रेयस्कर." एक घोडा बाळगणाऱ्या स्वाराचा पगार दरमहा ८० रुपये आणि दोन घोडे असणाऱ्याचा १५० रुपये असा ठरला होता. प्रत्येक पायदळीला दरमहा १० रुपये देऊ केले होते. भरतीच्या वेळी प्रत्येकाला एक ते दोन महिन्यांचा पगार उचल म्हणून दिला होता. प्रत्येक जनावर, मग ते कसेही असो, छाप मारुन कामावर घेतले. फक्त गाढवे तेवढी घेतली नाहीत. मला दाखल करून घ्या असे सांगत येणाऱ्या प्रत्येकाची, त्याचे पूर्वचरित्र लक्षात न घेता, भरती करून घेतली. [खाफीखान ९१४–९१७, शिवदास ५५ ब, कासिम ३६१.]

अखेरीस फौजेच्या पगारात केलेल्या सढळ वाढीमुळे जेवढा चांगला तेवढा वाईट परिणामही झाला. सैनिकाची चाकरीची वर्षे किती झाली हे लक्षात न घेता, पगारवाढी बेछूटपणे दिल्या. त्यामुळे जुन्या सैनिकांना नव्या इतकेच वेतन मिळू लागले. आपली गणना नव्या रंगरूटाबरोबर होत आहे याचा जुन्या नाणावलेल्या योद्धांना उबग आला. दोन–तीनशे रुपये किमतीचा घोडा बाळगणाऱ्या हत्यारबंद स्वाराला कळले की, दहा–पंधरा रुपये मोजून बाजारातून उचललेल्या कसल्याही शिंगरावर स्वार झालेल्या कुठल्याही खाटकापेक्षा, आचाऱ्यापेक्षा किंवा पिंजाऱ्यापेक्षा आपल्याला अधिक पगार मिळत नाही तेव्हा त्यालाही वीट आला. असला निष्काळजीपणा नज्मुद्दीन अलीखानाच्या सेनेत उठून दिसत होता. महिन्याचा पगार उचल म्हणून मिळताच बऱ्याचशा चव्हाट्यावरच्या गप्पीदासांनी पोबारा केला; नव्हे अगदी बरीचशी सैनिकपेशाच्या मंडळींनीही अशाच प्रकारे काढता पाय घेतला. एवढा सगळा प्रचंड खर्च करून देखील शाहझादा इब्राहीमच्या खासगीतील चाकरांच्या व कारकुनांच्या घोड्यांना खोगिरेसुद्धा नाहीत असे आढळून आले.

थोड्याच दिवसांत ५० हजार सैनिकांची नोंद झाली. या फौजेच्या दिमतीस तोफखाना यथातथाच होता. अगदी थोड्याच मोठ्या तोफा, दोनशे रेहकले आणि पाचशे जंजाल एवढाच सरंजाम होता. आपल्या बढाईखोर पद्धतीने सय्यिद म्हणाला की दारूगोळ्याची गरजच काय? अगदी पहिल्या झपाट्यात जवळ भिडून तर हल्ला करावयाचा आहे. खुद्द अब्दुल्लाहखानाने सांगितलेली माहिती आणि बक्षीच्या नोंदवह्या—ज्या खाफीखानास सहज प्राप्त होत—यावरून पाहता ९० हजारांहून अधिक स्वारांची नोंद झाल्याचे खाफीखानाला आढळून आले. या हिशेबात चूडामण जाट, राजा मुहक्कमसिंग यांच्या

सैनिकांचा तसेच हुसैन अलीखानाच्या फौजांतील पळून आलेल्यांचा व जमीनदारांनी पाठविलेल्या तुकड्यांचा समावेश केलेला नाही. सुमारे एक लाख ते एक लाख पस्तीस हजार सेनेची जमवाजमव झाली असल्याचा सर्वसाधारण अंदाज होता. ( खाफीखान ९१८, कासिम ३६२. )

फर्रुखसियरच्या मृत्यूपासून चाकरी सोडून खाजगी जीवन कंठत असलेल्या गाझी-उद्दीखान घालिबजंग यास अब्दुल्लाहखानाने वश करून घेतले. त्याची खुशामत करून, 'भाऊ' असे संबोधून दूअस्पी सात हजारी (दोन घोडे ठेवणारे) मनसब देऊन, पहिल्या बक्षीच्या पदावर नेमून त्यास अमीरूल्-उमरा असा किताब दिला. त्याला सय्यिद पक्षातून ओढून काढण्यासाठी प्रतिपक्षाने खूप खटाटोप केला. अमीनुद्दीन-खान सांभालीने त्यास लिहिलेल्या लांबलचक पत्रावरून त्या खटाटोपाची कल्पना येते. हा सांभाली पुन्हा एकदा चमकू लागला. तो लिहितो की अब्दुल्लाहखान जमवून जमवून जमविणार ती हीच फौज की जिने हुसैन अलीखानाच्या मृत्यूनंतर भेकडासारख्या टिऱ्यांना टाचा लावल्या (पळाले), 'ज्यांनी एकदा पाठ दाखविली ते पुनः पाठच दाखविणार' (या आशयाची) ही म्हण खरीच आहे. एका भावाचा इतक्या सहजपणे निकाल लागला हा दुसऱ्या भावाचा झटपट पराभव होण्यास झालेला शकून आहे असे सामान्य लोक बोलतात. लोकांचा आवाज म्हणजे अल्लानेच केलेली खूण नाही का?[७३] असा सगळा युक्तिवाद होऊन देखील सय्यिद पक्षाची तळी उचलून धरण्यात गाझीउद्दीन खानाने खंबीरपणा दाखविला.[७४]

अब्दुल्लाहखानाच्या पक्षाला येऊन मिळालेला आणखी एक उल्लेखनीय अनुयायी म्हणजे हमीदखान होय. त्यास "जंगली शाहझादा" असे टोपण नाव होते व तो आपल्या भावाच्या शत्रूंना पाठबळ देण्यात तत्पर झाला.[७५]

नज्मुद्दीन अलीखान याला ७,००० च्या ( सात हजार घोडे ) मनसबीवर बढती मिळून त्याची बक्षी दुसरा म्हणून नेमणूक झाली. सिआदतखान याचा मुलगा सय्यिद सलाबतखान आणि रूहुल्लाहखान निअमत इलाही याचा मुलगा बैरामखान यांना अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या बक्षीपदावर नेले. सैफुद्दीन अलीखान हा त्याचा भाऊ अब्दुल्लाहखान पलवल

७३ हल्क-इ-खल्क, कोस-इ-खालिक, शब्दशः अर्थ—'निर्माण झालेल्याचे ( म्हणजे माणसाचे ) नरडे म्हणजे निर्माण करणाऱ्याचा ( म्हणजे देवाचा ) ढोल;' म्हणजे पाचामुखी परमेश्वर यासारखा अर्थ.

७४ शिवदास ५५ ब; मुहम्मद कासिम लाहोरी ३६२; इन्शाअे यार मुहम्मद ९, ४४.

७५ मुहम्मद कासिम लाहोरी ३६३, या काळानंतर काही वर्षांनी अहमदाबादेत लूटमार करणाऱ्या मराठ्यां-समवेत त्यांचा साथीदार म्हणून हमीदखान दिसून येतो. त्याचा शाहझादा असा आलेला उल्लेख ( टॉड, ॲनाल्स, खंड दोन १०० ) समजू शकला नव्हता. का ते वरील जंगली शाहझादा या टोपण नावाच्या उल्लेखामुळे स्पष्ट होते. पहा, खुशहाल पान १०१२ अ आणि शराइफ-इ-उस्मानी, इर्विन हस्त. पृ. ३१९ हे टोपण नाव फर्रुखसियरच्या दरबारातील मानकऱ्यांनी दिले होते. एके दिवशी शाही शिकारगाहमध्ये हमीदखान घोड्यावरून उतरला, घाईघाईने पुढे झाला आणि बादशाह चिरायु होवो असे ओरडून त्याने लवून मुजरा केला. या खुलाशामुळे वस्तुतः काहीच बोध होत नाही. पण मला वाटते की दरबारच्या चालीरीती पाळण्यात त्याची काही गफलत झाली असावी व त्यामुळेच त्याचा नावलौकिक कमी लेखणारे नाव त्यास प्राप्त झालेले असावे. ब्रि. म्यू. हस्त., १८३२ पान ३३ अ.

मुक्कामी असता, मुरादेबादहून आला होता यास ५,००० ची ( ५,००० घोडे ) बढतीची मनसब मिळाली. शहामतखान ( सय्यिद ताज महम्मूद ) याला पंजहजारी ( ५,००० घोडे ), सय्यिद रफअतखान यास सातहजारी ( ७,००० घोडे ) इअ्तिबारखान, दर्याखान, शेख सिब्घतुल्लाहखान ( उर्फ शैख़ू ) लखनवी हा आपल्या चार मुलांसह येऊन मिळाला. सय्यिद मुजफ्फर अलीखान, सय्यिद अक्बर अलीखान, सैद मुहम्मदखान, मसूमखान, रुस्तम अलीखान, सिआदतखान ही बढती मिळालेल्यांची आणखी काही नावे होत. [ शिवदास ५५ ब, कासिम ३६३, खाफीखान ९६४. ]

ज्या मंडळींवर सय्यिदांची मर्जी खप्पा झाली होती त्यांनादेखील चाकरीस बोलाविले. अशा पाचारलेल्या मंडळींत इअ्तिकादखान ( मुहम्मद मुराद काश्मिरी ), दिल्लीचा माजी सुभेदार मुहम्मद यारखान, मृत बादशाह फर्रुखसियर याचे नातेवाईक शाइस्तेखान व सैफुल्लाहखान आणि माजी मीर आतिश इस्लामखान व अलीकडे आग्र्याचा किल्लेदार असलेला याचा भाऊ शफीखान यांचा समावेश होता. मुहम्मद यारखान, इस्लामखान आणि शफीखान यांनी नोकरीत येण्यास नकार दिला पण इअ्तिकादखान आणि सैफुल्लाहखान यांनी फौजांच्या पगारासाठी दिलेले पैसे आणि मनसबी यांचा स्वीकार केला. पण जेवढ्या हक्कावर दावा केला तेवढा मिळाला नाही म्हणून एक-दोन मजला मारून झाल्यावर, इअ्तिकादखान दिल्लीला परत निघून गेला. [ खाफीखान ९१५. ]

२६ जिल्हेज ( २८ ऑक्टोबर १७२० ) च्या सुमारास अब्दुल्लाहखानाची छावणी दिल्ली शहराच्या जरा बाहेर इदग्याच्या[७६] दिशेस उभी असल्यासारखी दिसत होती. एक मोहरम ११३३ हि. ( १ नोव्हेंबर १७२० ) रोजी सराई साहिल ( सुहैल ? ) पासून कुत्बपर्यंत आला. दुसऱ्या दिवशी सराई बख्तावरखान येथे आला. त्यावेळी प्रतिपक्ष राजपूत संस्थानातून कूच करीत असल्याची कल्पना होती. या प्रतिपक्षाच्या हल्ल्याची राजधानीजवळ वाट पहावी असा अब्दुल्लाहखानाचा मनसुबा होता. पण लवकरच अब्दुल्लाहखानाला कळून चुकले की, बादशाह सरळ मार्गाने राजधानीस कूच करीत नसल्याने व छावणी शहराच्या अगदी जवळ पडल्यामुळे सैनिकांना गुपचूप आपल्या घरी निघून जाण्यास अवसर मिळू लागला, म्हणून त्याने आपली दिशा बदलली. गुलाम अलीखान मुहम्मदशाहाच्या छावणीतून पलायन करून आला होता. त्याला दिल्लीच्या रखवालीसाठी मागे ठेवले व त्याच्या जोडीला अब्दुल्लाहखानाचा पुतण्या व अवघ्या १४ वर्षांचा दत्तक पुत्र नजाबत अलीखान यास ठेवले.

१० तारखेला ( १० नोव्हेंबर १७२० ) छावणी फरीदाबाद येथे होती. त्यानंतर त्यांचा मुक्काम पलवल येथे हालला. या ठिकाणी सैफुद्दीन अलीखान, शहामतखान, त्याची मुले व नातेवाईक, असदुल्लाहखानाचा सर्वांत थोरला मुलगा सय्यिद मुहम्मदखान, नवाब अव्‌लिया आणि जुल्फिकार अलीखान ही मंडळी अब्दुल्लाहखानास येऊन मिळाली. यांपैकी नवाब अव्‌लिया आणि जुल्फिकार अलीखान या दोघांना हुसैन अलीखानाने दक्षिणेतील चाकरी-साठी बार्हा सय्यिदांच्या फौजा उभ्या करण्याच्या कामगिरीवर पाठविले होते. त्यांनी बारा

७६ जुना इदगा शहराच्या तटापासून पश्चिमेस अंदाजे पाऊण मैलावर आहे; पहा कॉन्स्टेबलचा हॅण्ड अॅटलास तक्ता ४७. यह्याखान पान १२९ ब, सांगतो की, पहिले कूच कुत्बच्या दिशेने झाले तर खाफीखान ९१७, सांगतो की, इदग्याचा मुक्काम १७ जिल्हेज रोजी झाला.

हजारांहून अधिक घोडेस्वार आणले. त्यांच्या तांड्यामध्ये सय्यिदांनी गच्च भरलेल्या बैलगाड्याच बैलगाड्या होत्या. या मंडळींना स्वार होण्यासाठी लागणारा घोडा मिळविण्याची कठिणाई होती. तरीही संघर्षात सामील होण्यास ते उत्सुक होते आणि पुढे केव्हातरी हत्तीचा मान मिळालेला अधिकारी बनण्याच्या दिवसांकडे डोळे लावून बसले होते. अखेरीस लढाई देण्याच्या स्थळाबाबत अब्दुल्लाहखानाने निर्णय केला. त्यासाठी परगणा पलवलमधील यमुना नदीलगतच्या बिलौचपूर गावाची निवड केली. गावातील रहिवाशांना हुसकून लावून त्याने आपल्या छावणीभोवती संरक्षक चर खणले. [ शिवदास ५७, ६८ अ; खाफीखान ९१७. ]

या सुमारास अब्दुल्लाहखानाच्या मनावर एवढा ताण पडला होता की मनात बोलावयाची गोष्ट एक असता, तोंडातून तो दुसरीच गोष्ट बोले. त्याच्या भोवतालच्या माणसांची डोकी काम देत नव्हती. याचा प्रत्यय कुत्वजवळ घडलेल्या घटनेवरून येतो. जुन्या चालीरीतीनुसार शाहझादा इब्राहीमला फेटा बांधण्यासाठी तेथे नेले. अब्दुल्लाहखानालाही तेथे फेटा बांधला. बादशाहाच्या कमरेला तलवार लटकाविण्याचा विधी होऊन नंतर ख्वाजाच्या दर्यात नमाज झाला. बादशाह लढाईवर जाई तेव्हा दोरी सोडलेले धनुष्य या कौल देणाऱ्या दर्यात ठेवण्याचा प्रघात होता. सुटलेली दोरी पूर्वी होती तशी झाली तर याचा अर्थ फत्ते होणार असा लावीत. हा कौल मागण्याची आठवण अब्दुल्लाहखानाला कोणीतरी केली. एका धनुष्यासाठी शोधाशोध सुरू झाली. धनुष्य हवे ही गोष्ट दर्याच्या बाहेर देखील सर्वांना कळून चुकली. ही सगळी मंडळी धनुष्यासाठी अर्धा-पाऊण तास खोळंबून बसली. पण धनुष्य आणवण्याबद्दल झालेल्या हुकुमाकडे कोणी लक्ष दिले नाही अथवा धनुष्य आणण्याची तसदीही कोणी घेतली नाही. ( यह्या १२९ ब. )

दोन्ही फौजांची गाठ घडण्यापूर्वी मुहम्मदशाहाच्या फौजातून कितीतरी सैनिक फरारी झाले होते आणि हुसैन अलीखानाचे सैरावैरा झालेले शिपाई त्याच्या भावाभोवती जमू होते. जमविता येतील तेवढे सय्यिद पक्षाचे छुपे पाठीराखे जमवून राजा मुहक्कमसिंग खत्री मध्यरात्रीच्या सुमारास बादशाहाच्या छावणीतून पळाला. आपले ठोकलेले तंबू आणि इतर मालमत्ता जशीच्या तशी ठेवून त्याने पलायन केले. बहादुरखान, घोसरखान, सय्यिद कमालखान, सय्यिद मुहम्मदखान वगैरे असामी त्याच्याबरोबर पळाले. अब्दुल्लाहखाना-कडून आलेल्या पत्रांना प्रतिसाद म्हणून चूडामण जाटाने या अगोदरच मुहम्मदशाहाची छावणी सोडून दिली होती आणि लुटालूट करण्यास सुरुवात केली होती. मुहम्मदशाहाच्या छावणी-बाहेर असताना, मुहम्मदशाह आणि अब्दुल्लाहखान यांच्या संघर्षात अब्दुल्लाहखानाचा पराभव झाला तर मुहम्मदशाहाकडून माफी मिळविणे सोपे आहे. त्या मानाने अब्दुल्लाह-खानाचा विजय झाल्यास त्याच्या खुनशीपणातून बचावणे तितके सोपे नाही. असा त्याने व त्याच्या सल्लागारांनी विचार केला. जाटाने स्वतःबरोबर पळवून आणलेले कित्येक हत्तीघोडे आणले होते. ही लूट अब्दुल्लाहखानाला नजर करण्यात आली. पण अब्दुल्लाह-खानाने नजराणा लुटारूंना इनाम दिला. बादशाहाच्या फौजेला जेरीस आणण्याचे व शक्य होईल तेथे लुटालूट करण्याचे काम चूडामणवर सोपविले. शक्य झाल्यास बादशाहाची दारूगोळ्याची कोठारे उडवून लावावी किंवा तोफा ओढणारे बैल पळवून न्यावे असे हुकूम त्याने सोडले. पण डोळ्यांत तेल घालून काळजी घेणाऱ्या हैदर कुलीखानामुळे त्याचा हा बेत फसला. [ शिवदास ५८ अ-९१९-२१; सिवानिह ६७, ७६. ]

## १९ : बादशाह मुहम्मदशाह याचे आगेकूच

मुहम्मदशाहाने यमुनेपासून वीस मैलांवर नांदगाव आणि बरसाना या दरम्यान तळ टाकला ( ३० ऑक्टोबर १७२० ), येथपर्यंतचा भाग आपण यापूर्वी पाहिला. या मुलखात पाण्याची टंचाई होती. म्हणून करता येईल तेवढी जलदी करून, नदीच्या तीरापर्यंतच्या भागावर ताबा मिळविणे भागच होते. ३ मोहरम ११३३ हि. (३ नोव्हेंबर १७२०) रोजी त्यांनी ईशान्य दिशेस देवठाणपर्यंत १० मैलांची मजल मारली. दोन दिवसांनंतर आणखी १२ मैलांची मजल मारून यमुना नदीवरच्या माजूहवी या गावी त्यांनी तळ हलविला. अवजड सामान शेरगड गावी पाठविले. हे खेडे बिलोच जमिनदारांचे होते. त्याचे स्थान पिछाडीला ६–७ मैलांवर होते. पिछाडीलाच, दक्षिण दिशेला ३० मैलांवर असलेल्या मथुरा या शहरास, मातब्बर सरदार आणि धनाढ्य व्यापारी यांनी, आपले परिवार, आश्रित यास पाठविले. ११ मोहरम रोजी तळ उत्तरेला ६ मैलांवर शाहपूरजवळ, तर १२ तारखेला ( १२ नोव्हेंबर १७२० ) आणखी पुढे ५ मैलांवर हसनपूर नजीक हलवण्यात आला. अब्दुल्लाहखानाच्या तळाचे ठिकाण असलेले बिलोचपूर हसनपुराच्या उत्तरेस अंदाजे ६ मैलांवर आहे. ही दोन्ही ठिकाणे यमुनेच्या उजव्या तीरांवर पलवल परगण्यात आहेत. [७७]

## २० : लढाईची तयारी

रणांगणात उतरण्याचा हुकूम झालेल्या मुहम्मदशाहाच्या फौजांचे आधिपत्य मुहम्मद अमीनखान, त्याचा मुलगा कमरुद्दीनखान, शेर अफ्गनखान, हिजब्रखान, हिजब्र अफ्गन-खान आणि अमीनुद्दीन सांभाली यांजकडे होते. फौजेच्या मुख्य विभागाकडे कित्येक मैल अंतरावर हैदरकुलीखान गेला; त्याने आपल्या तोफांची मांडामांड केली व आपल्याभोवती चांगला, संरक्षक चर खणला. छावणीसोबत असणारी पण पिछाडीचे रक्षण करणारी फौज आणि सामानसुमान याचे रक्षण यांचे काम राजा गोपाळसिंग भदौडिया, किशनगढचा [७८] राजा बहादुर राठोड, राजा सवाई जयसिंगाचा दिवाण जगराम, मीर जुम्लह, रोशनुद्दौलह, मुहम्मदखान बंगश, अझीझखान चघताई आणि मीर मुश्रिफ यांकडे दिले. या सर्व सेनापतींच्या दिमतीला ३७,००० घोडेस्वार होते. फौजेची एकूण संख्या दिलेली आढळत नाही; पण इतर तीन विभागांमध्ये एकूण २७,००० घोडेस्वार होते. खाफीखानाच्या अंदाजानुसार मुहम्मदशाहाची फौज अब्दुल्लाहखानाच्या फौजेच्या निम्म्याहून कमी होती. [ शिवदास पान ५८ ब, खाफीखान ९२१, बयान ४२, खुशहाल १०१३ ब ]

फौजेच्या डाव्या फळीचे नेतृत्व खानदौरान आणि शाम्सुद्दौलह याकडे होते. त्यांच्या दिमतीस नुस्रत यारखान साबितखान, सिआदतखान वगैरे मंडळी होती. उजवी फळी नदीकिनाऱ्यावर होती. मध्य बाजूची पाखे अज़्जम खानाकडे आणि तिची आघाडी

७७ शिवदास पान ५८ अ; बयान-इ-वाकिअ, ४३१ मध्ये असे सांगितले आहे की, राजा मुहक्कमसिंग आणि इतर यांचा उल्लेख यापूर्वी झाला आहे-हे बारा आणि तेरा मोहरम दरम्यानच्या रात्री अब्दुल्लाहखानाला येऊन मिळाले. अहवालुल् खवाकीन १७७-अ मधील माहितीप्रमाणे ढोलकोटच्या मैदानात दोन्ही फौजा एकमेकास भिडल्या. या ढोलकोटसाठी पाहा; इंडियन ॲटलास तक्ता ४९ आग्नेय.

८७ खुशहाल १०१३ ब म्हणतो, "रूपनगरचा."

कमरूद्दीनखान, अजीमुल्लाहखान आणि तल्यारखान यांकडे सोपविली होती. फौजेची मध्यफळी नवा वजीर मुहम्मद अमीनखान, शेर अफ्गनखान, हादीखान आणि तर्बियतखान यांनी सांभाळली होती. असद अलीखान, सैफुल्लाहखान, मुहामिदखान, अमीनुद्दीनखान, आणि राजा सवाई जयसिंग याची सेना यांना, राखीव म्हणून बाजूस ठेवले होते व जरूर पडेल तेव्हा त्यांनी डाव्या अथवा उजव्या फळीस कुमक देण्यास आणि शाही जनानखान्याचे रक्षण करण्यास सज्ज रहावयाचे होते. ( तत्रैव. )

लढाईच्या योजनेत वारंवार बदल केल्यावर अब्दुल्लाहखानाच्या पक्षात, निरनिराळ्या सेनाधिपतींना दुसऱ्या दिवशीच्या लढाईच्या त्यांच्या जागा मुक्रर करून देण्याचा निर्णय एकदाचा झाला. सगळे बाऱ्हा सय्यिद माजी वजीराच्या भोंवती ठेवले होते. आपल्या टोळीप्रमुखाच्या मदतीसाठी ते गर्दी करून धावत आले होते. त्यांच्यापैकी ज्यांच्याजवळ घोडे नव्हते त्यांनी पायदळ बनून अब्दुल्लाहखानाच्या हत्तीभोवताली जागा लढविण्याचे ठरविले. उजव्या फळीचे आधिपत्य अब्दुल्लाहखानाने आपल्याकडे घेतले. तेथे त्याच्या वरुद्ध बाजूस प्रतिपक्षातील खान दौरान होता. डाव्या अंगाला धोका कमी आहे असे वाटल्यावरून ती बाजू नवा मीर बक्षी गाझीउद्दीनखान याच्या हवाली केली होती. आघाडी आणि तोफखाना यांचे नेतृत्व नज्मुद्दीन अलीखान याकडे दिले होते व त्याच्या दिमतीस सैफुद्दीन अलीखान, सय्यिद मुहम्मदखान, शहामतखान, तहव्वुर अलीखान शुजाअतुल्लाहखान, जुल्फिकार अलीखान, अब्दुन्नबीखान आणि मुजफ्फरखान यांना दिले होते. ( खाफीखान ९१८, वयान ४३३. )

सय्यिद पक्षातील एक अगदी मोठी अडचण म्हणजे त्यांतला कोणीही, दुसऱ्या कोणाचे ऐकण्यास तयार दिसत नव्हता; त्यांना आज्ञापालनास प्रवृत्त करणे कठीण दिसत होते. याचा परिणाम असा झाला की, फौजेच्या दोन्ही फळ्या नीट उभारल्या गेल्या नाहीत. प्रत्येकाने आपल्याला योग्य वाटेल ती जागा लढण्यासाठी निवडली. मुहम्मद इब्राहीम आणि अब्दुल्लाहखान यांसाठी रणांगणात उरलेल्या इतर पुढाऱ्यांमध्ये हमीदखान, सैफुल्लाहखान, बैरामखान, निअमतुल्लाहखान, अमीरखान, सय्यिद सलाबतखान, अब्दुल घनीखान, इख्लासखान, अफगाण, उमरखान रोहेला, दीनदारखान, अब्दुल कादिरखान, लखनऊचा सिब्घतुल्लाहखान (उर्फ शैखू), गुलाम मुहियुद्दीनखान, दिलेरखान, शुजाअखान पलवली आणि अब्दुल्लाहखान तरीन यांचा समावेश होता. हे सर्व मिळून हत्तीवरून लढणारे सत्तर मानकरी अधिकारी या फौजेमध्ये होते.

खुद्द अब्दुल्लाहखानाच्या सेनेत त्याचे बक्षी अब्दुल्-हसनखान, सय्यिद अलीखान आणि हिरामण यांच्या नेतृत्वाखाली पंचवीस हजार घोडेस्वार होते. मोजणी करताना इतर तपशील लक्षात घेतला तर आपणास चाळीस हजार घोडेस्वार आणि अठरा हजार पायदळ अशी एकूण संख्या मिळते. उरलेल्या सैन्यात मुख्यत्वेकरून नवख्या शिपायांची भरती होती. या सैन्याकडे सामानसुमान आणि शाहझादा मुहम्मद इब्राहीम यांची जबाबदारी दिली. लढाईच्या आदल्या रात्री बादशाहाची छावणी सोडून पळून आलेला राजा मुहक्कमसिंग खत्री याला पिछाडीचे नेतृत्व दिले. नवख्या फौजेचा कडवेपणा संशयास्पद वाटल्यामुळे, या फौजेला पाठबळ देण्याचे हुकूम मुहक्कमसिंगाला देण्यात आले. राजाच्या मदतीस त्याबरोबर पळून आलेले सात-आठशे घोडेस्वार, तसेच खुदादादखान आणि खान मिर्झा हे होते. (खाफीखान ९२३, सिवानिह ७८.)

रात्रीच्या वेळी अब्दुल्लाहखानाने तहव्वुर अलीखान आणि सय्यिद जुल्फिकार अलीखान यांना टेहळणीच्या कामावर धाडले. बादशाही पक्षाच्या छावणी नजीक त्यांना कांही रोहिले घोडेस्वार भेटले. त्यांनी तहव्वुर अलीखान याला हटकले. तेव्हा तो पुढे आला व मी नुस्रतयारखान बाऱ्हापैकी एक असून अब्दुल्लाहखानाच्या ठावठिकाणाबद्दल हेरगिरी करण्यासाठी मला खान दौराननें पाठविले आहे असे त्याने ठणकावून सांगितले. त्या रोहिल्यांना त्याने बोलण्यात गुंतवीपर्यंत जुल्फिकार अलीखान आणि त्यांची माणसे तेथे दौडत आली. तीन रोहिल्यांना पकडता आले; दोन पळाले. आपला पाठलाग होईल या भीतीमुळे सय्यिदांनी, पकडलेली माणसे घेऊन, आपली छावणी जवळ केली. मध्यरात्रीच्या सुमारास या पकडून आणलेल्या रोहिल्यांना अब्दुल्लाहखानापुढे हजर करण्यात आले. त्यांच्या प्रश्नास उत्तर देताना त्या रोहिल्यांनी माहिती दिली की, आम्ही अझीझखान चघताईच्या फौजेपैकी आहो; बायझीदखान मेवाती हा बादशाहाचे आणि पिछाडीचे तंबू रक्षिण्याच्या कामावर आहे; आदल्याच दिवशी छावणीच्या पिछाडीच्या भागात जाटांनी लुटालूट करून काही हत्ती पकडून नेले होते; म्हणून मुहमद अमीनखानाने हुकूम सोडून अफगाण टेहळणी पथके बाहेर धाडली होती; त्याने आम्हाला बाहेर पाठविले व कोणी जाट जवळ येत असल्यास दिसताच त्याचा ओरडून इशारा करण्यास फर्माविले होते; स्वतः अझीझखान एक हजार सेनेसह बाटेवर दडून बसला आहे; बंगश, अफगाण मंडळी आणि सआदतखान डाव्या फळीत आहेत; हैदर कुलीखान तोफखान्यासह फौजेच्या मुख्य फळीच्या पुढे आहे. या पकडून आणलेल्या लोकांकडून साधारण एवढी हकीकत समजली.

या माणसांचा आणखी जबाब घेण्यासाठी उमरखान रोहिला यास अब्दुल्लाहखानाने बोलाविले, तेव्हा त्या माणसांनी उमरखानाला अझीझखानास मिळालेली इनामे आणि देणग्या यांची माहिती दिली व त्याने सहा हजार मेवाती अफगाण बरोबर आणले असल्याचे सांगितले. जाट सारखे लुटालूट करीत आहेत आणि अफगाण देखील दरोडेखोरीत तितकेच पटाईत असल्यामुळे पहारेकरी म्हणून बाहेर धाडले आहे, असे ते म्हणाले. ही बोलणी कित्येक तास चालली. बहुतेक बोलणी अफगाण बोलीत झाली. शेवटी त्यांना बक्षिसे देऊन सोडून देण्यात आले. (सिवानिह ७९.)

## २१ : हसनपूरची लढाई

१३ मोहरम ११३३ हि. (१३ नोव्हेंबर १७२०) रोजी सूर्य उगवण्यापूर्वी मुहम्मदशाह आपल्या पादशाहपसंत नामक हत्तीवर आरूढ झाला व त्याने फौजेच्या मध्यभागातील आपले स्थान घेतले. बादशाहाच्या आवतीभोवती असलेल्या लवाजम्यात लाल आणि पिवळे नामक सेनांसह इक्रम अलीखान आणि शेख घफरूल्लाहखान तसेच तोडयाच्या बंदुका घेतलेले भिल्ल आणि कर्नाटकी मंडळी, गदाधारी आणि अहादी यांना मुक्रर करण्यात आले होते. सर्वांपुढे हैदर कुलीखानाच्या नेतृत्वाखालचा, तडाखेबंद तोफखाना होता. त्याच्या मागे राहून त्याला फौजेच्या डाव्या फळीसह आधार देण्याचा हुकूम खान दौरान आणि साबितखान यांना झाला. मुहम्मदखान बंगश आणि सआदतखान यांना नदीच्या बाजूला आणि पिछाडीला मुक्रर करण्यात आले. बादशाहाच्या भोवती नवा वजीर मुहम्मद अमीनखान त्याचा मुलगा कमरूद्दीनखान, दिल दिलेरखान, शेख अफ्गनखान हिजब्र अफगखान वगैरे मंडळी होती.

रणांगणात बादशाहाने घेतलेल्या ठिकाणापासून मुख्य छावणी एक कोसावर होती. या छावणीच्या रक्षणाची जोखीम जफरखान, त्याचा भाऊ फक्रुद्दीनखान, किशनगढचा राजा राजबहादुर, नुसरतयारखान, सवाई जयसिंगाचा दिवाण जगराम, अझीझखान, मीर मुश्रिफ आणि राजा गोपालसिंग भदौडिया यांच्यावर सोपविली. नंतर कैदी रतनचंद याला आणले. हत्तीवर बसलेल्या स्थितीत त्याला बादशाहापुढे हजर केले. नंतर त्याला हत्तीवरून उतरण्यास भाग पाडले व तडकाफडकी त्यास ठार केले. त्याचे धडापासून वेगळे केलेले मुंडके बादशहाच्या हत्तीपुढे फेकण्यात आले व ते पायदळी तुडविण्यात आले. (शिवदास ५९ब, कामवर २४०, खाफीखान ९२४-२८, खुशहाल १०१३ब.)

फौजेच्या पश्चिम बाजूला घिरटचा घालीत असलेल्या चूडामण जाटाने बऱ्याच शाही अनुचरांना अलग पाडले व तो छावणीत शिरला. पण वर उल्लेखलेल्या राजांनी त्याला पुन्हा एकदा पिटाळले. तदनंतर जाटांनी दक्षिण बाजूवर हल्ला चढविला. तेथून त्यांनी काही खासगी माल आणि थोडेसे शाही सामानसुमान लांबविले. जफरखान, मुजफ्फरखान, आणि मुहम्मदखान बंगश यांनी त्यांना आणखी एकदा हुसकून लावले तेव्हा त्यांनी पूर्व बाजूने लूटमारीचा आणखी एक प्रयत्न केला. या ठिकाणी मीर मुश्रिफ आणि लखनऊचा अल्वीखान तरीन यांनी त्यांशी मुकाबला करून त्यांचा पराभव केला. पण त्यावेळी उडालेला गदारोळ इतका भयंकर वाटला की छावणीतील इतर लोक आणि व्यापारी भयभीत झाले; त्यांनी यमुनेत उड्या टाकल्या. पोहत पोहत ती ओलांडण्याचा प्रयत्न करीत असता कित्येक जण बुडून वा वाहून जाऊन मरण पावले. तीन वाजण्याच्या सुमारास सामानसुमानाची छावणी सुरक्षित स्थळी हलविली. तरीही गोंधळ चालूच राहिल्याने ती पुन्हा एकदा आणखी दूर अंतरावर हलविली. (शिवदास ६०अ.)

सय्यिदांच्या आघाडीच्या[७९] अग्रभागी राहून नज्मुद्दीनखान चालून येत असल्याचे नदीकडच्या बाजूला लांबवरून दिसले. तेव्हा शाही मीर आतिश हैदरकुलीखान याने आपल्या तोफा मैदानात आणल्या. लहानमोठ्या तोफांतून भडिमार करून त्याने चालून येत असलेल्या शत्रूशी मुकाबला केला. भडिमार इतका जोरदार आणि अखंड झाला की, विरुद्ध पक्ष अगदी गप्पगार झाला. भडिमाराची प्रत्येक फैर संपली की हैदरकुलीखान आपल्या सैनिकांना सोन्या-चांदीच्या बक्षिसाची लालूच देऊन त्यांत उत्साह उत्पन्न करी. जसजसा तोफखाना पुढे सरकला तसतशी फौज त्यामागून पुढे येऊ लागली व तिने रणांगण व्यापले. तोफखानाच्या प्रमुखाच्या औदार्याने उत्तेजित झालेल्या हजारींनी अतिशय तडफ दाखवून कामगिऱ्या बजावल्या; ठासलेल्या पहिल्या तोफांचा संच भडिमार करतो न करतो तोच दुसरा संच दारू ठासून जय्यत तयारी होई. शाही तोफखान्याला आधार देण्यासाठी खान दौरानच्या फौजा आल्या. त्याच्या तोफांचे नेतृत्व करणारे संजरखान आणि दोस्तअलीखान यांची कामगिरी यावेळी विशेष उठून दिसली. पैकी दोस्त अलीखानाच्या पायाला इजा पोहोचली. सय्यिद नुसरतयारखान आणि साबितखान यांनी देखील महत्वाची कामगिरी बजावली; तर

७९ रणांगणातील निरनिराळ्या विभागांचे आधिपत्य कोणाकोणास दिले याबद्दल खुशहालचंद पान १०१४अ, ब; निराळी माहिती सांगतो. आघाडी शहामतखानाकडे आणि तोफखान्याचे नेतृत्व सैफुद्दीन अलीखानाकडे होते असे तो सांगतो. नज्मुद्दीनखान उजव्या फळीत आणि गाझीउद्दीनखान कोसा डाव्या फळीत हुकूमत करीत होता अशी त्याने माहिती दिली आहे.

सआदतखान आणि मुहम्मदखान बंगश यांनी शत्रूच्या डाव्या फळीला चकविण्यात यश मिळविले. सय्यिद अब्दुल्लाहखानाच्या दारुगोळ्याच्या कोठारावर त्या दिवशी एक बाण येऊन आदळला. त्यामुळे कोठारात स्फोट झाला व अनेक इसम प्राणास मुकले. (खुशहाल १०१५ब, शिवदास ५९ब.)

१३ तारखेच्या दिवशी दिवसभर खेळली गेलेली लढाई मुख्यत्वेकरून तोफखान्याचीच लढाई ठरली. या लढाईच्या मान्यास तोंड देण्याचे बहुतेक काम अब्दुल्लाहखानाच्या पक्षात अब्दुल्लाहखानाचा भाऊ आणि त्याच्या आघाडीवर हुकूमत करणारा नज्मुद्दीन अलीखान याने बजावले. सुरुवातीला सर्व भर हल्ला करण्यावरच मदार ठेवण्याचा सय्यिदांचा बेत होता. पण शाही छावणीतून फुटून आलेल्या राजा मुहक्कमसिंगाने त्यांना तसे करण्यापासून परावृत्त केले. प्रतिपक्षाजवळ एवढा जबरदस्त तोफखाना आहे की असा हल्ला केल्यास, आपण विनाशासच सामोरे गेलो असे होईल हे त्याने निदर्शनास आणून दिले. आपले तोफांचे नग मोजकेच आहेत, तेव्हा ते एखाद्या घळीच्या तोंडाशी खंदकवेष्टित स्थितीत मोक्याच्या जागी ठेवावे, म्हणजे मग आपल्याला काय घडेल याची वाट पहात रहाणे सोयीचे होईल असे त्याचे म्हणणे पडले. मुहक्कमसिंगाने दक्षिणेत योद्धा म्हणून अतिशय उत्तम लौकिक कमावलेला होता. तरीही त्याच्या सल्ल्याचा मान राखला गेला नाही. सय्यिदांच्या तोफा एका निर्जन गावाजवळच्या उंचवटयावर झाडाच्या आडोशाखाली ठेवल्या. या तोफखान्याने आपल्या कुवतीनुसार प्रतिपक्षाच्या भडिमारात नरमाई आणण्याचा खटाटोप केला. त्यांचा एक तोफगोळा मुहम्मदशाहाच्या हत्तीजवळून २-३ यार्डावरून गेला. इतिहासकार खुशहालचंद शेर अफगनखानाच्या उजव्या बाजूला घोड्यावर होता. तो तोफगोळा बाणांच्या दोन फेकींच्या अंतरावर येऊन आदळला. थोडासा उसळत गेला व एका घोडेस्वाराला त्याने जखमी केले. (कासिम ३७४, खुशहाल १०१५.)

लढाईच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे तुटक-तुटक ठिकाणी हल्ले आणि प्रतिहल्ले यांनी बनलेल्या लढती, रणांगणात दिवसभर चालू राहिल्या. एक वेळ तर अशी आली की, शाही पक्ष पराजित होणार असे वाटले. पण खान दौरान, सय्यिद नुस्रतयारखान, साबितखान, दोस्त अलीखान, सय्यिद हमिदखान आणि आसदअलीखान यांनी आटापिटा करून ओढविणारे महासंकट रोखले. कुमक येणे जरूरीचे आहे असे वाटल्यावरून खान दौरानने एका खोजाला बादशाहाकडे पाठविले. तेंव्हा बादशाहाने खान दौरानच्या मदतीसाठी मध्यभागातील शेर अफगनखानास मुक्रर करून पाठविले. सय्यिदांच्या तोफांचे काही नग हस्तगत केले व उरलेल्या तोफा झाडांच्या आडोशाखालून काढून लावल्या. लढाईत प्राण गमावलेल्यांमध्ये लखनऊचा शेख सिब्घतुल्लाह, त्याची तीन मुले आणि सत्तर असामी; अब्दुल कादिरखान टठ्ठवी हा काजी, मीर बहादुरशाहीचा पुतण्या, अब्दुर्रहीमखान आलमगीरी याचा मुलगा अब्दुल घनीखान, गुलाम मुहियुद्दीनखान आणि शुजाअखान पलवलीचा मुलगा यांचा समावेश होता. ठार झालेल्यात कित्येक शिपाईदेखील होते.[८०]

बादशाहाच्या नजीक असलेल्या आघाडीच्या रक्षकांचे नेतृत्व सय्यिद नुस्रतयारखानाकडे होते. त्याची फौज वेगळी पाडून तिच्यावर हल्ला चढविण्याचा बेत अब्दुल्लाहखानाने रचला. या सय्यिद नुस्रतयारखानावर सय्यिद मंडळींचा विशेष आकस असण्यास एक कारण होते. हा

८० बयान-इ-वाकिअ, ४३७; खाफीखान ९२५, ९३०; खुशहाल १०१७ अ; शिवदास पान ६१ अ.

त्यांच्या जमातीपैकी होता, त्यांचा आप्त होता आणि तरीही प्रतिपक्षास मिळून त्यांच्याविरुद्ध उभा ठाकला होता. याला एका बाजूला ढकलून मुहम्मदशाहाच्या मध्यभागापर्यंत घुसत जाता येईल अशी आशा अब्दुल्लाहखानाला वाटत होती. प्रथम आपले इच्छित साध्य करण्यासाठी तो आपल्या डाव्या अंगाने घुसला. पण नदीचा अडथळा त्याला एवढा मोठा वाटला की आपल्या आघाडीला ओलांडून तो आपल्या फौजेच्या उजव्या अंगाला येऊन दाखल झाला. त्याची ही हालचाल लक्षात येताच कुमक मिळण्याविषयी निरोप गेले. धाडलेल्या मदतीमुळे बादशाहाची मध्यबाजू कमकुवत बनली. कुमक म्हणून जाण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांना पाचारण झाले त्यांनी रणांगणातील त्यांची त्या वेळची जागा सोडण्यास हरकत नोंदविली. तेव्हा बादशाहाच्या सैन्य विभागासोबत असलेल्या तोफा नदीकडे शत्रूचा मार्ग रोखण्यासाठी धाडल्या आणि आघाडीचा काही भागदेखील तिकडेच धाडला. (बयान, ४३५, ४४१.)

अब्दुल्लाहखानाने आपल्या आगेकुचीच्या दिशेत बदल केल्याचा परिणाम म्हणून तो नदी किनाऱ्यापासून दूर जात चालल्याचे दुर्दैव ओढवले. त्याचे मुख्य ठाणे आता पाणस्थळापासून काही मैल अंतरावर गेले. तिन्हीसांजा होईपर्यंत लढाई चालत राहिली. या वेळेपर्यंत धीर खचल्याचे कसलेच चिन्ह अब्दुल्लाहखान दाखवत नव्हता. पण त्याचे लोक मात्र, विशेषत: प्रथमच भरती झालेले लोक, चलबिचल झाल्यासारखे दिसू लागले. लौकरच त्यांची बुद्धी काम देईनाशी झाली. आपल्या घोड्यांना आणि उंटाना पाणी दाखविण्याच्या मिषाने ते नदीकडे दौडत चालले किंवा एक लेखक नमूद करतो त्याप्रमाणे "चिमण्यांचे थवे उडतात तसे" घोळक्याने जाऊ लागले. नदीवर पोहोचल्यानंतर नदीचे किनारे प्रतिपक्षाने कब्जात घेतले असल्याचे त्यांना आढळून आले. पाणी पिण्याच्या सबबीखाली फौजांची पथकेच्या पथके रणांगणातील निशाण सोडू लागली. हे रणांगण सोडण्याचे प्रकार सूर्य मावळेपर्यंत चालू राहिले. छावणीपासून दिल्ली शहराबाहेरील बारा पुलापर्यंतचा रस्ता पळपुट्यांच्या रहदारीने संबंध रात्रभर नुसता गजबजून राहिला. रात्र पडली तेव्हा दिल्लीहून थोड्याच दिवसापूर्वी आलेल्या या महाप्रचंड फौजांतील जेमतेम काही हजाराच्या फौजा जागेवर उरल्या होत्या.[८१]

रात्रीच्या वास्तव्यासाठी रणांगणातील आपल्या त्या वेळच्या ठिकाणी राहुटी ठोकण्याचा हुकूम अब्दुल्लाहखानाने प्रथम सोडला. पण तसे केल्यास आपण शत्रूच्या गोळीबारात सापडू हे समजून चुकल्यावर, त्याने पहिला हुकूम फिरविला. ती रात्र चांदणीरात्र होती; शाही तोफखान्यानेही आग ओकण्याचे थोडा वेळसुद्धा थांबविले नाही. सय्यिदांच्या बाजूस कोणी जरा धांदल करताना दिसला किंवा दृष्टीस पडला की त्या दिशेने तोफ फिरविली जाई आणि भडिमार होई. मधूनमधून तोफा खेचून पुढे आणणे हा प्रकार सारखा चालू होता. त्यासाठी तोफेच्या ढुंगणाला बैल जुंपण्याऐवजी तोफेच्या तोंडालाच जुंपत. या तोफांमध्ये गाझीखान आणि शाहपसंद या नावाच्या तोफा होत्या. या तोफा सतत एवढा भडिमार करीत होत्या की, त्या गतीने त्या तोफांतून भडिमार यापूर्वी कधी झाला होता हे अगदी म्हाताऱ्या माणसांच्यादेखील ऐकण्यात नव्हते. बक्षिसांची सारखी खैरात करून आपल्या लोकांचा जोश हैदर कुलीखानाने टिकवून धरला. अब्दुल्लाहखानाच्या फौजा मात्र छोटेछोटे गट करून फरारी होत राहिल्या. शाही पक्षात मुहम्मदशाह मात्र आगीखाली बसावे अशा थाटात आघाडीच्या अगदी लगत राहून हत्तीवर बसल्यास्थितीत त्याने रात्र घालविली.

८१ कासिम ३७६; शिवदास ६० ब; खुशहाल १०१६ अ; अहवाल १७७ ब.

मोहरमच्या १४ तारखेची (१४ नोव्हेंबर १७२०) पहाट झाली तेव्हा आपली सगळी फौज म्हणजे आपले निवडक नातेवाईक आणि गाजलेले लढवय्ये यांचीच तेवढी छोटी फौज राहिली आहे असे अब्दुल्लाहखानाला दिसून आले. ते सगळे मिळून हजार घोडेस्वारांपेक्षा जास्त नव्हते. या सर्वांनी आपल्या सर्व शक्तीनिशी लढत चालू केली. रात्रभर हत्तीवर जागते राहून, कित्येक तास अन्नपाण्याविना घालवून, इमान राखणाऱ्यांमध्ये माजी वजीराचे धाकटे भाऊ नज्मुद्दीन अलीखान आणि सैफुद्दीन अलीखान, सद्रुस्सुद्दूर, सय्यिद अफजलखान, राय टेकचंद, त्याचा मुख्याधिकारी वाली खत्री, गाझीउद्दीनखान (अहमद बेग), नवाब अल्लाहयारखान शाहजहानी, सय्यिद सलाबतखान आणि रूहुल्लाहखान ही मंडळी होती. जाटांच्या करामतीमुळे नदीपर्यंतचा रस्ता मोकळा झाला होता. हे जाट मित्र आणि शत्रू असा कसलाही भेदभाव न करता दोघांचीही लूटमार करीत होते. पहाटेच्या सुमारास मुहक्कमसिंगाच्या अंबारीवर एक तोफगोळा येऊन आदळला. राजा हत्तीवरून उतरला, घोड्यावर स्वार झाला आणि घोडा भरधाव सोडून तो निघून गेला. तो जिवंत आहे की मेला याचा पत्ता पुढे कित्येक दिवस लागला नाही.[८२]

भल्या सकाळी अब्दुल्लाहखान रणांगणातील आपल्या आदल्या दिवशीच्या जागेवर आला. त्याच्या सोबत नज्मुद्दीन अलीखान आणि कित्येक बाऱ्हा अमलदार होते. अब्दुल्लाहखानाने बादशाहाच्या मध्य भागावर धडक मारण्याच्या आशेने पुन्हा एकदा हल्ला चढविला. शाही पक्षाच्या डाव्या फळीने या हल्ल्याचा जोरदार प्रतिकार केला. शेवटी तर हातघाईच्या लढाईसाठी ही मंडळी घोड्यावरून पायउतार झाली. शहामतखान, त्याचा मुलगा पीरजादा फतहमुहम्मदखान, तहव्वुर अलीखान (बहादुर अलीखान म्हणून जास्त प्रसिद्ध) वगैरे सय्यिद पक्षाचे कित्येक जण ठार झाले. खान दौरानच्या तोफखान्याचा प्रमुख दरवेश अलीखान कामास आला. दोस्त अलीखान[८३] आणि नुसरतयारखान हे जबर जखमी झाले. या चकमकीत सआदतखान आणि शेर अफगनखान यांची कामगिरीदेखील उठून दिसली. अब्दुन्नबीखान आणि मयाराम हे हैदर कुलीखानाचे दोन अधिकारी आणि मुहम्मद जफर हा हुसैनखानाचा नातू एवढीच इतर नावे कामास आलेल्यांच्या शाही पक्षाच्या यादीत दिसतात. नज्मुद्दीन अलीखानाच्या डोळ्याला[८४] तीर लागला. जम्बूरचा एक गोळादेखील त्याच्या गुडघ्याला लागला.

थोड्या वेळाने खान दौरान, हैदर कुलीखान, सआदतखान आणि मुहम्मदखान बंगश यांच्या सैनिकांनी माजी वजीराला वेढले. एक तीर त्याच्या कपाळाला लागला. त्यामुळे तेथील कातड्याला जखम झाली. त्याला कैद करण्याचा प्रयत्न शिपायांनी चालविला. पण हातात तलवार घेऊन त्याने जमिनीवर उडी टाकली. मरेपर्यंत लढत देण्याचा निर्धार त्याने दाखविला. अंगात चिलखत असले तरी त्याचे हे धाडस म्हटले पाहिजे. लढाईतील निकराच्या वेळी पायउतार होऊन लढत देण्याचा सय्यिदांचा रिवाज होता व हा रिवाज त्यांच्या पक्षातील सगळ्यांना चांगला माहीतही होता. असे असूनही वजीराच्या हत्तीवर वर्जीर दिसेना

८२ कासिम ३७८; बयान-इ-वाकिअ ४३८, ४४१, ४४३; खाफीखान ९२५, ९२८; शिवदास ६१ अ; खाफीखान ३२८ सांगतो की सय्यिद पक्षाकडे १७–१८ हजार फौज उरली होती.

८३ या जखमांपायी दोस्त अलीखान ९ रमजान ११३४ हि. (२३ जून १७२२) रोजी मरण पावला.

८४ या जखमेमुळे त्याने आपला डोळा गमावला. त्या जागी त्याने पुढे काचेचा डोळा बसविला. हा त्याचा डोळा त्याच्या उरलेल्या आयुष्यात सामान्य लोकांच्या औत्सुक्याचा विषय बनला होता.

तेव्हा आपला नेता पसार झाला आहे असे समजून वजीराच्या फौजेतील प्रत्येक जण आपल्या सुरक्षिततेपलीकडे काहीदेखील बघेनासा झाला. बक्षी अबुल मुहसिनखान याचा भाऊ सय्यिद अलीखान जखमी झाल्याने त्याला बाजूस काढण्यात आले. नंतर आपली माणसे पुनः घेऊन, तल्यारखानाने हल्ला चढविला; अब्दुल्लाहखानाच्या तोफखान्याचे नेतृत्व करणाऱ्या शेख नाथुला त्यांनी ठार केले. राजपूत मंडळी आली. शेखाचा मृतदेह त्यांनी ताब्यात घेतला; तो शाही छावणीस नेला. आपली माणसे गोळा करून रणांगणात उभी ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न नज्मुद्दीन अलीखान आणि गाझीउद्दीनखान यांनी केला; पण त्यांच्याकडे कोणी लक्षच दिले नाही. शुजाअतुल्लाहखान, जुल्फिकार अलीखान आणि अब्दुल्लाहखान तरीन हे पळाले. अगदी सैफुद्दीन अलीखानासारख्या माणसाला देखील दिवस हातचा गेल्यासारखे वाटले. शाहझादा हत्तीवरून उतरून घोड्यावर स्वार झाला; त्याला आपल्या २००-३०० माणसां-समवेत बरोबर घेऊन, सैफुद्दीन अलीखानाने रणांगण सोडले. नंतर इब्राहीमचा हत्ती आणि त्याचे शाही छत्र विरुद्ध पक्षाच्या हाती लागले. त्यांनी या गोष्टी मुहम्मदशाहाकडे दिल्या. सय्यिद पक्षाचा बचाव किती क्षीण झाला होता हे आपण वारिद सांगतो त्यावर विश्वास ठेवला तर, पूर्णपणे सिद्ध होते. तो म्हणतो "दोन दिवसांच्या लढाईनंतर रणांगणात फक्त ४० प्रेते उरली होती".[८५]

हातात नंगी तलवार घेऊन नज्मुद्दीन अलीखान आपल्या भावाची चौकशी करण्यास आणि त्याची शोधाशोध करण्यास हत्तीवरून निघाला. अब्दुल्लाहखान अगदी एकटा जमिनीवर उभा आहे, त्याच्या हाताला जखम झाली आहे, तरी तो अजूनही सिंहासारखा लढत आहे आणि मिनिटागणिक त्याच्या भोवतालच्या हल्लेखोरांची गर्दी वाढत आहे असे नज्मुद्दीन अलीखानाला दिसून चुकले. या हल्लेखोरांपैकी एकालाही अजून तरी त्याच्या अंगावर हात टाकण्याची हिंमत झाली नव्हती. पण खान दौरानकडील एका असामीने त्याच्या उजव्या हाताच्या बोटाला जखम केली होती. नज्मुद्दीन अलीखान हत्तीवरून उतरला, आणि भावा-शेजारी उभा राहिला. त्यास संबोधून अब्दुल्लाहखान उद्गारला, "दैवाची लीला किती अगाध आहे पाहा आणि लौकिकातील वैभव लयास कसे जाते तेही पाहा" या प्रसंगाला साजेशा सअदी शीराझी याच्या शायरीच्या दोन ओळीही त्याने म्हटल्या.[८६]

अब्दुल्लाहखानाच्या हत्तीवरील हौदा रिकामा दिसतो आहे असे पाहून हैदर कुलीखानाने चौकशी केली तेव्हा त्याच्या काही शिपायांनी त्याला सांगितले की नवाब पायउतारा झाला आहे, तो बोडका दिसतो आहे आणि त्याच्या हाताला जखम झाली आहे. तत्क्षणी बरोबर एक हत्ती घेऊन हैदर कुलीखान त्याच्या समोर आला आणि अतिशय स्तुतीपर शब्दात शक्य तितक्या विनयाने म्हणाला, "त्याला आपणाविषयी सदिच्छा वाटत नाही काय ? आणि त्याचे

८५ कासिम ३७८; वारिद १६४ ब; बयान-इ-वाकिअ ४४७, खाफीखान ९३१.

८६ लढाईमध्ये सय्यिद पक्षाच्या बाजूने भाग घेतलेल्या खिजखानाने नमूद केले आहे की, अब्दुल्लाहखान गरजल्याचे लक्षात येईल इतका त्याच्या जवळ तो होता. पण आरडाओरड इतकी होती की त्याचे नक्की शब्द खिजखानाला समजले नाहीत. पुढे काही वर्षांनी नज्मुद्दीन अलीखान अहमदाबादेच्या वाटेवर असताना खिजखानाची त्याच्याशी मथुरा येथे ११३८ हि. ( १७२५–२६ ) मध्ये गाठ पडली. त्यावेळीं अब्दुल्लाहखान काय बोलला होता याची माहिती खिजखानाने नज्मुद्दीन अलीखानाकडून मिळविली. खाफीखान लिहून ठेवतो की आपण सय्यिद असल्याचे प्रतिपादून आपल्या जिवास अभय मिळाले पाहिजे ( अमन ) असा दावा अब्दुल्लाहखानाने केला होता.

जीवन म्हणजे तुमचे जीवन नाही काय? बादशाहाच्या चरणी सादर होण्यापलीकडे आता दुसरा कोणता मार्ग उरला आहे?" असे बोलणारावर वार करण्यासाठी नज्मुद्दीन अलीखानाने हालचाल केली, तेव्हा अब्दुल्लाहखानाने आपल्या भावाला रोखले. नंतर दिमाख आणि मोठेपणा दाखवत त्याने नज्मुद्दीन अलीखानाचा हात आपल्या हातात घेतला आणि हैदर कुलीखानाने समोर आणलेल्या हत्तीवर तो आरूढ झाला. अब्दुल्लाहखानाच्या डोक्याभोवती गुंडाळण्यासाठी एक शाल हदर कुलीखानाने त्याच्याकडे फेकली आणि आपल्या स्वतःच्या हत्तीवरून त्याच्या मागोमाग जाऊन, त्याने बादशाह मुहम्मदशाहकडे या कैद्याला नेले.[८७]

आपले हात हैदर कुलीखानाच्या शालीने बांधवून घेऊन अब्दुल्लाहखान मुहम्मद शाहापुढे सादर झाला. बादशाहाने त्यास नेहमीचे अभिवादन केले व तो म्हणाला, 'सय्यिद, तुझे प्रकरण या थराला जाण्यास तू स्वतःच कारणीभूत आहेस'. अब्दुल्लाहखान शरमेने चूर झाला आणि उत्तरला, 'परमेश्वराची इच्छाच तशी आहे'. मुहम्मद अमीनखानाला संयम काही राहिला नाही. आनंदाने बेहोश होऊन त्याने भुईवर उडी मारली; आणि तो उद्गारला, 'या निमकहरामाला माझ्यासारख्या जुन्यापुराण्या चाकराच्या हवाली करा'. पण अब्दुल्लाह-खानाचा काय असेल तो मान राखला जावा या हेतूने खान दौरान मधे पडला. तो म्हणाला, "नाही, मुळीच नाही. सय्यिदाला मुहम्मद अमीनखानाच्या हवाली करू नका; कारण तो त्याला अगदी क्षुद्रपणे, तात्काळ ठार करून टाकील. असले कृत्य घडू देणे योग्य ठरणार नाही. जुल्फिकारखानाचा खून करून फर्रुखसियरने काय साधले? त्याला हैदर कुलीखानाकडेच राहू द्या किंवा खुद्द बादशाहाच्या चाकरांच्याच हवाली करा". तद्नुसार कैद्याला हैदर कुली-खानाच्या हवाली केले. नज्मुद्दीन अलीखान यालाही त्याच्या हवाली केले. त्याच्या जखमा इतक्या जबर होत्या की त्या बऱ्या होतील असे वाटत नव्हते. हमीदखानाला देखील कैद करून, अनवाणी, बोडक्या स्थितीत त्याचे चुलत भाऊ मुहम्मद अमीनखान आणि खान दौरान यांच्यापुढे हजर केले. नव्या वजीराने त्यांना शांत केले व चांगली वागणूक मिळेल असे आश्वासन दिले. याखेरीज आणखी कित्येकजण कैद झाले. त्यांत सय्यिद अलीखान या अबुल-मुहसिन खानाच्या भावाचा तसेच अब्दुन्नबीखानाचा मुख्यत्वेकरून समावेश होता. (कासिम ३७९; कामवरखान ९३३, बयान ४४८.)

अब्दुल्लाहखान पकडला गेल्यानंतर जवळजवळ तासभर गाझीउद्दीनखान वगैरेंनी खंदकाच्या आत पाय रोवून सय्यिद पक्षाचा लढा चालू ठेवला होता. पण शेवटी पराभव झाला आहे याची खात्री पटल्यावर त्यांनी लढाई करण्याचे सोडून दिले. जे काही सामान-सुमान उरले होते त्यासह गाझीउद्दीनखान रणांगणाबाहेर गेला. अल्लाहयारखान वगैरे कित्येकांसह तो थेट दिल्लीला गेला. यमुना ओलांडून आपल्या घराची वाट धरण्याची खटपट बाऱ्हा सय्यिदांनी केली. सैफुद्दीन अलीखानाने शाहझादा इब्राहीमला रणांगणाबाहेर काढले होते. पण त्याच्या वाहनाची कसलीच सोय न करता आल्याने त्याला नेकपूर गावाजवळच्या कुतबुद्दीनखानाच्या राईत ठेवणे सैफुद्दीन अलीखानाला भाग पडले. सैफुद्दीन अलीखान जनसथला आपल्या घरी गेला. तेथून त्याने बकिर अलीखान आणि खिज्रखान यांना

८७ सिवानिह-इ-खिज्री ९२, ९३; शिवदास ६१ अ; खुशहाल १०१८ ब; खाफीखान ९३३; बयान-इ-वाकिअ ४४६. आपला आश्रयदाता शेर अफगनखान याने नज्मुद्दीन अलीखानाला पकडले असा खुशहालचंदाचा दावा आहे. त्या वेळी सदर लेखकाचा चुलता खेमकरण अगदी जवळ उभा होता असे खुशहाल खात्रीपूर्वक सांगतो.

आणवण्याची व्यवस्था केली. बादशाह दिल्लीला पोहोचण्यापूर्वी हे निरोपे तेथे पोहोचले व त्यांनी सय्यिदांची बायकामुले त्यांच्या मुलुखाला नेली.

१४ मोहरम ११३३ हि. (१४ नोव्हेंबर १७२०) रोजी संध्याकाळी जरा उशिरा दिल्लीला बातमी येऊन थडकली की, अब्दुल्लाहखानाचा पराभव झाला असून त्याला पकडले आहे. त्याला पुष्कळ बायका आणि स्त्रिया होत्या. ही सर्व मंडळी दिङमूढ झाली. लग्गा साधण्याची वेळ हीच आहे असे समजून तेथील कित्येक रखेल्यांनी आपल्या भरजरी पोषाखावर जुनेपुराणे बुरखे चढविले व हाती लागेल ते बरोबर घेऊन त्यांनी पोबारा केला. अब्दुल्लाह-खान काशी याच्याकडे घराच्या रखवालदारीची जोखीम होती. पण कर्तव्य बजावण्याचा कसलाही प्रयत्न त्याच्या हातून झाला नाही. या सगळ्या गडबडीत नज्मुद्दीन अलीखानाच्या १० वर्षाच्या मुलीने सय्यिदांच्या कुटुंबाशी संबंध असलेल्या गायकाच्या घरात आसरा घेतला. बादशाहाच्या अनुयायांनी हुडकून काढून तिला धरले. या मुलीला बादशाहाची आई नवाब कुदसिया हिच्या हवाली केले. तिने त्या मुलीचे मुहम्मदशाहाशी लग्न लावण्याचा बेत केला. तेव्हा अब्दुल्लाहखानाने हैदर कुलीखानाकडे तक्रार केली. बाही सय्यिदाच्या बाबतीत असे कधी घडले नाही असे तो म्हणाला. तेव्हा हैदर कुलीखानाने बरीच मनधरणी करून त्या मुलीचा कबजा मिळवला व तिला नज्मुद्दीन अलीखानाच्या घरी पाठविले.

आता आपण रणांगणाकडे परतू या. रिवाजानुसार मुघल फौजांनी लुटालुटीला आरंभ केला. हाती लागतील त्या त्या वस्तू, घोडे, ऊंट, खेचरे, जनावरे वगैरे आपल्या कब्जात घेतली. चूडामण जाटाने हेच केले; युद्धातील दोन्ही पक्षांची त्याने अगदी निःपक्षपातीपणे लूट केली. या सर्व लुटीसह तो आपल्या मुलुखास पसार झाला. त्याने जमविलेल्या लूटीत सामान ओढणारे १००० बैल आणि ऊंट होते. ही जनावरे नदीजवळच्या उंचवटयावरील वाळूत निष्काळजीपणामुळे राहून गेली होती. शिवाय दान करण्यासाठी बाजूस काढून ठेवलेला कित्येक उंट भरतील एवढा माल आणि दानधर्म खात्याचे सगळे दफ्तर या लूटीत त्याच्या हाती लागले. (कासिम ३८१, शिवदास ६१अ, खाफीखान ९३०.)

## २२ : शाहझादा इब्राहीमला पकडतात

सैफुद्दीन अलीखानाने शाहझादा इब्राहीमला रणांगणाबाहेर काढले. त्याला सुरक्षित स्थळी हलविणे अशक्य असल्याचे आढळून आल्यावर त्याने शाहझाद्याला रणांगणापासून थोडया मैलावरील, पलवल[८८] परगण्यातील नेकपूर खेडयातील सय्यिदांच्या हवाली केले. त्या खेडूतांना त्याचे रक्षण करणे अशक्य झाले. त्याला आसरा देण्याचे त्यांनी नाकारले. त्याच्याबरोबर अमीरखान वगैरे लोक होते. या अमीरखानाच्या घराण्याने बादशाहाची पिढयान्पिढया चाकरी बजावलेली होती. या थोडयाशाच सोबत्यानिशी शाहझादा इब्राहीम वस्तीपासून फार दूर नसलेल्या कुत्बुद्दीन अलीखानाच्या आमराईत जाऊन बसला. येथून दुसरीकडे जाण्याचा बेत केल्यास आपण तुम्हाला सोडणार नाही असे शाहझाद्याच्या लोकांनी

८८ कदाचित हे बेगपूर असावे. सदर बेगपूर बिलोचपूरच्या उत्तरेला १५ मैलांवर, यमुना नदीजवळ पलवल परगण्यात आहे.

त्याला सुचवून पाहिले. शाहझादा उत्तरला की, ही लढाई म्हणजे माझ्या नशिबाची शेवटची परीक्षा; जर बादशाही मला मिळणार असे माझ्या नशिबातच असते तर दुसऱ्या कुठल्याही मार्गाने तो ललाटलेख खराच ठरला असता; आता मला जावयाचे कुठले ठिकाण उरलेले नाही. एवढे होईपर्यंत शाहझाद्यांनी आसरा कोठे घेतला आहे त्याचा तपास बादशाह पक्षाला लागला होता. हैदर कुलीखान, जफरखान आणि कमरुद्दीनखान हे त्याला पकडण्यासाठी आले.[८९]

या मंडळींनी मुजरा केला तेव्हा तो जागचा उठला आणि त्यांच्याबरोबर निघाला. त्या रात्री तो मुहम्मदशाहापुढे सादर झाला तेव्हा मुहम्मदशाहाने त्याला आलिंगन दिले आणि आपल्यासमोर बसवून घेतले. बसवता बसवता "कमा काय आलास ? " असे विचारले. शाहझादा उत्तरला, "तू जसा आलास तसाच आलो." बादशाह म्हणाला, "तुला कोणी आणले ? " तो उत्तरला, "ज्या माणसांनी तुला आणले त्याच माणसांनी मला आणले." आपणा दोघांनाही अब्दुल्लाहखान या एकाच माणसाने तख्तावर बसविले या गोष्टीचा संदर्भ नजरेस आणण्याचा हेतू या उत्तरात होता, यात शंका नाही. इब्राहीमच्या निर्वाहासाठी दररोज ४० रुपयांचा भत्ता ठरवून दिला आणि शाहाजहानाबादेतील शहररक्षक किल्ल्याच्या तुरुंगात त्याची रवानगी झाली. ८ मोहरम ११५९ हि. ( ३० जानेवारी १७४६ ) रोजी तो मरण पावला. खुशहालचंदाने उद्धृत केलेल्या पद्यपंक्ती-प्रमाणे त्याची सत्ता अगदीच अल्पजीवी ठरली; "जणू काही गवताच्या पात्यावर क्षणभर चकाकणारा दवबिंदूच"[९०]

## २३ : अब्दुल्लाहखानाचा शेवट

मुहम्मदशाहाने आपला अनुयायी निजामुल्मुल्क याला आपणास विजय मिळाल्याचे पुढील शब्दात कळविले, "हुसैन अलीखानाच्या मृत्यूनंतर आम्ही राजधानीकडे कूच केले. कारण अब्दुल्लाहखानाने शाहझादा इब्राहीमला तख्तावर बसवले असून तो प्रतिकार करण्याच्या तयारीत आहे असे त्या वेळी समजले होते. आम्ही केलेल्या कानउघाडणीला त्याने भीक घातली नाही. आमच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षी मोहरमच्या १२ तारखेला आम्ही दिल्लीपासून वीस कोसांवर आमचे तंबू ठोकले. दुसऱ्याच दिवशी लढाई झडली व ती सकाळपासून रात्रीपर्यंत चालली. लढाईच्या दुसऱ्या दिवशी शाही फौजांनी बंडखोरांवर हल्ला चढविला. अब्दुल्लाहखानाला पकडले आणि रणांगण सोडून पळून गेलेल्या इब्राहीमला पकडून आणून कैद केले." ( मज्मूअ-उल्-इन्शा ८६ ).

वजीराची मालमत्ता, त्याचे नातेवाईक आणि त्याचे आश्रित यांच्या मालमत्तेसह जप्त करण्यासाठी इनायतुल्लाहखानाला बयुतात ( जप्त मालमत्ता ) विभागाच्या अधिकाऱ्यांसह

८९ बयान-इ-वाकिअ पृ. ४४८ मधील हकीकतीत हैदरकुलीखानाचे नाव वगळून सआदतखानाचे नाव घातलेले आढळते. असे सांगतात की दिवस उगवला तेव्हा इब्राहीम नेकपूरच्या एका फकीराच्या तकियापाशी येऊन पोहोचला. त्याने चूळ भरण्यास पाणी मागितले. त्याबद्दल बक्षिसी म्हणून सोन्याची चार नाणी त्यास दिली. तो एकांतवासी फकीर शाहझाद्यासाठी न्याहारीची तयारी करू लागला. पण ती न्याहारी घेण्यापूर्वीच त्याच्या पाठलागावरची माणसे आली व त्यांनी त्याला पकडले. खुशहाल, पान १०२० अ.

९० शिवदास पान ६१ ब; खाफीखान ९३३; रुस्तम अली २४९ अ; तारीख-इ-मुहम्मदी ( ११५९ हि. हे वर्ष ).

सगळ्या तयारीनिशी पाठविले. सय्यिद गुलाम अलीखान हा सय्यिदांचा नायब म्हणून दिल्लीच्या रक्षणास मागे ठेवला होता. हे जप्तीचे संकट आणणारा हुकूम त्याने स्वतः ऐकला. तेव्हा हाती लागेल तेवढे सोने आणि रत्ने जमवून, त्या वेळच्या उडालेल्या गोंधळातून तो सहीसलामत पार झाला. वेष पालटण्याची त्याची युक्ती सफल झाली. पराभूत वजीराचा पुतण्या आणि दत्तक मुलगा सय्यिद निजाबत अलीखान यांस पकडले त्यावेळी तो तेरा-चौदा वर्षांचा होता. त्याला चुलत्याबरोबर तुरुंगात ठेवले. (खाफीखान ९३४).

ही जप्ती पार पाडल्यावर पलायन करणाऱ्या सय्यिदांचा आणखी तपास काढला नाही. त्यांची स्वतःची गावे जप्त झाली नाहीत किंवा त्यांच्या घराची लुटालूटही झाली नाही. सय्यिद नुसरतयारखान याने केलेल्या रदबदलीमुळे हा संयम पाळला गेला. सदर सय्यिद बार्हा कैठोरा[९१] नामक खेड्याचा रहिवासी होता. याने तुराणी गटाची बाजू घेतली होती. मुहम्मद अमीनखानाला मात्र, अशी दया दाखवू नये, असे वाटत होते. त्याने आपला आमिल (व्यवस्थापक) अब्दुल लतीफ बेग याला बार्हा मुलुख उध्वस्त करण्याचा हुकूम सोडला. हा आमिल त्यावेळी बदायून आणि सम्भल या नावाच्या नव्या वजीराच्या मोकाशाच्या गावी होता व त्याजवळ पाच हजार घोडेस्वार होते. गंगा ओलांडून दुआबात जावे व सदरचे कृत्य करावे असा हुकूम त्याला होता. पण त्यातून कांही साधले नाही. सय्यिदांनी आपल्या स्थावरावर वास्तव्य करणाऱ्या गुजर आणि अन्य जमातीच्या लोकांना जमविले आणि "मुघलांचे लोभी दात पाडले." या प्रकारानंतर लवकरच तो 'थेरडा लफंगा' मुहम्मद अमीनखान मरण पावल्यामुळे सय्यिदांना तेवढ्यापुरते तरी स्वास्थ्य लाभले. ( कासिम ३८४. )

दरम्यान सय्यिद अब्दुल्लाहखान दिल्लीच्या शहररक्षक किल्ल्यात कैदी म्हणून राहिला. त्याची जबाबदारी हैदर कुलीखानाकडे होती. मुहम्मद अमीनखान मरण पावल्यावर या हैदर कुलीखानावर असलेली बादशाहाची मर्जी आणखी वाढली होती. त्यामुळे सय्यिदाचा मान ठेवला जाई. त्याला खावयास साजुक अन्न मिळे व अंगात घालावयास तलम कपडे मिळत. पण तो जिवंत असेतो मुघलांना स्वास्थ्य नव्हते. समजा, दैव अचानक फिरले तर काय घ्या, अशी त्यांना धास्ती वाटे. म्हणून मुहम्मदशाहाला अब्दुल्लाहखानाची भीती घालत राहण्याचे प्रयत्न त्यांनी कधीही थांबविले नाहीत. एकदा म्हणे, जोधपूरचा राजा अजितसिंग याने बादशाहास शरण येऊन आपली स्वामीनिष्ठा व्यक्त करण्याचे ठरविले होते, पण त्यासाठी सय्यिदाला अभय पाहिजे अशी अट घातली, असे हा मुघल गट सांगत असे. आणखी अशाच काही अफवा वेळोवेळी पसरवीत. शेवटी अब्दुल्लाहखानाला हैदर कुलीखानाच्या जबाबदारीतून काढून घेऊन बादशाहाने त्याला शाही निवासस्थानाच्या नजीकच्या जागेत ठेवले. येथेही त्याला चांगली वागणूक मिळाली. दोन वर्षे गेली; पण मुघलांनी कारस्थाने रचणे थांबविले नाहीं. शेवटी अब्दुल्लाहखानाला विष घालण्याच्या योजनेस त्यांनी बादशाहाची संमती मिळविली.[९२] सय्यिद कुत्बुलमुल्क, अब्दुल्लाहखान

---

९१ बार्हा सय्यिदांच्या छाटबनूरी शाखेने व्यापलेल्या ३२ खेडेगावांतील कैठोरा किंवा कठोरा हे एक प्रमख गाव आहे. पाहा सय्यिद रोशन अलीचे हस्तलिखित, सय्यिद-उत्-तवारिख ( रचनाकाल १८६४ इ. ).

९२ निजामुलमुल्क हा जरी मुघल असला तरी या कारस्थानामध्ये त्याचा काही भाग असेल असे वाटत नाही, पण काय सांगावे, खऱ्या गोष्टी परमेश्वर काय तो जाणतो, असे खाफीखान, ९४१ म्हणतो.

अन्नाद्वारे केलेल्या विषप्रयोगाने १ मोहरम ११३५ हि. ( ११ आक्टोबर १७२२ ) रोजी मरण पावला. त्यावेळी तो ५७ वर्षे (चान्द्र) वयाचा होता. त्याला मुले नव्हती. त्याने मृत्यूसमयी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार त्याची आवडती रखेली व गायिका केसरमाही हिच्या जुन्या दिल्लीतील पंबा दरवाजाबाहेरील तटबंद बागेनजीकच्या थडग्याजवळ त्याचे दफन करण्यात आले. ही बाग ख्वाजा निजामुद्दीन अवलिया याच्या दर्ग्याकडे जाणाऱ्या हमरस्त्यावर होती. खालशाचा दिवाण राजा बख्तमल याने सदरची बाग पूर्वी कुत्बुलमुल्काला नजर केली होती.[९३]

## २४ : दोघे सय्यिद : त्यांचा स्वभाव आणि वर्तन

सय्यिदाच्या मृत्यूनंतर, एकाचा नमकहराम असा आणि दुसऱ्याचा हरामनमक असा उल्लेख व्हावा म्हणून मुहम्मदशाहाने हुकूम सोडला. निजामुलमुल्काने या हुकुमास हरकत घेतली आणि हुकुमाची अमलबजावणी करण्यास साफ नकार दिला. (खाफीखान ९४१.)

बार्हा सय्यिद मंडळी आलमगीराला आवडत होती असे दिसत नाही. एकदा अखबारनवीसाने अहमदाबादेहून पाठविलेल्या वृत्तात लिहिले होते की, सय्यिद हसन अलीखान बहादुर ( जो पुढे अब्दुल्लाहखान झाला ), याने कोणी एक हनवंत याजवर हल्ला करण्यात आणि त्याची लुटालूट करण्यात तडफ दाखविली आणि जनाजीच्या पुतण्यास पकडले व त्याला सक्तीने मुसलमान केले. त्यावेळी जुल्फिकारखान नुस्रत जंग हा धना जाधवाच्या विरुद्ध मोहिमेवर होता. वरील पराक्रम त्याच्या कानावर गेल्यावर त्याने दरबारास सुचविले की दोघा भावांची मनसब वाढवावी; थोरल्याला ८०० ते १००० ची व धाकट्याला ७०० ते ८०० ची मनसब द्यावी. या अहवालावर आलमगीराने लिहिले, "कोणत्या कारणाकरिता मी अभिनंदन करू नये? पण ते सय्यिद आहेत; म्हणजे परमानंदाचे नुसते झरेच आहेत. एवढ्या एकाच वस्तुस्थितीवरून, आपल्या पैगंबरादि पूर्वजांच्या शुद्ध धर्मास आधार देण्यासाठी, त्यांनी आणखी धडपड करण्याची आवश्यकता आहे असे वाटते. दोघा भावांसाठी दोन मानाचे पेहराव माझ्या खासगी वस्त्रागारातून पाठवा. त्यासोबत दोन तलवारी पाठवा; त्या तलवारींच्या मुठीत हिरे जडविलेले आणि त्याच्या पट्ट्यावर मोती बसविलेले असू द्यात. जमादतुलमुल्काने ( म्हणजे वजीराने ) या भेटी पाठविताना त्यासोबत खूप स्तुती करणारे व भरघोस अभिनंदन करणारे पत्र पाठवावे."

नंतर जुल्फिकारखानाकडून आलेल्या अर्जावर तो लिहितो, "मी कशा पद्धतीने विचार करतो हे माझ्या चाकराला माहीत आहे. तुमचा प्रस्ताव अगदीच अनुचित आहे. तलवार-बहाद्दरांनी ( सैफ ) भांडणखोरांच्या पुढाऱ्यांना ( कैफ ) अद्दल घडवावी हे नित्याचे आहे. पण तावडतोब बढती द्यावी यास होकार देणे कठीण आहे. सय्यिदांचा वंश फार मातब्बर आहे. त्याच्याविषयी प्रेम दाखविणे हे धर्माने मजवर लादलेले कर्तव्य आहे; नव्हे तो

९३ जौहर-इ-समसाम, हनीफचा मुलगा मुहसिन सादिकी लिखित, ब्रि. म्यू. ओरिएंटल हस्त. क्रमांक १८९८, माझे उद्धरण ब्रि. म्यू. ॲडि. हस्त. क्रमांक ३०७८४, पृ. ७९ या ए. आर. फुलर यांच्या भाषांतरामधून घेतलेले आहे. केसर माही हे नाव अचूक आहे किंवा कसे याविषयी शंका वाटते. पण फार्सी संहितेमध्ये ते अगदी स्पष्टपणे तसे लिहिलेले आहे. रुस्तम अली, तारीख-इ-हिंदी, पान २५० अ; कासिम; कामवर पृ. २५५ आणि तारीख-इ-मुहम्मदी ( ११३५ हि. चे वर्ष ).

धर्म मी पूर्णपणे स्वीकारला आहे याचा तो पुरावा आहे; त्या घराण्याला दुखविणे म्हणजे दयाघनाचा क्रोध मजवर ओढवून घेण्यासारखे आहे. पण अशी कोणतीही कृती करावयाची नसते की ज्यायोगे इहलोकी दुष्कृत्य घडेल आणि परलोकीही अवकृपा होईल. बाऱ्हा सय्यिदांवर अनावश्यक कृपा दाखविली तर इहलोकी आणि परलोकी अशा दोन्हीकडे महासंकट ठरेल. कारण त्यांना बढती दिली अथवा त्यांचा सन्मान केला तर ते म्हणतात, "आता मीच आणि दुसरा कोणी नाही;" आणि कर्तव्य बजावण्यास चुकत राहातात. ते फार वर बघत राहातात आणि उगीच कटकटी निर्माण करतात. या वृत्तीकडे जर दुर्लक्ष केले तर इहलोकातील व्यवहार चालविताच यावयाचे नाहीत; पण या कृतीबद्दल जर त्यांना शिक्षा करावी लागली तर परलोकात जाब विचारला जाईल."[९४]

सय्यिदांकडून झालेल्या विरोधाची झळ सोसूनदेखील निजामुल्मुल्काने अब्दुल्लाहखान सत्ताभ्रष्ट झाल्यावर त्याच्या जिवाचे रक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला असे म्हणतात. ही वस्तुस्थिती सांगणाऱ्या खाफीखानाला असे वाटते की, या दोघा भावांना श्रद्धांजली अर्पण करताना दोघांचे चांगले गुण तेवढे सांगावेत; कारण त्यांच्या वाईट गोष्टी पूर्वी सांगून झाल्याच आहेत; फर्रुखसियरचा झालेला अवमान तसेच महसूल गोळा करताना चालणारी लाचलुचपत व होणारा छळ या गोष्टी वजीराचा मुख्य अधिकारी रतनचंद याच्याच दुष्टपणामुळे होत असे, असे तो मानतो. दख्खनला जाण्याची वेळ येईतो, गैरप्रकारे पैसा घेण्याबाबत हुसैन अलीखान वेळोवेळी अगदी तिटकारा व्यक्त करताना आढळे. पुढे मुहक्कमसिंग खत्री वगैरेंनी त्याला विकृत बनविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण दोघे भाऊ गरीबांविषयी खरोखरचा कळवळा बाळगून होते; छळ करण्याची त्यांची वृत्ती नव्हती. शहरवासियांना शांतता आवडे व त्यांची सय्यिदाविरुद्ध कसली गाऱ्हाणी नव्हती. विद्वान आणि गरजू लोकांच्या बाबतीत सय्यिदांचा हात सढळ होता आणि होतकरू माणसाकडे ते चांगले लक्ष पुरवीत. या बाबतीत हुसैन अलीखान आपल्या थोरल्या भावापेक्षा उजवा असल्याचे उठून दिसत असे. औरंगाबाद शहरी पाण्याची टंचाई असे. धाकटया भावाने तेथे तलाव बांधण्याचे काम हाती घेतले. पुढे हा तलाव इवजखानाने वाढविला. औरंगाबादेला तो वरदान ठरला. बाऱ्हा मुलुखात त्याने एक सराई बांधली, एक पूल बांधला आणि सार्वजनिक उपयुक्ततेची कित्येक बांधकामे केली. ( खाफीखान ९४१, ९४३. )

संयम, धीर आणि अतिमानवता यांचे दर्शन अब्दुल्लाहखानाच्या वागण्यात हमखास होई. हैदर कुलीखान सुरतेला फौजदार होता. अब्दुल घफूर बोहरा या तिथल्या धनाढ्य व्यापाऱ्यांची मालमत्ता, त्याच्या नुकत्याच झालेल्या मृत्यूनंतर व त्याचा कायदेशीर वारस हयात असताना त्याने जप्त केली. याबाबत अब्दुल्लाहखानाने केलेली कारवाई अतिशय स्तुत्य होती. हैदर कुलीखानाला त्याने पदावरून दूर केले आणि ती स्थावर मालमत्ता कायद्याने मालक असणाऱ्यांच्या हवाली केली. सुरतेचा कारभार हुसैन अलीखानाच्या अख्त्यारीखाली होता. या प्रकरणाबाबत उडालेल्या विचाराच्या काहुरामुळे हुसैन अली-खानाला रात्रभर झोप आली नाही. मालमत्ता मुक्त झाल्यावर एक छदामदेखील त्यातून कोणी काढून घेतला नाही. धाकटया सय्यिदाच्या माहुताने बाजारातील लोकांवर एकदा

९४ अहकाम-इ-आलमगीरी, इर्विन, हस्त. क्र. २५२, पान २३ ब.

आळ आणला. त्यावेळी सय्यिदाने बाजारातील लोकांची खरी बाजू उचलून धरली. त्याबद्दल त्याचे कौतुक झाले. ( खाफीखान ९४३. )

फर्रुखसियरच्या दरबारात ईस्ट इंडिया कंपनीची वकिलात होती. या वकिलातीच्या प्रकरणी वजीराचे जे वर्तन घडले ते प्रशंसनीय होते. एका आर्मेनियन सहकाऱ्याच्या चुकीच्या सल्ल्यामुळे जॉन सरमन याने, वजीरामार्फत वाटाघाटी करण्याऐवजी, द्वितीय बक्षी खान दौरान याच्यामार्फत वाटाघाटी केल्या. यात खान दौराननें करून घेता येईल तेवढा स्वतःचा फायदा करून घेतला आणि तब्बल दोन वर्षे विलंब लावून अखेर करतो असे म्हणालेल्या सगळ्याच गोष्टी नाकबूल केल्या. तेव्हा अब्दुल्लाहखानाकडे अर्ज करण्याखेरीज सरमन वगैरेंना गत्यंतर उरले नाही. वागण्याच्या पावित्र्य पद्धती लक्षात घेता, या रेंगाळलेल्या कामाबाबतचा अर्ज म्हणजे पूर्वी आपल्याकडे झालेल्या दुर्लक्षाबाबत वचपा काढण्याची नामी संधी होती. तो इंग्रज माणूस या कामानिमित्त अब्दुल्लाहखानाकडे गेला तेव्हा अब्दुल्लाहखान त्याजशी भलेपणाने बोलला; त्यास त्याने मदत केली आणि आश्चर्य हे की, त्याने त्याचे काम झटपट केले. काही आठवड्यातच अपेक्षितच फर्मान देण्याइतपत प्रकरण सिद्ध झाले. आश्चर्याचा आणखी एक फटका म्हणजे वजीराने कसलाही नजराणा स्वीकारला नाही. म्हणून सरमन त्याला 'भला वजीर' का म्हणतो याचे नवल वाटावयास नको.

अब्दुल्लाहखान मुसलमानी धर्मातील नियम पाळण्याबाबत फार दक्ष नव्हता हे सरमनच्या रोजनिशीवरून दिसते. 'वजीर पितो असे समजल्यावरून' या वकिलाने त्याला शीराझचे मद्य आणि ब्रँडी यांची झकास भेट पाठविली. पण तो आपला अपमान समजून अथवा भेटीबद्दल उबग येऊन वजीराने भेट परत पाठविली असा उल्लेख कोठे आढळत नाही.

सरमनच्या रोजनिशीत अब्दुल्लाहखानाच्या दयाळूपणाविषयी एक नोंद आहे. या वकिलाचे दरबारास अखेरचे जाणे झाले त्या दिवशी फर्रुखसियरने विल्यिम हॅमिल्टन याला जाऊ देण्यास नकार दिला. फर्रुखसियर आजारी असता या शल्यवैद्याने त्याच्यावर उपचार केले होते. त्याला जाण्याची अनुमती न मिळाल्याने निर्माण झालेल्या आणीबाणीत ही मंडळी अब्दुल्लाहखानाकडे मदतीकरिता धावली आणि याबाबत जेवढे करता येईल तेवढे सर्व काही करण्याची तयारी भल्या वजीराने अगदी सहजगत्या दाखविली. अब्दुल्लाहखानाने एक अगदी करुणरम्य पत्र खाविंदांना पाठविले. चांगला इष्ट परिणाम व्हावा म्हणून सदरच्या पत्रात त्या शल्यवैद्याची निव्वळ कल्पनासृष्टीतील स्कॉटलंडमधील पत्नी आणि मुले यांची ( त्यांच्या उत्कंठेची ) पेरणी करण्यात आली. हिंदुस्थानला लगोलग परत येईन असे वचन हॅमिल्टनने दिल्यावर फर्रुखसियरने मोठ्या कष्टाने त्यास जाऊ दिले.[९५]

अगदी आजपर्यंतदेखील आचाराच्या बाबतीत बाऱ्हा सय्यिद जवळजवळ हिंदुस्थानी वाटतात. त्यामुळे अब्दुल्लाहखान वसंतोत्सव आणि होळी हे हिंदूंचे सण त्यांत भाग घेऊन साजरे करी, या एका तत्कालीन इतिहासकाराकडून मिळणाऱ्या माहितीबाबत आश्चर्य वाटावयास नको. शकुन–अपशकुनावर त्याचा विश्वास होता असे दिसते. आनंदराम मुखलिस याला असे दिसून आले की, अब्दुल्लाहखान जनतेला भेटण्यासाठी उपलब्ध होई तेव्हा

९५ सी. आर्. विल्सन याचे अर्ली ॲनाल्स, खंड दुसरा, भाग दुसरा, 'दि सरमन डायरी', पृ. ७४, १३१, १३३, १४२, १४३, २००, २०२, २०३, २०५.

तेव्हा हातात धूपारती घेतलेली, मजमरागर्दन असे संबोधली जाणारी, दोन माणसे त्याच्या मसनदीच्या तोंडाशी ब्राह्मी वनस्पतीच्या बियांचा धूर काढणारी चांदीची धूपपात्रे फिरवीत. दुष्टाची दृष्ट लागू नये म्हणून हे होई. आपली ही सगळी हकीकत नजरेखालून घालताना आपणाला असे दिसून आले आहे की तो हाडाचा शिपाई होता तसा तो हाडाचा कारभारी नव्हता; तो विषयासक्तही होता आणि धामधुमीचे दिवस नसले की तो सुस्त आणि बेपर्वा बने. त्याने आपली बहुतेक सगळी कामे व्यवहारकुशल रतनचंद या हिंदू माणसाकडे सोपवून टाकली होती.[९६]

दिल्लीच्या पटपटगंज नामक भागात वजीराने एक कालवा खोदला हे त्याचे परोपकारी कृत्य म्हटले पाहिजे. या कामास ११२७ हि. (१७१५ इ.) मध्ये आरंभ झाला. त्या अगोदर त्या भागात एक मोठी आग लागली होती. हे काम फर्रुखसियरच्या अमदानीच्या ५ व्या वर्षी (१७१६) इ. पूर्ण झाले. याबाबत सय्यिद अब्दुल्-जलील बिलग्रामी लिहितो :

बहर-इ-जूद व फैज, कुत्बुलमुल्क अब्दुल्लाहखान,
नहर-इ-खैरी कर्द जारी आं वजीर-इ-मुहतशम;
बहर-इ-आं अब्दुल्-जलील वसीती तारीख कर्द :
" नहर-इ-कुत्बुलमुल्क मद्द-इ-बहर-इ-आशान व-करम. "
( ११२७ हि. )

हाच पंडितकवी अब्दुल्लाहखानाचे गोडवे गाताना म्हणतो, —

अरिस्तू-फित्नत, के आसफ-निशान अस्त,
यमीनुद्दौलह, अब्दुल्लाहखान अस्त;
बदीवान चूं नशीनद नव बहार अस्त,
बमैदान चूं दर आयद जुल्फिकार अस्त.[९७]

अमीरुल् उमरा हुसैन अलीखान याचा स्वभाव आपल्या थोरल्या भावापेक्षा खूपच वेगळा होता. तो कामे झटपट करी. वाढवून सांगणे, मगरूरीने बोलणे असा त्याचा खाक्या होता. या त्याच्या सवयीच होत्या असे दाखविणारे कितीतरी दाखले दप्तरी नमूद आहेत. उदाहरणार्थ, त्याच्या लव्याजम्यात भाडोत्री भाट असत; ते आपल्या धन्याच्या स्तुतीची हिंदी गाणी गात; हा प्रकार बादशाहाच्या समोरदेखील चाले; त्यातील दोन ओळींचे फार्सी भाषांतर आजवर चालत आले आहे त्याचा आशय असा—

तमाम जग आणि सगळे जीव तुझ्या छत्राखाली आश्रय घेतात. तुझ्या पाठिंब्याने जगाचे राजे मुकुट मिळविते होतात.[९८]

---

९६ कामवरखान, ३ रबिलाखर ११३२ हि. या दिवसाची नोंद; आनंदराम मुखलिस, मिरातुल इस्तिलह पान २४८ अ. हर्कलॉट्स्, कानून-इ-इस्लाम, शब्दार्थसंग्रह पृ. चौऱ्याऐंशी, सांगतो की बिया वापरत त्या मेंदीच्या, मोहरीत मिसळलेल्या असत.

९७ मा. उ., खंड तीन, १४०; खुशहाल ब्रि. म्यू. क्र. ३२८८, पान ४०७ अ.

९८ अहवालुल्-खवाकीन, पान १७६ अ, मुळात त्या ओळी पुढीलप्रमाणे आहेत :
पनाह-इ-छत्र बगिरन्द जुम्लह-इ-आलम-व-खल्क
कुलहदार-इ-जहान रा कुलह अझ मुक्दम-इ-जू

दुर्दैवी ठरलेला दख्खनचा प्रवास चालू असता, एकदा आपल्या स्वतःच्या मोठेपणाची नशा चढून, त्या भरात त्याने बढाई मारली की, ज्या कोणाच्या डोक्यावर मी माझ्या चढावाची सावली पाडेन तो माणूस आलमगीराच्या तोडीचा होईल. हे ऐकणे तेथे बसलेल्या अनेकांना अपमानास्पद वाटले.[९९]

शुभाशुभावर आणि ज्योतिषांतील भाकितावर त्याचा विश्वास नव्हता. पण नशीब फुटण्याच्या बेतात असल्याची पूर्वकल्पना देणाऱ्या गोष्टींमुळे त्याची चालमेल झाल्यासारखी दिसते. हकीम नवकीखान शीराझी वारिदला सांगतो की, आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काही आठवड्यांत तो पुढील पद्यपंक्तींची फार वाखाणणी करी आणि तीत नवनवे अर्थ शोधत राही.

> हम चू मन बकसी शहीदी हेच काफिराना बूद
> सुबह-इ-महशर खुद दमीद, व खून-इ-मन
> ख्वाबी दह अस्त.[१००]

सय्यिद बंधूंचा अवतार संपल्यानंतर इतिहास-कथनातील नाट्य शेवटाला पोहोचल्यासारखे वाटते. म्हणून उत्तरकालीन मुघलांच्या इतिहासाबाबत माझे काम मी या टप्प्यावरच आटोपते घेतो. माझी उर्वरित ताकद, माझी मूळ इच्छा तडीस नेण्याच्या दृष्टीने पुरेशी नाही हे स्पष्ट दिसत आहे. भलत्याच मोठ्या आवाक्यानिशी मी लिहावयास बसलो. पण झाले त्यापेक्षा अधिक काही माझ्या हातून यापुढे होण्याची शक्यता जवळजवळ नाही. बहादुरशाहाची कारकीर्द ( १७०७–१७१२ ) हा मजकूर छापण्यासाठी पक्का करावयाचा आहे. १७२१ ते ( एप्रिल ) १७३८ पर्यंतच्या कालखंडाचा पहिला मसुदा लिहून तयार आहे. १७३९ सालचा इतिहास लिहिण्यास घेण्याचा माझा विचार आहे. या इतिहासात नादिरशाहाच्या स्वारीच्या हकीकतीचाही अंतर्भाव आहे. नादिरशाहाच्या प्रयाणानंतरच्या काळाची हकीकत लिहिणे मला जमेल की नाही ते पाहावयाचे तेवढे बाकी उरले आहे. पण १७५९-६० पर्यंतच्या वीस वर्षांच्या कालखंडावर माझे वाचनही पुष्कळ झाले आहे, काही भाषांतरे झाली आहेत व टिपणेही काढून तयार आहेत. १७५९–१८०३ या काळाचे प्राथमिक काम अजून सुरूही केलेले नाही. तरी पण, माझा प्रकाशित अभ्यास संकल्पित अभ्यासभूमीचा अल्पसा भागच अवगुंठित करीत असला तरी थोडाफार उपयुक्त ठरेल; रखरखीत आणि त्रासदायक आहे असे कित्येकांना सामान्यपणे वाटणारे, बरेचसे काबाडकष्टाचे काम माझ्या एखाद्या अधिक नशीबवान उत्तराधिकाऱ्याला पुन्हा उपसावे लागणार नाही. ऑक्सफर्डचा एक इतिहासकार मार्मिक शब्दात लिहितो त्याप्रमाणे, 'एखादा भावी गिबन कदाचित ऋणनिर्देशाचा एखादा शब्द तळटीपेत माझ्याकडे भिरकावील' ( २० आक्टोबर १९०७. )

---

९९ यह्याखान, तज्किरातुल्-मुल्क, पान १२५ अ.

१०० ( L'envol )

प्रकरण सातवे

# मुहम्मदशाहाची कारकिर्द, १७२०-१७२५.

## २५ : मुहम्मदशाह दिल्लीला परतल्यावर झालेल्या नव्या नेमणुका

१६ नोव्हेंबर १७२० रोजी मुहम्मदशाह बिलोचपूर येथून निघाला आणि त्याने रहीमपूर येथे मुक्काम केला. तेथून सतरा तारखेला तो छैन्सा येथे, १८ तारखेला तलपत येथे आणि १९ तारखेला तालाब किश्नदास येथे पोहोचला. २० तारखेला त्याने कुत्बला भेट दिली आणि नासिरुद्दीन अवधी याच्या दर्ग्यास तो जाऊन आला. ती रात्र त्याने मोठ की मस्जिद या ठिकाणापासून जवळच ठोकलेल्या तंबूत घालविली. २१ तारखेला निजामुद्दीन अव्लिया याच्या दर्ग्यात त्याने नमाज पढला. दुसऱ्या दिवशी म्हणजे २२ तारखेला त्याने राजधानीत रीतसर प्रवेश केला तो अजमेरी दरवाजाने. २४ तारखेला सवाई जयसिंग आंबेरहून येऊ लागला असल्याचे समजले. त्याला भेटण्यासाठी आणि त्याला सामोरे जाण्यासाठी वजीराला पाठविले. ( कामवर २४२, खाफीखान ९३४. )

नोव्हेंबरच्या २५ तारखेला दीवान-इ-खास मध्ये मोठा दरबार भरला. त्यात वजीराने सवाई जयसिंगाला बादशाहासमोर सादर केले. जयसिंगाने आपला नजराणा बादशाहास अर्पण केला आणि त्याला बादशाहाने नेहमीप्रमाणे भेटी दिल्या. वजीरपदाबरोबर स्वाभाविकतःच मिळणारी पदे म्हणून इतिमादुद्दौल्ह याला मुलतानाचा कारभार आणि मुरादबादेची फौजदारी मिळाली. दरबाराला मानकरी रोज येत राहिले. २६ तारखेला लाहोरहून अब्दुस्समदखान, आपला मुलगा जिकरियाखान यासह आला. जफरखान नासिरी याने बंगालमधून आपला नजराणा तसेच धन्यवाद, दरबारातील त्याच्या वकिलामार्फत पाठविले. गाझीउद्दीनखान याने चाकरीतून अंग काढून घेऊन आयुष्य खासगीत घालविण्यास आरंभ केला होता. त्याला हैदर कुलीखानाकरवी बोलावणे आले. सय्यिद हुसैन अलीखानाच्या खुनीचा भाऊ शापूरखान याला ४,००० ची ( २,००० घोडे ) वरची मनसब आणि इतर भेटी मिळाल्या. बढती मिळालेल्या अगर किताब मिळालेल्या इतर मनसबदारांमध्ये लुतफुल्लाहखान पानिपती ( हा आपल्या घरी अज्ञात अवस्थेत राहात होता व नुकताच दरबारात हजर झाला होता ) हैदरकुलीखान, जफरखान आणि नुस्रतयारखान बार्हा यांचा अंतर्भाव होता. ( कामवर २४४, खाफीखान ९३५. )

सुभेदार मंडळींमध्ये फारसा बदल करण्यात आला नाही. मुख्य सुभेदार पुढीलप्रमाणे होते. मुइज्जुद्दौल्ह, हैदर कुलीखान, नासिरजंग यास अहमदाबाद, अब्दुस्समदखानाचा मुलगा जिकरिया याला काश्मीर, अब्दुल्लाहखानाचा पक्ष सोडल्याबद्दल बक्षिस म्हणून मुहम्मदखान बंगशला अलाहाबाद आणि बयानाचा फौजदार सआदतखान–हा सय्यिद हुसैन अलीखानाच्या खुनाच्या कटात सामील होता–याला आग्र्याचा कारभार याप्रमाणे नेमणुकी झाल्या. ( तत्रैव )

**जझिया कर रद्द होतो**

जझिय्या कर म्हणजे एक जुलूम आहे असे हिंदूना नेहमीच वाटत आले होते. शिवाय, सार्वजनिक सुव्यवस्था अजून निर्माण झाली नसल्यामुळे धान्याचे भाव कडाडले होते. ही संधी चांगली आहे असे पाहून हिंदू व्यापाऱ्यांनी या कराविरुद्ध आपला निषेध नोंदविण्याचे ठरविले. सर्वांनी मिळून आपापली दुकाने बंद ठेवली तेव्हा सवाई जयसिंगाने हे प्रकरण स्वतःच्या हाती घेतले व हिंदूंची, या कराबाबतची भूमिका बादशाहापुढे मांडली. हिंदू लोक या देशाचे प्राचीन काळापासूनचे रहिवासी आहेत; खाविंद हे हिंदुस्थानचे बादशाह आहेत; दोन्ही धर्माचे लोक बादशाहाशी सारखेच एकनिष्ठ आहेत; इतकेच नव्हे तर हिंदू अधिक एकनिष्ठ आहेत असेही म्हणता येण्यासारखे आहे, कारण आपल्या धर्मबंधूपासून संरक्षण मिळावे अशा आशेने ते बादशाहाकडे पाहात असतात वगैरे गोष्टी त्याने बादशाहाच्या निदर्शनास आणल्या. अब्दुल्लाहखानाचे बंड उद्भवले तेव्हा मुहम्मदशाहाचा विजय व्हावा म्हणून प्रार्थना करा असे आवाहन सवाई जयसिंगानें हिंदू जनतेला केले होते. हिंदूंच्या प्रार्थनेस फळ मिळाले असे व्हावयाचे असेल तर जझिय्या कर सर्वप्रथम रद्द करण्याची विचारणा करण्याबाबत मी स्वतःला बांधून घेतले आहे असे राजाचे म्हणणे पडले. अयोध्येचा सुभेदार राजा गिरिधर बहादुर यानेही आणखी विनवण्या केल्या. फर्रुखसियरने जहान्दार शाहावर विजय मिळविल्यानंतर आपला काका छबेलाराम याने देखील हा कर रद्द करवून घेण्याची कृपा संपादन केली होती याची आठवणही त्याने बादशहास करून दिली. या सर्व विनंत्यांना प्रतिसाद म्हणून बादशाहाने संबंध राज्यातून ४ कोटी रुपयांचा महसुलाबाबत लौकिक असलेला हा कर कायमचा रद्द केला, निजामुल्मुल्काने १७२३ मध्ये या कराचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला; पण तो आरंभावस्थेतच असफल झाला. रज्जब ११३७ हि. (मार्च-एप्रिल १७२५) मध्ये तो अगदी नाममात्ररीत्या पुन्हा बसविण्यात आला. पण त्याची अंमलबजावणी कधीच झाली नाही. या घडामोडीनंतर हिंदुस्थानातील या जुलमी कराबद्दल आपणास काही ऐकू येत नाही. [ शिवदास ६४ ब, कामवरखान ९३६, ९४८, वारिद ६, ७. ]

## २६ : मुहम्मद अमीनखानाचा मृत्यू

या सुमारास एके रात्री चबुतऱ्याच्या (म्हणजे पोलीस मुख्यालयाच्या) इमारतीच्या कठड्याला एक निशाण बांधून ठेवलेले दिसले. त्यावर फार्सी भाषेत लिहिले होते, "बादशाहाने याद राखावी आणि राजवाडा सोडावा". याबाबत नेहमीप्रमाणे बादशाहापुढे अहवाल सादर झाले. हे कृत्य करणारा सापडावा म्हणून दवंडी पिटण्याचा आदेश दिला. ढोल वाजवून संबंध शहरभर दवंडी पिटल्यावर नारंजन नावाचा आझाद पंथाचा एक मुसलमान फकीर गुन्हेगार म्हणून निष्पन्न झाला. हा माणूस फक्त लंगोटी लावून बोडका हिंडत असे. निशाण तेथे लावल्याची कबुली त्याने दिली. त्याला बादशाहासमोर हजर केले तेव्हा वजीर मुहम्मद अमीनखान तेथे हजर होता. अधिक तपासासाठी त्या फकीराला माझ्या हवाली करावे अशी वजीराने विनंती केली. फकीराला वजीराच्या घरी नेऊन तेथे त्याला अतोनात फटके मारण्यात आले. मुहम्मदशाहाला समजले तेव्हा त्याने त्या फकीरास बोलावणे पाठविले, त्याला सोन्याची चार नाणी बक्षिस दिली आणि सोडून दिले. हा प्रसंग १५ जानेवारी १७२१ रोजी घडला.

काही दिवसांनी मुहम्मद अमीनखान भयंकर आजारी पडला. त्याला एकावेळी अनेक आजार झाले. फकीराने दिलेल्या शापामुळे असे झाले असा लोकांत समज पसरला. असा समज पसरणे त्या काळीं एक ठरलेली गोष्ट असे. त्याचा आजार चार-पाच दिवस राहून शेवटी २७ जानेवारी १७२१ रोजी वजीर त्यामुळे मृत्यू पावला.[1] त्याचे दफन अजमेरी दरवाज्याबाहेर त्यानेच स्थापन केलेल्या शाळेच्या आवारात (मद्रसा) झाले. तो फक्त तीन महिने वजीरपदावर होता. येवढ्या थोड्या मुदतीत आपल्या कारभारीपणाची झलक दाखविण्यास त्याला वेळ मिळाला नाही. तरीपण आलमगीराच्या कारकिर्दीपासून उत्तम शिपाईगड्याचा लौकिक त्याने मिळविला होता. बुखारा येथून आल्या दिवसापासून छळ करणे, अन्यायाने वागणे याकडे त्याचा कल अखंडपणे होता; अल्लाचे भय त्याला वाटत नव्हते; कनिष्ठ वर्गाविषयी त्याला ममता नव्हती; थोर वंशातील सय्यिद आणि नास्तिक यांत तो फरक करीत नसे अशी माहिती वारिदकडून आपल्याला समजते. पण सय्यिदां-विरुद्ध त्याला नेत्रदीपक विजय मिळाल्या दिवसापासून म्हणजे त्याचे आकाश निरभ्र होऊन त्यास एकही शत्रू उरला नाही असे झाल्यावर-आश्चर्य म्हणजे त्याचा स्वभाव पार बदलला. तो श्रेष्ठपदी पोहोचेल असा दिवस उगवेल की काय याची धास्ती नागरिक आणि खेडूत पूर्वी घेत. पण त्याच्या पूर्वीच्या सवयी सुटल्या असून त्या सवयींच्या विरुद्ध त्याचे वर्तन आहे हे पाहाताच लोकांना त्याचे नवल वाटले. त्याने प्रत्येकाला सौजन्याने आणि दयाळूपणे वागविले. ज्या सय्यिदांना शिक्षा होणे योग्यच होते अशांनासुद्धा त्याने सोडून दिले. पण मुहम्मदशाहाच्या बाजूने विचार केला तर मंत्री बदलल्याने बादशाहाचा कसलाही लाभ झाला नाही. एक लेखक लिहितो त्याप्रमाणे 'तेच ते खाद्य पुन्हा आपल्या ताटात पडले असे त्याला वाटले.' [शिवदास ६५ ब, ६६ अ : कामवर २४७; वारिद २–४; खाफीखान ९३९; अहवाल १७८अ.]

वजीराच्या रिकाम्या झालेल्या जागेवर मृत वजीराचा मुलगा कमरुद्दीनखान याने वारसा हक्काच्या जोरावर, दावा सांगितला. पण बादशाहाच्या पसंतीस उतरून देखील (याह्या १३० ब) खान दौरानला आपली स्वतःची नेमणूक करवून घेता आली नाही; तेव्हा त्याने निजामुल्मुल्कास दक्षिणेतून पाचारावे असे सुचवून मुहम्मदशाहाचे मन त्यासाठी वळविले. कमरुद्दीन खानाचे सांत्वन म्हणून त्याला वडिलांचा इतिमादुद्दौलह हा किताब बहाल केला (३० जानेवारी १७२१ इ.). एक तात्पुरती कारवाई म्हणून इनायतुल्लाहखान काश्मीरी याला वजीराची कामे बजावण्यास सांगितले. तो खान सामानपदावर होता. ते काम सांभाळून त्याने हे जादा काम करावयाचे होते. ही नेमणूक १४ फेब्रुवारीला झाली. (वारिद ४८, कामवर २४८, शिवदास ६६३, खाफीखान ९३९, अहवाल १७८ ब, खुशहाल १३६ ब.)

१ या आजाराचा किळसवाणा तपशील सियर, भाग एक, ६८ मध्ये आहे. तो बहुतेक, सगळा खरा नसावा. तपशील देणारा लेखक शिया पंथाचा अभिमानी असून सुन्नी पंथाच्या पुढाऱ्यांविरुद्ध लिहिण्याच्या मिषाने तो आलेला आहे. मुकद्दमा-इ-शाह-आलमनामा, (ब्रि. म्यू.) ४१ ब, या ठिकाणी गुलाम अलीखान २८ रबिलाखर अशी तारीख देतो. ती चुकीची आहे, हे उघड दिसते. त्याने नमूद केल्यानुसार आजार जीवघेण्या पोटशूळाचा होता.

## २७ : नवा वजीर निजामुल्मुल्क

सय्यिद बंधूंचा निकाल लागल्यानंतर दरबारास परतण्याचा विचार निजामुल्मुल्काने एकदा केला. पण या गोष्टीस एकंदरीत विलंब करणेच अधिक बरे असे त्याला वाटले. सगळी सत्ता इतिमादुद्दौलाहच्या हाती एकवटली होती. आपला एखादा प्रतिस्पर्धी तख्ता-भोवती वावरत असणे त्याला सहन होण्यासारखे नव्हते. खरे बोलावयाचे तर सय्यिद होते त्यापेक्षाही नवा वजीर मुहम्मदशाहाला अधिक कडक वाटेल असा होता. नव्या वजीराच्या मते, सय्यिदांच्या अंतास तो एकटाच कारणीभूत होता व ते खरे आहे असे तो गृहीत धरून चालत असे. वजीर आणि निजामुल्मुल्क हे नुसतेच जवळचे नातेवाईक नव्हते तर जिव्हाळ्याचे मित्रही होते यात शंका नाही. पण सत्तेत वाटा देण्याचा प्रश्न उद्‌भवणे ही त्रासदायक गोष्ट असते; 'बापाला मुलाचा मत्सर वाटतो, तर भावाला भावाचा मत्सर वाटतो.' आपल्या पदरची प्रचंड फौज घेऊन आपण राजधानीस आलो तर उगीच संशय घेण्यास जागा राहील व त्यातून अनंत तंटे उद्‌भवतील; तेव्हा स्वकर्तृत्वाच्या जोरावर मिळविलेला मुलूख सोडून, राजधानीच्या तापदायक भोवऱ्यात उडी टाकण्याची गरज काय असा विचार निजामुल्मुल्काने केला.

दिल्लीस परतण्याऐवजी निजामुल्मुल्क दक्षिणेस कर्नाटकात म्हैसुरास निघाला. तो औरंगाबाद या आपल्या राजधानीस परतल्यानंतर, निजामुल्मुल्कास दरबारी येण्यास फर्मा-विणारा सरकारी हुकूम आला. त्याचवेळी आपल्या चुलत भावाच्या मृत्यूचीही बातमी त्याला मिळाल्यामुळे परतण्यास आता धोका उरला नव्हता. (अहवाल १८० अ, गुलशन-इ-अजाइब ६१ अ.)

जिल्हेजच्या अखेरीस (ऑक्टोबर १७२१) निजामुल्मुल्क औरंगाबादेहून निघाला इवजखान या आपल्या नातेवाईकाच्या दिमतीस वीस हजार स्वार ठेवून त्याला औरंगाबादचे काम बघण्यास सांगितले. (शिवदास ८३ अ) बुंदेलखंडातून आपला रस्ता आक्रमत असता, त्याला चंदेरीचा दुर्जनसिंग, दतियाचा राव रामचंद्र बुंदेला आणि नरवरचा छत्रसिंग हे आपापल्या फौजेसह येऊन मिळाले. तो आग्र्याला १६ जानेवारी १७२२ इ. रोजी पोहोचला. त्यावेळी सुभेदार सआदतखान याने त्याची भेट घेतली. तीन दिवसांनी तो गौघाटला गेला. २८ तारखेला राजधानीपासून काही मैलांवरील बारापुला या ठिकाणी तो पोहोचला. २० फेब्रुवारी रोजी जंगी दरबार भरला. या दरबारात त्याला वजीरपद बहाल करण्यात आले. त्यावेळी शिरस्त्यानुसार त्याला मानाचा पोषाख, हिरे, अंगठी, रत्नजडित कलमदान आणि पुष्कळ द्रव्य भेट म्हणून मिळाले. सादुल्लाहखान या नावाचा, यमुनेच्या तीरावरील महाल त्याला दिला. (खाफीखान ९३९, शिवदास ८५ अ, कामवर २५०, मा. उ. खंड तीन, ८९७; आशूब १२९ ब; अहवाल १८१ ब.)

निजामुल्मुल्क आपल्या नव्या पदावर विराजमान झाला तेव्हा त्याच्या भोवती कितीतरी अडचणी होत्या. मुहम्मदशाह कमकुवत स्वभावाचा होता. तो कोकी या नावाच्या चतुर स्त्रीच्या हातचे बाहुले होता. ती त्याची दूधबहीण आणि मुहम्मदजान या भूरमलज्ञाची मुलगी होती. तिच्या बरोबरच, राजमहालांतील एक खोजा हाफिज खिदमतगारखान

आणि तसल्याच दर्जाचे इतर कित्येक, या सर्वांच्या तंत्राने बादशाह वागत असे. साम्राज्यात समसामुद्दौलह खान दौरान हा दुसऱ्या क्रमांकाचा सत्ताधारी होता. तो करीत असलेले शत्रुत्व कसेबसे झाकून राहिले होते. अशा रीतीने, आपल्या प्रत्येक हरकतीला मोडता घालून ती निष्फळ बनविली जाऊ शकते हे वजीराला आढळून येत होते.

निजामुल्मुल्क प्रत्येक बाबतीत आलमगीराला प्रमाण मानीत असे. म्हणून आलमगिराच्या कारकिर्दीत कारभार जसा चाले तसा तो चालविण्याच्या स्थितीत पुन्हा आणणे अशी एक निजामुल्मुल्काची कल्पना होता. त्याने मोठा निर्धार दाखवून पेशकशची प्रथा नष्ट करण्याचा खटाटोप केला. पेशकश याचा अर्थ पहिल्याने आलेले फळ अर्पण करणे असा आहे. हा दरबारी चालणारा सर्वात भयानक गैरप्रकार होता. बादशाहाला द्यावयाची लाच मिळाल्याशिवाय शाही चाकरीतील पद मिळत नसे. पेशकश असे भारदस्त नाव देऊन लाचलुचपत चालू राही. सारा मिळणाऱ्या भाराभर जमिनी शाहझादे, शाहझाद्या आणि मातब्बर मनसबदार यांना तोडून देण्याच्या गैरप्रकारावर उपाय शोधण्याचा त्याने प्रयत्न केला. ज्याचा महसूल यापूर्वी कधी बहाल झाला नव्हता अशा कित्येक जमिनी दरबाऱ्यांच्या हातात गेल्या होत्या. त्यामुळे सरकारी खजिन्यास चांगलीच ओहोटी लागली होती. जे चाकर आपला पगार रोकड स्वरूपात घेत त्यांना रोख पगार देता येईल एवढा पैसा खजिन्यात कधी शिल्लक नसे. त्यामुळे पगारबाक्या वाढल्या होत्या. अपात्र माणसे उच्च पदावर नेमली जातात, तर वृद्ध आणि पात्र माणसांना जीवनावश्यक गोष्टींचीही उणीव भासते, या गोष्टी त्याने निदर्शनास आणल्या. काही वृद्ध आणि पात्र अमलदार तर, केवळ जहागिरीहून धान्य आणून शाही बाजारात ते विकणे येवढ्या कामापुरतेच उरले होते. त्याच्या तापात आणखी भर म्हणजे भाव कडाडलेले होते. एक रुपया देऊन सात शेरांपेक्षा जास्त धान्य काही विकत मिळत नव्हते. नवा वजीर दरबारी जाण्यास निघाला की गाऱ्हाणी सांगणाऱ्यांची गर्दी त्याच्या भोवती होई. त्यातला एक जण ओरडे, 'मी महालातखानाचा वंशज आहे.' दुसरा म्हणे, 'मी अली मर्दानखानाचा नातू आहे.' भाव खाली आणावेत म्हणून सामान्य लोकांची सुद्धा ओरड सुरू होई. डोक्यात राख घालून ते 'फरियाद, फरियाद' (तक्रार आहे, तक्रार आहे) असे ओरडत. अशा गर्दीतून रस्ता काढणे वजीराला कठीण जाई. या सगळ्या मुद्द्यांवर वजीराने बादशाहाला तपशीलवार अहवाल सादर केले. त्यांना बादशाहाची मान्यता मिळाली. पण ती नाममात्रच ठरली. प्रत्यक्षात निजामुल्मुल्काच्या उपाययोजनेकडे दुर्लक्षच झाले. तो पन्नास वर्षांवर उमरीचा होता. त्यामुळे विशीतला तरुण आणि तरुण सोबती भोवती घेतलेल्या बादशाहाला निजामुल्मुल्क अगदी जुनापुराणा भासे. त्याचे वागणे-दिसणे याची कुचेष्टा होई. (सियर, एक, २६६) या काळाची म्हणून सांगण्यात येणारी एक हकीकत खरी असेल तर निजामुल्मुल्काच्या चालण्याच्या ढबीस आणि पोषाखास मुहम्मदशाह भर दरबारात हसला आणि समसामुद्दौलह तर उद्गारला, 'दख्खनची माकडे नाचतात कशी पाहा. आपण आता राजधानीतील कारस्थाने सोडून अजमेर आणि अहमदाबाद या सुभ्यांतील दुरावस्थेकडे वळू. ही दुरावस्था अजितसिंग राठोड याच्या असंतुष्टतेतून उद्भवली होती. (खाफीखान ९४०; शिवदास ८५ ब; अहवाल १८१ ब; ज. ए. सो. बे., खंड सहासष्ट, भाग एक, २६ आणि ५८; नादिरशाह ६९ आणि १२९.)

## २८ : राजा अजितसिंग राठोड याचे बंड

फर्रुखसियरच्या कारकिर्दीत आणि नंतर सय्यिदांचा वरचष्मा टिकून होता तोवर राजा अजितसिंग राठोड सय्यिदांशी एकनिष्ठ राहिला. दोन वर्षांपूर्वी सय्यिदांनी त्याला अहमदाबादेचा सुभेदार म्हणून नेमले होते. आता ही नवी व्यवस्था त्याला कबूल नव्हती. शिरस्त्याप्रमाणे त्याने बादशहाला धन्यवादाचा मुजरा आणि नजराणे पाठविले नव्हते. तो अजमेर सुभ्यात घुसला. सुभा आपल्या कब्जातील आहे असे तो गृहीत धरून चालला. दोन्ही सुभ्यांत त्याने गोहत्याबंदी जारी केली. अशा परिस्थितीत त्याला तत्काळ दडपणे अगत्याचे होते. अकबराबादेचा सुभेदार सआदतखान, समसामुद्दौलह, कमरूद्दीनखान, हैदर कुलीखान यांतील प्रत्येकाला, एका पाठोपाठ एक याप्रमाणे, सुभ्याचा कारभार व अधिक फौजेची हुकूमत देऊ केली. यातल्या प्रत्येकाने कामगिरी अंगावर घेतली पण नंतर काहीतरी सबबी सांगून यामधून अंग काढून घेतले. यातल्या काहींनी तर, आपल्या वाटेने पहिल्या मजलेच्या ठिकाणी तंबूही रवाना केले होते. समसामुद्दौलह यास या मोहिमेच्या खर्चाची विशेष धास्ती वाटली. कारण संभाव्य खर्चातील काही भाग तेवढा त्याला शाही खजिन्यातून मिळणार होता. समसामुद्दौलहने अशी कल्पना लढविली की, अजितसिंगाच्या कब्जात गुजरात राहू द्यावा, पण त्यासाठी अजमेरचा कब्जा सोडण्याची अट असावी.. या गोष्टीस हैदर कुलीखानाने हरकत घेतली. तेव्हा सआदतखानाला बोलावून, ही कामगिरी त्याच्यावर सोपविली. पण तो नवखा असल्याने, आपली चाकरी पत्करण्यासाठी पुरेशा अधिकाऱ्यांना उद्युक्त करण्यात तो अयशस्वी झाला. अब्दुल्लाहखान, निजाबत अलीखान आणि इतर बाऱ्हा सय्यिद यांना माफी देऊन, त्या सर्वांना आपल्या हुकूमतीखाली न ठेवल्यास जागचा हालण्याची देखील कमरूद्दीनखानाची तयारी दिसत नव्हती. बादशहाच्या मित्रमंडळींचा सय्यिदांवर भरवसा नसल्याने, त्याची ही विनंती अमान्य झाली. शेवटी १२ आक्टोबर १७२१ रोजी हैदर कुलीखान याची अहमदाबाद सुभ्यावर आणि सय्यिद मुजफ्फर अलीखान दार्यापुरी याची अजमेर सुभ्यावर नेमणूक झाली. पैकी हा दुसरा समसामुद्दौलहचा आश्रित होता. हैदर कुलीखानाने सुभ्यावर आपला नायब धाडला. (खाफीखान ९३७, गुलाम अली ४३ अ, शिवदास ७६ ब.)

नव्या कारभारावर जातीने हजर होण्यास मुजफ्फर अलीखान तयार होता, पण त्यासाठी लागणारा सरंजाम त्यापाशी नव्हता. सहा लाख रुपये त्याला देऊ केले, पण खजिन्यात द्रव्य उपलब्ध नव्हते म्हणून, सध्या दोन लाखांवर समाधान मानणे त्याला भाग पडले. त्याने शहराबाहेर आपले ठाणे मुक्रर केले आणि भलत्याच चढ्या दराने पगार देऊ करून फौजभरती सुरू केली. वीस हजार असामींची भरती आपल्या निशाणाखाली करून तो मनोहरपूरपर्यंत[२] पोहोचतो तोच द्रव्य सगळे संपल्याचे त्याला आढळून आले. राजा सवाई जयसिंग कच्छवाह याच्या बाबतीत समस्या अशी नव्हती. तो जुलै १७२१ मध्ये दरबारी आला. आपली निष्ठा किती, तीस सीमा नाही असे तो म्हणाला. तो आंबेरच्या सगळ्या मशिदीत जातीने जाऊन आला होता; धर्मानुसरणाचे जाहीर आवाहन करून, शुक्रवारची प्रार्थना म्हणण्याचे आदेश त्याने जारी केले होते. गोहत्याबंदीला रीतसर फाटा दिला असून मुघल साम्राज्यातील एक विनीत प्रजाजन म्हणून राहाण्याचा

२ जयपूर शहरापासून उत्तरेला ३५ मैलांवर आणि अजमेरच्या ईशान्येस १३० मैलांवर.

मनोदय असल्याचे या राजाने सांगून टाकले होते. बादशाहाचे वडील जहानशाह यांनी आपणावर अजमेर आणि गुजरात यांची सुभेदारी कायमची सोपविली होती हे दर्शविणारे करारपत्र त्याने दरबारात हजर केले. त्या दस्तऐवजावर जहानशाहाच्या पंजाच्या चंदनी शिक्क्याचा ठसा उमटविलेला होता. पूर्वीच्या राजवटीत नव्या बादशाहाकरिता त्याने केलेल्या मित्रत्वदर्शक कृत्यांकडे बादशाहाचे लक्ष त्याने वेधविले. या कैफियती संबंधात समसामुद्दौलह आणि रोशनुद्दौलह हे त्यास जामीन राहिले व त्यांच्या वाटाघाटीमुळे त्याची कैफियत मंजूर झाली. ( गुलाम अली ४३ ब. )

उलटपक्षी, अजमेर रिकामे करण्याची अजितसिंगाची कसलीच इच्छा दिसेना. त्याने तर, आपला थोरला मुलगा अभयसिंग याला, येऊ घातलेल्या सुभेदाराशी प्रतिकार करण्यासाठी धाडले. तेव्हा दिल्लीहून हुकूम ( २ आक्टोबर १७२१ ) आला की, मुजफ्फर अलीखानाने मनोहरपूरपलीकडे कूच करावयाचे नाही. तेव्हा तो तेथे तीन महिने थांबला. फौजांची पगाराची मागणी वाढली आणि ती चढती राहिली. मंजूर झालेल्या सहा लाखाच्या रकमेपैकी उरलेली रक्कम मिळण्याचे चिन्ह दिसेना. द्रव्यसंकटात सापडलेल्या शिपायांनी आपली शस्त्रे, आपले कपडे, जे जे काही होते ते विकावयास काढले. त्यानंतर त्यांची उपासमार तरी होणार किंवा लूटमारीचा मार्ग तरी ते पत्करणार असे दिसत होते. लूटमारीचा मार्ग अधिक श्रेयस्कर समजून ते आसपासच्या मुलखात पांगले. वीस हजार गुरेढोरे हस्तगत करून ते परतले. नारनोळ जवळच्या काही खेड्यात त्यांनी लुटालूट केली. ( शिवदास ७७ अ, गुलाम अली ४४ अ.)

आपल्या लोकांना पगार देणे मुजफ्फर अलीखानाला अशक्य झाल्यामुळे अधिकार आणि शिस्त या दोन्ही बाबतीत त्याच्या हातातील लगाम सुटला. लुटून आणलेल्या जनावरांचे वाटप कसे व्हावे यावरून शिपायांमध्ये भांडण जुंपले; अखेरीस त्यांनी आपआपसात लठ्ठालठ्ठीही केली. रात्र पडली, कोंडवाड्यात कोंडलेल्या गुरांनी निकरावर येऊन मुसंडी मारल्याने ती सगळी सुटून गेली आणि आपापल्या गावी परतून गेली. सगळा खेळ खलास झाला आहे याची खात्री पटल्यावर सैनिकांनी, चांगल्या दैवयोगाच्या आशेने, फातिहा म्हटला आणि तेही तळ सोडून आपापल्या घरी परतले. आता आपण किती कमकुवत झालो आहो याची जाणीव मुजफ्फरखानाला झाली; राठोडांवर हल्ला करण्याचा थोडाही प्रयत्न त्याने केला नाही. थोड्या वेळाने राजा सवाई जयसिंगाचा सेनापती त्याच्या मदतीला धावून आला. त्याने त्याला कच्छवाहांची राजधानी आंबेर येथपर्यंत नेऊन सोडले. मुजफ्फर अलीखानाचे उरलेसुरले घोडेस्वार आणि पायदळ बरोबर गेले. आपल्या सर्व चीजवस्तूंचा त्याग त्याने केला, मानाची वस्त्रे आणि नेमणुकीचे पत्र परत केले व संन्यासवेश धारण करून शाही चाकरी सोडून दिली. ( तत्रैव. )

एवढे झाल्यावर मुजफ्फर अलीखानास बाजूस सारून त्या जागी सय्यिद नुस्रतयारखान बार्हा याला मुक्रर करण्यात आले. अजितसिंग अजमेर येथे होता. त्याला जाटांच्या सेनेची कुमक येऊन मिळाली होती. ही कुमक चुडामण जाटाने आपला मुलगा मुहक्कमसिंग याच्या नेतृत्वाखाली पाठविली होती. नवा सुभेदार मोहिमेत उतरण्यापूर्वी अजितसिंगाने आपला थोरला मुलगा उत्तरेकडे नारनोळ, आग्रा आणि दिल्ली सुभ्यातील ठाण्यांवर हल्ला

करण्यासाठी पाठविला. या अभयसिंगाच्या दिमतीला बारा हजार सांडणीस्वार होते. त्यांजवळ तोडच्याच्या बंदुका आणि धनुष्यबाण ही शस्त्रे होती. प्रत्येक उंटावर दोघादोघांना बसविलेले होते. १४० मैलांची जोरदार धडक मारून ते नारनोळ जवळ आले. त्या भागाचा फौजदार बायजीदखान मेवाती होता. त्याच्या वतीने तेथे असलेल्या अमलदाराने शक्य तितकी लढत दिली. पण शेवटी माघार घेतली आणि मेवात येथे आपल्या धन्याकडे तो गेला. नारनोळ येथे लुटालूट झाली. अलवार, तिजारा आणि शाहजहानपूर ही गावे उध्वस्त झाली. लुटालूट करणाऱ्या मंडळींनी उत्तरेकडे थेट सराई अल्लाहविर्दीखान या दिल्लीपासून अवघ्या १६ मैलांवर असलेल्या ठिकाणापर्यंत धडक मारली. (शिवदास ७८.)

दिल्लीला नेहमीचा गोंधळ चालू राहिला. सुरुवातीला समसामुद्दौलह याने रक्ताचा बदला रक्ताने घेण्याच्या शपथा पुष्कळदा उच्चारल्या; तेव्हा त्याला कूच करण्याचा हुकूम झाला. त्याने तंबू शहराबाहेर धाडले आणि जय्यत तयारीला आरंभ झाला. पण यापेक्षा जास्त काही त्याने केले नाही. बादशाहाला देखील त्याचा वीट आला. त्याने आपली नाराजी प्रकट केली. परिणामी समसामुद्दौलह दरबारात हजेरी लावीनासा झाला. यानंतर हैदर कुलीखानाला बोलाविले. त्याने मागण्यांची मोठी यादीच दिली. सगळे शाही तोफदळ त्याच्या दिमतीला दिले. नंतर त्याचे तंबू शहराबाहेर उभे राहिले. पण त्याने विचार बदलला आणि कूच करण्यास नकार दिला. एवढ्याच उदासीनतेने कमरुद्दीन-खानानेही याबाबतचा अर्ज बाटेस लावला. शेवटी नुस्रतयारखानाने कूच केले. पण तो अजमेरच्या दिशेने विशेष अंतर चालून गेला नसतानाच, खबर आली की राजा अजितसिंगाने शहर खाली केले असून तो आपल्या मुलुखात परतला आहे. (शिवदास ७८ ब, गुलामअली ४४ अ.)

निजामुलमुल्काने वजीरपद स्वीकारले आहे, दख्खन सोडून तो दिल्लीनजीक आला आहे अशी बातमी राठोडांना समजल्यामुळे त्यांनी माघार घेतली असे दिसते. पूर्वी आपण पाहिलेच आहे की निजामुलमुल्क आपल्या वजीर पदावर २० फेब्रुवारी १७२२ रोजी रूजू झाला. एक महिन्यानंतर (२१ मार्च) राठोड राजाचा एक दूत म्हणून कोणी खेमसी भांडारी (वाकनीस) दरबारात आला. सांभरचा माजी फौजदार नाहरखान हा त्याला घेऊन आला होता. (शिवदास ८३अ, कामवर २५१.)

अजितसिंगाने बादशाहाकडे विनंती अर्ज गुदरून आपली कैफियत मांडली. त्याचा गोषवारा असा होता. सय्यिद हुसैन अलीखानाला मजविरुद्ध पाठविण्यात आले असता मी फर्रुखसियर बादशाहापुढे माझी कोणती कैफियत सादर केली याचा पाढा त्याने आपल्या अर्जाच्या आरंभी वाचला. पुढे तो लिहितो की, सय्यिद मंडळींचा सत्तेवरून दूर होण्याचा काळ येण्यापूर्वी मला अहमदाबाद आणि अजमेर यांचा सुभेदार नेमले होते; साम्राज्याच्या हिताचा विचार करता या कारभाराची जोखीम दुसऱ्या कोणी तरी पत्करणे आवश्यक होते; इस्लामी धर्माचा कायदा आणि इस्लामी धर्माचा आचार यांचे मला वावडे नव्हते; नंतर जेव्हा शाही निशाणाला विजयश्रीने माळ घातली, तेव्हा मला काढून टाकून अहमदाबाद सुभा हैदर कुलीखानाकडे दिला; याबाबत मी काहीसुद्धा केले नाही; फक्त सुभ्याचा कारभार

सोडला. अजमेरच्या बाबतीतही तसेच करण्याची माझी तयारी आहे; पण मुजफ्फर अलीखान कधी आलाच नाही; नंतर माझे हित न बघवणारे लोक होते ते, नारनोळ आणि इतर शहरातील माझे हल्ले म्हणजे माझ्या बेईमानीचा पुरावा आहे, असे दाखवत सुटले. हे सगळे चूक आहे; हे सर्व हल्ले मेवाती मंडळींशी असलेल्या भांडणातून उद्‌भवलेले आहेत; तेव्हा माझे प्रकरण बादशाहाने आपल्या हाती घ्यावे; खाविंदाकडून न्याय मिळेल याचा विश्वास वाटतो; अगदी केसभरही मी माझ्या योग्य मार्गावरून ढळलेलो नाही, याची मला पक्की खात्री आहे; मी दरबारी हजर होईन किंवा आपल्या मुलखात राहीन, जशी आपली इच्छा होईल असे करीन. (शिवदास ८३अ)

या रटाळ कैफियतीला उत्तर म्हणून बादशाहाने फर्मान धाडले. त्याच्या इमानदारीबद्दल त्याची संदिग्ध भाषेत प्रशंसा केली. तसेच तितक्याच संदिग्ध शब्दात दोन सुभे घेण्याचा त्याचा कसूर माफ असल्याचा उल्लेख पत्रात केल्यावर अजमेरचा कारभार पुन्हा एकदा तुमच्याकडे सोपविला आहे व अल्लाची इच्छा असल्यास अहमदाबादचा कारभारही पुन्हा आपल्या हाती देण्याचे कार्य करू असा मजकूर होता. बादशाहाकडून पत्रासोबत भेटी आल्या त्यात खास मानाची वस्त्रे, साफ्यावर लावावयाचा एक रत्नखचित अलंकार, एक घोडा आणि एक हत्ती यांचा समावेश होता. सरकारी हुकुमात शेवटी म्हटले होते–"आपल्या कृत्याबद्दल एखाद्या माणसाने केलेला विनंती–अर्ज किंवा कैफियत मान्य होईल किंवा नाही याबद्दल भीती असण्याचे कारण काय? मनातील भीती काढून टाका. देवाने निर्माण केलेल्या लोकांचे भले चिंतणारा हा मुहम्मदशाह तुमच्या कल्याणाच्या बाबतीत नेहमीच जिव्हाळा दाखवत राहील". (शिवदास ८४ब, कामवर २५५.)

अजमेर प्रकरणातील पुढचा टप्पा म्हणजे ८ डिसेंबर १७२२ रोजी नाहरखानाची त्या सुभ्याचा दिवाण म्हणून आणि त्याचबरोबर सांभरचा फौजदार म्हणून झालेली नेमणूक हा होय. दिवाण किंवा मुख्य महसूल अधिकारी या नात्याने नाहरखानाला नाजिम (म्हणजे लष्करी सुभेदार) च्या बरोबरीचा मान दिला. गढ पटिलीची[३] (मराठी कागदपत्रांतील कोट पुतळी ?–ग. ह. खरे) फौजदारी त्याचा भाऊ रुहुल्लाहखान याला बहाल झाल्याने, त्याची बाजू आणखी बळकट झाली. या सर्व मंडळींबरोबर अजितसिंगाचा मुनीम खेमसी भांडारी दिल्लीहून अजमेरला परतण्यासाठी निघाला. (कामवर २५७.)

९ फेब्रुवारी, १७२३ रोजी दरबारास खबर पोहोचली की, ६ जानेवारी रोजी नाहरखान आणि त्याचा भाऊ रुहुल्लाहखान यांना अजितसिंगाने ठार मारले. राजपूत मंडळींशी मित्रत्वाचे संबंध आहेत या समजुतीखाली त्यांनी यांच्यालगतच आपला तळ दिला होता. पहाटेच्या सुमारास त्यांच्यावर हल्ला झाला व त्यात ते दोघेही ठार झाले. फौजदाराचा पुतण्या हाफिज महमूदखान आणि फौजदाराचे इतर नातेवाईक यांना पकडले आहे. २५ असामींचा शिरच्छेद केला आणि अगदी थोड्या अवधीत सगळा तळ आणि तेथील लटांबर

३ इर्विनने सुचविले आहे की दिल्लीच्या आग्नेयीस ९४ मैलांवर असलेले पटली आणि त्याच्या ईशान्येस १ मैलावर असलेले कोट ही ठिकाणे फार्सी मजकुरात गढ पटिली या नावाने आली असावीत. बिथली टेकडी (अलीकडचे तारागढ) या ठिकाणाहून अजमेर दिसते. टेकडीवरील किल्ल्याला वेढा घालून तो किल्ला सर करण्यात आल्याची माहिती टॉडने दिली आहे. (जदुनाथ सरकार).

यांची लूट करून ते लांबवून नेले. जी काही थोडी माणसे जीव वाचवून पळाली त्यांनी आंबेरचा राजा सवाई जयसिंग याच्या मुलुखांत आश्रय घेतला. त्यांना तेथे मदत मिळाली आणि तेथून शाही मुलुखापर्यंत त्यांना सोबत देऊन घालविले. (कामवर २६०-२६१, टॉड खंड दोन ८७.)

शर्फुद्दौलह इरादतमंदखान[४] याला राजाविरुद्ध पाठवावयाच्या फौजेचा सेनापती म्हणून तडकाफडकी मुक्रर केले. त्याला ७ हजारांची (सहा हजार घोडे) मनसब बहाल करून बढती दिली. त्याच्या दिमतीस ५० हजार घोडेस्वारांची फौज देण्याविषयी बक्षींना आदेश झाला. २६ फेब्रुवारी रोजी बादशाहाने त्याला निरोप दिला. ४ दिवसानंतर आपल्या फौजेचा पगार करता यावा म्हणून त्याला शाही खजिन्यातून २ लाख रुपये दिले. १० मार्च रोजी कित्येक सरदारांना त्यास सोबत करण्यासाठी मुक्रर केले. ४ एप्रिल रोजी राजा सवाई जयसिंग, मुहम्मदखान बंगश, राजा गिरिधर बहादुर वगैरे मातब्बर सरदारांना तातडीचे निरोप पाठवून त्यांना शर्फुद्दौलह याच्या हाताखाली काम करण्यास सांगितले. ही मंडळी त्यावेळी जाट मोहिमेत गुंतली होती. (त्या प्रकरणाकडे आपण लवकरच वळू.) अजितसिंगाला इजा करण्यासाठी आवश्यक म्हणून राजा इंदरसिंग राठोड याला ५ जून १७२३ रोजी अजितसिंगाच्या नैसर्गिक मालकीचे नागोरचे इनाम बहाल केले. त्यावेळी तो वस्तुतः दक्षिणेत निजामुल्मुल्कासमवेत होता. पण त्याचा नातू मानसिंग याने अशा प्रसंगी पार पाडावयाची असतात ती नेहमीची कामे पार पाडली. (कामवर २६१-२६४, रुस्तमअली २५१ब.)

या सुमारास हैदर कुलीखान शर्मिंदा होऊन अहमदाबादेहून दिल्लीस परतण्याच्या मार्गावर होता. त्याबाबतची अधिक माहिती आपण पुढच्या विभागात घेणार आहोत. तो रेवाडी येथे पोहोचला असल्याचे ६ एप्रिल १७२३ रोजी कळले. रोशनुद्दौलह याने त्याच्या-बद्दल रदबदली केली. त्याच्या अपकृत्याबद्दल त्याला माफी देण्यात आली. जप्त मालमत्ता विभागाचा अधीक्षक (दारोगा) ख्वाजा सअदुद्दीन याला, एक सरकारी हुकूम त्याच्या हाती देऊन, हैदर कुलीखानाकडे पाठविले. या हुकुमाद्वारे त्याला अजमेर सुभ्याचा कारभार आणि सांभरची फौजदारी या नेमणुका मिळाल्या होत्या. या आज्ञा शिरोधार्य मानून हैदर कुलीखान मागे वळला आणि शाही फौजांना नारनोळ येथे जाऊन मिळाला. त्या सर्वांनी तेथून अजमेरच्या रोखाने कूच केले. (कामवर २६३.)

३० मे रोजी खबर आली की, भनहरा या गावी ठाणे घेण्यास सांगितलेला राजा अजितसिंग हा यापूर्वी लढाई न करताच शाही फौजांसमोरून गेला असून तो सांभरच्या बाजूस आहे. तदनंतर पाच दिवसांनी (४ जून) एक वार्ता आली की, हैदर कुलीखान आणि इतर सरदार आणि राजे सांभरमध्ये घुसले असून राजा अजितसिंगाने परिवारासह अजमेर सोडून दिले आहे; तो जोधपूरच्या रोखाने गेला आहे. गढ पटिली (कोट पुतळी) येथे त्याने मागे ठेवलेली शिबंदी, ते ठिकाण लढविण्याची तयारी करीत आहे. नवा शाही सुभेदार ८ जून १७२३ रोजी अजमेरात येऊन दाखल झाला. त्याने सांभर येथे आगा कासिम यास

४ ख्वाजा अब्दुल्लाह उर्फ शर्फुद्दौलह इरादतमंदखान सादिक तहव्वुर जंगबहादूर हा ३ जिल्काद ११४३ हि. (९ मे १७३१) रोजी वयाच्या ७० हून अधिक वयाचा होऊन मरण पावला. तो मुल्ला इवज वाजिह याच्या भावाचा मुलगा व जावईदेखील होता. सदर वाजिह १०८८ हि. मध्ये मरण पावला होता.

आणि महरूत (?) येथे सलाबत अफगाण यास आपले नायब म्हणून मागे ठेवले. १७ जून रोजी गढ पटिलीला (कोट पुतळी?) वेढा पडला आणि तदनंतर दीड महिन्याने (४ ऑगस्ट १७२३) हैदर कुलीखानाने सदर किल्ला सर केला असल्याची खबर दरबारास कळविली; गढीच्या किल्ल्याही सोबत पाठवून दिल्या.[५]

आता सलोखा करण्याची हीच वेळ आहे असे समजून, अजितसिंगाने आपला थोरला मुलगा अभयसिंग याला, त्याच्यासोबत कित्येक हत्ती आणि प्रचंड द्रव्य देऊन शाही सेनापतीकडे पाठविले. दिल्ली दरबारास स्वतः हजर राहाण्याची गोष्ट त्याने वर्षापुरती लांबणीवर टाकली. राजाचा नजराणा आणि राजाचा मुलगा यांना हैदर कुलीखानाने दरबारास धाडले. राजाने बादशहाला केलेल्या विनवणीस याने बादशहाचा अनुकूल प्रतिसाद मिळवून दिला. अभयसिंगाचे स्वागत अगदी सन्मानपूर्वक झाले. त्याला भेटी मिळाल्या. पण त्याला दरबारी थांबवून धरले. निजामुल्मुल्क दख्खनला पळाला तेव्हा तदनंतरच्या काळी हैदर कुलीखान पुन्हा एकदा बादशहाच्या मर्जीतला झाला. त्यास त्याचे पूर्वीचे मीर आतिश हे पद देण्यासाठी ३० डिसेंबर १७२४ रोजी दरबारचे बोलावणे आले आणि सय्यिद हुसैनखान बार्हा यास अजमेरचा अधिकार दिला. (एप्रिल १७२५). [कामवर, रूस्तम अली २५२-अ].

## २९ : अजितसिंगाचा त्याच्या मुलाकरवी खून

हा विभाग आपण राजा अभयसिंगाच्या मृत्यूच्या घटनेने संपवू. शाहीर आणि बखरकार यांनी या घटनेचा नुसता उल्लेखच करून ती निकालात काढली आहे, हे टॉड कबूल करतो; पैकी एकाने तर सदरची हकीकत अगदी निकराच्या मुद्द्यावर आली असता, तेथे काही लिहिण्याऐवजी, पान नुसते कोरे सोडले आहे. पण टॉडच्या पुस्तकाच्या अन्य भागात, या गुन्ह्याचे तपशीलवार वर्णन आपणास पाहावयास मिळते.[६] ते काही असो, अजितसिंगाच्या आयुष्याचा शेवट हिंसकरीत्या झाला व त्यास त्याचा दुसऱ्या क्रमांकाचा मुलगा बख्तसिंग कारण घडला हे खुद्द राजपूतदेखील मान्य करतात. इतकेच काय पण राजपुतांच्या उत्कटतेने कैवार घेणारा कर्नल टॉड हा देखील ते मान्य करतो. [टॉड, खंड एक, ६९८; खंड दोन, ८८.]

त्यांच्या हकीकतीनुसार, निजावयास जाण्यापूर्वी बख्तसिंगाने बापाचा निरोप घेतला आणि आईबापाच्या शेजघराजवळच्या खोलीत तो लपून राहिला. सगळीकडे निरवानिरव झाल्यावर, तो त्यांच्या खोलीत शिरला; वडिलांची तलवार त्याने घेतली आणि ती त्यांच्यावर

५ कामवर २६४–२६६, टॉड खंड दोन, महरूत, म्हणजे मारोत असे समजतो ते १८५९ च्या राजपुतान्याच्या नकाशात सांभर तलावाच्या उत्तर किनाऱ्याच्या उत्तरेस सुमारे १० मैलावर आहे. वारिद (१३०) सांगतो की गढ पटिली येथील राजपूत शिबंदीची संख्या फक्त चारशे होती; त्या ठिकाणचा कब्जा, वाटाघाटीच्या मार्गाने देऊ करण्यात आला. लढाईतील शौर्यपदके मिरवत, निशाणे फडकावत आणि ढोल वडवत ही शिबंदी कूच करीत आली. राजपुतांनी लिहिलेल्या हकीकतीनुसार (टॉड, खंड दोन, ८७) तारागढ अजमेरच्या अगदी जवळ असून त्यास जुलै महिन्यात वेढा पडला. उमरावसिंग या किल्लेदाराने सदर किल्ला चार महिने लढविला.

६ टॉड खंड एक, ६९९. टॉड हा इतिहासकार म्हणून कसा कच्चा होता याचा हा परिच्छेद निदर्शक आहे. अजितसिंगाचा खून सय्यिदांच्या माथी मारण्याचे त्याचे कृत्य म्हणजे कालक्रमविषयक घोडचूक आहे. 'सय्यिदांच्या विविध दुष्ट योजनांना त्याने आपली मान्यता दिली नाही' असे टॉड याने जे प्रतिपादले आहे तेही असेच खुळचटपणाचे आहे. अजितसिंग हा अगदी शेवटपर्यंत सय्यिदांचा मित्र व सय्यिदांचा पक्षपाती होता.

चालविली. नवऱ्याचे रक्त वक्षस्थळावर जाणवल्याने अजितसिंगाची पत्नी जागी झाली. बख्तसिंग पळून गेला होता. अजितसिंगाच्या मृतदेहावर ७ जून १७२४ रोजी अंत्यसंस्कार झाले. त्यावेळी त्याच्या चितेवर, त्याच्या ८४ बायका आणि रखेल्या सती गेल्या. वारस कोणी व्हावे यावरून मुलांमध्ये लागलीच तिथल्यातिथे बखेडा माजला. २५ जुलै १७२४ रोजी अभयसिंगाला वडिलांचा वारस म्हणून जोधपूरचा कब्जा घेण्यासाठी जाण्यास बादशाहाची अनुमती मिळाली. त्यावेळी त्याला राजराजेश्वर हा किताब आणि सात हजार जात (सात हजार घोडे) ही मनसब बहाल झाली. हे होण्यास समसामुद्दौलहचे प्रयत्न कारणीभूत झाले. अभयसिंग त्यावेळी २१-२२ वर्षांचा होता. [टॉड, खंड एक, ६९९; खाफीखान ९७४; खुशहाल १०४४-ब].

अजितसिंगाचा खून त्याचा मुलगा बख्तसिंग याने केला ही वस्तुस्थिती कोणीही नाकारीत नाहीत. पण हे कृत्य करण्यास चिथावणी कोणाची होती याबाबत मात्र भिन्न मतप्रवाह आढळतात. टॉडला माहिती पुरविणाऱ्यांनी त्याला सांगितलेले दिसते की, थोरला भाऊ अभयसिंग याच्या चिथावणीवरून बख्तसिंगाने हे कृत्य केले.[७] त्यावेळी अभयसिंग दिल्लीला बादशाहाच्या ताब्यात होता. खून करण्याबद्दल बक्षिसी म्हणून खून करणाऱ्याला नागोर आणि त्याखालील ५६५ गावे यांचा मोकासा मिळणार होता. अभयसिंगाच्या मनात बापाचा खून करण्याची पापी इच्छा का निर्माण व्हावी? त्याबाबत असे म्हणतात की, मॅकिव्हेली पद्धतीच्या सय्यिदांनी अभयसिंगाची महत्त्वाकांक्षा चाळवली होती; कारण त्यांना अजितसिंगावर सूड उगवावयाचा होता. अजितसिंगाने फर्रुखसियरला सिंहासनभ्रष्ट करण्याच्या योजनेस विरोध केला होता, हे हा सूड घेण्याचे निमित्त होते. आता आपण सोप्या पण निर्वाणीच्या कसोटया लावू. पितृहत्येसारखे कृत्य करण्यास बख्तसिंग उद्युक्त होईल एवढी मोठी बक्षिसी देऊ करण्यात आली होती का? तो कदाचित फार शहाणा माणूस नसेल; पण सदरच्या कृत्यामुळे होणारा दुर्लौकिक ओढवून घेण्याइतका मूर्खही नव्हता. शिवाय, या कृत्यामुळे (१) फायदा होणार होता तो त्याच्या भावाचा, खुद्द त्याचा स्वतःचा नव्हे आणि (२) या कृत्याबद्दल त्याला एक मोकासा बहाल होणार होता हा वस्तुतः बापाचा नैसर्गिक मृत्यू घडल्यावर यथावकाश राजपुतांच्या सार्वत्रिक रुढीनुसार स्वाभाविकपणे त्याचाच होणार होता. बाह्य कसोटया लावल्यावर सदरच्या हकीकतीत काही शिल्लक उरते का? उलट या हकीकतीचा सगळा आधारच तुटला आहे असे आपणास दिसून येते. अजितसिंगाचा वध जून १७२४ मध्ये झाला; एका सय्यिदाचा वध ८ आक्टोबर १७२० रोजी झालेला होता आणि दुसरा सय्यिद लढाईत पराभूत होऊन, १७२० मध्ये कैद झाल्यावर, तुरुंगातच ११ आक्टोबर १७२२ रोजी मरण पावला होता. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, १७२४ साली अभयसिंगाला चिथावणी देण्यास ते हयात नव्हते. याशिवाय, या काळाचा अगदी प्राथमिक अभ्यास केल्यावर देखील, फर्रुखसियरचा काटा काढण्यासाठी अजितसिंगाने सय्यिदांना विरोध केला नाही तर करता येईल तेवढी मदत केली या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करता येणे कठीण आहे. म्हणून टॉडची हकिकत म्हणजे निव्वळ दंतकथा आहे. ती परीक्षेस मुळीच उतरत नाही. शिवाय तो नेहमी आधार घेतो तो राजपुतांच्या शाहिरी बखरींचा; पण त्यादेखील याबाबत टॉडवर कसली मेहरनजर दाखवित नाहीत व ते टॉडदेखील कबूल करतो. टॉड स्वतः (खंड दोन ११३) कबूल करतो की, "हा धिक्कारपात्र गुन्हा बख्तसिंगाच्या हातून न घडता

७ टॉडने सांगितलेलेच खुनाचे कारण वारिद (१३०) देखील सांगतो. तुलना करा, मा. उ., भाग तीन, ७५८.

तर राजस्थानात पूर्वी कधी झाला नव्हता असा महान राजकुमार म्हणून नंतरच्या पिढ्यांत त्याची किर्ती दुमदुमली असती". या प्रशंसेच्या वर्षावातील अल्पांश जरी खरा समजला तरी परिवारातील रूढ चालीरीतीनुसार त्याच्याच होणाऱ्या मोकाशापेक्षा अधिक मोठा मोबदला मिळण्याची शक्यता नसताना तो शूर योद्धा आपल्या महत्त्वाकांक्षी भावाच्या हातचे दुर्दैवी बाहुले बनणे संभवनीय वाटत नाही. मग असे समजावे हे योग्यच नाही काय की वडिलांच्या हातून असे काही कृत्य घडले असावे की ज्यामुळे आपल्या खाजगी सन्मानावर आक्रमण झाले असे मुलाला वाटले असावे.

मुसलमानी आधारावरून घटना वेगळ्या पद्धतीने दाखविलेली आहे (कामवर). ती हकिकत "थोर अजित"च्या व्यक्तिमत्वास उध्वस्त करणारी आहे; पण राजपुतांच्या कैवाऱ्यांनी पुढे केलेल्या हकीकतीपेक्षा जास्त समाधानकारक आहे. हे भयंकर कृत्य करण्यास सबळ कारण होते असे त्यात दिसून येत असल्यामुळे या प्रकरणीची परिस्थिती त्यात समाधानकारकरीत्या स्पष्ट झाली आहे. त्यात सांगितले आहे की, अजितसिंग सलोखा करून जोधपूरला परत आल्यावर, तो आपला मधला मुलगा बख्तसिंग ह्याच्या पत्नीच्या प्रेमात पडला व अगम्यगमन (संभोग) दोषही त्याने पत्करला. याची शरम वाटल्याने आणि यामुळे आपला मानबिंदू दुखावला गेला, असे समजून बख्तसिंगाने सूडाची संधी साधली. एके रात्री अजितसिंग मद्य प्याला असता त्याची धुंदी चढल्याने तो गाढ झोपी गेलेला होता. मुलाने त्याला भोसकून ठार केले. टॉडच्या भाटकाव्याशी तुलना करता आपण येथे राजाच्या स्वभावाविषयी मुसलमानांनी कोणता दृष्टिकोन स्वीकारला होता ते पाहू. "प्रांजळपणाचा त्याच्याकडे अभाव असल्याचे प्रकर्षाने जाणवत होते. शपथा मोडणे ही त्याची वृत्ती होती. त्याने आपल्या अनेक नातेवाईकांचा आणि आश्रितांचा कपटाने जीव घेतला होता. त्याची मुलगी फर्रुखसियरला दिलेली असता फर्रुखसियरला वाऱ्यावर सोडून देण्याचे दुष्ट कृत्य त्याच्या हातून घडले. त्यास याने नुसतेच वाऱ्यावर सोडले नाही तर त्या बादशहाला तख्तावरून खाली खेचण्यात त्याने सक्रिय भाग घेतला. अखेर आपल्या अपकृत्यांची बक्षिसी त्याला मिळाली.

"जो दुष्टतेचे बीज पेरतो व चांगल्याची आशा धरतो, तो लढवितो ते डोके आणि कल्पितो ती गोष्ट, सारे काही व्यर्थ होय".

## ३० : अली मुहम्मदखान रोहिला याचा उदय

रोहिलखंड या आजकालच्या नावाने माहीत असलेल्या मुलुखाला हिंदू लोक कटहर असे संबोधीत आणि १८ व्या शतकाच्या पहिल्या चतुर्थापर्यंत या मुलुखाचा संभाल मुरादाबाद असा उल्लेख करीत. त्या नावाखालचा हा मुलूख म्हणजे दिल्ली सुभ्याचा एक भाग होता. आजचा रोहिलखंड त्याच्या बरोबरीचा धरला तर त्याचे क्षेत्रफळ अंदाजे १२,००० चौरस मैलांचे भरते. या मुलुखाच्या दक्षिणेला गंगा नदी आहे, उत्तरेला हिमालयाच्या पायथ्याची जमिनीची पट्टी आहे, तिला तराई म्हणतात. पूर्वेला अयोध्या प्रांत आहे. १७ व्या शतकात या पट्ट्याच्या आग्नेय भागात दाऊदझई पठाणांनी वस्ती केली. शाहजहानपूर हे महत्त्वाचे शहर त्यांनी वसविले. त्यांवरूनच बहुधा रोहिलखंड या नावाचा प्रचार झालेला असावा. शाहजहानाच्या आमदानीत (१६२८ ते १६५८) या टोळीतील दर्याईखान, दिलेरखान आणि बहादुरखान हे अग्रगण्य सेनानी होते. रोह याचा अर्थ 'डोंगराळ' असा असून अफगाण लोकांनी आपल्या मायदेशाला दिलेले ते नाव आहे. इला हा हिंदी प्रत्यय लावला की एखादी व्यक्ती

विशिष्ट गटाची अथवा भागाची आहे असा अर्थ होतो. रोह यास इला प्रत्यय लावल्यावर रोहिला असा शब्द तयार होतो व त्याचा अर्थ रोह नामक देशाहून आलेला असा होतो. त्यावरून रोहिलखंड असा शब्द तयार झाला. त्याचा अर्थ रोहिल्यांची वस्ती असलेला मुलूख असा आहे. (मा. उ., खंड दोन, १८, ४२; खंड एक ४१५; गुलिस्तान-इ-रहमत).

एक अफगाण साधू पुरुष शेख शिहाबुद्दीन बादलझई नावाचा होता. त्याचा वारस त्याचा तिसरा मुलगा महमूदखान नावाचा होता. त्याला शेख मुती असे म्हणत. त्याने रोहमध्ये रोहू शहामतपूर या गावी आपले घर केले. महमूदखानाच्या मृत्यूनंतर त्याच्या पाच मुलांनी त्याची मालमत्ता वाटून घेतली. सर्वात धाकटा मुलगा शाह आलमखान याच्या वाट्यास दाऊद नावाचा एक गुलाम आला. बहादुरशाहाच्या कारकिर्दीत (१७०७-१७१२) हा दाऊद हिंदुस्थानात आपले नशीब काढण्यासाठी धन्याच्या घरून पळाला तो कटहर (आता रोहिलखंड म्हणून ज्ञात) येथे येऊन पोहोचला.

१७१२ आणि १७१५ या दरम्यान कटहरच्या राजपुतांनी सरकार बदायून (रोहिल-खंडातील) मधील काही भागाचा कबजा घेतला आणि महसूल खजिन्यात धाडण्याचे त्यांनी नाकारले. या जमीनदारांच्या मुख्य म्होरक्यांमध्ये सरकार बदायूनच्या बरसीर परगण्यातील माधकर आणि अजाऊन या गावांचा मुदारशाह नामक माणूस होता. दाऊद या मुलुखास आला तेव्हा बरोबर दोन-तीन माणसे होती, पण त्याने ती २०० पर्यंत वाढविली. या बळाच्या जोरावर तो मुरादशाह राजपुतांच्या चाकरीत शिरला. त्या वेळच्या नेहमीच्या प्रकारानुसार तेथील आसपासचे जमीनदार आपआपसात सारखे भांडत-तंडत असत. एकदा चौमहला परगण्यातील बानकौली गावाबरोबर असलेल्या बखेड्याच्या संदर्भात दाऊदच्या धन्याने दाऊदला तेथे पाठविले. या मोहिमेत घेतलेल्या लुटीबरोबर दाऊदला सात-आठ वर्षे वयाच्या जाट मुलाचा कबजा मिळाला. त्याची त्याने सुनता केली आणि त्यास अली मुहम्मदखान बनवून दत्तक घेतले.[८]

काही वर्षानंतर दाऊदखान गुलाम असताना त्याचा धनी शाह आलमखान याच्या कानावर आपल्या माजी गुलामाच्या यशाची किर्ती पोहोचली. तो दाऊदखानाला भेटण्यासाठी हिंदुस्थानात आला. दाऊदखानाने त्याचे चांगले आदरातिथ्य केले; त्याला आहेर करून त्याची बोळवण केली; नंतर पाच-सहा वर्षांनी तो पुनः हिंदुस्थानात आला. तेव्हा दाऊदला आपल्याबरोबर अफगाणिस्थानला परतण्याचा आग्रह त्याने केला. पण एव्हाना दाऊदला बानहोलीचा[९] व आणखी काही गावांचाही कब्जा मिळाला होता आणि त्याच्या पदरी ४००-५०० लढवय्ये असामी होते. अशा परिस्थितीतील आपली जागा सोडण्याबाबत त्याने तीव्र नाराजी दाखविली. तेव्हा शाह आलमखानाला एकट्यानेच परतीच्या प्रवासास निघणे भाग पडले. तो दिल्लीला गेला तेव्हा घोड्याचा व्यापार करणाऱ्या काही असामींनी त्यास अडकवून ठेवले. ते दाऊदखानाचे धनको होते. कटहरला परतून त्यांचे येणे वसूल करण्याचे आश्वासन दिल्यावर त्याची सुटका झाली. या आश्वासनानुसार त्याने दाऊदखानाला पुन्हा एकदा हिंदुस्थान सोडण्याविषयी विनविले. या गळेपडूपणाचा वीट येऊन दाऊदखानाने आपल्या

८ ही मोहीम १७१५ साली पार पडली असे समजतात. त्यावरून अली मुहम्मदखान हा १७०७ किंवा १७०८ साली जन्मला असावा.

९ हे नाव सि. इलीयट याने वगळले आहे. मतकर हे चांदोसीच्या पूर्वेस १३ मैलावर आहे. (जदुनाथ सरकार)

माजी धन्याचा वध घडवून आणण्याचा निर्धार केला. ते दोघे कोणत्या तरी शिरजोर जमीनदाराविरुद्ध मोहिमेवर असताना शाह आलम खानाच्या तंबूत चार खुनी शिरले व त्यांनी त्याला ठार केले. खून झालेल्या माणसाची मालमत्ता दिल्लीतील कोण्या व्यापाऱ्याकडे सांभाळावयास होती. ती हस्तगत करण्याचा प्रयत्न दाऊदखानाने केला. पण सदरची मालमत्ता देऊ करण्यास त्या व्यापाऱ्याने नकार दिला. ठार झालेल्या व्यक्तीचा त्याच्या तोरू शहामतपूर या रोहमधील मूळगावी एक मुलगा हयात होता. त्याच्याकडे सदर मालमत्ता पाठविण्याचा विचार त्या व्यापाऱ्याचा होता. सदर मुलगा त्यावेळी ४–५ वर्षे वयाचा असल्याचे सांगितले गेले. हा मुलगा म्हणजेच पुढे प्रसिद्धीस आलेला हाफिज रहमतखान होय (गुलिस्तान-इ-रहमत).

शाह आलमखानाच्या मरणानंतर अंदाजे बारा महिन्यांनी दाऊदखानाने मुरादशाह याची चाकरी भिरकाऊन दिली आणि कुमाऊंचा राजा देवीचंद याची पत्करली. त्यांनी यावर डोंगराच्या पायथ्याशी असलेले किल्ले सांभाळण्याची जबाबदारी टाकली. तदनंतर लवकरच मुरादाबादच्या फौजदाराचे पद धारण केलेल्या वजीर कमरुद्दीन इतिमादुद्दौल्ह याने रोहिले आणि डोंगराळ भागातील राजे या दोघांच्या एकत्रित बळाविरुद्ध कारवाई करण्याचा निश्चय केला. दिल्लीला अशी खबर आली की, घोडदळ व पायदळ मिळून २०,००० अफगाण बांसबरेली आणि संभळ-मुरादाबाद येथे जमवाजमव करीत आहेत; ते शेतकऱ्यांना सतावत आहेत; हमरस्त्यावरील वाटसरूंना लुटत आहेत आणि स्थावर मालमत्ता कबजात घेत आहेत. काही जमीनदारांनी त्यांच्याशी सलोखा केला आहे; साम्राज्याच्या कारभाराला गुंडाळून टाकण्यात आले आहे आणि साम्राज्याचा महसूल गोळा करण्याचे थांबले आहे (शिवदास ७९, रुस्तम अलीचे उर्दूतील तारीख-इ-रोहिला, गुलिस्तान-इ-रहमत.)

हा सर्व सावळागोंधळ निपटून काढण्यासाठी शक्य ते सर्व करण्याचा हुकूम कमरुद्दीन-खानाच्या अख्त्यारीतील नायब सुभेदार अजमतुल्लाह खान लखनवी याला झाला. त्याने बरेलीच्या फौजदाराची मदत मिळविली आणि या दोघांच्या एकत्रित फौजांनी हल्ल्यासाठी कूच केले. दोन्ही सैन्यांची रुद्रपूरजवळ गाठ पडली. रोहिल्यांना आपल्या सामर्थ्याचा विश्वास होता. त्यांनी दोन कोस कूच केले आणि तोडयाच्या बंदुका आणि धनुष्यबाण यांसह लढाई आरंभिली. लौकरच ते जवळ आले. तासभर घनचक्कर लढाई झाली. दोन्ही पक्षांचे नुकसानही जबर झाले. पुष्कळ माणसे निकामी झाल्यावर अजमतुल्लाहखान पायउतारा झाला आणि आपले नातेवाईक भोवती घेऊन लढत राहिला. तेव्हा शत्रूने माघार घेतली. पाठलागावरचे सैनिक त्यांना पकडू लागताच ते नदीकडे वळले व पळून गेले. पण नदीवर नावा नव्हत्या. त्या नावा अगोदरच दूर हाकलण्याचे काम फौजदारांनी केले होते. सदर विजय मिळाल्यामुळे हा मुलूख पुन्हा एकदा शाही साम्राज्याच्या अधिकाराखाली आला. ही घटना डिसेंबर १७२१ मध्ये घडली. (शिवदास ७९अ, गुलिस्तान-इ-रहमत.)

दाऊदखान याने शाही पक्षाशी सूत जमविले होते. रणांगणात असतानाच त्याने राजाचा पक्ष सोडला असे दिसते. पराभवानंतर दाऊदखानाने राजाला पकडून, त्यास ओलीस ठेऊन, त्या मार्गाने त्याचे आणि त्याच्या फौजेचे देणे असलेली बाकी वसूल करण्याचा प्रयत्न केला. पण मावळी माणसांच्या एकनिष्ठतेमुळे त्याचा हा प्रयत्न फसला. राजा काकरदहरा येथे गेला. तेथून त्याने या रोहिला-प्रमुखाला आपला पगार आणि आपली बाकी घेण्यासाठी येण्याचे आमंत्रण पाठविले. यात काही कपट आहे याचा संशय न येऊन दाऊदखान हुकुमाप्रमाणे वागला. तेव्हा राजाने त्याला पकडण्याचा हुकूम सोडला आणि तो व त्याचे सगळे साथीदार

यांना ठार केले. मागे जिवंत उरलेल्या मलिक शादीखान, सदरखान कमालझाई आणि बक्षी सरदारखान यांनी दाऊदखानाचा दत्तकपुत्र अली मुहम्मदखान याला या सैन्यदलाचा प्रमुख केले. त्यावेळी सैन्यात ४००-५०० असामी होते. हे सैन्य मुरादाबादच्या शेख अजमतुल्लाहखान याने आपल्या चाकरीत ठेवले.

## ३१ : जाट लोक

आता आपण धामधूम उडालेल्या दुसऱ्या एका भागाकडे वळू. आपण यापूर्वी जाटांचा जो उल्लेख केला तो एप्रिल-मे १७१८ या फर्रुखसियरच्या राजवटीच्या अखेरच्या काळातील होता. चूडामण जाटाला चिरडून टाकण्याचा आंबेरचा राजा सवाई जयसिंग याचा बेत फसला होता. त्यामुळे चूडामण जाटाला थोडयाफार अनुकूलच ठरतील अशा अटीवर सलोखा करून टाकला होता. हा सलोखादेखील सय्यिदखानजहान या सय्यिदांच्या चुलत्याच्या मध्यस्थीने झालेला होता. हे अपयश सवाई जयसिंगाच्या काळजात सलत होते. सय्यिद अब्दुल्लाहखान याचा पराभव होऊन त्याची तुरुंगात रवानगी झाल्यावर सवाई जयसिंग दिल्ली दरबारला परतला होता (१ मे १७२१). मधल्या तीन वर्षांच्या काळात चूडामण जाटाकडून चिथावणीची कृत्ये झाली नव्हती असे नाही. सय्यिद हुसैन अलीखानाच्या मृत्यू-नंतर आपण बादशाहाच्या पक्षाचे आहोत असे त्याने तात्पुरते जाहीर केले होते. पण लढाईच्या दिवशी तो विरुद्ध पक्षात जाऊन मिळाला होता व त्याने शाही छावणी-सामानाची लुटालूट केली होती. त्याचप्रमाणे जोधपूरच्या अजितसिंगाविरुद्ध धाडलेल्या सआदतखानाच्या फौजेच्या मार्गक्रमणात त्याने अडथळे आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता. तसेच अल्लाहाबादेचा सुभेदार मुहम्मदशाह बंगश यांचा इमानी साहाय्यक दिलेरखान यास विरोध करण्यासाठी जात असलेल्या बुंदेल्या मंडळींच्या मदतीसाठी त्याने माणसे धाडली होती.

पूर्वी आपण पाहिल्याप्रमाणे सआदतखानाची नेमणूक आग्रा सुभ्यावर झाली होती. त्याने तेथे नीलकंठ नागर याला आपला नायब म्हणून पाठविले. या नायबाला त्याने दिलेल्या पहिल्यावहिल्या हुकुमामध्ये जाटांवर चालून जा आणि त्यांच्या निरनिराळ्या अपकृत्यांबद्दल त्यांना अद्दल घडव हाही एक हुकूम होता. तदनुसार फतहपूर सिक्रीच्या जवळ त्याने आपले ठाणे बसविले. त्यावेळी त्याच्याजवळ पायदळाखेरीज १०,००० स्वारांची फौज होती. २६ सप्टेंबर १७२१ रोजी जाट मुलुखातील एका खेडयावर तो चालून गेला, तिथल्या कित्येक रहिवाशांना तसेच त्यांच्या गुराढोरांना त्याने पकडून आणले. नीलकंठ परतीचे कूच करीत असता चूडामण जाटाचा सर्वात थोरला मुलगा मुहक्कमसिंग पाच-सहा हजार लोकांसह त्याकडे आला व लढण्याची इच्छा दाखवू लागला. त्यावेळी झालेल्या लढतीत नीलकंठाला गोळी लागली व तो त्याच्या हौद्यात मरून पडला. त्याच्या लोकांपैकी ज्यांना शक्य झाले त्यांनी पोबारा केला; बाकीचे कैद झाले व त्यांनी आपली हत्यारे व घोडे जाटांच्या हवाली केले. नायब सुभेदाराचे सगळे हत्ती आणि सगळी मालमत्ता मुहक्कमसिंगाच्या हाती लागली. पकडलेल्या प्रत्येक कैद्याकडून त्याच्या दर्जानुसार खंडणी वसूल केल्यावर जाटांनी त्यांना सोडून दिले (शिवदास ७९-ब, सियर संहिता ७३, गुलाम अली ४६अ).

दरबाराचा तत्काळ निरोप घेऊन कारभाराचा कब्जा जातीने घ्यावा असा हुकूम सआदतखानाला झाला. त्याचे आग्र्यास आगमन झाल्यावर चूडामण जाटाचा पुतण्या बदनसिंग जाट त्याला येऊन मिळाला. असे दिसते की, चूडामण वारसावाबतच्या भावकीत उद्भवलेल्या

बखेडचात, थोडेच दिवस आधी, मरण पावलेला होता. या आपणाकडे पळून आलेल्या माणसाशी समेट घडवून आणणे शहाणपणाचे ठरेल असे वाटल्यावरून सआदतखानाने त्याला मानाची वस्त्रे आणि हत्ती देऊ करून त्याच्याशी सलोखा केला. पण अशी सगळी सआदत-खानाची धडपड चालू राहून देखील, जाटांनी त्याची दखल घ्यावी असे त्याच्या हातून काही घडले नाहीं. जाटांचे किल्ले बळकट आहेत आणि जाटांच्या मुलुखात दाटीवाटीने वाढलेली झाडे आहेत; या अडथळचामुळे यश येत नाहीं अशी सबब त्याने सांगितली. एकंदरीत सोपविलेली कामगिरी त्याला पेलण्यासारखी नाहीं असे दिसून आल्यामुळे त्यास काढून घेण्याचे ठरले आणि सदरचा कारभार राजा सवाई जयसिंग कच्छवाह याकडे सुपूर्त केला.[१०]

नुकतेच सांगितल्याप्रमाणे, जाटांचा प्रमुख चूडामण हा या सुमारास मरण पावला होता. ही घटना ११३३ हिजरीच्या जिल्हेज महिन्यातील (सप्टेंबर-आक्टोबर १७२१) होती. या बाबतची एक हकीकत पुढीलप्रमाणे आहे. चूडामणच्या नात्यातील एक धनाढ्य माणूस निपुत्रिक मरण पावला. त्याच्या भाऊबंदांनी चूडामणचा थोरला मुलगा मुहक्कम याला बोलावून घेतले; त्यास मृताच्या जमीनदारीचा प्रमुख केले आणि त्या मृताची सर्व चीजवस्तू त्याच्या हवाली केली. तेव्हा चूडामणचा दुसरा मुलगा झुलकरण आपल्या भावाला म्हणाला, "त्या चीजवस्तूमध्ये मलासुद्धा हिस्सा दे आणि भागीदार बनव". त्यावर दोघात बाचाबाची होऊन बळजोरीने प्रतिकार करण्याची तयारी मुहक्कमने केली. तंट्याचा शेवट करण्याचा झुलकरणचाही निश्चय दिसला; त्याने माणसे जमविली आणि भावावर हल्ला केला. त्यावेळी तेथे असलेल्या पोक्त मंडळींनी चूडामणला कळविले की, तुमची मुले तंटाबखेडा करून झगडत आहेत हे बरे नाही; त्यांच्यातील भांडण तुम्ही सोडवावे हे जास्त बरे.

चूडामणने मुहक्कमबरोबर विषय काढला. त्यावर मुलाने बापाला दिलेले उत्तर म्हणजे शिवीगाळ होती. भावाबरोबर आणि बापाबरोबरही लढण्याची तयारी त्याने दर्शविली. चूडामणच्या मनाचा तोल ढळला. कारण त्याचा भलताच हिरमोड झाला होता. तो आपल्या अंगावर नेहमीच जहर विष बाळगत असे. त्या विषाची एक मात्रा त्याने गिळली आणि त्या गावातील एका राईत जाऊन तो झोपला; अशाप्रकारे त्याचा सगळा कारभार आटोपला. बराच वेळ झाल्यावर चूडामणची शोधाशोध करण्यासाठी माणसे गेली, तेव्हा त्यांना त्याचा मृतदेह मिळाला.[११]

---

१० शिवदास ८० अ, खाफीखान ९४४, मा. उ., खंड एक, ५४५. गुलाम अली ( ४६ अ ) सांगतो की सआदतखान या अगोदरच अयोध्येला आला होता व तेथून आग्र्याला परतण्याचा त्याचा बेत होता. पण समसामुद्दौलहने केलेल्या ढवळाढवळीमुळे आग्र्याचा कारभार त्याच्याकडून काढून घेतला.

११ शिवदास ७८, गुलामअली ४६ ब, सियर भाषांतर खंड एक, २५९.

सियर आणि खिजखान यांच्या हकीकती मिळत्याजुळत्या असल्याचे, तुलना केली असता, दिसते म्हणजे एकाने दुसऱ्याच्या हकीकतीची नक्कल केलेली असावी किंवा दोघांच्याही माहितीचे उगमस्थान एकच असावे. खिजखानावर ( तो घटनास्थळी हजर असावा असे समजले जात असले तरी ) संशयाचा ठपका ठेवणे मला भाग आहे, कारण त्याच्या हकीकतीनुसार जयसिंगाने थुनला वेढा घातल्यानंतर चूडामण मरतो. शिवदास, मिर्झा मुहम्मद आणि खाफीखान, म्हणजे एकंदरीत अधिक अधिकारसंपन्न इतिहासकार, यांचे याबाबत एकमत दिसते की, सवाई जयसिंगाविरुद्धच्या बचावाच्या हालचाली चूडामणच्या मुलांच्याकडून झाल्या, खुद्द चूडामणच्याकडून झाल्या नाहीत.

तारीख-इ-मुहम्मदी ( ११३३ ); "अकबराबाद सुभ्यातील एक मातब्बर परंतु मोकाट सुटलेला जमीनदार चूडामण जाट जिल्हेज महिन्यात थमसिंग आणि मुहक्कम सिंग या त्याच्या दोन मुलांत झालेल्या मारामारीत मरण पावला. त्यांच्यात सलोखा निर्माण करण्यासाठी तो मधे पडला व त्यात मारला गेला.

जाटांचे मुख्य ठाणे अजून थून येथे होते. आग्र्याचा नवा सुभेदार सवाई जयसिंग याने जाटांच्या या मुख्य ठाण्यावर पाठवावयाच्या फौजेचे नेतृत्व करण्याचे पत्करले होते. १९ एप्रिल १७२२ या दिवशी कित्येक सरदार आणि राजे यांना सवाई जयसिंगाच्या दिमतीस दिल्याचे जाहीर झाले. त्यात राजा गिरिधर बहादुर नागर आणि ओर्छाचा महाराव अर्जुनसिंग ही अतिप्रसिद्ध नावे होती. १४–१५ हजार स्वारांची फौज जमविण्यात आली, तोफखाना आणि दारुगोळा पुरविण्यात आला आणि शाही खजिन्यातून २,००,००० रु. ची रक्कम अदा झाली. पण सवाई जयसिंग अजून दरबारातच आहे असे १४ जुलै रोजी दिसते. तदनंतर बऱ्याच दिवसांनी म्हणजे २९ ऑगस्ट रोजी त्याला आणि त्याच्या मुजफ्फरखान या प्रथम क्रमांकाच्या मदतनिसाला कूच करण्याची पुन्हा आज्ञा झाली. फौज ५०,००० पर्यंत नेण्याचा आदेश बक्षींना झाला (कामवर २५१, खाफीखान ९४५).

शेवटी, १ सप्टेंबर १७२२ रोजी जयसिंग सवाई याला खुल्या दरबारात आग्र्याच्या कारभाराचे नेमणूकपत्र समारंभपूर्वक व नेहमीच्या शिरस्त्यानुसार बहाल झाले. आणखी काही सरदारांना मानाची वस्त्रे देण्यात येऊन त्यांना जयसिंगाच्या हाताखाली चाकरी करण्यासाठी पाठविण्यात आले व सय्यिद मुजफ्फर अलीखान याला आग्र्याचा नायब सुभेदार म्हणून नेमले. त्यावेळी त्या सुभ्याचा स्थानभ्रष्ट झालेला सुभेदार सआदतखान राजधानीत येऊन दाखल झाला. त्याच्या भेटीस बादशाहाने नकार दिला; त्यास तडक अयोध्येला जाण्यास सांगितले; त्याबाबतच्या अधिकारदानाची तसेच गोरखपूरच्या फौजदारीबाबतची मानाची वस्त्रे निरोप्याच्या हाती पाठविली. त्याचा अयोध्येतील पूर्वाधिकारी राजा गिरिधर बहादुर नागर याची माळव्यास बदली केली (९ सप्टेंबर १७२२) (कामवर २५४, सिवानिह).

२५ ऑक्टोबर रोजी दरबारात खबर आली की, चूडामण जाटाच्या मुलांनी त्यांच्या थूनच्या किल्ल्यात आश्रय घेतला असून तेथे आसपास रोज चकमकी झडत आहेत. राजाने प्रथम जंगलतोड केली व मग आपल्या तोफा बसविल्या. मधूनअधून जाट बाहेर येत; झाडीत दबा धरून बसत आणि रात्री शाही छावणीवर तुटून पडत. दोन्ही पक्षातील बरीच माणसे यात प्राणास मुकत होती. हा प्रकार दीडएक महिना चालू राहिला. जाटांच्या किल्ल्यांपैकी १–२ किल्ल्यावर निराशेचे वारे वाहू लागले. तदनंतर ज्याने पूर्वी एकदा आपल्या चुलत भावाविषयी दुष्टावा व्यक्त केला होता त्या बदनसिंगाने जाटांची बाजू सोडली व तो राजास येऊन मिळाला. याने किल्ल्याच्या बचावातील कमकुवतपणा निदर्शनास आणून दिला आणि दोन किल्ले सर झाले. त्यामुळे वेढ्यात अडकलेल्या जाटांच्या तोंडचे पाणी पळाले. मध्यरात्री मुहक्कमसिंगाने घरांना आगी लावल्या, आपला दारुगोळ्याचा साठा उडवून दिला आणि बरोबर जेवढी नेता येईल तेवढी रोकड, जडजवाहीर आणि जंगम मालमत्ता घेऊन त्याने पलायन केले. १८ नोव्हेंबर रोजी शाही पक्षाने थूनचा कब्जा घेतला. घरन्‌घर उकरण्यात आले. पण सारे व्यर्थ गेले. खजिना काही सापडला नाही. मुहक्कमसिंगाने जोधपूरचा राजा अजितसिंग याचा आश्रय घेतला. पुढे तो जरी बरीच वर्षे जगला तरी आपल्या वाड-वडिलांच्या मुलुखाचा कब्जा पुन्हा घेणे त्याला कधीच जमले नाही. तो ११६७ हिजरीमध्ये हयात होता. ते अहमदशाहाच्या अमदानीचे ६ वे वर्ष होते. तो दिल्लीत आला, त्या दिवशी त्या वर्षातील सफर महिन्याची ११ तारीख (१० डिसेंबर १७५३) होती. इमादुल्मुल्कचा मुख्य सल्लागार आकिबत महमूदखान यामार्फत आपले राज्य परत मिळविण्याचा प्रयत्न

त्याने केला.[१२] राजा जयसिंगाने बजावलेल्या कामगिरीबद्दल १२ जून १७२३ रोजी त्याला राजा-इ-राजेश्वर, श्री राजाधिराज, महाराज सवाई जयसिंग असे किताब बहाल झाले. यापूर्वी १ मे १७२१ रोजी त्याला सरआमद-इ-राजाहाअे असा किताब मिळालेलाच होता. जाटांच्या प्रमुखाचे पद बदनसिंगाकडे राहिले. (खाफीखान ९४५; सियर भाषांतर, खंड एक, २५९; कामवर २४९, २६५).

## ३२ : मुहम्मदशाहाचा विवाह आणि त्याचा दिनक्रम

सय्यिदांविरुद्ध विजय मिळविल्यानंतर व त्या विजयाच्या उत्सवाची सांगता झाल्यानंतर ज्या गोष्टी घडल्याचे दिसते त्यात पोरसवधा बादशाहाचा विवाह ही महत्त्वाची घटना आहे. त्याचा विवाह त्याचा पूर्वाधिकारी फर्रुखसियर यांच्या मुलीशी झाला. या विवाहानंतर तिचा किताब मलिका-उज्जमानी असा होता. १४ सफर ११३४ हिजरी (३ डिसेंबर १७२१) रोजी सचाक (म्हणजे वराने द्यावयाच्या भेटी) वधूच्या घरी पाठविण्यात आल्या. या विवाहाच्या बाबतीत समसामुद्दौल्हने पुढाकार घेतला होता. त्याला मूल्यवान भेटी मिळाल्या. ख्वाजा खवासखान, नाजिर महलदारखान, आणि हाफिज जवाहिरखान या खोजांनादेखील बक्षिसी मिळाली. १७ तारखेला (६ डिसेंबर १७२१) रात्र पडण्याच्या सुमारास बादशाह शाही थाटात, मिरवत जफधराकडे गेला. त्यावेळी थोर मनसबदारांना म्हणजे समसामुद्दौल्ह (या शाहजादीशी मिलन घडवून आणण्याची मुख्य जबाबदारी याच्यावर पडली होती.) वजीर, हैदर कुलीखान, रोशनुद्दौल्ह यांना पतीच्या संपत्तीतील पत्नीच्या भागाची रक्कम किती असावी हे ठरविण्याची कामगिरी देण्यात आली. ही रक्कम ५० लाख रुपये असावी असे ठरले. नंतर एका शुभमुहूर्तावर मुल्ला सादुल्लाह (मूसवीखान हा त्यांचा किताब) आणि हिंमतखान यांनी निका लावला. समसामुद्दौल्ह, कमरुद्दीनखान, अब्दुस्समदखान दिलेरजंग, हैदर कुलीखान, खान खानान, मीरजुम्ला, जफरखान (रोशनुद्दौल्ह), राजा जयसिंग आणि राजा गिरिधर बहादुर यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचा आहेर मिळाला. नृत्य, गायन, आरास आणि दारूकाम यामध्ये संध्याकाळ संपून गेली. हेन्ना (हीना ?) बंदी वगैरेसारखे हिंदुस्थानी लोकांत रूढ असलेले विधी जाहीरपणे झाले नाहीत. पवित्र कायद्यातील आदेशांचा भंग होऊ नये म्हणून ही काळजी घेण्यात आली. बादशाहाची आई कुदसिया-उल्-अल्काब हजरत बेगम आणि राजगृहातील अन्य स्त्रिया यांना मूल्यवान भेटी नजर केल्या. (खाफीखान ९३७, सहीफा-इ-इकबाल ४६५).

आपल्या आमदानीच्या आरंभीच्या या काळात मुहम्मदशाह जरी केवळ १९ वर्षांचा होता तरी त्याची प्रकृति नादुरुस्त असल्याचे आपल्या कानावर येते. ७ जिल्हेज (२८ सप्टेंबर १७२१) रोजी, प्रकृतीच्या कसल्यातरी गाऱ्हाण्यावरून तीन वैद्य त्याच्यावर औषधोपचार करीत होते. या तीन वैद्यांपैकी एकजण मार्टिन नावाचा फ्रेंच माणूस होता असे आढळते. या काळात बादशाहाला कित्येक अपत्ये झाली. पण त्यातील एकसुद्धा वाचले नाही. डिसेंबर १७२७ ला मात्र जगून वाढू शकेल असा एक मुलगा त्याला झाला. हा मुलगा पुढे अहमदशाह या नावाने बादशाहाचा उत्तराधिकारी झाला. काही वर्षे मुहम्मदशाहाने थोडेफार घाईगर्दीचे आयुष्य घालविल्यासारखे दिसते; आपल्या पूर्वाधिकाऱ्यांप्रमाणे

१२ तारीख-इ-अहमदशाह (ब्रि. म्यु. ओरि. २००५), ९४ ब

त्यानेही थोड्याथोड्या कालावधीच्या अंतराने शिकारमोहिमा काढणे चालू ठेवल्याचे आढळते. उदाहरणार्थ–२६ फेब्रुवारी १७२२ रोजी तो शक्करपूरच्या रमण्यात गेल्याचे समजते. पुन्हा १३ एप्रिल १७२२ रोजी तो शिकारीसाठी तालकटोरा येथील रमण्यात आढळतो. नंतर १६ ऑगस्ट १७२२ रोजी तालकटोरा दिल्लीच्या ज्या बाजूस आहे त्याच्याविरुद्ध बाजूस असलेल्या बडली नामक रमण्यात दिसतो. आणखी एक व काहीशी जंगी शिकार मोहीम १८ जानेवारी ते ७ फेब्रुवारी १७२३ अशी पार पडली. या मोहिमेत अगहराबाद, सराई नरेला, सियूबी (=सोनिपत?), सराई कन्वर (गणोर), पानिपत (लुत्फुल्लाहखानाचा बगीचा), सराई संभालका, पुन्हा सराई कन्वर (=गणोर), पुन्हा सोनिपत, नरेला आणि अगहराबाद व शेवटी कुत्बजवळ तालकटोरा असे या मोहिमेतील ठळक टप्पे होते. या शिकार दौऱ्यावर असताना बादशाहाने पानिपतच्या ख्वाजांच्या दर्गांना भेटी दिल्या. (शिवदास ७९-ब, कामवर, सियर, गुलामअली).

अशाप्रकारची आणखी एक अधिक महत्त्वाची मोहीम एका वाघाविरुद्ध काढली. १७ डिसेंबर १७२३ रोजी बादशाह कुत्बच्या दर्गांना गेला. तेथे असलेल्या टेकड्यांच्या पायथ्यांशी त्याने आपले तंबू ठोकले. तदनंतर ४ दिवसांनी मुअतकदुदौलह अल्लाहविर्दीखान या शिकार विभागाच्या प्रमुख अमलदाराने खबर आणली की, झुडपांनी आच्छादलेल्या एका मैदानी भागात दोन वाघ आणि दोन बछडे आढळून आले आहेत. तेव्हा शिकारीसाठी लागणारे कसले तरी यावर किंवा बावर या नावाचे जाळे आणि इतर शिकारसाहित्य जय्यत ठेवण्याचा हुकूम झाला. २२ तारखेला खावोली या गावी आघाडीचे तंबू रवाना झाले. दोन दिवसांनंतर कुत्बजवळील आपल्या तळापासून निघून ते बिजवसन या खेड्यापाशी येऊन थांबले. दुसऱ्या दिवशी धुळकोट येथे, तर तिसऱ्या दिवशी कसबा पाटोदी येथे ते आढळतात. वाघाची शिकार २९ तारखेला झाली. यावर (किंवा जाळे) लावले होते, त्याच्याजवळ शिकारी मंडळी आल्यावर पुढील अमलदारांनी जाळ्यात शिरावे असा हुकूम बादशाहाने सोडला. वजीर (निजामुलमुल्क), अमीरुल्-उमरा (समसामुद्दौलह), गाझीउद्दीनखान (वजीराचा सर्वांत थोरला मुलगा), सर बुलंदखान, मीर मुश्रिफ आणि हाफिज खिदमतगारखान, जवाहिरखान व अइतिबारखान हे तीन खोजे. या अमलदारांच्या काही अनुयायास—त्यांची शौर्याबद्दल ख्याती होती—हत्यारबंद होऊन बादशाहाच्या हत्तीसमोर चालण्याबाबत फर्माविले. सर्वप्रथम बादशाहाने स्वतः मोठ्या वाघाला ठार मारले. नंतर तलवार, खंजीर आणि तोड्याची बंदूक या साधनांनिशी चार बछडे, अमलदारांनी व त्यांच्या पदरच्या लोकांनी मारले. यात सुमारे १५ माणसे जखमी झाली. दुसऱ्या दिवशी धुळकोटपर्यंत परतीच्या प्रवास झाला. त्याच्या दुसऱ्या दिवशी बादशाह पुन्हा दिल्लीच्या महालात दाखल झाला. (कामवर २६६, २५९; अहवाल १८३-अ येथे निजामाविरुद्धच्या कटाची माहिती आहे.)

## ३३ : भारतीय सालोमनच्या भूमिकेत मुहम्मदशाह

त्या काळी प्रचलित असलेल्या न्याय-कल्पनाविषयी माहिती देणारा एक चमत्कारिक प्रकार रज्जब ११३७ हिजरी (मार्च-एप्रिल १७२५) मध्ये उद्‌भवला. ३–४ वर्षांपूर्वी शाही दफ्तरखान्यातील एक कारकून रामजी याने मुसलमानी धर्म स्वीकारला होता. पण रामजीप्रमाणे मुसलमानी धर्म अनुसरण्यास त्याची बायको व मुलगी यांनी नकार दिला. आता

या रामजीने मुस्तफिदखान या मुख्य काजीकडे तक्रार गुदरली की, मी धर्म बदलेलला असून माझी मुलगी अल्पवयीन आहे; सबब या बाबतीत कसलाही विकल्प तिच्यापुढे न उरता, ती या वस्तुस्थितीवरून, मुसलमान बनली आहे. मुलीला बोलावून घेऊन जबाब घेतला, तेव्हा तिने या सर्व गोष्टींचा इन्कार केला. चौकशी चालू ठेवून मुलीची रवानगी तुरुंगात केली. शेवटी आपल्या बापाने धर्मांतर केल्यानंतर तीन महिन्यांनी आपण वयात आलो हे तिने कबूल केले. तेव्हा मुख्य काजी आणि धर्मशास्त्र कायद्याचे स्पष्टकर्ते यांनी सदर मुलगी मुसलमान आहे असे आपले मत नोंदविले. उर्दू बाजारातील हिंदू लोक बादशाहाच्या महालापुढे झरोक्याखाली जमले व आपले गाऱ्हाणे मांडण्यासाठी त्यांनी आवाज दिला. सद्रस्सुदूर या पदावर ( मुख्य धर्माधिकारी या पदावर ) असलेल्या मीर जुम्लह याला हा तंटा सोडविण्यासाठी मुकर केले. त्याने राजमहालातील लाकडी मशिदीत चौकशी सुरू केली. ऋतु येणे ही वयात येण्याची एकमेव खूण नाही असे सदरेवर ठरले. दौलत नावाच्या एका मुफ्तीला या निर्णयाचा राग आला आणि त्याने आपला निष्कर्ष कसा खरा आहे याबद्दल वादविवादही केला. बादशाहाने हुकूम करून सदर मुलगी जीवनदास नावाच्या एका कापडविक्याकडे सुरक्षिततेसाठी सोपविली. काजीने तिला हजर करण्यास नकार देण्याचा प्रसंग उद्भवू नये म्हणून असे करण्यात आले.

या प्रकरणाचा हा लागलेला निकाल मुसलमानांना मुळीच रूचला नाही. दुसऱ्या दिवशी शुक्रवार होता. जहाननुमा ( थोरली मशीद ) येथे ५०—६० हजार मुसलमान जमले. बादशाहाच्या कल्याणासाठी होणारा खुत्बा ( प्रार्थना ) पढत असताना त्यांनी आरडाओरडा करून त्यात व्यत्यय आणला. तद्नंतर दोन-तीन हिंदूना त्यांनी बळजबरीने पकडून आणले आणि त्यांची बळजबरीनेच सुन्ता केली. मोठी दंगल घडून येते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. मुख्य काजी आणि मुफ्ती यांना घेऊन येण्यासाठी तिसरा बक्षी रोशनुद्दौलह याला धाडले. या मंडळींना शांत करण्यासाठी मुहम्मद-शाहाने मुलीस तुरुंगात धाडण्याचा हुकूम सोडला. नंतर दोन-तीन दिवसांनी मुसलमानी विधीनुसार तिचे दफन करण्यात आले— "ही लांबलचक गोष्ट थोडक्यात सांगावयाची म्हणजे तिला ठार केले, तसे केले नसते तर नसती डोकेदुखी झाली असती व सतावणारे प्रश्न उद्भवले असते." काफिरांवर जिझिया कर पुन्हा लादला. हा मुसलमानांना संतुष्ट करण्यासाठी त्याच्या तोंडावर टाकलेला तुकडा होता. पण आठवडाभरातच मुख्य काजीला कामावरून कमी केले आणि दुसऱ्याच मुफ्तींची नेमणूक केली. बादशाह आणि त्याचे सल्लागार याना कटकट होणे किंवा त्यांच्या ख्यालीखुशालीत व्यत्यय येणे यापुढे त्या बिचाऱ्या मुलीचे आयुष्य कःपदार्थ होते. ( कामवर, रुस्तमअली २४५-अ वरील हकीकत वेगळी आहे ).

## ३४ : निजामुल्मुल्काची गुजरातची आणि माळव्याची मोहीम

सय्यिद अब्दुल्लाहखानाचा पराभव होण्याच्या अगोदर काही महिन्यांपासून ते निजामुल्मुल्क दिल्लीस येऊन वजीराचे पद त्यास मिळेपर्यंतच्या काळात बादशाहाच्या मर्जीत जास्त जाऊन बसलेला मनसबदार म्हणजे तोफखान्याचा प्रमुख हैदर कुलीखान. मुहम्मद अमीनखान मृत्यू पावल्याने वजीरपद रिकामे पडल्यावर या मोक्याच्या पदावर आपली नेमणूक होईल अशी त्याला आशा असावी. ते काही असो, निजामुल्मुल्कास सदरचे पद मिळाले

ही गोष्ट या उमरावास मुळीच रुचली नाही. म्हणून शक्य होईल तेथे नव्या वजीराने केलेल्या उपाययोजनांना सुरुंग लावण्याचा उद्योग त्याने आरंभिला. तेव्हा या गोष्टींची पुसट जाणीव नव्या वजिराने मुहम्मदशाहाला करुन दिली. बादशाह याबाबत हैदर कुलीखानाशी बोलला. हैदर कुलीखानाला या गोष्टींचा भलताच राग आला. पण आपण पडते घेणे अधिक योग्य असे त्याला वाटले. म्हणून गुजरात सुभ्याचा कारभार जातीने करण्याचा बादशाहाचा हुकम त्याने मिळविला. सदरचा गुजरात सुभा सुमारे एक वर्षापूर्वी त्याला बहाल झालेला होताच. १ एप्रिल १७२२ रोजी त्याने दिल्ली सोडली. मीर आतिश ( तोफखाना प्रमुख ) या आपल्या पदावर आपला पर्यायी म्हणून त्याने खान जमान मेवाती यास ठेवले. ( वारिद १०१, खाफीखान ९४०, गुलामअली ४५-अ, कामवर २५१)

२८ जून १७२२ च्या थोडे अगोदर तो अहमदाबाद या आपल्या मुख्य ठाण्यास येऊन पोहोचला. आल्यावर त्याने ज्या जमिनींचा महसूल निरनिराळ्या मनसबदारांना, अधिकाऱ्यांना आणि दरबारची मर्जी झालेल्यांना बहाल झालेला आहे अशा जमिनी कब्जात घेण्याचा उद्योग सुरू केला. याबाबत बादशाहाकडे तक्रारी आल्या आणि सुभेदाराने जहागिरी जमिनीत ढवळाढवळ करू नये असा प्रतिबंधक स्वरूपाचा हुकूम बादशाहाने दिला. त्याकडे हैदर कुलीखानाने प्रथम दुर्लक्ष केले. नंतर या हुकूमाचा भंग करुन त्याने ज्या जमिनी कब्जात घेतल्या होत्या त्याला प्रत्युत्तर म्हणून, त्याच्या दिल्लीजवळील जहागिरीच्या जमिनी जेव्हा कब्जात घेतल्या, तेव्हा हैदर कुलीखानाने सदरचा प्रकार थांबविला ( खाफीखान ९४०, कामवर २५१ ).

पोकळ अवसान आणणारी इतर काही कृत्येही त्याच्या हातून घडली. आपल्या सुभ्यातील काही अधिकाऱ्यांना त्याने झालर लावून सुशोभित केलेल्या पालखीचा मान बहाल केला. असा मान मिळणे ही बाब राजघराण्यात असल्याचे किंवा अत्युच्च उमराव असल्याचे चिन्ह मानीत. मान बहाल करण्याच्या या त्याच्या प्रकारामुळे तो स्वतःला सार्वभौम राजा समजतो की काय, असे भासू लागले. कारण असले मान बहाल करण्याचा अधिकार सार्वभौम राजाचा होता. सुरत बंदर त्याच्या सुभ्यात मोडत होते. तेथून त्याने बरेच अरब ( जे त्याला 'फेरीवाले नाहीत' असे वाटले ), इथिओपियन, फ्रेंच असे इसम बोलावून घेतले व त्यांना भरगच्च पगारावर चाकरीस ठेविले. एकंदरीत त्याच्या वर्तणुकीवरून स्वातंत्र्य जाहीर करण्याचा त्याचा मनसुबा असल्याचे दिसून आले. लोकांची गाऱ्हाणी तो दरबारात बसल्याबसल्या ऐके; तो रपेटीला निघे तेव्हा रहदारी बंद केली जाई व रस्त्यावर पहारा बसवीत. अशा गोष्टी बादशाहासाठीच करण्याची पद्धत होती. अधिकृतपणे आलेल्या आणि खासगीतून सांगितलेल्या खबरीवरून तो उर्मटपणाची भाषा वापरी व शाही अधिकारछत्र भिरकावण्याचा इरादा त्या उर्मटपणाद्वारे दिसे (वारिद ८).

अखेरीस मुहम्मदशाहाच्या या लाडक्या अमलदाराबाबत हस्तक्षेप करण्यास मुहम्मद-शाहाला वाटणारी नाराजी दूर करण्यात निजामुलमुल्काला यश आले. २४ ऑक्टोबर १७२२ रोजी गुजरात सुभा हैदर कुलीखानाकडून काढून घेतला. तो निजामुलमुल्काला खुद्द त्याच्या नावाने किंवा त्याचा थोरला मुलगा गाझीउद्दीनखान फिरूज जंग याच्या नावाने बहाल होऊन मिळाला. ११ नोव्हेंबर १७२२ रोजी बादशाहाचा निरोप घेण्यासाठी निजामुलमुल्क दरबारास गेला. गाझीउद्दीनखान हा आपल्या वडिलांचा नायब म्हणून दरबारात

राहिला. वजिरासमवेत त्याचा दुसरा मुलगा अहमदखान आणि वजिराचे उमराव म्हणजेच बहुतेक सोयरे असलेले अमलदार होते. त्यांची नावे अशी–अजीमुल्लाहखान, मुतवस्सिलखान, शुक्रुल्लाहखान आणि तालिब मुहियुद्दीनखान. नवाब २५ नोव्हेंबर रोजी मथुरेला दिसतो. तो आग्र्यातून गुजरला त्यावेळी त्याला तेथे हैदर कुलीखानाचे पत्र मिळाले. त्यात त्याने संशयास्पद स्वरूपाच्या काही सबबींचा पाढा वाचला होता. ९ जानेवारी १७२३ रोजी तळ माळव्यातील सारंगपूरला, १३ फेब्रुवारी १७२३ रोजी धारला तो आढळतो. १६ फेब्रुवारी रोजी त्याने अहमदाबादेकडे प्रस्थान ठेवले (खाफीखान ९४६, कामवर २५६–२६१, गुलाम अली ४५-अ).

दरम्यानच्या काळात हैदर कुलीखान प्रतिकाराची साधने शोधण्यासाठी धडपडू लागला. त्याने आपला मुलगा काजिमखान याला दिल्लीला बादशाहाच्या मर्जीत शिरण्याचा कामावर पाठविले. बादशाहाने त्याला २६ फेब्रुवारी १७२३ रोजी भेटीस बोलाविले. नवाब रोशनुद्दौलह हाही भेट घडवून आणण्यास गेला होता. तद्नंतर हैदर कुलीखानाने आपल्या सुभ्याच्या उमराव-वर्गाकडे मोर्चा वळविला. द्रव्य व मानमरातब देऊन त्यांना आपलेसे करण्याचा प्रयत्न त्याने चालविला. त्याच्या प्रतिकाराच्या योजनेस नकार देण्याच्या बाबतीत या उमरावात चढाओढच दिसून आली. आपले भांडण वैयक्तिक स्वरूपाचे नाही आपण सार्वभौम बादशाहासच विरोध करीत आहा व त्याकामी आपण आमची मदत मागत आहा; आपण सुभ्याच्या कारभारावरून कमी झाले आहा आणि आम्ही आता आपल्या हुकूमाखाली राहिलो नाही असे या मंडळींनी, प्रतिकारास नकार देताना, हैदर कुलीखानाला सांगितले (वारिद १०, कामवर २६१, सियर संहिता ७४).

आपल्या हाताखालच्या अमलदारांचा वरीलप्रमाणे निर्धार आहे हे हैदर कुलीखानाला समजले. ती गोष्ट त्याच्या आशा पूर्णपणे धुळीस मिळविणारी ठरली. या दिवसापासून हैदर कुलीखानाने वेड[13] लागल्याचा बहाणा करणे आरंभिले व खाणेपिणे अजिबात टाकले. तेव्हा, असे सांगतात की, त्यावर औषधोपचार करणाऱ्या वैद्यांनी एक शक्कल लढविली. त्यातील एक हैदरकुलीखानाच्या बैठकीत ओरडत ओरडत घुसला. हैदरकुलीखान अन्न घेत नसेल तर त्याची गठडी वळून त्याला तत्काळ मजपुढे आणा असा प्रत्यक्ष निजामुल्मुल्काचा हुकूम आला आहे असे तो म्हणाला. हे ऐकताच हैदरकुलीखानाने मोठी घाई करून खाण्यासाठी अन्न मागविले. हैदरकुलीखानाची अशी स्थिती पाहून रघुनाथदास वगैरे त्याच्या मुख्य चाकरांनी रुस्तम अलीखानाला त्याचा मुतालिक (प्रतिनिधी) बनविले आणि हैदर कुलीखानाला ते दिल्लीस घेऊन निघाले. आपला पाठलाग होईल याची त्यांना इतकी भीती वाटत होती की, एका दिवसात तो दोन-दोन तर कधी तीन-तीन मजला मारीत होता. ते उदेपूरमार्गे येत होते; पण निजामुल्मुल्काने याचा बाऊ करून त्याचा पाठलाग करण्याचा हुकूम सोडला नाही. यापूर्वी आपण माहीत करून घेतल्याप्रमाणे, या पळपुट्यास निर्धास्त करणारे अनेक संदेश बादशाहाकडून आले. त्यावेळी म्हणजे ६ एप्रिल १७२३ रोजी पळपुटा दिल्लीनजीक रेवाडी या ठिकाणी होता. तेथे त्याला राजा अजितसिंग–यावेळी तो अजमेर येथे होता–या विरुद्धच्या मोहिमेची सूत्रे नव्याने देण्यात आली. तेव्हा त्याचे वेड जितक्या झटपट आले होते तितक्याच झटपट पळाले (रुस्तम अली २५०ब, मिरात-इ-अहमदी).

१३ आपला दिवाण राजा रघुनाथ याच्या सल्ल्यावरून तो असे वागला असे रुस्तम अली (२५१ अ) सांगतो.

निजामुल्मुल्क धारहून १६ फेब्रुवारी १७२३ रोजी निघाला. यावेळी हैदर कुलीखानाने अहमदाबाद सोडले असावे कारण ५ मार्च १७२३ रोजी तो उदेपूराहून दिल्लीच्या बाजूला ३२ मैल जाऊन पोचला होता; त्यावेळी महाराणा संग्रामसिंगाने त्यास शिदोरीचा आणि मिठाईची पुष्कळ ताटे पाठविली होती अशी खबर बादशाहाला ११ मार्च रोजी पोहोचल्याचा उल्लेख आहे; निजामुल्मुल्काचा तळ जालोद येथे असता इवजखान, अब्दुर्रहीमखान, रिआयतखान आणि दख्खनचे काही राजे यांनी मिळून बनलेला एक फौजफाटा दख्खनमधून येऊन त्याला मिळाला. इवजखान आणि इतर मुघल अमलदार यांना दक्षिणेस परत पाठविले. वजिराचा जंगली शाहजादा या टोपण नावाचा चुलता हमीदखान याला नायब सुभेदार नेमून, अहमदाबाद, गुजरात सुभा त्याच्याकडे सोपविला ( कामवर २६१, मिरात, खाफीखान ९४७ ).

यानंतर निजाम माळव्यास परतला. तेथे त्याला भोपाळच्या दोस्त मुहम्मदखानाशी असलेले जुने भांडण निपटावयाचे होते. काही वर्षांपूर्वी म्हणजे १७२० साली सय्यिद बंधूंनी निजामुल्मुल्कास पकडण्यासाठी सय्यिद दिलावर अलीखान याच्या नेतृत्वाखाली पाठविलेल्या फौजेत दाखल होण्याचे पाप त्याच्या हातून घडले होते. त्यावेळी झालेल्या लढतीत पुष्कळ लोक ठार झाले. पण हा दोस्त मुहम्मद आपल्या सुरक्षिततेसाठी रणांगण सोडून पळाला होता. आता त्याचा बदला घेण्याची वेळ येऊन ठेपली होती. २३ मार्च १७२३ रोजी वजीर पुन्हा माळव्यात दिसतो. दोस्त मुहम्मदखानावर चालून जाण्यासाठी त्याने फौजफाटा धाडला. दरम्यान दोस्त मुहम्मदखानाने भोपाळगड येथे आसरा घेतला होता. दोन पक्षांमधील थोड्याफार झाल्या त्या झटापटी या ठिकाणीच घडल्यानंतर २४ मे १७२३ रोजी दरबारास पोहोचलेल्या खबरीनुसार इस्लामगड हा छोटा किल्ला सर झाला होता. झाल्या गोष्टीबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यासाठी व शरणागती दर्शविण्यासाठी यार मुहम्मद-खानाला त्याच्या बापाने निजामुल्मुल्काचेकडे पाठविले. या पवित्र्यामुळे निजामुल्मुल्काचे समाधान झाले व सलोख्याच्या अटी त्याने ठरविल्या. सिरोंज मुक्कामी २५ मे १७२३ रोजी वजिराने आपला दुसरा चुलत भाऊ अजीमुल्लाहखान ( रिआयतखानाचा मुलगा) यास माळव्याचा नायब सुभेदार नेमले तर राव ( खान किंवा जान ) चंद याचा मुलगा चंदरबंस याला इस्लामगढचा किल्लेदार नेमले. तदनंतर दिल्लीचा परतीचा प्रवास सुरू झाला. तोफखाना आणि छावणीचे अवजड सामान सिरोंजला ठेवले. ७ जून १७२३ रोजी वजीर नरवरला आला. २ जुलै रोजी तो राजधानीच्या दक्षिणेला मैल-दोन मैलावरील खिज्राबादला आला. त्याला सन्मानपूर्वक दरबारी घेऊन जाण्यासाठी समसामुद्दौलह यास सामोरा पाठविण्याची तजवीज होऊन तो त्याप्रमाणे आला होता. दुसऱ्या दिवशी वजिराने बादशाहाची दरबारात भेट घेतली. त्यावेळी त्याचा धाकटा मुलगा अहमदखान त्याच्या सोबत होता ( रुस्तमअली २५१-ब, कामवर २६३–२६५, वारिद १२ ).

## ३५ : निजामुल्मुल्क वजीरी सोडतो आणि दक्षिणेला परततो

दिल्लीस परतल्या परतल्या ( ३ जुलै १७२३ ) निजामुल्मुल्काने सार्वजनिक व्यवहार पुन्हा एकदा सुरळीत स्थितीत लावण्याचा प्रयत्न आरंभिला. पण आपले प्रयत्न लटके पाडले जात आहेत असा त्याला प्रत्येक खेपेला अनुभव येऊ लागला. बादशाहाची आवडती कोकी आणि तिचे मदतनीस म्हणजे हाफिज खिदमतगारखान हा खोजा आणि जफरखान रोशनुद्दौलह

ही मंडळी प्रत्येक बाबीत नाक खुपसत आणि प्रत्येक नेमणुकीसाठी प्रचंड द्रव्य घेत. याबाबत कितीही अदबीने निषेध नोंदविला व तो थेट बादशाहाकडे नोंदविला तरी ते सर्व निरुपायाचे ठरे. या परिस्थितीमुळे मनात निर्माण होणाऱ्या कडवटपणाने एक लेखक लिहितो, "बायका चार भिंतींच्या आत स्वतःला कोंडून घेतल्यासारख्या बसतात तसे बादशाहाचे वागणे आहे. यात चांगले कशास म्हणावे ? जर सार्वभौम सत्ताधीश बायकी सवयींच्या आहारी जातील आणि त्यांच्या केशकलापात स्वतःला अडकवून घेतील तर चांगला मुसलमान जास्तीत जास्त काय करू शकतो ? तो करू शकतो ते एवढेच की, देश सोडून हाज यात्रेसाठी जाऊ शकतो आणि यात्रेसाठी लागणारा पैसा गाठीशी नसेल तर परलोकी जाता यावे म्हणून विषाचा एक घुटका घेऊन, या जगाचा निरोप घेऊ शकतो" ( अहवाल १८१, १९६ अ ). यात भर म्हणून की काय समसामुद्दौलहची तणातणी चाले. याचा स्वतःचा एक गट होता. त्यात प्रामुख्याने हिंदुस्थानी लोक आणि हिंदू राजे यांचा समावेश होता. महसूल वसुलीचा ठेका देण्याची पद्धत अलीकडच्या काळात निर्माण झाली होती. लाचलुचपतही वाढली होती. पदावर नेमणूक मिळविण्यासाठी नजराणा घेणे अगर उचल घेणे या नावाखाली हा भ्रष्टाचार चाले. निजामुलमुल्काने या गोष्टींना प्रतिबंध करण्याच्या दिशेने आपले प्रयत्न मुख्यत्वेकरून चालू ठेवले. जहागिरीखालचा जमिनींचा विस्तार कमी करावा, ज्या जहागिरी कारभाराच्या दृष्टीने अधिक किचकट आहेत त्या अधिक मातबर उमरावांना द्याव्या आणि ज्या जहागिरीतून प्राप्ती सहजपणे होऊ शकते, त्या जहागिरी छोट्या मनसबदारांना द्याव्या अशी त्याची इच्छा होती. या सर्व गोष्टी अतिशय अर्थपूर्ण होत्या आणि त्या स्तुत्य होत्या. जिझिय्या कराचा तिसरा प्रस्ताव मात्र पहिल्या दोन प्रस्तावांपेक्षा वादग्रस्त होता. मुसलमान-धर्मवेडेपणा हे या प्रस्तावा-मागचे कारण असावे किंवा औरंगजेबाच्या कृतीचे अंधानुकरण करण्याचाही हेतू त्यामागे असावा. इराण हा देश पुन्हा जिंकून घेण्याची एक भयानक योजना वजिराने मांडली होती, असा एक उल्लेख इतिहासकार खाफीखानाने केला आहे. त्या देशातील सफवी या राजवंशाला नुकतेच सत्ताभ्रष्ट व्हावे लागले होते. मीर वईस याचा मुलगा मुहम्मद हुसैन हा कंदाहारचा घिलझाई सरदार या सफवींच्या सत्ताभ्रष्टतेस कारणीभूत झाला होता. एके काळी हुमायुनाला आश्रय देणाऱ्या सफवी वंशाविषयी कृतज्ञता दर्शविण्याच्या निमित्ताने घिलझाईकडून इराण जिंकून घेऊन सफवींना तो देण्याची अशी वजिराची योजना होती, म्हणून तो सांगतो. सफवी वंश सत्ताभ्रष्ट झाला या घटनेची बातमी नुकतीच ( १० मार्च रोजी ) दिल्लीस येऊन पोहोचली होती. त्यामुळे या प्रकरणी अशाप्रकारची काही संदिग्ध बोलणी झाली असतीलही; पण सावधपणाविषयी वजिराची ख्याती पाहाता, सदर योजना त्याच्या स्वभावाशी काहीशी विसंगत वाटते. (खाफीखान ९४७, गुलामअली ४५-अ).

वजिराने कोणतीही हालचाल केली किंवा कोणतीही गोष्ट करण्याचे ठरविले की, त्याचा इतका चुकीचा अर्थ लावण्याचा प्रकार सुरू होई की, शेवटी मुहम्मदखानाच्या मनात त्याच्याबाबत शंका अथवा संशय निर्माण होई. गोंधळाची परिस्थिती काहीजणांच्या फायद्याची होती. ही मंडळी निजामाच्या योग्य कार्यपद्धती घालून देण्याच्या प्रयत्नाबद्दल नापसंती दाखवीत. "माणसाचा सैतान माणूसच होय" अशा अर्थाची नाही तरी म्हण आहेच. खुद्द बादशाहादेखील तरुण म्हणजे पोरकटच होता. त्याच्या भोवती खुशमस्कऱ्यांचे कोंडाळे होते. बादशाहाच्या हीन वासना भागविण्यात हे खुशमस्करे तत्पर असत.

या खासगीतील सवंगड्यांचा सल्ला वजिराच्या सल्ल्यापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे असे बादशहाला वाटत असल्याचे त्याच्या वागण्यावरून भासे. एक लेखक ( खुशहालचंद ) सांगतो की, "सगळेच जण वजीर किंवा महसुलाचे कारभारी बनले होते." मुहम्मदशाहाच्या मनात असे पक्के भरवून दिले होते की, निजामुल्मुल्काचा विचार बादशहाला तख्तावरून खाली ओढून शाहझादा इब्राहीमला तख्तावर बसविण्याचा आहे. म्हणून निजामाचा वरचष्मा होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे; मुहम्मद अमीनखानाचे सत्ता उपभोगण्याचे दिवस आले असता त्याने जशी दांडगाई केली तशी दांडगाई निजामाकडून होऊ द्यावयाची नसेल तर सतत जागृत रहाणे निकडीचे आहे असे हे खुशमस्करे बादशहास सांगत. बादशहाचे हेच तथाकथित मित्र निजामुल्मुल्काकडे जात आणि बादशाह मूर्ख आहे; तो कुचकामाचा, बाहेरख्याली आणि तख्तावर बसण्याची त्याची मुळीच लायकी नाही असे सांगत. अशा बादशहाच्या जागी शाहझादा इब्राहीमला का आणू नये? असल्या उचापतीपायी बादशाह आणि वजीर यांची मने एकमेकांविषयी संशयग्रस्त बनली. फर्रुखसियर आणि अब्दुल्लाहखान यांच्या बाबतीत जसे घडले तसेच पुन्हा घडू लागले. निजामुल्मुल्क दरबारी येण्यास वारंवार नकार दर्शवू लागला आणि जेव्हा जेव्हा दरबारास हजर होई तेव्हा तेव्हा आपल्यावर बळजोरी होणार नाही याची तो कसून खबरदारी घेई. बादशहाला पदच्युत करण्याचे निजामुल्मुल्काने स्वप्नातही आणले नाही. पण वजिराचे दक्षिणी अधिकारी आणि कमरुद्दीन वगळता सगळे मुघल, वजिराने नसते खुणावण्याचा अवकाश की, तो सांगेल ते करण्यास तत्पर असल्याचे पाहाता बादशहास पदच्युत करणे त्याला सहज शक्य झाले असते (खाफीखान ९४८, ४९; अहवाल १८२–ब–१८३–अ).

## ३६ : खन्नाची हकीगत

एकमेकावरचा विश्वास उडाला असल्यामुळे अव्यवस्था किती माजली होती याचे गमक म्हणून एक, या काळातील हकीकत सांगता येईल. खन्ना नावाचा एक गाय-कसाई होता. सदर खन्ना लुटारूंच्या एका छुप्या टोळीचा म्होरक्या होता. अमलदारांची आणि धनाढ्य व्यापाऱ्यांची घरे लुटणे हा याचा उद्योग होता. यात काही माणसे चोराकरवी ठार वा जखमीही झाली होती. त्याबाबत बादशहाकडे पोटतिडकीच्या तक्रारी गेल्या; तेव्हा त्याने शहर कोतवालाला ( याविरुद्ध ) हुकूम सोडले. सुव्यवस्थेचा उपमर्द करणाऱ्या या सर्व गोष्टींच्या बुडाशी खन्नाची टोळी आहे; त्यास कोकाखानाचे संरक्षण लाभले आहे; खुद्द कोकाखान मातबर आहे; तो चांगला लढवय्या आणि कुस्तीगीर आहे अशा स्थितीत त्याला धरणे भयप्रद आहे वगैरे गोष्टी कोतवालाकरवी बादशहास समजल्या.

एके दिवशी कोकाखानाबरोबरच्या लटांबरात हा खन्ना बादशहाच्या महालात आला. तेव्हा बादशहाने त्यास पकडण्याचा हुकूम केला. खन्नाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. महालातील रक्षकांनी त्याला वेढले; त्याच्यावर दगडविटांचा मारा केला आणि अखेर त्याला जिवंत पकडले. बादशहाने त्यास कैदी म्हणून ठेवण्यासाठी पोलीस कार्यालयाच्या (चबुतरा) ताब्यात दिले. तेथील कोतवालाने त्याला खूप बदडले; त्याचा छळ केला. तेव्हा चोरलेला माल आणि २५००० रुपये त्याच्या घरात मिळाले.

गुन्ह्यातील आपला मदतनीस म्हणून मुहम्मद घौस याचे नाव त्याने घेतले; तेव्हा पुढची पायरी म्हणून त्याला अटक झाली. तो शाही चाकरीत अधिकारी होता; त्याला ५०० ची मनसब व चांगली जहागिरीदेखील होती. त्याने आरोप कबूल केला आणि चोरलेल्या बऱ्याच मालमत्तेचा ठावठिकाणा सांगितला. शेवटी उच्चभ्रू समजले जाणारे बरेच लोक चोरीमारीत आणि चोरांना आसरा देण्याच्या उद्योगात गुंतल्याचे उघडकीस येऊन त्यांना अटक झाली.

आपले प्राण पणास लागले आहेत हे लक्षात येताच, रोमांचकारी प्रसंग पाहाण्यास बादशाहाला आवडते या गोष्टीचा फायदा उठविण्याचे खन्नाने ठरविले. वाघाशी झटपट करण्यास मी तयार आहे; वाघाने मला खाल्ले तर उत्तमच; पण वाघास जर मी मारले तर मात्र मला मोकळे करावे असा निरोप त्याने तुरुंगप्रमुखाकरवी पाठविला. या प्रस्तावास बादशाहाने मान्यता दर्शविली. महालाच्या झरोक्याखाली यमुनेचे वाळवंट दिसेल अशा पद्धतीने एक आडोसाही उभा करण्यात आला. हे सर्व प्रकरण निजामुल्मुल्काच्या कानावर गेले. असे करणे अल्लाची प्रतिमा नष्ट करण्यासाठी आहे असे त्याला वाटले; चोरीस गेलेल्या बऱ्याच द्रव्याचा अजून ठावठिकाणा लागावयाचा आहे आणि तपास पूर्ण होईपर्यंत कैद्यास मारणे उचित होणार नाही असे सांगूना निजामुल्मुल्काने या प्रकाराविरुद्ध आपला निषेध व्यक्त केला. अशा प्रकारे वाघाबरोबरची झटापट प्रथम लांबणीवर पडली व नंतर ती पुन्हा कधीच झाली नाही. (शिवदास ८५ ब–८६ ब.)

## ३७ : निजामुल्मुल्क संघर्ष थांबवितो

हे विषयांतर संपवून आपण निजामुल्मुल्काच्या वजिराच्या नात्याच्या स्थितीकडे वळू या काळात वजिराचा अगदी जवळचा नातेवाईक असूनदेखील कमरुद्दीनखान वजिरापासून अलग राहिला. तो दारू फार पीत असे व त्यामुळे सार्वजनिक व्यवहारात परिणामकारक-रीत्या भाग घेण्यास तो अपात्र ठरला होता, असे सांगतात. त्याने फटकून वागण्याचे हेही एक कारण असू शकेल. त्याच्या या वागण्यामुळे त्याच्या नेतृत्वाखालचे ७००० मुघल तटस्थ राहिले. लहान मुलांचे खेळणे समजून सरकारी व्यवहार चालत. "लष्कर प्रमुख महसुली कामकाज निकालात काढीत आणि काझीच्या ऐवजी रात्रीचे पहारेकरी कज्जाखटल्यांचा निकाल करीत." बादशाह नुसता सुखविलासात डुंबत होता; ते पाहून मत्सरग्रस्त उमराव दारूत डुंबत आणि शासनाचे नोकर मात्र उपासमारीने खंगत होते. बादशाहाभोवती घोटाळणाऱ्या उमरावांचे आपसातील गुप्त हेवेदावे कधीकधी चव्हाट्यावर येत. समसामुद्दौलह याचा भाऊ मुजफ्फरखान हा बादशाहाचा एक मौजमित्र होता. त्याच्याशी आणि त्याच्या भावाशी तंटा असलेले बुर्हानुल्मुल्क सआदतखान आणि नवाब रोशनुद्दौलह हे दोघे बादशाहाचे जिवलग दोस्त होते. मुज्जफरखानाच्या अधिकाऱ्यांमध्ये सआदत-खानाच्या नैशापूर या मूळ गावचा रहिवासी एक फार्सी गृहस्थ होता. या माणसाच्या हिशेब-व्यवहारात गैरव्यवस्था झाली; पैसे भागविणे त्याला अशक्य झाले. माझा जामीन घेऊन सदर माणसाची सुटका करावी असे सआदतखानाने मुजफ्फरखानास एके दिवशी खुल्या बैठकीत सांगितले. त्यास मुजफ्फरखानाने मर्मभेदक उत्तर दिले. सआदतखान त्या उत्तराने जरासा गोंधळला पण आपल्या

प्रस्तावाचा हेका त्याने सोडला नाही. तेव्हा मुजफ्फरखान आणखी क्रुद्ध झाला. राजाची तलवार त्याच्या ताब्यात होती; तिच्या मुठीस त्याने हात घातला. सआदतखानाच्या हातात वारा घेण्याचा पंखा होता. तो मुजफ्फरखानाच्या टाळक्यात हाणण्याचा आविर्भाव सआदत-खानाने केला. रोशनुद्दौलहने कानउघाडणी केली; पण अधिकाऱ्यांनी त्याला तेथून बाहेर नेले. मुजफ्फरखान लगबगीने दालनातून बाहेर आला आणि त्याने आपल्या बंदुकचींना सज्ज राहण्याचा हुकूम दिला. रोशनुद्दौलह याने आपल्या चाकरीतील १०,००० अफगाणांना बोलावणे पाठविण्याबद्दल बादशाहाची परवानगी मिळविली व अशाप्रकारे होऊ घातलेल्या चकमकीस प्रतिबंध केला. दुसऱ्या दिवशी समसामुद्दौलह याने बादशाहाकडे तक्रार गुदरली आणि बुर्हानुल्मुल्क याबर हल्ला करण्याचा आपला मनोदय व्यक्त केला. मी काय करू शकतो याचा पाढा त्याने घमेंडीने वाचला. रोशनुद्दौलह म्हणाला बुर्हानुल्मुल्काच्या केसास धक्का लागण्यापूर्वी तो आणि त्याचे पन्नास हजार अफगाण प्राणास मुकणे अटळ आहे. तरी समसामुद्दौलहचा लढतीचा हेका चालूच राहिला. तेव्हा रोशनुद्दौलहच्या विनंतीवरून मुहम्मद-खान बंगश रोशनुद्दौलहच्या फौजेस व तोफदळास येऊन मिळाला. कमरुद्दीनखानाने मध्यस्थी केली आणि हा मार्ग सोडून देण्याचा सल्ला समसामुद्दौलहला दिला. दोन्ही झगडेखोरांना दरबाराब ाहेर घालविले. सआदतखानाला अयोध्येला तर मुजफ्फरखानाला अजमेरला धाडण्यात आले. ११३६ हि. च्या आरंभीच्या (आक्टोबर १७२३) सुमारास हा पेचप्रसंग कळसास पोहोचल्याचे दिसते. या सर्व प्रकाराबद्दल वाटणारा विषाद व्यक्त करण्यासाठी वजिराने दरबारास येण्याचे सोडून दिले. आपला राजीनामा त्याने पाठवून दिला. पण शहाणपणा आणि सबूरी दाखवून आणखी कोणतीही निर्णायक कृती त्याने केली नाही. मात्र दक्षिणेला परतण्याचा मनसुबा त्याने रचला असल्याचे मानीत होते. त्याप्रमाणे त्याचे दक्षिणेस जाणे झाल्यास ते आपल्या हिताचेच होईल असे दोन्ही पक्षांना वाटत होते. जर निजामुल्मुल्काशी सलोखा केला आणि त्याला दरबारातून रजा घेण्याची परवानगी दिली तर त्याचा निकाल लावणे सोपे जाईल असे बादशाहाच्या साथीदारांना वाटत होते. उलट पक्षी निजामुल्मुल्काला वाटत होते की, दक्षिणेतील आपले बस्तान टिकवावयाचे असेल तर आता दक्षिणेत जातीने जाणे भाग आहे. बादशाहाला नुकताच मुलगा झाला होता व त्याकरिता नाममात्ररीतीने दख्खनचा सुभा सोडण्याविषयी निजामाशी सूतोवाच झाले होते. दख्खनचा सुभा माझाच आहे; तो मजकडेच राहिला पाहिजे; कारण तो मी माझ्या उजव्या हाताच्या बळावर मिळविलेला आहे असे बादशाहाला ठणकावून सांगणे निजामाला शक्य नव्हते. याबाबत बरीच निरोपानिरोपी झाली. अखेर त्यातून तडजोड झाली आणि ३१ आक्टोबर १७२३ रोजी निजामुल्मुल्क शाही दरबारात पुन्हा एकदा हजर झाला. (सियर, खंड एक, २६७; गुलामअली मुकदमा, ४५ब-४९अ; अहवाल १८४अ-१८५ब; खुशहाल १०४२अ.)

हा वरकरणी दिसणारा सलोखा झाल्यानंतर महिनाभराने निजामुल्मुल्काने दिल्लीतील न मानवणाऱ्या थंडीची सबब सांगून संभळ आणि मुरादाबाद या आपल्या जहागिरींच्या गावी शिकार-सहलीसाठी जाण्याची अनुज्ञा मागितली. १७ डिसेंबर १७२३ रोजी बादशाहाने त्यास निरोप दिला. २२ तारखेला निजामुल्मुल्काने यमुना ओलांडली आणि नदीकिनारी तळ टाकला. येथे बादशाह त्याच्या भेटीला आला. खालशाचा दिवाण राजा गुजरमल सक्सेना याच्या मध्यस्थीने सलोख्याच्या काही अटी ठरवता याव्या या आशेने निजामुल्मुल्क

आसपासच्या भागात घुटमळत राहिला. ( कामवर २६७, खाफीखान ९४९, गुलामअली ४९अ, खुशहाल १०४३अ, अहवाल १८४अ.)

आपले डावपेच बदलण्यासाठी मुहम्मदशाहास उद्युक्त करणे अजूनही शक्य होते. त्यासाठी निजामुल्मुल्काच्या वतीने मुनीश नावाचा एक खोजा बादशाहाकडे गेला. राजा गुजरमल यानेदेखील तसाच दृष्टिकोण ठेवण्याचा आग्रह धरला; यश येईल असे त्याला वाटलेही. पण ती आशा अगदी धुळीस मिळाली. कारण २६ डिसेंबर १७२३ रोजी राजा अकस्मात मरण पावला. वजिराच्या मागण्याविषयी एक लेखी निवेदन राजा गुजरमलने तयार केले होते व त्यावर बादशाहाची मान्यतादर्शक सही घेण्याची त्याला उमेद होती. फर्रुखसियरच्या कारकिर्दीत 'बनियाने', म्हणजे रतनचंदाने सुरू केलेली, करवसुलीचा ठेका देण्याची पद्धत पूर्णपणे नष्ट करावी हे निजामाकडूनचे मुख्य मागणे होते. दरबारात बादशाहास सदरचा कागद वाचून दाखवीत असता त्यास अचानक फेफरे आले. कमरुद्दीनखानाने आपल्या खांद्यावरची शाल त्याच्या अंगावर टाकली. त्याला पालखीत घालून त्याच्या घरी नेले. घरी येता क्षणीच तो मरण पावला. जेव्हा हे निजामुल्मुल्कास कळले तेव्हा प्रथम त्याने मृतास आदरांजली वाहिली आणि पुढील वाटाघाटीबाबतची सगळी आशा सोडून देऊन मुरादाबादेचा रस्ता धरला. त्याचा सर्वांत थोरला मुलगा गाझीउद्दीनखान याला नायब वजिराचे पद ६ जानेवारी १७२४ रोजी दिले. (खुशहाल १०४३अ.)

१२ फेब्रुवारी रोजी निजामुल्मुल्क अनूपशहर येथे असल्याची खबर मिळते. त्यावेळी त्याची आग्र्यास कूच करण्याची इच्छा दिसते. आपण अजून दरबारचे मित्र आहो हा बहाणा वठविता यावा म्हणून त्याने दिल्लीतील आपल्या मुनिमाकरवी १८ फेब्रुवारी रोजी बादशाहास भेटवस्तू पाठविल्याचे आढळते. आग्र्याहून आपण थेट दिल्लीलाच परतू अशा आशयाची लांबलचक विनंतीपत्रे दरबारास पाठविण्याचे त्याने चालू ठेवले. त्यानंतर बादशाहाच्या मान्यतेसाठी अहवाल सादर केला की, माझ्या आणि माझ्या मुलाच्या ताब्यातील माळवा आणि गुजरात या सुभ्यांवर मराठ्यांनी हल्ले चढविलेले असून त्यांना हुसकून लावण्यासाठी मला दक्षिणेकडे कूच करणे भाग आहे. त्यावेळी सोरों या गंगा नदीवरील गावी तो होता. जलदीच्या मजला मारून, जलेसर आणि आग्रा येथून गुजरून, तो नरवरला पोहोचला व तेथून माळव्यातील उज्जयिनीला आला. त्याची फौज आग्र्याच्या दक्षिणेस असलेले ढोलपूर तसेच चंबळ नदी ओलांडून ग्वाल्हेरला येऊन दाखल होईपर्यंत सामान्य शिपायांना आपले मुक्कामाचे अंतिम उद्दिष्ट कोणते याची कल्पना आलेली नव्हती. पण दिल्ली सोडताना वजिराने आपले सगळेच्या सगळे कुटुंब बरोबर घेण्याची सावधगिरी घेतली आहे, या गोष्टीवरून काहींना मात्र अगदी सुरुवातीपासूनच अंतिम उद्दिष्टाची कल्पना येऊन चुकली होती. (अहवाल १८५अ.) तो उज्जयिनीला येऊन पोहोचेपर्यंत मराठ्यांनी नर्मदा दुसऱ्यांदा ओलांडिली होती. म्हणून तो आता दोस्त मुहम्मदखानाच्या मुलुखात गेला आणि सिरोंज गावाजवळच्या सिहोर गावी त्याने तळ दिला. पण हे बहाणेदेखील तत्काळ टाकून देऊन निजामुल्मुल्काने दक्षिणेत पोहोचण्याची शक्य तितकी घाई केली. तो बुर्हानपूर या खानदेशातील गावी रमजान महिन्यात (मे-जून) येऊन दख्खनची राजधानी औरंगाबाद या शहरी तो जिल्काद (जुलै-ऑगस्ट १७२४) महिन्यात पोहोचला. [कामवर २६८; खाफीखान ९४९-५२; बुर्हान १६९अ; मा. उ.; खंड तीन, ७३९.]

## ३७ : दक्षिणेत निजामुल्मुल्कावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न

दरम्यान, दिल्ली दरबारातील निजामुल्मुल्काचे शत्रू गप्प बसून राहिले नव्हते. ३ फेब्रुवारी १७२४ रोजी म्हणजे वजिराने हात दाखविण्याच्या अगोदर हैदराबादचा सुभेदार मुबारिजखान याचा मुलगा अब्दुल्-मअबूदखान यास एक फर्मान आले. तान्हा शाहज़ादा शहरयारशाह याचा नायब म्हणून संपूर्ण दख्खन तुझ्या वडिलांना कारभारासाठी बहाल करण्यात आली आहे असे सदर फर्मानात म्हटले होते. सदर तान्हा शाहज़ादा लवकरच मयत झाला. तेव्हा सदरची दख्खनची नेमणूक खुद्द मुबारिजखानाच्या नावे केली आणि शाही खजिन्यातून त्याला पाच लाख रुपयांचे अनुदान दिले. शिवाय दख्खनच्या महसुलातून कित्येक लाखांचे द्रव्य दिले. पुरेसे सैन्य त्यास उभे करता यावे यासाठी ही तरतूद करण्यात आली. निजामुल्मुल्क आणि मुबारिजखान या दोघांचाही मूळ देश एकच होता. पण पद आणि सत्ता यांचा लोभ दाखविल्याने निजामुल्मुल्काला स्वदेशीय समजून त्याच्याविरुद्ध उठण्याबाबत मुबारिजखानाकडून काही कसूर होत असल्यास ती भरून काढली जाईल असे दरबारी लोकांना वाटले. मुबारिजखानाला जाऊन मिळावे आणि आपली सर्व शक्ती एकवटून त्यास मदत करावी अशा आशयाचे इतर हुकूम निजामुल्मुल्काचा नायब इवजखान, बहादुरखान, अब्दुन्नबीखान, अब्दुल्-घफ्फारखान, अमीनखान, सआदतुल्लाहखान, मराठ्यांचा राजा शाहू तसेच रावरंभा यांना पाठविले. नंतर जवळजवळ पाच महिन्यांनी म्हणजे २२ जुलै १७२४ रोजी नायब वजीर गाझीउद्दीन यास उघड उघड बाजूला सारले आणि मुहम्मद अमीनखान चीन याचा मुलगा कमरुद्दीनखान इतिमादुद्दौलह याला वजीर केले. [कामवर २६७, वारिद १३, १४, खुशहाल १४४अ.]

मुबारिजखान हा त्यावेळी हैदराबादचा सुभेदार होता; त्याला आता निजामुल्मुल्काचा प्रतिस्पर्धी बनविले. या मुबारिजखानाचे नाव ख्वाजा मुहम्मद असे होते. तो बाल्खचा मूळ रहिवासी होता. ११३७ हि. (१७२४ इ.) मध्ये तो साठ वर्षांपेक्षा थोड्या अधिक वयाचा होता. पोरवयाचा असताना, त्याची आई त्याला घेऊन हिंदुस्थानात आली. तद्नंतर काही दिवसांनी त्याला दरबारातील विविध कार्यालयांत शाही चाकरी करावयास मिळाली. पुढे आलमगीराची बहाल मर्जी असलेल्या इनायतुल्लाहखान काश्मीरीच्या मुलीशी विवाह केल्यामुळे त्याला चांगलेच वजन प्राप्त झाले. आलमगीराचा सर्वात धाकटा मुलगा कामबक्ष याचा बक्षी म्हणून आणि तद्नंतर संगमनेरचा फौजदार म्हणून त्याला नेमणुका मिळाल्या. अमानतखान हा त्याला मिळालेला पहिला किताब होय. आलमगीराच्या अमदानीच्या ४७ व्या वर्षी (१११४-१११५ हि., १७०३-१७०४ इ.) औरंगाबादेपासून ४८ मैलांवरील वैजापूर येथील फौजदारी त्यास जादा कामगिरी म्हणून मिळाली. बहादुरशाहाच्या कारकिर्दीत सुरतेचा ताबा त्याजकडे होता. बहादुरशाहाचा वजीर मुन्अिमखान याचे त्याविषयी फारच चांगले मत होते. त्याच्याकडे नुसता दृष्टिक्षेप टाकला तरी, त्याच्या दिसण्यावरून त्याचे उत्तम गुण नजरेत भरतात असे मुन्अिमखानाला वाटे. गाझीउद्दीनखान फीरूझ जंग याच्या मृत्यूनंतर ११२२ हि. (१७१० इ.) मध्ये त्याला अहमदाबाद गुजरातच्या कारभारावर बढती मिळाली. जहाँदार-शाहाने त्यास माळव्याला बदलले (१७१२ इ.) आणि त्या सुभ्यातील रामपुरा येथील इस्लामखानावर विजय मिळविल्याबद्दल त्याचा सन्मान करण्यासाठी त्यास शाहामतखान असा किताब दिला. फर्रुखसियरच्या कारकिर्दीच्या आरंभी (१७१३ इ.) त्यास पुन्हा एकदा

गुजरातचा कारभार मिळाला. पण तो कारभार दोनएक आठवडे सांभाळतो न सांभाळतो तोच दाऊदखान पन्नी याने त्याच्यावर कुरघोडी केली. तेव्हा दक्षिणेतील हैदराबाद सुभ्यावर याची बदली करून त्यास इमादुल्मुल्क मुबारिजखान बहादुर, हिजब्रजंग असे किताब दिले. त्याने जवळजवळ बारा वर्षे हैदराबादचा राज्यकारभार पाहिला. हुसैन अलीखान बार्हा इथे सुभेदार असताना त्याने मराठ्यांना महसुलातील चौथा हिस्सा म्हणजे चौथ, देण्याचे पूर्वी कबूल केले होते. मात्र त्याने ती चौथ दिली नसल्याचे दिसते. चौथ देण्याऐवजी तो शक्य होईल तेथे मराठ्यांशी लढत राहिला. या लढती देण्यासाठी त्याने जिवाचा आटापिटा केला हे जरी खरे असले तरी मराठे मात्र संधी मिळेल तेव्हा, सदासर्वत्र, हाती लागेल ते पळवून नेऊन चौथच्या रकमेपेक्षाही जास्त द्रव्य गोळा करीत. बहुतेक सगळे रस्तेदेखील पायाखाली घालणे अशक्य व्हावे इतके असुरक्षित झाले होते. [मा. उ., खंड तीन, ७२९; खाफीखान ९६३; वारिद ५४.]

निजामुल्मुल्क पहिल्या खेपेला दक्षिणेत आला (१७१९-१७२० इ.), तेव्हा त्याने मुबारिजखानाला पत्र लिहिले होते. निजामुल्मुल्काच्या मदतीसाठी मुबारिजखान कूच करीत निघाला. पण सय्यिद दिलावर अलीखान आणि सय्यिद आलिम अलीखान यांचा पराभव करून निजामुल्मुल्क औरंगाबादेस येईतोपर्यंत तो त्यास येऊन मिळाला नव्हता. नंतर १७२१ इ. मध्ये निजामुल्मुल्काने दरबारास परतण्याचा बेत केला. पण मुबारिजखानाचा त्यास विरोध होता. औरंगाबाद आणि बुर्हानपूर यांच्या मध्यावर असलेल्या फर्दापूरच्या खिंडीत ते पोहोचले तेव्हा, आल्या पावली मागे वळा आणि दक्षिणेस अदोनीकडे निघा, असा सल्ला मुबारिजने नवाबाला दिला. तद्नंतर अफगाण म्होरक्यांना आपल्या हुकुमतीखाली आणण्यासाठी निजामुल्मुल्काने केलेल्या हालचालीस मुबारिजखानाचा जो थोडाफार पाठिंबा लाभला तो मनापासून नव्हता. आपले आणि अफगाण म्होरक्यांचे हितसंबंध सारख्याच प्रकारे गुंतलेले आहेत, त्यांच्याप्रमाणेच आपणही सिकाकोल आणि अन्य ठिकाणच्या शाही जमिनी बळकावल्या आहेत असा विचार मुबारिजखानाने मनाशी केला. यावेळी निजामुल्मुल्काने त्याच्याविषयी वाटणारी आपली नाखुषी उघड केली नाही. पण जेव्हा तो वजीरपदावर विराजमान झाला तेव्हा मुबारिजखान, त्याची मुले आणि त्याचे अनुयायी यांना जहागिरी मिळण्याबाबत त्याने आडकाठ्या आणल्या. इतकेच काय पण शाही मुलुखातील वसूल सुभेदाराकडून येणे लागत असून तो तावडतोब भागवावा लागेल असे त्याने सुभेदाराच्या दरबारी असलेल्या मुनिमाला बजावले. मुबारिजखानाला दख्खनच्या बाहेर काढण्याचाही प्रयत्न वजिराने केला. त्यासाठी काबुलचा कारभार देण्यास (त्यावेळी काबुलची जागा रिकामी झाली होती) मुबारिजखानाखेरीज दुसरा कोणी लायक माणूस नाही अशी जबरदस्त शिफारस देखील त्यांने केली. नंतर माळवा आणि गुजरात यांच्या बदल्यात दक्षिण घेण्याबाबत बोलणी सुरू झाली तेव्हा खुद्द निजामुल्मुल्काने आपला उत्तराधिकारी म्हणून दक्षिणेसाठी मुबारिजखानाचे नाव सुचविले. दक्षिणेवर अगदी नवखा माणूस नेमला जाण्याऐवजी मुबारिजखान परवडला असा विचार निजामुल्मुल्काने केला. [मा. उ. : खंड तीन, ७२९-७४ इ.]

या सुमारास इनायतुल्लाहखानाने दिल्लीहून आपल्या जावयास पत्र पाठविले, दक्षिणेतील शाही सुभ्यावरील नेमणूक स्वीकारण्याची त्याला गळ घातली आणि निजामुल्मुल्कास सक्रिय विरोध करण्याची चिथावणी दिली. असे केल्यास मुहम्मदशाहाची फार मोठी कृपा संपादन

करणे शक्य होईल असे त्याने कळविले. आपण यापूर्वी पाहिलेच आहे की, निजामुलमुल्काशी असलेला तंटा प्रथमावस्थेत असतानाच सदरच्या नेमणुकीचे फर्मान त्याच्याकडे रवाना झाले. ते फर्मान मुबारिजखानाला मिळाले तेव्हा तो अप्पारावाच्या ताब्यातील मच्छलीबंदरच्या जवळ असलेल्या फुलचेरीच्या वेढयात गुंतून पडला होता. हा वेढा सहा ते आठ महिने चालला. आणखी थोडे दिवस ती जागा लढवून, शेवटी तह होऊन हे प्रकरण निकालात निघाले. नंतर सुभेदार आणि त्याचा फौजफाटा हैदराबादेला परतला. तेथे त्याला कर्नूलचा फौजदार बहादुरखान पन्नी, कडप्प्याचा फौजदार अब्दुन्नबीखान याचा मुलगा अबुल फतह, दिलेरखानाचा नातू अब्दुल मजीदखान, त्याचा दत्तक मुलगा अलीखान आणि कर्नाटकचा फौजदार सआदतुल्लाहखान याच्या वतीने अमीर अबू तालिबखान बदक्षी याचा मुलगा घालीबखान वगैरे मंडळी येऊन मिळाली. रायचूरचा फौजदार दिलावरखानसुद्धा येऊन मिळाला. पण पावसाळा सुरू झाला असल्याने बहुतेक लोक नंतर आपापल्या घरी परतले. दरम्यान इवजखानाने हैदराबाद मुलखात छापा घालून सरकार मेदकमधील बांसवाडा शहरात लुटालूट केली होती.[१४] या घुसखोरीमुळे भडकून जाऊन, तसेच भरीस घातले म्हणून, मुबारिजखानाने तत्काळ बदला घेण्याचा निश्चय केला. पावसाळा ऐन मध्यात असतानाच औरंगाबादच्या रोखाने कूच सुरू झाले. गोदावरी नदी त्यांनी नांदेडच्या जवळपास पार केली. वऱ्हाडातील बालाघाटमधील सरकार वाशीमखालच्या उधिया या परगण्याच्या ठाण्यापासून त्याचा तळ फार दूर नव्हता. सगळा पावसाळा येथे घालवावा असा त्याचा विचार दिसला. त्याच्याजवळ १५ हजार स्वार आणि ३०-४० हजार काळे प्यादे होते. तोडयाची बंदूक बाळगणाऱ्या शिपायाला दक्षिणेत काळे प्यादे असे म्हणत. या फौजफाटयाखेरीज त्याच्याजवळ जंजाल आणि शुतरनाल हा सरंजाम होता. मात्र मोठया तोफा दोन-तीनच होत्या. त्याने मुलुखात सगळीकडे शिपायांच्या चौक्या बसविल्या आणि त्याचे अधिकारी महसूल वसुलीच्या दौऱ्यावर गेले. [मा. उ. : खंड तीन, ७३६-३७, कामवर.]

निजामुल्मुल्क माळव्यातील भोपाळ जवळच्या सिहोर गावी असताना, त्याला औरंगाबाद येथे असलेल्या मुहम्मद इनायतखान याच्याकडून एक पत्र आले. दिल्लीतील दरबारी मंडळींच्या चिथावणीने आणि दख्खनमधील अफगाणांचा पाठिंबा लाभल्यामुळे मुबारिजखानाने संपूर्ण दख्खनच्या सुभेदारीची नेमणूक स्वीकारली असून तो हैदराबादेहून इकडे येण्यास निघाला आहे अशी खबर त्याने त्या पत्रात कळविली होती. तो तेथे येऊन कारभाराचा कब्जा घेईल, नंतर तो उत्तरेस माळव्याकडे सरकेल, तेथे त्याला दिल्लीची कुमक येऊन मिळेल आणि या दोन्ही फौजा एकत्रित करून होणारे बळ निजामुलमुल्काविरुद्ध वापरले जाईल असा कयास होता. या खबरीवर विचार विनिमय चालू असतानाच मुबारिजखानाच्या दरबारातील प्रतिनिधीने, मुबारिजखानाचा सासरा इनायतुल्लाहखान याच्या करवी समजलेला तोंडी हुकूम कळविणारे पत्र मुबारिजखानाला पाठविले होते; ते नवाबाच्या हाती पडले. त्या पत्रातील आशयावरून मुहम्मद इनायतखान याने औरंगाबाद मुक्कामाहून पाठविलेली बातमी पक्की झाली. परिस्थिती काय आहे याबाबत आता संशय उरला नाही. म्हणून कृतीचा निश्चय तावडतोब झाला. [मा. उ. : खंड तीन, ७३८.]

---

१४ हैदराबादेच्या वायव्येस ८१ मैलांवर बांसवाडा, उत्तरेस ५१ मैलांवर मेढक शहर आणि उत्तरेस १४५ मैलांवर नांदेड शहर आहे.

कसलाही विरोध न होता निजामुल्मुल्क औरंगाबादेस आला हे पाहून, हा खेळ आपण हरल्याचे मुहम्मदशाहास वाटून, त्याने आपले मनसुबे बदलले. दिल्लीस प्रकृती नादुरुस्त होत असल्यामुळे हवा पालटण्यासाठी मुरादाबादेला जाता यावे म्हणून तुम्ही दोन महिन्यांची रजा घेतलीत आणि नंतर औरंगाबादेस गेला या गोष्टीचा पाढा वाचून बादशहाने प्रतिपादिले की, दख्खनचा मुलूख ओसाड असून कसला महसूल तेथे वसूल होण्यासारखा नाही अशी तुम्ही तक्रार केल्यामुळे सदरचा सुभा मुबारिजखानाकडे वर्ग करण्यात आला; दक्षिणेचा सुभा आपणास हवा आहे अशी आपली इच्छा आम्हास दिसली असती तर आपल्या जागी माणूस नेमला नसता, तुमचा मुलगा गाझीउद्दीनखान यास तुम्ही औरंगाबादेस गेला आहा हे कळले तेव्हा तो मत्सरी लोकांच्या कारस्थानामुळे धास्तावला आणि नायब वजीर म्हणून काम पाहाण्याचे त्याने सोडून दिले; तुम्ही दरबारी परत येईतो सदरचे काम इतिमादुद्दौल्ह याजकडे सोपविण्यात आले. असे न होवो की, आपणास पदच्युत करण्यात आले आहे किंवा आपल्यावरील कृपादृष्टी ढळली आहे असा समज व्हावा; वजिराचे पद आणि सुभ्याचे पद अशी दोन्ही पदे तुम्हास बहाल झालेली आहेत; आपल्या सुभ्यात मर्जीस येईल तितके दिवस रहावे आणि इच्छा होईल तेव्हा दरबारास परत यावे; पटणा (अजिमाबाद) हा सुभा मुबारिजखानाला देऊ केलेला असून त्याच्या व्यवहारात तुम्ही हस्तक्षेप न करावा ही विनंती. बादशहाने मुबारिजखानाला लिहिले : आपले साथीदार असलेल्या स्थानिक अफगाणांची मदत घेऊन कामगिरी पत्करण्यास तयारी दर्शविलीत, म्हणूनच दक्षिणेचा मुलूख तुला बहाल केला. या आश्वासनामुळे निजामुल्मुल्काकडे दुर्लक्ष झाल्याचे निष्पन्न झाले. जेव्हा पहिला हुकूम निघाला तेव्हा निजामुल्मुल्क मुरादाबादेस होता आणि इज्जुद्दौल्ह (इवजखान) देवगडजवळ होता. औरंगाबादेस बचाव करण्यास कोणी नव्हते. निजामुल्मुल्क आणि इवजखान या दोन उमरावांचा औरंगाबाद येथे एकत्रित असलेला फौजफाटा ज्या साध्यासुध्या गढीत होता, ती गढी घेण्यास तुम्ही भलताच वेळ घेतलात. पावसाळा असल्याचे निमित्त तुम्ही पुढे केले होते. पण शूर शिपायांच्या दृष्टीने विचार करता हा पावसाळ्याचा अडथळा काही खरा मानता यावयाचा नाही. याच लटक्या सबबीसाठी तुम्ही औरंगाबादेहून साठ कोसांवर थांबलात. अशाप्रकारे सोपविलेली कामगिरी तुमच्या हातून पार पडली नाही. आम्हास सुचविल्यानुसार बहादुरखान वगैरेला लिहून देखील त्यांनी काही केल्याचे आढळत नाही. सगळाच इथपासून तिथपर्यंत नुसता बहाणाच होता. त्यामुळे निजामुल्मुल्कास पुन्हा त्याच्या पदावर आणण्याखेरीज दुसरा पर्याय उरला नाही. आणखी विलंब होणे अयोग्य आहे. कारण त्याचे अनुयायी दुर्बल आणि पाखरांच्या पंख न फुटलेल्या पिलांसारखे आहेत. तेव्हा निजामुल्मुल्काला त्याच्या पदावर पुन्हा आणण्यात आले आहे आणि अजिमाबाद पटणा मुबारिजखानाला बहाल झाला आहे. नव्या कारभारावर जाण्यासाठी त्याने निघण्याचे करावे. बुर्हानपूर मार्गे अथवा सिकाकोल मार्गे, यापैकी पसंत पडेल त्या मार्गे, निघावे. फर्मान मागाहून येईल. तुमच्या व्यवहारात अडथळा न आणण्याचे किंवा ढवळाढवळ न करण्याचे आदेश निजामुल्मुल्कास जारी केले आहेत. पण हे हुकम पोहोचण्यापूर्वी, शत्रुभाव धारण केलेल्या सुभेदारांनी आपले भांडण तलवारीच्या जोरावर सोडविण्याचे ठरविले व त्यात मुबारिजखानाचा निकाल लागला. [ मज्जअ-उल्-इन्शा, ८७-८८. ]

## ३८ : निजामुल्मुल्काशी लढण्यास मुबारिजखान सज्ज होतो

११३६ हि. च्या रमजान महिन्यात ( मे-जून १७२४ ) निजामुल्मुल्क बुर्हानपुरास होता आणि रमजान महिन्याच्या अखेरीस ( २१ जून ) तो औरंगाबादेस आला. पुढे होणारी टीका टाळता यावी म्हणून निजामुल्मुल्काने मुबारिजखानाला आग्रहपूर्वक उपदेश करणारे व इशारा देणारे पत्र लिहिले. त्यात मुसलमानी रक्त सांडण्याचे पातक त्याच्या हातून कसे होणार आहे हे निजामुल्मुल्काने त्याच्या ध्यानास आणून दिले. भोवती बेइमान मंडळी असताना मुसलमानाशी भांडणे गैर आहे; आपण दोघे एकाच देशाचे मूळ रहिवाशी असून एकाच वंशाचे आहोत; मुहम्मदशाहाचे वागणे बालकाच्या लहरीसारखे असते हे ध्यानात घ्या; मला दुसऱ्या सुभ्याचा कारभार मिळणार असे मी कितीदा तरी माझ्या दरबारातील प्रतिनिधीकडून ऐकले आहे वगैरे मजकूर निजामुल्मुल्काच्या पत्रात होता. हुकूम येईल तेव्हा तो पाळण्यासाठी मी दिल्लीला परतेन व मग मुबारिजखानाला औरंगाबादचा कब्जा शांतपणे घेता येईल; नवे पद मिळेतो मला दक्षिण सोडता येणार नाही; कारण तसे केल्यास माझा फौजफाटा लयास जाईल व त्यातून आपल्या जबर शत्रूंचा विजय उद्भवेल; तेव्हा थोडचा सबूरीने घेतले तर सगळी परिस्थिती कशी साफ होऊन जाईल असे त्याने त्यात म्हटले होते. निजामुल्मुल्काचा सल्ला त्याचे हित साधावे म्हणून दिलेला आहे असे मुबारिजखानाच्या मनाने घेतले. शिवाय लढा न देताच त्याने शरणचिठ्ठी दिली तर ते त्याच्या इभ्रतीला शोभणारे नव्हते. तो तर विख्यात लढवय्या होता आणि मुख्य म्हणजे आपल्या सार्वभौम शासकाकडून थेटची आयुक्ती लाभलेला उमराव होता. काही जण समजतात की त्याचे पठाण साथीदार त्याशी अर्वाच्यपणे बोलले नसते आणि आपल्या सार्वभौम शासकाशी इमान राखण्यापेक्षा आपल्या मुघल जातभाईंशी इमान राखणे तुला अधिक पसंत दिसते असा आरोप पठाणांनी त्याच्यावर केला नसता तर त्याने पड खाल्ली असती. दोन्ही पक्षात शांततापूर्णरीत्या ठराव झाला तर त्यात कोणता लाभ आहे याची तरफदारी मुबारिजखानाने केली. पण त्यामुळे पठाण मंडळी पूर्वीपेक्षा अधिक क्रुद्ध झाली. तेव्हा तो पठाणांच्या आहारी गेला. निजामुल्मुल्काने केलेल्या प्रास्ताविकास उत्तर पाठविताना त्याने पठाणांना दोष दिला. आपले दैव अल्लाच्या हवाली केले आहे व त्या दैवातून आता काय निष्पन्न होईल ते लवकरच समजेल अशा आशयाचे लिहून त्याने पत्र संपविले. या मोहिमेची तयारी त्याने चालू ठेवली. ( मा. उ. : खंड तीन, ७३९; खाफीखान ९५२; बुर्हान १६९ अ; वारिद १५, ५४–५५; अहवाल १८७ ब, १८८ अ. )

निजामुल्मुल्काने आपली तयारी ठेवली. त्याचा पहिला तळ जसवंत तलाव येथे पडला. एका हकीकतीनुसार इवजखान आणि घियासखान हे दोघे निजामाचे मुख्य सल्लागार होते व पावसाळा संपेतोपर्यंत आणि हिंदुस्थानाहून कूच करीत आल्याने झालेला शीण नाहीसा होईपर्यंत रणांगणात उतरू नये असा त्यांचा सल्ला होता. पण हा दृष्टिकोण नवाबाने मानला नाही. उशीर झाला तर शत्रूस ते फायद्याचे होईल; कारण मुबारिजखानाला आता फर्मान सुटले असल्यामुळे, कालांतराने आपल्या पक्षातून काही जण फुटून पळणे नाकारता येण्यासारखे नाही. शेवटी त्याने ३ सप्टेंबर १७२४ रोजी बाजीराव आणि इतर मराठे यांच्या मदतीने कूच केले. त्यासोबत सहा हजार स्वार होते. विजांचा चकचकाट, ढगांचा गडगडाट, वारा आणि पाऊस चालू असता त्यांनी कूच आरंभिले. वर्णनही

करता येणार नाही अशा अडचणी असताही त्यांनी चाल थांबवली नाही. अशाप्रकारे मुबारिजखानाच्या छावणीपासून १२ कोस अंतरावर येऊन ते पोहोचले. मुबारिजखान चारठाणा परगण्यात येऊन पोहोचला तेव्हा आपल्या सेनाधिकाऱ्यांचा सल्ला मानून त्याने जफरनगरकडे कूच करण्याचा निर्धार केला. त्याचा दोस्त बहादुरखान पन्नी याजकडे सदरचा मुलूख कायम स्वरूपाची जहागीर म्हणून होता; तेथे अफगाण वस्तीही होती. या शहरी लगबग करून एका रात्रीत मजल मारावी असे त्याला वाटत होते. क्षणाचाही विलंब न लावता औरंगाबादेवर अचानक तुटून पडावे असा त्याचा बेत होता. कारण औरंगाबादची मोर्चेबंदी अजून झालेली नाही; त्यामुळे गढीचा ताबा लगेचच मिळेल असे त्याला दौलताबादेच्या किल्लेदाराकडून समजले होते. अशा आणीबाणीच्या समयी हालचाल त्वरेने करणे आवश्यक असल्याने, शत्रूने पाठलाग आरंभला तर आपल्याजवळचा भरगच्च तोफखाना शत्रूला मागेच ठेवला पाहिजे; ती मंडळी शेवटी मुबारिजखानाकडे दयेची याचना करतीलच; उलट जर त्यांनी आपला तोफखाना मागे टाकून देण्याचा निर्णय केला नाही तर तोफखाना संगती घेतल्यामुळे त्यांना होणाऱ्या विलंबाचा परिणाम म्हणून आपल्याला सुभ्याच्या राजधानीच्या शहरी मागे ठेवलेल्या नवाबाच्या स्त्रिया आणि खजिना तसेच त्याच्या सैनिकांचे परिवार ताब्यात घेण्यास पुरेसा अवसर मिळेल; या कल्पनेच्या आहारी जाऊन मुबारिजखानाने आपला पूर्णेच्या तीरावरील तळ हलविला. हा तळ शत्रूच्या छावणी-पासून जेमतेम २० ते २४ मैलांवर होता. येथून त्याने विरुद्ध दिशेने कूच केले. तुमचा शत्रू एकदा का तुमच्या दृष्टिपथात आला आणि तद्नंतर तुम्ही त्याशी न लढताच बाजूला झाला तर ही गोष्ट हिंदुस्थानात तुमच्या पलायनासमान आणि तुमच्या शत्रूच्या विजया-समान समजण्याची प्रथा आहे, ही गोष्ट तो विसरला. या प्रसंगीदेखील वरील संकेतच तिऱ्हाइतांनी स्वीकारला. प्रत्यक्ष पाहाणारा एक साक्षीदार आपल्याला सांगतो की, या क्षणापर्यंत निजामुल्मुल्काच्या लोकांना पराभव होईल असे भय वाटत होते. पण आता मात्र त्यांना विजय मिळण्याची खात्री वाटू लागली. मुबारिजखान आपणास भ्याला आहे आणि म्हणून आपल्या समोरून पळून गेला आहे असे लहानथोर सगळ्यांनाच वाटले आणि छावणीवरच्या एका कवीला दर्या मुबारिज या शब्दात कालसूचन आढळले [ मा. उ. : खंड तीन, ७३९; खाफीखान ९५२, अहवाल १८९. ]

निजामुल्मुल्काच्या छावणीवरून जाताना मुबारिजखानाच्या आघाडीच्या रक्षकांनी आणि छापेमारांनी निजामुल्मुल्कावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला तोफखान्याच्या प्रमुखासह बरेच असामी या हल्ल्यात ठार झाले. पण हल्ला झालेला पक्ष ही बाब एवढ्यावर सोडण्यास तयार नव्हता. मराठ्यांचा बराच मोठा फौजफाटा घेऊन ही मंडळी प्रत्युत्तरा-साठी बाहेर पडली. गनिमी काव्याचा अवलंब करून मराठ्यांनी प्रतिपक्षाची प्रवासाची घाई पार मोडून काढली. एका वेळी दोन मजला मारण्यापलीकडे प्रवासात अधिक गती आणणे मराठ्यांनी त्यांना अशक्य करून टाकले. १ ऑक्टोबर १७२४ पासून छापेमारी सुरू झाली; ८ तारखेपासून झटापट अधिकाधिक तीव्र होत गेली. शत्रूचा डाव कोणता आहे याची अटकळ धूर्त निजामुल्मुल्काला बांधता आली. म्हणून त्याने मराठ्यांना मुबारिजखानाभोवती घुटमळत ठेवले. या मराठ्यांनी मुबारिजखानाच्या प्रवासात सतत व्यत्यय आणला. नवाबानेही रात्रीची एक मजल मारली आणि मोठा आटापिटा करून पूर्णा नदी आपल्या तोफखान्यासह ओलांडण्यात यश मिळविले. [ मा. उ. खंड तीन, ७४०; कामवर, अहवाल १९१ अ. ]

## ३९ : साखरखेडल्याची लढाई

दुसरा कोणताच पर्यायी मार्ग न उरल्यामुळे मुबारिजखानाने आपले अवजड सामान-सुमान आणि इतर लटांबर साखरखेडले.[१५] येथे ठेवून दिले; आपल्या फौजफाट्याची या शहराबाहेर मांडणी केली. तो आणि त्याची फौज यांना दोन दिवस रसद मिळाली नाही; आपला घोडा आणि त्यास मारावयाचा चाबूक याखेरीज त्यांच्याजवळ काहीच राहिले नव्हते. हा ताप त्यांना भलताच भोवला. सुरुवातीला २ फौजांमधील अंतर ८ मैलांचे होते. मुबारिजखान आपली जागा सोडत नव्हता. निजामुल्मुल्काचे व्यूहरचित सैन्य मात्र दरदिवशी मैल-दोन मैल पुढे सरकत होते. निर्णायक लढाईला २३ मोहरम ११३७ A. H. हिजरी– ११ आक्टोबर १७२४ च्या सायंकाळी तोंड लागले. [ मा. उ., खंड तीन, ७४१ ; अहवाल १९१ अ. ]

निजामुल्मुल्काने आपल्या फौजेचे दोन मुख्य विभाग करून. फौजेची व्यवस्था लावली. पैकी एक विभाग स्वतःच्या हुकूमतीखाली व दुसरा विभाग इवजखानाच्या हुकूमतीखाली ठेवला. आपली आघाडी कादिरदादखान आलमगिरी याचा मुलगा कादिरदादखान याकडे सोपविली. उजव्या फळीची हुकूमत वजीर सादुल्लाहखान याचा नातू तालिब मुहियुद्दिन-खान याकडे तर डाव्या फळीची हुकूमत इस्माईलखान आणि मुजफ्फरखान खीशगी याकडे सोपविली. तोफखाना प्रमुख बर्कंदाजखान आणि पायदळाचा अधीक्षक अतयारखान यांच्या दिमतीला छत्रसाल बुंदेला याचा मुलगा कुंवरचंद आणि इतर बुंदेले लोक यांना दिले. या सर्वांनी आघाडीच्या पुढच्या भागात आपली रणांगणातील जागा घेतली. इवजखानाने निजामुल्मुल्काच्या डाव्या हाताची जागा व्यापली. त्याच्या हाताखाली त्याचा मुलगा सय्यिद जमालखान, मुकर्रबखान दख्खिनी, खान आलम दख्खिनी, मुतहव्वुरखान खीशगी आणि अझीज बेग खान हरीसी या मंडळींना देण्यात आली. इवजखान दख्खनचा नायब सुभेदार झाला तेव्हा त्याने तोफखाना तयार केला होता, तो त्याजबरोबर होता [ मा. उ. : खंड तीन, ७४१; खाफीखान ९५३. ]

निजामुल्मुल्काचा चुलत भाऊ जहीरुद्दौलह रिआयतखान आणि मुहम्मद घियासखान यांची योजना मध्य आणि डावी फळी यांच्या मधल्या जागेत झाली. नवाबाचा चुलता नासिरुद्दौलह अब्दुर्रहीमखान याला उजव्या फळीवर पाठविले. त्याच्या सोबतीस नवाबाचा सर्वात थोरला मुलगा गाझीउद्दीनखान फीरुजजंग याचा वक्षी सय्यिद घज्नफरखान बुर्हानपुरी यास त्याच्या हुकूमतीखालील ३०० असामीसह दिले. शिवाय थोड्या हलक्या तोफा व तटावरून डागावयाचे काही नगही होते. सादुल्लाहखानाचा नातू हिर्जुल्लाहखान याला मध्य आणि डावी फळी याच्या मधल्या जागेत ठेविले आणि बहादुर दिलखान (लाचीन बेग) कल्माक यास त्याच्या मदतीसाठी पाठविले. सादुल्लाहखानाचे नातू हाफिजुद्दीनखान आणि मुहम्मद सैदखान नवाबाच्या अगदी जवळच्या नात्यातले होते. त्यांना फौजेच्या मध्यभागापासून फर्लांगभर अंतरावर ठेविले. यल्तमश (आघाडीची राखीव फौज) होशदारखानाच्या (नंतरचा इरादतखान) नेतृत्वाखाली ठेविली. महतशिमखानाला (शेख मीर खाफी याचा नातू) मध्य भागातील (तराह) कित्येक सेनाधिकाऱ्यांसह मध्य

१५ आताचे नाव फतहखेरा, वऱ्हाडाच्या बुलढाणा जिल्ह्याच्या दक्षिण भागात, औरंगाबादेपासून अंदाजे ८० मैलांवर. ( बेरार गॅझेटिअर, १६८ ).

भागाच्या उजव्या व डाव्या अंगास ठेविले. गोपालसिंग गौरसह खाजम कुलीखान तूरानी, आपल्या छापेमारासह शिकारखात्याचा नायब प्रमुख सलीमखान अफगाण तसेच रसूलखान अफगाण या तिघांना स्वार होण्यास तीन हत्ती देऊन, फौजेच्या मध्य भागासमोर राखीव ( यल्तम्श ) म्हणून त्यांना ठेविले. [ खाफीखान ९५४–९५५. ]

निजामुल्मुल्क फौजेच्या मध्यभागी जातीने हजर होता. त्याच्यासोबत ख्वाजा अब्दुल्लाहखान, इहतिदाखान ( दिवाण ), रुस्तमबेगखान, नेकनजरखान ( नवाबाचा दुसरा मुलगा नासिरजंग याचा बक्षी ) हिम्मतयारखान ( नवाबाच्या मुलाचा मामा ) वगैरे उमराव होते. शिवाय व्यक्तिगत रक्षण विभागाचा अधीक्षक अब्दुर्रहमान खान यासारखे अधिकारीही होते. मराठ्यांना बरोबर घेऊन वेळोवेळी हुकूमत करणारा तुर्कताजखान यावर बाजीराव वगैरे मराठे आणि त्यांच्या बरोबर असलेले ७–८ हजार मराठा सैन्य यांची जबाबदारी सोपविली.

विरुद्ध पक्षात, मुबारिजखानानेदेखील लढाईसाठी सैन्यरचना केली. पण अवजड तोफखान्याबाबत त्याची बाजू पडती आहे हे स्पष्ट दिसत होते. त्याच्या आघाडीची हुकूमत हैदराबाद कर्नाटकचा फौजदार सआदतुल्लाहखान याचा नोकर घालिबखान आणि खान झमान किंवा शेख निजाम दखिनी याचा मुलगा हुसैन मुनव्वरखान यांजकडे त्याने सुपूर्त केली. यांच्या मागे राखीव फौजेच्या प्रमुखपदी ( यल्तम्श ) मुबारिजखानाचा चुलता व एक अनुभवी अधिकारी मुहम्मदबेगखान यास मुक्रर केले. उजव्या फळीत इब्राहीमखान पन्नी ( याचा किताब बहादुरखान आणि सुप्रसिद्ध दाऊदखान पन्नीचा भाऊ ), अब्दुल फतहखान ( विजापूर कर्नाटकात लौकिकास चढलेला, अब्दुन्नबीखान मियाना याचा मुलगा ), आणि २,००० अफगाण घोडेस्वारांसह इतर अफगाण अमलदार यांना ठेवले. बंकापूरचा दिलेरखान मियाना याचे मुलगे व त्याचा दत्तक मुलगा अलीखान हे त्यांच्या फौजेचे नेतृत्व करीत होते आणि ख्वाजा महमूदखान, ख्वाजा असदखान, ख्वाजा मस्‌ऊदखान आणि हमीदखान हे मुबारिजचे मुलगे यांना फौजेच्या मध्यभागानजीकची जागा दिली. खुद्द मुबारिजखानाने मुनइमखान ( बहादुरशाही वजीर ) याचा मुलगा खान झमान, मुनव्वरखान, किजिलबाशखान, त्याचा दिवाण फाइकखान, अरबबेगखान तूरानी, मीर युसुफखान व इतर यांना सांगाती घेऊन फौजेच्या मध्यभागाच्या अग्रभागी ठाण मांडले. [ खाफीखान ९५६. ]

हल्ला अगदी निकराच्या स्थितीवर येईपर्यंत भडिमार करावयाचा नाही असा हुकूम निजामुल्मुल्काने दिला. आपल्या सगळ्या मोठ्या तोफा साखळीने बांधून मुबारिजखानाच्या हल्ल्याला तोंड देण्याच्या तयारीत तो उभा ठाकला. एव्हाना, दोन्ही फौजांमधील अंतर मैलाभराचेच राहिले असावे. दोन्ही फौजांच्या मधील भागातून एक ओहळ जात होता. त्याचा तळ गाळाने भरलेला होता. माणसे आणि घोडे छातीइतके रुततील एवढा गाळ होता. मध्यान्हीनंतर इवजखानाविरुद्ध चालून जाण्याचा हुकूम मुबारिजखानाने अखेरीस दिला. इवजखानाची फौज निजामुल्मुल्काच्या फळीच्या डाव्या अंगाला होती. हल्ला चढविणाऱ्या फौजेत कदाचित दहा हजार भरतील एवढे घोडेस्वार होते. दौड करीत निघाल्यावर त्यांचा वेग वाढत जाऊन, वाटेत ओहळ आडवा आल्यावर, तो वेग अचानक कमी करावा लागला. त्यामुळे त्यांच्या दौडत येणाऱ्या फळीत विस्कळीतपणा आला. दाटी आणि गर्दी इतकी अतोनात झाली की घोडा मागील पायावर उभा राहिला तर पुढचे पाय

तसेच हवेत राहिलेल्या स्थितीत तो पुढे पुढे ढकलला जाई; माणसाची मांड सुटली तर तो खाली जमिनीवर पडण्याऐवजी दोन्ही अंगाला खेटून असलेल्या घोड्यांच्या आधारावर गर्दीतून वाहात पुढे पुढे जाई. डाव्या फळीच्या असामींना एक पाऊलवाट अखेरीस सापडली. शत्रूचा सर्व तोफखाना उजव्या अंगाला सज्ज आहे; त्यातून कानठळ्या बसविणारा भडिमार होत आहे; डोळे निकामी करणारा धूर तोफा ओकत आहेत अशा परिस्थितीची कसलीही तमा न बाळगता, शत्रूच्या उजव्या फळीवर तसेच इवजखानाच्या मध्य बाजूच्या आघाडीवर 'गरजणाऱ्या वाघा' प्रमाणे ते तुटून पडले. तलवारी, भाले आणि गदा यांनिशी त्यांनी हातघाईची लढाई सुरू केली. ढालीतलवारींनिशी त्यांनी लढत जारी ठेवण्यासाठी सुमारे पाच हजार घोडेस्वार पायउतारा झाले, असे सांगतात. ( अहवाल १९१ ब; खाफीखान ९५७, मा. उ. : खंड तीन, ७४१; कामवर. )

प्रसंग येथवर येईतो निजामुलमुल्काचे इतर सेनाधिकारी इवजखानाला कुमक करण्यास आले. फिरत्या तोफा आणि चापाच्या बंदुका यांनिशी त्यांनी तडाखेबंद कामगिरी पार पाडली. नंतर लगेचच घालिबखान कामास आल्याची बातमी येऊन थडकली. त्यावर मुबारिजखान अगदी निर्विकारपणे म्हणाला, "दैवातील अटळ गोष्टीसाठी मीसुद्धा आता तयार आहे." तदनंतर असदखान या त्याच्या मुलाचा हत्ती मागे वळला आणि पळून जाऊ लागला. हत्ती आणि असद मुबारिजखानाजवळून जाऊ लागले आणि तेव्हा मुबारिजखान ओरडला, "अरे असद, पळपुटा की रे निघालास!" त्यावर असदखान उत्तरला, "यात माझा काय दोष? माझा हत्ती बिथरला आहे." तेव्हा बाप रागरागाने बोलला, "तुझा हत्तीच मागे फिरला असेल तर हत्तीवरून उडी टाक आणि सार्वभौमविषयक तुझे कर्तव्य पार पाड." तेव्हा लोखंडी बडगा हत्तीच्या डोक्यावर जोराजोराने हाणून माहुताने हत्तीला वळणावर आणले. चांगला दीडएक तास त्यांच्यावर तोफा आणि बंदुका यांतून नुसता भडिमार होत होता. शेवटी असदखान आणि मस्ऊदखान ठार झाले. हे मुबारिजखानाला कळविले तेव्हा तो उद्गारला, "अल्लाचा मी ऋणी आहे. ऐन जवानीपासून आतापर्यंत मी कधी पराभव पाहिला नाही. जखमी होणे आणि मरून जाणे हे आमच्या जीवनक्रमाचे अंगच आहे. अंगचोरपणा एवढासुद्धा न करता धारातीर्थावर पतन पावणे हीच आमची मुक्ति. असद आणि मस्ऊद हे दोघे या जगातून निघून गेले. आता माझ्या मुबारिझीचा ( मर्दुमकीचा ) उपयोग काय बरे उरला आहे?" असे म्हणून त्याने आपला हत्ती इब्राहीमखान तसेच अब्दुन्नबी आणि अब्दुर्रौफ यांच्या मुलांच्या हत्तीजवळ नेला. तो आणखी चांगला तासभर लढला आणि शेवटी पार करण्यास अशक्य असलेल्या व गाळाने गच्च भरलेल्या नाल्यापाशी येऊन थांबला. तो घायाळ झाला होता; त्याची ताकद संपुष्टात येऊ लागली होती. मधून मधून त्याला ग्लानी येत होती; पण तीमधून जरा सावध झाला की लगेच तो धनुष्यबाण हाती धरत होता. आपला माहूत ठार झाला, तेव्हा ती जागा त्याने स्वतः घेतली आणि पहिल्यासारखाच लढत राहिला. पण सूर्य मावळण्यास तास उरला असता मुबारिजखान आणि त्याचे सर्व प्रमुख पाठीराखे रणांगणावर मरण पावले होते. ( अहवाल १९२, खाफीखान ९५८, मा. उ. : खंड तीन, ७४२. )

मुबारिजखानाच्या पक्षातील जे बडे असामी कामास आले त्यांची नावे अशी : उजवी फळी सांभाळणारा बहादुरखान पन्नी, डावी फळी सांभाळणारा व पूर्वी खान झमान नावाने ओळखला जाणारा मुकर्रमखान, आघाडीचे नेतृत्व करणारा घालिबखान, अब्दुल् फतहखान

मियाना हुसैनीखान (अलीमर्दानखान हैदराबादी याचा मुलगा), अमीनखान दख्खिनी, जगदेवराव जाधव आणि फाईक खान काश्मिरी (दिवाण). मुबारिजखानाच्या बाजूची साडेतीन हजार माणसे कामास आली असे सांगतात. त्यातील तीस ते चाळीस माणसे हत्तीचा मान असलेले सेनाधिकारी होते. महमूदखान आणि हमीदुल्लाहखान ही मुबारिजखानाची दोन मुले. पैकी हमीदुल्लाहखान–हा छोटा मुलगाच होता–जखमी झाली. त्यांना कैद केले. दिलावरखानदेखील निजामाच्या हाती लागला. (अहवाल १९३ अ, कामवर, खाफीखान ९५९, वारिद १६.)

त्या मानाने निजामुल्मुल्काच्या बाजूची झालेली हानी कमी होती. निजामुल्मुल्काचा एक चुलत भाऊ–यास नवाबाची आत्या दिलेली होती–रिआयतखान नरडीस बाण लागून मरण पावला. सुलैमानखान खीशगी हा देखील ठार झाला. सय्यिद घज्नफरखान जखमी झाला व या जखमांमुळे दोन-तीन दिवसांनी मरण पावला. (खाफीखान ९५९.)

या लढाईतील एक गमतीदार प्रकार म्हणजे अमीनखान दख्खिनी आणि त्याचा मुलगा मुकर्रबखान हे दोघे विरुद्ध पक्षातून लढले. या बापलेकांमध्ये नेहमीचे वितुष्ट राहिले होते. ही लढाई होण्याअगोदर काही दिवस अमीनखानाने निजामुल्मुल्काची फौज सोडली आणि मुबारिजखानाकडे आपली चाकरी वर्ग केली. त्या वेळी त्याने आपल्याबरोबर बुर्‍हानपुराहून बरेच अमलदार नेले. लढाईच्या दिवशी एकमेकांचे रक्त सांडण्यास उतावीळ झाल्याच्या आविर्भावात दोघे बापलेक रणांगणात उतरले. मुकर्रबखान अगदी चिवटपणे लढत देत होता आणि जो कोणी त्यास आडवा आला, त्या प्रत्येकाला त्याने आपले पाणी दाखविले. पण रणांगणात त्याची आपल्या बापाशी काही गाठ पडली नाही. तरी अमीनखानास, निजामुल्मुल्काच्या पक्षातील कोणी तरी, लढाईत मारले. त्यामुळे अशी दंतकथा पसरली की खुद्द आपल्या मुलाच्याच तलवारीने तो ठार झाला. (खाफीखान ९५७.)

मुबारिजखानाचे दफन साखरखेडले शहराच्या बाहेरील मैदानात झाले. बेफिकीरपणा आणि तडफ दाखविण्याचा अभाव हे त्याचे दोष होते असे मासिरूल्-उमराचा लेखक शाह नवाजखान याला वाटते. बादशाहाचे फर्मान आल्याआल्या त्याने फुलचारीचा वेढा उठवून औरंगाबाद गाठले असते तर मुबारिजखान यशस्वी होऊ शकला असता; कारण तोपर्यंत प्रतिपक्षातील इवजखानाकडे दोन हजारांपेक्षा जास्त असामी नव्हते. एवढा विलंब होऊनदेखील जर त्याने माणसे आणि सामग्री यांची पुरेशी जमवाजमव करण्याची खबरदारी घेतली असती तरीसुद्धा त्याला हा मार खावा लागला नसता. वस्तुतः मोहीम चालू असता काही मराठा प्रमुखांनी, विशेषतः कान्हू भोसले याने मदतीविषयी सूतोवाच केले होते. भोसल्याच्या पदरी पाच हजार असामी होते व थोड्याशाच रकमेवर तो समाधान पावणे शक्य होते. मुबारिजखानाची असले काही ऐकून घेण्याची तयारी नव्हती. त्या सगळ्यांनी माझ्या पंजाचा इंगा अनुभवला आहे; माझे ठोसे खाल्लेले आहेत; तेव्हा आताही मी माझ्या पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे जरूर लागेल तेव्हाच माणसांची भरती करीन; त्याच्याकडे मदतीची याचना करून माझी किंमत मी कमी करून घेणार नाही; पण ते आपण होऊन, द्रव्य न घेता मजकडे आले तर त्यास माझी काही हरकत असणार नाही, असे त्याचे म्हणणे पडले. निजामुल्मुल्काच्या अट्टल पक्षपात्यांनी दोषाचे सगळे खापर मुबारिजखानावर फोडले. असल्या उमरावाशी (निजामाशी) प्रतिकार करण्याचे धाडस त्याने

का करावे? असे धाडस केल्यास कोणत्या वेगळ्या गोष्टीची अपेक्षा धरता येईल? काटेरी झुडुपांना द्राक्षे लागत नाहीत किंवा ताड-माडांना सफरचंदे लागत नाहीत अशा आशयाची जी म्हण आहे ती खरीच नाही का?" (मा. उ. : खंड तीन, ७४३, बुर्हान १६९ अ, अहवाल १९६ ब.)

लढाईनंतरचा दुसरा दिवस मृतांचे दफन करण्यात आणि जखमींची देखभाल करण्यात खर्च झाला.[१६] यापैकी जखमी झालेल्यामध्ये मुबारिजखानाचे दोन मुलगे, मेव्हणा दिलावरखान आणि मामा मुहम्मदबेगखान हे प्रमुख होते. पैकी शेवटचा जखमांमुळे काही दिवसांनी मरण पावला. अरबबेगखानाची हीच गत झाली. ज्यांच्यावर औषधोपचार झाले, अशा जखमी मंडळींमध्ये हकीम इज्जत तलबखान, किजिलबाशखान, मीर अबुल फज्लखान, रिजा मुहम्मदखान (कमरनगर किंवा करनूरचा दिवाण), अका अबुल हसन (मच्छली बंदरचा अखबारनवीस) यांचा समावेश होता. निजामुल्मुल्काने गरजेनुसार अन्न, औषधपाणी आणि दुखवटा पाळण्यासाठी आवश्यक त्या गोष्टी यांची तजवीज केली. शिवाय त्याचा दिवाण आणि वाकनीस असलेला इहतिदाखान याने देखील आपत्कालीन मदतीत मोठा वाटा उचलला. दख्खनचा माजी दिवाण दियानतखान याने सर्वस्व गमावलेल्या असामींना रोकड आणि अन्न दिले. मुबारिजखानाचे मुलगे, दिलावरखान, कासिम अलीखान (हाजी मन्सूरचा मुलगा) वगैरे मंडळींचे भरजरी कपडे आणि हिरेमाणके जप्त झाली होती. निजामुल्मुल्काने हुकूम करून ती ज्याची त्याला परत दिली. (खाफीखान ९५९–९६०.)

## ४० : निजामुल्मुल्काच्या विजयानंतरच्या हालचाली

आपल्या लोकांना विश्रांती मिळावी म्हणून तीनचार दिवस मुक्काम केल्यावर, निजामुल्मुल्काने औरंगाबादेस कूच केले. त्यास लौकरच खबर मिळाली की, हैदराबादेची जबाबदारी अंगावर घेऊन मागे राहिलेल्या ख्वाजा अहमदखान या मुबारिजखानाच्या थोरल्या मुलाने, आपल्या घराण्याचा खोजा असलेल्या संदलखान या किल्लेदाराच्या तसेच शिबंदीच्या मूकसंमतीने राजधानीजवळील मुहम्मदनगर येथील किल्ल्यात आसरा घेतला आहे. माजी सुभेदाराची सर्व मालमत्ता या गढीत हलविण्यात आली होती व गढीची मोर्चेबंदी सुधारून गढी अधिक बळकट केली होती. (खाफीखान ९६०–९६१, मा. उ. : खंड तीन, ७४४.)

१६ खाफीखानाच्या छापील संहितेमध्ये पृष्ठ क्रमांक ९६० वर काही चूक झाली असावी असे दिसते. त्या पानावरील चौथ्या ओळीनंतरचे काही शब्द गळले तरी असावेत किंवा पाचव्या ओळीतील पाचवा शब्द नकारार्थी तरी नसावा. सदर मजकुरात सध्या तो जसा आहे त्या स्थितीत, मुबारिजखानाच्या पक्षातील हानीची माहिती पुढीलप्रमाणे आहे. (पृष्ठे ९५८–९६०) :

ठार झालेले : मुबारिज, त्याचे मुलगे असद आणि मस्अद, घालिब, हुसैन मुनव्वर, कमाल (खान झमान दखनी याचा वंशज), बहादुरखान पन्नी आणि इब्राहीमखान पन्नी (हे दोघे एकच गृहस्थ आहेत असे पृष्ठ १९५६ वर सांगितले आहे.) अब्दुल फतह, मुहम्मद अमीन, मुहम्मद बेग आणि अरब बेग (दोघे जखमी होऊन मग मरण पावले.) जखमी झालेले : महमूद आणि हमीदुल्लाह हे दोघे मुबारिजचे मुलगे, दिलावर, खान झमान (माजी वजीर मुन्अिमखान याचा मुलगा) अहसन (हुसैनी नव्हे), मीर युसुफ, फाइक मीर फत्कुल्लाह.

लुटले गेलेले पण जखमी न झालेले : हकीम इज्जत तलब, किजिलबाश, मीर अबुल फजल, रिजा मुहम्मद आणि अका अबुल हसन. (जदुनाथ सरकार.)

औरंगाबादेस पोहोचल्यावर शहराच्या रक्षणाची आवश्यक ती तजवीज निजामुल्मुल्काने केली. जरूरीचे नव्हते असे सामान तेथील गढीत ठेवले. तदनंतर, तो पुन्हा मोहिमेवर निघाला. २७० मैलांचे कूच करून त्याला हैदराबादचा परिसर गाठावयाचा होता. रबिलाखर (११३७ हि.) महिन्याच्या अखेरीस (= १४ जानेवारी १७२५) त्याचे तंबू गोशा महल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या राईत पडले. अधिकाऱ्यांच्या नेमणुकी, सुभ्याच्या कारभाराचा ताबा घेणे ही कामे उरकण्यात आली. दरम्यान, आपल्या विरुद्ध तसेच मुबारिजखानाच्या संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई होईल या भीतीने ख्वाजा अहमदखान याने वेढ्यास तोंड देण्याची जय्यत तयारी चालविली. या किल्ल्याचा किल्लेदार म्हणून तसेच या सुभ्याचा सुभेदार म्हणून आपल्या बापाच्या जागी आपली नेमणूक करणारे शाही फर्मान येण्याची रोजच वाट आहे अशीही त्याने बातमी सोडून दिली होती. तिचा परिणाम म्हणून सुव्यवस्था निर्माण होण्यास बरीच मदत झाली. एक वर्षाची मुदत संपेतो आपल्या किल्ल्यांचा, पदांचा वा वतनजमिनींचा ताबा निजामुल्मुल्काने नेमलेल्या लोकांना देऊ नये अशी पत्रे, त्याने शिबंदींना, अमलदारांना आणि जमीनदारांना खरोखर धाडली. प्रतिकार करणाऱ्यांना मदत म्हणून आपल्या फौजाही काही ठिकाणी त्याने धाडल्या. मुबारिजखानाने पकडून तुरुंगात टाकलेल्या कित्येक कुप्रसिद्ध, उचापतखोर, भांडखोरांना त्याने किल्ल्याबाहेर सोडून दिले. ही मंडळी घरोघर विखुरल्यामुळे, अगोदरच झालेली अव्यवस्था आणखी बिघडली. निजामुल्मुल्काच्या लोकांची सुभ्यावरील पकड सुटली आणि महसूल-वसुली होईनाशी झाली. रस्ते असुरक्षित बनले; ते रहदारीस बंद झाले आणि काही काही ठिकाणी मुलकी अधिकाऱ्यांवर चक्क हल्ले झाले. या असल्या उठावांपैकी एकात, हाजी मन्सूरचा मुलगा काजिम अलीखान या भोनगीर भागाच्या फौजदारावर हल्ला होऊन, बरोबरच्या कित्येक लोकांसह त्याला ठार केले. पण, हळूवारपणे घेऊन, वाढत्या मनसबीची, नव्या जहागिरींची आणि घराण्याकडे पूर्वीपासून असलेल्या किताबांना पुन्हा बहाल करण्याची बक्षिसी पुढे करून, निजामुल्मुल्काने ख्वाजा अहमदखान याला गढीच्या किल्ल्या आपल्या हवाली करण्यास अखेरीस उद्युक्त केले.[१७] ख्वाजा अहमदखान याला शहामतखान आणि ख्वाजा महमूदखान याला मुबारिजखान असा किताब मिळाला. त्या घराण्यावर अवलंबून असणाऱ्यांचाही योग्य तो परामर्श घेतला. शेवटी निजामुल्मुल्क किल्ल्यात गेला व तेथे त्याने आपला किल्लेदार आणि आपली शिबंदी नेमली, [खाफीखान ९६१, अहवाल १९७, कामवर, मा. उ. : खंड तीन, ७४४.]

अशाप्रकारे हैदराबाद सुभ्यामध्ये सुव्यवस्था लावण्याच्या कामात निजामुल्मुल्क गर्क असता, दिल्लीहून अन्वरुद्दीनखान आला. अल्लाहाबाद सुभ्यातील कुरा आणि जहानाबादच्या फौजदारीवरून त्याला नुकतेच काढून टाकण्यात आले होते. असा कार्यक्षम अमलदार चाकरीस मिळणे निजामुल्मुल्काच्या दृष्टीने स्वागतार्हच होते. त्याने अन्वरुद्दीनखानाला हैदराबादचा नायब सुभेदार नेमले. विरोध मोडून काढण्याचे त्याचे प्रयत्न सिकाकोल आणि अन्य ठिकाणी चांगले यशस्वी झाले. महसुलाच्या वसुलीचे मान देखील त्याने योग्य स्थितीला आणले. (खाफीखान ९६२, मा. उ. ५२७.)

---

१७ अहमदखानास तात्पुरता धक्का न लावता, निजामुल्मुल्काने हैदराबाद शहर आणि त्याच्या आसपासचा मुलूख आपल्या ताब्यात घेतला. नंतर तो मच्छलीबंदरला (कामवर) आणि तदनंतर कर्नाटकात गेला. त्याने हैदराबाद सुभ्याची जबाबदारी हिफ्जुल्लाहखानावर सोपवून त्यास मागे ठेवले. (अहवाल १९७ ब.) ख्वाजा अहमदखान याला देऊ केलेल्या शर्ती म्हणजे हैदराबाद सुभ्यात चाकरीची अपेक्षा न ठेवता एक जहागीर आणि वडिलांच्या संपूर्ण जंगम मालमत्तेची देणगी. (मा. उ. : खंड तीन, ७४५.)

**निजामुल्मुल्काला क्षमा होते**

निजामुल्मुल्काचा नाश होण्याऐवजी तो पूर्वी होता त्यापेक्षा अधिक शक्तिशाली झाला आहे हे दिसून आल्यावर, काही महिन्यांनी, त्याला शाही मर्जीत नाममात्ररीत्या पुन्हा दाखल करून आपल्या मनसुब्यांना आलेले अपयश झाकावे असा निश्चय दरबारी झाल्याचे दिसते. त्यानुसार, २० जून १७२५ रोजी, हजर असलेल्या सर्व उमरावांनी केलेल्या विनंती-अर्जावरून निजामुल्मुल्काचे सर्व अपराध पोटात घातले. तो वजीर होण्यापूर्वी त्याकडे असलेल्या सर्व जागिरी त्यास परत बहाल करण्यात आल्या. त्याला औपचारिकरीत्या दख्खनच्या सुभ्यांचा सुभेदार म्हणून नेमणारे फर्मान निघाले. पण अहमदाबाद-गुजरात आणि माळवा हे त्याच्याकडे असलेले दोन सुभे त्याच्याकडून काढून घेऊन दुसऱ्यांना दिले. अहमदाबाद-गुजरात हा सुभा सरबुलंदखानास दिला. त्याने काजिम बेग तेहरानी याचा मुलगा शुजाअतखान यास आपला नायब नेमले. निजामुल्मुल्काचा चुलता हमीदखान यास दरबारचे बोलावणे गेले. पण त्याने येण्यास नकार दिला तर त्याची हकालपट्टी करण्याचे ठरले. त्यासमयी दरबारी हजर नसलेल्या राजा गिरधर बहादुर नागर यास माळव्यास, अजीमुल्लाहखान (निजामुल्मुल्काचा चुलतभाऊ व प्रतिनिधी) याच्या जागी, पुन्हा एकवार नेमणूक मिळाली. [कामवर; खाफीखान ९६२, ९७३.]

## ४१ : निजामुल्मुल्काचे मुहम्मदशाहास पत्र

निजामुल्मुल्काने बादशाहास उद्देशून पाठविलेला एक सविस्तर अहवाल आजही उपलब्ध आहे. तो बहुधा अधिकृत असावा आणि तसा तो असेल तर त्यामध्ये त्याच्या वर्तणुकीमागचे त्याचे समर्थन प्रतिबिंबित झाले आहे. फर्रुखसियरच्या राजवटीतील अव्यवस्थेचा उल्लेख करून तो तैमूरच्या काळापासून मुघल फौजांनी इमान कसे राखले आहे याबद्दल बढाया मारतो. या इमानदारीचा एक नमुना म्हणून तो आलमगीराच्या काळातील आपल्या बापाच्या, तसेच आपल्या चाकरीचा उल्लेख करतो. नंतर गुजरातेतून हैदर कुलीखानाला कसे उचलले आणि माळव्यात दोस्त मुहम्मदखानाला कसा धडा शिकविला हे तो सांगतो. आपण सत्तास्थानाचा लोभ बाळगणारे कसे नव्हतो हे दाखविण्यासाठी तो खात्रीपूर्वक सांगतो की वजीर होण्याची इच्छा मी दर्शविली असती तर वजीरपद घेण्यास मुहम्मद अमीनखानाने कधीच होकार भरला नसता. निजामाचा दख्खनवर डोळा आहे या विषयी पसरलेल्या संशयाचे निराकरण करण्यासाठी तो सांगतो की, मी वेळोवेळी दख्खन सोडून दिल्लीस आलेलो आहे ही वस्तुस्थिती ध्यानी घ्यावी. तद्नंतर वजीरपद सांभाळत असताना आपण कोणकोणत्या गोष्टी मनात योजल्या होत्या हे तो विस्तारपूर्वक सांगतो. दगलबाजीत तरबेज असलेल्या दरबारातील तुच्छ करंटयांनी माझे प्रयत्न लटके पाडल्यामुळे माघार घेणे मला भाग पडले; ह्याच दुष्ट सल्लागारांनी तद्नंतर मुबारिजखानाला शाही फर्माने धाडण्याची व्यवस्था करविली; सदरचे खलिते माझ्या हाती पडले व त्याच्या खऱ्या नकला पाठविल्या आहेत असे सांगून मला अशी वागणूक का मिळावी अशी पृच्छा तो करतो. काळजीपूर्वक निवडलेल्या सल्लागारांवरच शासनाचे सामर्थ्य अवलंबून असते या विधानाची सत्यता पटवून देणारे काही दाखले तो विजापूर आणि हैदराबाद याच्या इतिहासातून उद्धृत करतो. बदसल्लागारांच्या दरबारातील प्रभावामुळेच इराण देश अफगाणांच्या कब्जात गेला असे तो सांगतो. यानंतर सार्वभौम शासकाची कर्तव्ये कोणती

आहेत याविषयींचे विचार त्याने अशाप्रकारे सांगितले आहेत की, त्याचा रोख मुहम्मद-शाहाच्या पोरकट आणि दुर्व्यसनी सवयींकडे आहे हे जागोजाग लक्षात यावे. या पत्राच्या शेवटी मुबारिजखानाच्या ललाटी काय लिहिले होते याविषयी एक संक्षिप्त विवरण आहे. मुबारिजखान ६० वर्षे वयाचा म्हणजे मजपेक्षा दहा वर्षांनी देखील थोर नसून देखील त्यास म्हातारचळ लागल्यासारखे झाले होते असे त्याचे वर्णन निजामुलमुल्क करतो. पुढे तो सांगतो की, त्याच्याजवळ २५,००० घोडेस्वार होते आणि कर्नाटकाहून आणलेले पायदळ किती होते याची तर गणतीच नव्हती. लढाईपासून त्यास परावृत्त करण्याचा आग्रही उपदेश मी केला पण तंट्याचा निकाल तलवारीच्या जोरावर करण्याचा हेका त्याने चालविला व परिणामी त्यात खुद्द त्याचा स्वतःचा तर निकाल लागलाच पण त्याच्या-बरोबर एक हजारापासून सात हजारापर्यंत मनसब असलेले ३१ योद्धे आणि असंख्य शिपाई युद्धात ठार झाले. [ एशियाटिक मिसलेनी (१७८५), खंड एक, ४८२–४९३, संहिता आणि भाषांतर. ]

असे म्हणता येईल की, या काळापासून निजामुल्मुल्क जवळजवळ स्वतंत्र झाला व त्याने सध्याच्या हैदराबाद संस्थानाची स्थापना केली. या काळापासून दक्षिणेतील पदे तोच बहाल करू लागला; मनसबदारांच्या बढत्या तोच करू लागला, तसेच किताब बहाल करणे, शेतसाऱ्याच्या रकमा बहाल करणे अशा गोष्टी स्वतःच्याच मर्जीनुसार व लहरी-नुसार करू लागला. सार्वभौम शासकाची समजली जाणारी जी लक्षणे आहेत त्यापैकी शेंदरी रंगाचे शाही छत्र धारण करणे, स्वतःच्या नावे शुक्रवारची प्रार्थना म्हणवून घेणे आणि स्वतःचा उल्लेख असलेला मजकूर कोरली जाणारी नाणी पाडणे ही लक्षणे धारण करण्यापासून मात्र तो अलिप्त राहिला. त्याने मनात आणले तर तो सिंहासनाधिष्ठितही होऊ शकेल असे भाकित कित्येक जोतिषांनी व्यक्त केले होते. पण ते संसूचन फेटाळून लावतांना तो म्हणाला, "सिंहासन आणि छत्र धरून घेणाऱ्यांचे नशीब खुशाल उजळो! माझे काम काय तर माझा सन्मान सुरक्षित ठेवणे आणि हा सन्मान जर माझा राहिला तर मला शाही सिंहासनाची गरज ती काय?" ( यह्या १३१ ब, अहवाल १३६ ब. )

प्रकरण आठवे

# गुजरातेतील मराठे : १७३० पर्यंतचा काळ

## ४२ : मराठे लोक आणि त्यांचा देश

आपल्या हकीकतीच्या ओघात ४ थ्या प्रकरणातील ३८ व्या विभागात आपण पाहिलेच आहे की, सयिद हुसैन अलीखानाच्या लव्याजम्यात मराठ्यांची फौज दिल्लीस आली. फर्रुखसियर पदच्युत झाल्यावर दिल्लीतील रस्त्यावर उसळलेल्या दंगलीत त्यांची जी परवड झाली ती त्याना काहीशी लाजिरवाणीच होती. १७२१ सालापासून आपल्याला दिसते की, दिवसेंदिवस ते हिंदुस्थानावर, म्हणजे भारताच्या नर्मदेपलीकडच्या भागावर आपले अतिक्रमण वाढवत नेत आहेत; इतके की १८ व्या शतकाच्या अखेरीस ते सगळ्या मुलुखाचे पुरते धनी झाले आहेत आणि एके काळी सामर्थ्यवान असलेल्या मुघल साम्राज्याचे किरकोळ अवशेष तेवढे उरले आहेत. मुहम्मदशाहाच्या कारकिर्दीच्या सुरूवातीच्या काळापासून पुढे ऱ्हास आणि पतन यांचे जे केविलवाणे नाट्य घडून आले त्यात या दख्खनच्या लुटारूंचा भाग फारच मोठा होता, हे लक्षात घेता त्यांच्या पूर्वेतिहासाची संक्षिप्त रूपरेषा या ठिकाणी सादर करणे इष्ट ठरेल. सुदैवाने कॅप्टन ग्रँट डफ (१८२६) याने इतक्या अनुकूल परिस्थितीत मराठ्यांचा इतिहास एकदाचा पुरता लिहून टाकला आहे की, तशी अनुकूल परिस्थिती पुन्हा कुणाला लाभण्याची सुतराम शक्यता नाही.[१] म्हणून या विषयावर आणखी संशोधन करण्याचे ओझे मी बाळगण्याचे कारण नाही. मला जे काही सांगावयाचे आहे ते बहुतेक सगळे मी ग्रँट डफमधून घेतले आहे; पण वेळप्रसंगी मी कदाचित त्याचे एखादे विधान दुरूस्त करू शकेन किंवा त्याच्या हकीकतीला अधिक अचूकता आणू शकेन. कारण त्याला उपलब्ध नसलेली मुसलमानी साधने आता मला उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र या नांवाने ज्ञात असलेला मुलूख दख्खनमध्ये मोडतो. नर्मदेच्या दक्षिणेस असलेल्या भारताच्या प्रदेशाचा उल्लेख दख्खन असा होतो. महाराष्ट्र स्थूलमानाने त्रिकोणी आकाराचा आहे. त्याची एक बाजू सुरतेपासून गोव्यापर्यंत ४२० मैल लांब, दुसरी बाजू समुद्र किनाऱ्यापासून नागपूर शहराच्या आसपासपर्यंत ४२० मैल लांब आणि तिसरी बाजू नागपूरपासून गोव्यापर्यंत ४९० मैल लांब आहे. या सरहद्दींनी व्यापलेल्या प्रदेशाचे क्षेत्रफळ एक लक्ष तीन हजार चौरस मैल असून या प्रदेशाची सध्याची (म्हणजे १८९१ इ. स. ची) लोकसंख्या एक कोटी तेवीस लक्ष ब्याऐंशी हजार चारशे अकरा भरते.

---

१ विल्यम इर्विनचे हे लिखाण १८९८ सालाच्या डिसेंबर महिन्यातील आहे. तदनंतरच्या काळात ग्रँट डफचा मराठ्यांच्या इतिहासाबाबतचा अधिकार ( विशेषत: इ. १७७५ पूर्वीच्या काळाविषयीचा ) फारच कमकुवत बनला आहे. कारण या नंतरच्या काळात मराठ्यांच्या इतिहासाची लिखित साधने फार मोठ्या प्रमाणावर प्रकाशात आली असून फार्सी भाषेतील अनेक साधने नजरेस आली आहेत–ज्या गोष्टी ग्रँट डफला अपरिचित होत्या. यामुळे कोणत्या चुका दुरूस्त होणे क्रमप्राप्त आहे यासाठी पाहा, माझे शिवाजी अँड हिज टाइम्स आणि हिस्टरी ऑफ औरंगजेब खंड ४ तसेच गो. स. सरदेसाई यांचे मराठ्यांचे इतिहास आणि वि. स. राजवाडे यांचे निबंध. ( जदुनाथ सरकार ).

या प्रदेशाचे दोन मुख्य विभाग पडतात. नैसर्गिकदृष्टया विचार करता हे दोन्ही विभाग एकमेकांपासून अगदी भिन्न आहेत. पश्चिम बाजू कोंकण या नावाने ज्ञात आहे. पूर्व बाजूस देश ( येथे अर्विन, देश या शब्दाच्या अर्थाचा खुलासा करतो. मराठी भाषांतरात तो पुनरावृत्त व अनावश्यक समजून वगळला आहे. –भाषांतरकार ) म्हणतात. कोंकणचे पुन्हा (१) तळकोंकण–म्हणजे समुद्रकिनाऱ्यालगत जेमतेम काही मैल रूंदीचीच असलेली, सखल जमिनीची पट्टी आणि (२) घाटमाथा–म्हणजे घाटाच्या वरील भागातील कोंकण असे दोन भाग पडतात. तळकोंकण डोंगराळ खडबडीत असून घाट म्हणजे समुद्रसपाटीपासून ३–४ हजार फूट उंच असलेल्या पर्वतशिखरांची एक साखळीच आहे. या डोंगराच्या पूर्वेकडील पठारी प्रदेश म्हणजे देश. हा सामान्यपणे पर्वतशिखरांपेक्षा एक हजार फूट कमी उंचीचा भरतो. घाटमाथ्याच्या प्रदेशात डोंगरांची शिखरे अग्निजन्य खडकाची बनलेली आहेत. या कडेकपारीवरून कलाकुसरीचा जरा हात फिरविला की त्याचे रूपांतर दुर्गम अशा किल्लेगढयांमधे होऊ शकते. या नैसर्गिक वैशिष्टयांमुळे मराठयांच्या कब्जात किल्ल्यांची एवढी प्रचंड संख्या कशी होती याचा आपोआप खुलासा होतो. असल्या मुलुखात फौजफाटा हालविताना येणाऱ्या प्रचंड अडचणींवरून मराठयांना नामोहरम करण्याच्या कामी मुसलमानांची प्रगती मंद गतीची का राहिली आणि अखेर मुसलमानांचा पराभव का झाला ही गोष्ट स्पष्ट होते. कोंकणच्या डोंगराळ भागाचे लांबीत तीन तुकडे पडतात. उत्तरेकडील तुकडयास मावळ, मधल्या तुकडयास खोरा आणि दक्षिणेकडच्या तुकडयास मुऱ्हा असे म्हणतात. मावळ या शब्दावरूनच मावळे धनगर हा शब्द तयार झाला असून मराठयांच्या युद्ध व्यवहारात मावळयांची संख्या फार मोठी होती. देश या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात डोंगरांच्या चार समांतर रांगा आहेत. चांदवड डोंगररांग, अहमदनगर डोंगररांग, पुण्याच्या दक्षिणेस असलेली डोंगररांग आणि साताऱ्याच्या उत्तरेस असलेली महादेव डोंगराची रांग या त्या चार रांगा होत. असा हा महाराष्ट्र म्हणजे मराठयांची भूमी होय.[२]

या विस्तीर्ण भूप्रदेशाची आजची लोकसंख्या १८९१ च्या शिरगणतीप्रमाणे एक कोटी वीस लाखापेक्षा थोडी जास्त आहे. पण १८ व्या शतकात लोकसंख्या सध्याच्या एक

२ मराठा हा शब्द कसा उत्पन्न झाला याबाबत वेगवेगळया संसूचना आहेत. याबाबतची जी संसूचना सामान्यपणे प्रसिद्ध आहे तीच ग्रँट डफने स्वीकारली आहे. महाराष्ट्र या नावाच्या प्रदेशाची कल्पना अगोदरच गृहीत धरली आहे, तदनंतर भाषेचा अपभ्रंश होण्याच्या नेहमीच्या प्रक्रियेनुसार या भागातील लोकांचे आजचे नाव आपणास थेटपणे मिळते. पण बॅलड्स ऑफ दि मराठाज् प्रस्तावना पृष्ठ सहा, यावर एच्. ए. ॲक्वर्थ यांचा असा कल दिसतो की, रथी किंवा रथ ( रथातून युद्ध खेळणारे ) नामक जमात होती. त्यापासून मराठा हा शब्द व्युत्पन्न झाला. महारथ म्हणजे थोर योद्धा होय. यासाठी पुढे असेही गृहीत धरले पाहिजे की या जमातीचे नाव त्याच्या मुलुखाला लाभले व शेवटी महाराष्ट्र असे त्याचे संस्कृतीकरण झाले. पण बेडन पॉवेल ( ज. रॉ. ए. सो. ,१८९७, पृ. २४९ ) यास पसंत असे दिसते की मराठा हा शब्द म्हार किंवा महार या शब्दाकडे बोट दाखवितो; त्या जमातीचे लोक एके काळी फार होते व त्यांचे वर्चस्वही होते, त्यावरूनच महाराष्ट्र–'महारांचे राज्य' हा शब्द तयार झाला असे त्याला वाटते. असाच चमत्कारिक आणि फेटाळून लावण्यास पात्र असा सिद्धांत एच्. डी. रॉबर्टसन ( डिस्ट्रिक्ट डयूटीज डयूरिंग दि रिव्होल्ट इन इंडिया, १८५९, पृ. १०४ टीप ) याने पुढे केला आहे. त्याच्यामते मार हे मारणे या क्रियापदाचे रूप आहे आणि हत म्हणजे पळून गेला; मराठयांची लढाई करण्याची पद्धत झटापट करून पळून जाण्याची असल्यामुळे त्या पद्धतीवरून त्यांना सदरचे टोपण नाव मिळाले. (अधिक परिपूर्ण चर्चेसाठी पाहा, सरदेसाई मराठी रियासत, दुसरी आवृत्ती, खंड एक, २–६. जदुनाथ सरकार).

द्वितीयांश किंवा एक तृतीयांशही नसण्याची शक्यता आहे. या एकूण लोकसंख्येतील नक्की कोणता भाग मराठा हे विशिष्ट नाव हक्काने धारण करू शकतो हे नक्की सांगणे कठीण आहे. एका अर्थाने, मराठी मुलुखात राहणारे सगळे लोक किंवा मराठी भाषा बोलणारे सगळे लोक देखील मराठा या अभिधानावर हक्क सांगू शकतील. पण राजकीय अथवा लष्करीदृष्टचा पाहता, आणि येथे आपलाही संबंध तेवढ्या दृष्टीपुरताच आहे, सदरच्या नावाचा अर्थ काहीसा मर्यादित ठेवणे भागच आहे. म्हणून मराठे लोकांची संख्या ठरविण्याच्या कामी आपण मराठे या शब्दाचा अर्थ मराठा या नावाचा दावा करणारे आणि कुणबी जातीचे लोक असा मर्यादित करू.

धर्माच्या दृष्टीने पाहता मराठे जवळजवळ पूर्णांशाने हिंदू धर्माचे आहेत. त्यांतील बरेच मोठे प्रमाण सन्माननीय पण उच्चकुलीन नसलेल्या कुणबी जमातीच्या लोकांचे आहे. या कुणबी लोकांचा येथील मुख्य व्यवसाय, भारतातील मेहनत–मशागतीचा आहे. ज्याचा उल्लेख मराठा राष्ट्र असा होऊ लागला ते राष्ट्र या कुणब्यांमधूनच निर्माण झाले. मराठा राष्ट्राचा पहिला संस्थापक शिवाजी हा स्वतः एक कुणबीच होता. १७२० सालानंतर खरी सत्ता ब्राह्मण जातीचे पेशवे यांच्या हाती गेली. पेशव्यांचे म्हणजे मुख्य मंत्र्याचे पद वंशपरंपरागत झाले. या पदामुळे शिवाजी राजाच्या घराण्यातील उत्तराधिकारी त्यांच्यापुढे फिके पडले.

दख्खनच्या अंतर्गत इतिहासात खोलवर शिरण्याचे अथवा मागे दूरवर जाण्याचे आपणास येथे कारण नाही. मराठा राज्याच्या उदयाची रूपरेषा थोडक्यात समजण्यासाठी सोळाव्या शतकाच्या अखेरीस तेथील परिस्थिती कशी होती हे नजरेखालून घातले तरी पुरेसे आहे. मुसलमान राजवंशांनी हा सर्व मुलुख अर्धवटपणे नमविल्यासारखा दिसतो. या मुसलमान राजवंशांनी बाराव्या शतकापासून दख्खनचा बहुतेक मुलुख आपापसात तोडून घेतल्यासारखा दिसतो. सोळाव्या शतकात मराठ्यांचा मूळ मुलुख ज्यांच्या प्रदेशात मोडत होता त्या विजापूर आणि अहमदनगर येथील राजवटींच्या सैन्यामध्ये मराठ्यांची मोठी भरती झाली असल्याचे दिसते. या सुमाराच्या मिळणाऱ्या माहितीवरून मराठा वंशाचे नऊ प्रमुख सरदार होते. त्यापैकी सात विजापूरकरांच्याकडे व दोन अहमदनगरच्या चाकरीत होते, असे दिसून येते. अहमदनगरचे राज्य विजापूरच्या उत्तरेला होते व हे राज्य मराठ्यांच्या मूळ मुलूखास अधिक जवळचे होते. अहमदनगरच्या राज्याशी संबंध जडलेल्या दोन मराठा घराण्यांपैकी एकाचे आडनाव भोसले[३] असे होते. या भोसले मंडळींकडे कित्येक गावांची पाटीलकी होती–आणि त्यांचे भोसले हे आडनाव त्यांनी प्रथम वस्ती केलेल्या त्यांच्या भोसा किंवा भोंसा या गावावरून त्यांना मिळाले असे म्हणतात. मालोजीचे वडील बाबाजी हे पुणे परगण्यातील हिंगणी, बेरडी, देउळगाव आणि तपताश या गावांचे धनी होते. (मा. उ. : खंड दोन, ३४२.) ; पण त्यांचे नेहमीचे वास्तव्याचे ठिकाण म्हणजे दौलताबादेजवळील वेरूळ हे होय. येथे इ. १५५२ मध्ये बाबाजी भोसल्यांचा सर्वात मोठा मुलगा

३ इर्विन यानी लिहिलेली ही मराठ्यांच्या आरंभीच्या इतिहासाविषयीची हकीकत ग्रँट डफ याच्या इतिहासावर आधारलेली आहे. गो. स. सरदेसाई यांच्या मराठी रियासत, खंड १, आवृत्ती ११५ या आधारे सदरची हकीकत दुरुस्त करून मी येथे दिली आहे. शिवाजी आणि शंभूजी यांच्याविषयी पूर्ण तपशीलवार, अद्ययावत तसेच आधार सामग्रीच्या उल्लेखासहित माहितीसाठी पाहा, माझे शिवाजी अँड हिज टाइम्स आणि हिस्ट्री ऑफ औरंगजेब, खंड ४ (जदुनाथ सरकार.)

मालोजी याचा जन्म झाला. त्याचे लग्न फलटणच्या नाईक निंबाळकर या मातब्बर माणसाच्या बहिणीशी झाले. १५७७ इ. मध्ये त्याने अहमदनगरची चाकरी धरली. १५९४ इ. मध्ये वारस मिळण्याविषयी एका पिरास केलेला नवस फळास येऊन त्याच्या थोरल्या मुलाचा जन्म झाला. या मुलाचे नाव शाहजी ठेवले. मालोजी १६२० च्या थोडा अगोदर मरण पावला. त्याचा वारसा शाहजीला मिळाला.

## ४३ : शिवाजी : त्याचा जीवनमार्ग

१६०४ इ. मध्ये शाहजीचे लग्न दैवयोगाने, सरकार दौलताबादचा देशमुख, अहमदनगर राज्यातील सर्वात जास्त मातब्बर मराठा सरदार सिंदखेडचा लखूजी जाधव याच्या मुलीशी झाले. लग्नासाठी तिला मालोजीने धरून आणले होते. लढाया आणि कारस्थाने यांत सक्रिय भाग १६२८ इ. पासून घेत घेत शाहजी तुंगभद्रेच्या काठी बसवपट्टण येथे जानेवारी १६६४ इ. मध्ये मरण पावला. त्यावेळी त्याच्या मागे शिवाजी आणि व्यंकोजी असे दोन औरस मुलगे होते; पैकी शिवाजी हा त्यास जिजाबाई या पहिल्या बायकोपासून झाला होता. शिवाजीचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर ११ एप्रिल १६२७ इ. मध्ये झाला. शिवाजीचे बाळपण पुणे येथे वडिलार्जित घरी गेले; पण वयाच्या सोळाव्या वर्षापासून (म्हणजे सुमारे १६४३ इ. पासून) तो तेथून कोठेतरी वारंवार जाऊ लागला. अशा बहकण्यापासून, तसेच त्याच्या बेबंद सहकाऱ्यापासून त्यास तोडण्यासाठी त्याच्या पालकाने (त्याचे वडील घरी नसत, कारण ते विजापूरकरांच्या चाकरीत होते.), त्याच्या कुटुंबाची काही स्थावर मालमत्ता देखभालीसाठी त्याच्याकडे सोपविली. तरी देखील शिवाजीच्या मनात स्वतंत्र होण्याची तारुण्यसुलभ ऊर्मी उसळतच राहिली. १६४६ इ. मध्ये वयाच्या १९ व्या वर्षी पुण्याच्या नैर्ऋत्येस पंचवीस मैलांवर असलेला नीरा नदीच्या उगमस्थळीचा तोरणा किल्ला त्याने सामोपचाराच्या मार्गाने सर केला. विजापूरकरांना खंडणी देणारा जहागीरदार म्हणून राहण्याचे त्याने आता पत्करले. पण कित्येक वर्षे अशा गोष्टींची कसलीही दखल कोणी घेतली नाही.

तोरणा या ठिकाणी खजिना सापडल्यानंतर त्याने ते द्रव्य आग्नेय दिशेस पाच मैलांवरील डोंगर-शिखरावर दुसरा एक किल्ला बांधण्यासाठी खर्च केले. या किल्ल्याला त्याने राजगड असे नाव दिले. त्याचा पालक मरण पावल्यावर त्याने कुटुंबाच्या मालकीच्या स्थावराचा कब्जा घेतला व महसूल पाठविण्याविषयीच्या वडिलांच्या मागण्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. यानंतर फार विलंब न लावता त्याने द्रव्याच्या जोरावर मुसलमान किल्लेदाराला वश करून कोंडाणा किल्ला ताब्यात घेतला. त्याचे नाव सिंहगड असे बदलले. त्याच्या पाठोपाठ पुरंदर नावाचा आणखी एक मोक्याचा किल्ला कपटाने घेतला. विजापूरच्या शासकाने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. अशाप्रकारे चाकण आणि नीरा या दरम्यानच्या पट्ट्यात त्याचे वर्चस्व केव्हा प्रस्थापित झाले हे कळून देखील आले नाही.

१६४८ इ. मध्ये शिवाजीने विजापूरकराविरुद्ध उघड बंड केले. कल्याणहून येत असलेल्या खजिन्याच्या तांड्यावर त्याने धाड घातली. दहा किल्ल्यांवर अचानक छापा घालून ते ताब्यात घेतले, कोकणातील कित्येक श्रीमंत गावांवर लुटालुटीसाठी धाडी घातल्या. शेवटी कल्याणवर अचानक छापा घालून सुभेदाराचे कुटुंब पकडले. (नंतर बरेच विजय

संपादून त्याने स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला व यथासांग दरबार भरवून कारभारव्यवस्था, लष्कर आणि नौदल उभे केले.)

अविश्रांत उद्योग आणि लढायामागून लढाया यांनी भरलेले आयुष्य घालवून शिवाजी ५ एप्रिल १६८० रोजी वयाच्या ५३ व्या वर्षी मरण पावला. ग्रँट डफ म्हणतो ते खरेच की, "तो अद्वितीय माणूस होता यात शंकाच नाही. न्याय द्यावयाचा झालाच तर त्याची अनेक कृत्ये निंदास्पद होती, तरी पण इतिहासातील त्याचे स्थान उच्च आहे हे कबूल करणे भागच आहे." आपल्या मृत्यूसमयी[४] काही अपवाद वगळता गणदेवीपासून फोंड्यापर्यंतचा सगळा कोकण आणि पूर्वेकडची हद्द स्पष्ट दर्शविणारी ताथवड्यापासून पन्हाळ्यापर्यंतची किल्ल्यांची माळ त्याच्या कब्जात होती. याखेरीज काही फुटकळ मुलूख त्याच्या ताब्यात होता, त्यामध्ये शिंगणापूर, दमणजवळचा पारनेरा किल्ला, बागलाणातील कित्येक किल्ले आणि खानदेश व संगमनेर या भागातील कित्येक मोक्याच्या जागा त्याच्याकडे होत्या.

## ४४ : औरंगजेबाची मराठ्यांशी युद्धे

जून १६८० इ. मध्ये, त्यावेळी १८ वर्षे वयाच्या असलेल्या राजाराम या धाकट्या मुलाला गादीवर बसविण्याचा प्रयत्न मोडून टाकून, थोरला मुलगा संभाजी वडिलांच्या जागी गादीवर आला. पुढच्या वर्षी म्हणजे १६८१ इ. मध्ये बादशाह आलमगीर याचा चौथा मुलगा शाहझादा अकबर यास संभाजीने रायगड येथे आश्रय दिला. वडिलांविरुद्ध बंड करणाऱ्या राजपुतांचे नेतृत्व या शाहझाद्याने केले होते. पण शेवटी त्याला या मुलखातून हुसकून लावण्यात आले. बंडखोर मुलगा आणि जिंकण्यास कठीण बनू पाहणारे मराठ्यांचे उगवते राज्य या दोन गोष्टींच्या हातमिळवणीने आलमगीराने धास्ती घेतली. जातीने दख्खनच्या मोहिमेवर निघण्याचा त्याने निश्चय केला. २५ नोव्हेंबर १६८१ रोजी त्याचे बुऱ्हाणपूरला आगमन झाले आणि त्याच्या अमदानीची राहिलेली २६ वर्षे त्याने अखंडपणे आणि निष्फळपणे मराठ्यांविरुद्धच्या मोहिमेत घालविली. शाहझादा अकबर यास देश सोडून इराणात पळून जाण्यास भाग पाडले, तर संभाजीस पकडून त्याचा वध केला (१६८९) आणि त्याची बायको व मुले याना कैद केले.[५] बादशाह अहमदनगर मुक्कामी १७०७ इ. मध्ये मरण पावला, त्यासमयी मराठे पूर्वी कधी नव्हते इतके सामर्थ्यवान बनले होते, खुद्द शाही छावणीमध्ये देखील होणारे मराठ्यांचे शिरकाव रोखणे कठीण झाले होते.

संभाजीचा मुलगा शिवाजी हा शाहूजी–याला आलमगीराने त्यास दिलेल्या टोपण नावानेच आयुष्यभर ओळखतात–पकडला गेला तेव्हा आठ वर्षांचा होता. त्याचे पालन-पोषण मुसलमानी छावणीतच झाले. १७०७ साली आलमगीर मरण पावला तेव्हा तो

४ आपल्या मृत्यूसमयी शिवाजीच्या राज्यात अंतर्भूत होणारा मुलख म्हणजे उत्तरेस रामनगरपासून (म्हणजे सूरत एजन्सीमधील आजचे धरमपूर संस्थान) कारवारपर्यंतचा, पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेश वगळून उरलेला सर्व भाग किंवा दक्षिण कानडा या कर्नाटक राज्याच्या जिल्ह्यातील गंगावती नदीपर्यंतचा भाग. पूर्वेकडील हद्द उत्तर दिशेस बागलाण भागास वळसा घालून दक्षिणेकडे पुणे आणि नासिक जिल्ह्यांच्या मध्यातून वाकडीतिकडी व तुटक सरकत जाणाऱ्या रेषेची बनून नंतर संपूर्ण सातारा जिल्ह्यास वळसा घालून कोल्हापूर जिल्ह्याचा बराचसा भाग अंतर्भूत करणारी होती.

५ तपशिलासाठी पहा, माझा हिस्टरी ऑफ औरंगजेब, खंड चार, प्रकरण ४४ आणि ४८. (जदुनाथ सरकार).

राजबंदीच होता. मधल्या काळात मराठ्यांनी आलमगीराशी प्रतिकार करणे चालूच ठेवले होते. सुरूवातीला संभाजीचा सावत्र भाऊ राजाराम हा त्यांचा नेता होता. पण मार्च १७०० इ. मध्ये झालेल्या त्याच्या मृत्यूनंतर त्याची विधवा ताराबाई हिने आपला अज्ञान मुलगा, दुसरा शिवाजी ( जन्म १६९९ इ. ) याच्या नावे प्रतिकार चालू ठेवला.

१७०० ते १७०७ या काळात आलमगीराने मराठ्यांविरुद्धची आपली मोहीम चालू ठेवली. त्यांच्या असंख्य बालेकिल्ल्यांची संख्या थोडी कमी करणे हेच त्याने आपले मुख्य उद्दिष्ट ठेवले होते. पण मधल्या काळात या 'अतिदुष्ट शत्रू' ने आपल्या कारवाया वाढविल्या होत्या. १७०२ इ. मध्ये सुरत आणि बुर्‍हानपूर या गावांमधून त्यांनी खंडणी वसूल केली होती. १७०५ इ. मध्ये त्यांनी नर्मदा नदी प्रथमच ओलांडली आणि माळव्यात आतपर्यंत धडक मारली. त्यांनी खानदेश आणि मोठ्या फौजेनिशी गुजरातशी कुरापत काढली. उत्तरेकडे मुघल फौजा त्यांच्या पाठीवर पाठविल्या, तर दक्षिणेकडे बादशाह जातीने जुन्नरहून विजापुरापर्यंत कूच करीत गेला. प्रथम, संभाजीचा मुलगा शाहू यास सोडून देण्याचे करून, दुसऱ्याने, सरदेशमुखी या नावाखाली दख्खनच्या महसुलातील दहावा हिस्सा देऊ करून, त्यांच्याशी सलोखा करण्याचा प्रयत्न झाला. पण या वाटाघाटीतून काही निष्पन्न झाले नाही. १७०५ इ. च्या फेब्रुवारी महिन्यात पेम नाईकचा बालेकिल्ला वाकिनवेऱ्याच्या ( वागिनगेरेच्या ) किल्ल्याला वेढा घालण्यास आलमगीराने सुरूवात केली. वेढा तीन महिने चालला. पण जुल्फिकारखान व दाऊदखान यांना बोलावून घेतल्याखेरीज तो किल्ला काही सर झाला नाही. ७ मे १७०५ रोजी किल्ला सर झाला. शाही फौजांनी तदनंतरचा पावसाळा त्या ठिकाणापासून तीन कोसावर असलेल्या देवापूर या कृष्णेवरील गावाजवळ घालविला. ३० जानेवारी १७०६ रोजी बादशाह अहमदनगरला पोहोचला; तेथेच २ मार्च १७०७ रोजी मरण पावला. त्याच्या मृत्यूच्या वेळी मराठे मंडळी शाही छावणीच्या अगदी जवळपास लूटमार करीत होती. ( मिरात, ४९८–५०७; मा. आ. ४९८, ५०४, ५१२, ५२१. )

## ४५ : १७०७ नंतरच्या मराठ्यांतील घटना

या पूर्वी तपशीलवार कथन केल्याप्रमाणे, मृत बादशाहाचा सर्वात थोरला मुलगा मुहम्मद मुअज्जम आणि दुसऱ्या क्रमांकाचा मुलगा अअ्जमशाह या दोघांमध्ये आता तख्तासाठी भांडण जुंपले. पैकी अअ्जमने शाही छावणीचा कब्जा घेतला. ज्याला नुकतेच देखरेखीसाठी वजीराचा मुलगा जुल्फिकारखान याच्या हवाली केले होते त्या राजा शाहूलाही याने ताब्यात घेतले. अहमदनगरहून आग्ऱ्यास जाण्यासाठी कूच चालू असताना जुल्फिकारखानाच्या विनंतीवरून शाहूची सुटका करून त्यास दक्षिणेस जाण्याची मुभा दिली. तळ दुराहा येथे असता तो तेथून निघाला. परगणा सुलतानपूर-नंदुरबार आणि सरकार बिजागड याना वेढणाऱ्या डोंगराळ भागातील मोहनसिंग जमीनदार याच्या घराकडे निघालेल्या सदर जमीनदाराच्या पन्नास चाकरांना शाहूने बरोबर घेतले. तेथे पोहोचल्यावर त्यास रसद मिळून तो सुलतानपुरातून बाहेर पडला. परगणा सुलतानपूरमध्ये कुकुरमुंड्याचा किल्लेदार आणि सुरतेपासून थेट बुर्‍हाणपुरापर्यंतच्या मुलखात लुटालुटीचा उद्योग करणाऱ्या अंबू बांडे नावाच्या मराठा इसमाने त्यास आणखी मदत केली. अशी कुमक मिळत गेल्याने, आपल्या मुलखात परतणे त्यास शक्य झाले. येथे आलमगिराने घेतलेले कित्येक किल्ले यापूर्वीच

मराठ्यांनी पुन्हा सुरु केले होते. राजारामाची विधवा ताराबाई हिचे कच्चे पाठीराखे असलेली मंडळी आता मोठ्या आनंदाने शाहूस येऊन मिळाली. शाहू कूच करीत अहमदनगरास आला. आलमगीराने प्राण सोडला त्या जागेला त्याने भेट दिली. तेथे त्याने खैरातही केली. नंतर तो औरंगाबाद आणि दौलताबाद या ठिकाणी गेला. बादशाहाच्या खुलदाबाद येथील कबरीचे भाविकपणे दर्शन घेता यावे या हेतूने त्याने हा प्रवास केला. त्याच्या अनुयायांनी लूटमार करण्यास सुरूवात केली. म्हणून मन्सूरखान या सुभेदाराने प्रतिकाराची तयारी केली. तेव्हा शाहूने आपल्या लोकांना रोखले व इकडे येण्याचा आपला हेतू सिद्धीस नेऊन तो आपल्या मुलुखास परतला.[६]

मार्च १७०८ इ. मध्ये, ताराबाई आणि तिचे पक्षपाती यांच्या क्षीण प्रतिकारानंतर, शाहूने सातान्यावर कब्जा मिळविला आणि तो गादीवर बसला. याच सुमारास एक ब्राह्मण मुलकी अधिकारी, विश्वनाथचा मुलगा, बाळाजी भट नावाचा, प्रथमच आपल्या नजरेस येतो. हा माणूस पुढे पेशवा म्हणजे मुख्यमंत्री झाला. ताराबाईच्याविरुद्ध लढा १७०९ इ. मध्ये चालू होता. पण त्या वर्षाच्या अखेरीस मुघलाशी एक करार होण्याच्या निमित्ताने गादीच्या दावेदारांपैकी कोणाचा दावा योग्य याचा निर्णय करण्याची गरज दूर झाली. आमचा आश्रित, राजा शाहू यास जे मानतील त्या सर्वांना दख्खनच्या महसुलातील चौथा हिस्सा ( चौथ ) वसूल करण्यास मुभा मिळेल, द्रव्य मुघल अधिकारी गोळा करतील व त्यांच्या मार्फतच त्याची अदायगी होईल असे दख्खनचा सुभेदार जुल्फिकारखान याचा मुतालिक दाऊदखान याने कबूल केले. जानेवारी १७१२ मध्ये राजाराम आणि ताराबाई यांचा मुलगा देवीच्या रोगाने मरण पावला; तेव्हा गादीच्या वारसाचा प्रतिस्पर्धी म्हणून राजारामाची दुसरी बायको राजसबाई हिच्या मुलास, म्हणजे ताराबाईचा मुलगा शिवाजी याच्या सावत्र भावास, पुढे केले.

१७१३ इ. स. मध्ये, जुल्फिकारखानाच्या वधानंतर, त्याचा प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या दाऊदखानाला सदर कामावरुन काढून टाकले. त्यामुळे त्याजबरोबर झालेला ठराव संपुष्टात आला. तेव्हा मराठ्यांनी आपली जुनी पद्धत पुन्हा सुरू केली. सेनापती चंद्रसेन जाधव याला चौथ ( महसुलाचा चौथा भाग ) सरदेशमुखी ( महसुलाचा १० वा हिस्सा ) आणि घासदाणा[७] ( म्हणजे खर्चासाठी रक्कम ) या नावाखाली दख्खनमध्ये दमदाटी करून पैसे उकळण्याच्या कामावर धाडले. चंद्रसेन जाधवासोबत बाळाजी

६ वरील हकीकत खाफीखान ५८२–९३ आणि दिल् १७१-ब मधील हकीकतीवर आधारलेली आहे. कुकुरमुंडे हे ठिकाण.........उत्तर किनाऱ्यावर, खानदेशातील धुळ्याच्या वायव्येस ६२ मैलांवर राजपिंपळा संस्थानाच्या सरहद्दीस लागून आहे. चिटणीस, ८–९ यांनी दिलेला प्रवासमार्ग विश्वसनीय वाटत नाही. खाफीखान वाचण्यात गो. स. सरदेसाई यांची चूक झाली आहे; त्यामुळे ते म्हणतात, 'शाहू........ बिजागड, सुलतानपूर आणि नंदुरबार या डोंगराळ भागातील सुजनसिंग रावळ या जमीनदाराकडे आला, सदर जमीनदार धुळ्यापासून ७–८ कोसांवर असलेल्या लांबकानी नामक किल्ल्यावर राहात असे.' (मराठी रियासत, एक ७४४). या बाबतीत शाहूस सुरुवातीची मदत देणाऱ्यांची नावे मराठी घेण्यात आली आहेत. राजवाडे यांनी अंबू पांडे हे चुकीचे नाव अमृतराव कदम बांडे असे दुरूस्त केले आहे. (जदुनाथ सरकार).

७ घासदाणा म्हणजे गवत आणि धान्य. याचा अर्थ जनावरांच्या वैरणीसाठी पैसा व माणसांच्या अन्नासाठी द्रव्य यासाठी वसूल करण्याची पद्धत इ. १६९२ पासून सुरु झाली. घासदाण्याद्वारे होणारी वसुली, वसुली करणाऱ्या मराठा अमलदारांना मिळे; तर चौथ आणि सरदेशमुखी याद्वारे मिळणारे द्रव्य राजाच्या खजिन्यास जमा होई.

विश्वनाथ गेला. राजा शाहूच्या हितसंबंधांची जपणूक करण्याचे काम त्याच्याकडे होते. लौकरच या दोन गृहस्थांमध्ये भांडण जुंपले. (लढाईत पराभव होऊन) बाळाजीला स्वतःचा जीव वाचविण्यासाठी बाजीराव आणि चिमाजी या आपल्या मुलांसह पळून जाणे भाग पडले. त्याला पांडवगड येथे आसरा मिळाला.[८]

आता निजामुलमुल्क दख्खनचा सुभेदार झाला होता (इ. १७१३). प्रथम प्रथम त्याने संभाजीची कड घेतली पण थोडचाशा लढती झाल्यावर एक समझोता घडून आला. मराठ्यांची आपआपसातील ईर्षा चालूच राहिल्यामुळे बाळाजीला आपला उत्कर्ष साधणे जमले; इतके की, (१६ नोव्हेंबर १७१३ रोजी) त्याला पेशवा हे पद प्राप्त झाले. १७१९ इ. मध्ये मुघल साम्राज्याचा मुख्य बक्षी अमीरुल्-उमरा आणि बादशाहाचा मुतालिक सय्यिद हुसैन अलीखान बार्हा हा दख्खनला प्रमुख पदी आला. दख्खनचा कब्जा घेण्यास विरोध करणाऱ्या दाऊदखानाचा त्याने पराभव केला. दाऊदखान मारलाही गेला. तद्नंतर सय्यिदांनी आपली शस्त्रे मराठ्यांवर उगारली. पण त्याच्या प्रयत्नाना यश जवळ जवळ न आल्यामुळे शेवटी सलोखा करण्यास आनंदाने कबूल होणे त्याला भाग पडले. चौथ आणि सरदेशमुखी याबाबतचे आश्वासन त्याने दिले आणि त्यानी मागितलेले 'स्वराज्य' त्याना बहाल करण्यात आले. तद्नंतर हुसैन अलीखान दिल्लीला परतला. या ठरावास मान्यता देण्यास फर्रुखसियरने नकार दिला, हे जरी खरे असले तरी ठरावाचा अमल तिथल्या तिथे झाला आणि १७१९ इ. मध्ये फर्रुखसियर पदच्युत झाल्यावर औपचारिक कागदपत्रे जारी करण्यात आली. याच्या बदल्यात वारसाने आलेल्या राज्याच्या संबंधात १० लाखांची पेशकश (नजराणा), लुटालुटीचा बंदोबस्त करण्यासाठी, चोर लुटारूंना शिक्षा करून अथवा चोरीस गेलेली रक्कम परत करून राजा शाहूची सरदेशमुखी मान्य केल्यावर त्याने दंड भरावा आणि बादशाहाच्या चाकरीसाठी १५ हजारांचे घोडदळ बाळगावे या गोष्टीचे आश्वासन शाहूकडून मिळाले.[९]

तद्नंतर लौकरच निजामुलमुल्काने माळव्यातून पलायन केले. पाठोपाठ त्याने सय्यिद दिलावर अलीखान आणि आलिम अलीखान यांचा पराभव केला. त्याची वजीर म्हणून नेमणूक झाली. अखेरीस तो दक्षिणेत परतला तेव्हा, मालकीस त्याचे नाव लागले नाही तरी, प्रत्यक्षात तो मुघलांच्या दक्षिणेतील मुलुखाचा स्वतंत्र शासक बनला होता. या संक्षिप्त घटनाक्रमावरून असे दिसून येते की, इ. १६७० सालापर्यंत मराठ्यांनी आपले लक्ष दख्खनच्या पश्चिम बाजूपुरते म्हणजे स्थूलमानाने महाराष्ट्राच्या त्यांच्या मुलुखापुरते मर्यादित ठेवले होते. मुघलांच्या सुभ्यातील महसुलाची चौथ जबरदस्तीने वसूल करण्याचा पहिला प्रकार इ. १६७० मध्ये खानदेशातील मुलुखगिरीच्या वेळी घडला. याच वर्षी शिवाजीने जातीने सुरत (दुसऱ्याने) लुटली. अगदी १६५८ इ. पासून मराठ्यांच्या पदरी मुसलमान काही प्रमाणात आढळतात. पण त्यांची वरिष्ठ पदे मात्र नेहमी हिंदूंच्या हाती असत. विजयामागून विजय मिळविणारी सत्ता प्रस्थापित करीपर्यंत त्यांच्या इतिहासात हीच स्थिती राहिल्यासारखी दिसते. नर्मदेच्या पलीकडे उत्तरेतील त्यांची पहिली मुलुखगिरी इ. १७०५ पर्यंत (जर आपण १७२० इ मधील सौम्य हल्ला अपवाद म्हणून वगळला तर)

८ बाळाजीच्या सुरुवातीच्या जीवनमार्गाविषयी तपशीलवार आणि अचूक माहितीसाठी पाहा: गो. स. सरदेसाई यांची मराठी रियासत, भाग दोन, १७–४०. पांडवगड हे ठिकाण वाईजवळ आहे. सदरच्या लढाईचा समय सरदेसाई डिसेंबर १७१० इ. असा सांगतात. (जदुनाथ सरकार).

९ संपूर्ण आणि अधिक तपशीलासाठी पाहा: सरदेसाई. दोन, ८२–११५. (जदुनाथ सरकार).

आढळात येत नाही. त्या वर्षी माळवा आणि गुजरात उध्वस्त करण्यात आले. (उत्तर) हिंदुस्थानच्या प्रदेशातील त्यांच्या या धाडीपुढे वारंवार व अधिकाधिक विस्तीर्ण प्रदेशात पडू लागल्या. पुढे पुढे तर तो एक दुःखदायक असा वार्षिक अनुभव बनला. म्हणून आता आपण महम्मदशाहाच्या कारकिर्दीच्या पहिल्या अर्ध्या भागात गुजरात बुंदेलखंड आणि माळवा या सुभ्यांतील घटनाक्रम जरासा तपशीलवार पाहू. या घटनाक्रमाचा मराठ्यांच्या आक्रमणांशी काय संबंध आहे तेही पाहू. नर्मदेच्या उत्तरेकडील मुघलांच्या मुलुखात एकसारखी आक्रमणे करण्याची जी चाल या वेळेपासून सुरू झाली ती ब्रिटिशांच्या सत्तेच्या उदय होईपर्यंत टिकून राहिली. मुसलमानांच्या राज्याला चिरडून टाकण्याचा दृढ निश्चयातून सदरची चाल उद्भवलेली होती. या दूरगामी योजनेचा कर्ता बाजीराव होता. त्याला इ. १७२० मध्ये वडील बाळाजी विश्वनाथ याचा वारस म्हणून पेशवाईची वस्त्रे मिळाली.

## ४६ : गुजरातेत मराठे

इ. १६८० मध्ये शिवाजीचा मृत्यू झाल्यावर गुजरात सुभ्यात १७०२ साली मराठे प्रथम आल्याचे आढळून येते. त्यावेळी त्यांनी सुरतेमधून खंडणी गोळा केली. तद्नंतर १७०५ साली मराठ्यांनी १५ हजार घोडेस्वारांनिशी धाड घातली आणि बाबा प्यारा या नर्मदेवरील उताराच्या जागी फौजदाराचा पराभव करून मराठ्यांनी जिकडे तिकडे कत्तली केल्या. तेव्हा शाहझादा अज़मशाह यास तत्काळ गुजरातचा सुभेदार नेमिले. त्याने तेथील परिस्थिती थोडचा फार अंशाने पूर्वपदावर आणली. आलमगीराच्या मृत्यूपासून (१७०७ इ.) ते मुहम्मदशाहाचे राज्यारोहण होईपर्यंत (१७१९ इ.) गेलेल्या काळात मराठ्यांनी मोठ्या प्रमाणावरील कोणतेही आक्रमण केल्याचे दिसत नाही. पण दरम्यानच्या काळात दरवर्षी काढलेल्या चौथ-वसुलीच्या छोट्या मोहिमांमध्ये त्यांना यश आल्याचे दिसते. मराठ्यांचा दावा असा होता की खंडणी वसूल करण्याचा त्यांचा हक्क इ. १७१९ मध्ये दिल्ली मुक्कामी पक्का झाला होता. त्यावेळी दख्खनच्या सहा सुभ्यांमधून चौथ मिळण्याविषयीची कागदपत्रे हस्तांतरित झाली होती. पण हा दावा बहुधा बराच निराधार होता. विरुद्ध पक्षाने या दाव्यास थोडीसुद्धा संमती कधी दर्शविली नाही. इ. १७२० नंतर वडील बाळाजीच्या जागी पेशवाईची वस्त्रे बाजीरावाला वारसाने मिळाली तेव्हा नर्मदेच्या उत्तरेकडील मुघलांच्या साम्राज्यावर दमदार आणि चिकाटीची अतिक्रमणे होण्याची एक मालिकाच सुरू झाली. एका दूरगामी आणि पोक्त योजनेचा पाठपुरावा म्हणून ही कृत्ये घडत होती. बाजीराव राजा शाहूला म्हणाला, "वठू लागलेल्या झाडाच्या खोडावर घाव घालू, फांद्या काय आपोआपच पडतील. अशा रीतीने कृष्णेपासून सिंधूपर्यंत मराठ्यांचे निशाण फडकवावे असे वाटते." तेव्हा उत्साहाने उत्तेजित होऊन राजा उद्गारला, "तू ते निशाण हिमालयावर रोवशील!"

या काळात विवक्षित मराठा अमलदाराला विवक्षित सुभ्यावरील हल्ल्यासाठी नेमून देण्याची प्रथा सुरू झाली. त्यानुसार पेशव्यांना खानदेश आणि बालाघाटचा भाग दिला आणि पुढे माळव्यातल्या व यमुना नदीपर्यंतच्या मुलुखातील मोहिमा देऊ केल्या होत्या. सेनापती खंडेराव दाभाडे हा तापी आणि नर्मदा या दोन नद्यांमधील बागलाण मुलुखातून तसेच गुजरातमधून बाक्या वसूल करीत असे.

निजामुल्मुल्क आणि सय्यिद आलिम अलीखान या दोघांमध्ये बाळापुराजवळ ९ ऑगस्ट १७२० रोजी जी लढाई झाली तीत खंडेराव दाभाडचाच्या फौजा सय्यिद पक्षाच्या बाजूने लढल्या होत्या. त्यांपैकी एक अमलदार दमाजी गायकवाड याने विशेष उल्लेखनीय कामगिरी

बजावली होती. सेनापतीच्या शिफारशीवरून राजा शाहूने त्यास द्वितीय सेनापती नेमून समशेर बहादुर असा किताब दिला. इ. १७२१ मध्ये दमाजी मरण पावला व त्याचा वारसा त्याचा पुतण्या पिलाजी गायकवाड याजकडे येऊन हा पिलाजी गुजरातवर हल्ले चढविणारा प्रमुख मराठा नेता बनला. दुसरा एक उल्लेखनीय मराठा सरदार म्हणजे विश्वासरावाचा मुलगा उदाजी पवार हा होय. त्याची कामगिरी नुकतीच नजरेत भरू लागली होती. त्याने माळव्यात धारपर्यंत मोहिमा काढल्या होत्या. गुजरातेतही मुलुखगिरी करून लूनावाडा[१०] येथपर्यंत लुटालुटीचे लोण नेऊन पोहोचविले होते. कंठाजी कदम बांडे नावाचाही एक त्याचा उद्योगी साथीदार होता व त्याने गुजरातवरील धाडीत प्रमुख भूमिका बजावली.

बहादुरशाह (१७०७–१७१२) आणि फर्रुखसियर (१७१२–१७१९) यांच्या कारकिर्दीत एका मागोमाग एक आलेल्या सुभेदारांनी गुजरातेतून थोडी फार सुव्यवस्था राखली होती. या सुभेदारांमध्ये विशेष उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे गाझीउद्दीनखान फीरूझजंग आणि महाराजा अजितसिंग राठोड या होत. याच काळामध्ये हैदर कुलीखान इस्फरैनचा या सुभ्याशी पहिलावहिला संबंध आला. त्याजकडे १७१५ डिसेंबरपासून १७१८ जूनपर्यंत सुरत या महत्त्वाच्या शहराची आणि बंदराची जबाबदारी होती. इ. १७२० मध्ये सदर हैदर कुलीखान ज्या सय्यिद पक्षाचा होता त्याचा बोजवारा उडाला तेव्हा हैदर कुलीखानाच्या जागी अजितसिंगाची नेमणूक झाली हे आपण मागे पाहिलेच आहे. तद्नंतर त्याच्याही जागी निजामुल्मुल्काचा प्रतिनिधी हमीदखान हा १७२३ फेब्रुवारीमध्ये आला. (मा. उ. : खंड तीन, ७६५.) पण आपल्या जागी उत्तराधिकारी म्हणून आलेल्यांशी त्याच्या उत्तराधिकाऱ्याच्या हक्काबाबत हैदर कुलीखानाने दावा मांडल्यामुळे सदर सुभा त्याच्याकडे राहिला; पण त्याची जबाबदारी मात्र त्याने नेमिलेला कोणी एक शुजाअतखान याच्याकडे आली. पुढे कालचक्र आणखी फिरल्यावर, निजामुल्मुल्काची या सुभ्यावरील नेमणूक संपुष्टात आली आणि सदर सुभा सरबुलंदखान मुबारिजुल्मुल्क यास बहाल झाला. नव्या सुभेदाराने पहिली गोष्ट कोणती केली असेल तर हैदर कुलीखानाने नेमलेला शुजाअतखान यास आपला नायब नेमिले. आता आपल्या हकीकतीत हा शुजाअतखान आणि त्याचा भाऊ यांचा प्रमुख कार्यभाग दिसून येणार असल्यामुळे, पुढील हकीकत देण्यापूर्वी, या दोघांची थोडी माहिती देणे इष्ट ठरेल.

कोणी एक शुजाअतखान (शेख मुहम्मद शाह फारुकी)[११] याचा गुजरातशी दीर्घकाळ

१० अहमदाबादच्या ईशान्येस ६८ मैलांवर.

११ मा. उ. : खंड दोन; खाफीखान ९६५. गुजरातमधील घडामोडीबाबतची इर्विनची हकीकत जवळजवळ संपूर्णपणे मिरात-इ-अहमदी या अली मुहम्मदखान याच्या रचनेवर आधारलेली आहे. सदर अली मुहम्मदखान हा सदर सुभ्याचा दिवाण होता आणि सुभ्यातील कित्येक घटना त्याने स्वतः डोळ्यांनी पाहिलेल्या होत्या. या स्त्रोतातून मिळणाऱ्या माहितीला तपशीलाबाबत अथवा फेरफाराबाबत, कधी इथे तर कधी तिथे, जोड देण्यासाठी खाफीखान आणि कामवरखान आणि क्वचित् प्रसंगी खुशहालचंद यांची पूरक माहिती घेतलेली आहे. खाफीखान आणि कामवरखान यांच्या लेखनकृतीवरूनच इर्विनने आपल्या लिखाणाचा कच्चा खर्डा तयार केला; पण मिरातमधील हकीकत अधिक परिपूर्ण व अधिक अचूक वाटल्यावरून, ती स्वीकारता यावी म्हणून त्याने आपला सदरचा कच्चा खर्डा रद्द केला. मगाशी उल्लेख केलेल्या इतिहासाची संहिता, मुंबई शिळाछापात निघालेली असून, ती अर्धवट, इ. १७१५ या वर्षापाशी संपणारी असल्याने, आपण हाती घेतलेल्या अभ्यासाच्या कालखंडाच्या दृष्टीने निरुपयोगी ठरते. मिरातमधील हकीकतीचा उत्कृष्ट सारांश ( कर्नल वॉटसन यांचा ) बॉम्बे गॅझेटिअर, खंड एक, भाग एक, पृ. २९५–३४५ वर पाहावयास मिळतो. केवळ मराठ्यांशी संबंधित असलेल्या हकीकतीपुरता इर्विन ग्रँट डफवर अवलंबून राहिलेला आहे; एक दोन संदर्भ मात्र त्याने फॉरेस्टच्या सिलेक्शन्समधून घेतलेले दिसतात. ( जदुनाथ सरकार ).

संबंध आला होता. तो १११२ हि. (१७००–१७०१) मध्ये गुजरातच्या सुभेदारीवर असतानाच मरण पावला. त्याच्या मुख्य-मुख्य अमलदारांत एक काजिम बेग नामक गृहस्थ होता. या माणसाला सहा मुले होती. पैकी एक मुलगा कोळी नामक जंगली जमातीशी झालेल्या झटापटीत ठार झाला. त्यावेळी इब्राहीमखानाचा कारभार (१७०५-१७०८) चालू होता. दुसरी दोन मुले सुरतेस हैदर कुलीखानाचा कारभार चालू असता मोहिमेत कामाला आली. एक जण जामू येथे बंडखोरावर हल्ला चढविताना तर दुसरा सुरतेचा फौजदार या नात्याने कर्तव्य बजावत असताना धारातीर्थी पडला. तीन मुले उरली ती हैदर कुलीखानाच्या मर्जीतील अमलदार झाली. हैदर कुलीखानाने त्यांचे हरप्रकारे हितवर्धन केले आणि त्यांना किताब मिळवून दिले. शुजाअतखान (शेख मुहम्मदशाह) याच्या मुलीशी ज्याचे लग्न झाले होते त्या मुलाला शुजाअतखान असा किताब मिळाला. उरलेल्या दोन मुलांना अनुक्रमे रुस्तम अलीखान आणि इब्राहीम कुलीखान असे किताब मिळाले.

## ४७ : हमीदखानाचा कारभार

आता आपण आपल्या हकीकतीकडे वळू. हैदर कुलीखानाने अहमदाबादचा ताबा सोडला आहे असे निजामुल्मुल्काला कळले तेव्हा त्याने जागच्या जागीच कूच थांबवून, एक स्थानिक प्रमुख पुढारी सफदरखान बाबी यास एक पत्र लिहून नवा नायब येईपर्यंत कामाची ज़बाबदारी पार पाडण्याचा आदेश दिला. तेव्हा सफदरखान, भद्र या नावाने ज्ञात व सुभेदाराचे अधिकृत निवासस्थान असलेल्या अशा महालात राहावयास गेला. दरम्यान, १२ फेब्रुवारी १७२३ रोजी निजामुल्मुल्काने आपला चुलता हमीदखान यास आपला नायब म्हणून, तसेच फिदवीखान यास सुभ्याचा दिवाण म्हणून नेमले आणि काही परगणे खालशाच्या दप्तरातून काढून त्यांचे रुपांतर जहागिरींमध्ये केले. यापैकी पाच अति-उपजाऊ परगणे खुद्द निजामुल्मुल्काकडे तर गोध्रा निजामाचा मेव्हणा मुतवस्सिलखान याकडे जहागीर म्हणून तबदील झाले. हमीदखानाचा प्रवास चालू असता, सफदरखान बाबीची दोन मुले सलाबत मुहम्मदखान आणि जवानमर्दखान हे त्याला येऊन भेटले. हमीदखान दोहद मुक्कामी असता, सुभ्याच्या दिवाण पदावर एके काळी काम केलेला मिहर अलीखान, तेथे आजारामुळे अडकून पडला असल्याचे त्याला दिसले. या मिहर अलीखानाला त्याने उचलले. शुजाअतखान त्यास गोध्रा येथे तर रुस्तम अलीखान थास्रा[१२] येथे येऊन मिळाले. शहराजवळ आगमन झाले तेव्हा, त्याने आपला तळ कांकरिया तळ्याजवळ मिहर अलीखानाच्या राईत ठोकला. त्याने ५ एप्रिल १७२३ रोजी शहरात औपचारिक प्रवेश केला. (मिरात)

आता सुभ्याचे व्यवहार सुरळीत सुरू झाले. शाही दंडधारी प्रमुख सय्यिद नासिरखान नायब सुभेदाराची मानपानाची वस्त्रे घेऊन दिल्लीहून आला. या सुमारास कृपाशंकर नागर

१२ थास्रा हे अहमदाबादेच्या पूर्वेस अंदाजे २६ मैलांवर आहे.

खाफीखानाच्या म्हणण्यानुसार, (९६५–६८), हमीदखान गुजरातेत आल्याआल्या शुजाअतखानाने त्यास विरोध केला. पण हमीदखान झालोदहून १७२३ फेब्रुवारी मध्ये निघाला आणि शुजाअतखान १७२४ नोव्हें-पूर्वी ठार झाला नव्हता, त्याअर्थी या मधल्या काळाचा हिशेब लावता येणे अशक्य वाटते. म्हणून खाफीखानाचा सदरचा वृत्तांत हा पुढील काळाशी संबंधित असावा, शुजाअतखानाला सरबुलंदखानाचा नायब म्हणून पुन्हा एकदा नेमणूक मिळाली त्या घटनेशी संबंधित असावा असे मी मानले आहे. असे मानणे म्हणजे खऱ्या कालक्रमाला, मिरात-इ-अहमदीमध्ये आलेल्या कालक्रमाला, मानण्यासारखे ठरेल.

नामक एक लष्करी अधिकारी आणि शहर फौजदाराचे वगलवच्चे यात एक झटापट झाली. या माणसाच्या राजवाडा भागातील घरास वेढण्याचा हुकूम हमीदखानाने आपल्या तोफखान्याला दिला. ही दंगल रात्र पडेपर्यंत चालू होती. अपराधी गणला गेलेला हा असामी मोलाचा अमलदारही आहे हे जाणून रुस्तम अलीखानाने हस्तक्षेप केला; त्याला आपल्या घरात नेऊन ठेवले; आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्यास हमीदखानासमोर हजर केले. कृपाशंकरला क्षमा झाली व त्यास नायबाच्या चाकरीत घेण्यात आले.

थोडे दिवस लोटल्यावर, हमीदखान पेशकश गोळा करण्यासाठी आपल्या सुभ्यात हिंडू लागला. अहमदाबादच्या दक्षिणेला बारा मैलांवर, ८० मैल लांबीची वात्रक नावाची नदी साबरमती नदीस डावीकडून येऊन मिळते. सदर वात्रक नदीकाठच्या भागातील महसुलाच्या वसुलीपोटी एक वट्ट रक्कम देण्याचे रुस्तम अलीखानाने पत्करले होते. ही रक्कम हस्तगत करण्यासाठी रुस्तम अलीखानाने आपला सर्वात धाकटा भाऊ इब्राहीम कुलीखान यास पाठविले. त्याने आपला तळ वात्रक नदीच्या काठी दिला. अहमदाबादच्या आग्नेयेस अंदाजे २४ मैलावर नडियाद गावी किल्ला आहे. हमीदखान तेथे आला होता. तेव्हा या भावांशी शत्रुत्व असलेली काही माणसे नायब सुभेदाराकडे आली. एका भावावर हल्ला करुन त्याचा काटा काढण्याची ही नामी संधी चालून आली असल्याचे प्रतिपादून तसे करण्यासाठी त्यांनी नायब सुभेदाराचे मन वळविले. या कारस्थानाची खबर इब्राहीम कुलीखानाला सांगितली तेव्हा त्याने आपल्या बचावाची सज्जता ठेवली. हमीदखानाच्या तळावरील तोतये मित्रांनी त्यास माघार घेण्याबाबत लिहिले. त्याने त्यास नकार दिला. आपल्या भावाचे रक्षण करण्यासाठी रुस्तम अलीखान त्या रात्री अहमदाबादेहून निघाला आणि झुंजूमुंजू होण्याच्या सुमारास तळावर पोहोचला. हमीदखानही नडियादहून यापूर्वी निघालाच होता. पण वाट चालत असतानाच त्याला कळले की, रुस्तम अलीखान हा इब्राहीम कुलीखानाला येऊन मिळाला आहे. आपले उद्दिष्ट वाऱ्यावर सोडून हमीदखानाने दोघा भावांना मित्रत्वाचे निरोप धाडले व तो शहरास परतला. सदरच्या बंधूंकडे पेटलाद आणि वडोदा परगण्यांची जबाबदारी असल्याने ते तिकडे गेले. तेथे त्यांनी कोळ्यांची वस्ती असलेल्या ढवण या गावावर हल्ला करुन जाळपोळ केली. त्यांनी तेथे एक लहानशी गढी बांधली व त्यात शिबंदी ठेवली. (मिरात).

## ४८ : गुजरातेत हमीदखानाच्या जागी शुजाअतखान येतो

इ. १७२३ डिसेंबरमध्ये निजामुल्मुल्काने बादशाहाची अनुमती न घेता दरबार सोडला; तेव्हा त्याच्या दक्षिणेत होणाऱ्या शिरकावास प्रतिकार करण्यासाठी मुबारिजखानाला चिथावण्यात आले; पण परिणामी निजामुल्मुल्काचा विजयच झाला वगैरे हकीकत आपण यापूर्वी ऐकलीच आहे. निजामुल्मुल्काला आता सवलती देणे भाग आहे असा विचार बादशाहाने केला. दख्खनची मुतलकी पक्की करण्याच्या बदल्यात निजामाला आपल्या वजीरपदाचा व त्याचबरोबर गुजरात आणि माळवा सुभ्याच्या सुभेदारांचा राजीनामा द्यावा लागला होता. गुजरातचा नवा सुभेदार सर बुलंदखान मुबारिजुल्मुल्क याने, स्वतः सुभ्यावर हजर होण्यापर्यंतच्या काळासाठी, शुजाअतखानाला दरबारी परतण्याचा हुकूम झाला. शुजाअतखानाचा धाकटा भाऊ रुस्तम अलीखान याला याचवेळी मुन्अिमखान नज्म सानी याच्या जागी सुरतेच्या जबाबदारीची नेमणूक मिळाली. सदर मुन्अिमखान नज्म सानी यास फिदवीखानाच्या

जागी सुभ्याचा दिवाण म्हणून नेमणूक मिळाली (खाफीखान ९६६). सदरचा अधिकृत हुकूम, सोबतच्या सर बुलंदखानाच्या पत्रासह अहमदाबादेस १७२४ जुलै-ऑगस्टमध्ये पोहोचला. हुकूम काय झाला आहे याची हमीदखानास जाणीव दिली व नवा नायब आपले अमलदार नेमण्याच्या कामास लागला. सुभेदाराचे अधिकृत निवासस्थान असलेला भद्र हा महाल सोडण्यास शुजाअतखानाने हमीदखानाला सांगितले. ते भर पावसाळ्याचे दिवस असल्याने त्याने घर सोडण्यास मुदत मागितली. पण असली काही सवलत देण्याचे शुजाअतखानाच्या मनात नसल्याने त्याने महालाभोवती तोफा बसवून, बळजोरी करून त्यास वाड्याबाहेर पिटाळण्याचा मनसुबा केला. रात्रंदिवस धुमश्चक्री चालली आहे, असे तीन दिवस गेले. महालालगतच्या कित्येक घरांची पडझड झाली, ज्यांना शुजाअतखानाचा मत्सर वाटत होता अशी माणसे इतक्या थराला गेली की, त्यांनी आपल्या पाठीराख्यांना हमीदखानाच्या साहाय्यार्थ धाडून, त्यास प्रतिकार करण्यास उत्तेजन दिले. पण तडजोड होणेच योग्य असा शहाणपणाचा विचार अली मुहम्मदखानास सुचला. तेव्हा[13] त्याने सफदरखान बाबी याची भेट घेतली आणि त्याच्या मुलांना तो म्हणाला, ' हे पाहा, नवा सुभेदार नेमून आला आहे; त्या नव्या माणसाशी नीट जमवून घ्यावयाचे असेल तर ही धुमश्चक्री थांबविणे शहाणपणाचे ठरेल. त्याने या मंडळींना घोड्यावर स्वार व्हावयास लावून हमीदखानाची भेट घेण्यास भाग पाडले. नंतर अली मुहम्मदखानाने शुजाअतखानाची भेट घेतली. माजलेले रणकंदन अशाप्रकारे संपुष्टात आले आणि हमीदखानाने शहर सोडले. हमीदखानाचा चुलत भाऊ अजीमुल्लाहखान हा माळव्याचा सुभेदार होता. त्याच्याकडे जाण्याचा हमीदखानाचा इरादा होता. पण अजीमुल्लाहखान यापूर्वीच माळव्याच्या कारभाराच्या जबाबदारीतून मुक्त झाला असून दिल्लीला परतलाही आहे, असे त्याला समजले. ते दिवस पावसाळ्याचे होते. म्हणून तो अहमदाबादेच्या पूर्वेस ११० मैलांवर असलेल्या दोहद या गावी पावसाळा संपेपर्यंतचा काळ घालविण्यासाठी थांबला. तेथून त्याने निजामुल्मुल्कास काय घडले त्याचा वृत्तांत कळविला व उत्तर मागविले. आपणास पैशाची फार चणचण भासत आहे असे त्याने दिल्लीसही कळविले. तेव्हा सिरोंजच्या खजिन्यातून त्यास २ लाख रुपये मिळण्याबाबत हुकूम झाला. (मिरात, कामवर.)

माजी वजीरावर बादशाहाची मर्जी खप्पा झाली आहे असे दिसताच शुजाअतखानाने त्याच्यावर दक्षिणेत हल्ला चढविण्याची तयारी दर्शविली होती असे दिसते. या कामासाठी बादशाहाने त्याला सुरतेच्या खजिन्यातून तीन लाख रुपये देऊ केले. हे त्याने वीस हजार हशमांची जमवाजमव करावी याकरिता होते. या तोडीस तोड म्हणून निजामुल्मुल्काने राजा शाहूचा एक सेनापती कंठाजी कदम बांडे याशी एक ठराव केला. या ठरावानुसार, हमीदखान यास त्याने सुभेदारपदी पुन्हा विराजमान केल्यास कंठाजीला गुजरातच्या महसुलासाठी चौथ मिळणार होती. आपल्या चुलत्याला शुजाअतखानाने ज्या धसमुसळेपणाने वागविले त्यामुळेही त्याचे मन कडवट बनले होते. पावसाळा संपल्यावर, पंधरा-वीस हजार स्वारांनिशी कंठाजी नर्मदा ओलांडून हमीदखानाकडे दाखल झाला. हे दोघे दोस्त अहमदाबादेच्या पूर्वेस सुमारे ३२ मैलांवरील कापडवंज येथे आले. तेथून हमीदखानाने आपल्या अहमदाबादमधील साथीदारांशी संधान बांधले. परिस्थिती तुम्हास फार अनुकूल आहे असे सांगून त्या साथीदारांनी हमीदखानाला उत्तेजनच दिले. यावेळी शुजाअतखान अहमदाबादेबाहेर होता; मुजोरी करणाऱ्या

१३ हवेली अहमदाबादचा फौजदार आणि मिरात-इ-अहमदीच्या लेखकाचा बाप. खुद्द लेखक १७२४ इ. मध्ये अहमदाबादे परतला.

जमीनदारांच्या बंदोबस्तात तो गुंतला होता. त्याच्याजवळ जेमतेम ४-५ हजार घोडेस्वार होते; आणखी कुमक येण्याची वाट न पाहाता देखील, आपण शत्रूस नमवू शकू असे त्याला वाटले (मिरात, कामवर).

हमीदखान अहमदाबादेस येण्यास निघाला आहे हे समजताच शुजाअतखान अहमदाबादच्या रोखाने जलदीने कूच करीत निघाला. शहरापासून ९ कोसांवर असलेल्या धाबोरा गावी तो येऊन पोहोचला. त्याने टेहळणी पथके न पाठविण्याचा निष्काळजीपणा केला. शत्रू जवळ आला आहे याची जाणिव नसल्याने त्याने त्या खेड्यातून खंडणी गोळा करण्यासाठी कूच थांबविण्याचा हुकूम केला. गुरुवार ता. १४ डिसेंबर १७२४ रोजी त्याने शहराच्या रोखाने प्रयाण केले. तो रस्त्याने जात असता, कितीतरी शिपाई आणि बाजारी इसम सैरावैरा पळून गेले.[१४]

## ४९ : शुजाअतखान ठार होतो

शहरापासून चार कोसांवरील मोतिया मेडारा या खेडेगावाजवळ ते येऊन पोहोचले तेव्हा शत्रू नजीक येऊन ठेपला आहे याची त्यांना काहीसुद्धा कल्पना नव्हती. छावणीसोबतचे लोक आणि घोडेस्वार यांनी मुख्यत्वेकरून बनलेले सैन्य, छोटे छोटे गट करून एकमेकांशी चढाओढ करीत, शहराकडे परतू लागले. सगळी व्यवस्था आणि शिस्त कोलमडून पडली, होलस्वार (हुलस्वार) म्हणून ओळखले जाणारे मराठे घोडेस्वार नंतर दृष्टिपथात आले; त्यांनी पिछाडीच्या रक्षकांवर हल्ला चढविला. शुजाअतखानाच्या लोकांना काही कळेनासे झाले. त्यांचे कूच म्हणजे शहरास पोचावयाचे हे उद्दिष्ट ठरवून, ज्याला जमेल त्याने, आसरा मिळविण्यासाठी सैरभैर व्हावे, असा प्रकार बनला. मराठे आणखी पुढे घुसले. त्यांनी शुजाअतखानाच्या मध्य बाजूवर हल्ला करून ती लुटली. आपल्या सैन्यात व्यवस्था प्रस्थापित करण्याचा आटोकाट प्रयत्न शुजाअतखानाने केला. पण पलायनवीरांची भाऊगर्दी आणि बैलगाड्यांची लांबच लांब रांग यामुळे त्याची धडपड व्यर्थ ठरली. आपल्या प्रमुखाच्या नजरेतून सुटावे आणि अशाप्रकारे मराठ्यांच्याही तावडीतून सुटावे एवढा एकच ध्यास शुजाअतखानाच्या लोकांनी घेतल्यासारखा होता.

हे निष्फळ ठरणारे प्रयत्न सोडून देऊन, शुजाअतखानाने भाऊगर्दीच्या बाहेर एका बाजूला आपली जागा मुक्रर केली. ही बरी संधी आहे असे समजून नखशिखान्त चिलखत घातलेला आणि लोखंडी पत्र्याने मढविलेल्या अंबारीत बसलेला हमीदखान चालून आला. दोन्ही नेत्यांच्या निशाणांच्या हत्तीत लढाई झाली आणि त्यात शुजाअतखानाचा हत्ती वरचढ ठरला. तेव्हा हमीदखानाने स्वतः स्वार झालेला हत्ती पुढे काढला. शुजाअतखान साधा तक्क्या टाकून लोखंडी आडोसा न करता हत्तीवर बसला होता; त्याच्या मागे त्याचा लहान मुलगाही होता. तरीही शुजाअतखान डळमळला नाही. त्यानेही आपला हत्ती शत्रूच्या हत्तीसमोर आणला. दोघेही आपले तीर सोडू लागले.

तीन हजार घोडेस्वारांच्या तोंडाशी राहून आघाडीचे नेतृत्व करणारा शुजाअतखानाचा मुलगा हुसैन कुली याने बसल्या जागेवरून पाहिले की हमीदखान आपल्या बापावर चालून

१४ खुशहालचंद (बर्लिन हस्त. पान १०४५) असे संसूचित करतो की शुजाअतखानाचा पराभव त्याच्या दारू पिण्यापायी झाला.

आला आहे. तेव्हा भोवती असलेल्या थोड्याफार लोकांना गोळा करून त्याने हल्ला चढविण्यासाठी त्यांना उद्युक्त करून पाहिले, पण कोणीही त्याचे सांगणे मनावर घेतले नाही. आपल्या बापाच्या मदतीसाठी तो एकटाच धावत गेला पण त्यास उशीर झाला. शुजाअतखानाचे बाण आदळत ते लोखंडी अंबारीवर. त्यामुळे कोणास कसली इजा होण्यासारखी नव्हती. पण हमीदखानाचे कित्येक बाण मात्र शुजाअतखानास लागून तो घायाळ झाला होता. त्याचे थोडेफार साथीदार उरले होते ते ठार वा जखमी झाले नव्हते, तरी त्यांनी पळ काढला किंवा मराठ्यांचे कैदी तरी झाले. नंतर हमीदखानाच्या लोकांनी शुजाअतखानाच्या हत्तीस वेढले आणि भालेबरच्यांनी 'अखेरचा घाव' घातला. मृताचा परिवार, ज्यात हुसैन कुलीखान आणि मुस्तफा कुलीखान या त्याच्या दोन मुलांचा समावेश होता, कैद झाला. त्याच्या छावणीतील माल आणि सरंजाम विजेत्यांनी लूट म्हणून घेतला. रात्र पडण्याच्या सुमारास हमीदखान मराठ्यांसह आपल्या तळास गेला. हा तळ शाहीबाग येथे ठोकला होता. रात्रीच्यावेळी शुजाअतखानाचे मुंडके शहरात सफदरखान बाबी याच्याकडे धाडण्यात आले. त्याने ते इब्राहीम कुलीखानाकडे पाठविले.

दुसऱ्या दिवशी, म्हणजे १७ डिसेंबर १७२४ रोजी, हमीदखान शहरात आला व त्याने भद्र महालाचा ताबा घेतला. दिवाण मुन्अिमखान आणि त्याचा पूर्वाधिकारी फिदवीखान– ज्याने शहरात घर केले होते–हे शहरातील ठळक हिंदु-मुसलमान मंडळींसह भयकंपित अवस्थेत त्याच्यापुढे सादर झाले. मही नदीच्या पश्चिमेकडच्या परगण्यातील चौथ आणि सरदेशमुखी कंठाजीला दिली. रस्त्यात आणि गल्लीकुच्यांत मराठा शिपायांची गर्दी उसळली. मन मानेल तसे ते हिंडूफिरू लागले. शुजाअतखानाच्या छावणीच्या लुटीत हाती लागलेला माल ते विकू लागले. शेख अहमद खत्तू (सरखेज) याच्या दर्यातील पुष्कळशी मालमत्ताही उचलून नेली. धान्य, चारा, मेणबत्तीची घरे, किंतानाची छते, पितळी कठडे यांचा त्यात समावेश होता. पितळी कठडे तर कबरीभोवतीच्या जागेवरून उचकटून काढले होते. चौथ वसूल करण्यासाठी कंठाजीने आपले मुनीम बाहेर पाठविले. तो स्वतः खंडणी वसूल करण्यासाठी विरमगाव या तटबंदी नसलेल्या गावाकडे गेला. देसाई उदयकरण याच्या सल्ल्यावरून गावचे रहिवासी शरण आले; मालमत्तेला धक्का लावला नाही तर अडीच लाख रुपये पट्टी करून देण्यास ते कबूल झाले. पैसे गोळा झाल्यावर देसायाने शहाणपणा दाखवून आपल्या थोड्या रकमेची त्यात भर घातली व या पैशाने एक किल्ला बांधून काढला. दरम्यान, हमीदखानाने आपला बुरखा भिरकावला; शाही अमलदार आणि उमराव यांना त्याने हाकलून दिले, सगळ्या मुलुखाचा ताबा घेतला. हळूहळू दिवाणाचे सगळे दप्तर त्याने ताब्यात घेतले. यानंतर या सुभ्याचा महसूल बादशहास जाणे बंद झाले. हा महसूल निजाम आपल्याकडेच ठेऊन घेऊ लागले.

## ५० : इब्राहीम कुलीखानाचा मृत्यू

हमीदखान चालून येत असल्याच्या अफवांमुळे इब्राहीम कुलीखानाने जादा सैन्यभरती करून शहराच्या रक्षणाची तयारी केली होती. लढाईच्या दिवसाच्या दोन दिवस अगोदर, तो कारेज बाजार[१५] मधील आपल्या निवासस्थानी रहावयास गेला होता. शुजाअतखान आणि

१५ कारंजे हे अधिक बरोबर. भद्र महालाच्या बाहेरील प्रांगणाच्या मध्यभागी आणि प्रवेशद्वारे असलेल्या तीन रस्त्यांपैकी मधल्या रस्त्यावर एक कारंजे असलेली ही इमारत होती. ( बॉम्बे गॅझेटिअर, खंड चार २७३ ).

त्याचे भाऊ यांवर सफदरखान बाबी याचा बरेच दिवसापासून दात होता. या बंधूंचा आश्रयदाता हैदर कुलीखान याने, तो सुरतेचा शासक असताना, बाबीस त्रास दिला होता, म्हणून हा दात होता. याने आता आपण इब्राहीम कुलीखानाचे मित्र आहोत, असे भासविण्यास सुरुवात केली. हमीदखानाकडे भीड घालण्याचे काम पत्करण्याची तयारी त्याने दर्शविली. या नव्याने उद्‌भवलेल्या मैत्रीविषयी शंका घेऊन, त्या तरुण माणसाने सदरचा देकार फेटाळून लावला आणि मध्यस्थीसाठी दुसऱ्या एका अमलदाराची निवड केली.[१६] हा अमलदार स्वतः अहमदाबादेचा रहिवासी होता. हैदर कुलीखानाच्या सदिच्छा आणि त्याची इमानदारी यांची दोन्ही बाजूकडून हमी घेण्यासाठी हा माणूस जामीन राहिला. तेव्हा नव्या सुभेदाराच्या दरबारास इब्राहीम कुलीखान हजर झाला. त्यावेळी त्याचे चांगले आगतस्वागत झाले; त्याला एक शिरपेचासारखा अलंकार भेट म्हणून मिळाला.

लढाईनंतर काही दिवसांनी, सफदरखान आणि इतर दुष्टबुद्धीच्या माणसांनी सारखा पिच्छा पुरविल्यामुळे हमीदखानाने आपला दिलेला शब्द मोडण्याचा निश्चय केला; इब्राहीम कुलीखानाला बोलावणे धाडून त्यास कैद करावे व शेवटी त्यास ठार मारावे असे त्याने योजिले. पण ही गोष्ट तितकीशी गुप्त राहिली नाही. म्हणतात ना की पुष्कळांनी ठरविलेली गोष्ट, गुप्त ठेवायची म्हटल्याने, गुप्त राहात नाही. ह्या कानाची त्या कानाला होत होत ही बातमी लौकरच जामीन राहिलेल्या अमलदाराच्या कानावर गेली. त्याने मध्यरात्री इब्राहीम कुलीखानाला गाठले. काय उद्देशाने आला आहे याची त्यास कल्पना देऊन, वेळ गेली नाही तोवर [ रात्रीच्या अंधारात सुरतेस वा खंबायतला ] पळून जा असा सल्लाही त्याने दिला. एक मित्र सोबत करावयास तयार झाला. पळून जाऊन आश्रय शोधण्याच्या कामास इब्राहीम कुलीखानाचा मानी स्वभाव आडवा आला. नशिबात जे असेल ते पदरात घेण्यास व प्रसंगी मरण्यास तो सज्ज झाला. लौकरच सुभेदाराचे हस्तक आले. सुभेदारापुढे हजर होण्याची त्यानी मागणी केली. इब्राहीम कुलीखानाच्या मृत भावाचा काही ऐवज होता व तो याच्या ताब्यात आहे अशी बोलवा होती. सदर ऐवजदेखील हवाली करण्याबाबत मागणी झाली. या कुटुंबाचा विश्वासू कारभारी आकाहादी याला अगोदरच तुरुंगात घातले होते. २० डिसेंबर १७२४ इ. रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास सुस्नात होऊन, आपल्या घरातील सर्वांचा मोठाथोरला निरोप घेऊन, इब्राहीम कुलीखान बाहेर पडला. एवढ्या विपत्तीतदेखील तीसचाळीस लोक त्याशी इमान बाळगून होते. त्यांना तसेच सातआठ माणसे बरोबर घेतलेल्या जमीनदारास घेऊन तो निघाला.

भद्र–म्हणजे सुभेदारमहाल–मध्ये इब्राहीम कुलीखान आपल्या पथकासह दौडत घुसला. या बगीचा घराच्या प्रवेशद्वारापाशी असलेले द्वाररक्षक आणि गदाधारी यांनी त्यांच्या या घुसण्याला विरोध केला. प्रवेश करण्यापूर्वी इब्राहीम कुलीखानाने आपली हत्यारे येथे ठेवून द्यावी व आपल्यासोबत फार तर दोनतीन माणसे आत नेता येतील असे त्याचे म्हणणे पडले. या रक्षकांनी उपस्थित केलेल्या निषेधाला न जुमानता हे पथक तसेच आत घुसले. त्यामुळे द्वाररक्षक आणखी क्रोधायमान झाले. ते जोरजोराने ओरडू लागले, शिवीगाळ करू लागले आणि त्यांनी आपल्या बळाचा हिसका दाखविण्यासही कमी केले नाही. इब्राहीम

१६ कामावरच्या मते सुभ्याचा दिवाण असलेल्या मुन्अिमखानाची.

कुलीखानाची सहनशीलता लौकरच संपुष्टात आली. त्याच्या हातात एक छोटी तलवार होती. त्या रक्षकावर त्याने एकाएकी वार करण्यास सुरूवात केली. तेव्हा त्याचे मित्र पुढे सटकले व महालाच्या दिवाणखान्याकडे जलदीने दौडू लागले. हमीदखान अजून सदरेवर आलेला नव्हता आणि त्यास भेटावयास आलेली मंडळी ही गडबड पाहून सैरावैरा पळाली. इब्राहीम कुलीखान हमामखान्याजवळच्या खासगी दालनाच्या दाराकडे वळला. तेथे नौइंध (नवेन्द्र ?) राय (निजामुलमुल्काच्या जमिनींचा व्यवस्थापक), भारमल (दुराहाचा फौजदार), गिरधरलाल दिवाण आणि झालवाच्या[१७] जमीनदाराचा मुख्य मुनीम असलेला कोणी एक पटिया याच्याशी त्याची समोरासमोर गाठ पडली. तेथल्या झटापटीत पटिया ठार झाला आणि बाकीचे दोघे जखमी झाले. इब्राहीम कुलीखान खासगी दालनात घुसला. पहाऱ्यावरची माणसे पळाली; काही तर साबरमतीला जाऊन मिळणाऱ्या ओघळातून पळाली. हमीदखान छपरावर जाऊन बसला होता; त्यामुळे सापडत नव्हता. त्याच्या शत्रूने त्याला जनानखान्यात हुडकले. पण कितीही शोधाशोध केली तरीही त्याला त्याचा ठावठिकाणा लागेना. हमीदखानाने सोडलेल्या हुकुमानुसार शिपाई चारी बाजूंनी आले. इब्राहीम कुलीवर बंदुकातून झालेला गोळीबार आणि त्याच्या दिशेने भिरकावलेले दगड आणि मातीची ढेकळे यामुळे नंतर लगोलग तो प्राणास मुकला. त्याचे मुंडके धडावेगळे केले. मुंडके आणि धड प्रवेशद्वाराबाहेर, एका बाजूस धड व दुसऱ्या बाजूस मुंडके असे, मांडून ठेवले. पुरबिया शिपायांचा एक गट हाती लागतील ती हत्यारे वा कपडे लंपास करण्यासाठी धडपडू लागला. भद्राचे दरवाजे बंद झाले. कोणास आत वा बाहेर जाऊ दिले जाईना. इब्राहीम कुलीखानाच्या साथीदारांचा शोध घेतला. सुभेदाराची भेट घेण्यासाठी आवारात थांबलेल्या मंडळीत सरबुलंदखानाचा मुनीम अलीमुहम्मदखान, अश्रफ अलीखान (दिवाण मिहर अलीखान याचा मुलगा) आणि त्याचा परिचय करून देण्यासाठी आलेला ईदरचा फौजदार आकिलखान हे होते. आपल्यावर आळ येईल असे या मंडळींना वाटले. वस्त्रघराचा (तोषकखाना) अधिकारी खोजा अली मुहम्मदखानाच्या ओळखीचा होता. त्याच्या मदतीने ते वस्त्रघरात लपून राहिले.

आपला दरबारातील लौकिक शाबूत राहावा म्हणून हमीदखानाने आपल्या दिल्ली दरबारातील प्रतिनिधीला कळविले की, शुजाअतखान अहमदाबादेस कूच करीत असताना त्याच्यावर शहराजवळ कंठाजीचा हल्ला होऊन त्यात तो ठार झाला. मी फार दूर नव्हतो; म्हणून घटनास्थळाकडे धावलो. शहर सुरक्षित राखण्यासाठी उपाययोजना केली; त्यामुळे शहरास झळ बसू शकली नाही. हे पत्र म्हणजे तिकडून आलेली पहिलीच खबर असल्यामुळे, बादशाहाने धन्यवाद देऊन हमीदखानाला मानाचा पोषाख आणि मोत्याचा कंठा पाठवून दिला. दोन दिवसानंतर सरबुलंदखानाच्या मुनीमाकडून पत्र आले आणि खरी गोष्ट काय आहे ते सर्वांना कळून चुकले.

## ५१ : रुस्तम अलीखानचे कूच व मृत्यू

घडलेली खरी खरी हकीकत कोणती हे दिल्लीत समजल्यावर रुस्तम अलीखानास हुकूम आला. रुस्तम अलीखान हा मधला भाऊ (?) असून तो सुरतेचा नायब सुभेदार

१७ अहमदाबाद आणि इंदौर याच्या मधोमध असलेले जाबवा तर नव्हे ? का बहुधा पंचमहालामधील जालोद? (जदुनाथ सरकार). ही हकीकत मिरात आणि खुशहाल याच्यावर आधारलेली आहे.

आणि बडोदे आणि पेटलाद येथील फौजदार होता. सुरतबदराच्या खजिन्यातून हाती लागतील तेवढे पैसे काढा; त्याद्वारे फौजफाटा उभा करा आणि हमीदखानाला हुसकून लावा असा हुकूम झाला. हा हुकूम रुस्तम अलीखानास मिळाला तेव्हा तो सुरतेपासून काही मैलांवर असलेल्या खानापूर खिडीजवळ पिलाजी ( गायकवाड ) मराठ्याशी झडलेल्या चकमकीत गुंतला होता. तो तत्काळ शहरात परतला. थोड्या दिवसांच्या अवधीत त्याने १५ हजार घोडेस्वार, २० हजार बंदूकची व धनुष्यधारी आणि पुरेसा तोफखाना असा फौजफाटा उभा केला. पावसाळा सुरू झाला की, मराठे तीन महिने माघार घेतात; तेव्हा हा मधला काळ सुरत शहरी आपली तयारी पक्की करण्यात घालविणेच उत्तम; नंतर आपण कूच करू, तेव्हा लढत न होताच बहुधा जिंकू असे पोक्त सल्लागार रुस्तम दिलखानाला म्हणाले. पण रुस्तम दिलखान वेळ दवडण्यास तयार नव्हता. अलीकडे रुस्तम अलीखानाच्या पिलाजी मराठ्याशी थोड्याफार चकमकी झडल्या होत्या. हा पिलाजी मराठा त्यांच्या पाठलागावर सुरतेकडे आला होता. त्याच्या हाताखाली दहा हजार घोडेस्वारांची फौज होती. या फौजेनिशी तो रस्ता अडवून बसला होता. या मराठा पुढाऱ्याशी बोलणी करण्यासाठी मुस्तफारखानाला पाठविले. सलोख्याच्या अटी त्याच्यासमोर ठेवल्या. दोन लाख रुपये दिल्यास साह्य करण्यास त्याने निदान बाह्यात्कारी तरी होकार दिला.[१८] त्या वेळी बडोद्याचा फौजदार व आपला मेव्हणा कामगार अलीखान यास सांगाती घेऊन हैदर कुलीखानाने अहमदाबाद शहर गाठण्याची घाई चालविली. त्याचा नव्यानेच दोस्त बनलेला पिलाजी त्याच्या मागे एक मजल राहून मागाहून येत होता.

ही बातमी लागताच हमीदखानाने सफदरखान बाबी यास आपला भद्रमधील नायब म्हणून ठेवले; रुस्तम अलीखानाचा एक अमलदार मुहम्मदखान घोरणी याचा भाऊ मुहम्मद अश्रफ आणि अल्लाहदाद यांच्या जबाबदारीवर आपला परिवार ठेवला. नंतर त्याने अहमदाबाद सोडले. आपला तळ ताल–इ–काकरिया[१९] येथे दिला. तेथे सगळीकडून मागविलेली कुमक येण्याची वाट पाहात तो थांबला. तीस-चाळीस हजार घोडेस्वारांनिशी त्याने ताल-इ-काकरिया सोडले आणि बडोद्याच्या रोखाने कूच केले. अहमदाबाद शहराच्या बाहेरील उघड्या मदानावर दोन-तीन दिवस थांबून त्याने आपले कूच पुढे चालू ठेवले. अहमदाबादपासून ७० मैल अंतरावर आल्यावर तो मही नदीच्या किनारी पोहोचला. तेथे त्याने तळ दिला. पिलाजीस एक दिवसाचे अंतर ठेवून पाठीवर घेतलेल्या रुस्तम अलीखानाने मही नदी ओलांडली आणि परगणा पेटलादमधील अरस या गावी तो पोहोचला. पिलाजीचा तळ एका बाजूला पण फार दूर नव्हता. ही ७ फेब्रुवारी १७२५ इ. ची घटना. याच दिवशी हमीदखानाने अहमदाबादेहून येऊन, रुस्तम अलीखानाच्या तळापासून पाच

---

१८ वरील हकीकत कामवर आणि खाफीखान (९६८) यानी दिलेल्या हकीकतीवर आधारलेली आहे. मिरात ( १८० ब–१८१ अ ) मध्ये पुढील तपशील अधिक आढळतो :

"बडोद्याजवळील कारजू आणि बाजूद दरम्यानच्या तळावर रुस्तम अलीखान आणि पिलाजी यांची भेट झाली. त्यामधील वाटाघाटी चालू असताना बरेच दिवस तेथे तळ देऊन थांबले होते. एक लाख रुपये नगद दिले. हत्तीची झूल आणि दागदागिने यांची भेट देऊन मोबदला वाढविला. तेव्हा पिलाजीने मुस्तफारखानास महेन्द्री ओलांडली आणि तळ ठोकला.

१९ ७२ एकरांचे आणि एक मैलापेक्षा अधिक घेराचे, रायपूर दरवाजापासून पाऊण मैलावर असलेले व सभोवती बांधीव घाट असलेले एक तळे. ( बॉम्बे गॅझेटिअर, खंड चार, १७. )

मैल अंतरावर आपला तळ ठोकला. हमीदखानासह कंठाजी मराठा होता. तसेच सलाबत मुहम्मदखान बाबी, सय्यिद फय्याजखान वगैरे उमरावही होते. येथे त्याला मीर नथू आणि सलाबतखान रोहिला हे दोघे येऊन मिळाले. ते चाकरीच्या शोधात माळव्याहून आले होते.

आल्यानंतरची रात्र सरल्यावर हमीदखानाने पिलाजीस निजमुलमुल्काचे पत्र पाठविले. आपल्या चुलत्यास मदत करावी असे निजामुलमुल्काने त्या पत्रात लिहिले होते. या सूतोवाचास होकार भरणे पिलाजीला सोयीचे वाटले. हा मुलूख काबीज करावयाचा असेल तर रुस्तम अलीखानास हाकलणे आवश्यक आहे; पण त्यास आपल्या एकटयाचे बळ अपुरे आहे असे वाटले. त्याच रात्री त्याने हमीदखानाच्या तळास भेट दिली; अटी ठरल्या. मानाची वस्त्रे, हत्ती त्यास बहाल होऊन तो आपल्या तळावर परतला. विश्वासघाताचे हे कृत्य रुस्तम अलीखानाला लगोलग समजले. पण त्याने निर्विकार असल्याचा बहाणा केला. विजय ही अखेर स्वर्गीय देणगी. ती या अथवा त्या अथवा आणखी कोणत्या माणसामुळे मिळते थोडीच? "तो म्हणजे थोर मित्र ज्याची इच्छा करतो किंवा अल्लाचा कल ज्याच्याकडे वळतो."

दुसऱ्या दिवशी सूर्य उगवताच रुस्तम अलीखानाने आपला डंका पिटला आणि चार हजार स्वार व चार हजार ढाल्लाईत घेऊन तो रणांगणात उतरला. त्याच्या बिनीत सरदार मुहम्मदखान घोरनी आणि त्याचा मेव्हणा कामगार अलीखान हुकूमत करीत होते. उजव्या फळीत ( दस्त-इ-रास्त ) अहमद कुलीखान ( शुजाअतखानाचा मुलगा ) आणि डाव्या फळीत ( दस्त-इ-चप ) काजिम बेगखान ( काजिम बेगखानाचा मुलगा ) होते. मुहम्मद पुनाह पिछाडीचे ( चंदावल ) नेतृत्व करीत होता. आपल्या रात्री हमीदखानाने आपला तोफखाना पुढे सरकावलेला पाहून, तोफखान्याचा अरावा होणार हे हेरून, रुस्तम अलीखानाने आपला बाडबिस्तरा आणि वाहन सरंजाम एका गावी, तेथे लहान गढी होती म्हणून पाठवून दिला. या वस्तू त्या गढीत मावल्या तेवढया ठेवल्या. अरब पायदळाचे एक पथक या सामानसुमानाच्या रक्षणासाठी मुक्रर केले. डंके पिटत होते; तुताऱ्या फुंकत होत्या; दोन्हीकडील तोफखाने आग ओकू लागले होते.

रुस्तम अलीखान तोफांकडे थेट गेला आणि थोडयाशा झटापटीतच त्याने त्याचा कब्जा घेतला. हमीदखानाचा दिवाण गिरधरलाल वगैरे लोक जागच्या जागी ठार झाले. ही पिछेहाट झालेली पाहून मीर नथू आणि सलाबतखान रोहिला ( जो हमीदखानाच्या बिनीस होता ) आता पुढे घुसले; लढाई सगळीकडे पसरली. सरदार मुहम्मदखान याने आपला हत्ती मीर नथू बसला होता त्या हत्तीसमोर आणला. आपापल्या तलवारीने एकमेकांवर वार-प्रतिवार झाल्यावर आपल्या शत्रूला ठार करण्यात सरदार मुहम्मदखान यशस्वी झाला. रुस्तम अलीखानाने हमीदखानावर मोहरा वळविला. म्हण आहे तसा हमीदखानाने विचार केला की 'लढयाची योग्य वेळ निवडणे म्हणजे जवळजवळ विजय मिळविण्यासारखेच आहे.' तो हत्तीवरून उतरला; घोडयावर स्वार झाला आणि चक्क पळून गेला.

मराठयांना रुस्तम अलीखानाची चांगलीच धास्ती बसली होती. रुस्तम अलीखान हमीदखानाच्या तळात बळजबरीने घुसला; त्याने मृत शुजाअतखानाची दोन मुले हुसैन

कुली, मुस्तफा कुली आणि आका हादी हा त्याचाच मुख्य मुनीम याची तुरुंगातून सुटका केली. हे सर्व होत असता मराठे एका बाजूस जाऊन स्वस्थ होते. त्यांनी नुसती बघ्याची भूमिका घेतली होती. तुरुंगातील सदरच्या कैद्यांच्या हातापायात साखळदंड होते. हमीद खानाच्या तळावरील, गोळा करता येईल तेवढा सरंजाम हैदर कुलीखानाने ताब्यात घेतला. शत्रूच्या तळावर तो तब्बल दोन तास होता. कुणीच प्रतिकारास येत नाही हे पाहताच त्याने दारू, शिसे आणि थोडच्या तोफा लांबविल्या व इतर तोफांच्या कान्यात खिळे ठोकून त्या निकामी करून टाकल्या. नंतर तो आपल्या तळावर परतला. ज्यांनी त्याच्याकडे आसरा मागितला व ज्यांना तो दिला ते शिपाई आणि बाजारबुणगे त्याच्या सांगाती गेले.[२०]

हमीदखानाला रणांगणाबाहेर हुसकून लावल्यावर रुस्तम अलीखान आपल्या स्वतःच्या तळावर गेला होता, त्यावेळी कंठाजीने हमीदखानाच्या उरल्यासुरल्या सरंजामाची लुटालूट करण्यास आरंभ केला. जीव वाचवून उरलेल्यांचे घोडे आणि इतर चीजवस्तू बळकावत त्याने तळावरील एकूण एक वस्तू साफ धुऊन नेल्या. विरुद्ध पक्षात लढाई जारी असताना पिलाजीने देखील अशाच पद्धतीने रुस्तम अलीखानाच्या तळावर हात मारला होता आणि अरब पहारेकऱ्याच्या ताब्यात दिलेल्या किल्ल्यातील सामानास वगळता, त्याची सगळीच्या सगळी चीजवस्तू लंपास झाली होती. तोफगाड्यांना आगी लावल्या होत्या; तोफांच्या कान्यात खिळे ठोकून त्या निकामी केल्या होत्या; पळविता येतील तेवढे घोडे, शिसे, दारु पळविली होती आणि उरलेली चीजवस्तू पेटवून दिली होती. रुस्तम अलीखान परतला तेव्हा त्याला आपल्या तंबू-राहुट्यांचा मागमूसही लागेना. ज्यांची चीजवस्तू लंपास झाली होती अशा काही असामींनी त्यास काय घडले त्याची हकीकत ऐकविली. अशा वेळी गावच्या तळ्याच्या काठी एक तंबू ठोकून राहाण्यापलीकडे आणखी काही तो करू शकला नाही. जखमींची देखभाल आणि मृतांचे दफन झाले. मृत झालेल्यात, पहिल्याच हल्ल्यात ठार झालेला काजिम बेगखान होता.

रणांगणातून पळून गेल्यावर हमीदखानाने कंठाजीकडे आसरा घेतला. त्यास त्याने पोटतिडकीने शाप दिले. नुसते बघत बसल्याबद्दलचा आणि वर पुन्हा तळ लुटल्याबद्दलचा त्याचा हा तळतळाट होता. कंठाजी मराठ्याने तोंडभर दिलगिरी व्यक्त केली; नवाबास अगदी आवश्यकच असलेले थोडे तंबू, तसेच नवाब स्वार झाला होता तो हत्ती एवढ्या गोष्टी नवाबास परत केल्या. हमीदखान मराठ्यांच्या तळावरच राहिला. दोन दिवस मराठे दुसऱ्या बाजूकडे बिलकुल फिरकले नाहीत. खरे म्हणजे, लढाईच्या दिवशीच कित्येक मराठ्यांनी मही नदी ओलांडली होती. तदनंतर पवार आणि सोमवंशी यांच्या नेतृत्वाखालचा एक फौजफाटा दख्खनहून आला. हा फौजफाटा म्हणजे मागून येत असलेल्या हजारो मराठ्यांची विनी होती. शुजाअतखान मरण पावल्याचे समजल्यावर गुजरातला

२० रुस्तम अली आपला विजय झाला असे समजला. तसेच आपल्या शत्रूस ( म्हणजे हमीदखानास) आपण ठार केले असे समजला. त्याने लढाईची हकीकत सांगणारे पत्र दिल्लीस बादशाहाला पाठविले. हे पत्र राजधानीस दहाबारा दिवसांनी मिळाले. विजयाबद्दल तसेच हमीदखानाच्या तथाकथित मृत्यूबद्दल बक्षीस म्हणून रुस्तम अलीखानाची मनसब ६,००० जात ( ६,००० स्वार ) अशी वाढविण्यात आली आणि गुजरात सुभ्याचा कारभार त्याच्या नावे झाला. त्या समयी दिल्लीत अशा खबरा पोहोचल्या की ठार झालेल्यांची प्रेते २३ कोस लांबवर पडल्याचे दिसून येत असून चारपाच हजार मराठे प्राण गमावून बसले आहेत. सलाबत रोहिला आणि त्याच्या संगतीने माळव्यातून आलेले कित्येक अफगाणदेखील ठार झाले. (कामवर).

आणखी जेयभूमी समजून ती काबीज करण्याच्या इराद्याने, त्याच्या झुंडी गुजरातेकडे येऊ लागल्या. शेवटी शेवटी सत्तरऐंशी हजार मराठ्यांची जमवाजमव झाली असल्याचे दिसले.

दुसऱ्या दिवशी, म्हणजे लढाईच्या पहिल्या दिवसाच्या तिसऱ्या दिवशी मराठ्यांनी कत्येक तोफा आणल्या व हल्ल्यास सुरुवात केली. रुस्तम अलीखानाच्या बाजूकडून प्रत्युत्तर आले. पण मराठ्यांचे थवेच्या थवे येत राहिल्यामुळे दाणा, दारू, वैरण वगैरे रसदीचा रस्ता बंद झाला. तोफ रात्रंदिवस बंद राहिली. मुसलमानांना आसऱ्याची जागा नव्हती आणि रोज त्यांचा निकाल लागत असल्याचे दिसू लागले.

ही लढाई इतरत्र होत असता, अहमदाबादेत चोरभामट्यांचे फावले. त्यांनी तसेच शुजाअतखानाच्या तळावर सर्वस्व गमावलेल्यांनी लुटालूट करण्यास आरंभ केला. घोडे, गाड्या त्यांनी वळकावल्या; हमीदखानाचे आश्रित आणि चाकर यांची कुरापत त्यांनी काढली. त्यांनी जमाव केला आणि भद्रमहालावर हल्ला चढविला. शाही भांडारातील जाजमे, कपडे यांची लूट केली. या दंगलखोरांच्या हातून आपली सुटका करून घेणे सफदरखान बाबी याला कठीण गेले. महाल सोडून तो आपल्या घरी राहावयास आला. हमीदखानाची माणसे मिळेल तेथे आसरा घेत सुटली. रुस्तम अलीखानाने मुन्अीमखानास निरोप पाठवून शहरात सुव्यवस्था राखण्यास सांगितले. मृत शुजाअतखानाचा एक आश्रित मीर इब्राहीम याला भद्रमहाल ताब्यात घेण्यास पाठविले. दिवाणाने माणसे जमविली; आपला मुलगा मुहम्मद बाकिर यास रात्री शहरात गस्त घालण्याच्या तसेच शहराबाहेरील चौक्या तपासण्याच्या कामावर पाठविले.

दरम्यान, हमीदखान मेल्याच्या भाकडकथा रोज रुस्तम अलीखानाच्या तळावर येऊन पोहोचू लागल्या.[२१] पहिला विजय मिळाला त्या दिवशीच सरळ अहमदाबादेस जाण्याचे रुस्तम दिलखानाने ठरविले होते. पण त्याच्या छावणीचा सरंजाम पार मोडल्यामुळे त्याला ते शक्य झाले नाही. उलट तब्बल आठ दिवस आणि आठ रात्री तो अरस गावच्या तळ्याच्या काठावर असहाय्य स्थितीत होता. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्याच्यावर तोफांचा भडीमार होत असे. शेवटी, १४ फेब्रुवारी १७२५ रोजी अहमदाबादेच्या रोखाने कूच करण्याचे धाडस त्याने केले. तोफखाना दिमतीस नसताना आणि कसला सरंजामही उरला नसताना बरोबर चारपाच हजार असामी घेऊन त्याला जावयाचे होते. मराठे प्रचंड संख्येने त्याच्याभोवती घुटमळत होते. प्रत्येक पाऊल उचलताना लढत द्यावी लागत होती. रोज तीन चार मैलांच्या वर चाल घडत नव्हती. चौरासी खंबायतमधील नापड गावापर्यंत येणे त्याना कसेबसे जमले. पुढच्या दोन दिवसांत, असल्याच अडचणींना तोंड देत देत, ते किल्ला कलमसार आणि नंतर परगणा पेटलादमधील नेपा या गावी येऊन पोहोचले. या

२१ लढाईनंतर दोन-तीन दिवसानी, रुस्तम अलीखानाने शेवटची खात्री करून घेतली की, हमीदखान जबर जखमी झाला असून त्याला मराठ्यांकडे आसरा मिळाला आहे. त्याला जिवंत अथवा मृत स्थितीत शरणागत म्हणून हजर करण्याची मागणी मराठ्यांकडे झाली. मराठ्यांची कुमक दक्षिणेतून येऊन पोहोचण्यास अजून अवकाश असल्यामुळे त्यानी काही फसवी आश्वासने देत वेळ काढला. रुस्तम अलीखानाचा एक कारकून मराठ्यांच्या हाती लागून, त्यांचा कैदी झाला होता. त्याने रुस्तम दिलखानाला नंतर गुप्तपणे कळविले की, मराठ्यांची फार मोठी कुमक येऊ घातली असून ती औरंगाबादेहून सुरतमार्गे येत आहे; दिलेली आश्वासने खरी नसून वेळ काढण्यासाठी केलेले बहाणे आहेत. (कामवर)

प्रवासात त्याना क्षणाचीदेखील उसंत मिळाली नाही. मोका मिळाला तेव्हा कतवार आणि हमीदखानाची आसन्यास असलेली माणसे पोबारा करीत. रोज घडणारे मृत्यू आणि कूच सोडून होणारे पलायन यामुळे त्यांची संख्या रोज कमी होऊ लागली. आका हादी याची सुटका घडवून आणली होती. पण तोही आता प्राणास मुकला. बाणांच्या आतिशबाजीने त्याचा हत्ती घाबरला. तो माहुताचे ऐकेनासे झाला. पळत पळत शत्रूच्या फळातच घुसला. अशा प्रकारे चंडोलमध्ये हत्तीवर बसल्या स्थितीत आका हादीला मरण आले.

अशा आणीबाणीच्या प्रसंगी परगणा पेटलादमधील बसू गावचा पटेल, कोणी एक बनारसी मदतीसाठी धावून आला. त्याचे बसू गाव अहमदाबादेपासून २५ मैलावर होते. या त्याच्या गावात अन्न आणि थोडीशी कुमक मिळणार होती. रुस्तम अलीखान त्या गावी पोहोचू शकला तर याला आपला शीण घालवून पुन्हा ताजेतवाने होण्यासाठी लागणारी विश्रांती मिळणार होती आणि अहमदाबादेहून पाठविलेली कुमक येण्याची वाट पाहात थांबणेही तेथे शक्य होते. म्हणून त्यानी त्या गावाच्या रोखाने कूच करण्याचा हुकूम सोडला. पण हमीदखान आणि मराठे यांनी बनारसीला धाकदपटशा दिल्या. रुस्तम अलीखानाच्या अहमदाबादेमधील शत्रूंनी देखील आपले बनारसीवरील वजन वापरले. बनारसी घाबरला. रात्रीच्या वेळी त्याने गाव खाली केले. एकूणएक चीजवस्तू तो बरोबर घेऊन गेला. त्यामुळे गाव अगदी रिकामे पडले.

आपल्या बरोबरच्या ८०० लोकांसह लढता लढता वाट काढीत रुस्तम अलीखान १८ तारखेची रात्र पडण्याच्या सुमारास बसू गावात आला. या दिवसाचे कूच होत असताना कामगार अलीखान वगैरे माणसे प्राणास मुकली. गावानजीकच्या तळ्याजवळ ते थांबले. शोधाशोध केल्यावर रहिवाशांचा अथवा अन्नाच्या शिताचा मागमूसदेखील लागेना. त्याच्या मदतीस जाण्याची कोणाची हिम्मत झाली नाही. शत्रू मात्र रातभर[२२] आग बरसत राहिला. त्यामुळे जे मेले त्यांना, तळ ठोकला होता तेथेच, कडेला पुरून टाकले. आता मात्र कूच करणे अगदी अशक्य आहे असे दुसऱ्या दिवशी आढळून आले. तेव्हा थांबण्याचे ठरले. गाव मोठे होते व नुकतेच ते खाली झाले होते. त्यामुळे कसून झडती घेतल्यावर थोडे धान्य आणि वैरण मिळाली. त्यामुळे लोकांच्या आणि त्यांच्या घोड्यांच्या पोटात थोडेफार गेले. दुसऱ्या दिवशी दिवस उगविण्याच्या सुमारास त्यांची प्रवासाची धडपड सुरू झाली. खूप खटाटोप करून अंदाजे मैलभर ते पुढे सरकले. तेथे साई तालवार नावाचे एक छोटे बांधीव तळे होते. आणखी लढत देण्याचे सामर्थ्य न उरल्याने, फौज फाटयाच्या या उरल्यासुरल्या तुकडीने सगळी आशा सोडली. त्यांचा धीर खचला. त्यानी आपली घोडी सोडून दिली. आपल्या जवळची शस्त्रे टाकून दिली. आपले रूप पालटता येईल तेवढे पालटले. अगदी रात्र पडल्यावर त्यानी पोबारा केला.

गुरुवार, २१ फेब्रुवारी रोजी सूर्य उगवला तेव्हा रुस्तम अलीखान अजूनही अगदी निर्भय दिसत होता. सकाळची प्रार्थना त्याने अगदी शान्तचित्ताने म्हटली आणि कॉफी मागविली. सरदार मुहम्मदखान घोरनी त्याच्याकडे दौडत आला. त्याने हाक दिली

२ कामवर : २० फेब्रुवारीपासून रुस्तम अलीच्या लोकांना इतक्या जवळून डिवचणे चालले होते की, त्यांना पाण्याचा घोट घेण्यास सवड नव्हती, तिथे अन्न शिजविण्यास आणि ते खाण्यास वेळ कोठून आणणार?

की, "स्वार होऊन लढाईवर निघण्याचा वखत झाला आहे." रुस्तम अलीखानाची कॉफी एव्हाना आली होती; तो म्हणाला, "येथेच आपले कांबळे पसरू या आणि नशिबात काय लिहिले आहे ते पाहू या." त्याच्या अधिकाऱ्यांनी त्यास स्वार होण्याची निकड लावली. त्यासाठी एक हत्तीदेखील आणला. तेव्हा रुस्तम अलीखान म्हणाला, "ही वेळ तर घोड्यावर स्वार होण्याची आणि हातघाईची लढाई खेळण्याची आहे." 'अल्ला ! अल्ला ! ' अशी गर्जना करीत त्याने आपला वारू शत्रूकडे वळविला. मराठ्यांचे संख्याबळ फार मोठे होते. त्यामुळे रुस्तम अलीखानाचे लोक पांगले. काही ठार झाले; काही जखमी झाले; काही कैदी झाले आणि काही कसलीही इजा न होता पळून गेले. सरदार मुहम्मदखान जबर जखमी होऊन रणांगणातच पडून राहिला. सुरुवातीला मराठे रुस्तम अलीखानाच्या वाटेतून बाजूला झाले; पण अखेरी अखेरीस त्याच्या भोवती गोळा झाले आणि त्याला बाण आणि भाले मारून त्यांनी त्यास घायाळ केले. सरते शेवटी हातघाईच्या लढाईत त्यास घाव बसून तो ठार झाला. शुजाअतखानाची हुसैन कुलीखान आणि अहमद कुलीखान ही मुले दुसऱ्यांदा कैद झाली. दक्षिणी लोकांनी रुस्तम अलीखानाचे मुंडके धडावेगळे केले आणि ते हमीदखानाकडे पाठविले. त्याचा एक हात पिलाजीने तोडला आणि आपल्या शौर्याच्या स्मरणचिन्हादाखल तो आपल्या सोनगडच्या[२३] घरी पाठविला. मुंडके अहमदाबादला धाडण्यात आले आणि धड बसू या गावी पुरण्यात आले. रुस्तम अलीखानाचा पराभव झाला आहे आणि तो मृत्यू पावला आहे ही बातमी अहमदाबाद शहरी शुक्रवारी पोहोचली. त्याचे मुंडके कोतवाल कचेरीसमोर एक दिवस व एक रात्रभर मांडून ठेवलेले होते. नंतर सदर मुंडके रुस्तम अलीखानाचा भाऊ इब्राहीम कुलीखान याच्या थडग्याशेजारी पुरले.

आता हमीदखानाचे लपून राहिलेले मित्र आणि पाठीराखे बाहेर पडले. पूर्वी घडलेल्या अपकृत्यांचा बदला घेण्याच्या निमित्ताने त्यांनी आणखी अत्याचार केले. मीर इब्राहीम याने, नूरुल्लाह याचा फौजफाटा भाडोत्री घेऊन, त्याच्या संरक्षणाखाली भद्र सोडले, तो आपल्या स्वतःच्या घरी आला व तेथून पळून गेला. हमीदखान आणि मराठे यांचे आगमन झाले. रात्र त्याने शाही बागेत घालविली. नंतर भद्रमध्ये प्रवेश केला. अहमदाबादच्या गढीचे दरवाजे मोडून काढले. पिलाजी आणि कंठाजी हे रुस्तम अलीखानाच्या हत्तीवर आरूढ झाले. त्यांच्या मागोमाग मराठ्यांच्या फौजा येत होत्या. ही मंडळी शहरात आली. त्यांनी हमीदखानाची औपचारिक भेट घेतली. दिवाण मुन्अिमखान आणि माजी दिवाण फिदवीखान या प्रत्येकाने त्यांना एक-एक हत्तीण, वस्त्रे, इतर जामानिमा आणि साज—या गोष्टी हाताशी होत्या—त्यांना नजर केल्या. हमीदखान मात्र आपली छावणी नुकतीच लुटली गेल्यामुळे, आपल्याला किती ताप सहन करावा लागला याबद्दल सारखी कुरबूर करीत होता.

२३ सुरतेच्या पूर्वेस ५० मैलांवर मिरात. ( १७५ अ ) : "सुरत सरकारात बंदरापासून ३२ कोसांवर परगणे नोकरामध्ये सोनेर नावाचे गाव आहे. पिलाजीने आपल्या गटाच्या जमीनदाराशी हातमिळवणी केली आणि या गावाजवळील उंच टेकडीवर एक लहानसा किल्ला बांधला आणि टेकडीच्या पायथ्याशी एक तटबंदी असलेले लहानसे गाव वसविले." बॉम्बे गॅझेटिअर, खंड सात, ५८५, १६९.

## ५२ : हमीदखान आणि मराठे यांनी केलेला वसुलीचा जुलूम

ठरल्याप्रमाणे मही नदीच्या अहमदाबादेकडील मुलुखाची चौथ कंठाजीला आणि सदर नदीच्या बडोदे सुरत बाजुकडील चौथ पिलाजीला देण्यात आली. मराठे या मुलुखात सगळ्या परगण्यात, जिकडे तिकडे, वाट फुटेल तसे पांगले. त्यांनी खंडणी वसूल करणे आरंभिले. हमीदखान आपण एकप्रकारे स्वतंत्र आहोत, अशी हवा निर्माण करू लागला. ८०,००० रुपयांची रक्कम आणि बादशहासाठी बनविलेले जामेनिमे, (शेखुल्-इस्लामखान याच्या अखत्यारीतील खात्याचे) बळजबरी करून हिसकावून घेतले. शाही माल साठविलेली कोठारे उघडली आणि ती रिकामी करून टाकली. या अगोदर बळकाविलेली अधिकृत हिशेब-पुस्तके जाळून टाकली.' हिशेब-पुस्तकांचे उरलेले खंड दिवाणाच्या ताब्यातून काढून घेतले. सुभ्याची सगळी जमीन, मग ती जहागीर म्हणून दिलेली असो वा नसो, बळकावली. श्रीमंत मंडळींना पकडले. नंतर बाबूरा[२४] या स्थानिक नावाचा दंड बसविला. अहमदकुली आणि हुसैन कुली या शुजाअतखानाच्या मुलांवर विषप्रयोग झाला. मुस्तफा कुली या छोट्या मुलाला तेवढे जीवदान मिळाले. कायस्थ जातीच्या मुरलीधर नावाच्या एका गुजराती गृहस्थाला हमीदखानाने आपला दिवाण नेमले.

मधल्या काळात मराठे सगळ्या मुलुखभर दाहीदिशांना पांगले. जिकडे जात तिकडे ते लुटालूट आणि जाळपोळ करीत. शेख अहमद खत्तू याचा दर्गा सारखेज येथे होता. तेथे उच्चभ्रू रहिवाशांनी जोहार केला; म्हणजे आपल्या बायकामुलांना बळी दिले. आपल्यावर बळजोरी होऊ नये म्हणून शेकडो उच्चकुलीन स्त्रियांनी विहिरीत आणि तळ्यात जीव दिले. साबरमतीच्या पलीकडील एका खेड्यात अफगाण मंडळी राहात होती. तेथे सुद्धा अशाचप्रकारे बायकांची कत्तल त्यांच्या नातेवाईकांनी केली. मृत शुजाअतखानाची दोन मुले, पैकी एक ३ वर्षांचे तर दुसरे आईच्या अंगावर पिणारे तान्हे मूल होते, यांना जेते मंडळींनी ठार केले. या कुटुंबात सुहराबखान हा एकटाच वाचला. तो बारा वर्षांचा होता. त्याच्यावर सुरत शहर आणि सुरतेची गढी यांच्या रक्षणाची जबाबदारी टाकली होती.

पिलाजी हा मराठी सेनापतीचा केवळ हस्तक आहे असे समजून राजा शाहूचा मनसबदार असलेला कंठाजी त्याला जरा आपल्याहून हीन लेखत असे. या भावनेतून खंबायत या ठिकाणी त्या दोघांमध्ये तंटा होऊन त्याचे रुपांतर बखेड्यात झाले. तटावरून दिसेल इतक्या अंतरावर त्यांच्यात झटापट झाली. पिलाजी हरला. तदनंतर कंठाजीने खंबायतवर पट्टी बसविली. राजा शाहूने संरक्षण दिले आहे असे पत्र जवळ असतानाही इंग्रज गुमास्त्याकडून बळजबरीने ५ हजार रुपये वसूल केले. कंठाजी आणि पिलाजी यांच्यातील उघडउघड झालेल्या तंट्याबखेड्यामुळे हमीदखानाने त्यांना एक ठराव आपआपसात करण्यास भाग पाडले. त्यानुसार पिलाजीने मही नदीच्या पूर्वेकडील मुलुखाची चौथ घेतली. खंबायतच्या लढाईनंतर पिलाजी सोनगड येथील आपल्या घरी तर कंठाजी खानदेशातील आपल्या जहागिरीच्या गावी गेला. (मिरात.)

२४ हा दंड विविध प्रकारे आकारीत. व्यापाराच्या उलाढालीवर, जातीवर, व्यक्तींच्या शिरगणतीवर किंवा घरागणिक अशा विविध प्रकारे त्याची आकारणी होई. असला दंड बसविल्याचे पूर्वी कधी ऐकिवात नव्हते पण आता मात्र ती प्रतिवर्षीची घटना बनून गेली. (मिरात, १८० अ).

## ५३ : गुजरात व्यापण्यासाठी सर बुलंदखानाची तयारी

इ. १७२५ मार्चच्या आरंभी केव्हा तरी प्रथम शुजाअतखानाच्या पराभवाची आणि मृत्यूची व मागोमाग रुस्तम अलीखानाच्या पराभवाची आणि मृत्यूची दुर्वार्ता दिल्लीस येऊन थडकली. तेव्हा नवा सुभेदार सर बुलंदखान याला आपली तयारी अधिक जलदीने उरकण्याची व गुजरातमधील आपल्या कारभाराचा ताबा शक्य तितक्या लवकर घेण्याची निकड करण्यात आली. नेमणूक झाल्यापासून पुढे ७–८ महिने सर बुलंदखान कधी दिल्लीजवळ तर कधी खोरीजवळ नाहीतर कोटपुतळीजवळ घोटाळताना दिसतो. बादशाह स्वतःच मोहिमेचे आधिपत्य करील असा कयास कदाचित असावा. पण असे काही, खरोखर योजलेले असले तरीदेखील त्या योजनेस प्रत्यक्षात आकार असा कधी आला नाही. आता सर बुलंदखानाला एक कोटी रुपयांचे बक्षिसवजा सहाय्य दिले. त्यातील ५० लाख तत्काळ दिले. उरलेली रक्कम तीन-तीन लाख रुपयांच्या मासिक हप्त्याने मिळण्याचे आश्वासन मिळाले. जोधपूरचा महाराजा अभयसिंग राठोड, नरवरचा छत्तरसिंग, गंधर्वसिंग आणि महाराणा यांना त्याच्या मदतीस जाण्याचा आदेश झाला. मुहक्कमसिंग खत्री हा पूर्वी सय्यिद हुसैन अलीखानाचा एक महत्वाचा अमलदार होता. सय्यिद अब्दुल्लाहखानाचा पराभव झाल्यापासून गेली चार वर्षे त्याला ना चाकरी ना मनसब होती, ना पगार, ना किताब होता. आता त्याला ६ हजाराची (५ हजार घोडे) मनसब दिली, राजा हा किताब दिला आणि दोन कोटी दामाची जहागीरही दिली. त्याला २ लाख रुपयांची नगद उचलदेखील मिळाली. कित्येक बार्हा सय्यिदांना पुन्हा एकदा चाकरीत घेतले आणि गुजरातवर पाठविले. अब्दुल्लाहखानाचा धाकटा भाऊ नज्मुद्दीन अलीखान हा गेली ५ वर्षे तुरुंगात होता. त्याला आता त्याची जुनी मनसब परत बहाल झाली. अजमेरच्या सुभेदारीची नेमणूक त्याला मिळाली आणि सर बुलंदखानाला जाऊन मिळण्याचा हुकूम झाला. सय्यिदबंधूंचा आणखी एक धाकटा भाऊ सैफुद्दीन अलीखान, शुजाअतुल्लाहखान, मुहम्मदखान, शाहअलीखान, सय्यिद निजाबत अलीखान (बार्हा वजीर अब्दुल्लाहखानाचा पुतण्या) असे सगळे मिळून बार्हा सय्यिदांचे वीस ते तीस प्रमुख आपल्या सैन्यासह राजधानीस आले. त्यांना गुजरातवर धाडले. शेवटी रज्जब महिन्याच्या अखेरीस (३० ता = १३ एप्रिल १७२५) सरबुलंदखान आग्र्यास जाण्यासाठी दिल्लीतून बाहेर पडला. पण दोन-तीन छोटया मजला मारून, राजधानीपासून १३ मैलांवरील तिलपतला तो थांबला, येथे तो शाबान महिन्याच्या अखेरीपर्यंत राहिला. (२९ ता. = १२ मे १७२५) रमजान महिन्यात (मे-जून) तो फक्त फरीदाबादपर्यंत सरकला. पण बादशाहाच्या दंडधाऱ्यांनी बातमी आणली की, आता तो मजल दरमजल करीत आग्र्यास निघाला आहे. या दंडधाऱ्यांनी त्याचा निरोप घेतला तेव्हा त्याचा तळ यमुनेच्या तीरावर पडला होता.

### अहमदाबादेतील घडामोडी

एप्रिल १७२५ मध्ये हमीदखानाला समजले की, सरबुलंदखान लौकरच दिल्लीहून निघणार आहे. लगेचच पावसाळा सुरू होण्याचे दिवस होते. मराठे मंडळी पावसाळ्यासाठी आपल्या मुलुखाला नेहमीप्रमाणे परतणार होती. पावसाळा संपल्या संपल्या परत येऊ असे मराठ्यांचे आश्वासन हमीदखानाने मिळविले. मधल्या काळात नव्या सुभेदाराचा मुनीम अली मुहमदखान याने अब्दुर्रहीम बाबी याचे छत्र घेऊन शहर सोडून दिले होते. अब्दुर्रहीम बाबी

यास कारीचा फौजदार म्हणून हमीदखानाने नुकतेच नेमले होते. नंतर अली मुहम्मदखान सलावत मुहम्मदखान बाबी यांच्या आमंत्रणावरून विरमगावाला जाण्यास निघाला. तेथे, सरबुलंदखानाकडून, हमीदखानाच्या हालचालींविषयी, तसेच शहरातील सर्व घडामोडीविषयी विचारणा करणारी पत्रे आली. अली मुहम्मदखान तदनंतर राधनपूरकडे वळला. त्यावेळी त्याला जवानमर्दखान बाबी याने संरक्षण दिले. हमीदखानाच्या अधिकाऱ्यांची मुलखावरील पकड हळूहळू ढिली झाली. पाटण या ठिकाणी काजी इलमुद्दीन याने, आपणास इथला फौजदार म्हणून नेमणूक मिळाली आहे असे भासविले आणि परिणामी हमीदखानाच्या प्रतिनिधीला हुसकून लावले. अशाच घटना इतर ठिकाणी देखील घडल्या. सप्टेंबर महिन्यात हमीदखानाने जमीनदाराकडून पेशकश गोळा करण्याचे उद्दिष्ट जाहीर करून मोहिमेचे तंबू झालावाडच्या दिशेने पाठविले. त्यासाठी निकडीचे हुकूम आल्यामुळे सलावत मुहम्मदखान आणि जवानमर्दखान हे आपली ठाणी सोडून त्याला येऊन मिळाले.

## ५४ : सरबुलंदखान अहमदाबादेत प्रवेश करतो; हमीदखान दख्खनला परततो

या घडामोडी होईतो सरबुलंदखान अजमेरला येऊन पोहोचला होता. तेथून मारवाड-मार्गे अहमदाबादच्या रोखाने कूच करीत निघाला होता. आपल्यास येऊन मिळण्याच्या कामी बाबी नामक दोन प्रमुख असामी यशस्वी होतील या आशेवर मुहम्मदखान वाट पहात थांबला. पण ते दोघे आता हमीदखानाच्या ताब्यात गेले होते आणि त्याच्या तावडीतून सुटणे त्यांना शक्य दिसत नव्हते. एके दिवशी सरबुलंदखान वडगाव येथे आला. तेथे त्याच्यासाठी दिल्लीहून पाठविलेली तीन लाख रुपयांची बक्षिसीवजा मदत घेऊन, सय्यिद आकिलखान आला; तेव्हा सरबुलंदखानाला जरा विस्मयाचा धक्काच बसला. या अगदी वेळेवर येऊन पोहोचलेल्या आवश्यक मदतीचा वाहक सय्यिद आकिलखान याला, निजामुल्मुल्काने आपला म्हणून नेमलेल्या मुतवस्सिलखानाच्या जागी, सरकार गोध्रा आणि थासरा येथे फौजदार म्हणून नेमले.

वारंवार होणाऱ्या हुकुमानुसार अली मुहम्मदखानाने राधनपूर सोडले. तो पाटणला आला व तेथून सिद्धपूरला आला. तेथे त्याला नव्या सुभेदाराचा बक्षी शेख अल्लाहयार बिलग्रामी भेटला. तो आघाडीचे नेतृत्व करीत होता. त्याच्याजवळ कित्येक तोफा होत्या. झालोर या ठिकाणी मुख्य फौजा होत्या व हा आघाडीचा भाग पुढे कूच करीत आला होता. येथे दोघात सल्लामसलत झाली. आपणास पाठिंबा देणारे स्थानिक पुढारी कोण याची यादी तयार केली. काजी इलमुद्दीन यास पाटणहून बोलावून घेऊन त्याला चाकरीत घेतले. सरबुलंदखान दांतीवाडा येथे येऊन पोहोचला असल्याचे आढळूनआले. या ठिकाणी त्याने सरदार मुहम्मदखान घोरनी हा आपला अहमदाबादेतील प्रतिनिधी म्हणून काम पाहील असे लेखी नेमणूकपत्र त्याने जारी केले. हे पत्र त्याच्या प्रतिनिधीला पाठविले. शहराचा ताबा मिळण्याची पहिली संधी त्याने साधावी अशा सूचना त्याला दिल्या.

सरबुलंदखान जवळ जवळ येत चालला आहे ही गोष्ट हमीदखानाला समजली तेव्हा तो मागे अहमदाबादेकडे सरकू लागला. वाटेत सलावत मुहम्मदखान आणिज वानमर्दखान (बाबी) यांनी त्याला सोडून दिले. हे दोघे त्याच्या उत्तराधिकाऱ्याला जाऊन मिळण्यासाठी मोठ्या चपळाईने चालते झाले. अजूनही हमीदखान जिवात जीव आणून मराठ्यांची वाट

पहात होता. पण ते अखेर आलेच नाहीत. त्यांना अनेक आर्जवी पत्रे त्याने लिहिली; तरीही ते येण्याचे चिन्ह दिसेना. नवा सुभेदार सुभ्याच्या सरहद्दीवर खरोखर येऊन ठेपला होता. त्यामुळे आपण अगोदर केलेल्या दडपशाहीविरुद्ध लोक आपल्यावर सूड उगवतील अशी भीती त्याला वाटली. म्हणून त्याने कोणा एका रूपसिंग नावाच्या माणसास आपला प्रतिनिधी नेमले आणि सरदार मुहम्मदखान याच्या सदिच्छा त्यास लाभाव्यात म्हणून शिफारस करणारे पत्र दिले. नंतर त्याने शहर सोडले; महमूदाबादेच्या रोखाने त्याने कूच केले.

जलदी करण्यासाठी धन्याकडून निकड झाल्यामुळे शेख अल्लाहयार सिद्धपुराहून मोठ्या लगबगीने निघाला. सदरची कूच करीत येणारी फौज, सरदार मुहम्मदखान याला नेमणूकपत्र मिळाले तेव्हा, राजधानीपासून फक्त ६० मैलांवर आलेली होती. नव्या सुभेदाराच्या प्रतिनिधीने रुपसिंगाची ताबडतोब भेट घेतली; त्यास कोणता धोका आहे हे दाखवून दिले. नवा सुभेदार आपल्या फौजफाट्यासह नजीक येऊन ठेपला आहे; तेव्हा पलायनाच्या मार्गाने आपला जीव वाचविणे श्रेयस्कर होय असे त्याने रुपसिंगास सांगितले. जीव वाचविण्यासाठी संधी मिळाली यात समाधान मानून सदर रुपसिंग निघून गेला. त्यामुळे सरदार मुहम्मदखान यास निवांतपणे कब्जा मिळाला. या घडामोडी झाल्या त्याचवेळी हमीदखानाला मराठ्यां-विषयी खबर आली. हमीदखानाने आणि कंठाजीने झटकन हातमिळवणी केली आणि आपले मोहरे शहराकडे वळविले. वाट चालत असता त्याला पलायनवीर रुपसिंग भेटला. आघाडीची फौज अगदी नजीक येऊन पोहोचली असल्याचे त्याजकडून समजले. म्हणून मोठ्या त्वरेने मजल मारून, हमीद-कंठाजी या दोस्तांनी आपला तळ शाही बागेत ठोकला. तेथून त्यांनी सरदार मुहम्मदखानास तटस्थ राहण्याबद्दल निरोपावर निरो पाफ्ठविले, पण कार्यभाग साधण्याच्या दृष्टीने ते निष्फळ ठरले.

सरदार मुहम्मदखानाने शहर कब्जात घेतले आणि हमीदखान आपल्या मराठे साथीदारांसह परतला आहे या दोन घटनांबाबतच्या बातम्या शेख अल्लाहयार यास एकाचवेळी समजल्या. त्यावेळी तो अहमदाबादेपासून ३० मैलांवरील कलोल गावी होता. आता वेळ दवडून उपयोग नव्हता. आपल्या फौजफाट्याची हुकूमत विजयी मिर्जा गुलाम अली बेग, ख्वाजा अहमद अमन नूरानी आणि रायजादा हरकरण यांच्या हवाली करून अल्लाहयार लगोलग रातोंचा निघाला. त्याने बरोबर निवडक एक हजार घोडेस्वार घेतले होते. ही मंडळी शहरासमोरच्या साबरमती तीरावर आली. तेथे त्यांनी नदी ओलांडली आणि रायगड दरवाज्यातून शहरात प्रवेश केला. ही कुमक आल्याने शहरातील शिबंदीना धीर आला. त्याचप्रमाणे हमीदखानाच्या जुलुमातून वाचण्याची शक्यता निर्माण झाल्याने शहरवासियांतही आनंदीआनंद पसरला. कूच करीत येत असलेल्या फौजफाट्यातील कलोल येथे मागे राहिलेला गुलाम अली बेगच्या नेतृत्वाखालचा भाग मागाहून येत राहिला. हा भाग अदलज या शहरापासून १० मैलांवर असलेल्या ठिकाणी आला. या फौजफाट्याने आपल्या तळाभोवती खंदक खणून तळास सुरक्षितता आणली. आपल्या या हालचालींची माहिती त्यांनी सरबुलंदखानाला कळविली. सरबुलंदखानाच्या प्रवासात दोन दिवसांचा खोळंबा होऊन तो दांतीवाडा या ठिकाणी अडकून पडला; कारण फतह लश्कर या नावाची त्याची प्रचंड तोफ वाहून नेणाऱ्या गाडीचे चाक मोडले. तो सिद्धपूरला येऊन पोहोचला तेव्हा सलाबत मुहम्मद-खान बाबी आणि जवान मर्दखान बाबी हे दोघे त्याला येऊन मिळाले. त्यांचा पुढचा मुक्काम मेहसाणा या गावी झाला. येथे एक दिवस थांबून नंतर ते बिस्तरैन या गावापासून ४५ मैल अंतरावर असलेल्या खेडेगावी येऊन पोहोचले.

या ठिकाणी मुक्काम असताना हमीदखान आणि मराठे यांनी अदालज येथील गुलाम अली बेगच्या नेतृत्वाखालच्या सैन्यावर हल्ला केल्याची बातमी येऊन पोहोचली. ही लढाई पहाटेपासून तिन्ही सांजापर्यंत चालली. नंतर कस्बती (म्हणजे नव्याने भरती केलेले स्थानिक रहिवाशांचे सैन्य) माघार घेऊ लागले. त्यामुळे फौजफाटयातील एकजीनसीपणा नष्ट झाला. गुलाम अली बेग आणि इतर दोन सेनापती यांनी आपले लोक जमविले आणि शत्रूवर हल्ला चढविला. हल्ला चढवत चढवत ते हमीदखानाचा हत्ती असलेल्या शत्रू सैन्याच्या मधल्या फळीपर्यंत घुसत गेले. पण तेथे संख्याबळाच्या जोरावर शत्रूने त्यांच्यावर मात केली. यावेळी मुहम्मद अमन आणि हरकरण हे ठार झाले. गुलाम अली बेग देखील घायाळ झाला; तरीदेखील शत्रूची फळी मोडून आपल्या निवडक लोकांसह शहरात घुसणे त्याने जमविले. त्याच्या सैन्यातील काहींनी रणांगणातून पळ काढून जवळपासच्या खेडयात आश्रय घेतला. तर बाकीच्या काहींनी सरबुलंदखानाचे आघाडीचे तंबू ज्या बिस्तरैनला होते तेथे पळ काढला.

असा दुर्दैवी प्रसंग अनपेक्षितपणे उदभवल्यामुळे मसलतीसाठी बैठक बसली. विरमगाव आणि पाटण या ठिकाणांची फौजदारी सलाबत मुहम्मदखान बाबी आणि जवान मर्दखान बाबी यांना दिली. कित्येक राजपूत आणि कोळी प्रमुखांना बोलावणे धाडले. जवळच्या रस्त्यावर पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने साबरमती नदीच्या काठाकाठाने विजापूरमार्गे कूच करण्याचा निर्णय झाला. अली मुहम्मदखान आणि दोघे बाबी प्रमुख यांना मार्ग दाखविण्यासाठी पुढे धाडले. दुसऱ्या दिवशी ते साबरमतीच्या तीरावर येऊन पोहोचले. तेथून ते मजल दरमजल कूच करीत राहिले.

अदालज येथून हमीदखान शाही बाग येथे परतला. परतल्यावर त्याने काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला. शहराचे दरवाजे त्याला बंद झाले होते. सरदार मुहम्मदखानाची फौज भराभर वाढत होती. नव्या सुभेदाराजवळ २० हजारांचा फौजफाटा आहे अशी खबर होती. हमीदखानाच्या पक्षात मात्र भरवशाचे असे चार-पाच हजारच लोक होते. मराठयांना गनिमी काव्याने लढण्याचीच सवय होती. रणांगणात उभे ठोकून समोरासमोर होणाऱ्या लढतीत ते उतरण्याची शक्यता नव्हती. हमीदखानाच्या सैन्यात उठाव होत होते. त्याचे मुलकी अमलदारदेखील रोज त्यास सोडून जात होते. मुरलीधर नावाचा त्याचा दिवाण गुजरातचा रहिवासी होता. नवी राजवट आल्यास आपला बदला घेतला जाईल अशी भीती त्याला वाटली. (आणि तो सरबुलंदखानाच्या पक्षास जाऊन मिळाला.) या सर्व गोष्टींचा एकत्रितपणे विचार करुन हमीदखानाने झगडा करण्याचा विचार सोडला. कंठाजीस बरोबर घेऊन तो महमूदाबादला गेला. नंतर मही नदी ओलांडून त्याने दक्षिणेकडे कूच केले.

११ डिसेंबर १७२५ रोजी सरबुलंदखानाने साबरमती नदीच्या काठावर व शहराच्या उत्तर दिशेस मुहम्मद अमीनखानाच्या बागेजवळ आपला तळ ठोकला. दिवाण मूमीनखान, सदर अबुल् मुफाखिरखान, काजी अब्दुल्लाहखान, बाकिअनिगार अमानतदार, अखबारनवीस कबीर अलिखान, शेख अल्लाहयार, सरदार मुहम्मदखान, सय्यिज फय्याजखान शिरन (शीरीन?)खान, नगरशेठ (म्हणजे व्यापाऱ्यांचा प्रमुख), खुशहालचंद तसेच हिंदू-मुसलमान जमातीचे प्रमुख असामी त्यास भेटण्यासाठी शहराबाहेर आले. काही दिवसांच्या या तळावरील मुक्कामात कित्येक नव्या नेमणुकी केल्या. शहरात प्रवेश करणे श्रेयस्कर नाही असे वाटल्याने

सरबुलंदखानाने शहराच्या भोवताली कूच केले. शाह भिकन याच्या दर्ग्यावरुन नदीच्या काठावरील तटबंदीच्या दक्षिण बाजूस असलेल्या ठिकाणी तो आला. लोकांच्या आदरातिथ्यासाठी फिदाउद्दीन खान [२५] यास पुष्कळ द्रव्य दिले. राजधानीच्या आसपासच्या मुलुखाची जबाबदारी त्याच्यावर टाकली. कल्ब अली याला नगर कोतवालपद देऊन शहरात धाडण्यात आले.

## ५५ : मराठे परत येतात[२६]

कंठाजीने हमीदखानाला मही नदीच्या पैलतीरावर सुरक्षितपणे पोहोचविले. तेव्हा त्यास पिलाजी येऊन मिळाला. आपल्या पाठलागावर कोणी आले नाही हे पाहाताच त्यांना धीर आला. ते शहराच्या आसपासच्या भागात परतले. येथे त्यांनी खेडोपाडी लुटालूट केली; येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांना ठार मारले. राजधानी लगतच्या मुलुखाची जबाबदारी टाकलेल्या फिदाउद्दीनखानाला त्यांच्या विरुद्ध पाठविले. बाडा (बडा?) नैनपूर आणि राजपूर या ठिकाणी त्यात कित्येक चकमकी झडल्या. थोडासाही वेळ न गमावता एक तडाखेबंद फौजफाटा उभा करण्यात आला. सुभेदाराचा सर्वात थोरला मुलगा खानाजादखान याच्या नेतृत्वाखाली तो रणांगणावर धाडला. त्याच्या सांगाती जवान मर्दखान बाबी, सरदार मुहम्मदखान घोरनी आणि सय्यिद फय्याजखान यांना धाडण्यात आले. त्याच्यासोबत त्यांच्या तीन-चार हजाराच्या, गुजराती लोकांच्या फौजा होत्या. दुराहा, खंबायत आणि पेटलाद या ठिकाणी नेमणूक झालेले अनुक्रमे मुहम्मद इरज, नूरुद्दीन मुहम्मदखान आणि अली मर्दानखान यांनाही धाडण्यात आले. सरबुलंदखानाने २२ रबिलाखर ११३८ हि. (२७ डिसेंबर १७२५) रोजी शहरात औपचारिक प्रवेश केला. त्याने हमीदखानाच्या चाकरीत असलेल्या अमलदारांना धरून आणण्याचा प्रयत्न केला. गोळा केलेल्या महसुलातील काही रक्कम आपल्या हाती लागावी, या आशेने त्याने हा उद्योग केला.

दुराहाकडे कूच चालू असता मराठ्यांनी खानाजादखानावर चोहोबाजूकडून हल्ले चढविले. दुराहा येथे पोहोचल्यावर मुहम्मद इरज याने बस्तान बसविले. नंतर फौजेचे कूच सुरू झाले. मराठे पुन्हा गोळा झाले. पेटलाद परगण्यातील सोजित्रा गावाजवळ आमनेसामने लढाई झाली. त्यात शत्रूचा पाडाव झाला. अली मर्दानखान यास पेटलाद येथे ठेवले आणि नूरुद्दीन मुहम्मदखान यास खंबायत या ठिकाणी ठेवले. मराठ्यांवर दबाव आल्याने त्यांना तात्पुरते का होईना मही नदीच्या पलीकडे जावे लागले. निरनिराळ्या ठिकाणी नवे अधिकारी ठेवून झाल्यावर बापाच्या आज्ञेनुसार खानाजादखान परतला. अहमदाबादेच्या पूर्वेस पाच मैलावर राख्याल गावी त्याचा तळ पडला. नज्मुद्दीन अलीखान, निजाबत अलीखान आणि इतर दरबाराकडून धाडलेले बाऱ्हा सय्यिद यांचे यावेळी आगमन झाले. सुभेदाराचा दुसरा मुलगा शाह नवाजखान त्यांना सामोरा गेला. त्याने सय्यिद मंडळींना शाहीबाग येथील तळापर्यंत आणले. काही दिवसानंतर सय्यिदांना त्यांच्या ३,००० लोकांसह खानाजादखान यास जाऊन मिळण्यास सांगितले.

---

२५ यास पुढे नज्मुद्दौलह मूमीनखान दिलावर जंग असा किताब मिळाला आणि तो सुभेदारही झाला. ११५८ हि. मध्ये तो मरण पावला.

२६ हा सर्व वृत्तांत प्राय : मिरात-इ-अहमदीवर आधारलेला आहे; क्वचित प्रसंगी वारिद पुरवणीसाठी घेतला आहे.

खानाजादखान अहमदाबादेस परतल्यावर मराठे मंडळी कापडवंज[२७] येथे आली. तेथे कोळी जमातीच्या मदतीने त्यांनी आपला तळ उभा केला. झाडांच्या जाडजूड फांद्या आणि काटेरी कुंपणे उभी करुन त्यांनी आपल्या तळाला मजबुती आणली. या ठिकाणी आपला सगळा बाडबिस्तरा आणि वाहनसरंजाम टाकून ते मुसलमानांना भिडण्यासाठी मैदानात आले. पण लढाई मराठ्यांना मानवली नाही. त्यामुळे आपल्या तळापर्यंत त्यांना मागे यावे लागले. येथे मुसलमानांना तोफखान्याच्या भडिमारास त्यांना तोंड द्यावे लागले. धीर खचल्याने मराठे सैनिक पळाले. त्यामुळे रणांगण आणि मराठ्यांचा तळ शत्रूपक्षाच्या कब्जात आला. मराठ्यांचा तळ आपल्या कब्जात घेऊन, मुसलमानांनी मराठे नदी पार करीपर्यंत, त्यांचा अखंड पाठलाग केला. मराठ्यांनी अलीमोहनच्या[२८] डोंगराळ प्रदेशात आश्रय घेतला. शेख हुसैनुद्दीन याला बडोद्यावर नेमले. बाकीचे असामी भडोच, जंबुसर आणि मकबूलाबाद येथे धाडले.

खानाजादखानाची फौज अलीमोहन येथे कंठाजी आणि पिलाजी यांच्याविरुद्ध कारवाई करीत असतानाच अंताजी आणि भास्कर यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची आणखी एक फळी उत्तरेस ईदरच्या रोखाने येताना दिसली. या फळीने वडनगर शहर वेढले. या शहरात श्रीमंत नगरमहाजन आणि श्रीमान व्यापारी राहात होते. या गावाच्या रक्षणासाठी फौजा धाडण्याविषयी निकडीचे विनंती-अर्ज राजधानीस रवाना झाले. शहरात एक गढी होती. पण तेथे दाणादारू नव्हती की शिबंदी नव्हती. राजधानीच्या गावीदेखील फौजफाटा उरला नव्हता; सदर गावी पाठविण्यास फौजा शिल्लक नव्हत्या. अशा परिस्थितीत गावची लुटालूट होऊ नये म्हणून गावकरी मंडळींनी चार लाख रुपयांची खंडणी मोजली.

समोरासमोरच्या लढाईत मुसलमानाविरुद्ध विजय मिळण्याची सुतराम शक्यता नाही हे लक्षात आल्यावर कंठाजी आणि पिलाजी यांनी आपल्या फौजांच्या तुकड्या पाडून, त्या लुटालुटीच्या मोहिमेवर, जिकडे तिकडे पाठविण्याचे ठरविले. कंठाजी गोध्रा ओलांडून ईदरला व तेथून वडनगरला गेला तर पिलाजी बडोद्यास गेला. तेथून त्याने जलदी करून सूरत गाठली. कंठाजीने वडनगरला वेढा घातला. पहिल्या दुर्दैवी आपत्तीतून इथले रहिवासी अजून सावरलेले नव्हते तोच हा दुसरा प्रसंग घडल्याने ते धीर खचून रात्रीच्या वेळी गाव सोडून पळून गेले. दुसऱ्या दिवशी मराठ्यांनी शहरात प्रवेश केला. गावकऱ्यांनी बरोबर न नेल्याने उरले होते ते एकूण एक सर्व, त्यांनी हस्तगत केले. पुरुन ठेवलेले गुप्तधन त्यांनी उकरून काढले, सर्व शहरास आग लावून त्यांनी आपली कामगिरी संपविली. या आगीत कित्येक सुशोभित घरे नष्ट झाली. येथून सैरावैरा झालेले रहिवासी आसरा घेत घेत मथुरा आणि बनारस येथपर्यंत जाऊन पोहोचले. नेहमीप्रमाणे परतीचा हंगाम आल्यावर (मे-जून १७२६) कंठाजी आणि पिलाजी यांनी सुभा सोडला व ते आपआपल्या घरी परतले. खानाजादखानाला ६ हजारची (५ हजार घोडे) मनसब बढतीदाखल मिळाली. त्यात घालिबजंग हा किताबही मिळाला. नज्मुद्दीन अलीखानालादेखील बढती मिळाली.

२७ सदर ठिकाण मोहर नदीच्या पूर्व किनाऱ्यावर अहमदाबादेच्या पूर्वेस ३० मैलांवर आहे. ( इंडियन ॲटलास २२ ईशान्य ) (जदुनाथ सरकार ).

२८ आता सदर ठिकाण छोटा उदेपूर या प्रांताच्या अतीपूर्वेकडील भागात आहे. उदेपूर शहर हे बडोद्याच्या पूर्वेच्या सुमारास ५० मैलांवर आहे. ( बॉम्बे गॅझेटिअर, खंड सहा ) ( जदुनाथ सरकार ).

## ५६ : सरबुलंदखानाचा गुजरातमधील कारभार

फौजा परत बोलावून घेतल्यानंतर थोड्याच दिवसात सरबुलंदखानाचे नज्मुद्दीन अलीखानाशी भांडण झाले. सय्यिदांची मदत आली नसती तर सुभेदाराचा निभाव लागला नसता अशी बोलवा उठली. ती सरबुलंदखानाच्या कानावर गेली. सय्यिदांशी झालेल्या पुढच्याच भेटीच्यावेळी सरबुलंदखान सय्यिदांशी शिरजोरीने वागला. ते दोघे गुद्यावर येणे थोडक्यात चुकले. नज्मुद्दीन अलीखानाने याची पुढे फारशी दखल घेतली नाही आणि दरबाराकडून येणाऱ्या हुकुमाची वाट पहात तो थांबला. पण एके दिवशी सरबुलंदखानाने आपला तोफखाना, सय्यिदांची छावणी मारागिरीत सापडेल अशा अंतरावर, छावणीसमोर आणून ठेवला. त्याने नज्मुद्दीन अलीखानाला निरोप पाठविला की, आता तू एकच गोष्ट करावयाची आहेस व ती म्हणजे आपल्या सुभ्यास परत जाणे. नज्मुद्दीन अलीखानाने काय घ्यायचा तो अर्थ घेतला आणि तो अजमेरला परतला. तेथून लवकरच त्याची ग्वाल्हेरला बदली झाली; तेथे तो मरण पावला. (वारिद १११, खुशहाल १०५५ब.)

असे दिसते की आपल्या हाताखालच्या माणसांशी भांडण उकरून काढण्याच्या कलेत सरबुलंदखान तरबेज होता. गुजरातमधील त्याच्या पहिल्याच वर्षी खानाजादखान आपल्या बापास सोडून दिल्लीला परतला. सरदार मुहम्मदखान घोरनी यालादेखील वाटेस लाविले. स्थानिक शिबंदीच्या पगाराची हमी मिळावी म्हणून शहराच्या महसुलाचा कब्जा मिळावा अशी मागणी त्याने केली होती. त्यावरून जोरदार तंटा झाला आणि सरदारावर मर्जी खप्पा झाली. त्याबरोबरच दिवाणपदावर असलेला त्याचा मित्र अली मुहम्मदखान याला काढून त्या जागी सैद बेगला आणि नंतर त्यालाही काढून मुहम्मद सुलैमान यास नेमले. नगरशेठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या खुशहालचंद या श्रीमंत व्यापाऱ्यावर गैरमर्जी करून गंगादीन या रेशीमविक्यास मर्जीत घेतले. तुझी धिंड[२९] काढू अशी त्यास धमकी देऊन त्याजकडून जबर दंड उकळला. पण एव्हाना, शिपाई लोक पगार न मिळाल्याने अधीर बनले होते. सबब आणखी जुलूम करणे शहाणपणाचे नाही असा विचार सरबुलंदखानाने केला. अली मुहम्मद-खानाने मध्यस्थी केल्यास ती मान्य होईल असे तो सूचकपणे बोलला. त्याच्या सदिच्छापूर्वक मध्यस्थीखातर शेठाने साठ हजार रुपये दिले; पण नंतर मात्र त्याने ताबडतोब दिल्लीस प्रयाण केले. शेठाने मुहम्मद लतीफ नावाच्या, एका कामावरून काढून टाकलेल्या अमलदारास बरोबर घेतले होते.

११३९ हि. (१७२६ इ.) मध्ये सरबुलंदखान पेशकश गोळा करणे आणि मुलुखात सुव्यवस्था निर्माण करणे यासाठी कारी आणि बिजापूर[३०] परगण्यात आला. मराठे परत येण्याचा हंगाम (ऑक्टोबर १७२६) आला तेव्हा कंठाजी मही नदीच्या तीरावर दृग्गोचर झाला. मराठ्यांनी तहाची बोलणी काढली. सरबुलंदखानाजवळ प्रतिकार करण्याची असलेली साधने लक्षात घेता तो वरचढ ठरेल असे काहींना वाटले; पण असे सारखे बेमुदतपणे लढत राहाण्यासही सरबुलंदखान कंटाळलेला दिसला. कोणी सुरतसिंग कंठाजीकडून आला व एक ठराव दोघांमध्ये झाला. मही नदीच्या पश्चिम बाजूच्या किंवा अहमदाबाद बाजूच्या मुलुखाची

---

२९ तश्हीर; म्हणजे शहरातून अवहेलनापूर्वक फिरविणे.

३० बिजापूर अहमदाबादेच्या उत्तरेस ३६ मैलांवर आहे.

चौथ मराठ्यांना देऊ केली. पण शहरातून गोळा होणारा तसेच हवेली परगण्यातून गोळा होणारा महसूल चौथ देण्यास पात्र ठेवला नव्हता. चौथ-वसुलीविषयी महसुलाच्या ज्या बाबी वगळल्या होत्या त्या बाबी सुभेदाराला त्याच्या पगारासाठी व इतर खर्चासाठी एकरकमी (बिलमुक्ता) मोबदला म्हणून मिळाल्या होत्या. कराराचे कागदपत्र लिहून तयार झाले आणि फौजदार व आमिल (व्यवस्थापक) यांना पाठवावयाची पत्रे दूतांच्या हाती पडली. मराठी मोकासदारांना प्रवेश द्यावा असा आदेश या पत्रात अमलदारांना दिला होता.

आपल्या सुभ्याच्या कारभारात कोणाकडून ढवळाढवळ होईल याची भीती न उरल्याने सरबुलंदखान आता आपल्या कारभारात गढून गेला. साबरमती नदीलगतच्या मुलुखाचा बंदोबस्त केल्यावर तो झालावाडकडे आणि सोरठ प्रदेशाकडे वळला. परगणा विरमगाव येथील वढवाण या खेड्यातील लोकांची इच्छा प्रतिकार करण्याची दिसली. तेथे अर्जुनसिंगाचे वर्चस्व होते. त्याशी वाटाघाटी झाल्या पण त्या निष्फळ ठरल्या तेव्हा गावावर भडिमार केला. दुसऱ्या दिवशी खेड्यातील विहिरींचें पाणी आटले आणि तिसऱ्याच दिवशी जमीनदाराकडून सलोखा करण्याविषयी विचारणा झाली. तो बाहेर आला; सुभेदाराच्या सैन्यात कामावर असलेला नरवरचा राजा छत्तरसिंग याकडे त्याने आश्रय घेतला. त्याच्यावर तीन लाख रुपयांचा दंड बसविला. त्याखेरीज ठराविक महसूल देण्याची अट घातली. त्याजकडून पेशकशदेखील वसूल केली. जमीनदाराकडील हे सर्व येणे वसूल होईपर्यंत त्याच्या जमीनदारांना अडकवून ठेवले होते.

वढवाण या गावाच्या नशिबी काय आले ते पाहून इतर जमीनदारांनी धडा घेतला. इस्लामनगर उर्फ नवानगरच्या जामसाहेबाचा वकील सलाबत मुहम्मदखान बाबी याच्या मध्यस्थीने तीन लाख रुपये देण्यास कबूल झाला. यावर्षी या मुलुखात गोळा केलेला सगळा महसूल खूपच मोठा भरला. नंतर सरबुलंदखान अहमदाबादला परतला; तेथून तो बात्रक-जवळच्या कोळ्यांच्या गावाकडे वळला. कोळी लोकांना चांगल्या वर्तणुकीचे प्रतिज्ञापत्र लिहून देण्यास भाग पाडून तो शहराकडे परतला. येथे दुराहाचा फौजदार मुहम्मद इरज गावांच्या आणि परगण्यांच्या प्रमुखांसह जमाबंदीच्या कामासाठी आणि पुढील वर्षीच्या महसुलाच्या तजविजीसाठी आला. सदर फौजदाराविषयी जोराच्या तक्रारी झाल्याने, त्याच्या जागेवर अली मुहम्मदखान याला नेमले. अधिकारी वर्गात कित्येक बदल करण्यात आले. दरम्यान मुहम्मद अमीन बेग आणि शेख अल्लाहयार बक्षी यांना फौजफाटा देऊन मही नदीजवळच्या कोळ्यांच्या वस्त्यांवर खंडणी निर्धारित करून ती वसूल करून आणण्याच्या कामावर पाठविले.

चौथ देण्याचा ठराव झालेला आहे आणि कंठाजीबरोबर झालेल्या वाटाघाटींच्या अटी अमुक अमुक आहेत असे शाही दरबारास कळविले तेव्हा तीन लाख रुपयांचा मासिक हप्ता तिकडून येण्याचे बंद झाले. तीन हप्ते तोपर्यंत देऊन झाले होते. सरबुलंदखान मोठा फौजफाटा बाळगून होता; अनेक भरगच्च पगाराचे अमलदार त्याने पदरी ठेवले होते; त्यामुळे परगण्यातून येणारा महसूल आणि पेशकश म्हणून मिळणारे द्रव्य त्याच्या खर्चास पुरे पडणार नव्हते; म्हणून तुटवडा भरून काढण्यासाठी त्याने दंड बसविणे तसेच विविध प्रकारचे हिंसाचार सुरू केले. अशा कामांमुळे तो निंदानालस्ती करणाऱ्या, अदूरदर्शी आणि स्वार्थी सल्लागारांच्या अधीन होत गेला.

## ५७ : गुजरातेत मराठे, ऑक्टोबर १७२६ ते जून १७२७

मही नदीच्या पूर्वेकडील चौथ सेनापती त्रिंबकराव दाभाडे यास मिळाली होती. त्याच्या वतीने पिलाजी (गायकवाड) चौथ गोळा करण्यासाठी झटू लागला. पण बाजीरावाचे त्याशी उघड शत्रुत्व असल्याने, आपल्या या कडव्या शत्रूला इजा पोहोचविण्यासाठी, आपला एक अमलदार उदाजी पवार याला बाजीराव पेशव्याने वसुलाच्या कामात ढवळाढवळ करण्यासाठी पाठविले. दोन्ही पक्ष बडोदे मुक्कामी भेटले. भांडणाचे पर्यवसान झगड्यात झाले. डभोई येथे अब्दुन्नबी बेग हा नायब फौजदार होता. चौथ वसूल करण्यावरून पिलाजीने त्याला पुष्कळ छळले होते. म्हणून अब्दुन्नबी बेगने उदाजीचा पक्ष घेतला आणि त्याला डभोईस आसरा दिला. पण नंतर झालेल्या झटापटीत अब्दुन्नबीखान मारला गेला; अशा प्रकारे डभोई शहर आणि तेथील किल्ला उदाजीच्या कब्जात आला.

कंठाजी खानदेशातील आपल्या भागातून परतला. त्याने डभोईस वेढा घालून बसलेल्या पिलाजीशी हातमिळवणी केली. मराठे मंडळी अशा व्यापात गुंतलेली आहेत हे पाहून बडोद्याचा नवा फौजदार सद्रुद्दीन मुहम्मदखान हा आपल्या कामाच्या ठिकाणी मोठ्या जलदीने निघाला. त्याने मही फाजिलपूर येथे ओलांडली; रात्रीत्री एक मजल मारून इच्छित स्थळी आपण पोहोचू असा त्याचा कयास होता. पिलाजीने फौजेची एक तुकडी त्यावर पाठविली. या तुकडीने त्याला मार्गातच गाठले. त्याचा बाडबिस्तरा आणि त्याच्या गाड्या यांची या तुकडीने लुटालूट केली. त्यामुळे बडोद्यापर्यंतचा आपला मार्ग लढत लढत आक्रमणे त्याला भाग पडले. त्याच्यावरील आणि डभोईवरील हल्ला पूर्वीपेक्षा अधिक निकराने चढविण्यात आल्याने उदाजीला सरबुलंदखानाकडे मदत मागण्याची पाळी आली. त्याचा भाऊ आनंदराव हा त्याच्या मुलासह कांकरिया तलावाजवळ आला; भेटी-प्रतिभेटी देऊन झाल्या. तेथे ठराव झाले; मग मुहम्मद अमीन बेग आणि शेख अल्लाहयार यांना परत बोलविले. मही नदीच्या तीरावरील प्रदेशाचा त्यांनी बंदोबस्त केला होता; तेथून ते नुकतेच झालावाड आणि सोरठ या भागाकडे निघाले होते. त्यांना परत बोलाविण्याचा निरोप आला त्या क्षणी ते धांदुका[31] येथे होते. डभोईस जाण्यासाठी कच करीत असताना त्यांना दर पावलावर मराठे घोडेस्वारांचे अडथळे होत राहिले. या घोडेस्वारांचा प्रमुख कृष्णा होता. हा कृष्णा कंठाजी कदम याचा दत्तक मुलगा होता. मराठे घोडेस्वारांनी रसदीचा मार्ग बंद करून टाकला. वासकजवळ समोरासमोर लढाई झाली. त्यात कृष्णाचा निभाव लागला नाही. त्याने बडोद्यापर्यंत माघार घेतली.

पिलाजी आणि कंठाजी यांनी डभोईचा वेढा उठविला. कूच करण्यात तडफ दाखवून त्यांनी मुसलमानांवर हल्ला चढविला. मुसलमान त्यावेळी बडोद्याच्या मार्गावर नडियादपर्यंत आले होते. आपली पिछाडी शहराकडे ठेवून अमीन बेग आणि अल्लाहयार यांनी आठवडाभर प्रतिकार केला तेव्हा कंठाजीने पेटलादचा फौजदार फिदाउद्दीनखान मार्फत सरबुलंदखानासमोर सलोख्याच्या अटी ठेवल्या. सुभेदाराने त्यास अनुकूल प्रतिसाद दिला. सुभ्याचा दिवाण मुन्अिमखान याला पेटलादहून धाडले. चौथ देण्याविषयी ठराव झाला. तेव्हा सुभेदाराच्या

३१ काठेवाड द्वीपकल्पाच्या ईशान्य कोपऱ्यात वढवाणच्या आग्नेयीस ३० मैलांवर. ( इंडियन ॲटलास तक्ता २२, नैर्ऋत्य. ) (जदुनाथ सरकार ).

फौजा परत बोलाविल्या. मुसलमान सुभेदाराकडून मदत मिळविण्याच्या कामी उदाजीचे प्रयत्न असफल झाले होते. त्याने डभोईची मोर्चेबंदी आणखी पक्की केली व डभोई लढविणे चालू ठेवले. या कामी त्याला बडोद्याचा फौजदार सद्रुद्दीन मुहम्मदखान याने यथाशक्ती मदत केली. या दोघांचे संयुक्त प्रयत्न बराच काळ चालू राहिले तरी त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी या दोघांनी डभोई खाली केली आणि माळव्याच्या सुभ्यात प्रवेश केला. येथे धारेस उदाजीला चांगला आधार होता. पिलाजीने डभोई आणि बडोदा व्यापले. कंठाजी आणि पिलाजी यांनी आपली माणसे चौथ वसूल करण्यासाठी पाठविली व पावसाळ्यापुरते ते आपआपल्या गांवी परतले. कंठाजीचा दत्तक मुलगा कृष्णा याने चांपानेरचा किल्ला घेतला आणि तेथे आपले मुख्य ठाणे व घर केले. या डोंगराच्या माथ्यावरील मजबूत आणि दुर्गम अशा छोट्या किल्ल्यातून तो मारवाडातील थेट झालावाडपर्यंतच्या लुटालुटीच्या मोहिमांवर निघत असे.

११३९ हि. (एप्रिल-मे १७२७) च्या उत्तरार्धात, शेतातील पिके काढण्यास तयार झाली असता सरबुलंदखान पुन्हा एकदा मोहिमेवर निघाला. तो सोरठला[३२] गेला. नवानगरच्या जमीनदाराने सलाबत मुहम्मदखान बाबी याच्या मध्यस्थीने पुनः एक लाख रुपयांची खंडणी दिली. सुभेदार समुद्रकिनाऱ्यावरील पोरबंदर आणि छाया या ठिकाणी वेळेवर पोहोचला. छाया येथे पोहोचण्यासाठी मुसलमानांना झाडे तोडावी लागली व झुडुपे जाळावी लागली. मुसलमान जवळ येताच जमीनदाराने आपले जहाज समुद्रात घातले; सुटका करून घेऊन तो पळाला. पळून जाताना हलवाहलव करण्यास अवसर न राहिल्याने काही तोफा, सात छातीपाठीची चिलखते आणि रसदसाहित्य मागे राहिले. पळपुटा परत येईल म्हणून सुभेदार वाट पाहात राहिला. तो नमला नाही म्हणून त्याचा किल्ला जमीनदोस्त करण्यासाठी त्याने माणसे धाडली. पण आणखी एक सल्ला मिळाल्यामुळे सरबुलंदखानाने आपला मनसुबा बदलला. त्याने किल्ला दुरुस्त केला आणि फौजदाराची नेमणूक जाहीर केली. आपण कायमचेच परागंदा राहू या भीतीची जाणीव होऊन फरारी जमीनदार शुद्धीवर आला. तेव्हा त्याच्याकडून सव्वा लाख मुहम्मदी रुपये घेऊन त्याला त्याच्या जागेवर पुन्हा विराजमान केले. परतीच्या प्रवासात असताना, हालोदचा परतापसिंग याच्या मुलीशी सरबुलंदखानाने विवाह केला. त्याच्या मालमत्तेवरील पेशकश त्याने आदा केली. जामतमाची (रायसिंगाचा मुलगा) हा भाद्रपद शुद्ध ११ सं. १७६७ (१७१० इ.) रोजी नवानगरच्या राज्यावर वारस या नात्याने आला होता. त्याचा चुलता हरधवल याची भीती वाटून, त्याच्या दायीने त्याला त्याच्या आत्याकडे, म्हणजे बाई रतनजीकडे भूज येथे पाठविले. या मुलाच्या भल्याकरिता या आत्याने द्रव्य वेचले आणि आपला भाऊ हालोदचा राजा परतापसिंग यास पत्र लिहून त्याची मुलगी सरबुलंदखानास आणि त्याच्या एका चुलत भावाची मुलगी सलाबत मुहम्मदखान बाबी यास देण्यास सांगितले. या दोन माणसांनी हरधवल याला हुसकून लावले आणि तमाची[३३] याला त्याचे राज्य मिळवून दिले.

आता सरबुलंदखानाचे दरबारातील वजन चांगलेच ढासळू लागले होते. अगदी सुरुवातीपासून—त्यास हमीदखानाकडून विरोध होऊ लागल्यापासून—या सुभेदाराने दिल्ली

३२ म्हणजे काठेवाड, सोरठ (सौराष्ट्र) म्हणजे सुरत मानण्याचा घोटाळा करू नये. (जदुनाथ सरकार).

३३ रणछोडजी अमरजीकृत तारीख-इ-सोरठ, २५८.

दरबारातील उमरावांना जहागीर म्हणून दिलेले परगणे बळकावले होते व त्यांचा उपभोग घेतला होता. याबाबत बादशाहाकडे तक्रारी झाल्या. या जहागिरी ज्याच्या त्यास द्याव्यात असा आदेश आपल्या धन्याकडे पाठवा असा हुकूम सुभेदाराच्या दरबारातील वकिलाला वारंवार होत होता; पण त्याकडे दुर्लक्ष झाले. शेवटी पदपरत्वे नसलेल्या (बिला शर्त) सरबुलंदखानाच्या पंजाबातील जहागिरी साम्राज्यास जोडून टाकल्या आणि सरबुलंदखानाच्या कामगिरीमुळे जहागिरी गमावलेल्यापैकी काही वजनदार जहागिरदारांना, त्यानी गमावलेल्या जहागिरीएवढा हिस्सा या जहागिरीत वाढवून मिळाला. पण बाकीचे मात्र भिकेस लागले. त्यांची ते होते तेथे उपासमार तरी झाली किंवा ते पोटापाण्याच्या शोधार्थ इकडेतिकडे पांगले.

## ५८ : गुजरातमधील घडामोडी, ऑक्टोबर १७२७ ते जून १७२८

हि. ११४० मधील पावसाळा (जून–सप्टेंबर १७२७) संपल्यावर चिमाजीने आपला भाऊ बाजीराव पेशवा याच्या हितासाठी गुजरात सुभ्यावर आक्रमण केले. मात्र चौथ विषयी काही तजवीज करणे मनात आहे असे वरून दाखविले. त्याबाबत पत्रव्यवहारही झाला. अहमदाबादपासून १२ कोसांवर असलेल्या दुराहा या ठिकाणी तळ पडला असता चिमाजीने उदाजी पवार आणि काही पंडित याना सरबुलंदखानाकडे धाडले. सरबुलंदखानाने आपला कार्यवाह नाथमल यास आपला प्रतिनिधी म्हणून मुक्रर केले. पण सुभेदाराने अटी लादण्याचे ठरविल्यामुळे ठराव होऊ शकला नाही; वाटाघाटी फिसकटल्या. दुराहा गावाला तटबंदी नव्हती. चिमाजीने दुराहा येथे आणि आसपासच्या गावात लुटालूट सुरू केली. स्थानिक शिपाई मंडळी–ज्यांना कस्बाती म्हणत–मोठ्या संख्येने ठार वा जखमी झाली. शेवटी खंडणी देण्यास कबुली मिळाल्यानंतर लुटालूट स्थगित केली. खंडणीची रक्कम मिळताच चिमाजी गोध्रा आणि दोहद मार्गे माळव्यात परतला. या दोन परगण्यांचा आणि चांपानेरच्या किल्ल्याचा त्याने कब्जा घेतला.

ऑक्टोबर १७२७ ते जून १७२८ या हंगामात सरबुलंदखानाने दुराहाचा बंदोबस्त करण्याचे काम हाती घेतले; वात्रक नदीच्या काठावरील गावातून तो खंडणी वसूल करू लागला. मांडवचा जमीनदार लाल याने वीस हजार रुपये दिले. इतर कोळी जमातीच्या प्रमुखांनी आपापल्या कुवतीनुसार रकमा दिल्या. सुभेदार बारनुवे या गावी असता कंठाजी महमूदाबाद या राजधानीपासून बारा कोसांवर असलेल्या गावी आला असल्याची खबर मिळाली. चिमाजी अलीकडेच येऊन गेला असल्याने त्याचा संशय बळावला. सरबुलंदखानाने कोना मौदिज या ठिकाणी आपला तळ ठोकला. या ठिकाणी कंठाजीच्या प्रतिनिधींनी त्याची भेट घेतली आणि चौथविषयी वाटाघाटी केल्या. कंठाजी सुरतेच्या रोखाने गेला तर सरबुलंदखान आल्या पावली मागे वळला; वात्रकच्या आसपासच्या भागातील कोळ्याविरुद्ध त्याच्या मोहिमा चालू राहिल्या. या कोळी मंडळींनी पिपळोद परगण्यातील महकूल गावाजवळच्या दाट जंगलात आपल्या कुटुंबियांसमवेत आश्रय घेतला होता. तेव्हा मुसलमानांच्या फौजा मुरासा आणि अहमदनगरच्या रोखाने वळल्या. फौजा जेथे जात तेथील महसूल वसूल होई. अहमदाबादेस परतताना त्यानी साबरमती नदीच्या काठाकाठाने कूच केले.

## ५९ : गुजरातमधील घडामोडी, ऑक्टोबर १७२८ ते जून १७२९

हि. ११४१ (या वर्षीचा बिगरपावसाळ्याचा काळ १ ऑक्टोबर १७२८ ते ३० जून १७२९ असा होता) मध्ये सरबुलंदखान मही नदीच्या काठावरील मुलुखाच्या दौऱ्यावर गेला. पांगलेले येऊन मिळावेत व तोफदळ यावे म्हणून तो चौदुला तलावाजवळ वाट पाहात थोडा थांबला. येथे मुक्काम असतानाच पेटलादचा फौजदार जवानमर्दखान बाबी याच्या मृत्यूची खबर त्याला समजली. या अमलदाराने बालूर नावाच्या खेड्यावर हल्ला चढविला होता आणि लढाई चालू असता त्याच्या डाव्या कुल्ल्याला तोफगोळा लागला होता. त्यामुळे पेटलादला परतल्यावर कित्येक दिवसांनी तो मरण पावला होता. अहमदाबादेस ईदगाजवळ त्याच्या पूर्वजांच्या थडग्याशेजारी त्याचे दफन केले. आता त्याचा सर्वात थोरला मुलगा कमालुद्दीनखान याला मनसब मिळाली; सामी आणि मुंजवार या परगण्यातील महसूल बहाल झाला आणि वडिलांचा किताबही त्याला मिळाला. धाकटा मुलगा मुहम्मद अन्वर यास सफदरखान हा किताब मिळाला व राधनपूरचा फौजदार म्हणून वडिलांच्या जागी त्याची नेमणूक झाली.

सरबुलंदखानाने आपला तळ हवेली परगण्यातील कानज या गावी हलविला. तेथून तो नडियादकडे कूच करीत गेला. तेथे परगणा पेटलादचे अधिकारी आणि मुखिये त्याला येऊन मिळाले. मृत फौजदाराचा मुख्य दिवाण राय किश्वर (केशव ?) याच्याकडे सदरचा मुलूख एकरकमी खंडाने होता. त्याने सदरचे देणे पार पाडण्यास होकार दिला. काही काळाने, आपला वायदा पुरा करणे त्यास जमले नाही, खंडाची रक्कम सलाबत मुहम्मदखान बाबी यास दिली. पण मागील बाकी वसूल न झाल्यामुळे त्याला भद्रच्या तुरूंगात टाकले. तेथे त्याने आत्महत्या केली. तदनंतर सुभेदार मही नदीच्या तीरावर गेला. सरदारसिंग याचे निवासस्थान असलेल्या भादरवाडा या खेड्यावर त्याने हल्ला चढविला. पहिल्या दिवशी लढाईचा निर्णय लागला नाही. सरबुलंदखानाने ही रात्र होता त्याच जागी घालविली. सकाळी चकमक पुन्हा सुरू झाली तेव्हा सलाबत मुहम्मदखानाच्या मार्फत शरणचिठ्ठी आली. वीस हजार रुपयांची मागणी होऊन सलोख्याची तडजोड झाली. हे उन्हाळ्याचे सरतीचे दिवस होते. वैरण फार दुर्मिळ झाली होती. म्हणून फौजा अहमदाबादेला परतल्या. उतमिना वगैरे ठिकाणी खंडणी वसूल केली.

या वर्षी (१७२८–२९) महसुलाची वसुली होणे ही बाब शहराच्या आसपासच्या भागात डोकेदुखीची बनली होती. हिम्मतदिलखान याने मुखिये आणि कुळे यांच्याशी भांडणे केली. त्यामुळे ती मंडळी पळून गेली. त्यानेही राजीनामा दिला. त्यामुळे महसूल निर्धारित करणे आणि तो वसूल करणे या बाबतीत सगळाच गोंधळ उडाला. या भागातील लोकांशी कित्येक वर्षांचा परिचय असल्याच्या कारणावरून अली मुहम्मदखान यावर येथली जबाबदारी सोपविली. हा अली मुहम्मदखान बहादुरशाहाच्या अमदानीत (१७०७–१७१२) शाहझादा जहानशाह याचा प्रतिनिधी म्हणून या भागात होता. त्याच्या एका मुलाला[३४] या भागाचा फौजदार बनविले. दुसऱ्या मुलाला शहरातील बऱ्याच नेमणुका दिल्या, (जशा) कापडावरील वसूल, जकातीवरील बाक्या, घोडेबाजार, टाकसाळ इत्यादी. लवकरच सुभेदाराच्या गरजांमुळे, महसूल–निर्धारण जेवढ्या रकमेचे झाले आहे त्यापेक्षा

३४ मिरात-इ-अहमदीचा लेखक.

दहा हजार रुपये जास्त मिळण्याबाबत सुभेदाराकडून विचारणा झाली. या भागात आणखी जुलूम करता येणे या वर्षी शक्य नाही; आणखी छळले नाही तर येत्या वर्षी महसुलात मोठी वाढ होईल असे त्याने दाखवून दिले. पण पैशाची निकड तर फार मोठी होती. तेव्हा फौजदार किंवा न्यायाधीशाचे कार्यालय यांच्या अधीन असलेल्या जमाखात्याकडून पैसे उभे करावेत असे सरबुलंदखानाने त्यावर सुचविले. त्या खात्यातील पैसे जुलूम केल्याशिवाय वसूल होण्यासारखे नव्हते. म्हणून अली मुहम्मदखानाने त्यास नकार दिला आणि आपल्या पदांचे राजीनामे दिले. तेव्हा त्याच्या जागी झैलनखान याला नेमण्यात आले. तो मुन्अिमखानाचा आश्रित होता. दंड बसवून आणि नदीवर ये-जा करणाऱ्या नावांचे मक्ते जुलमी तरीवाल्यांना देऊन अधिक रक्कम उभी केली. व्यापारी समाजावर वर्षातून एकदा तर कधी वर्षातून दोनदा कर बसवू लागले. कधी तो त्यांच्या प्राप्तीवर, तर कधी कुटुंबातील व्यक्तींच्या संख्येवर तर कधी त्यांच्या घरांच्या संख्येवर असे. हसन नावाचा कोणी एक लोखंडाचा व्यापारी होता. तो धनाढ्य होता. त्याची श्रीमंती शंकास्पद मार्गांनी जमली होती. एके रात्री तो आपल्या घराच्या वाटेवर असता त्याचा खून झाला. या गुन्ह्याबद्दल त्याच्या वारसांनी त्याच्या जातभाईंची नावे घेतली. हे निमित्त बरे आहे असे पाहून, सुभेदाराने त्या जमातीच्या प्रमुख असामींना धरले. त्यांना मारहाण करून, त्यांचा छळ करून त्याने त्यांच्याकडून तीन लाख रुपये जबरीने उकळले. या छळामुळे व मारहाणीमुळे त्यांच्यातील एक प्रमुख असामी मरण पावला.

सोरठहून आपल्या मुलुखाकडे निघालेला कंठाजी अहमदाबादपासून १२ मैलांवरून गेला. तो सानंदच्या जवळपास असताना, हुलस्वार म्हणून गुजरातेत ओळखले जाणारे त्याचे घोडेस्वार लुटालुटीच्या मिषाने आसपासच्या मुलुखात घुसले. घियासपूर या बडोद्यापासून सहा मैलांवर असलेल्या गावानजीकच्या मैदानात त्यांची सरबुलंदखानाच्या हत्तींच्या एथकाशी गाठ पडली. वैरण गोळा करण्यासाठी हे हत्ती पाठविलेले होते. यांपैकी तीन हत्ती या घोडेस्वारांनी आपल्या बरोबर हाकीत नेले. या मगरुरीबद्दल अद्दल घडविण्यासाठी अल्लाहयार बक्षी यास तत्काळ धाडण्यात आले. पण तो महमूदाबादेच्या यलीकडे गेला न गेला तोच मराठ्यांवर हत्ती मैल- दोन मैल हाकून, पाठलागाची भीती वाटल्याने, सोडून दिले अशी खबरे सुभेदाराला मिळाली. म्हणून अल्लाहयारला परत बोलाविले. तो दुसऱ्याच दिवशी परतला.

## ६० : गुजरातेतील घडामोडी, ऑक्टोबर १७२९ ते जून १७३०

पावसाळा संपला आणि पिके तयार झाली तेव्हा रणांगणात पुन्हा एकदा उतरण्याची वेळ येऊन ठेपली ( ऑक्टोबर १७२९ ). सरबुलंदखान कोळव्याच्या रोखाने कूच करीत गेला. त्याने साहपूरचा भाऊसिंग याजकडून खंडणी वसूल केली. जाईल तिकडे वसुली करीत सुभेदार जुनागढजवळच्या मधपूर गावी आला. हे ठिकाण प्रशस्त होते. त्यावर हल्ला चढवून लुटालूट केली. याच ठिकाणी कच्छवर हल्ला चढविण्याचा मनसुबा रचला. त्याची पूर्वतयारी म्हणून १० लाख महमूदी रुपयांची खंडणी मागण्यासाठी दूत रवाना झाले. कच्छच्या राजाने त्याची दखल घेतली नाही. तेव्हा त्या राजाचे प्रतिस्पर्धी आणि शत्रू यांनी जास्त द्रव्य गोळा होऊ शकेल असा सर्वांत जास्त भरभराटलेला प्रदेश दाखवून देण्याचे आश्वासन दिले. वसुलीसाठी प्रयत्नांची आवश्यकताच नाही किंवा पडतील ते प्रयास अगदीच किरकोळ असतील असे त्यांनी छातीठोकपणे सांगितले. पण कच्छला पोहोचण्यासाठी रण

या नावाने ओळखले जाणारे, पाणी नसलेले वाळवंट पार करणे आवश्यक होते. हे खारे वाळवंट ५० मैल रूंद होते. हे वाळवंट पार करणे कठीण गोष्ट आहे असा इशारा तिथल्या लोकांनी सरबुलंदखानाला दिला. पण खंडणी आणि लुटालूट यांचा मोह पडल्याने हा प्रयत्न करून पाहाण्याचे सरबुलंदखानाने ठरविले. प्रत्येक माणसाने बरोबर नेता येईल तेवढे अन्नपाणी घ्यावे असा हुकूम झाला. कूच सोपे व्हावे म्हणून प्रवास रात्रीचा करण्याचे ठरले. एवढी सगळी दक्षता घेऊनही वाळवंट पार करण्यापूर्वी कित्येक माणसे तहानेपायी मेली.

ते भुजच्या मुलूखात शिरले तेव्हा त्यांनी गावांगावातून जाळपोळ व लुटालूट करण्यास सुरूवात केली. त्यांनी भूजला वेढा घातला; खंदक खणला आणि आपली तोफतुकडी सज्ज केली. तेव्हा जमीनदाराने तहाची मागणी केली. पण तहाचा आकडा भल ताच वरचा निघाल्याने जमीनदाराने तहास नकार दिला. आपल्या भोवतालची बरीच गावे त्याने जाळून टाकली आणि दाणादारूचा मागमूसही शिल्लक ठेवला नाही. शिवाय त्याने दररोज सुसज्ज घोडेस्वार पथके पाठवून रसदीचा मार्ग बंद केला. दरम्यान शरण येत असल्याबद्दलचे दिशाभूल करणारे प्रस्ताव तो पाठवीत राहिला. अशात महिना-दीड-महिना गेला. तळावरील सगळी दाणादारू संपली. माणसे आणि जनावरे रोज कृश होऊ लागली. तोफा ओढणारे बैल आणि ओझे वाहणारे उंट मेले. या वेळी दरबारातील वकिलाकडून निरोप आला की सरबुलंदखानाची गुजरातच्या कारभारावरून उचलबांगडी झालेली आहे आणि त्या जागेवर जोधपूरचा महाराजा अभयसिंग राठोड याची नेमणूक झाली आहे. तेव्हा भूजचा वेढा उठवला. परतीचा प्रवास राधनपूरच्या रोखाने सुरू झाला. या ठिकाणी कच्छचे रण जरा कमी रूंद आहे. राधनपूर येथे जवानमर्दखान बाबी याच्या मृत्यूबद्दल, त्याच्या कुटुंबियांकडे शोकसमाचाराला जाणे झाले. येथून सरबुलंदखान अहमदाबादेस येऊन पोहोचला.

## ६१ : शेख अब्दुल्लाह याच्या नेतृत्वाखालील बोहरा मंडळींचा उठाव

फौजा मुख्य ठाण्यास पोहोचल्या-पोहोचल्या शिपायांनी बंड करून आजवर थकत आलेल्या सगळ्या पगारबाकीची मागणी केली. त्यांच्या मागण्या पुऱ्या करता याव्या म्हणून शहरावर पट्टी बसवावी असे ठरले. यापूर्वी कित्येक वेळा अशा कारणासाठी हाच मार्ग अनुसरण्यात आला होता. वसूल करावयाच्या रकमेपैकी ३/४ रक्कम हिंदू व्यापाऱ्यांकडून आणि १/४ रक्कम बोहरा व्यापाऱ्यांकडून वसूल केली. वसुलीचे हे प्रमाण मागील प्रसंगी-देखील असेच होते, बोहरा व्यापारी धर्माने मुसलमान व सुन्नी पंथाचे अनुयायी होते. वसुलीसाठी वसुली अमलदार नेमले. दरम्यान सरबुलंदखानाच्या जागी दुसरी नेमणूक झाली असल्याची बातमी पसरली. त्यामुळे बोहरा मंडळींना धीर येऊन त्यांनी वसुलीचा प्रतिकार करण्याचे ठरविले. आम्ही गरीब आहोत अशी सबब त्यांनी पुढे केली. बळाचा वापर केला

तर दंगल उसळेल या भीतीने सरबुलंदखान बळाचा वापर करणार नाही अशी त्यांची कल्पना होती. शेख अब्दुल्लाह नावाचा एक एकांतवासी योगी बोहरा जमातीचा होता. त्याने तीस वर्षे एकांतवासात काढली होती. चळवळ करणाऱ्या बोहरा मंडळींचे नेतृत्व त्याने आपल्याकडे घेतले. सर्व असंतुष्ट मंडळी जामा मशिदीसमोर जमली. शेखाने आपली दाढी उपटून आपली साथ करावयाला स्वर्गातल्या फौजा येतील अशी गर्जना केली. त्याच्या चिथावणीवरून सरबुलंदखानास निरोप गेला की, त्याने शहरातून तावडतोब काळे केले नाही तर त्याला अटक होईल. शेखाच्या वाणीचा जमावावर अनुकूल परिणाम होत राहिला. आगीत तेल टाकावे तसे झाले. हा ईश्वराने पाठविलेला प्रेषितच आहे असे सगळेजण समजून चालले.

सरबुलंदखानाने सुभ्याचा दिवाण अब्दुल घनीखान वगैरे प्रमुख अंमलदारांना बोलावून घेतले. सौम्य शब्दातील निरोप एकापाठोपाठ एक असे त्याने शेखाकडे पाठविले. शेखाला कळविले की, सुभेदाराने कृपावंत होऊन बोहराकडून घेतला हिस्सा परत करण्याचे ठरविले आहे; त्यामुळे बोहरा मंडळींनी आता शांतपणे आपापल्या घरी जावे. शेख संतुष्ट होण्याऐवजी, या मऊ शब्दामुळे त्याचे अंतःकरण आणखी कठोर बनले. आपल्या कठोर वाणीचा इष्ट तो परिणाम झाला असे त्याला वाटले. "माझ्या इच्छारूपी बाणाने नेम साधला." पूर्वीपेक्षा अधिक कडक भाषा वापरून त्याने सरबुलंदखानाला उत्तर पाठविले की, सरबुलंदखानाने नुसते शहरच सोडले पाहिजे असे नाही तर हिंदूंकडून पैसे वसूल करण्याचा हुकूमदेखील रद्द करावा. आपल्या चळवळीत सामील होण्यासाठी त्याने हिंदूंनाही चिथावणी दिली; रस्त्यारस्त्यात लढण्यासाठी त्यांना सज्ज केले.

आपण पुढे केलेला मैत्रीपूर्ण सलोख्याचा प्रस्ताव डावलला हे पाहून सरबुलंदखानाने आपल्या फौजांना हुकूम केला. शेख अल्लाहयार याला फौज घेऊन मशिदीकडे जाणारे सगळे रस्ते रहदारीसाठी बंद करण्यास सांगितले. नंतर सुभेदार भद्रच्या वाड्याबाहेर पडला; मैदान बाजाराच्या तिन्ही कमानीखालून त्याने फेरफटका केला. शेखाच्या बढाया आणि त्याची मूर्खासारखी बडबड ज्या सामान्य माणसांना शहाणपणाची वाटली होती, ती माणसे फौजा येत आहेत असे दिसताच रस्त्याच्या दुतर्फा दुकानांच्या छपरावर जाऊन बसली; फौजावर विटा आणि कौले यांचा मारा करू लागली. त्यातील अगदी निवडक असामींना अल्लाहयारने पकडून कैद केले. तेव्हा उरलेल्या सर्वांना शेखाच्या आश्चर्यकारक शक्तीचे पूर्ण विस्मरण झाले आणि स्वर्गातून अवतरणाऱ्या फौजांची वाट पहात न बसता त्यांनी पोबारा केला.

अल्लाहयारने मशिदीच्या प्रवेशद्वाराचा ताबा मिळविला. मशिदीत शिरल्यावर शेख आणि काही थोडी माणसे मिहराबवर[३५] बसली आहेत असे त्याला दिसून आले. शेखाला तावडतोब पकडले. त्याच्या काही साथीदारांना ठार केले. तेव्हा उरलेल्यांनी दयेची याचना केली. शेखाने नाक खुपसण्याचा एकमेव परिणाम म्हणजे बोहरा मंडळींना मूळ मागणीच्या दुप्पट रक्कम भरावी लागली. हा प्रकार १४ मोहरम ११४३ हि. ( २९ जुलै १७३० ) रोजी घडला.

३५ मिहराब म्हणजे प्रार्थना सांगणाऱ्या नेत्यासाठी असलेला ओटा. (प्रा. ग. ह. खरे यांच्या मते ही टीप चुकीची आहे; मिहराब याऐवजी मिंबर पाहिजे. मिहराब म्हणजे कमान; तिजकडे तोंड करून प्रार्थना करतात; मिंबरवर काझी उभा राहतो व खुत्बा पढतो.–भाषांतरकार ).

## ६२ : आपला उत्तराधिकारी महाराजा अभयसिंग याशी प्रतिकार करण्यासाठी सरबुलंदखान सज्ज होतो

सफर महिन्याच्या अखेरीच्या ( १२ सप्टेंबर १७३० ) दिवसांच्या सुमारास विरमगावचा फौजदार सलाबत मुहम्मदखान बाबी याला स्वस्थानी कूच करण्याची अनुमती मिळाली. उदेकरण नावाचा मुखिया अथवा देसाई या माणसाकडे कारभाराची जबाबदारी बाबीच्या वतीने होती. तो मारला गेला होता. शहरातील एक रहिवाशी दौलत मुहम्मद तंक याचा भाऊ असलेल्या अली नावाच्या कोणा एका माणसाने रात्री त्याच्यावर हल्ला केला व त्याला भोसकून ठार मारले. पण भांडणाचे कारण समजले नाही. सलाबत मुहम्मदखान याने पालेरी गावापर्यंत आपली पहिली मजल मारली. हे गाव साबरमती नदीच्या पैलतीरावर म्हणजे पश्चिम तीरावर आहे. आपल्या असामींची जमवाजमव करता यावी म्हणून तो तेथे थांबला. दोन दिवसांनी त्याला पटकी झाली व तो मृत्युपंथाला लागला.

योगायोग असा की अगदी नेमक्या त्याच दिवशी सरबुलंदखानाने विरमगावाला कूच करण्याचे जाहीर केले. त्यामागील त्याचा खरा हेतू सलाबत मुहम्मदखान याशी सल्लामसलत करण्याचा होता. नवा सुभेदार महाराजा अभयसिंग झालोरपर्यंत कूच करीत आला असल्याची बातमी लागली होती. या नव्या सुभेदाराशी कसा प्रतिकार करावा या विषयावर सरबुलंदखानाला सलाबत मुहम्मदखानाशी खलबत करावयाचे होते. कसलेही कारण नसताना सरबुलंदखान एकाएकी निघाला, भद्रच्या रस्त्यावर उघडणाऱ्या दिंडीतून तो बाहेर पडला. त्याच्या सोबत अगदी मोजकी मंडळी होती. तीसुद्धा त्या समयी जी हजर होती त्यातूनच घेतलेली होती. सलाबत मुहम्मदखान मृत्युपंथाला लागला आहे हे पाहून सुभेदार आपले तंबू आणि असामी यांची वाट पाहात तेथे थांबला. त्याने आपला तळ घुमटाशेजारी ठोकला. संध्याकाळी सलाबत मुहम्मदखानाचा देह शहरात हलविण्यात आला. तो बेशुद्ध होता पण शुद्धीवर येईल अशी आशा होती. त्यावर औषधोपचार केले; पण आता अर्थ उरला नव्हता. शेवटी रात्री तो मरण पावला.

आपल्या पहिल्या मजलेवरील या तळावर सरबुलंदखान बरेच दिवस राहिला. या वास्तव्यात त्याने माणसांची जमवाजमव केली, दाणादारूचा साठा केला. महाराजा अभयसिंग हा पालनपूर या अहमदाबादच्या उत्तरेस ८२ मैलांवर असलेल्या ठिकाणावर येऊन पोहोचला आहे असे त्याला कळले. तेव्हा काली[३६] नावाच्या गावी आपला तळ त्याने हलविला. हे गाव साबरमतीच्या पश्चिम तीरावर विरमगावच्या उत्तरेला आहे. या ठिकाणी सरबुलंदखानाने उत्तरेकडून येणारा रस्ता अडविण्याची तयारी केली. त्याची सगळी फौज ४ हजार घोडेस्वार आणि जवळजवळ तेवढेच बक्सारी आणि अरब बंदुकची यांनी बनलेली होती. यापैकी ५०० स्वार आणि १००० पायदळ यांना शहराच्या रक्षणासाठी पिटाळले. या फौजेचे नेतृत्व मुहम्मद अमीन बेग आणि शेख अल्लाहयार यांच्याकडे दिले. यांनी सुभेदाराचा धाकटा मुलगा

३६ अहमदाबादच्या ईशान्येस २५ मैलांवर कडी तर उत्तरेला १६ मैलांवर कालोल ही गावे आहेत. या दोन्ही गावांची नावे अभिप्रेत नसावीत. कारण बॉम्बे गॅझेटिअर ( खंड १, भाग १, ३११ ) मध्ये म्हटले आहे की सरबुलंदखानाचा तळ अहमदाबाद आणि अहमदाबादेच्या उत्तरेस ९ मैलांवर असलेल्या अदलज या गावाच्या दरम्यान होता. शहराच्या ईशान्येस ८ मैलांवर कारही नावाचे ठिकाण आहे. पण ते नदीच्या पूर्वकिनाऱ्यावर आहे. ( इंडियन ॲटलास, २२ ईशान्य ). ( जदुनाथ सरकार ).

शाहनवाजखान याला आपल्या बरोबर घेतले. तळाच्या भोवती ७०० लहानमोठ्या तोफांची मांडणी केली. या सर्व तोफा एकमेकीस साखळीने बांधून टाकल्या. याखेरीज एक हजार तोफा बुरुजावर आणि तटावर बसविल्या. कोठारावर दोन हजार मण शिसे आणि बंदुकीची दारु होती. अशाप्रकारे सज्ज झालेला सरबुलंदखान महाराजाच्या येण्याची वाट पाहू लागला.

प्रतिकाराची अशी तयारी करण्यामागील हेतू काय अशी पृच्छा सरबुलंदखानाच्या आतल्या गोटातील काही माणसांनी केली. सरबुलंदखानाने आपला राजीनामा वारंवार पाठविला नव्हता का? मग त्याची सुटका करण्यासाठी आलेल्या उत्तराधिकाऱ्याला कामाचा ताबा देण्यास नकार का द्यावयाचा? सरबुलंदखान उत्तरला, "राजीनामा देण्याची तयारी मी दाखविली होती ती अंतःकरणापासूनचीच होती. पण पगाराच्या फार मोठ्या बाक्या थकल्या आहेत आणि त्या भागविणे मला आता शक्य नाही. नव्याने नेमणूक झालेली व्यक्ती स्वामीनिष्ठ नाही. त्याच्या शिपायांच्या बाबतीतही असेच म्हणता येईल. जर या लढतीत मी ठार झालो तर थकबाकीच्या कर्जातून माझी सुटका तर होईलच; पण त्याचबरोबर मला धर्मनिष्ठा दाखविणारा हुतात्मा म्हणून देखील लौकिक मिळेल".

## ६३ : महाराजा अभयसिंग राठोडला दिल्लीहून गुजरातेस पाठवितात

या वेळपर्यंत दिल्ली दरबाराची सरबुलंदखानावरील कृपा घटत घटत संपुष्टात आली होती. निजामुल्मुल्कावरील कडता सरबुलंदखानाकरवी काढता येईल ही मुहम्मदशाहाला वाटणारी आशा आता मावळली होती. दरम्यान सुभेदाराच्या वर्तणुकीविषयी तक्रारीच तक्रारी येत राहिल्या. बेकायदेशीर दंड वसूल करणे, जहागिरी बळकावणे आणि इतर असल्याच त्याच्या आक्रमक कृत्याबाबत तक्रारी येत राहिल्या. यापेक्षा मोठा घाला म्हणजे खान दौरान आणि सरबुलंदखान यांत दुरावा निर्माण झाला होता. या दुराव्याची कारणे समजत नव्हती. शाही मामल्यात खान दौरानकडे अव्वल दर्जाची सत्ता त्यावेळी होती. सरबुलंदखानाने गुजरातची नेमणूक स्वीकारली तेव्हा त्याला दरमहा ठराविक रक्कम देण्याचे वचन मिळालेले होते. पण खान दौराननं आपले दरबारी वजन वापरून सदरची दरमहाची रक्कम पाठविण्याची सवलत बंद करवून घेतली. तेव्हा दरमहाच्या या भत्त्याला मुकल्यामुळे, सरबुलंदखानाच्या सगळ्या योजना वाऱ्यावर गेल्या. मुळातच तो बेफिकीर आणि उधळा होता. शिवाय सुभ्यातील परिस्थिती नेहमी धामधुमीची राहिली. त्यामुळे मोठ्या फौजा त्याला बाळगाव्या लागल्या. या सर्व कारणामुळे गोळा करता येईल त्या सर्व महसुलापेक्षा जास्त खर्च करणे त्याला भाग पडले. शिवाय जो महसूल गोळा होऊ शकला तो सगळा तलवारीच्या जोरावरच गोळा केला होता. रोकड स्वरुपात मिळणारा दरमहाचा भत्ता बंद झाला तेव्हा तो पुन्हा चालू केला नाही तर मी राजीनामा देईन अशा धमक्या देणे त्याने सुरु केले. आपल्या जागेवर नेमण्यास लायक माणूस मिळणे मुश्कील आहे तेव्हा आपल्या मागण्यांची पूर्तता होईल अशी आशा त्याला वाटत होती. पण खान दौरान याला स्वतःच्या शहाणपणाविषयी आणि मुत्सद्देगिरीविषयी भलताच (भ्रामक) आत्मविश्वास होता. मराठ्यांच्या चढायांना परिणामकारक तोंड देण्यास फक्त आपले हिंदू राजेच तेवढे योग्य आहेत असे त्याचे मत होते. आपले हेतू साध्य करू शकेल असा एकमेव माणूस म्हणजे जोधपूरचा राजा अभयसिंग राठोड असे तो समजत होता. खान दौरानचा विरुद्ध गोट म्हणजे वजीर इतिमादुद्दौलह आणि तुराणी मंडळी यांचा गोट. अभय-सिंगाला गुजरातच्या नेमणुकीवर पाठविले तर या खानदौरानला विरोधी असलेल्या

गोटापासून त्याची तटातूट होणार होती. हा अधिक फायदा अभयसिंगाच्या नेमणुकीपासून मिळणार होता.

अभयसिंगाला नेहमीप्रमाणे मानसन्मान आणि देणग्या मिळाल्याच; पण त्याचबरोबर खर्चासाठी खजिन्यातून १८ लाख रुपये मिळाले. लहानमोठ्या आकाराच्या पन्नास तोफा आणि त्या तोफांना लागणारा सगळा सरंजामदेखील त्याला देऊ केला. नंतर महाराजा दिल्लीहून जोधपूरला आला.

या ठिकाणी त्याने वीस हजार फौजेची जमवाजमव केली. हे सगळे राठोडी घोडेस्वार होते. ते शिक्षण देऊन चांगले तयार केलेलेही होते. ही राठोड मंडळी मारवाडातली किंवा नागोरची होती. अभयसिंगाला त्याचा भाऊ राजा बख्तसिंग जोधपूरला येऊन मिळाला. दोघे आपल्या संयुक्त सैन्यबळानिशी अहमदाबादच्या रोखाने निघाले. ते पालनपूरच्या नजीक आले तेव्हा करीमदादखान हा फौजदार त्यांना येऊन मिळाला.

सरबुलंदखान आपल्या प्रवेशास विरोध करणार आहे असे अभयसिंगाला समजले. तेव्हा अभयसिंगाने सरदार मुहम्मदखान घोरनी याकडे वीस हजार रुपयांची हुंडी आणि नायब सुभेदाराचे नेमणूकपत्र धाडले. शक्य असेल तर शहरात बस्तान बसवा अशी सूचनाही त्याला गेली. सरदार मुहम्मदखानाने बऱ्याच गुजराती लोकांची भरती केली. तो संधीची वाट पाहत राहिला. दरम्यान शाहनवाजखान मुहम्मद अमीनबेग आणि शेख अल्लाहयार यांनी कमानी, दरवाजे विटांनी बंद केले. सगळ्या बुरुजांवर पहारा बसविला. वेढा पडल्यास तोंड देता यावे म्हणून दाणादारूची साठवण केली. रात्रंदिवस जागता पहारा ठेवला. त्यामुळे सरदार मुहम्मदखान याला कसलीही हालचाल करण्यास वाव उरला नाही.

महाराजा सिद्धपूर या अहमदाबादच्या उत्तरेस ६४ मैलांवर असलेल्या गावाजवळ येऊन ठेपला तेव्हा मरहूम सलाबत मुहम्मदखान याचे जवानमर्दखान बाबी आणि सफदरखान बाबी हे दोन पुतणे राधनपूर या आपल्या जहागिरीच्या गावाहून आले. सरबुलंदखानाने आपले कोणकोणते लाभ करवून दिले याचा त्यांना विसर पडला. स्वतःचे हित जपण्यासाठी ते नव्या सुभेदारापुढे हजर झाले. आपली निष्ठा त्यांनी अभयसिंगास वाहिली. कित्येक धंदेवाईक शिपाई आणि कस्बाती म्हणून प्रसिद्ध असलेले शिपाई चाकरीच्या आशेने महाराजाच्या निशाणाभोवती गोळा झाले. त्याचप्रमाणे दिवाण अब्दुलघनीखान या आपल्या चुलत्यास न कळविता, मरहूम मुन्अिमखानाचा मुलगा मुहम्मद बाकिर हा तीन-चार सोबत्यांना घेऊन गुपचूप निघाला आणि राजाच्या तळावर आला. तेथे तो आपला भाऊ मुन्अिमखान (दुसरा) यास येऊन मिळाला.

## ६४ : अहमदाबादेवर कब्जा मिळविण्यासाठी अभयसिंग आणि सरबुलंदखान यांची लढाई

हि. ११४३ च्या रबिलाखरच्या सुरुवातीला (म्हणजे १७३० च्या ऑक्टोबरच्या मध्यास) महाराजा साबरमती नदीवरील मोजीर गावी आला. हे ठिकाण सरबुलंदखानाच्या छावणी-पासून जेमतेम कोसभर अंतरावर होते. येथे त्याने चर वगैरे खणले आणि रात्रीचा मुक्काम केला. सरबुलंदखानाने आपला तोफखाना नदीपलीकडे मुहम्मद अमीनच्या राईमध्ये हलविला. ही राई राजाच्या तळासमोर होती आणि राईतून राजाच्या तळावर भडिमार करता येणे

शक्य होते. त्याप्रमाणे गोलंदाजांनी तोफांचा भडिमार सुरू केला. कित्येक तोफगोळे छावणीवर येऊन आदळले. रात्र पडली तेव्हा दोन्ही फौजांनी एकमेकांवर आपली टेहळणी पथके पाठविली. दोन्ही बाजूंचे सेनापती दुसऱ्याच दिवशी द्यावयाच्या लढाईच्या तयारीबाबत आपापल्या सल्लागारांशी मसलत करीत राहिले. पहाटेच्यावेळी सरबुलंदखानाने आपली फौज बाहेर काढली. हल्ला होण्याची तो वाट पाहू लागला. पण तशाच स्थितीत लढा देण्यास महाराजाचा नकार दिसला. गुजराती मंडळींच्या सल्ल्यावरून तो मागे फिरला. प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने चार-पाच मैलांची चाल त्याने केली. रात्र पडण्याच्या सुमारास शहराच्या पश्चिम भागी तो येऊन ठेपला. सरबुलंदखानाचा अगदी पहिला तळ या ठिकाणी मोठ्या घुमटाजवळ पडला होता. महाराजानेही आपला तळ तेथेच टाकला.

उंचवट्याची जमीन होती तेथील नदीकाठच्या गावातील घरे राठोडांनी ताब्यात घेतली. त्यांच्या भिंती आपल्या तोफांचे आधार करून त्यांनी गावाकडे येण्याचे व तरीचे रस्ते तोफांच्या जोरावर रोखून टाकले. रस्ता रोखण्याचे हे ठिकाण अहमदाबादच्या गढीच्या अगदी समोर येते. नदीचा प्रवाह भिंतीवरून डागलेला गोळा पडेल इतक्याच अंतरावरून किल्ल्याच्या बाजूने वहातो. मोर्चेबंदी केलेले हे गाव मारवाडी पायदळाच्या जबाबदारीवर टाकले. शिवाय जवानमर्दखान आणि सफदरखान बाबी हे देखील या कामावर होतेच. त्यांनी हा मोर्चा बांधला तेव्हा भद्रच्या किल्ल्यातून त्यावर चार-दोन बार टाकले. पण याखेरीज त्यांवर दुसरी कसलीही चढाई झाली नाही. महाराजाने आपल्या सैन्याची आणखी एक फळी नदीपलीकडे शहराच्या दक्षिणेस शाह भिकन याच्या कबरीजवळ आणि बहरामपूर आणि बडा नैनपूर (पैकी बडा नैनपूर येथे फौजदाराचे निवासस्थान होते) येथे पाठविली. येथे तोफांसाठी मोर्चे बांधता यावेत व अशाप्रकारे राजधानीच्या शहराला वेढा टाकता यावा असा फौजांची ही फळी पाठविण्यामागचा हेतू होता.

आपल्या शत्रुपक्षाच्या नक्की ठावठिकाण्याविषयी निश्चित माहिती सरबुलंदखानाला पहिल्यानेच मिळाली तेव्हा सूर्य मावळण्याची वेळ झाली होती. म्हणून पुढचा दिवस उजाडेपर्यंत तो आहे त्याच ठिकाणी थांबून राहिला. पण एक दक्षतेची उपाययोजना म्हणून त्याने भिंतीवरच्या तोफा आणि जझैल (जेजाला) देऊन काही माणसे तळाजवळील कालीच्या गढीत तर तशाचप्रकारे सज्ज केलेले आणखी काही लोक शाही बागेजवळच्या मलिक मक्सूद गुजराती मशिदीच्या छपरावर ठेवले. पहाटेच्या वेळी त्याने आपली जागा सोडली आणि आपले तंबू शाही बागेसमोरच्या दर्गा-इ-खान गुजराती याच्या कबरीसमोरच्या मैदानात ठोकले. आपल्या जवळचा जादा तोफखाना, तोफगोळे आणि दारू सोबत देऊन तसेच थोडासा बाडबिस्तारा, घोडेस्वार आणि पायदळ असलेला फौजेचा काही भाग त्याने शहरात पाठविला. अशाप्रकारे फौजांनी जागा धरलेल्या स्थितीत तो दिवस संपत आला. दरम्यान सबंध दिवसभर किल्ल्यातून आणि तटबंदीवरून तोफांचा भडिमार चालू राहिला. विरुद्ध पक्षात, महाराजाचे लोक उतरले होते. त्या गावांच्या वेशी विटांच्या भिंती बांधून बुजविण्यात गर्क झाले होते. त्यांनी गावाबाहेर खोल चर खणले. सगळी सज्जता झाल्यावर शहराकडून होणाऱ्या भडिमाराला यांनी उत्तर दिले. त्यांचे ठिकाण शहराच्या मानाने उंचीवर असल्याने यांचे काही तोफगोळे शहरी भागात व विशेषत: गढीमध्ये नेमके जाऊन आदळले. पैकी शहरात पडलेले गोळे नुकत्याच उभ्या केलेल्या मातीच्या बांधावर जाऊन पडले. त्यामुळे त्यापासून कसलीच इजा झाली नाही.

२० ऑक्टोबर रोजी सूर्य उगवल्यावर तासा दोन तासांनी सरबुलंदखान लढाईसाठी तयार झाला. त्याने साबरमतीच्या वाळवंटातील जागा धरली. आपली पिछाडी गढीच्या बाजूला राहील अशा बेताने त्याने रणांगणातील ही जागा धरली. शत्रू खंदकात दडून बसलेला असून त्याला खंदकाबाहेर हुसकणे हे त्याने आपले उद्दिष्ट ठरविले होते. आपल्या तोफ-दळातून दोन-तीन वेळा भडिमार केल्यानंतर, हल्ला करण्याच्या मिषाने तो पुढे सरकला आणि त्याचे लोक नदीच्या दिशेने पुढे घुसले. वाळवंटात घोडे कुचकामी आहेत असे दिसून आल्यावर घोडेस्वार पायउतारा झाले आणि ते रांगत मातीच्या बांधावर चढले. मधले अडथळे दूर सारीत गावाच्या तटबंदीच्या टोकावर ते येऊन पोहोचले. तेथून त्यांनी मोर्चे लढविणाऱ्यांवर तोडयाच्या बंदुकांनिशी हल्ला चढविला. बराच खटाटोप केल्यावर खानापूरचा दरवाजा फोडण्यात त्यांना यश आले. ही जागा नदीच्या काठावर होती. नदीला येणाऱ्या महापुरामुळे तयार झालेल्या अनेक पोकळ जागा व खाचखळगे तेथे होते. जेथे जमीन कठीण होती तेथे गुरांच्या येण्याजाण्याने खळगे पडले होते. असे असूनही प्रत्येक अडचणीशी झगडत सरबुलंदखानाच्या माणसांनी पुढे सरकत दरवाजातून प्रवेश केला. इतर लोक शत्रूची नजर चुकवून रांगत रांगत शहरात घुसले. महाराजाच्या चाकरीत भरती झालेल्या गुजरात्यांनी सगळ्या जागा पक्केपणाने धरून ठेवल्या. हातघाईची लढाई सुरू झाली. ठोसाठोशी आणि भोसकाभोसकी सुरू झाली. ठळक अशी बरीच मंडळी कामास आली; तेव्हा उरलेल्यांनी माघार घेतली व ते पुन्हा महाराजाला येऊन मिळाले.

सरबुलंदखान आपला राखीव फौजफाटा घेऊन आला. आपला तोफखाना परत गढीमध्ये मागे घेण्याची घातक चूक त्याने केली. वस्तुतः तोफदळ नदीच्या पलीकडे घेणे फारच सोपे होते. बादीज या ठिकाणी साबरमतीला असलेला उतार या ठिकाणापासून दूर नव्हता; तो शत्रूने अजून ताब्यातही घेतला नव्हता. तेथून खेडेगावाच्या घरांच्या इमारती डाव्या अंगाला ठेवून ते खुल्या मैदानात उतरू शकले असते; हे खुले मैदान आमने-सामनेच्या लढाईला अगदी योग्य दिसत होते. हा मार्ग सुभेदाराला माहीत होता. इतकेच नव्हे तर या मार्गाचे स्मरण त्याला त्याच्या अनेक मित्रांनी करून दिले. पण सरबुलंदखानाने त्यावर उत्तर दिले ते एवढेच की किल्ल्यातील ज्या घरात माझ्या बायका मी ठेवल्या आहेत त्यावर शत्रूचा भडिमार पोहोचेल याची भीती मला वाटते. फौजांनी गल्ल्यातून आणि बाजारातून जातांना समूहाने जावयास हवे होते. त्या ऐवजी पायदळाचे शिपाई, बक्सारी बंदुकची आणि कारागीर हे घरांची[३७] लुटालूट करण्याच्या मिषाने जिकडेतिकडे पांगले. घरातील रहिवासी पळून गेलेले नव्हते. प्रत्येकाने हाती लागेल ते घेतले आणि पोबारा केला.

सरबुलंदखानाची पाठ या खेडेगावाकडे होती. तो बाहेर पडून मैदानात आला व आपला फौजफाटा त्याने उभा केला. तदनंतर जवळजवळ केवळ घोडेस्वार असलेल्या आपल्या सगळ्या फौजांनिशी महाराजा लढाई देण्यासाठी पुढे झाला. सुरुवातीची तोफांची सरबत्ती झाल्यावर मारवाडी घोडेस्वार आपल्या शत्रूवर त्वेषाने तुटून पडले. पुढे घुसत असताना त्यांनी गोळीबार चालू ठेवला. या खेडेगावावर हल्ला होऊन ती कब्जात घेतल्यावर

३७ या वेळेपर्यंत ( १७३० इ. ) नदीच्या पैलतीरावरील म्हणजे पश्चिम तीरावरील खेडी दाट वस्तीची होती. हमीदखानाच्या काळात (१७२६ इ.) या खेडयांना मराठ्यांची झळ चांगलीच पोहोचली होती. पण या दुसऱ्या लुटालुटीनंतर ही गावे उठल्यात जमा झाली आणि हि. ११७४ ( १७६०–६१ ) मध्ये जेव्हामिरात-इ-अहमदी लिहिले गेले तेव्हा त्या गावांचा मागमूसदेखील राहिला नव्हता. ( मिरात, ११९ अ.)

सरबुलंदखानाच्या बहुतेक सगळ्या बंदुकचींची आणि जझैल ( जेजाला ) धारकांची पांगापांग झाली होती. त्यामुळे तोंडयाच्या बंदुका किंवा जझैल यातून होणाऱ्या वर्षावास उत्तर देण्यासाठी मुसलमानांच्या जवळ आता फक्त धनुष्यबाण तेवढे होते. दोन्ही पक्षातील कित्येक मंडळी ठार वा जखमी झाल्यावर नंतर व्यापक हमल्यांना सुरुवात झाली. भारतीय पद्धतीनुसार, हत्तीवर बसून लढाईत घुसण्याऐवजी महाराजा आणि त्याचा भाऊ त्या दिवशी इतर राजपुतांसारखाच पेहराव करून घोड्यावर स्वार झाले होते. हत्तींचा एक कळप दिसताच सरबुलंदखान बेछूटपणे दौडत तिकडे गेला आणि एखाद्या विजेप्रमाणे त्यावर कोसळला. हल्ल्याच्या आरंभीच तो संरक्षक फळी फोडून आत घुसला. पण हत्तींवर कोणी स्वारच नव्हते. तेथे हत्तींच्या पाठीवर त्याला दोन-तीन बाण आढळले. ते निकामी केल्यावर नवाबाने हत्तींना जाऊ दिले. सरबुलंदखानाने आपली तलवारबाजी पुन्हा चालू केली. सावज कोठे सापडेल हे तो शोधत राहिला.

## ६५ : सरबुलंदची फौज पांगते

मारवाडी लोक एकास एक चिकटून राहिले आणि त्यानी आपल्या शत्रूपुढे एक बेडर आघाडी उभी केली. मुसलमानांनी देखील आपल्या पायाखालची जमीन गमावली नाही. पण थोड्या वेळाने मात्र मुसलमानांचा पक्ष वरचढ होऊ लागला. शेवटी तर मारवाड्यांनी जिद्द सोडली व रणांगण सोडून ते जाऊ लागले. सरबुलंदखानाने वारंवार हल्ले चढविले व त्यांना आपल्या समोरून हुसकले. पण यानंतर मात्र त्या दिवसाच्या नशिबाचा रंग बदलला. मुसलमानांच्या पक्षाचे कित्येक ठळक अमलदार कामास आले. जमाल अलीखान याने आपला भाऊ आबिद अलीखान यास गमावले. आबिद अलीखान आणि जमाल अलीखान हे दोघे एकाच हत्तीवर स्वार झाले होते. भावाचा मृतदेह शहरात पाठवून जमाल अलीखान आपल्या अरबी घोड्यावर बसला आणि रणांगणात परतला. तेथे त्याने सय्यिद काइम आणि तरीनखान अफगाण यांचे मृतदेह सोडवून घेतले. तो आणि त्याचे असामी या मृतदेहांसोबत शहरात गेले. इतरांनीही संधी साधली आणि रणांगणाला राम राम ठोकला. सरबुलंदखानाला वर्चस्व अखेर मिळाले नाही. तो नक्कीच मारला जाईल अशी सर्वसाधारण भावना रणांगणात आढळून आली. सुरुवातीला ही भावना म्हणजे करून घेतलेला एक काल्पनिक समज होता, पण या कानाचे त्या कानास होत होत संध्याकाळच्या सुमारास हे मत शहरात जाऊन पोहोचले. तेव्हा त्याला सरबुलंदखानाच्या मृत्यूची कळा आली होती.

ही खबर ऐकताच शहररक्षणाची जबाबदारी असलेले मुहम्मद अमीन बेग आणि शेख अल्लाहयार यांनी आपल्या लोकांची जमवाजमव केली. क्षणाचाही विलंब न लावता ते खानपूर दरवाजातून बाहेर पडले. साबरमतीच्या वाळवंटात त्यांना खेड्यापाड्यावर हल्ला केल्यावर पांगलेली मंडळी, तसेच ठार झालेल्यांची प्रेते घेऊन येणारी मंडळी वाटेत आडवी भेटली. या पळपुट्यांनी आपल्यावर कसला ठपका येऊ नये यासाठी या दोन सेनापतींना सांगितले की, आता पुढे जाण्यात अर्थ उरलेला नाही, एकंदर प्रकरण बहुधा आवाक्या-बाहेर गेल्याच्या स्थितीत आहे आणि आताची गरज जर कोणती असेल तर ती म्हणजे शहराचे रक्षण करणे आणि नेत्याच्या कुटुंबाचे रक्षण करणे ही होय. या मनधरणीला बिलकुल न जुमानता अमीन बेग आणि अल्लाहयार आपल्या रस्त्याने तडक पुढे झाले.

दरम्यान सुरुवातीच्या लढाईत कामगिरीवर पाठविलेल्या मारवाडी लोकांना समजून आले की, सरबुलंदखानाच्या पलटणीत आता जेमतेम ४०० लोक आहेत. आपले किती थोडे लोक उरले आहेत याची कसलीही तमा न बाळगता तो मात्र रणांगणात पाय रोवून होता. मारवाड्यांना या परिस्थितीमुळे नवे स्फुरण चढले. त्यांनी आपले लगाम खेचले, आणखी एकदा नशीब अजमावण्याचे त्यांनी ठरविले. त्वेषपूर्ण लढाईला पुन्हा एकदा तोंड लागले. सरबुलंदखान मात्र थोडासुद्धा न डगमगता रणांगणात उभा ठाकलेलाच होता. आपल्या धनुष्यातून सोडलेल्या बाणांनी त्याने अनेक मारवाडी शिपायांना यमसदनाला पाठविले. थोड्याच वेळात दूरवर एक हत्ती दिसला. त्या हत्तीवर निशाण घेतलेला माणूस होता. ते निशाण सरबुलंदखानाचे होते, तो नक्कीच कुमक घेऊन येणारा अल्लाहयार असला पाहिजे ! अमीन बेगखान आणि अल्लाहयार दौडत आले. तेव्हा पुन्हा एकदा ढोल वाजू लागले व आणखी त्वेषपूर्ण लढाईला सुरुवात झाली. मारवाड्यांनी चढविलेल्या एका हल्ल्यात शेख अल्लाहयार ठार झाला. तरी पण सरबुलंदखान खचला नाही. शत्रूला तोंड देणे त्याने चालू ठेवले; आणखी एकदा त्यांना पळवून लावले. त्याने पाठलाग करीत त्यांना सारखेज या ५ मैलांवरील गावापर्यंत पिटाळले. धुमश्चक्री सबंध दिवसभर चालू राहिली. रात्र पडल्यानंतरच दोन्ही पक्षांनी लढाई थांबविली. सूर्य मावळेपर्यंत सरबुलंदखान रणांगणावर ठासून उभा होता. त्याचे ढोल विजय झाल्याचे दर्शवीत होते. सरबुलंदखान रणांगणात जेथे होता त्या ठिकाणी तंबू मागवून घेऊन ते त्याने मुक्कामासाठी ठोकले.

या दिवशी राजपुतांच्या छावणीवर खबर आली की महाराजा रणांगण सोडून पळाला. सबंध छावणीवर घबराटीचे थैमान पसरले. घाईघाईने बैलगाड्या भरणे आणि जुंपणे, भराभरा तंबू उखडणे आणि निशाणे उतरविणे या सर्व गोष्टी झाल्या. 'मारवाड फार दूर आहे' असा आरडाओरडाही झाला. गुजराती आणि कस्बाती हे स्थानिक शिपाई जवळपासच्या खेड्यात गेले. काहींनी तर यत्किंचितही न थांबता दुराहापर्यंत मजल गाठली. कित्येक जण शहराच्या आसपासच्या वस्त्यांमधील घरात लपून राहिले, संध्याकाळच्या प्रार्थनेच्या वेळी महाराजा रणांगणावरून परतला. त्यामुळे भेदरटांच्या जिवात जीव आला. पळपुटे-जे अजून फार लांब गेले नव्हते ते-परत आले आणि राजपूत सेनापतीला पुन्हा येऊन मिळाले.

रात्र रणांगणात घालवावयाची असा हुकूम सरबुलंदखानाने काढला तेव्हा मुहम्मद अमीन बेग त्याला म्हणाला, " आपली इच्छा पुरी झाली नाही का ? आपण तर सुभेदार पदाचा सारखा राजीनामा देऊ करीत होता. आता या वेळी जखमींची देखभाल व्हायला हवी आणि मृतांच्या नातेवाईकांचे सांत्वन व्हावयास हवे. तुम्ही आता शहरास परतणेच आवश्यक आहे. " ही रदबदली मान्य होऊन शहराकडे कूच करण्याचा हुकूम सुटला. रात्र पडल्यावर तासा-दीडतासाने ते गढीच्या खालच्या अंगास असलेल्या शहराच्या तटबंदीपाशी येऊन पोहोचले. तेथे त्यांनी साबरमतीच्या तीरावर तळ टाकला. शहराच्या आतल्या भागात मात्र कसलीही इजा न होता सरबुलंदखान परतला आहे यावर मुख्य मुख्य गुजराती लोकांचा विश्वास बसला नाही. सरदार मुहम्मदखान याला नव्या सुभेदाराच्या नायब पदाची सनद आलेली होती. त्याचा तर सरबुलंदखानाच्या सुखरूप परतण्यावर मुळीच

विश्वास बसला नाही. सरदार मुहम्मदखानाने त्यास आलेली हुंडी वटवून त्या पैशातून माणसांची भरती केली होती. तो आपल्या घरात थांबून संधी केव्हा येते याची टेहळणी करीत होता. सरबुलंदखान पडला अशी खबर आली की शहराचे दरवाजे ताब्यात घ्यावयाचे व ते उघडावयाचे असा मनसुबा पक्का केला होता. पण खबरीची खात्री करून घेण्यासाठी त्याने आपल्या एका माणसास आपल्या शेजारीच राहणाऱ्या अली मुहम्मदखानाकडे, काही खबर आहे का हे पाहाण्यास पाठविले. खरी गोष्ट काय आहे ते त्याला ऐकविण्यात आले. मनात योजलेल्या कामापासून परावृत्त होण्यास त्याला सांगण्यात आले. पण त्याचे समाधान झाले नाही. तो अस्वस्थ झाला. मध्यरात्रीच्या सुमारास तपास करण्याकरिता त्याने पुन्हा एकदा माणूस पाठविला. त्याची खात्री पटविण्यासाठी त्याच्या माणसास गढीत जाऊ दिले, तटबंदीवर चढून, खाली वाकून सरबुलंदखानाच्या छावणीवर डोकावून पाहू दिले. तो आपल्या तंबूत बसून आपल्या एका साथीदाराला दिवसभरातील घडामोडींची हकीकत सांगत असल्याचे वर ऐकू देखील आले. ही गोष्ट या माणसाने सरदार मुहम्मदखानाला सांगितली; तेव्हा त्याने आपला इच्छित हेतू मनातून काढून टाकला.

## ६६ : सरबुलंदखान आणि अभयसिंग यांमधील वाटाघाटी

दुसऱ्या दिवशी महाराजाला समजले की शत्रू अजून सुखरूप आहे. तेव्हा तो पुन्हा रणांगणात उतरला. सरबुलंदखान सावधच होता. पण त्याच्या हेरांनी बातमी आणली की, महाराजाची आज लढण्याची योजना नाही. त्यामुळे हा जो अवधी मिळाला तो दोन्ही पक्षातील लोकांनी जखमींची हलवाहलव करण्यात आणि मृतांचे दफन करण्यात घालविला. या दिवशीच अभयसिंगाने आपल्या पूर्वाधिकाऱ्याकडे सलोख्याचा प्रस्ताव पाठविण्याचे निश्चित केले. सरबुलंदखानाकडे पाठविण्यासाठी त्याने मुक्रर केलेल्यापैकी एकजण मुखलिसखान नावाचा महमूदाबादचा जहागिरदार होता तर दुसरा मूमीनखान नावाचा त्याच्या फौजेतील अखबारनवीस आणि खंबायतचा फौजदार होता. निरोपाची एक चिठ्ठी धाडण्यात आली. त्यास अनुकूल उत्तर आल्यावर त्या दिवसाच्या अखेरीस मुखलिसखान सरबुलंदखानाकडे गेला. नेहमीचे आगतस्वागत वगैरे झाल्यावर त्याने आपले काम काय आहे ते सांगितले. रात्रीच्या वेळी तो तेथून परतला.

दुसऱ्या दिवशी वाटाघाटींना सुरुवात मूमीनखान आणि अमरसिंग उदावत यांनी केली. वय फार असल्याने आणि देह लठ्ठ असल्यामुळे मुखलिसखान याला वाटाघाटीच्या जबाबदारीतून मोकळे केले. सरबुलंदखानास खर्चापोटी एक लाख रुपयांची रोकड मिळावी; हलवाहलवीसाठी उंट आणि बैलगाड्या उपलब्ध कराव्यात आणि भेटी-प्रतिभेटी व्हाव्या या सलोख्याच्या अटी ठरल्या. पहिली भेट महाराजाने द्यावयाची होती. त्यासाठी प्रत्येक पक्षाने आपल्या तळापासून थोड्या अंतरावर एक तंबू उभा करावयाचा होता. त्यानुसार नवाबाने गाझीउद्दीन हुसैन याच्या राईजवळ एक तंबू उभा केला; तर महाराजाने शाह भिकनच्या कबरीसमोरील आपल्या तळासमोर जाजम अंथरले. अशा प्रकरणी नेहमी जे घडते त्यानुसार पहिली भेट देण्याचे टाळण्यासाठी महाराजाने सर्व प्रकारच्या सबबी सांगितल्या. महाराजाच्या आगमनाची वाट पाहण्यातच सगळा दिवस संपला. दुसऱ्या दिवशी तीन प्रहरी सरबुलंदखान आपल्या घोड्यावर स्वार झाला आणि छोटासा लवाजमा घेऊन तो महाराजाच्या तंबूपाशी आला. तेव्हा सगळी मारवाडी फौज ओळीने उभी आहे, त्यांनी

नखशिखान्त चिलखते परिधान केली आहेत असे त्याला आढळले. केवळ मुसलमानांना पाहण्याच्या इच्छेखातर ते तसे उभे असावेत किंवा काही दगाफटका झालाच तर सावधगिरी असावी म्हणूनही ते उभे असावेत अशी कल्पना झाली. सरबुलंदखानाने तंबू भोवतालच्या आडोशात प्रवेश केला तेव्हा महाराजा कनातीपर्यंत सामोरा आला. दोन्ही उमरावांनी एकमेकांना आलिंगन दिले. नंतर भावाप्रमाणे एकमेकांच्या शेजारी बसले. वेळ अगदीच थोडा असल्याने बंधुभावाचे प्रतीक म्हणून त्यांनी आपल्या फेटयांची अदलाबदल केली व एकमेकांचा निरोप घेतला. सरबुलंदखान आपल्या तळावर परतला. त्याचा तळ आता मुहम्मद अमीनखानाच्या गईपाशी पडला होता. त्याची चीजवस्तू आणि स्त्रिया तेथे आल्या होत्या. बख्तसिंगाला बाण लागला होता म्हणून तो या मुलाखतीच्या वेळी हजर नव्हता आणि अभयसिंगानेदेखील मुलाखतीच्या वेळी आपल्या कोटाच्या आत चिलखती सदरा घातला होता असे म्हणतात.

## ६७ : अभयसिंग अहमदाबादेत प्रवेश करतो; सरबुलंद गुजरात सोडतो

सरबुलंदखानाच्या प्रयाणाची तजवीज करण्यासाठी जगदेव याला २६ ऑक्टोबर १७३० रोजी मुक्रर केले. दुसऱ्याच दिवशी म्हणजे २७ तारखेला महाराजांचा नायब रतनसिंग भंडारी याने भद्र किल्ल्यात प्रवेश केला. नव्या कोतवालाची नेमणूक झाली. सरबुलंदखानासाठी लागणाऱ्या गाडया जमा होईपर्यंत आणि कबूल केलेली रोकड देईपर्यंत सरबुलंदखानाला थांबून राहावे लागले. रोकड रक्कम देण्याची जबाबदारी अमरसिंग उदावत याने उचलली होती. लहानमोठया १७३ तोफा सुभ्याचा दिवाण अब्दुल्घनी याच्याकडे शाही खात्यावर जमा करून त्याची त्याने पावती घेतली. कबूल केलेल्या १ लाख रुपयांपैकी अजून २० हजार रुपये देणे बाकी होते. ही बाकी पाठवून[३८] देण्याचे काम अमरसिंग याने पत्करले. तेव्हा सरबुलंदखानाने प्रवासास निघण्याचे ठरविले. मुरासा येथे तो पोहोचला तेव्हा जावई सय्यिद नवाझिशखान मरण पावला. तो आजारीच होता. या मृत्यूमुळे एक दिवसाचा मुक्काम घडला. पण येथून पुढे मात्र रोजचा प्रवास सुरू झाला. शेवटी उदेपुराहून गुजरून सरबुलंदखान आग्र्याच्या वाटेस लागला.

इकडे महाराजाने आता आपला तळ शाही बागेनजीक हलविला. शहरात प्रवेश करण्याच्या मुहूर्ताची वाट पाहात तो थांबला. येथे अब्दुल् घनीखान हा सुभ्याचा दिवाण आणि अब्दुल मुफाखिरखान अखबारनवीस त्याला येऊन भेटले. ७ नोव्हेंबर १७३० हा शुभ दिवस असल्याने महाराजा आणि त्याचा बंधू यानी शहरप्रवेश केला. प्रवेशाच्या वेळी त्याने बरोबर सैन्य घेतले नव्हते. तो थोडावेळ भद्र किल्ल्यात थांबला आणि नंतर तळावर परतला. काही दिवसांनी त्याने शहरात कायमचे वास्तव्य ठेवले आणि सुभ्याचा महसूलविषयक तसाच इतर सामान्य कारभार पहाण्यास त्याने सुरूवात केली.[३९]

इकडे सरबुलंदखान उदेपुराहून आग्र्यास परतण्याच्या मार्गावर होता. वाटेत त्याला फार काळ थांबून रहावे लागले; कारण त्याच्या बंडाळी करणाऱ्या फौजफाटयाच्या मागण्या

३८ ही रक्कम पुढे कधीच भागविण्यात आली नाही.

३९ गुजरातमधील घडामोडींचा येथपर्यंतचा हा इतिहास जवळजवळ पूर्णपणे मिरात-इ-अहमदी या ग्रंथातील माहितीवर आधारलेला आहे.

पुऱ्या करणे त्याला अगदी अशक्य झाले. शेवटी शेवटी तर पैशाच्या मागणीचा तगादा एवढा जबर झाला की आपली चीजवस्तू गहाण टाकून सावकारांकडून कर्ज काढणे त्याला भाग पडले. बादशाहाची तुम्हावर कृपा होईपर्यंत तुम्ही जाट मुलुखात वास्तव्य करणार असाल तर एक लाख रुपयांची नजर देतो असा प्रस्ताव बदनसिंग जाट याने आपल्या खिज्रखान आणि नूरअलीखान या मुसलमान अमलदाराकरवी सरबुलंदखानकडे पाठविला या मंडळींना एक आठवडाभर तटकळत ठेवल्यावर सरबुलंदखानाने त्यांची भेट घेतली. त्यावेळी पाय दुखत असल्याने सरबुलंदखान निजून होता. बदनसिंगाचा निरोप ऐकल्यावर सरबुलंदखान हसला आणि म्हणाला की आपण सत्कारपूर्वकच्या पुढे केलेल्या प्रस्तावाबाबत मला फार कृतज्ञता वाटते; पण मी अजून इतक्या विपन्न दशेला पोहोचलो नाही की मजवर बरोबरीच्या लोकांकडे हात पसरण्याची पाळी यावी; मी जेथे आहे तेथे सुखात आहे आणि मला कसलाही त्रास नाही; पण मला असल्या मदतीची गरज पडेल तेव्हा मी सूचना करीन. आता सरबुलंदखानाने एक घोडा आणि रत्नजडित तलवार बदनसिंगाला भेट म्हणून पाठविली. त्यासोबत दिलेल्या पत्रात त्याने बदनसिंगाला ठाकूर असे संबोधिले. बदनसिंगाने ते पत्र ५ हजार रुपये सोबत देऊन परत पाठविले व आपणास राजा असे संबोधण्याबद्दल त्याची विनवणी केली. सय्यिद हुसैन अलीखानाने चूडामण जाटाला राजा हा किताब देण्याचे आश्वासन सय्यिद आग्ऱ्याहून दख्खनला निघाला त्यावेळी दिले होते. पण सय्यिदांचा वध झाल्यामुळे या आश्वासनाची पूर्तता होऊ शकली नव्हती, शिवाय थूनचा किल्ला ताब्यात घेताना राजा जयसिंगाने सदरचा राजा किताब मिळवून देण्याबाबत आश्वासन दिले होते. अजितसिंग आणि अभयसिंग हे दोघे बदनसिंगाशी पत्रव्यवहार करताना त्याचा राजा असाच उल्लेख करीत. पण सरबुलंदखानाने या सगळ्या युक्तिवादाला उत्तर दिले की, किताब बहाल करण्याचा अधिकार मला नाही; तो फक्त बादशाहाचा खास अधिकार आहे; पण जर कधी बादशाहाची कृपा पुन्हा संपादणे मला जमले तर बदनसिंगाचा याबाबतचा दावा मी आग्रहाने उचलून धरीन. नंतर सदरचे पत्र आणि पैसे परत पाठविण्यात आले. [मा. उ. : खंड तीन ८०१, खिज्र १२२; हदीकत ३८१ ].

## ६८ : सरबुलंदखानाचे अखेरचे दिवस

गुजरातमधून उचलबांगडी झाल्यावर सरबुलंदखानाची साम्राज्यसेवा संपुष्टात आल्यासारखीच होती. यास अपवाद म्हणजे त्याची अल्पकाळ टिकलेली अल्लाहाबादेची सुभेदारी आणि १७३९ साली नादिरशाहाने राजधानीवर पट्टी बसविली तेव्हा नादिरशाहाचा वसुली अंमलदार म्हणून त्याचा अल्पकाळ झालेला उदय होय. त्याच्या समकालीन लोकांशी तुलना करता, तो उद्योगी आणि तडफदार अमलदार होता. पण आग्रा, पटणा, काबूल किंवा गुजरात यापैकी कुठल्याच कारभारात, आपला जम पूर्णपणे बसविण्यात त्यास यश आले नाही. पटण्याच्या कारभारावर असताना त्याने धीरचा मुलगा आणि भोजपूरचा जमीनदार संदिष्ट नारायण याचे पारिपत्य केले. काबूलच्या कारभारावर असताना एक-दोन बाबतीत त्याला यश लाभले. अहमदाबाद-गुजरातच्या कारभारावर असताना, या सुभ्यात कसली ना कसली व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्योगात तो गढलेला दिसतो. पण शहाणपणा आणि दूरदृष्टी याचा यात अभाव होता आणि मुख्य म्हणजे खर्चाच्या बाबतीत तो भलताच ढिल्या हाताचा आणि निष्काळजी होता. गुजरातमधील ५ वर्षांच्या काळात

त्याने आपण एक क्रियाशील शिपाईगडी आहोत हे दाखवून दिले. त्याच्या उत्तराधिकाऱ्यांमध्ये दिसून आलेला वाढता कमकुवतपणा पाहिल्यावर त्याच्या त्या सुभ्यातील कारभाराचे यश उत्तम प्रकारे अजमावता येते. त्याच्या उत्तराधिकाऱ्यांचा सुभ्यावर बसलेला (पोकळ) जम पहाता सरबुलंदखानाचे बस्तान पक्के आणि परिणामकारक होते असे दिसते. आग्र्यास दीर्घकाळ खोळंबा होऊन अखेर दिल्लीस परतणे शक्य झाले तेव्हा धनकोंना आपणाशी संपर्क साधता येऊ नये म्हणून सरबुलंदखानाला घर बंद करून बसणे भाग पडले. जेव्हा जेव्हा त्यास बादशाहाचे दरबारी येण्याबाबतचे पत्र येई तेव्हा तेव्हा त्या पत्रासोबत बादशाह कित्येक शाही चाकरांना पाठवी. वाटेत त्याच्यावर हल्ला झाला तर त्यास संरक्षण मिळावे असा त्या मागचा हेतू असे. मुबारिजुल्मुल्क सरबुलंदखान बहादुर दिलावरजंग (मूळ नाव मुहम्मद रफीअ) हा १३ जिल्काद ११५४ हि. (१९ जानेवारी १७४२) रोजी वयाच्या ६९ व्या वर्षी (चांद्रवर्ष) मरण पावला. [तारीख-इ-मुहम्मदी.]

१७३० इ. पर्यंत मराठ्यांनी अहमदाबाद-गुजरातमध्ये केलेल्या चढायांची हकीकत सांगून झाल्यावर आपण आता बुंदेलखंड या दुसऱ्या मुलखाकडे वळत आहोत. अल्लाहाबाद सुभ्याचा भाग असलेल्या बुंदेलखंडातही शाही कारभार गुजरातप्रमाणे ढिला पडला होता. आपल्या विरोधकाचा थोडासा जरी कमकुवतपणा दिसला तरी त्याचा फायदा उचलण्याच्या बाबतीत मराठ्यांनी गुजरातेत जी तडफ दाखविली तीच तडफ मराठ्यांनी येथेही कशी दाखविली ते आता आपण पाहू.

प्रकरण नववे

# बुंदेलखंड आणि माळवा, १७२०–१७३६

## ६९ : बुंदेलखंड : देश आणि लोक

हा देश मुघलांना पूर्णपणे वश असा कधीच झाला नाही. बुंदेलखंडावर मराठ्यांनी जे हल्ले चढविले त्यामुळे, मुघल साम्राज्याला गुजरातमधील हल्ल्यामुळे जसे गंभीर नुकसान पोहोचले तसे या हल्ल्यामुळे पोहोचू शकले नाही. मुघलांनी केलेल्या सुभ्यांच्या रचनेनुसार बुंदेलखंड म्हणजे बुंदेले लोकांचा मुलूख. हा जवळजवळ सगळा अल्लाहाबाद सुभ्यात मोडत होता. आग्रा सुभ्यातील काल्पी सरकार एवढाच काय तो त्यास अपवाद होता. बुंदेलखंड यमुनेच्या दक्षिणेस आहे. त्याची पश्चिम सरहद्द म्हणजे आजच्या ग्वाल्हेर मुलखाची सीमा. येथे सिंद[1] नदीमुळे बुंदेलखंड ग्वाल्हेर मुलखापासून अलग झाला आहे. बुंदेलखंडाची पूर्व सीमा बघेलखंड म्हणजे रेवा संस्थान होय. दक्षिण बाजूची सरहद्द जरा अस्पष्टच आहे. पण मुघलांच्या विभागवार प्रदेशरचनेनुसार बुंदेलखंड माळव्यापर्यंत पसरला होता. थॉर्नटन याच्या म्हणण्यानुसार ( १५३ ) हा प्रदेश आग्नेय ते वायव्य असा २०० मैल लांब व १५५ मैल रुंद आहे. १८९१ सालची शिरगणती पाहिली तर हा प्रदेश २०,६४१ चौरस मैल आणि येथील लोकसंख्या ३९०७५८५ भरते. एवढी लोकसंख्यादेखील भारतातील मानाने विरळ वस्तीच दाखविते.

या मुलुखावर राज्य करणाऱ्या राजपूत टोळीच्या नावावरून बुंदेलखंड हे नाव प्राप्त झाले असले तरी हे सदरचे नाव प्राप्त होण्याची बाब तुलनेने अलीकडच्या काळातील आहे. १२ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत या मुलुखाच्या पश्चिम भागात चंदेले नावाचे टोळीवाले वर्चस्व ठेवून होते व त्यांची राजधानी महोबा[2] येथे होती. बुंदेले मंडळींची संख्या कधीच फार मोठी नसावी. सध्या शिरगणती होत असून देखील यांची संख्या ठरविणे सोपे नाही. कारण १८९१ च्या शिरगणतीतील नोंदी दिशाभूल करणाऱ्या आहेत. बांदा या एका जिल्ह्यात त्यांचे संख्याबळ मोठे असलेच पाहिजे. पण शिरगणतीतील नोंदीत त्यांची संख्या वेगळी करून दाखविलेली नाही. तसेच बुंदेलखंड या संस्थानातील शिरगणतीबाबतच्या नोंदीत त्यांचा समावेश राजपूतात केला आहे. या गोष्टींचा विचार करून, बुंदेले लोकांच्या संख्येचा सावध अंदाज करावयाचा झाला तर १८९१ मधील एकूण भरणाऱ्या ४० लाखांच्या लोकसंख्येत व राजपूत लोकांच्या ४ लाख १६ हजाराच्या संख्येत ते एक लाख भरत असावेत. अशाप्रकारे बुंदेले कुळात २० हजार प्रौढ माणसे निघतील. या मानाने १५० वर्षांपूर्वी त्यांची संख्या भलतीच कमी असली पाहिजे. या बुंदेले मंडळीखेरीज मध्य भारतात विशेषतः सागर आणि दमोह या जिल्ह्यांत, काही बुंदेले मंडळी वास्तव्य करून आहेत. बुंदेले

१ सिंद यमुनेची उपनदी आहे. ती माळव्यात सिरोंजजवळ उगम पावते. तिची लांबी २०० मैल असून त्यापैकी १३० मैल लांबी म्हणजे शिंदे सरकारांचा मुलूख आणि बुंदेलखंड यामधील सरहद्द होय.

२ २५° १८′ उत्तर अक्षांश ७९° ५५′ पूर्व रेखांश, बांदा रेल्वे स्टेशनपासून नैर्ऋत्येस ३० मैलांवर ( इंडियन ॲटलास ६९ आग्नेय ).

कुळाच्या उगमाविषयीची माहिती अगदीच अज्ञात आहे. तरीपण ते कोणते ना कोणते राजपूत असल्याचे मानतात. इतिहासात त्याना महत्त्व प्राप्त झाले याचे कारण त्यांना अधिपतींचे किंवा शासकाचे स्थान होते. हे स्थान त्यांनी आपल्या शौर्याच्या बळावर मिळविले होते.

आपले मूळस्थान बनारसच्या आसपासच्या भागात असून आपण गाहडवाल कुळाची एक शाखा आहोत असे बुंदेले सांगतात. उत्तर प्रदेशातील अल्लाहाबाद आणि आग्रा या भागात वास्तव्य करुन असलेल्या सगळ्या गाहडवालांची संख्या ५३,४७७ भरते. त्यापैकी २६,८३२ म्हणजे चांगले निम्मे लोक मिर्झापूर आणि गाझीपूर या जिल्ह्यात रहातात. मिर्झापुरातील गाहडवालांची संख्या २०,२४९ तर गाझीपुरातील संख्या ६,५८३ आहे. मिर्झापूर व गाझीपूर हे जिल्हे बनारसला लागून आहेत. या आधारावरच आपण बनारसजवळच्या मुलुखाचे मूळ रहिवासी आहोत असा ते दावा करीत असण्याची शक्यता संभवते. त्यांची एक मोठी वस्ती मिर्झापूरच्या पश्चिमेस कांतित या परगण्यात आहे आणि दुसरी वस्ती बनारस आणि गाझीपूर यांमध्ये गंगेच्या दक्षिणेला महैच या परगण्यामध्ये आहे. गाहड कुळातील एका काशीराजा ( जो बहुधा पुराणकथेतलाच असावा ) च्या १९ व्या पिढीत कोणी एक रुद्र प्रताप नामक असामी, आज ज्यास बुंदेलेखंड म्हणतात त्याच्या पश्चिम भागात महत्पदास चढला. कोण्या एका सोहनपाल नामक व्यक्तीने १२९२ इ. च्या सुमारास या भागात स्वतंत्र संस्थान प्रस्थापित करण्यात यश मिळविले होते. सदर रूद्र प्रताप हा सोहनपालाच्या वंशातील नवव्या पिढीचा होता. रूद्र प्रताप १५०१ इ. च्या सुमारास पहिल्याने प्रकट झाल्याचे दिसते. आपल्या आयुष्याच्या शेवटच्या वर्षी संवत् १५८८ वैशाख शुद्ध ३ ( २१ एप्रिल १५३१ ) रोजी त्याने वोडसे हे शहर बसविले व कुरार[५] येथून तिकडे आपला कारभार त्याने हलविला. पुढे लौकरच एका गाईला एका वाघाच्या तावडीतून सोडविण्याच्या खटाटोपात असताना त्याला मरण आले. त्याला ९ मुले होती. त्यांच्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष वंशजातून बुंदेलखंडातील सगळे शासक आलेले आहेत. वोडसे, दतिया, पन्ना, बिजावर, चरखारी, अजयगढ ही चार मोठी संस्थाने आणि १९ मोठ्या जहागिरी आजही या बुंदेले वंशजाकडे आहेत. [ मा. उ. : खंड दोन, ३१७; पॉगसन ३-११.]

बुंदेला हे नाव कसे तयार झाले याविषयी बराच वाद आहे. या नावाचा संबंध खुद्द बुंदेले मंडळी विंध्यबासिनीदेवी या आपल्या कुलदेवतेच्या नावाशी जोडतात. या देवीचे मंदिर विंध्याचलावर आहे. सदर विंध्याचल म्हणजे विंध्यपर्वतमालिकेतील एक पर्वतशृंग आहे. त्याचे स्थान मिर्झापूरच्या पश्चिमेस काही मैलांवर गंगेच्या बाजूने पुढे आलेल्या भागात आहे. बुंदेले शब्दाची व्युत्पत्ती सांगण्याचा मुसलमानांचा कयास असा की बुंदेले शब्दातील मूळ शब्द बुंद हा असून तो बंदा या फारसी शब्दाचा अपभ्रंश आहे. बंदा याचा अर्थ गुलाम असा असून एका गुलाम मुलीला झालेल्या प्रजेपासून हे कूळ निर्माण झाले असे त्यांचे म्हणणे आहे. व्युत्पत्तीबाबतच्या दुसऱ्या एका खटाटोपानुसार बुंद या हिंदी शब्दाचा अर्थ द्रवाचा थेंब असा आहे आणि विंध्यबासिनीदेवीला[६] जे रक्ताचे थेंब वहाण्यात आले त्याशी सांगड घालणारी एक हकीकत सांगितली जाते.

५ कुरहरा नावाचे ठिकाण मऊच्या पूर्वेस १२ मैलांवर आणि वोडशा अति आग्नेयीस ४४ मैलांवर आहे. ( इंडियन ॲटलास ६९ नैऋत्य ). दिलकुशाने उल्लेख केला आहे की, किल्ले करारा नामक ठिकाण वीरसिंगदेव याच्या मालकीचे आहे. वोडसे हे बेटवा नदीच्या डाव्या किनाऱ्यावर झाशीच्या दक्षिणेस ८ मैलांवर आहे. दतिया हे झाशीच्या ईशान्येस १६ मैलांवर आहे. ( जदुनाथ सरकार )

६ हकीकत्-उल्-अकालीम, १६७; छत्र प्रकाश, पॉगसन. पृ. ८.

बेटवा नदीवरील ओडसे हे बुंदेले मंडळींनी १५३१ इ. मध्ये स्थापन केलेल्या पहिल्या स्वतंत्र संस्थानांची राजधानी होते. सदर ओडसे शहर या मुलुखाच्या पश्चिम भागात आहे; त्यावरून बुंदेले मंडळी या मुलखात प्रथम पश्चिम बाजूने शिरली असावीत; ईशान्य बाजूने शिरली नसावीत असे वाटते. ती ईशान्य बाजूने शिरली असतील तर त्यांना रेवाबांदा आणि त्या दरम्यानचा मुलुख तुडवावा लागला असेल. सदरच्या मुलखात या टोळीचे झालेले आगमन सामोपचाराने झालेले असण्याची शक्यता कमीच. पण त्यांच्या परंपरांमध्ये त्यांच्या आगमनाचा मागमूस मुळीच आढळत नाही. रुद्र प्रताप याने १५३१ इ. मध्ये ओडसे शहर वसविले तेव्हाच आपणाला त्यांच्याविषयी पहिला पक्का धागादोरा मिळतो. शाहझादा सलीम (जो पुढे बादशाह जहाँगीर झाला) याच्या चिथावणीवरून बीरसिंग देव (रुद्र प्रतापचा नातू) याने अकबराचा मंत्री अबुल फज्ल याचा वध करविला; तेव्हापासून बुंदेले[3] मंडळींच्या दीर्घकाळ चालू राहिलेल्या उत्कर्षाचे नवे युग सुरू झाले.

बुंदेलखंडाचा पूर्वभाग मात्र बुंदेले मंडळींच्या वर्चस्वाखाली येण्यास बराच काळ लागला. या भागाला सामान्यपणे डांगिया राज असे म्हणत आणि येथील शासकांना डांगिया राजे असे संबोधत. या शब्दाचा संबंध हिंदीतील दंगल, गोंधळ या अर्थाच्या शब्दाशी जोडत असले तरी वस्तुतः त्याचा संबंध त्या उच्चाराच्या स्थानिक शब्दाशी असून सदर स्थानिक शब्दाचा अर्थ डोंगराळ-जंगली मुलूख असा आहे. इ. १५३१ मध्ये रुद्र प्रताप मरण पावला. त्याची दुसरी पत्नी राणी मोहरबन हिला तिच्या मुलासमवेत ओडशाहून कटेरा येथे हलविण्यात आले. कटेरा हे ओडशाच्या पूर्वेस २० मैलावरील काटेरी झुडुपांनी व्यापलेल्या डोंगराळ भागात आहे. तिचा थोरला मुलगा उदयजित हा रुद्र प्रतापचा तिसरा मुलगा होता. त्याने महेबा[4] असे नवे नाव ठेवलेल्या गावात आपल्या नव्या घराण्याची स्थापना केली. सदर ठाणे बनविण्यासाठी त्याने पटारी गावातील उरल्यासुरल्या इमारती आणि घरे ताब्यात घेतली. सदर ठिकाण एके काळी जाट टोळीतील राणा रुद्र याचे निवासस्थान होते. या राणा रुद्रचा अल्लाउद्दीन खिलजीने (१२९५–१३१५) पराभव करून त्यास ठार मारले होते. उदयजित आणि त्याचे वंशज महेबा या ठिकाणी, अज्ञात स्थितीत वास्तव्य करून होते. चौथी पिढी होईतोपर्यंत या कुटुंबाविषयी कसलीही माहिती कानावर येत नाही. चौथ्या पिढीत मात्र छत्रसालाचा बाप चंपतराय याचा दबादबा झाल्याचे आढळते.

३ येथे आलेला बुंदेले मंडळींचा इतिहास मूलतः लाल कवि याच्या छत्रप्रकाश (हिंदी संहिता डब्ल्यू. प्राइस यांनी संपादित केलेली व कलकत्ता येथे १८२९ साली छापलेली आवृत्ती उपयोगात आणली आहे.) आणि मासिरूल्उमरा (खंड दोन, ३१७) यातील माहितीवरून घेतलेला असून भीमसेन याच्या दिलकुशा या ग्रंथावरूनही कांही माहिती घेतली आहे. पाँगसन यांच्या हिस्टरी ऑफ दि बुंदेलाज (कलकत्ता १८२८) या पुस्तकात छत्रप्रकाश ग्रंथाचे आलेले भाषांतर ठिकठिकाणी चुकलेले आहे. चुका फक्त विशेष नामापुरत्याच मर्यादित नाहीत तर पद्यपंक्तीचे अर्थ लावण्यातही चुका झाल्या आहेत. इर्विन यांनी मंजूर अहमद याच्या पुस्तकाचा मुक्तपणे वापर केला असून त्यातील माहितीवर ते विसंबून राहिले आहेत. या हकीकतीसाठी दुय्यम स्रोत म्हणून हदीकत-उल-अकालीम आणि पंडित किशन नारायण याच्या तारीख-इ-बुंदेल खंड व जालवन (१८५३) यांचा वापर केला आहे. मुघल काळातील बुंदेला राजांच्या जीवनाविषयक वृत्तांतासाठी मा. उ., खंड दोन, १३१, २१४, २५८, ३१७, ५१० वगैरे पाहा. (जदुनाथ सरकार)

४ कटेरा हे ओडशाच्या पूर्वेस २० मैलांवर, तर महेबा हे कटेराच्या दक्षिणेला ३ मैलांवर आहे. महेबाच्या उत्तरेस अर्ध्या मैलावर पटारी डोंगर सुरू होतो. (इंडियन ॲटलास ६९ नैर्ऋत्य). सदर महेबा ठिकाण म्हणजे अधिक प्रसिद्ध असलेले महोबा हे ठिकाण असा गोंधळ होऊ देऊ नये. महोबा हे ठिकाण महेबाच्या पूर्वेस ५९ मैलांवर आहे. मऊ हे ठिकाण कटेराच्या थेट पूर्वेस १० मैलांवर आहे. (जदुनाथ सरकार)

वोडसे या संस्थानातील महेवाजवळील मोरपारिया[७] या गावी चंपतराय याचा जन्म झाला. सदरचे ठिकाण कटेरा आणि मऊ राणीपूर या ठिकाणांपासून फार दूर नाही. चंपतराय मोठा झाला तेव्हा त्याची परिस्थिती मोठी तंगीची होती. त्याच्या उदरनिर्वाहासाठी अगदी लहानशा जहागिरीची तरतूद होती. तेव्हा त्याने मुलुखगिरीचा जीवनक्रम स्वीकारला. महेवाच्या पश्चिमेस ज्यांचा मुलूख होता त्या वोडसे आणि दतिया येथील राजांनी त्याला आमच्या रोखाने न येण्याबाबत बजावलेही होते, म्हणून तो दांगिया मुलुखाच्या रोखाने पूर्वेकडे चढाई करीत राहिला. त्यात त्याला काही विजयही मिळाले. तो वोडसे राजांचा जहागिरदार किंवा आश्रित असावा. ते काही असो, इ. १६२७ मध्ये तो बीरसिंगदेव (बुंदेला) यांचा सर्वात थोरला मुलगा जुझारसिंग याच्या बाजूने लढत असताना आपल्याला आढळतो.

## ७० : जुझारसिंगाचे जीवन आणि त्याचा अंत

जहांगीर २८ आक्टोबर १६२७ इ. रोजी मरण पावला. त्यापूर्वी काही महिने बीरसिंग मृत्यू पावला. राजाचा सर्वात थोरला मुलगा जुझारसिंग मुघल दरबारी होता. पूर्वीच्या राजवटीत आपल्या बापावर मेहेरबानीचा जो वर्षाव झाला तो आपल्याला लाभणार नाही असे वाटून निराश झाल्याने आग्र्याहून तो स्वस्थानी पळून आल्याचे दिसते. तेव्हा या त्याच्या कृत्याबद्दल त्याच्याविरुद्ध महाबतखान खानेखानान, खाने जहान लोधी आणि अब्दुल्लाहखान फीरूझजंग या तिघांना तीन फौजा देऊन पाठविले. तिघांच्या या तीन फौजा तीन दिशांनी आल्या व त्यांनी त्याला वोडसे येथे वेढा घातला. १० जानेवारी १६२९ रोजी इरजवर[८] अचानक हल्ला चढवून अब्दुल्लाहखानाने पहिले यश संपादन केले पण अब्दुल्लाहखान आणखी काही करू शकण्यापूर्वीच जुझारसिंगाने आपली रदबदली शाहजहानाकडे करण्याविषयी महाबतखानाचे मन वळविले होते. १६२९ मार्चच्या सुरुवातीस त्यास क्षमा करण्याच्या प्रस्तावास बादशाहाची संमती मिळाली. नंतर जुझारसिंगाला महाबतखानाच्या हाताखाली देऊन दक्षिणेत मोहिमेवर पाठविले. पण हि. १०४४ यावर्षी (२६ जून १६३४–१५ जून १६३५) त्याने महाबतखानाकडून रजा मिळविली व तो घरी परतला; पण आपला सर्वात थोरला मुलगा विक्रमाजित् (जगराज) यास त्याने मागे आपल्या जागी ठेवले. आता राजाने दक्षिण विजयाची मोहीम सुरू केली. देवगढचा गोंड राजा भीमनारायण यावर हल्ला चढविला. चौरागढ[९] हा त्याचा किल्ला, त्याच्या कपटाने केलेल्या वधानंतर सर केला. तेव्हा बादशाहाने हस्तक्षेप केला व चौरागढ कब्जात द्यावे अगर त्याच्या बदल्यात दुसरा एखादा परगणा ताब्यात द्यावा अशी मागणी केली. बादशाहाची मर्जी खप्पा झालेली आहे हे ऐकताच जुझारने आपला मुलगा विक्रमजित् याला गुप्त निरोप पाठवून परत बोलाविले. त्यावेळी विक्रमजित् हा दक्षिणेत बालाघाट या ठिकाणी होता. बालाघाटचा सुभेदार खान झमान याने पळपुट्याचा पाठलाग केला आणि परगणा अष्टा या ठिकाणी

७ बहुधा इंडियन अॅटलास ६९ नैर्ऋत्यमधील मोहर–पहाडी, असावे; ते महेवाच्या दक्षिणेस ४ मैलांवर आहे. मन्जूर अहमद सांगतो की, महेवा नावाचे आणखी एक गाव असून ते छत्तरपूरच्या ईशान्येस १० मैलावर आहे; आपल्या परिवार–गृहाच्या स्मृतिप्रीत्यर्थ छत्रसालाने ते गाव वसविले असे तो सांगतो. ( इंडियन अॅटलास ७०, ईशान्य )

८ बेटवा नदीवरील इरीच, वोडशाच्या ईशान्येस ४२ मैलांवर. ( इंडियन अॅटलास, ६९ वायव्य )

९ मध्य-भारतातील छिंदवाड्याच्या दक्षिणेस २४ मैलांवर देवगढ आहे. चौरागड नर्मदेच्या दक्षिणेस २५ मैलावर आणि नरसिंगपूरच्या नैर्ऋत्येस २४ मैलावर आहे.

पळपुट्यावर कुरघोडी केली. जखमी झाला असताना देखील विक्रमजित्ने आपली सहीसलामत सुटका करून घेतली. जंगली वाटेने प्रवास करून धामोणी गावी आपल्या वडिलांना जाऊन मिळण्यात तो यशस्वी झाला. धामोणी हा माळव्याच्या सरहद्दीतील बळकट किल्ला असून तो वीरसिंगदेव [१०] याने बांधला होता.

तेव्हा शाही फौजांना मोहिमेवर धाडले. या फौजांचे प्रमुखपद अब्दुल्लाहखान फीरुझजंग, सय्यिद खानजहान आणि खान दौरान यांकडे होते. त्यात भांडणे होण्यास वाव राहू नये म्हणून शाईस्तेखान याच्या पालकत्वाखाली शाहझादा औरंगजेब याच्याकडे सर्वश्रेष्ठ आधिपत्य दिले होते. इ. १६३५ ऑगस्ट २९ रोजी शाहझाद्याने कूच केले. बोंडशाचे राज्य भारतशाह याचा मुलगा चंदेरीचा देवीसिंग यास बहाल केले. तो रुद्र प्रताप याच्या सहाव्या पिढीतला होता. जुझारसिंग बोंडशाहून पळाला व दक्षिणेच्या बाजूस ८० मैलांवर असलेल्या धामोणी गावी गेला. इ. १६३५ आक्टोबर १४ रोजी बोंडसे सर झाले. शाही पक्ष धामोणीच्या नजीक आला तेव्हा जुझारसिंग आणखी मागे हटून चौरागढच्या रोखाने गेला असल्याचे आढळून आले. लवकरच धामोणी सर केली. एवढे होईतो जुझार या चौरागढपासून चार मैलांवर असलेल्या शाहपूर शहरी जाऊन पोहोचला होता. तेथे त्याने देवगढच्या राजाकडे मदतीबाबत विचारणा केली होती. धामोणीपासून जुझारसिंगाचा पाठलाग करण्याच्या कामगिरीवर खानदौरान आणि अब्दुल्लाहखान फीरुझजंग यांना मुकर केले. जुझारला देवगढाहून कसलीच मदत मिळाली नाही; कारण तेथला जमीनदार नुकताच मरण पावला होता. तोफा मोडीत काढून, इतर चीजवस्तू जाळून टाकून आणि चौरागढमधील इमारती उडवून देऊन जुझार देवगढच्या मुलखातून दक्षिणेच्या रोखाने पळाला. त्याच्या पाठलागावर असलेले लोक गढ काटंगा आणि लांजी या ठिकाणातून गुजरले व चांदा प्रदेशाच्या सरहद्दीपाशी येऊन पोहोचले. त्यावेळी त्यापुढे चार कोसांवर पळपुट्यांचा मुक्काम पडला होता. सबंध रात्रभर दौड करून पाठलागावरचे लोक त्या जागी पोहोचले तेव्हा सावज उडून गेल्याचे त्यांना आढळून आले. दुसऱ्या दिवशी दुपारच्या वेळी पळपुट्यांवर कुरघोडी झाली, तेव्हा झटापट होऊन आपली निशाणे, चौघडे आणि हत्ती जिथल्या तिथे टाकून ते जंगलात पळाले व तेथे लपून बसले. तरी पण पाठलागात जरासुद्धा ढिलाई येऊ दिली नाही. उदेभान आणि जुझारसिंगाचा आणखी एक धाकटा मुलगा या दोघांनी सटकून जाण्याचे साधले व ते गोवळकोंड्यास येऊन पोहोचले. जुझार आणि विक्रमजित् यांच्यावर कुरघोडी झाली तेव्हा ते जंगलात आणखी आत घुसले. तत्पूर्वी त्यांनी आपल्या बायकांना बळी देण्याचा प्रयत्न केला. त्याची पट्टराणी, त्याचा एक मुलगा दीर्घभान आणि विक्रमजितचा मुलगा दुर्जनसाल एवढ्यांना कैद केले.

हे दोघे बुंदेले-प्रमुख जंगलात गोंडांच्या तावडीत सापडले. या गोंडांनी त्यांना ठार मारले. जेथे ते ठार झाले त्या ठिकाणी खानदौरान गेला. त्याने त्यांची मुंडकी कापली व त्यांच्या शिक्क्याच्या अंगठ्या काढून घेतल्या. ही मुंडकी शाहजहानापुढे सिहोल मुक्कामी हजर केली. इ. १६३६ जानेवारी १० रोजी तिथल्या सराईच्या दरवाज्यासमोर ती लोकांना पाहण्यासाठी मांडून ठेवली. १५ दिवसांनी खान दौरानचे आगमन झाले. चांद्याच्या राजाने

१० जुझारबरोबरच्या दोन लढाया, अब्दुल हमीद लाहोरी याचा पादशाहनामा, खंड एक, भाग १, पृ. २४०-२४८; भाग २, पृ. ९५-१३९.

दिलेला नजराणा, त्याखेरीज बुंदेले मंडळींना लूटून आणलेला माल आणि बंडखोरांचे कुटुंब त्याने बरोबर आणले होते. झालेल्या जखमांमुळे राणी पार्वती मरण पावली. इतर बायकांना मुसलमान केले व त्यांना शाही जनानखान्यात पाठविले. मुलगा दुर्गभान आणि नातू दुर्जनसाल या जुझारसिंगाच्या वंशजांना मुसलमान करून त्यांची इस्लाम कुली आणि अली कुली अशी नावे ठेविली. दोन एक महिन्यानंतर उदेभान आणि दुसरा एक पोरवयाचा मुलगा सियमदौवा या अनुयायासमवेत दरबारी आले. गोवळकोंड्याच्या राजाने त्यांची पाठवणी केली होती. मुसलमानी धर्म स्वीकारला तर जीव वाचेल असे त्यातील दोन प्रौढांना सांगितले. पण मुसलमान होण्यास त्यांनी नकार दिला. म्हणून त्यांना 'नरकात पाठविले'. लहान मूल होते त्याला जनानखान्याच्या नाजिरच्या (व्यवस्थापकाच्या) हवाली केले.

## ७१ : चंपतराय बुंदेला याची कारकिर्द

बोडशाच्या जुझारसिंगाचे पारिपत्य करण्याच्या सर्व घडामोडींमध्ये चंपतराय हा मुसलमानांचा विरोधक होता असे दिसते. पण त्याने पलायन करण्यात जुझारसिंगाचे अनुकरण केल्याचे दिसत नाही. राजाच्या मृत्यूनंतर दोन-तीन वर्षांनी चंपत याने राजाचा एक मुलगा पिर्थीराज याजबरोबर संगनमत केले आणि बोडशाच्या आसपासच्या भागात दंगल केली. त्यावेळी त्या मुलुखाची जबाबदारी अब्दुल्लाहखान फीरुझजंग याकडे होती. त्याचे मुख्य ठाणे इस्लामाबादेस[११] होते. त्याने बुंदेले मंडळींच्या बाले किल्ल्यावर १६४० एप्रिल १८ रोजी हल्ला चढविला. बाले किल्ल्याचे ठिकाण बोडशे आणि झाशी या दरम्यान बोडशापासून सहा मैलांवर होते. दम न घेता कूच करीत गेलेली, बाकीखान या त्याच्या एका मुख्य अमलदाराच्या अधिपत्याखालील फौज बुंदेल्यावर तुटून पडली. ती वेळ दिवस उगवण्याची होती. हल्ल्यात बुंदेले मंडळींना हुसकले. कित्येक जण मुसलमानांच्या तलवारींना बळी पडले. पिर्थीराज कैद झाला. चंपतराय मात्र पळून गेला. पिर्थीराज याला ग्वाल्हेर किल्ल्यातील तुरुंगात ठेवले. अब्दुल्लाहखान पुरेशी तडफ दाखवत नाही असे वाटल्यावरून त्याच्या जागी बहादुरखान रोहिल्याची नेमणूक झाली. इस्लामाबाद या ठिकाणचा महसूल त्याजकडे तबदील होऊन त्यास बहाल झाला. बहादुरखानाने खूप करून दाखविण्याचे वचन दिले होते. पण तो काय करू शकेल हे दाखवून देण्यास त्यास फारसा अवधी देण्यात आला नाही. कारण शाहजहानाच्या सल्लागारांनी शाहजहानाला सांगितले की, बुंदेलखंडाचे रूपांतर रोहिलखंडात करणे श्रेयस्कर ठरणार नाही. म्हणून या हरकतीला अनुसरून बहादुरखानाला परत बोलाविले. [पाद. भाग दोन, १९३; मा. उ., खंड एक, ४२०.]

बहादुरखानाने संपादलेल्या एकमेव यशाची खबर त्याने पत्राने दरबारास कळविली. सदरचे पत्र १६४१ जानेवारी १३ रोजी दरबारी मिळाले. जंगल तोडण्यात आणि काही बुंदेले मंडळींना ठार करण्यात त्याला यश आले होते. पण चंपत आणि त्याचा भाऊ सुजन हे पुन्हा पळून गेले होते. १६४१ आक्टोबरमध्ये अब्दुल्लाहखान फीरुझजंग याला शाहझादा मुरादबख्श याच्या फौजेत सामील होण्याचा हुकूम झाला. मुरादबख्श याची ही फौज जगतसिंग नावाच्या एका डोंगरी राजाविरुद्ध मोहिमेवर निघाली होती. १६४१ नोव्हेंबर १८ रोजी

११ मन्जूर अहमद सांगतो ( पृष्ठ ४७ ) की, कठेराजवळचे अवशेष आजही सलीमाबाद या नावाने ओळखले जातात. ज्या जागेचा निर्देश झाला आहे ती जागा बहुधा हीच असावी.

काहीतरी अहवाल सादर करण्याच्या निमित्ताने तो परतला. पण कोणत्या तरी कारस्थानात तो गुंतला असल्याचा संशय असल्याने त्याला बादशहाने भेट दिली नाही. उलट गुप्त सूचनेद्वारे बुंदेलखंडाहून परत बोलाविलेल्या बहादुरखानाला अब्दुल्लाहखानाच्या जागी नेमिले, व अब्दुल्लाहखानाला पुन्हा बुंदेलखंडावर पाठविले. [पाद., भाग दोन, २२१.]

१६४२ जून ४ रोजी, अब्दुल्लाहखान फीरुझजंग याची मोहिमेतील प्रगती असमाधान-कारक वाटल्यावरून ओडशाचा मृत जुझारसिंग याचा भाऊ राजा पहाडसिंग याने चंपत आणि त्याचे भाऊ यांना समूळ नष्ट करण्याचा विडा उचलला. अब्दुल्लाहखानाची नेमणूक झाल्यावर त्याची मनसब ३,००० जात (३,००० स्वार, दोन वा तीन घोड्यांचे) अशी वाढविली. बीरसिंगदेव आणि त्याचा मुलगा जुझारसिंग याच्या चाकरीत असताना चंपतचा उत्कर्ष होत गेला होता. ही गोष्ट लक्षात घेता त्याने पहाडसिंगाशी सलोखा करण्याचे अधिक पसंत केले. ज्या कुटुंबाचे आपणावर काही तरी उपकार आहेत त्या कुटुंबाशी संघर्ष करण्यापेक्षा सलोखा केलेला अधिक बरा असे त्याला वाटले. [तत्रैव, ३०३.]

पण नेहमीप्रमाणे पहाडसिंग आणि चंपतराय यांचा मेळ नीट जमून आला नाही. तापदायक ठरलेल्या आपल्या आश्रित उमरावाच्या कटकटीतून सुटण्यासाठी पहाडसिंगाने विषप्रयोग करण्याचा एकदा प्रयत्न केला. पण नातेवाईक व मित्र असलेल्या राजा भीम याने पेल्यांची अदलाबदल केली आणि चंपतरायाऐवजी आपण बळी जाण्यास तयार आहोत असे सांगितले. आपल्या आईच्या सल्ल्यावरून चंपतराय याने मुघल दरबाराशी संधान बांधले. परिणामी त्याला दरबारचे बोलावणे येऊन शाही चाकरीत त्यास भरती करून घेतले. शिरस्त्यानुसार इ. १६५६ मध्ये भारगढचा[१२] किल्ला काबीज करण्यासाठी त्याला चाकरीत घेतले होते. या चाकरीबद्दल त्याला दरसाल तीन लाख रुपयांचा लाभ देणारा कुंछ हा परगणा जहागीर म्हणून मिळाला. या प्रकारामुळे पहाडसिंग वैतागला. शाहझादा दारा शुकोह यास ९ लाख रुपयांची देणगी देऊन त्याने सदरचा परगणा आपल्या नावे करून घेतला. या प्रकाराचा उबग येऊन चंपतराय याने दरबार सोडला आणि महेवा या ठिकाणी तो परतला. [मन्जूर अहमद ५२, पॉगसन, २५.]

आपला भाऊ दारा शुकोह याजबरोबरचा तख्ताविषयीचा दावा साधण्यासाठी शाहझादा औरंगजेब दक्षिणेहून निघाला तेव्हा चंपतराय त्यासमोर हजर झाला. तेव्हा त्यास चाकरीवर रुजू करून घेतले. जसवंतसिंग राठोड या शुकोहच्या पक्षात असलेल्या मनसबदाराचा पराभव १६५८ एप्रिल २५ रोजी धरमत या ठिकाणी झाला. तेव्हा या बुंदेल्यास एक घोडा आणि मानाची वस्त्रे मिळाली. सामूगढच्या लढाईच्यावेळी (९ जून १६५८) चंपत हा औरंगजेबाच्या उजव्या फळीत शाहझादा मुहम्मद अअजम याच्या हाताखाली होता. विजयानंतर

१२ हे चूक आहे. ज्यास वेढा पडला तो किल्ला अफगाणिस्थानातील कंदाहारचा होता. छत्रप्रकाशचा पृष्ठ ३० वर खंधार असा स्पष्ट उल्लेख आहे. तसेच या वेढ्यात दारा शुकोह याने भाग घेतल्याचाही उल्लेख आहे. पण दरबारच्या भाटाला अतिशयोक्ति करण्याची जी नित्याची सवय असते त्यानुसार भाट म्हणतो की, किल्ला ताब्यात देण्यास चंपतने भाग पाडले ! कंदाहारला मुघलांनी जो तिसरा वेढा घातला तो दारा शुकोह याच्या आधिपत्याखाली. हा वेढा १६५३ एप्रिल ते सप्टेंबर या काळात पडला होता. वेढा दुर्दैवाने अपेशी ठरला. पादशाहनामा खंड एक, (भाग दोन, ३०४) मध्ये अशी नोंद आढळते की चंपत आणि त्याचे भाऊ दाराच्या चाकरीत १६४२ सालानंतर शिरले. (जदुनाथ सरकार)

त्याला एक हत्ती बहाल झाला. दारा शुकोह याचा पाठलाग करण्याच्या कामगिरीत तो नंतर सामील झाला. आलमगीर औरंगजेब याचा तळ पंजाबमध्ये सराई जौहरमल या ठिकाणी असताना चंपतराय आणि त्याचा मुलगा अंगद यांना खलीलुल्लाहखान याच्या हाताखाली काम करण्यासाठी लाहोर येथे धाडले. नंतर आलमगीर दिल्लीस परतला. त्याचे दिल्लीतील आगमन १६५८ नोव्हेंबर २१ रोजी झाले. जानेवारी १६५९ मध्ये शाहझादा शुजाअ याच्याविरुद्ध एक फौज धाडली. चढाई करीत शाहझादा शुजाअ याने अल्लाहबादच्या पुढे मजल मारली होती. गंगा-यमुनेच्या दुआबात खानवा येथे झालेल्या झटापटीत, आजवर आलमगीरास निष्ठा वाहिलेल्या जसवंतसिंगाने पुन्हा एकदा दगलबाजी केली आणि बादशाहाच्या पिछाडीवर हल्ला केला. तो अपेशी ठरल्याने त्याने आपल्या जोधपूरच्या मुलखाकडे पलायन केले. दारा शुकोह आता गुजरातमध्ये शिरला आणि उत्तरेस अजमेरच्या रोखाने त्याने चढाई केली. अशी धामधुमीची परिस्थिती उद्‌भवली असता, तिचा फायदा घेऊन चंपत लाहोरहून पळाला व बुंदेलखंडास पोहोचला. तद्नंतर लगेचच त्याने माळव्यातून जाणारे सगळे रस्ते रहदारीस बंद करून टाकले. अशावेळी करता येण्यासारखे होते ते केले; म्हणजे दतियाचा राजा शुभकरण आणि वोडशाचा राजा इंद्रमण या दोघांना, धामधूम करणाऱ्यांविरुद्ध पाठविले. [आलमगीरनामा, ७८, ९२, १६३, २१७, ३०१, ६३१.]

चंपतराय याने झाशीपासून ईशान्येस २४ मैलांवर असलेल्या भांडेर या ठिकाणी लुटालूट केली. इरजच्या किल्ल्यात त्याने आपले ठाणे बसविले. शुभकरण त्याच्यावर चढाई करून आला. त्याने त्याच्याशी खुल्या मैदानात लढाई केली. शेवटी शुभकरण याने आपल्या फौजेनिशी माघार घेतली व आपले लक्ष शाहगढच्या किल्ल्याकडे वळविले. पण तो किल्ला इतक्या शर्थीने लढविला गेला की, तो काबीज करणे त्यास जमले नाही. [पॉगसन ३५-३६].

## ७२ : चंपतराय याचे पलायन व मृत्यू इ. १६६१

थोड्या कालावधीनंतर कुमक घेऊन शुभकरण परत आला. तेव्हा चंपत भरैमी येथे पळून गेला. तेथे काही झटापटी झाल्या. पण त्यात निर्णय असा निघाला नाही. तेथून चंपतने अंघोरी येथे आपला पुढचा आसरा घेतला. एवढे घडेतो आलमगीर दिल्लीला परतला होता (मे १६५९); आणि त्याचा भाऊ दारा शुकोह कैद झाला होता. आता औरंगजेबाने बुंदेलखंडातील कामगिरीची जबाबदारी चंदेरीचा राजा देवीसिंग बुंदेला याजवर सोपविली. ही घडामोड त्याच्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षातील म्हणजे ३० एप्रिल १६६१ ते १९ एप्रिल १६६२ या काळातील आहे. चंपतने आता आपला भाऊ सुजनराय याच्यामार्फत सलोख्याचा प्रस्ताव पाठविला. दोन्ही पक्षांच्या बेदपूर येथे गाठीभेटी झाल्या. पण सलोख्यासाठी शुभकरणने घातलेल्या अटी चंपतराय याला मान्य होण्यासारख्या नव्हत्या. तेव्हा चंपतरायला वश करणे आपल्या शक्तीपलीकडचे आहे असे शुभकरणने जाहीरपणे सांगितले. तरी चंपतचा एक मुलगा रतनशाह याने नामदारखान याच्यामार्फत शरण येण्याचा प्रस्ताव पाठविला. मात्र त्यातून काही निष्पन्न झाले नाही. [पॉगसन ३८.]

सुजनराय हा शुभकरण याच्याबरोबर शाही दरबारास गेला होता. सलोख्याच्या अटी आपणास अनुकूल करून घेता येतील अशी त्याला आशा वाटत होती. तो आता बुंदेलखंडास परतला. वोडशाची राणी हीरादेवी हिला त्याने मदतीचे आवाहन केले. पण त्याची लढाई

तिने परतवून लावल्यामुळे, तो वेदपूरच्या किल्ल्यात गेला. येथे राणीने त्याजवर हल्ला चढविला. त्याचा दारूगोळा संपुष्टात आला. तेव्हा हल्ला करून ही जागा काबीज केली. सुजनरायाच्या राण्यांनी स्वेच्छेने जोहार केला. कैद होणे टाळण्यासाठी सुजनरायाने आपल्या हाताने कटयार आपल्या काळजात घुसविली आणि तो मरणाधीन झाला. [पॉगसन ३८-३९.]

सुजनराय याचा पराभव झाला हे समजताच चंपतने वोडसे[१३] सोडले आणि जाटवाडा येथे तीन दिवस मुक्काम केला. राणीची फौज पाठलागावर होतीच तेव्हा चंपतरायाला माळवा सुभ्यातील सारंगपूर सरकारमधील साहरा येथील राजा इंद्रमण ढंढेरा (मराठी ढमढेरे?) याची आठवण झाली. चंपतवर आलमगीरची मर्जी असण्याच्या काळी हा इंद्रमण मुघल दरबारात कैदी होता. त्याचा मुलूख शाहजहानाने शिवराम गौर यास बहाल केला होता. हा मुलूख सदर शिवराम गौड याने काबीज केला असता त्यास याने प्रतिकार केला होता. चंपतने त्याच्याबद्दल रदबदली केली होती; त्याची सुटका घडवून आणली होती आणि त्याचे राज्य त्याला परत मिळवून दिले होते.[१४] चंपतने इंद्रमणच्या राजधानीत आसरा घेण्याचा निश्चय केला. तो तडक सहारा या ठिकाणी पोहोचला. १६ हजारांची शाही फौज त्याच्या पाठीवर होती. चंपतजवळ मात्र ५० स्वारांपेक्षा जास्त कोणी नव्हते. तो आजारी होता आणि त्याचा आजार दररोज बळावत होता. एके दिवशी ३० मैलांची रपेट झाल्यामुळे आपले असामी आणि घोडे यांना विश्रांती मिळावी म्हणून तो थांबला. ते आपल्या घोड्यांना दाणागोटा करीत असताना, चौघड्याचा आवाज त्यांनी ऐकला. शत्रूचे थोडे लोक त्यांच्या दृष्टीस तत्पूर्वीच पडले होते. चंपतने आपला भाता तयार केला; तो आपल्या कमरपट्ट्यात अडकविला व घोड्यावर स्वार होऊन तो पळून गेला. एका डोंगरकड्याच्या बाजूने जाणाऱ्या वाटेवर तो थोड्याच वेळात येऊन पोहोचला. आपल्या बचावाचा प्रयत्न करण्याच्या धडपडीत त्याने प्रतिपक्षाला लोळविले. त्याचा एक अनुयायी इंद्रमण या डोंगरकड्याच्या वाटेने जाण्याचा प्रयत्न करीत असता आपल्या घोड्यासह कोसळला व त्याचे तुकडे तुकडे झाले. झटापट चालू असता चंपतराय पळाला आणि त्याने एका खेड्यात आश्रय घेतला. साहिबराय ढंढेरा याला ही बातमी समजली. राजा इंद्रमण याच्या गैरहजेरीत साहराची जबाबदारी त्याच्याकडे होती; चंपतला आश्रय देण्याचा त्याचा निश्चय झाला. तेव्हा शिवराम दौवा आणि गोपाल बारी यांना सोबतीस २०० स्वार देऊन त्याला भेटण्यासाठी पाठविले.

घोड्यांची टपटप अचानक कानावर आल्यावर चंपतने आपले धनुष्य सज्ज करावयास घेतले. पण ते जुने असल्याने दोरी ताणताच तुटले. आपल्या बापाच्या बचावासाठी जीव

---

१३ इर्विन याने वेच्छा असे लिहिले आहे. पण छत्रप्रकाशच्या हिंदी पाठामध्ये ओच्छी असेच लिहिलेले आहे. (जदुनाथ सरकार)

१४ पॉगसन (पृष्ठ ४०) सांगतो की, शाह मलिक नावाच्या शाही अमलदाराला ठार करण्याबद्दल इंद्रमण याला कैदेत टाकले होते. चंपतने ज्याकडे रदबदली केली तो बादशाह शाहजहान असावा; तो आलमगी असण्याची शक्यता जवळजवळ नाही. शिवरामला शाहजहान बादशाहाच्या कारकिर्दीच्या आरंभीच्या काळातर ढंढेराच्या जमिनी जहागीर म्हणून मिळाल्या होत्या. (मा. उ., खंड दोन, २६५) औरंगजेबाने बापाचे तख्त मिळविण्यासाठी व त्यासाठी सामना देण्याकरता दख्खन सोडली, तेव्हा इंद्रमणाला त्याने जुन्नरच्या किल्ल्यातून मुक्त केले. (तत्रैव २६६). तेव्हा या बाबतीत चंपतचा काही हात असण्याची कसलीच शक्यता वाटत नाही. पण औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात आपल्या आप्तेष्टांचा परामर्श घेण्याच्या बाबी-वरून इंद्रमणवर बादशाहाची गैरमर्जी झाली होती. (तालिश). (जदुनाथ सरकार)

जाईपर्यंत लढण्याचा निर्धार त्याचा मुलगा छत्रसाल याने केला. चंपतच्या बायकोने कटयार बाहेर काढली. नवऱ्याची अब्रू जपण्यासाठी मरण पत्करण्यास ती आनंदाने तयार झाली. ढंढेराचे घोडेस्वार नजीक येऊ लागले तेव्हा ती ओरडली, "चढाईची धिटाई करणारे तुम्ही कोण आहात? मी शरण येणार नाही व चंपतला सोडणारही नाही. त्याच्यासाठी बळी द्यावयाचे कार्य पूर्ण होईपर्यंत यातले काही देखील होणार नाही. या नंतर मात्र तुम्हाला हवे ते करता येईल". तेव्हा येणाऱ्या घोडेस्वारांचा म्होरक्या उद्‌गारला, "असा संताप का व्यक्त करीत आहात? आम्ही काही कपट-कारस्थान करण्यासाठी आलेलो नाही. आम्ही चंपतला साहरा येथे घेऊन जाण्यासाठी आलो आहो. तेथे शत्रूला चंपतचा बिलकुल सुगावा लागू शकणार नाही". या सौम्य उत्तरामुळे त्यांची भीती पळून गेली. त्यांना देऊ केलेल्या तळावर, आलेल्या-समवेत जाण्यास त्यांनी रुकार दिला.

सहारा येथे त्यांचा अल्पकाळ मुक्काम घडला. तेथून सिताबाडीस येथे ते गेले. तेथे रघुनाथाचे मंदिर होते. पाठलागावरचा शत्रू कालांतराने आसपासच्या मुलखात आला. राजा इंद्रमण याचा अजून पत्ता नव्हता. त्याचा प्रतिनिधी साहिबराय याने किल्ल्यात आश्रय घेतला होता. तो देखील अगतिकच झाला होता. ढंढेराचा धीर खचला होता. त्याने चंपतच्या सोबतीची जोखीम असलेल्या साहिबराय दौवा आणि गोपाळ बारी याना पत्र लिहिले. 'पाहुण्यांचा विश्वास संपादन करा' व नंतर त्यांचा खून करा असा हुकूम त्याने पत्रात दिला होता. असा विश्वासघात केला तर बादशाहाबरोबर निभाव लागेल अशी आशा त्यांना वाटत होती.

या कारस्थानाची कसलीच कल्पना चंपतला नव्हती. त्याची पत्नी कालीकुंवर हिने रघबीरच्या मंदिरात आराधना वगैरे केली. तदनंतर चंपतने मोरनगावी जावयाचे ठरविले. आपला मुलगा छत्रसाल यास या ग्यानशाहच्या म्हणजे छत्रसालाच्या बहिणीच्या नवऱ्याच्या-गावाला त्याने पाठविले. छत्रसाल त्या गावी पोहोचला तेव्हा त्याची बहीण घरी होती. पण त्याची भेट घेण्यास तिने नकार दिला. हा छोकरा तीन दिवस उपाशी राहिला. अन्न मिळवायला लागणारे पैसे देखील त्याच्या जवळ नव्हते. संध्याकाळी ग्यानसाह घरी परतला. त्याला खबर समजली तेव्हा त्याने छत्रसालाकडे शिधा पाठविला. तो शिजवून खाऊन छत्रसालाने रात्र काढली.

आपल्या पाठलागावर असलेल्यांना चकवावे असा विचार चंपतने केला. मोरनगावी आपल्याला पालखीतून वाहून नेले जात असता दुसरी एक पालखी सहाराजवळच्या राईकडे पाठवावी; त्यात आपल्याऐवजी दुसऱ्या कोणास बसवावे; त्याला पायापासून डोक्यापर्यंत आपली चादर पांघरावी व पालखीसोबत २०० घोडेस्वार पाठवावेत असा बेत त्याने केला. काली कुंवर हिने याबाबत आपल्या माहेरच्या एका चाकराकडे शब्द काढला. चाकराने विनंती ऐकली; पण ती अव्हेरली. ठकुरानी त्याच्या पाया पडली. पण त्याचा ठाम नकार होता. हा बेत फसला तेव्हा चंपतने सहाराच्या राईकडे २०० घोडेस्वारांनिशी कूच केले. ७ कोस अंतर काटल्यावर लोकांच्या आपआपसात खाणाखुणा झाल्या; ही मंडळी अकस्मात बुंदेला-प्रमुखावर तुटून पडली. बुंदेला-प्रमुख आजारी असल्यामुळे त्याला नीट प्रतिकार करता आला नाही. ठकुरानीने घोड्यावरून उडी मारली; आपल्या नवऱ्याच्या

शेजारी ती धावत आली. एका घोडेस्वाराचा लगाम तिने धरला. पण तो वळला आणि त्याने तिच्यावर कट्यारीचा वार केला; अशाप्रकारे हे नवराबायको जोडीने मेले व जोडीने परलोकाला गेले.[१५]

चंपतराय याची उचलबांगडी करण्याचे श्रेय आपले आहे असा दावा बोंडशाचा राजा सुजनसिंग याने मुघल दरबारी केला. बंडखोराने आसरा घेतलेल्या सहारा या ठिकाणापर्यंत मी त्याचा पाठलाग केला व त्यास शरण येण्यास सांगितले असा वृत्तान्त त्याने दरबारास पाठविला पण ज्या मंडळींनी चंपतरायाचे मुंडके दरबारास पाठविले ती मंडळी सुजनसिंगाच्या ओळखीचीही नव्हती. हे पाठविलेले मुंडके ७ नोव्हेंबर १६६१ रोजी दरबारास पोहोचले. [आलमगीरनामा, ६३३.]

## ७३ : राजा छत्रसाल याची इ. १७२० पर्यंतची कारकिर्द

अशाप्रकारे चंपतरायाचा चौथ्या क्रमांकाचा मुलगा असलेल्या छत्रसालाच्या[१६] वाट्याला वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षी अनाथाचे आणि पलायिताचे जिणे आले. त्याने प्रथम, जगलेल्यांपैकी आपला सर्वात थोरला भाऊ, देवगढचा अंगदराय याच्याकडे आसरा मिळतो का ते पाहिले. दिलवाडी या शहरी त्याला आईचे दागिने परत मिळाले. तेथे ते पूर्वी अमानत म्हणून ठेवलेले होते. दागिने मिळाल्यामुळे त्याला आपले लग्न उरकता आले. आता त्याने आंबेरचा राजा जयसिंग याच्या पदरी चाकरी पत्करली. त्या वेळी राजा जयसिंग शिवाजीविरूद्ध मोहिमेवर दख्खनच्या वाटेवर होता. त्याचा भाऊ अंगदराय हा देखील याच सेनाधिपतीला येऊन मिळाला. या दोघांनी त्याची चाकरी उत्तमप्रकारे बजावली. बहादुरखानाने देवगढला वेढा टाकला, तेव्हा जयसिंगाने कुमक म्हणून पाठविलेल्या सैन्यतुकडीत छत्रसाल होता. डोंगरातून वाट मिळावी म्हणून झालेल्या लढाईत छत्रसाल रणांगणात मेला असा समज झाला; रात्र पडेपर्यंत त्याचा तपासही लागला नाही.

आपल्या चाकरीची बहादुरखानाने अशी वासलात लावली याचा उबग येऊन छत्रसालाने शिवाजीस जाऊन मिळण्याचे ठरविले. डोंगर आणि अरण्ये तुडवत, कसोटी पाहाणारी लांबची वाट चालून शेवटी भीमा नदी पार केली. शिवाजीशी झालेल्या भेटीत, शिवाजीने त्याला 'बुंदेलखंडास परत जा आणि मुसलमानांच्या विरूद्ध झेंडा घेऊन उभा राहा' असा सल्ला दिला.[१७] हा सल्ला शिरोधार्य मानून छत्रसालाने प्रथम दतियाचा बुंदेला राजा शुभकरण याची मदत मिळते का ते पाहिले. त्यावेळी तो राजा दक्षिणेत मुघलांच्या

१५ चंपतने इरजचा किल्ला सोडल्यापासून तो त्याचा मृत्यू होईपर्यंत त्याच्या झालेल्या पाठलागाची ही सगळी हकीकत छत्रप्रकाशवर आधारलेली आहे. (जदुनाथ सरकार)

१६ आलमगीराचा मृत्यू घडेपर्यंतचा छत्रसालाचा इतिहास छत्रप्रकाशवर आधारलेला आहे. मात्र तारखा छत्रप्रकाशमधील असल्या तरी थोडाफार तपशील मा. उ. ,खंड दोन, पृ. ५१० आणि मा. आ. १६९, ३८४, ४२४, ४८३ यावरून घेतलेला आहे. हफ्त अंजुमन यामधील जयसिंगाच्या पत्रात छत्रसालाच्या, त्याच्या हाताखालच्या चाकरीविषयीची माहिती मिळते. (जदुनाथ सरकार)

१७ भीमसेनाने सांगितलेली हकीकत. त्यासाठी माझे शिवाजी अँड हिज टाईम्स, प्रकरण सात अखेर पाहा. (जदुनाथ सरकार)

चाकरीत होता. शुभकरणाने मुघलांची चाकरी सोडण्यास नकार दिला. पण तुला योग्य अशी मनसब मिळावी म्हणून आपण बादशाहाकडे रदबदली करू असा सल्ला दिला. छत्रसालाने तो अव्हेरला.

यानंतर सुरू झाला तो सामना तब्बल पन्नास वर्षे चालला. छत्रसालाने इ. १६७१ मध्ये नर्मदा ओलांडली व बुंदेलखंडात प्रवेश केला. त्या वेळी त्याने बाविसाव्या वर्षात पदार्पण केले होते. या सुमारास त्याचे अनुयायी म्हणून ५ घोडेस्वार आणि २५ पायदळाचे शिपाई होते. तो डिसेंबर १७३१ मध्ये मरण पावला तेव्हा बुंदेलखंडाच्या पूर्वेकडच्या अर्ध्या भागाचा सत्ताधीश होता. त्याची कारकिर्द म्हणजे एक विजयमालिकाच म्हणावी लागेल. कित्येक मुसलमान सेनापतींचा त्याने पराभव केला. त्यात हाशिमखान, सय्यिद बहादुर, रणदौलहखान, तहव्वुरखान, सय्यिद लतीफ, अन्वरखान, मिर्झा सद्रुद्दीन, हमीदखान, अब्दुस्समदखान आणि मुरादखान ( दिलेरखानाचा हस्तक ) यांचा समावेश होता. हे जे सामने झाले ते अज्ञात राहिले असून मुसलमानांच्या इतिहासात त्यांचा क्वचितच उल्लेख होतो. मुसलमानी इतिहासात यातील एकाच मोहिमेचा उल्लेख आढळतो. ही मोहीम म्हणजे हि. १०८९ ( १६७८–७९ इ. ) मध्ये जसवंतसिंग बुंदेला यास " चंपतच्या मुलावर पाठविले " ती होय.

या न संपणाऱ्या झुंजीत वीस एक वर्षे उलटली. आलमगीर १६८१ इ. मध्ये उत्तर हिंदुस्थानातून बाहेर पडला. मुसलमानी सत्ता आणि मराठ्यांचे वाढते वर्चस्व यांविरुद्ध त्याने काढलेल्या मोहिमा दीर्घकाळ रेंगाळल्या. त्यापायी साम्राज्याच्या इतर भागावरील त्याचे लक्ष विचलित झाले. स्थानिक अमलदार कर्तव्य बजावण्यासाठी धडपड करीतासे झाले. शाहजहानाच्या काळात देखील अमलदारांमध्ये अशीच ख्यालीखुशाली बोकाळलेली होती. ही परिस्थिती, छत्रसालासारख्या स्थानिक प्रमुखांना आपला उदय घडवून आणण्यास निःसंशय अनुकूल होती. आलमगीराच्या कारकिर्दीच्या ४० व्या वर्षी ( ५ एप्रिल १६९६–९७ ) किंवा त्याच्या आसपासच्या काळात छत्रसालाला शाही चाकरी पत्करण्यास राजी केले. या चाकरीत असताना, तो दक्षिणेत मोहिमेवर गेला. आलमगीराच्या कारकिर्दीच्या ४६ व्या वर्षी ( १९ फेब्रुवारी १७००–८ फेब्रुवारी १७०१ ) त्याची साताऱ्याचा किल्लेदार म्हणून नेमणूक झाली. तदनंतर चार वर्षांनी त्याने चाकरी सोडली व तो घरी परतला. पुढच्या वर्षी म्हणजे आलमगीराच्या कारकिर्दीच्या ४९ व्या वर्षी ( १७०५ इ. ) नवाब फीरूझजंग याने छत्रसालाला ४,००० च्या मनसबीनिशी परत चाकरीत घेण्याची यशस्वी खटपट केली. आलमगीर मेला तेव्हा ( २ मार्च १७०७ ) छत्रसाल स्वगृही परतला.

बहादुरशाहाच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात छत्रसालाला दरबारची अनेक बोलावणी आली. पण त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. तरी नवा बादशाह, त्याचा धाकटा भाऊ कामबख्श याशी लढा देण्याच्या मोहिमेवर दख्खनच्या वाटेवर असताना, १७०८ मे ३० रोजी, छत्रसालाचे हरदे नारायण आणि इतर मुलगे बहादुरशाहासमोर हजर झाले. त्यावेळी त्यांना मनसबी बहाल झाल्या. बहादुरशाहाच्या कारकिर्दीच्या ४ थ्या वर्षी, बहादुरशाह हिंदुस्थानला परतण्याच्या प्रवासात कोटा प्रदेशात काराटीय येथे असता १७१० एप्रिल २२ रोजी, छत्रसाल बादशाहापुढे जातीने हजर झाला. तो फौजेबरोबर उत्तरेकडे

गेला. त्यावेळी फौजा गुरु गोविंदसिंग या मृत शीख गुरूंचा वारस बंदा याचा पाडाव करण्यासाठी जात होत्या. १७१० डिसेंबर १० रोजी हिमालय पर्वताच्या बाह्य बाजूवरील, शीखांच्या, लोहगड किल्ल्यावरील हल्ल्यात छत्रसालाने भाग घेतला. फर्रुखसियरच्या कारकिर्दीत ( १७१३–१७१९ ) त्याजवर बादशाहाची कृपा होती असे दिसते. १७१४ जानेवारी २१ रोजी त्याला ६,००० जात ( ४,००० घोडे ) ची मनसब मिळाली. १७१८ मे ३ रोजी त्याचे ३ मुलगे आणि कित्येक नातू दरबारात हजर झाले. त्यावेळी त्यांना दरबाराकडून देणग्या मिळाल्या. [ कामवर, दिल्. १७१ ब, बहादुर, मा. उ. : खंड दोन, ५१० . ]

## ७४ : मुहम्मदखान बंगश बुंदेलखंडाच्या मोहिमेवर निघतो

सय्यिद बंधूंचा पाडाव झाल्यावर मुहम्मदखान बंगशाला अल्लाहाबाद सुभ्याचा कारभार मिळाला ( २५ डिसेंबर १७२० ). सय्यिद अब्दुल्लाहखान याचा पक्ष सोडल्याबद्दल इनाम म्हणून, त्याला हा कारभार मिळाला. या अल्लाहाबाद सुभ्यामध्येच बुंदेलखंडाचा[१८] बहुतेक भाग मोडतो. छत्रसालाने अनधिकाराने बळकावलेला सगळा प्रदेशदेखील याच सुभ्याखाली येत होता. सबंध हिंदुस्थानात आपण सार्वभौम आहोत असा मुघलांचा दावा असल्यामुळे, या दाव्यास अनुसरून मुहम्मदखानाचा बुंदेलखंडाशी अगदी अधिकृतपणेच संबंध पोहोचत होता. एवढेच नव्हे तर फर्रुखसियरच्या पहिल्या वर्षी इ. १७१३ मध्ये ज्या परगण्यांचा जमीन महसूल त्यास बहाल झाला होता ते सगळे परगणे बुंदेलखंडातच होते. बुंदेलखंडाच्या कारभाराची जोखीम कटकटीची मानली जाई. ( म्हणजे मुघलांचे वर्चस्व या भागावर फार कमी आहे किंवा जवळजवळ नाही असे गृहीत धरण्याचाच तो एक प्रकार होता. ) दिलेरखान नावाचा, मुहम्मदखान बंगशचा आवडता चेला या कटकटीच्या कामावर नेमला होता. इ. १७२० मध्ये बुंदेल्यानी उठाव केला. काल्पी सर केली व स्थानिक अमलदाराला ( आमिल ) मारून टाकले. तेव्हा थोडाफार फौजफाटा देऊन दिलेरखानाला त्याविरुद्ध धाडले. त्याने बुंदेल्यांना काल्पी आणि जलालपूर[१९] या ठिकाणाहून झटपट हुसकावून लावले. पण लौकरच बुंदेले हाकलले. तेव्हा छत्रसालाने तीस हजार बुंदेल्यांनिशी चढाई केली. १७२१ मे २५, रोजी घनघोर लढाई झाली. तीमध्ये दिलेरखान आणि त्याचे पाचशे असामी ठार झाले. बांद्याच्या वायव्येस वीस मैलांवर असलेल्या मौदा या ठिकाणी दिलेरखानाचे दफन झाले. छत्रसालाने अल्लाहाबादेस गिरिधर बहादुरला आणि दुआबातील असोथरचा बंडखोर किचर जमीनदार याला मदत पाठविली होती. त्याच्या या कृत्यामुळे छत्रसाल शाही पक्षाचा नावडता ठरला होता. शाही पक्षाशी उघड वैर करण्याचा कळस म्हणजे त्याने केलेला दिलेरसिंगाचा पराभव व त्यात दिलेरसिंगाचा झालेला मृत्यू हा होता. या कारणामुळे छत्रसालाचे पारिपत्य करणे अगत्याचे होऊन बसले होते. [ शिवदास ६७ अ, गुलाम अली ४१ ब. ]

१८ येथपासून पुढे मुहम्मदखानाचे अंतिम निर्गमन हक्कपर्यंतचा बुंदेलखंडाचा इतिहास इर्विनच्या 'बंगश नवाब्ज ऑफ फर्रुखाबाद' या ज. ए. सो. बे., १८७८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रकरणावर आधारलेला आहे. या हकीकतीत शिवदास वगैरे लेखकाकडून घेतलेला जादा तपशीलही आला आहे. याबाबतचा, आधाराविषयीचा उल्लेख योग्य त्या ठिकाणी केला आहे. ( जदुनाथ सरकार )

१९ जलालपूर हे काल्पीच्या दक्षिणेस १८ मैलांवर पण बेटवा नदीच्या दक्षिणेस आहे. (जदुनाथ सरकार)

या आपत्तिकारक पराभवाचा सूड बुंदेले मंडळींवर तावडतोब उगवणे मात्र शक्य झाले नाही. त्यावेळी जोधपूरचा राजा अजितसिंग याने अजमेरवर आक्रमण केले होते आणि अजमेर शहर त्याच्या तावडीतून वाचविणे भाग होते. मुघलांची सगळी शक्ती केवळ याच कारणाकरिता खर्च होत होती. अखेरीस इ. १७२३ च्या शेवटी शेवटी अजितसिंगाने सलोख्याची भाषा काढली; आपला सर्वात थोरला मुलगा अभयसिंग याला दरबारास पाठविले. या मोहिमेत मुहम्मदखानाने भाग घेतला होता. तो अभयसिंग या राजकुमारासह दिल्लीला परतला. या काळात मुघल प्रदेशावर आक्रमण करणे छत्रसालाने चालूच ठेवले होते. म्हणून अल्लाहाबाद या आपल्या सुभ्याच्या राजधानीला जातीने जाण्याचा तसेच बुंदेलखंडाविरुद्ध जातीने मोहीम करण्याचा हुकूम त्याला झाला.

ही पहिली मोहीम निकाली अशी ठरली नाही. अल्लाहाबाद येथे दोन महिने तळ दिल्यावर मुहम्मदखानाने पंधरा हजार घोडेस्वारांची फौज उभी केली. दुआबातील भोगनीपूर या ठिकाणी त्याने आपली छावणी ठोकली. अखेरीस यमुना पार करून तो बुंदेलखंडात शिरला. सहा महिनेपर्यंत दिलेल्या लढतीच्या जोरावर तो साहेंदा या बांद्याच्या दक्षिणेस १२ मैलांवर असलेल्या ठिकाणापर्यंत आत घुसला. निजामुलमुल्काने मुबारिजखानाच्या केलेल्या पराभवामुळे (११ ऑक्टोबर १७२४) दिल्ली दरबारला चांगलाच धसका बसला होता. परिणामी, दरबारचे बळ एकत्रित करून ठेवण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार मुहम्मदखानाला दरबारी परतण्यास सांगितले. सलोख्याच्या जमतील तेवढ्या चांगल्या अटी पदरात पाडून मुहम्मदखान दिल्लीस परतला. त्या वेळी त्याला ग्वाल्हेरला पाठविण्याचा हुकूम झाला. कारण मराठे ग्वाल्हेरवर चाल करीत येण्याचा धोका निर्माण झाला होता. मुहम्मदखान गैरहजर होताच बुंदेले मंडळींच्या कारवाया पुन्हा सुरू झाल्या. मुहम्मदखानाने जी काही पकड बुंदेलखंडावर बसविली असेल. ती बुंदेल्यांनी पुन्हा होती का नव्हती अशी करून टाकली. बघेलखंड त्यांनी पादाक्रांत केला. पटणा सुभ्याच्या अगदी सरहद्दीपर्यंत जाऊन ते थडकले.

इ. १७२६ च्या अखेरीच्या सुमारास आपल्या सुभ्यातील बुंदेलखंडाच्या भागात बंदोबस्त करण्याचा हुकूम मुहम्मदखान याला झाला. त्यासाठी दरमहा २ लाख रुपयांचा भत्ता त्यास दिला. नंतर या भत्त्याचे चकला कुराच्या जहागिरीत रूपांतर केले. १७२७ फेब्रुवारी ३, रोजी त्याच्या आघाडीच्या फौजेने अल्लाहाबादच्या नजीक कोठेतरी यमुना ओलांडली. हाती घेतलेल्या पहिल्या कामगिरीत बुंदेलखंडाच्या पूर्वभागाचा बंदोबस्त झाला. तराहवन हे ठिकाण मात्र अपवाद झाले. येथील वेढा चालू ठेवण्याचे काम आपला सर्वात थोरला मुलगा काइमखान याजवर सोपवून मुहम्मदखानाने सहेंदापासून ४ कोसांच्या आत असलेल्या एका ठिकाणी तळ दिला. भेंड, मौदा, पैलानी, आगवासी आणि सिमनी [२०] हे परगणे

२० तराहवन हे बांद्याच्या पूर्वेला ४२ मैलांवर आणि करवी पासून २ फर्लांगांवर आहे. भेंड म्हणजे बहुधा बेंडा. हे बांद्यापासून २२ मैलांवर आणि पैलानीपासून १४ मैलांवर एक खेडेगाव आहे. (नॉर्थ-वेस्ट प्रॉव्हिन्स गॅझेटिअर खंड एक, ३९०) किंवा भेंर (भेयर)? मौदा बांद्याच्या वायव्येस २० मैलांवर. पैलानी बांद्यापासून २० मैलांवर. आगवासी=औगासी बांद्यापासून ईशान्येस २८ मैलांवर आणि यमुनेच्या दक्षिण किनाऱ्यावर सिमनी बांद्याच्या ईशान्येस १८ मैलांवर. इजोली=चौली हे बांद्याच्या वायव्येस ११ मैलांवर जैतपूर हे महोबाच्या पश्चिमेस २० मैलांवर (जदुनाथ सरकार).

त्याच्या कब्जात आले. काइमखानाने चढविलेल्या हल्ल्यामुळे तराहवनदेखील १७२७ डिसेंबर २२ रोजी सर झाले.

शत्रूला पश्चिम बाजूला चेपत नेण्याची कामगिरी चालू असता महोबा परगण्यातील इजोली गावी त्याची अखेर शत्रूशी गाठ पडली. इथे १७२७ मे २२ रोजी तो शत्रूवर जाऊन घसरला. शत्रूने मोर्चेबंदी केली होती. हल्ल्यात अनेक सैनिक मृत व जखमी होऊन दोन्ही पक्षांची मोठी हानी झाली. छत्रसाल, त्याचे मुलगे आणि त्याचे नातू यांनी पलायन केले. साल्हटच्या जंगलात त्यांनी आसरा घेतला. हे जैतपूरच्या दक्षिणेस आहे[२१] हा सगळा मुलूख नैसर्गिक अडचणींनी भरलेला आहे. त्यामुळे पाठलाग करणे अवघड होऊन बसले. १७२७ जून १८ रोजी म्हणजे पहिल्या लढाईनंतर २७ दिवसांनी शाही फौजा शत्रूच्या नव्या ठिकाणाकडे कूच करीत गेल्या. दुसऱ्याच दिवशी १७२७ जून १९ पहाटेच्या जरा अगोदर, हल्ला चढविला. पण मुसलमानी फौजा बुंदेले फौजांना जाऊन भिडण्या-पूर्वीच फळी फोडून महोबाला पळून गेले. तेव्हा, बाडीगड आणि लौरी-झुमर हे किल्ले कब्जात घेतले. पैकी पहिला महोबापासून १० मैलांवर आणि दुसरा आग्नेयीस १६ मैलांवर आहे. महोबापासून दोन मैलांवर मुसलमानांनी आपला तळ टाकला. पावसाळ्याचे पाच महिने त्यांनी याच ठिकाणी काढले. इथली जमीन पावसाळ्यात अशी निसरडी बनते की पावलापुढे पाऊल टाकणे अशक्य होऊन बसते. [ शाकीरचे गुलशन-इ-सादिक. ]

इ. १७२७ नोव्हेंबर मध्ये चढाईच्या कामाला पुन्हा सुरुवात झाली. शत्रूच्या डोंगरातील मोर्च्यांवर सबंध दिवसभर हल्ले चढविले. पण त्यांचा फारसा परिणाम दिसला नाही. तथापि सूर्य मावळण्याच्या सुमारास मात्र बुंदेले-मंडळींनी हार खाल्ली. नंतर चार एक महिन्यांचा खळ पडल्याचे दिसते. या काळात मुहम्मदखान वारंवार दरबारास विनंतीपत्रे लिहून आणखी द्रव्याची व फौजांची मागणी करीत होता. १७२८ एप्रिलमध्ये धुमश्चक्रीस पुन्हा तोंड फुटले. इ. १७२८ एप्रिल २९ रोजी कुल पहाड ( महोबाच्या पश्चिमेस १४ मैलांवर ) येथे शत्रूने उभ्या केलेल्या नव्या मोर्च्यांवर मुसलमानांनी हल्ला चढविला. बचावाच्या एका मागे दुसरी अशा सात फळ्या त्या वेळी कामगिरीवर होत्या. दुसऱ्या दिवशी मुसलमान सेनापती मुंढारी येथे जाण्यास निघाला. हे ठिकाण जैतपूरच्या पूर्वेस चार मैलांवर आहे. इथला किल्ला ताब्यात घेतला. मुसलमानी फौजांनी आता कुल-पहाडच्या समोरच्या बाजूला, जैतपूर उजव्या बाजूला ठेवून आणि त्याच दिशेने मुंढारी थोडीशी बाजूला ठेवून, नवी जागा व्यापली. साल्हटचा डोंगराळ भाग त्यांच्या डाव्या बाजूस होता. तो पुढे शत्रूने व्यापला. अखेरीस अझनर या जैतपुराहून दक्षिणेस ६ मैलांवर असलेल्या डोंगराळ भागात बुंदेल्यांनी आश्रय घेतला. तेव्हा खुद्द जैतपूरलाच वेढा घालणे सुरू झाले. आता पावसाळा सुरू झाल्यामुळे मोहिमेची प्रगती मंद झाली. सर्द हवेमुळे पेरलेले सुरुंग उडत नव्हते. १७२८ डिसेंबरमध्ये, अखेर ती गढी वेढा घालणाऱ्यांच्या हाती पडली. येवढे होईतो ही मोहीम सुरू होऊन २४ महिने उलटले होते. ( १७२७ जानेवारी ते १७२८ डिसेंबर ).

---

२१ साल्हट डोंगर जैतपूरच्या थेट पूर्वेस ( दक्षिणेस नव्हे ) ९ मैलांवर व जैतपूर आणि महोबा यांच्या मध्यावर आहे. ( जदुनाथ सरकार )

## ७५ : मुहम्मदखानाचे लढ्याबाबत खलिते

जैतपूरला वेढा घालण्याच्या कामाची पूर्वतयारी करीत असताना ज्या काही झटापटी झाल्या त्या विषयी हकीकत खुद्द मुहम्मदखान यानेच बादशहाला पाठविलेल्या अहवालात दिली आहे. ( शाकिरचे गुल्शन )–" शत्रू बुंदेलखंडाच्या डोंगरातून बाहेर पडला व आपले मराठा व जाट भाईबंद येण्याची वाट पहात थांबला. पहिली मजल मारत असताना व जैतगढापासून [२२] आम्ही चाळीस मैलांवर असताना पहिला विजय आमच्या पदरात पडला. चालू वर्षाच्या (११४०') शाबान महिन्यांच्या १४ तारखेला छत्रसाल, बुंदेले मंडळींचा एक फौजफाटा घेऊन सुनी गावापर्यंत चढाई करीत आला. येथे त्यांनी खेडुतांची मालमत्ता आणि गुरेढोरे यांची लुटालूट केली. माझे कित्येक लोक रसद मिळविण्याच्या कामी बाहेर गेले असूनसुद्धा व माझी फौज थोडीशीच उरलेली असतानाही, अगदी थोड्या दिवसापूर्वी, दिलेरखानास काय झाले याची आठवण ठेवून, मी कसलीही दिरंगाई न करता स्वार झालो आणि ६ कोस (म्हणजे सुमारे १२ मैल) रपेट मारून शत्रूच्या सामने खडा झालो. त्यांनीदेखील आपल्या सैन्याची लढाईच्या दृष्टीने मांडामांड केली, धनुष्यबाण आणि तोड्याच्या बंदुका यांनी हल्ला करण्यास त्यांनी सुरूवात केली. ते आपल्या जागेवर पक्के पाय रोवून उभे होते. दोन्ही पक्षांनी पुष्कळ शर्थ केली; पुष्कळ जण जायबंदी झाले. मी माझा घोडा गमावला. नंतर मात्र शत्रूने नमते घ्यावयास सुरूवात केली. आम्ही ६ कोस पाठलाग केला. कित्येक मुंडकी उडविली. कित्येक घोडे, निशाणे आणि हत्यारे आमच्या हाती पडली. या अगोदरच्या अहवालात, अगदी पूर्वीच मी तपशीलवार माहिती दिली आहे,''

"या झटापटीनंतर आम्ही पायी, एका पाठोपाठ एक मजला मारीत, शत्रूच्या दगडी किल्यापाशी येऊन पोहोचलो. इथे मंगलखान आणि भरेखान मला येऊन मिळाले. आमच्या संयुक्त फौजांनी शाबान महिन्याची २९ वी तारीख (१७२८ एप्रिल ९) किल्ल्याच्या पायथ्याशी घालविली. शुक्रवारी रात्री मसलती झाल्या. पाण्याची शाश्वती राहावी म्हणून किल्ल्याच्या दक्षिणेला ६ मैलांवर असलेल्या एका छोट्या नाल्याच्या किनाऱ्याकडे जावे असे आम्ही ठरविले; मोहीम लांबणीवर टाकावी असे काही जणांचे म्हणणे पडले. आम्ही इच्छित स्थळी पोहोचलो. तेव्हा शनिवारची एक टेहळणी पूर्ण झाली होती. आमच्या छावणीची जागा आम्ही अजून निश्चित केली नव्हती. कूच चालू असताना, नेहमीप्रमाणे आमचे लोक जरासे पांगलेलेच होते. माझ्या भोवती काही चेले स्वार घेऊन मी शत्रूची टेहळणी करीत उभा होतो."

"अकस्मात छत्रसालाच्या सर्वात थोरल्या मुलाच्या नेतृत्वाखालची बुंदेले मंडळींची आघाडी आम्हास दडपण्यासाठी चालून आली. मी ताबडतोब मंगलखान आणि त्यांचे काही लोक यांना छावणीच्या जागेवरून बोलावून घेतले. या लोकांसह मी माझी डावी फळी बनविली. भुरेखान आणि त्यांचे लोक यांना मी आघाडीस धाडले; तर सरदारखान शमसुद्दीनखान आणि रुस्तमखान यांना उजव्या फळीवर ठेविले. येवढे होईतो शत्रूने मोठ्या संख्येने जमावजमव केली. त्यांनी आपले कित्येक गट पाडले. त्या सर्वांनी मला आणि माझ्या लोकांना पूर्ण वेढले. फौजेच्या मध्य फळीशिवाय तिच्या भोवती शत्रूने तीन

२२ जैतपूरच्या किल्ल्याचे नाव सुनीसुनदी नांवाचे ठिकाण जैतपूरच्या उत्तरेस पन्नास मैलांवर आणि काल्पीच्या नैर्ऋत्येस १२ मैलांवर पण बेटवा नदीच्या उत्तरेस आहे. ( ६९ अंश ईशान्य ). ( जदुनाथ सरकार )

वेढे (दौर) ठेविले होते. त्यांचा एक वेढा १०७ जरीब मापाचा होता. त्यांची सगळी फौज ४५ हजार असावी असा आम्ही अंदाज केला. शत्रूच्या तळावरील माणसांनी आणि आसपासच्या जमीनदारांनी सांगितलेल्या माहितीप्रमाणे खुद्द छत्रसाल आपल्या सर्व भाईबंदासह व मुख्य लोक यांसह जातीने हजर होता; त्याच्या या शेलक्या लोकांची संख्या ३७ होती. जाटही त्याचा तोफखाना आणि सैन्य यासह हजर होता."

"आपल्याकरिता आता मेजवानीच वाढून ठेवली आहे असे शत्रू समजला. पण त्या मेजवानीवर हात मारता न येताच शत्रूला परतावे लागले. सूर्य माध्यानी आला तशी धुमश्चक्री रंगू लागली. बाण आणि बंदुकीच्या गोळ्या यांचा वर्षाव होऊ लागला. बाण, तोफगोळे आणि तोडच्याच्या बंदुका यांची सरबत्ती यांमुळे आकाशातून जणू गारपीटच होत आहे असे वाटत होते. नंतर शत्रू आमच्या दिशेने चालून आला. पण आम्ही आमची जागा सोडली नाही. मी माझा तोफखाना मागविला. माझ्या मीर आतिशला तोफखान्यासोबतच्या घोडेस्वारांना पायउतारा होण्याचा हुकूम देण्यास सांगितले. त्यांना छत्रसालाच्या उटावर हल्ला करण्यास फर्माविले. अशा प्रकारे शत्रूला तोडच्याच्या बंदुका आणि बाण (रॉकेट) यांच्या मार्‍यात आणले. या बाजूने आपली डाळ शिजत नाही हे पाहाताच त्यांची सगळीच्या सगळी फौज, तिच्या सर्व भागांसह, आमच्या उजव्या अंगाला वळली. ते आमच्या छावणीनजीक आले. आमच्या तंबूची लुटालूट करण्यास आणि आमच्या चाकरांशी हाणामार करण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यांच्या आणि आमच्या संख्येत जमीनअस्मानाची तफावत होती. आमचा बाडबिस्तरा शत्रूच्या तावडीतून वाचविण्याचा खटाटोप करणे व्यर्थ आहे असे मला आढळून आले. आमचा विजय होणार की आमचा मृत्यू घडणार याची जेथे आम्हाला भ्रांत होती तेथे आमच्या चीजवस्तूंचा निकाल लागणे या गोष्टीची आम्हास कसली चिंता वाटणार? सर्वांच्या पालनकर्ता असलेल्या ईश्वराचा धावा आम्ही केला आणि आमचे प्रयत्न चालू ठेवले."

"नंतर शत्रूच्या तीन मजबूत सैन्यफळ्या एकत्र आल्या आणि आमच्या उजव्या फळीला झोडपू लागल्या. त्यांच्या हल्ल्याला तोंड देता देता आमचे कित्येक लोक कामास आले. त्यामुळे आमची फळी नमते घेऊ लागली. पण मंगलखान आणि भुरेखान जायबंदी झालेले असूनसुद्धा रणांगणात पाय रोवून राहिले. शत्रूशी मुकाबला करण्यात यश येत आहे असे दिसताच आम्हाला हुशारी आली. त्या शूर लोकांनी प्राणांची आहुती दिली; पण शत्रूस तसूभर जागा घेऊ दिली नाही. आणखी थोडा काळ असाच जाता तर कदाचित विजय शत्रूच्या पदरी पडला असता. अशावेळी खर्‍या नायकाला जे शोभते तेच मी केले. शिपाईगडी म्हणून माझा लौकिक काय आहे आणि खाविंदांच्या चाकरीवर माझी किती निष्ठा आहे या गोष्टी मी मनात आणल्या. करावयाची उरलेली एकच गोष्ट आता बाकी होती व ती म्हणजे रणांगणात जातीने उतरणे व सैनिकाप्रमाणे लढणे."

"सूर्य मावळण्यास दोन तासांचा अवधी असता, मी आमच्या डाव्या फळीतील, एके ठिकाणी, आघाडीसमोर माझा सर्व तोफखाना जमविला. माझे मोजकेच पण उत्तमोत्तम घोडेस्वार सोबत घेऊन मी माझा हत्ती तडक शत्रूच्या भाऊगर्दीत आणला. येथे लढत असलेले माझे लोक शत्रूच्या हल्ल्यामुळे पार जेरीस आलेले दिसत होते. यावेळी शत्रूचे घोडेस्वार एका पाठोपाठ एक रपेट करीत आले; मोठ्या धिटाईने त्यांनी आपल्या घोड्यांना त्यांचे पुढचे दोन्ही पाय माझ्या हत्तीवर ठेवून उभे केले. अल्लाची मोठी खैर की त्या दोघांना आम्ही

आमच्या बाणांनी एका पाठोपाठ एक असे निकालात काढले. या समयी माझे सगळे साथीदार आणि चेले यांनी आघाडीत अद्‌भुत शौर्य गाजविले. कित्येकांना तर जखमावर जखमा झाल्या. अशी प्रयत्नांची शर्थ केल्यावर, आम्ही आमच्या समोरची शत्रूची फौज पिटाळून लावली. तेवढ्यात आमच्या उजव्या अंगाला शत्रूचा जबर फौजफाटा नव्याने उभा ठाकला. हा हल्ला देखील परतवून लावण्यात आम्हाला यश आले. तिसऱ्याने शत्रू डाव्या अंगाला उपटला. पण त्याने लौकरच माघार घेतली. चौथ्याने एकसंघ समूहानिशी त्यांनी हल्ला चढविला. त्यावेळी झालेल्या लढाईतील आणि कत्तलीतील घनघोरपणाचा तपशील या छोट्या अहवालात देता येण्यासारखा नाही. पण अल्लाची कृपा आणि खाविंदांचे नशीब बलवत्तर म्हणून शत्रूने अखेर माघार घेतली."

"शत्रू माघार घेत असताना आम्ही शत्रूला चेपत राहिलो. माघार घेणाऱ्या शत्रूच्या पाठलागासाठी आम्ही पथके पाठविली. या पथकांनी बजावलेल्या कामगिऱ्या उल्लेखनीय ठरल्या. कामगिऱ्या बजावून ती पथके परत माझ्या मुख्य फौजेला येऊन मिळाली. छत्रसालच्या हत्तीला दोन बाण लागले. त्यामुळे तो जखमी झाला व रणांगणातून पळाला. त्याचा व त्याच्या फौजेचा आम्ही चार-पाच मैल पाठलाग केला. तोफा, तोफगाडे आणि हातनाळा ही आमच्या कामगिरीची बक्षिसी समजून, आम्ही शत्रूच्या या वस्तू आमच्या कब्जात घेतल्या; शत्रूचे पुष्कळ लोक ठार झाले; चौघडे आणि घोडे आमच्या हाती पडले. लढाईत आणि तळावर ठार झालेली माणसे वगळता आम्ही सात हजार जण पुन्हा एकत्र जमलो".

"या विजयानंतर मी तीन दिवस याच जागी थांबलो. सध्या मी जैतगढाकडे लक्ष ठेवून आहे. माझा पहिला अहवाल रस्त्यातच हरवला म्हणून मी हा दुसरा अहवाल पाठविला आहे. बुंदेल्यांच्या विरुद्ध विजय संपादण्याची हमी म्या, यःकश्चित् पामराने घेतली आहे. हा विजय माझे दैव उजळविणारा आहे. या विजयाद्वारे दैव मजवर जी खैर करील ती अन्य कोणत्याच गोष्टीमुळे मजवर होणार नाही."

मुहम्मदखान शत्रूला पश्चिमेच्या दिशेने चेपत असताना त्याचा सर्वात थोरला मुलगा कायिमखान याजवर, पूर्वबाजूचे तराहवन काबीज करण्याची कामगिरी सोपविली होती. त्याने १७२७ डिसेंबर २२ रोजी या जागेला वेढा टाकला. त्या वेढ्याची जोखीम एका अमलदारांवर सोपवून कायिमखान आपल्या बापास येऊन मिळाला. पण असे झाल्यावर लगेचच त्यांना खबर मिळाली की, बुंदेल्यांनी पुन्हा उठाव केला असून तराहवन शिबंदीवर त्यांनी हल्ला चढविला आहे. तेव्हा कायिमखानाला पुन्हा त्यांच्याविरुद्ध पाठविले. घोडेस्वार व पायदळ मिळून दहा हजार फौज त्याच्या सोबत दिली. पण तराहवन येथे तो पोहोचण्यापूर्वीच शत्रूने किल्ल्याचा बाह्य भाग सर केला होता. १७२८ ऑक्टोबर ४ रोजी कायिमखानाने किल्ला परत सर केला. एक महिन्यानंतर १७२८ नोव्हेंबर ११ रोजी एका मोर्चाखाली पेरलेला सुरुंग उडाला. त्यामुळे ते ठिकाण हल्ल्यास बळी पडले. तेव्हा मात्र कायिमखान मोहिमेत उतरला. त्याने पूर्वेस बाडगढपर्यंत[२३] बुंदेल्यांचा बंदोबस्त केला. जेव्हा १७२९ मार्चमध्ये मुहम्मदखानाच्या विजयमालिकेला अचानक पायबंद बसला तेव्हा देखील हा मुलगा याच कामगिरीवर असल्याने बापाच्या चाकरीत गैरहजर दिसतो.

२३ बहुधा, बाडीगढ; महोबाच्या अतिआग्नेयीस १० मैलांवर.

## ७६ : मुहम्मदखान बंगश याच्या मार्गात अडचणी येतात व तो माघार घेतो

जैतपूर येथील वेढा कायम ठेवून मुहम्मदखान याने दक्षिणेकडील टेकड्यांच्या भागात माघार घेत असलेल्या बुंदेले मंडळींना जेरीस आणण्याचे थांबविले नव्हते. १७२८ डिसेंबरमध्ये जैतपूर पडले. त्याच महिन्यात हरदेसाह आणि इतर छत्रसालचे मुलगे शरण आले. थोड्या वेळाने छत्रसाल पण शरण आला.[२४] ही मंडळी मुसलमानांच्या छावणीवर तीन-चार महिने मुकाट्याने राहिली. या कैदी मंडळींना दिल्लीस घेऊन येण्याचा प्रस्ताव मुहम्मदखानाने दरबारी पाठविला होता. त्याचे उत्तर येण्याची वाट ही मंडळी पाहात होती. परिस्थितीच्या रेट्यामुळे शाही सत्तेपुढे नमते घेणे, राजाला दरम्यानच्या काळात भाग पडले होते. ताब्यात असलेल्या सगळ्या जागा सोडून देण्यास आणि आपल्या सगळ्या मुलुखात शाही हत्यारबंद शिपायांची ठाणी उभी करू देण्यास तो कबूल झाला होता. दिल्लीहून काही उत्तर आले नाही. तीन महिन्यांचा काळ असाच उलटला. दिल्ली दरबारात अशी हकीकत पसरविणे चालू होते की, मुहम्मदखान आणि छत्रसाल यांनी हातमिळवणी करून राजवंश उलथून बादशाहाच्या जागेवर अफगाणास बसविण्याचा आपापसात करार केला आहे. ही अफवा खुळचटपणाची आहे हे खुद्द बुंदेल्यांनीच आपल्या वर्तणुकीने सिद्ध केले. बुंदेल्यांनी मुहम्मदखानाचा प्रतिस्पर्धी बुर्हानुल्मुल्क याजकडे शब्द टाकून पाहिला व त्यास बुर्हानुल्मुल्काचे उत्साहवर्धक उत्तर आले. इतर दरबारी मनसबदारांचीही पत्रे आली; त्यात प्रतिकार चालू ठेवण्याचा आणि लढा पुन्हा सुरू करण्याचा आग्रह त्या मनसबदारांनी केला. या प्रकारामुळे, मुहम्मदखानाला किती प्रबळ शत्रू आहेत याची जाणीव बुंदेले मंडळींना होऊन सामना पुन्हा चालू करण्यासाठी त्यांना धीर आला. १७२९ फेब्रुवारीमध्ये हिंदूचा, होळीची धामधूम उडवून देणारा सण जवळ आला होता. म्हाताऱ्या छत्रसालाने त्याचे निमित्त केले आणि होळीचा सण साजरा करण्यासाठी मुसलमानांच्या तळाच्या दक्षिणेस सहा-सात मैलांवर असलेल्या जागी जाऊन राहाण्याची मुभा त्याला मिळाली.

मुहम्मदखान विनाकारण निर्धास्त बनला होता. या निर्धास्तपणामुळे त्याच्या हालचालींना एकप्रकारची सुस्ती आली होती. आपल्या फौजेतील बऱ्याच लोकांना त्याने रजेवर जाऊ दिले होते आणि त्याचे बरेचसे सैनिक त्यानेच स्थापन केलेल्या, ठिकठिकाणच्या हत्यारबंद ठाण्यांच्या ठिकाणी तुकड्या तुकड्या होऊन विखुरले होते. त्याचा सगळा फौजफाटा चार हजारापेक्षा जास्त भरत नव्हता. यावेळी मराठ्यांचे आक्रमण होणार असल्याची अशुभ अफवा त्याच्या कानांवर आली. या मराठ्यांनी अगदी अलीकडेच, म्हणजे १७२८ डिसेंबर ८ रोजी, माळव्याचा शाही सुभेदार गिरिधर बहादुर याचा पराभव करून त्यास ठार मारले होते. पण बुंदेले मंडळींबरोबर झालेल्या ठरावावर मुहम्मदखान पक्का विश्वासून होता. मराठ्यांकडून धोका आहे असे कोणी सुचविले तर त्याची तो अतितुच्छतापूर्वक वाट लावी. साहजिकच त्याने कसली सज्जता ठेवली नाही.

२४ वारिद म्हणतो की छत्रसालाने आपला मुलूख वाचविण्यासाठी मुहम्मदखान याला चाळीस लाख रुपये दिले.

## ७७ : छत्रसालाच्या मदतीसाठी बाजीराव बुंदेलखंडात येतो

मराठे मंडळी मुहम्मदखानाच्या छावणीच्या परिसरात दोन ते वीस मैलांवर येऊन ठेपली, तेव्हा कोठे मराठे नजीक येत असल्याच्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास तो राजी झाला. आता मोठमोठ्या अडचणींना तोंड देत त्याने आपले नऊ हजार सैन्य उभे केले. तो मोच उभारून बसला. स्वारीवर आलेल्या मराठे मंडळींचे नेतृत्व पेशवा बाजीराव याजकडे होते. त्याच्या सोबत पिलाजी जाधव वगैरे इतर नावाजलेले मराठे सरदार होते. बाजीराव आपल्या सैन्यासह पुढे सरकू लागला तेव्हा अनेक असंतुष्ट जमीनदार त्याला येऊन मिळाले. त्यामुळे त्याची फौज सत्तर हजारावर फुगत गेली.[२५] मराठे प्रथम दिसले ते १७२९ मार्च २२ रोजी, मुसलमानांच्या छावणीपासून जेमतेम दोन मैल अंतरावर. पण रानात चरत असलेल्या गुरांना हाकून नेण्यासाठी आलेल्या मराठ्यांच्या छापेमारांना लवकरच हुसकून लाविले. दुसऱ्या दिवशी मराठे डाव्या व उजव्या अंगांनी छावणीच्या पिछाडीस चढाई करीत आले त्यावेळी वैरणीचे भारे घेऊन येण्यासाठी उंट आणि तट्टे सोडत होते. ती त्यांनी अलग पाडली. २५ तारखेला मुहम्मदखानाने एक छापा टाकला. पण त्याचा कसलाही चिरस्वरूपाचा फायदा झाला नाही. हळूहळू मराठ्यांनी छावणीला घेरले. सगळ्यांना लागणारे धान्य वीस रुपये शेराच्या भावाने विकू लागले. इतर धान्ये गडप झाली. जवळजवळ दोन महिने मुसलमानांनी उंट, घोडे आणि गायी यांच्या मांसावर काळ कंठला.

मे महिन्याच्या मध्यास, वडील संकटात असल्याचे तराहूवन येथे कळल्यावरून कायिमखान जैतपुरापासून ईशान्येस १२ मैलांवर असलेल्या सुपा या गावी दाणादारू आणि कुमक आणण्यासाठी येऊन पोहोचला. त्याला वाटेतच गाठण्यासाठी मराठी फौजेचा एक भाग जागचा हलला.[२६] उद्भवलेल्या संधीचा फायदा घेण्यासाठी वेढ्यातल्या शिपायांनी जैतपूर गाठण्यासाठी छावणीबाहेर पडून रीघ लावली. मुहम्मदखानाजवळ हजारापेक्षा जास्त असामी उरले नाहीत. बुंदेले मंडळी आपल्या डोंगरातल्या लपावयाच्या जागा सोडून खाली आली, तेव्हा मुहम्मदखानाने चिटपाखरूही मागे न ठेवता छावणी सोडली. दोन असमान संख्याबळाच्या पक्षातील चकमक तीन तास चालली. आपली अब्रू वाचली हे पाहून मुहम्मदखान जैतपूरपर्यंत माघार घेण्यास कबूल झाला.

जैतपूरला पोहोचल्यावर मुहम्मदखानाने, ते ठिकाण शक्य तेवढे सुरक्षित केले. पण दाणागोटा नव्हता. तो पैदा करून आणण्यास वेळही नव्हता. कायिमखानाचा पराभव करून मराठे परतले तेव्हा त्यांनी शहर आणि किल्ला यांना वेढा घातला. मुहम्मदखानाने या ठिकाणी माघार घेतलेलीच होती. वेढा घालणारे, आपले पाणी तेथे दाखवू शकले नाहीत

२५ मराठे आणि छत्रसाल यांच्या युतीचे वर्णन सरदेसाई खंड दोन, ३८४ आणि तदनंतरची पृष्ठे यात आहे (जदुनाथ सरकार)

२६ कायिमखानाला कसे पिटाळले या विषयीचे वर्णन पिलाजीने जाधवाने लिहिलेल्या एका मराठी पत्रात पुढीलप्रमाणे आले आहे : " शव्वाल ९ रोजी ( ७ मे १७२९ ) कायिमखान तीस हजार लोकांसह आम्हांवर चालून आला. आम्ही त्याशी ( सुपा ) येथे लढत दिली. देवाची कृपा होऊन आम्ही त्याचा पराभव केला. आम्ही तीन हजार घोडे आणि तेरा हत्ती पकडले. हत्तीपैकी दोन हत्ती अंताजी माणकेश्वर आणि दावलजी सोमवंशी सरलश्कर यानी घेतले असून बाकीचे मजजवळ आहेत." ( राजवाडे, खंड तीन, क्रमांक १४ ). (जदुनाथ सरकार)

तेव्हा वेढ्यात पडलेल्यांची उपासमार घडवून आणून त्यांना शरण येण्यास भाग पाडावे असे त्यांनी ठरविले. गेले चार महिने या किल्ल्यावरच्या शिबंदीला अतिशय केविलवाण्या अवस्थेत काळ कंठावा लागला होता. तोफा ओढणारे बैल आणि शिपायांचे घोडे यांचे मांस येवढेच काय ते अन्न त्यांना खावयास मिळत होते. शेराला शंभर रुपये मोजून देखील आटा पैदा करता येत नव्हता. उपासमारीमुळे कित्येक जण दगावले, कित्येक जण मोहीम सोडून चालते झाले. जी मंडळी आपली शस्त्रे हवाली करतील त्यांना जाऊ देत होते. (वारिद ११ब, खुशहाल १०४९–११५२.)

परिस्थिती इतकी आपत्तिजनक झाल्याने मुहम्मदखानाने बादशाह आणि इतर मोठे उमराव यांना आवाहन केले व या जबाबदारीतून आपणास मुक्त करावे अशी प्रार्थना केली. बादशाहाने तर प्रथम बक्षी खान दौरान समसामुद्दौलह यास जैतपूरला जाण्याचा हुकूमही केला. पण या उमरावाच्या बाबतीत जे नेहमी घडे त्यानुसार त्याने वचने फार दिली पण त्याच्या हातून कृती काही घडली नाही. त्याचे आघाडीचे तंबू भपकेबाज समारंभानिशी दिल्ली शहराच्या तटाबाहेर रवाना झाले. पण या प्रकरणी यापेक्षा जादा असे एकसुद्धा पाऊल त्याने उचलले नाही. उचापती करणे, विश्वासघात करणे आणि सबबी सांगणे हेच त्याचे सर्वस्व असल्याने, तो रोज सायंकाळी आपले प्रस्थान सकाळपर्यंत पुढे ढकली व प्रत्येक सकाळी ते सायंकाळपर्यंत पुढे ढकली. नंतर बेदिली माजावी म्हणून त्याने बुंदेले मंडळींना पत्र लिहिले की, 'विचारशून्य बादशाह' मुहम्मदखानाच्या मदतीसाठी फौज पाठविण्याच्या खटाटोपात आहे. तो इतक्या थराला गेला असे सांगतात की, त्याने छत्रसालास सुचविले की, मुहम्मदखान आता तुझ्या तावडीत सापडल्याने, यावेळी तू त्याला ठार मारले नाहीस तर नशिबाने तुला दिलेला हात तू पार झिडकारुन टाकल्यासारखे होईल. मुहम्मदखानाचे मुंडके बादशाहाच्या पायाशी वहाण्यासाठी तू घेऊन आलास तर ती भेट स्वीकारली जाण्यासारखी आहेच; शिवाय ही भेट पाठविणाऱ्याला उच्चस्थान आणि इनामदेखील मिळेल. इकडे, खान दौरानने बादशाहाच्या मनावर असे बिंबविण्याचा प्रयत्न केला की, मुहम्मदखान हा अफगाण सेनानी फार यश संपादित गेला तर तख्तास त्याचा धोका आहे. (वारिद, ११ब.)

सुपा येथून हुसकून लावल्यानंतर आपला बाप आणि वेढ्यात अडकलेली शिबंदी यांना कसलीही कुमक तातडीने घेऊन जाण्याची सगळी आशा दुरावली आहे असे समजणे कायिमखानाला भाग पडले. जमले तर, इतर उमरावांकडून काही फौजफाटा मिळतो का ते पाहावे असे त्याने ठरविले. सगळ्यात अगोदर, फैजाबाद येथे अयोध्येचा सुभेदार बुर्हानुलमुल्क याची त्याने भेट घेतली. येथे त्यास मदत देऊ करण्याचे बाजूलाच राहून त्यास पकडण्याचा घाट ठरला. या चालबाजीचा अयोध्येच्या चाकरीतील अफगाणांना इतका संताप आला की, शाहजहानपूर येथील पठाणवस्तीवर कायिमखानाचे कूच झाले असता, हे संतापलेले बाराशे अफगाण अनुयायी त्याला येऊन मिळाले. कायिमखान नंतर बाणगढचा[२७] अली मुहम्मदखान रोहिला याच्या भेटीस गेला. या शासकाने मदत केल्यामुळे आणखी फौज भरती करण्यात आली. मऊ शम्सावाद या स्वगृही परतल्यावर (हे फर्रुखाबाद जिल्ह्याच्या वायव्येस आहे) त्याने सावकारांकडून कर्ज उभे केले. आपल्या वडिलांची सगळी चीजवस्तू गहाण टाकली. अशाप्रकारे तीस हजार लोकांची भरती करण्यात तो यशस्वी झाला.

२७ बदायूनच्या उत्तरेला सुमारे १० मैलांवर.

## ७८ : मुहम्मदखानाची बुंदेलखंडातून अखेरची माघार, १७२९

दरम्यानच्या काळात जैतपूरचा वेढा कडक ठेवण्यात आला होता. त्यामुळे शिबंदीच्या हालअपेष्टांना सीमा उरली नव्हती. नंतर मराठ्यांच्या तळावर रोगराई सुरू झाली. हजारो मराठे या रोगराईस बळी पडले. शिवाय पावसाळा येऊ घातला असल्याने आपल्या मुलखास परतण्याची त्यांची दर वर्षाची वेळही झाली होती. या रोगराईमुळे झालेल्या प्राणहानीमुळे धसका बसल्याने म्हणा अगर घरी परतण्याच्या आतुरतेने म्हणा, मराठ्यांनी वेढा उठविला व दक्षिणेची वाट धरली. तरी छत्रसालाने किंचितही विचलित न होता वेढा चालू ठेवला. त्यासाठी त्याच्याजवळ वीस हजार लोक उरले होते. असेच आणखी काही दिवस उलटले. तेव्हा वेढ्यात पडलेले आणि वेढा घातलेले अशा दोघांचीही चांगलीच दमछाक झाली. कायिमखानानेही यमुना ओलांडली व आपल्या बापाची सुटका व्हावी म्हणून तो घाई करीत होता. आता सलोखा करणे अधिक शहाणपणाचे आहे असा विचार छत्रसाल आणि त्याचा परिवार यांनी केला. त्यानुसार, आम्हावर पुन्हा हल्ला चढवू नका, आम्ही आपणास यापूर्वी जो नजराणा दिला त्यावर संतोष माना अशा आशयाच्या लेखी ठरावावर स्वाक्षऱ्या घेऊन, मुहम्मदखानाला जैतपूर खाली करून जाण्याची मुभा बुंदेल्यांनी दिली. (१७२९ ऑगस्ट) बापाशी भेट झाल्यावर कायिमखानाने प्रस्ताव केला की बुंदेल्याबरोबरचा सामना आपण पुन्हा चालू करू या. पण दिलेला शब्द मोडण्यास मुहम्मदखानाने नकार दिला. त्यांनी काल्पी या ठिकाणी इ. १७२९ ऑक्टोबर ३ रोजी यमुना नदी पुनश्च ओलांडली. तद्नंतर मुहम्मदखान बुंदेलखंडात पुन्हा कधीही आला नाही. ११४४ (१७३१ जुलै–१७३२ जून) मध्ये त्याच्या अल्लाहाबादेच्या सुभेदारपदाच्या जागेवर त्याच्याऐवजी सरबुलंदखान याची नेमणूक झाली. (वारिद ११-१३.)

दाखविलेल्या दोस्तीबद्दलचे इनाम म्हणून मराठ्यांना छत्रसालाकडून त्याच्या मुलुखाचा एक तृतीयांश भाग मिळाला. अशाप्रकारे मराठ्यांना देण्यासाठी बाजूस केलेले परगणे बुंदेलखंडाच्या दक्षिणेस व पश्चिमेस होते व त्यापासून ३०,७६,९५३ रुपयांचा किंवा अंदाजे ३ लक्ष पौंडांचा वार्षिक महसूल गोळा होतो असे सांगतात.[२८] लवकरच शेजारच्या आपल्या बुंदेले मंडळीशी मराठ्यांची बाचाबाची झाली. ती करणारे बुंदेले मूळच्या बुंदेलखंडातील वोडसे येथील होते. तेथला राजा उदोतसिंग याशी लढताना मल्हारराव होळकर याचा एक भाऊ पिरभूजी हि. ११४४ च्या जिल्काद महिन्यात (१७३२ एप्रिल-मे) ठार झाला.

राजा छत्रसाल पन्ना या ठिकाणी १७३१ डिसेंबर १४ रोजी ८२ वर्षे वयाचा होऊन मरण पावला. त्याच्या मागे त्यास कित्येक मुले होती. पण हरदेसाह आणि जगतराज या दोन थोरल्या मुलांनी बापाचे राज्य आपसात वाटून घेतले. पहिला पन्नाचा राजा झाला. हा राजा लवकरच म्हणजे ११५१ हि. (एप्रिल १७३८–एप्रिल १७३९) मध्ये मरण पावला. दुसरा राजा जैतपूरचा राजा झाला. तो १७५८ साली मरण पावला.

धाकट्या भावांना राजपुतांच्या नेहमीच्या पद्धतीनुसार चरितार्थासाठी पदपरत्वे छोट्या छोट्या जहागिरी मिळाल्या. पन्ना संस्थानाचा गृहीत महसूल ३८,४६,१२३रु. तर जैतपूर संस्थानाचा ३०,७६,९५३ रु. होता. (पॉगसन १०५-११५.)

२८ बुंदेलखंडाची फाळणी, सरदेसाई, खंड दोन, ३८६. ( जदुनाथ सरकार )

## ७९ : मराठ्यांच्या माळव्यातील प्राथमिक कुरापती

हिंदुस्थानवर, म्हणजे नर्मदेपलीकडच्या भारताच्या मुलुखावर आक्रमण करण्याची मराठ्यांची जी काही योजना होती तीप्रमाणे सुबत्ता असलेल्या माळव्याचा प्रांत,[२९] खुद्द बाजीरावाने, आपले सावज म्हणून हेरला होता. आपली नेमणूक झाल्याच्या वर्षापासून (१७२० इ.) तो प्रतिवर्षी खानदेशाहून माळव्यात फौजतुकड्या धाडी. पण त्याने जातीने हजर राहून नर्मदा नदी इ. १७२४ च्या अखेरीस प्रथमच ओलांडली. सुरुवातीच्या काळात त्याचे माळव्यातील वास्तव्य वर्षाच रेंगाळलेले नसे. घरचे राज्यव्यवहार आणि निजामुल्मुल्काचे उपद्व्याप यामुळे दक्षिणेवरची आपली नजर त्याला हलविता येत नसे.

मागे आपण (प्रकरण-४, विभाग ३३) मध्ये पाहिलेच आहे की, फर्रुखसियरच्या कारकिर्दीच्या उत्तरकाळात मुहम्मद अमीनखान यास मराठ्यांच्या घुसखोरीपासून माळव्याचा बचाव करणे एवढ्या एकाच कामगिरीवर पाठविले होते. हुकूम नसताना तो दरबारी परत आला; यामुळे त्याच्या जागी निजामुल्मुल्काची नेमणूक झाली (इ. १७१९ मार्च १५). दरबारचे धोरण सारखे बदलत राहिल्याने निजामुल्मुल्काच्या जागीही, इ. १७२२ सप्टेंबर ९ रोजी, राजा गिरिधर बहादुर नागर याची नेमणूक झाली. सआदतखान बुर्हानुल्मुल्क याजसाठी जागा रिकामी व्हावी म्हणून राजा गिरिधर बहादुर याला अयोध्येच्या सुभ्यावरून माळव्यास बदलले होते. एक वर्षानंतर निजामुल्मुल्काची गृहदशा आणखी एकदा उजळली. त्याने आपला चुलत भाऊ अजीमुल्लाहखान याजसाठी गिरिधर बहादुर यास त्या जागेवरून हलविले. (इ. १७२३ मे २५) निजामुल्मुल्काने अयोध्या सोडली आणि तो दखनला पळून आला. तेव्हा माळव्याचा सुभा पुन्हा एकदा गिरिधर बहादुराकडे दिला (इ. १७२५ जून १२). (कामवर १९९.)

माळव्यावरील आपल्या कारभाराच्या सगळ्या मुदतीत गिरिधर बहादुराने मराठ्यांच्या चढाईच्या येणाऱ्या लाटांमागून लाटा थोपवून धरण्यासाठी शर्थीची झुंज दिली. माळव्यावरील हल्ल्यामुळे मराठ्यांचे दक्षिणेवरील लक्ष दुसरीकडे वळते; हा स्वार्थी हेतू मनात बाळगून, मराठ्यांच्या माळव्यावरील सतत होणाऱ्या हल्ल्यास निजामुल्मुल्काकडून गुप्तपणे उत्तेजन मिळे. उदाजी पवार, मल्हारराव होळकर आणि राणोजी शिंदे या बाजीरावाच्या सरदारांनी माळव्याचा सगळा मुलूख पादाक्रांत केला. या सामन्यात, नशिबाचे पारडे कधी इकडे तर कधी तिकडे झुके; पण रणांगणात कोणाचा का विजय होईना; सुभ्याच्या उत्कर्षाला ओहोटी लागणे अगदी स्वाभाविक झाले. शेवटी इ. १७२८ डिसेंबर ८ रोजी उज्जयिनीच्या परिसरात मराठ्यांनी गिरिधर बहादुराचा पराभव केला व त्यास ठार मारले. या मराठी फौजेचे

---

२९ माळव्यात आलेल्या मराठ्यांबाबतचा येथे आलेला हा इर्विनचा इतिहास संपूर्णपणे ग्रँट डफ आणि दि बंगश नवाब्ज ऑफ फर्रुखाबाद (ज. ए. सो. बे. मध्ये १८७८ इ. मध्ये प्रकाशित) यावर आधारलेला आहे. त्याने वापरलेल्या इतर निवडक लेखनकृतींचा नावनिशीवार उल्लेख होईल. संपादकाने जादाची म्हणून दिलेली माहिती मराठी अभ्याससामग्रीमधून घेतलेली आहे.

मराठ्यांनी माळव्यावर पहिली स्वारी केल्याची नोंद १६९० इ. (माल्कमचा सेंट्रल इंडिया, खंड एक, ६१ एन्) मधील आहे. इ. १६९८ मध्ये उदाजी पवाराने मांडव लुटले. पण त्याने ते ठिकाण कायम व्यापले नाही. ते काम बाळाजी विश्वनाथ याने पूर्ण केले. इ. १७९५ मधील एका मराठी पत्रात असा उल्लेख आला आहे की दावलजी सोमवंशी याने माळवा सर करण्याचा पहिला प्रयत्न केला. हे काम बाजीरावाचे मदतनीस असलेल्या शिंदे, होळकर आणि पवार यांच्या हिंमतीने पुष्कळच सोपे झाले. (सरदेसाई, खंड दोन, ३५५). (जदुनाथ सरकार)

नेतृत्व बाजीरावाचा भाऊ चिमाजी आणि उदाजी पवार यांकडे होते.[30] याचवेळी राव गुलाबराम आणि राजा आनंदराम हे त्याचे दोन नातेवाईकही प्राणास मुकले. गिरिधर बहादुराचा पुतण्या दया बहादुर याने काही काळ प्रतिकार चालू ठेवला; पण शेवटी त्याचाही पराभव झाला. हा पराभव तारलाजवळच्या लढाईत झाला. हे ठिकाण धारच्या नैर्ऋत्येस चार मैलांवर धार आणि आमझरे यांच्या दरम्यान आहे. या लढाईत तो आणि त्याचे दोन हजार सैनिक प्राणास मुकले. (सियर, खंड एक, ७९, तारीख-इ-मुहम्मदी.)

## * ८० : मराठ्यांनी माळव्यात पाय कसे रोवले? (मजकूर संपादकाचा)

गिरिधर बहादुर याचा मृत्यू झाल्यापासून सुभ्याचा नवा सुभेदार म्हणून मुहम्मदखान बंगश याचे आगमन होईपर्यंतच्या काळातील माळव्याच्या इतिहासाविषयी मुबलक माहिती उपलब्ध आहे. गिरिधरच्या मुलांनी पाठविलेली फार्सी पत्रे (अजाइबुलआफाक) आणि इंदूरच्या चौधरी नंदलाल मंडलोई यास आलेली मराठी व हिंदी पत्रे (जी सरदेसाई, खंड दोन, ३६३–३७५ वर छापलेली आहेत) यांमध्ये ही माहिती आढळते. आपल्याला अडचण कोणती येत असेल तर काही तारखांविषयी. फार्सी आधार घेऊन इर्विन सांगतो की, मुहम्मद-खान ३० जानेवारी १७३१ रोजी उज्जयिनीला पोहोचला. त्यावरून हे उघड आहे की तारलाची लढाई आणि दयाबहादुराचा मृत्यू या घटना तत्पूर्वी काही महिने अगोदर (समजा इ. १७३० ऑक्टोबरमध्ये) घडलेल्या असाव्या. पण सदर लढाईची मराठी पत्रांतून आलेली तारीख शुहूरसन ११३२ रबिलाखर २१ (म्हणजे नव्या कालगणनेनुसार १७३१ ऑक्टोबर २२) अशी आहे. दुसऱ्या काही पुराव्यानुसार दया बहादुर २० ऑक्टोबरपर्यंत जिवंत असावासा दिसतो. मुहम्मदखान दया बहादुराच्या मृत्यूपूर्वी माळव्यात आला नाही याबाबत मात्र या विषयातील सर्व तज्ज्ञांचे एकमत आहे. म्हणून मुहम्मदखानाची माळवा मोहीम आणि पर्यायाने मुहम्मदखानाच्या मोहिमेशी संबंधित असलेल्या निजामाच्या हालचाली या घटनांचा काळ इर्विन सांगतो त्या तारखेनंतर एक वर्षाचा असावा.[31]

---

३० "राजासाहिब गिरिधर बहादुर हा माळव्याचा मालवीराज होता. बादशाही सत्ता उखडून धरण्यासाठी तो माझा बंधू चिमाजी अप्पा याजबरोबर सारंगपूर येथे लढला." (बाजीरावाचे पत्र) येथे गिरिधर बहादुरावर मराठ्यांनी केलेला हल्ला अगदी आकस्मिक होता व त्याचा परिणाम गिरिधर बहादुर ठार झाला. (जदुनाथ सरकार)

३१ कदाचित वर दिलेली शुहूरसनाची तारीख रूपांतरित करताना चूक झाली असण्याची शक्यता आहे. मराठी पत्रातील तारखादेखील अन्वयार्थाने अचूक म्हणून स्वीकारता येण्यासारख्या नाहीत. कारण यातील दोन पत्रांमध्ये नंदलालचा मृत्यू शुहूरसन ११३२ मध्ये झाल्याचा उल्लेख असून तिसरे ११३३ चे पत्र मात्र त्याच्या नावे धाडलेले आहे. या प्रत्येक पत्रामध्ये वर्ष, अक्षरी लिहिलेले आहे. त्यामुळे वर्ष दर्शविणारी संख्या नकलून काढताना कारकुनाच्या हस्तदोषामुळे चूक घडली असावी, असेही संभवत नाही. घटनाक्रमावरून असे दिसते की, इर्विनने दिलेल्या कालावधीपेक्षा अधिक काळ दयाबहादुराने माळव्याचा कारभार पाहिला. इर्विनच्या मते जुलै १७२९ ते ऑक्टोबर १७३० या १६ महिन्यांच्या काळात दया बहादुर माळव्याचा सुभेदार म्हणून कारभार पहात होता. या बाबतच्या मी निश्चित केलेल्या तारखा पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १७२८ डिसेंबर ८ | .. गिरिधर बहादुरचा मृत्यू; त्याचा मुलगा भवानीराम माळव्याचा कारभार पहातो. |
| १७२९ जुलै १ | .. दया बहादुर उत्तराधिकारी म्हणून सुभेदार होतो. |
| १७३१ ऑक्टोबर २२ | .. दया बहादुर याचा तारला येथे मृत्यू. |
| १७३२ जानेवारी १९ | .. (म्हणजे २२ रज्जब पण ११४४ चे) मुहम्मदखान सुभेदार म्हणून उज्जैनला पोहोचतो. |

दया बहादुर याच्या पत्रांवरून हे स्पष्ट दिसते की वंशपरंपरागत चालत आलेले आपले कौटुंबिक राज्य असे रूप माळव्यास देण्याचे गिरिधर–बहादुरचे उद्दिष्ट होते; म्हणजे निजामुल्मुल्क आणि लयास चाललेल्या दिल्लीतील सत्तेचे अन्य महत्त्वाकांक्षी सुभेदार यांचे अनुकरण करण्याचाच तो प्रकार होता. दया बहादुर देखील तीच स्वप्ने रंगवत होता. पण तसे प्रत्यक्षात घडून येण्याची आशा नव्हती. कारण त्याला कोणी दोस्त नव्हता. हिंदू जमातीतून देखील त्यांना दोस्त मिळू शकले नाहीत. मराठ्यांना माळव्यात येऊ देत नाही असे आश्वासन बादशाहाला दिले तरच त्यांना माळव्यावर पकड बसविणे शक्य होते. या कामासाठी राजपुतांचा पाठिंबा त्यांना मिळण्यासारखा नव्हता. राजपूत, विशेषतः सवाई जयसिंग हा मराठ्यांचा दोस्त होता. त्यानेच वस्तुतः मराठ्यांना बोलावणे करून माळव्यात आणले. उत्तर भारतात मुघल सत्तेविषयी असमाधान व्यक्त होऊ लागले होते. म्हणून ही सत्ता कमकुवत करण्यासाठीच मराठ्यांना बोलावणी होत होती. १८ व्या शतकाच्या आरंभीच्या काळातील माळव्याच्या इतिहासातील हाच मुख्य सूर आहे. माळव्यातील स्थानिक जमीनदार बहुधा राजपूत होते. माजलेल्या अव्यवस्थेचा त्यांनी साहजिकच फायदा घेतला आणि महसूल अडवून ठेवला. राज्याची महसूल बाकी, कडकपणा दाखवून वसूल करण्याचा प्रयत्न दया बहादुराने करून या जमीनदारांना अलग पाडले. तसेच (मला आढळले की) ही महसूल वसुली हवा निर्माण करून गेली. अदूरदृष्टीचे स्थानिक म्होरके आणि त्यांची कुळे यांनी मराठ्यांचा पक्ष घेतला. मुघल साम्राज्याची कायदेशीररीत्या द्यावयाची देणी चुकविण्याचा हाच एक मार्ग होता. पण दिल्लीतल्या जुन्या सुलतानाच्या जागी दक्षिणेतला नवा सुलतान आल्याचे त्यांना लौकरच दिसणार होते.

मुघलांच्या चाकरीत नंदलाल मंडलोई हा इंदूरचा चौधरी होता. शाही अमलदारांनी त्याला फार तंग केल्यामुळे तो जयसिंगाच्या सल्ल्यावरून मराठ्यांच्या पक्षाकडे वळला. त्याचा स्थानिक प्रभाव मोठा होता. माळव्यातील सगळ्या सरदारांची अंतःकरणे त्याच्या ओंजळीत होती. (तसा उल्लेख दोन पत्रांमध्ये आहे.) मराठ्यांच्या सगळ्या उपद्रवकारक हालचाली आणि माळव्यातील मुघल कारभाराविरुद्धच्या हालचाली यांमधला तो महत्त्वाचा दुवा होता. नर्मदेच्या उतारांवर पहारा देण्याची जबाबदारी त्याची असे. ते उतार कपटपूर्वक बिनपहाऱ्याचे ठेवून, बाजीरावास माळव्यात आक्रमण करणे त्याने सोयीस्कर करून ठेवले. (मंडलोई कागदपत्रे, सरदेसाई, खंड दोन, ३६४-३७० वर छापलेली)

## * ८१ : भवानीरामने केलेला माळव्याचा कारभार (मजकूर संपादकाचा)

गिरिधर बहादुराचा मृत्यू झाल्यावर (८ डिसेंबर १७२८) बादशाहाने त्याचा मुलगा भवानीराम याला स्वहस्ताचे सांत्वनपर पत्र लिहिले आणि त्याला "काफिरांच्या" हल्ल्यापासून सुभ्याचे रक्षण करण्याची विनंती केली. भवानीराम याला चिमाबहादुर असा किताब देऊन त्यास राजा बनविण्यात आले व २ लाख रुपयांची रक्कम त्याला दिली. सय्यिद नज्मुद्दीन अलीखान, महाराणा (सवाई जयसिंग याच्यामार्फत) दुर्जनसाल आणि मुहम्मद उमरखान यांना भवानीराम यास मदत करण्यासाठी कूच करण्याचा हुकूम झाला.

सारंगपूर येथे चिमाजी अप्पा आणि उदाजी पवार यांना मोठा विजय मिळाला. तेव्हा ते उज्जयिनीच्या आसपासच्या भागात लुटालूट करीत सुटले. भवानीरामाने घाईघाईने आणखी सैनिक भरती केले आणि शहराभोवती मातीची तटबंदी उभी केली. २० डिसेंबर रोजी

मराठ्यांच्या फौजांनी वेढा घातला. रोजच्या रोज झटापटी होऊ लागल्या. भवानीरामाजवळ द्रव्य नव्हते. त्यामुळे त्याच्या अडचणी आणखी गंभीर बनल्या. गिरिधर बहादुराच्या फौजांची मोठी बाकी तो लागत होता. गिरिधर बहादुराने आपल्या पदांच्या नियमानुसार फौज आणि तोफखाना या व्यतिरिक्त अंदाजे ८ हजार शिपायांची भरती केली होती. बाकी येणे असलेले लोक बंडात सामील होण्याच्या तयारीत होते. या पेचप्रसंगाची खबर मराठ्यांना लागताच, त्याच्या आसपास घोटाळत राहण्याचा मोह मराठ्यांना अनावर झाला. वेढा ३५ दिवस चालल्यावर, इ. १७२९ जानेवारी २३ रोजी, भवानीराम याने वेढ्यावर हल्ला चढविला. हातघाईची लढाई होऊन दोन्ही पक्षांची विपुल हानी झाली व मराठ्यांनी माघार घेतली.

कित्येक महिने उलटले तरी दरबारचे आश्वासित द्रव्य किंवा कुमक भवानीरामाला येऊन पोहोचली नाही. त्याचे फौजांचे ५ लाख रुपयांचे देणे थकले होते. सारंगपूर सर करण्याचा प्रयत्न करून मराठे आता सिरोंजच्या रोखाने वळले होते. येथे शहराभोवती अडथळे निर्माण करून व मोर्चेबंदी करून नज्मुद्दीन अलीखान स्वस्थ बसला होता.

आता नव्याच अडचणी उद्भवल्या. आपल्याला या सुभ्याची सुभेदारी मिळाली आहे, असे नज्मुद्दीन अलीखानाने जाहीर केले. मी येईतो जमा झालेला महसूल विश्वस्त वृत्तीने सांभाळून ठेवा अशा मजकुराची पत्रे त्याने पाठविली. संकीर्ण स्वरूपाचा महसूल वसूल करून तो मजकडे पाठवावा असेही त्याने कळविले. असली कृत्ये करण्यापासून परावृत्त व्हा आणि धामोणी येथील आपल्या फौजदारीवर रूजू व्हा असे दरबाराने खानास लिहून कळविले. नज्मुद्दीन अलीखान कालियदेहा या उज्जयिनीपासून ३ मैलांवर असलेल्या ठिकाणी येऊन पोहोचला. येथे त्याने सर्वप्रकारचे उपद्रव देणे सुरू केले (१७२९). दरबाराकडून आलेले हुकूम त्याला दाखविले तरी त्याचे हे उपद्रव थांबले नाहीत. मनधरणी व्यर्थ आहे हे स्पष्ट झाल्यावर, ठोशास ठोसा देण्याखेरीज भवानीराम याला दुसरा मार्ग उरला नाही. त्याने आपले तंबू बाहेर आणले आणि नज्मुद्दीनच्या तळासमोर तळ ठोकला. सकाळपासून रात्र पडेपर्यंत दोन्ही पक्षाची माणसे हत्यारबंद होऊन सज्ज राहात. या प्रकारापासून नज्मुद्दीन अलीखानास परावृत्त करण्यात दुर्जनसाल आणि उमरखान यांना अपयश आले. ते त्याजपासून अखेर दूर झाले. पण भवानीराम याने घेतलेल्या कडक पवित्र्याकडे अपेक्षित परिणाम साधला. गोंधळलेल्या नज्मुद्दीनने कूच करून काढता पाय घेतला.

मधल्या काळात भवानीराम याच्या जागी दुसरा कोणी येणार आहे या अफवेमुळे भवानीरामाच्या व्यवहारामध्ये गोंधळ उडाला होता. जमीनदारांनी महसूल आदा करण्यास नकार दिला. त्याच्या शिपायांनी बंड केले आणि येणेबाकीची मागणी केली. शहरातील असामी आणि आसपासचे जमीनदार यांच्याशी हातमिळविणी करून या शिपायांनी भवानीरामाला कालियदेहा येथे वेढले. पण भवानीराम याने त्यांशी लढाई केली आणि त्यांना पळवून लावले.

पुढच्या वर्षी (१७२९-३०) त्याचा त्रास पुन्हा सुरू झाला. कंठाजीने (जून १७२९ च्या सुमारास) खरगोणला (नर्मदेच्या दक्षिणेस, मंडलेश्वराच्या दक्षिणेस २५ मैलांवर) ४ दिवस वेढा घातला व धाकदपटशा दाखवून ५० हजार रुपये उकळले. नंतर त्याने (बाखाणी येथे) नर्मदा ओलांडली आणि माळव्यात प्रवेश केला. धारच्या आसपासच्या भागात,

तो धाडीवर धाडी घालीत होता. मल्हार आणि उदाजी यांनी आपला फौजफाटा जमविला होता आणि बुऱ्हानपुराहून बाजीराव आणि इतर पुढारी यांचे आगमन होण्याची वाट पहात, ते चिखलदा या ठिकाणी थांबून राहिले होते. या वर्षी मराठ्यांनी आपले पावसाळ्यातील वास्तव्यदेखील माळव्यातच ठेवले. पण जयसिंग अजून आंबेर या आपल्या राजधानीतून बाहेर पडला नव्हता. त्याचा सेनापती जोरावरसिंग हा त्यावेळी रामपुरा येथे होता; आणि त्याने फक्त ७०० घोडेस्वार मदतीखातर पाठविले होते. भवानीरामाजवळचे सगळे द्रव्य आणि त्याची सगळी पतदेखील संपुष्टात आली होती नव्याने भरती केलेल्यांना देण्यासाठी त्याच्याजवळ द्रव्य उरले नव्हते.

बादशाहाने त्याला आश्वासन दिले की, राव रामचंद्र (कोट्याचा ?) आणि राजा उद्‌वतसिंग यांना तुमच्या मदतीस जाण्याचा हुकूम दिला आहे आणि जयसिंग ३० हजार असामींनिशी कूच करीत निघालाही आहे. दरम्यान उदाजीच्या आधिपत्याखालचा दुसरा ५ हजारांचा फौजफाटा माळव्यात उतरला होता. मांडव जिल्ह्यातील धार, धरमपूर आणि मालेरी या ठिकाणी त्यांनी लुटालूट चालविली होती. अखेरीस बादशाहाने भवानीरामाला पत्र लिहून कळविले की, माळव्याची सुभेदारी जयसिंगास दिली असून तू त्याच्या हाताखाली चाकरी करावयाची आहेस. (अजाइबुल्‌आफाक, ब्रि. म्यू. ओरि. १७७६, पान, ११ब, ७४ब, ७८ब, ८०ब-८६अ, आणि क्रमांक १९५, १९७, १८०, १८९.)

## ८१ : दया बहादुरने केलेला माळव्याचा कारभार (मजकूर संपादकाचा)

या सर्व घडामोडी जून किंवा जुलै १७२९ मध्ये घडलेल्या असाव्यात. पण जयसिंगाने बादशाहास दिलेले पद धारण केले नाही असे नाही; पण गिरिधर बहादुराचा चुलतभाऊ छबेलाराम याचा मुलगा दया बहादुर याजकडे या सुभ्याचा कारभार राहिला. १७३१ ऑक्टोबरमध्ये या पदावर राहून कारभार करीत असतानाच त्यास मृत्यू आला. आपल्या तरण्या पुतण्याच्या जागेवर म्हणजे भवानीरामाच्या[३२] जागेवर जुलै किंवा ऑगस्ट १७२९ पासून आलेल्या दया बहादुर या नव्या सुभेदाराने आपल्या कामाला मोठ्या तडफेने सुरुवात केली. त्याचा कारभार दमदारपणाचा होता आणि महसूल देखील तो कडकपणे वसूल करी. या गोष्टी शिरजोर बनलेल्या स्थानिक म्होरक्यांना मान्य नव्हत्या. याचा सर्वात मोठा शत्रू मात्र चौधरी नंदलाल मंडलोई होता. नंदलालने आपली तळी उचलावी म्हणून त्याची स्तुती करणारी व त्यास लालूच दाखविणारी, त्याने लिहिलेली कित्येक पत्रे आपणास उपलब्ध आहेत. मराठेसुद्धा अशीच वारेमाप स्तुती करून चौधरीस वश करण्याच्या प्रयत्नात असत. जयसिंगाचा त्याच्यावर प्रभाव होता. त्यामुळे मंडलोई मराठ्यांच्या पक्षाकडे झुकला. दया बहादुराच्या करूण विनवणीच्या पत्रास त्याने उत्तरदेखील धाडले नाही. १७३० च्या मार्च महिन्यात नंदलाल ५० हजार फौज उभी करीत आहे असे कळल्यावरून सुभेदाराने त्याला येथे वाटाघाटीसाठी बोलावले. त्यास पर्याय म्हणून इंदूरला स्वतः येण्याची तयारी दर्शविली. मंडलोईची कोणती गाऱ्हाणी आहेत आणि त्याशी दोस्ती व्हावी म्हणून कोणत्या अटी असाव्या

३२ नंदलाल यास लिहिलेल्या २५ जानेवारी १७३० च्या पत्रास दया बहादुर लिहितो : "मालवी साल ११३२ ( ? ) सारंगपूरच्या लढाईत मराठा सरदाराकरवी राजा गिरिधर बहादुर ठार झाले. तेव्हा त्याचा सूड घेण्यासाठी मी दिल्लीस गेलो. बादशाहाकडे विनंती अर्ज दिला आणि सुभ्याच्या कारभाराची तावेदारी घेऊन इकडे परतलो." ( सरदेसाई खंड, दोन, ३६४ मध्ये छापलेले हिंदी पत्र. )

याचा निर्णय करण्यासाठी या वाटाघाटी व्हावयाच्या होत्या. या आमंत्रणाला चौधरीने प्रतिसाद दिला नाही. इतकेच काय पण १७३१ एप्रिलमध्ये लिहिलेल्या आणखी एका पत्रालाही त्याने उत्तर दिले नाही.

१७३१ जूनमध्ये बाजीराव बुर्हानपुरास होता. नंदलालच्या मदतीस येण्याचे आश्वासन देणारे पत्र त्याने लिहिले. नालचा आणि मांडव या ठिकाणी मराठी सैनिक-तुकड्यांचा पहारा बसविला. "दया बहादुर याजकडून होणाऱ्या छळामुळे असंतुष्ट झालेल्या जमीनदारांनी आणि कुळांनी" पेशव्यांना आवाहन केले होते. नंदलालची फौज बळकट करण्यासाठी नेमाडातून ५ हजार शेतकरी आणि महसूल अधिकारी नंदलालला येऊन मिळाले होते.

या सर्व धुमसत्या असंतोषाचा स्फोट, बेचैन सुभेदाराच्या शिरावर, त्या वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यात झाला. दक्षिणेतून येणाऱ्या आक्रमकांना विरोध करता यावा म्हणून त्याने मांडव घाटात तीन सुरुंग पेरले होते आणि २५ हजार सैनिक जय्यत तयार ठेवले होते. नंदलालच्या कपटामुळे या सज्जतेची खबर मराठ्यांना मिळाली होती. त्यांनी हा सापळा टाकला आणि भैरव घाट या दुसऱ्याच रस्त्याने ते माळव्यात घुसले. सुरुंग मात्र, बहुधा अपघाताने उडाले आणि नंदलालच्या गोतावळ्यातील (भाऊ, मुलगे आणि सरदार) कित्येक जण व शाही पक्षातील कित्येक सैनिक त्या स्फोटात खलास झाले.[३३]

ही घटना ऑक्टोबर १९ रोजी घडली. तीन दिवसानंतर खुद्द दया बहादुर याजवर, तारला या ठिकाणी हल्ला झाला. हे ठिकाण धारच्या पश्चिमेस चार मैलांवर आहे. या हल्ल्यात दया बहादुराचा पराभव होऊन तो ठार झाला. बाजीराव लिहितो, "एक भरघोस विजय मिळाला. रावसाहेब (नंदलाल मंडलोई), ठाकूर नरहरदास आणि वकील मयाराम यांनी हार्दिक मदत केली".

या हल्ल्याबद्दल जयसिंगाने नंदलाल याचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन केले: "तुम्ही माळव्यात आमच्या धर्माचे रक्षण करीत आहा. मुसलमानांना चिरडून तुम्ही धर्मस्थापनाच करीत आहा. माझी इच्छा तुमच्या हातून पूर्ण होत आहे".

हा सगळा वृत्तांत बादशाहास समजला तेव्हा तो भलताच नाराज झाला. नंदलाल याजवर मराठ्यांना बोलावणे धाडल्याचा ठपका ठेवणारे पत्र त्याने जयसिंगास लिहिले. "नंदलालने मराठ्यांना, मल्हार होळकर आणि राणोजी शिंदे यांना वकील पाठवून बोलावून घेतले; आपला सगळा आधार घेऊन त्यांचे माळव्यात बस्तान बसविले व त्यासाठी आपले

३३ दया बहादुर रागारागाने नंदलालला लिहितो, "आपले धोरण तरी काय आहे ? मराठ्यांना वाचविण्यासाठी आपण आपले भाऊ, मुलगे आणि सरदार यांची कत्तल करणार आहात काय ? आणि सगळे राज्य गनिमांच्या हवाली करणार आहात का ? आपण हे सगळे काय चालविले आहे ? आपले डोके ठिकाणावर आहे काय ? आपल्या सरदारांचा सल्ला घ्या आणि माळव्याचा तुमचा मुलूख दुसऱ्याच्या हवाली करू नका पण आपण शत्रूस बोलावणे करणार असाल आणि जयसिंगास तसा सल्ला देणार असाल तर त्यात आपला कसलाही लाभ होणार नाही. या दिवसाची मराठे भविष्यकाळी आठवण ठेवतील याची सुतराम शक्यता नाही याची जाण ठेवा." ( सरदेसाई, खंड दोन, ३६७ ). भैरवपुरा हे ठिकाण नर्मदेपासून उत्तरेकडे जाणाऱ्या रस्त्यावर मांडवपासून ईशान्येस तीन मैलांवर आहे.

भाऊ, मुलगे आणि सरदार यांच्यासह हजारो लोक प्राणास मुकविले," असा मजकूर त्या पत्रात होता. बादशाहाने जयसिंगावरही ठपका ठेवला. माळव्याचा सुभा देशद्रोही पद्धतीने घालविण्यास त्याने चिथावणी दिली असे बादशाहाचे म्हणणे पडले. आपल्या पत्रात बादशाह पुढे लिहितो, "ठीक आहे. या सगळ्याचा बदला घेतला जाईल. मराठे पूर्वी तीन वेळा माळव्यात आले; तेव्हा त्यांना मार खाऊन पळावे लागले होते. या खेपेलासुद्धा त्यांची गत अशीच होईल आणि त्यांना हुसकले जाईल. सावध असा. दरबारची मोहीम निघण्याची तारीख पक्की झाली आहे."

उघडच आहे की, या धोरणाची अमलबजावणी करण्यासाठी मुहम्मदखान बंगश याला माळव्यावर धाडण्यात आले.

## ८२ : मुहम्मदखान बंगश याची माळव्यावर मोहीम, पहिले वर्ष

इ. १७२९ च्या अखेरीस मुहम्मदखान बंगश बुंदेलखंडातून परत दिल्लीस आला त्यावेळी गिरिधर बहादुराच्या मृत्यूमुळे माळव्यातील त्याची रिकामी झालेली जागा अजून भरलेली नव्हती. मुहम्मदखानाला अल्लाहाबादेचा सुभा होता. त्यातील बहुतेक भाग महसुलाच्या दृष्टीने चांगल्या वसुलीचा होता; सुभा सांभाळणेही जिकीरीचे काम नव्हते. म्हणून आपल्याकडे असलेल्या अल्लाहाबादेचा सुभा आपल्या हातून जाऊ नये यासाठी मुहम्मदखानाने करता येईल तितकी धडपड केली. पण त्या धडपडीला यश आले नाही. म्हणून त्याने माळव्याची अवघड जबाबदारी अर्ज करून मागितली. माळव्यातील यावेळची परिस्थिती लक्षात घेता ती जागा पटकावण्यासाठी स्पर्धा जवळजवळ नव्हतीच. (ज. ए. सो. बे., ३०५.)

त्याची माळव्यास सुभेदार म्हणून नेमणूक करणारे फर्मान मुहम्मदशाहाच्या कारकिर्दीच्या बाराव्या वर्षीच्या रबिलाखर १७ (११४३ हि. २९ सप्टेंबर १७३०) या तारखेचे आहे. हे फर्मान जफरखान रोशनुद्दौलह पानिपती याच्या खटपटीने त्याने मिळविले. शिवाय बादशाहाची आवडती रहीमुन्निसा (जिला कोकीजीऊ म्हणजे दूधबहीण असे म्हणत) हिची या कामी मदत झाली. या दोघांनाही जबर लाच द्यावी लागली होती. मुहम्मद-खानाच्या सगळ्या व्यवहाराबाबत, त्याला बहाल झालेल्या महसुलाबाबत आणि त्याला मिळालेल्या दाखल देणगी द्रव्याबाबत नेहमीप्रमाणे बरीच चर्चा झाली. त्याला फारच थोडे द्रव्य उपलब्ध होऊ शकले. इ. १७३० नोव्हेंबर ५ रोजी मुहम्मदखान आग्र्यास पोहोचला तिथल्या शस्त्रागारातून काही तोफा त्याने हस्तगत केल्या. त्याच्या फौजफाटयात ८२०० घोडे आणि २५०० पायदळ होते. अखेरीस १७३० नोव्हेंबर १६ रोजी त्याने आग्रा मागे टाकले; त्याची छावणी शहराच्या दक्षिणेस १८ मैलांवर जाजौ या ठिकाणी पडली धोलपूरच्या रोखाने कूच करून, चंबळ नदी पार करून, काही दिवसांनी तो ग्वाल्हेरला आला येथे त्याने मुक्काम केला (ईद. अजीजुल्कुलुब ४०ब.)

निकडीची पत्रे खान दौरान याजकडून आली म्हणून तीन सेनाधिकाऱ्यांना सिरोंज, मंडलेश्वर आणि सारंगपूर या ठिकाणी, जलदीने कूच करण्याचा हुकूम झाला. इ. १७३० डिसेंबरमध्ये मुहम्मदखान स्वतः साधोरा या ठिकाणी पोहोचला. हे ठिकाण उत्तरेस १७२ मैलांवर आहे. येथे त्यास निजामुल्मुल्काचे पत्र मिळाले. या पत्रात निजामुल्मुल्काने नर्मदेच्या

काठी दोघांची मुलाखत व्हावी म्हणून प्रस्ताव केला होता. इ. १७३१ डिसेंबर २५ रोजी सैन्य सारंगपूर या ठिकाणी होते. हे ठिकाण ईशान्येस ५२ मैलांवर आहे. यावेळी होळकर हिच्या नैर्ऋत्येस १६ मैल अंतरावर असलेल्या शाहजहानपूर गावी होता. मुहम्मदखान चालून येत असल्याचे ऐकताच होळकराने आपला अवजड बाडबिस्तरा नर्मदेच्या पलीकडे पाठविला. मुसलमानी पक्ष सारंगपूरच्या छावणीत प्रवेश करीत असतानाच मराठे त्यांच्यावर तुटून पडले. पण लगेचच ते 'बाण पाहिल्यावर कावळे उडून जातात' त्याप्रमाणे पळून गेले. जानेवारी २७ रोजी मुसलमानांनी शाहजहानपूरची मुक्तता केली. हे सुभ्याच्या राजधानीचे शहर त्यांनी ३० तारखेला व्यापले. (ज. ए. सो. बे., ३०८.)

फेब्रुवारी १८ रोजी मुहम्मदखान पुन्हा रणांगणात उतरला. तो धारच्या रोखाने गेला. धार हे गाव नैर्ऋत्येस ५० मैलांवर आहे. फौजेचा दुसरा भाग नवाबाने आपला दुसरा मुलगा अहमदखान याच्या नेतृत्वाखाली होळकराचे पारिपत्य करण्यासाठी पाठविला. ती फौज सारंगपूर आणि शाहजहानपूर यांच्या रोखाने गेली. खुद्द मुहम्मदखान इ. १७३१ फेब्रुवारी २४ रोजी धारला पोहोचला. पाच दिवसानंतर मराठे उगवले. थोडीशी छापेमारी झाली. दुसऱ्या दिवशी होळकराचे आगमन झाले. भोपाळचा यार मुहम्मदखान रोहिला आपल्या कुळाशी बेइमान झाला होता. हल्ला करण्यासाठी मराठ्यांचे मन त्यानेच उद्युक्त केले होते. मुकीमखान या जबाबदार अधिकाऱ्याने मराठ्यांना पिटून काढले. तेव्हा मराठे मुहम्मदखानाच्या पाठलागावर निघाले. धारच्या आसपास सुमारे १० दिवसपर्यंत म्हणजे शाबान महिन्याच्या अखेरीपर्यंत (इ. १७३१ मार्च ८) झटापटी होत राहिल्या. मोहिमेच्या पहिल्या वर्षाचे फलित म्हणून, मंडलेश्वर, धार आणि देपाळपूर या ठिकाणाहून मराठ्यांना हुसकले. तसेच नर्मदेच्या काठावरील मराठ्यांचे नवीन किल्ले जमीनदोस्त केले. (ईद ३१०)

निजामुलमुल्क बुर्हानपुराहून निघून मार्गस्थ झाला आहे हे कळताच मुहम्मदखान इ. १७३१ मार्च ८ रोजी नर्मदेवर जाण्यास निघाला. वारंवार आलेल्या पत्रांनुसार इ. १७३० डिसेंबर ३० रोजी निजामुलमुल्काने फर्दापूरची खिंड ओलांडली आहे आणि तो बागलाणात शिरला आहे व १७३१ जानेवारी २८ रोजी गाळणा येथे आला आहे असे मुहम्मदखानास कळविले. या सगळ्या पत्रांतून निजामुलमुल्क आपली योजना उघडी करून दाखवितो. पिलाजी गायकवाड आणि उदाजी पवार यांची, बाजीराव पेशव्याबरोबर आपसात भांडणे होती आणि मुसलमानाशी एखाद्या करारात बांधून घेण्यास ते राजी दिसत होते. या समझोत्यात मुहम्मदखानाला सहभागी करणे हाच निजामुल्मुल्काच्या प्रवासामागचा हेतू असावा असे उघड वाटत होते. 'एकीत बळ आहे' असे त्याने नवाबापुढे प्रतिपादले होते. फेब्रुवारी ८ रोजी धामणगावहून लिहिलेल्या पत्रात तो कळवितो की, मी आता लौकरच नर्मदेवर येऊन पोहोचेन. फेब्रुवारी २४ रोजी त्याने बुर्हानपुराहून कूच केले खरे; पण या दोन नवाबांची अक्बरपूर या नर्मदेच्या घाटावर भेट होण्यास एप्रिलच्या सुरुवातीचे दिवस उजाडले. (ईद. ३११.)

त्यावेळी पसरलेल्या अफवेनुसार माळव्याचा कारभार स्वीकारताना मुहम्मदखान बंगश याने, स्वतःला एका गुप्त वचनात बांधून घेतलेले होते. मराठ्यांचा पुरेसा पाडाव झाल्यावर निजामुल्मुल्काविरुद्ध मोहीम काढण्याचे ते वचन होते. खुद्द निजामुल्मुल्काच्या फौजेतदेखील असाच समज पसरला होता खरा. पण निजामुलमुल्क अचानक नर्मदेकडे कूच करीत निघाला

तेव्हा त्यांचा हा समज चांगलाच पक्का झाला. आता लढाई जुंपणार असे ते धरून चालले होते. तसे होण्याऐवजी शांततापूर्ण वाटाघाटी सुरू झाल्या आहेत हे पाहून त्यांना विस्मयाचा धक्का बसला. तब्बल बारा दिवस दोन्ही उमरावांच्या गाठीभेटी चालल्या. त्या दोघांमध्ये काय काय घडले याबाबतचा तपशील आपल्याला समजत नाही. पण दोघांनी हातमिळवणी करून राहावे असे दोघांत ठरले असावे यात संशय नाही. शेवटी मुहम्मदखानाने एप्रिल ८ रोजी अकबरपूर सोडले. (ईद., ३१३; अहवाल १९९-२००.)

तद्नंतर अगदी अल्पकाळातच निजामुल्मुल्काचे सगळे मनसुबे धुळीस मिळाले. आपल्या विरुद्ध युती होत आहे व तीत मराठे पक्षातील आपला प्रतिस्पर्धी सेनापती त्रिंबकराव दाभाडे प्रमुखपदी आहे हे समजताच, बाजीराव जलदी करून उत्तरेस गुजरातकडे गेला. १७३१ एप्रिल ११ रोजी डभोई आणि बडोदा[३४] या दरम्यान युतिवाल्यांना तो सामोरा गेला. वेळ न दवडता त्याने हल्ला चढविला. त्रिंबकराव मारला गेला. त्याचबरोबर पिलाजीचा एक मुलगा आणि इतर काही पुढारी ठार झाले. उदाजी पवार आणि चिमणाजी दामोदर यांना कैद केले. पिलाजी आणि इतर म्होरकी मंडळी जायबंदी झाली; पण ती निसटून गेली. या दुर्दैवी आपत्तीच्या खबरीबरोबरच असा निरोपही आला की, बाजीरावाने लगोलग पाठ फिरविली असून नर्मदा पुन्हा पार केली आहे आणि तो सुरतेकडे आणि दक्षिणेकडे सरकत आहे. निजामास कापरे भरले; आपल्या सुरक्षिततेसाठी तो औरंगाबादेजवळ गेला. नंतर

---

३४ ही लढाई बडोद्याच्या आग्नेयेस ११ मैलावरील भिलापूरला झाली. या लढाईविषयी, मराठी सामग्रीत आपल्याला दोन हकीकती आढळतात. अगदी 'सुरुवातीपासूनच त्रिंबकराव दाभाडे याचा बाजीरावास विरोध होता. गुजरातची चौथ आणि सरदेशमुखी बाजीरावास मिळाल्यावर दाभाड्यांनी सैनिक-भरती सुरू केली. मराठी अमलदारांत फूट पाडली आणि बाजीरावाच्या विरुद्ध हालचाली करण्यास सुरुवात केली. निजामाकडून मदत मिळेल या आशेवर त्याने ३५ हजार सैनिक जमविले; त्यासह दक्षिणेत कूच करण्याचा त्याचा निश्चय झाला. तो आपल्या सैनिकांना उघडपणे सांगत असे : "बाजीरावाने आपल्या धन्याचे राज्य बळकाविले आहे. मी धन्याचे राज्य मुक्त करणार आहे ? " (पेशवे शकावली.) बाजीराव लिहितो, "त्रिंबकराव दाभाडे, उदाजी आनंदराव पवार, कंठाजी रघुजी कदमबांडे, पिलाजी गायकवाड आणि चिमणाजी दादा (=दामोदर) हे सर्वजण ३० हजार सैनिकांसह मजबरोबर लढले. ही लढाई शव्वाल ४ रोजी .........डभोईपासून पाच कोसांवर झाली. त्रिंबक आणि जिवाजी दाभाडे, मालोजी पवार, पिलाजी गायकवाडाचा मुलगा (संभूजी) वगैरे एकूण १४ मराठे सरदार लढाईत ठार झाले. उदाजी पवार आणि चिमणाजी याना पकडले. आनंदराव पवार (जसवंतराव), पिलाजी गायकवाड आणि कुवंर बहादुर(कुमार बाबा पवार) हे जायबंदी होऊन पळाले. बांडे पळाले. त्यांच्या फौजफाट्यात लुटालूट झाली. आमच्या बाजूला नारायण ढमढेरे ठार झाला." दाभाडे कुलवृत्तान्तात सांगितले आहे की, 'बाजीरावाने दाभाड्यांच्या अंमलदारांना मथविले आणि त्याच्या सैनिकांना वेगवेगळ्या सबबी सांगून, त्यास सोडून जाण्यासाठी चिथविले. ...... ... अवघे पाच हजार असामी बरोबर उरले असता त्रिंबकराव लढाईत उतरला. बाजीरावाने त्याला घेरून टाकले. पहाटेपासून तिसऱ्या प्रहरापर्यंत त्रिंबकने लढाईत शौर्य गाजविले. पेशवे पक्षातील कित्येकाना कंठस्नान घातले आणि सदर पक्षाला कोसभर मागे रेटले. आपण लढाई जिंकली असे समजून त्याने विजयवाद्ये वाजविणे सुरु केले. तेव्हा त्रिंबकचा सावत्र आईचा भाऊ भागसिंग ठोके यांस बाजीरावाने गुप्तपणे भ्रष्ट बनविले होते. ——याने आपल्या बारगीराना गोळीबार करण्यांस सांगितले. त्रिंबकच्या कानशिलातून आरपार गोळी जाऊन तो आपल्या हत्तीवरून पडल्याची घटना संध्याकाळी घडली. त्याचा भाऊ जसवंत दाभाडे रात्री ९ वाजता तेथे आला व त्याने मृतदेहावर अग्निसंस्कार केला आणि नंतर बाजीरावाचा साताऱ्यापर्यंत पाठलाग केला ............ साताऱ्यास पेशवा राजवाड्यातील बायकांच्या खोल्यात लपून राहिला!" (सरदेसाई, खंड दोन, २५०–२५६). (जदुनाथ सरकार)

तत्काळ त्याने पश्चिमेच्या रोखाने कूच करणे चालू केले. दमणच्या जवळपास कुठेतरी त्याची बाजीरावाशी चकमक झडली असावी. पण ऑगस्टच्या अखेरीस दोन्ही पक्षांनी आपल्यातील मतभेद मिटविले होते व बाजीराव सातान्यास परतला होता. एका गुप्त करारानुसार बाजीरावाने निजामुल्मुल्कास दक्षिणेत स्वस्थ राहू द्यावयाचे होते; पण त्यासाठी अशी अट होती की मुघल साम्राज्याच्या उत्तरभागासंबंधातील बाजीरावाचे मनसुबे, स्वस्थपणे पार पाडू देण्याची मोकळीक निजामाने बाजीरावास द्यावयास हवी. (ज. ए. सो. बे., ३१३; पत्राकरिता खुजिस्ताकलाम.)

१७३१ इ. चा पावसाळा सुरू होण्याअगोदर मोहिमेच्या हंगामात किल्ले सर करण्यात आणि मराठ्यांचे फुटकळ हल्ले परतवून लावण्यात मुहम्मदखान गढून गेला. कालकी आणि चिखलदा हे नर्मदेच्या उजव्या काठावरचे किल्ले उदाजी पवाराकडे होते. एप्रिल १० रोजी ते कबजात घेतले. भिल्लांच्या ताब्यातील काही किल्लेदेखील सर केले. पण ही कामे चालू असतानाच मंडलेश्वराजवळ लुटालूट करीत असलेल्या मल्हारी होळकराच्या समाचारास जाणे भाग पडले. नवाब विरोधासाठी त्याच्या समोर जाण्यापूर्वीच मल्हार जयपूरच्या मुलखात निघून गेला. इतर मराठ्यांनी नर्मदा ओलांडली, मांडवजवळच्या मुलखात लुटालूट करून ते स्वगृही निघून गेले. अंतू शाहजहानपूरच्या भोवती लुटालूट करीत होता. इ. १७३१ मे १९ रोजी सुभेदार या आपल्या राजधानीच्या शहरी पोहोचला. आठवडाभराची विश्रांती घेऊन तो (नवाब) अंतूविरुद्ध मोहिमेवर निघाला. जून १३ रोजी नवाब कौथ[३५] या ठिकाणानजिक आला तेव्हा अंतूने माघार घेतली. (ज. ए. सो. बे., ३१४-३१५.)

दुसऱ्या दिवशी सारंगपूर हे ठिकाण लढवत असलेल्या अमलदाराचा तातडीचा निरोप आला की, तत्काळ कुमक मिळाली नाही तर होळकर मजवर मात करण्याची शक्यता आहे. तेव्हा मध्यरात्रीच्या सुमारास मुहम्मदखान निघाला व उत्तरेस १९ मैलांची मजल मारून सूर्य उगवल्यानंतर थोड्या वेळात सारंगपूरला येऊन पोहोचला. प्रवास संपवून ते मार्गातून बाजूला होतात न होतात तोच होळकर, अंतू वगैरेंनी त्यांच्यावर हल्ला चढविला. सबंध दिवसभर धुमश्चक्री चालली. सूर्य मावळण्याच्या सुमारास मराठ्यांनी पळ काढला. मध्यरात्री-पर्यंत मुसलमान मराठ्यांच्या पाठलागावर आणि त्यांच्या छावणीच्या लुटालूटीवर बाहेरच होते. मुहम्मदखानाने थोडाफार महसूल गोळा करण्याचा खटाटोप आता केला. येथून तो ईशान्येस १३६ मैलांवर असलेल्या सिरोंज या गावी पोहोचला. सिरोंज या ठिकाणीच आपले मुख्य ठाणे ठेवावे असा त्याचा कल दिसला. कारण हिंदुस्थानात माघार घेण्याच्या त्याच्या रस्त्यापासून ते ठिकाण अगदी जवळ पडत होते. इ. १७३१ चा पावसाळा त्याने या ठिकाणी घालविला असावा. द्रव्य काही वसूल होत नव्हते; त्यामुळे मदतीसाठी दरबारास विनंती अर्ज पाठवत मुहम्मदखान दिवस घालवत राहिला. [ज. ए. सो. बे. ३१७.]

३५ कौथ सारंगपूरच्या दक्षिणेस १९ मैलांवर आहे. ( इंडियन ॲटलास ५३ वायव्य )

## ८३ : मुहम्मदखानाची माळव्यातील मोहीम, दुसरे वर्ष

माळवा मोहिमेतील आपले दुसरे वर्ष सुरू होण्याच्या सुमारास (१७३१ ऑक्टोबर) मुहम्मदखानाने सिरोंजच्या उत्तर भागात मोहिमेला तोंड फोडले. कित्येक किल्ले सर केले आणि शेवटी राजा छत्रसिंग नरवरी याचे निवासस्थान असलेल्या शाहाबादला[३६] वेढा घातला. त्याशी करावयाच्या सलोख्याच्या अटी कबूल होतात न होतात तोच बाजीरावाने पुन्हा आक्रमण केल्याची खबर येऊन पोहोचली. राजा फरारी झाला. त्यामुळे सिरोंजला परत येऊन नव्या धोक्याचा मुकाबला करण्याखेरीज सुभेदाराला दुसरा मार्ग उरला नाही. [उपर्युक्त ३२०.]

गुजरातेतील घडी अशी बसली होती की मराठ्यांना आता गुजरातेतून कसलाच धोका उरला नव्हता. मराठे आता आपल्या सगळ्या बळानिशी माळव्याकडे वळले होते. त्यांच्याजवळ घोडेस्वारांची लाखाची फौज आहे असा एकाना हिशेब लागत होता. फत्तेसिंग वगैरे तीस हजार स्वारांनिशी खिमलासा या ठिकाणी, म्हणजे सिरोंजच्या पूर्वेला ४२ मैलांवर, ठाणबंद झाले होते. बाजीरावाचा भाऊ चिमणाजी, मल्हार आणि इतर हे तेवढ्याच स्वारांच्या फौजेनिशी काली सिंध पार्वती नद्यांच्यामध्ये उमटवाडा[३७] या ठिकाणी होते. मराठ्यांची १२ हजाराची फौज अजूनही नर्मदेच्या दक्षिणेला होती. त्याखेरीज बारा हजारांची फौज सागरच्या दिशेने येऊ घातली होती. मराठे येत असल्याचे जाहीर झाले की, जमीनदार मंडळी मराठ्यांना खंडणी देण्याची गर्दी करीत. अशा प्रकारे आपला कडेकोट बंदोबस्त करून हे राजे स्वगृही जाऊन स्वस्थ बसत, मुसलमानांना मदत करण्यासाठी हातपाय मुळीच हालवत नसत. पुणे येथे राजा शाहूबरोबर थेटच्या वाटाघाटी करण्याचा मुहम्मदखानाचा प्रयत्न निष्फळ ठरला होता. बाजीराव पंडित प्रधान 'हा त्याचा संपूर्ण आणि एकमेव असा सर्व बाबतीतील सल्लागार आहे' ३२१ असे सांगून मुहम्मदखानाला बाजीरावाकडे जाण्यास सुचविण्यात आले. (तदेव ३२१)

सिरोंजला पोहोचल्यावर मुहम्मदखानाला तातडीची इच्छा झाली की खिमलासा येथील शत्रूवर तावडतोब पडावे. पण त्यासाठी निघण्यापूर्वीच त्याला कळून चुकले की, ५० हजार लोकांसह मल्हार यापूर्वीच सिरोंजपासून अवघ्या ४–६ मैलांवर येऊन, ठेपला आहे. त्याचे आणखी २० हजार सैनिक दक्षिणेकडच्या आणि पश्चिमेकडच्या भागात विखुरलेले होते. मुहम्मदखानाने खिमलासा येथे जावयाचे ठरविले असते तर शत्रूचा पराभव करून त्याचा पाठलाग करण्याच्या कामासाठी निदान १५ दिवस तरी खर्ची पडणार हे उघड होते. शिवाय त्याच्या गैरहजेरीत सिरोंज, दिलसा वगैरे गावांची लुटालूट होण्याची शक्यता होती. किंबहुना त्याजवर मात होऊन ती खलास होण्याच्या बेतात होती म्हणून त्याने मराठा अंमलदारांना बोलावून घेतले. त्यांना भेटवस्तू दिल्या व तो त्यांच्याशी करारबद्ध झाला. तेव्हा मराठ्यांनी तेवढ्या वेळेपुरता तरी तो सुभा खाली करून दिला. (तदेव ३२२).

३६ शाहाबाद नरवरच्या नैर्ऋत्येस ५५ मैलावर आणि सिरोंजच्या वायव्येस ८४ मैलांवर आहे.

३७ उमटवाडा–या शब्दाशी काही तरी साम्य दर्शविणारे एकमेव स्थळ म्हणजे अंताह–हे कोटयाच्या थेट पूर्वेस २८ मैलांवर आहे. ( इंडियन ॲटलास, ५१ नैर्ऋत्य ) ( जदुनाथ सरकार )

इ. सन १७३२ चा पावसाळा सिरोंज मुक्कामी त्याने घालविला. या फावल्या काळात त्याने दिल्लीकडे मदत मागणारे अर्ज वारंवार गुदरले. मुहम्मदखानाची सामग्री आता संपुष्टात आल्यासारखी होती. त्याच्या सगळ्या जहागिरी बुंदेलखंडात होत्या. तो लिहितो की, माझे अहवाल फार पाल्हाळीक आणि अतिशयोक्तिपूर्ण वाटत असतील तर दरबाराने ते संक्षिप्त करू शकणाऱ्या दुसऱ्या कोणास तेथे पाठवावे; या नव्या माणसाच्या हाताखाली मी आनंदाने काम करीन; सध्या घडत आहेत त्याच घडामोडी दीर्घकाळ घडत राहिल्या तर मराठे हिंदुस्तान पादाक्रांत करतील; मग त्यांच्या आक्रमणाला आत्ताच प्रतिकार करणे बरे नाही काय? शेख सअदी याने म्हटलेले नाही काय की "झरा उगम पावतो तेथे तो सुई ठेवून देखील बंद करता येतो पण तो जेव्हा मोठा होतो तेव्हा, हत्तीवर बसून देखील ओलांडता येत नाही". [तदेव ३२३.]

मदत काही आली नाही. नव्या सुभेदाराची नेमणूक लवकरच होईल अशी बातमी स्थानिक अमलदारांना आली. निजामुल्मुल्कालाही तिनवणी पाठविली होती. पण मदतीचे कसलेच चिन्ह त्याच्याकडूनही दिसेना. दरबारहून आलेला एकच जबाब म्हणजे समसामुद्दौलह याजकडून आलेले निर्भर्त्सनेचे एक पत्र. बादशाहाने स्वहस्ते लिहून काढलेले फर्मान लवकरच मुहम्मदखानाच्या हाती पडले. तुझा उत्तराधिकारी म्हणून राजा जयसिंग सवाई याची नेमणूक केली असे त्यास बादशाहाने कळविले. बादशाह आग्र्यास जाण्यास निघण्याचे इच्छित असून तुम्ही तेथे बादशाहासमोर हजर व्हावे असा आदेश मुहम्मदखानाला झाला. मुहम्मदखानाने आपल्या उत्तराधिकाऱ्यांच्या अमलदारांच्या हवाली शहर देऊन सुभा सोडला व तो १७३२ डिसेंबर १६ रोजी आग्र्यास पोहोचला. [तदेव].

द्रव्यविषयक अडचणी आणि त्यास आलेले एकंदर सैनिकी अपयश वगळता मुहम्मदखानावर अवकृपा होण्याची तीन कारणे दिसतात. एक म्हणजे राजवाड्यात वजन असलेल्या माळव्यातील जागीरदार मंडळींनी त्याजविरुद्ध केलेल्या तक्रारी, दुसरी म्हणजे खोजा हाफिज खिदमतगारखान वगैरेंचा आश्रित नरवरचा छत्तरसिंग याजवर मुहम्मदखानाने केलेला हल्ला आणि तिसरे सुभेदार आणि निजामुल्मुल्क यांच्यात उद्‌भवू घातलेली मैत्री. कदाचित या तीन बाबीपैकी तिसरी बाब म्हणजे सर्वात मोठा अपराध असावा; कारण दिल्लीत, दरबारची सूत्रे हाती असणारी मंडळी त्यावेळी निजामुल्मुल्काच्या हालचालीवर अगदी मत्सराने नजर ठेऊन होती. नंतरच्या काळात मराठ्यांनी भराभर ज्या चढाया केल्या त्यावरून हे स्पष्ट दिसते की, मराठ्यांचे प्रकरण प्रतिकार करण्याच्या दृष्टीने, एका सुभेदाराच्या आवाक्याबाहेर गेले होते. काही कनिष्ठ दर्जाची साधने होती. त्यायोगे बादशाहाचा वजीर आणि अमीरुल्‌उमरा जे काही साध्य करू शकत, त्यापेक्षा जास्त कामगिरी मुहम्मदखानाने बजावली हे स्पष्ट आहे. (तदेव ३२४, रुस्तम अली २६१अ.)

जयसिंगाची माळव्यातली कारकिर्द अल्पकालीन व वैभवशून्य ठरली. हि. ११४८ (१७३५-३६) मध्ये दोन वर्षांच्या सामन्यानंतर मराठ्यांनी त्याला माळव्यातून हुसकून लावले आणि अचानक ग्वाल्हेरपर्यंत आणि त्याच्या पलीकडेही चढाई करीत ते आले. याचा परिणामकारक प्रतिकार झाला नाही. दिल्ली दरबारची सूत्रे समसामुद्दौलह याच्या हाती होती. तो आणि त्याचा जानी दोस्त जयसिंग यांना असे वाटे की आक्रमकांना संतुष्ट

करण्यातच सर्वोच्च शहाणपण आहे[३८] १७३६ जुलै १६ रोजी धोलपूर येथे एक बैठक झाली. राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, जसवंतराव पवार वगैरेंना घेऊन बाजीराव राजा जयसिंग याच्या भेटीस गेला. सहीशिक्क्यानिशी तेथे करार पुरा करण्यात आला त्यानुसार यापुढे शाही प्रदेशात लुटालूट न करण्याच्या बाबतीत मराठ्यांनी स्वत:ला बांधून घेतले. त्याच्या बदल्यात बाजीरावाला राजा जयसिंग याजकडून माळव्याच्या नायब सुभेदाराची नेमणूक मिळाली. अशा प्रकारे फजिती टाळण्यात आली पण त्यातून चांगले काही साधले नाही. पुढे आपल्याला दिसूनच येईल की लुटालुटीच्या मामल्यापासून मराठे थोडेसुद्धा परावृत्त झाले नाहीत. तडजोड याचा अर्थ बाजू कमकुवत असल्याचे चिन्ह आणि सवलत याचा अर्थ नव्या मागण्या करण्याची सबब असा लावला गेला. [ज. ए. सो. बे., ३२७.]

---

३८ अशाप्रकारे माळव्याची विभागणी झाली : " शिंदे, होळकर आणि जसवंतराव पवार याच्यात ठरले की आपल्या राजाच्या पदरात पडलेला मुलूख वाटून घ्यावा, फौजा बांधाव्यात आणि सर्व गोष्टी एकमेकांच्या विचाराने कराव्यात. प्राप्तीतील ३१ टक्के वाटा ( राजा शाहूच्या ) सरकारला जावयाचा होता, प्रत्येकी ३० टक्के वाटा शिंदे आणि होळकर याना मिळावयाचा होता व उरलेले ९ टक्के पवारांना द्यावयाचे होते. या ठरावास बाजीरावाची संमती मिळाली. वाटणीच्या हिश्श्याचे दर मात्र नंतरच्या काळात दुरुस्त झाले व शेवटी प्रत्येकाचे वाटे पुढीलप्रमाणे निश्चित झाले–४५ टक्के राजास, २२ $\frac{1}{2}$ टक्के प्रत्येकी शिंदे व होळकर यास आणि १० टक्के पवार यास." ( सरदेसाई, खंड दोन, ३७५–३७६ ) ( जदुनाथ सरकार)

प्रकरण दहावे

# मुहम्मदशाह : त्याचे दरबार व्यवहार, १७२१–१७३३ आणि उत्तर हिंदुस्थानात मराठे, १७३२–१७३८

## ८४ : दिल्लीतील चांभारांची दंगल

राजवटीच्या अकराव्या वर्षी झालेली जोडेविक्या चांभारांची दंगल त्या काळाच्या सगळयाच इतिहासामध्ये पुष्कळ जागा व्यापून आहे. राजधानीत चालणाऱ्या दांडगाईचे चित्र उभे करण्याच्या दृष्टीने या दंगलींच्या घटनेला महत्त्व आहेच, पण त्याशिवाय मुहम्मदशाहाच्या पहिल्या बारा-तेरा वर्षांच्या कारकिर्दीच्या काळात बादशाहाच्या मनावर ज्यांचा अप्रतिहत प्रभाव होता त्या राजमहालातील आवडत्या व्यक्तींच्या गटाचे अधःपतन घडवून आणण्यास साधक होण्याच्या दृष्टीनेही या दंगलीस महत्त्व आहे.

परंपरेनुसार कनिष्ठ वर्गातील मुसलमान शाबान महिन्याच्या पूर्वार्धात उत्सव साजरा करतात. रोषणाई करणे आणि रस्त्यात दारूकाम करणे ही या उत्सवाची विशेषता असे. या महिन्याच्या ८ तारखेला (८ मार्च १७२९) कोणी एक शुभकरण नावाचा, शाही कारखान्यातील सराफ जामदारखान्याचा अधिरक्षक ख्वाजा हाफिज खिदमतगारखान याच्या घरून निघून स्वतःच्या घरी जाण्याच्या वाटेवर होता. या माणसाला रोशनुद्दौलह पानिपती या शेलक्या उमरावाने सांभाळलेले होते. याच्याच खटाटोपाने शुभकरण याला शाही मनसब मिळाली होती आणि खानसामानाच्या कार्यालयात एका महत्त्वाच्या जागेवर चाकरीदेखील मिळाली होती.[१]

शुभकरण जोहरी बाजाराच्या मागच्या बाजूला रहात होता. त्याच्या घराचा रस्ता राजमहालाच्या दक्षिणेस असलेल्या सादुल्लाहखानाच्या चौकात असलेल्या जोडेविक्या चांभारांच्या दुकानावरून जात होता. हे जोडेविके सगळे पंजाबी होते. त्यांची दुकाने असंख्य व मोठमोठी होती. रस्त्याच्या दुतर्फा त्यांची रांगच्या रांग होती. हे सगळे कडवे मुसलमान होते. प्रार्थनेचे व्रत ते कटाक्षाने पाळीत. त्यातील वृद्ध माणसे आदरणीय समजत. या वृद्धांचा पोषाख नीटनेटका असे. त्यांना लांब दाढीही असे. त्यातील कित्येकांना कुराण तोंडपाठ होते; त्याचे विवरण करण्याचीही कुवत त्यांच्याजवळ होती. शुभकरण मुन्शीची पालखी या चांभारांच्या ओळीला आली तेव्हा हिंदू आणि मुसलमान या दोन्ही जमातीचे लोक उत्सवाच्या निमित्ताने नेहमीच्या रीतीनुसार रस्त्यात फटाके उडविण्यात गुंग होते. एक फटाका उडून पालखीत शिरला व त्यामुळे मुन्शीचा दरबारी पोषाख जळून, त्यास एक छिद्र पडले. पालखीच्या भोवती असलेल्या चाकरांनी याबद्दल तक्रार केली. थोडीशी बाचाबाची झाल्यावर

---

[१] आशोब ५६ अ–६४ ब (या निवेदनाचा आधार); बयान-इ-वाकिअ ४९७–५०७; वारिद २६–३२ आणि ३७.

दोन्ही पक्ष गुद्दागुद्दीवर आले. पालखीसोबतच्या लवाजम्याजवळ हत्यारे होती. पण चांभारांच्याजवळ त्यांच्या कानशी तेवढ्या होत्या. असे असले तरी चांभारांचे संख्याबळ मोठे होते. त्यांनी एका शिपायाला पकडले आणि त्याची ढाल-तलवार हिसकावून घेतली. शुभकरणाला याचा राग आला. घरी गेल्यावर त्याने अचानक निःशस्त्र केलेल्या माणसाला परत जाऊन हल्लेखोराला अद्दल घडविण्याचा हुकूम केला.

रात्र पडल्यावर हा चाकर आपल्याबरोबर आपल्या मित्रमंडळींचा जथा घेऊन जोडेविक्यांच्या गल्लीस गेला. तिथल्या एका पोऱ्याला पकडून त्यास इतके बेदम चोपले की ते पोरगे मरते की काय अशा स्थितीला आले. त्या मुलाचे ओरडणे ऐकून हाजी-हाफिज नावाचा एक आदरणीय वृद्ध आपल्या चारपाईवरून उठला आणि अनवाणी पायानेच त्या पोऱ्याच्या मदतीला धावला. पोराला त्यांच्या तावडीतून सोडविण्याच्या खटाटोपात खुद्द हाजी यालाच तलवारीचा वार लागला. त्यामुळे तो कोसळला आणि मरण पावला. त्याचा मृतदेह तेथेच टाकून हल्लेखोर आपापल्या घरी सटकले. पहाटेच्या वेळी चांभारमंडळी व तद्नंतर सबंध शहर त्या मृतदेहाभोवती गोळा झाले. खुनी माणूस आणि त्याचा धनी ठार होत नाही तोपर्यंत मृतदेहाचे दफन करावयाचे नाही अशी शपथ जमावाने घेतली. सगळ्या कनिष्ठ वर्गातील मुसलमानांनी आपले बळ चांभारांच्या पारड्यात टाकले. तो मृतदेह त्यांनी एका पलंगावर ठेवला; मोठी खळबळ माजवीत दीन-दीन असा गिल्ला करीत तो शुभकरणाच्या दारासमोर नेऊन ठेवला.

रात्रीच्या वेळी शुभकरणाने शेरअफ्कनखान पानिपती याच्या घरी आसरा घेतला. हा शेरअफ्कनखान पानिपती त्यावेळी खानसामान पदावर असल्यामुळे तो शुभकरणचा वरिष्ठ अधिकारीच होता. पूर्वी सांगितलेच आहे की हा पानिपतचा जाफरखान रोशनुद्दौलह याचा आश्रित होता. विवाहसंबंधामुळे रोशनुद्दौलह हा शेरअफ्कनखान याचा नातेवाईक लागत होता. नाते असल्यामुळे व दोघांचे मूळ गाव पानिपत हेच असल्यामुळे हे दोघे उमराव एकमेकांचे घनिष्ठ मित्र होते. शेरअफ्कनखान हा लुत्फुल्लाहखान सादिक या अगदी अव्वल दर्जाच्या उमरावाचा धाकटा भाऊ देखील होता. घाबरून पळून आलेला हा आपल्या कार्यालयातील आपला कनिष्ठ आहे आणि तो आपल्या घनिष्ठ मित्राचा आश्रित आहे या दोन कारणांमुळे शेरअफ्कनखान याने शुभकरणला जमावाच्या हवाली करण्यास नकार दिला. खरे तर तो आपल्या घरात आहे हेच त्याने धडधडीतपणे नाकारले. मृतदेह मुन्शीच्या दारात टाकून जमाव राजमहालावर तक्रार गुदरण्यासाठी गेला.

जमाव राजमहालावर पोहोचण्याच्या वेळी बादशाह मुहम्मदशाह हा आपली आई कुदसिया बेगम हिच्यासह जाफरखानाच्या बागेहून परत येत होता. दीन-दीन आणि इन्साफ इन्साफ अशा घोषणा देऊन जमावाने बादशाहाचे स्वागत केले. हकीकत काय आहे ते सांगण्यास बादशाहाने फर्माविले. वजीर पदावर असलेला कमरुद्दीनखान हा दरबारगृहाचा दारोगा (अधीक्षक) देखील होता. दरबारातील एक चाकर पाठवून, आरोपीस, तो सापडेल तेथून पकडून आणा, असा बादशाहाने त्याला हुकूम केला. या हुकुमाबरहुकूम वागण्यास शुभकरणचा आश्रयदाता शेरअफ्कनखान याने साफ नकार दिला. अशा घडामोडीतच गुरुवारचा दिवस संपुष्टात आला.

शुक्रवारच्या दिवसाच्या (हि. ११४१ शाबान ११ = ११ मार्च १७२९) अगदी पहाटेपासून चांभारमंडळी शहरभर फिरून, प्रत्येक मुसलमानाने निषेधात सामील व्हावे आणि मुसलमानी धर्म व त्या धर्माचे अनुयायी यांचा बचाव करावा असे आवाहन करू लागली. जामा मशिदीत सर्वांनी जमावे असे ठरले होते. दुपारच्या प्रार्थनेची वेळ झाली तेव्हा मशिदीच्या प्रशस्त पटांगणात खूप गर्दी उसळली होती. प्रार्थनेच्या जागी आणि व्यासपीठावर इतकी खेचाखेच झाली की प्रार्थनेच्या विधीत व्यत्यय आला. गोंगाट आणि गोंधळ क्षणाक्षणाला वाढत गेला. या जमावात रूमीखानाच्या चाकरीतील अरब, हबशी आणि कुस्तुंतुनिया तुर्क तसेच सय्यिद, अरब अलीखान बगदादी याचे आश्रित निदर्शनाचा आवाज करताना उठून दिसत होते. यातील बहुतेक मंडळी शाही तोफखान्यात हैदर कुलीखान, मीर आतिश, म्हणजे तोफदळ-प्रमुख, असल्यापासून चाकरीत होती. ही मंडळी हत्यारबंद नव्हती; तरी ती म्होरक्याप्रमाणे वागली. व्यासपीठाभोवती कडे करून माणसांना चेपत ती पुढे चालली. गुडघे टेकून प्रार्थना करणाऱ्यांना, प्रार्थना-विधीनुसार पायावर उभे राहाणे आवश्यक असतानादेखील खेचाखेचीमुळे त्यांना उभे रहाणे अशक्य झाले. जमावास प्रार्थनेत सामील होण्याची मागणी करणारी घोषणा मशिदीतील अमलदाराला करू देण्यास जमावाने दांडगाई करून प्रतिबंध केला. काझी आणि मुसलमानी कायद्याचे विवरण करणाऱ्याला तडाखे मारून त्याला शिव्याशाप दिले. काफीर मंडळींना आसरा देण्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला. तलवारी बाहेर निघाल्या नाहीत किंवा रक्ताचा थेंबही सांडला नाही; पण काझी आणि त्याचा मुलगा यांना लाथाबुक्क्यानिशी, ते मरणप्राय: होईतोपर्यंत, तिंबून काढण्यात आले. प्रार्थना म्हणणारा आणि तिचे विवरण करणारा यांना व्यासपीठावरून फरफटत खाली ओढून जमिनीवर फेकण्यात आले. ते जवळजवळ बेशुद्ध पडेतोपर्यंत जमावाने त्यांना चांगले बुकन काढले.

ही दंगल उसळण्याची खबर राजमहालात पोहोचली. बादशाहाच्या आज्ञेनुसार वजीर आणि रोशनुद्दौलह हे आपल्या सैन्यासह दंगल शमविण्यासाठी, सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी आणि प्रार्थनेच्या मार्गात आलेली आडकाठी दूर करण्यासाठी घटनास्थळी गेले. वजीर तेथे अगोदर पोहोचला. आपल्या अनुयायासमवेत त्याने उत्तर दरवाजाने मशिदीत प्रवेश केला. त्याने मुसलमान-धर्माच्या मदतीसाठी भरघोस आश्वासने दिली. आपल्या मृदू भाषणाने त्याने, काझी आणि त्याचे कनिष्ठ यांच्यावर झालेल्या हल्ल्यात दिसलेली, अतिरेकी हवा तेवढ्यापुरती तरी काढून टाकली. पण एवढा मोठा वजीरासारखा उमराव आपल्यात सामील झाला यात अपूर्वाई समजून जमाव आणखी निश्चयी बनला आणि आपल्या सूड उगवण्याच्या उद्दिष्टाचा पाठपुरावा करण्याचे जमावाने ठरविले. दुर्दैवाने रोशनुद्दौलह आपल्या अनुयाया-समवेत याचवेळी पूर्व दरवाजाने प्रवेश करता झाला. हे प्रवेशद्वार बादशाहासाठी असे. रोशनुद्दौलह याच्या लवाजम्यात आडमुठे अफगाण होते. आपल्या शौर्याविषयीच्या लौकिकाने ते शेफारलेले होते. हे लोक खुर्जा, सिकंदरा वगैरे दिल्ली भोवतालच्या परगण्यातील होते. त्यांचे पुढारी शाहजहानपूर, मऊशम्साबाद, आणि फर्रुखाबाद ("भारतीय अफगाणिस्तान") येथले होते. तर काही थोडे असामी सरहिंदमधील ठाणेसरच्या आसपासचे रहिवाशी होते. दक्षिणेच्या बाजूच्या दुसऱ्या एका वाटेने शेर अफ्कनखान आला. वध झालेल्या माणसाच्या रक्ताची किंमत त्याच्या वारसांना देण्यास लावण्याच्या खटाटोपात तो होता. वजीर आणि रोशनुद्दौलह मशिदीत आहे आहेत हे ऐकून तोदेखील आपली सगळी हत्यारबंद हिंदुस्थानी फौज सज्ज करून घराबाहेर पडला होता.

मशिदीत आणखी गर्दी होऊ नये यासाठी रोशनुद्दौलह याने मशिदीचे दरवाजे बंद करण्याचा हुकूम आपल्या अफगाणांना सोडला. रोशनुद्दौलह आणि शेरअफ्कनखान यांचे मुखडे नजरेस पडताच जमावाचा बेफामपणा चाळवला गेला. "दीन-दीन" आणि "काफरांचे थोबाड फोडा" असे ओरडत, त्यांच्या हातात एकमेव हत्यार म्हणून असलेले नालबंद जोडे जे त्यांनी आपल्या काखोटीत लपवून आणले होते—त्यांनी उगारले. आपल्या कोटाच्या लांब घेरात त्यांनी दगडधोंडे लपविले होते. हे जोडे आणि दगडधोंडे यांचा वर्षाव या दोन उमरावांवर त्यांनी केला. त्यांना जोरजोराने शाप दिले आणि ओंगळ शिव्या दिल्या. हल्ल्याचा पहिला मारा शेरअफ्कनखान यास सोसावा लागला. त्याचा "प्रतिष्ठा" जोडे आणि इतर फेकलेल्या वस्तूंचा मारा बसल्याने "झालेल्या अप्रतिष्ठेच्या अधीन बनली". फेकलेल्या वस्तू त्याच्या सापयावर आदळल्या. काही त्याच्या अंगावरून पलीकडे गेल्या; आणि रोशनुद्दौलह याच्या जरतारी मंदिलाच्या तुऱ्यावर जाऊन आदळल्या. नंतर दंगलखोरांनी आपल्या धन्यामागे रांगेत उभ्या असलेल्या अफगाणांवर हल्ला चढविला. हे सर्व होईपर्यंत वजीर नुसता प्रेक्षक बनून व्यासपीठाजवळ एकटाच उभा दिसत होता.

शेवटी दोन उमराव धोक्यात सापडले आहेत याबद्दल भीती वाटून आणि आपल्या नायकांची मार खाल्लेली व रक्तबंबाळ झालेली तोंडे पाहून संताप आल्याने अफगाणांचा संयम सुटला व ते ढाल-तलवारीनिशी हल्लेखोरांवर तुटून पडले. अफगाणांच्या हल्ल्यात बाजारकरू-मंडळींचा निभाव लागण्याची शक्यता नव्हती. तेव्हा दंगलखोरांची बाजू उचलून धरलेल्या तोफदळ असामींनी हलक्या बंदुका आणि युरोपियन पिस्तुले यांनिशी अफगाणांचा प्रतिकार करण्यास सुरुवात केली. तोफदळाच्या लोकांमध्ये मुघलपुरा भागात रहाणारे काही शिरजोर मुघल सामील झाले. व्यासपीठाच्या जवळच्या जागेवरून एका हबशाने दोन उमरावांच्या रोखाने बार टाकले. तेव्हा अफगाण बेफाम बनले आणि पुढे घुसले. आता दोन लढणाऱ्या पक्षांचा, सोडवता येणार नाही इतका गुंता झाला. तोफदळाच्या संख्याबळापेक्षा अफगाणांचे संख्याबळ फारच मोठे होते आणि जोडेदिके तर निःशस्त्र होते. एवढे होईपर्यंत वजीराभोवतालच्या मुघलांनी कसाबसा संयम बाळगला होता. पण आता आपल्या बांधवांना पराभव पत्करावा लागणार आहे हे दिसताच, त्यांनी वजीराच्या हुकुमाकडे दुर्लक्ष केले; आपली हत्यारे उचलून ते या भांडणात उतरले.

आणखी मुघल फौजा मशिदी बाहेरच्या रस्त्यावर, घोड्यावर स्वार होऊन सज्ज उभ्या होत्या. वजीर परतून जाईल तेव्हा त्याला सोबत करण्यासाठी त्या थांबून राहिल्या होत्या. जे काही घडत होते ते पाहून या बाहेरच्या फौजा भडकल्या. मशिदीच्या दरवाजास असलेल्या पहाऱ्यावरच्या अफगाणांना पिटाळून लावून, पायऱ्या ओलांडून, दरवाजे उघडून एका हाकेसरशी पायउतारा होऊन, एका धडाक्यात ते सगळे मशिदीत घुसले. त्यांच्या मागोमाग वजीराचा हत्ती आणि पाठीवर छोट्या तोफा आणि उडवावयाचे बाण लादलेले उंट यांना घुसविण्यात आले. यात कित्येक दंलखोर प्रणास मुकले. करता येईल तितके शर्थ करून आणि आपले पुढारी आणि आपले साथी पडत आहेत असे पाहून अफगाणांनी नमते घ्यावयास सुरुवात केली. शेरअफ्कनखान याच्या उजव्या मनगटावर तलवारीचा घाव बसला व त्यामुळे तलवार त्याच्या मुठीतून निसटली. त्याचे काही अनुयायी ठार झाले; काही जायबंदी झाले. बाकीचे आसरा शोधत पळाले आणि दक्षिण दरवाजाकडे घुसले. एवढे सगळे होत असताना अफगाण मंडळींनी रोशनुद्दौलहच्या भोवती आपली नुसती ढाल उभी केली होती. शेर

अफ्कनखान याने माघार घेतली तेव्हा त्यांनी रोशनुद्दौलह याला तसे करण्यास भाग पाडले. पण त्याच्या लठ्ठ आणि आडदांड देहामुळे अशावेळी लागणारा चपळपणा त्याला दाखविता येईना. तेव्हा झटापट करीत असतानाच अफगाणांनी त्याला चक्क खांद्यावर उचलले. तशाच स्थितीत झटापट करीत धापा टाकीत ते दरवाजापाशी पोहोचले.

मशिदीतून बाहेर पडून तेथून जवळच असलेल्या शेरअफ्कनखानाचा थोरला भाऊ दिल-दिलेरखान याच्या घराकडे ते पळाले. आतल्या अफगाणांना जेव्हा समजले की आपले दोन्ही उमराव सुरक्षित स्थळास पोहोचले आहेत तेव्हा त्यांनीही मशिदीची जागा सोडली आणि दुसरीकडे आसरा शोधला. वजीर कमरुद्दीनखान याच्या हुकुमांची तमा न बाळगता, दंगलखोरांनी पळणाऱ्यांचा पाठलाग करून लढा चालू ठेवण्याची इच्छा दाखविली. दिल–दिलेरखानाच्या घराला वेढा घालावा, ते घर जाळावे, नष्ट करावे, आपले सावज पकडावे आणि सूड उगवावा असा त्यांचा इरादा दिसला. पण शेवटी त्यांना यापासून परावृत्त करण्यात यश आले. रोशनुद्दौलह याच्या मालकीतील ज्या उमरावांना लढतीची दगदग मानवण्यासारखी नव्हती ते बरेच उमराव मशिदीच्या कोपऱ्यात, कमानीत आणि मनोऱ्यात लपून बसले. त्यांच्या लपण्याच्या जागेच्या आसपास, त्यांच्यावर टाकलेले बार पडू लागल्याने, त्यांना तेथूनही बाहेर पडावे लागले. तेव्हा बाजारास लागून असलेल्या कमानीवर ते चढले आणि तेथून जमेल त्याप्रमाणे त्यांनी रस्त्यावर उड्या घेतल्या. अअ्जमखान नावाचा कोणी एक महाभाग अशा प्रकारे पळून जाण्याच्या प्रयत्नात असता त्याच्या हातून एक हास्यास्पद साहस घडले. तो जेथे चढून गेला होता तेथून खाली एका गवती छपराखाली कुंभाराचे गाडग्यामडक्यांनी भरलेले दुकान होते. गवती छपराचा सगळा बोजा भदून त्याचे पाय छपरातून खाली गेले आणि तो तुळई आणि बांबू यांच्यामध्ये अडकला. आपल्या छपराचे झालेले नुकसान पाहून कुंभाराला राग आला. आपल्या मालाचीदेखील नुकसानी होईल असा धोका त्याला वाटला. तेव्हा त्याने फोक घेऊन अअ्जमखानाची तंगडी सपाटून चोपून काढली. या चोपामुळे त्याचा पाय सुजला व हाड मोडले. पुढे कित्येक दिवस पायावर उभे राहाणे अअ्जमखानाला जमत नव्हते.

दिवसभराच्या घडामोडींचा परिणाम म्हणून आपले हातपाय एवढेसुद्धा न हालवलेला वजीर, इस्लामचा काफराविरुद्धचा संरक्षक या नात्याने, लोकांत मान्यता पावलेला नायक ठरला. मुहम्मदशाहालाही आनंद झाला; कारण निर्णय करण्याचे जोखड आता त्याच्या खांद्यावरून उतरले होते. आपल्या डोक्यावरचा मंदील काढून, बादशाहाने तो वजीरास बक्षीस म्हणून देण्यासाठी खोजाच्या हातात दिला. त्यास आपल्यासमोर ताबडतोब हजर होण्याचा हुकूम दिला. मशिदीतून दंगलखोरांना बाहेर घालविण्यासाठी माणसे मुकर करून, दरवाजावर कडक पहारा बसवून आणि "पवित्र पाऊल-ठश्यांच्या" पडद्यात आपली आसरची प्रार्थना म्हणून, परमेश्वराला धन्यवाद देऊन, दर्ग्याच्या विश्वस्तांना देणग्या वाटून वजीर खोज्यासमवेत दरबारास परतला. घडलेली हकीकत त्याने बादशाहास निवेदन केली. प्रथम बक्षी समसामुद्दौलह हा सबंध दिवसभर राजमहालात कामावर थांबला होता. दोन्ही उमराव बक्षिसी घेतल्यावर तेथून बादशाहाची अनुमती घेऊन निघाले व बादशाहदेखील राजमहालात परतला. खून झालेल्या जोडेविक्याचे त्या रात्री दफन झाले. जमावाने मुन्शीचे घर जमीनदोस्त केले होते. त्या उध्वस्त घराच्या जागेत जोडेविक्याचे दफन झाले. त्याच्या कबरीवर पुढे मशिद बांधण्यात आली. पुढे कित्येक वर्षे या घडामोडीवर फार्सी आणि हिंदी भाषेत कवने करण्यात येत होती.

## ८५ : दरबारातील गट आणि दरबारची लाडकी मंडळी (१७२१ ते १७३४)

आपल्या संपूर्ण राजवटीत मुहम्मदशाह याजवर त्याच्या खासगीतील लाडक्या मंडळींचा प्रभाव होता. या लाडक्या मंडळीतील बहुतेक जण स्त्रिया होत्या किंवा खोजे होते. मुहम्मदशाह स्वभावाने कमकुवत असल्याने या लाडक्या मंडळींना राज्यव्यवहारात ढवळाढवळ करण्यास उत्तेजन मिळाले. एक लेखक (आशोब, ११अ) लिहितो त्याप्रमाणे या काळाचे उमराव पोरकट गोष्टी एकण्यात मनमुराद आनंद उपभोगत. हमजा नावाचा अरब ७२ लढाया कसा खेळला आणि त्यातल्या पहिल्याच लढाईत तो कसा ठार झाला होता असल्या थिल्लर गोष्टी त्यांना आवडत किंवा शाहनामा अथवा महाभारत यामधला चोथा चघळण्यात त्यांना धन्यता वाटे. या दरबारी मंडळींना पुढील पद्यपंक्ती लागू पडत होत्या.

सारख्या पंखांची पाखरे
उडतात संगतीसंगतीने
पोरासोरांना आवडतो पोरकटपणाच;
कावळा इतर कावळ्यांसहच आश्रयस्थानी जातो.
बुलबुलाचे कूजन त्याला आवडेल कसे ?

आपण पूर्वी पाहिलेच आहे की दरबारातील ही भानगडखोर मंडळी निजामुल्मुल्काच्या सार्वजनिक विरोधकांशी संधान जुळवून असत. या मार्गाने त्यांनी निजामुल्मुल्काला आपली वजीरी इतकी असह्य करून टाकली की निजामाने वजीरीकडे पाठ फिरविली आणि दख्खनचा रस्ता धरला. राजवटीच्या पूर्वार्धात या सर्व लाडक्या मंडळीत प्रामुख्याने तळपणारी व सर्वात जास्त प्रभावी ठरलेली एक स्त्री होती. तिचे नाव रहीमुन्निसा. पण तिला कोकीजीऊ (म्हणजे दूधबहिणाबाई) याच नावाने विशेष करून संबोधले जाई. राजमहालातील हाफिज खिदमतगारखान नावाचा एक खोजा तिचा हरकाम्या होता; शिवाय तुर्रा-इ-बाज या टोपणनावाने माहीत असलेला पानिपतचा रोशनद्दौलह जफरखान आणि शाह अब्दुल्-गफ्फर नावाचा एक साधू वाटणारा पुरुष हे तिचे आणखी मदतनीस होते. या काळात खानदौरान समसामुद्दौलह या अमीरूल-उमरापदावर असलेल्या उमरावाचा शापसदृश प्रभावदेखील तितकाच वरचढ होता. वजीर सुस्त होता. त्याच्या सवयी स्वैरवर्तनाची ग्वाही देणाऱ्या होत्या. कारभारात मुहम्मदशाहाचा कार्यभाग, एक लेखक लिहितो त्याप्रमाणे एवढाच की "तख्तावर बसणे आणि राजमुकुट परिधान करणे." (खाफीखान ९४०, वारिद ४४.)

कोकीजीऊ ही एक हुषार आणि कर्तबगार स्त्री होती. जान मुहम्मद नामक माणसाची ती मुलगी होती. जान मुहम्मद रमलविद्या जाणणारा होता. अगोदर तो जुन्या दिल्लीत छपरे शाकारण्याचे काम करीत असे. लहान वयाचा असतानाच तो मुसलमान झाला. आपल्या गल्लीतील शाळेत तो थोडेफार शिकला. रमलविद्या शिकून, तो शकून सांगण्याच्या त्या पद्धतीद्वारे, भविष्यकथन करून उपजीविका करू लागला. त्याला ६ अपत्ये झाली. त्यातील चार मुलगे व दोन मुली होत्या. या मुलांना त्याने शाळेत घातले. यातल्या प्रत्येकाने लिहिण्याच्या कामात कमीजास्त कौशल्य संपादले. पण या सर्वांमधील, सर्वात थोरली मुलगी रहीमुन्निसा ही सर्वात जास्त बुद्धिमान निघाली. हस्ताक्षर काढण्यात आणि लेखन करण्यात ती आपल्या सर्व भावंडात उजवी होती. आपल्या बापाचे निरोप पोहोचविण्यासाठी तिला उमरावांच्या घरी जावे लागे. संपर्कामुळे तिने वागण्याच्या खानदानी ढबी आत्मसात केल्या.

हळूहळू तिच्या बापाची कीर्ती पसरू लागली. सलीमगढच्या महालसदृश कारागृह इमारतीत राहाणाऱ्या शाही कुटुंबातील शाहजाद्यांच्या जनानखान्यातील स्त्रियांदेखील आता त्याला भविष्य विचारू लागल्या. पूर्वेकडच्या स्त्रियांच्या स्वभावानुसार दात पडणे, शकून होणे वगैरे गोष्टींवर त्यांची गाढ श्रद्धा होती. त्यानुसार घडले अथवा न घडले तरी त्यांची ही श्रद्धा ढळत नसे. महालातील मुख्य मुख्य अशा रहीमुन्निसाच्या मित्रांमध्ये पुढे मुहम्मदशाह झालेल्या रोशन अख्तरची आई नवाब कुदसिया हिचा समावेश होता. तिचे एक मूल आजारी पडले. मूल बरे होईल असे भाकीत जान मुहम्मद याने वर्तविले होते. तेव्हापासून बेगमेची त्याच्यावर आणि त्याच्या भविष्यकथनाच्या अधिकारावर भक्ती बसली होती. याखेरीज जान मुहम्मद याने आपले ठिपके आणि रेषा यांचे अवलोकन करून रोशन अख्तर तख्तावर बसेल असे भाकित केले होते. तेव्हापासून रहीमुन्निसा नजरेआड झाली तर नवाब कुदसियाला करमेनासे होई. ही बाई केव्हाही येथे येते हे पाहून दरवाजावरच्या पहारेकऱ्यांनी तिच्या तेथे येण्याच्या मार्गात अडथळे आणण्यास सुरुवात केली. तेव्हा तिला आत प्रवेश मिळण्यासाठी हजारो कावे आणि काकुळत्या कराव्या लागत. या अडचणी दूर व्हाव्यात म्हणून रहीमुन्निसा आणि रोशनअख्तर हे दोघे एकाच दायीच्या अंगावर दूध प्यालेले आहेत आणि शाहजादा त्या दायीच्या अंगावर पीत असल्यापासून, त्याला तिचा लळा लागला आहे, असे उठवून दिले. तेव्हापासून तिला कोका किंवा कोकीजीऊ म्हणजे दूधबहिणाबाई असे संबोधले जाऊ लागले. पत्रे लिहिण्याच्या कामावर तिला योजले होते. बेगम आणि तिचे सलीमगढाबाहेरचे मित्र यांच्यातील मध्यस्थ म्हणून ती कामगिरी बजावी. ही सेवा तिने मोठ्या कौशल्याने, कोणास कसलाही थांगपत्ता लागू न देता बजावली. (खाफीखान ९४०, सियर ७५ आशोब ४५ ब, वारिद ४४, खुशहाल १०४२)

मुहम्मदशाहाच्या पहिल्या दोन वर्षांच्या अमदानीत सय्यिद वजीर आणि त्याचा भाऊ या दोघांच्या हातीच सगळी सत्ता एकवटलेली होती; बादशाह कवडी किमतीचा बनला होता. पण सय्यिद बंधू संपल्यावर आणि मुहम्मद अमीनखान याचा अचानक मृत्यू घडल्यानंतर मुहम्मदशाहाला राज्यकारभार करण्याच्या बाबतीत थोडीफार मोकळीक मिळाली. ही लाभलेली सत्ता उपभोगताना कोकीजीऊचे वर्चस्व प्रभावी बनत होते. ती बादशाहाची रखेली बनली किंवा काय हे सांगता येणे कठीण आहे. पण बहुधा ती त्याची रखेली नसण्याचीच शक्यता जास्त आहे. तिच्या ठायी बादशाहाचा असलेला विश्वास किंवा तिच्या बापाच्या ठायी असलेली भविष्य सांगण्याची आणि यश मिळविण्यासाठी अथवा नशीब सिकंदर करण्यासाठी कोणता मार्ग अनुसरावा हे सांगण्याची असलेली शक्ती, यामुळे ती शक्तिमान बनली होती. खुद्द बादशाह तख्तावर बसला तेव्हा जेमतेम १८ वर्षे वयाचा होता. त्यावेळी त्याचे पोरकट चाळे चालत. राज्यव्यवहारांकडे त्याच्या हातून दुर्लक्षच होत असे. गप्पाटप्पा करणे किंवा अमीनखान उम्दतुल्मुल्क यांशी किंवा त्याच्यासारख्याच स्वभावाच्या इतरांशी चेष्टा-विनोद करणे यांत त्याचा काल जात असे. असे सांगतात की एके दिवशी मुहम्मदशाह म्हणाला की ती पुरुष असती तर मी तिला वजीर केले असते. एका शिरजोर दरबाऱ्याने तेव्हा सुचविले की रोशनुद्दौलहची दाढी कापावी व ती तिच्या गालांना चिकटवावी.[२] असेही सांगतात की कोकीजीऊ हिची बादशाहाकडे खूप चलती होती साम्राज्याचे शिक्कामोर्तब तिच्या ताब्यात असे आणि बादशाहाच्या वतीने कागदपत्रावर

[२] दलपतसिंकृत मलाहात-इ नवल, ब्रि. म्यू. ओरि., १८२८, ३२ अ.

ते उठविण्याची मुभा तिला होती. निजामुल्मुल्क वजीर असताना त्यास विरोध करण्यात कोकीने पुढाकार घेतला होता. यामुळे जिकीरीस आलेल्या वजीराने तिच्यावर एक उपहासात्मक अशी चार ओळींची कविता केली होती. या कवितेची शेवटची ओळ–" आलमगीराच्या जागी आज बसली आहे एक गलिच्छ बया " अशा आशयाची होती. (बयान, ५३०.) दरबार तिच्या अंगी लागला होता याचा एक विवक्षित दाखला म्हणून मुहम्मदखान बंगश याचे एक निवेदन सांगता येण्यासारखे आहे. त्या निवेदनानुसार, माळव्याचा सुभेदार म्हणून नेमणूक होण्यासाठी मुहम्मदखान बंगशने तिला एक लाख रुपये (१० हजार पौंड) दिले तरी होते किंवा देण्याचे आश्वासन तरी दिले होते. या मलिद्यामधील बराचसा भाग चोरून मारून बादशहाच्या खिशात जात असे यात संशय नाही. असल्या क्षुद्र, तात्पुरत्या लाभासाठी सगळे राज्य लयास जाते हे समजण्या इतका बादशाह शहाणा नव्हता. (ज. ए. सो. बे., पृ. ३०६; आशोब ४५ ब).

हाफिज खिदमतगारखान कोकीजीऊ हिचे हस्तक म्हणून वावरणाऱ्या त्रिकूटामध्ये हाफिज खिदमतगारखान नावाचा एक खोजा होता. ख्वाजा अंबर या नावाने तो अगदी लहानपणापासून आलमगीराच्या चाकरीत होता. त्याचे शिक्षणही आलमगीरा करवीच झाले होते. आलमगीराच्या तालमीत तयार झाल्यामुळे त्याच्या अंगावर कर्तृत्वाची झिलई चढली होती, पण प्रत्यक्षात तो कर्तबगार नव्हता. 'तांब्याला सोन्याचा मुलामा द्यावा' असा तो होता. प्रत्यक्षात गुलामाचे आणि खोजाचे गुणच त्याच्या अंगात मुरले होते. असल्या माणसांना खानदानी माणसांपेक्षा हलक्या कुळातला आणि हीन सवयी असलेली माणसेच आवडतात. वारिद हा लेखक जाहीरपणे सांगतो की, खिदमतगारखान लाच घेण्यास नकार देत असे; त्यामुळे याची मदत होण्याऐवजी याचा अडथळाच होत आहे असे वाटून त्याच्या चाकरीचा एक वर्ष अनुभव घेतल्यावर कोकीने त्याला आपल्या चाकरीतून दूर केले. ते काही असो, हा खोजा तिच्या अगदी विश्वासातला आहे आणि तिचा हस्तक आहे असे सर्वजण त्याचा मृत्यू होईतो समजत असत. त्याचा मृत्यू १७३२ जून २१ रोजी झाला. त्याचे व्यवहार सांभाळणारा मुख्य असामी म्हणजे खुशहालचंद कायस्थ. याला फार क्रूरपणे वागविण्यात आले. खोजा खाजगीकडचा फडणवीस होता व त्याला मीरत परगण्यात जमिनी होत्या. या दोन मार्गांनी गिळंकृत केलेला पैसा ओकण्यास भाग पाडण्यासाठी हा छळ झाला. त्याच्यावर कुत्री सोडली; पैसा कोठे लपविला आहे हे तो उघड करीतो कुत्र्यांनी त्याचे अंग फाडून खाल्ले. (खाफीखान ९४०; वारिद ४४, ४७; आशोब ४५ अ, ४६ ब; खुशहाल १०६०.)

रोशनुद्दौलह फर्रुखसियरच्या अमदानीच्या पहिल्या वर्षी ख्वाजा मुजफ्फर याचा उत्कर्ष कसा झाला हे आपण यापूर्वी पाहिले आहे. फर्रुखसियरची पदच्युती आणि मृत्यू यानंतर राज्यकारभारात जे काही बदल झाले तेव्हा या माणसाची नव्या राजवटीतील असामींशी मैत्री जमली. मुहम्मदशाहाच्या राजवटीच्या सुरुवातीच्या काळात त्याने बादशहाची लाडकी कोकी हिच्याशी घनिष्ट संधान बांधले. लवकरच त्याने आपला पाठिंबा देऊ करण्याच्या बदल्यात घेतलेल्या देणग्यांद्वारे भरगच्च माया केली. तो उच्चपदाला पोहोचला याचे समर्थन व्हावे असे कोणतेही गुण त्याच्या ठायी स्पष्टपणे दिसत नव्हते. पण दरबारी असामीजवळ

जो खुशामतीपणा असावा लागतो तो त्याजकडे होता यात शंका नाही[3] त्यास दरबाराबाहेर पाठविले की त्याची चमचम लुप्त होई. मेवात या कटकटीच्या मुलुखात फौजदार म्हणून त्यास चाकरी बजावावी लागली. या चाकरीमुळे त्याच्या लौकिकात भर पडली नाही पण बोलण्या वागण्यात तो रुबाबदार आणि आतिथ्यशील होता. दानधर्म करण्यात, विशेषतः साधूफकीरांना दानधर्म करण्यात, त्याने लौकीक मिळविला होता. शाह भिक या साधूचा तो श्रद्धाळू अनुयायी होता. शाह भिकन याचे दफन ठाणेसरजवळच्या टासका या ठिकाणी झाले आहे. दिल्लीपासून कुतबुद्दीनच्या दर्ग्यापर्यंतच्या रस्त्यावर वर्षातून एकदा तो रोषणाई करीत असे. या रोषणाईचा फार बोलबाला झाला होता. इमारती बांधण्याचाही त्याला शौक होता. त्याने राजवाड्याजवळ एक मशिद बांधली, तसेच चांदणी चौकात एक मद्रसा आणि मशिद बांधली. दोन्ही मशिदींचे घुमट आणि मिनार याजवर सोन्याचा मुलामा दिलेले तांब्याचे पत्रे मढविलेले होते. पानिपतला तशाच बांधकामाच्या धर्तीची एक मद्रसा त्याने बांधली व आपल्यासाठी एक दफनमदीर बनविले. कर्नाल आणि पानिपत या ठिकाणच्या शाह शर्फ बुआली कलंदर याच्या दर्ग्याच्या घुमटावर त्याने मुलामा चढविला व तेथे कमानी आणि मिम्बर बनविले. टासका येथे याच साधूपुरुषाच्या दर्ग्याची शोभा वाढविणारी सजावट त्याने करून दिली आणि यात्रेकरूंच्या सोयीसाठी त्याने तेथे एक धरवजा इमारत बांधली. तेथे एक सभागृह आणि एक अन्नछत्र खोलले. या सगळ्या गोष्टी अनेक खेड्यांसह त्याने दर्ग्याच्या हवाली करून टाकल्या. दिल्ली येथे त्याने कदम-इ-शरीफ (पवित्र पाऊल ठसे) या नावाने प्रसिद्ध असलेल्या दर्ग्याची दुरुस्ती केली आणि दर्गा साफ करण्याचे काम प्रतिवर्षी पार पाडले. प्रेषित जन्मल्याच्या दिवशी (रबिलावल महिन्याच्या १२ तारखेला) तो तेथे अन्नदान करी आणि देणग्याही वाटी.[4] (मा. उ. खंड दोन, ३३३, आशोब ४७ ब-५६, गुलाम अली १७ अ.)

## ८६ : शाह अब्दुल गफूर त्याचे जीवनकार्य आणि त्याचा प्रभाव

कोकीच्या त्रिकुटातला तिसरा सदस्य म्हणजे शाह अब्दुल गफूर होय. तो टट्टा येथील रहिवासी होता. तो सय्यिद या बिरुदाखाली खपून जाई. पण प्रत्यक्षात मात्र, तो कोष्टी आहे असा समज होता. आलमगीराच्या कारकिर्दीत तो काबूल शहरी येऊन पोहोचला. काबूलचा सुभेदार शाहजादा मुअज्जम (जो पुढे बहादूरशाह बनला) याच्या चाकरीत असलेल्या एका खोजाशी त्याने दोस्ती जमविली. त्यास खोटेनाटे करणारा ठरवून पुढे त्याची सुभ्याबाहेर हकालपट्टी झाली. त्याने काही काळ लाहोर शहरी वास्तव्य केले. नंतर बहादुरशाहाची छावणी गाठली. त्यावेळी बहादुरशाह आग्र्याच्या वाटेवर होता; तख्ताच्या झगड्यात त्याला अजून अज्जमशाहाशी सामना द्यावयाचा होता. आग्र्याहून दक्षिणेत कूच

३ वारिद (५८) एका म्हणीचा आधार घेऊन सांगतो, "त्याने तुम्हाला नमुना दाखविताना गव्हाचा दाखविला व माल मात्र मातूचा पोच दिला."–याचा अर्थ या माणसाची आश्वासने जबरदस्त असत पण कृती मात्र क्षुल्लक असे.

४ जरतारी भपकेबाज कपडे घालण्याचा त्याला फार शौक होता. आपल्या कपड्यात जमेल तेथे सोन्याचा धागा वापरण्याची त्याला हौस होती. आपल्या इमारतींच्या घुमटांना त्याने जे मढविले त्यावरूनही त्याची असली आवड सिद्ध होते. त्याचा लवाजमा रस्त्यातून पुढे गेल्यावर गरीबगुरीब लोक रस्ता झाडून केरकचरा गोळा करीत. त्याच्या पोषाखावरील सोन्याच्या जरीचे कण या केरकचऱ्यात असतील व ते निवडून घेता येतील असे त्याना वाटे.

करीत करीत अब्दुल गफूर हैदराबादेस पोहोचला. तो स्वतः पायी प्रवास करी आणि त्याची बायको त्याने पूर्वी मैत्री केलेल्या खोजाच्या मालकीच्या, ओझे वाहणाऱ्या बैलावर बसे. अशाच पद्धतीने तो येथून परत हिंदुस्थानला परतला. बहादुरशाहाच्या मृत्यूनंतर (इ. १७१२) लाहोरमध्ये दंगली उसळल्या तेव्हा अब्दुल गफूर दिल्लीस गेला.

अब्दुल गफूर हा मुसलमान जिन्न आणि सैतान यांचा धनिष्ट संबंधी असून त्यांच्याकडून जादूटोणा, मंत्र मोहिनीविद्या त्याने अवगत करून घेतली आहे, असा लोकांचा त्याजविषयी समज होता. आपल्या आयुष्याच्या आरंभीच्या दिवसात त्याने एका हिंदू संन्याशाची सेवा बजावलेली होती. हा साधू एका पहाडाच्या टोकावर सिंधू नदीपलीकडच्या अरण्यात, एकांतात जीवन व्यतीत करीत असे. या माणसाच्या मदतीने अब्दुल गफूर याने गूढविद्येत पदार्पण केले. या साधूचा दूत म्हणून तो डोंगरी राजांकडे आणि या साधूच्या इतर शिष्यांकडे ये-जा करू लागला. नंतर काही वर्षांनी हा योगी मरण पावला; आणि अब्दुल गफूर त्याचा वारस बनला. पण असल्या बंदिस्त विश्वात त्याची महत्त्वाकांक्षा अडकून राहू शकणारी नव्हती. पूर्वी सांगितल्याप्रमाणे त्याने शाह आलमचा (जो पुढे बहादूरशाह झाला) छावणीचा मार्ग धरला. त्यावेळी शाह आलम काबूलचा सुभेदार होता. येथे त्याने आपले रूप पालटले व तो मुसलमान साधू बनला.

तो जहांदारशाहाच्या छावणीमागोमाग दिल्लीस आला तेव्हा त्याने शहराबाहेर जुन्या मशिदीजवळ आपले बिऱ्हाड थाटले. त्या वेळी त्याच्यासोबत त्याचे एक-दोन सिंधी अनुयायी होते. अब्दुल गफूरने मंत्रून दिलेले ताईत हे शिष्य शहरभर हिंडून विकीत आणि त्यापासून मिळणाऱ्या पैशावर त्यांचा हा धनी गुजराण करी. हळूहळू त्याची कीर्ती पसरत गेली. त्याचा सल्ला घेण्यासाठी लोक गर्दी करू लागले. (आशोब ६८ अ, ६९ ब.) आपल्याला प्रत्येक शास्त्र आणि प्रत्येक कला अवगत आहे. आणि आपल्याला भविष्य वाचता येते असा त्याचा दावा होता. त्याने केलेल्या दहा बहाण्यांतील एक गोष्ट खरी असे; बाकीच्या गोष्टी खोट्या असत. राजमहालाच्या दरवाजावरचे अडाणी पहारेकरी आणि निरक्षर खोजे त्याचे शिष्य बनले. शाही जनानखान्यातील स्त्रिया आजारी पडल्या की त्या त्याच्याकडे ताईत मंत्रून मागू लागल्या. मुहम्मदशाहाची आई नवाब कुदसिया ही त्याची आश्रयदाती बनली. तिला पडणाऱ्या स्वप्नांचे अर्थ लावण्याचे काम त्याजवर येऊन पडले. यामुळे त्याच्या कीर्तीत आणखी भर पडली. त्याने ज्यांना ज्यांना ताईत मंत्रून दिले होते त्यातले काही लोक आजारातून बरे झाले. तो आणि त्याच्याशी पक्की मैत्री असलेली कोकी यांनी एकमेकांच्या पाठीशी रहाण्याच्या शपथा घेतल्या होत्या. तिने बेगमेस असे भासविले की हा माणूस साधू (वली) असून याजकडे अतिमानवी शक्ती (तसव्वुफ) आहे. हा देखील, कोकी आणि तिचा बाप हे रमलविद्येत तज्ज्ञ आहेत. याची ग्वाही देत असे. शेवटी दोस्ती झालेल्या एका खोजामार्फत आणि कुदसिया बेगमेच्या शिफारसीमुळे त्याचा मुहमम्द अमीनखान इतिमादुद्दौलह याशी परिचय झाला. या उमरावावर त्याने लवकरच आपली छाप बसविली. याची वाणी अस्खलित होती. म्हणून त्याला सगळे ज्ञान असल्याचे मानले जाई. त्यामुळे मुहम्मद अमीनखानाच्या अतिगुप्त खलबतांमध्ये देखील हा बसून राहिलेला आढळे. तो आणि अमीनखान यात एवढा धनिष्ट संबंध आल्यामुळे हा माणूस मुहम्मद अमीनखानाचा आध्यात्मिक गुरू आहे असे इतरेजन समजू लागले. हुसैन अलीखानाचा वध करण्याच्या

संबंधात जी काही कारस्थाने झाली त्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसते. कारस्थानी मंडळी आणि मुहम्मदशाहाचे खासगीचे तंबू यांत त्याची ये-जा चाले. ती सुकर व्हावी म्हणून तो गवळणीचे रूप व सोबत मुहम्मद अमीनखानाची पत्रे घेऊन जाई. मुहम्मद अमीनखान सत्तेच्या सर्वोच्च स्थानावर पोहोचल्या पोहोचल्या त्याचा मृत्यू घडून आला. तद्नंतर अब्दुल गफूरने आपल्याला कोकीच्या पक्षात गोवून घेतले. पुढे १२ वर्षे तो कोकी-इतकाच वजनदार ठरला होता. वडिलांच्या स्मृतींविषयी आदर दाखविण्यापोटी कमरूद्दीनखान त्यास पाठिंबा देत असे. दिल्लीतील आपल्या अल्पकालीन वास्तव्यात निजामुल्मुल्कदेखील या माणसाच्या आपण साधु पुरुष आहोत अशा दाव्याचा आदार करी. (वारिद ३९-४२; आशोब ६४-७२; खुशहाल १०४१-१०४२) नंतरच्या काळात, कोकीच्या बरोबर हातमिळवणी केल्यानंतर अब्दुल-गफूर सर्व शक्तिमान बनला आणि त्याने अमाप पैसा मिळविला. त्याला त्याच्या अधिकारपदाद्वारे होणारी प्राप्ती दरदिवशी ५ हजार रुपयांच्या घरात जाऊन पोहोचली. लाचलुपतीच्या मार्गाने, यापेक्षा जास्त मिळणारे पैसे वेगळेच, असे त्यावेळी बोलत. लाचलुचपतीद्वारे मिळणाऱ्या पैशाच्या जेमतेम १/४ भाग बादशाहास मिळे; उरलेल्या भागाची कोकी आणि अब्दुल-गफूर यांत समप्रमाणात वाटणी होई. हा अब्दुल-गफूर अगदी पराकोटीचा कंजूष होता. (वारिद ५८-७१.)

दरबारीमंडळी अथवा सर्वसामान्य लोक यांपैकी कोणामध्येच अब्दुल-गफूर प्रिय नव्हता. पण त्याचा मुलगा आणि त्याची मुलगी यांनी स्वतःवर ओढवून घेतलेल्या तिरस्कारांच्या मानाने त्याचा होणारा तिरस्कार अगदीच किरकोळ समजला पाहिजे. त्याच्या मुलाचे नाव अब्दुर्रहीम होते. हा तरूण असून दिसावयास चांगला होता. मुहम्मदशाहाच्या राजवटीच्या सुरुवातीच्या काळात याला ६ हजार जातची मनसब मिळाली. पण हा वागण्यात कमालीचा दुराचरणी होता. कारण असो वा नसो, कोणाचा जीव घेण्याची संधी आल्यास, ती साधण्यात तो किंचितही मागचा-पुढचा विचार करीत नसे. त्यास कधीकधी एक विक्षिप्तपणाची लहर येई. त्यावेळी तो बाजारबसव्या स्त्रीचा वेश परिधान करी. आपल्या हातापायावर मेंदीची नक्षी काढी, सोन्याचे दागदागिने अंगावर घाली, नंतर सोन्याची जर असलेला पट्टा खांद्याला बांधून त्याच्या आधाराने ढाल-तलवार लटकवून टाकी. असा वेश परिधान करून तो रस्त्यातून जाई. तेव्हा त्याच्याबरोबर दंडधारी मंडळी तसेच तोडच्याच्या बंदुकांच्या वाती पेटवलेल्या स्थितीत, बंदुका घेतलेले शिपाई असत. ही मंडळी प्रत्येक गर्दीत घुसत आणि प्रत्येक दंगलीत यांचा भाग असे. दुसऱ्या एखाद्या वेळी हा अब्दुर्रहीम पोलादाचा पूर्ण पोषाख करी. त्यावेळी त्याच्या दोन डोळ्यांखेरीज त्याचे दुसरे कोणतेच अंग दिसत नसे. आपल्या लवाजम्याला असलाच पोषाख चढवून तो रस्त्यातून रपेट करी. त्याच्या मार्गात कोणी आडवे आले की त्याचा सत्यानाश झालाच म्हणून समजावे. असल्या माणसांचा जिवानिशी निकाल लावण्यास तो चुकत नसे. पण विरुद्ध पक्ष जर शिरजोर निघाला तर हा पलायन करी. तो आपल्या घराच्या दरवाजापाशी हातात दारूचा पेला घेऊन बसे; तेव्हा नाचणाऱ्या बायकांना तेथे नाच करण्यासाठी फर्मावी.

तो आपल्या पायांना चाळ बांधे आणि नाचात सामील होई. यावेळी येथून रस्त्याने कोणी जाऊ नये म्हणून रस्त्याच्या दोन्ही टोकांना हत्यारबंद शिपायांचा पहारा बसवी. तरीही रस्त्याने जाण्याचा हेका कोणी चालविलाच तर त्याचा जीव

घेई. गरीब माणसाच्या स्त्रियांचे निघालेले मेणे त्याचे हस्तक अडवीत. मग या बायका त्याच्यापुढे हजर करीत. ज्या बायका त्याच्या पसंतीस उतरत त्या तो ठेवून घेई. आपल्या इतर आणि अधिक अनैसर्गिक वासना शमविण्यासाठी तो अमाप पैसा खर्च करी. अब्दुल-गफूरची मुलगी म्हणजे ह्याची वहीण तर ह्याच्यापेक्षाही अधिक बेशरम होती' (आशोत्र, ६६ ब.)

११४४ च्या अखेरीस (जून १७३२) हाफिज खिदमतगारखान खोजा मरण पावला. तेव्हा बादशाहाच्या जामदारखान्याचा कारकून या नात्याने त्याने मिळविलेली संपत्ती हस्तगत करण्यासाठी त्याच्या चाकरांचा छळवाद झाला. याच सुमारास या त्रिकुटातील इतर सदस्यांची बेअब्रू होऊ घातली होती. समसामुदौलहाने या त्रिकुटाचे पतन घडवून आणण्यासाठी सर्वांच्या अगोदर कारस्थान रचले. कोकीची बादशहावरील पकड संपुष्टात आली. तिचा भाऊ अली अहमदखान हा अर्जमुकर्र या विभागाचा दारोगा होता. त्याच्या हातून अपराध घडले. सर्वात विपरित गोष्ट म्हणजे राणी मलिकादौरान हिचे तिच्याशी भांडण झाले. कोकीजवळच्या पैशाची मागणी झाली. सगळा पैसा बादशहाचा आहे असे तिने उत्तर दिले. आपल्या जनानखान्यामधील खोलीच्या किल्ल्या बेगमेकडे पाठवून तिने राजमहाल सोडला. समसामुद्दौलाने रोशनुद्दौलाहवर एक आरोप ठेवला. पेशावर पासून काबूलपर्यंत रस्ता खुला ठेवण्यासाठी रोशनद्दौलह याला खजिन्यातून द्रव्य दिले होते. सदर द्रव्य त्याने गिळंकृत केले असा त्याजवरचा आरोप होता. अब्दुल्-गफूर हा अधिकाराच्या बाबतीत, मग ते लौकिक क्षेत्रातले असोत अगर पारलौकिक क्षेत्रातील असोत, इतके मूर्खासारखे व लांबलचक दावे करू लागला की खुद्द बादशाहाला देखील त्याचा वैताग येऊ लागला. (शखुहाल १०६१–१०६२).

रोशनुद्दौलह याची वेअब्रू अशाच प्रकारे झाली. काबूलला जाणारी खिंड वाहतुकीस खुली ठेवण्यासाठी येणाऱ्या खर्चाची मासिक रक्कम आदा करण्याच्या कामी, रोशनुद्दौलह हा, कारकिर्दीच्या आरंभी, मध्यस्थ बनला होता. सदरची रक्कम सुभ्याचा सुभेदार नासिर खान याच्या हस्ते आदा झाली. सदर नासिरखान याने आपली सुभेदारपदावरील नेमणुकीची वर्णी रोशनुद्दौलह याच्यामार्फत लावलेली होती असे म्हटले जात असले तरी ती अतिशयोक्ती असण्याचीच शक्यता जास्त आहे. बंदर सुरत तसेच गुजराथ सुभ्यातील कित्येक परगण्यांविषयीचे सर्व दरबारी कामकाज रोशनुद्दौलह हाताळीत असे. हा काबूलचा पैसा गिळंकृत केल्याचा, समसामुद्दौलह याने रोशनुद्दौलह याजवर आरोप केला. यामुळे साम्राज्याचा कसलाच फायदा होत नसल्याने खिंडीतील अफगाणांना द्यावयाची ही रक्कम देणे त्याने बंद करून टाकले. त्याबद्दल सौम्य निषेध व्यक्त करणारे अथवा विनवणी करणारे कित्येक अर्ज रोशनुद्दौलह याने पाठविले, पण त्याकडे लक्ष दिले नाही. या वेळेपासून रोशनुद्दौलह मुहम्मदशाहाच्या मर्जीतून उतरला. तुम्हाला मिळालेल्या सर्व सरकारी पैशाचा हिशेब द्या अशी मागणी त्याच्याकडे झाली. त्याचकडे अजूनही तीन कोटी रुपये सरकारी रक्कम शिल्लक आहे असे लेखापरीक्षकांचे म्हणणे पडले. असा दबाव आला असता नवाबाने दोन कोटी रुपये आदा केले आणि पुढची पिडा टळली. तरी, १७२९ मार्च ११, रोजी झालेल्या जोडेविक्यांच्या दंगलीमध्ये आलेल्या त्याच्या लज्जास्पद सहभागामुळे, अगोदरच ढळलेला त्याचा प्रभाव पुन्हा कधी प्रस्थापित होऊ शकला नाही. त्याच्या तिसऱ्या क्रमांकाच्या

मुनव्वरखान या भावाच्या वर्तणुकीमुळेही त्याची स्थिती नाजूक बनली. सदर भाऊ हा नूरबाई नामक स्त्रीच्या प्रेमात पडला व त्याने तिला फूस लावून नेले. पण ती नूरबाई मुहम्मदशाहाची रखेली होती. तेव्हा मुनव्वरखानास ठार करण्याचा प्रथम हुकूम सुटला. शेवटी त्याला जीवदान मिळाले. पण त्याची मनसब आणि जहागीर हिसकावून घेतली. काही वर्षानंतर इशाकखान नावाच्या नव्या मर्जीबहाद्दराने त्याचे पुनर्वसन घडवून आणले. अहादींचा बक्षी हे पद त्याला दिले. रोशनुद्दौल्लह दिल्ली येथे हि. ११४८ जिल्हेज १२ (२३ एप्रिल १७३६) रोजी मरण पावली.[५]

मुहम्मदशाह साम्राज्यव्यवहारात मुळीच लक्ष घालीत नसल्याने तब्बल एक तपाच्या काळापर्यंत सर्वश्रेष्ठ राज्यसूत्रे अब्दुल–गफूरच्या हाती होती. त्याचा विरोध असला तर ती गोष्ट होणे कदापि शक्य नव्हते. मग बादशहाच्या इच्छेचा देखील सवाल नसे. शेवटी आपल्या कारकिर्दीच्या तेराव्या वर्षी मुहम्मदशाहाने बंडखोरी केली. (वारिद ६०)

## ८७ : अब्दुल-गफूर याचे पतन

एका किरकोळ बाबीवरून बादशहाचा क्रोधाग्नी पेटला. एके दिवशी बादशाह कुत्बुद्दीन बख्तियार याच्या दर्ग्यास गेला. त्याच्या जवळच अब्दुल-गफूर याने अगदी अलीकडेच बांधविलेली एक मोठी सुबक मशीद होती. तिची पाहणी करावी अशी इच्छा मुहम्मदशाहाने व्यक्त केली. पण तिचे दरवाजे पक्के बंद केले होते व किल्ल्या दुसरीकडे होत्या. किल्ल्या मागून आणून दरवाजा उघडावा लागला. त्यावेळी त्याबद्दल कोणी दिलगिरी व्यक्त केली नाही. नंतर शेख मुहम्मदशाह फाजिल आणि मोतीलाल यांनी राजवाड्याच्या सज्जाखाली मोठ्याने ओरडून गुदरलेल्या तक्रारीचा प्रसंग उद्भवला. हे दोघे शाही टाकसाळीत अब्दुल गफूरने चाकरीस ठेवलेले होते. पैकी मुहम्मद फाजिलने टाकसाळीतील चाकरी सोडली व अब्दुल गफूरच्या सोनपत या गावातील एक ठेका घेतला. त्यासाठी एक लाख रुपयांचे कर्ज काढले. असेच दिवस गेले आणि ठेका घेणारा मोठ्या थकबाकीत सापडला. तेव्हा या ऋणकोवर देणे फेडण्यासाठी दबावावर दबाव येऊ लागले. शिवीगाळीने भरलेली पत्रे त्याला येऊ लागली. तेव्हा टाकसाळीत आपल्या जागी नेमलेल्या मोतीलाल यास आपल्या बाजूस ओढून मुहम्मद फाजिल याने सूड घेण्याच्या इराद्याने, अब्दुल-गफूर याने सरकारी पैसा गिळंकृत केला, अशी तक्रार रीतसरपणे नोंदविली.

या फडतूस असामींना भरीस घालण्याचे काम प्रथम बक्षी समसामुद्दौल्लह आणि अयोध्येचा सुभेदार सआदतखान यांनी केले. या तक्रारी त्यांनी चांगल्या चालू ठेवल्या. तेव्हा सरकारी पैसा वसूल करून घेतलाच पाहिजे असे बादशाह म्हणाला. अब्दुल-गफूर शिरजोर बनला होता. वजीराने त्याची बाजू उचलून धरली असता व निमूटपणे वागण्याचा वजीराने सल्ला दिला असताना त्याकडे लक्ष देण्यास अब्दुल–गफूरने नकार दिला. अब्दुल गफूरने वजिरास शेलक्या शिव्या हासडल्या आणि तक्रार गुदरण्याची हिंमत करणाऱ्या मुहम्मद फाजिल आणि मोतीलाल यांना बोलावण्याच्या कामास तो लागला. रोज अफजूनखान या राजमहालातील खोजाने ही बाब

५ खुशहाल १०६१ ब; आशोब ५३–५५ अ, गुलामअली ४७–५४.

बादशहाच्या निदर्शनास आणली. तेव्हा कोणतीही हालचाल करण्यास अब्दुल–गफूर यास मनाई झाली हे प्रकरण आणखी धसास लागले. तेव्हा त्याने अपहार केलेली रक्कम साठ लाख रुपयांच्या घरात असल्याचे आढळून आले.

वजीर कमरुद्दीनखान हा अब्दुल–गफूरचा हितैषी होता. पण त्याचे काही न ऐकण्याचे अब्दुल–गफूरने ठरवून टाकले. त्याचे अधःपतन घडवून आणण्याची कारस्थाने करणारे समसामुद्दौलह आणि सआदतखान यांचे म्हणणे तो मानू लागला. याच्या वर्तणुकीतील बेफामपणा वाढावा म्हणून त्या दोघांनी अशी आवई उठविली की बादशाह झाले गेले विसरून जाण्यास, अब्दुल–गफूरला क्षमा करण्यास राजी असून ठठ्ठा (सिंध) प्रांताचा सुभेदार म्हणून त्याची नेमणूक करण्याच्या बेतात आहे. ही कल्पना त्याच्या डोक्यात शिरल्यावर तो पूर्वीपेक्षाही अधिक बेफाम बनला. एके दिवशी तो शाही दरबारास निघाला तेव्हा वजिराने त्यास सुनावले की, तुझा मुखत्यार नाहीस, तू घरी बसणेच अधिक श्रेयस्कर ठरेल.

आपण साधू पुरुष आहोत या कारणाने बादशहास कुर्निसात करण्याच्या सोपस्कारातून त्याला सूट मिळालेली होती. त्याऐवजी समकक्ष व्यक्ती एकमेकास अभिवादन करताना उच्चारतात ते 'आपणास शांती लाभो' अशा आशयाचे वचन उच्चारून तो बादशाहास अभिवादन करी व बादशाह ठरवून दिलेले वाक्य उच्चारून त्यास प्रत्युत्तर करी. एके दिवशी अब्दुल-गफूर बादशाहाच्या दालनात शिरला. पण अभिवादनादाखल काहीही बोलला नाही. याबद्दल कसली टीका टिपणी न करता मुहम्मदशाह "आपणास शांती लाभो" असे आपणहून म्हणाला. या अभिवादनास प्रत्युत्तर देण्याचे टाळून अब्दुल-गफूर कडक भाषेत बोलू लागला. तेव्हा बादशाह अगदी शांतपणे जागेवरून उठला आणि आपल्या खासगी दालनाकडे निघून गेला. एक-दोन पावले पुढे गेल्यावर त्याने वजीरास आपल्या बाजूस बोलावून घेतले आणि म्हणाला, "हा सगळा त्रास मला तुमच्यामुळे होतो." तेव्हा वजीर उत्तरला, "असली गोष्ट करण्याचे धाडस या बंद्याच्या हातून होईल कसे ?" "मग माझ्या पायावर हात ठेवून या प्रकरणातील सगळ्या हितसंबंधावर तुम्ही पाणी सोडा" असे बादशहाने सुनावले. तेव वजीराने त्याप्रमाणे केले.

अब्दुल गफूर आपल्या घरी परतला. शाप देणे आणि शपथा घेणे त्याचे चालूच राहिले. पण या पोकळ वल्गनांना काय अर्थ होता? आता हिशेब मांडले की, अब्दुल गफूरकडून ३ कोटी रु. येणे निघत होते. हे द्रव्य घेऊन येण्यासाठी किंवा शाहाला कैदी करून घेऊन येण्यासाठी एका चेल्याला धाडले. या चेल्यास अब्दुल गफूर याने नुसती शिवीगाळ केली आणि त्याने चेल्याला विचारले "राजमहाल अजून उभा आहे काय ? " त्याला अटक झाली. राजमहालातील तुरुंगात त्याला ठवले. त्याने यापूर्वीच ज्याची विल्हेवाट लावली होती ते सगळे वगळता त्याजकडून एक कोटी रुपयाची नगद रक्कम शिवाय इमारती व इतर मालमत्ता अशा बाबी हस्तगत करण्यात आल्या. त्याच्या मुख्य चाकरांना कैद करून त्याजकडून त्यानी माया कोठे लपविलेली आहे हे शोधून काढले. त्याचा मुख्य असामी दख्खनीराय याने एक लाख रुपये दिले. त्याचा मुख्य कारकून कुंवरसेन, घोडेबाजारातील शाहचा नायब संपतराय ( दख्खनीराय याचा भाऊ आणि इतिहासकार खुशहालचंद याचा मेहुणा ) व इतर नोकरचाकर यानी आपआपल्या पतीनुसार वेगवेगळ्या रकमा भरल्या. ( खुशहाल १०५९ ब–१०६१ ब. )

## ८८ : शाह अब्दुल गफूर याच्या अधःपतनाची आणखी एक हकीकत

इतिहासकार वारिद याने अब्दुल गफूरवरील बादशाहाची मर्जी कशी खप्पा झाली आणि त्याचे अखेरचे दिवस कसे गेले याविषयी अगदी तपशीलवार माहिती दिली आहे. मुहम्मदशाह अब्दुल् गफूर याच्या पालकत्वाखाली कित्येक वर्षे राहिला. अखेर आपल्या कारकिर्दीच्या १३ व्या वर्षी ( १७३१–१७३२ ) त्याने अब्दुल् गफूरचे वर्चस्व झुगारून दिले. अब्दुल् गफूर याला त्याच्या अधिकाराद्वारे किती प्राप्ती झाली याची एकूण रक्कम काढून त्यातून त्याने खजिन्यात भरलेली रक्कम वजा करून अजून त्याजकडून किती रक्कम येणे आहे याजविषयी अहवाल सादर करण्याचा बादशाहाने हिशेब तपासनीसांना आदेश दिला. त्याने जो महसूल अजून सरकारात भरावयाचा बाकी ठेवला आहे त्याची रक्कम २५ लाख रु. निघाली. पैसे वसूल करा असे बादशाहाने वजीरास सांगितले. कमरुद्दीन-खान याचे वडील अब्दुल्-गफूरचे मित्र होते. त्यामुळे कमरुद्दीनखान अब्दुल् गफूरच्या बाजूचा होता. वजीर आणि अब्दुल् गफूर याची बादळी मुलाखत झाल्यावर वजीराने अर्धा हिस्सा आदा करण्याबाबत अब्दुल् गफूरला सल्ला दिला. उरलेला अर्धाभाग मी तुला उपलब्ध करून देईन असेही तो म्हणाला. अब्दुल् गफूर चिडून गेला; त्याने हा प्रस्ताव धुडकावून लावला. अब्दुल् गफूरची मालमत्ता जप्त करण्यासाठी अधिकारी आले; तेव्हा तुम्हास खेटरे मारावीत असे वाटते, असे अब्दुल् गफूर त्यांच्यावर ओरडला. एवढे झाल्यावर; सदर माणसाशी मैत्रीपूर्ण तडजोड व्हावी म्हणून जे करता येण्यासारखे होते ते मी केले आता जे उपाय योजणे आवश्यक वाटेल ते जरूर योजावे असे वजीराने बादशाहास सांगितले.

अब्दुल् गफूरच्या मुलाच्या वर्तणुकीमुळे बादशाह अगोदरच नाराज बनला होता. अब्दुल् गफूरचा अजून दाढीमिशा न फुटलेला व गुळगुळीत चेहऱ्याचा मुलगा असहाय्य लोकांचा छळ करण्यात तरबेज झाला होता. खुद्द अब्दुल् गफूर देखील छळवादी वृत्तीचा गृहस्थ होता. त्याच्या पतनाच्या घटनेपूर्वी एक महिना, त्याच्या छळाचा नमुना दर्शविणारा एक प्रसंग घडला. अब्दुल् गफूरने आपल्या चाकराला बोलावणे धाडले. त्यावेळी हा चाकर प्रार्थनेत गुंतला होता. दुसऱ्या एका चाकराला पाठवून पहिल्या चाकराला फरफटत धन्यापुढे आणले. तो गुडघ्यावर बसलेला किंवा उभा, जसा कसा असेल तशा स्थितीत त्याला ओढत आणण्याचा हुकूम अब्दुल् गफूरने दिला होता. या कुचराईखोराला अब्दुल् गफूर म्हणाला, "तुझा एकमेव परमेश्वर, की ज्याच्याविना तू उपाशी मरशील, म्हणजे मी अब्दुल गफूर. मी येथे बसलो आहे. तिकडे तू कोणत्या देवाची प्रार्थना करीत होतास? असले कृत्य जर पुन्हा तुझ्या हातून घडले तर तुला अद्दल घडेल." त्याच्या छळवादी स्वभावाबाबत आणखी एक गोष्ट सांगतात. एका अर्धवट बांधलेल्या इमारतीची दुरुस्ती पावसाळ्यापूर्वी करण्यासाठी त्याला पैसे खर्च करण्याबद्दल विचारणा झाली; तेव्हा त्याने सदर माणसास बाजूच्या खोलीत फरफटत नेले. या खोलीत त्याची सगळी संपत्ती ठेवलेली होती. "सगळ्या गोष्टी ज्या परमेश्वराच्या मुठीत आहेत तो परमेश्वर मी येथे कित्येक वर्षे बंद करून ठेवलेला आहे. ढग आणि पाऊस सगळे माझ्या हुकूमतीत आहेत. माझी इच्छा नसेल तर पावसाचा एक थेंब देखील पडणार नाही."

वजीराने अब्दुल्-गफूरला झटकून टाकले; तेव्हा बादशाहाने आपल्या नेहमीच्या सुस्तपणाच्या खाक्यानुसार येणे बाकीच्या वसुलीसाठी काही गुलामांना पाठविले. या माणसाने द्रव्याचा भरणा तत्परतेने केला असता तर कदाचित त्यास क्षमाही झाली असती. पण

भरणा करण्याच्याऐवजी त्याने एक जालीम उत्तर दिले. तेव्हा त्यास खाण्यापिण्यास मनाई करण्यासाठी त्याजवर पहारा बसविण्यात आला. काही दिवसांनी त्याने वीस लाख आणि काही हजार रुपये आदा केले आणि उरलेली बाकी भागविण्यासाठी १२ दिवसांचा अवधी मिळविला. १६ दिवस भरल्यावर अब्दुल् गफूरकडे माणसे धाडण्यात आली. तेव्हा द्रव्य हजर करण्याऐवजी त्याने, अगदी नीच माणसांनाही शोभणार नाही अशी, शिवराळ भाषा बादशाहाबाबत वापरली. एका गुलामाने त्याचे हे उत्तर तंतोतंतपणे बादशाहाच्या कानी घातले; तेव्हा कोठे मुहम्मदशाहाचा क्रोधाग्नी भडकला. अब्दुल् गफूरला पकडण्याचा हुकम झाला. त्याचे सगळे संपत्तीसाठे पडताळावेत, त्यास कुलूप ठोकून सील करावे असाही हुकूम सुटला. यावेळी त्याने कसलाच प्रतिकार केला नाही. पण राजमहल आणि मुहम्मदशाह यासह सर्व काही लवकरच अदृष्य होईल असे भाकीत उच्चारले. मुहम्मदशाहास मी घडविले; सबब मीच त्याचा नाश करीन असे तो म्हणाला. त्याने विचारलेल्या प्रश्नास उत्तर म्हणून त्याला जेव्हा सांगण्यात आले की, राजमहल अजून खडा असून बादशाह अजून जिवंत आहे; तेव्हा तो पुटपुटला की, मुहम्मदशाह मरण पावला असून दरबारी मनसबदारांनी ही गोष्ट लपवून ठेवली आहे. त्याच्या अधःपतनाचा निरनिराळ्या टप्प्यांनी दोन-तीन महिन्यांचा कालावधी व्यापला होता तरी दि. ११४४ जिल्हेज ४ (२८ मे १७३२) रोजी त्यास अटक करून किल्ल्यातील तुरुंगात ठेवण्याचा हुकूम झाला. दिल्लीच्या तुरुंगात एक वर्ष काढल्यावर अब्दुल् गफूर, त्याची बायको, मुलगा आणि मुलगी यांना बिहार-मधील रुहतास या किल्ल्यात पाठविले. तेथे तो हि. ११४८ शव्वाल २२ (५ मार्च १७३६) रोजी मरण पावला. वारिद याने त्याचा स्वभाव अगदी थोडक्यात पुढीलप्रमाणे वर्णिला आहे : "चांगल्या कामासाठी त्याने कधी द्रव्य वेचले नाही; कधी कुणावर कसलीही कृपा केली नाही किंवा दयाळूपणाचे कसलेच कृत्य त्याच्या हातून कधी घडले नाही." (वारिद ६०–६९ खुशहाल १०६१ ब.)

इ. स. १७३४ च्या सुमारास बादशाहाच्या ज्या लाडक्या मंडळींनी मुहम्मदशाहाला त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासून गुलाम करून टाकले होते त्या मंडळींवर अवकृपा झाली व त्यांची वाटही लागली. अशा प्रकारे समसामुद्दौलह याला काही काळ जरा वाव मिळाला. पण लवकरच कमकुवत बादशाह नव्या लाडक्या पठ्ठ्यांच्या आहारी पुन्हा एकदा गेला. या नव्या मंडळींत मुहम्मद इसहाक आणि अमीरखान उम्दतुल्मुल्क यांचा प्रामुख्याने समावेश होता. यथावकाश अयोध्येचा सुभेदार अबुल्मनसूरखान सफदरजंग हा त्यांचा साथीदार बनला. मात्र आता आपण ज्याकडे वळणार आहोत ते विषय जरासे वेगळे आहेत.

## ८९ : मराठ्यांची वाढती आक्रमणे (१७३२–१७३५).

अर्धामुर्धा गुजरात मराठ्यांनी कसा व्यापला; बुंदेलखंडाची फाळणी कशी केली आणि माळवा कसा तात्पुरता पादाक्रांत केला येथपर्यंतची मराठ्यांच्या नर्मदेपलीकडच्या हिंदुस्थानातील आक्रमणांची हकीकत आपण यापूर्वी पाहिलीच आहे. ही हकीकत ११४५ (म्हणजे इ. स. १७३२) या वर्षापर्यंतची व राजा जयसिंग सवाई याची माळव्याचा सुभेदार म्हणून नेमणूक होण्याच्या घटनेपर्यंतची होती. आता गुजरातच्या रोखाने होणारी मराठ्यांची चढाई थांबली होती. त्याचे एक कारण तो मुलूख जिंकून घेणे कठीण झाले होते व दुसरे कारण

म्हणजे उदेपूर आणि जोधपूर येथील राजपूत राजानी मराठ्यांचा मार्ग जवळजवळ रोखला होता. तेव्हा मुघल साम्राज्याच्या दिल्ली आणि आग्रा येथे असलेल्या गाभ्यास हात घालण्यासाठी माळवा आणि माळव्याच्या उत्तरेस असलेली छोटी राजपूत राज्ये यांवर आता मराठ्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. पक्षपाती नायक आणि मुत्सद्दी या नात्याने आपले कौशल्य सिद्ध करण्यास हीच भूमी योग्य आहे असे बाजीराव पेशव्यास वाटले. मल्हारराव होळकर आणि राणोजी शिंदे–ज्यांनी अनुक्रमे इंदूर आणि ग्वाल्हेर संस्थानांचा पाया घातला ते याच बाजीरावाचे चेले होते. ग्वाल्हेरच्या शासकाने तर १७९० ते १८०३ इ. स. च्या दरम्यान उत्तर हिंदुस्थानात सर्वश्रेष्ठ सत्ता अनुभवली. आता आपण इ. स. १७३२ ते १७३८ या काळात माळवा प्रांत आणि त्याचा आसपासचा भाग यामध्ये काय काय घडले ते पाहू. आपली हकीकत सुस्पष्ट व्हावी म्हणून मराठ्यांच्या हालचालीचे वर्षाचे जे दोन भाग पडत ते आपण जाणून घेतले पाहिजेत. दसऱ्याच्या सणाच्या सुमारास, म्हणजे १ ऑक्टोबरच्या सुमारास, त्यांच्या वार्षिक हालचाली सुरू होत आणि पावसाळ्याच्या आरंभी म्हणजे ३० जूनच्या सुमारास त्या संपत. पावसाळ्याच्या काळात फौजा, मग त्या कोणत्याही पक्षातील असोत, स्वगृही परतण्याची पद्धत पडली होती.[६]

**११४५–४६ हिजरी मधील मोहीम, मुहम्मदशाहाच्या कारकिर्दीचे १५ वे वर्ष (१ ऑक्टोबर १७३२–३० जून १७३३)**

दोन हजार मराठ्यांना पळवून लावण्यासाठी १०० हिंदुस्थानी घोडेस्वार पुरेसे आहेत आणि मराठ्यांची बायकामुले एकाच जागी दोन लागोपाठच्या रात्री सुखरूपपणे घालवू शकत नाहीत असे वारिदने नमूद करून ठेवलेले आहे (पृ. ८०). पण हा काळ आता बदलला होता. लुटालूट करणाऱ्या मराठ्यांनी माळव्याच्या पलीकडे जाण्याचे धाडस यापूर्वी दाखविले नव्हते. पण आता ते आणखी धाडसी बनले; आग्र्यापासून थोड्याच अंतरावर असलेल्या प्रदेशावर आणि हिंदू राज्यावर ते गर्दी करून चालून जाऊ लागले. मुघल सत्तेकडून कसलीच मदत येत नाही असे पाहून हिंदू राज्ये, मराठा आक्रमकांच्या मागण्या मान्य करून, त्यांच्याशी तडजोड करू लागली.

मराठे गनिमांच्या विरुद्ध चालून जाऊन त्याचे पारिपत्य करण्याचे हुकूम मोठमोठ्या उमरावांना एकापाठोपाठ एक असे झाले. पण सर्वांनीच सुरुवातीला जरी तयारी दर्शविली तरी नंतर सबबी सांगण्यास सुरुवात केली. (वारिद ११७.) शेवटी सुखासीनता आणि आळस याच्या आहारी गेलेल्या बादशाहाने देखील जातीने कूच करण्याचा निश्चय केला.

हिजरी ११४५ शाबान मध्ये (फेब्रुवारी १७३३) बादशाहाचे तंबू बाहेर रवाना झाले. त्याने एक–दोन छोट्या मजला मारल्या. नंतर यमुना ओलांडली. नदीच्या काठाकाठाने थोडे अंतर काटल्यावर त्याने पुन्हा एकदा नदी ओलांडली. असल्या भेदरट आणि पोरकट खेळात कित्येक महिन्यांचा काळ दवडला. बादशाहाचा तळ दिल्लीच्या दक्षिणेस १६ मैलांवर असलेल्या फरीदाबादच्या पलीकडे कधी गेला नाही, सबंध तळावर गोंधळ व अव्यवस्था

६ मराठ्यांच्याविषयी वारिद, ७६, ८०–८५, ९१–९६, ९९–१००, ११६–१२७ (मार्च १७३४ पर्यंतचा इतिहास).

असे. मराठ्यांच्या चढाईचा हंगाम संपुष्टात येण्याची वेळ नजीक येऊन ठेपली होती. वजीर कमरुद्दीनखान याला बादशाहाच्या स्वभावाचा चांगला अंदाज होता. बादशाहास रणांगणात उतरावयास नको असते हे त्याने जाणले. म्हणून मोहिमेची जबाबदारी मजवर सोपवावी असे वजीराने बादशाहास सुचविले. त्यामुळे बादशाहाने सुटकेचा निश्वास टाकला आणि आणि वजीराचा प्रस्ताव तात्काळ मान्य केला. वजीर दिल्लीहून शव्वाल २१ (५ एप्रिल १७३३) रोजी निघाला. वजीरासोबत वजीराचा चुलत भाऊ जहीरूद्दौलह आणि त्याचा जावई फीरूझजंग (निजामुल्मुल्काचा मुलगा) हे ही निघाले. आग्र्यास पोहचल्यावर मुहम्मद-खान बंगश त्यास येऊन मिळाला. मराठे सिरोंज आणि नरवर याच्या दरम्यान आहेत आणि उमैतच्या जमीनदारांची ते लुटालूट करीत आहेत अशी खबर येथे समजली; तेव्हा नरवरच्या पलीकडे कुलारसच्या दक्षिणेस लोढा डंगर या ठिकाणी फौजेची एक तुकडी आघाडीवर पाठविली. मराठ्यांनी त्याच्या मागे परतण्यात अडथळे आणण्याच्या राजा जयसिंग याने केलेल्या दुबळ्या प्रयत्नास न जुमानता पुन्हा एकदा नर्मदा पार केली; राजाने आपले सामानसुमान आंबेर या आपल्या प्रदेशाच्या रोखाने पाठविले; त्याच रोखाने राजाने एक मजलही मारली. मराठ्यांचा चढाईचा हंगाम आता संपला आहे असे वाटल्यावरून म्हणा अगर दिल्लीहून आलेला हुकूम पाळण्यासाठी म्हणा, वजीराने आपल्या फौजा परत बोलावल्या. या फौजा त्याला शिवपुरी येथे येऊन मिळाल्या. काही जणांनी असे म्हटले आहे की, दरबारास लगोलग परत येण्याविषयी बादशाहाचे त्यास तातडीचे आणि वारंवार विनंती-वजा निरोप गेले. पैकी एका पत्रात पुढील आशयाची ओळ आहे. "मदिरापान तुमच्या-समवेत केल्यास विधियुक्त ठरते; तुमच्याविना जलपानदेखील प्रतिबंधित होते." परतीच्या मार्गावर असताना वजीराने दुआबातील गाझीपूर (फतहपूर जिल्हा) पर्यंतचा मुलूख तुडवून काढला व खीचीं अडारू याचा मुलगा भगवंत यास अद्दल घडविली. सदर भगवंताने कुरा जहानाबादचा फौजदार जाननिसारखान यास १७३२ मार्च मध्ये ठार मारले होते. पहिल्या दिवशी भडिमार झाल्यावर भगवंत असोठर येथे पळून गेला. प्रकरण मिटविण्या-साठी मुहम्मदखानास मागे ठेऊन वजीर लगबगीने दिल्लीस परतला. समसामुद्दौलह बुर्हनुल्मुल्क आणि मुबारिजुल्मुल्क या तिघांनी त्याजविरुद्ध उभारलेली युती मोडून काढणे हे त्याचे परतण्यामागचे उद्दिष्ट होते. १७३३ जूनच्या अखेरीस वजीर राजधानीस पोहोचला. वजीराची मोहीम वांझोटी ठरली. दारू व बायका याच्या व्यसनात कायम अडकल्यामुळे असे घडल्याचे वारिद सांगतो. (खुशहाल १०६३ ब, रुस्तम अली २६५, वारिद ८५, गुलाम अली ५४ ब.)

## ११४६–४७ हिजरी मधील मोहीम: मुहम्मदशाहाच्या कारकिर्दीचे १६ वे वर्ष (१७३३ ऑक्टोबर १–१७३४ जून ३०)

या वर्षी आणखी धीट बनून, मराठे परत आले. ग्वाल्हेर ते अजमेर या २२० मैलांच्या प्रदेशावर ते परतले. आग्र्याच्या पूर्वेस काही मैलावर असलेल्या भदावरच्या मुलखात त्यांच्या कारवाया विशेषेकरून चालू होत्या. राजा दरबारी होता. आपल्या मुलुखाचे रक्षण करता यावे म्हणून त्याने मुलुखास परतण्याची बादशाहाकडून परवानगी घेतली. पण विलंब फारच झाला होता. राजाचे आगमन होण्यापूर्वीच गावे आणि शहरे यांची लुटालूट झाली होती. राजाने आपल्या किल्ल्यात आसरा घेतला व काही काल प्रतिकार चालू ठेवला. बादशाहा-कडून काही मदत येईल अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे असे त्याला लवकरच कळून चुकले.

"त्याऐवजी गजाच्या मोजपट्टीने सूर्याचे मोजमाप घेणे किंवा वाऱ्याला ओंजळीत बंद करणे देखील एकवेळ शक्य होईल." (हे त्यास पक्के कळून चुकले की बादशाहाकडून साह्य मिळणे शक्य नाही) तेव्हा मराठ्यांना ३ लाख रुपयांची खंडणी मोजून, त्याना परतून जाण्यास त्याने राजी केले. (वारिद ११८, सियर २८९)

या वेळी राजा जयसिंगाच्या आंबेरच्या उणीवा विशेषेकरून नजरेत भरल्या. तो गेली १२ वर्षे आग्र्याच्या सुभेदारपदावर व ४–५ वर्षे माळव्याच्या सुभेदारपदावर होता. दिल्लीच्या दरवाजापासून नर्मदेच्या किनाऱ्यापर्यंत त्याचाच अधिकार सर्वश्रेष्ठ होता. पण आपल्या भोवती एवढी अव्यवस्था माजली असतानादेखील राजा स्वस्थ चित्ताने घरी बसून होता; काहीच करीत नव्हता. त्याच्या या निष्क्रियतेस समसामुद्दौलह याच्या दरबारी प्रभावाचा आधार लाभला होता. वस्तुतः या राजाच्या पदरी ३०,००० घोडेस्वारांची फौज व त्याही पेक्षा अधिक संख्येने बंदूकची होते. पूर्वी कित्येक वर्षे, या राजाला मुहम्मदशाहा-कडून मराठ्यांना देण्यासाठी मोठमोठ्या रकमा मिळाल्या होत्या. या रकमा २० किंवा ३० लाख रुपयांच्या घरात होत्या असे बोलत. यातली निम्मी रक्कम राजा आदा करी व निम्मी स्वतःकडे ठेवून घेई. मग मराठे आपल्या मुलुखास परतत; व जयसिंग स्वतःच्या मुलुखास जाई. असे दोन–तीन वर्षे घडल्यावर वारिद सांगतो त्याप्रमाणे, मराठ्यांना "न्याहारीची" चटक लागून ते दर खेपेला अतिलोभी व हावरट बनू लागले. पण समसामु-द्दौलह नाराज होईल या भीतीपायी मुहम्मदशाहाला जयसिंगाकडचा आग्रा आणि माळवा या सुभ्यांचा कारभार काढून घेण्याची हिम्मत होत नव्हती. मराठ्यांविरुद्ध मोहीम काढून तिचे नेतृत्व करण्याची समसामुद्दौलह याची वस्तुतः कुवत होती. पण त्याने मराठी हल्ले-खोरांविरुद्ध मोहीम काढण्याचे काम कधी पत्करले नाही. (वारिद ११९–१२०)

मराठे गुजरातेत आणि माळव्यात चढाई करीत आहेत असे गुप्त हेरांचे दक्षिणेतून अहवाल आले की, बादशाहाचे चित्त दुसरीकडे गुंतविण्यासाठी बादशाहास राजधानीच्या आसपासच्या निरनिराळ्या बागबगीच्यांमध्ये दीर्घकाल सफरीवर किंवा कित्येक शाही शिकारगारांमध्ये शिकारीच्या मोहिमांवर पाठवावयाचे असा दरबारी खाक्या झाला होता. दरम्यान वजीर दिल्लीपासून १२ मैलांवर असलेल्या कालव्याशेजारच्या आपल्या ग्रामीण निवासस्थानी महिनाभर किंवा जास्त आराम करण्यासाठी जाई. या ठिकाणी वजीर मासे पकडीत बसे किंवा हरणे मारीत सुटे. सगळा राज्यकारभार थंडावलेला असे. सगळ्या साम्राज्यात शासन असे उरलेले नसे. धार्मिक वृत्तीच्या मुसलमानापुढे एकच मार्ग उरलेला असे व तो म्हणजे असहाय्यपणे हात स्वर्गाकडे पसरण्याचा.[७]

या वर्षी (१७३३–३४) समसामुद्दौलह यास मराठ्यांविरुद्ध चालून जाण्याचा हुकूम होण्याची पाळी आली. आपले आघाडीचे तंबू बाहेर पाठविण्यात व ते पुन्हा मागवून घेण्यात त्याने ३–४ महिने घालविले. आपल्याऐवजी दुसऱ्या कोणी ही मोहीम पत्करावी म्हणून बादशाहाचे मन वळविण्याचे त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले. सदरचे कालहरण देखील या

७ वारिद (१२३) पुढील म्हण उद्धृत करतो : "जमीन सुकली आहे, ढगात पाणी उरले नाही. अरेरे! बिचारे उरले आहे ते थोडे फार गवत."
खाक खुश्क व अब्र बेनम वई बर मुस्त-इ-काह.

प्रयत्नामुळे झाले. शेवटी मराठ्यांच्या चढाईचा हंगाम अगदी संपत आला आणि नेहमी-प्रमाणे मराठे परतण्याच्या बेतात आले तेव्हा समसामुद्दौलह याने आपला भाऊ मुजफ्फर-खान यास बोलावणे पाठविले. सदर भाऊ दीर्घकाल अजमेरचा सुभेदार होता. तो मेवाडमधील नारनोळ या मुख्य ठाण्यात त्या वेळी होता. इ. स. १७३३ जून २८ रोजी पहिले-वहिले हुकूम सुटले. पण शहराजवळच्या बगीच्यामध्ये त्यांचे तंबू पडण्यासाठी इ. स. १७३४ फेब्रुवारी २० चा दिवस उजाडला. आणखी तयारी करण्यात एक महिन्याचा काल खर्चला आणि शेवटी १७३४ मार्च ३० रोजी ६ मैलांची पहिली मजल मारली. एवढे सगळे होईतो, मराठ्यांनी माघार घ्यावयास सुरुवात केली आहे अशी खबर गुप्त हेरांनी आणली. मुजफ्फरखान आग्यास पोहचेतो मराठे परतीच्या मार्गावर नर्मदादेखील ओलांडतील असे स्पष्ट दिसू लागले. तथापि भोपाळचा यार मुहम्मदखान व मराठे यात चकमक उडाली व तीत कित्येक असामी ठार झाले.

सिरोंज या गावी मुजफ्फरखान पोहचू शकला; पण गनीम तेथून निघून गेले होते. म्हणजे शत्रूच्या तलवारीला तलवार यत्किंचितही न लागता मुघल फौज १७३४ जून २१ पासून परतीच्या प्रवासाला लागल्या. दरबारी परतल्यावर मुजफ्फरखानाला दरबारी हजर होण्याची अनुज्ञा झाली. ( गुलाम अली ५४ अ, रुस्तम अली २६५ ब, सियर २८९)

**११४७–४८ हिजरी ची मोहीम; मुहम्मदशाहाच्या कारकिर्दीचे सतरावे वर्ष. ( १७३४ ऑक्टोबर–१ ते १७३५ जून ३० ).**

या वर्षी सर्व मुलुखभर मराठे पसरले होते. म्हणून त्यांच्या पारिपत्यासाठी दोन फौजा पाठविण्याचा निर्णय झाला. पैकी एक फौज वजीर कमरुद्दीनखान याच्या आधिपत्याखाली तर दुसरी फौज मीर बक्षी समसामुद्दौलह याच्या आधिपत्याखाली पाठविण्याचे ठरले. मराठ्यांचे आक्रमण झालेला अर्धा पूर्वभाग वजीराकडे व अर्धा पश्चिम भाग मीर बक्षीकडे अशी कामाची वाटणी झाली.

कमरुद्दीनखान यास मोहिमेवर जाण्यासाठी निरोप देण्याची भेट बादशाहाने १७३४ नोव्हेंबर २० रोजी दिली. वजीर आग्र्याच्या रोखाने कूच करीत निघाला. पिलाजी जाधव आणि बाजीराव याविरुद्ध तो चालला होता. त्याच्या समवेत त्याचे स्वतःचे सैन्य व तोफदळ होते. त्याशिवाय प्रमुख तुराणी–मुघल सरदारांच्या सगळ्या फौजा त्याच्या दिमतीला होत्या. वजीराचे सैन्य ज्या ज्या राजांच्या मुलखातून गेले त्या त्या राजांना चाकरीत येण्याविषयी बजाविले. फेब्रुवारी ३ ते फेब्रुवारी १२, १७३५ या दरम्यान वजीर मराठ्यांना भिडत होता; व त्याशी लढत देत होता. या सर्व घटना नरवरच्या आसपासच्या मुलखात घडत होत्या. पिलाजी जाधव हा त्याचा सामनेवाला होता. वजीराच्या फौजा माळव्याच्या सरहद्दीवरील सिप्री आणि कुलारस येथपर्यंत चढाई करीत गेल्या. मुघलांच्या या चढाईशी पिलाजी जाधवाने आपल्या ३०–४० हजार मराठे सैन्यानिशी दोन हात केले. २–४ सलम्या अशा झाल्या की, ज्यात वजीराचा पक्ष वरचढ दिसला. पावसाळा नजीक आला तेव्हा बाजीरावाने दिलेली परतीची हाक ऐकून मराठे दक्षिणेस परतले. वजीर १७३५ मे २१ रोजी दिल्लीस पोहोचला. त्याच्याही अगोदर ११ दिवस समसामुद्दौलह दिल्लीस

येऊन पोहोचला होता. ( आशोब १०४–१०६, खुशहाल १०६६–६७, रुस्तम अली २६७, गुलाम अली ५४ ब. )

मराठ्यांविरुद्ध पाठविलेल्या दुसऱ्या फौजेचा प्रमुख समसामुद्दौलह याच्या फौजांत त्याचे स्वतःचे सैन्य, शिवाय लाल फेटे बांधणाऱ्या, वालाशाही म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, बादशाहाच्या शरीररक्षकांच्या पलटणी, शिवाय कित्येक अमलदार व राजे यांचा समावेश होता. आंबेरचा राजा जयसिंग त्याला वाटेत आपल्या सैन्यासह येऊन मिळाला. या फौजांनी अजमेर हे आपले लक्ष्य ठरविले; कारण मल्हारराव होळकर तेथे अगदी थोड्या फौजफाटयानिशी नेहमीप्रमाणे लुटालूट करीत होता. मल्हाररावाचे शिलेदार सांभर येथे देखील धुमाकूळ घालीत होते. झटापटी झाल्या; पण त्याची नोंद मात्र आढळत नाही. ताल काकरिया या ठिकाणी जयसिंगाचे वास्तव्य बराच काळ घडल्याचे दिसते. मराठ्यांच्या मागण्या कबूल करणे हा सर्वांत शहाणपणाचा मार्ग आहे हे जयसिंगाने समसामुद्दौलह याची मनधरणी करून पटवून दिले. मराठ्यांना, ते नर्मदेच्या पलीकडे परतण्यापूर्वी, वसूल करून चौथ देण्याचे आश्वासन मिळाले असे वाटते. माळव्याच्या सुभ्यातून प्रतिवर्षी बावीस लाख रुपयांचे वार्षिक द्रव्य मराठ्यांना देण्याचे आश्वासन दिले. महादेव पंडित नामक गृहस्थास पेशव्यांचा प्रतिनिधी म्हणून स्वीकारले. एकंदरीत शाही फौजा कोटा व बुंदी या राज्यांच्या पलीकडे गेल्या नाहीत. फौजेत नव्याने भरती झालेल्यांना–ज्यांनी घोडे वगैरे खरेदी करण्यासाठी बरेच द्रव्य वेचले होते–ताबडतोब कामावरून कमी केले. १७३५ मे २१ किंवा २२ रोजी, समसामुद्दौलह दिल्लीस परतला. ( आशोब, बयान ५३२, रुस्तम अली २६६–६७ खुशहाल १०६७ अ. )

## ९० : ११४८–४९ हिजरीची मोहीम मुहम्मदशाहाच्या कारकिर्दीचे १८ वे वर्ष (१ ऑक्टोबर १७३५–३० जून १७३६)

१७३५ च्या पावसाळ्यानंतर मराठे मोहिमेत उतरले. तेव्हा त्यांनी पूर्वीपेक्षाही अधिक तडफ दाखविली. मेवाडमधील उदेपूर, मारवाडमधील मेडते आणि नागोर, अजमेरचा शाही प्रदेश आणि त्याच्या उत्तरेस असलेले रूपनगर हे शहर इतक्या ठिकाणी त्यांनी धडका मारून लुटालूट केली. आदल्या वर्षीप्रमाणे या वर्षीही दिल्लीहून दोन फौजा धाडल्या. आग्नेय दिशेच्या रोखाने पाठविलेल्या फौजेचे नेतृत्व वजीराकडे होते; तर नैऋत्येकडे पाठविलेल्या फौजेचे नेतृत्व समसामुद्दौलह याजकडे होते. आग्ऱ्याच्या आसपासच्या मुलखात अयोध्येचा सुभेदार सआदतखान बुर्हानुल्मुल्क याने मोहिमेस सहकार्य करावे असा बादशाहाने आदेश काढला. ( रुस्तम अली २६७ ब; ज. ए. सो. बें; (१८८८) ३२६–२७. )

मराठे बुंदेलखंडात येऊन थडकले होते. छत्रसालाचे मुलगे हरदेसाह आणि जगतसाह यांनी मराठ्यांना आपल्या मुलखातून रस्ता दिला. मराठ्यांचे शेकडो घोडेस्वार उतार शोधण्यासाठी यमुनेपर्यंत येऊन पोहोचले. ते दुआबात घुसतील आणि मार्गावरील काल्पी व इटावा या शहरांची लुटालूट करतील हे अपेक्षित होते. बाजीरावाचा भाऊ चिमणाजी हा सिरोंज, बुंदेलखंड या मार्गाने ग्वाल्हेरपर्यंत येऊन पोहचला होता. या वर्षी बाजीराव कोंकण मोहिमेत अडकला होता. चाचे मंडळींचा बालेकिल्ला समजत त्या जंजिऱ्याविरुद्ध त्याने मोहीम उघडलेली होती. चिमणाजी, मल्हारराव होळकर आणि शिंदे यांना आधार देण्यासाठी पिलाजी जाधव याला उत्तरेस माळव्यात धाडण्यात आले होते.

इटावा जिल्ह्यातील औडुया व सराई अजितमल आणि त्या समोरच्या नावाच्या घाटावरून मराठ्यांनी नदी ओलांडली आणि खानपूर, डेरापूर, मंगलपूर सिकंदरा आणि शिगणापूर [ कानपूर जिल्ह्यातील ] या ठिकाणी लुटालूट केली; खेडुतांकडून आणि शाह अमलदाराकडून त्यांनी खंडणी गोळा केली. ग्वाल्हेरच्या मुलुखातही आक्रमकांचे संख्याबळ वाढलेले होते विजापूर या ग्वाल्हेरच्या दक्षिणेस ५२ मैलांवर असलेल्या गावाला मराठ्यांचा वेढा बसला होता. या गावाचे रहिवाशी १२ मैलांवरच्या ग्वाल्हेर गावास पळून गेले होते. आग्र्यालासुद्धा वेढा बसेल अशी भीती व्यक्त होत होती.

आग्रा आणि ग्वाल्हेर यांच्या रक्षणाबद्दल मुहम्मदखान बंगश यास सांगणे झाले. त्याने यमुना ओलांडण्यास १७३६ जानेवारी १० पासून आरंभ केला. मराठ्यांची एक फौज आग्र्याच्या रोखाने १४ मैलांवर ग्वाल्हेरच्या वायव्येस नूराबादेपलीकडे येऊन ठेपली असून दुसरी फौज भदावरमधील अंत्री या गावाच्या जवळ आली आहे, अशा खबरा मिळाल्या. म्हणून चंबळ नदीवरील तरीचे संरक्षण करण्यासाठी धोलपूर येथे दोन हजार स्वार आणि दोन हजार पायदळ अशी फौज १७३६ जानेवारी २४ रोजी पाठविली. दाउदोतिया, मेंगार वगैरे स्थानिक टोळीवाल्या लोकांना सगळे रस्ते आणि नदीचे उतार यांच्यावर पहारा बसविण्यास धाडले. नूराबादच्या बाजूने आलेला गनीम रोज चंबळेच्या तीरावर येई; पण चंबळ नदी ओलांडणे दुरापास्त असल्याचे त्याना आढळून येई. शेवटी मराठ्यांनी आपले प्रयत्न सोडून दिले व ते भदावर येथे परतले. मराठे ग्वाल्हेरवर कसलाही दबाव टाकू शकले नाहीत. ग्वाल्हेरला दोन हजार पठाणांची शिबंदी होती. हे पठाण मुहम्मदखान बंगश याने मऊ गावाहून पाठविले होते. यांच्या दिमतीला १ हजार शिपायांची स्थानिक फौज होती. (ज. ए. सो. बे., ३२८)

अशा प्रकारे मुहम्मदखान आग्र्याच्या मदतीसाठी धावला होता. कमरुद्दीनखान चंबळ ओलांडून पलीकडे गेला. पिलाजीला निकालात काढण्याचा त्याचा प्रयत्न होता. नरवर येथे त्याने आपल्या बायका आणि कुटुंबातील इतर व्यक्ती, तसेच गरजेपेक्षा जास्त असलेले सैन्याचे सामानसुमान ठेवले. ओरछा या ठिकाणी पोहोचल्यावर त्याने अर्जल सरोवराच्या काठावर तळ टाकला. हे सरोवर शहराच्या पूर्वेस १२ मैलांवर असून ते खोल व विस्तीर्ण आहे. या सरोवराच्या भोवती टेकड्या असून सरोवराचा परीघ १२ ते १४ मैलांचा आहे. मैदानाच्या पलीकडच्या बाजूस आणि डोंगर-उतरणीवर पिलाजीचा तळ पडला होता. दोन्ही फौजांना तळ्याच्या पाण्यावर, एक गरज म्हणून, हुकूमत हवी होती. सबंध रमजान महिन्यात ( जानेवारी १७३४ ) तेथे रोज चकमकी झडत; पण निर्णायक अशी लढाई झाली नाही. ( आशोब १०५–६ )

एके दिवशी दोन्ही पक्ष जोर करून बाहेर पडले. या लढाईत मराठ्यांचा निभाव न लागून त्यांनी पळ काढला. तेव्हा शेरबाजखान आपल्या दोन छोट्या मुलांसह फौजेतून बाहेर पडला आणि गनिमांच्या मागे लागला. हा शेरबाजखान वजीराचा नातेवाईक होता. आपल्या शौर्याचा त्यास फार गर्व होता. तो दौड करत निघाला तेव्हा आपल्या दोन छाव्यांना ओरडून म्हणाला सावजाची शिकार कशी करावी ते मी तुम्हाला शिकवितो. हल्ल्यामध्ये थोरला बछडा ठार झाला आणि धाकटा मीर मुहम्मद अजम हा कैद झाला.

पकडलेला हा मुलगा १०–१२ वर्षाचा होता. त्याला निःशस्त्र केले होते. एका मराठा शिलेदाराच्या पाठीमागे बसून त्याला पळवून नेत होते. या छोकऱ्याने मराठा शिलेदाराच्या कमरेची कटचार उपसली व शिलेदार मागे वळून बघण्याच्या आत कटचारीचे तीन वार त्याच्यावर केले. शिलेदार पडला व हा छोकरा मुसलमानांच्या तळावर दौडत परत आला. दरम्यान शेरबाजखान लढतलढत आपल्या थोरल्या मुलाच्या जागी परतला होता. त्या मुलाचे कलेवर त्याने आपल्या घोड्यावर घेतले. आपल्या दुसऱ्या मुलाविषयी मोठमोठ्याने शोक करीत तो दौडत निघाला होता. मुहम्मद अअ्जम परतला तेव्हा बापाच्या दुःखाश्रुंचे रूपांतर आनंदाश्रूंत झाले. (आशोब १०६.)

ईदच्या दिवशी (१७३६ फेब्रुवारी १३) पिलाजी लढाई देण्याच्या तयारीने जरा अगोदरच बाहेर पडला. त्याला नर्मदेवर असलेल्या बाजीरावाच्या सैन्यातून कुमक आली होती. सबंध दिवसभर धुमश्चक्री चालली. पण रात्रीच्या वेळी मराठ्यांनी तळ सोडला. मोठ्या लगबगीने कूच करीत त्यांनी लवकरच नर्मदा ओलांडली. सिप्री, कुलारस, सिरोंज आणि उज्जयिनी येथपर्यंत मराठ्यांचा पाठलाग करण्यात आला. मराठ्यांनी सध्यातरी माळवा प्रांत रिकामा केला आहे अशी खात्री पटल्यावर वजीराच्या नेतृत्वाखालच्या मुसलमानी फौजा दिल्लीला परतल्या. (आशोब १०७.)

इकडे दुसऱ्या फौजेचा सेनापती समसामुद्दौल्ह हा राजा जयसिंग याच्या साहाय्यार्थ निघाला. सवाई जयसिंग मल्हारराव होळकर यास राजपुतान्यातून हुसकून लावण्यात गुंतला होता. तोडा तलाव या ठिकाणी महाराजा समसामुद्दौल्ह यास येऊन मिळाला. महाराजाच्या सल्ल्यावरून त्याने रणांगणाची मोर्चेबंदी केली. नंतर मोर्च्याच्या आत आपली जागा पक्की केली. मल्हाररावाजवळ असलेली फौज ७–८ हजारापेक्षा मोठी नव्हती. बुंदीच्या प्रतापसिंग हाडा याच्या येण्याची होळकर वाट पाहात होता. जयसिंगाविषयी वाटणारा दुष्टावा आणि आपला मुलूख वाचविण्याची धडपड याच्यापायी प्रतापसिंग हाडा याने आपली सुसज्ज फौज मराठ्यांच्या दिमतीला दिली होती. प्रतापसिंग येताच मल्हारराव चढाई करत गेला. मुसलमानी पक्षाच्या मोर्चापासून १०–१२ मैलांवर त्याने आपले ठाणे स्थापले. दररोज पहाटेपासून सायंकाळच्या प्रार्थनेची वेळ होईतो मराठे मुसलमानांच्या छावणीभोवती छापे घालीत. छावणीभोवती खणलेल्या खंदकाच्या पलीकडे पाऊल टाकण्याची हिम्मत एकाही मुसलमानाची होत नसे. मुसलमानी फौज आपल्या तोफखान्याच्या अखंड भडिमार करी. पण खुल्या मैदानात येण्याचे धाडस त्यांनी कधी केले नाही.

थोडासा काळ उलटल्यावर दाण्यागोट्याची रसद तोडण्यात आली. सैनिकांच्या घोड्यांना वैरणी अभावी उभेदेखील राहाता येईना. शेवटी हजार-दीड हजार अहादी सैनिकांनी खंदकाबाहेर कूच केले. तसे करण्यासाठी त्यांनी आपल्या सेनापतीची परवानगी घेतली नव्हती किंवा सेनापतीने त्यांना तसे करण्याबाबत हुकूमदेखील सोडलेला नव्हता. बाहेर पडणाऱ्या या सैनिकांत मुख्यत्वेकरून बलुची आणि मुघल यांचा भरणा होता. ते खंदकाबाहेर पडले तेव्हा त्यांनी आपल्या कनिष्ठ अंमलदारांना पुढे केले होते. ते आपल्या छावणीपासून अशा प्रकारे आठ मैलांचे अंतर काटून आले. खेडेगावातील मिळेल ती चीजवस्तू उचलण्याच्या कामात ते गर्क होते. तेवढ्यात मल्हारराव आणि प्रतापसिंग यांनी आपल्या लोकांनिशी

त्याना अकस्मात वेढले. या शाही ज्येष्ठ सैनिकांकडे धनुष्यबाण आणि तोडच्यांच्या बंदुका होत्या. त्यामुळे पहिले काही तास मराठ्यांचा निभाव लागला नाही. मराठ्यांना अहादींच्या नजीक येता येत नव्हते व त्यामुळे आपले भाले किंवा सरळ तलवारी (धोप) चालविता येत नव्हत्या. शेवटी बाणांचे भाते रिकामे पडल्यावर आणि तोडच्यांच्या बंदुकांची दारू संपल्यावर मराठे चढाई करुन आले. प्रतापसिंग हाडा आणि त्याचे राजपूत यांची घोड्यावरची मांड मल्हाररावांच्या स्वारांपेक्षा पक्की असल्याने राजपूत स्वारांना आपल्या मराठे साथीदारांना मागे टाकले व आपल्या तोडच्यांच्या बंदुकानिशी त्यांनी मुसलमान फौजांवर भडिमार केला. कित्येक जण रणांगणावर कोसळले; तर उरलेले सैरावैरा पळाले. जायबंदी झालेल्यात इतिहासकार आशोब यांचे दोन आप्त होते. पैकी एकाचे नाव शिहाबुद्दीन बेग असे होते. प्रेतांच्या ढिगाऱ्याखाली तीन दिवस सापडल्यानंतर त्यास ढिगाऱ्याखालून जिवंत बाहेर काढले. तद्नंतर तब्बल ४० वर्षे तो जगला. पण मुंग्यानी खाल्यामुळे त्याचे हात निकामी झाले होते व पायांनी तो लंगडा झाला होता. मल्हाररावाची परवानगी घेऊन प्रेतांचा ताबा घेण्यास जयसिंगाला तीन दिवस लागले. या पराभवानंतर मुसलमानी फौजांचा सेनापती व राजा यांनी हुकूमाशिवाय खंदक ओलांडण्यास मनाई करणारे कडक हुकूम जारी केले. ( आशोब १०८–०९.

यथावकाश मल्हारराव नेहमी प्रमाणे दक्षिणेस परतला. त्यामुळे या दोन्ही सेनापतींना ठाण मांडलेल्या अडचणीच्या जागेतून सुटल्यासारखे वाटले. समसामुद्दौलह दिल्लीस परतला. तेथे त्याचे एखाद्या विजयी सेनानीप्रमाणे स्वागत झाले. जयसिंग आपल्या राज्यातील स्वगृही गेला. तद्नंतर लवकरच समसामुद्दौलह याच्या सल्ल्यावरून जयसिंग याने मांडलेला एक प्रस्ताव बादशाहाने स्वीकारला. जयसिंगाने माळवा सुभ्याचा कारभार सोडावा आणि तो पेशवा बाजीराव यास द्यावा असा तो प्रस्ताव होता. या योजनेचा पाठपुरावा करण्यासाठी यादगार काश्मीरी याच्यासोबत किरपाराम आणि नजाबत अलीखान यांना सोबत देऊन वाटाघाटींना आरंभ करण्यासाठी हिजरी ११४८ जिलकाद ६ (१८ मार्च १७७६) रोजी जयसिंगाकडे पाठविले. जयसिंग आणि बाजीराव यांची भेट धोलपूर येथे हिजरी ११४९ रबिलावल ८ (१६ जुलै १७३६) रोजी झाली. तेथे दोघांत झालेल्या करारानुसार बाजीराव हा माळव्याच्या राज्याच्या हाताखालचा नायब सुभेदार बनला. बाजीरावाच्या सोबत त्याचा मुलगा व राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, यशवंतराव पवार वगैरे त्याचे मुख्य अमलदार होते. (आशोब ११० ब, गुलाम अली ५४ ब, रुस्तुम अली २६७–६८, सियर २९४, ३०९, ज. ए. सो. बे. ३२८.)

हा जो व्यवहार झाला त्याच्या स्वरूपावर प्रकाश टाकणारे पुरावे मुसलमांनापेक्षा मराठ्याकडे जास्त आढळतात. सुरुवातीला पुढील अटी मान्य करण्यास बादशाह राजी झाला होता. एक अट म्हणजे चंबळच्या दक्षिणेस असलेल्या मुलखातून येणाऱ्या महसुलातून एका हंगामात बाजीरावास १३ लाख रुपये तीन हप्त्यात देण्यात यावेत. दुसरी अट म्हणजे बुंदी आणि कोटा येथपासून सुरुवात करून भदावरपर्यंत पसरलेल्या राजपूत राज्यांकडून दरसाल १० लाख ६० हजार रुपयांची खंडणी वसूल करण्याचा अधिकार बाजीरावास द्यावा. पैकी दुसऱ्या अटीमुळे राजपूत आणि मराठे यांच्यातील संबंध बिघडतील अशी उमेद शाही पक्षाला वाटत होती. या प्रस्तावाबरहुकूम तयार करावयाचे कराराचे कागदपत्र गुप्तपणे तयार केले; आणि ते

यादगारखान याच्या हाती सोपविण्यात आले. आवश्यकता भासल्याखेरीज हे कागदपत्र बाहेर काढू नयेत असा त्यास हुकूम होता. मुसलमानांच्या दुर्दैवाने काय घडले आहे याची माहिती बाजीरावाच्या प्रतिनिधीला झाली. त्याने आपल्या धन्यास त्याची हकीकत कळविली. बादशाह आता आपल्या कचाट्यात सापडला आहे याची बाजीरावास खात्री पटली. त्याने आपली मागणी वाढविली. माळव्याचा सगळाचा सगळा महसूल मिळावा आणि त्याच वेळी भोपाल पठाणांच्या कडून काढून घ्यावे अशी त्याची मागणी झाली. मांडव, धार आणि रायसीन येथील किल्यांचा ताबा आपल्याला मिळावा अशीदेखील मागणी त्याने केली. याच्याही पुढे जाऊन चंबळेच्या दक्षिणेकडील सगळा मुलुख आपल्याला मिळावा आणि फौजदारांच्या नेमणुका करण्याचेही काम आपल्याकडेच असावे असे त्याचे म्हणणे होते. तद्नंतर ५० लाख रुपये रोख द्या किंवा ही रोकड देण्याचा बंगालच्या सुभेदारावर आदेश द्या असे त्याचे मागणे झाले. अगदी अल्पकाळातच त्याने आपल्या मागण्यांच्या यादीत अलाहाबाद, बनारस, गया आणि मथुरा यांच्या जहागिरींच्या मागणीचा समावेश केला. शेवटी दख्खनच्या ६ सुभ्यांचे वंशपरंपरेचे सरदेशपांडेपण आपणास मिळावे अशी त्याने मागणी केली. [ग्रँट डफ. २५४.] बाजीरावास माळव्याच्या नायब सुभेदार म्हणून नेमण्यास राजा जयसिंग याने कबुली दिली होती हे आपण पाहिलेच आहे. हा प्रकार औपचारिक नव्हता तर प्रत्यक्षात सुभा तोडून देण्याचाच प्रकार होता. बाजीरावाने केलेल्या इतर मागण्यापैकी फक्त शेवटची मागणी म्हणजे वंशपरंपरेचे सरदेशपांडेपण, तेवढी मान्य झाली. मोबदल्याचा दर जो देशपांडेपणाचा होता तोच ठरविण्यात आला. देशपांड्यांना देशमुखांच्या निम्मा मोबदला मिळे म्हणजे तो महसुलाच्या पाच टक्के भरे. या मोबदल्यास समसामुद्दौलह याने मान्यता दिली. अशी वसुली करू दिल्यास त्याद्वारे निजामुलमुल्क आणि त्याचे सुभे यांना इजा पोहोचेल हा हेतु मनात बाळगून बाजीरावाची सदर मागणी मान्य केली होती.

## ९१ : ११४९–५० हिजरीमधील मोहीम, मुहम्मदशाहच्या कारकिर्दीचे १९ वे वर्ष (१ ऑक्टोबर १७३६–३० जून १७३७)

मुघल साम्राज्याला पिळवटून नुकत्याच घेतलेल्या सवलतींमुळे हिंदुस्थान पादाक्रांत करावयाच्या योजनेपासून बाजीराव परावृत्त झाला नाही. उत्तरेवर स्वारी करण्याचा मराठ्यांचा हंगाम पुन्हा नजीक आला तेव्हा मराठ्यांच्या फौजा पुन्हा एकदा मोहिमेवर निघाल्या. ११४९ हिजरीच्या जिल्काद महिन्यात (मार्च १७३७) मराठ्यांच्या फौजा भदावर या आग्र्याच्या अतिआग्नेयेस असलेल्या मुलुखात गर्दी करू लागलेल्या होत्या. हे पुनश्च एकदा झालेले आक्रमण परतवून लावण्यासाठी दिल्लीहून पाठविलेल्या फौजा पुनश्च रणांगणात उतरल्या. अयोध्येचा सुभेदार सआदतखान याला मोहिमेस सहकार्य करण्याचा आदेश झाला. १७३७ मार्च ८ रोजी मीर बक्षी समसामुद्दौलह याचे तंबू शहराबाहेर उभे करण्यात आले. दुसऱ्या दिवशी (९ मार्च) त्याने पूर्वेच्या रोखाने कूच केले. शहराच्या दक्षिणेस १५ मैलांवर असलेल्या तलपत या ठिकाणी त्याने पहिला मुक्काम ठोकला. याचप्रमाणे, वजीराने मार्च २१ रोजी चारबाग या ठिकाणच्या छावणीत जाऊन मोहिमेस आरंभ केला. समसामुद्दौलह वजीराच्या अगोदर निघाला आणि जिल्हेज ११४९ हिजरी (१ ते २९ एप्रिल १७३७) च्या आरंभी मथुरेस जाऊन पोहोचला. पाच जिल्हेज (१७३७ एप्रिल ५) रोजी तो हसनपूर येथे होता.

हे ठिकाण मथुरेपासून १८ कोसावर आहे. दुसऱ्या दिवशी शेरगढपर्यंत कूच करण्याचा तद्नंतर तिसऱ्या दिवशी वृंदावनपर्यंत कूच करण्याचा व अशा प्रकारे त्या वेळी आग्र्यास असलेल्या समसामुद्दौल्हा आणि सआदतखान यांना मिळण्याचा त्याचा इरादा होता. जयपूर (आंबेर) चा राजा जयसिंग राजधानीतून बाहेर पडला असल्याची खबर आली होती. मराठ्यांची एक मोठी फौज रेवाडीच्या रोखाने गेली आहे अशी खबर मिळाल्याने वजीर अगदी अस्वस्थ झाला. पूर्वेच्या रोखाने आपली कूच चालू ठेवण्याची इच्छा त्याने दोन दिवसपर्यंत सोडली नाही. कारण परतण्यापूर्वी गनिमास कसे जाऊन भिडावे अशी त्यास चिंता लागली होती. आणखी एक दुर्वार्ता कानावर येऊन आदळली होती. बुंदीचा बुधसिंग याने उठाव केल्याची ती बातमी होती. (खुशहाल १०७० ब, रुस्तम अली २७० ब.)

बाजीरावाने आपले अवजड सामान मृत राजा छत्रसाल याचा दुसरा मुलगा जगतराज बुंदेला याजकडे जैतपूर या ठिकाणी ठेवले. आग्र्यापासून ४० मैलांवर असलेल्या यमुनेच्या किनाऱ्याकडे त्याने कूच केले. वाटेवर असताना त्याने भदावरचा राजा अनिरुद्धसिंग यावर हल्ला केला. राजा आपल्या अटेर या शहराबाहेर पडला. त्याच्याजवळ सुसज्ज फौज होती. सात हजार घोडेस्वारांशिवाय पायदळ व ४५ हत्ती होते. राज्याच्या एका भावाचे राजाशी वाकडे होते. हा भाऊ मराठ्यांना येऊन मिळाला. या येऊन मिळालेल्या भावाच्या सल्ल्यावरून मराठ्यांनी आपली निम्मी फौज राजासमोर उभी ठेवली. उरलेली अर्धी फौज गोहद व बरहद येथून अचानक अटेर या शहरात घुसविली. तेथे या फौजेने लुटालुट चालू केली. आपली राजधानी वाचविण्यासाठी राजाने लढत लढत माघार घेतली व अटेरच्या किल्ल्यात आसरा घेतला. नंतर त्याने सलोख्याची मागणी केली. त्यासाठी २० लाख रुपये व १० हत्ती दिले. पहिल्या सलामीलाच हे यश मिळाल्यावर मल्हारराव होळकर, पिलाजी जाधव आणि विठूजी बुळे हे पेशव्याचे प्रमुख सरदार यमुना ओलांडून पलीकडे गेले आणि दुआवात त्यांनी आपल्या शस्त्रांचा हिसका दाखविला. (सियर ३०९, गुलाम अली.)

**अयोध्येचा सआदतखान बाजीरावाच्या फौजेच्या एका भागाचा दुआबामध्ये पराभव करतो.**

जिल्हेज महिन्यात (एप्रिल १७३७) मराठ्यांनी रापडी या शहराजवळ यमुना नदी ओलांडली. शुकोहाबाद या गावास वेढा घालण्यास त्यांनी सुरुवात केली. या शहराची तावेदारी असलेल्या लालजी खत्री या अधिकाऱ्याने दीड लाख रुपये आणि एक हत्ती मराठ्यांना देऊन त्याच्या मोबदल्यात शहर वाचविले. दुआबात चढाई करताना जाळपोळ व लुटालूट करीत, मराठ्यांनी फीरुझाबाद आणि इअतिमादपूर येथे छापे टाकले. पैकी इअतिमादपूर तर आग्र्याच्या पूर्वेस अवघ्या ११ मैलांवरील गाव आहे. ती जागा सोडल्यावर मराठे जलेसर येथे आले. दिवस उगवण्याच्या सुमारास सआदतखानाच्या फौजा त्यांच्या दृष्टिपथात एकाएकी आल्या. सआदतखान ८५ मैलांवरील इटावा या शहरावर मोठी त्वरा करून आला होता. त्याच्या आघाडीची हुकूमत त्याचा भाचा अबुल-मन्सूरखान सफदरजंग याकडे होती. आघाडीच्या फौजेत १२ हजार स्वार होते.

चालून आलेली फौज आपल्यापेक्षा संख्येने डावी आहे असे समजून मराठ्यांनी त्यांच्या खास पद्धतीनुसार या फौजेला पूर्ण वेढा टाकण्याचा खटाटोप केला. अब्दुल्-मन्सूर-खान लढणे यत्किंचितही न थांबवता, हळूहळू मागे सरकत सआदतखानाच्या ५० हजार स्वारांच्या मुख्य फौजेकडे परतला. आघाडीची फौज नजीक आल्यावर सआदतखान आणि त्याचे सैनिक यांनी आपल्या घोड्यांना टाच मारून शत्रूवर हल्ला चढविला. मराठ्यांची फळी फुटली व त्यांची पळापळ झाली. प्रत्येक जण निसटण्याची वाट शोधू लागला. त्यांचा कित्येक मैल पाठलाग झाला. इअतिमादपूर येथील एका पाणवठ्यावर, पाठलाग करणाऱ्यांनी तीन मराठे अमलदार व एक हजार सैनिक यांच्यावर कुरघोडी केली. त्यांना कैद केले. जे घोडेस्वार तलवारीच्या तडाख्यातून निसटून गेले, त्यांनी यमुना ओलांडली. यमुना ओलांडताना नदीचा उतार कोणत्या स्थळी आहे व तेथे पाणी किती खोल आहे हे कळावे म्हणून त्यांनी नदीच्या पात्रात बांबू उभे रोवले होते. पण पळापळीच्या गदारोळात काही जण उताराची जागा चुकले आणि बुडाले. पण बहुतेक जण नदी ओलांडून पैलतीरावर सुखरूप आले. ही घटना हिजरी ११४९ जिल्काद २२ (२३ मार्च १७३७) रोजी घडली मल्हारराव ग्वाल्हेर जवळच्या कोटिला या गावी बाजीरावास येऊन मिळाला. (आशोब ११२ अ.)

समसामुद्दौलह यास जाऊन मिळता यावे म्हणून सआदतखान याने आपले कूच पश्चिमेच्या रोखाने चालू ठेवले. मथुरा येथे त्यांची एकमेकांशी गाठ पडली. समसामुद्दौलह मथुरा येथे १ एप्रिल १७३७ नंतर लगेचच येऊन पोहोचला होता. मीर बक्षी जवळ २५ हजार घोडेस्वार, कित्येक तोफा व कित्येक हत्ती होते. १२ हजाराच्या फौजफाट्यानिशी मुहम्मदखान बंगशदेखील तेथे हजर होता. एके दिवशी समसामुद्दौलह याने सआदतखान याला आपल्या तंबूत खान्यासाठी बोलावले होते. मेजवानी चालू असतानाच बाजीराव दिल्लीस धडकला असल्याचे त्यांना समजले. फतहपूर सिक्री मधून गुजरून, बदन जाटाच्या मुलाखातील डिग हे शहर उजव्या हाताला टाकून तो दिल्लीस गेला होता. या खबरीमुळे शाही छावणीमध्ये कमालीचा हलकल्लोळ उडाला. त्यांनी आपली छावणी मोडली आणि मोठी लगबग करून ते राजधानीस परतण्याच्या वाटेस लागले. परतण्याच्या मार्गावर असताना त्यांनी "शरमेच्या दाताखाली आपले गांजलेले बोट दाबून धरले होते." (रुस्तम अल्ली २७२.)

## ९२ : बाजीराव दिल्लीवर हल्ला करतो

ही अगदी अनपेक्षित आणि आकस्मिक अशी घडामोड कशी घडून आली याचा जरासा खुलासा केला पाहिजे. सआदतखान आग्र्यास आला तेव्हा बाजीराव चंबळेपासून——त्याची छावणी खोल खाचा जिथे त्याच्या डाव्या फळीला नदीची मर्यादा पडली होती आणि ईशान्येकडील खुला मुलूख यांमध्ये दुभागलेली होती——दूर हटला; तेथे समसामुद्दौलह याच्या छावणीतील आपल्या हस्तकाकरवी त्याला सआदतखानाने स्वतः आपल्या यशस्वी मोहिमेचा सांगितलेला बढाईचा वृत्तांत समजला. बाजीराव लिहितो "खरी गोष्ट काय आहे ते बादशहास समजावून देण्याचा मी निश्चय केला. मी अजून

हिंदुस्थानात उभा ठाकलेला आहे हे सिद्ध करून बादशाहाच्या राजधानीच्या वेशीवर मराठे येऊन पोहोचले असल्याचे बादशाहास दाखवून देण्याचा मी निर्धार केला."[७]

समसामुद्दौलह आणि सआदतखान यांच्या फौजा एकवटण्यापूर्वी सहा दिवस अगोदर बाजीराव दिल्लीच्या रस्त्याला लागला होता. हा दहा दिवसांचा प्रवास त्याने रात्रंदिवस घाई करून, कोठे न थांबता दोन दिवसांत संपविला. वजीर आणि समसामुद्दौलह यांच्या छावण्या एक दिवसाच्या प्रवासाच्या अंतरावर आपल्या दोन्ही अंगास ठेवून बाजीराव त्या दोघांच्या छावण्यामधून पार झाला. हिजरी ११४९ जिल्हेज ९ (९ एप्रिल १७३७). ईदुज्जुहाच्या आदल्या रात्री बाजीराव अचानक कालका मंदिराच्या टेकडीवर दिसून आला. हिंदूंचे हे प्राचीन पूजास्थान असून ते शहराच्या दक्षिणेस सहा मैलांवर खिजराबाद सराई नजीक निजामुद्दीन अवलिया आणि नासिरूद्दीन 'चिराग–इ–दिल्ली' यांच्या समाधी-मंदिराच्या मध्यभागी आहे. वर्षातून अनेक वेळा, दिवसभर, भाविकांची या मंदिरावर गर्दी उसळते. कधी कधी ते रात्रभरदेखील तेथे असतात. त्यामुळे व्यापारी आपला माल येथे विक्रीसाठी आणतात. तेव्हा भाविकांच्या मेळाव्याला यात्रेचे रूप येते. बाजीराव तेथे आला तो दिवस रामनवमीचा होता. त्या दिवशी जत्रा होती. शहराबाहेर येत असलेले काही हत्ती आणि ऊंट पकडल्यावर बाजीरावाने झटकन आपली माणसे लूटमार करण्या-साठी जत्रेकडे पाठविली हे उद्दिष्ट साध्य झाल्यावर तो आणि त्याचे घोडेस्वार यांनी आपला रात्रीचा मुक्काम मालचा या ठिकाणी टाकला. मालचा हे ठिकाण ताल कटोरा नामक राईच्या जवळ आहे. सदर राई बादशाहाच्या मालकीची असून या ठिकाणाला मुहम्मदाबाद असे म्हणत. हे ठिकाण शहराच्या तटबंदीपासून दोन कोस अंतरावर आणि राजमहालापासून चार कोस अंतरावर आहे. दिल्लीभोवतालच्या वस्त्या जाळून उध्वस्त करण्याचा प्रथम विचार होता. पण बादशाह आणि समसामुद्दौलह यांच्याकडून सवलती उपटण्याचा त्याचा बेत होता; तेव्हा ते दोघे पराकोटीच्या भूमिकेत जाऊ नयेत म्हणून, ही जाळपोळीची कल्पना सोडून दिली. बाजीरावाने बादशाह आणि राजा बख्तमल यांन-यांना पत्रे लिहिली. त्यास उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात बादशाहाने पेशव्यास त्याचा प्रतिनिधी धोंडो पंत यास आपणाकडे पाठवून देण्यास सांगितले; पण त्यासाठी रक्षकतुकडी बाहेर येत नाही तोवर धोंडो पंत यास पाठवू देण्यास बाजीरावाने नकार दिला. पण त्याचे उत्तर नम्र भाषेत लिहिलेले होते. त्यात तो म्हणतो, "माझी फौज शहराच्या सान्निध्यात

७ सवाई जयनगरच्या परिसरातून बाजीराव चिमणाजी अप्पा या आपल्या भावास लिहिलेल्या १५ जिल्हेजच्या पत्रात म्हणतो : " माझे अवजड सामानसुमान ( बंगाह ) बुंदेलखंडाच्या राजा जगत्राज याजकडे बुंदेलखंडास धाडून मी बरोबरचा बोजा हलका केला. सआदतखान याने बादशाह आणि इतर अमीर याना कित्येक खोट्या खबरा लिहून कळविल्या होत्या. यमुना ओलांडून आलेल्या मराठा फौजेचा आपण पराभव केला आहे; दोन हजार मराठे ठार मारले आहेत; दोन हजार मराठे बुडून गेले आहेत; यात मल्हार होळकर आणि विठोबा बुळे याचाही समावेश आहे; मी मराठ्यांना चंबळेपलीकडे हुसकावून लावीत आहे ...............वगैरे आशयाच्या त्या खबरा होत्या. ........हा अहवाल मला धोंडो गोविंद याजकडून मिळाला. ..........दिल्लीस जाऊन तेथे जाळपोळ करावी व मराठे अजून शिल्लक आहेत हे बादशाहास दाखवून द्यावे असे मी ठरविले .........म्हणून मी जिल्काद २६ रोजी राजमार्ग सोडून लांबच्या वाटेने निघालो.........रोज ४० मैलांचे अंतर काटत होतो. दोन मजला मारून आम्ही दिल्लीस आलो. जिल्हेज ७ रोजी दिल्लीच्या अगदी जवळ असलेल्या कुशबंदी या ठिकाणी, बारापुला आणि कालिका मंदीर आमच्या उजव्या हाताला टाकून, आम्ही पोहोचलो." ( ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र पत्र २७ ) (जदुनाथ सरकार )

आल्यास गोंधळ होण्याची भीती मला वाटते. म्हणून मी झील तळ्याकडे परतत आहे. (झील तलाव याचा संदर्भ बहुधा ताल कटोरा या स्थानाशी असावा.) (आशोब ११३ अ, रुस्तम अली २७३ अ, वर उद्धृत केलेले बाजीरावाचे पत्र.) ज्यांची लुटालुट झाली होती व त्यामुळे जे घाबरून पळत सुटले होते अशा लोकांनी बाजीरावाच्या आगमनाची दुर्दैवी बातमी प्रथम शहरात आणली. शहरातून ती बातमी राजमहालात जाऊन पोहोचली. जायबंदी झालेले, लुटालुट झालेले, आरडाओरडा करणारे जमाव राजमहालाच्या प्रवेशद्वारासमोर दिसू लागले. काय घडले ते सांगा असे त्यांना फर्माविले तेव्हा ते एवढे भयाकुल झालेले होते की, एकमेकांनी सांगितलेल्या त्यांच्या माहितीचा मेळ बसत नव्हता व त्यांच्या कथनावरून तथ्य शोधून काढता येत नव्हते. बादशाह आणि त्याचे दरबारी मानकरी या जमावाकडे पाहून कुचेष्टेने हसू लागले. कालकादेवी येथे बाजीराव याचे काय गाठोडे आहे? मेवाती चोरांनी घातलेला तो एक किरकोळ छापा होता. या पलीकडे काय असणार? व्यापाऱ्यांनी इतके निष्काळजी आणि निर्धास्त का रहावे? तसल्या उजाड ठिकाणी त्यांनी आपली चीजवस्तू का न्यावी? दरबारकरूंच्या मनात तरीही शंकाकुशंका रेंगाळत राहिल्याच. म्हणून तीन प्रहरच्या सुमारास एका माणसास साधूवेश देऊन कालका, मालचा आणि ताल कटोरा या ठिकाणी जाऊन तेथील हालहवाल जाणून घेण्यासाठी रवाना केले. हा दूत मध्यरात्र होण्यापूर्वी परतला. बादशाहासमोर हजर होऊन याने आपल्या झोळीतून पसाभर धान्य, त्यात मुख्यत्वेकरून हरभरे होते, बिनमिठाच्या भाकरीचे अर्धेकच्चे भाजलेले तुकडे आणि थोड्याशा मिरच्या काढून दाखविल्या.[८] या सगळ्या गोष्टी मराठ्यांच्या छावणीतून याला भीक म्हणून मिळालेल्या होत्या. सकाळी न्याहरीच्या वेळेपर्यंत शहरावर त्याचा हल्ला होईल असे त्या इसमाने सांगितले. (आशोब ११३ ब.)

लगोलग निरनिराळ्या योजना पुढे येऊन त्यावर चर्चा होऊ लागली. खुल्या मैदानात उतरून प्रतिकार यशस्वीपणे करण्याची सुतराम शक्यता नाही असे त्याना दिसून आले. चर्चेच्या वेळी एका क्षणी त्यांच्यात असाही वाद झाला की, साम्राज्याच्या दोन जबर फौजा रणांगणात असताना त्यांच्याशी मुकाबला न करता ते 'सैतान' दिल्लीपर्यंत येऊन कसे थडकले? जर त्या दोन्ही फौजांचा त्यानी पराभव केलेला असेल तर बादशाह आणि त्याचा दरबार याच्यापुढे एकच मार्ग उरला होता व तो म्हणजे सलोख्याची मागणी करण्याचा किंवा नावात बसून यमुना पार करून निसटून जाण्याचा. अशा प्रकारे, बरीचशी मोघम आणि मूर्खपणाची बडबड चालू राहिली. निरुपयोगी प्रस्ताव पुढे फेकले जात होते. आपला स्वभाव आणि आपली कुवत यास अनुसरून प्रत्येक जण प्रस्ताव मांडत सुटला होता. शाही तोफखान्याच्या प्रमुखपदी सादुद्दीनखान होता. तो काही तसा लौकिकवान योद्धा नव्हता. पण त्याचे उभे आयुष्य अनुभवी माणसांच्या सहवासात गेले होते. दक्षिणेत निजामुल्मुल्काच्या हाताखाली त्याने चाकरी बजावली होती. मराठ्यांचा गनिमी कावा त्याला चांगला माहीत होता. दरबारातले इतर मानकरी पाहिले तर त्याला कसलेला योद्धाच म्हटले पाहिजे. त्याच्या मताला किंमत आली. मराठे निव्वळ नांगरगटे आहेत; ते अगदीच भिकार आहेत; इतक्या फडतूस मंडळीविरुद्ध बादशाहाने स्वतः चालून जाणे बादशाहाच्या दृष्टीने निंदाव्यंजक ठरेल असे सर्वांचे मत पडले. पण बादशाहाने किल्ल्याच्या भिंतीआड आसरा घेऊन

८ या तांबड्या मिरच्या जवळपासच्या दगडावर वाटून, त्या भाकरीबरोबर तोंडीलावणे म्हणून मराठे खात असत.

बसणे हेदेखील बादशाहास तितकेच लांछनास्पद ठरणारे होते. किल्ल्याच्या शिबंदीत दहाबारा हजार घोडेस्वार आणि वीस हजार पायदळ होते. बादशाहाची बहालमर्जी लाभलेल्या अमीरखानावर नेतृत्व सोपवून या फौजा पाठवाव्यात असा निर्णय झाला. या अमीरखानाचे किताब उम्दतुल्मुल्क मुमताज-उस्-सल्तनत असे होते. ( आशोब ११४ ब )

अमीरखानाच्या अंगी कमकुवतपणा असला तरी अखेर तो खानदानी होता. धैर्य आणि शौर्य या गोष्टी निसर्गतःच त्याच्या अंगी होत्या. शिवाय आणखीही पुढारी होतेच, पैकी एकाचे नाव अगरखान होते. हा अगरखान मुघल याचा मुलगा होता. या अगरखानाने दक्षिणेत शिपायांचे नेतृत्व केलेले होते आणि मराठ्यांच्या विरुद्ध काही विजय देखील संपादिले होते. त्याच्या पदरी त्याच्या जातकुळीच्या असामींची अजूनही एक फौज होती. त्याखेरीज तुर्की, कल्माक आणि किरघिज गुलामांच्या हत्यारबंद तुकड्या होत्या. दंडधारी पथकाचा अधीक्षक मुबारिझखान या आणखी एका मुघलाने आपली चाकरी देऊ केली. तो हैदराबादचा सुभेदार–जो ११३७ हिजरी मध्ये निजामुल्मुल्काकडून पराभूत होऊन निजामुल्मुल्काकडूनच मारला गेला होता–याचा मुलगा होता. सादुद्दीनखान याने सगळा शाही तोफखाना अमीरखानापुढे उभा केला. दरम्यान शरीररक्षकांच्या अंबारीसंबद्ध सैनिकांचे दोन राजपूत अधिकारी येऊन मिळाले. एकाचे नाव राजा शिवसिंग होते; त्याच्या बरोबर पाचशे असामी होते. दुसऱ्याचे नाव राजा अजमेरसिंग होते. त्याच्या समवेत अडीचशे असामी होते. ( आशोब ११५ अ, रुस्तम अली २७३ ब. )

बादशाह किल्ल्यातच राहिला. त्याच्या रक्षणासाठी तीन हजारांचे तोफदळ, एक हजाराची शाह आला फौज, तोड्याचे बंदूकधारी, कारागीर आणि शरीररक्षक पलटणीचा अर्धा भाग एवढ्याना ठेवण्यात आले. शरीररक्षक पलटणीचा उरलेला अर्धा भाग अमीरखान याच्या पलटणीस जाऊन मिळाला. किल्ल्याची हुकूमत सादुद्दीनखान याच्या हातात आली. काही आपत्ती कोसळल्यास सावधगिरी म्हणून नदीच्या वरच्या आणि खालच्या बाजूस, १५–२० मैलांच्या टापूत असलेल्या उतारांवरील सगळ्या नावा ओढून आणून, राजमहालाच्या खिडकीखाली बांधून टाकल्या. गरजच पडली तर जनानखान्यातील राजस्त्रियांना नावेत उतरून निसटून जाता यावे व अशा प्रकारे त्यांच्या वरील बेअब्रूचा प्रसंग टाळावा हा यातील हेतु! खोजे मंडळींना सगळ्या प्रमुख अमलदारांचा फेरा करून जागता पहारा ठेवण्यास त्यांना उद्युक्त करण्यासाठी पाठविले. संबंध रात्रभर राजमहालातील रक्षकांना इशारा देण्यासाठी ललकारे घरोघर जात होते.

रात्र पडल्यावर घटकाभराने, मिश्रीखानाचे फाटक म्हणून नाव असलेल्या दिंडीदरवाजा-पुढे अमीरखानाने आपली फौज उभी केली. तेथे त्याला अगहरखान आणि मुबारिझखान येऊन मिळाले. युद्धविषयक मसलत झाल्यावर, शहरापासून ताल कटोऱ्याच्या राईपर्यंतच्या भागात त्यांनी मोर्चे बांधण्यास सुरुवात केली. या रेषेत अधल्यामधल्या भागात त्यांनी आपल्या तोफा ठेवल्या. मराठे कसा हल्ला करीत येतात याचा अंदाज घेत, ते वाट पाहात थांबले. पण ही सगळी तयारी होईपर्यंत पहाट होण्याची वेळ झाली. शत्रूचा तर अजून मागमूसही लागत नव्हता. बचाव पक्षाने चांगली मोर्चेबंदी केली होती. या बचाव पक्षाच्या मोर्च्यावर गर्दी करून जाणे मानवणार नाही हे मराठ्यांना दिसत होते. मुसलमानांनी आपले मोर्चे

सुरक्षित राखले असते असे धरून चालवयास जागा आहे. पण फौजेतील तापट आणि भडक डोक्याच्या तरुण अमलदारांनी मात्र हल्ल्यातील पुढाकार आपल्याकडे घेण्याचा हेका चालू केला. (आशोव ११५ ब–११६ अ.)

असा हेका चालविणाऱ्यांमध्ये मीर हसनखान कोका हा प्रमुख होता. त्याचा नुकताच बहाल झालेला किताब खान जहान बहादुर कोकलताश जफरजंग असा होता. त्याचा अर्थ युद्धात विजयी होणारा असा होता. आपले नाव सार्थ करून दाखविण्याच्या इर्षेने तो झपाटला होता. एका म्हणीचा आशय आहे त्याप्रमाणे, याचे लोखंड नेहमीच भट्टीत असे हा तरुण माणूस मोठा देखणा आणि अगदी महत्त्वाकांक्षी होता. हा एका इराण्याचा मुलगा होता खरा, पण तो स्वतःची ठेवण सर्व बाबतीत मऊ शम्साबाद आणि शाहजहानपूर येथील पठाणांच्या धर्तीवर ठेवे. आपला नखशिखान्त पोषाख तो या पठाणांप्रमाणे करी. त्याच्या घोड्यांचे खोगीर, त्याचे सामानसुमान, त्याचा जीवनमार्ग किंवा चालीरीती, त्याची प्रत्येक हालचाल आणि हावभाव अशा सगळ्या बाबतीत तो पठाणांची नक्कल करी. अगदी अलीकडेच शाही लवाजम्याचे आधिपत्याच्या जागी बादशाहने त्याची नेमणूक केली होती. हा शाही लवाजमा इतर शरीररक्षक पलटणींच्या मानाने छोट्या संख्येचा असे; पण या लवाजम्यावर बादशाहाची विशेष मदार असे. यातील लोक कसास उतरलेले असत. ते शेलके लढवय्ये म्हणून समजत. त्यांच्याजवळ उत्तम घोडे असत; त्यांची हत्यारे देखील ठेवणीतली असत. या सगळ्या धामधुमीच्या काळात सदर पलटणीला राजमहालात रहाण्याचा हुकूम होता. पण तसली कामगिरी मीर हसनखानाच्या महत्त्वाकांक्षेशी मिळतीजुळती नव्हती. किल्ल्याच्या आत लपून बसणाऱ्या बादशाहाला भेदरट समजून, मीर हसनखान, हुकूम नसताना, आपल्या पलटणी घेऊन कूच करीत बाहेर आला व अमीरखानास जाऊन मिळाला (आशोव ११६ ब–११७ अ.)

हसनखानाचा तरुण उमरावांवर प्रभाव होता. हे तरुण अधिकारी सावज पकडण्यासाठी अधीर झाले होते. तुम्ही अगदी म्हणजे अगदी भ्याड आहात अशा शब्दांत अमीरखान आणि त्याचे साथीदार यांना दूषण देऊन ही तरणी मंडळी आपल्या फौजांना घेऊन उघड्या मैदानात पुढे झाली. ते सरळ बाजीरावाच्या दृष्टिपथात आले. बाजीराव सावधच होता. तो युद्धासाठी स्वार झाला; आपल्या फौजांची मांडामांड त्याने केली. सटवाजी जाधव याच्या आधिपत्याखाली त्याने ५०० सुसज्ज राऊत पुढे पाठविले. शत्रूला बाहेर काढण्यासाठी आणि शत्रूचे संख्याबळ आणि शत्रूची जागा याविषयीची बित्तंबातमी मिळविण्यासाठी हे आघाडीचे राऊत पाठविले होते. ताल कटोरा आणि मालचा यांना ओलांडून बाजीरावाची ही छापेमार सेना मैदानात उतरली. ते असामी जेव्हा बाणाच्या एका फेकीच्या आटोक्यात, जेजालांच्या रांगेजवळ आले तेव्हा बाजीराव त्यांना येऊन मिळाला. बाजीरावाने त्यांना हल्ला करण्याचा हुकूम दिला. भाले चालवा आणि तलवारी म्यान करा असा त्याचा हुकूम होता. त्यांच्याविरुद्ध मीर हसनखान आणि कोकलताशखान याचे मुलगे, तरुण कोकाखान वगैरे आडदांड, पोरकट मंडळी होती. रस्त्यात भांडणे-कलागती करण्यात ही पोरे पटाईत होती; पण खऱ्याखुऱ्या युद्धाचा हिसका त्यांना माहीत नव्हता. शिवसिंग आणि अजमेरसिंग राजपूत यांचे भाऊ आणि मुलगेही तेथे होते. बाजीराव आणि त्याचा किरकोळ फौजफाटा पाहून हे

९ 'रिकबगंजजवळ, शहराबाहेर सात किंवा आठ हजार फौजेसह' (बाजीरावाचे पत्र). (जदुनाथ सरकार)

सावज सहज आपल्या हाती लागेल असे त्यांना वाटले. दोन हजार घोडेस्वारांनिशी ते पुढे झाले. पोक्त माणसांनी घेतलेल्या, याबद्दलच्या हरकतींना त्यांनी जुमानले नाही. उलट या म्हाताऱ्या मंडळींत कसला जोर उरला नाही, असा आरोप पोरांनी त्यांच्यावर केला. (आशोब ११७ अ.)

ही मंडळी घोड्यावर बसून कशी रपेट करीत आहेत आणि त्यांनी आपले लगाम कसे पकडले आहेत याचे निरीक्षण करून बाजीरावाने ताडले की हे अननुभवी व कच्च्या दिलाचे शिपाईगडी आहेत. त्यांना चुचकारण्यासाठी बाजीरावाने एकदोनदा आपल्या फौजेनिशी माघार घेतली. या माघारीमुळे मुसलमान पक्ष धीट बनला व अधिक निकराने त्यांचा पाठलाग करू लागला. अगदी थोड्याच वेळात ते अमीरखानाच्या हाताखालच्या त्यांच्या कुमकेपासून दोन मैलांवर आले; अशा पाठलागात त्यांनी ताल कटोरा ओलांडले; शहराच्या बाजूने विरुद्ध दिशेला असलेल्या तलावाच्या काठापर्यंत ते आले. सटवाजी जाधव याने मागे सूचना पाठविली की मुसलमान आणखी पुढे येत आहेत. एका क्षणात मल्हारराव होळकर एकदम मागे फिरला व मुसलमानांवर तुटून पडला. पाठोपाठ राणोजी शिंद्यांनीदेखील तेच केले. आपले भाले आणि तलवारी यांनिशी धुमश्चक्री करीत त्यांनी मुसलमानांना तुडवून काढले. मुसलमान जायबंदी झाले. त्यांच्यातील हजार एक असामी घोड्यावर टिकले नाहीत. ते घोड्यावरून खाली पडले. जायबंदी झालेल्यांतील कित्येक जणांच्या अंगावर या लढाईतील जखमांचे वण मरेपर्यंत राहिले. स्वार नसलेली हजार घोडी त्यावरील खोगिरांसह आणि सोन्या-माणकांच्या दिमाखदार साजांसह मराठ्यांनी पडकली. सहाशे मुसलमान ठार वा जायबंदी झाल्याचे आणि दोन हजार घोडे व एक हत्ती हस्तगत केल्याचे वृत्त बाजीराव कळविताना आढळतो. मराठ्यांनी जवळजवळ कोणासच गमावले नाही. मराठ्यांचा एक अधिकारी जखमी झाला.[१०] (आशोब ११७ ब, रुस्तम अली २७३ ब.)

दरम्यान मीर हसनखान अगदी कमालीचा घाबराघुबरा होऊन, अमीरखानाच्या फौजेस जाऊन मिळण्यासाठी पळाला. एखाद्या आसऱ्यापर्यंत जाऊन पोहोचण्यापूर्वीच शत्रूने त्यास गाठले. भाल्याने फक्त एकदाच डिवचले असता तो घोड्यावरून खाली पडला. त्याचा घोडा हिसकावला; त्याचा उत्तम पोषाख व शस्त्रे हिसकावली. रक्तबंबाळ स्थितीत त्याला जमिनीवर तसेच टाकून दिले. एखादा जखमी अनुयायी तेथे आला आणि त्याचे किताब उच्चारून त्याची विनवणी करू लागला की, तो आपल्या डोक्यात राख घालून घेई आणि लीनतेने कुर्निसात करून म्हणे, "अल्लाची शपथ! गप्प बैस. तू माझे किताब उच्चारशील तर शत्रू मला ओळखेल आणि प्रचंड खंडणी देणे मला भाग पडेल." कोकाखानाचा जिवानिशी निकाल लागला. आपली मुले आणि आपले नातेवाईक यांनी आपणावर कसला बेअब्रूचा प्रसंग आणला हे पाहून राजा शिवसिंग मदत करण्यासाठी मातीच्या भरावामागून बाहेर आला. मार खाल्लेले घोडेस्वार पुन्हा गोळा करणे अशक्य झाले होते. शिवसिंग एकटा पडला. मराठ्यांनी त्याला घेरले तरी त्याने आपला बचाव एखाद्या शूर शिपायाप्रमाणे

१० बाजीराव लिहितो, "राजा शिवसिंग आणि इतर दहाबारा दरबारी उमराव ठार झाले. मीर हसनखान जखमी झाला. बादशहाच्या शरीररक्षक दलातील अडीच-तीनशे माणसे पडली, चारशे असामी जायबंदी झाले.............खान मंडळी पळून गेली, दोन हजार घोडे हस्तगत केले, पाचसहा हजार असामी पळून गेले. राणोजी शिन्दे याचा एक अधिकारी इंद्राजी कदम याची दोन बोटे तुटली." ( जदुनाथ सरकार)

चालू ठेवला. शेवटी त्याच्यावर वार होऊन तो ठार झाला. दुसरा अजमेरीसिंग जो वारेमाप बढाया मारी—पळण्यात सर्वांच्या पुढे गेला. त्याचे कित्येक अनुयायी घोड्यावर नीट रपेट करता येत नसल्याने शत्रूच्या हाती लागले. तलवारी आणि भाले यांच्या जखमा त्यांना झाल्या. घोड्यावरून ते खाली कोसळले. आपली शस्त्रे त्यांनी गनिमांच्या हवाली केली. पूर्णपणे नागवले गेल्यामुळे ते सर्वांची नजर चुकवून नग्नावस्थेत अमीरखानाच्या शिपाई-तळात पायदळ म्हणून घुसले. तेथून ते शहरात सटकले. शहरात शिरताना त्यांचा दुःखवेग अनावर होऊन ते रडू लागले. त्यामुळे शहरातील रहिवाशामध्ये कमालीची घबराट पसरली.

रणांगणात ठार वा जायबंदी झालेल्यांना जेव्हा त्यांच्या नातेवाईकांनी शहरात आणले तेव्हा शहरात पुन्हा एकदा घबराटीचे वातावरण पसरले. अमीरखानाच्या पलटणीतील आपल्या कामगिरीच्या जागा सोडून ही मंडळी शहराच्या नैर्ऋत्येकडे पहाडगंजमध्ये आणि आसपासच्या भागात येऊन थडकली होती. तेथे त्यांनी दुकानदारांकडून चारपाया घेतल्या. या चारपायांवर मृत सैनिकांची कलेवरे टाकून त्या त्यांनी शहरातील गल्ल्यांतून ज्याच्या त्याच्या घरी नेल्या. शहरवासियांनी पळून जाण्याची सिद्धता ठेवली. भीतीचा संसर्ग किल्ल्यापासून राजमहालासही झाला. थोड्याच वेळात काय घडत आहे यावर नजर ठेवून मालचा येथील छोट्या टेकडीवर जमलेल्या मराठ्यांनी शहरचा रस्ता धरला. या रस्त्यावर आपणास कसलाही विरोध होत नाही असे मराठ्यांना आढळून आले (आशोब ११८ ब–११९ ब.)

## बाजीराव दिल्लीतून माघार घेतो

शहर काबीज होईल अशी भीती जितक्या झपाट्याने उद्भवली तितक्याच झपाट्याने ती नाहीशी झाली. शहरावर चढाई करून जाण्याऐवजी बाजीराव महरामनगर[११] आणि सराई अल्लाहविर्दीखान यांच्या रोखाने गेला. तावडतोब अमीरखानाने राजमहालाकडे आनंदाचे भरते आलेली तातडीची खबर पाठविली. रणांगणातील लोक जेवढे खचलेले होते व भीतीने पछाडलेले होते त्यापेक्षा ही मंडळी अधिक खचलेली व पछाडलेली होती. बादशाह दिवाण-इ-खासमध्ये मध्यरात्र होईतो खुला दरबार भरवून बसला होता, कोणकोणत्या उपाययोजना करता येतील याची चर्चा करीत होता. शहरास येऊन पोहोचणाऱ्या प्रत्येक निरोप्याला खबर विचारणाऱ्या जमावांच्या गर्दीस तोंड द्यावे लागत होते. शहर दरवाजापासून दिल्लीच्या दरवाजापर्यंत, चौकशी करणाऱ्यांच्या हल्ल्यातून त्याला वाट काढावी लागे. तेथून बादशाहापुढे हजर होईपर्यंत हीच स्थिती असे. हेरांनी आणलेली बातमी पडताळण्यासाठी सराई अल्लाहविर्दीखान या ठिकाणाकडे आता घोडेस्वार पाठविले. हे स्वार महरामनगर येथे पोहोचले तेव्हा ते ठिकाण शत्रूने पूर्णपणे सोडून दिले आहे असे त्यांना आढळून आले. (आशोब ११९ ब.)

---

११ आशोब, १२१ अ, सांगतो की महरामनगर दिल्लीपासून सात कोसांवर आहे; तेथे एक बाग आणि एक सराई आहे. या दोन्ही गोष्टींची चांगली देखभाल ठेवलेली असून त्या प्रेक्षणीय आहेत. इतिमादुद्दौलह चीन बहादुर नुरअतजंग या वजीरास महरामखान नावाचा खोजा होता. त्याने हे गाव वसवले. तेथे या खोजाच्या नावाची एक बाजारपेठ आहे. सराई अल्लाहविर्दीखान (इंडियन ॲटलास ४९ आग्नेय) हे ठिकाण दिल्लीच्या नैर्ऋत्येस सोळा मैलावर आणि गुरगाव रेल्वे स्टेशनच्या उत्तरेस एक मैलावर आहे.

शत्रू एकाएकी निघून गेला याचे कारण पुढीलप्रमाणे होते. मीर हसनखान याजबरोबर दोन हात करीत असताना बाजीरावाच्या कानी असे आले की वजीर आणि त्याचे मुघल सैनिक दिल्लीस परतण्याच्या मार्गावर असून सध्या ते फार दूर अंतरावर नाहीत. वजीराच्या आघाडीचे नेतृत्व वजीराचा चुलत भाऊ जहीरुद्दौलह अजीमुल्लाहखान याकडे होते तर पिछाडीचे नेतृत्व निजामुल्मुल्काचा सर्वात थोरला मुलगा गाझीउद्दीनखान बहादुर फीरुझ जंग याकडे होते. जिवात जीव आणणाऱ्या या दोन बातम्या–एक म्हणजे बाजीरावाचे पलायन आणि दुसरी म्हणजे वजीराचे आगमन–समजल्यावर अमीरखान राजमहालात परतला; तेव्हा बादशाहाने त्यास हजर करून घेतले (आशोब १२१ अ.)

## ९३ : बाजीराव आणि वजीर यांमधील लढाई

वजीर आणि त्याची फौज जवळजवळ येत आहे असे कळताच बाजीरावाने दिल्ली सर करण्याचा आपला बेत सोडून दिला. मध्यान्हीच्या सुमारास त्याने रणांगण सोडले. सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळी त्याने सराई अल्लाहविर्दीखान ओलांडलेली होती व बादशाहपूर[१२] नामक ठिकाणी तो येऊन पोहोचला होता. सदर ठिकाण दिल्लीपासून २० मैलांवर आहे. या ठिकाणी वजीर बाजीरावास भिडला. दोन्ही पक्ष रणांगणात उतरले तेव्हा दोन्ही फौजांनी लांबचा प्रवास पार पाडलेला होता. फौजांची लढाईच्या दृष्टीने मांडामांड करण्यास किंवा तोफखाना रणांगणात उभा करण्यास त्यांना अवसरही नव्हता. सूर्य आता मावळणारच आहे; आता काय असेल तो संधिप्रकाशच आहे आणि रात्र पडू लागलेली आहे याची जाणीव होऊन वजीराने लढाईला तोंड फोडण्यास प्रतिबंध केला. शिवाय वजीराच्या फौजांनी डोंगर आणि जंगले पालथी घालून, मोठी धडपड करून ८०–९० मैलांचा पल्ला गाठलेला होता. त्यामुळे फौजेतील सैनिक अगदी थकून भागून गेले होते. खरे म्हणजे अर्धीच फौज येऊन पोहोचली होती. उरलेली अर्धी फौज महाबताबादच्या दगडाधोंड्यांनी भरलेल्या भागातून अजूनही वाटचालच करीत होती. सेनापतीच्या सोबतीस असलेला तोफखाना तेवढा येऊन पोहोचला होता. त्यात हलक्या जेज़ाला आणि जोरात पळणाऱ्या उंटावर लादलेले, थोडेसे लढाईतले बाण होते. याखेरीज कसलेच तोफदळ वजीराजवळ त्यावेळी नव्हते. सगळ्या मोठ्या तोफा अजून वाटचालच करीत होत्या. एकंदरीत वजीराची फौज लढाई देण्याच्या तयारीत नव्हती. (आशोब ११२ अ.)

पण मराठे दिसतील त्याच ठिकाणी त्यांवर हल्ला चढविण्याचा विडा जहीरुद्दौलह याने उचलला होता. मराठ्यांवर हल्ला करण्याच्या कल्पनेने त्याच्या मनात घर केले होते. शिवाय बाजीरावाच्या दिल्लीवरील हल्ल्यामुळे, बादशाहाच्या झालेल्या उपमर्दामुळे देखील तो

१२ आशोब म्हणतो की बादशाहपूर दिल्लीपासून १५ कोस अंतरावर आहे. गुरगाव जिल्ह्यात बादशाहपूर नावाचे एक गाव आहे. ते दिल्लीच्या नैर्ऋत्येस २० मैलावर आणि गुरगाव स्टेशनच्या दक्षिणेस ६ मैलांवर आहे. वजीर कामा या ठिकाणी होता. सदर ठिकाण डिग नामक गावाच्या उत्तरेस १२ मैलांवर आणि मथुरेच्या पश्चिमेस २७ मैलांवर आहे. ( रूस्तम अली २७३ अ. ) सदर कामा या ठिकाणापासून तो बाजीरावाच्या आगमनाची बातमी समजताच लगबगीने दिल्लीस परतण्यासाठी येत होता. महाबताबाद कोटेरा नावाचे ठिकाण दिल्लीच्या दक्षिणेस १७ मैलांवर आणि बादशाहपूरच्या पूर्वेस १० मैलांवर आहे. ( इंडियन अॅटलास, ४९ आग्नेय ). ( डब्ल्यू. इर्विन ) सराई अल्लाहविर्दीखान हे ठिकाण गुरगाव रेल्वे स्टेशनच्या उत्तरेस एक मैलांवर आणि बादशाहपूरच्या उत्तरेस सात मैलांवर आहे.

संतापलेला होता. अशा स्थितीत त्याने आपला हत्ती पुढे काढला. आपल्या सोबत हलका तोफखाना घेतला. दुसऱ्याही काही फौजा सोबत घेऊन तो वजीराच्या पुढे झाला. थोडेथोडे पुढे सरकण्याचे साधून तो वजीरापासून खूपच दूर गेला. गनिमाच्या अगदी जवळ येऊन ठेपलो आहे; गनिमास भिडताही येत आहे; तेव्हा हल्ला करण्याची इच्छा झाली आहे; सबब पाठबळ देण्यासाठी आपण आपल्या सगळ्या फौजेसह मागून येणार ना? अशी विचारणा करणारा निरोप त्याने वजीरास पाठविला. नंतर प्रार्थना करून, अल्लाची लीला अगाध आहे अशा अर्थाची गर्जना त्याने केली व आपला हत्ती पुढे काढला. विरुद्ध पक्षातील मराठेदेखील त्याला भिडण्यासाठी पुढे झाले.[13] दोन्ही पक्षांतील योद्धे आपापल्या फळ्यातून शस्त्रसज्ज होऊन बाहेर पडले व एकमेकांवर चालून गेले. सेनापतीने आपले मोठे नगारे वाजविण्याचा हुकूम सोडला. व आपला तोफखाना व तोड्याचे बंदूकधारी यांना कामगिरी बजावण्यास फर्मावले. बाजीरावानेही आपल्या दुंदुभी वाजवून आणि रणशिंगे फुंकून प्रत्युत्तर दिले. नंतर तो पुढे सरकला. तेव्हा पुढे सरकणाऱ्या मुसलमानी पक्षाने त्याच्या आघाडीवर हल्ले चढविले. जहीरुद्दौलह याच्या पाठबळासाठी वजीर लौकरच त्या ठिकाणी येऊन पोहोचला. (आशोब १२२ अ.)

जहीरुद्दौलह आणि वजीर यांचा संयुक्त हल्ला बाजीराव व त्याचे सैनिक याना चांगलाच जड गेला. रात्र पडली तेव्हा बाजीराव राजपुतान्याच्या रोखाने माघार घेऊ लागला. त्याचे तीस असामी कामास आले होते. त्यानेच कळविलेल्या हकीकतीनुसार तो रणांगणाच्या पश्चिमेस ८ मैलांवर आलेला होता. ईदची ( १० एप्रिल १७३७ ) पहाट होण्यापूर्वी त्याने कोटपुतळी हे ठिकाण ओलांडले होते. सदरचे ठिकाण राजधानी पासून ९३ मैलांवर आहे. त्या दिवशी त्याने नारनोळ[14] लागेपर्यंत दिवसभर आपले धीमेकूच चालू ठेवले. येथे त्याने

---

१३ वजीराच्या फौजेत जाननिसारखानाच्या तुकडीत आशोबचे दोन थोरले भाऊ होते. हे दोघे भाऊ आणि मीर घियासुद्दीन हे आघाडीत टेहळणी करणारे सैनिक म्हणून रपेट करीत पुढे गेले होते. त्यांना बाजीराव आणि त्याची मुसलमान रखेली मस्तानी हे रस्त्यात दिसून आले. दोघेही एकाच खोगिरावर बसले होते आराम करता करता त्याचे पिणे आणि गाणे चालू होते. या टेहळणी सैनिकांच्या अस्तित्वावरून मुघल फौजा येऊन ठेपण्याची सूचना मराठ्यांना पहिल्यांदाच मिळाली. मस्तानी ही कंचनी किंवा नर्तिका बाजीरावासमवेत त्याच्या सर्व मोहिमामध्ये असे. ती त्यास थोडीसुद्धा सोडत नसे. ती एका उंच्यापुऱ्या घोड्यावर स्वार होऊन, रिकिबीस रिकिब लावून दौड करीत असे. घोडेस्वारी करण्यात ती कुठल्याही मराठे सरदाराच्या मागे नसे. इतकेच काय पण भालाफेक व तलवारबाजी यांतदेखील तिची त्यांच्याशी बरोबरी असे.

१४ दिल्लीच्या परिसरातून बाहेर पडावे लागले ही घटना बाजीराव, अगदी थोडक्यात आणि सहजपणे आपल्या ( पूर्वोक्त ) पत्रात निकालात काढतो. तो लिहितो : "मीर हसनखान थकून गेल्यावर...... मी झील तलावापाशी थांबलो. रात्र पडण्यास अजून चार घडीचा ( घटिकाचा ) अवकाश होता. त्यावेळी कमरुद्दीनखान बादशाहपूरच्या मार्गाने येत असल्याची खबर मला मिळाली. मी ताबडतोब सिद्ध झालो आणि कूच केले. आमच्या फौजा शत्रूस भिडल्या. बाबा येथे पोहोचलो असता यशवंतराव पवार याने एक हत्ती पकडून आणला. घोडी आणि उंट छावणीकडे आले. तोवर सूर्य मावळला. रात्री मी आराम करतो तर मुघलांनी मला घेरले असते........झील तलाव १६ कोस दूर होता. माझ्या उजव्या हाताला कमरुद्दीनखान होता; तर शहर माझ्या मागे राहिले होते. गुरुवारी खान-इ-दौरान, सआदतखान आणि महम्मदखान बंगश याची वजीराबरोबर युती घडली असती. म्हणून मुघलांना ( मागे ) टाकून मी चार कोस अंतरावर तळ ठोकला. आमच्या बाजूस फिरंगोजी पाटणकर गोळी लागून ठार झाला. दहापाच माणसे जखमी झाली. मुघलांच्या पक्षातील दहापाच ठार झाले व दहावीस जखमी झाले. मुघलांना पाठीवर घेऊन, त्याना काबूत आणून, त्याचा पराभव करावा म्हणून मी अशा प्रकारे ( माघारीच्या ) प्रवासास लागलो. मी रेवाडी, कोटपुतळी आणि मनोहरपूर या गावाच्या वाटेने आलो. सगळे मुघल ( म्हणजे वजीर आणि तीन खान ) याचा तळ अल्लाहविर्दीपासून झील तलावपर्यंत पडलेला आहे." (जदुनाथ सरकार).

रात्र काढली. पण दुसऱ्या दिवशी पहाटेच आपले पलायन चालू ठेवले. अगदी लगबग करीत तो अजमेरास गेला. शंभर मैलांचा, दमछाक करणारा प्रवास बाजीरावाने नुकताच संपविलेला होता. त्याचे असामी व घोडे इतके दमले होते की पाठलाग करणे त्याना शक्यच नव्हते. म्हणून वजीरपक्षीय मंडळींनी आपल्यातील जखमींची देखभाल केली. मेलेल्यांचे दफन केले. उरलेली फौज पहाट होईतो शस्त्रे परजून सज्ज राहिली. तो दिवस ईदच्या सणाचा होता. त्याचे विधी सादर करण्यासाठी छावणीबाहेर एक तंबू उभारला होता. सण तेथे साजरा झाला. खैरातही तेथेच केली. ( आशोब १२४ ब. )

लढाईच्या दुसऱ्या दिवशी, मध्यान्हीच्या प्रार्थनेनंतर समसामुद्दौलह वजीराच्या तळावर येऊन पोहोचला. तो आग्ऱ्याच्या वायव्येस चौदा मैलांवर असलेल्या यमुनेवरील गौघाट येथे होता तेव्हा बाजीराव अकस्मातपणे दिल्लीस येऊन पोहोचल्याची खबर त्याला मिळाली. तेव्हा तीन दिवस अखंड प्रवास करून तो गौघाटाहून दिल्लीस आला. प्रत्येक बारापंधरा तासांनी, आराम करण्यासाठी, माणसे आणि जनावरे यांना अन्नपाणी करण्यासाठी तेवढा तो अल्पवेळ थांबत होता. जिल्हेज ११ (११ एप्रिल) रोजी तीन प्रहरी सआदतखानदेखील येऊन पोहोचला. पिलाजी जाधवाचा पराभव करून तो आग्ऱ्यास गेला होता. पण बाजीराव दिल्लीस गेल्याचे समजताच, सआदतखानदेखील करता येईल तेवढी त्वरा करून, त्याच दिशेने निघाला. ( आशोब १२४ ब. )

या तिन्ही सेनानींनी एकमेकांच्या औपचारिक भेटी घेतल्या; एकत्र बसून मसलत केली. या वेळपर्यंत बाजीराव नारनोळच्या पलीकडे व अजमेरच्या नजीक जाऊन पोहोचला होता. तेथून तो लौकरच माळव्यात उतरण्यासारखा होता. म्हणून बाजीरावाचा पाठलाग करणे निरर्थक आहे असा निर्णय झाला. तापदायक ऊन आणि गरम हवा अशा वातावरणात लांबलचक व कष्टदायक प्रवास पार पाडल्यावरदेखील त्यांना शत्रूस भिडण्याची उमेद धरता येत नव्हती. शत्रूस भिडण्याऐवजी दरबारास परतावे आणि ईदच्या सणानिमित्त बादशाहास शुभेच्छादर्शक अभिवादन करावे; एका मोठ्या अरिष्टातून सुटका झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करावे असे त्यांनी ठरविले. शहरात पोहोचल्यावर त्यांनी बादशाहाची भेट मागितली व बादशाहानेही ती दिली. सआदतखानाला त्याच्या सुभ्यास परतण्याचा हुकूम झाला. समसामुद्दौलह याच्या समवेत आलेल्या मुहम्मदखान बंगश यास आग्ऱ्याचे रक्षण करण्यासाठी पाठविले. उरलेले दोन उमराव शहरातील आपापल्या निवासस्थानी परतले. मोहिमेचा या वर्षीचा कार्यक्रम संपुष्टात आला आहे असे ते आपल्यापुरते धरून चालले. ग्वाल्हेरला परतल्यावर, बाजीरावाने यमुना पुन्हा एकदा ओलांडून दुआबात पुन्हा एकदा प्रवेश करण्याचे ठरविले. पण माळव्यात निजामुल्मुल्क कुरापत काढील अशी शंका आल्यावरून त्याने आपले मन आवरले. शेवटी तो दख्खनच्या रोखाने निघाला. साताऱ्याहून तो तत्काळ कोकणात उतरला. १३ लाख रुपयांची रक्कम, खेरीज माळव्याच्या कारभाराचे वचन मिळाल्यावर त्याने राजधानीतील समसामुद्दौलह याशी वाटाघाटी करणे पुन्हा आरंभले. ( आशोब १२५ अ. )

## ९४ : ११५०–५१ हिजरीची मोहीम–मुहम्मदखानाच्या कारकिर्दीचे २० वे वर्ष (१ ऑक्टोबर १९३७ ते ३० जून १७३८)

या वेळपर्यंत असे मत दृढ होऊ लागले की मराठ्यांच्या आक्रमणाला थोपवून बादशाही वाचवू शकेल असा एकच असामी असून तो म्हणजे निजामुलमुल्क होय. या वेळपर्यंत समसामुद्दौलह याने त्याला दरबाराबाहेर ठेवले होते. कारण "तख्ताभोवती कोणी प्रतिस्पर्धी असू नये" असे त्याला वाटे. वजीर कमरुद्दीनखान हा इतका मवाळ होता की तो मत्सरविषय होऊ शकत नव्हता. पण निजामुल्मुल्क हा वेगळ्या धर्तीचा माणूस होता. शिवाय त्याच्यावर एक वहीमदेखील होता. तो वहीम असा की, मराठ्यांना चढाईसाठी नर्मदेपलीकडे धाडण्यास त्याचीच फूस होती. असा समज करून घेण्यास थोडासा आधारही होता. मराठ्यांपासून दक्षिणेतील आपल्या सुभ्याचा बचाव व्हावा या हेतूने तो, मराठ्यांचे लक्ष उत्तरेकडे वळवत होता. हा हेतू साध्य होण्यासाठी त्याने दख्खनच्या महसुलातील चौथ वसूल करण्याचा मराठ्यांचा दावा मान्य केला होता. (अहवाल-इ-खवाकीन १४० ब.). खुद्द समसामुद्दौलह याला देखील अखेरीस असे वाटू लागले की परिस्थिती अशा थराला गेली आहे की ती हाताळणे आपल्याला शक्य नाही. म्हणून निजामुलमुल्काशी दिलजमाई करावी, या मताचे तो समर्थन करू लागला. हळूहळू बादशाहास या दिलजमाईसाठी अनुकूल केले. दख्खनच्या सुभेदाराला दिल्ली दरबाराची आग्रहाची आमंत्रणे जाऊ लागली.

निजामुल्मुल्काच्या ठिकाणी अजूनही वजीरपदावर राहून मुघल साम्राज्याचे सूत्रचालन करण्याची महत्त्वाकांक्षा टिकून होती असे दिसते. कितीही शक्तिमान असलेल्या सुभ्याच्या सुभेदारापेक्षा वजीराचे स्थान नाममात्र का होईना अधिक सत्तासंपन्न होते. निजामुल्मुल्काच्या दिल्लीतील सरदारांनी बादशाहाचे आमंत्रण स्वीकारण्याबाबत नकार दर्शवावा असा युक्तिवाद करणारी पत्रे निजामुल्मुल्कास पाठविली होती. असे असूनही मुहम्मदशहाचे आमंत्रण स्वीकारण्यात निजामुल्मुल्कास नाराजी वाटत नव्हती. नवाब बुर्हानपुरास होता तेथून दिल्लीस जाण्याचा केलेला बेत त्याला, त्याच्या वऱ्हाड मुलखातील गडबडीमुळे, सोडून द्यावा लागला होता. निजामुल्मुल्कास दक्षिणेतच अडकवून ठेवावे किंवा बाजीरावाचे शब्द वापरावयाचे झाल्यास, निजामास दोरखंडानी आवळून टाकावे, या आदेशास अनुसरून वऱ्हाडातील बाजीरावाच्या एका सरदाराने निजामाच्या मुलखात धामधूम सुरू केली होती म्हणून सईद जमालखान याला त्याने वऱ्हाडवर धाडले. थोड्याच दिवसात देउळघाट ओलांडून तो त्या मुलुखात हजार स्वार व पंधराशे पायदळ घेऊन उतरला. कवडे या मराठा सरदाराने त्याच्या समोर माघार घेतली. तेव्हा जमालखानाने मंगळूर[१५] या ठिकाणी तळ ठोकला. मंगळूरास शाह बद्रुद्दीन याचा दर्गा आहे. वाशीम जवळच्या उघड्या मैदानात जमालखान पोहोचला तेव्हा त्याने मराठ्यांवर हल्ला चढवला; त्याना हुसकले आणि ते सुभ्याच्या बाहेर पडेपर्यंत त्यांचा पाठलाग केला. नंतर तो परतला आणि त्याने आपल्या मोहिमेचा अहवाल निजामुल्मुल्कास सादर केला. (अहवाल-उल्-खवाकीन, २४१–२४६.) आपल्या स्वतःच्या मुलखाला आता कसलाच धोका नाही याची खात्री पटल्यावर शेवटी

---

१५ देऊळघाट बुर्हानपुराच्या दक्षिणेस ६५ मैलांवर व बुलढाणा जिल्ह्याच्या पश्चिम सरहद्दीपासून ५ मैलांवर आहे. मंगळूर हे तेथून ८५ मैलांवर आणि वऱ्हाडातील वाशीम शहराच्या ईशान्येस २० मैलांवर आहे

निजामुल्मुल्क हिजरी ११४९ जिल्हेज १७ ( ११३७ एप्रिल १७ ) रोजी बुर्हानपुराहून निघाला. नर्मदा ओलांडून तो सिरोंजच्या रोखाने वाट चालू लागला. भोपाळच्या दोस्त मुहम्मद-खानाचा मुलगा यार मुहम्मद आणि इतर स्थानिक पुढारी त्याला येऊन मिळाले. पिलाजी जाधव देखील निजामुल्मुल्कास येऊन मिळाला; आपली निष्ठा त्यास वाहिली असल्याचा देखावा त्याने केला व नंतर तो दख्खनमधील आपल्या घरी रवाना झाला. लवकरच उत्तरेचा प्रवास पुन्हा सुरू झाला. मधला दगदगीचा आणि रसद न मिळाल्यामुळे कटकटीचा झालेला प्रवास संपवून त्याचा तळ ग्वाल्हेरजवळ पडला. आग्रामार्गे निघून तो दिल्लीच्या आसपास लवकरच दाखल झाला. दिल्लीस तो हिजरी ११५० रबिलावल १५ ( १७३७ जुलै १२ ) रोजी पोहचला. ( अहवाल २४५ अ, मिरातुस्सफा ६३ अ. )

होडल या राजधानीपासून ५५ मैलांवर असलेल्या गावी वजीर कमरुद्दीनखान आपल्या सर्व मुघल फौजांनिशी सामोरा आला. निजामुल्मुल्क वयपरत्वे मोठा असल्यामुळे सर्व कुटुंबाचा प्रमुख म्हणूनच त्याचे स्थान जाणून वजीराचा जनानखानाही निजामुल्मुल्काच्या स्वागतार्थ त्याच्यासोबत आला होता. तेरा-चौदा वर्षांचा वियोग घडल्यावर निजामुल्मुल्काचा सर्वांत थोरला मुलगा गाझीउद्दीनखान फीरूझजंग याला आपल्या बापाच्या भेटीचा आनंद झाला होता. वजीराची सर्वांत थोरली मुलगी कमरुन्निसा बेगम हिच्याशी त्याचा नुकताच विवाह झाला होता. त्याने आपली सहचरी पत्नी, वडिलांच्या अभिवादनासाठी आणली होती. दुसऱ्या दिवसापासून मजल-दरमजल करीत राजधानीची वाटचाल सुरू झाली. वजीर व निजामुल्मुल्क एकाच हत्तीवर स्वार झाले होते. त्यांच्या मागे वजीराची मुलगी होती. आपल्या लग्नाचा सरंजाम म्हणून तिने आपल्या घरातून आणलेले वैभव आणि लवाजमा याचा दिमाख मिरवत ती चालली होती. तिची उस्तवारी करण्यासाठी एका वयाच्या ५०-६० तरुण दासी होत्या. त्या तुर्की, कल्माक, किरघिज वंशाच्या मुली होत्या. सोन्याची जर असलेली, मूल्यवान खडे बसविलेली वस्त्रे त्यांनी परिधान केली होती. या सर्वांच्यावर त्यांनी सोन्याचे काठ लावलेले जरतारी झगे घातले होते. डोक्यावर मखमलीचे किंवा जरीचे हातरूमाल बांधले होते. ते बांधण्यासाठी सोन्याच्या कड्या आणि सोन्याच्या साखळ्या होत्या. त्यांच्या चेहऱ्यावरच्या बुरख्याची जागा मोत्यांच्या माळांनी भरून टाकलेली होती. त्यामुळे त्यांचे चेहरे चांगले स्पष्ट दिसू शकत होते. या दासी घोड्यावर स्वार होऊन बेगमेच्या भोवती चालत होत्या. त्यांच्या हातात सोन्याच्या आणि चांदीच्या छड्या होत्या. त्यांच्या पाठीवर धनुष्यबाण लटकलेले दिसत होते. ( आशोब १२६ ब. )

बादशाहाने अगोदरच दिलेल्या स्पष्ट हुकूमानुसार निजामुल्मुल्क चौघडा वाजवीत व कूच करीत आला.[१६] थोड्या थोड्या अंतरावर या लवाजम्याला राजमहालातून पाठविलेले खोजे आणि हुजरे सामोरे येत होते. ते क्षेमकुशल विचारीत होते आणि बादशाहाची उत्कंठा दूर करण्यासाठी पाय झटपट उचलण्याचे निरोप देत होते. असा सन्मान केल्याबद्दल प्रत्युत्तर म्हणून निजाम आपल्या हत्तीला पुढचे गुडघे वाकवून मुजरा करावयास लावीत होता. रस्त्यामध्ये बघ्यांची इतकी गर्दी उसळली होती की वाट काढणे अवघड बनले होते. शहराच्या आतील भागात घरांच्या आणि दुकानांच्या छपरावर प्रेक्षकांची गर्दी झाली होती.

१६ दरबारच्या चालीरीतीनुसार बादशाहाच्या निवासस्थानापासून तीन मैलांच्या परिसरात कोणत्याही उमरावाला आपला चौघडा वाजविण्याची मनाई होती.

"मिठाईवाल्याच्या दुकानातील माशांपेक्षा जाडजूड" असलेले साधु-बैरागी नवाबाच्या हत्तीभोवती येत होते. त्याना दूर लोटण्यासाठी असलेल्या नवाबाच्या हुजऱ्याजवळच्या काठ्या आणि बांबू यांची त्यांना तमा वाटत नव्हती. त्याच्या हत्तीला मुंगीच्या चालीने चालण्याखेरीज गत्यंतर उरले नव्हते. किल्ल्याच्या दिल्ली दरवाजाजवळ पोहोचण्यास त्यांना मध्यान्ह झाली. तेथे निजामुल्मुल्क आपल्या नालकीत बसला. त्याची नालकी काहीशी जुनी पण भरड कापडाने घट्ट वेष्टिलेली होती. वजीराच्या नालकीला झालरी होत्या; तीवर मोती बसविलेले होते, नालकीवरच्या कापडी आच्छादनावर सोन्याची जर होती. आपल्या पुढे पाऊल-दोन पावले चालण्यास वजीराने निजामुल्मुल्कास अनुमती दिली. नगारखान्यापाशी ते खाली उतरले. हातात हात घेऊन डावी–उजवीकडे न पाहता, ते दिवाण-इ-आम मध्ये गेले. बादशाहासमोर येताच निजामुल्मुल्काने कुर्निसात केली, तेव्हा बादशाहाने मानाची वस्त्रे त्यास देऊन प्रत्युत्तराबद्दल सन्मान केला. त्याला दिलेली मानाची वस्त्रे खुद्द बादशाहाच्या वस्त्रागारातून मागविलेली होती. त्यात चारकूब नावाचे एक जाकीट होते. हे जाकीट तैमूरच्या वंशातून अवतरलेल्या चघताई कुळातील असामीच तेवढे परिधान करीत. आसफ जाह हा, प्रजेला धारण करण्यासाठी उपलब्ध असलेला सर्वोच्च किताब त्याला बहाल केला. आसफ जाह या किताबाचा अर्थ राजा सालोमन याचा वजीर आसफ याच्या प्रतिष्ठेचा-तोडीचा असा आहे. दिल्लीतील सादुल्लाहखान याने बांधविलेले निवासस्थान सर्वोत्कृष्ट होते. ते त्याच्या निवासाठी सज्ज केले. दिवस मावळण्याच्या सुमारास बादशाहाच्या मुदपाकखान्यातून खोजांच्या हाती खाद्यपदार्थांची ताटे आली. अशी ताटे रोज येणे पुढे रोज चालू राहिले. ( आशोब १२८अ. )

## ९५ : भोपाळला बाजीरावाने वेढलेला निजाम अवहेलनाकारक सलोखा करतो

यानंतर महिन्याभराने हिजरी ११५० रबिलारवर १७ ( १७३७ ऑगस्ट १३ ) रोजी नवाबाचा सर्वांत थोरला मुलगा गाझीउद्दीनखान फीरूझजंग याला राजा जयसिंग याच्या जागी आग्ऱ्याचा सुभेदार तसेच बाजीरावाच्या जागी माळव्याच्या सुभेदार म्हणून नेमणूक केली. निजामुल्मुल्काने जातीने माळव्यात मराठ्यांच्या विरुद्ध चालून जावे या अटीवर ही नेमणूक पत्रे दिली होती. इ. १७३७ चा पावसाळा संपल्यावर निजामुल्मुल्काने मोहीम सुरू केली. त्याच्या फौजेत तीस हजार शिपाई होते. त्याखेरीज तोफखान्याची एक माळच्या माळ होती. हा त्याचा तोफखाना भारतातील सर्वोत्कृष्ट तोफखाना समजत. आग्ऱ्यास मुहीउद्दीन कुलीखान याला नायब सुभेदार म्हणून मागे ठेवले. हा सादुल्लाहखान याचा पणतू होता. तसा तो निजामुल्मुल्काचा चुलत भाऊच लागत होता. चंबळ ओलांडून ग्वाल्हेरला जाणारा सरळ मार्ग न चोखाळण्याचा निर्णय झाला. दक्षिणेहून येत असताना या रस्त्यावर फार हाल-अपेष्टा सोसाव्या लागल्या होत्या. चंबळेच्या तीरावर दोन्ही बाजूला खोल खळ्या, कित्येक मैल अंतरापर्यंत पसरलेल्या आहेत. यांच्या तळात निसरडा चिखल तरी असतो किंवा तुंबलेले पाणी तरी असते. रस्त्याने एकावेळी एकाच माणसाला जाता येते. असे जाताना खूप अडचण वाटते ही गोष्ट वेगळीच. त्यामुळे सैन्याला एकामागे एक या प्रमाणे ओळीने जावे लागते. पिण्याच्या पाण्याची चणचणही फार जाणवते. वाटेत मधून-अधून लागणारी गावे म्हणजे अट्टल चोर आणि लुटारू यांची माहेर घरेच आहेत. हा मुलूख टाळण्यासाठी फौजेने आग्ऱ्याच्या खालच्या अंगाला यमुना ओलांडली आणि पूर्वेच्या रोखाने कूच केले. इटावा गावातून गुजरून; कालपी येथे यमुना आणखी एकदा ओलांडून, फौजा

बुंदेल्यांच्या मुलुखात शिरल्या. तेथे कित्येक बुंदेले राजे येऊन मिळाले. धामोणी आणि सिरोंज या मार्गाने वाट चालून, फौजा शेवटी माळव्यातील भूपाल तळ्यापाशी येऊन पोहोचल्या. नवाबाचा दुसरा मुलगा मीर अहमदखान (नासिरजंग) याला हुकूम पाठविला की त्याने बाजीरावास दख्खन सोडण्यास प्रतिबंध करावा. (खुशहाल १०८२, आशोब १३० ब, सुदाम याचे सुजान चरित्र अ. ४)

बाजीरावाचे कूच रोखण्याचा प्रयत्न अपेशी ठरला.[17] एक तर तसे करण्यास अवसर मिळाला नाही व दुसरे कारण नासिरजंगाचे मराठी साथीदार त्यापासून फुटून गेले. सेनापती यशवंतराव दाभाडे आणि त्याचे अधिकारी, तसेच नागपूरचा रघूजी भोसले फटकून राहिले. तरीदेखील ८० हजारांची फौज उभी करणे बाजीरावास शक्य झाले. या फौजेनिशी (नेमाड जिल्ह्यातील) पुनाशाह जवळ खरगोण येथे त्याने नर्मदा पार केली. त्यावेळी निजामुल्मुल्क सिरोंजेस होता. १७३७ डिसेंबरमध्ये भूपाळजवळ दोन्ही फौजा एकमेकांच्या संपर्कात आल्या. आपल्या शत्रूवर धीर करून चढाई करण्याऐवजी निजामुल्मुल्काने किल्ल्याच्या आसपासच्या भागात आपली मोर्चेबंदी केली. मागच्या बाजूला एक तळे तर पुढच्या बाजूला एक नाला अशा स्थितीत त्याने आपले ठाण मांडले. ही फाजिल सावधानता घातक ठरली. प्रतिपक्ष आपणास भारी आहे असे मराठ्यांना वाटत होते. पण आता मात्र त्यांनीच चढाईत पुढाकार घेण्याचे योजिले.[18] त्यांनी फौजेच्या अगदी काठापर्यंत लुटालट चालविली.

शाही पक्षातील एक तुकडी छावणीतून बाहेर पडली आणि लढाई देण्यासाठी ती, स्वतः ठरवून घेतलेल्या जागी रणांगणात उतरली. मराठेदेखील अगदी खुशीने त्याच्यावर मोठ्या तडफेने चालून आले. राणोजी शिंदे, पिलाजी जाधव आणि सयाजी गुजर हे त्याचे नेते होते. शाही पक्षाच्या बाजूचा बचाव मुख्यत्वेकरून राजपूत, बुंदेले आणि हाडा यांनी केला. राजपुतांची फौज आंबेरच्या राजा जयसिंगाची होती. तिचे नेतृत्व त्याच्या मुलाकडे होते. बुंदीचा हाडा राजा मात्र निजामुल्मुल्काला येऊन मिळालेला नव्हता. राजपुतांना आपली पाचशे माणसे आणि सातशे घोडे गमवावे लागले. मराठ्यांच्या पक्षात मुख्यत्वेकरून

१७ येथपासून या प्रकरणाच्या अखेरीपर्यंत फक्त ग्रँट डफला अनुसरून मजकूर लिहिला आहे. ग्रँट, डफची हकीकत ज्या मराठी अभ्याससामग्रीवर आधारलेली आहे ती अभ्याससामग्री ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र पत्रे ३३–३६, १३२ आणि १३४ येथे छापलेली आहेत. शिवाय पहा राजवाडे, खंड सहा. पत्र क्रमांक ११७. (जदुनाथ सरकार)

१८ बाजीराव लिहितो, "निजामाच्या फौजेने भूपाळच्या किल्ल्यात आसरा घेतला. मी रमजान ३ (२४ डिसेंबर १७३७) रोजी त्याच्यावर फौज धाडली. निजामासोबत सवाई जयसिंगाचा मुलगा, सभासिंग बुंदेला, खुद्द निजामाचा मुलगा गाझीउद्दीन, जाट, अहीर, रोहिले, राजपूत..........असे (सगळे मिळून) ५० हजार असामी होते. सआदतखानाचा पुतण्या आणि कोटयाचा राजा आणखी २० हजार फौजेनिशी त्याच्या मदतीस येण्यास निघालेले आहेत........" "निजाम हा मातब्बर अमीर आहे, त्याची फौज ३०–४० हजाराची आहे. हथनाळ, शुतरनाळ, बरकंदाज आणि रेहकळे यांनी ती सज्ज आहे, एवढे असूनही हा किल्ल्यात लपून बसला आहे! ही गोष्ट त्याला निश्चितच शोभादायक नाही" (जदुनाथ सरकार).

तोफखान्याच्या भडिमारामुळे शंभर माणसे ठार व तीनशे माणसे जखमी झाली.[19] लढाई चालू असताना बाजीराव निजामाच्या ठाण्यापासून दोन बाणांच्या अंतरावर उभा होता. तो ज्या मजबूत जागी उभा होता ती जागा त्याने सोडल्यास त्याला अलग पाडण्याची संधी मिळण्याची वाट पाहात तो थांबला होता. पण निजामाने त्याला तशी संधी दिली नाही. मात्र निजामाने आपल्या फौजा परत बोलावल्या.

या लढाईनंतर शाही पक्षाला अधिक कठोरपणे घेरण्यात आले. थोड्याच दिवसात दाणावैरण दुर्मिळ झाली, अयोध्येचा सुभेदार सआदतखान याचा पुतण्या सफदरजंग आणि कोटचाचा हाडा राजा हे वेढ्यात पडलेल्या फौजेच्या सहाय्यार्थ येत असता त्यांना वाटेत अडवून मल्हारराव होळकर आणि यशवंतराव पवार यांनी त्याचा पराभव केला. सफदरजंग याची पिछेहाट झाल्यावर निजामाची कोंडी आणखी कडक झाली. त्याची रसद पूर्णपणे तोडण्यात आली. रात्रंदिवस जागता पहारा ठेवण्यात आला. राजपूत मंडळी निजामुल्मुल्कास सोडून जाण्यास राजी झाली होती. पण त्याबाबत कसलेही बोलणे खपवून घेण्यास बाजीराव तयार नव्हता. कारण वेढ्यात अडकलेली माणसे जेवढी जास्त तेवढा आपणास लवकर विजय मिळणार असा त्याचा कयास होता.[20] आपल्याला अडचणींमध्ये निजामुल्मुल्काने स्वतःस कसे अडकवून घेतले असेल याचाच अचंबा बाजीरावाला वाटला. "निजामुल्मुल्क पोक्त आणि अनुभवी आहे, त्याने स्वतःला या अडचणीत कसे गुंतवून घेतले तेच मला समजत नाही. तमाम हिंदुस्थानच्या लोकांना वाटते आहे की, या मार्गाने तो स्वतःचा नाशच ओढवून घेईल.

हिंदुस्थान आणि दख्खन या दोन्ही ठिकाणाकडून मदत मागविण्यात आली. विशेष मदत येण्याची आशा हिंदुस्थानकडून करण्यास जागा नव्हती. निजामुल्मुल्कास अपयश आल्याने समसामुद्दौल्ह यास अगदी नाराज होण्याचे कारण नव्हते. मी जातीने कूच केल्याखेरीज, कसलेच कूच होणार नाही; या बादशहाच्या हुकूमाचा अर्थ जवळजवळ असाच होता की, कूच आता मुळी करावयाचेच नाही. दख्खनकडून मदत येईल अशी मोठी उमेद होती. म्हणून मोठी लगबग करण्याची निकड करणारे दूत त्या बाजूला धाडले. नवाबाचा मुलगा नासिरजंग याने हैदराबाद आणि औरंगाबाद या ठिकाणी गोळा करता येईल तेवढी फौज गोळा केली; फुलमार्डी या ठिकाणापर्यंत तो कूच करीत आला. इकडे बाजीरावाने राजा शाहूस मदतीसाठी आवाहन केले. राजा शाहूने सुरतेजवळ सोनगढ येथे असलेल्या आपल्या सेनापतीस निक्षून हुकूम पाठविला. बाजीरावाने नागपूरच्या रघूजी भोसल्याला कळकळीची विनंती

१९ बाजीराव लिहितो की, तो ही लढाई रमजान ३ ( ब्रह्मेंद्र. पत्र ३४ ) रोजी लढला. पण राजवाडे खंड सहा, क्रमांक ११७ मधील एका पत्रात रमजान ४ ( २५ डिसेंबर ) अशी सदर लढाईची तारीख दिली आहे. लढाईतील हानीबाबत बाजीराव लिहितो "राजपुतांनी दीडशे असामी ठार होऊन गमावले आम्ही पन्नास किंवा साठ गमावले तर दोनचारशे आमचे असामी जखमी झाले . . . . . . . निजामाच्या तोफखान्याचा भडिमार भलताच कडक होता." (क्रमांक ३३१, राजवाडे, खंड सहा, पत्र ११७) यामध्ये आणखी वेगळी हकीकत आहे; पण ती विश्वासार्ह नाही. ( जदुनाथ सरकार )

२० बाजीराव लिहितो, "निजाम भूपाल शहरी स्वतःभोवती खंदक खणून बसला आहे. त्याच्या छावणीत दुष्काळ आहे. तेथे धान्याचा भाव रुपयास ४ शेर झाला आहे त्याचे हत्ती आणि घोडे यांची चाऱ्याअभावी उपासमार होत आहे. राजपूत आणि निजाम याचा एकमेकांवर विश्वास राहिलेला नाही. राजपुतांना पळून जाता येत नाही. कारण त्यांनी आपले सामानसुमान शहरात ठेवलेले आहे . . . . . . . मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे आणि यशवंतराव पवार यांनी शाहजहानपूरचा फौजदार मीर मन्नूखान याचा सराई दुराहा या ठिकाणी पराभव करून त्याचे १,५०० असामी मारले आहेत. सदर मीर मन्नूखान निजामाच्या मदतीसाठी येत होता." ( क्रमांक ३३ ). ( जदुनाथ सरकार )

केली. पण त्याने प्रतिसाद दिला नाही. पेशव्याचा भाऊ चिमणाजी अप्पा याने मात्र तापी नदीच्या काठावर ठाण मांडले आणि औरंगाबादेकडून येणाऱ्या मुसलमानांशी दोन हात करण्यास तो सज्ज झाला. या दोन्ही फौजा लढू लागणार तोच निजामुल्मुल्काने बाजीरावा-बरोबर तह केला आहे अशी बातमी येऊन थडकली.

निजामुल्मुल्काने आपली जागा सोडण्याचा खटाटोप करून पाहिला. पण बरोबरचे सामानसुमान फार अवजड असल्यामुळे त्याला मूळ जागी परतणे भाग पडले. त्याने आपल्या फौजा तटबंदीच्या आत ढकलल्या. भूपालच्या मोर्चेबंदीच्या आतल्या जागेत या फौजांची खेचाखेच झाली. बाजीरावाजवळ तोफखाना नव्हता. पण त्याचे बाण आणि त्याच्या तोड्याच्या बंदुका यातून होणाऱ्या वर्षावामुळे मुघल फौजांनी एवढा मार खाल्ला की शेवटी बाजीरावाची फळी मोडून निघून जाण्याचा आणखी एक प्रयत्न करण्याचा निश्चय झाला. सामान-सुमान भूपाल आणि इस्लामगढ येथे ठेवले असल्यामुळे पायदळासोबतचा तोफखाना आणि उंटावरून वाहून नेलेल्या जेजाला यातून होणाऱ्या माऱ्याचे संरक्षण घेऊन फौजांचे माघार घेणे सुरू झाले. पण माघार घेणाऱ्या फौजा रोज जेमतेम तीन मैलांचे अंतर कसेबसे काटत होत्या व त्याना चोपण्याचे काम मराठ्यांनी चालूच ठेवलेले होते. पण अधूनमधून निजामा-कडून होणाऱ्या तोफांच्या भडिमारामुळे मराठ्यांचाही धीर खचू लागे. शेवटी निजामुल्मुल्काने तहाची भाषा काढली. हि. ११५० रमजान २६ ( १६ जानेवारी १७३८ ) रोजी दुराई ( दुराहा ) सराई या सिरोंजपासून ६४ मैलांवर असलेल्या ठिकाणी तहनाम्यावर सह्या झाल्या. स्वतःच्या हस्ताक्षराच्या तहनाम्यात निजामुल्मुल्काने वचन दिले की (१) बाजीरावास संपूर्ण माळवा मिळावा, (२) नर्मदा आणि चंबळ यामधील प्रदेशावर बाजीरावाचे संपूर्ण सार्वभौमत्व असेल, (३) यास बादशहाची मंजुरी मिळवून देईन आणि (४) बाजीरावाचा खर्च भागविण्यासाठी ५० लाख रुपये पैदा करण्याचा करता येईल तेवढा निकराचा प्रयत्न निजामुल्मुल्क करील.[२१] खुद्द नवाबाकडून बाजीरावास काहीसुद्धा घेता आले नाही. हातातून पैसा सोडण्यास निजाम किती नाराज असतो याचा नाहीतरी बाजीरावास तब्बल सहा वर्षांचा अनुभव होता. हि. ११५० जिल्हेज (एप्रिल १७३८ ) मध्ये निजामाने दिल्लीत पुन्हा प्रवेश केला. येथे नवाच धोका निर्माण झाला होता. इराणात नादिरशाह नावाचा नवा राजा आला होता. त्याचा हल्ला, या मोडकळीस आलेल्या मुघल साम्राज्यावर होण्याची भीती निर्माण होऊ लागली होती.

---

२१ बाजीराव लिहितो, मी निजामाशी रमजान ३ ( २४ डिसेंबर ) रोजी लढलो. नंतर त्याच्या फौजेत वेढा घातला. त्याच्या छावणीत दुष्काळाने थैमान घातले, चारा मिळेना तेव्हा त्याने ......तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी मला गाठले. ( लांबलचक वाटाघाटी ) ......रमजान १५ ( ५ जानेवारी १७३८) रोजी मी कूच करीत बाहेर पडलो आणि कोसभर अंतरावर थांबलो. नंतर निजाम बाहेर पडला आणि तळ्याच्या पलीकडे त्याची राहुटी पडली. दुसऱ्या दिवशी तो आपल्या तोफदळाचा भडिमार करीत भूपालला माघार घेत गेला. पण आम्ही मागे महम्मदखान बंगश याची केली होती तशी, निजामाची कोंडी त्यास अगदी भिडून केली." ( क्रमांक ३४ ) "आपले सामानसुमान थोडे भूपालमध्ये तर थोडे इस्लामगढमध्ये ठेवून आणि तहाची बोलणी चालू ठेवून तो रोज कोस दीडकोस निघून जात आहे. आमच्या फौजा त्याच्या-भोवती घिरट्या घालीत आहेत. त्याचे धान्य, त्याचा चारा आणि त्याचे जळण त्यास मिळणार नाही अशी आम्ही पूर्ण नाकेबंदी केली आहे. त्याच्या छावणीत तांदळाचा भाव रुपयास शेर झाला. आहे. एवढा दाम मोजूनदेखील, छावणीतील कित्येकांना तो मिळत नाही. त्याचे घोडे ........चा पाला खाऊन आहेत. रमजान २५ (१५ जानेवारी) रोजी त्याच्या मुसलमान फौजांनी तोफा खेचणारे बैल मारून खाल्ले. राजपुतांची चक्क उपासमार घडू लागली. मात्र त्याने तहाच्या अटी तावडतोब मान्य केल्या...... त्याचा प्रतिनिधी अयामल हा होता. "तद्नंतर वरील मजकुरात आलेल्या तहाच्या अटी पत्रात दिलेल्या आहेत. ( क्रमांक ३५ ) ( जदुनाथ सरकार )

प्रकरण अकरावे

# १७३८ इ. मधील भारतातील अंतर्गत परिस्थिती नादिरशाह याचा उदय व उत्कर्ष

## (मजकूर संपादकाचा)

### ९७ : मुघल उमरावशाहीचा ऱ्हास

नादिरशाहाच्या स्वारीमुळे मुघल साम्राज्याला, लुटालूट आणि साम्राज्याचे अवयवछेदन यामुळे उद्‌भवलेली बेअब्रू सोसावी लागली. पण नादिरशाहाची स्वारी हे मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाचे कारण नव्हते तर ते साम्राज्य ऱ्हासमान झाले आहे याचे एक सुस्पष्ट लक्षण होते. जी गोष्ट कितीतरी अगोदर घडून चुकली होती ती गोष्ट या इराणी विजेत्याने फक्त जगाला उघडी करून दाखविली. एक श्रृंगारलेले प्रेत म्हणजे खंदा माणूस होय असा प्रजेत भ्रम पसरला होता. तो भ्रमाचा भोपळा नादिरशाहाने फोडला.

अकबर आणि शाहजहान, मानसिंग आणि मीर जुम्लह यांचे येवढे महान कार्य लयास कसे गेले? औरंगजेबाने घडविलेले, भरभराटीस चढलेले असे वाटणारे हे साम्राज्य औरंगजेबाच्या मृत्यूनंतर अवघ्या ३१ वर्षांनी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कसे कोसळले? या ३१ वर्षांतील इतिहासाचा मागोवा घेतला तर आपल्याला पहिली कोणती गोष्ट दिसून येत असेल तर ती ही की उमरावशाहीचे चारित्र्य आणि सैन्याची कार्यदक्षता विस्मयकारकरीत्या लयास जाऊ लागली होती. यादवी युद्धांनी उडविलेला धुमाकूळ या परिस्थितीस थोडाफार कारणीभूत असावा. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर १३ वर्षांच्या काळात औरंगजेबाच्या वंशजामध्ये एकापाठोपाठ एक अशा सात[1] रक्तपाती लढाया झाल्या. त्यांमध्ये कित्येक शाहझादे, उमराव आणि लढवय्ये कामास आले. एकमेकांचे प्रतिस्पर्धी असलेल्या उमरावमंडळींमध्ये ज्या हत्यारी चकमकी झडल्या त्यांमुळेही अधिकारी आणि सैनिक यांचा तितकाच मोठा नाश झाला. उदाहरणार्थ, दख्खनमधील बादशाहाचा नायब म्हणून आपले पद पक्के करण्यासाठी निजामाला आपल्या तीन प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव करावा लागला होता. गुजरात सुभ्याची सुभेदारी हस्तगत करण्यासाठी तीन विनाशक चकमकी झडल्या; ज्यात शुजाअतखान आणि रुस्तमअलीखान ठार झाले आणि सरबुलंदखान पराभूत झाला.

मुघलांच्या आपापसातील मेळमिलाफात व्यत्यय आल्यामुळे जी काही हानी झाली तिच्या कितीतरी पट अधिक हानी शीख, जाट, बुंदेले आणि मराठे तसेच दोन प्रसंगी राठोड मंडळी यांविरुद्ध काढलेल्या मोहिमांमध्ये झाली. त्यामुळे लढवय्या उमराववर्गात जी काही पोकळी निर्माण झाली ती नैसर्गिक वारशाच्या पद्धतीने उमरावांच्या लायक वंशजाकडून भरून निघाली नाही. तसेच लायकीची व पुरेशा संख्येची माणसे सामान्यजनांतून उदयास येऊन अथवा अशा परदेशाहून मागविलेल्या माणसांची भरती करूनही, सदरची

१ बहादुरशाहाच्या दोन, जहांदारशाहाच्या तीन, फर्रुखसियरची एक आणि मुहम्मदशाहाची एक.

पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाही. मुघलांच्या इतिहासाचा सविवेक अभ्यास करणाऱ्याला उमरावक्र्गाच्या ऱ्हासाइतकी नजरेत भरणारी दुसरी कोणतीच ठळक गोष्ट वाटत नाही. एक पिढी मर्दुमकी गाजवते; पण ती आपण जन्माला घातलेले लायक वारस मागे ठेवण्यात अयशस्वी होते असे दिसून येते. अब्दुर्रहीम आणि महाबत, सादुल्लाह आणि मीर जुम्लह, इब्राहीम आणि इस्लामखान रूमी यांनी सतराव्या शतकातील भारताचा इतिहास घडविला. पण त्यांच्या मागे त्यांच्या मानाने निदान निम्मी तरी मर्दुमकी गाजविणारे त्यांचे मुलगे वा त्यांचे नातू निघाले नाहीत. मुघल उमरावक्र्गाचा जाडजूड चरित्रकोश वाचताना ( मासिरुल्-उमरा याचे प्रत्येकी नऊशे पृष्ठांचे तीन खंड आहेत ) वाचकांच्या नजरेस, पुढील पद्धतीच्या नोंदी वारंवार येतात : "हा उमराव ( येथे सेनापती किंवा वजीर अशा अव्वल मनसबदाराचे नाव दिलेले असते ) अमुक अमुक वर्षी मरण पावला. त्याच्या मागे त्याचे दोन मुलगे होते; पण त्यांचा विशेष उत्कर्ष झाला नाही; " किंवा, "त्याला तीन मुलगे होते; पण त्यांपैकी एकानेही येथे नोंद व्हावी येवढचा लायकीचे कर्तृत्व दाखविले नाही." घराण्याच्या संस्थापकांच्या जीवनवृत्तान्ताने चरित्रकोशाची आठ-दहा पृष्ठे व्यापलेली असतात; पण त्याच्या मुलाच्या कामगिरीची नोंद अर्ध्या पृष्ठातच संपुष्टात येते; त्याच्या नातवाचा नुसता उल्लेखच होतो; तोदेखील त्याने त्या कुळात जन्मण्याची मर्दुमकी गाजविण्याच्या आधारेच असतो.

सबंध मुघल अमलामध्ये मुलकी प्रशासनासाठी आणि युद्धासाठी भरती केलेले उत्तमोत्तम मुसलमान हे एक तर सामान्यपणे परदेशाहून नशीब काढण्यासाठी आलेले मुसलमान असत किंवा बाटून मुसलमान झालेले हिंदू असत. परदेशी मुसलमानांचे दमदार बीज भारतीय भूमीवर फारच लौकर फिके पडले. एतद्देशीय मुसलमान समाज आणि परदेशाहून आलेला, पण या देशात कायमचे वास्तव्य केलेला मुसलमान समाज, यामधून नवे रक्त येईनासे झाल्यानंतर साम्राज्याचे जीवन टिकविण्याची मदार बुखारा आणि खुरासान, इराण आणि अरबस्तान येथून होणाऱ्या लायक असामींच्या आवकप्रवाहावर पडली. पण ही आवक थांबली तेव्हा, एखाद्या वृक्षाचा जीवनरस तोडल्यावर तो वृक्ष जसा वठू लागतो त्याप्रमाणे, साम्राज्याला उतरती कळा लागली.

## ९८ : हिंदू आणि शिया लोकांना जाणवणारा परकेपणा

उपर्युलिखित धोका उद्‌भवू नये म्हणून सावधानता बाळगण्याचा प्रयास अक्‌बराने केला होता. त्यासाठी त्याने लष्करी राजेशाहीचे एका राष्ट्रराज्यात रूपान्तर केले. हे रूपांतर संविधानात्मक नव्हते, असे फार तर म्हणता येईल. आपल्या भाडोत्री, विदेशी फौजांच्या मागे हिंदूंच्या लढवय्या जमाती उभ्या करण्याचा व अशा प्रकारे आपल्या तख्ताच्या रक्षणासाठी अधिक इमानी अशी दुसरी फळी उभी करण्याचा प्रयत्न अक्‌बराने केला. त्याच्या आणि त्याच्या उत्तराधिकाऱ्यांच्या आधिपत्याखाली हिंदू, राजपूत योद्ध्यांनी पश्चिमेस ऑक्सस ( अमू-इ-दर्या ) नदीच्या किनाऱ्यापर्यंत आणि हेल्मंदपर्यंत तर पूर्वेला ब्रह्मपुत्रा व कर्णफुलीपर्यंत मुघलांचे निशाण मिरविले. खैबर खिंडीची रखवाली त्यांनी केली. आहोम लोकांची हल्ला झाला असता गढगाव यशस्वीपणे लढविले आणि ब्रह्मी लोकांकडून चितगाव बादली छापा घालून हिसकावले. पण औरंगजेबाच्या कृत्यांमुळे राजपूत वंशियांना मुसलमानांविषयी नुसता परकेपणाचा भाव वाटू लागला असे नाही तर भारतातील इतर हिंदू जमातींना

याची मनोमन खात्री पटली की, या मुघल साम्राज्यात आपला कसलाच भाग नाही; किंवा आपल्याला कसलाच कार्यभाग नाही; त्याना असेही वाटले की आत्मसन्मान आणि विवेकस्वातंत्र्य या आपल्या मूल्यांचे जतन होण्यासाठी आता आपण अन्यत्र आसरा शोधला पाहिजे. औरंगजेबाने आपला वृद्ध राजपूत चाकर जसवंतसिंग मृत्यू पावल्यावर त्याचे जोधपूरचे राज्य खालसा करायचा चंग बांधला; त्याने मेवाडवर स्वारी केली. हिंदूंची देवळे त्याने अहर्निशपणे फोडली. घृणास्पद असा जझिय्या कर हिंदू जमातीवर अगदी कडकपणे लादला. औरंगजेबाची ही कृत्ये हिंदूंना मुसलमानी साम्राज्याविषयी परकेपणा वाटू लागण्यास कारणीभूत ठरली. मराठ्यांनी या संधीचा लाभ उचलला. मुसलमानी राज्याविषयी वाटणाऱ्या परकेपणाची भाषा औरंगजेबाचे हिंदू अधिकारी व हिंदू मांडलीक यांच्या मनात पक्की रुजलेली होती. म्हणून औरंगजेबाने शिवाजी व त्याचे वारस यांशी युद्धे खेळण्याचा डाव मांडला. तेव्हा या हिंदू मंडळींनी उदासीनपणा दाखविला. औरंगजेबाच्या या हेतूस त्यांनी गुप्तपणे शहदेखील दिला. येथपर्यंत राजपूत आणि बुंदेले लोक मुघल साम्राज्याचे कणखर आधारस्तंभ होते. पण त्यांना आता मराठे सेनानायक स्वर्गातून अवतरलेल्या प्रेषितांसारखे वाटू लागले. राम रावणाचा किंवा कृष्ण कंसाचा वध करतो त्याप्रमाणे, मराठे मुसलमानांचा काटा काढीत आहेत असे त्यांना वाटले. भूषण या हिंदू कवीने शिवाजीवर केलेल्या काव्यात ही भावना ओतप्रत भरल्याचे दिसते. सबंध भारतभर असलेल्या कोट्यवधी हिंदूंच्या मूक विचारांना तो हळूवारपणे पण दमदारपणे वाचाच फोडत आहे यात शंका नाही. सतराव्या शतकाच्या अखेरीस मुघल साम्राज्य म्हणजे सैतानशाही आहे असे हिंदू मानू लागले होते व या साम्राज्याशी सहकार्य करण्यास ते मनातून नकार देऊ लागले होते.

हिंदूंच्या उपर्युल्लेखित भावनेला आवाहन करून पहिल्या बाजीरावाने माळव्यात सहज शिरकाव करून घेतला; नंतर त्या सुभ्यावरील आपली पकड घट्ट केली. त्याने स्थानिक हिंदू सरदार तसेच जवळच्या जयपूर आणि मेवाड येथील राजपूत यांची एकजूट करून त्यांना मराठ्यांच्या पक्षात ओढले. आपल्या सर्वांचा धर्म एकच असून, मुसलमान आपला छळ करीत आहेत, सबब आपणा सर्वांची युती झाली पाहिजे असे बाजीरावाचे आवाहन होते. ही गोष्ट सवाई जयसिंगाने इंदूरचा चौधरी नंदलाल मंडलोई यास पाठविलेल्या पत्रात स्पष्टपणे प्रत्ययास येते. नंदलाल मंडलोई याने मराठ्यांशी संगनमत करून कपटाने आपल्या धन्याच्या फौजेची भयंकर कत्तल घडवून आणली होती (ऑक्टोबर १७३४). त्या निमित्त सवाई जयसिंग त्याला पत्रात लिहितो, "तुम्हास धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच. तुम्ही माझ्या शब्दावर पुरा भरोसा ठेवून आणि आपला धर्म राखण्यासाठी माळव्यात मुसलमानांचा नाश केला आणि तेथे धर्माची प्रतिष्ठापना केली. माझ्या अंतराची इच्छा तुम्ही सफल केली." (सरदेसाई, खंड दोन, ३६९.)

औरंगजेबाच्या मृत्युनंतर अवघ्या ३१ वर्षांच्या काळात औरंगजेबाच्या उत्तराधिकाऱ्यांनी शीख, जाट, बुंदेल, राठोड, कच्छवाह आणि सिसोदिये यांशी एकापेक्षा अधिक वेळा युद्धे केली. त्यामुळे लष्करीदृष्ट्या महत्त्वाची अशी एकही हिंदू जमात बादशहाच्या बाजूस उरली नाही. शिवाय मराठे ही एक चिघळलेली जखम होती. त्याद्वारे साम्राज्याचा रक्तस्राव होत जाऊन अखेर हळूहळू साम्राज्याचा आकारदेखील लहान झाला. इमानी मांडलीक म्हणून राहाण्याचे हिंदूंनी उत्तरकालीन मुघलांच्या काळात थांबविले. एवढेच नव्हे तर मुघलांशी उघड शत्रुत्व पत्करले. त्यामुळे परकीय आक्रमणाचा धोका निर्माण झाला असताना देखील बादशहाला या हिंदू शत्रूंच्या विरुद्ध मोठमोठ्या फौजा पाठवून गुंतून पडावे लागले.

इस्लामी धर्मियांमध्ये इराणातून येणारे मुसलमान अतिशय कुशाग्र आहेत. पण उर्वरित मुसलमान धर्मियांपासून ते वेगळे पडले आहेत. कारण प्रेषितांच्या जावयास खिलाफतमध्ये वंशपरंपरेचा हक्क आहे असा त्यांचा समज आहे. त्यांची शियापंथीय अशी ही श्रद्धा म्हणजे ऊर्वरित अतिबहुसंख्य मुसलमानांच्या दृष्टीने पाखंडमत आहे. उत्तर हिंदुस्थानातील बहुतेक सगळ्या मुसलमानांनाही असेच वाटते; कारण ते सुन्नी पंथाचे आहेत. उदारमतवादी अकबर, ख्याली-खुशातील मग्न असलेला जहांगीर, अतिखानदानी शाहजहान यांनी आपल्या छावण्यांत व दरबारांत शियापंथी मुसलमानांचे स्वागत केले; त्यांना कारभारात विशेषत: दप्तरखान्यात आणि महसूलखात्यात उच्च पदे दिली. त्यांनी या खात्यामध्ये आपले बुद्धिवैभव अगदी सहजगत्या दाखविले होते. पण सनातनी औरंगजेबाने मात्र, एक आवश्यक आपत्ती म्हणून त्यांना कसेबसे खपवून घेतले. त्याच्या राजवटीत शियापंथी मुसलमानांना जाणवले की, औरंगजेबास आपण नकोसे वाटतो. औरंगजेबाला शियापंथियांविषयी जो आकस वाटे, त्याविषयी कित्येक ठळक दाखले त्याच्या हमीदुद्दीखान या मर्जीतल्या आसामीने संग्रहित केलेल्या पत्रांमध्ये आणि आख्यायिकांमध्ये[२] पाहावयास मिळतात. सदरच्या पाखंडमताचे सामान्यजनांना तर अतिशय वावडे होते. एकमेव शियागुणवाचक विशेषण लावून खुत्बा पढण्याविषयी बहादुरशाहाने केलेल्या प्रस्तावातून लाहोरला १७१२ इ. स. मध्ये दंगल उद्‌भवली. तद्‌नंतर काही वर्षांनी काश्मीरच्या राजधानीजवळच्या हसनाबाद या ठिकाणी अडीच हजार शियापंथी मुसलमानांची कत्तल सुन्नीपंथी मुसलमानांनी केली. (खाफीखान, खंड दोन, पृ. ८७०.) अशा प्रकारे, इराणातून मुलुखगिरीसाठी आलेल्या महत्त्वाकांक्षी आणि गुणी शियापंथी मुसलमानांना, पूर्वी जेथे गुणांना वाव मिळून सर्वोच्च जीवनमार्ग उपलब्ध होत असे त्या, हिंदुस्थानचे दरवाजे बंद झाले आहेत असे वाटले.

## ९९ : उत्तरकालीन मुघलांचे कमकुवत व्यक्तिमत्व

मुघल उमरावर्गाचा ऱ्हास घडून आला याचे मुख्य कारण म्हणजे बादशाहाच्या व्यक्तिमत्वाचा झालेला ऱ्हास. सार्वभौम बादशाहाचे पहिले कर्तव्य हे की, त्याने योग्य चाकर निवडावे, त्यांच्या प्रशासकीय उमेदवारीच्या काळात त्यांना शिक्षण द्यावे, त्यांच्या कामाचे पर्यवेक्षण करावे व अशा प्रकारे त्यांना अनुभव देऊन त्यांच्या विकासास अवसर द्यावा. आपल्या खासगी पत्रात औरंगजेब पुष्कळदा अशी तक्रार करताना आढळतो की, अकबर आणि शाहजहान यांच्या वैभवशाली कारकिर्दीशी तुलना करता, माझ्या अमदानीत लायक अमलदारांची चणचण भासत आहे. अज्ञ नायाबी-इ-आदम-इ-कार आह ! आह ! पण नावाजलेला वजीर सादुल्लाहखान याचे खुद्द औरंगजेबाने उद्‌धृत केलेले व सहमती दर्शविलेले पुढील उद्‌गार म्हणजे असल्या वादास मिळालेले योग्य व चपखल प्रत्युत्तर आहे. "समर्थ असामींचा तुटवडा कोणत्याही काळात नसतो. शहाण्या धन्यांचे काम आहे की, त्यांनी अशा समर्थ माणसांना हुडकून काढले पाहिजे, त्यांना वश करून घेतले पाहिजे व त्यांच्यामार्फत कामाचा उठाव केला पाहिजे; असे करताना अशा समर्थ माणसांच्या विरुद्ध जी स्वार्थी माणसे कुभांडखोरपणा दाखवितात, त्यांकडे पूर्ण दुर्लक्ष केले पाहिजे". ( रुक्आत-इ-आलमगीरी, क्र. ४६.)

२ अहकाम-इ-आलमगीरी, संपादक आणि भाषांतरकार जदुनाथ सरकार, विभाग चार.

खरे पाहाता, बादशाहांची व्यक्तिमत्वे खालावत गेली, हेच उमरावबर्गाच्या स्वभाव-विशेषांचा ऱ्हास होऊन साम्राज्याचे अधःपतन झाले याचे मुख्य कारण धरले पाहिजे. औरंगजेबाची संशयी दक्षता आणि त्याच्या उत्तराधिकाऱ्यांनी बाळगलेले अतोनात पितृवात्सल्य यामुळे शाहझादे मंडळी दरबारीच राहिली; आणि त्यांची सुभ्यांवर पाठवणी झाली तरी, कारभाराच्या बाबतीत त्यांची बादशाहाकडून भलतीच पाठराखण झाली. १८ व्या शतकात, दिल्लीच्या तख्ताचे वारस अगदी असहाय्य बनले; ते परावलंबीही झाले. त्यांच्याजवळ स्वतःचा स्वतंत्र विचार उरला नव्हता, जबाबदारी पेलताना आवश्यक असलेली निर्भयता तसेच निर्णय करणे आणि तत्परतेने कृती करणे यासाठी लागणारी क्षमता त्यांच्याजवळ उरली नव्हती. त्यांची बुद्धी आणि त्यांचे चैतन्य यावर मळभ चढले. यातून सुटका करून घेण्यासाठी, अंतःपुरातील स्त्रिया, विदूषक आणि भाट यांच्या संगतीत त्यांना विरंगुळा वाटू लागला. असे शाहझादे तख्तावर बसले तेव्हा, ते जर शहाणे असते तर, सर्व राज्यकारभार त्यांनी कर्तबगार वजीरांच्या हाती सोपविला असता. असे होते तर इतर बड्या उमरावांचा वजीराबद्दलचा खोटा मत्सराग्नी भडकला असता. शिवाय, असे शाहझादे मूर्ख असत. एखाद्या अतिशय कर्तबगार वजीरावर वर्चस्व संपादण्यासाठी ते कारस्थाने रचीत व पर्यायाने स्वतःला दुसऱ्या कोणाच्या अधीन करून घेत.

असले रेमेडोके व सुस्त बादशाह आपल्या मुलखावर जातीने राज्यकारभार करू शकत नाहीत आणि त्यांनी तो करूही नये. तरीदेखील अशा बादशाहाला योग्य माणसाची निवड वजीरपदासाठी करावी हे सुचत नसे. अशा योग्य वजीरास विश्वासपात्र करावे व त्यास हातचे न राखता पाठबळ द्यावे ही गोष्ट त्यांना सुचत नसे. खोजे मंडळी व भाट मंडळी कानास लागली की विचलित होण्याइतका बादशाह हलक्या कानाचा असे व जुन्या चाकरीतील वजीर व सुभेदार यांना, त्यांजकडून आणखी द्रव्य संपादण्याच्या लोभापायी किंवा त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांकडून अधिक खुशामतयुक्त चाकरी मिळावी या आशेपायी, कामावरून काढून टाकण्याचे आदेश तो देई.

शेवटी, उमरावांना कळून चुकले की हा जीवनमार्ग स्वीकारण्यास गुणी माणसांना वाव उरलेला नाही; इमानीपणे उपयुक्त चाकरी बजावली तरी लहरीपणाने केव्हा चाकरी जाईल अथवा पदावनती होईल याचा नेम उरलेला नाही; आपली मालमत्ता आणि आपल्या परिवाराची अब्रू नेहमीच सुरक्षित राहील याची खात्री उरलेली नाही; स्वतःची सुरक्षितता टिकेल व उत्कर्ष होईल याची आशा दाखविणारी ही एकच गोष्ट उरली होती व ती म्हणजे स्वतंत्र असल्याचा दावा करणे आणि सुभ्यामध्ये स्वतःची आनुवंशिकता स्थापन करणे शिवाय हा मार्ग सुभ्यातील आम जनतेच्या दृष्टीने भला मार्ग ठरत होता. एखाद्या स्वतंत्र स्थानिक घराण्याच्या छत्राखाली शांतता व सुबत्ता यांचा आस्वाद घेता येणे त्यांना शक्य होते. दूरवर असलेल्या शाही दरबारातून त्यांच्यावर सत्ता गाजविण्यासाठी शासक पाठविणे ही प्रक्रिया चालू होती तोपर्यंत, उगविलेल्या प्रत्येक दिवशी नवा असामी लाडका बनण्याची तो सुभेदारीची भीक मागण्याची अथवा सुभेदारी विकत घेण्याची शक्यता असे; आपले नेमणूकपत्र बरोबर घेऊन सुभ्यास येण्याची शक्यता असे व आपल्या पूर्वाधिकाऱ्यास हुसकून लावण्याचा त्याचा खटाटोप होण्याची शक्यता असे. असले प्रयत्न यशस्वी ठरोत अथवा अयशस्वी ठरोत; त्या सर्वांचा एकच परिणाम उद्‌भवे व तो म्हणजे युद्ध. युद्धे, युद्धाविषयी अफवा, लुटालूट, महसूल आखडून घेणे, रस्ते बंद होणे अशा घटनांनी सुभा व्यापून जाई. मुहम्मदशाहाच्या कारकिर्दीतील गुजरातचा इतिहास ही गोष्ट अगदी रेखीवपणे चित्रित करतो.

## १०० : दरबारातील गटबाजी आणि तिचे परिणाम

नादिरशाहाने भारतावर स्वारी केली तेव्हा साम्राज्याचे सर्वोच्च उमराव तिघेजण होते. ते म्हणजे आसफ जाह, निजामुल्मुक (वकील–इ–मुत्लल्क म्हणजे नायब बादशाह) इतिमादुद्दौल्ह कम्रुद्दीनखान (वजीर म्हणजे मुख्य प्रधान) आणि ख्वाजा असीम किताब समसामुद्दौल्ह खान दौरान (अमिरुल्–उमरा आणि बक्षी उल्–ममालिक म्हणजे सेनापती). सुभेदार मंडळींमध्ये सर्वोच्चपदी (जर आपण निजामास तसेच जवळजवळ स्वतंत्र असलेल्या बंगालच्या सुभेदारास वगळले तर) अयोध्येचा सुभेदार सआदतखान बुर्हानुल्मुल्क हा होता; त्यास दरबारच्या वजीरपदासाठी अगदी महत्त्वाचा उमेदवार म्हणून समजत. यांपैकी खान दौरान याला आपण सोडून देऊ; कारण तो नुसता गालिचा-वरचा सरदार किंवा दरबारी भाट होता. कसलीच कारभारविषयक क्षमता त्याच्याजवळ नव्हती किंवा अनुभवही नव्हता. निजाम समर्कंद या ठिकाणी जन्मला होता. पोरवयाचा असताना आपले नशीब अजमावण्यासाठी तो हिंदुस्थानात मुघल निशाणाखाली आला होता. याचा चुलतभाऊ कम्रुद्दीनखान या वजीराची देखील गोष्ट अशीच होती. सआदतखान हा खुरासान या मूळ गावचा होता. अठराव्या शतकाच्या सुरुवातीस नशीब अजमावण्याच्या मोहिमेवर तो हिंदुस्थानात आला होता. या मंडळींच्या ठायी, भारताविषयीचे राष्ट्रप्रेम नव्हते. कारण हिंदुस्थान ही त्यांची पितृभूमी नव्हती. या देशात त्यांचे पणास लागले आहे असे काहीच नव्हते. या देशाचा गतेतिहास, या देशाच्या परंपरा, या देशाची संस्कृती अथवा या तख्ताविषयी पिढीजाद इमान यांपैकी कशामध्येच त्यांचा वाटा नव्हता. मुघल बादशाह हा केवळ त्यांचा वेतनदाता होता. या वेतनदात्याच्या शत्रूशी अधिक चांगले संधान बांधता आले वा तह करता आला तर तो देशाविषयी वाटणाऱ्या भावनिक प्रेमापायी झिडकारून टाकण्याइतकेच ते मूर्ख नव्हते. आपली संशयातीत गुणसंपदा प्रदर्शित करता यावी व त्याद्वारे मोबदल्याच्या रूपाने संपदा साठवावी; हा आपला हेतू साध्य करण्यासाठी हिंदुस्थानची भूमी अत्युत्तम आहे येवढ्याच संकुचित दृष्टीने ते भारतभूमीकडे पाहात होते. भारताच्या भूमीत त्यांची पाळेमुळे रूजली ती त्यांच्या पाठीमागून आलेल्या पिढ्यांच्या काळात.

जेव्हा बादशाह ऐदी किंवा मूर्ख असे तेव्हा धनीपण गाजविणे आणि उमराव वर्गाला मार्गदर्शन करणे त्याला अशक्य असे. अशावेळी दरबारात अथवा सुभ्यांच्या ठिकाणी जी कोणती नियंत्रणसत्ता असे तिला संतुष्ट करण्याचा प्रयत्न हा उमराव वर्ग करी. या स्वार्थमय सामन्यात उमराव वर्गात गट पडत. प्रत्येक गट आपल्या उमरावांचा उत्कर्ष कसा होईल आणि आपल्याविरुद्ध गटातील उमरावांच्या यशाला पायबंद कसा बसेल याच्या खटाटोपात असे. उत्तरकालीन मुघलांच्या दरबारांत दिल्ली दरबार तुराणी (किंवा मध्य आशियायी) आणि हिंदुस्थानी गटात विभागलेला राहिला.[३] हे दोन्ही गट मुसलमानांनी बनलेले होते. पैकी हिंदुस्थानी गटाची बाजू हिंदू राजे उचलून धरत असत. प्रत्येक गट बादशाहाच्या कानांत दुसऱ्या गटाविषयी विष ओती; दुसऱ्या गटाचे मनसुबे उधळून लावी; त्यातील असंतुष्ट चाकरांना चिथावणी देई आणि दरबारापासून दूर असताना

३ अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात ही विभागणी इराणी (फार्सी शिया) आणि तुराणी (सुन्नी) नामक गटांमध्ये होती.

अशा गटाविरुद्ध सक्रिया वैरभाव दर्शविण्यात गुंते. साम्राज्याचे सगळे हत्यारी सामर्थ्य वापरून प्रतिकार केला तरी बंडखोरांना नमविणे अशक्य होई, बंडखोर मंडळी शाही पक्षातील गुप्त पाठीराख्यांवर नेहमीच विसंबून असत; निदान शाही दरबारात अथवा शाही छावणीत लुटूपुटीचा विरोध करणाऱ्या पण प्रत्यक्ष तटस्थ असलेल्या उमरावावर ते विसंबून असत.

उमराववर्गाच्या नैतिक अधःपतनाबरोबरच नोकरशाहीच्या आणि खरे म्हणजे तमाम शासकवर्गाच्या अकलेचेही दिवाळे वाजले होते. अकबराच्या काळात राष्ट्रीय प्रगतीच्या एखाद्या सुविहित आणि धिम्या कार्यक्रमाचा पाठपुरावा होई. तशी स्थिती आता राहिली नाही. दूरदर्शी नेता उरला नाही. देशाला नव्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाची शिकवणूक देणारा, या पृथ्वीतलावर नवा स्वर्ग वसविण्याच्या आकांक्षा जागृत करणारा कोणी राजकीय महात्मा निर्माण झाला नाही. त्यावेळचे सगळेच असामी आपल्या पूर्वजांच्या शहाणपणाचे कौतुक करण्यात वाहवत गेले. त्यांना या कौतुकाचीच ग्लानी आली. अलीकडच्या काळातील खालावत चाललेल्या अव्यवस्थेबद्दलची आपली बेचैनी ते व्यक्त करीत.

मुघल साम्राज्याचे उद्दिष्ट मुळी केवळ लष्करी शासनाचे होते. त्यामुळे या साम्राज्याला आपले लष्करी कर्तव्य जेव्हा पार पाडता येईनासे झाले, अंतर्गत सुव्यवस्था त्याला राखता येईना आणि शांततेला असणारा बाह्य शत्रूपासूनचा धोका निवारता येईना तेव्हा या साम्राज्याच्या अस्तित्वास असलेले एकच एक समर्थन संपुष्टात आले. आजवर सगळ्या देशाचे जीवनसूत्र दरबाराने आपल्या हाती ठेवले होते. पण जेव्हा कोणाची तरी प्यादी असलेली माणसे तख्तावर बसू लागली, तेव्हा आमजनतेला एकत्र ठेवणारे बंध तुटू लागले. आम जनतेच्या आशा आकांक्षा आणि त्यांचे यत्न यांचा समन्वय साधणारी यंत्रणा विघटित होऊ लागली. शासनाचे कार्यच खुंटले. अनागोंदीची नांदी चालू लागली.

नादिरशाहाच्या स्वारीच्या जरा अगोदर जाटांनी अवलंबिलेल्या लुटालुटीमुळे राजधानीच्या आसपासचे रस्ते असुरक्षित झाले होते. व्यापार आणि वाहतूक यांतही त्यामुळे व्यत्यय आला होता. आरंभी-आरंभी अगदी नियमितपणे होणाऱ्या मराठ्यांच्या दरसालच्या स्वाऱ्यांमुळे, तसेच गुजराथ, माळवा आणि बुंदेलखंड या मुघल साम्राज्याच्या सीमेवरील सुभ्यांत त्यांनी नंतरच्या काळात कायमचे पाय रोवल्यामुळे, साम्राज्याचा झालेला रक्तस्राव साम्राज्य मृत्यूपंथास लागण्यास कारणीभूत झाला. मराठ्यांनी केलेली जुलूमजबरदस्तीची वसुली व विध्वंस यांचा प्रत्यक्ष परिणाम येवढ्या एकाच कारणामुळे संपत्तीचे उत्पादन थांबले असे नाही तर मालमत्तेबाबतची अशा प्रकारे असुरक्षितता निर्माण झाली असता काटकसरीपणा आणि उद्योगीपणा या गुणांना प्रोत्साहन न राहून, अशा अप्रत्यक्ष मार्गानेही संपत्तीचे उत्पादन थंडावले.

वारंवार होणाऱ्या यादवी स्वरूपाच्या चकमकी मग त्या शाहझादे आणि उमराव यांमधल्या असोत किंवा शासन आणि बंडखोर प्रजा यामधल्या असोत; त्यामुळे कर भरणाऱ्या जनतेमध्ये असुरक्षिततेची भावना पसरली. शेतसाऱ्याच्या महसुलावर सरकारची सगळी मदार असे. पण शेतकरी आता शेतसारा स्वतःजवळच दाबून ठेवू लागले; तर कनिष्ठ महसूल अधिकारी जमलेल्या महसुलाचा भरणा करण्याचे टाळू लागले. अशा यादवी

चकमकीमध्ये जो विजयी ठरे त्याद्वारे थकबाकीत गेलेली प्रजा आणि सार्वजनिक पैशाचा अपहार करणारे तहसिलदार चिरडले जाण्याची ते आपले घर आणि चीजवस्तू यांपासून हुसकले जाण्याची शक्यता असे. पण असे करण्याने, असे करणारा स्वतःचाच नाश ओढवून घेई; कारण असे करण्याने त्याचा प्राप्तीचा एकमेव मार्ग संपुष्टात येई. विजेत्याच्या अशा प्रकारच्या कृत्यामुळे केवळ वाटणामाऱ्या करणाऱ्या बेघर, भटक्या, बेदरकार, पुंड लोकांची संख्या तेवढी फुगे आणि मशागतीखालील क्षेत्र मात्र कमी होई.

या देशावर निसर्गाची कृपा भरगच्च आहे. इथल्या समशीतोष्ण हवामानामुळे तसेच लोकांच्या सवयी मिताहारविहारी असल्यामुळे देखील मानवी गरजा कमी आहेत. या सर्वांच्या एकत्रित परिणामामुळे १६ व्या आणि १७ व्या शतकात देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वृद्धींगत झाले. "राष्ट्रीय संचयात प्रतिवर्षी पडणारी भर", शेवटी अर्थात व्यापारी आणि महसूल ठेकेदार यांनी स्वतःकडे ठेवलेला त्यातील छोटा भाग वगळता, शासक वर्गाच्या हाती जाऊन पडली. भारताची संपत्ती ही इतर देशांच्या मत्सराची व विस्मयाची बाब होती. पण राष्ट्राच्या कार्यदक्ष संरक्षण व्यवस्थेवर, तसेच आमजनतेची बुद्धिमत्ता आणि चारित्र्य यांत सुधारणा घडवून आणण्यासाठी सार्वजनिक शिक्षणाची विवेकी व्यवस्था निर्मिण्याच्या कामावर, सदर राष्ट्रीय संपत्तीतील काही भाग खर्च करण्याचे भान मुघल दरबाराला किंवा मुघल उमराववर्गाला राहिले नाही. उलट आपला दुबळेपणा घातकी बनविण्यास तसेच परकीय आक्रमकाला यशाची ग्वाही आणि प्रचंड लुटीची शाश्वती देऊन आक्रमणाचा मोह त्याला पाडण्यास, त्यांची संपत्ती कारणीभूत ठरली.

जे शासन स्वगृही सुव्यवस्था राखू शकत नाही त्या शासनाला विदेशात मानमरातब मिळणे आणखी असंभाव्य आहे. मध्यवर्ती शासन कमकुवत बनलेले आहे याची तत्काळ जाणीव सीमेवरील सुभ्यांना झाली. माळवा आणि अफगाणिस्तान या सुभ्यांमध्ये पुरेशा बळासह पहारा नव्हता. मराठ्यांनी माळवा व्यापल्यानंतर दिल्ली शहर मराठ्यांच्या शस्त्रांच्या माऱ्याच्या टप्प्यात आले. इ. १७३७ मध्ये बाजीरावाने राजधानीची मानहानी केली, राजधानीच्या उपनगरात लुटालूट जाळपोळ केली. इतके नव्हे तर एवढे सर्व करून तो कसलीही इजा न होता आपल्या तळावर सुखरूप पोहचला. अशाच प्रकारे अफगाणिस्तान मधील बंदोबस्त पार थंडावल्यामुळे, नादिरशाहाची हिंदुस्थानावर स्वारी घडली.

## १०१ : सफवी राजवंशाचा ऱ्हास होतो आणि अफगाण इराण बळकावतात

इराणमधील सफवी राजवंशाची स्थापना शाह इस्माईल याने १६ व्या शतकाच्या आरंभी केली. त्याने इराणमधील परकीय अमल तसेच शिरजोरीने वागणाऱ्या भटक्या टोळ्यांबरोबर होणारी युद्धे संपुष्टात आणली. राजांच्या या नव्या मालिकेबरोबर इराणात शांततासुबत्ता नांदू लागली; इराणचा प्रदेशही विस्तारला. या अगोदरचे शासक, इराणमधील आम-जनता पाळत असलेला धर्म म्हणजे पाखंडमत आहे असे समजून जनतेचा धार्मिक छळ करीत असत. आता जनतेचा धर्म हा राज्याचा धर्म बनला. संपत्ती वाढली, त्याबरोबर सुसंस्कृतपणाही वाढला. जगातील कीर्तीमान् आणि स्वतंत्र राजेशाही म्हणून मान्यता पावून, इराणने आपला जुना लौकिक पुन्हा संपादन केला. पण मुस्लिम जगताचा विचार करता तुर्कस्थान व हिंदुस्थान यांच्या दृष्टीने इराण हा एक प्रतिस्पर्धी ठरला.

मूळ संस्थापक राजानंतर जवळजवळ दीडशे वर्षे शहाणेसुरते लढवय्ये आणि कार्यमग्न राजे एकापाठोपाठ एक आल्यामुळे इराणचे वैभव आणि इराणची शक्ती टिकून राहिली. पण १७ व्या शतकाच्या मध्यापासून राजांच्या चारित्र्याला लागलेल्या निरंतरच्या ओहोटीमुळे या राजेशाहीचा ऱ्हास अटळ बनला. सर जॉन माल्कम या इतिहासकाराच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, थोर बादशाह अब्बास (इ. १६५७) याच्या मृत्यूनंतरच्या शतकभराच्या काळात इराणी तख्तावर बसलेली मंडळी म्हणजे "कमकुवत, क्रूर आणि दुर्व्यसनी राजांची मालिका होती............कनिष्ठ थरावरील असामी दिवसेंदिवस युयुत्सु वृत्तीपासून परावृत्त होऊ लागले आणि........राज्याचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी उरले नाही.........या राष्ट्राने पूर्वी संपादलेल्या लौकिकाच्या आधारावर राष्ट्राचे अस्तित्व टिकून राहू शकले असे फार तर म्हणता येईल." (हिस्टरी ऑफ पर्शिया, दुसरी आवृत्ती, खंड एक, पृ. ३७९.)

सफवी वंशातील शेवटचा राजा शाह हुसैन याने इ. १६९४ पासून इ. १७२२ पर्यंत राज्य केले. त्याच्या अंगी कोणतेही दुर्गुण नव्हते हे खरे, पण लीनता आणि धर्मवेडेपणा या बाबतीत त्याने अगदी आत्यंतिक टोक गाठून, आपल्या दुराचारी पूर्वाधिकाऱ्यांनी केलेल्या हानीपेक्षा अधिक हानी घडवून आणली. आपल्या सर्व कारभाराची सूत्रे त्याने मुल्ला-मौलवींच्या हाती सोपविली; अशा प्रकारे लढवय्या आणि पदाधिकारी उमराववर्गाला त्याने इतरांपासून अलग पाडले. राजाचा विवेक जागृत ठेवणाऱ्यांच्या सल्ल्यावरून, राजाने सूफी तत्त्ववेत्त्यांची इस्लामी धर्मातील पाखंडी अशी संभावना करून त्यांचा छळ आरंभिला. त्यांची देशाबाहेर हकालपट्टी केली. त्यामुळे देशातील बुद्धिवंतवर्गाचा संताप त्याने ओढविला. पण त्याच्या मातब्बर पूर्वजांच्या प्रतिष्ठेने राज्याला एवढी गती दिली होती की सदर राज्य पुढे आणखी २० वर्षे चालू राहिले.

शेवटी १८ व्या शतकाच्या आरंभी ही राजवट विसर्जित झाली; तीदेखील या राज्याच्या अफगाण प्रजेच्या हातूनच. पहिल्या अब्बासाने १७ व्या शतकाच्या आरंभी कंदाहार जिंकल्यापासून दक्षिण अफगाणिस्तान हा इराणचा एक प्रांत बनला होता. गिलझाई आणि अब्दाली टोळ्यांच्या रहिवासाचे ते ठिकाण होते. इराणच्या आरंभीच्या काळातील शाहांच्या धूर्त व मुत्सद्देगिरीच्या निर्णयामुळे इराणी साम्राज्यातील या टोळ्यांच्या लोकांना टोळ्यांच्याच कायदे कानूखाली आणि टोळ्यांच्याच न्यायपद्धतीखाली राहू दिले होते. अफगाण लोकांचा शिरजोर स्वभाव, त्यांच्या मुलखातील उजाडपणा, भारत आणि इराण या प्रतिस्पर्धी राजवटींच्या मुलखादरम्यानच्या वादग्रस्त प्रदेशात असलेले त्यांचे स्थान या गोष्टीमुळे या मंडळींना स्थानिक स्वरूपाचे बरेचसे स्वातंत्र्य मिळविणे शक्य झाले होते. मध्यवर्ती शासनाला निष्ठा वाहण्याच्या कामी त्यांची ढिलाई असे. आपली मर्जी होईल तेव्हाच ते या मध्यवर्ती शासनावर अवलंबून राहात. कंदाहार या ठिकाणी गुर्गीनखान हा इराणी सुभेदार नव्याने आला असताना १७०८ मध्ये अफगाण लोकांच्या असंतोषाचा स्फोट झाला. गुर्गीनखान हा मूळचा आर्मेनियन वंशाचा व धर्मांतर करून मुसलमान झालेला होता. त्याने कंदाहार येथे धसमुसळेपणाने अधिकार गाजविण्याचा प्रयत्न केल्याने सदरचा स्फोट झाला. मीर वईस याच्या पुढारीपणाखाली गिलझाई टोळीने उठाव केला. त्यांनी सुभेदाराला ठार मारले. कंदाहार ताब्यात घेतले आणि तेथे आपला स्वतःचाच अंमल स्थापन केला.

उठावात यशस्वी झालेल्या मीर वईस याचा मुलगा महमूद याने इ. १७१७ मध्ये कंदाहारच्या तख्तावर आरोहण केले. इराणचा हतबल राजा आणि प्रजा यांची लुटालूट करण्यासाठी तो आपल्या टोळीस घेऊन तिकडे चालून गेला. या प्रकारात सफवी साम्राज्याचे तुकडे तुकडे झाले. साम्राज्याची राजधानी असलेले इस्फहान महमूदाने काबीज केले. तेव्हा १७२२ ऑक्टोबर २१ रोजी शाह हुसैन सफवी याने आपल्या वडिलार्जित तख्ताचा परित्याग केला. अशा रीतीने इराण मधील अफगाणी अमलास आरंभ झाला.

महमुदानंतर त्याचा उत्तराधिकारी म्हणून त्याचा चुलत भाऊ अश्रफ इ. १७२५ मध्ये तख्तावर आला. पण विजेत्या पक्षाला नवे धोके जाणवू लागले. कंदाहारचा ताबा महमूदाच्या भावाकडे होता. त्यास किल्यातून हुसकावून लावणे अश्रफला शक्य झाले नाही. अशा प्रकारे, दोन दूरच्या ठिकाणांवर दोन राजे राज्य करू लागले. अशा स्थितीत, गिलझाई टोळीचे विभाजन झाले. सिस्तान येथील सुभेदाराने जवळजवळ सगळा खुरासानचा प्रदेश आपल्या मुलखास जोडला व आपले स्वातंत्र्य उद्घोषित केले. तरीपण अश्रफ याचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे पदच्युत झालेल्या शाह हुसैन याचा मुलगा मिर्झा तहमास्प हा होय. त्याने राजेपणाचे बिरुद स्वतःच लावून घेतले होते आणि माझिन्दरान या सुभ्यामध्ये तो आपली सत्ता स्थापन करण्याच्या खटाटोपात होता. हा शाहझादा मूर्ख, वायल्या आणि दुराचारी असा युवक होता. आपला वारसा आपल्याच प्रयत्नाने पुन्हा हस्तगत करण्याची त्याची कुवत नव्हती. त्याला आता नादिर कुली नावाचा असा एक असामी येऊन मिळाला की जो तत्कालीन आशियातील एक सर्वश्रेष्ठ योद्धा होता. (माल्कम, खंड एक, ४०१–४६५.)

## १०२ : नादिर इराणची मुक्तता करतो आणि स्वतः राजा बनतो

नादिर कुली हा इमाम कुलीचा मुलगा. इमाम कुली एक गरीब तुर्की गृहस्थ होता. तो अवशार टोळीतला होता. ही टोळी दीर्घ काळापासून खुरासानमध्ये स्थायिक झालेली होती. मेंढ्यांच्या कातड्यापासून कोट, टोप्या बनवून इमाम कुली आपले पोट भरी. नादिरचा जन्म १६८८ साली झाला. बालपणी त्यास फार हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. उपासमारदेखील सोसावी लागली. यामुळे त्याच्या असामान्य धैर्याला आणि उत्साहशक्तीला खतपाणीच मिळाले. त्याला उझबेक लुटारूंनी तार्तरी येथे पळवून नेले व तेथील तुरुंगात ४ वर्षे डांबले. घरी परतून आल्यावर त्याने काही किरकोळ सरदारांच्या पदरी चाकरी केली. शेवटी त्याने दरोडेखोराचे जिणे पत्करले. त्याचे अनुयायी देखील त्याच्याचप्रमाणे राकट आणि धाडसी होते. अफगाणांनी इराण बळकावला, तेव्हा शासनाला लागलेल्या ग्रहणाचा काळ, असे जीवन सीमेवरील अनियंत्रित अशा खुरासान या प्रांतात सुरक्षिततेने व अतिशय लाभदायकरीत्या पत्करण्यास, त्यास अनुकूल ठरला. कलात या ठिकाणी सुभेदार असलेल्या आपल्या स्वतःच्या चुलत्याचा खून करून त्याने कलातचा किल्ला ताब्यात घेतला. अशा प्रकारे त्याला जे बळ प्राप्त झाले त्याचा वापर करून त्याने खुरासानच्या अफगाण शासकांचा पराभव करून नैशापूर शहर आणि आसपासचा प्रदेश प्राप्त करून घेतला. त्याने मिळविलेला हा विजय राष्ट्रहितकारक होता. या विजयामुळे राजा शाह तहमास्प या विधियुक्त राजाकडून त्याचे स्वागत होण्याची शाश्वती निर्माण झाली. सदर शाह तहमास्प याच्या चाकरीत तो इ. १७२७ मध्ये शिरला. (माल्कम, खंड दोन, २–५, मा. उ. खंड ए, ८२३).

नादिरच्या लौकिकामुळे त्याच्या पक्षात उत्तम लढवय्ये भरती झाले. इराणवरील परकीयांचे जू भिरकावून देण्यासाठी होणाऱ्या राष्ट्रीय प्रयत्नांचा तो केंद्रबिंदू बनला. युद्ध आणि राजनीती या क्षेत्रात विहारणारी त्याची प्रतिभा आणि त्याच्या हाती केंद्रित झालेली सत्ता यामुळे त्याला अखंडपणे व अविलंबाने यश मिळत गेले. इराण अफगाणांच्या हातून पुन्हा सोडवून घेतला. रणांगणावर झालेल्या कत्तली नंतर आणि कोपलेल्या शेतकरी-वर्गाच्या हातून ठार झाल्यानंतर युद्धातले फारच थोडे अफगाण आपल्या मुलखास परत पोहचू शकले. इराणच्या दुःखी प्रजेला अफगाण वर्चस्वाचा सात वर्षांचा काळ भयाकुल स्थितीचा गेला. "या सात वर्षांच्या काळात सुमारे १० लाख लोक प्राणास मुकले होते; देशाच्या सुपीक प्रांतांची वैराण वाळवंटे बनली होती; देशाला अभिमानास्पद असलेल्या इमले-इमारती जमीनदोस्त झाल्या होत्या; हे सर्व अशा शत्रूने घडवून आणले होते की, ज्याच्याजवळ संपादलेला विजय टिकविण्यासाठी लागणारे बळही नव्हते आणि शहाणपणही नव्हते." (माल्कम, खंड एक, ४७२) इराणची राष्ट्र म्हणून मुक्तता करण्याची कर्तबगारी एकट्या नादिरशाहाची होती. त्यामुळे नादिरविषयीच्या जनतेच्या उत्साहाला सीमा राहिली नाही. आपली कृतज्ञता दर्शविण्यासाठी राजाने आपले अर्धे राज्य, उंची रत्ने जडविलेला राजमुकुट आणि स्वतःच्या नावे नाणे पाडण्याचा अधिकार नादिरला दिला.

पण पूर्वेकडील प्रांतात नादिर असता राजाने पश्चिमेच्या बाजूस अविवेकीपणाने मोहिमा नेल्या. त्या बाजूला नादिराने जे काही पदरात पाडून घेतले होते ते सगळे घालविले व अपमानास्पद असा शांतता तह केला. त्यामुळे देशभर संतापाची लाट उसळली. शाह तहमास्प याला सर्वाधिकारीपदावर राहू दिले तर अलीकडच्या काळात आपण जी कामगिरी बजावली ती सगळी धुळीस मिळेल आणि इराण पुन्हा दास्यात अडकून पडेल असे सैन्यातील अधिकाऱ्यांना वाटले. राजमुकुट धारण करा असा एकमुखी आग्रह या अधिकाऱ्यांनी नादिरला केला. (आनंदराम, ३४; माल्कम, खंड दोन, ८–११ पृ.). पण तहमास्प १७३२ ऑगस्ट २६ रोजी पदच्युत झाला तरी त्याचा सेनापती त्याच्या तख्तावर बसण्याचे धाडस करीत नव्हता. तहमास्प याच्या ८ महिन्यांच्या अब्बास नावाच्या तान्ह्यामुलाची राजा म्हणून द्वाही फिरवून, नादिर हा राजाचे संपूर्ण अधिकार असलेला त्याचा प्रतिनिधी बनला. ४ वर्षांनंतर हे मूल मरण पावले. तेव्हा १७३६ फेब्रुवारी २६ रोजी नादिर राजा बनला. त्याचे किताब शहनूशाह नादिरशाह असे होते.

त्याने आर्मेनिया आणि जॉर्जिया बळाच्या जोरावर तुर्कीकडून हिसकावून घेतले. रशियाबरोबर तह करून घालविलेला प्रांत परत मिळविला. बहरीन बेट अरबांच्या हातून घेऊन आपल्या अमलाखाली पुन्हा आणले. शुस्तर डोंगरावर राहून लुटमारीचा जीवनमार्ग स्वीकारलेल्या बख्तियारी टोळीचा पाडाव करून तीमधील लोकांना आपल्या फौजेत भरती करून घेतले. अशाप्रकारे त्यांच्या जवळच्या शक्तीला उपयुक्त वाट करून दिली आणि शांततेचा भंग करण्यापासून त्यांना परावृत्त केले. (माल्कम, खंड दोन, ११–१८).

शेवटी इ. १७३७ च्या आरंभी नादिरशाहाने ८० हजार लोकांनिशी कंदाहारवर चढाई केली. कंदाहार हे अफगाणांच्या स्वायत्ततेचे एक केंद्र बनलेले होते. ते केंद्र जोपर्यंत उध्वस्त होत नाही तोपर्यंत इराणच्या सुरक्षितेला दहशत होती आणि खुरासान

प्रांतांची शांतता आणि सुबत्ता उध्वस्त होण्याची कायम भीती होती. शिवाय कंदाहार जिंकावयाचे बाकी राहिले तर सफवी राजांचा परिपूर्ण वारसा कब्जात आला असे म्हणता येत नव्हते. कंदाहारचा किल्ला मुघल साम्राज्यावर चढाई करण्याच्या वाटेवर होता. सात शतकांपूर्वी गझनीच्या महमूदाने जसे केले त्याप्रमाणे यालाही आपल्या विदेशातील विजयमोहिमेत सहाय्य करण्यासाठी अफगाणांना आपल्या झेंड्याखाली चाकरीत घेण्याची इच्छा होती.

इराण बळकावून राजा बनलेल्या महमूद याचा धाकटा भाऊ असलेल्या हुसैनच्या ताब्यात या वेळी कंदाहार होते. जुने[४] कंदाहार एका पर्वतश्रेणीच्या पूर्व-उतारावर, आजच्या आधुनिक शहराच्या पश्चिमेस दोन मैलांवर वसलेले होते. या किल्ल्यांची तटबंदी अगदी अभेद्य होती आणि शिबंदीने किल्ला लढविण्याची जय्यत तयारी केली होती. इराणी फौजेने १७३७ मार्च ३० रोजी कंदाहारला वेढा घातला. पण वेढा चांगला वर्षभर रेंगाळून किल्ला सर होण्यास[५] १७३८ मार्च १२ ही तारीख उजाडली. विजयी वीराने किल्ला आणि शहर उध्वस्त केले. या शहराच्या परिसरात त्याने नवे शहर वसविले. तेथे सुभेदार आणि सैनिक यांच्या निवासाची व्यवस्था केली. त्याच्या नावावरून या नव्या शहराला नादिराबाद असे नाव दिले. पण आता ते नवे कंदाहार या नावानेच ओळखतात. पराभूत झालेल्या अफगाण टोळीवाल्यांना त्याने दयाळूपणाने वागविले. पकडलेल्या सर्व सैनिकांना त्याने मुक्त केले. टोळीच्या प्रमुख शासकांना त्याने वर्षासन नेमून दिले. आपल्या फौजेत या टोळीवाल्यांना भरती करून घेतले. गिलझाई मंडळींना खुरासना (अब्दाली मंडळींचे पूर्वीचे मूळस्थान) मधील नैशाबूर वगैरे ठिकाणी वसविले; तर अब्दाली टोळीप्रमुखांना कंदाहार गिरिश्क, बिश्त आणि जमीन-दावर वगैरे दक्षिण अफगाणिस्थान-मधील ठिकाणी सुभेदार म्हणून नेमले. अशा प्रकारे आपल्या पूर्वीच्या शत्रूंना आपल्या चाकरीत घेऊन त्यांना कार्यमग्न करून ठेवले. आपण शत्रू असलो तरी दयाळू आहोत आणि चाकरांना उदारपणे वागविणारे धनी आहोत अशा प्रकारचा आपला लौकिक निर्माण करून त्याद्वारे अफगाणीस्थानातील इतर किल्ले आपल्या हवाली करू देण्याचा मोह त्याने निर्माण केला. मध्य आशिया आणि हिंदुस्थान येथे विजय-मोहिमा काढण्याचे आयोजन त्याने केले. त्यासाठी या मोहिमांचे तळमळीचे पाठीराखे म्हणून अफगाण शिपाई आपल्या झेंड्याखाली गोळा व्हावेत म्हणूनही त्याने लालूच निर्माण केली. (जहानकुशा ३११–३२८; माल्कम, खंड दोन, २०; आनंदराम ६–८.)

कंदाहारचा पाडाव झाल्यावर आता पाळी मुघल साम्राज्यावर येऊन ठेपली. युद्ध पुकारण्यासाठी त्याने अगदी मजबूत समर्थन तयार केले. आपण हिंदुस्थानावर केलेली स्वारी म्हणजे स्वैराचारी आक्रमण आणि लुटालूट यांचे ते एक कृत्य आहे अशी निंदा तटस्थ राष्ट्रांनी आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांची बूज राखणाऱ्यांनी करू नये अशाच पद्धतीने त्याने आपली पावले उचलली. नादिर हा केवळ शिपाईगडी नव्हता. रानटी

४ किल्ला आणि त्याची तटबंदी याच्या वर्णनासाठी पहा, जदुनाथ सरकारकृत हिस्टरी ऑफ औरंगजेब, खंड एक, १४०–१४३.

५ आनंदराम पृ. ७ वर सांगतो की किल्ला कपटाने सर झाला.

बाजारबुणग्यांचा रानटी पुढारी असा तो नव्हता; उलट तो जसा तलवारबहादूर होता त्याप्रमाणे राजनीती व राज्यशासनव्यवहार यांमध्ये देखील निपुण होता. त्याच्या युद्धातील सेनापतीत्वात जशी भव्यता होती त्याप्रमाणे त्याच्या राजनीतीमध्येही गहनता होती. रणांगणात विजय मिळाल्यावर पराजित पक्षांविषयी त्याने शहाणपणाचे धोरण ठेवलेले होते.

## १०३ : इराणी सरकार आणि मुघल साम्राज्य यांतील राजनैतिक बिघाडाची कारणे

हतबल झालेल्या दिल्ली दरबाराची इराणविषयक वर्तणूक राजनैतिक रीतीभाती आणि शिष्टाचार यांच्या उल्लंघनांनी भरलेली आहे. या वर्तणुकीत एक प्रकारचा मित्रत्वविहीन दुरावादेखील अगदी स्पष्टपणे दिसतो. मागे कित्येक पिढ्यांपासून हिंदुस्थानचे मुघल बादशाह आणि इराणचे सफवीशाह यांमध्ये वकील, नजराणे आणि राजनैतिक शिष्टाचार यांची देवाणघेवाण होत आली होती. शाहजहानाकडून बळाच्या जोरावर कंदाहार हिसकावून घेतल्यानंतर आणि मुघल फौजेविरुद्ध चार मोहिमा काढून त्यांशी लढून झाल्यावरदेखील दुसऱ्या अब्बासनेही राजनैतिक देवाणघेवाणची प्रथा चालू ठेवली होती. तख्तावर नवा बादशाह विराजमान होई त्या प्रत्येक वेळी एक दरबार दुसऱ्या दरबाराला अभिनंदनाची औपचारिक पत्रे पाठवी. पण या रीतीभातीचे विस्मरण होऊ मुहम्मदशाहाने, दुसरा शाह तहमास्प याने त्याचे राज्य बळकावणाऱ्या अफगाणाला उलथवून आपले पिढीजात तख्त परत हस्तगत केले तेव्हा, त्यास अभिनंदनपर पत्र पाठविण्यात कुचराई केली. इतकेच नव्हे तर भित्रेपणापायी शांतताप्रिय बनलेल्या दिल्ली सरकारने मीर वईस आणि त्याचा मुलगा हुसैन (कंदाहार बळकावणारा) यांशी, त्यांने मुघलांच्या मुलतान या सुभ्यावर छापे घातले असतानाही आणि शाही साम्राज्यातील मुलुखाचा विध्वंस केला असतानाही मित्रत्वाचे संबंध ठेवले होते.

कंदाहारच्या अफगाणांच्या विरुद्ध लवकरच चढाईमोहिम काढण्यात येणार आहे.[६] तेव्हा त्यातून निसटलेले अफगाण मुघल साम्राज्यात येऊ नयेत म्हणून काबूलच्या सुभेदारास बादशहाने हुकूम करावा अशी विनंती करण्यासाठी, नादिरशाहाने, अफगाणांना इराणांतून हाकलून दिल्यानंतर, अली मर्दानखान शामलू यास, आपला हिंदुस्थानातील वकील म्हणून पाठविले होते. तशाच स्वरूपाच्या सूचना मी जारी केल्या आहेत आणि सदर काम पार पाडता यावे म्हणून काबूल येथे फौजफाटा पाठवत आहे अशा आशयाचे उत्तर मुहम्मदशाहाने धाडले होते.

तद्नंतर काही दिवसांनी, नादिराने, तशीच विनंती करण्यासाठी, मुहम्मद अलीखान नामक दुसऱ्या एका राजदूताला पाठविले. दिल्ली सरकारनेही पूर्वीसारखेच उत्तर त्यास धाडले. इ. १७३७ च्या आरंभी इराण्यांनी कंदाहारला वेढा टाकल्यानंतर स्थानिक अफगाण उत्तरेस मुघल अफगाणिस्थानाकडे पळून जाऊ लागले; तेव्हा माघार घेणाऱ्या गिलझाईचा रस्ता रोखण्यासाठी इराण मुघल सरहद्दीवरील उलंग मुरघा या कलात भागातील

६ अली हजीन म्हणतो की इस्फहान परत काबीज केल्यानंतर दुसरा शाह तहमास्प याने आपल्या एका उमरावास दूत म्हणून हिंदुस्थानास धाडले व त्याच्याकरवी गिलझाई लोकाना मुघल प्रदेशाबाहेर ठेवावे अशी मुहम्मदशाहास विनंती केली. अशाच प्रकारचा संदेश अत्यल्पवयी तिसरा अब्बास तख्तावर बसला त्यावेळीही पाठविला होता. पण जहानकुशा, पृ. ३३१ वर सुचवितो की, या दोन्ही वकिलाती नादिरने पाठविल्या होत्या.

आपल्या शेवटच्या पहारा चौकीवर नादिरने फौज धाडली. या फौजतुकडीने सगळा मुलुख, कलातचे डोंगर संपेपर्यंतचा भाग उध्वस्त केला. त्यानी हजार एक गिलझाई ठार केले. बरीच खंडणी व लूट जमविली आणि कित्येकांना जिवंत पकडले. या टोळीतील बाकीचे असामी मुघल प्रदेशात गझनी आणि काबूलच्या रोखाने पळाले. कारण त्यांना थोपाविण्यासाठी तेथे सरहद्दीवर कोणी मुघल अमलदार हजर नव्हते. इराणी सेनानींना सरहद्द ओलांडण्याचा हुकूम मिळाला नाही म्हणून ते तेथेच थांबले आणि घडलेली हकीकत त्यांनी आपल्या धन्याला कळविली. तेव्हा १७३७ इ. च्या एप्रिलच्या ३० तारखेला नादिरशाहाने मुहम्मदखान तुर्कोमन नामक तिसऱ्या राजदूतास सिंधच्या मार्गाने भारतात पाठविले आणि बादशाहाने दिलेल्या वचनाचा भंग का केला याचा खुलासा विचारण्यास त्याला सांगितले. हिंदुस्थानात ४० पेक्षा जास्त दिवस खर्च न करता, तेवढया अवधीत उत्तर आणण्याची कामगिरी या राजदूतावर, त्याने हुकूम करून सोपविली. पण दिल्ली दरबार या राजदूताला उत्तर देत नव्हता व परतून जाण्याची परवानगीही देत नव्हता. या अनास्थेच्या धोरणाचे वर्णन आली हजीन याने पुढीलप्रमाणे केले आहे. "राजदूत शाहाजानाबाद येथे आला तेव्हा आल्यावर लगेच, त्याने पत्र दरबारास सादर केले. त्याला थांबण्यास सांगितले पण उत्तराबाबत मात्र त्यांनी मौन पाळले. कधी या पत्रास उत्तर तरी धाडावे काय या समस्येबद्दल त्या सर्वांमध्ये एकमत होऊ शकत नव्हते, तर कधी नादिरशाह यास उद्देशून कोणते किताब घालावे याविषयी त्यांच्या मनात गोंधळ दिसत होता........राजदूताला खोळंबून ठेवणे ही राज्याच्या धोरणाचीच एक झलक आहे असे समजून ते काय घडते याची वाट पाहात थांबले. कदाचित कंदाहार येथे वेढयात अडकून पडलेल्या हुसैन अफगाण यानेच नादिरशाहाविरुद्ध विजय संपादन केला आणि नादिरशाहाला जिवे मारले किंवा त्यास पळवून लावले तर या पत्राला तद्नंतर उत्तर लिहिण्याची गरजच उरणार नाही अशी त्यांनी समजूत करून घेतली होती."

अशा प्रकारे वर्षभराचा कालावधी लोटला. नंतर कंदाहारचा पाडाव करून नादिरशाहाने हिंदुस्थानातील आपल्या वकिलाला तावडतोब परतून येण्याबाबत लिहिले. पत्रव्यवहार आणि चर्चा या पलीकडचा टप्पा घटनाक्रमाने आता गाठलेला होता. [ जहानकुशा, ३३१, ३३२; बेलफोरकृत अली हजीन, २८१–२८७ ( ज्याचा मोवम गोषवारा सियर खंड एक, ९३–९४ येथे आढळतो ) ].

## १०४ : अफगाणिस्तान आणि पंजाब याच्याकडे झालेले दुर्लक्ष आणि त्यांची संरक्षणविहीन अवस्था

या ठिकाणी घटनाक्रमाचे विवरण थांबवून मुघल साम्राज्याच्या वायव्य सरहद्दीवर असलेल्या सुभ्यांची स्थिती कशी होती हे पाहाणे आवश्यक आहे. बाबराच्या वंशजांना अफगाणिस्तान म्हणजे एक संकटमय कब्जा आणि कमकुवतपणाचे एक उगमस्थान असेच वाटत होते. तरी सदर देश व्यापून राहाण्यात आणि भारतातून या देशात जाणाऱ्या खिंडी रहदारीस खुल्या ठेवण्यात त्याना यश आले होते. सुरुवातीस मुघल बादशाह काबूलला वारंवार भेट देत. पण औरंगजेबाच्या प्रदीर्घ कारकिर्दीत तेथील शाही सत्ता कमालीची धोक्यात आली. प्रथम पेशावरचा युसुफझाई याने इ. १६६७ मध्ये आणि नंतर खैबरच्या आफ्रीदी मंडळींनी इ. १६७२ मध्ये जोरदार बंड केले. तद्नंतर दिल्लीतील शासकांच्याविरुद्ध

संपूर्ण दायव्य प्रांतातील पठाण लोकांनी केलेल्या उठावामुळे परिस्थिती आणखी चिघळली. म्हणून ती काबूत आणण्यासाठी या टोळीवाल्यांविरुद्ध बादशाहाला स्वतः जातीने चढाई करून जावे लागले व या मोहिमेसाठी संपूर्ण साम्राज्याची साधनसामग्री एकत्र करावी लागली होती. तरीही औरंगजेबाला मर्यादित यश पदरी घेऊनच सरहद्दीहून मागे फिरावे लागले. यासाठी त्याची दोन वर्षे खर्ची पडली होती व तद्नंतरही जो काही सलोखा त्याच्या पदरी पडला त्यासाठीही सरहद्दीवरील अफगाणांना भरगच्च लाच चारण्याचे कृत्य करावे लागले ( १६७६ इ. ) त्याच्या पुढच्या वर्षी अमीरखान[७] यास काबूलच्या सुभेदारपदी नेमले. हा अमीरखान काबूलच्या सुभेदारपदी तब्बल २१ वर्षे राहिला. आपल्या कार्यकाळात त्याने नजरेत भरेल असे सामर्थ्य दाखविले व यश संपादिले. या सुभेदाराला जी प्रशासकीय मर्दुमकी गाजविता येऊ शकली याचे कारण त्याचे मुत्सद्देगिरीचे व्यवहार, त्याचे व्यावहारिक कौशल्य, शाही फौजेत डोंगरी असामींची भरती करून घेण्याच्याद्वारे त्यांना उपयुक्त कार्यात मग्न ठेवण्याचे त्याचे धोरण आणि खिडीच्या जवळपास वास्तव्य करणाऱ्या टोळीवाल्या असामींना नियमितपणे शाही बक्षिसी अदा करणे शक्य होईल इतक्या चातुर्याने आणि काटकसरीने त्याने खजिन्याची लावलेली व्यवस्था ही आहेत असे औरंगजेब सांगतो.

१६९८ इ. मध्ये अमीरखान मरण पावल्यानंतर त्याच्या मागे कोणी लायक उत्तराधिकारी आला नाही. काही काळ अस्थिर शांतता नांदल्यावर जुने धामधुमीचे दिवस पुन्हा उगवू लागले. पण १६९९ इ. पासून १७०७ इ. मधील आपल्या वडिलांच्या मृत्यूपर्यंत शाह आलम याने या सुभ्याचा कारभार पाहिला आणि येथे बऱ्यापैकी व्यवस्था राखली. त्याच्या जवळ मोठी व कार्यदक्ष फौज होती. मुलुखभर त्याचा संचार सारखा चालू असे. थंडीचे दिवस तो पेशावर या ठिकाणी ( जे त्यावेळी अफगाणिस्थानात समाविष्ट होते ) आणि उन्हाळ्याचे दिवस काबूल किंवा बामियान येथे काढी. तरी देखील शांतता टिकविण्यासाठी खिडीतील अफगाणांना लाच देण्याचे धोरण अनुसरणे त्याला भाग पडले. १७०९ इ. किंवा १७१० इ. मध्ये नासिरखान या पूर्वी जमरूद येथे फौजदार असलेल्या अमलदारास काबूलचा सुभेदार म्हणून नेमणूक मिळाली. सदरचे पद त्याचा १७१९ इ. च्या आसपास मृत्यू होईतो त्याजकडेच राहिले. तद्नंतर त्याचा मुलगा, ( त्याचाही किताब नासिरखान असाच होता ) त्याचा उत्तराधिकारी म्हणून आला. पुढे त्याचीही नेमणूक मुहम्मदशाहाने इ. १७२० मध्ये कायम केली. दुसऱ्या नासिरखानाची आई अफगाण वंशाची होती आणि या नासिरखानास उत्तराधिकारी म्हणून राज्य करणे सोपे जाईल व खिडीतील मार्ग खुला ठेवणे शक्य होईल असा समज होता. [ मा. उ., खंड तीन, ८३३. ]

पण हा नासिरखान अगदी साधासुधा आणि सुस्त माणूस होता. तो आपला बहुतेक वेळ शिकारीत घालवी आणि शिकारीत गुंतलेला नसे तेव्हा तो प्रार्थनेत वेळ घालवी(सियर, खंड ए. ९३. ) अशा प्रकारे या मुलुखातील शांतता वाऱ्यावर सोडून दिली होती; रस्ते असुरक्षित बनले होते. याचा दरबाराचा आश्रयदाता म्हणजे बादशाहाचा लाडका रोशनुद्दौलह. खिडी रहदारीस खुल्या ठेवण्यासाठी अदा कराव्याच्या शाही देणग्या रोशनुद्दौलह या उमरावाच्या हस्ते नासिरखानाकडे रवाना होत. रोशनुद्दौलह याचा प्रतिस्पर्धी खान दौरान याने

७ पहा, जदुनाथ सरकारकृत, हिस्टरी ऑफ औरंगजेब, खंड तीन ( दुसरी आवृत्ती ), २४३ आणि स्टडीज इन मुघल इंडिया १११–११७.

त्याजवर सदरच्या द्रव्याचा अपहार केल्याचा आरोप केला आणि हे निरर्थक असलेले देणे बंद करण्यास त्याने बादशाहाला उद्युक्त केले. नासिरखानाने याबाबत केलेल्या विनवण्या धुडकावून लावल्या गेल्या. इ. १७३० च्या सुमारास खुद्द रोशनुद्दौल्ह हाच बादशाहाच्या मर्जीतून पार उतरला व त्याची हकालपट्टी झाली. या सगळ्याचा परिणाम असा झाला की, अफगाणिस्थान वाऱ्यावर सोडून दिला गेला व ही परिस्थिती सुधारायची आशा यत्किंचितही उरली नाही.

गुलाम हुसैन लिहितो त्याप्रमाणे, "या मुलुखातील रस्ते आणि खिंडी यांची हालहवाल काय आहे याची माहिती करुन घेण्याची काळजी सुभेदार किंवा (दरबारातील) अमीरुल्-उमराव करीनासे झाले. रस्त्यावर पहारेकरी उरले नाहीत. सरकार कमकुवत बनल्यामुळे आपल्याला कोणी जाब विचारील याची भीती स्थानिक अधिकाऱ्यांना राहिली नाही. कोणी कोणाची किंमत बाळगीना, कोणी कोणास घाबरेना, (वरिष्ठ अमलदारांकडून) कसल्या सूचनाही कोणी घेईना. ज्यास जे वाटेल ते त्याने करावे असे जिकडेतिकडे होऊ लागले. ज्याची इच्छा होईल त्याने (या सरहद्दीवरील रस्त्यावरुन हटकून घेतल्याविना) यावे आणि जावे असा पायंडा पडला. बादशाह आणि उमराव यांच्या कानावर येथील कसलेच वृत्त पडेनासे झाले. एखाद्या सुभ्याकडून किंवा सरहद्दीवरच्या पहाराचौकीवरुन एखादे बातमीपत्र का आले नाही याची विचारपूस करण्याचे बादशहाने आणि दरबाराने पार सोडून दिले." (सियर खंड एक, ९३.)

इराणशी भिडलेल्या सरहद्दीविषयी मुहम्मदशाह याचा हा सुस्तपणा अणि दुर्लक्ष औरंगजेबाच्या याबाबतच्या जागत्या दक्षतेच्या[८] पार्श्वभूमीवर ताडून पाहिले म्हणजे नदिर-शाहाच्या आक्रमणाअगोदर मुघल साम्राज्यात कारभारविषयक अकार्यक्षमता किती बोकाळली होती याचा प्रत्यय येतो.

आपल्या फौजेची बाकी चुकती करता यावी म्हणून काबूलच्या सुभेदाराने द्रव्याची मागणी करणारे अर्ज बादशाहाकडे वारंवार गुदरले होते; पण त्याची दखल कुणीही घेतली नाही. या सुभेदाराच्याविरुद्ध पक्षातील उमरावांचे आता दरबारात वर्चस्व होते आणि बादशाह आपल्या निर्णयवृत्तीचा वापर करीत नव्हता किंवा कुठल्या व्यवहारात जातीने लक्ष घालीत नव्हता. या सुभ्यात ठेवलेल्या सैनिकांचे पाच वर्षांचे पगार थकलेले असल्यामुळे त्यांची उपासमार चालू होती. पोट खपाटीस लागलेले, सैनिकी सरंजामाची कळा गेलेले आणि दारिद्रयामुळे हत्यारबंदीत देखील डावे ठरलेले हे सैनिक पाच वर्षांच्या थकबाकीतील निदान एक वर्षाची तरी थकबाकी द्या, म्हणजे आमच्या धनकोंची थोडीफार समजूत काढून कूच करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची, आम्हास थोडी तरतूद होईल, असे त्यांनी आग्रहपूर्वक विनविले. त्यांना निर्धास्त करण्यासाठी नासिरखान असे म्हणे, "दोस्तांनो! चिंता का करता? मी बादशाहास लिहिले आहे; दरबारातील माझ्या प्रतिनिधीलाही लिहिले आहे; आज नाही आले तर उद्या पैसे येणार हे नक्की." याच्या प्रतिनिधीने आपला अर्ज अमीरुल्उमरा खान दौरान यास सादर केला आणि घाबऱ्या घाबऱ्या, हातपाय कापत, याने

८ याचा एक ठळक दाखला हमीदुद्दीनकृत अहकाम-इ-आलमगीरी, ४९–५२ मध्ये मिळतो; भाषांतरकार जदुनाथ सरकार भाषांतरकाराचा मथळा, अनेक्डोट्स् ऑफ औरंगजेब.

अफगाणिस्थानातील अंगावर शहारा आणणारी परिस्थिती वर्णन करून सांगितली. तेव्हा हा उमराव उपहासाने म्हणाला, "असली हकीकत ऐकविल्याने माझ्यावर असर पडावयास मी फालतू मूर्ख आहे असे तुला वाटले की काय? आमची घरे मदानात बांधलेली आहेत. आमच्या डोळ्यास जे दिसेल ते वगळता बाकीच्या कशाची आम्हा भीती वाटत नाही. तुमची घरे उंच डोंगरावर आहेत व म्हणून तुमच्या घराच्या छपरावरून तुम्हास कदाचित मोंगोल किंवा किझिल्बाश फौजा दिसल्या असतील! तुझ्या धन्याला कळव की, आम्ही बंगालच्या सुभेदारास द्रव्य पाठविण्याविषयी लिहिले आहे. हा बंगालचा खजिना पावसाळा संपल्यावर येथे येईल; तेव्हा द्यावयाची आहे ती रक्कम काबूलला[९] झटपट रवाना होईल." ( आनंदराम ११–१२. )

अफगाणिस्थानाला संरक्षण असे काही उरलेले नाही असा साक्षीपुरावा कोणी आणला तर, त्याकडे तिरस्कारयुक्त मुद्रेने पाहून त्याची गणना मूर्खात होई. उपर्युल्लेखित अहवाला-सोबत काबूलच्या रहिवाशांचे आलेले शिष्टमंडळ म्हणजे वजीर आणि निजाम या तुराणी गटांच्या पुढाऱ्यांनी खान दौरान याची नापत व्हावी आणि बादशाहाने आपला विश्वास पुन्हा एकदा पहिल्या गटावर सोपवावा या हेतूने केलेल्या शुद्ध नाटकाचा एक भाग आहे असे खान दौरान याच्या साथीदारांनी संसूचित करूनदेखील पाहिले! ( सियर; एक, ९६. )

या सगळ्याचा परिपाक झाला त्याचे गुलाम हुसैनचे वर्णन अत्युत्तम असून ते पुढीलप्रमाणे आहे: 'नादिरशाहाच्या हिंदुस्थानातील प्रवेशास प्रतिबंध करणे नासिरखान यास अशक्य झाले होते. राज्यकारभाराचे क्षेत्र सडूनकुजून गेले होते. बादशाह शक्तिहीन झाला होता. अफगाणिस्तानातील शासकीय जम टिकून राहावा म्हणून लागणारे द्रव्य पाठविण्यात आले नाही. तेव्हा सुभेदारदेखील आपली ख्यालीखुशाली सांभाळून, पेशावर येथे राहू लागला. तत्पूर्वी त्याने काबूलचा किल्ला एका किल्लेदाराच्या हवाली केला. भारतास जाणाऱ्या खिंडीच्या रस्त्यावर नियंत्रण ठेवा व त्याचा पहारा करा असे हुकूम त्याने दिले." ( सियर; खंड एक, ९४. )

भारताचे दुसरे प्रवेशद्वार असलेल्या पंजाब सुभ्याच्या संरक्षणाबाबत देखील अशीच हयगय झालेली होती. जिक्रियाखान ( अब्दुस्समदखान याचा मुलगा ) हा लाहोर आणि मुलतानचा सुभेदार होता. त्याच्या कुळाचे मूळस्थान मध्य अशियातील अहरार हे असल्याने त्याला "तुरानी पक्षाचा बळकट आधारस्तंभ" असे समजत. याची आई पैगंबरवासी वजीर मुहम्मद अमीनखान याच्या बायकोची बहीण होती. खान दौरान याच्या नेतृत्वाखालील हिंदुस्थानी गटाचा कडवा विरोध हा अगदी सहजपणे उद्दीपित करू शकत असे.[१०] जिक्रियाखान

९ यावर आनंदराम याने केलेली टिप्पणी उचितच होय. तो म्हणतो अफगाण लोकांनी आपल्या परंपरागत शौर्याने आणि मनापासूनच्या तळमळीने सरहद्दीचे रक्षण करण्याचे ठरविले असते तर त्यांनी इराणी फौजेची चढाई इतक्या दूरवर रोखून धरली असती की, त्याच्याकरता दिल्लीहून पाठविलेली कुमक तेवढ्या वेळात त्याच्यापर्यंत सहज पोहोचू शकली असती व मग हिंदुस्थानचा लागला तसा निकाल लागला नसता.

१० दरबारी गटांमधील हाडवैराचा एक थक्क करून टाकणारा मासला इतिहासकार शाकिरखान (शाकिर) ( पानिपतचा भारतीय मुसलमान ) देतो तो असा: खान दौरान यास उलथवून टाकण्याच्या आपल्या इच्छेपायी निजाम आणि सआदतखान यांनी दिलेल्या चिथावणीवरून जिक्रियाखानाने नादिरशाहास लाहोरात येऊ देण्याची बेईमानी केली.

हा एक शूर आणि कार्यक्षम शिपाईगडी आणि चांगला प्रशासकही होता. बंडाळी करणाऱ्याविरुद्ध तसेच वाटमारी करणाऱ्याविरुद्ध वारंवार मोहिमा नेऊन त्याने आपल्या अखत्यारीतील सुभ्यात शांतता व सुबत्ता आणली होती. ( मा. उ., खंड दोन, १०६०; आनंदराम १३८. ) पण बादशहाचे कान फुंकण्याचा मक्ता हिंदुस्थानी पक्षाकडे होता. या पक्षाने त्याजकडून बादशाहाकडे आलेल्या सर्व विनंती-अर्जांना विरोध केला, त्याची वर्तणूक आणि त्याचे इरादे याविषयी बादशाहास वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी माहिती सांगितली आणि नादिरशाहाच्या स्वारीचा क्षण नजीक येऊन ठेपला तेव्हा त्याजकडे द्रव्य वा फौजा पाठविण्यास बादशाहाकरवी प्रतिबंध केला.

अशा प्रकारे, बादशाहाच्या पराकोटीच्या कसोटीचा क्षण येऊन ठेपला असताना, गटबाजीतून उद्‌भवलेला मत्सर आणि एकमेकांवरील मूर्खपणाचा अविश्वास यामुळे आक्रमकाला सरहद्दीपासून हुसकून लावण्याचा खराखुरा प्रयत्न होण्यास प्रतिबंध झाला; किंवा निदान बचावाची दिल्लीतील तयारी पूर्ण होऊन शाही फौजांचा युद्धव्यूह पंजाबमध्ये रचला जाईपर्यंत, शत्रूला आहे त्या ठिकाणी थोपवून धरण्याचेही काम झाले नाही. पहिल्याच झपाट्यात, 'भारताचे प्रवेशद्वार' नादिरच्या हाती पडले. तरी देखील अफगाणिस्तानाच्या खिंडीमधून किंवा पंजाबातील नद्या ओलांडून शत्रूला पुढे सरकता येणार नाही या लटक्या आशेपायी मूर्ख बादशाह आणि त्याचे सल्लागार यांनी संरक्षणाच्या तयारीला विलंब लावला.

आक्रमणाच्या वादळाने झोडपून काढले, त्यावेळी हिंदुस्थानच्या वायव्य सुभ्यांची स्थिती अशी होती.

## १०५ : नादिर मुघलांकडून उत्तर अफगाणिस्तान जिंकून घेतो

इराणच्या राजाने आपल्या अफगाण शत्रूंचा निकाल लावण्यासाठी उत्तर अफगाणिस्तान-मध्ये १७३८ मे १० रोजी कूच केले. मुखूर झऱ्यापाशी मुघल सरहद्द ओलांडून घझनीच्या नैर्ऋत्येस ३६ मैलांवर काराबाग येथे त्याने मुक्काम केला. आपला धाकटा मुलगा नसरुल्लाह याच्या दिमतीस एक भक्कम फौजफाटा देऊन, त्याला काबूलच्या वायव्येकडील घोरबंद आणि बामियान येथील अफगाणाविरुद्ध कामगिरीवर धाडले. नादिर काराबाग येथे येऊन पोहोचला तेव्हा घझनीचा मुघल सुभेदार बाकीखान भिऊन पळाला. शहरातील काजी, विद्वान आणि श्रीमंत व्यापारी आक्रमकास शरण जाण्यासाठी व त्यास नजराणे देण्यासाठी त्याच्या आगमनाची वाट पहात थांबून राहिले. अशा प्रकारे नादिरचा घझनीतील प्रवेश मे ३१ रोजी शांततेच्या वातावरणात झाला. त्यानेही या लोकांना उत्तम वागणूक दिली.

नादिरच्या फौजांना आव्हान देणाऱ्या गझनीच्या नैर्ऋत्येकडील हझारा किंवा डोंगरी अफगाणाविरुद्धच्या कामगिरीवर फौजेच्या आणखी दोन तुकड्या होत्याच. ज्यांनी निष्ठा नादिरला वाहण्याची संधी साधली त्या सर्वांना कसूर माफ झाले; पण ज्यांनी प्रतिकार केला त्या सर्वांना तलवारीच्या धारेवर धरण्यात आले. त्यांच्या बायकांना फरफटत नेऊन गुलाम बनविले आणि त्यांची घरे पाडून टाकली. अशा प्रकारे आपली आजूबाजू आणि आपली पिछाडी यांचा बंदोबस्त करून नादिरने काबूलवर चाल केली. शहरावर त्याची वादळी धाड पडण्याचे टळावे म्हणून शहरातील मुख्य मुख्य असामी त्याला रस्त्यात दोन

मजल सामोरे गेले; त्यानेही या सामोरे आलेल्यांना मानाची वस्त्रे, इनाम आणि निर्धास्त राहण्याचे आश्वासन देऊन परत पाठविले. पण शहररक्षक किल्ल्याचा किल्लेदार शारझाखान याने प्रतिकाराचा निर्णय घेतला. किल्ल्याचे दरवाजे बंद करून त्याने संरक्षणाची तयारी केली.

जून १० रोजी नादिरचे आघाडीचे तंबू किल्ल्यानजीक येऊन पडले. पण शिबंदीतील काहींनी त्यावर छापे मारले आणि विरोध प्रदर्शन केले. नादिरची भारवाहू मंडळी प्रतिकाराच्या दृष्टीने सज्ज नव्हती; म्हणून शिबंदीने दिलेले आव्हान न स्वीकारता त्यांनी किल्ल्याच्या तटबंदीपासून सुरक्षित अंतरावर, शहराच्या पूर्वेस दीड मैलांवर उलंग येथे निवांतपणे आपले तंबू ठोकले. या ठिकाणी नादिरचे आगमन ११ तारखेला झाले. दुसऱ्या दिवशी शहराचा परिसर आणि शहररक्षक किल्ल्याचे मोर्चे यांची पाहणी करण्यासाठी तो रपेट करीत 'काळचा खडका' कडे गेला. शिबंदी तडफेने चालून आली. त्यांनी त्याजवर भडिमार करणे चालू केले. पण त्या सोबत असलेल्या इराणी तुकडीने या चालून आलेल्या शिबंदीला किल्ल्याच्या भिंतीच्या पायथ्यापर्यंत मागे हाकलले. नादिराने आता शहरास वेढा घालण्यास आरंभ केला. त्याच्या तोफा आणि उखळी तोफा जवळपासच्या उंचवट्यावर खेचून नेण्यात आल्या आणि त्यांतील भडिमार किल्ल्याच्या तटबंदीवर जाऊन आदळला. सातव्या दिवशी, म्हणजे जून १९ रोजी, अकाबीनचा बुरूज, त्यावरून डागलेल्या एका मोठ्या तोफेच्या हादऱ्याने कोसळला; तटबंदीचा काही भाग पडला;[११] शहररक्षक किल्ला काही अटीवर ताब्यात आला. काबूल येथील शाही खजिना, घोडे, हत्ती आणि मालाची भांडारे नादिरच्या कब्जात आली. (जहानकुशा ३३३–३३५)

या सुभ्याचा कारभार लावून देण्यासाठी त्याने तेथे चार दिवस घालविले. घोरबंद आणि बामियान यांना नमवून नस्रतुल्लाहाखान हा त्याचा मुलगा परतून, त्यास जुलै १ रोजी येऊन मिळाला. मधल्या काळात त्याला त्याच्या दिल्ली दरबारातील वकिलाचे पत्र येऊन पोहचले. बादशाह आपल्या पत्रास उत्तर देत नाही आणि मला निरोपही देत नाही असे त्याने पत्रातून कळविले होते. तेव्हा नादिरशाहाने बादशाहास निषेधाचे एक कडक पत्र लिहिले आणि एका जलद जासूदाहाती ते पाठविले. मुघल दरबारास अफगाणिस्थानातील खरी परिस्थिती काय आहे तिची खुलासेवार माहिती देण्यासाठी, सदर पत्रासोबत काबूल शहराच्या प्रमुख असामींना त्यांच्या विनंतीवरून पाठविले. नादिरशाहाने बादशाहास पाठविलेल्या सदरच्या पत्रात, वचनभंग केल्याचा, वकिलातीला उत्तर देण्यात विलंब केल्याचा आणि यापूर्वीच्या इराणी वकिलाला आंतरराष्ट्रीय चालरीतीचे उलंघन करून, वर्षभरापेक्षा अधिक काळ खोळंबून ठेवल्याचा त्याने बादशाहावर आरोप केला. अफगाणांनी इराणमध्ये जेवढा हैदोस घातला आहे त्यापेक्षा जास्त हैदोस त्यांनी हिंदुस्थानी मुलखात घातलेला असल्याने, अफगाणांना चिरडून टाकण्याची मोहीम पत्करून, मी मुघल साम्राज्याचीही सेवाच केली हे नादिरशाहाने बादशाहाच्या निदर्शनास आणून दिले. काबूलमधील शाही शिबंदीने केलेला उभा दावा आणि त्यांनी अफगाणांशी केलेली हातमिळवणी यामुळे त्यांच्याशी लढणे आपणास

११ आनंदराम, १०. यामुळे पडलेले खिंडार येवढे मोठे होते की त्यातून ५०० घोडेस्वार दौडत जाऊ शकत होते अशी एक अविश्वसनीय हकीकत तो सांगतो. एका तोफेच्या हादऱ्याने पाव मैल लांबीचा दगडी तट उध्वस्त होणे शक्य नाही. हॅन्वे (खंड दोन, पृ. ३५९) सांगतो की काबूलचा पाडाव झाल्यावर नादिरने बहुसंख्य शिबंदीची कत्तल केली. कत्तल झालेल्यात शारझाखान आणि त्याचा मुलगा याचाही अंतर्भाव होता.

कसे भाग पडले; त्यांच्या शरणागतीनंतर त्यांना इजा पोहोचू न देण्याची मी खबरदारी कशी घेतली; कारण माझा हेतू केवळ अफगाण शत्रूस अद्दल घडविणे एवढाच कसा होता याचे स्पष्टीकरण त्याने केले. ज्या जासूद-पथकाच्या हवाली हे पत्र नेऊन देण्याचे काम सोपविले होते त्या पथकाने जुलै ३ रोजी काबूल सोडले; सदर पथक जलालाबाद येथे पोहोचले असता, स्थानिक शासकाने काबुली लोकांच्या शिष्टमंडळाला परतण्यास भाग पाडले. तर जासूद आणि त्याचे नऊ रक्षक यांना, मीर अब्बासचा[12] मुलगा व जवळचा स्थानिक टोळीप्रमुख यांनी लुटले व नंतर ठार मारले.

दरम्यान, मुलुखात दुर्भिक्ष्य असल्याने नादिरशाहाने जुलै १९ रोजी काबूल सोडले व अधिक सुपीक आणि दाट वस्तीच्या चहार-एक-कार, नर्जद आणि सार्फीच्या टेकड्यांवर आपला तळ हलविला. टेकड्यांच्या माथ्यावर स्थानिक टोळीवाले जाऊन बसले होते. त्यांवर चढाई करून त्यांना पराभूत केले. त्यांना शरण येण्यास भाग पाडून इराणच्या लष्करी चाकरीत त्यांना दाखल करून घेतले. येथे २२ दिवस व्यतीत केल्यानंतर ऑगस्ट २५ रोजी त्याने गंदमक या ठिकाणाकडे कूच केले.

निरोप्याचा खून झाला असल्याची खबर यानंतर आली. तेव्हा इराणच्या आघाडीच्या फौजेने जलालाबादवर धडक मारली आणि तेथील धान्यसाठा जप्त केला. शाही शासक पळून गेला; प्रमुख रहिवासी शरण आले व त्यांनी किल्ला हवाली केला (सप्टेंबर ७). पण नादिरच्या जासुदावरील हल्ल्याबद्दल अद्दल म्हणून शहरात कत्तल घडविली. मीर-अब्बासच्या मुलाच्या डोंगरी किल्ल्यावर धाड घातली. पुरुषांवर तलवारी चालविल्या व स्त्रियांना (त्यात त्या मुलाची बहीण आणि बायका अंतर्भूत होत्या) इराणी छावणीवर गुलाम म्हणून पकडून आणले. (जहानकुशा ३३७–३३९; अली हजीन २८९.)

या मुलुखाच्या कारभाराची घडी बसविण्यात थोडे दिवस घालविल्यावर नादिर जलालाबादेच्या दक्षिणेस बहार-शवलानी[13] येथे कूच करीत गेला. हिंदुस्थानातील वास्तव्यामुळे आपणास स्वतःच्या मुलखात दीर्घकाळ अनुपस्थित राहावे लागणार आहे; आपल्या इराणातील मुख्यालयापासून दिल्ली फार दूर आहे आणि युद्धात काय अपघातदेखील होऊ शकतात असा बहुधा विचार करून नादिरशाहाने सर्वात थोरला मुलगा मिर्झा रिझा कुली यास राजमुकुट चढविला. त्यास इराणचा राज-प्रतिनिधि बनविले (नोव्हेंबर ३) आणि त्यास मोठ्या समारंभानिशी व एक शक्तिशाली फौज सोबत देऊन, आपल्या इराणी मुलखास परत पाठविले.

---

१२ जहानकुशा, ३३५–३३७. अली हजीन, २८८.

१३ बहार, जलालाबादेच्या नैर्ऋत्येस १७ मैलांवर शोवलानी (याचा वर्णविन्यास जहानकुशामध्ये सफली असा आला आहे.) बहारच्या पूर्वेस आठ मैलांवर.

प्रकरण बारावे

# नादिरशाहाचे भारतावरील आक्रमण

## (मजकूर संपादकाचा)

### १०६ : पेशावर आणि लाहोर यावर नादिरशाह कब्जा करतो

१७३८ इ. च्या नोव्हेंबरच्या ६ तारखेला भारताचा प्रवास सुरु झाला. नादिरशाहाच्या नेतृत्वाखालच्या मुख्य फौजेने १२ तारखेस जलालाबाद ओलांडले व शहरापलीकडे १ मैल अंतरावर तळ टाकला. या मजलेनंतर निवडक १२ हजार घोडेस्वारांची आघाडी चढाईसाठी पुढे निघाली. त्यांच्यामागे शाही तंबूच्या रक्षणासाठी ६ हजार असामींची दुसरी फौज होती. त्यानंतर सैन्याची मध्यबाजू आणि त्यामागे सैन्याची पिछाडी होती.

नासिरखान हा अफगाणीस्तानचा मुघल सुभेदार होता. नादिरने काबूल जिंकले असून भारतावर स्वारी करण्याचा त्याचा मनसुबा आहे ही खबर नासिरखानास लागली. त्या वेळी तो त्याच्या नेहमीच्या रीतीनुसार पेशावर शहरी मुक्कामास होता. त्याने खैबर आणि पेशावर भागातील २० हजार अफगाण जमा करून, अली मास्जिद आणि जमरूद यांमध्ये असलेली खिंड अडवून टाकली. जमरूद म्हणजे पेशावरपासून बारा मैलांवर असलेली त्याची शेवटची पहाराचौकी होती. त्याची उपासमारीने ग्रासलेली फौज आणि घाईगडबडीत धरून आणून भरती केलेले टोळीवाले लोक सामना करण्याच्या परिस्थितीत नव्हते. कारण त्यांना लढावयाचे होते ते एका स्वर्गीय सेनानीच्या आधिपत्याखालच्या, शेकडो विजय संपादल्याची आढयता असलेल्या मुरब्बी इराणी फौजेशी.

नोव्हेंबर १४ च्या तीन प्रहरी असरची प्रार्थना झाल्यावर जलालाबादेच्या पूर्वेस २० मलांवर असलेल्या बारिकाब येथे आपली छावणी आणि सामानसुमान नसुल्लाह मिर्झा याच्या हाती सोपवून, आपल्या बरोबर हलके प्रवाससाहित्य घेऊन, सेहचूबा मार्गाने नादिरशाहाने पुढ प्रयाण केले. रस्ता अगदी खाचखळग्यांचा आणि खड्या चढणीचा असून देखील दुसऱ्या दिवशी सकाळचे आठ वाजण्यापूर्वी, त्याने पन्नास मलांचे अंतर काटून अगदी अनपेक्षितपणे, खैबर खिंडीच्या एका अंगाने तो हिंदुस्थानी फौजेवर तुटून पडला. इराणी सैन्याच्या पहिल्याच हल्ल्यात नासिरखानाचे टोळीवाले वेठीचे शिपाई सैरावैरा पळाले. पण त्याच्या कायम फौजेने मात्र काही तास सामना दिला. शेवटी नासिरखान आणि इतर

कित्येक उमराव यांना पकडण्यात आले. [1] उरलेला फौजफाटा पळून गेला. त्यामुळे नासिरखानाची संपूर्ण छावणी आणि त्यातील सगळी चीजवस्तू विजेत्याच्या हाती पडली. [जहानकुशा ३४१–३४२, अली हजीन २९]

या विजयानंतर ३ दिवसांनी इराणी छावणी आणि पिछाडीरक्षक सेना नेहमीच्या रस्त्याने तेथे येऊन पोहोचली. नोव्हेंबर १८ रोजी नादिरने पेशावर शहरात प्रवेश केला. त्या वेळी त्यास कोणी विरोध केला नाही. तेथे त्याने सुभेदाराचा महाल कब्जात घेतला. डिसेंबर १२ रोजी चढाईचा प्रवास सुरू झाला. मार्गातील मुलखावर छापे घालून तो उध्वस्त करण्यासाठी आणि अटक येथे सिंधू नदीवर पूल टाकण्यासाठी आका मुहम्मद याच्या सोबत एक मजबूत सैन्यफळी पुढे धाडली. पुढील प्रवासात पंजाबमधील इतर पाच नद्या पायीच ओलांडल्या, कारण त्या हंगामात त्या तशा पार करता येण्यासारख्या होत्या. चिनाब नदी लाहोरच्या वायव्येस सुमारे ६० मैलांवर वजीराबाद येथे १७३३ जानेवारी ८ रोजी ओलांडली.

लाहोर येथे जिक्रियाखान हा मुघलांचा सुभेदार होता. बादशहाची कसलीही मदत आली नव्हती. तरी सुद्धा स्वतःची जी काही मर्यादित सामग्री होती तीसह त्याने करता येईल तेवढी बचावाची तयारी केली. लाहोरच्या उत्तरेस ३० मैलांवरच्या यमीनाबाद येथील कचा मिर्झा [2] नामक किल्ला आपले आघाडीचे ठाणे बनवून व आपले पाच हजार असामी कलंदरखान याच्या दिमतीस देऊन जिक्रियाखानाने त्यास सदर ठाणे लढविण्यास सांगितले. खुद्द सुभेदार आपली बहुसंख्य फौज (म्हणजे बहुधा १०–१२ हजार असामी) बरोबर घेऊन दक्षिणेस १० मैलांवरील शाहदौला या पुलाजवळ थांबला. इराणी आघाडीने[3] किल्ला सर केला. कलंदरखानाला मारले. आणि त्याची फौज पिटाळून लावली. ही खबर समजताच जिक्रियाखान मागे सरून लाहोरास गेला. नादिर शहराच्या उत्तरेस २० मैलांवर वर असलेल्या शाहदौला नामक पुलापर्यंत पुढे आला. अब्दुल बाकीखान या इराणी वजीराने येथून जिक्रियाखानास पत्र लिहिले व त्यास शरण येण्याचा आणि अशा प्रकारे अनावश्यक रक्तपात टाळण्याचा सल्ला दिला. [जहानकुशा ३४३; हॅन्वे, खंड दोन ३६५–६६, आनंदराम १६–२०]

---

१ मेहदी सांगतो की नासिरखानाने आपली फौज लढाईच्या रेषेत भिडविली आणि थोडा वेळ सामना दिला. सियर (खंड एक, ९५) सांगतो की, हा सेनापती जायबंदी झाल्यावर शत्रूने त्यास पकडले. तेव्हा त्याने आपले नाव व पद उघड केले. आनंदराम (१३) प्रतिपादतो की नासिरखान बिछान्यात निद्रिस्त असताना त्याच्यावर अकस्मात हल्ला झाला. तेव्हा त्याचा गोंधळ उडून, तो, चिराग बेगखान आणि इतर थोडे चाकर यांच्यासमवेत, पळून गेला. हॅन्वे (दोन, ३६२) आपणास सांगतो की, खिंडीतील अफगाणांचे वेतन दिल्ली दरबाराकडून तब्बल ४ वर्षे बाकी राहिले होते. नादिरने खिंडीतील अफगाणांना विकत घेतले. अशा प्रकारे त्याला खिंड सहज आणि प्रतिकार न होता ओलांडणे शक्य झाले. नादिर अगदी अनपेक्षितपणे जवळ आल्याचे दिसताच नासिरखानाचे नवखे वेठीचे शिपाई ठाणे सोडून पळाले. तेव्हा नासिरखानाने पेशावर नजीक ७ हजार लोकांनिशी खंदक खणून मोर्चा बांधला आणि काही तास सामना दिला. पण त्याच्या तळावर हल्ले झाले आणि त्याचे लोक ठार तरी झाले किंवा पकडले तरी गेले. अली हजीन (२९०) सांगतो की, अफगाण आणि नासिरखानाच्या फौजा यांची खोऱ्याच्या भागात प्रचंड संख्येने कापाकाप झाली.

२ इंडियन ॲटलासमध्ये यमीनाबादेच्या थोड्या पूर्वेस कोट मिर्झागान नावाचे ठिकाण आढळते.

३ हॅन्वेच्या म्हणण्यानुसार सदर आघाडीचे नेतृत्व नासिरखान याच्याकडे होते. अली हजीन याच्या अंदाजानुसार जिक्रियाचा फौजफाटा १४–१५ हजार कवायती घोडेस्वारांचा आणि शिवाय रंगरूटांचा बनलेला होता.

लाहोरच्या उत्तरेस असलेल्या रावी नदीच्या किनाऱ्यावर जिक्रियाखानाने मोर्चेबंदी केली होती. इराणी फौजेची चढाई सामना देऊन रोखता यावी म्हणून मोठमोठ्या अवजड तोफा येथे बसविल्या होत्या. १७३९ जानेवारी १० रोजी नादिरने शाहदौलाचा पूल ओलांडला आणि लाहोर भोवताली लांबच्या मार्गाने चक्कर मारली. मुघलांचे मोर्चे आपल्या डाव्या अंगाला दूर अंतरावर ठेवून नदी ओलांडली आणि शहराच्या पूर्वेस पाच मैलांवर असलेल्या शालिमार बागेत तळ टाकला. लाहोर शहरात प्रवेश करण्याचे इराणी फौजेचे सगळे प्रयत्न उधळून टाकण्यात खानाला त्या सबंध दिवशी यश येत गेले. दुसऱ्या दिवशी जानेवारी ११ रोजी लढत सुरू झाली. पण अगदी सकाळीच निवडक असामी बरोबर घेऊन सुभेदाराच्या मुलाने दिल्लीचा आडवळणी रस्ता धरला. आदिनगर येथील जमीनदाराच्या नेतृत्वाखालचा मोठा हिंदुस्थानी फौजफाटा जिक्रियाखानास मदत म्हणून येत असता इराणी छापेमारांनी त्यांना लाहोरपासून १२ मैलांवर मुल्कपूर येथे वाटेत गाठले आणि त्यांना पळवून लावले. यात त्यांनी जवळचे काही पकडलेले शत्रुसैनिक गमावले.[४] विरोध करणे व्यर्थ आहे हे जिक्रियाखानास कळून चुकले. दिल्लीहून कसलीही मदत येऊ शकली नव्हती. तेव्हा तिसऱ्या प्रहरी त्याने आपला हस्तक किफायतखान याला शरणागतीचा प्रस्ताव देण्यासाठी आणि सुरक्षिततेची भीक मागण्यासाठी नादिरच्या छावणीवर पाठवले. दुसऱ्या दिवशी (१२ जानेवारी) खुद्द जिक्रियाखान विजयी सेनानीस भेटावयास गेला. या भेटीत त्याने गडाच्या किल्ल्या नादिरच्या हवाली केल्या; जंगी हत्ती आणि अगदी दुर्मिळ वस्तू त्यास नजर केल्या. नादिरने त्याला दयेने वागविले; पण शहरावर २० लाख रुपयांची खंडणी बसविली. त्यातील काही रक्कम शासकीय तिजोरीतून भागविली. उरलेली रक्कम श्रीमंत लोकांवर बसविली. १४ तारखेला खान पुनः इराणी राजाच्या भेटीस गेला. त्यानंतर त्याने द्रव्य राजाच्या हवाली केले व अशा प्रकारे लुटीच्या भयानकतेतून शहराची सोडवणूक केली.[५] नादिरने त्याचे चांगले स्वागत केले, त्याला मानाची वस्त्रे दिली. सोन्याची कलाबतू असलेले खोगीर आणि उंची साज असलेला अरबी घोडा, रत्नजडित तलवार व कट्यार त्यास भेट दिली. तसेच त्याजकडील लाहोरचे सुभेदारपद त्याजकडे कायम ठेवले. पण त्याच्या हयातुल्लाहखान या मुलास, पाचशे तैनाती इसम दिमतीस घेऊन, इराणी राजाच्या मोहिमेत रहाण्यास फर्माविले. हयातुल्लाहखानाच्या बापाच्या स्वामीनिष्ठेच्या हमीसाठी हयातुल्लाहखान यास ओलीस ठेवले होते यात शंका नाही.

नादिरने लाहोर येथे १६ दिवस मुक्काम केला. फखरुद्दौलह नामक काश्मीरच्या सुभेदारास कामावरून दूर केले होते. तो दारिद्र्याने पिचलेल्या व दुर्लक्षित स्थितीत येथे

४ जहानकुशाचे पृष्ठ ३४४ अस्पष्ट आहे. शिळाछापावरील त्याचा मजकूर देखील अपभ्रष्ट आहे. यावेळी आदिनाबेग हा लाहोरच्या आग्नेयेस ६६ मैलांवर असलेल्या सुलतानपुरचा फौजदार होता. (तिलोकदास याची कविता). आदिनगर हे ठिकाण मला माहीत नाही. लाहोरच्या पूर्वेस १४ मैलांवर नरोवर हे ठिकाण दिसते; पण मुल्कपूर नावाचे ठिकाण आढळत नाही. ते एखादे पूर असेल तर हैबतपूर-पटी असण्याची शक्यता आहे. जहानकुशामधील मजकुराचा अर्थ असाही लागू शकतो की, या भारतीय फौजा लाहोरात घुसल्या.

५ आनंदराम २३; जहानकुशा ३४४; अली हजीन, २३३. पण तिलोकदास सांगतो की, नादिरचा शहर-प्रवेश झाल्यानंतर लाहोरची लुटालूट झाली ती थांबविण्याबाबत विनंती करून देखील इराणी राजाने आपल्या शिपायांना आवरण्याचा कसलाच प्रयत्न केला नाही. लाहोर येथे, हिंदुस्थानी मोठ्या शहरातील संपत्ती काय असते याचा आक्रमकांना प्रथमच प्रत्यय आला.

काळ कंठत होता. याला नादिरने त्याच्या पदावर पुन्हा नेमले. नासिरखान यास बंदिवासातून मुक्त केले. काबूल आणि पेशावर येथील सुभेदारी त्यास पुन्हा देऊ केली. पंजाबमधील नद्यांतील नावा पकडून आणण्यासाठी, नदीवरील उतारांचे रक्षण करण्यासाठी आणि हिंदुस्थानात वास्तव्य असेतो इराणी फौजेकडे येणाऱ्या आणि जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सहज होऊ शकेल याची काळजी वाहण्यासाठी एक इराणी तुकडी मुकरर केली. अशा प्रकारे आक्रमकांची पिछाडीची बाजू तसेच डावी, उजवी बाजू पूर्णपणे सुरक्षित झाली.

मुहम्मदशाहाने युद्धाचा निर्णय केला आहे; इराण्यांशी सामना देण्यासाठी, आपल्या साम्राज्यातून चहूबाजूंनी तो फौजफाटा उभा करीत आहे अशी पक्की बातमी लाहोर येथे समजली होती. मी तुर्कोमान आहे, तैमूरचे कुल ज्या वंशाचे आहे त्याच वंशाचा मी आहे व दिल्लीच्या बादशाहाविषयीचे माझे मनसुबे केवळ मित्रत्वाचे आहेत अशा मजकुराचे एक पत्र नादिरने बादशाहास पाठविले. अफगाण लोक इराणचे जेवढे शत्रू आहेत तेवढेच ते हिंदुस्थानचे देखील आहेत आणि अशा अफगाणांना अद्दल घडविण्याच्या एकमेव हेतूने आपण मुघल सरहद्द ओलांडली हे आपले पहिले पालुपद त्याने आळविले. मित्रत्व आणि राजनैतिक शिष्टाचार यांचे उल्लंघन करून मुहम्मदशाहाने आपल्या तीन वकिलांना गैरवागणूक दिल्याचे गाऱ्हाणेदेखील पुन्हा गायिले. शेवटी युद्धात पडल्यास त्याचे काय परिणाम होतील, याबाबत मुघल दरबारास नादिरने इशारा दिला. पण त्याच बरोबर पराभवानंतर हिंदुस्थानी सेनानी शरण आल्यास त्यांना क्षमा होईल अशी आशा लावण्यास त्याने या पत्रात कमी केले नाही. [जहानकुशा–३४५–३४६]

नादिरच्या स्वारीमुळे सबंध पंजाबमध्ये अव्यवस्था आणि विनाश पसरला. नादिरच्या हुकुमानुसार घोडदळाचा एक भाग पुढे धाडला होता. "झटपट छापेमारी करण्यासाठी (तुर्कताझी), सुभ्यातील शहरे आणि श्रीमंत खेडी यांची लूट करण्यासाठी आणि मुख्य फौजेच्या आघाडीच्या ३०–४० मैलांच्या टापूत टेहळणी करण्यासाठी हे घोडेस्वार धाडलेले होते. कसलीही दयामाया न दाखविता बेधडक लुटालूट आणि नासधूस करण्याची सूचना त्याने आपल्या आघाडीस अटक येथे दिली होती. यामुळे वजीराबाद, यमीनाबाद, गुजरात वगैरे शहरे आणि मोठी खेडी (प्रत्येक खेडेगाव अर्ध्या शहराएवढे मोठे होते) यांची राखरांगोळी झाली. जिकडेतिकडे मालमत्तेची लुटालूट आणि स्त्रियांवर अत्याचार घडले." [आनंदराम, १६ आणि २१] लाहोर, जालंदर आणि नादिरच्या मार्गावरील इतर शहरे येथे झालेल्या लुटालुटीची उघड साक्ष तिलोकदासाकरवी आपणास मिळते. पण सुभ्यावर कोसळलेली एवढी एकच आपत्ती नव्हती. इतर वेळी कायदा पायदळी तुडविणारे, छळ आणि लूट करणारे लोक सरकारने काबूत ठेवलेले असतात पण परकियाचे आक्रमण झाल्यावर, सरकार स्वसंरक्षणात गुंतल्यामुळे, या मंडळींना अंदाधुंदी करण्याची इच्छित संधी प्राप्त झाल्यासारखी वाटते. ते आपले डोके वर काढू लागतात. शेख अली हजीन हा या समयी लाहोरपासून सरहिंदपर्यंत प्रवास करीत होता. त्यावेळच्या परिस्थितीचे तो पुढीलप्रमाणे वर्णन करतो. (पृ. २९२) : "संबंध सुभ्यात अगदी परिपूर्ण क्रांती घडून येत होती. अगदी प्रत्येक जण लुटालुटीत आणि दरोडेखोरीत भाग घेत होता. हमरस्त्यावर हजारो लुटारू दबा धरून बसलेले होते.......त्यावेळच्या सगळ्यांनाच, मग ते रस्त्यावर असोत अथवा (मुक्कामाच्या) ठिकाणी असोत, आपला वेळ लढतीत आणि भांडणात घालवणे भाग पडत होते."

## १०७ : नादिर लाहोरहून कर्नाळला कूच करतो

१७३९ जानेवारी २६ रोजी लाहोर सोडल्यावर नादिरशाह फेब्रुवारी ५ रोजी सरहिंद येथे येऊन पोहोचला. तेथे पोहोचल्यावर, मुहम्मदशाह कर्नाळ येथे आपल्या फौजेसह तळ देऊन आहे असे त्याला समजले. कर्नाळ नादिरच्या तळापासून ८२ मैल अंतरावर होते. शाही तळापर्यंत असलेल्या वाटेतील मुलुखाची टेहळणी करून शत्रूचे बळ आणि शत्रूच्या सैन्याची मांडामांड याविषयीची खबर मिळविण्यासाठी ६ हजार घोडेस्वारांची एक फौज पुढे पिटाळली होती. दुसऱ्या दिवशी नादिरची मुख्य फौज राजा सराई [आजचे राजपुरा] येथे येऊन पोहोचली. हे ठिकाण सरहिंदच्या आग्नेयेस १६ मैलांवर आहे. तिसरे दिवशी (फेब्रुवारी ७) आणखी पूर्वेस १३ मैलांवरील अंबाला शहरी नादिर पोहोचला. या ठिकाणी त्याने आपला जनानखाना आणि अवजड सामानसुमान ठेवले. त्यांच्या रक्षणासाठी एक जबर फौज ठेवली; तो स्वत: मात्र ८ तारखेस एक सडा लढाऊ फौजफाटा आणि उंटावर लादलेला हलका तोफखाना घेऊन पुढे निघाला व दिवस मावळण्याच्या वेळी अंबाल्याच्या पूर्वेस १७ मैलांवर असलेल्या शाहाबाद या गावी पोहोचला. हे ठिकाण कर्नाळच्या उत्तरेस अवघ्या ३६ मैलांवर होते.

दरम्यानच्या काळात ७ आणि ८ तारखेच्या मधल्या रात्री इराणी फौजेचे टेहळे मुघल छावणीच्या तोंडाशी येऊन पोहोचले होते. ते तोफखान्यावर तुटून पडले. त्यात काही असामी ठार झाले तर काहींना त्यांनी पकडून नेले. लढतीच्या शेवटी ते सराई अजीमाबाद[१] या कर्नाळच्या उत्तरेस १२ मैलांवर असलेल्या ठिकाणापर्यंत मागे हटले. नंतरच्या रात्री या पकडलेल्या हिंदुस्थानी असामींना नादिरपुढे हजर करण्यात आले. नादिरने त्यांच्याकडे मुघल फौजेविषयी चौकस प्रश्न विचारले. अजीमाबाद येथील सैन्य तुकडीला मदत पाठविण्यात आली. गोष्टी लढाईच्या थराला जाणार नाहीत अशा रीतीने टेहळणी सावधपणे करण्याचा इशारा नादिरने त्यांना दिला. १० तारखेला नादिरने शाहाबादेहून कूच केले आणि त्याच दिवशी संध्याकाळी तो ठाणेसर (दक्षिणेस १३ मैलांवर) आणि ११ तारखेला सूर्योदयानंतर दीड तासाने सराई अजीमाबाद (दक्षिणेस आणखी १० मैलांवर) येथे पोहोचला.

येथील सराईची इमारत दगडविटांनी बांधलेल्या मोठ्या घरासारखी होती. या इमारतीत अंबाल्याचा फौजदार आणि मुख्य मुख्य असामी यांनी आसरा घेतला होता. पण इराणी तोफखान्याचा इमारतीवर भडिमार सुरू होताच त्यांनी शरणागतीची आरोळी ठोकली. कर्नाळची बादशाही छावणी या ठिकाणापासून फक्त १२ मैलांवर होती. या छावणीची इत्थंभूत माहिती या ठिकाणी नादिरास मिळाली. आता आपण मुहम्मदशाह आणि त्याचे सल्लागार यांनी काय केले या भागाकडे वळू. [जहानकुशा ३४६–३४८]

---

६ थॉर्न याच्या मेम्वायर ऑफ दि वॉर ला जोडून असलेल्या नकाशात अजीमाबाद दाखविले आहे. त्याचप्रमाणे लेटच्या नकाशा-पुस्तकात सदर ठिकाण ताराओरीच्या उत्तरेस तीन मैलावर आणि ठाणेसरच्या दक्षिणेस १० मैलावर दाखविले आहे. दिल्ली–लाहोर प्रवासातील ठाणेसरच्या पुढची मजल म्हणजे अजीमाबाद अशी माहिती चहार गुलशनमध्ये आहे. (इंडिया ऑफ औरंगजेब).

## १०८ : नादिरच्या आक्रमणाच्या समयी शाही दरबारची हालहवाल

नादिरच्या आक्रमणाच्या काळातील दिल्ली दरबारातील घडामोडी म्हणजे, क्लैब्य मानावी अशा, लांच्छनास्पद अकार्यक्षमतेची कहाणीच आहे. काबूल हातचे गेल्याची (१९ जून १७३८) वार्ता जुलैच्या पहिल्या आठवड्यात दिल्लीला पोहोचली असलीच पाहिजे. तरीही तदनंतर कित्येक महिने उलटेतो सरहद्दींच्या संरक्षणासाठी कसलेही उपाय योजण्यात आले नाहीत. नादिरने खैबर खिंड ओलांडली (१५ नोव्हेंबर) तेव्हा त्याचे उद्दिष्ट नक्की काय आहे याविषयी गफलत होण्याची शक्यता उरली नव्हती. तरीदेखील तदनंतर दोन महिन्यांचा कालावधी उलटतो, सर्वांनाच कळून चुकलेला धोका टाळण्यासाठी, कसलेही हिम्मत दर्शविणारे उपाय योजले नाहीत. साम्राज्याच्या तीन अत्युच्चपदस्थ उमरावांना बादशाहाने आक्रमकाविरुद्ध मोहिमेवर जाण्यासाठी २ डिसेंबर १७३८ रोजी औपचारिक निरोप दिला व त्यांच्या मोहिमेच्या खर्चासाठी एक कोटी रुपये दिले. हे खरे असले तरी इतिमादुद्दौलह कमरुद्दीनखान (वजीर), निजामुल्मुल्क आसफजाह (वकील) आणि समसामुद्दौलह खानदौरान (अमीरुल्-उमरा आणि बक्षी) हे ते तीन उच्चपदस्थ उमराव दिल्लीबाहेरील सराई बावलीजवळच्या शालिमार बागेत मुक्काम ठोकून होते. तब्बल एक महिन्याचा काळ त्यांनी तेथे दवडला.[६]

अटक येथे नादिरशाह याने नदी पार केली. ही खबर दिल्लीत १० जानेवारी १७३९ रोजी पोहोचली असलीच पाहिजे. तेव्हा कोठे शाही फौजांना त्वरा करण्याची निकड केली. ज्या जिक्रियाखानाला मदत पाठविण्यास त्यांनी नकार दिला होता तो जिक्रियाखान चांगली लढत देऊन शत्रूस आडकाठी करील अशी आशा दिल्ली दरबाराला वाटत होती. पण गरीब बिचाऱ्या सुभेदाराला जगज्जेत्याशी टक्कर देता आली नाही; तेव्हा विश्वासघात झाल्याची आवई उठविण्यात आली. खानाने बेईमानी करून लाहोरचा किल्ला इराण्यांच्या कब्जात दिला कारण तो नादिरप्रमाणेच खुरासानचा रहिवासी आहे असे दोषारोप दरबारातील हिंदुस्थानी गटाने केले. [शाकिर]

नादिरशाहाच्या आक्रमणाची वदंता प्रथम सर्वत्र पसरली तेव्हा आपली अक्षमता दरबारास समजून चुकली; म्हणून दरबारी मंडळींनी निजामास मसलतीसाठी पाचारण केले. औरंगजेबाच्या वैभवशाली काळाची साक्ष सांगणारा तो शेवटचा उमराव होता. अनेक लढतींचा अनुभव घेऊन केस पांढरे झालेला मुरब्बी असा तो होता. अनुभवांनी समृद्ध असे जीवन व्यतीत करण्याची संधी त्याला मिळाली होती. राजनीति-व्यवहारातही तो तरबेज होता. असे असून देखील अशा अरिष्टाच्या समयी आवश्यक असते त्याप्रमाणे या मोहिमेची सर्वश्रेष्ठ हुकूमत आणि अधिनायकी निजामुल्मुल्कास प्रदान केल्या नाहीत. इतकेच काय पण आपल्या धन्याचा विश्वास सांभाळणेही त्यास जमवू देत नव्हते. कारण खान दौरान

६ हॅन्वे (खंड दोन, ३६०) म्हणतो की, निजामाविषयी मत्सर आणि त्याच्याशी झालेला मतभेद यांमुळे खान दौरान येथेच थांबला. दिल्ली क्रॉनिकलमध्ये म्हटले आहे की, त्यांच्या फौजांच्या हिशेबनिसांची नेमणूक १४ डिसेंबर आणि २० डिसेंबर इतक्या उशीरा झाली. यावरून त्यात बोकाळलेल्या त्यावेळच्या ऐशारामाची कल्पना येईल. सदरचा महिना (२–३१ डिसेंबर) रमजानचा महिना म्हणजे उपवासाचा महिना होता हे खरे आहे; पण रमजान महिन्यात मोहिमेवर जाण्याचे औरंगजेबदेखील पत्करत असे.

आणि हिंदुस्थानी पक्ष बादशहाचे कान, एकसारखे निजामुल्मुकाविरुद्ध फुंकत. या खान दौरानला राजपुतांच्या शौर्याविषयी फार आदर वाटे. आपले आश्रित असलेले हिंदू राजे, विशेषत: सवाई जयसिंग, याला बादशहाच्या मदतीस धावून येण्याविषयी फर्माने पाठविण्यास तो कारणीभूत होता. पण औरंगजेबाच्या काळापासून, राजपुतान्याचा मुलूख शाही साम्राज्यापासून फुटून गेल्यासारखा होता. आपले स्वातंत्र्य घोषित करून राजकीय मुक्तीचे उद्दिष्ट जयसिंग आणि इतर राजपूत राजांनी आता आपल्यासमोर ठेवले होते. साम्राज्याचे विसर्जन करण्याच्या कामी मदत करण्यासाठी ते मराठ्यांना हाक मारीत होते. या राजांनी निरनिराळ्या सबबी पुढे करून येण्यास उशीर लावला. मुहम्मदशाहाने तर बाजीरावास सुद्धा मदतीचे आवाहन केले असे पेशव्यांनी आपला सेनापती पिलाजी जाधव यास पाठविलेल्या पुढील पत्रावरून आपणास कळते.

"मी नेहमीच्या मजला मारीत उत्तर हिंदुस्थानकडे कूच करणार आहे. इराणचा राजा तहमास्प कुली जंग जिंकण्याच्या मोहिमेवर आला आहे. मुहम्मदशाहाच्या मदतीसाठी मी मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व (उदाजी) पवार यांच्या नेतृत्वाखाली माळव्यातील फौजफाटा पाठवीत आहे. दिल्लीच्या बादशाहाला अशा प्रसंगी मदतीसाठी जावयास मिळत आहे हे आमच्या राजेशाहीच्या (म्हणजे मराठेशाहीच्या) वैभवाचे प्रतीकच म्हणावयास पाहिजे." [राजवाडे, खंड सहा, क्रमांक १३०] पण मराठ्यांवर मदार टाकणे अगदी मनापासून अभिप्रेत धरले असले तरी तसे करणे म्हणजे जीर्ण बांबूवर रेलण्यासारखे ठरले. कर्नाळ येथे बादशाहाच्या मदतीसाठी दक्षिणेतून कसलाच फौजफाटा आला नाही. रणांगणात शाही पक्षाचा पराभव झाल्यानंतरदेखील दिल्लीच्या रक्षणासाठी त्यांची कसलीही फौज वेळेवर येऊन पोहोचली नाही. उलट कर्नाळ येथे शाही छावणीत असलेल्या मराठी दूताला २५ फेब्रुवारी रोजी छावणीतून निसटून, रानावनातल्या वाटेने, दक्षिणेस जयपूर येथे, आसरा घेण्यात धन्यता वाटली. खुद्द बाजीराव देखील आपल्या पुढच्या पत्रात नादिरच्या नर्मदेच्या दक्षिणेकडील चढाईस प्रतिबंध करण्यासाठी नर्मदारेषेचे रक्षण करण्याच्या मनसुब्यात असल्याचे दिसून येते. उत्तर हिंदुस्थानचे मराठ्यांकरवी संरक्षण व्हावे या योजनेचा विचारसुद्धा कधी झाला नाही.

शाही फौजफाट्याने रमजानचा सगळा महिना [डिसेंबर १७३८] दिल्लीबाहेर केवळ आळसात व्यर्थ दवडला. तदनंतर इराण्यांनी अटक येथे नदी ओलांडल्याची बातमी येऊन धडकली. तेव्हा कोठे १७३९ जानेवारी १० रोजी तीन उमराव लाहोरच्या दिशेने हलले. तत्पूर्वी तिन्ही उमरावांनी अगदी एका सुरात आणि अगदी उच्च सुरात बादशाहास फौजेत जातीने दाखल होण्याची निकड केली होती. १८ तारखेला दिल्लीच्या उत्तरेस ५५ मैलांवर असलेल्या पानिपत या ठिकाणी ते येऊन पोहोचले.

त्या दिवशी (१८ जानेवारी) मुहम्मदशाह स्वत: दिल्लीहून निघाला. २७ तारखेला तो पानिपत येथे येऊन पोहोचला. येथे बादशाह येऊन मिळेल या अपेक्षेने हे सेनाधिकारी तब्बल ९ दिवस त्याची वाट पहात थांबले होते! नादिरने लाहोरचा कब्जा घेतला असल्याची बातमी दरबारी समजली होती. तेव्हा, सदर शहर वाचविण्यास आता विलंब झाला असल्याचे त्यांनी मानले. मग कर्नाळ येथेच छावणी टाकावी व शत्रूची वाट पाहात थांबावे;

शिवाय येथे अली मर्दानच्या कालव्याचे विपुल पाणी आहे; तसेच घोडेस्वारांच्या प्रचंड फौजांची फिरवाफिरवी करीत लढाई खेळण्यासाठी लागणारे विस्तीर्ण मैदानही आहे असा विचार झाला. त्याखेरीज अयोध्येचा सुभेदार सआदतखान ३० हजार घोडेस्वारांनिशी निघालेला होता. त्यास येऊन मिळण्याचा अवसर मिळावा यासाठीही थांबणे भाग होते. राजपुतान्याहून देखील कुमक येईल अशी आशा वाटत होती.

म्हणून बादशाहाच्या सल्लागारांनी विशेषत: निजामाने असा निर्णय केला की, लढाईचा धोका पत्करण्यापेक्षा कर्नाळ येथे मोर्चेबंद छावणी टाकलेली बरी. मीर आतिश सअदुद्दीनखान याच्या मार्गदर्शनाखाली छावणीभोवती कित्येक मैल घेराची, छावणी झाकणारी एक मातीची तटबंदी उभारण्यात आली. या तटबंदीच्या रेषेला अनुसरून तोफांची एकमेकींच्या शेजारी-शेजारी मांडामांड केली. दिवसा आणि रात्रीदेखील डोळ्यात तेल घालून खडा पहारा देण्यासाठी खंदकात शिपायांचे पहारे बसविण्यात आले. [आनंदराम, २५; शकीर ४०; क्रॉनिकल; सियर, खंड एक, ९६; बयान ३२, जौहर-इ-समसाम; इलियट-डौसन खंड आठ, ७४.]

## १०९ : कर्नाळ येथील प्रतिस्पर्धी फौजा, शाही छावणी

नादिरच्या कर्नाळ येथे आलेल्या इराणी फौजेच्या संख्येविषयी रुस्तम अलीचा अंदाज ५५ हजार घोडेस्वार असा होता. हा अंदाज सत्यस्थितीच्या अगदी जवळचा अंदाज आहे. मिर्झा महदी याच्या इतिहासावरून आपल्याला समजते की, नादिरशाहाने इराणबाहेर कूच करताना सोबत ८० हजार फौज घेतली होती. वाटेत त्याने कित्येक अफगाणांना भरती करून घेतले होते आणि स्वदेशाहूनदेखील निवडक फौजेच्या तुकड्या त्यास नंतर येऊन मिळाल्या असण्याची शक्यता आहे. तरी पण मोहिमेवर असताना जिंकलेल्या कित्येक किल्ल्यांवर शिबंदी ठेवण्यासाठी त्यास आपली बरीच मोठी फौज नेमावी लागली होती. त्याचप्रमाणे आपल्या पिछाडीचा दळणवळणाचा लांबलचक मार्ग सुरक्षित ठेवण्यासाठी, तसेच आपला सर्वांत थोरला मुलगा इराणास पाठविला तेव्हा त्याच्यासोबत दिलेल्या जबर फौजफाट्या-पायी त्याचे बरेच सैन्य कमी झालेले होते. हॅन्वे सांगतो की, नादिर तिलावरी (म्हणजे अजीमाबादजवळील तारावोरी) येथे पोहोचला तेव्हा त्याच्याजवळ ४० हजार सैन्य होते. अर्थातच यात त्याची आघाडी आणि पिछाडी यांचा समावेश नसावा असे स्पष्ट वाटते. संपूर्ण इराणी छावणीत एक लाख साठ हजार माणसे असावीत. त्यापैकी एक–तृतीयांश माणसे नोकर-चाकर होती. पण तशी असली तरी त्या सर्वांना बसावयास घोडे होते व ते पूर्णपणे शस्त्रसज्ज होते. लुटालूट झालीच तर त्यांना भाग घेता यावा आणि आपल्या सामानसुमानाचा बचाव करता यावा अशी यामागची कल्पना होती. शिवाय नादिरच्या छावणीत सहा हजार स्त्रिया होत्या. इरानी नावाच्या पुरुषांच्या जांभळ्या कापडाच्या लांब कोटासारखेच कोट त्यांनी घातलेले होते व दूर अंतरावरून पुरुष व स्त्रिया यांतील फरक ओळखता येण्यासारखा ठेवलेला नव्हता. [हॅन्वे, खंड दोन, ३६७.]

नादिरच्या चिटणिसाच्या अंदाजानुसार मुहम्मदशाहाच्या शाही फौजेत तीन लाख 'नावाजलेले लढवय्ये', [७] दोन हजार लढाईच्या सरावाचे हत्ती आणि तीन हजाराचे तोफदळ होते. रुस्तम अलीने दिलेले आकडे असे आहेत : दोन लाख घोडेस्वार, अगणित पायदळ,

७ एवढे सगळेच्या सगळे 'नावाजलेले' कसे असतील ? हॅन्वे सांगतो, "ते दोन लाख होते व त्यात बहुतेक भाग घोडदळाचा होता."

पंधराशे हत्ती आणि कित्येक तोफा. [इलियट व डौसन, खंड आठ, ६०]. पश्चात-कालीन गुलाम अली या लखनऊच्या इतिहासकाराने, फौजेच्या संख्येविषयी आणखी अतिशयोक्ती केलेली आहे. त्याने दिलेल्या माहितीनुसार छावणीत पाच लाख घोडदळ आणि पायदळ, तोफखान्याचे विविध व्यासाचे आठ हजार नग आणि अकरा हजार तंबू होते. [इमाद २४]. वजीराचा सचिव आणि पानिपतपर्यंत फौजेबरोबर गेलेल्या आनंदराम याने सांगितलेला आकडा पन्नास हजार घोडेस्वार, शिवाय तीन उमरावांच्या स्वतःच्या खासगी तुकड्या असा आहे. निजामाने आपल्यासोबत फक्त तीन हजार असामी आणले होते असे समजते. म्हणजे कर्नाळ येथे हिंदुस्थानच्या बाजूचा सगळा लढाऊ फौजफाटा ७५ हजार असामींच्या पलीकडचा असण्याची शक्यता नाही.

पण या फौजेसोबत असलेल्या बाजारबुणग्यांची संख्या मात्र अफाट होती. अगदी १८ व्या शतकाच्या अखेरीच्या काळात याच भागात कामगिरीवर असलेली आधुनिक युरोपीय फौजदेखील प्रत्येक लढवय्या सैनिकासोबत नऊ बिगर लढवय्ये चाकर बरोबर ठेवी. लॉर्ड लेक याच्या छावणीत तीन लाख असामी होते; पण त्यापैकी फक्त तीस हजारच लढाऊ शिपाई होते. खुद्द बादशाह आपल्या जनानखान्यासह आणि वैभवशाली उमराव आपल्या परिवारासह मोहिमेवर होते. ही गोष्ट लक्षात घेता कर्नाळच्या छावणीची लोकसंख्या दहा लाख असल्याचा अंदाज आपण केल्यास तो चुकीचा ठरणार नाही.

हिंदुस्थानी छावणीचा घेर १२ मैल लांबीचा होता असे एका अधिकारी व्यक्तीचे म्हणणे पडते. [ हॅन्वे, खंड दोन, ३६४. ] सडे घोडेस्वार आणि उंटावर लादलेला हलका तोफखाना जवळ बाळगणाऱ्या चपळ शत्रूपासून एवढ्या प्रचंड लांबीच्या तटबंदीचे पुरेसे संरक्षण होणे शक्य नव्हते. याचा परिणाम असा झाला की अगदी पहिल्या झपाट्यातच हिंदुस्थानी फौजेची चलनवलन आणि आक्रमक शक्ती संपुष्टात आली; या फौजेचा अनिवार्य कोंडमारा झाला. पुढे २२ वर्षांनी पानिपतच्या लढाईत सदाशिव भाऊच्या मराठा फौजेचाही असाच कोंडमारा झाला होता.

शत्रूचा आघाडीस स्पर्श झाला आणि लगतचा मुलूख छोट्या तुकड्यांना असुरक्षित बनला तेव्हाच बादशाहाचे डावपेच चुकीचे ठरले आहेत याची पावती मिळाली. हिंदुस्थानी फौजेची १० लक्ष असामी बेरीज करून जनावरे ही प्रचंड संख्या लक्षात घेता, अशा फौजेला छावणी टाकण्यास सोयीची जागा मिळणे कठीणच होते. इराणी घोडेस्वार सर्व बाजूंनी हल्ले चढवीत आणि धान्य, चारा, जळण पळवून नेत. त्यामुळे छावणीतील धान्याचे भाव कडाडले. [8] [ रुस्तम अली. ] कर्नाळची लढाई होण्यास अजून चार दिवस उरले असतानाच, या छावणीतील भयंकर संख्येच्या जमावाने, सगळा अन्नसाठा खाऊन फस्त केला आणि तद्नंतर पाच दिवसांची उपासमार घडल्यावर, सगळ्याच्या सगळ्या फौजांनी शरणागती स्वीकारली.

८ यावेळी दिल्लीत असलेला अली हजीन हीच गोष्ट सांगतो : "हिंदुस्थानी फौजेने आपला तोफखाना आपल्या भोवती मांडलेला होता. त्यामुळे स्वतःच्या तोफांचे कडे त्याच्याभोवती पडलेले होते. शिवाय त्याच्या प्रत्येक बाजूला किझिलबाश मंडळीचे वर्तुळ होतेच. त्यामुळे छावणीबाहेरच्या भागाशी संपर्क ठेवणे त्यांना अशक्य होऊन बसले. अशात दुर्भिक्ष्य आणि दुष्काळ याचे संकट फौजेवर कोसळले. ......मुहम्मदशाह आणि त्याचा अवाढव्य फौजफाटा याना आपल्या भोवती भोवती किझिलबाश घोडेस्वार सर्व बाजूंनी आडवे येऊ लागले; तेव्हा हालचाल करण्याची त्यानी भीती घेतली आणि आपल्या ठाण्याचे आपल्या हातून रक्षण होणे कठीण आहे, हे खुद्द त्यानाच कळून चुकल्यानंतरदेखील ते त्याच ठिकाणी थांबून राहिले."

## ११० : नादिर कर्नाळ येथे हिंदुस्थानी फौजेच्या संपर्कात येतो; फेब्रुवारी १२

दिल्ली–लाहोर या प्राचीन हमरस्त्यावर, मुघल राजधानीच्या उत्तरेस ७५ मैलांवर व पानिपतच्या उत्तरेस वीस मैलांवर कर्नाळ शहर आहे. ताराओरीच्या दक्षिणेस ९ मैलांवर ते आहे. उत्तर हिंदुस्थानचे स्वामित्व कोणी गाजवावे याचा निर्णय करणाऱ्या कित्येक ऐतिहासिक लढाया सदर ताराओरी या ठिकाणी झाल्या आहेत. पांडव आणि कौरव यांत झालेल्या पौराणिक भारतीय युद्धाचे ठिकाणसुद्धा येथून २२ मैल उत्तरेस आहे. तेव्हा हिंदुस्थान आणि इराण यांतील निर्णायक लढत कर्नाळ येथे झडली हे, अशा परिस्थितीत, अगदी स्वाभाविक वाटते.

शहराच्या पूर्व बाजूच्या कडेकडेने अली मर्दानखानाचा कालवा वाहतो. हा कालवा आणि कालव्याच्या पूर्वेस असलेली यमुना नदी याच्या दरम्यान पाच-सात मैल रुंदीचे मैदान आहे. असले मैदान प्रचंड संख्येच्या घोडेस्वार पलटणींच्या युद्धजन्य हालचालींना उपयुक्त असते. मुहम्मदशाहाने आपली मोर्चेबंद केलेली छावणी कालव्याच्या पश्चिम किनाऱ्यावर ठेविली होती. या छावणीस लागूनच दक्षिणेस कर्नाळचे तटबंद शहर होते. आक्रमक फौजेचे आघाडीचे ठाणे सराई अजीमाबाद हे होते. सदर ठिकाण कर्नाळपासून १२ मैल अंतरावर आणि कालव्याच्या पश्चिमेस सुमारे १० मैल अंतरावर होते. अजीमाबाद आणि कर्नाळ यामधील जमिनीचा पहिल्या आठ मैलांचा भाग दाट जंगलाने[१] व्यापलेला होता; हे जंगल ओलांडणारी एकच निरुंद वाट होती. कर्नाळच्या सीमेस लागून उत्तरेस ४ मैलांवर जंगलाचा मागमूस नसलेले सपाट मैदान होते. म्हणजे मुहम्मदशाहाची आघाडी आणि उजवी बाजू अनुक्रमे जंगल आणि कालवा या नैसर्गिक गोष्टींनीच सुरक्षित बनलेली होती. हिंदुस्थानी फौजांची रणांगणातील मांडामांड पुढीलप्रमाणे झाली. निजामास आघाडीला ठेवले. आघाडीचे तोंड उत्तरेस किंवा काहीसे वायव्येस होते. निजामाच्या दोन्ही अंगास तोफदळ होते. वजीर फौजेच्या डाव्या फळीत म्हणजे पश्चिम दिशेला होता. बादशाह मध्य बाजूस होता; तर खान दौरान हा फौजेच्या उजव्या फळीत म्हणजे पूर्व दिशेला होता. [ जहानकुशा ३४६, ३४८; हॅन्वे, खंड दोन, ३६४. ]

नादिरशाह सराई अजीमाबाद येथे ११ फेब्रुवारी १७३९ रोजी रविवारी अगदी सकाळीच येऊन पोहोचला. कुर्दिस्तान मधील शेलक्या असामींनी बनलेली, हाजीखान याच्या नेतृत्वाखालची सहा हजार घोडेस्वारांची एक तुकडी, दोन तुकड्यांत विभागली होती. या तुकड्यांनी यापूर्वीच कालव्याच्या दोन्ही काठाने शाही छावणीच्या सीमेपर्यंत सगळ्या मुलुखाची टेहळणी केली होती. या टेहळणी शिपायांनी रणभूमीची परिस्थिती काय आहे याबाबतचा आपला अहवाल सांगितला आणि मुघल छावणीबाहेर पकडलेले कैदी नादिरशाहा समोर हजर केले.

शाही फौजेची मांडामांड कशी आहे, रणभूमी आणि तिचा परिसर यांची परिस्थिती काय आहे याची तंतोतंत माहिती समजून घेतल्यावर समोरून चालून जाऊन हल्ला

१ १९ व्या शतकाच्या आरंभीच्या वर्षी हे जंगल अस्तित्वात होते. थॉर्न (मेम्वा ऑफ दि वॉर पृ. ४८०) १८०५ इ. मध्ये दिल्ली ते सोनपत या पट्ट्याविषयी लिहिताना सांगतो, "हा सगळा मुलूख पूर्वी अली मर्दानखानाने खणलेल्या कालव्यामुळे सुपीक बनला असता, आता येथे जंगल माजलेले आहे. त्यामुळे हा सर्व प्रदेश सामान्यतः अगदी निर्जन भासतो."

करण्याचा बेत टाळण्याचे नादिरशाहाने ठरविले. त्याऐवजी आपल्या डाव्या फळीच्या बाजूला पाण्याच्या मुबलक पुरवठ्यासाठी यमुना नदीची जवळीक ठेऊन कर्नाळच्या पूर्व बाजूने आड वळणाने पिछाडीच्या पानिपत शहरी पोहोचावे व ते शहर काबीज करून मुघलांचे दिल्लीशी असलेले दळणवळण तोडून टाकावे असे त्याने ठरविले. मुहम्मदशाहाने आपल्या छावणीतून बाहेर पडावे आणि नादिरने रणांगण म्हणून निवडलेल्या जागेवर लढाईस कबूल व्हावे किंवा इराणी फौजा कसलाच धक्का न लागता दिल्लीस पोहोचल्या तरी त्याने कर्नाळ येथे असहायपणे अडकून पडावे या हेतूने, नादिरने लढाईचा हा व्यूह रचला होता. [जहानकुशा, ३४४.] त्याचा हा कौतुकास्पद व्यूह यशस्वी तर झालाच, पण त्यासाठी जेवढा वेळ लागेल अशी अपेक्षा होती त्यापेक्षा कमी वेळात, तो यशस्वी झाला.

सोमवारी, १२ फेब्रुवारीच्या सूर्योदयापूर्वी इराणी फौजा सराई अजीमाबादेच्या बाहेर पडल्या. शहराच्या पूर्वेस सुमारे ९ मैलांवर त्यांनी कालवा ओलांडला. कर्नाळच्या ईशान्येस सहा मैलांवरील मैदानी भागात त्यांनी तळ टाकला. कुंजपुऱ्याच्या थोडे उत्तरेस, जेथून यमुना दृष्टिपथात आहे अशा ठिकाणी सदर मैदान आहे हे उघड आहे. फौजेचा मुख्य भाग येथे थांबला. छोटा फौजफाटा संगती घेऊन नादिरशाह मुहम्मदशाहाच्या ठाण्याच्या आसपासच्या भागात रपेट करीत गेला. रणांगणातील निशाणे आणि भोवती पडलेला तोफखान्याचा गराडा यावरून त्या ठिकाणी मुहम्मदशाह असणार असे त्याने ताडले होते. शत्रूची संख्या किती आहे, आपल्या फौजांची मांडामांड शत्रूने कशी केली आहे याची टेहळणी करून तो आपल्या तंबूत परतला.

बादशाहाच्या मदतीसाठी तीस हजार घोडेस्वार, तोफदळ आणि भांडारसाहित्य घेऊन निघालेला अयोध्येचा नवाब सआदतखान पानिपत येथे येऊन दाखल झाला असल्याची बातमी सायंकाळच्या सुमारास त्याच्याकडे येऊन थडकली. त्यास वाटेतच गाठून रोखण्यासाठी इराणी फौजेतील एक तुकडी लगोलग धाडली. त्याच रात्री आणखी एक, जबर बळाची तुकडी मुघल छावणीच्या पूर्वफळीला धमकावण्यासाठी नेमिली. वस्तुतः छापेमारांच्या छोट्या तुकड्या यापूर्वीच बादशाहाच्या छावणीभोवती मैलभर अंतरावरून घोटाळू लागल्या होत्या व पांगलेल्यांना छावणीपासून अलग पाडण्यास त्यांनी सुरुवात केली होती. [ जहानकुशा, ३४९. ]

## १११ : कर्नाळला हिंदुस्थानी पक्ष लढतीसाठी बाहेर पडतो

१७३९ चा फेब्रुवारी १३ मंगळवारचा घातक दिवस उजाडला. कालवा आणि यमुना यामधील पाच मैल रुंदीच्या पट्ट्यातून पुढे सरकण्यासाठी इराणी फौजांनी आपल्या तीन पलटणी बनवून आपली तळाची जागा सोडली. फौजेच्या मध्यभागाचे नायकत्व करणाऱ्या शाहझादा नस्रुल्लाह याला, यमुनेवरून [१०] कूच करीत निजामाच्या फौजांसमोर तोंड करून, मुहम्मदशाहाच्या छावणीच्या उत्तरेस रणांगणातील ठाणे धरण्याविषयी हुकूम झाला. खुद्द नादिरशाह आघाडीचे आधिपत्य करीत होता. तो प्रथम कालव्यासमोरच्या हिंदुस्थानी फौजेसमोर आला. पण मध्यरात्रीच सआदतखान बादशाहास येऊन मिळाला आहे अशी खबर

१० मिर्झा महदी सांगतो, 'यमुना नदीच्या उत्तर बाजूकडून' याचा गर्भितार्थ असा की, नादिरशाहाच्या डाव्या फळास संरक्षण देण्यासाठी शाहझाद्याच्या फौजांना आदल्याच दिवशी नदी पार करून पैलतीरावर घेतले होते. पण ते असंभाव्य वाटते.

त्याला वाटेतच समजली. म्हणून तो आपल्या डाव्या अंगास वळला आणि त्याने आपला तळ प्रशस्त पटांगणात टाकला. हे पटांगण शत्रूच्या पूर्वेस ३ मैलांवर आणि यमुनेच्या पश्चिमेस एक-दोन मैलांवर होते. येथे त्याचा मुलगा त्यास सैन्याच्या मध्यभागासह येऊन मिळाला. या सगळ्या हालचालीत मध्यान्ह टळून गेली. एवढ्यात हिंदुस्थानी फौजा लढत देण्याच्या इराद्याने छावणीबाहेर पडत असल्याचे अकस्मात दिसून आले.

हे कसे घडले हे जाणून घेण्यासाठी शाही छावणीतील घटनाक्रम आपण जाणून घेणे आवश्यक आहे. मदत करण्याविषयी आपल्या धन्याचे आवाहन होताच सआदतखान याने आपला अयोध्येचा सुभा सोडला आणि वीस हजार स्वार, तोफखाना आणि युद्धसामग्री यांसह महिनाभर कूच करीत त्याने कर्नाळ गाठले. तो ७ फेब्रुवारी रोजी दिल्लीस आला व येथे त्याने फक्त एक दिवसच मुक्काम केला. दिल्ली आणि पानिपत हे ५५ मैलांचे अंतर त्याने तीन दिवसांत काटले. चौथ्या दिवशी म्हणजे फेब्रुवारी १२ या तारखेस त्याने जिवाचा आटापिटा करून उरलेले २० मैलांचे अंतर पार केले आणि आपल्या फौजेच्या मुख्य भागासह तो मध्यरात्रीच्या सुमारास कर्नाळ येथे येऊन थडकला; पण त्याची छावणी आणि त्याचे सामानसुमान मंदगतीने कूच करीत असल्याने, मागे राहिले. मागून येणाऱ्या मंडळींची एक लांबच्या लांब रांग होती व तिचे संरक्षण करण्याची पुरेशी सिद्धता ठेवलेली नव्हती. ही मंडळी एक मजल अंतरावर मागे होती. असे घडणे हे हिंदुस्थानी फौजांच्या कुचाच्या बाबतीत नेहमीचीच बाब होती.

आपण पाहिलेच आहे की १२ तारखेस इराणी टेहळे शिपाई आपल्या छावणीपासून ३२ मैलांपर्यंत थडकून आले होते व त्यांनी सआदतखान याच्या पानिपत येथील ठाण्याची खबर आणली होती. पण हिंदुस्थानी फौजांचे हेरखाते मात्र अगदीच बेफिकीर किंवा अकार्यक्षम असावे. शत्रूचा ठावठिकाणा कोठे आहे हे सआदतखानाने शोधण्याचा प्रयत्न केला नव्हता किंवा संभाव्य हल्ल्यापासून आपल्या सामानसुमानाची रांग सुरक्षित ठेवण्याची काळजी-देखील त्याने वाहिली नव्हती. कर्नाळ येथे खुद्द बादशाहदेखील तितकाच बेपर्वा होता. गुलाम हुसैन सांगतो त्याप्रमाणे, 'नादिर लाहोरहून निघून आपल्या अगदी जवळ येऊन ठेपला आहे याची शाही छावणीवर कोणालाच दाद नव्हती. एके दिवशी धान्य व्यापाऱ्यांची (बंजाऱ्यांची) काही माणसे चारा गोळा करण्यासाठी सहा ते आठ मैल अंतरावर पुढे गेली असता, इराणी टेहळ्यांनी त्यांशी मुकाबला केल्याने, ती जायबंदी होऊन, तसेच भीतीने धडकी बसून परतली; तेव्हा कोठे 'नादिर आला! नादिर आला! 'असा आक्रोश सबंध छावणीत घुमला.' सगळ्या फौजेवर मूर्तिमंत भीतीचा पगडा बसला. सआदतखानाच्या येण्याविषयीची तळमळ तीव्रतर झाली आहे असे दिसून आले.' [ एक, ९६. ]

फेब्रुवारी १२ च्या मध्यरात्री सआदतखान कर्नाळनजीक येऊन पोहोचला. एक मैल अंतर उरले असताना खान दौरान त्याच्या स्वागतार्थ सामोरा गेला व सआदतला छावणीत घेऊन आला. सकाळी तो बादशाहापुढे हजर होण्यासाठी गेला. नेहमीचे शिष्टाचाराचे सोपस्कार पार पडल्यावर युद्धाविषयीची मसलत झाली. त्यावेळी बादशाह हजर होताच. युद्धकामगिरीच्या मनसुब्यांची चर्चा झाली. त्याच वेळी खबर आली की इराणी फौजांतील आघाडीच्या छापेमारांनी सआदतखानाच्या सामानसुमानावर हल्ला चढविला आणि पाचशे माल लादलेले उंट त्यांनी पळवून नेले. [ हरचरण. ]

बादशाहापुढच्या गालिचावर खानाची तलवार पडलेली होती. खबर ऐकताच खानाने ती उचलून घेतली आणि इराणी फौजेशी लढण्याची व त्यासाठी निघण्याची त्याने बादशहास परवानगी मागितली.[११] निजामाने सबुरीचा सल्ला दिला. अयोध्येहून आलेले शिपाई महिनाभराच्या अखंड प्रवासाने अगदी शिणून गेलेले आहेत आणि लढाईयोग्य होण्यास त्यांना एक दिवसाच्या विश्रांतीची गरज आहे असे निजामाने नेट लावून सांगितले. शिवाय सूर्य उतरणीला लागला होता. त्यामुळे रणांगणात पोहोचल्यानंतर जेमतेम तीन तासांपुरताच सूर्यप्रकाश मिळणार होता. लढाईसाठी आज सज्ज व्हा असा इशारा शाही फौजांना यापूर्वी अजून दिलेला नाही; त्यामुळे आपापल्या हत्यारांनिशी हजर होऊन लढाईची मांडणी उभी करण्यास बराच वेळ लागेल ही बाबदेखील खान दौरान याने निदर्शनास आणून दिली. म्हणून ( दोन्ही उमरावांनी आग्रह धरला की ) दुसऱ्या दिवशीच लढत देणे इष्टतर ठरेल; त्या वेळी लढाईचा योग्य व्यूह रचून, तोफदळ सोबत घेऊन परिपूर्ण सज्जता ठेवून चालून जाणे तसेच लढाईचे, त्यांच्या सरावाचे डावपेच लढविणेही त्यांना शक्य होणार होते. एक दरबारकरू तर सआदतखानाला असे देखील म्हणाला की, तुझ्यासारख्या असामीला पाचशे उंटांचे ते काय होय? तुला नादिरशाहाचा पराभव करता आला आणि तो उद्या समोरासमोरच्या लढाईत सहज मिळण्यासारखा आहे, अशी आपणा सर्वांनाच उमेद आहे तर सगळी इराणी शाही छावणी आणि तिची संपत्ती ही आपले सावजच नाही का?

पण सआदतखानाने हा सल्ला मनावर घेतला नाही व आपल्या छावणीसोबतींच्या सुटकेसाठी बाहेर पडण्याचा त्याने हेका धरला. माझ्या सर्व सैनिकांनी एकत्र यावे आणि मजमागून यावे अशी दवंडी आपल्या छावणीच्या भागात देण्यासाठी काही माणसे रवाना करून तो हल्ल्याच्या ठिकाणाकडे घाईघाईने निघाला. त्यावेळी त्याच्या सोबतच्या तसेच त्याच्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या त्याच्या शिपायांची संख्या म्हणजे हजारभर घोडेस्वार, काही शेकडे पायदळ शिपाई अशी होती. कसलाच तोफखाना त्यासोबत नव्हता. हिंदुस्थानी घोडेस्वाराची चाकरी त्याच्या घोड्याच्या जिवावर अवलंबून असे. घोडा ही त्याची खासगी मालमत्ता असे. या घोड्याची अतिदमणूक करण्यास हिंदुस्थानी घोडेस्वार कमालीचा नाखुश असे. महिनाभर जलदगतीचे कूच केले असल्याने त्या दिवशी हालचाल करण्यास त्यांनी साफ नकार दिला. आपला धनी बादशाहाच्या भेटीस गेला असल्यामुळे तो लढाईसाठी बाहेर पडला असण्याची शक्यता वाटत नाही असे सआदतखानाचे शिपाई त्यावेळी बोलले. तरीही अखेरपर्यंत चार हजार घोडेस्वार आणि एक हजार पायदळ येवढे, असामी सआदतखानास येऊन मिळाले. [ बयान ३४, आनंदराम २७. ]

११ हरचरण सांगतो की, सआदतखान मूळ इराणचा रहिवासी असल्याने बादशाह त्यावर भरोसा ठेवत नव्हता. कुराणावर हात ठेऊन स्वामिनिष्ठेची आपल्या समोर शपथ घेण्यास त्याने सआदतखानाला भाग पाडले होते. सियर प्रतिपादतो की, सआदतखानाने बादशाहाचा निरोप घेतला होता आणि त्यास मुकरर करून दिलेल्या छावणीच्या जागी ( खान दौरानच्या तंबूच्या मागच्या जागी तो आपल्या सामानसुमानाच्या) येण्याची वाट पाहात थांबला असता त्यास सदरच्या हल्ल्याची खबर समजली. पण ( त्यावेळी छावणीत हजर असलेला ) शकीरखान, अब्दुल करीम आणि हरचरण सांगतात की, सदरच्या हल्ल्याचा वृत्तांत त्याने बादशाहाच्या दरबारातच ऐकला. दिल्ली क्रॉनिकलमध्ये सांगितले आहे की, बाहेर पडून इराणी फौजेवर हल्ला चढविण्यास बादशाहाने सआदतखानाला फर्माविले. आनंदराम सांगतो की, त्या दिवशी लढण्याबाबत खान दौरानने उपस्थित केलेल्या हरकती बादशाहाने फेटाळून लावल्या. इतर सर्व इतिहास-तज्ज्ञांच्या मते लढाईची कृती दुसऱ्या दिवसापर्यंत लांबणीवर टाकण्याच्या निजामाच्या प्रस्तावास बादशाहाने संमती दिली.

सआदतखान रणांगणात उतरला तेव्हा इराणी छापेमारांनी पळून जाण्याचा बहाणा केला व अशा प्रकारे सआदतखानास आपल्या पाठलागाच्या भरीस पाडून त्याला त्याच्या छावणीपासून दूर, दोन मैल अंतरावर जाण्याच्या मोहात पाडले. सआदतखानाने बादशाहाकडे जासूस पाठवून विजय परिपूर्ण करण्यासाठी मदत पाठविण्याची विनवणी केली. मुहम्मदशाहाने निजामाचा सल्ला घेतला. लढत शाही छावणीच्या पूर्व बाजूस चालू आहे, त्या बाजूस खान दौरानची फळी म्हणजे फौजेची उजवी फळी सर्वांत जवळ असल्याने खान दौराननेे जावे असे उत्तर निजामुलमुल्काने दिले. खान दौराननें हुकूम शिरोधार्य मानला.[१२] आपली सर्व तुकडी निघण्यास सज्ज होण्याची किंवा तोफखाना ओढून बाहेर काढला जाण्याची वाट न पाहता तो हत्तीवर आरूढ झाला आणि निघाला. तो शिपाईवर्गात फारच प्रिय होता. त्यामुळे खान दौरान लढाईसाठी निघून गेला आहे असे कळताच कित्येक शिपाई शस्त्रसज्ज झाले आणि आपण होऊन त्यास जाऊन मिळाले. अशा प्रकारे शिपायांचे जथेच्या जथे, एकामागून एक असे त्याजकडे गेले. अखेरीस खान दौरान भोवती आठ हजारांची फौज जमा झाली.

तद्‌नंतर तीन प्रहरी खुद्द बादशाह आपले तंबू सोडून वजीर समवेत बाहेर आला आणि कालव्याच्या बाजूस खड्या असलेल्या व्यूहरचित सैन्यात जाऊन तो उभा ठाकला. पण युद्धात पडण्यापेक्षा युद्ध पाहाण्याचीच त्याची वृत्ती दिसली. निरनिराळ्या तुकड्यांना युद्धावर निघण्यास झालेला विलंब, युद्धाच्या अगोदर आखून ठेवलेल्या समाईक योजनेचा अभाव आणि सबंध हिंदुस्थानी पक्षाच्या युद्धव्यवहारावर सर्वश्रेष्ठ हुकूमत असण्याचा अभाव या कारणांमुळे तिन्ही तुकड्या एकमेकांपासून सुमारे मैलभर अंतराने अलग पडलेल्या होत्या. सआदतखानाच्या फौजेनिशी हिंदुस्थानी पक्षाची उजवी फळी बनली होती. ही फळी अतिपूर्वेला यमुनेच्या जवळ होती. खान दौरानची तुकडी आता फौजेची मध्य बाजू बनली. ही मध्य बाजू मैदानी मुलुखाच्या मध्यभागी ठाण मांडून उभी होती. वजीर आणि बादशाह यांच्या फौजेची डावी फळी तयार झाली होती. ही फळी कालव्याच्या कडेला उभी होती. हळूहळू दिवसाच्या अखेरीच्या वेळी शाही पक्षाचे निरनिराळे गट रणांगणात एका पाठोपाठ एक याप्रमाणे येऊन दाखल झाले. तेव्हा सर्वत्र यांचीच भाऊगर्दी उसळली. आपल्या छावणी-पासून लढाईच्या जागेपर्यंत पसरलेले सगळे मैदान या भाऊगर्दीने, वर वर्णन केलेल्या दोन मोकळ्या जागा वगळता, गच्च भरून गेले. ( बादशाहाच्या नेतृत्वाखाली ) डाव्या फळीने रणांगणातला तो तोफखाना खंदकांच्या आडोशातून ओढून बाहेर काढला. आपल्या प्रमुख अमलदारांसाठी त्यांनी राहुटयाही ठोकल्या. पण शत्रूस भिडून लढाई खेळण्याचे काम मात्र त्यांनी मुळीच केले नाही.

पण ही फौज म्हणजे नुसता गोंधळ करणारा समुदाय होता. त्यात एकजीव नव्हता. या फौजेला चैतन्य देणारा आत्माच नव्हता. हुकूमत करणाऱ्यांमध्ये एकमत नव्हते. खरे म्हणजे नेतृत्व नामक भाग मुळी नव्हताच. फौजेचा मुख्य भाग लढाईची झळ लागणाऱ्या ठिकाणा-पासून फार दूर अंतरावर गप्प उभा होता. संग्रामास आपल्या पक्षाच्या दृष्टीने उपकारक ठरेल असले कसलेही कृत्य त्यांच्या हातून घडले नाही. त्यांच्या प्रचंड संख्येचा काय झाला असेल तो परिणाम हाच की, माघार घेताना त्यांची कत्तल अधिक भयानक प्रमाणात झाली.

१२ ( बयानानुसार ) ताबडतोब पण आनंदरामानुसार थोडीफार कुरकूर करून मग.

शत्रू मात्र अतिशय चपळ होता. शत्रूपक्षाचे नेतृत्व तत्कालीन आशियातील सर्वश्रेष्ठ सेनानीकडे होते. त्याची फौज हिंदुस्थानी शिपायांच्या गर्दीवर येऊन आदळली; एका अर्थाने ही गर्दी त्यांनी टाळली देखील. शिपायांची ही भाऊगर्दी टाळणेच सर्वांत अधिक लाभदायक आहे असे त्यांना आढळून आले. नादिरशाहाने आपल्या सेनानायकी प्रतिभेच्या जोरावर हिंदुस्थानी फौजेचा संख्याबळविषयक वरचढपणा आणि कित्येक भारतीय सैनिकांनी, अगदी प्रतिकूल परिस्थितीत, जिवावर उदार होऊन गाजविलेले शौर्य निष्प्रभ केले.

## ११२ : कर्नाळची लढाई, फेब्रुवारी १३

मध्यान्ह उलटल्यानंतर सआदतखानाची फौज मैदानी प्रदेशात पुढे सरकून येत आहे असे दिसले. तेव्हा ती बातमी नादिरला लगोलग कळवली. बातमी ऐकताच नादिर हर्षभरित झाला. त्याचा दरबारी इतिहासकार सांगतो की, असा दिवस उगवावा अशी तो इच्छा करीत होता. आणि असा इच्छित दिवस अनपेक्षितरित्या फार लवकर उगवला होता. आपल्या भोवती जबर मोर्चे उभारून पडलेली हिंदुस्थानी फौज बाहेर आलेली होती. आणि आता लढाईतील डावपेचांना वाव निर्माण झाला होता. अशा डावपेचाच्या युद्धात इराणी सेनापती आपले असामान्यत्व दाखवू शकत होता.

नादिरने आपल्या फौजेची व्यवस्था फार झटपट लावली. रात्रीच्या काळोखाचा आडोसा घेऊन शत्रूस निसटून जाण्याची संधी मिळण्यापूर्वी शत्रूचा पुरेपूर पाडाव करता यावा म्हणून त्याने ही खबरदारी घेतली. आपल्या छावणीचा पहारा करण्यासाठी त्याने एक तुकडी पाठविली. सैन्याच्या मध्य बाजूचे नेतृत्व त्याने आपला मुलगा नस्त्रुल्लाह याजकडे दिले. त्याच्या दिमतीला कसलेले योद्धे व शक्तिमान तोफखाना दिला. आघाडीची हुकूमत त्याने स्वत:कडे घेतली. आपल्या फौजेतील, तीन हजार सर्वोत्तम शिपाई घेऊन त्याने त्यांच्या निरनिराळ्या तीन तुकड्या बनवल्या व त्यांना दबा धरून बसावयाच्या जागा दिल्या; पाचशे चपळ घोडे असलेल्या दोन लहान तुकड्या सआदतखान आणि खानदौरान यांच्या विरुद्ध त्याने धाडल्या. त्या धाडण्यामागे सआदतखान आणि खानदौरान यांना रणांगणाच्या बाजूस ओढून आणण्याचा त्याचा हेतू होता.[१३] स्वत: नादिरने युद्धाचा चिलखती पोषाख नखशिखांत धारण केला होता. दागिन्यांनी सजविलेले शिरस्त्राण त्याने घातले होते. एका चपळ घोड्यावर स्वार होऊन आपल्याच जातकुळीच्या ( अफ्शार ), निवडक एक हजार तुर्की घोडेस्वारांना बरोबर घेऊन तो थेट लढाईत जाऊन उतरला. सगळी इराणी फौज घोडेस्वारांची बनलेली होती. त्यांच्या तोफखान्यात जेजाला होत्या. जेजाला म्हणजे तोड्याच्या मोठ्या बंदुकाच होत्या. त्यांची लांबी ७–८ फूट होती. त्यांना टेकण देण्यासाठी सोय केलेली होती. याखेरीज झंबूरक होते. या लांबड्या जेजालाच होत्या. त्यातून एक-दोन पौंडी गोळे सुटत. "यातला प्रत्येक नग त्याच्या बुंध्यासकट उंटाच्या पाठीवर लादलेला होता. इशारा करताच उंट खाली बसे आणि नग उंटाच्या पाठीवर असतानाच त्यात दारू ठासत आणि ती उडवीत. असा भडिमार करण्याची तालीम उंटाला दिलेली होती." [ जहानकुशा ३५१, हॅन्वे, खंड दोन, ३६८, १५३ ].

---

१३ बयानमधील माहिती वेगळी आहे, "नादिरची उजवी फळी तहमास्प कुली जलैर याच्या, डावी फळी फतह-अली आणि लुत्फअली अफ्शर याच्या, मध्य फळी नस्त्रुल्लाह याच्या हुकूमतीखाली दिली. आणि संगती जेजाला घेतलेल्या चार हजार घोडेस्वारांनी बनलेल्या आघाडीचे नेतृत्व खुद्द नादिरने आपल्याकडे घेतले

युद्धविजयाचा लाभ साधण्यासाठी हिंदुस्थानी लोकांची हत्तीच्या सामर्थ्यावर फार मोठी मदार असे. अशा हिंदुस्थानी फौजेतील हत्तींना गोंधळून टाकण्यासाठी नादिरने युक्ती लढविली. त्याने लाकडी फळ्या एकत्र जोडून तयार केलेले चौरंग दोन उंटाच्या पाठीवर एक याप्रमाणे बांधून टाकले. या चौरंगांवर त्याने ज्वलनशील वस्तू ठेवून त्या रॉकेलने माखल्या. लढाई चालू असताना त्यास आग लावण्याचा हुकूम दिला. भडकलेली आग आपल्या दिशेने जल्दीने चालून येत आहे हे पाहून हत्ती पळून जाणार आणि त्याच्या मागे उरलेल्या हिंदुस्थानी फौजेत अव्यवस्था माजणार यात शंका नव्हती. [ हॅन्वे, खंड दोन, ३६९. ]

इराणी फौजांतील छापेमारांनी रणांगणातील आपल्या जागेची पाहाणी चांगल्या प्रकारे केली होती. येथे नादिरने आपली उत्तमोत्तम अशी तीन हजार फौज ठेवली होती. छापेमारांनी आपल्या जेजाला खाली उतरविल्या. आघाडीच्या दिशेस तोंड करुन त्यांच्या नळ्या टेकाडावर ठेवून त्या भडिमारास सज्ज केल्या. लढाईला दुपारी एक वाजण्याच्या सुमारास आरंभ झाला. सुरूवातीची फैर धनुष्यबाणांची झडली. इराणी टेहळ्या सैनिकांनी पळून जाण्याचा बहाणा केला. आपल्या घोड्यांच्या खोगिरांवरच मागे वळून त्यांनी आपल्या इराणी पूर्वजांच्या चालीरीतीनुसार, दौड चालू असताना, आपल्या धनुष्यातून बाण आणि तोड्याच्या बंदुकांतून गोळ्या झाडल्या. सआदतखानाने पाठलाग चालविलेला होता. तो या पाठलागामुळे शत्रूच्या कचाट्यात सापडला. यावेळी तो शाही छावणीच्या पूर्वेस आणि आपल्या तोफखान्याच्या पाठबळापासून ३–४ मैल अंतरावर दूर गेलेला होता. एकाएकी सआदत-खानासमोरचा पळणाऱ्या शत्रूंच्या घोडेस्वारांनी बनलेला, पडदा मध्यभागी दूर झाला. त्याच्या या मधल्या सापटीतून, शेकडो जेजालामधून त्याच्यावर अगदी जवळून भडिमार झाला [ हरचरण. ] सआदतखानाचे सर्वांत शूर योद्धे पाठलागात अग्रभागी होते. या भडिमारात ते सर्वप्रथम प्राणास मुकले. या खुनी भडिमारास थोडा वेळ तोंड देऊन आघाडीची हिंदुस्थानी फौज पळाली [ आनंदराम ]. पण सआदतखानाने आणखी थोडा वेळ रणांगणातील आपला जम कायम ठेवला. त्याच्या सोबत त्याचे इमानी शिपाई मरेपर्यंत लढत राहिले. पण सायंकाळच्या वेळी मात्र रणांगण सोडणे त्याला भाग पडले. अशा प्रकारे मुघल सैन्याच्या अतिउजव्या फळीतील लढत संपुष्टात आली.

रणांगणाच्या अन्य भागात असलेल्या खान दौरानच्या पलटणीची देखील अशीच गत झाली. पण फौजेची मध्यबाजू बनलेल्या खान दौरानने जरा जास्त वेळ जागा लढविली. इराणी जेजालांच्या–तोफांच्या झटपट झालेल्या भडिमारामुळे त्याच्या फौजफाट्यातील कित्येक असामी जीवानिशी गेले. भडिमारास प्रत्युत्तर देण्याचा अवसरदेखील मिळाला नाही. नादिरच्या कौशल्यपूर्ण डावपेचांमुळे, तसेच हिंदुस्थानी सेनाधिपतींचा बेधडकपणा आणि त्यांचे अभावाने तळपणारे रणनायकी कौशल्य या गोष्टी नादिरच्या पथ्यावर पडल्यामुळे हिंदुस्थानी फौजेच्या तीन फळ्या एकमेकींपासून मैल मैल अंतरावर अलग पडल्या होत्या. त्यामुळे प्रत्येक फळीतील शिपायांच्या कानावर रणांगणाच्या इतरत्रच्या भागातील भडिमाराचे आणि गोळीबाराचे आवाज येत होते. पण तेवढ्यावरून आपल्या भाईबंदांची कशी घाबरगुंडी उडालेली आहे याची कल्पना त्यांना येत नव्हती; मग त्यांच्या मदतीसाठी धावून जाणे तर दूरच राहिले. सआदतखानाशी सहकार्य साधावे असे खान दौरानने खूप मनात आणून पाहिले पण खान दौरानला ते प्रत्यक्षात साधता आले नाही. शाही पक्षात निज़ाम हा सर्वांत जास्त

समर्थ सेनानी होता. पण तो सबंध दिवसभर अगदी सुस्त राहिला. त्याने खान दौरान किंवा सआदतखान यांना काडीचीही मदत केली नाही. (अब्दुल करीम सुचवितो त्याप्रमाणे) हे दोन उमराव या लढाईत पार निकालात निघाले तर आपल्या या प्रतिस्पर्ध्यांच्या जागा आपणास मिळतील अशा आशा बहुधा निजामास वाटत असावी. बादशाहा सुद्धा पुरुषार्थाने वागला नाही. डाव्या फळीच्या टोकाला एखाद्या लाकडी पुतळ्याप्रमाणे तो उभा होता. जेथे खणाखणी चालू होती तेथे शत्रूपेक्षा हिंदुस्थानी फौजांचे संख्याबळ अगदीच कमी होते आणि त्यांच्या अवजड तोफखान्यांचे त्यांना साह्य होणे अंतराच्या अडचणीमुळे दुरापास्त झाले होते. त्यांचे सेनापती उंच हत्तीवर आरूढ झाले होते. त्यामुळे नेम धरून त्यांच्यावर मारा करणे शत्रूस सोपे जात होते. चलाख इराणी घोडेस्वार शाही फौजेभोवती घोटाळत होते. पण ते शाही फौजेच्या शस्त्रांच्या माऱ्याच्या पलीकडे होते.

प्रचंड रक्तपात घडविणारा नादिरच्या तोफखान्याचा भडिमार दोन एक तास चालू राहिला. हिंदुस्थानी शिपाई शौर्याने लढले; पण धारातीर्थावरील त्यांचे पतन म्हणजे एक व्यर्थ बळी ठरला. कारण (अब्दुल करीम यांच्या शब्दात सांगावयाचे तर) "गोळ्यांना बाण उत्तर देऊ शकत नाहीत." जेव्हा परिस्थिती अगदीच भयाण बनली आणि आपले बहुतेक सगळे अमलदार ठार झालेले आहेत असे दिसले तेव्हा खान दौरानच्या पदरीचे हजारभर शौर्यशाली योद्धे पायउतारा झाले आणि हिंदुस्थानी चालीरीतीनुसार आपल्या लांब झग्याचा घोळ कमरेस आवळून, मरेपर्यंत पायी लढत राहिले. [बयान] खुद्द खान दौरानच्या चेहऱ्यास झालेल्या जखमेमुळे तो मरणाधीन झाला होता आणि आपल्या हौद्यात बेशुद्ध होऊन पडला होता. परंतु त्याच्या पदरच्या इमानी चाकरांनी मजलीस राय या त्याच्या भांडारीच्या नेतृत्वाखाली हत्तीस घेरा घातला आणि त्या जिवावर उदार झालेल्या प्रसंगातून त्यांनी त्याला सूर्य मावळण्याच्या सुमारास छावणीस परत आणले खरे; पण तेथे तो मरण पावला. [आनंदराम]

## ११३ : भारतीय पक्षाचा पराभव आणि त्यांची झालेली हानी

गेले तीन महिने पायास झालेल्या एका जखमेमुळे होणाऱ्या त्रासापायी सआदतखान याला घोड्यावर बसता येत नव्हते किंवा चालताही येत नव्हते. तो खुर्चीत बसून अथवा हत्तीवर बसून एका ठिकाणाहून दुसरीकडे जात असे. त्याला या लढाईत दोन जखमा झाल्या होत्या तरी, एक अपघात न होता तर, तो सुरक्षितपणे छावणीस परतू शकला असता. याच्या हत्तीवर याचा पुतण्या निसार मुहम्मद खान शेर जंग याच्या चवताळलेल्या हत्तीने हल्ला करून या हत्तीस इराणी सैन्याच्या फळीत ढकलण्यास आरंभ केला. सआदतखानाच्या असामींनी हत्तीस तलवारींनी व खंजिराने वार करून, त्यास थांबविण्याचा प्रयत्न केला तरी उपयोग झाला नाही. शत्रूचा भोवती वेढा पडला असता, सआदतखानाने आपले पकडणे रोखण्यासाठी बसल्या जागेवरून बाणांचा वर्षाव चालू ठेवला. यावेळी सआदतखानाच्या नैशाबूर या मूळ गावचा रहिवासी एक तरुण इराणी सैनिक मोठ्या धिटाईने या हत्तीकडे दौडत आला. त्याला त्याच्या नेहमीच्या नावाने संबोधून ओरडला, "मुहम्मद अमीन! तुला वेड लागले आहे काय? कोणाशी तू लढतो आहेस? अजून तू कोणाच्या भरोशावर आहेस? " नंतर त्याने आपला भाला जमिनीत घुसवला; आपल्या घोड्याचे लगाम त्याभोवती गुंडाळून तो सआदतखानाच्या हौद्यापासून

लोंबकळणाऱ्या दोराने वर चढून सआदतखानापाशी आला. यावेळी मात्र खान शरण आला. त्याला नादिरच्या तळावर नेण्यात आले. [सिअर, खंड एक, ९७.]

हे दोन पुढारी लुप्त झाल्यावर भारतीय फौज जणू वितळून गेली. इराणी घोडेस्वारानी त्यांचा पाठलाग केला व त्यांची भयानक कत्तल केली. बादशाह आपल्या इतर उमरावांसमवेत युद्धसज्ज स्थितीत कालव्याच्या काठावर (रणांगणाच्या अतिपश्चिमेला) हल्ल्याची अपेक्षा धरून उभा ठाकलेला होता. पण ती जागा पक्की मोर्चेबंद होती. तेथे अवजड तोफखानादेखील होता. म्हणून त्या जागेवर हल्ला करण्यापासून नादिरशाहाने आपल्या फौजेस परावृत्त ठेवले होते. बादशाहास शरण आणण्यासाठी यापेक्षा अधिक खात्रीचे व अधिक सोपे उपाय त्याला माहीत होते. सूर्य मावळण्याच्या वेळी आपले तख्त किंवा आपली जनता यांचा बचाव करण्यासाठी यत्किंचितही धडपड न करता मुहम्मद शाह छावणीस परतला.[14] पुरे तीन एक–तास देखील झाले नाहीत तोच लढाई संपली होती. जुहरच्या प्रार्थनेच्या वेळी सुरू झालेली लढाई असरच्या प्रार्थनेच्या वेळी संपलीदेखील होती. [जहानकुशा, ३५१].

हिंदुस्थानी फौजेची झालेली कत्तल भयानक होती. शंभर सेनाधिकारी आणि तीस हजार सामान्य शिपाई ठार झाले; गिरफदार झालेल्यांची संख्या अफाट होती, असे नादिरच्या दरबाराचा इतिहासकार सांगतो. पण ती अतिशयोक्ती आहे. [जहानकुशा, ३५३.] तद्नंतर अल्प काळातच इराणात हॅन्वेच्या कानी आले की, १७ हजार भारतीय सैनिक लढाईत ठार झाले. हरचरणदास याचा आकडा २० हजारांचा आहे. शाही छावणीतील मराठा राजदूत एका हकीकतीत १० ते १२ हजार असा आकडा सांगतो; तर नंतर पाठविलेल्या अहवालात ७ ते ८ हजार असा आकडा सांगतो. [ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र क्र. ४१.] रुस्तम अली सांगतो की एकट्या खान दौरानचे ५ हजार असामी कामास आले. त्यात सआदतखानाच्या पलटणीचा निदान तीन हजाराचा आकडा मिळवावयासच हवा. तेव्हा ठार झालेल्यांची बेरीज ८ हजार भरते.

ठार झालेल्या अमलदारांत मुजफ्फरखान (खान दौरानचा धाकटा भाऊ), खान दौरानची तीन मुले (अली हमीद, मुहतरम व आणखी एक), अस्लिहखान (बादशाहाच्या शरीररक्षकांचा अधिपती), अली अहमदखान,[15] शहदाद अफगाण, यादगार हसनखान (कोका), अश्रफखान, इअतिबारखान आकिल बेग कंबलपोश ("कंबलवाला"), मीर कालू (मीर मुश्रीफ याचा मुलगा ) आणि रतनचंद (शाही वेतन-खात्यात कार्यालयीन साहाय्यक असलेला इतिहासकार खुशहालचंद याचा मुलगा) यांचा समावेश होता. सआदतखान, त्याचा पुतण्या शेरजंग तसेच ख्वाजा आशूरा (खान दौरान याचा एक मुलगा) यांना जिवंत पकडण्यात आले.

---

१४ बयानच्या पृ. ४१ वर सांगितलेली मूर्खपणाची हकीकत मी फेटाळतो. हॅन्वे ( खंड दोन, ३६९ ) सांगतो की, लढाई नंतरच्या रात्री शाही छावणी एवढी रोडावली होती की, बादशाहाच्या तंबूपासून निजामाच्या तंबूपर्यंतच्या दोन मैलाच्या भागात माणसांचा वावर दिसून येत नव्हता.

१५ मह्दी आणि बयान यानी केलेला उल्लेख असा आहे. पण आनंदराम आणि क्रॉनिकल यांतील मजकुरात हमीदअली असा वर्णविन्यास आहे. बयान आणि आनंदराम त्यास कोका संबोधतात.

इराणी फौजेच्या बाजूस अडीच हजार असामी ठार झाले आणि याच्या दुप्पट असामी जखमी झाले, असे हॅन्वे सांगतो. प्रत्येक ठार झालेल्या इराणी सैनिकामागे सात हिंदुस्थानी सैनिक ठार झाल्याचा अंदाज त्याने केला आहे. ठार झालेल्यांचे दोन्ही पक्षातील आकडे अतिशयोक्त असले तरी मृत्युबाबतचे दोहोंमधील हॅन्वेने सांगितलेले प्रमाण सत्याच्या जवळपास असावे, असे मला वाटते.[१६]

विजयीपक्षास झालेला लाभ प्रचंड होता. हत्ती, रणांगणातील खजिना, तोफा, बाडबिस्तरा, सामान वगैरे एकूण एक गोष्टी खंदकाबाहेर काढल्या. कोणतीही चीजवस्तू त्यातून सुटली नाही. लूट अक्षरशः अगणित होती. सआदतखान आणि खान दौरान हे रणांगणातून बाद झाल्याचे दिसताच, खुद्द त्यांच्याच अनुयायांनी आणि मुघल छावणीसोबत असणाऱ्या बाजारबुणग्यांनी, त्यांच्या छावणीची लुटालूट चालविली. क्षणार्धात, या दोन उमरावांच्या विस्तीर्ण छावणीची मागमूस देखील उरला नाही. तंबू नावास देखील उरले नाहीत. [शाकिर, सियर, खंड एक ९६.] खान दौरानचा मृतप्राय देह छावणीस परत आणला तेव्हा त्याच्या चाकरांना, त्याचे डोके आसऱ्याखाली ठेवता यावे म्हणून, दुसरीकडून एक राहुटी आणवावी लागली व तिलाही बांबूचा देखील आधार नव्हता.

हिंदुस्थानी फौजेवर भीतीचा जबरदस्त पगडा बसला. उरलेले सगळे सैनिक घोड्यावर खोगिरे चढवून, शत्रूच्या हल्ल्यास तोंड देण्याच्या तयारीत, सबंध रात्रभर छावणीच्या कुंपणापाशी पहारा देत बसले. [शाकिर; क्रॉनिकल.]

## ११४ : हिंदुस्थानींच्या कर्नाळ येथील पराभवाची कारणे

युद्धातील हत्यारे आणि लढण्याची पद्धती यांमध्ये शत्रू वरचढ ठरल्यामुळे तसेच शाही फौजेतील सेनानायकत्व हिणकस निघाल्यामुळे कर्नाळ येथे हिंदुस्थानी फौजेचा पराभव झाला.

नादिर हा खरे पाहता इराणी नव्हता. तर तो इराणच्या भूमीवर कित्येक शतकांपूर्वी स्थायिक झालेल्या तुर्क टोळीत जन्मलेला होता. त्याचे शिपाई तुर्क किंवा (कुर्दसारख्या) इतर भटक्या टोळीतील होते. हे शिपाई जातिवंत इराणी नव्हते. नादिरने मुहम्मदशाहबरोबर तुर्की भाषेत संभाषण केले. [हरचरण]. खुद्द इराणी लोकांनी नादिरच्या फौजेस खरोखर अचूक नाव ठेवले होते. ते या फौजांना किजिलबाश किंवा लाल टोपे[१७] असे म्हणत. कारण हे शिपाई शेंदरी रंगाच्या, जाडत्या-भरड्या कापडाच्या टोप्या घालत असत. आजही तुर्क लोक आणि इजिप्तमध्ये अथवा हिंदुस्थानात त्यांचे अनुकरण करणारे लोक अगदी असल्याच टोप्या घालताना दिसतात. ज्यांना खरे इराणी म्हणावयाचे ते आर्य वंशाचे लोक आहेत. त्यांचा झोक ज्यू लोकासारखा झाला; तो मुसलमानांच्या

१६ अली हजीन हा बिछान्यावर खिळलेला असा अपंग आहे. तो हिंदुस्थानला तिथल्या हवामानाला आणि तिथल्या लोकांना सारखी दूषणे देत असतो. तो सांगतो की इराणी फौजेतील अवघे तीन लोक ठार झाले आणि वीस लोक जखमी झाले ! सियर आणि गुलाम अली यानी अगदी आंधळेपणाने ते नकलून घेतले आहे

१७ "किझिलबाश फौजांतील सर्व सैनिकांनी तुर्कांप्रमाणे ( ? ) लाल टोप्या घातल्या होत्या. या फौजांच्या गर्दीमुळे रणांगणावर अफूच्या झाडाची लालभडक फुले पसरल्यासारखे भासू लागले." (आनंदराम, २९)

या भागातील विजयानंतर. पण त्यांत इराणी किंवा तुर्की वंशाची मिसळ जवळजवळ आढळत नाही. त्यांची भाषा तुर्की लोकांना जवळची नाही. त्यांच्या वागणुकीच्या तऱ्हा तुर्क लोकांपेक्षा अगदी वेगळ्या आहेत. तुर्कस्थान आणि तुर्की लोक सुन्नी पंथाचे सनातनी अनुयायी आहेत, तर हे इराणी लोक सुन्नी पंथाच्या विरोधी धर्माचे अनुयायी आहेत. खुद्द इराणी लोक (जे आज हिंदुस्थानात स्थानिक झालेल्या आणि पार्शी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वंशाचे आहेत) हे फार बुद्धीमान, सुसंस्कृत, अभिमानी आणि नर्म विनोद अनुभवण्याची संवेदनाशक्ती असलेले असे असले तरी ते शिपाईबाण्याचे नाहीत. नादिरच्या किजिल-बाश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फौजेतील शिपाई हे मध्य आशियातील तुर्क किंवा तुर्कोमन या वंशाचे होते. हिंदुस्थानातील पठाण म्हणून ओळखले जाणारे किंवा हिंदुस्थान जिंकणारे मुघल हे देखील याच वंशाचे होते. हे किजिल-बाश, पठाण आणि मुघल यांच्या लढण्याच्या पद्धतीदेखील सारख्याच होत्या. जलदीने कूच करीत लांबचा पल्ला गाठणे आणि वाटेत होणाऱ्या हाल-अपेष्टांना न जुमानणे या गोष्टी या सर्वांमध्ये समान होत्या.

याखेरीज नादिरच्या फौजेत भडिमार करणाऱ्या अस्त्रांनी सज्ज असलेल्या बर्कन्दाजांचे प्रमाण मोठे होते. त्याच्या पदरी कित्येक हजार जेजाल (म्हणजे जेजालाधारी) होते. त्यांच्यातील शिस्त कडक होती. भडिमाराचे नियंत्रण करण्याची त्यांची पद्धत युरोपियनांच्या तोडीची होती. बार उडविण्याचा हुकूम मिळेपर्यंत ते थांबत आणि हुकूम मिळाल्यावर मग फैर झाडत. त्यामुळे शत्रूची दाणादाण तर होईच पण त्याच-बरोबर शत्रू गोंधळून देखील जाई. कर्नाळ येथे इराणी फौजांतील जेजाला, जमिनीवर रांगेने मांडून, भारतीयांचा फन्ना उडविण्यासाठी तयार ठेवल्या होत्या.. इराणी छापेमारांनी हिंदुस्थांनी फौजांना घुलवत घुलवत या जेजालांच्या रांगेसमोर आणले व ते स्वतः बाजूला झाले. तद्नंतर झालेल्या जोरदार भडिमारात शत्रूचा पुरा निकाल लागला. प्रत्युत्तर देण्यासही त्याला सवड सापडली नाही. भारतीय घोडेस्वारांना आपल्या तलवारबाजीबद्दल फार गर्व वाटे. तलवारीच्या लढती आणि रपेट करणे याचा ते सराव करीत. युद्ध म्हणजे जणू काही नाटकाचा प्रयोगच आहे असे त्यांना वाटत असावे. ते फक्त तलवारीनेच लढत. मारा करणारी हत्यारे आणि ती वापरणारे लोक यांचा ते तिटकारा करीत. १७ व्या शतकाच्या मध्यास कंदहारचा कब्जा घेण्यासाठी इराणी लोकांशी झालेल्या लढायांचे वर्णन करताना दिल्ली दरबारचा इतिहासकार, हिंदुस्थानी घोडेस्वाराबरोबर तलवारीचे युद्ध खेळण्यास नकार देणाऱ्या इराणी शिपाईगड्यांबद्दल नाक मुरडताना दिसतो. तो इराणी फौजांना त्यांच्या भित्रेपणाबद्दल टोमणा मारतो. गेल्या युद्धात जर्मन शिपायांच्याविषयी बोलताना, सदर जर्मन शिपाई ब्रिटिश पायदळाच्या संगिनीहल्ल्यास तोंड देण्यासाठी कचरत असत. त्याबद्दलही अशाच धर्तीचा टोमणा इतिहासकार जर्मनांना मारताना आढळतात.

क्षेपणास्त्रे वापरण्याच्या बाबतीत हिंदुस्थानी मुसलमान आणि राजपूत शिपाई हे दोघेही अगदीच अकार्यक्षम होते. १७ व्या शतकातील मुघल सैन्यात नाव घेण्यासारखे बंदूकची म्हणजे फक्त बक्सारी, बुंदेले आणि कर्नाटकी हे हिंदु जमातीचे लोक होते; पैकी कर्नाटकी बंदूकची विजापूरच्या सुलतानाच्या चाकरीत पुष्कळ संख्येने होते; पण उत्तरकालीन मुघलांच्या पदरी कोणी नव्हते. याशिवाय बहेलिया या नावाने ओळखला जाणारा व बहुधा अलाहाबाद सुभ्यातून भरती झालेला शिकारी लोकांचा एक लहानसा वर्ग देखील बंदुका चालवीत असे. पण भारतीय फौजांतील प्रचंड बहुसंख्या बंदुकीनिशी लढत नसे किंवा

परिपाठ म्हणून जेजाले या वर्गात मोडणाऱ्या हलक्या मैदानी तोफा मोठया संख्येने आपल्या संगती रणांगणात आणीत नसत. भारतीय शस्त्रास्त्रे त्रासदायक वाटावीत इतकी अवजड होती. इराणी आणि तुर्कस्थानी यांच्याजवळ असलेल्या शस्त्रास्त्रांपेक्षा ती अधिक कालबाह्य झालेली होती. त्यामुळे त्यातून केलेला भडिमार बेहुधा मंद गतीचा असे. त्याचा मारा देखील फिकीर बाळगू नये इतका नेम चुकणारा असे. भरगच्च घोडेस्वार फौजांनी अचानक हल्ला केल्यास आणि अंगास अंग भिडवून लढाई सुरू झाल्यास हिंदी शिपाई आपले सर्वस्व पणास लावण्यात वाकबगार होते. पण त्यांच्यात चपळपणा असा जवळजवळ नव्हताच. इराणच्या चाकरीतील किजिल-बाशांबाबत मात्र तसे म्हणता येण्यासारखे नाही. आपल्या ऑक्सस नदीपलीकडच्या भागातील तुराणी बांधवांप्रमाणे किंवा कॉन्स्टॅन्टिनोपलच्या उस्मानअली सुलतांनाच्या फौजांप्रमाणे त्यांचे घोडदळ आशियातील सर्वोत्तम घोडदळ होते. त्यांचे घोडेस्वार राकट असत त्यांची रपेट जलद असे. त्यांचे घोडेदेखील अगदी चपळ आणि बळकट औलादीचे असत. या इराणी असामींना घोडयावर बसण्याचे बाळकडूच मिळालेले असे. कारण ते भटक्या वंशाचे होते. ते पट्टीचे धनुर्धारी होते. पळून जाताना देखील लढत लढत पळण्याची त्यांची पद्धत होती. हिंदुस्थानी लोकांपेक्षा अधिक असा, निर्णायक महत्त्वाचा एक लाभ त्यांच्या गाठीशी होता. तो म्हणजे, ज्यांच्याजवळ लढण्यासाठी फेकण्याची अस्त्रे असतात, त्यांना, ज्यांच्याजवळ केवळ आधार घेऊन फेकण्याची अस्त्रे असतात त्यांपेक्षा, जो अधिक लाभ मिळू शकतो, तो त्यांना मिळत होता.

नादिरच्या फौजेचे चलनवलन सरस असल्याने, अगदी सुरुवातीपासून हल्लाखोरी भूमिका बजावणे त्यांना शक्य झाले. त्यांनी लष्करी डावपेचात हिंदुस्थानी पक्षावर कुरघोडी केली आणि त्यांना, हल्लेखोरांना जेथे लढाई करणे लाभदायक आहे तेथे ओढीत आणले. सोयीचे ठरणार असेल तर ते लढा देत व सोयीचे ठरणार नसेल तर लढा देण्याचे लांबणीवर देखील टाकीत. हिंदुस्थानी पक्षाचा मूर्खपणाचा कळस म्हणजे उंटावरून वाहून न्यावयाचा काहीसा लांब पल्ल्याचा तोफखाना आणि बंदुका यांच्या आधुनिक युगात, त्यांनी लढाईत घुसविलेले आणि वापरलेले हत्ती. अगदी इतिहासपूर्व काळात सिकंदर बादशाहाच्या वेळी, म्हणजे भडिमार करणारी अस्त्रे अजून माहीत झालेली नव्हती इतक्या जुन्या काळीदेखील, चपळ घोडदलापुढे हत्ती फिके पडले होते. अगदी अलीकडच्या काळात बाबराचे घोडेस्वार आणि त्यांच्या सोबतच्या थोडया सावकाश भडिमार करणाऱ्या अगदी ओबडधोबड तोफा यांच्यापुढेही हत्तींचा टिकाव लागलेला नव्हता. १७३९ साली हे हत्ती जेव्हा नादिरशाहाविरुद्ध रणांगणात उतरले तेव्हा ते हुकमीपणे आत्मघात करणारी यंत्रेच ठरले.

## ११५ : नादिरशहाबरोबर शांततेच्या वाटाघाटी

नादिरशाह रणांगणातून आपल्या छावणीस परतला तेव्हा इशा प्रार्थनेनंतर (रात्री ८ वाजता) सआदतखान यास त्याच्यासमोर हजर केले. नादिरशाहाने भारतीय फौजेची निर्भर्त्सना केली. तो या फौजेला 'भिकारडयांचा कळप' असे म्हणाला. तुमचा सेनापती खान दौरान याला कसे मरावयाचे हे माहीत होते; पण कसे लढावयाचे ते मात्र माहीत नव्हते असे तो बोलला. [इमाद.] तद्नंतर त्याने बादशाहाची सामग्री काय आहे आणि बादशाहाची उद्दिष्टे कोणती आहेत याची चौकशी केली. सआदतखान मुत्सद्दीपणे उद्गारला "बादशाहाची सामग्री अमाप आहे. आज त्याचा एकच उमराव लढाईसाठी आला होता

व अपघाताने एक बार लागून जखम झाल्यामुळे तो परत गेला आहे. पण अजून पुष्कळ अमीर आणि शूर राजे तसेच अगणित फौजा मागे उरलेल्या आहेत". नादिरशाह म्हणाला, "तू माझा देशबांधव आहेस व माझ्याच धर्मपंथाचा अनुयायी आहेस तेव्हा मला तुझ्या बादशाहाकडून खंडणी कशी मिळेल आणि मी तुर्कस्तानच्या सुलतानाशी लढण्यासाठी स्वदेशी कसा जाऊ शकेन यांविषयी मला सल्ला दे." तेव्हा सआदतखानाने त्याला सल्ला दिला की, तू निजामास पाचारण कर; कारण तो म्हणजे हिंदुस्थानची गुरुकिल्ली आहे; त्याच्यामार्फत शांततेच्या अटी निश्चित कराव्या.[१८] दुसऱ्या दिवशी १४ फेब्रुवारी रोजी नादिरशाहाने कुराण सोबत देऊन एक इसम मुहम्मदशाहाकडे धाडला; त्यावर हात ठेवून आपल्या सदिच्छेची ग्वाही म्हणून शपथ घेण्यास सांगितले व निजामास पाठविण्यास सांगितले सआदतखानानेदेखील बादशाहास लिहिले आणि निजामास पाठवा व शांतता तह करा असा सल्ला दिला.

बादशाहाच्या बाजूस उरलेला निजाम हा शेवटचा मातब्बर उमराव होता; त्यामुळे त्याला शत्रूकडे पाठविण्याच्या कल्पनेने बादशाह साहजिकच धास्तावला होता. बादशाहाने विचारले, "जर तुमच्याशी काही दगलबाजी झाली तर आम्ही काय करावे?" निजाम उत्तरला, "कुराण आपणामध्ये आहे; जर दगलबाजी झालीच तर अल्ला ती पाहून घेईल. नंतर बादशाहाने मांडू येथे किंवा तसल्याच एखाद्या बळकट किल्ल्यामध्ये माघार घ्यावी, नासिरजंग यास दक्षिणेतून मोठ्या फौजफाट्यानिशी बोलावून घ्यावे आणि इराणी फौजेशी लढा द्यावा."

एवढे झाल्यावर वाटाघाटींचे एकूण एक अधिकार घेऊन निजाम इराणी छावणीवर गेला. नादिरने त्याचे नीट स्वागत केले. तक्रारीच्या सुरात तो म्हणाला, "तुमच्यासारखे उमराव बादशाहाच्या पक्षात असताना उघडेनागडे मराठे दिल्लीच्या तटबंदीपर्यंत धडक मारू शकतात आणि तुमच्याकडून खंडणी वसूल करू शकतात ही आश्चर्याची गोष्ट आहे!" त्यावर निजाम उत्तरला, "नवे नवे उमराव उत्कर्ष पावल्यामुळे खाविंदांनी मर्जीस आले ते केले. माझा सल्ला स्वीकारार्ह वाटला नाही म्हणून अगदी असहाय्य बनून मी त्यास सोडले आणि दख्खनला परतलो."

या उत्तराने नादिर खूश झाला. शांततेच्या विषयाकडे वळून तो तक्रारीच्या सुरात म्हणाला की, इराणच्या पूर्वीच्या सार्वभौम राजांनी बादशाहाच्या वाडवडिलांना कित्येकदा मदत केली असतानादेखील, मी माझ्या शत्रूशी सामना करीत असताना दिल्लीतील सरकारने इतके उदासीनपणे वागावयास नको होते. तेव्हा त्याचा खुलासा करण्यासाठी निजाम म्हणाला, "फर्रुखसियरच्या मृत्यूनंतर या सरकारचे सगळे व्यवहार अगदी मोडकळीस आले आहेत. उमरावांमधील भांडणे हे त्याचे कारण आहे. अशा परिस्थितीत आपल्या पत्रांची दखल वजीर वगैरे मंडळींनी घेतलीच नाही."

---

१८ वाटाघाटींचा हा इतिहास मुख्यत्वेकरून हरचरणदास याच्या मजकुरावर आधारलेला आहे. (त्यास रुस्तमअली, इलियट व डौसन खंड आठ, ६२ याचादेखील आधार मिळतो.) त्याखेरीज क्रॉनिकल, मराठी पत्रे, आनंदराम ३५–३६; जहानकुशा ३५४, सियर ९७–९८, बयान ४३–४४ यामधून उपयुक्त असे काही मुद्दे घेतले आहेत.

बरीच चर्चा झाल्यानंतर इराणी फौजेने येथून मागे परतावे, त्यासाठी त्यांना ५० लाख[१९] रुपयांची युद्धाबाबतची नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन मिळावे असा समझोता झाला. या ५० लाखापैकी २० लाख तिथल्या तिथे द्यावयाचे होते, १० लाख लाहोरला पोहोचल्यावर, १० लाख अटक येथे व उरलेले १० लाख काबूल येथे आदा करावयाचे होते. ही तडजोड झाल्यावर निजामाने नादिरची जाण्यासाठी अनुमती घेतली. नादिरने त्याच्यासोबत बादशाहास दुसऱ्या दिवशी खान्याचे आमंत्रण धाडले.

गुरुवारी फेब्रुवारी १५ रोजी[२०] आपले सर्व उमराव बरोबर घेऊन मुहम्मदशाह इराणी छावणीकडे निघाला. नादिरबरोबर तुर्की भाषेत संभाषण करावे लागेल अशी सूचना निजामाने बादशाहाला दिली. वाटेत इराणी वजीर त्यांना भेटला आणि त्याने कुराणाची शपथ घेऊन कसलाही दगा फटका होणार नाही याची हमी दिली. इराणी छावणीच्या बाहेर शाहझादा नस्त्रुल्लाह याने आपल्या बापाच्या वतीने पाहुण्यांचे स्वागत केले. त्यांचे आगमन होताच नादिर आपल्या तंबूबाहेर आला. मोठ्या दिमाखात त्याने आपला हात पुढे करून मुहम्मदशाहाचा हात धरला आणि त्यास आत घेऊन गेला. शाही मसनदीवर त्याला आपल्या बाजूस त्याने बसवून घेतले. निजाम, वजीर आणि मुहम्मद इस्हाकखान यांना आत जाऊ दिले. बाकीच्यांना तंबूबाहेरच थांबावे लागले.

दोन राजे एकमेकांशी बोलत असताना इस्हाकखान ( मूतमिनुद्दौलह ) संभाषणात घुसला तेव्हा नादिरशाह रागावला. राजांच्या संभाषणात आपले बोलणे मिसळण्याचे धाडस करणारा हा कोण अशी पृच्छा त्याने केली. तेव्हा मुहम्मदशाहाने त्याची नादिरशी ओळख करून दिली. माझ्या बालपणापासून ते माझे अतालिक म्हणजे शिक्षक आहेत असे बादशाहाने सांगितले. इराणी राजाने इस्हाकखान याला काही प्रश्न विचारले. त्यास इस्हाकखानाने तत्परतेने जी बुद्धिमत्तादर्शक उत्तरे दिली त्यामुळे नादिर अगदी खुश झाला; हा इसम हिंदुस्थानचा वजीर होण्यासदेखील लायक आहे असे तो तेथे म्हणाला. [ हरचरण ]

यानंतर सगळे मंडळ खान्यास बसले. इराणी विजेता गर्वाने उद्गारला, " खुल्लमखुल्ला युद्ध करणे हा माझा खाक्या आहे. दगलबाजी करून मनुष्यवध करणे हा माझा खाक्या नाही. नंतर अन्नात विष घातलेले नाही याची मुहम्मदशाहास खात्री पटावी यासाठी, आपल्यासमोरच्या खाद्यपदार्थांच्या बशा आणि बादशाहासमोरच्या खाद्यपदार्थांच्या बशा यांची खान्यास सुरुवात होण्यापूर्वी त्याने अदलाबदल केली. [ हरचरण ] शिष्टाचाराचा एक भाग म्हणून नादिरशाहाने स्वतः आपल्या हाताने कॉफीचा कप बादशाहाच्या हाती दिला. बैठक समाधानपूर्वक संपली. सूर्य मावळण्यास तीन तासांचा अवकाश असताना मुहम्मदशाहाने आपल्या यजमानाचा निरोप घेतला आणि तो आपल्या छावणीवर परतला. येथे त्याचा परिवार, त्याचे नोकरचाकर इतकेच नव्हे तर सगळीच्या सगळी छावणी त्याच्या अनुपस्थितीच्या काळात कमालीची भयग्रस्त आणि चिंतातूर होऊन बसली होती. बादशाहाचा खून होईल किंवा नादिरच्या बंदिवासात त्याला जावे लागेल असा त्यांचा कयास होता.

१९ सदरचा आकडा दोन कोटीचा असल्याचे सियर ( ९७ ) सांगतो; पण ते खरे नाही.

२० दिल्ली क्रॉनिकलमध्ये सदरच्या प्रसंगाची तारीख १८ फेब्रुवारी असल्याचे सांगितले आहे. पण महदी हरचरण आणि इतर सर्व तज्ज्ञ मंडळी ती तारीख नाकबूल करतात.

पण तो सुखरूप परतल्याचे पाहून, इतिहासकाराच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, "त्यांची शरीरे सोडून गेलेली त्यांची हृदये त्यांना परत लाभली." [ आनंदराम, बयान ] तरी पण हिंदुस्थानी छावणीभोवतालचा इराणी वेढा कायम होता. [ जहान ]

समसामुद्दौलह खान दौरान हा फौजेचा सेनापती ( अमीरुल्‌उमरा आणि बक्षी-उल्‌ममालिक ) १५ तारखेस मृत्यू पावला. असे सांगतात की, फेब्रुवारी १३ च्या घातकी संध्याकाळी त्याचा निश्चल देह त्याच्या लुटालूट झालेल्या छावणीत परत आणला तेव्हा निजाम, वजीर आणि बादशाहाचे खोजे त्याच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी, संबंधितांचे सांत्वन करण्यासाठी आणि त्यास आराम पडावा म्हणून प्रार्थना करण्यासाठी तेथे आले. खान दौरान थोडा वेळ शुद्धीवर आला. त्याने डोळे उघडले आणि अगदी क्षीण आवाजात तो पुटपुटला, "माझा होता तो कार्यभाग मी उरकून टाकला आहे. आता तुम्ही जाणा आणि तुमचे काम जाणा. बादशाहास नादिरकडे नेऊ नका किंवा नादिरला दिल्लीस नेऊ नका. काय वाटेल ते करून त्या दुष्टास येथून घालवून लावा." [ सियर ] नंतर तो बेशुद्ध पडला व दोन दिवसातच मरण पावला.[२१]

नादिरशाहाच्या भेटीस पहिल्या खेपेस जाऊन आल्यानंतर बादशाहाला खान दौरानच्या मृत्यूची खबर मिळाली. त्यानंतर लगेचच निजाम बादशाहाकडे गेला. नादिरशाहास परतवून लावण्याच्या बाबतीत आपल्याला आलेल्या राजनैतिक यशाची बक्षिसी म्हणून, आपला मुलगा फीरूझजंग यास मृत उमरावाकडे असलेले बक्षीपद देण्यास त्याने बादशाहास प्रवृत्त केले. [ सियर ] तेव्हा वजीराच्या भावाचा मुलगा अजीमुल्लाहखान याचा हताशपणा आणि मत्सर उफाळून आला. आपले स्वतःचे आश्रित घेऊन तो नादिरला मिळण्यासाठी इराणी छावणीकडे जाऊ लागला. तो त्यावेळी म्हणाला, "मी फीरूझजंगपेक्षा वयाने मोठा आहे, मी उपलब्ध असताना बक्षीचे पद फीरूझजंग यास का बरे बहाल केले?"

निजाम आणि वजीर यांनी घाई केली आणि त्याला रस्त्यातून माघारी आणले. निजाम अजीमुल्लाहपेक्षा वयाने जास्त होता म्हणून बक्षीचे पद त्याने स्वतःकडे घेतले व अशा प्रकारे अजीमुल्लाह यास गप्प केले. दरबारातील मतभेद मिटविणारा असा समझोता झाला; पण इराणी छावणीत असलेल्या सआदतखानाला निजाम बक्षी पदावर नेमला गेल्याचे समजले तेव्हा मत्सराग्नीने तो नुसता होरपळून निघाला. हे पद आपणास मिळावे अशी त्याने दीर्घकाळ अभिलाषा केली होती आणि ते त्यास मिळवून देण्याच्या कामी मदत करण्याचे आश्वासन निजामाने त्याला दिले होते. तेव्हा आपला कृतघ्न धनी आणि यशाचा धनी बनलेला प्रतिस्पर्धी यांच्याबरील

२१ आनंदराम खात्रीपूर्वक प्रतिपादतो की, तो लढाईनंतर फक्त एक दिवस जगला. मिर्झा महदी सांगतो (पृ. ३५२) की तो लढाईच्या दुसऱ्या दिवशी मरण पावला. मा. उ. (खंड एक, ८१९) मध्ये याला आधार आहे. गुलाम अली (पृ. २५) याच्या म्हणण्यानुसार तो एका रात्रीपेक्षा जास्त काळ टिकला नाही. मराठा राजदूताच्या पत्रात त्याचे मरण लढाईनंतर दोन-तीन दिवसांनी झाल्याचे सांगितले आहे. त्याच्या मृत्यूची खबर बादशाहाला १५ तारखेस रात्र पडून ४ घडी उलटल्यावर मिळाली, असे हरचरणदास सांगतो. बयानमध्ये तो लढाईच्या दिवसानंतर तिसऱ्या दिवशी मरण पावल्याचे म्हटले आहे. मात्र दिल्ली क्रॉनिकलमध्ये १७ फेब्रुवारी ही त्याच्या मृत्यूची तारीख दिलेली असून सियरमध्ये याच तारखेचा पुनरुच्चार झालेला आहे.

आपला आकस दाखविण्याचे त्याने ठरविले. नादिरशाहाशी झालेल्या दुसऱ्या भेटीत सआदत-खानाने नादिरशाहास सांगितले की, युद्धाची नुकसानभरपाई म्हणून ५० लाख रुपयांचे द्रव्य एवढी कमी रक्कम मागणे शहाणपणाचे नाही; कारण जर विजेता दिल्लीस गेला तर रोकड, जडजवाहिर आणि इतर मूल्यवान जिनसा, की ज्यांची गणतीच नाही, हे सर्व मिळून २० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम सहज हाती लागू शकेल. सआदतखान म्हणाला सध्या शाही दरबारात निजामाच्या तोडीचा दुसरा उमराव नाही. तो लुच्चाही आहे व तत्त्ववेत्ताही आहे. या लबाडास कचाटयात पकडले तर आपल्या मनात येईल ते ते घडेल. जर तुम्ही मला हुकूम कराल तर मी माझ्या फौजा आणि माझी चीजवस्तू शाही छावणीतून आणवून घेऊन येथे आपल्या छावणीत ठेवीन." नादिरशाहाने यास मान्यता दर्शविली व त्यानुसार तसे घडले. [ हरचरण ]

हे सर्व कारस्थान जमून येण्यास जरा काळ लागला. दरम्यान निजामाने इराणी राजाची १८ तारखेला पुनः भेट घेतली होती व इराणी वजीराने त्यानंतरच्या दिवशी निजामाच्या तंबूत खाना घेतला होता. [ क्रॉनिकल ] या भेटी सुरुवातीला ठरवून घेतलेली नुकसान-भरपाईची रक्कम झटपट वसूल करण्यासाठी झाल्या हे उघड आहे.

## ११६ : बादशाह आणि उमराव यांना नादिर तुरुंगात टाकतो

या खेपेस नादिरने दगलबाजीचा फटका देण्याचा मनसुबा रचला. त्यासाठी त्या वेळचा दुष्काळ त्याच्या पथ्यावर पडला. दोन्ही पक्षातील करार १४ तारखेला ठरला होता आणि १५ तारखेला बादशाहाने तो तोंडी कायम केला होता. पण अजून द्रव्य आदा झाले नसल्यामुळे शाही छावणी भोवतालचा इराणी वेढा चालू ठेवला होता. [जहानकुशा ३५४] या अवाढव्य छावणीतील प्रचंड लोकसंख्येची स्थिती अगदी शोचनीय झाली होती. तेथे उपस्थित असलेल्या मराठा राजदूताच्या पत्रातून ही परिस्थिती अगदी सुस्पष्ट झाल्यासारखी दिसते. "गेले पाच-सहा दिवस झाले छावणीवर कोठे खावयास मिळत नाही. सहा-सात रुपयास एक शेर या दराने देखील धान्य कोठून मिळत नाही. हा सगळा मुलूख वैराण आहे. [जवळपासच्या गावांतून] काही मिळण्यासारखे नाही. ५ दिवस छावणीतील लोकांना खावयास अन्न मिळाले नाही." १९ तारखेला म्हणजे लढाईच्या दिवसानंतर फक्त ६ दिवसात छावणीवरील तुपाचा सगळा साठा संपुष्टात आलेला होता. [क्रॉनिकल]

पण यातून सुटका नव्हती. किजिल-बाश घोडदळ दिल्लीच्या रस्त्यावर पहारा देत हिंडत होते; जे कोणी हिंदुस्थानी छावणी सोडतील त्यांना कापून काढत होते किंवा गुलामगिरीत ढकलत होते. जे काही थोडे असामी शत्रूंच्या घोडेस्वारांचे कडे ओलांडून निसटून गेले त्यांचा रस्त्यातील शेतकऱ्यांनी खून केला किंवा त्यांना पूर्णपणे नागविले. [अली हजीन]

अशा प्रकारे, दुष्काळ आणि निराशा यांच्या मगरमिठीत मुघल छावणी सापडली होती, तेव्हा नादिरशाहाने अजून ज्या गोष्टीचा निर्णय झाला नव्हता त्या गोष्टीची चर्चाकरण्यासाठी निजामास पाचारले.

गुरुवारी दि. २२ फेब्रुवारी रोजी आठवड्यापूर्वी झालेल्या तहनाम्यांवर भरोसा ठेवून आणि मनात कसली भीती न बाळगता निजाम इराणी छावणीवर नादिरच्या पत्रास अनुसरून गेला. तो नादिरशाहाच्या दिवाणखान्यालगतच्या आतल्या खोलीत पोहोचला तेव्हा, त्याला तेथे अडकवून ठेवण्यात आले. नुकसानभरपाई म्हणून २० कोटी रुपये, तसेच साहाय्यकारी फौज म्हणून इराणी झेंड्याखाली चाकरी करण्यासाठी २० हजाराची फौज यांची मागणी करणारा निरोप नादिरने निजामाकडे पाठविला. आसफजाहच्या पायाखालची जमीन सरकली. सूट मिळावी अशी बाजू मांडताना तो म्हणाला, "चघताई घराण्याच्या स्थापनेपासून आजवरच्या काळात शाही खजिन्यात कधी २० कोटी रुपये साठले नव्हते. शाहजहानाने अगदी पराकाष्ठा केल्यानंतर फक्त १६ कोटी रुपये साठले होते. पण ती सगळी रक्कम औरंगजेबाने दक्षिणेत दीर्घकाळ चालविलेल्या मोहिमेत घालवून टाकली. आता खजिन्यात ५० लाख रुपयेसुद्धा नाहीत.

उत्तरादाखल नादिर रागारागाने म्हणाला, "असले खोटे बोलणे खपवून घेणार नाही. मी मागणी केलेली रक्कम मला उपलब्ध करून देण्यास तू कबूल होत नाहीस तोपर्यंत तुला ही जागा सोडता येणार नाही." अशा प्रकारे निजामाला इराणी छावणीत कैदी म्हणून त्या दिवशी व त्याच्या दुसऱ्या दिवशी अडकवून ठेवले. इराणी छावणीत पुन्हा एकदा येण्याबद्दल बादशाहास लिहिण्याविषयी नादिरने निजामावर दबाव टाकला. असे काही पूर्वी आपले ठरलेले नाही असे म्हणून निजामाने आपला निषेध व्यक्त केला. मी दिलेले वचन मोडण्याचा माझा विचार नाही असे आश्वासन मात्र इराणी राजाने निजामास दिले. मुहम्मदशाह याला पुन्हा एकदा भेटणे जरूर आहे असे मला वाटत आहे एवढेच, तो म्हणाला. [सियर, खंड एक, ९७]. काय नक्की वस्तुस्थिती आहे हे बादशाहास लिहून कळवण्याखेरीज निजामास दुसरा मार्ग उरला नाही.

आदल्या रात्री निजामास परतून येणे जमले नाही. यामुळे हिंदुस्थानीत चिंतातुरता पसरली. तसेच दग्याफटक्याविषयीच्या अफवा हिंदुस्थानी छावणीत पसरल्या. निजामाच्या आलेल्या पत्रातून खरी परिस्थिती काय आहे हे आता समजून चुकले. त्यामुळे बादशाहाच्या दरबारात व छावणीत सर्वांची पाचावर धारण बसली. अगदी असहाय्य बनल्याची भावना सर्वत्र फैलावली. बादशाहाच्या बाजूस आता वजीर हा एकटाच मोठा उमराव उरला होता. तेव्हा साहजिकच मुहम्मदशाह सल्लामसलतीसाठी त्याच्यावर विसंबला. अशा परिस्थितीत मी काही करू शकत नाही आणि बादशाहाने स्वतःस सर्वोत्तम वाटेल ते करावे असे उत्तर त्याने दिले. मुहम्मदशाहाच्या मनात गोंधळ उडाला. दुःखावेग त्याला अनावर झाला. बंदिवास घडणार हे उघडच असेल तर नमण्यापूर्वी आणखी एकदा बाहुबळ अजमावावे आणि प्रतिकार करावा असा सल्ला काही तरण्या उमरावांचा पडला. पण आणखी लढत दिल्यास आणखी दुःख व आणखी विनाश उद्‌भवेल याची बादशाहास जाणीव होती. अल्लाच्या मनात काय असेल ते होईल असा विचार करून त्याने नादिरकडे जाण्याचा निर्णय घेतला.

शनिवारी २४ फेब्रुवारी रोजी बादशाह आपल्या छावणीतून बाहेर पडला. त्याच्या सोबत मुहम्मद इस्हाक, काही खोजे, काही आपले व्यक्तिगत हुजरे (खवास) होते. त्याने आपल्यासोबत फक्त २ हजार घोडेस्वारांचा लवाजमा घेतला होता. त्याच्याबरोबर जाण्याचे

पत्करणाऱ्या इतर उमरावांना त्याने मागे रहाण्यास सांगितले. तो इराणी छावणीस पोहोचला. तेव्हा कर्नाळ येथे असलेल्या मराठा राजदूतास लागलेल्या खबरीनुसार, बादशाहाच्या स्वागतास कोणी आले नाही. कोणाचे त्याच्याकडे लक्ष नाही अशा स्थितीत बादशाहाला एकटयालाच बराच वेळ ताटकळत ठेवले. रात्रीच्या वेळी निजाम व सआदतखान त्यास येऊन मिळाले. तद्नंतर बादशाहाला एकटयालाच नादिरच्या तंबूत नेले. इराणी वजीर या बादशाहाच्या भेटीबाबत सांगतो ते बरोबरच आहे की, "हिंदुस्थानच्या संपूर्ण साम्राज्याचे कुलूप उघडण्याची किल्ली नादिरशाहाच्या हाती आली." खरे म्हणजे बादशाह बंदिवान झाला. त्याच्यावर पहारा बसविला. बादशाहासोबत आलेले किंवा तत्पूर्वी इराणी छावणीवर आलेले उमराव यांना सांगितले की, त्यांनी स्वतःला अटकेत आहोत असे समजावे. अशा प्रकारे हिंदुस्थानकडून आता प्रतिकार होण्याची शक्यता न वाटून नादिरशाह निर्धास्त झाला. [आनंदराम ४२, राज]

दुसऱ्या दिवशी म्हणजे २५ फेब्रुवारी रोजी बादशाहाच्या बायका, मुले, नोकरचाकर आणि गृहसाहित्य कर्नाळहून नेऊन त्या सर्वांना नादिरशाहाच्या तंबूलगत ठेवण्यात आले. बंदिवान झालेल्या उमरावांनी देखील आपला परिवार आणि लवेजमे आपल्या मूळच्या छावणीतून आपल्याकडे बोलावून घेतले. स्वातंत्र्य न गमावलेला शेवटचा उमराव कमरुद्दीनखान यास, कर्नाळमधील शाही तोफखाना ओढून नेताना, किजिल-बाशांनी नेले. नादिरशाहाने या आपल्या धन्याची सत्ता उलटण्याचा हा जो विश्वासघातकी व्यूह पार पाडला, त्याबाबत इराणी सरकारी इतिहासकाराने ढोंगबाजीचा बुरखा पांघरून घेतल्यासारखा दिसतो. सदर प्रसंगाचे वर्णन करताना तो लिहितो, "बादशाहाच्या वैभवशाली परिवाराच्या सन्मानाप्रीत्यर्थ बादशाहाच्या वास्तव्याचे तसेच त्याच्या जनानखान्याच्या वास्तव्याचे तंबू नादिरशाहाच्या आणि अब्दुल बाकीखान या इराणी सर्वोच्च उमरावाच्या तंबूशेजारी उभारले. प्रत्येक ठिकाणी मुहम्मदशाहाच्या दिमतीस राहाण्यासाठी शिपायांची एक तुकडी नेमिली. पाहुण्यांचे आदरातिथ्य करण्याचे कर्तव्य पार पाडण्यासाठी या तुकडीस सांगितले होते." [जहानकुशा ३५४.]

ज्यांना इराणी छावणीकडे नेले नाही अशा छोटया उमरावांना आणि सर्व साध्या फौजी असामींना व त्यांच्या अनुयायांना कर्नाळ येथे राहावे किंवा मर्जीनुसार दिल्ली अथवा आपल्या घरी जावे असे शाही छावणीत दवंडी पिटून प्रकट केले.

मगळ्या हिंदुस्थानी छावणीवर आता भीती आणि गोंधळ यांची दाट सावट पडली. कोणीही मेंढपाळ उरलेला नाही, भोवती लांडगे जमलेले आहेत अशा वेळी शेळ्या-मेंढयांना जे वाटेल ते त्यांना वाटले. त्यांच्या जवळ उरलेला वजीर हा शेवटचा प्रमुख असामीदेखील त्यांच्यापासून ओढून नेला. दिल्लीच्या सगळ्या रस्त्यावर किजिल-बाशांच्या तुकडया भटकत होत्या. त्यांना आता प्रतिकार होईल अशी भीती उरली नव्हती. आजवर सुव्यवस्था ठेवणारे सरकार कोसळले आहे हे पाहताच निद्रिस्त शेतकरीवर्ग उठाव करून आला.[२२] प्रचंड छावणी खिळखिळी झाली. जो तो जिकडे बरे वाटेल तिकडे पळाला. पण त्यातील फारच थोडया लोकांना सुरक्षितपणे परतणे शक्य झाले. [अली हजीनला अनुसरून सियर.]

२२ हॅन्वे (खंड दोन, ३६९): (शाही) छावणीच्या ४० मैलांच्या परिसरात इराणी फौजेच्या धावत्या तुकडयांनी निदान ४० हजार तरी भारतीय पेंढारी कापून काढले.

अशा, पळता भुई थोडी झालेल्यापैकी एका पलायन-वीराच्या पत्रात त्यांच्या परिस्थितीचे रेखीव वर्णन आहे. मुघल दरबारातील बाबूराव मल्हार हा मराठा राजदूत बादशाहासमवेत दिल्लीहून कर्नाळला आपला सोबतीचा फौजफाटा व आपली चीजवस्तू घेऊन गेला होता. या घबराट व चिंता वाढत जाणाऱ्या दिवसात त्याचा तेथे मुक्काम होता. शेवटी २५ तारखेला रविवारी सारा खेळ खलास झाला असल्याचे त्याला वाटले. धीर धरून किंवा त्याच्याच शब्दात सांगावयाचे तर "छातीचा कोट करून" तो दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास छावणीतून बाहेर सटकला. त्याचे हत्ती, उंट, पायदळ, बाडबिस्तरा आणि तंबू हमरस्त्याने दिल्लीकडे रवाना झाले. नंतर त्याने स्वतः छावणी सोडली आणि अधिक सुरक्षितता मिळावी म्हणून तो जंगलात गडप झाला. येथे त्याने रात्र काढली. दुसऱ्या दिवशी आडवळणी वाटेने ८० मैलांची रपेट करून तो शाही राजधानीच्या रस्त्यास लागला. या हमरस्त्यावरून भक्कम इराणी सैन्यदल सोबतीस असलेला सआदतखान जात होता. त्यांच्या मागोमाग मराठा राजदूत २७ तारखेला दिल्लीस पोहोचला. पण वास्तव्यासाठी राजधानी आता सुरक्षित राहिली नव्हती. म्हणून आल्या दिवशीच त्याने राजधानी सोडली. रात्रीचा मुक्काम शहराच्या दक्षिणेस ६ मैलांवर असलेल्या मुहम्मदखानाच्या सराईत केला. तेथून सूरजमल जाटाच्या छावणी मार्गे तो जयपूरला येऊन पोहोचला (६ मार्च). येथपर्यंत तो वाटेत कोठे थांबला नव्हता. येथे तो त्याचा सहकारी धोंडोपंत यास येऊन मिळाला. त्याचे हत्ती व उंट दिल्ली-पासून रेवाडीपर्यंत हळूहळू आले. त्याने काढलेल्या भावनोद्‌गारावरून त्याला काय वाटत होते याची कल्पना करता येते. "परमेश्वराने मजवरचे एक मोठे संकट टाळले व मला अब्रू वाचवून निसटण्याचे त्याने सामर्थ्य दिले. चघताई साम्राज्य लयास गेले आहे. इराणी साम्राज्य आता उगवले आहे आता अगदी सावध असले पाहिजे !"
[राजवाडे, खंड सहा, १३१]

प्रकरण तेरावे

# नादिरशाह दिल्लीत; तो दिल्लीहून परततो

## (मजकूर संपादकाचा)

### ११७ : बादशाहाच्या पराभवानंतर दिल्ली शहराची स्थिती

शाही दरबाराप्रमाणेच दिल्लीतील लोक देखील बाह्य जगाविषयी बेफिकर बनले होते. इराणी धमकावणीचे स्वरूप काय आहे किंवा आपल्या मुलुखानजीक येत असलेल्या लुटारू धनगरी उपटसुंभाची प्रतिभा काय आहे हे त्यांना सुरूवातीला समजले नव्हते. मोहिमेच्या सर्वाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेल्या आत्मविश्वासामुळे सुरक्षिततेची खोटी भावना निर्माण झाली होती. १७३८ डिसेंबर २ रोजी तीन सर्वोच्च उमरावांच्या संयुक्त सेनेचे जे भव्य प्रदर्शन दिल्लीस झाले त्यामुळे तर सुरक्षिततेचा आभास कळसास पोहोचला. १७३९ जानेवारी १९ रोजी म्हणजे सैन्यास जाऊन मिळण्यासाठी बादशाह निघाला त्याच्या दुसऱ्या दिवशी, चिटणीस आनंदराम यास असे आढळून आले की, लहानथोर अशा सर्वांनीच या मोहिमेवर आपला जीव टाकला होता. काहींना वाटले की, पंजाब पाहण्याची संधी मिळेल, तर इतर काहींनी विचार केला की शहराजवळच विजय मिळेल आणि आपण लगेचच घरी परतू.

यानंतर अत्यंत आकस्मिकरीत्या सत्य काय होते ते बाहेर आले. फेब्रुवारी १५ या दिवशी अगदी सकाळी दिल्लीत खबर येऊन थडकली की दोन दिवसांपूर्वी शत्रूच्या फौजांना विजय मिळाला आहे; शाही फौजेच्या दोन मोठ्या थोरल्या फौजा त्यांच्या सेनापतींसह मारल्या तरी गेल्या आहेत किंवा पकडल्या तरी गेल्या आहेत; आणि बादशाहाच्या छावणीला वेढा पडला आहे. दिल्लीची वस्ती बहुढंगी होती. त्यात हिंसाचार आणि लुटालूट करण्यास नेहमीच सज्ज असलेला एक मोठा पण विस्कळीत असा वर्ग होता. गुजर नावाची धनगरी वाटमाऱ्यांची एक जमात शहराच्या अगदी नजीक वास्तव्य करून होती. शाही सत्ता लुळी पडली आहे किंवा तात्पुरती कमकुवत बनली आहे असे त्यांना समजताच त्यांच्या धाडी दिल्लीतील समृद्ध बाजारपेठेवर पडण्याची शक्यता होती. [ईमाद ६६]

हाजी फूलादखान हा दिल्लीचा पोलीस प्रमुख होता. तो शहाणा आणि कर्तबगार होता. रस्त्यावर रात्रंदिवस पहारा बसवून कोठे उपद्व्यापी माणूस दिसला की, त्याजवर लगेच झडप घालून त्याने शहर सुरक्षित ठेवले होते. दरम्यान शहराकडे येणारे सगळे हमरस्ते लुटारूंनी बंद करून टाकले. शहराच्या तटबंदीबाहेर जीवित आणि मालमत्ता असुरक्षित बनली होती. शहराच्या तटबंदीबाहेर राहणाऱ्या आनंदरामासारख्या इसमांनी आपल्या घरांच्या रखवालीसाठी हत्यारबंद अशी भाडोत्री माणसे ठेवली; रस्त्याच्या टोकाला तात्पुरती मेढेबंदी केली आणि घरात घर व कुटुंब यांच्या रक्षणासाठी दारूगोळा साठवून ठेवला. अशा प्रकारच्या चिंतातुर पहाऱ्याच्या परिस्थितीत १२ दिवस गुजरले; तेव्हा फेब्रुवारी २७ रोजी सआदतखान ४ हजार फौजेसह आला. मग अनागोंदी माजविणाऱ्या लोकांना चांगली दहशत बसली. [आनंदराम ३८–४१]

नादिरशाहाने बादशाहाच्या अंगाचा ताबा मिळविला त्याच दिवशी त्याने सआदतखान यास बादशाहाचा प्रतिनिधी म्हणून आणि तहमास्पखान जालैर याला आपल्या स्वतःचा शाही कुलमुख्त्यार म्हणून दिल्लीस पाठविले. त्यांच्यासोबत ४ हजार स्वारांची फौज दिली. शहर आणि राजमहाल यांचा विजेत्यासाठी कबजा घ्या, सुव्यवस्था राखण्याची तजवीज करा; राज्याचा धनी बदलत असण्याच्या काळात शाही मालमत्तेची लूट होण्याची किंवा ती छपवून ठेवली जाण्याची शक्यता आहे; तसे काही होणार नाही याची काळजी घ्या आणि नादिरच्या राजमहालातील आगत-स्वागताची सज्जता ठेवा असे त्यांना सांगितले होते. दोन्ही उमराव फेब्रुवारी २७ रोजी दिल्लीस पोहोचले. त्यांनी शहराचा सुभेदार लुत्फुल्लाहखान यासाठी मुहम्मदशाह आणि नादिर यांच्याकडून दोन पत्रे आणली होती. राजमहाल, शाही खजिना आणि शाही कोठारे यांच्या किल्ल्या तहमास्प याच्या हवाली कराव्या आणि शाहझाद्यांवर काळजीपूर्वक पहारा करावा असा हुकूम बादशाहाने त्यास फर्माविला होता. प्रामाणिकपणा आणि धन्याविषयीची कर्तव्यपरायणता यांबद्दल लुत्फुल्लाहखानाची नादिरने आपल्या पत्रात स्तुती करून माझ्या वतीने मी तुझ्याकडचा दिल्लीचा कारभार कायम करीत आहे असे म्हटले होते.

दिल्लीभोवती खंदक खणावा आणि शहर संरक्षणाची तजवीज करावी असे लुत्फुल्लाहखान बोलला होता म्हणून सआदतखानाने शहराबाहेर एक मजल राखून मुक्काम केला आणि लुत्फुल्लाहखानास पत्र पाठविले. शांतपणे शरण जा; प्रतिकार अगदी निष्फळ आहे असा सल्ला त्याने लुत्फुल्लाहखानास दिला. तेव्हा लुत्फुल्लाहखानाने शहर इराणी प्रतिनिधीच्या हवाली केले. [शाकिर]

दिल्ली व्यापून झाल्याची खबर कर्नाळबाहेरच्या छावणीस जाऊन पोहोचली तेव्हा, मार्च १ रोजी, दोन्ही राजे तेथून निघाले. शिष्टाचाराच्या गरजेनुसार मुहम्मदशाहाचा हत्ती नादिरशाहाच्या हत्तीच्या मागे बाणाच्या एका फेकीच्या अंतरावरून चालत होता. बादशाहासोबत[1] फक्त हजार स्वार होते तर वजीरासोबत १० हजार स्वार होते. उरलेली सगळी शाही फौज २५ फेब्रुवारीच्या हुकूमानंतर तावडतोब आपापल्या घरी जाण्यासाठी विसर्जित झाली होती.

## ११८ : नादिरशाह आणि बादशाह दिल्लीतील राजमहालात प्रवेश करतात

शाही असामींचे पथक दिल्ली शहराच्या उत्तरेस असलेल्या शालिमार बागेजवळ मार्च ७ रोजी येऊन पोहोचले. नादिरचे स्वागत करण्यासाठी सआदतखान एक दिवस अगोदर बाहेर आला होता. ७ तारखेला लुत्फुल्लाहखान आपल्या धन्यास भेटण्यासाठी बागेत गेला. तेव्हा बादशाहाने त्यास नादिरपुढे उभे केले. लुत्फुल्लाहखान तत्परतेने आज्ञापालन करीत आहे याबद्दल आपणास परमसमाधान झाले आहे असे इराणी राजा म्हणाला. त्याने आपल्या अंगावरील उंची कोट काढला आणि खानाच्या अंगावर स्वहस्ते चढविला. [शाकिर] नादिर आणि त्याच्या फौजा ८ तारखेस बागेतच थांबल्या तर मुहम्मदशाह आपल्या वड्या पाहुण्यांच्या स्वागताकरिता राजमहाल सज्ज करण्यासाठी शहरात निघून गेला.

१ हरचरण; क्रॉनिकल; पण हॅन्वे (खंड दोन, ३७३) हा नादिरच्या दिल्लीकडील प्रयाणाची वेगळी हकीकत देतो. या प्रवासात साडेतीन लाख माणसे सामील झाली होती व त्यामुळे प्रवास करणाऱ्या असामींचा १२ मैल लांब आणि ३ मैल रुंद असा पट्टा तयार झाला होता असे त्याचे म्हणणे आहे.

बाबर आणि अक्बर यांच्या अधःपतित झालेल्या ह्या वंशजाने तख्त-इ-रवान वरून (म्हणजे फिरत्या तख्तावरून) शहरात प्रवेश केला. त्याचा हा प्रवेश अगदी निःस्तब्ध आणि केविलवाण्या वातावरणात झाला. वाद्ये वाजली नाहीत किंवा बादशाहासमोर झेंडेदेखील मिरवले नाहीत. [क्रॉनिकल] थोडेसे उमराव त्याच्या संगतीस होते-इस्हाकखान, बहरोजखान आणि जाविदखान. दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजे मार्च ९ रोजी शुक्रवारी एका करड्या रंगाच्या लढाऊ घोड्यावर बसून विजयी वीराने दिल्लीत प्रवेश केला. शालिमार बागेच्या हद्दीपासून दिल्लीतील किल्ल्यामधील राजमहालाच्या दरवाज्यापर्यंतच्या रस्त्यावर त्याच्या फौजी असामींची ओळ लागली होती. बादशहाने अजिक्य-वीराचे स्वागत केले. सोन्याच्या जरीने मढविलेला अतिउंची गालिचा तसेच अगदी दुर्मिळ-दुर्मिळ अशा गोष्टी त्याने पाय ठेवण्याच्या जागी (पा-अंदाजी) ठेवल्या होत्या. दिवान-इ-खास जवळ शाहजहान राजमहालाच्या ज्या दालनात रहात असे त्या दालनात नादिरशाहाने वास्तव्य केले; तर असदबुर्जाच्या देवडीत मुहम्मदशाह राहिला. [आनंदराम] या दिवशी बादशाह यजमान होता व म्हणून त्याने नादिरला खाना दिला. इराणी फौजेपैकी काहींनी किल्ल्याभोवती थारा घेतला, काहीजण शहराजवळच्या यमुनाकाठी राहिले तर काही जणांनी शहरभर विखुरलेल्या घरात मुक्काम ठोकले. [अली हजीन, जहानकुशा ३५५] त्या दिवशी सबंध दिवसभर सआदतखान नादिरच्या सेवेत हजर होता. ज्या खंडणीचे वचन दिले आहे ती खंडणी उभी करणे न जमल्याबद्दल इराणी राजाने त्या रात्री त्याची कडक कानउघाडणी केली. जर दिलेला शब्द पाळला नाही तर वैयक्तिक शिक्षा केली जाईल अशी त्याने सआदतला धमकी दिली. सआदतला हे सगळे अगदीच असह्य झाले. स्वतःच्या घरी तो परतला व तेथे त्याने विषप्राशन केले.

ईद-उज्-जुहाची मेजवानी मार्च १० रोजी शनिवारी आली होती. त्या दिवशी सकाळी जामा मशिदीच्या आणि प्रार्थनेच्या इतर ठिकाणच्या व्यासपीठावरून नादिर यास त्याच्या नावानिशी आणि किताबानिशी सार्वभौम म्हणून उद्घोषित करण्यात आले. [सियर खंड एक, ९८] दुपारच्या वेळी नादिर परत भेटीसाठी मुहम्मदशाहाच्या दालनात गेला. आता त्याने खंडणी उकळणे हा आपला खरा उद्योग आरंभला. धडधडीत लूट घडवून आणण्याची तजवीज अगोदरच योजली होती. पण त्यावर बाह्यात्कारी सुसंस्कृतीचा बुरखा टाकण्यासाठी थोडे नाटक करण्यात आले. इराणी राजाच्या सचिवाच्या पुढील राजनैतिक निवेदनात, त्याचा खराखुरा अर्थ ताडला, तर सत्य काय होते ते आपणास सहज शोधून काढता येते [जहानकुशा, ३५५]

"नादिरशाहाने उदार अंतःकरणाने असा अभिप्राय दिला की, पहिल्या दिवशी झालेल्या कराराच्या अटीनुसार हिंदुस्थानचे तख्त मुहम्मदशाहाकडे राहील आणि बादशाहाला इराणी राजाचे पाठबळ आणि मैत्री यांचा लाभ होत राहील; कारण दोघेही एकाच म्हणजे तुर्कोमन रक्ताचे आहेत."

"त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मुहम्मदशाहाने अदबीने झुकून अभिवादन केले आणि दाखविलेल्या औदार्याबद्दल विजेत्याचे तोंड भरून आभार मानले. त्याच्यावर काही हलकीसलकी कृपा झालेली नव्हती. ती राजमुकुटाची देणगी होतीच व त्याशिवाय जीवदानाची देणगीदेखील होती. त्याबद्दल वाटणाऱ्या कृतज्ञतेपोटी मुहम्मदशाहाने नादिरशाहासमोर दिल्लीच्या शासकांनी जमविलेला खजिना, कोठारे आणि अतिदुर्मिळ चीजवस्तू नादिरशाहास

नजराणा म्हणून आणि नादिरशाहाच्या दीर्घायु आरोग्याबद्दल समर्पण (निसार) केल्या. पण जगातील सर्व राजांची सम्पत्ति एकत्र केली असती तरी ती या मांडलेल्या महाप्रचंड संचयाच्या एक शंभरांशदेखील भरली नसती; असे असतानादेखील इराणच्या उमद्या सार्वभौम राजाने यांतील काहीसुद्धा उचलण्यास नकार दिला. शेवटी मात्र मुहम्मदशाहाने अतियाचना केली असता, नजराणा घेण्यास तो राजी झाला; त्याने सदरचे द्रव्य आणि इतर मालमत्ता कब्जात घेण्यासाठी विश्वासू अधिकाऱ्यांची नेमणूक केली."

## ११९ : दिल्लीतील जनता इराण्याविरुद्ध उठाव करते

अशा प्रकारची ही शांततामय बैठक राजमहालात घडत असता शहरात मात्र याच्या नेमके विरुद्ध टोकाचे दृश्य उदय पावत होते. नादिरच्या फौजेत आणि फौजेबरोबरच्या बिगरलष्करी लोकांत मुख्यत्वेकरून तुर्क, कुर्द आणि मोंगोल लोकांचा भरणा होता. त्यांच्या राजाने शहराचा ताबा घेतला असल्याने ते दिल्लीच्या रस्त्यांत आणि बाजारात निर्धास्तपणे भटकत होते. एकाएकी, सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास (शनिवार, १० मार्च) नादिरशाहाचा वध झाला असल्याची अफवा काही रिकामटेकड्या व उपद्व्यापी मंडळींनी उठविली. बादशाहास भेट देऊन परतत असता मुहम्मदशाहाच्या चिथावणीवरून राजमहालातील एका कल्माक स्त्री पहारेकरणीने कपटपूर्वक गोळी चालवून नादिरशाहास ठार मारले अशी ती अफवा होती.[२] [आनंदराम ४४, सियर, खंड एक, ९८] त्या दिवशी नादिर बादशाहाकडे जाणार आहे ही गोष्ट सर्वांच्याच कानावर असल्यामुळे, अफवेतील हकीकतीवर सर्वांचा चटकन विश्वास बसला. राजमहालाचे दरवाजे उघडे होते. लोकांची कामानिमित्त तेथे ये-जा चालू होती. तरीदेखील राजमहालावर जावे व बातमीची खात्री करून घ्यावी असे कोणालासुद्धा वाटले नाही. [अली हजीन] ही अफवा वणव्यासारखी पसरली. तद्नंतर पाठोपाठ शहरातील हुल्लडबाज आणि कनिष्ठवर्गीय लोक यांनी हाती शस्त्र धरले आणि शहरातील रस्त्यात सड्या फिरणाऱ्या किंवा दोघातिघांच्या गटाने फिरणाऱ्या इराणी शिपायांवर किंवा शिपायांच्या सहाय्यकर्त्यांवर हल्ले चढविण्यास आरंभ केला. इराणी सैनिकांची संख्या थोडी होती, स्थानिक भाषा त्यांना येत नव्हती आणि शहरातील आडरस्त्यांची त्यांना माहिती नव्हती. या गोष्टींची अडचण होऊन कत्तलीत ते बळी पडले. आपल्या राजाचा वध झाला आहे या अफवेने त्यांच्या हृदयाचे पाणी पाणी झाले. संघटित कृत्य करण्यास ते असमर्थ बनले. दंगलखोरांना यश आल्याचे पाहून आणि इराणी सैनिकांचा बचाव कमकुवत आहे असे पाहून उठाव पसरू लागला. सबंध रातभर खुनी हल्ल्यांचे थैमान चालू राहिले. दुसऱ्या दिवशी पहाटे तीन वाजल्यानंतर (हल्लेखोर दमल्यामुळेच म्हणा) दंगल जरा ओसरली. पण दिवस उजाडताच ती पुन्हा नव्या दमाने

२ दिल्लीतील कथेकऱ्यांची ही एक नेहमीची नाटकी कल्पना आहे. शाहजहान बंदिवासात असताना आग्र्याच्या किल्ल्यात त्याने औरंगजेबाविरुद्ध असलेच कारस्थान केले होते असे सांगण्यात येते. नादिरशाहाचा जो तथाकथित वध झाला त्याविषयीचा कमीजास्त फरकाचा तपशील लोकांच्या तोंडी होता. एका मराठी बातमीपत्राने औरंगाबादेस पोहोचलेली अफवा पुढीलप्रमाणे होती. (राजवाडे, खंड ६, क्रमांक १३४) : "नादिरशाहाने आपली शपथ मोडली, विश्वासघात करून बादशाह आणि त्याचे उमराव याना तुरुंगात टाकले. त्यास येऊन मिळालेल्या पठाणांनीदेखील तसे न करण्याविषयी त्यास आग्रहपूर्वक सांगितले होते. नादिरचे दिल्लीत आगमन झाले तेव्हा त्याच्या भोवतालच्या पठाणांनी उठाव केला. कासिमखान पठाण आणि त्याचा भाऊ हे मोरपिसाच्या पंख्याने हौद्यात बसलेल्या नादिरला आणि त्याच्या वजीराला वारा घालीत होते. दरवाजाच्या जवळ ते आले असता या पठाणांनी त्या दोघांनाही आपल्या कट्यारींनी ठार केले."

पसरली. तो दिवस फाल्गुन शुक्ल त्रयोदशीचा होता. या दिवसापासून होलिकोत्सव सुरू होतो. अशा वेळी हिंदूतील कनिष्ठवर्गीय विशेषेकरून उद्दीपित अवस्थेत असतात; पुष्कळदा अमली पदार्थांच्या कैफातही असतात. [क्रॉनिकल आणि राजवाडे, खंड सहा, १३१.]

या घटनाक्रमाविषयी माहितगार लोकांपैकी हरचरणदास हा एकटाच असे सांगतो की, इराणी सैनिकांनी मालमत्ता आणि स्त्रिया यांच्यावर हिंसक हल्ले केल्यामुळे दिल्लीचे नागरिक क्रोधोन्मत्त बनून त्यांनी दंगल घडविली. पण हे विधान या प्रकरणीच्या संभाव्यतेविरुद्ध जाते. कारण नादिरच्या आगमनानंतर फक्त एकच दिवस उलटलेला होता. खंडणीची रक्कम किती असावी, ती लादण्याची पद्धत काय असावी या गोष्टी अजून चर्चेतच होत्या; शिवाय योग्य वेळ येण्यापूर्वी रहिवाशांना अगोदरच ओरबाडण्यास परवानगी देणाऱ्यांपैकी किंवा परकीय शहरात असलेल्या आपल्या फौजेतील शिस्त ढिली करणाऱ्यांपैकी नादिर नव्हता. इतर सगळे लेखक दर्शवितात की, भारतीय लोकच आक्रमक होते. उच्चवर्गीय लोक तसेच सगळे सज्जन लोक या दंगलीपासून दूर राहिले. पण हुल्लडबाज लोकांना शांत करण्याचा अथवा नियंत्रित करण्याचा कसलाच सक्रिय उपाय योजण्यात त्यांनी भाग घेतला नाही. कारण सुव्यवस्था राखणारी जुनी शासकीय यंत्रणा विसर्जित झाली होती. जात, पंथ, वंश, पेशा इत्यादी कारणावरून जनतेचे इतके तुकडे उडाले होते की त्यांनी क्षणार्धात एकत्र येऊन स्वयंसेवक रक्षकदल उभे करण्याची घटना घडणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे त्यांच्या सुलतानी थाटाच्या केंद्रवर्ती सरकारने त्यांना सामूहिक कृती करण्याची एखादी संधी उपलब्ध करून अथवा स्थानिक स्वराज्य देऊन, त्यांच्या पुढाकार घेण्याच्या अथवा स्वाश्रयी बनण्याच्या शक्तींची जोपासना केलेली नव्हती.

दंगलीस आरंभ कसा झाला याविषयी हॅन्वे याने ऐकली ती गोष्ट या दंगलीविषयी अतिसंभाव्य माहिती असावी असे मला वाटते. सदरची माहिती अशी की, तहमास्पखानाने पहाडजंग या शहराच्या भागातील धान्यकोठाराकडे कित्येक इराणी लष्करी पोलीस (नसकची) पाठविले आणि कोठारे उघडावीत व धान्याची किंमत ठरवून द्यावी अशी त्यांना आज्ञा दिली. धान्य व्यापाऱ्यांचे भावाविषयी समाधान झाले नाही. तशात जमाव जमला. सय्यिद नियाजखान आणि इतर कित्येक ठळक असामींनी जमावाचे नेतृत्व आपल्या हाती घेतले आणि इराणी घोडेस्वारांना कापून काढले. तद्नंतर नादिरचा खून झाला आहे अशी खबर पसरविण्यात आली. त्यामुळे हलकल्लोळ वाढला. [हॅन्वे, खंड दोन, ३७५]

अली हजीन याच्या म्हणण्यानुसार त्या रात्री ७ हजार इराणी असामींची कत्तल झाली; पण अब्दुल करीम सदरचा आकडा तीन हजार असल्याचे सांगतो व तो तेवढा असण्याची शक्यता जास्त वाटते.[३]

३ अली हजीन सांगतो की, काही हिंदुस्थानी उमरावांनी आपल्या महालाकरिता किजिलबाश रक्षकांची नादिरकडे भीक मागितली होती. याच उमरावांनी या पहारेकऱ्यांना त्यांची कत्तल व्हावी म्हणून जमावाच्या हवाली केले व काहींनी तर खुद्द आपल्या हाताने त्यांना ठार मारले. पण अब्दुल करीमने सांगितलेली हकीकत अधिक संभाव्य वाटते. तो सांगतो की, या पहारेकऱ्यांचे दंगलीतून संरक्षण झाले. या पहारेकऱ्यांच्या त्या महालापुढच्या अस्तित्वामुळे दुसऱ्या दिवशी नादिरच्या फौजी लोकांनी जो सूड उगवला व कत्तल घडविली त्यावेळी, ही घरे इतकेच काय पण या घराभोवतालच्या गरीब-गुरीबांचे संसारदेखील त्यांची विनवणी केल्यावर, सुटले होते.

आपल्या फौजी लोकांवर हल्ले होत आहेत याविषयीचे पहिले अहवाल त्या दिवशी रात्र पडण्याच्या सुमारास नादिरशाहासमोर प्रथम सादर झाले. तेव्हा त्यावर विश्वास ठेवण्यास त्याने नकार दिला. तक्रार आणणाऱ्यांची त्याने कानउघाडणी केली. माझ्या फौजेत काही करंटे लोक आहेत, ते शहरवासियांविरुद्ध खोटा आरोप करीत आहेत, असा आरोप केल्याने मजकडून त्यांची लूट करण्याचा व त्यांना ठार करण्याचा हुकूम मिळेल व अशा प्रकारे आपली पाशवी हाव तृप्त करता येईल अशी आशा त्यांना वाटते असे नादिर यावेळी म्हणाला. पण असले अहवाल येतच राहिले आणि हळूहळू ते अधिकाधिक घबराट निर्माण करू लागले. खरी गोष्ट काय आहे ते शोधून काढण्यासाठी त्याने एका हवालदाराला बाहेर पाठविले. किल्ल्याचा दरवाजा उघडताच जमावाने या हवालदारास ठार केले. दुसरा एक हस्तक पाठविला, तर त्याचीही गत तीच झाली. तद्नंतर इराणी राजाने रस्त्यात घुसा व जमावास पिटाळून लावा असा हुकूम हजार बंदूकचींना दिला. पण एवढे होईतो दंगल इतक्या विस्तीर्ण भागात पसरली होती की, इतक्या थोड्या लोकांना ती चेपून टाकणे शक्य नव्हते.

हे सर्व समजताच, आपल्या सर्व सैनिकांनी रात्रीच्या उरलेल्या काळात आपापल्या ठाण्याच्या ठिकाणी एकत्रित होऊन बसावे असा हुकूम नादिरशाहाने काढला. विखरून बसू नका व हल्लेखोरांना अद्दल घडविण्यासाठी प्रतिहल्ला करू नका असा आदेश त्याने दिला. आपल्या ठाण्यावर हल्ला होत नाही तोपर्यंत लढण्यासदेखील त्यांना मनाई झाली. शहराच्या प्रत्येक मोहल्ल्याच्या तोंडाशी पहाऱ्यासाठी इराणी पहारेकऱ्यांनी जबरदस्त तुकड्या बसविल्या. दंगलखोर जमावांना आपापल्या मोहल्ल्यात अलग पाडण्यात आले. त्यांना दुसऱ्या दंगलखोरांबरोबर सामील होण्याची संधी दिली नाही अथवा त्यांना अन्यत्र कोठे निघून जाण्याचीदेखील संधी मिळू दिली नाही. [ जहानकुशा ३५७, हरचरण, बयान ४६–४७, अली-हजीन२९८–९९, आनंदराम ४४ ]

## १२० : नादिरने केलेली दिल्लीतील कत्तल

रविवारी मार्च ११ रोजी सूर्योदयाच्या वेळी दंगलीची धामधूम पुन्हा एकदा सुरू झाली. नादिरने आपला चिलखती पोशाख चढविला. तो घोड्यावर स्वार झाला. आपल्या-भोवती त्याने भालेकरी सज्ज ठेवले. त्यांच्या हाती कटचारीदेखील ठेवल्या. अशा थाटात जव्हेरी बाजाराच्याजवळ कोतवाल कचेरीच्यासमोर आणि चांदणी चौकाच्या अगदी मध्यभागी असलेल्या रोशनुद्दौलाहच्या सुवर्ण-मशिदीकडे तो रपेट करीत गेला. तेथे गेल्यावर शहराच्या कोणत्या भागातून आणि शहरातील कोणत्या वर्गातील लोकांनी आदल्या रात्रीची गुन्हेगारी कृत्ये केली याचा त्याने छडा लावला व नंतर त्याने आपली तलवार, मोहल्ल्यातील लोकांच्या सरसहा कत्तलीचा आदेश देण्याची खूण म्हणून म्यानाबाहेर उपसली.

येथपर्यंत नादिरच्या हुकुमाची अमलबजावणी करावयाची या एकमेव कारणावरून नादिरच्या सैनिकांनी कसलेही प्रत्युत्तर देण्याच्या फंदात न पडता आपले हात बांधून ठेवले होते. आता आपल्या तलवारी उगारून सूडाचा हैदोस घालण्यासाठी त्यांची लगबग सुरू झाली. जेथे दंगलीचा हैदोस घडला होता तेथील घरे त्यांनी लुटली. वयाचा कसलाच विचार

न करता सगळे पुरुष त्यांनी ठार केले व सर्व स्त्रियांना फरफटत नेऊन गुलाम केले.[४] विध्वंस करणाऱ्यांनी कित्येक घरांना आगी लावल्या. त्यात मेलेल्या आणि जखमी झालेल्या हिंदू आणि मुसलमान अशा सर्वांना भेदभाव न करता जाळून टाकले. [ जहानकुशा ३५७-३५८ ]

माणसांची ही कत्तल सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास सुरू झाली ती दुपारी दोन वाजेपर्यंत अप्रतिहतपणे चालली. तेव्हा विजेत्याने आपला क्रोध आवरावा व आपल्या चुकल्या-माकल्या प्रजेवर दया दाखवावी अशी करुणा भाकण्यासाठी दीनवाण्या मुहम्मदशाहाने निजाम आणि वजीर या आपल्या दोन सर्वोच्च उमरावांना नादिरकडे पाठविले. [ जहानकुशा ३५९ ] त्यांची प्रार्थना नादिरने ऐकली. कारण स्वैराचारी रक्तपातात त्यास आनंद वाटत नव्हता; हिंदुस्थानी जनतेचा आमउठाव होईल या काल्पनिक भीतीने स्वतःच्या संरक्षणाचा उपाय म्हणून केवळ, त्याने कत्तलीचा हुकूम दिला होता. [ हरचरण ]

इराणी फौजेतील म्होरके घेऊन शहरभर दौरा काढून कत्तलीचे काम थांबवा अशी दवंडी पिटण्याचा कोतवालास हुकूम झाला. आज्ञेचे परिपालन त्यांनी तत्परतेने केले.

आनंदराम ( नादिरच्या दिल्लीतील वास्तव्याच्या सबंध काळात हा वकिलपुरा या उपनगरात उपस्थित होता. ) सांगतो की, चांदणी चौक, फळ बाजार चौक, दरीबा बाजार आणि जामा मशिदीजवळचा भाग येथील घरांची लुटालूट झाली. हरचरणसुद्धा सांगतो की, किल्ल्याजवळील फक्त दोन किंवा तीन मोहल्ले आणि तेथून जवळच असलेला पहाडगंज हा धान्य व्यापाऱ्यांचा मोहल्ला येथे कत्तलीने हैदोस घातला. शहरातील ज्या भागाला कत्तलीची आणि लुटालुटीची झळ पोहोचली त्या भागाचा निर्देश करताना अब्दुल करीम सांगतो की, किल्ल्याच्या दरवाजापासून पश्चिम बाजूस जुन्या ईदग्यापर्यंत उत्तर बाजूस लाकूडबाजारापर्यंत व दक्षिण बाजूस शहराच्या तटबंदीच्या आतील दिल्ली-दरवाजाच्या बाहेरच्या भागापर्यंत कत्तलीची झळ लागलेली होती. या भागाव्यतिरिक्त, "उठाव जेथे सुरू झाला त्या पहाडगंज भागात दंगल घडवून आणण्याच्या वहिमावरून अनेक इसमांना अटक करण्यात आली. त्यांना यमुनेच्या वाळवंटी नेऊन त्यांची डोकी तेथे उडवण्यात आली." [ बयान ]

कत्तलीत किती माणसे ठार झाली याचा तपास कोतवालाने नंतर केला. तेव्हा अब्दुल करीम याच्या आठवणीविषयीच्या, माझ्या हस्तलिखितानुसार सदरचा आकडा ८ हजाराचा होता. पण याच लेखनकृतीची नक्कल वापरणाऱ्या लेफ्टनंट प्रिचर्ड या, सर एच्. इलियट यांच्या भाषांतरकाराने सदरच्या आकड्याचे २० हजार असे वाचन केले आहे. इराणी राज्यसचिवाने ३० हजार ठार असा अंदाज केला आहेत तर मराठी बातमीपत्रात ( जी दुरून आलेल्या ऐकीव माहितीवर आधारलेली होती ) एके ठिकाणी बळी गेलेल्यांची संख्या ५० हजार

४ हॅन्वे ( खंड दोन, ३७६ )–जवळपासच्या मुलुखातून आलेले कित्येक निर्वासित, जवाहिरे, सराफ व श्रीमंत दुकानदार यांच्यासह व दरबाराच्या हकीमाच्या नेतृत्वाखाली, नाइलाजाने जिवावर उदार होऊन, हातात शस्त्र घेते झाले. त्यांनी आपला जमाव उभा केला आणि थोडा वेळ मोठ्या शौर्याने लढत दिली. पण शस्त्रे वापरण्याचा यत्किंचितही सराव नसल्याने हाती तलवार असताना, त्याना मरण पत्करावे लागले.

अशी सांगितली आहे तर दुसऱ्या ठिकाणी ३ किंवा ४ लाख अशी सांगितली आहे. हरचरण दास याच्या मते, एक लाख; तर या संख्येत आणखी १० हजार मिळवून हॅन्वे आपला अंदाज वर्तवितो व पुढे सांगतो की, आणखी १० हजारांनी विहिरीत उड्या टाकून जीव दिले. [ खंड दोन, ३७६ ] बाजारपेठेत अस्पष्ट उठलेल्या अफवांमुळे हे सर्व आकडे म्हणजे सर्वसामान्य लोकांच्या अतिशयोक्तीतून निघालेले आहेत. ज्या भागात झळ पोहोचली तो शहराचा लहान भाग होता आणि कत्तलीचा हदोस चालला तो अल्पकाळापर्यंतच या गोष्टी विचारात घेता जे तलवारींना बळी पडले त्यांची जास्तीतजास्त संभाव्य संख्या २० हजार असण्याची शक्यता आहे.

कित्येक हिंदुस्थानी सद्‌गृहस्थांनी आपल्या बायका आणि मुली, त्यांची किजिलबाश सैनिकांकडून बेअब्रू होऊ नये म्हणून स्वतःच्या हातांनी ठार केल्या आणि नंतर शत्रूच्या तलवारीस बळी तरी पडले किंवा आपले गळे त्यांनी स्वतःच कापून घेतले. कित्येक स्त्रियांनी आपल्या घरांतील आडांत, मृत्यूपेक्षा अधिक भयंकर लज्जास्पद अशा प्रसंगातून सुटण्यासाठी, उड्या टाकून जीव दिले. पण यापेक्षा अधिक स्त्रियांवर अत्याचार झाले. त्यांना बंदी करून फरफटत नेण्यात आले. इराणी राज्यसचिवानुसार मात्र या स्त्रियांना परत त्यांच्या घरी पाठविण्याचा हुकूम नादिरने दिला. [हॅन्वे, जहानकुशा ३५९, राजवाडे, खंड सहा, क्रमांक १३३ व १६७] दंगलीच्या रात्री सय्यिद नियाजखान ( वजीराचा जावई ) आणि शाहनवाजखान या दोन हिंदुस्थानी उमरावांनी रायभान याच्यासह नादिरच्या हत्तीखान्यावर हल्ला चढविला, त्याच्या माहुतांच्या दारोग्याला ठार मारले आणि त्याचे हत्ती पळवून नेले. तद्नंतर त्यांनी आपणाला शहराबाहेरील एका किल्ल्यात बंद करून घेतले; नादिरच्या स्वाधीन होण्यास त्यांनी विरोध दर्शविला तेव्हा त्यांना पकडण्यासाठी बादशाहाने अजीमुल्लाहखान आणि फूलादखान यांना पाठविले. त्यांना त्यांच्या ४७० हत्यारबंद अनुयायासमवेत नादिर समोर उभे करण्यात आले. नादिरच्या हुकुमानुसार या सर्वांना ठार करण्यात आले. [जहान, ३५९] पण अब्दुल करीम याच्या मते मात्र रात्रीच्या दंगलीत भाग घेण्याच्या बाबतीत ते पूर्णपणे निरपराध होते. मात्र तो सांगतो की, कत्तलीचे सत्र चालू असताना आपली मालमत्ता आणि आपल्या परिवाराचा सन्मान यांचा बचाव करीत असताना कित्येक किजिलबाश हल्लेखोरांचा त्यांच्या हातून वध झाला होता. इतर सर्व वृत्तान्त कथन करणाऱ्यांच्या तज्ज्ञ मतानुसार, हे दोन उमराव आक्रमक होते. या प्रसंगाचे वेगळे वर्णन हॅन्वेच्या कानी आले. त्याच्या मते [ खंड दोन, ३७७ ] दिल्लीतील कत्तल सुरू होण्याअगोदर एका मुघलपुऱ्यात राहाणाऱ्या हिंदुस्थानी उमरावाच्या महालात असलेल्या तोफा जप्त करण्यासाठी इराणी फौजेची एक तुकडी धाडली होती. तार्तार मोगोलांच्या एका गटाने कपट–कृत्य करून त्या सर्वांना ठार मारले. तेव्हा नादिरने मोठी तुकडी धाडली. या लोकांवर ती तुकडी तुटून पडली. सदर तुकडीने तेथील सुमारे ६ हजार लोक कापून काढले. इराण्यांनी दारूगोळा हस्तगत केला. शिवाय तीनशे असामी व त्यांचे अमलदार यांना धरून आणले. या सर्वांची मुंडकी उडविण्यात आली आणि त्यांची प्रेते यमुनेच्या रेतीत भिरकावून देण्यात आली.

कत्तल झाल्यानंतर पुढे काही दिवस कत्तलीचा हैदोस झालेल्या दिल्लीतील गल्ल्यांत रस्त्याने जाणे मुश्कील झाले. घरे, विहिरी आणि रस्त्यांच्या बाजू या ठिकाणी प्रेतेच प्रेते पडली होती. त्यांची येणारी दुर्गंधी असह्य होती. भीतीपायी कोणी तिकडे फिरकण्याचे

धाडस करीत नव्हते. शेवटी कोतवालाने नादिरची परवानगी घेतली. प्रेते रस्त्यावर व इतर मोकळ्या जागेत गोळा केली व जाळून टाकली. [ आनंदराम ५०, अली हजीन ३००]

कत्तलीनंतर, धान्याच्या कोठारांना सील ठोकावे व तेथे पहारा बसवावा असा हुकूम नादिरने सोडला. त्याने घोडेस्वारांच्या कित्येक तुकड्या शहराभोवती वेढा घालण्यास पाठविल्या आणि शहरची ये-जा बंद पाडली. शहराला जणू वेढा पडला होता. सगळे रस्ते रहदारीसाठी एकदम बंद झाले होते. कत्तलीतून जे वाचले त्यांच्यावर दुष्काळाचे संकट कोसळले अन्नपाण्याच्या शोधात जी मंडळी दिल्ली सोडून जवळपासच्या खेड्यात जाण्याचा प्रयत्न करीत होती त्यांना घोडेस्वार पहारेकऱ्यांनी वाटेत अडविले आणि त्यांचे नाक कान कापून त्यांना पुन्हा शहरात पिटाळले. नंतर काही दिवसांनी एका शोकग्रस्त शिष्टमंडळाने इराणी राजाची भेट घेऊन विनवणी केली; तेव्हा शेवटी त्याने त्यांना लागणारा किराणामाल खरेदी करण्यासाठी फरीदाबादला जाण्याची परवानगी दिली [हॅन्वे, खंड दोन, ३७७-७८, राजवाडे, खंड सहा, क्रमांक १३३]

पण खेडी तरी कोठे सुरक्षित होती ? इराणी असामी राजधानी भोवतालच्या ३०-४० मैलांत लूटमार करीत होते. त्यांनी या भागातील खेडी लुटली होती व जमीन उजाड करून टाकली होती. ज्या रहिवाश्यांनी प्रतिकार केला त्यांना इराण्यानी मारून टाकले. कर्नाळची लढाई झाल्यानंतर इराण्यांची एक तुकडी ठाणेसरवर धाड घालण्यासाठी पाठविली होती. या तुकडीने तेथे लुटालूट केली व कित्येकांना ठार मारले. मार्च महिन्याच्या सुरूवातीस शाह दिल्लीस कूच करीत असताना रस्त्याच्या कडेला असलेल्या पानिपत, सोनिपत वगैरे शहराना नागविण्यात आले होते. [हॅन्वे, खंड दोन, ३८४, ३७२-३७३]

## १२१ : दिल्लीतून खंडणी उकळली जाते

नादिरने दिल्लीत दोन महिने मुक्काम ठोकला. राजधानी व्यापल्यामुळे त्याचे वास्तव्य सुरक्षित झाले होते. नुकसानभरपाई म्हणून महाप्रचंड रक्कम वसूल करण्याच्या उद्योगात तो गुंतून गेला. मार्च २६ रोजी त्याचा धाकटा मुलगा मिर्झा नस्रुल्लाह याचे एका शाही राजकुमारीशी लग्न लावून दिले. ही शाहझादी दावर बख्श [५] याची मुलगी होती. हा दावर बख्श म्हणजे मुरादचा नातू आणि शाहजहानाचा पणतू होता. विवाहसमारंभाच्या अगोदर एक आठवडाभर रात्रंदिवस भव्य प्रमाणात आनंदोत्सव चालू होता. दिवाण-इ-खासच्या समोरील यमुनेच्या किनाऱ्यावर दररोज रात्री रोशणाई होत असे. दिवसा हत्ती, बैल, वाघ आणि हरणे यांच्या झुंजी होत.

आपली कपटदायक मोहीम पार पाडल्यावर आजिक्य-वीराने थोडी विश्रांती घेतली. त्याच्यासमोर नाच-गाण्याचे कार्यक्रम पेश झाले. नूरबाई नावाच्या हिंदुस्थानी नर्तकीने आपल्या संगीत-कौशल्याच्या जोरावर आणि त्यास उद्देशून केलेल्या स्तुति-काव्याच्या जोरावर त्याची चांगलीच नजरबंदी केली. इतकी की तिला ४ हजार रुपये द्यावेत आणि आपल्या बरोबर तिला इराणला न्यावे असा हुकूम त्याने सोडला. नादिरच्या या दुसऱ्या क्रमांकाच्या कृपादृष्टीतून मुक्त होण्यासाठी मात्र तिला जिवाचा आटापिटा करावा लागला. [बयान ५६]

५ दावर बख्शाची आई औरंगजेबाची मुलगी होती.

नादिरशाहाला दिल्लीत जी एकूण नुकसानभरपाई हस्तगत झाली तिचा त्याच्या सचिवाने केलेला अंदाज १५ कोटी रुपयांचा आहे. या नुकसानभरपाईत रोकड, महाप्रचंड संख्येचे जवाहिर, वस्त्रेप्रावरणे, सामानसुमान आणि शाही कोठारातील इतर कित्येक वस्तू यांचा समावेश होता. या आकड्यात शाही खजिन्यातून तसेच जवळच्या आणि लांबच्या उमरावांकडून जे जे काही हिसकावले त्या सर्वांचा समावेश आहे. [ जहानकुशा, ३६१ ] सर्व मार्गांनी उकळलेल्या खंडणीची बट्ट रक्कम पुढील तपशीलानुसार ७० कोटी रुपये भरते असा फ्रेझरचा अंदाज आहे. पण ती अतिशयोक्ती आहे यात शंका नाही. कारण इराणी राज्यसचिवाचा आकडा जास्तीतजास्त अधिकृत आहे. सोन्याचांदीची ताटे व रोकड. . . ३० कोटी., जडजवाहिर. . . . २५ कोटी., मयूर सिंहासन आणि इतर नऊ सिंहासने, तसेच कित्येक शस्त्रे आणि उपकरणे, ज्यांच्यावर मूल्यवान खडे जडविलेले होते. . . ९ कोटी; उंची पक्का माल. . . २ कोटी; तोफा, सामानसुमान. . . ४ कोटी; एकूण. . . ७० कोटी याखेरीज ३०० हत्ती, १० हजार घोडे व तितकेच उंट त्याने ताब्यात घेतले. [हॅन्वे ३८३, ३८९] हिंदुस्थानी वजीराच्या पदरी चाकरीस असलेला आनंदराम मात्र खंडणीचा तपशील ६० लाख रुपये आणि काही हजार सुवर्णमुद्रा, १ कोट रुपये किंमतीची सोन्याची भांडी, ५० कोटी रुपये किंमतीचे, ज्यातील बहुतेक सगळे जगात असामान्य ठरतील असे मयूर सिंहासनासकटचे जडजवाहिर, असा देतो. [आनंदराम ५१]

बादशहाला आपल्या राजमुकुटातील सगळे हिरे त्याच्या हवाली करावे लागले. त्यात सुप्रसिद्ध कोहिनूर हिऱ्याचा देखील समावेश होता. शिवाय शाहजहान बादशहाने दोन कोटी रुपये खर्च करून बनवून घेतलेले मयूर सिंहासनदेखील नादिरला द्यावे लागले. सरकारी तिजोऱ्यांत ३ कोटी रुपये सापडले. या खजिन्यांच्या आतल्या कप्प्यात– जे कित्येक बादशहांच्या अमदानीत कधी उघडण्यातच आले नव्हते– यापेक्षा कितीतरी जास्त द्रव्य आढळून आले. [ हॅन्वे, ३८३ ] अब्दुल करीम सांगतो की दिल्लीतील बेगमांच्या खासगी मिळकती हिसकवण्यात आल्या नाहीत. पण हे विधान स्वीकारता येत नाही. तरी बेगमांचे जडजवाहिर मिळावे म्हणून त्या स्त्रियांचा अथवा नोकरांचा छळ मात्र झाला नाही. बादशाह आणि उमराव यांना अशा प्रकारे पिळून त्यांची संपत्ती उकळली जात असताना सामान्य जनता या संकटातून सुटली नाही. ज्या श्रीमंत रहिवाश्यांवर कत्तल किंवा लूटालूट यांचे गडांतर कोसळले नाही अशांनी आपल्या मालमत्तेच्या निम्म्या रकमेची वर्गणी भरावी व या मार्गाने एकूण २ कोटी रुपये[६] उभे करावेत असा हुकूम सुटला [शाकिर आणि आनंदराम] आनंदरामावर वर्गणीचा ५ लाखाचा आकडा बसविला. हे द्रव्य आदा व्हावे याची खबरदारी घेण्यासाठी इराणी लष्करी रक्षक त्याच्या दारावर बसविण्यात आले. जुलमी वसुलीची त्यांची पद्धत कशी होती याचे वर्णन करताना आनंदराम सांगतो, "तहमास्पखान जालेर याच्या मार्गदर्शनाखाली रहिवाशांवरील नुकसानभरपाईची रक्कम आकारून वसूल करण्यासाठी हिशेबनीस नेमले. पण नागरिकांची पूर्ण नागवणूक होणार नाही याची खबरदारी घेण्यासाठी दोन्ही सरकाराच्या उमरावांना खंडणीच्या आकारणीवर देखरेख ठेवण्यास सांगितले. खंडणीची ही आकारणी न्यायालयात लोकांसमक्ष होई. कोतवालाची

६ हॅन्वे, ३८३, सांगतो, "एप्रिलच्या मध्याच्या सुमारास व्यापारी आणि सामान्य जनता यांच्यावर जुलूम-जबरदस्ती करून ४ कोटी रुपये वसूल केले होते." पण या कामाची आनंदराम याची माहिती अधिक विश्वसनीय वाटते.

प्यादी आणि नसकची (म्हणजे इराणचे लष्करी पोलीस) यांना, घरांची मोजणी करण्याच्या, त्या प्रत्येकातील मालमत्तेची यादी तयार करण्याच्या आणि संबंधित नागरिकांना, त्यांच्या विषयीच्या न्यायालयीन कामकाजाच्या वेळी हजर ठेवण्याच्या कामावर पाठविले. खंडणीच्या आकारणीच्या वेळी संबंधित नागरिकांना हजर ठेवण्यामागील हेतू त्यांच्यावर त्यांच्या कुवतीनुसार आकारणी व्हावी हा होता. लहानथोर, श्रीमंत-गरीब अशा सर्वच असहाय्य लोकांना कित्येक दिवस न्यायालयात तिष्ठत राहावे लागले. पहाटेपासून सूर्य मावळेपर्यंत तर कधी रात्रीचा प्रहर होईपर्यंत थांबावे लागे......मीर वारिस आणि ख्वाजा रहमतुल्लाह यांच्यावरील आळ, कसली शाहनिशा न करता, खरे धरून चालले.. याद्या तयार झाल्या. राजधानीतील वर्गणीची रक्कम २ कोटी रुपये भरली. हे द्रव्य वसूल करण्यासाठी नादिरशाहाने निजाम, वजीर, अजीमुल्लाहखान, सरबुलंदखान आणि मुर्तजाखान यांची नेमणूक केली. संपूर्ण शहराची विभागणी ५ विभागात केली. निरनिराळे मोहल्ले, त्या मोहल्ल्यातील रहिवाशांची नावे, आणि त्यातील प्रत्येकाकडून सक्तीने वसूल करावयाची रक्कम एवढी माहिती या पाच उमरावांना देण्यात आली." [आनंदराम, ५३]

प्रत्येक नागरिकाने किती वर्गणी भरावी याचा नक्की आकडा आकारून झाला की, सदरची रक्कम अदा करण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला जाई. चालढकल केल्यास किंवा हरकत उपस्थित केल्यास केवळ अपमान व यातना तेवढ्या पदरी पडत. घरांच्या जमिनी उकरून धन कोठे पुरून ठेवले आहे काय, याची शोधाशोध झाली. [राजवाडे, खंड सहा, १३३] आनंदराम आपल्या आत्मचरित्रात लिहितो, "ज्या दोन मोहल्ल्यात वसुलीचे काम निजाम व वजीर यांच्याकडे सोपविण्यात आले होते तेथे लोकांना माणुसकीची वागणूक मिळाली. कारण वजीराने आपल्या खासगी खजिन्यातून बरेच पैसे भागवून टाकले होते, पण इतर तीन मोहल्ल्यात विशेषतः सरबुलंदखानाकडे सोपविलेल्या मोहल्ल्यात (म्हणजे खुद्द आनंदरामाच्या मोहल्ल्यात!) लोकांच्या हाल-अपेष्टांना सीमा उरली नाही. कुटुंबेच्या कुटुंबे नष्ट झाली. कित्येकांनी विषप्राशन केले, तर इतरांनी खंजीर खुपसून घेऊन आत्महत्या केली." [आनंदराम, ५४]

असे म्हणतात की, वजीर कमरुद्दीनखान याला उन्हात उभे करण्यात आले. असा त्रास देऊन त्याच्याकडून १ कोटी रुपये आणि जडजवाहिर व हत्ती उकळले. त्याचा दिवाण मजालिसराय याच्यावर भल्या मोठ्या रकमेची आकारणी केली. त्याचा छळ व्हावा म्हणून त्याला सरबुलंदखानाच्या हवाली केले. भर दरबारात त्याचा कान कापण्यात आला. अशा प्रकारे अवहेलनेत पार बुडून गेल्याच्या स्थितीत घरी परतत असताना ८ एप्रिल रोजी त्याने आत्महत्या केली. बंगालच्या सुभेदाराच्या दरबारातील प्रतिनिधीला बदडून काढण्यात आले तेव्हा त्याने आपल्या सर्वच्या सर्व परिवारासमवेत विषप्राशन केले. हॅन्वेदेखील सांगतो, "रानटीपणाचा एकही प्रकार दाखवावयाचा उरला नाही. आकारलेला कर अगदी कडेकोटपणे वसूल करण्यात आला. कित्येकांनी आपला नाश स्वहस्ताने करून घेतला........." [हॅन्वे, खंड दोन, ३८२; फ्रेझर, १९९; तारीख-इ-मुहम्मदी, तिलोकदास]

या सर्व काळात नादिर, राजा या नात्याने, दिल्लीत राहिला. त्यास सार्वभौम शासक समजून त्याच्या नावे नाणी पाडण्यात आली. सार्वजनिक प्रार्थनादेखील त्याचे नाव घालून म्हटली. आजवर मुघल बादशाहाचा शहन्शाह (राजाधिराज) हा जो किताब होता

तो त्याच्याकडून काढून घेतला आणि तो फक्त नादिरचा राहील अशी व्यवस्था झाली. हिंदुस्थानातील सुभ्यांच्या सुभेदारांनी नादिर हा आपला अधिराज आहे असे उद्घोषित करणे त्यांना आवश्यक केले. सुभ्यांच्या टाकसाळीत त्याच्या नावाची नाणी पाडण्याचे प्रकार-देखील घडले. मुहम्मदशाह आणि त्याचे उमराव अगदी असहाय्य आणि पददलित अवस्थेत दिल्लीत राजबंद्यांच्या अवस्थेत राहात होते.

इराणच्या राजाची या स्वारीमुळे जी भरभराट झाली तिचा लाभ इराणच्या तमाम लोकसंख्येला झाला. तेथील जनतेस तीन वर्षांच्या काळासाठी सरकारी कर माफ केले. फौजेतील सेनानींना बक्षिसी मुक्तहस्ताने दिली. सामान्य शिपायांना १८ महिन्यांचा पगार एक मुठीने मिळाला. त्यातील एक–तृतीयांश भाग थकबाकीचा होता, एक तृतीयांश भाग उचल पगाराचा होता व उरलेला एक ततीयांश भाग बक्षिसाच्या स्वरूपात होता. [बयान ५३] लष्करासोबत आलेल्या बिगरलष्करी असामींना प्रत्येकी ६० रुपये पगार म्हणून आणि १०० रुपये बक्षीस म्हणून मिळाले. [जहानकुशा, ३६१]

दिल्लीस असताना शेख मुईनुद्दीन चिश्ती याच्या अजमेर येथील दर्ग्याच्या यात्रेस जाण्याचा बेत नादिरशाह बोले. हा प्रवासाचा मनसुबा वस्तुतः राजपूत राज्यांची लूट करण्याच्या इराद्यानेच रचलेला होता. अजमेर राजपुतान्याच्या तसे अगदी मध्यावरच आहे नादिर असे कूच करण्याची इच्छा करीत आहे अशी खबर कानी येताच सवाई जयसिंग याची घाबरगुंडी उडाली. त्याने आपला आणि आपल्या उमरावांचा परिवार उदयपूर या डोंगरी बालेकिल्ल्यात पाठविला आणि तो एकटाच राजधानीत राहिला. पहिला इशारा मिळताच पळून जाण्याची जय्यत तयारी त्याने ठेविली होती. या वेळी बाजीराव पेशवा बर्‍हानपुरास होता. इराणी फौजांचे दक्षिणेस आक्रमण होऊ नये म्हणून चंबळ नदीच्या सीमेवर नादिरला थोपवून कसे धरावे याविषयीच्या योजना आखण्यास त्याने आरंभ केला. [राजवाडे, खंड सहा, १३३; ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र, ४२]

## १२२ : नादिरचे दिल्लीहून प्रयाण

दिल्ली शहरात याप्रमाणे दोन महिने घालवून झाल्यावर आणि खंडणी वसूल करून झाल्यावर, बुधवारी मे १ या दिवशी त्याने आपला भव्य दरबार भरविला. या दरबारास येण्यासाठी बादशाह आणि त्याचा उमराववर्ग यांना पाचारण केले. अशा आलेल्या शंभर एक उमरावांना त्याने मानाची वस्त्रे, रत्नजडित तलवारी आणि कट्यारी, घोडे वगैरे भेटवस्तू दिल्या. त्याने आपल्या हाताने हिंदुस्थानचा राजमुकुट मुहम्मदशाहाच्या शिरावर ठेवला व त्याच्या कमरेस एक रत्नजडित तलवार बांधली.

बादशाहाने कृतज्ञतापूर्वक कुर्निसात केला आणि तो म्हणाला, "ज्या अर्थी शहनशाहाने मोठी उदारता दाखवून मला दुसर्‍याने राजमुकुट आणि तख्त यांचा धनी बनवले आहे आणि जगातील राजमुकुटधारक अधिपतींमध्ये मला आदरणीय बनविले आहे, तेव्हा माझ्या साम्राज्यापैकी सिंधू नदीच्या पश्चिमेचा काश्मिरपासून सिंधपर्यंतचा सगळा मुलूख तसेच ठठ्ठा हा सुभा व त्या सुभ्याखाली असलेली बंदरे असा सर्व भाग माझा नजराणा म्हणून मी विनवणीपूर्वक देऊ करतो." अशा

रीतीने सिंधू नदीच्या पलीकडील मुलूख आणि अफगाणिस्थान हे प्रदेश अखेर बाबराच्या वंशजाच्या हातून निसटले. शिवाय सिंधू नदीच्या पूर्वेकडे बराच मोठा प्रदेश नादिरने कर्नाळची लढाई होण्याच्या अगोदर स्थानिक सुभेदारांबरोबर केलेल्या लढाईत विजय मिळवून, या विजयांच्या जोरावर बळकावला होता. या प्रदेशांच्या महसुलावरील त्याच्या हक्काबाबत तंटा नव्हता. तरी पण या सुभ्यावर मुहम्मदशाहाच्या अमलदारांचाच कारभार चालू होता. सदर महसुलापोटी नादिरला प्रतिवर्षी २० लाख रुपये पाठविण्याबाबतचा करार लाहोरच्या सुभेदाराने नादिरला लिहून दिला. त्यामुळे सिंधू नदीच्या पूर्व भागात इराणी शिबंदी ठेवण्यास कसलेच कारण उरले नाही.

या मे १ रोजीच्या दरबारात नादिरने हिंदुस्थानच्या समस्त उमरावांना आणि अधिकाऱ्यांना बादशाहाच्या आज्ञेचे पालन करण्यास आणि बादशाहाची मर्जी संपादण्यास आग्रहपूर्वक सांगितले. त्यांना आणि त्यांच्या धन्याला त्याने राज्य करण्याच्या कलेबाबत बहुमोल सल्ला दिला. यापुढे फर्माने मुहम्मदशाहाकडून निघतील आणि नाण्यावर तसेच खुत्ब्यामध्ये त्याचेच नाव आणि किताब राहतील असा हुकुमनामा त्याने काढला. गेले दोन महिने नादिरच्या नावाचा खुत्बा आणि नादिरच्या नावाची नाणी हिंदुस्थानात प्रचारात आली होती. पण तो प्रकार आता बंद केला. [ जहानकुशा, ३६२ ] या दिवशी इराणी विजेत्याने आपल्या सहीची चार फर्माने, पैकी एक नासिरजंग यास, एक नासिरुद्दौलह यास, एक राजा शाहू यास आणि एक बाजीराव यास याप्रमाणे रवाना केली. मी दिल्लीस जी व्यवस्था लावली आहे तिचा आदर करावा आणि भावी काळात मुहम्मदशाहाशी आज्ञाधारक असावे असे त्यात आग्रहपूर्वक प्रतिपादिले होते. [ जहानकुशा, ३६१–३६२; राजवाडे खंड सहा, १६७; अली हजीन ३०१; बयान ५७; आनंदराम ८०–८३ ]

तद्नंतर बादशाहाच्या आठ पिढ्या साठलेला खजिना आणि लुटलेली भारताची संपत्ती आपल्याबरोबर लादून घेऊन, नादिर परतीच्या वाटेस लागला. मुघल साम्राज्याच्या वित्त व्यवस्थेची माहिती असलेल्या १३० हिशेबनिसांना, त्याचप्रमाणे इराणात दिल्लीसारखे शहर बांधण्यासाठी ३०० गवंडी, २०० लोहार, २०० सुतार आणि १०० पाथरवट यांना त्याने आपल्याबरोबर नेले. काही सोनार आणि काही नौकाशिल्पी यांच्यावर देखील त्याच्याबरोबर जाण्याची जबरदस्ती झाली. या कारागिरांना घोडी आणि इतर आवश्यक साहित्य पुरविले होते, मोठ्या पगाराचे आश्वासन त्यांना दिलेले होते व व तीन वर्षांनंतर त्यांना भारतास परतण्याची मुभाही त्याने दिली होती. पण नादिर लाहोरला पोहोचेतो यांतील बहुतेकांनी कसली ना कसली युक्ती लढवून निसटून जाण्यात यश मिळविले. [ हॅन्वे, खंड दोन, ३८९. ]

१७३९ मे ५ रोजी नादिरने ५७ दिवस दिल्लीत राहिल्यानंतर दिल्लीहून प्रयाण केले. शहराबाहेरच्या शालिमार बागेत थोडे थांबून तो नरेला ते सोनीपत या वाटेने गेला. सोनीपत येथे त्याने आपल्या फौजेस मागे टाकले. त्याच्या पिछाडीच्या भागात शेतकऱ्यांनी उठाव केला. त्याच्या माळव्यातील सर्वांत मागच्या बाडबिस्तऱ्याची, तसेच माळकेतून मागे पडल्यांची या शेतकऱ्यांनी लुटालूट केली. माल वाहून नेणारी ( उंट, घोडे, खेचरे ) एक हजार जनावरे ठाणेसर येथे पोहोचण्यापूर्वी त्याने गमावली असे सांगतात. तेव्हा संतापलेल्या नादिरने येथे तसेच वाटेतील काही शहरात कत्तलीचे हुकूम सोडले. [ हॅन्वे, ३९१ ] सरहिंद-पासून पुढे तो आपल्या उजव्या हाताच्या रस्त्यावर वळला आणि हिमालयाच्या पायथ्या-पायथ्याने सरकू लागला. पंजाबच्या पाचही ( पाची ) नद्या त्याने अगदी वरच्या बाजूस

त्यासाठी टाकलेल्या पुलांवरुन ओलांडल्या. उन्हाळा असल्यामुळे उन्हाचा ताप कमी करण्यासाठी त्याने असा रस्ता बदलला. २५ मे रोजी वजीराबादच्या[७] ईशान्येस ४२ मलांवर असलेल्या अखनूर या गावी तो चिनाब नदीवर येऊन पोहोचला. यावेळी डोंगराळ भागात मुसळधार पाऊस पडल्यामुळे नदीला पूर आलेला होता. जेमतेम अर्ध्या इराणी फौजेने नदी ओलांडली असता नदीच्या वेगवान धारेमुळे नदीवर बांधलेला नावांचा पूल मोडला आणि २,००० इराणी असामी बुडून मेले. तेव्हा येथे मोठा मुक्काम टाकण्यात आला. जवळपास आणि लांबवरदेखील नावांचा शोध दरम्यानच्या काळात घेण्यात आला. उरलेल्या निम्म्या-अर्ध्या फौजी असामींना नावा आणि तराफे यांच्यात बसवून, त्यांच्या फेऱ्या करून, त्यांना कालूवाल या ठिकाणी पैलतीरांवर पोहोचविण्यात आले. या सर्व गोष्टींस ४० दिवस लागले. नादिरने सर्वांत शेवटी जुलै ३ रोजी नदी ओलांडली व आपले कूच चालू केले.

या वेळेपर्यंत पर्वताच्या पायथ्यापाशीदेखील वाटणारा उष्मा असह्य होता. लाहोर आणि मुलतानचा सुभेदार जिक्रियाखान या ठिकाणापर्यंत नादिरच्या सोबत आला होता. आता त्याला रजा दिली. त्यास त्याच्या कारभाराच्या जागेवर हजर होण्यास सांगितले. नादिरने त्याला कित्येक भेटी दिल्या, त्यास बढती द्यावी अशी शिफारस करणारे पत्र त्याच्या धन्यास उद्देशून लिहिले. जिक्रियाखानाची कर्तव्यदक्षता आणि त्याची कर्तबगारी यावर नादिरशाह खूश झाला होता. तुला हवी ती मेहेरबानी माग असे नादिरने त्याला सांगितले, तेव्हा इराणी फौजांनी दिल्लीहून आपल्याबरोबर घेतलेल्या सगळ्या हिंदुस्थानी बंद्यांची सुटका करावी अशी उमदी विनवणी जिक्रियाखानाने केली. त्यानुसार नादिरच्या हुकुमान्वये या सर्व बंद्यांना मुक्त केले. [मा. उ. खंड दोन, १०६]. नंतर हसन अब्दाल आणि खैबर खिंड या मार्गाने इराणी लोक काबूलला परतले. [जहानकुशा ३६३–३६५; आनंदराम ८३-९८]

परतीचे कूच करीत पंजाबातून गुजरत असताना नादिरशाहाच्या पिछाडीस शीख आणि जाट लोकांनी उठाव केले आणि त्याच्या थोड्याफार सामानसुमानाची लुटालूट केली. त्याने हिंदुस्थानातून जी अतिप्रचंड लूट बरोबर नेली ती इराणच्या शाही खजिन्यात दीर्घकाळ राहिली नाही. या आक्रमणानंतर आठ वर्षांनी नादिरशाहाचा वध झाला व त्या पाठोपाठ जी धामधूम उडाली त्यात त्याच्या संचित खजिन्याची लूट झाली. अशा प्रकारे या खजिन्यास वेगवेगळ्या दिशेने पाय फुटले.[८]

---

७ येथे मी आनंदराम यास अनुसरून चाललो आहे. मिर्झा महदी याचा मजकूर असा आहे. "तो वजीराबाद म्हणून चिनाब नदीच्या काठी असलेल्या गावी आला व तेथे त्याने तळ टाकला." याचा अर्थ असाही निघू शकतो की, इराणी फौजांनी वजीराबाद हे शहर काही ओलांडले नाही तर वजीराबादची नदी म्हणून ओळखली जाणारी नदी ओलांडली.

८ मयूर सिंहासन हे ज्याचे भाग सुटे करता येतील अशा, सोन्याचा पत्रा मढविलेल्या सांगाड्याचे, त्याच्या आठ बाजूस बसवावयाच्या उंची हिरे जडविलेल्या तक्त्यांचे, तसेच वेगळे करून काढून ठेवता येतील अशा खांबाचे, पायऱ्यांचे आणि छताचे बनलेले होते. शाही राज्याभिषेकाच्या वार्षिकोत्सवाच्या वेळीच फक्त, हे सगळे सुटे भाग जोडून तयार झालेले मयूर सिंहासन दरबार दालनात ठेवले जाई. पण इतर वेळी मात्र या सिंहासनाचे सर्व भाग सुटे करून ते पेटाऱ्यात भरून ठेवलेले असत. या सुट्या भागांची जेव्हा लुटालूट झाली तेव्हा साहजिकच निरनिराळे सुटे भाग निरनिराळ्या ठिकाणी लंपास झाले. शाहजहान बादशाहाचे खरेखुरे मयूर सिंहासन आता जगात कोठेही अस्तित्वात नाही. पण नंतरच्या काळात झालेल्या इराणी राजांनी त्याची आधुनिक पण तितकी उंची नसलेली नक्कल करून तयार केलेले सिंहासन अजूनही तेहरान येथे जतन करून ठेवण्यात आले आहे.

## १२३ : नादिराच्या प्रयाणानंतर हिंदुस्थानची स्थिती

नादिरशाहाने व्यापलेली दिल्ली आणि तेथे त्याने केलेली लोकांची कत्तल यांमुळे लोकांना अशाच प्रकारच्या अरिष्टाच्या वेळी ३४० वर्षांपूर्वी तैमूरच्या हातून घडलेल्या गोष्टींची आठवण झाली. पण या दोन्ही परकीय आक्रमणांच्या परिणामांचा विचार करता, या दोन आक्रमणांत फार मोठा फरक आहे. तैमूर आला तेव्हा दिल्ली जशी होती, जवळ-जवळ तशाच स्थितीत, तैमूरने दिल्ली सोडली तेव्हा ते शहर राहिले होते. त्याने साम्राज्य दरिद्री बनवले खरे. पण साम्राज्याचे लचके मात्र त्याने तोडले नाहीत. उलट नादिरशाहाने सिंधू नदी पलीकडचा सगळा मुलूख व संपूर्ण अफगाणिस्थान आपल्या राज्यास जोडला. अशा प्रकारे हिंदुस्थानच्या पश्चिम सरहद्दीवर अखंडपणे धडका देणारी एक समर्थ परकीय शक्ती त्याने पेरली. तैमूरच्या अंताबरोबरच त्याचे विध्वंसक कार्य आणि त्याच्या आणखी आक्रमणाची भीती नष्ट झाली. पण नादिरच्या साम्राज्याचे वारस या नात्याने, अब्दाली आणि त्याचा राजवंश यांनी नादिरच्या भारतातील कामाचा पाठपुरावा चालू ठेवला. खैबर-खिंड आणि पेशावर जिल्हा परकियांच्या हातात पडल्यामुळे दिल्लीविरुद्ध काढावयाच्या कोणत्याही नव्या मोहिमेची सुरुवात आता पंजाबच्या प्रदेशापासून होऊ लागली.

नादिरच्या आक्रमणाचा परिणाम म्हणून केवळ अफगाणिस्थान आणि आजचा वायव्य सरहद्द प्रांत यांनाच हिंदुस्थानने गमावले असे नाही तर तद्नंतर लवकरच पंजाबचा प्रांत-देखील गमवावा लागला. १८ व्या शतकाच्या संबंध उत्तरार्धात काबूल आणि लाहोर येथे राज्य करणारा अहमदशाह अब्दाली आणि त्याचे वंशज यांची दिल्ली शहर इतकेच काय पण मुघल साम्राज्याचे पूर्वेकडील सुभे यांनादेखील आक्रमणाची धमकी कायम बसलेली असे. या मंडळींच्या सगळ्या बारक्यासारक्या हालचाली, त्यांनी जाहीरपणे उच्चारलेला प्रत्येक शब्द यांची खबर दिल्ली आणि लखनऊ येथे जाऊन पोहोचत असे व लगोलग या हिंदुस्थानी दरबारात भीतीची लहर उसळून त्यांच्या इंग्लिश संरक्षकांना, विशेषतः हेस्टिंग्ज आणि वेलस्ली यांना, सावधगिरीचा उपाय म्हणून आपल्या फौजांची योग्य ती हलवाहलव करावी लागे आणि चिंतातुर होऊन बसावे लागे. लाहोरहून सुटलेले मध्य अशियातील व अफगाणि-स्थानातील हे राकट आणि कसबी लढवय्ये, थोड्याच दिवसांची मजल मारून, एका धडकेत दिल्ली काबीज करू शकत होते.

खुद्द हिंदुस्थानचा पश्चिमेकडील संरक्षक अडथळा असलेला पंजाबचा प्रांत अब्दालीने आपल्या राज्यास जोडण्यापूर्वीच तो दिल्लीतील राज्यकर्त्यांच्या हातातून निसटला होता. हा प्रांत नादिरच्या हाती लागण्यापूर्वी फर्रुखसियरने शीख गुरू बंदा आणि त्याचे अनुयायी यांचा यशस्वीपणे निःपात केल्यामुळे, तसेच नंतरच्या काळात जिकरियाखानाने लूटमार करणारे स्थानिक म्होरके आणि बंडखोर यांविरुद्ध दमदार मोहिमा काढल्यामुळे, पंजाबला शांतता आणि सुबत्ता यांचा लाभ झाला होता. जिकरियाखानाने तर येथील शहरांची सम्पत्ती आणि सौंदर्य यांत भरदेखील घातली होती. त्याचे वर्णन आनंदरामाने मोठ्या उत्साहाने केले आहे. पण या सगळ्या गोष्टी नादिरच्या आक्रमणानंतर होत्या का नव्हत्या अशा झाल्या. पहिल्याने मिळालेल्या हुकुमानुसार इराणी सैनिकांनी हा मुलूख नागविला व तद्नंतर बेबंद झालेल्या स्थानिक रहिवाशांनी तेथे लुटालूट केली. दरोडेखोरी आणि खुनाखुनी या भागात सगळीकडे होत होती. दरोडेखोरांच्या टोळ्यांनी सुरळित रहदारीसाठी आणि व्यापारासाठी

असणारे रस्ते बंद करून टाकले. प्रत्येक जण प्रत्येक दुसऱ्या कोणाशी तरी लढत होता. उध्वस्तता आणि अव्यवस्था यांचे सर्व प्रांतभर थमान चालू होते. शिखांनी आपले बळ वाढवत आपला हेका चालवायला सुरुवात केली व नंतर अर्ध्या शतकाच्या काळात त्यांनी संपूर्ण प्रांतावर आपला कब्जा बसविला. मुहम्मदशाहाची राजवट संपुष्टात आल्यानंतर शीख जमात म्हणजे साम्राज्याच्या शरिरात कायमपणे रुतणारा काटा ठरली. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात हे शीख लोक जवळजवळ प्रत्येक वर्षी पूर्वेस दिल्लीच्या परिसरापर्यंत लूटमार, जाळपोळ करीत येत आणि अतिशय हिम्मतपूर्वक केलेली मशागत आणि माणसाचा वावर याचा मागमूसदेखील पुसून साफ करीत. त्यांच्या विध्वंसक कामाची झळ सरहिंद, सहारनपूर, मीरत, शाहदरा इतकेच काय पण हरिद्वारलासुद्धा लागली. मुघल साम्राज्याच्या उत्तर आणि पश्चिम भागात शांतता, सुबत्ता आणि उद्योग या गोष्टी लुप्त झाल्यासारख्या दिसल्या.

नादिर परतल्यानंतर मुघल साम्राज्याच्या दक्षिण आणि पश्चिम सुभ्यांत मराठे पूर्णपणे निर्धास्त झाले. त्यांच्याशी थोडाफार तरी प्रतिकार करण्यासाठी दिल्लीतील सार्वभौमाजवळे ना फौज उरली ना सेनापती उरला. मध्यवर्ती सरकारची ही असहाय्यता पाहून मराठे आणखी धीट बनले. ओरिसा, आग्नेय विहार आणि बंगाल या भागात ते वारंवार शिरकाव करू लागले. त्यांच्या फौजांचे जथेच्याजथे आले म्हणजे मुघलांचे स्थानिक अमलदार अगदी अगतिक होत. हा धोका टाळण्यासाठी बादशाहालासुद्धा एकच उपाय सुचे. तो म्हणजे नागपूरकर मराठ्याला बंगालमधून हुसकण्यासाठी पुण्याच्या मराठ्यांची विनवणी करणे.

भारतीय इतिहासकार असे सांगतात की नादिरच्या प्रयाणानंतर बादशाहाने आपल्या सर्व मंत्र्यांना एकत्र बोलावले आणि राज्यकारभाराची घडी परत बसविण्याचा तसेच फडणिशी व्यवहार पूर्वपदावर आणण्याचा निकराचा प्रयत्न केला. पण इतिहासावरून नजर फिरविल्यावर आपल्याला कळून चुकते की, त्याला त्यात यश आले नाही; उलट नादिरच्या आक्रमणानंतर मुहम्मदशाहाच्या उरलेल्या १० वर्षांच्या अमदानीत सरकार अधिकाधिक कमकुवत बनत गेले आणि राज्याची एकंदर हालहवाल आक्रमणाच्या पूर्वीच्या काळासारखीच राहिली.

बादशाह आणि त्याचा उमराव वर्ग यांचे स्वभावविशेष नादिरच्या स्वारीपूर्वीच्या काळाइतकेच शोचनीय राहिले असता, नंतरच्या काळात, शाही सत्ता आणि प्रतिष्ठा यांची पुनः स्थापना होणे खरोखरच शक्य नव्हते. निजाम हा एकच सल्लागार असा उरला होता की, जो कर्तबगार आणि प्रामाणिक होता. पण तो आता, ८२ का ८३ वर्षांचा, इतका म्हातारा झाला होता. त्याचा मृत्यू नजीक येऊन ठेपला आहे असा अंदाज बांधून, त्याची मुले बंड करून उठली होती. घरच्या कटकटी आणि चिंता यामुळेच त्यास दख्खनला जावे लागले तेथे तो आपल्या मृत्यूपर्यंत याच कामात व्यग्र राहिला. अशा प्रकारे निजामाचे शहाणपण

आणि निजामाचा अनुभव यांचा कसलाही लाभ बादशाहास झाला नाही. बादशाह त्याचा सल्ला मानण्यास सामान्यतः अनुकूल नसे. पण तो समजा अनुकूल राहिला असता, तरीदेखील वरील कारणांवरून बादशाहास निजामापासून कसलाच फायदा झाला नसता.

अयोध्येचा सुभेदार आणि दख्खनचा सुभेदार यांना आपले स्वातंत्र्य जाहीर करण्या-वाचून मार्ग उरला नाही. हे स्वातंत्र्य रीतसर नसले तरी प्रत्यक्षात त्यांनी ते उपभोगले. बंगालच्या सुभेदाराने यापूर्वीच आपली स्वतंत्रता दाखवून दिली होती, कळसूत्री बाहुली प्रमाणे वागणाऱ्या बादशाहाची देखभाल करण्याचे पद म्हणजे वजीरपद होते. ते पद मिळण्यासाठी राजधानीत अतभूपूर्व अशी, कटुतापूर्ण चढाओढ चालूच राहिली. उमराव वर्गातील तट पूर्वीप्रमाणेच एकमेकांशी भांडत राहिले अथवा एकमेकांविरुद्ध कारस्थाने करीत राहिले. शेवटी मुहम्मदशाहाचा मृत्यू झाल्यावर (१७४८ इ.) हे उमराव रस्त्यात गुद्दागुद्दी करू लागले किंवा दिल्लीबाहेरच्या मैदानावर समोरासमोर लढती देऊ लागले. मोठी अंदाधुंदी सुरू झाली. खरे पाहिले तर मुघल साम्राज्याच्या अखेरच्या दिवसातील इतिहासाला अंदाधुंदी हा एक, केवळ प्रतिशब्द आहे. ही अंदाधुंदी पुढे, अर्ध्या शतकानंतर शाही राजधानी परकियाकडून जिंकली जाईतो, संपणारी नव्हती.

---

# परिशिष्ट (अ)

## उत्तरकालीन मुघल खंड १ व २ मध्ये आलेल्या मुसलमानी तारखा व त्यांचे इंग्रजी तारखांतील रूपांतर यांची पृष्ठवार सूची

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| | | खंड १ | | |
| १ | १ | २८ जिल्काद १११८ हि. | ३ मार्च १७०७ | दुरुस्ती नाही. |
| २ | १ | २४ रमजान १०४९ हि. | ३० डिसें. १६३९ | २९ डिसें. १६३९ |
| ३ | १ | ७ शव्वाल १०८७ हि. | १४ डिसें. १६७६ | १३ डिसें. १६७६ |
| ४ | १ | ११ जिल्हेज १०६७ हि. | २१ सप्टें. १६५७ | दुरुस्ती नाही. |
| ५ | २ | ३० रज्जब १०५३ हि. | १४ ऑक्टो. १६४३ | २ ऑक्टो. १६४३ |
| ६ | २ | १२ शाबान १०६३ हि. | ९ जुलै १६५३ | २६ ऑक्टो. १६५३ |
| ७ | २ | १० रमजान १०७७ हि. | ७ मार्च १६७७ | ६ मार्च १६६७ |
| ८ | २ | १० शव्वाल १०४७ हि. | २६ फेब्रु. १६३७ | २५ फेब्रु. १६३८ |
| ९ | २ | १ शाबान १०५३ हि. | १६ ऑक्टो. १६४३ | १५ नोव्हें. १६४३ |
| १० | २ | २९ शव्वाल १०५७ हि. | २० एप्रिल १६७० | २७ नोव्हें. १६४७ |
| ११ | २ | २६ रमजान १०६१ हि. | १३ सप्टें. १६५१ | १२ सप्टेंबर १६५१ |
| १२ | ३ | ३ सफर १०७२ हि. | २९ सप्टें. १६६१ | २८ सप्टेंबर १६६१ |
| १३ | ३ | १८ जिल्हेज १११७ हि. | १ एप्रिल १७०६ | २ एप्रिल १७०६ |
| १४ | ४ | ९ शव्वाल ११०६ हि. | २४ मे १६९५ | २३ मे १६९५ |
| १५ | ७ | १० जिल्हेज, (ईद-उज्-जुहा) १११८ हि. | १४ मार्च १७०७ | १५ मार्च १७०७ |
| १६ | १८ | १ सफर १११९ हि. | ३ मे १७०७ | ४ मे १७०७ |
| १७ | ३६ | १११९ हि. रबिलाखर अखेर | जुलै १७०७ | ३० जुलै १७०७ |
| १८ | ३६ | १० शाबान १११९ हि. | ५ नोव्हेंबर १७०७ | ६ नोव्हेंबर १७०७ |
| १९ | ४० | ६ जिल्काद १०८९ हि. | १८ डिसेंबर १६७८ | २० डिसेंबर १६७८ |
| २० | ४१ | १५ शाबान १११९ हि. | १० नोव्हेंबर १७०७ | ११ नोव्हेंबर १७०७ |
| २१ | ४२ | १० सफर ११२० हि. | ३० एप्रिल १७०८ | १ मे १७०८ |
| २२ | ६३ त. | २९ शव्वाल ११२२ हि. | २० डिसेंबर १७१० | २१ डिसेंबर १७१० |
| २३ | ६३ त. | २२ जिल्काद | ११ जानेवारी १७११ | १२ जानेवारी १७११ |
| २४ | ८० | २८ जिल्काद १११८ हि. | २ मार्च १७०७ | ३ मार्च १७०७ |
| २५ | ८१ | १८ रबिलावल १११९ हि. | १८ जून १७०७ | १९ जून १७०७ |
| २६ | ८१ | ४ जमादिलावल १११९ हि. | ऑगस्ट १७०७ | ३ ऑगस्ट १७०७ |
| २७ | ८२ | ५ रमजान ११२० हि. | १७ नोव्हेंबर १७०८ | १८ नोव्हेंबर १७०८ |
| २८ | ८७ | २४ रबिलावल ११२२ हि. | २२ मे १७१० | २३ मे १७१० |
| २९ | ९२ त. | १८ शाबान ११२२ हि. | ११ ऑक्टोबर १७१० | १२ ऑक्टोबर १७१० |
| ३० | ९४ त. | १५ जमादिलावल ११२२ हि. | ११ जुलै १७१० | १२ जुलै १७१० |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| ३१ | ९६ | २ रबिलाखर ११२२ हि. | ३० मे १७१० | ३१ मे १७१० |
| ३२ | ९६ | १ जमादिलावल १११२ हि. | २७ जून १७१० | १४ ऑक्टो. १७०० |
| ३३ | ९६ | १ रबिलावल ११२२ हि. | २५ ऑगस्ट १७१० | ३० एप्रिल १७१० |
| ३४ | ९७ | १२ जमादिलाखर ११२२ हि. | ७ ऑगस्ट १७१० | ८ ऑगस्ट १७१० |
| ३५ | ९७ | २७ जमादिलाखर ११२२ हि. | २२ ऑगस्ट १७१० | २३ ऑगस्ट १७१० |
| ३६ | ९७ | ४ रज्जब | २८ ऑगस्ट | २९ ऑगस्ट |
| ३७ | ९७ | १७ रज्जब | १० सप्टेंबर | ११ सप्टेंबर |
| ३८ | ९७ | ४ रमजान ११२२. | २६ ऑक्टोबर १७१० | २७ ऑक्टो. १७१० |
| ३९ | ९७ | २९ शाबान ११२२ हि. | २२ ऑक्टोबर १७१० | २३ ऑक्टो. १७१० |
| ४० | ९८ | १९ शाबान ११२२ हि. | १२ ऑक्टोबर १७१० | १३ ऑक्टो. १७१० |
| ४१ | ९८ | ८ रमजान ११२२ हि. | ३० ऑक्टोबर १७१० | ३१ ऑक्टो. १७१० |
| ४२ | ९८ | २२ रमजान ११२२ हि. | १३ नोव्हेंबर १७१० | १४ नोव्हेंबर १७१० |
| ४३ | ९८ | १९ शाबान ११२२ हि. | १२ ऑक्टोबर १७१० | १३ ऑक्टो. १७१० |
| ४४ | ९८ | ६ शव्वाल | २७ नोव्हेंबर १७१० | २८ नोव्हेंबर १७१० |
| ४५ | ९९ | ४ शव्वाल ११२२ हि. | २५ नोव्हेंबर १७१० | २६ नोव्हेंबर १७१० |
| ४६ | १०२ | १३ शव्वाल ११२२ हि. | ४ डिसेंबर १७१० | ५ डिसेंबर १७१० |
| ४७ | १०३ | १८ शव्वाल ११२२ हि. | ९ डिसेंबर १७१० | १० डिसेंबर १७१० |
| ४८ | १०३ | १९ शव्वाल ११२२ हि. | १० डिसेंबर १७१० | ११ डिसेंबर १७१० |
| ४९ | १०६ | २० शव्वाल ११२२ हि. | ११ डिसेंबर १७१० | १२ डिसेंबर १७१० |
| ५० | १०६ | २२ शव्वाल ११२२ हि. | १३ डिसेंबर १७१० | १४ डिसेंबर १७१० |
| ५१ | १०७ | २ जिल्काद ११२२ हि. | २२ डिसेंबर १७१० | २३ डिसेंबर १७१० |
| ५२ | १०७ | ४ सफर ११२३ हि. | २३ मार्च १७११ | २४ मार्च १७११ |
| ५३ | १०७ | २० मोहरम ११२३ हि. | ८ मार्च १७११ | १० मार्च १७११ |
| ५४ | १०७ | २५ शव्वाल ११२२ हि. | १६ डिसेंबर १७१० | १७ डिसेंबर १७१० |
| ५५ | १०७ | २२ जिल्काद ११२२ हि. | ११ जानेवारी १७११ | १२ जानेवारी १७१० |
| ५६ | १०७ | १८ मोहरम ११२३ हि. | ७ मार्च १७११ | ८ मार्च १७११ |
| ५७ | १०८ | ७ व १४ रबिलाखर ११२३ हि. | २४ व ३१ मे १७११ | २५ मे व १ जून १७११. |
| ५८ | १०८ | १८ रबिलाखर ११२३ हि. | ४ जून १७११ | ५ जून १७११ |
| ५९ | १०८ | २३ रबिलाखर ११२३ हि. | ९ जून १७११ | १० जून १७११ |
| ६० | १०९ | २८ रबिलाखर ११२३ हि. | १४ जून १७११ | १५ जून १७११ |
| ६१ | १०९ | १९ रज्जब ११२३ हि. | १ सप्टेंबर १७११ | २ सप्टेंबर १७११ |
| ६२ | ११० | २० शव्वाल ११२३ हि. | ३० नोव्हेंबर १७११ | १ डिसेंबर १७११ |
| ६३ | ११० | १४ जिल्हेज ११२३ हि. | २२ जानेवारी १७१२ | २३ जानेवारी १७१२ |
| ६४ | ११० | ११२४ हि. अखेर | डिसेंबर १७१२ | २७ जानेवारी १७१३ |
| ६५ | १२९ | १०८१ हि. | १६७०–७१ | दुरुस्ती नाही. |
| ६६ | १२९ | १११२ हि. | १७०० | १७००–०१ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| ६७ | १३१ | २६ जमादिलावल १०७५ हि. | १६ डिसेंबर १६६४ | १५ डिसेंबर १६६४ |
| ६८ | १३४ | ८ रमजान १११४ हि. | २५ जानेवारी १७०३ | २६ जानेवारी १७०३ |
| ६९ | १४४ | १११९ हि. | १७०७ | १७०७–०८ |
| ७० | १४६ | १५ जिल्हेज ११२३ हि. | २३ जानेवारी १७१२ | २४ जानेवारी १७१२ |
| ७१ | १४७ | २५ जिल्काद ११२३ हि. | २ फेब्रुवारी १७१२ | ४ जानेवारी १७१२ |
| ७२ | १४७ | १ मोहरम ११२४ हि. | ८ फेब्रुवारी १७१२ | ९ फेब्रुवारी १७१२ |
| ७३ | १४७ | १८ मोहरम ११२४ हि. | २५ फेब्रुवारी १७१२ | २६ फेब्रुवारी १७१२ |
| ७४ | १४८ त. | २८ शाबान १०४६ हि. | ४ फेब्रुवारी १६३७ | २५ जानेवारी १६३७ |
| ७५ | १४८ त. | १२५२ हि. | १८३६–३७ | दुरुस्ती नाही. |
| ७६ | १४९ त. | ७ रबिलावल १०४५ हि. | २१ ऑगस्ट १६३५ | दुरुस्ती नाही. |
| ७७ | १५२ | १ सफर ११२३ हि. | ९ मार्च १७१२ | २१ मार्च १७१२ |
| ७८ | १५३ | ६ सफर | १४ मार्च १७१२ | २६ मार्च १७१२ |
| ७९ | १५३ | ७ सफर ११२४ हि. | १५ मार्च १७१२ | १६ मार्च १७१२ |
| ८० | १५७ | ९ सफर | १७ मार्च १७१२ | १८ मार्च १७१२ |
| ८१ | १५९ त. | ४५६ हि. | १०६३–६४ | दुरुस्ती नाही. |
| ८२ | १६४ | १८ सफर ११२४ हि. | २६ मार्च १७१२ | २७ मार्च १७१२ |
| ८३ | १६४ | १९ सफर ११२४ हि. | २७ मार्च १७१२ | २८ मार्च १७१२ |
| ८४ | १६८ | २० सफर (११२४ हि.) | २८ मार्च (१७१२) | २९ मार्च (१७१२) |
| ८५ | १६८ त. | २१ सफर (११२४ हि.) | २९ मार्च (१७१२) | ३० मार्च (१७१२) |
| ८६ | १६८ त. | (१) रमजान ९१८ हि. | नोव्हेंबर १५१२ | ११ नोव्हेंबर १५१२ |
| ८७ | १७० | २१ सफर ११२४ हि. | २९ मार्च १७१२ | ३० मार्च १७१२ |
| ८८ | १७१ | २३ जिल्हेज ११५९ हि. | ५ जानेवारी १७४७ | ६ जानेवारी १७४७ |
| ८९ | १७३ त. | २९ रबिलावल ८१५ हि. | २० फेब्रुवारी १४९० | ११ जुलै १४१२ |
| ९० | १७३ त. | (१) रबिलाखर ८९६ हि. | फेब्रुवारी १४९१ | ११ फेब्रुवारी १४९१ |
| ९१ | १७४ | २५ रबिलावल ११२४ हि. | १ मे १७१२ | २ मे १७१२ |
| ९२ | १७४ | १८ जमादिलावल | २२ जून (१७१२) | २३ जून १७१२ |
| ९३ | १७५ | १५ जमादिलाखर | १९ जुलै (१७१२) | २० जुलै १७१२ |
| ९४ | १७७ त. | १९ जमादिलाखर | २५ जुलै (१७१२) | २४ जुलै १७१२ |
| ९५ | १७९ त. | १८ रमजान ७५७ हि. | १४ सप्टेंबर १३५९ | १६ सप्टेंबर १३५६ |
| ९६ | १७९ त. | १३ रमजान (७५७ हि.) | १९ सप्टेंबर (१३५६) | ११ सप्टेंबर (१३५६) |
| ९७ | १८० त. | ७५२ हि. | १३५१–५२ | दुरुस्ती नाही. |
| ९८ | १८१ | ९ रमजान १०९४ हि. | ११ सप्टेंबर १६८३ | १ सप्टेंबर १६८३ |
| ९९ | १८१ | ११०५ हि. | सप्टेंबर १६९३ ते ऑगस्ट १६९४. | १६९३–९४ |
| १०० | १८१ त. | शव्वाल | ३१ ऑक्टो. ते २८ नोव्हेंबर १७१२. | १ ते २९ नोव्हेंबर १७१२. |
| १०१ | १८२ | ७ सफर ११२४ हि. | १५ मार्च १७१२ | १६ मार्च १७१२ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| १०२ | १८२ | १३ सफर | २१ मार्च | २२ मार्च |
| १०३ | १८२ | २९ सफर | ६ एप्रिल १७१२ | ७ एप्रिल १७१२ |
| १०४ | १८३ त. | १०८५ हि. | १६७४ | १६७४–७५ |
| १०५ | १८३ त. | ११५४ हि. | १९ जानेवारी १७४२ | १७४१–४२ |
| १०६ | १८४ त. | १०६४ हि. | १६५३–५४ | दुरुस्ती नाही. |
| १०७ | १८४ त. | १०३० हि. | ऑक्टो.-नोव्हें. १७१८ | १६२०–२१ |
| १०८ | १८४ त. | २६ शाबान ११२४ हि. | २७ सप्टेंबर १७१२ | २८ सप्टेंबर १७१२ |
| १०९ | १८४ त. | १०८५ हि. | १६७४–७५ | दुरुस्ती नाही. |
| ११० | १८४ त. | ४ जिल्हेज ११५५ हि. | २९ जानेवारी १७४३ | ३० जानेवारी १७४३ |
| १११ | १८५ त. | ११२४ हि., सफर | मार्च १७१२ | मार्च-एप्रिल १७१२ |
| ११२ | १८६ | ११०९ हि. | १६९७–९८ | दुरुस्ती नाही. |
| ११३ | १८७ | ११०६ हि. | १६९४–९५ | दुरुस्ती नाही. |
| ११४ | १८७ | सफर १११९ हि. | मे १७०७ | मे–जून १७०७ |
| ११५ | १८७ | १८ रबिलावल १११९ हि. | १८ जून १७०७ | १९ जून १७०७ |
| ११६ | १८८ त. | २४ जिल्हेज १११९ हि. | १६ मार्च १७०८ | १७ मार्च १७०८ |
| ११७ | १८८ त. | जिल्काद १११९ हि. | फेब्रुवारी १७०८ | जाने.–फेब्रु. १७०८ |
| ११८ | १८९ | २१ जिल्काद ११२२ हि. | १० जून १७११ | ११ जानेवारी १७११ |
| ११९ | १८९ | ११ मोहरम ११२० हि. | १ एप्रिल १७०८ | २ एप्रिल १७०८ |
| १२० | १८९ त. | ११६१ हि. | १७४८ | १७४७–१७४८ |
| १२१ | १९० त. | २२ जिल्हेज ११२३ हि. | ३० जानेवारी १७१२ | ३१ जानेवारी १७१२ |
| १२२ | १९१ त. | १७ मोहरम ११५२ हि. | २५ एप्रिल १७३९ | २६ एप्रिल १७३९ |
| १२३ | १९१ त. | १०२० हि. | १६११–१२ | दुरुस्ती नाही. |
| १२४ | १९२ | २९ जमादिलाखर ११२४ हि. | २ ऑगस्ट १७१२ | ३ ऑगस्ट १७१२ |
| १२५ | १९३ त. | ११३६ हि. | १७२३–२४ | दुरुस्ती नाही. |
| १२६ | १९५ त. | १०४० हि. | १६३०–३१ | दुरुस्ती नाही. |
| १२७ | १९५ त. | १०५९ हि. | १६४९–५० | १६४९ |
| १२८ | १९५ त. | ११२४ हि. | १७१३ | १७१२ |
| १२९ | १९५ त. | ११३८ हि. | १७२५–२६ | दुरुस्ती नाही. |
| १३० | १९६ | १७ शाबान ११२४ हि. | १८ सप्टेंबर १७१२ | १९ सप्टेंबर १७१२ |
| १३१ | १९६ | २८ शाबान | २९ सप्टेंबर | ३० सप्टेंबर |
| १३२ | १९६ | ४ रमजान | ४ ऑक्टोबर | ५ ऑक्टोबर |
| १३३ | १९६ | १२ रमजान | १२ ऑक्टोबर | १३ ऑक्टोबर |
| १३४ | १९६ | १७ रमजान | १७ ऑक्टोबर | १८ ऑक्टोबर |
| १३५ | १९६ | ३० रमजान | ३० ऑक्टोबर | ३१ ऑक्टोबर |
| १३६ | १९६ | ६ शव्वाल | ५ नोव्हेंबर १७१२ | ६ नोव्हेंबर १७१२ |
| १३७ | १९७ त. | ७ जिल्हेज ७८५ हि. | ३१ जानेवारी १३८४ | २५ जानेवारी १३८४ |
| १३८ | १९७ त. | १३ शव्वाल | १२ नोव्हेंबर १७१२ | १३ नोव्हेंबर १७१२ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| १३९ | १९७ त. | ७२० हि. | १३२०–२१ | दुरुस्ती नाही. |
| १४० | १९७ त. | ११०४ हि.–११०८ हि. | १६९२–९६ | १६९२–९३ ते १६९६–९७. |
| १४१ | १९८ | १ रज्जब | ३ ऑगस्ट १७१२ | ४ ऑगस्ट १७१२ |
| १४२ | १९८ | २ शव्वाल ११२४ हि. | १ नोव्हेंबर १७१२ | २ नोव्हेंबर १७१२ |
| १४३ | १९९ त. | २४ शव्वाल (११२४) | २३ नोव्हेंबर १७१२ | २४ नोव्हेंबर १७१२ |
| १४४ | २०० | शव्वाल अखेर (११९४ हि.) | २८ नोव्हेंबर १७१२ | २९ नोव्हेंबर १७१२ |
| १४५ | २०० | १९ शव्वाल (११२४ हि.) | १८ नोव्हेंबर १७१२ | १९ नोव्हेंबर १७१२ |
| १४६ | २०१ | २५ शव्वाल ११२४ हि. | २४ नोव्हेंबर १७१२ | २५ नोव्हेंबर १७१२ |
| १४७ | २०१ | २६ शव्वाल ११२४ हि. | २५ नोव्हेंबर १७१२ | २६ नोव्हेंबर १७१२ |
| १४८ | २०१ | २८ शव्वाल | २७ नोव्हेंबर | २८ नोव्हेंबर |
| १४९ | २०१ | २८–२९ शव्वाल | २८ नोव्हेंबर १७१२ | २८–२९ नोव्हेंबर १७१२. |
| १५० | २०३ | ४ जिल्काद | २ डिसेंबर १७१२ | ३ डिसेंबर १७१२ |
| १५१ | २०३ त. | ११३१ हि. | १७१९ | १७१८–१९ |
| १५२ | २०५ | ११ जिल्काद ११२४ हि. | ९ डिसेंबर १७१२ | १० डिसेंबर १७१२ |
| १५३ | २०६ | ६ जिल्काद | ४ डिसेबर १७१२ | ५ डिसेंबर १७१२ |
| १५४ | २०६ | १५ जिल्काद ११२४ हि. | १३ डिसेंबर १७१२ | १४ डिसेंबर १७१२ |
| १५५ | २०६ | २१ जिल्काद ११२४ हि. | १९ डिसेंबर १७१२ | २० डिसेंबर १७१२ |
| १५६ | २०६ | १ जिल्हेज ११२४ हि. | २९ डिसेंबर १७१२ | ३० डिसेंबर १७१२ |
| १५७ | २०७ | २ जिल्हेज ११२४ हि. | ३० डिसेंबर १७१२ | ३१ डिसेंबर १७१२ |
| १५८ | २०७ | ६ रमजान १०६८ हि. | जून १६५८ | ७ जून १६५८ |
| १५९ | २०८ | १० जिल्हेज | ७ डिसेंबर १७१२ | ८ जानेवारी १७१३ |
| १६० | २०८ | ३ जिल्काद | १ डिसेंबर १७१२ | २ डिसेंबर १७१२ |
| १६१ | २०९ त. | १८ जमादिलावल ८४० हि. | २९ नोव्हेंबर १४३६ | १ डिसेंबर १४३६ |
| १६२ | २१० | ७ जिल्हेज | ४ जानेवारी १७१३ | ५ जानेवारी १७१३ |
| १६३ | २१० | ९ जिल्हेज ११२४ हि. | ६ जानेवारी १७१३ | ७ जानेवारी १७१३ |
| १६४ | २११ | १० जिल्हेज | ७ जानेवारी १७१३ | ८ जानेवारी १७१३ |
| १६५ | २११ | १२ जिल्हेज ११२४ हि. | ९ जानेवारी १७१३ | १० जानेवारी १७१३ |
| १६६ | २१२ | १३ जिल्हेज ११२४ हि. | १० जानेवारी १७१३ | ११ जानेवारी १७१३ |
| १६७ | २१३ | १३ जिल्हेज | १० जानेवारी १७१३ | ११ जानेवारी १७१३ |
| १६८ | २१४ त. | २५ रमजान ११३० हि. | २१ ऑगस्ट १७१८ | २२ ऑगस्ट १७१८ |
| १६९ | २१६ त. | सफर ११२१ हि. | एप्रिल १७०९ | एप्रिल-मे १७०९ |
| १७० | २२० | १६ जिल्हेज ११२४ हि. | १३ जानेवारी १७१३ | १४ जानेवारी १७१३ |
| १७१ | २२० | १८ जिल्हेज ११२४ हि. | १५ जानेवारी १७१३ | १६ जानेवारी १७१३ |
| १७२ | २२० | १७ जिल्हेज ११२४ हि. | १४ जानेवारी १७१३ | १५ जानेवारी १७१३ |
| १७३ | २२२ | २२ जिल्हेज ११२४ हि. | १९ जानेवारी १७१३ | २० जानेवारी १७१३ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| १७४ | २२३ | १६ मोहरम ११२५ हि. | ११ फेब्रुवारी १७१३ | १२ फेब्रुवारी १७१३ |
| १७५ | २२३ | १० रमजान १०७१ हि. | १० मे १६६१ | ९ मे १६६१ |
| १७६ | २२५ | ५ शाबान १०८७ हि. | १४ ऑक्टोबर १६७६ | १३ ऑक्टो. १६७६ |
| १७७ | २२५ | १८ रमजान १०९५ हि. | ३० ऑगस्ट १६८४ | २९ ऑगस्ट १६८४ |
| १७८ | २२५ | २५ जिल्काद ११४७ हि. | १७ एप्रिल १७३५ | १८ एप्रिल १७३५ |
| १७९ | २२५ | ११०३ हि. | १६९१–९२ | दुरुस्ती नाही. |
| १८० | २२५ | १११८ हि. | १७०६–०७ | दुरुस्ती नाही. |
| १८१ | २२५ | २४ रमजान ११२१ हि. | २३ नोव्हेंबर १७०९ | २७ नोव्हेंबर १७०९ |
| १८२ | २२५ | ६ मोहरम ११२६ हि. | २१ जानेवारी १७१४ | २२ जानेवारी १७१४ |
| १८३ | २२५ | ८ जिल्हेज ११५७ हि. | १२ डिसेंबर १७४४ | १२ जानेवारी १७४४ |
| १८४ | २२५ | ११०३ हि. | १६९१–९२ | दुरुस्ती नाही. |
| १८५ | २२५ | ८ रबिलाखर ११५१ हि. | २५ जुलै १७३८ | २६ जुलै १७३८ |
| १८६ | २२५ | १०९९ हि. | १६८७–८८ | दुरुस्ती नाही. |
| १८७ | २२५ | ११६७ हि. | १७५४ इ. | दुरुस्ती नाही. |
| १८८ | २२५ | २२ रबिलावल ११२२ हि. | २० मे १७१० | २१ मे १७१० |
| १८९ | २२६ | १४ रज्जब | ७ सप्टेंबर १७१० | ८ सप्टेंबर १७१० |
| १९० | २२६ | ४ जमादिलावल ११५२ हि. | ८ जुलै १७३९ | १० जुलै १७३९ |
| १९१ | २२६ | १०९६ हि. | १६८४–८५ | दुरुस्ती नाही. |
| १९२ | २२७ | १४ जिल्हेज ११२४ हि. | ११ जानेवारी १७१३ | १२ जानेवारी १७१३ |
| १९३ | २२७ | १५ जिल्हेज | १२ जानेवारी | १३ जानेवारी |
| १९४ | २२८ | १७ जिल्हेज ११२४ हि. | १४ जानेवारी १७१३ | १५ जानेवारी १७१३ |
| १९५ | २२८ | १८ जिल्हेज ११२४ हि. | १५ जानेवारी १७१३ | १६ जानेवारी १७१३ |
| १९६ | २२९ | २५ जिल्हेज ११२४ हि. | २२ जानेवारी १७१३ | २३ जानेवारी १७१३ |
| १९७ | २२९ | ६ मोहरम (११२५ हि.) | १० फेब्रुवारी (१७१३) | २ फेब्रु. (१७१३) |
| १९८ | २२९ | १५ मोहरम (११२५ हि.) | १० फेब्रु. (१७१३) | ११ फेब्रु. (१७१३) |
| १९९ | २३० | १५ जिल्हेज ११२४ हि. | १२ जानेवारी १७१३ | १३ जानेवारी १७१३ |
| २०० | २३० | ३ मोहरम (११२५ हि.) | २९ जाने. (१७१३) | २६ जाने. (१७१३) |
| २०१ | २३१ त. | २० जिल्हेज ११२४ हि. | १७ जानेवारी १७१३ | १८ जानेवारी १७१३ |
| २०२ | २३१ त. | १ मोहरम ११२४ हि. | २७ जानेवारी १७१३ | ९ फेब्रुवारी १७१३ |
| २०३ | २३३ त. | ९ रबिलाखर ११२८ हि. | १ एप्रिल १७१६ | २ एप्रिल १७१६ |
| २०४ | २३६ | १६ मोहरम ११२५ हि. | ११ फेब्रुवारी १७१३ | १२ फेब्रुवारी १७१३ |
| २०५ | २३७ | १७ मोहरम ११२५ हि. | १२ फेब्रुवारी १७१३ | १३ फेब्रुवारी १७१३ |
| २०६ | २३८ | १९ मोहरम | १४ फेब्रुवारी १७२३ | १५ फेब्रुवारी १७१३ |
| २०७ | २३९ | १५ जमादिलाखर ११२८ हि. | १५ जून १७१६ | ६ जून १७१६ |
| २०८ | २४१ त. | २५ रमजान ११३० हि. | २१ ऑगस्ट १७१८ | २२ ऑगस्ट १७१८ |
| २०९ | २४१ त. | ११४४ हि. | १७३१–३२ | दुरुस्ती नाही. |
| २१० | २४१ त. | ११०५ हि. | १६९३–९४ | दुरुस्ती नाही. |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| २११ | २४१ त. | १०५७ हि. | १६४७–४८ | दुरुस्ती नाही. |
| २१२ | २४२ | १२ शाबान ११२५ हि. | २ सप्टेंबर १७१३ | ३ सप्टेंबर १७१३ |
| २१३ | २४२ त. | १२ शाबान ११२५ हि. | २ सप्टेंबर १७१३ | ३ सप्टेंबर १७१३ |
| २१४ | २४२ त. | ११०४ हि. | १६९३–९४ | १६९२–९३ |
| २१५ | २४२ त. | ११५९ हि. | १७४६–४७ | दुरुस्ती नाही. |
| २१६ | २४३ त. | रबिलाखर ११३१ हि. | फेब्रुवारी १७१९ | फेब्रु.-मार्च १७१९ |
| २१७ | २४३ त. | ९ जमादिलावल ११२५ हि. | २ जून १७१३ | ३ जून १७१३ |
| २१८ | २४५ त. | ११२७ हि. | १७१५–१६ | १७१५ |
| २१९ | २४५ त. | ११४३ हि. | १७३०–३१ | दुरुस्ती नाही. |
| २२० | २४५ त. | ११३७ हि. | १७२४–२५ | दुरुस्ती नाही. |
| २२१ | २४५ त. | ११०८ हि. | १६९५–९७ | १६९६–९७ |
| २२२ | २४६ | १०९८ हि. | १६८६–८७ | दुरुस्ती नाही. |
| २२३ | २४६ | ११०९–१० हि. | १६९७–९८ | १६९७–९९ |
| २२४ | २४६ | १११५–१६ हि. | १७०४–०५ | १७०३–०५ |
| २२५ | २४६ | ११२२ हि. | १७१०–११ | दुरुस्ती नाही. |
| २२६ | २४७ | १०८३ हि. | १६७२–७३ | दुरुस्ती नाही. |
| २२७ | २४७ | ११५१ हि. | १७३९ | १७३८–३९ |
| २२८ | २४८ | १०७६ हि. | १६६५–६६ | दुरुस्ती नाही. |
| २२९ | २४९ | १२ सफर ११३९ हि. | ८ ऑक्टोबर १७२६ | ९ ऑक्टोबर १७२६ |
| २३० | २४९ | १०८१ हि. | १६७०–७१ | दुरुस्ती नाही. |
| २३१ | २५० | २४ रबिलावल १०९८ हि. | ३० जानेवारी १६८७ | ७ फेब्रुवारी १६८७ |
| २३२ | २५० | ११२५ हि. | १७१३ | दुरुस्ती नाही. |
| २३३ | २५० | ११६१ हि. | १७४८ | दुरुस्ती नाही. |
| २३४ | २५० | १०६६–६७ हि. | १६५५–५६ | १६५५–५७ |
| २३५ | २५० | १०९१–९२ हि. | १६८०–८१ | १६८०–८२ |
| २३६ | २५० | १०९६ हि. | १६८५–८६ | १६८४–८५ |
| २३७ | २५१ | १०६० हि. | १६४९–५० | १६५० |
| २३८ | २५१ | १०७९–८० हि. | १६७८–७९ | १६६८–७० |
| २३९ | २५१ | १०९९–११०० हि. | १६८७–८८ | १६८७–८९ |
| २४० | २५१ | १११५–१६ हि. | १७०३–०४ | १७०३–०५ |
| २४१ | २५१ | १११८ हि. | १७०७ | १७०६–०७ |
| २४२ | २५१ | १७ शव्वाल ११२२ हि. | ८ डिसेंबर १७१० | ९ डिसेंबर १७१० |
| २४३ | २५२ | १४ रबिलाखर १०८२ हि. | ११ ऑगस्ट १६७१ | २० ऑगस्ट १६७१ |
| २४४ | २५२ | १०९५ हि. | १६८३–८४ | दुरुस्ती नाही. |
| २४५ | २५२ | ११०१–०२ हि. | १६९०–९१ | १६८९–९१ |
| २४६ | २५२ | १५ रमजान १११९ हि. | ९ डिसेंबर १७०७ | १० डिसेंबर १७०७ |
| २४७ | २५२ | ५ जिल्काद | २७ जानेवारी १७०८ | दुरुस्ती नाही. |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| २४८ | २५३ | १८ जिल्हेज ११२२ हि. | ६ फेब्रुवारी १७११ | ७ फेब्रुवारी १७११ |
| २४९ | २५७ | २ रबिलावल ११२५ हि. | २८ मार्च १७१३ | २९ मार्च १७१३ |
| २५० | २५७ | २१ मोहरम ११२५ हि. | १६ फेब्रुवारी १७१३ | १७ फेब्रुवारी १७१३ |
| २५१ | २५८ | ११ जमादिलाखर ११२५ हि. | ४ जुलै १७१३ | ५ जुलै १७१३ |
| २५२ | २६१ | १३ जिल्काद ११२५ हि. | ३० नोव्हेंबर १७१३ | १ डिसेंबर १७१३ |
| २५३ | २६१ | ६ मोहरम ११२६ हि. | २१ जानेवारी १७१४ | २२ जानेवारी १७१४ |
| २५४ | २६१ | २ रबिलाखर ११२६ हि. | १६ एप्रिल १७१४ | १७ एप्रिल १७१४ |
| २५५ | २६४ त. | ११३८ हि. रबिलाखर-जमादिलावल. | जानेवारी १७२६ | डिसेंबर १७२५–जानेवारी १७२६. |
| २५६ | २६५ | ९ रबिलावल ११२५ हि. | ४ एप्रिल १७१३ | ५ एप्रिल १७१३ |
| २५७ | २६५ | रबिलावल आरंभ | २७ मार्च १७१३ | २८ मार्च १७१३ |
| २५८ | २६६ त. | १ जिल्हेज ११२५ हि. | १८ डिसेंबर १७१३ | १९ डिसेंबर १७१३ |
| २५९ | २६६ त. | ९ जिल्हेज | २६ डिसेंबर | २७ डिसेंबर |
| २६० | २६६ त. | २२ जिल्हेज | ८ जानेवारी १७१४ | ९ जानेवारी १७१४ |
| २६१ | २६७ | २९ जिल्काद ११२५ हि. | १६ डिसेंबर १७१३ | १७ डिसेंबर १७१३ |
| २६२ | २६७ | २० जिल्हेज ११२५ हि. | ६ जानेवारी १७१४ | ७ जानेवारी १७१४ |
| २६३ | २६७ | १५ जिल्हेज ११२५ हि. | १ जानेवारी १७१४ | २ जानेवारी १७१४ |
| २६४ | २६७ त. | १३ जिल्काद ११२५ हि. | २ डिसेंबर १७१३ | १ डिसेंबर १७१३ |
| २६५ | २६७ त. | १४ मोहरम ११२६ हि. | २९ जानेवारी १७१४ | ३० जानेवारी १७१४ |
| २६६ | २६८ | १४ रबिलावल ११२६ हि. | २९ मार्च १७१४ | ३० मार्च १७१४ |
| २६७ | २७० | ५ जमादिलावल ११२६ हि. | १८ मे १७१४ | १९ मे १७१४ |
| २६८ | २७० | २६ जमादिलाखर ११२६ हि. | ८ जून १७१४ | ९ जुलै १७१४ |
| २६९ | २७० | २ रज्जब ११२६ हि. | १३ जुलै १७१४ | १४ जुलै १७१४ |
| २७० | २७२ | ५ रज्जब ११२६ हि. | १६ जुलै १७१४ | १७ जुलै १७१४ |
| २७१ | २७४ | ११२६ हि. जिल्काद | ७ नोव्हें.-६ डिसें. १७१४ | ८ नोव्हें.- ७ डिसें. १७१४ |
| २७२ | २८० | २२ जिल्काद ११२६ हि. | २८ नोव्हेंबर १७१४ | २९ नोव्हेंबर १७१४ |
| २७३ | २८० | ५ जिल्हेज ११२६ हि. | ११ डिसेंबर १७१४ | १२ डिसेंबर १७१४ |
| २७४ | २८१ | १२ रमजान ११२६ हि. | २० सप्टेंबर १७१४ | २१ सप्टेंबर १७१४ |
| २७५ | २८१ | १७ जिल्हेज ११२६ हि. | ३ डिसेंबर १७१४ | २४ डिसेंबर १७१४ |
| २७६ | २८२ | २९ सफर | ५ मार्च | दुरुस्ती नाही. |
| २७७ | २८२ | ३० रबिलावल ११२७ हि. | ४ एप्रिल १७१५ | ५ एप्रिल १७१५ |
| २७८ | २८२ | २९ जमादिलावल ११२७ हि. | ३ मे १७१५ | २ जून १७१५ |
| २७९ | २८२ | ८ रमजान ११२७ हि. | ६ सप्टेंबर १७१५ | ७ सप्टेंबर १७१५ |
| २८० | २८२ | १० शव्वाल ११२७ हि. | ८ ऑक्टोबर १७१५ | ९ ऑक्टोबर १७१५ |
| २८१ | २८३ | १२ जमादिलावल ११२७ हि. | १५ मे १७१५ | १६ मे १७१५ |
| २८२ | २८३ | २५ रमजान ११२७ हि. | २३ सप्टेंबर १७१५ | २४ सप्टेंबर १७१५ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| २८३ | २८३ | १५ जिल्हेज ११२७ हि. | ११ डिसेंबर १७१५ | १२ डिसेंबर १७१५ |
| २८४ | २८३ | २१ जिल्हेज | १७ डिसेंबर १७१५ | १८ डिसेंबर १७१५ |
| २८५ | २८४ | १९ शाबान ११२७ हि. | १९ ऑगस्ट १७१५ | २० ऑगस्ट १७१५ |
| २८६ | २८५ | ६ रबिलाखर ११२८ हि. | २८ मार्च १७१६ | ३० मार्च १७१६ |
| २८७ | २८५ | २६ रबिलाखर | १८ एप्रिल १७१६ | १९ एप्रिल १७१६ |
| २८८ | २८६ | २६ जिल्हेज ११२७ हि. | २२ डिसेंबर १७१५ | २३ डिसेंबर १७१५ |
| २८९ | २८६ | २७ मोहरम ११२५ हि. | २२ फेब्रुवारी १७१३ | २३ फेब्रुवारी १७१३ |
| २९० | २८६ त. | २२ जमादिलावल ११२२ हि. | १८ जुलै १७१० | १९ जुलै १७१० |
| २९१ | २८८ | २० रमजान ११२५ हि. | ९ ऑक्टोबर १७१३ | १० ऑक्टो. १७१३ |
| २९२ | २८८ | २६ जिल्काद ११२५ हि. | १३ डिसेंबर १७१३ | १४ डिसेंबर १७१३ |
| २९३ | २८८ | २० सफर ११२६ हि. | ६ मार्च १७१४ | ७ मार्च १७१४ |
| २९४ | २८९ | १४ जमादिलाखर ११२६ हि. | २६ जून १७१४ | २७ जून १७१४ |
| २९५ | २८९ | १६ शाबान ११२६ हि. | २६ ऑगस्ट १७१४ | २७ ऑगस्ट १७१४ |
| २९६ | २९० | १५ रबिलावल ११२७ हि. | २० मार्च १७१५ | २१ मार्च १७१५ |
| २९७ | २९० | १३ रबिलाखर ११२७ हि. | १७ एप्रिल १७१५ | १८ एप्रिल १७१५ |
| २९८ | २९१ | २६ रबिलाखर ११२७ हि. | ३० एप्रिल १७१५ | १ मे १७१५ |
| २९९ | २९३ | २१ जिल्हेज ११२७ हि. | १७ डिसेंबर १७१५ | १८ डिसेंबर १७१५ |
| ३०० | २९४ | २२ रबिलावल ११२८ हि. | १५ मार्च १७१६ | १७ मार्च १७१६ |
| ३०१ | २९५ | २९ जमादिलाखर ११२८ हि. | १९ जून १७१६ | २० जून १७१६ |
| ३०२ | २९७ त. | ४ जमादिलावल | १८ जानेवारी १७२५ | दुरुस्ती नाही. |
| ३०३ | २९७ | ११७३ हि. | ऑगस्ट १७५९– ऑगस्ट १७६०. | दुरुस्ती नाही. |
| ३०४ | २९७ | ११७३ हि. | १७५९–६० | दुरुस्ती नाही. |
| ३०५ | २९८ | १०४७ हि. | १६३७ | १६३७–१६३८ |
| ३०६ | २९८ | १०९९ हि. | १६८७–८८ | दुरुस्ती नाही. |
| ३०७ | २९९ | १५ रमजान १०९९ हि. | १४ जुलै १६८८ | दुरुस्ती नाही. |
| ३०८ | २९९ | ११०६ हि. | १६९५ इ. | १६९४–९५ |
| ३०९ | २९९ | २ रज्जब १११७ हि. | १९ ऑक्टोबर १७०५ | २० ऑक्टो. १७०५ |
| ३१० | २९९ | १८ रमजान १११९ हि. | १३ सप्टेंबर १७०७ | १३ डिसेंबर १७०७ |
| ३११ | २९९ | रमजान ११२० हि. | नोव्हेंबर १७०८ | दुरुस्ती नाही. |
| ३१२ | २९९ | ११२२ हि. | १७१० | १७१०–११ |
| ३१३ | २९९ | ११२४ हि. | जानेवारी १७१३ | १७१२–१३ |
| ३१४ | ३०० | १६ रमजान ११२५ हि. | ५ ऑक्टोबर १७१३ | ६ ऑक्टोबर १७१३ |
| ३१५ | ३०० त. | २७ रबिलावल ११२८ हि. | १९ एप्रिल १७१६ | २२ मार्च १७१६ |
| ३१६ | ३०० | ९ शव्वाल | २५ सप्टेंबर १७१६ | २६ सप्टेंबर १७१६ |
| ३१६अ | ३०१ | ५ जिल्हेज ११२८ हि. | १९ नोव्हेंबर १७१६ | २० नोव्हेंबर १७१६ |
| ३१७ | ३०१ | ७ मोहरम ११२९ हि. | २१ डिसेंबर १७१६ | २२ डिसेंबर १७१६ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| ३१८ | ३०२ | ३० मोहरम ११२९ हि. | १३ जून १७१७ | १४ जानेवारी १७१७ |
| ३१९ | ३०२ | ११३० हि. | जानेवारी १७१८ | १७१७–१८ |
| ३२० | ३०४ | १० जमादिलावल ११३० हि. | १२ एप्रिल १७१८ | ११ एप्रिल १७१८ |
| ३२१ | ३०४ | १९ जमादिलावल | २१ एप्रिल १७१८ | २० एप्रिल १७१८ |
| ३२२ | ३०४ | ३० जमादिलावल | २ मे १७१८ | १ मे १७१८ |
| ३२३ | ३०४ | २९ जमादिलाखर ११३० हि. | ३० मे १७१८ | दुरुस्ती नाही. |
| ३२४ | ३०४ | ११ जमादिलाखर ११२७ हि. | १४ जून १७१५ | दुरुस्ती नाही. |
| ३२५ | ३०४ | जमादिलावल ११२९ हि. | एप्रिल १७१७ | दुरुस्ती नाही. |
| ३२६ | ३०४ | २१ रज्जब ते २५ शाबान ११२७ हि. | २२ जुलै ते २५ ऑगस्ट १७१५ | २३ जुलै ते २६ ऑगस्ट १७१५ |
| ३२७ | ३०५ | १० शव्वाल ११२७ हि. | ८ ऑक्टोबर १७१५ | ९ ऑक्टोबर १७१५ |
| ३२८ | ३०५ | ८ रमजान ११२७ हि. | ६ सप्टेंबर १७१५ | ७ सप्टेंबर १७१५ |
| ३२९ | ३०६ | जिल्हेज ११२६ हि. | डिसेंबर १७१४ | १५ जानेवारी १७१५ |
| ३३० | ३०६ | २२ मोहरम ११२८ हि. | १६ जानेवारी १७१६ | १७ जानेवारी १७१६ |
| ३३१ | ३०७ | १ रबिलावल (११२८) | २३ फेब्रुवारी १७१६ | २४ फेब्रुवारी १७१६ |
| ३३२ | ३०८ | २१ जमादिलावल ११२८ हि. | ११ जून १७१६ | १३ मे १७१६ |
| ३३३ | ३०९ | ६ रबिलावल ११२८ हि. | २९ मार्च १७१६ | २९ फेब्रुवारी १७१६ |
| ३३४ | ३०९ | २९ रबिलावल ११२८ हि. | २१ एप्रिल १७१६ | २३ मार्च १७१६ |
| ३३५ | ३०९ | ११ जमादिलाखर ११२८ हि. | १ जून १७१६ | २ जून १७१६ |
| ३३६ | ३०९ | ७ रबिलाखर ११२८ हि. | २० मार्च १७१६ | ३१ मार्च १७१६ |
| ३३७ | ३०९ | १४ जमादिलाखर ११२८ हि. | ४ जून १७१६ | ५ जून १७१६ |
| ३३८ | ३०९ | ९ शव्वाल ११२८ हि. | २५ सप्टेंबर १७१६ | २६ सप्टेंबर १७१६ |
| ३३९ | ३०९ | २४ मोहरम ११२९ हि. | ७ जानेवारी १७१७ | ८ जानेवारी १७१७ |
| ३४० | ३०९ | १७ सफर ११२९ हि. | ३० जानेवारी १७१७ | ३१ जानेवारी १७१७ |
| ३४१ | ३१० | २७ सफर ११२९ हि. | ९ फेब्रुवारी १७१७ | १० फेब्रुवारी १७१७ |
| ३४२ | ३१० | ७ ते १३ रबिलावल ११२९ हि. | १९ ते २५ फेब्रुवारी १७१७ | दुरुस्ती नाही. |
| ३४३ | ३१० | २६ रबिलावल ११२९ हि. | ९ मार्च १७१७ | १० मार्च १७१७ |
| ३४४ | ३१० | २९ रबिलाखर ११२९ हि. | ११ एप्रिल १७१७ | १२ एप्रिल १७१७ |
| ३४५ | ३१२ | ९ रज्जब ११२९ हि. | १८ जून १७१७ | १९ जून १७१७ |
| ३४६ | ३१२ त. | २९ जिल्हेज ११२९ हि. | ३ डिसेंबर १७१८ | ४ डिसेंबर १७१७ |
| ३४७ | ३१३ | १५ शव्वाल ११२९ हि. | २१ सप्टेंबर १७१७ | २२ सप्टेंबर १७१७ |
| ३४८ | ३१३ त. | २८ जिल्काद ११३२ हि. | ३० सप्टेंबर १७२० | १ ऑक्टोबर १७२० |
| ३४९ | ३१४ | २९ शाबान ११२८ हि. | १७ ऑगस्ट १७१६ | १८ ऑगस्ट १७१६ |
| ३५० | ३१४ | १०९० हि. | १७७९–८० | दुरुस्ती नाही. |
| ३५१ | ३१९ | १९ सफर ११३० हि. | १९ जानेवारी १७१८ | २२ जानेवारी १७१८ |
| ३५२ | ३१९ | २९ जिल्हेज | ३ डिसेंबर १७१७ | ४ डिसेंबर १७१७ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| ३५३ | ३१९ त. | ८१६ हि. | १४१३ | १४१३–१४ |
| ३५४ | ३२० | २७ मोहरम ११२९ हि. | ३० डिसेंबर १७१७ | ११ जानेवारी १७१७ |
| ३५५ | ३२० | २ सफर ११२९ हि. | ४ जानेवारी १७१८ | १६ जानेवारी १७१७ |
| ३५६ | ३२० | १ रबिलाखर ११३० हि. | ३ मार्च १७१८ | ४ मार्च १७१८ |
| ३५७ | ३२० | १६ रबिलाखर | १८ मार्च | १९ मार्च |
| ३५८ | ३२१ | १२ जमादिलावल ११३० हि. | १२ एप्रिल १७१८ | १३ एप्रिल १७१८ |
| ३५९ | ३२१ | ९ जमादिलाखर (११३०) | ९ मे १७१८ | १० मे १७१८ |
| ३६० | ३२१ | २ रज्जब (११३०) | ३१ मे १७१८ | १ जून १७१८ |
| ३६१ | ३२२ | १० शाबान ११३० हि. | ८ जुलै १७१८ | ९ जुलै १७१८ |
| ३६२ | ३२३ | १९ शव्वाल (११३०) | १४ सप्टेंबर १७१८ | १५ सप्टेंबर १७१८ |
| ३६३ | ३२३ | १ मोहरम ११३१ हि. | २३ नोव्हेंबर १७१८ | २४ नोव्हेंबर १७१८ |
| ३६४ | ३२४ | १ शव्वाल ११३० हि. | २७ ऑगस्ट १७१८ | २८ ऑगस्ट १७१८ |
| ३६५ | ३२५ | ४ शव्वाल ११३० हि. | ३० ऑगस्ट १७१८ | ३१ ऑगस्ट १७१८ |
| ३६६ | ३२६ | ५ शव्वाल (११३०) | ३१ ऑगस्ट १७१८ | १ सप्टेंबर १७१८ |
| ३६७ | ३२६ | २२ शव्वाल (११३०) | १७ सप्टेंबर १७१८ | १८ सप्टेंबर १७१८ |
| ३६८ | ३२७ | २२ शव्वाल | १७ सप्टेंबर १७१८ | १८ सप्टेंबर १७१८ |
| ३६९ | ३२७ | २६ शव्वाल ११३० हि. | २१ सप्टेंबर १७१८ | २२ सप्टेंबर १७१८ |
| ३७० | ३२८ | २९ शव्वाल ११३० हि. | २४ सप्टेंबर १७१८ | २५ सप्टेंबर १७१८ |
| ३७१ | ३२८ | १६ सफर ११३१ हि. | ७ जानेवारी १७१९ | ८ जानेवारी १७१९ |
| ३७२ | ३२८ | ११२८ हि. | मार्च १७१६ | १७१५–१६ |
| ३७३ | ३२९ | ५ जिलकाद (११३०) | २९ सप्टेंबर १७१८ | ३० सप्टेंबर १७१८ |
| ३७४ | ३२९ | ५ जिलकाद (११३०) | २९ सप्टेंबर १७१८ | ३० सप्टेंबर १७१८ |
| ३७५ | ३२९ | २९ शव्वाल (११३०) | १४ सप्टेंबर १७१८ | दुरुस्ती नाही. |
| ३७६ | ३२९ | ११ शव्वाल (११३०) | ६ सप्टेंबर १७१८ | दुरुस्ती नाही. |
| ३७७ | ३२९ | ६ जिलकाद (११३०) | ३० सप्टेंबर १७१८ | १ ऑक्टोबर १७१८ |
| ३७८ | ३३० | ९ जिलकाद (११३०) | ३ ऑक्टोबर १७१८ | ४ ऑक्टोबर १७१८ |
| ३७९ | ३३१ | २० जिलकाद (११३०) | १४ ऑक्टोबर १७१८ | १५ ऑक्टो. १७१८ |
| ३८० | ३३२ | ७ जिल्हेज (११३०) | ३१ ऑक्टोबर १७१८ | १ नोव्हेंबर १७१८ |
| ३८१ | ३३२ | १२ जिल्हेज (११३०) | ५ नोव्हेंबर १७१८ | ६ नोव्हेंबर १७१८ |
| ३८२ | ३३२ | १५ जिल्हेज ११३० हि. | ८ नोव्हेंबर १७१८ | ९ नोव्हेंबर १७१८ |
| ३८३ | ३३३ | १ मोहरम ११३१ हि. | २३ नोव्हेंबर १७१८ | २४ नोव्हेंबर १७१८ |
| ३८४ | ३३३ | २२ मोहरम (११३१) | १४ डिसेंबर १७१८ | १५ डिसेंबर १७१८ |
| ३८५ | ३३३ | ४ सफर (११३१) | २६ डिसेंबर १७१८ | २७ डिसेंबर १७१८ |
| ३८६ | ३३३ | १५ मोहरम ११०१ हि. | २८ ऑक्टोबर १६८९ | २९ ऑक्टो. १६८९ |
| ३८७ | ३३४ | १५ शव्वाल | १० सप्टेंबर १७१८ | दुरुस्ती नाही. |
| ३८८ | ३३६ | ११३१ हि. सफर आरंभ (१) | १७१८ डिसेंबर अखेर | २४ डिसेंबर १७१८ |
| ३८९ | ३३६ त. | ११३० हि. शव्वाल अखेर | २४ सप्टेंबर १७१८ | २५ सप्टेंबर १७१८ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| ३९० | ३३८ | ११३१ हि. मोहरम मध्य (१५) | ७ डिसेंबर १७१८ | ८ डिसेंबर १७१८ |
| ३९१ | ३३८ | २६ मोहरम | १८ डिसेंबर १७१८ | १९ डिसेंबर १७१८ |
| ३९२ | ३३९ | १ सफर | २३ डिसेंबर १७१८ | २४ डिसेंबर १७१८ |
| ३९३ | ३३९ | ६ सफर | २८ डिसेंबर १७१८ | २९ डिसेंबर १७१८ |
| ३९४ | ३३९ | ६ सफर | २८ डिसेंबर | २९ डिसेंबर |
| ३९५ | ३४० | ७ सफर | २९ डिसेंबर | ३० डिसेंबर |
| ३९६ | ३४० | १६ सफर ११३१ हि. | ७ जानेवारी १७१९ | ८ जानेवारी १७१९ |
| ३९७ | ३४० | १६ सफर ११३१ हि. | ७ जानेवारी १७१९ | ८ जानेवारी १७१९ |
| ३९८ | ३४० | १८ सफर | ९ जानेवारी १७१९ | १० जानेवारी १७१९ |
| ३९९ | ३४० | २५ सफर | १६ जानेवारी १७१९ | १७ जानेवारी १७१९ |
| ४०० | ३४२ | २० सफर | ११ जानेवारी १७१९ | १२ जानेवारी १७१९ |
| ४०१ | ३४२ | २९ सफर | २० जानेवारी | २१ जानेवारी |
| ४०२ | ३४२ | १ रबिलावल ११३१ हि. | २१ जानेवारी १७१९ | २२ जानेवारी १७१९ |
| ४०३ | ३४३ | ३ रबिलावल ११३१ हि. | २३ जानेवारी १७१९ | २४ जानेवारी १७१९ |
| ४०४ | ३४३ | ४ रबिलावल ११३१ हि. | २४ जानेवारी १७१९ | २५ जानेवारी १७१९ |
| ४०५ | ३४३ | २२ मोहरम ११३१ हि. | १४ डिसेंबर १७१८ | १५ डिसेंबर १७१८ |
| ४०६ | ३४३ | ४ सफर | २७ डिसेंबर १७१८ | दुरुस्ती नाही. |
| ४०७ | ३४३ | २६ मोहरम ११३१ हि. | १८ डिसेंबर १७१८ | १९ डिसेंबर १७१८ |
| ४०८ | ३४४ | १ रबिलावल ११३१ हि. | २१ जानेवारी १७१९ | २२ जानेवारी १७१९ |
| ४०९ | ३४५ | १० रबिलावल | ३० जानेवारी १७१९ | ३१ ज।नेवारी १७१९ |
| ४१० | ३४५ | ९ रबिलावल | २९ जानेवारी १७१९ | ३० जानेवारी १७१९ |
| ४११ | ३४५ | १८ रबिलावल ११३१ हि. | ७ फेब्रुवारी १७१९ | ८ फेब्रुवारी १७१९ |
| ४१२ | ३४६ | १८ रबिलावल | ७ फेब्रुवारी १७१९ | ८ फेब्रुवारी १७१९ |
| ४१३ | ३४६ | २३ रबिलावल | १२ फेब्रुवारी १७१९ | १३ फेब्रुवारी १७१९ |
| ४१४ | ३४६ | २१ रबिलावल | १० फेब्रुवारी १७१९ | ११ फेब्रुवारी १७१९ |
| ४१५ | ३४६ | २५ रबिलावल ११३१ हि. | २४ फेब्रुारी १७१९ | १५ फेब्रुवारी १७१९ |
| ४१६ | ३४८ | २७ रबिलावल ११३१ हि. | १६ फेब्रुवारी १७१ | १७ फेब्रुवारी १७१९ |
| ४१७ | ३४८ | २९ रबिलावल | १८ फेब्रुवारी १७१९ | १९ फेब्रुवारी १७१९ |
| ४१८ | ३४९ | १ रबिलाखर ११३१ हि. | २० फेब्रुवारी १७१९ | २१ फेब्रुवारी १७१९ |
| ४१९ | ३५० | ३ रबिलाखर | २२ फेब्रुवारी १७१९ | २३ फेब्रुवारी १७१९ |
| ४२० | ३५० | ४ रबिलाखर | २३ फेब्रुवारी १७१९ | २४ फेब्रुवारी १७१९ |
| ४२१ | ३५१ | १ जमादिलावल ११३१ हि. | | २२ मार्च १७१९ |
| ४२२ | ३५१ | १ जमादिलावल ११३१ हि. | २१ मार्च १७१९ | २२ मार्च १७१९ |
| ४२३ | ३५२ | ५ व ६ रबिलाखर | २४ व २५ फेब्रुवारी १७१९ | २५ व २६फेब्रुवारी १७१९ |
| ४२४ | ३५२ | ८ रबिलाखर ११३१ हि. | २७ फेब्रुवारी १७१९ | २८ फेब्रुवारी १७१९ |
| ४२५ | ३५६ | ९ रबिलाखर ११३१ हि. | २८ फेब्रुवारी १७१९ | १ मार्च १७१९ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| ४२६ | ३५९ | ९ रबिलाखर | २८ फेब्रुवारी १७१९ | १ मार्च १७१९ |
| ४२७ | ३५९ | २ जमादिलाखर १०६६ हि. | १७ एप्रिल १७५६ | २८ मार्च १६५६ |
| ४२८ | ३६३ त. | ११२३ हि. | १७११–१२ | दुरुस्ती नाही. |
| ४२९ | ३६३ त. | ६ जमादिलाखर ११६१ हि. | २ जून १७४८ | ३ जून १७४८ |
| ४३० | ३६६ | ८–९ जमादिलाखर ११३१ हि. | २७–२८ एप्रिल १७१९ | २८–२९ एप्रिल १७१९ |
| ४३१ | ३६६ | १० जमादिलाखर ११३१ हि. | २९ एप्रिल १७१९ | ३० एप्रिल १७१९ |
| ४३२ | ३७२ | २९ सफर ११२४ हि. | ६ मार्च १७१२ | ७ एप्रिल १७१२ |
| ४३३ | ३७२ | १३ जिल्हेज ११२४ हि. | १० डिसेंबर १७१२ | ११ जानेवारी १७१३ |
| ४३४ | ३७४ | २९ रमजान ११२७ हि. | २७ सप्टेंबर १७१५ | २८ सप्टेंबर १७१५ |
| ४३५ | ३७४ | २९ शाबान ११३१ हि. | जुलै १७१९ | १७ जुलै १७१९ |
| ४३६ | ३७६ | २४ रज्जब ११२९ हि. | ३ जुलै १७१७ | ४ जुलै १७१७ |
| ४३७ | ३७६ | १८ जिल्काद ११२३ हि. | २७ डिसेंबर १७११ | २८ डिसेंबर १७११ |
| ४३८ | ३७६ | १७ रबिलाखर ११२५ हि. | १२ मे १७१३ | १३ मे १७१३ |
| ४३९ | ३७६ | १६ जिल्काद ११२९ हि. | २१ ऑक्टोबर १७१७ | २२ ऑक्टो. १७१७ |
| ४४० | ३७६ | २२ जमादिलाखर ११३० हि. | २२ मे १७१८ | २३ मे १७१८ |
| ४४१ | ३७६ | ११३३ हि. | १७२०–२१ | दुरुस्ती नाही. |
| ४४२ | ३७६ | १२०३ हि. | १७८८–८९ | दुरुस्ती नाही. |
| ४४३ | ३७९ | १९ रबिलाखर | १० मार्च १७१९ | २९ फेब्रुवारी १७२० |
| ४४४ | ३७९ | १८ रबिलावल | ७ फेब्रुवारी १७१९ | २९ जानेवारी १७२० |
| ४४५ | ३७९ | २४ रबिलाखर | १५ मार्च १७१९ | ४ मार्च १७२० |
| ४४६ | ३८० | १२ रमजान ११३९ हि. | २ मे १७२७ | ३ मे १७२७ |
| ४४७ | ३८० | २९ रबिलाखर ११३१ हि. | ३० मार्च १७१९ | २१ मार्च १७१९ |
| ४४८ | ३८० | २२ रबिलाखर ११३१ हि. | १३ मार्च १७१९ | १४ मार्च १७१९ |
| ४४९ | ३८० | मोहरम ११७० हि. | सप्टेंबर–ऑक्टोबर १७५६. | दुरुस्ती नाही. |
| ४५० | ३८० | ११३८ हि. | जानेवारी १७२५ | १७२५–२६ |
| ४५१ | ३८१ | ४ जमादिलावल | २४ मार्च १७१९ | २६ मार्च १७१९ |
| ४५२ | ३८२ | १७ जमादिलाखर | ६ मे १७१९ | ७ मे १७१९ |
| ४५३ | ३८२ | १६ जमादिलाखर ११३१ हि. | ५ मे १७१९ | ६ मे १७१९ |
| ४५४ | ३८३ | ११ रज्जब ११३१ हि. | १९ मे १७१९ | ३० मे १७१९ |
| ४५५ | ३८३ | शाबान १०९० हि. | सप्टेंबर–ऑक्टोबर १६७९. | दुरुस्ती नाही. |
| ४५६ | ३८३ | १७ शाबान ११३० हि. | १५ जुलै १७२८ | १६ जुलै १७१८ |
| ४५७ | ३८३ त. | ११३७ हि. रज्जब आरंभ (१) | मार्च १७१५ | १६ मार्च १७२५ |
| ४५८ | ३८३ त. | १०९७ हि. | १६८५–८६ | दुरुस्ती नाही. |
| ४५९ | ३८३ त. | ११४४ हि. | १७३१–३२ | दुरुस्ती नाही. |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| ४६० | ३८३ त. | ११०५ हि. | १६९३–९४ | दुरुस्ती नाही. |
| ४६१ | ३८३ त. | १०५७ हि. | १६४७–४८ | दुरुस्ती नाही. |
| ४६२ | ३८५ | २९ जमादिलाखर | १८ मे १७१९ | १९ मे १७१९ |
| ४६३ | ३८६ | ७ रज्जब ११३१ हि. | २५ मे १७१९ | २६ मे १७१९ |
| ४६४ | ३८७ त. | ११२६ हि. | १७१४–१५ | दुरुस्ती नाही. |
| ४६५ | ३८७ त. | ६ जिल्काद ११२७ हि. | २ नोव्हेंबर १७१५ | ३ नोव्हेंबर १७१५ |
| ४६६ | ३८७ त. | ३ मोहरम ११२८ हि. | २८ डिसेंबर १७१५ | २९ डिसेंबर १७१५ |
| ४६७ | ३८७ त. | २१ शाबान ११२८ हि. | ९ ऑगस्ट १७१६ | १० ऑगस्ट १७१६ |
| ४६८ | ३८७ त. | २२ रज्जब ११३० हि. | २० जून १७१८ | २१ जून १७१८ |
| ४६९ | ३८९ | १४ जमादिलावल | ३ मे (१७१९) | ४ मे (१७१९) |
| ४७० | ३८९ | १९ जमादिलावल | ८ एप्रिल (१७१९) | ९ एप्रिल (१७१९) |
| ४७१ | ३८९ | १४ जमादिलाखर | ३ मे (१७१९) | ४ मे १७१९ |
| ४७२ | ३८९ | २४ जमादिलावल | ३ एप्रिल (१७१९) | १४ एप्रिल १७१९ |
| ४७३ | ३९० | १७ रज्जब | ४ जून (१७१९) | ५ जून १७१९ |
| ४७४ | ३९१ | २४ रज्जब | ११ जून (१७१९) | १३ जून १७१९ |
| ४७५ | ३९१ | ८ जमादिलाखर ११११ हि. | ३० नोव्हेंबर १६९९ | १ डिसेंबर १६९९ |
| ४७६ | ३९२ | १९ रज्जब ११३१ हि. | ६ जून १७१९ | ७ जून १७१९ |
| ४७७ | ३९३ | २४ रज्जब | ११ जून १७१९ | १२ जून १७१९ |
| ४७८ | ३९३ | २६ रज्जब | १३ जून १७१९ | १४ जून १७१९ |
| ४७९ | ३९३ | २३ रज्जब ११३१ हि. | १० जून १७१९ | ११ जून १७१९ |
| ४८० | ३९३ | ११४१ हि. रज्जब सुरुवात (१) | जानेवारी–फेब्रुवारी १७२९. | ३१ जानेवारी–फेब्रुवारी १७२९. |
| ४८१ | ३९४ | ७ रज्जब (११३१) | २५ मे १७१९ | २६ मे १७१९ |
| ४८२ | ३९४ | ६ शाबान | २३ जून १७१९ | २४ जून १७१९ |
| ४८३ | ३९४ | २० शाबान | ७ जुलै १७१९ | ८ जुलै १७१९ |
| ४८४ | ३९५ | २१ शाबान | ८ जुलै १७१९ | ९ जुलै १७१९ |
| ४८५ | ३९५ | २५ शाबान | १२ जुलै १७१९ | १३ जुलै |
| ४८६ | ३९७ | २२ रमजान ११३१ हि. | ७ ऑगस्ट १७१९ | ८ ऑगस्ट १७१९ |
| ४८७ | ३९८ | २७ रमजान ११३१ हि. | १२ ऑगस्ट १७१९ | १३ ऑगस्ट १७१९ |
| ४८८ | ३९९ | ६ रज्जब ११३५ हि. | ११ मार्च १७२३ | १२ एप्रिल १७२३ |
| ४८९ | ४०० | २६ शाबान ११३१ हि. | १३ जुलै १७१९ | १४ जुलै १७१९ |
| ४९० | ४०० | ८ रमजान | २४ जुलै १७१९ | २५ जुलै १७१९ |
| ४९१ | ४०० | १९ रमजान | ४ ऑगस्ट १७१९ | ५ ऑगस्ट १७१९ |
| ४९२ | ४०० | १२ शव्वाल (११३२ हि.) | १६ ऑगस्ट १७२० | १७ ऑगस्ट १७२० |
| ४९३ | ४०१ | २७ रमजान (११३१) | १२ ऑगस्ट १७१९ | १३ ऑगस्ट १७१९ |
| ४९४ | ४०१ | २९ रमजान | १४ ऑगस्ट १७१९ | १५ ऑगस्ट १७१९ |
| ४९५ | ४०१ | ११ शव्वाल | २६ ऑगस्ट १७१९ | २७ ऑगस्ट १७१९ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| ४९६ | ४०२ | १९ शव्वाल | ४ सप्टेंबर १७१९ | ५ सप्टेंबर १७१९ |
| ४९७ | ४०२ | २० शव्वाल | ४ सप्टेंबर | ६ सप्टेंबर |
| ४९८ | ४०३ | २८ शव्वाल | १२ सप्टेंबर | १४ सप्टेंबर |
| ४९९ | ४०३ | ४–५ जिल्काद ११३१ हि. | १७–१८ सप्टेंबर १७१९. | १८–१९ सप्टेंबर १७१९. |
| ५०० | ४०४ | १३ जिल्काद | २१ सप्टेंबर १७१९ | २७ सप्टेंबर १७१९ |

## खंड २

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १ | ११ जिल्काद ११३१ हि. | २४ सप्टें. १७१९ | २५ सप्टें. १७१९ |
| २ | १ | १५ जिल्काद ११३१ हि. | २८ सप्टें. १७१९ | २९ सप्टें. १७१९ |
| ३ | १ | २३ रबिलावल १११४ हि. | १६ ऑगस्ट १७०२ | १७ ऑगस्ट १७०२ |
| ४ | २ | (४ भादों १७७६ सं.) | ९ ऑगस्ट १७१९ | १९ ऑगस्ट १७१९ |
| ५ | ३ | २४ जिल्काद | ७ ऑक्टो. १७१९ | ८ ऑक्टो. १७१९ |
| ६ | १ त. | ३ जमादिलाखर ११३४ | २० मार्च १७२२ | २१ मार्च १७२२ |
| ७ | ३ | २६ जिल्काद | ९ ऑक्टोबर | १० ऑक्टोबर |
| ८ | ३ | १ जिल्हेज | १४ ऑक्टो. १७१९ | १५ ऑक्टो. १७१९ |
| ९ | — | ४ जिल्हेज ११३१ | १७ ऑक्टो. १७१९ | १८ ऑक्टो. १७१९ |
| १० | ३ | २ जिल्हेज | १५ ऑक्टो. १७१९ | १६ ऑक्टो. १७१९ |
| ११ | ४ | २३ जिल्हेज | ५ नोव्हें. १७१९ | ६ नोव्हें. १७१९ |
| १२ | ४ | ११ जिल्काद | २४ सप्टें. १७१९ | २५ सप्टें. १७१९ |
| १३ | ४ | १५ मोहरम ११३२ हि. | २७ नोव्हें. १७१९ | २८ नोव्हें. १७१९ |
| १४ | ४ | २ सफर | १४ डिसें. १७१९ | १५ डिसें. १७१९ |
| १५ | ४ | ५ मोहरम ११३२ हि. | १७ नोव्हें. १७१९ | १८ नोव्हें. १७१९ |
| १६ | ५ | ३ रबिलाखर ११३२ हि. | १२ फेब्रु. १७२० | १३ फेब्रु. १७२० |
| १७ | ५ | ११२४ हि. | १७१२ | १७१२–१३ |
| १८ | ५ | ११३१ हि. रमजान मध्य (१५) | ऑगस्ट १७१९ | १ ऑगस्ट १७१९ |
| १९ | ६ | जिल्हेज ११३१ हि. | नोव्हेंबर १७१९ | ऑक्टो.-नोव्हें. १७१९ |
| २० | ७ | ८ जिल्हेज ११३१ हि. | २१ ऑक्टो. १७१९ | २२ ऑक्टो. १७१९ |
| २१ | ८ | १ मोहरम ११३२ हि. | १३ नोव्हें. १७१९ | १४ नोव्हें. १७१९ |
| २२ | ११ | ३ सफर | १५ डिसें. १७१९ | १६ डिसें. १७१९ |
| २३ | ११ | २३ जमादिलावल ११३२ हि. | १ एप्रिल १७२० | २ एप्रिल १७२० |
| २४ | ११ | १ रबिलाखर ११३२ हि. | १० फेब्रु. १७२० | ११ फेब्रु. १७२० |
| २५ | ११ | १ जमादिलावल | १० मार्च १७२० | ११ मार्च १७२० |
| २६ | १२ | २५ जमादिलावल ११३२ हि. | ३ एप्रिल १७२० | ४ एप्रिल १७२० |
| २७ | १२ | २५ जमादिलाखर ११३२ हि. | ३ मे १७२० | ४ मे १७२० |
| २८ | १२ | ४ रज्जब | ११ मे १७२० | १२ मे १७२० |
| २९ | १३ | १६ रज्जब | २३ मे १७२० | २४ मे १७२० |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| ३० | १३ | ९ शाबान | ८ जून १७२० | १६ जून १७२० |
| ३१ | १३ | १४ जमादिलाखर | २२ एप्रिल १७२० | २३ एप्रिल १७२० |
| ३२ | १३ | १७ जमादिलाखर | २५ एप्रिल १७२० | २६ एप्रिल १७२० |
| ३३ | १३ त. | १९ रज्जब | २४ मे १७२० | २७ मे १७२० |
| ३४ | १४ | २४ रबिलाखर ११३१ हि. | १५ मार्च १७१९ | १६ मार्च १७१९ |
| ३५ | १८ | ९ रज्जब ११३२ हि. | १६ मे १७२० | १७ मे १७२० |
| ३६ | १८ | ११३२हि.जमादिलाखर मध्य (१५) | २३ एप्रिल १७२० | २४ एप्रिल १७२० |
| ३७ | १८ | १ रज्जब ११३२ हि. | ८ मे १७२० | ९ मे १७२० |
| ३८ | १९ | १३ रज्जब ११३२ हि. | २० मे १७२० | २१ मे १७२० |
| ३९ | २० | १६ रज्जब | २३ मे १७२० | २४ मे १७२० |
| ४० | २१ त. | ११३७ हि. | १७२४ | १७२४–२५ |
| ४१ | २१ | १ शाबान | ७ जून १७२० | ८ जून १७२० |
| ४२ | २१ | ३० रज्जब | ६ जून १७२० | ७ जून १७२० |
| ४३ | २१ | १ शाबान | ७ जून १७२० | ८ जून १७२० |
| ४४ | २२ | ९ शाबान | १५ जून | १६ जून १७२० |
| ४५ | २२ | १३ शाबान ११३२ हि. | १९ जून १७२० | २० जून १७२० |
| ४६ | २३ | १३ शाबान ११३२ हि. | १९ जून १७२० | २० जून १७२० |
| ४७ | २७ | २९ शाबान | ५ जुलै १७२० | ६ जुलै १७२० |
| ४८ | ३१ | २२ शव्वाल | २६ ऑगस्ट १७२० | २७ ऑगस्ट १७२० |
| ४९ | ३१ | २१ शाबान ११३२ हि. | २७ जून १७२० | २८ जून १७२० |
| ५० | ३२ | १२ रज्जब | १९ मे १७२० | २० मे १७२० |
| ५१ | ३२ | रमजान सुरुवात (१) | मे १७२० | ७ जुलै १७२० |
| ५२ | ३३ | रमजान १५ तारीख | २० जुलै १७२० | २१ जुलै १७२० |
| ५३ | ३४ | १ शव्वाल ११३२ हि. | ५ ऑगस्ट १७२० | ६ ऑगस्ट १७२० |
| ५४ | ३७ | ५ शव्वाल | ९ ऑगस्ट १७२० | १० ऑगस्ट १७२० |
| ५५ | ३८ | ६ शव्वाल ११३२ हि. | १० ऑगस्ट १७२० | ११ ऑगस्ट १७२० |
| ५६ | ४० | २२ शव्वाल | २६ ऑगस्ट १७२० | २७ ऑगस्ट १७२० |
| ५७ | ४१ | १ जिलकाद ११३२ हि. | ३ सप्टें. १७२० | ४ सप्टें. १७२० |
| ५८ | ४१ | ९ जिल्काद | ११ सप्टेंबर | १२ सप्टेंबर |
| ५९ | ४२ | १३ जिलकाद | १५ सप्टें. १७२० | १६ सप्टें. १७२० |
| ६० | ४२ | २ जिल्हेज | ४ ऑक्टो. १७२० | ५ ऑक्टो. १७२० |
| ६१ | ४५ | ६ जिल्हेज | ८ ऑक्टो. १७२० | ९ ऑक्टो. १७२० |
| ६२ | ४३ | ४ जिलकाद | ६ सप्टें. १७२० | ७ सप्टें. १७२० |
| ६३ | ४५ | ९ जिलकाद | ६ सप्टें. १७२० | १२ सप्टें. १७२० |
| ६४ | ४६ | ६ जिल्हेज ११३२ हि. | ८ ऑक्टो. १७२० | ९ ऑक्टो. १७२० |
| ६५ | ४६ | ६ जिल्हेज ११३२ हि. | ८ ऑक्टो. १७२० | ९ ऑक्टो. १७२० |
| ६६ | ५३ | १२ जिलकाद | १४ सप्टें. १७२० | १५ सप्टें. १७२० |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| ६७ | ५३ | ७ जिल्हेज | ९ ऑक्टो. १७२० | १० ऑक्टोबर १७२० |
| ६८ | ५५ | ९ जिल्हेज | ११ ऑक्टो. १७२० | १२ ऑक्टोबर १७२० |
| ६९ | ५६ | २ मोहरम ११३३ हि. | २ नोव्हें. १७२० | ३ नोव्हेंबर १७२० |
| ७० | ६० | ८ जिल्हेज ११३२ हि. | १० ऑक्टो. १७२० | ११ ऑक्टोबर १७२० |
| ७१ | ६४ | १० जिल्हेज | १२ ऑक्टो. १७२० | १३ ऑक्टोबर १७२० |
| ७२ | ६१ | १५ जिल्हेज ११३२ हि. | १५ ऑक्टो. १७२० | १८ ऑक्टोबर १७२० |
| ७३ | ६१ | २६ रबिलावल १११५ हि. | ९ ऑगस्ट १७०३ | १० ऑगस्ट १७०३ |
| ७४ | ६१ | २८ जिल्हेज ११३२ हि. | २८ ऑक्टो. १७२० | ३१ ऑक्टो. १७२० |
| ७५ | ६१ | ७ रमजान १११९ हि. | २ डिसेंबर १७०७ | ३ डिसेंबर १७०७ |
| ७६ | ६१ | ११०७ हि. | १६९५–९६ | दुरुस्ती नाही. |
| ७७ | ६१ | ११५९ हि. | १७४६ | १७४६–४७ |
| ७८ | ६१ | ११०९ हि. | १६९७–९८ | दुरुस्ती नाही. |
| ७९ | ६४ | २६ जिल्हेज | २८ ऑक्टो. १७२० | २९ ऑक्टो. १७२० |
| ८० | ६४ | १ मोहरम ११३३ हि. | १ नोव्हें. १७२० | २ नोव्हें. १७२० |
| ८१ | ६४ | १० मोहरम | १० नोव्हें. १७२० | ११ नोव्हें. १७२० |
| ८२ | ६६ | ३ मोहरम ११३३ हि. | ३ नोव्हें. १७२० | ४ नोव्हें. १७२० |
| ८३ | ६६ | १२ मोहरम | १२ नोव्हें. १७२० | १३ नोव्हें. १७२० |
| ८४ | ६८ | १३ मोहरम ११३३ हि. | १३ नोव्हें. १७२० | १४ नोव्हें. १७२० |
| ८५ | ७२ | १४ मोहरम | १४ नोव्हें. १७२० | १५ नोव्हें. १७२० |
| ८६ | ७२ त. | ९ रमजान ११३४ हि. | २३ जून १७२२ | २४ जून १७२२ |
| ८७ | ७३ त. | ११३८ हि. | १७२५–२६ | दुरुस्ती नाही. |
| ८८ | ७५ | १४ मोहरम ११३३ हि. | १४ नोव्हें. १७२० | १५ नोव्हें. १७२० |
| ८९ | ७६ | ८ मोहरम ११५९ हि. | ३० जाने. १७४६ | ३१ जाने. १७४६ |
| ९० | ८१ | ११२७ हि. | १७१५ | १७१४–१५ |
| ९१ | ८४ | ११३७ हि. | मार्च-एप्रिल १७२५ | १७२४–२५ |
| ९२ | ९९ | जिल्हेज ११३३ हि. | सप्टें.–ऑक्टो. १७२१ | दुरुस्ती नाही. |
| ९३ | १०० | ११ सफर ११६७ हि. | १० डिसें. १७५३ | दुरुस्ती नाही. |
| ९४ | १०१ | १४ सफर ११३४ हि. | ३ डिसें. १७२१ | ४ डिसें. १७२१ |
| ९५ | १०१ | १७ सफर | ६ डिसें. १७२१ | ७ डिसें. १७२१ |
| ९६ | १०१ | ७ जिल्हेज | २८ सप्टें. १७२१ | २९ सप्टें. १७२१ |
| ९७ | १०२ | रज्जब ११३७ हि. | मार्च-एप्रिल १७२५ | दुरुस्ती नाही. |
| ९८ | ९२ त. | ३ जिल्काद ११४३ हि. | ९ मे १७३१ | १० मे १७३१ |
| ९९ | ११० | ११३६ हि. | ऑक्टोबर १७२३ | १७२३–२४ |
| १०० | १११ | रमजान (११३६) | मे–जून | मे-जून १७२४ |
| १०१ | १११ | जिल्काद (११३६) | जुलै-ऑगस्ट १७२४ | दुरुस्ती नाही. |
| १०२ | ११२ | ११३७ हि. | १७२४ इ. | १७२४–२५ इ. |
| १०३ | ११२ | १११४–१११५ हि. | १७०३–४ | १७०२–४ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| १०४ | ११२ | ११२२ हि. | १७१० | १७१०–११ |
| १०५ | ११६ | रमजान ११३६ हि. | मे-जून १७२४ | दुरुस्ती नाही. |
| १०६ | ११६ | रमजान अखेर | २१ जून | २२ जून १७२४ |
| १०७ | १२३ | ११३७ हि. रबिलाखर अखेर (२९) | १४ जाने. १७२५ | १५ जाने. १७२५ |
| १०८ | १३६ | ११११२ हि. | १७००–१७०१ | दुरुस्ती नाही. |
| १०९ | १५० | ३० रज्जब | १३ एप्रिल १७२५ | १४ एप्रिल १७२५ |
| ११० | १५० | २९ शाबान | १२ मे १७२५ | १३ मे १७२५ |
| १११ | १५० | रमजान | मे–जून | दुरुस्ती नाही. |
| ११२ | १५४ | २२ रबिलाखर ११३८ हि. | २७ डिसें. १७२५ | २८ डिसें. १७२५ |
| ११३ | १५६ | ११३९ हि. | १७२६ इ. | १७२६–२७ |
| ११४ | १५९ | ११३१ हि. | एप्रिल–मे १७२७ | १७१८–१९ |
| ११५ | १६० | ११४० हि. पावसाळा | जून–सप्टें. १७२७ | दुरुस्ती नाही. |
| ११६ | १६४ | १४ मोहरम ११४३ हि. | २९ जुलै १७३० | ३० जुलै १७३० |
| ११७ | १६५ | सफर अखेर (२९) | १२ सप्टें. १७३० | १३ सप्टें. १७३० |
| ११८ | १६७ | ११४३ हि. रबिलाखर सुरुवात (१) | १७३० इ. ऑक्टो. मध्य | १७३० इ. १४ ऑक्टोबर |
| ११९ | १६९ | त.११७४ हि. | १७६०–६१ | दुरुस्ती नाही. |
| १२० | १७५ | १३ जिल्काद ११५४ हि. | १९ जाने. १७४२ | २० जाने. १७४२ |
| १२१ | १८७ | १०८९ हि. | १६७८–७९ | दुरुस्ती नाही. |
| १२२ | | २९ शाबान | ९ एप्रिल १७२८ | १० एप्रिल १७२८ |
| १२३ | १७९ | १०४४ हि. | २६ जून १६३४ ते १५ जून १६३५ | १७३१–३२ |
| १२४ | १९७ | जिल्काद ११४४ हि. | एप्रिल–मे १७३२ | दुरुस्ती नाही. |
| १२५ | १९७ | ११५१ हि. | एप्रिल १७३८– एप्रिल १७३९ | १७३८–३९ |
| १२६ | १९९ | २१ रबिलाखर | २२ ऑक्टोबर | २३ ऑक्टोबर |
| १२७ | १९९ | शूहूर सन ११३२ | १७३१ नवी कालगणना | १७३१–३२ |
| १२८ | १९९ | त.२२ रज्जब ११४४ हि. | १९ जाने. १७३२ | २० जाने. १७३२ |
| १२९ | २०४ | ११४३ हि. १७ रबिलाखर | २९ सप्टें. १७३० | ३० सप्टें. १७३० |
| १३० | २०५ | शाबान अखेर | ८ मार्च १७३१ | ९ मार्च १७३१ |
| १३१ | | ११४८ हि. | १७३५–३६ | दुरुस्ती नाही. |
| १३२ | २११ | ८ शाबान | ८ मार्च १७२९ | ९ मार्च १७२९ |
| १३३ | २१३ | ११ शाबान ११४१ हि. | ११ मार्च १७२९ | १२ मार्च १७२९ |
| १३४ | २२२ | ११४४ हि. अखेर | जून १७३२ | २३ जून १७३२ |
| १३५ | २२३ | १२ जिल्हेज ११४८ हि. | २३ एप्रिल १७३६ | २४ एप्रिल १७३६ |

| अनु. | पृष्ठ | मुसलमानी तारीख | इंग्रजी तारीख | दुरुस्त तारीख |
|---|---|---|---|---|
| १३६ | २२६ | ४ जिल्हेज ११४४ हि. | २८ मे १७३२ | २९ मे १७३२ |
| १३७ | २२६ | २२ शव्वाल ११४८ हि. | ५ मार्च १७३६ | ६ मार्च १७३६ |
| १३८ | २२६ | ११४५ हि. | १७३२ इ. | १७३२–३३ |
| १३९ | २२७ | ११४५–४६ हि. | १ ऑक्टो. १७३२–३० जून १७३३ | १७३२–३४ |
| १४० | २२८ | २१ शव्वाल | ५ एप्रिल १७३३ | ६ एप्रिल १७३३ |
| १४१ | २२८ | ११४६–४७ हि. | १ ऑक्टो. १७३३–३० जून १७३४ | १७३३–३५ |
| १४२ | २३० | ११४७–४८ हि. | १ ऑक्टो. १७३४ ते ३० जून १७३५ | १७३४–३६ |
| १४३ | २३१ | ११४८–४९ हि. | १ ऑक्टो. १७३५ ते ३० जून १७३६ | १७३५–३७ |
| १४४ | २३३ | ईद | १३ फेब्रु. १७३६ | १४ फेब्रु. १७३६ |
| १४५ | २३४ | ६ जिल्काद ११४८ हि. | १८ मार्च १७३६ | १९ मार्च १७३६ |
| १४६ | २३४ | ८ रबिलावल ११४९ हि. | १६ जुलै १७३६ | १७ जुलै १७३६ |
| १४७ | २३५ | ११४९–५० हि. | १ ऑक्टो. १७३६ ते ३० जून १७३७ | १७३६–१७३८ |
| १४८ | २३७ | ११४९ हि. जिल्काद | मार्च १७३७ | दुरुस्ती नाही. |
| १४९ | | जिल्हेज ११४९ हि. | १ ते २९ एप्रिल १७३७ | एप्रिल १७३७ |
| १५० | २३८ | जिल्हेज | एप्रिल १७३७ | दुरुस्ती नाही. |
| १५१ | २३७ | २२ जिल्काद ११४९ हि. | २३ मार्च १७३७ | २४ मार्च १७३७ |
| १५२ | २३८ | ९ जिल्हेज ११४९ हि. | ९ एप्रिल १७३७ | ११ एप्रिल १७३७ |
| १५३ | २४५ | ईद | १० एप्रिल १७३७ | |
| १५४ | २४६ | ११ जिल्हेज | ११ एप्रिल | १२ एप्रिल |
| १५५ | २४७ | ११५०–५१ हि. | १ ऑक्टो. १७३७ ते ३० जून १७३८ | १७३७–३९ |
| १५६ | २४८ | १७ जिल्हेज ११४९ हि. | १७ एप्रिल १७३७ | १८ एप्रिल १७३७ |
| १५७ | २४८ | १५ रबिलावल ११५० हि. | १२ जुलै १७३७ | १३ जुलै १७३७ |
| १५८ | २४९ | १७ रबिलाखर ११५० हि. | १३ ऑगस्ट १७३७ | १४ ऑगस्ट १७३७ |
| १५९ | २५१ | ४ रमजान | २५ डिसेंबर | २६ डिसेंबर |
| १६० | २५२ | २६ रमजान ११५० हि. | १६ जाने. १७३८ | १७ जाने. १७३८ |
| १६१ | २५२ | १५ रमजान | ५ जाने. १७३८ | ६ जाने. १७३८ |
| १६२ | २७९ | रमजान महिना | २–३१ डिसें. १७३८ | १३ डिसें. १७३८ ते १२ जाने. १७३९ |

# परिशिष्ट (आ)–सूची

## नामसूची


अ ते अः

अॅक्वर्थ एच्.ए.
अंगद ( चंपतरायाचा मुलगा )
अंताजी माणकेश्वर
अंबू पांडे
अअ्जमशाह
अगहरखान
अज्मतुल्लाहखान लखनवी
अजमतखान
अजितसिंग
अजीमुल्लाहखान
अजीमुल्लाहखान ( वजीराचा पुतण्या )
अजीमुल्लाहखान (माळव्याचा सुभेदार, हमीदखानाचा चुलत भाऊ )
अजीमुश्शान
अझीझ बेग हरीसी
अझीझखान दाऊदझई
अतयारखान
अन्दरखान
अप्पा पंडित
अब्बास, तिसरा
अब्बास, इराणचा राजा
अब्दुन्नबीखान
अब्दुन्नबी बेग ( डभईचा नायब फौजदार)
अब्दुल्-रहीमखान आलमगीरी
अबुल्-फज्ल
अबुल्-फतह
अबुल-फतह जहीरुद्दीन मुहम्मद इब्राहीम ( शाहझादा इब्राहीमचे किताब )
अबुल-फतह नासिरुद्दीन मुहम्मदशाह बादशाह गाझी
अबुल्-मन्सूरखान सफदरजंग (अयोध्येचा सुभेदार )
अबुल्-मुफाखिरखान ( सदर )
अबुल्-मुहसिनखान
अबुल्-हसनखान
अबू तालिबखान
अबू तालिबखान बदख्शी
अब्दुल् करीम
अब्दुल्-कादिरखान ठट्ठवी
अब्दुल्-घनी ( सुभ्याचा दिवाण )
अब्दुल्-घफूर
अब्दुल्-घफूर बोहरा
अब्दुल्-फतह
अब्दुल्-फतहखान
अब्दुल्-बाकीखान ( इराणी वजीर )
अब्दुल्-मअबूदखान
अब्दुल्-लतीफबेग
अब्दुल्लाहखान
अब्दुल्लाहखान ( काजी )
अब्दुल्लाहखानतरीन
अब्दुल्लाहखान फीरुझ जंग
अब्दुल् हमीद (बादशाहनाम्याचा कर्ता)
अब्दुर्रहमानखान
अब्दुर्रहीमखान
अब्दुर्रहीम बाबी (कारीचा फौजदार)
अब्दुर्रौफ
अभयसिंग
अमृतराव कदमबांडे
अमरसिंग
अमीनुद्दीनखान संभाली
अमीरखान
अमीरखान उम्दतुल्मुल्क
अमीनखान दखिनी
अयामल (निजामचा मुनिम)
अरब अलीखान बगदादी
अरबबेगखान तुराणी
अल्बीखानतरीन
अल्लाहदाद
अल्लाहयारखान
अलाउद्दीन खिलजी
अली ( दौलत मुहम्मद टंक याचा भाऊ )

अलीकुली (मुसलमान झालेला दुर्जनसाल)
अलीमर्दानखान
अलीमर्दानखान ( पेटलादचा )
अलीमुहम्मदखान
अली मुहम्मदखान (गुजरातचा दिवाण)
( मिरात-इ-अहमदीचा कर्ता )
अलीखान (दिलेरखान मियानचा दत्तक मुलगा)
अली मुहम्मदखान रोहिला
अलीमर्दानखान शामलू (नादिरचा वकील)
अलीमर्दानखान हैदराबादी
अली अहमदखान (किंवा हमीद अली किंवा
काका )
अली हमीद ( खान दौरानचा मुलगा )
अली हजीन
अश्ररफ ( महमूदचा चुलत भाऊ )
अश्ररफ अलीखान ( मिहर अलीखान दिवाण
याचा मुलगा )
अश्ररफखान
अस्लिहखान
असदुल्लाहखान
अहमद कुलीखान ( शुजाअतखानाचा मुलगा)
अहमदखान (निजामुलमुल्काचा मुलगा )
अहमदशाह ( मुहम्मदशाहाचा मुलगा )
आका अब्दुल् हसन
आका हादी
आकिबत महमूदखान
आकिलखान ( ईडरचा फौजदार )
आकिल बेग कंबलपोश
आघा कासिम
आबिद अलीखान
आबिदखान
आदिलशाह सुर
आनंदराव ( पिलाजीचा भाऊ )
आनंदराम ( लेखक )
आनंदराम मुखलिस
आलिम अलीखान
आसफ जाह ( निजाम )
इंदरसिंग
इअ्तिबारखान
इअ्तिकादखान (मु. मुराद काश्मिरी)
इख्लासखान
इख्तिसासखान
इज्जतखान
इनायतखान
इनायतुल्लाहखान काश्मिरी
इन्द्रमण ( ओडछाचा राजा )
इन्द्राजी कदम
इब्राहीमखान पन्नी ( दाऊदचा भाऊ)
इब्राहीमखान ( गुजरातचा सुभेदार )
इब्राहीम कुलीखान ( काजिमबेगचा मुलगा)
इमाम कुली (नादिरशाहाचा बाप)
इमाम हुसैन
इलिअट सी.
इवजखान
इर्विन
इस्हाकखान (मुतमिनुद्दौलह, बादशाहाचा
शिक्षक )
इस्माईलखान खीशगी
इस्लाम कुली ( मुसलमान झालेला दीपभान)
इस्लामखान
इस्लामखान रूमी
इस्लामुल्लाह हजारी
इहतिदादखान
उदयजित (रुद्र प्रतापचा दुसरा मुलगा)
उदयकरण
उदाजी पवार (विश्वासरावाचा मुलगा)
उदेभान (जुझरसिंगाचा मुलगा)
उदोतसिंग
उमरासिंग
उमरखान
उस्मानखान

क

कंस (कृष्णाचा मामा)
कदमबांडे, कंठाजी
कबीर अलीखान (अखबारनवीस)
किमरुन्निसा बेगम (वजीराची मुलगी)
कमरुद्दीनखान
कमाल

कमालुद्दीनखान
कमालुद्दीनखान (जवानमर्दखान बाबीचा मुलगा)
करीमदादखान
कल्ब अली
कलंदरखान
कृपाराम
कृपाशंकर नागर
कृष्ण (देव)
कृष्ण (कंठाजी कदमाचा दत्तक मुलगा)
क्रूक, डब्ल्यू (ट्राईब्स ऑफ प्रॉव्हिन्सेस)
कॉन्स्टेबल
काजिम अलीखान
काजिमबेगखान (काजीम बेगखानाचा मुलगा)
काजिमबेग तेहरानी
काजी इल्मुद्दीन
काजी मीर बहादुरशाही
कादिरदादखान
कादिरदादखान रौशनी
कान्होजी
कान्होजी भोसले
कामगार अलीखान
कामयाबखान
कामवरखान
कायथ
कायमखान
काली कुंवर
काशी राज (मिथ्यकथेतील)
कासिम
कासिमखान पठाण
किजिलबाशखान
किफायतखान (जिक्रियाचा हस्तक)
किलीच मुहम्मदखान
कुवरचंद (छत्रसालाचा मुलगा)
कुंवरसेन (अब्दुल घफूरचा कारकून)
कुत्बुद्दीनखान
कुत्बुद्दौलह
कुत्बुल्मुल्क
कुदसिया-उल्-अल्काब हजरत बेगम
कुमारबाबा पवार (कुमार बहादुर)
कुरैश बेग
केसूराय (रतनचंदाचा मेहुणा)
कोकी

ख

खंडोजी दाभाडे
खन्ना (= खान मुहम्मद)
खलीलुल्लाहखान
खान आलिम दखिनी
खानेजहान लोधी
खानाझादखान
खाफीखान
खिज्रखान
खिज्रखान (बदनसिंग जाटाचा अमलदार)
खुदादादखान
खुस्रव
खुशहालचंद
खुशहालचंद (नगरशेठ)
खुशहालचंद कायस्थ (हाफिज खिदमदगार खानाचा मुनीम)
खेमसी भंडारी
खेमा जाट
खोजा मुनीस
ख्वाजमकुलीखान
ख्वाजमकुलीखान तुराणी
ख्वाजा अन्वर
(पाहा हाफिज खिदमतगारखान)
ख्वाजा अब्दुल-हम्माम
ख्वाजा असदखान
ख्वाजा अहमदखान
ख्वाजा आशूरा
(खान दौरानचा एक मुलगा)
ख्वाजा खव्वास खान
ख्वाजा मक्बूल अहमद
ख्वाजा मस्अूदखान
ख्वाजा महमूदखान
ख्वाजा मासूम
ख्वाजा रहमतुल्लाहखान
(शुजाअतखान)

ग

गंगादीन
गंजअलीखान
गंधर्वसिंग
गजसिंग
गाझीउद्दीनखान (अहमद बेग)
गाझी-उद्दीनखान कोसा
गाझी-उद्दीनखान फीरूझ-जंग
गायकवाड दमाजी (समशेर बहादुर)
गायकवाड पिलाजी
(दमाजीचा पुतण्या)
गिबन
गिरिधर बहादुर
गिरिधरलाल दिवाण
गुलाम अलीखान
गुलाम मुही-उद्दीनखान
गुलाम हुसैन
गोपाळवाडी
गोपाळसिंग गौड
गोरिया (मराठा अमलदार)
गॅरेट
ग्रॅन्ट डफ (कॅप्टन)
ग्यानसाह

घ

घालिबखान
घियासखान
घियासुद्दीनखान
घौस-उल्-अअ्जम
घौसखान

च

चंदरबंस
चंद्रसेन जाधव सेनापती
चंपतराय
चिमणाजी
चिमणाजी दादा ( = दामोदर)
चिमणाजी दामोदर
चिरागबेगखान
चूडामण हजारी

छ

छत्तरसिंग
छत्रसाल बुंदेले
छबेलाराम

ज

जंगली शाहझादा (हमीदखानाचे टोपण नाव)
जगत्सिंग
जगतराज (छत्रसालाचा मुलगा)
जगदेव
जगराज (विक्रमजित्)
जगराम
जनाजी
जफरखान, तुर्रा-इ-बाज
जमाल अलीखान
जमालखान
जमालुल्लाहखान
जयचंद बुंदेले
जयसिंग सवाई
जवानमर्दखान बाबी (सफदरखान बाबीचा
मुलगा)
जवाहिरखान
जसनसिंग
जसवंतसिंग राठोड
जहांगीर
जहान-आरा बेगम
जहान्दारशाह
जहानशाह
जहीरुद्दौलह (वजीराचा चुलत भाऊ)
जॉन ख्रिश्चन
जान निसारखान (कुरा जहानाबादचा
फौजदार)
जान मुहम्मद (नूरमलज्ञ, कोकी
जिऊचा बाप)
जानिशखान
जाफरखान नासिरी
जाम तमाची (रायसिंगचा मुलगा)
जावजी दाभाडे
जाविदखान

जिक्रियाखान (लाहोरचा सुभेदार)
जिजाबाई
जीवनदास (कापडविक्या)
जुझारसिंग (बीरसिंगदेव याचा थोरला मुलगा)
जुम्दतुल्मुल्क
जुल्फिकारखान
जुल्फिकार अलीखान
जैनुल्खान (मुन्अिमखानाचा आश्रित)
जोरावरसिंग
जौहरखान

झ

झुलकरण
झैलनखान

ट

टॉड

ठ

ठाकूर नरहरदास

ढ

ढमढेरे, नारायण

त

तर्बियतखान
तरीनखान (अफगाण)
तल्यारखान
तहव्वुर अलीखान (उर्फ बहादुर अलीखान)
तहव्वुरखान
तहव्वुरखान तुराणी
तहमास्प कुली जालैर (नादिरच्या फौजेतील)
ताराबाई
तालिब मुहिउद्दीनखान
तीमूर (तैमूर)
तुकाजी गुजर
तुर्कताजखान
त्रिलोकदास (कवि)

थ

थर्मसिंग
थॉर्नटन

द

दखनीराय (अब्दुल गफूरचा नोकर)
दर्याईखान
दर्याखान
दयाराम
दरवेश अलीखान
दाऊदखान
दानिशमन्दखान
दाराबखान
दावर बख्त (मुरादचा नातू व शाहजहानाचा पणतू)
दावलजी सोमवंशी (सरलश्कर)
दारा शुकोह
दिर्घभान (जुझारचा मुलगा)
दिलावर अलीखान
दियानतखान
दिलेरखान
दिल्-दिलेरखान
दिलेरखान मियानी
दीनदारखान
दुर्जनसाल (विक्रमाजितचा मुलगा)
दुर्जनसिंग
देवीचंद (कुमावचा राजा)
देवीसिंग (भरतशाह याचा मुलगा)
दोस्त अलीखान
दोस्त मुहम्मदखान अफगाण
दोस्त मुहम्मदखान रोहिला
दौलत (मुफ्ती)
दौलत मुहम्मद तंक

ध

धनाजी जाधव
धोंडो गोविंद
धोंडोपंत (मराठा राजदूत)

न

नंदलाल मंडलोई
नजाबत अलीखान
नवाब अल्लाहयारखान शाहजहानी
नवाब अव्लिया (असदुल्लाहखान बहादुर)
नवाब कुदासिया
नस्रुल्लाह मिर्झा
नाईक निंबाळकर (फलटण)
नामदारखान
नाथमल (चिमणाजीचा सचिव)
नादिर कुली (नादिरशाहाचे पहिले नाव)
नादिरशाह (इराणचा राजा)
नारंजन (आझादपंथी फकीर)
नाहरखान
निअमतुल्लाहखान
निअ्मत-इ-इलाही
निजामुल्मुल्क
निरंजन
निसार मुहम्मदखान शेरजंग (सआदतचा पुतण्या)
नीलकंठ नागर
नूर अलीखान (बदनसिंग जाटाचा अमलदार)
नूरखान खाटिक
नूरबाई (नर्तिका)
नूरुद्दिन मुहम्मदखान
नूरुन्निसा बेगम
नूरुल्लाहखान
नेकनजरखान
नेकूसियर
नौइंधराय

प

पंडित किशन नारायण
पतीया (झालण्याच्या जमीनदाराचा मुनीम)
पन्नी अफगाण
परतावसिंग (हालोदचा)
पहाडसिंग
पिर्थीराज (पृथ्वी)
पिरभूजी (मल्हारराव होळकरांचा एक भाऊ)
पिलाजी जाधव
पीरझादा (शहामतखानाचा मुलगा)
पेम नाईक
प्रतापसिंग
प्राइस डब्ल्यू.
प्रिचर्ड, लेफ्ट. (भाषांतरकार)

फ

फरुरुद्दौल्ह (काश्मिरचा पदच्युत सुभेदार)
फतह अली (नादिरच्या फौजेतील)
फतह मुहम्मदखान
फतहयाबखान
फतहसिंग
फतदुल्लाहखान खुस्ती
फरहतखान
फराहखान
फर्रुखसियर
फाइकखान
फॉरेस्ट
फिदवीखान (गुजरातचा दिवाण)
फिदाईखान
फिदाउद्दीनखान (नंतर नज्मुद्दौल्ह मुमीन-खान दिलावर जंग)
फिदाउद्दीनखान (पेटलादचा फौजदार)
फिरंगोजी पाटणकर
फील जंग
फुलर

ब

बख्तसिंग
बदनसिंग जाट
बदक्षीखान
बनारसी (बसू गावचा पटेल)
बहरामखान
बहादुरखान (रोहिला)
बहादुरदिलखान (लाचीन बेग)
बहादुरशाह
बाई रतनजी (आम तमाचीची आरया)
बाकिर अलीखान

बाकिरखान
बाकीखान
बाजीराव
बाबर
बाबरखान
बाबाजी (बाजीराव)
बाबाजी (मालूजीचा बाप)
बाबूराव मल्हार
(मराठा राजदूत)
बायझीदखान मेवाती
बाली खत्री
बार्हा
बाळाजी विश्वनाथ
बुलंद बख्त
बुर्हानुल्मुल्क
बीरसिंगदेव (रुद्र प्रतापचा नातू)
बील
बुधसिंग हाडा
बेग
बेडन पॉवेल
बैरामखान

भ

भगवंत (खीचीअडारूचा मुलगा)
भगवंतसिंग
भवानीराम–राजा चिमणा बहादुर (गिरधर बहादुराचा मुलगा)
भारमल
भारतशाह
भावसिंग (साहपूरचा)
भावसिंग ठोके (त्रिंबक दाभाडेच्या सावत्र आईचा भाऊ)
भास्कर (मराठा)
भीम नारायण (देवगढचा गोंड राजा)
भीमसिंग
भुरेखान
भूषण (कवि)
भोसले

म

मंगलखान
मकडाईचा राजा
मजलिसखान (वजीराचा दिवाण)
मत्तीखान
मदारशाह
मन्जूर अहमद
मन्सूरखान
मयाराम (वकील)
मरहमतखान
मल्हार
मलिक शादीखान
मलिका-उझ्-झमानी (मुहम्मदशाहाची पत्नी)
मस्तानी (कंचनी, बाजीरावाची)
महलदारखान नाजीम
महमूद (गझनीचा)
महमूद (मीर वईसचा मुलगा)
महमूदखान (शेख मुतीअ)
महादेव पंडित (मराठ्यांचा राजदूत)
महाबतखान
महाबतखान (खानखानान)
महाराजा संग्रामसिंह
मानकाजी दाना
मानसिंग
मार्टिन (मार्त्यां), (फ्रेंचमन)
मालकम
मालकम सर जॉन
मालूजी (=मालोजी)
मालोजी पवार
मासूमखान
मिर्झा अली
मिर्झाखान
मिर्झा गुलाम अली बेग
मिर्झा तहमास्प (पदच्युत शाह हुसैनचा मुलगा)
मिर्झा नईम
मिर्झा नस्रुल्लाह (नादिरचा धाकटा मुलगा)
मिर्झा मह्दी
मिर्झा राजा कुली (नादिरचा थोरला मुलगा)

मिर्झा सद्रुद्दीन
मिहर अलीखान (गुजरातचा माजी दिवाण)
मीर अब्दुल् फज्ल
मीर अब्बास
मीर अलीखान
मीर अहमदखान (नासिरजंग)
मीर इब्राहीम (शुजाअत्खानाचा आश्रित)
मीर इहसान
मीर कालू (मीर मुश्रिफचा मुलगा)
मीर कुत्बुद्दीन
मीर घियासुद्दीन
मीर जुम्ला
मीर जुम्ला तर्खान
मीर नथू
मीर फखरुल्लाह
मीर मुहम्मदखान
मीर यूसुफखान
मीर वईस
मीर हसनखान कोका (खान जहान बहादुर कोकलताश जफरजंग)
मीर हैदर बेग
मीर हैदरबेग दुघलात
मुअज्जमखान अफगाण
मुअज्जम
मुअतकदुद्दौलह-अल्लाह-विर्दीखान
मुईनुद्दीन चिश्ती
मुकर्रबखान
मुकर्रमखान (पूर्वीचा खानजमान)
मुकीमखान
मुखरामसिंग खत्री
मुखलिसखान (जहागीरदार)
मुजफ्फरखान (खान दौरानचा धाकटा भाऊ)
मुतवस्सिलखान
मुतहव्वुरखान
मुन्इमखान नज्मसानी
मुनव्वरखान (रोशनुद्दौलहचा तिसरा भाऊ)
मुबारिजखान
मुमीनखान (फौजेचा अखबारनवीस)
मुरलीधर (हमीदखानाचा दिवाण)
मुरीदखान
मुर्तजाखान
मुल्ला इवज वाजिह्
मुल्ला सादुल्लाह (मूसवीखान)
मुस्तफाखान
मुस्तफिदखान
मुहकम (चूडामण जाटाचा मुलगा)
मुहतराम (खान दौरानचा मुलगा)
मुहम्मद अमीनखान
मुहम्मद अली
मुहम्मद अलीखान (नादिरचा वकील)
मुहम्मद अश्रफ
मुहम्मद इरज
मुहम्मद इस्हाक
मुहम्मद उमरखान
मुहम्मद कासिम
मुहम्मद कासिम औरंगाबादी
मुहम्मदखान
मुहम्मद घियासखान
मुहम्मदखान घोरनी
मुहम्मदखान तुर्कोमन (नादिरचा वकील)
मुहम्मदखान बंगश
मुहम्मद घियासखान
मुहम्मद जफर (हुसैनखांनाचा नातू)
मुहम्मद जान (भूरमलज्ञ)
मुहम्मद-पनाह
मुहम्मद (प्रेषित)
मुहम्मद बाकिर (दिवाणाचा मुलगा)
मुहम्मदयारखान
मुहम्मद लतीफ
मुहम्मद शाह
मुहम्मदशाह-भारतीय सालोमन
मुहम्मद सुलैमान
मुहम्मद सैदखान
मुहम्मदीबेग
मुहासिन सादिकी
मोतीलाल
मोहनसिंग
मोहरबन (राणी)

य

यझीद
यल्बुर्जखान अघारिया
यल्रसखान
यशवंत दाभाडे (त्रिंबकचा भाऊ)
यशवंतराव पोवार
यह्याखान
यादगार काश्मीरी
यादगार हसनखान (कोका)
युस्ट्स् किट्स्
युसुफझई (पेशावरचा)

र

रघूजी भोसले
रणछोडजी अमरजी (तारीख-इ-सोरठचा लेखक)
रणदौलाखान
रतनचंद
रतनचंद (इतिहासकार खुशहालचंदचा मुलगा)
रतनशाह (चंपतपुत्र)
रतनसिंग भंडारी
रफअत तलबखान
रफीअ-उद्-दौलह्
रफीअ-उद्-दरजात
रहीमुन्निस्सा
रॉबर्टसन एच. डी.
राजवाडे वि. का.
राजसबाई
राजा अजमेरीसिंग
राजा अनिरुद्धसिंग
राजा आनंदराम
राजा इंद्रमन ढंढेरा
राजा इंदरसिंग राठोड
राजा उदावर्तसिंग
राजा गोपालसिंग भदौडिया
राजा दयाराम
राजा बहादुर राठोड (किशनगडचा)
राजा बख्तमल
राजा रघुनाथ (दिवाण)
राजाराम
राजा शाहू
राजा शिवसिंग
राणा रुद्र
राणी पार्वती
राणी मुहरवन (रुद्र प्रतापची दुसरी बायको)
राणी हीरादेवी (ओडछा)
राम-रावण
रामजी
राय किश्वरदास
राय टेकचंद
रायभान
राय सारोभन दास
राय सूरतसिंग मुल्तानी
रावण
राव (खान किंवा जान चंद)
राव गुलाबराव
राव रंभा निंबाळकर
राव रामचंद्र
राव रामचंद्र बुंदेला
रिआयतखान
रिजा कुलीखान (जहान्दारशाही)
रिजा मुहम्मदखान
रिफाहत तलबखान
रुद्र प्रताप
रुस्तम अली
रुस्तम अलीखान (काजिम बेगचा मुलगा)
रुस्तमखान आफ्रीदी
रुस्तमबेगखान
रुहुल्लाहखान
रुहुल्लाहखान निअमत इलाही
रेनॉल्ड्स्
रोशन अख्तर

ल

लखूजी जाधव
लतीफखान
लतीफखान बनवारी
लॉर्ड लेक
लाल (मांडवचा जमीनदार)

लाल कवी (छत्रप्रकाशचा कर्ता)
लालजीऊ खत्री
लाला आनंदसिंग
लाला जसवंतराय
लुत्फु-अली अपशार (नादिरच्या फौजेतील)
लुत्फुल्लाहखान (दिल्ली शहर सुभेदार)
लुत्फुल्लाहखान सादिक
लेट (ॲटलासचा कर्ता)

व

वॉटसन कर्नल
वारिद
विंध्यवासिनी देवी (दैवत)
विक्रमजित् (जगराज)
(जुझारसिंगाचा थोरला मुलगा)
विठूजी बुळे
विल्मॉट
विलसन सी. आर.
वेल्स्ली
व्यकोजी
व्हॅन्सिटार्ट, हेन्री

श

शंकराजी
शर्झाखान (काबूलचा किल्लेदार)
शफीखान
शंभूजी (संभाजी)
शमशीरखान
शम्सुद्दीनखान
शर्फखान
शरैफ-इ-उस्कानी
शर्फुद्दौलद इरादतमंदखान
शहदाद अफगाण
शहरयारशाह (तान्हा शाहझादा)
शहामतखान
शाइस्ताखान
शाकिर (लेखक)
शाकिरखान
शापूरखान
शाहअलीखान
शाहअलीखान बार्हा
शाहआलमखान
शाहनवाजखान
शाहजहान
शाहजी
शाहझादा अक्बर
शाहझादा
मुराद-बख्श
शाहझादा शुजाअ
शाहमलिक
शाह सलीम चिश्ती
शाह हुसैन सफवी
शिवदास
शिवराम गौड
शिवराम दौवा
शिवाजी
शिवाजी (राजारामाचा मुलगा)
शुक्रतुल्लाखान
शुजाअखान पलवली
शुजाअतखान (शेख मुहम्मदशाह फारुकी)
शुजाअतखान (मुहम्मद मासूम)
(हैदर कुलीखानाचा नायब)
शुजाअतुल्लाहखान
(अब्दुल्लाहखानाचा जावई)
शुभकरण (जवाहिऱ्या)
शुभकरण (दतियाचा राजा)
शेख अब्दुल्-अझीझ
शेख अब्दुल्लाह (बोहरा जमातीतील सत्पुरुष)
शेख अल्लाहयार बिलग्रामी (सुभेदाराचा बक्षी)
शेख अहमद खत्तू
शेख घफरुल्लाह
शेख नज्मुद्दीन (नेकअंदेशखान)
शेख नथू
शेख नूरुल्लाह
शेख मुहम्मद फाजिल
शेख मुहम्मदशाह
शेख मुहम्मदशाह फारुकी
शेख शिहाबुद्दीन बादलझई
शेख सअदी

शेख सलीम चिश्ती (साधू)
शेख सिबघतुल्लाहखान लखनवी (उर्फ शेखू)
शेख हुसैनुद्दीन
शेर अफ्कनखान पानिपती
शेरखान
शेरजंग (सआदतखानाचा पुतण्या)
शेरबाजखान
शैखुल्-इस्लामखान

स

संताजी शिंदे
संभाजी (राजाराम-राजसबाई यांचा मुलगा)
संभाजी (शिवाजीचा मुलगा)
संभूजी पिलाजी गायकवाडाचा मुलगा)
सअदुद्दीनखान (तोफदळ-प्रमुख)
सअदुद्दीनखान
सअदुल्लाहखान
सआदतखान
सटवाजी जाधव
सदिष्ट नारायण (धीरचा मुलगा)
सद्रुन्निसा
सद्रुद्दीन मुहम्मदखान (बडोद्याचा फौजदार)
सदरखान कमलझई
सदाशिवभाऊ
सन्जरखान
सन्दलखान
सफदरखान बाबी
समसामुद्दौलह
सय्यिद
सय्यिद अलीखान
सय्यिद अक्बर अलीखान
सय्यिद अक्रम अलीखान
सय्यिद अफजलखान
सय्यिद अब्दुल्-जलील बिलग्रामी
सय्यिद कमालखान
सय्यिद करीमुल्लाह
सय्यिद काइम
सय्यिद घज्नफरखान
सय्यिद गैरतखान
सय्यिद जलाल
सय्यिद जानअली
सय्यिद ताज मुहम्मद
सय्यिद दिलावर अलीखान
सय्यिद नवाझिशखान
(नवाबाचा जावई)
सय्यिद नासिरखान (शाहीदंडधारी-पथक-प्रमुख)
सय्यिद नियाजखान (वजीराचा जावई)
सय्यिद नूरुल्लाह
सय्यिद नूरुल्लाह-सआदतखान बहादुर बार्हा
सय्यिद फय्याजखान
सय्यिद बहादुर
सय्यिद मुजफ्फरअलीखान
सय्यिद मुजफ्फर अलीखान दाईपुरी
सय्यिद मुबारिक
सय्यिद मुहम्मदखान
सय्यिद रिफाअतखान
सय्यिद रोशनअली
सय्यिद लतीफ
सय्यिद वली
सय्यिदवली मुहम्मद
सय्यिद शेरखान
सय्यिद सलाबतखान
सयाजी गुजर
सरकार, जदुनाथ (इतिहासकार)
सरदारखान
सरदार मुहम्मदखान घोरनी
सरदारसिंग (भद्रवाडचाचा)
सरदेसाई गो. स.
सरमन जॉन
सलाबत अफगाण
सलाबतखान रोहिला
सलाबत मुहम्मदखान बाबी (सफदरखान बाबीचा मुलगा)
सलीमखान अफगाण
साबितखान
साबितजंग (जफरबेग)
सालिमसिंग
साहिबराम दौवा
साहिबराय

साहिबराय मुन्शी
साहूजी (=शाहू)
सियादतखान
सियमदीवा
सीताराम
सुजन (चंपतचा भाऊ)
सुलैमानखान खीशगी
सूरजमल जाट
सैफुल्लाहखान
सैफुद्दीन अलीखान

ह

हॅन्वे
हॅमिल्टन विल्यम
हकीम इझ्झत तलबखान
हकीम मुहम्मद मुर्तजा
हनवंत
हमजा (गोष्टीतला अरब)
हमीदुल्लाहखान
हयातुल्लाहखान
हर्कलॉट्स्
हरचरण
हरधवल (जाम तमाचीचा चुलता)
हसन (लोखंडाचा व्यापारी)
हसनखान
हाजीखान (नादिरशाहाचा अमलदार)
हाजी फूलादखान (दिल्लीचा कोतवाल)
हाजी मन्सूर
हाजी बशीर (हबसाणातील गुलाम)
हाजी हाफिज (बूटविक्या)
हादीखान
हाफिज खिदमतगारखान (खोजा)
हाफिज रहमतखान
हाफिजुद्दीनखान
हाशिमखान
हिजब्र अफकनखान
हिजब्रखान
हिदायत अलीखान
हिफ्जुल्लाहखान
हिमू धूसर
हिम्मतखान
हिर्जुल्लाहखान
हिरामण
हुसैन
हुसैन अलीखान
हुसैन मुनव्वरखान
हुसैनीखान (अली मर्दानखान हैदराबादीचा मुलगा)
हुसैन बिलग्रामी
हेस्टिंग्ज
हैदर कुलीखान
हैदर बेगखान
हैबतराव निंबाळकर
होशदारखान

# स्थलसूची

## गावे–शहरे

अंघोरी
अक्बरपूर
अक्बराबाद
अकोले
अखनूर
अजमेर
अजाऊन
अजिंठे
अजीमाबाद (ठानेसरजवळील)
अझनर
अटक
अदालज
अदिना-गर (आदिनगर)
अयोध्या
अरस
अर्काट

अलवाड
अली मोहन (आता छोटा उदेपूर)
अल्लाहाबाद
असोथर
अहमदनगर
अहमदाबाद
ऑक्सफर्ड
आंबेर
आग्रा
आटेर
आदिलाबाद
आमझरे
इंदूर ( = इंदौर)
इटावा
इरज (=इरीच)
इस्फरैन
इस्लामनगर (पहा नवानगर)
इस्लामाबाद
ईदर
उज्जयिनी
उतमीन
उदेपूर
उधिया
उमटवाडा
उलंग मुरघा
एलिचपूर
औडुया
औरंगाबाद
कंबे (पहा खंबायत)
कंदाहार
कटहर
कटेरा
कठेडा
कठोडा
कडवाड
कनवारी
कर्नाळ
कनौज
कमरनगर ( = करनूर)
करबाली ( = करकाली = करेली)
काराटीय
करिती
करौली
कल्याण
कलकत्ता
कली (गाव) (कारी, कालोल, कारहा)
कलोल
कसूर
कहरगाव
कहारवल
काकरदहरा
कानज
कानपूर
कापडवंज
काबूल
कामा कसबा
कार्रा
कारी
काल्पी
कालका मालचा
कालकी
कालियदेहा (उज्जयिनीजवळ)
कालूवल
काशघर
कुंजपुरा
कुरा (कार्रा)
कुरा जहानाबाद
कुरुक्षेत्र
कुरैली घौट
कुल पहाड
कुलारस
कुशबंदी
कैथोरा
कोटिला
कोना मौदीज
कोरवाई बोरसू
कोल्हारी
कोल्हापूर
कोलवा
कौथ

खंबायत चौरासी
खरगोण (नर्मदेवरील)
खांडवा
खाओली
खानवा
खारिदा
खारेला
खिजराबाद
खिमलासा
खुर्जा
खुरासान
खेडा
खेमकरन
खोरी
खोहारी
गंदमाक
गजनी
गडगाव
गया
गांदवी
गाझीपूर
गाळणा
गिरिश्क (अफगाणिस्तान)
गुजरात (शहर)
गुल्शनाबाद (नाशिक)
गोध्रा
गोपाळपूर
गोरखपूर
गोवळकोंडे
गोहद
गौघाट
घियासपूर (बडोद्याजवळील)
घोरबंद
चंडौसी
चंदेरी
चरखारी
चांदा
चिखलदा
चित्तूर
चितगाव
छाया
छिंदवाडा
छैन्सा
जनसाथ
जम्बुसर
जमरूद
जमीन-दावर (अफगाणिस्तानातील)
जयपूर
जलंधर
जलवा
जलालपूर
जलालाबाद
जलेश्वर (=जलेसर)
जाटवाडा
जाम (इस्लामनगर=नवानगर)
जामू
जालौरी
जिऊंद (जींद)
जुन्नर
जुनागड
जैतपूर
जोधपूर
झालवा (जाबवा, झालोद)
झालावाड
झालोद
टठ्ठा
ठासका
ठास्रा (पहा ठासरा)
डिग
ढबोरा
ढवण
ढोलकोट
तट्ठोरा
तराहवन
ताजपूर
तापताश
तारळे
ताराओरी
तालम (नालम हा मुद्रणदोष असावा-इ.)
तिजारा

तिलावरी (=ताराओरी)
तेहरान
तोडा भोन (किंवा भीम) (=तोरा)
थुन
दमण
दमोह
दांतीवाडा
दार सवाद-इ-बालाघाट
दिलसा
दिल्ली
दिल्वाडी
देपालपूर
देवापूर
दुराहा
देवठाण
देउलगाव (देऊळगाव)
देवापूर
दोराहा
दोहद
धरमत
धरमपूर
धवन
धाबोरा
धामणगाव
धामोणी
धार
धारैणी
धंधुका
धुलकोट
नंदगाव
नंदुरबार
नकटी भवानी
नडियाद
नबाहरा
नरवर
नरसिंगपूर
नरेला
नरोवार
नवा नगर (जामचे)
नांदगाव
नांदेड
नागपूर
नागोर
नादिराबाद (कंदाहारचे एक नाव)
नापड
नापा
नारनोल
नालम
नाशिक
नूराबाद
नेकपूर
नेपा
नैशापूर
नैशाबूर
प्रयाग
पट्टण
पटणा
पतारी (पठारी)
पन्ना
पलवल
पांडवगड
पांढर
पाओहा कसबा
पाचोरे
पानिपत
पालनपूर
पाली
पालेरी
पिंपरी गौळी
पिपलोद
पुतळी
पुनाशा
पेटलाद
पेशावर
फतहपूर
फतहपूर सिक्री
फत्तेखेडले (साखरखेडले नवे नाव)
फर्दापूर
फर्रुखाबाद
फरीदाबाद

फाजिलपूर
फुलमर्डी
फुलचेरी
फैजाबाद
फोंडे
बंकापूर
बजहरा
बडली (रमणा)
बडोदे
बदायूं
बनारस
बन्तवारा
बयाना
बरसाना
बरहद
बल्ख
बर्लिन
बसवापट्टण
बसू (पेटलाद परगण्यातील)
बहरामपूर
बहार–शोवलानी
बहादुरपूर
बहादुरपूर कसबा
बळ्ळारि
बांदा
बांसबरेली
बांसवाडा
बाजाहरा
बानकोली
बानाहाली
बामियान
बारापुला
बाडा नैनपूर
बारनुवे
बारिकाव
बालूर
बावन
बाळापूर
बिआना (बयाना?)
बिऊंद (बोंद)
बिजवासन
बिजागढ (सरकार)
बिजीपूर
बिद्यापूर
बिलोचपूर
बिश्त (अफगाणिस्तानातील)
बिस्तरैन
बीजावाड
बुखारा
बुर्हानपूर
बेदपूर
बेदर
बेराडी
बैजापूर (वैजापूर)
बैरा
बोरसू
भडोच
भद्रवाडा
भनहरा
भरतपूर
भरैमी
भांडेर
भिलापूर
भूपाल (भोपाळ)
भुसावळ
भुसावार
भूज
भेलसे
भोगनीपूर
भोसा, भोंसा
भोसावार
भोजपूर
मंगरूळ
मंगलपूर
मंडलेश्वर
म्हैसूर
मऊ राणीपूर / मऊ शम्साबाद
मक्का
मकडाई
मकबूलाबाद

मच्छलीबंदर
मतकर
मथुरा
मधकर
मधूपूर (जुनागढ जवळचे)
मनोहरपूर
मलकापूर
मलिकपूर
मल्काहरी
महकूल
महरामनगर
महाबताबाद
महाबताबाद कोटेरा
मह्
मांडव
माजहवी
मालकहरी
मालोरी
माहवा
माहरुत
माहूर
माहेवा
मिर्झापूर
मीरत
मुंजेवाड
मुमताजाबाद
मुरादाबाद
मुरासा
मुल्कपूर
मुहक्कमपूर
मुहम्मदनगर
मूमिनाबाद
मेदक
मेहसाणा
मोजीर
मोतीया मेडरा
मोरनगाव
मोर पारीया
मौफी
रतनपूर
रहीमपूर
राख्याल
राधनपूर
रामपुरा
रायचूर
रायपूर
रायसीन
रूद्रपूर
रूपनगर
रेवाडी
रेवाबांदा
लखनऊ
लांजी
लाहोर
लूनावाडा
लोडा डंगर
वडगाव (गुजरातमधील)
वडनगर
वढवाण
वाई
वागिनगेरे
वाशीम
विजापूर
विरमगाव
वेरूळ
वोडसे (=वोडशा)
शहझादपूर
शहामतपूर
शाहजहानाबाद
शाहदरा
शाहाबाद
शिगणपूर
शिगणापूर
शीराझ
शुकोहाबाद
शेवगाव
संगमनेर
संदिला
संभळ–मुरादाबाद
संभाल

सअदाबाद
समर्कंद
सरहिंद
सलिहाबाद
साखरखेडले
सागर
सातारा
सानंद
सानेसर
सारंगपूर
सारखेज
सालगाव
सालिहाबाद
साहपूर
साहरा
साहेंदा
साळगाव
सिकंदरा
सिकाकोळ
सिंदखेड
सिद्धपूर
सिप्री
सियुबी (? =सोनीपत)
सिहारा
सिहोल
सिहोर
सीताबाडी
सुजी
सुपा (बुंदेलखंड)
सुपे
सूरत
सोजित्रा (पेटलाद परगण्यातला)
सोनीपत (=सोनपत)
सोरों (गंगानदीवरील)
हरदा
हरिद्वार
हवेली अहमदाबाद
हसनपूर
हसनाबाद
हालोद
हिंगणी
हिंदुस कटहर
हिंदौन
हुसैनपूर
हैदराबाद
हैबतपूर–पाती
होशंगाबाद

## देश-प्रदेश वगैरे

अगवासी (परगणा)
अफगाणिस्तान
अरबस्तान
अष्टे (परगणा)
आर्मेनिया
इराण
उधिया (परगणा)
कॅनरा
कच्छ
कर्नाटक
कलात (जिल्हा)
कांतित (परगणा)
काठेवाड
काश्मीर
कुंच ( =कुंछ ?) (परगणा)
कुर्दिस्तान
कुमाऊन
कोकण
कोकण–घाटमाथा
कोटा (प्रदेश)
कोटा–बूंदी मुलूख
खानदेश
खुरासान (सुभा)
खुर्जा (दिल्लीजवळील परगणा)
गोवे
घाट कारबाली (कारकारी वा कारेली)
चारठाणा (परगणा)
चारदा
चौमहला (परगणा)
जॉर्जिया
जुना हमरस्ता, दख्खन ते आग्रा

डांगिया राज
तळकोकण
तराई
तातरी
तुर्कस्तान
त्रिवेणी
दतिया
दक्षिण
दांगिया (मुलूख)
दुआब
देश (महाराष्ट्राचा भाग)
धरमपूर (संस्थान)
नोकारा (परगणा)
पाओटा (कसबा)
पाटोदी (कसबा)
पाली (परगणा)
पिपळोद (परगणा)
पिलानी (परगणा)
पैनघाट (तालुका)
बसरीर (परगणा)
बघेलखंड
बहरीन (बेट)
बालाघाट
बावन (परगणा)
बुंदेलखंड
बूंदी
बैरा (परगणा)
भिंड (परगणा)
भैरवघाट
महाराष्ट्र
माजिन्दरान (सुभा)
मावळ (कोकणचा भाग)
माहँच (परगणा)
माळवा
मुंजवार (परगणा)
मुऱ्हा
मुलतान
मौदा (परगणा)
रण (कच्छचे)
रीवा संस्थान
रोहिलखंड
लाखी दर्रा
लाखेरी दर्रा
वऱ्हाड
वऱ्हाड पैनघाट
वऱ्हाड बालाघाट
वायव्य सरहद्द प्रांत
विजापूर राज्य
विंध्याचल
सामी परगणा
साल्हट (जंगल)
सिकंदरा (दिल्लीजवळील परगणा)
सिमन्नी (परगणा)
सीस्तान (सुभा)
सुलतानपूर–नंदुरबार (परगणा)
हरहा (परगणा)
हवेली (परगणा)
हांडिया घाट (नदी उतरण्याचा)
हिमालय

## स्थलविशेष (स्वाभाविक)

### नद्या आणि तळी

ऑक्सस
कर्णफुली
काकरिया (तळे)
कृष्णा
गंगा
गंभीरा नदी
गोदावरी
चिनाब
चौदुला (तलाव)
जसवंत (तलाव)
तापी
ताल कटोरा
ताल-इ-काकरिया

तालाब खेलानाथ
तालाब हरताला
तुंगभद्रा
तोडा (तळे)
नर्मदा
नीरा
पूर्णा
वेटवा
ब्रह्मपुत्रा
भीमा
मही
महेन्द्री
मोहर
यमुना
रावी
वात्रक
सरस्वती
साई तालवार (तळे)
सावरमती
सिंद (यमुनेची उपनदी)
सिंधू
सोरठ
हेलमंद

## सराई, बागा वगैरे

गोशामहल (राई)
बाग-इ-बुलंद
बाग-दहर-आरा
बादिज (सावरमतीवरील उतार)
बाबा प्यारा उतार
मुहम्मद अमीनची राई
मोतीबाग
रमणा
राजा सराई (आजचे राजपुरा)
लाल बाग
लुत्फुल्लाहखानाचा बगीचा
शालीमार बाग
शाही बाग (अहमदाबादेजवळील)
सराई अल्लाह विर्दीखान
सराई कन्वर (=गानौर=गणौर)
सराई खोजा
सराई छाथ
सराई जौहरमल
सराई नरेला
सराई संभालका
सराई साहिल

## इमारती वगैरे

अजमेरी दरवाजा (दिल्ली)
अली मर्दानखानाचा कालवा
असद बुरुज (दिल्ली राजमहालाचा)
आकावीनचा मनोरा (काबूल)
ईदगाह
उर्दू बाजार (दिल्ली)
कदम-इ-शरीफ (पवित्र पाऊल ठसे दर्गा)
काबा मशीद
कारेज (कारंज) बाजार
कुत्ब
खानपूर (दरवाजा)
खानापूर (खिंड)
खैबर खिंड
गुडगाव रेल्वे स्टेशन
चांदणी चौक
चबुतरा (पोलीस कार्यालय, दिल्ली)
चिराग-इ-दिल्ली (नासिरुद्दीनचा दर्गा)
जहान-नुमा मशीद
जामअ मशीद
जाफरखानाची बाग (दिल्ली)
जाळी
जोहरी बाजार (दिल्ली)
झरोका
तस्बीहखाना
ताज
ताजगंज
दरीबा पानबाजार (दिल्ली)
दिवाण-इ-खास
देवडी (प्रवेश द्वाराजवळची खोली)
निजामुद्दीन अव्लियाचा दर्गा
पंबा दरवाजा (जुनी दिल्ली)
पटपटगंज (दिल्ली)

पहाडगंज (दिल्ली)
फळबाजार चौक (दिल्ली)
भद्र (गुजरातच्या सुभेदाराचे अहमदाबादेतील निवासस्थान)
मलिक मक्सूद गुजरातीची मशीद
मिस्रीखानाचे फाटक
मुघलपुरा (दिल्ली)
मैदानबाजार (अहमदाबादेतील)
मोठ की मस्जिद
रघुनाथाचे मंदिर
राजा भोज निवास
रोशनुद्दौलहची सोनेरी मशीद
रिकाबगंज
लाखी दर्रा (=लाखरी दर्रा=लकेरकेपुरा)
शाहजहानची कबर
शाह भिकनचा दर्गा
शाह शर्फ बूआली कलंदरचा दर्गा
शाहदौला (पूल)
शाह बद्रुद्दीनचा दर्गा (मंगल्ळ)
शेख मुईनुद्दीन चिश्तीचा दर्गा
सादुल्लाहखानाची हवेली
सेह-चुबा मार्ग

**किल्ले**

अजयगढ
अशेरी
इस्लामगढ
कलात
कली
कलमसार
कलकली
काच मिर्झा
काटंगा (गढ)
किशनगढ
कुकुरमुंडे
कुशर (कुराहरा) (करारा किल्ला)
कोंडाणा
कोटपुतळी
गढ कटांगा
गौरीगढ
चांपानेर
चाकण
चिखलदा
चौरागढ
जिंजी
तारागढ
तोरणा
देवगढ
दौलताबाद
धामोणी
नडियाद
पन्हाळा
पारनेर
पुरंदर
फुलचरी (चा वेढा)
बाणगढ
बाडीगढ
बिथली
भारगढ
भोपाळगढ
मांडवगढ
राजगड
रामगढ
रायगड
रूहतास
लांबकानी
लोहगढ (शिखांचा)
लौडी झुमंड
शाहगढ
शिवनेरी
शेरगढ
सिंहगड
सोनगढ

ग्रंग्र १–(१,१२२ पु.)–७.९३

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.